# लो. टिळक यांचें चरित्र

पूर्वार्ध

( सन १८९९ अखेर )

लेखक

नरसिंह चिंतामण केळकर

शके १८४५ पुणें. सन १९२३

प्रकाशकः—न. चिं. केळकर, पुणें.

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर, जगद्धितेच्छु छापखाना
५०७ शनवार पेठ, पुणें.

# अनुक्रमणिका


| भाग | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | कुलवृत्तांत ... ... ... ... | १ |
| २ | बालपण व विद्याभ्यास ... ... ... | २० |
| ३ | टिळकांपूर्वीचा महाराष्ट्र ... ... ... | ५१ |
| ४ | न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना ... ... ... | ९७ |
| ५ | केसरी व मराठा (१) ( १८८१–१८८७ ) ... | ११३ |
| ६ | कोल्हापूर प्रकरण व पहिली शिक्षा ... ... | १२६ |
| ७ | फर्ग्युसन कॉलेजची स्थापना ... ... ... | १६४ |
| ८ | टिळक विरुद्ध आगरकर ... ... ... | १७४ |
| ९ | भांडणें व राजीनामा ... ... ... | २०३ |
| १० | क्रॉफर्ड प्रकरण ... ... ... ... | २१७ |
| ११ | केसरी व मराठा (२) ( १८८७–१८९१ ) ... | २३६ |
| १२ | संमतिवयाच्या बिलाचा वाद ... ... ... | २४९ |
| १३ | टिळक व ग्रामण्य प्रकरण ... ... ... | २८० |
| १४ | पंडिता रमाबाईचे शारदा सदन ... ... | ३१३ |
| १५ | हिंदु–मुसलमानाचे दंगे ... ... ... | ३३२ |
| १६ | बापट कमिशन ... ... ... ... | ३६९ |
| १७ | किरकोळ चळवळी १८९०–१८९२ ... ... | ३८४ |
| १८ | टिळक व कायदेकौंसिल ... ... ... | ३९९ |
| १९ | दोन नवे राष्ट्रीय उत्सव ... ... ... | ४१८ |
| २० | राष्ट्रीय सभेच्या मंडपाचा वाद ... ... | ४४० |
| २१ | सार्वजनिक सभा व डेकन सभा ... ... | ४७१ |
| २२ | टिळक व लॉर्ड हॅरिस ... ... ... | ४९१ |
| २३ | १८९६ च्या दुष्काळांतील चळवळ ... ... | ४९९ |
| २४ | पुण्यातील प्लेगचा अनर्थ ... ... ... | ५१८ |
| २५ | राजद्रोहाचा पहिला खटला ... ... ... | ५३८ |
| २६ | तुरुंगवास व सुटका ... ... ... | ६०३ |
| २७ | टिळक व वेदकाल निर्णय ... ... ... | ६२५ |
| २८ | पुनश्च हरिः ॐ ... ... ... ... | ६४६ |

# सूची

## ठळक व्यक्तींच्या नांवांची सूची.


अ

अभ्यंकर वासुदेव शास्त्री ३०५
अभ्यंकर विनायक शास्त्री ४३६
अर्तोळ रुद्रगौडा ३५
ॲस्क्विथ ५८०–८१
ॲस्टन ५८६

आ

आगरकर ३२,७१,१००,१०२, १०७,१०९,११३,११४,११६, ११७,११९,१२०,१३३ते१४०, १४२,१४९,१६४,१६५,१६७, १७०,१७४,१७७,१७९,१८४, १८६,१९२,१९३,१९४,१९५ ते २००,२०३,२०६,२०८, २०९,२१०,२१३,२१४,२१५, २१८,२३९,२४०,२४१,२८१, २८३,२८४,२९९,३००,३२८, ४०५,४३३,४९२,
आपटे महादेव चिमणाजी २६२, २६३,२६४,२७१,२७२,३४०,
आपटे वामन शिवराम ३२,३३, १०६,१०८,१०९,११२,१२०, १३३,१३४,१४२,१६४ ते १६८,१९१,१९२,२०६,२०९, २१२,२१३,२१६,२४१,२९५,
आपटे हरि नारायण २५१,२८२, २९४,३९७,४०८,४१६,

उ

उपासनी श्री. बा. ३२,३५,३६,

ओ

ओक विनायक कोंडदेव ५९

औ

औंधकर श्रीनिवासराव परशरामराव ३६६,६७

क

करंदीकर र. पां. ४१०,४३२, ४४७,
करवीकर छत्रपती ४३०
कर्वे धोंडो केशव ३,१९८,१९९, ३२१,
कानिटकर काशीबाई २७३,२८३, ३०३,३०४,
कानिटकर गो. वा. ३६,२५१,२९४, ३०१,३०७,३०८,३०९
कानिटकर ना. वा. २६३,२७८, ४३७,
कानिटकर वा. बा. १६८,१८४, ३०७.३०८,४४२,
कीर्तिकर डॉ. १८८,१९०,
कुंटे माधवराव २४,६५,८१,८२, १०२,१७६,१७८,१८४,२७१, २७३,
कुरुंदवाडकर बापूसाहेब ३०१,३०२,
कुरुंदवाडकर बाळासाहेब ३०१,३०२, ४३०,४३२,
केळकर कृ. र. २२७ ते ७२,२९१,
केळकर वासुदेव बाळकृष्ण १०७, १०९,१६४,१६५,१६७,१७०,

१८४,१९४,१९५,२००,२०६,
२०८,२३८-२३९,२४१ ते
२४६,२९४,३२०,३२४,३३०,
३८८,४००,
केळकर न. चिं. २३५,४०८,५१३,
५६३,७४,७५,६६२,६३,७०,
क्राफर्ड १३,२१७ ते २२५,२८,३३,
३४,३५,३८२,८३,४७८,५४६,

ख

खरे दाजी आबाजी २८,३२,१८३,
३७६,४०३,९,१३,२३,५४७,
५१,५३,७५,६६७,
खरे वासुदेव शास्त्री १०३,४,६८
खाडिलकर कृ. प्र. ५६३,७४,६६२,
६३,७०.
खापर्डे गणेश श्रीकृष्ण ३२,३५,२६२,
८५.

ग

गर्दे डॉ. १२०.
गाडगीळ काशिनाथपंत ६५,२२८,
३५४,४३०,४४८.
गायकवाड मल्हारराव ५५,९१.
गायकवाड सयाजीराव ३७१,३७९.
गुरुजी कृ. आ. २४,२५.
गोखले गो. कृ. १७०,९२,९५,९९,
२०९,१०,११,१३,१४,१८,
२५,२६,२८,९८,३२४,५१,
५८,८७,८८,९०,९७,४०३,
४०६,१२,१३,१५,१७,४२,
४८,५०,५३,५७,६३,६५,६७,
७३,७७,७८ ते ८२,८३,८९,
९२ ते ९४,५४६,७६,६५७,७१.
गोखले हरि नारायण २०८,५४७,
७३.

घ

घाटगे आबासाहेब १४९.
घोरपडे बाबासाहेब ४१३,२९,३०,
३२.

च

चंदावरकर ३२,३६,१८४.
चाफळकरस्वामी ४२९,४३०.
चाफेकरबंधू ५७९,६५५,५७.
चिपळूणकर कृष्णशास्त्री ६३,६४,७३,
१०४,२९७.
चिपळूणकर विष्णुशास्त्री ७१,८०,
८२,८३,८६,९०,९८,१०२,
१०३,५ ते १०,१२,१६,१७,
१९,२०,२३,२४,३३,४४,६५,
६८,७५,२०५
चिपळूणकर सितारामपंत ९३,१५०,
१८४,२१८,२१,२५,४७६, ते
७८,४८४.
चिरोल व्हॅलेंटाईन २,४,३०३,४१९.
चौबळ मा. भा. ३२.

छ

छत्रे केरूनाना ३२,३५,६३,६४,
११८.

ज

जठार रावबहादूर ४०४ ते ४०८,
४१०
जमशेटजी जिजिभाइ १७२
जिन्सिवाले प्रोफेसर २७,३५,२६२,
६४,६५,७४,५४१,५६१
जोशी गणेश वासुदेव ९४,१०८,४७२
जोशी आनंदीबाई १८८,२८३,३१८
३२३, ३३१
जोशी गणेश व्यंकटेश ३९७

जोशी गोपाळराव २५२,८६,८७,८८
९२,९४,३०३
जोशी रामचंद्र भिकाजी १०८,१११,
२५१,५२,९४
जोशी वासुदेव गणेश २५२,७०,७२,
९४,९८,३७०,७४,७५

झ

झळकीकर भीमाचार्य १८७,२६२,
९३

ट

टिळक गंगाधरपंत ५,६,७,९,१२,
१३,१६,१८,२३
टिळक गोविंद रामचंद्र २२,२३
**टिळक बाळ गंगाधर.**
मूळ ठिकाण १, चिखलगांवची खोती ४, जन्म ६, कुलदैवत १०, कोकणी इस्टेटीची स्थिती १०, कोकणचा ऋणानुबंध ११ १२ वंशवृक्ष १७ १८, कुंडली ३७, मूळ नांव २१ मुंजीपूर्वीचें अध्ययन २१-२२, आईचा मृत्यू २२, टिळकांचे काका २३, लग्न २५, कॉलेजातील अभ्यास २६ २७, कविता २७ कॉलेजातील अभ्यासक्रम २८-३०, सहाध्यायी ३२, अध्यापक ३२-३३, एल्. एल्. बीची परिक्षा ३४ टिळक व न्यू इंग्लिशस्कूल ९७ व पुढे. टिळक व विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा सबंध ११२, कोल्हापूरप्रकरणीं फिर्याद १३४ डोंगरीच्या तुरुंगाकडे रवानगी १४४, फ. कॉ. करिता पायपिटी १६९ कॉलेजातील शिकविण्याची पद्धत १७०, ७१, टि. विरुद्ध आगरकर १७५ व पुढे, केसरीचे संपादक १९२,१९५ आगरकराविषयीं आदरबुद्धि २०१, डे. ए. सोसायटीचा राजिनामा २०३ व पुढे, क्रॉफर्ड प्रकरणातील मामलेदाराना सहाय्य २२५, डिग्विशी पत्रव्यवहार २३०, लातूरची गिरणी व लॉ क्लास २३७, छापखाना व कर्ज २४४ संमति बिल व सामाजिक सुधारणेविषयीं मत २५३,५५,५६,२८०, भांडारकरांच्या शास्त्रार्थास उत्तर २६०, ग्रामण्य प्रकरण २८६ व पुढे, कमीशनपुढील वादकुशलता २९२, धार्मिक आचाराबदल मत २९७, आगरकरावर फिर्याद २९९ पं. रमाबाईवर टीका ३२७, स्त्रीशिक्षणाविषयीं मत ३३१, हिंदुमुसलमानातील दंग्याचें निदान ३३७,३८ बापट व मिशनमधील कामगिरी ३७६ व पुढे, बॅ. ब्रॅन्सननें केलेली तारीफ ३८२, प्रांतिक परिषदेचे चिटणीस ३९१ म्युनिसिपल कौन्सिलर ३९४, कायदे कौन्सिलचे सभासद ४०९, टिळकांची आंकडेगिरी ४१७, गणपत्युत्सवाचे जनक ४१९, उत्सवासबंधीं मत ४२४, रायगडावरील उत्सवाविषयीं खटपट ४३५, राष्ट्रीय सभेच्या मंडपाचा वाद ४४० व पुढें, ब्रूट फोर्स व गोखल्यावर मात ४६७, 'हिंदू' वर फिर्याद ४६८, सार्वजनिक सभा काबीज केली ४७७, रानड्यावर आग पाखडतात ४८५, ८६,८७, लॉर्ड हॅरिसच्या स्मारकास विरोध ४९५,९६, दुष्काळांतील कामगिरी ५०० व पुढे, प्लेगमधील कामगिरी ५२६, सरकारवरील टीका व तारेवरील कसरत ५३३, रँडच्या खुनानंतरही कडक लेख ५४४, राजद्रोहाच्या खटल्याचे वारंट ५४७, स्वयंस्फूर्तीचा

जामीन ५५०, बाबा महाराजांचे ट्रस्टी ५५५, बंगाल व डिफेन्स फंड ५५७ टिळक व डिटेक्टिव्ह ब्रुइन ५६०, कोर्टांतील व्याकरण संबंधी खुलासा ५८७ अपील अर्ज ५९२-९७, डिफेन्स फंड ५९८ ९९ तुरुंगवास व सुटका ६०३ व पुढे, तुरुंगवासांतील भीतिप्रद कष्ट ६०३,४ सुटकेविषयीं हॉवर्ड असोसिएशनचे प्रयत्न ६०८-१०, चाफेकरांशी तुरुंगांत आलेला संबंध ६१४, ब्रुइनची सुटकेविषयीं कारवाई ६१५, मॅक्समुल्लरांचे सुटकेविषयीं प्रयत्न ६१६, १७, दाजीसाहेब खऱ्यांचा प्रयत्न ६२२ सुटका ६२३, रमेशचंद्र दत्त व केन यांनीं केलेले अभिनंदन ६२४, ग्रंथद्वय (आर्क्टिकहोम व ओरायन) ६२५ व पुढे सदरील ग्रंथावरील विद्वानांचे अभिप्राय ६३८-४५ सिंहगडावरील विश्रान्ति ६४६-४७, मद्रासची राष्ट्रीयसभा ६४८, मद्रास सिलोन व ब्रह्मदेश येथील प्रवास ६४९-५४, आधि सामाजिक कीं आधी राजकीय ६५३, पुण्यांतील खून ६५५-५८, 'टाइम्सची' माफी ६५९, ग्लोबवरील फिर्याद ६५९-६०, ग्लोबची माफी ६६१, टिळकांचे मदतनीस ६६२,६३ राहणी व कुटुंब ६६३,६४,६५,६६ स्नेही मंडळी ६६७, पुनश्च हरिः ॐ ६६८-७० भावी चरित्राची प्रस्तावना ६७१-७२

### त

तय्यबजी बद्रुद्दिन ३३७,५५०,५१, ५६३

तेलंग काशिनाथ त्र्यंबक ३६,९०, १४२,१६५,७६,८०,८३,८४, ८८,८९,२५९,२६०,६२,७७, ९६,३१९,३३७,४००.

### द

दाते श्रीधर विठ्ठल २२६,४५४ ते ६१,५७८.

दादोबा पांडुरंग ६०,७२.

दांडेकर नारायण भाई १६६,३०३, ३०४,४०२.

दावर बॅ. ५४८,५५०.

दीक्षित शं. बा. ४३५.

देशमुख गोपाळ हरि ५६,५७,७०, ८१,८५,१३०,१८४,३८८.

देशमुख नानासाहेब ३५,३६,५५२, ६६०.

द्रविडबंधू ६५६,५७.

### घ

घारप प्रो. २१३.

### न

नातु बाळासाहेब २२८,६८,७१,७८, ३४०,५३,८७,८८,८९,९२, ९४,९५,४२०,४३२,४४९ ते ५४,५७,५८,६२,५४९,६६७.

नामजोशी माधवराव १०३,१०७, ११३,१४,१६,१७,२०,२१, ३३,८४,२०५,६,९,१०,१२, १६,१७,१८,२८,६८,७१,७८, ३४०,३५३,३८७,८८,८९,९२ ९४,९५,४२७,४३२,४४१, ४९३.

नूलकर कृ. ल. ८७,२२७,२९,५१, ५५,५९,७१,७४,३२४.

नेने आणासाहेब ५५०,५५३.

नौरोजी दादाभाई ५५,७६,९१, १२९,३१७,४१७,४७२.

## प

पटवर्धन आण्णासाहेब ३९५,३९७, ४७७,५०२.
पारसनीस द. ब. ४३३.
पुरंदरे सरदार २५१.

## फ

फडके वासुदेव बळवंत ७०,८३,९३.
फुले जोतिराव ६९,७०.

## ब

बखले कं. ना. १३४,३५,३६,४०, ४२,४४.
बर्वे माधवराव १३०,३२,३३,३६, ३८,४४,२५९.
बानर्जी सुरेंद्रनाथ २६२,४१४,४३३, ६२,६३,
बापट रावसाहेब ३६९,७०,७१,७३, ७४–८०,८३,६६७.
बावा महाराज २२७,३५३,४२०, ४४८,४७७,५५४,५५७.
बेळवी द. त्र्यं. ४१७.
ब्रॅडलॉ चार्लस २३२,२४०.
ब्रॅन्सन ३८२,५८०.
ह्युइन ४९३.५५९,५६१,६५६, ६५७.
ब्लूमफील्ड ६४०,४१,४२.

## भ

भागवत हरि रघुनाथ २१३.
भाटवडेकर सरभालचंद्र ३४०,५५२,
भाजेकर बंडोपंत ३४०.
भानू चिं. गं. ४३२,५४१.
भांडारकर रा. गो. ७,१६,३३,३६, ९०,१६५,६६,६९,१७८,२०८ २१२,१३,२७,४४,४६,५१, ५७,५९ ते ६१,६७,६८,७० ते ७२,७५, ते ७७.
भांडारकर रा. गो. २९५,३१६, १९,२७,४९७,५२६,४७,६६,
भिडे वि. मो. २२८,८५,३०४,२४, ९०,४७८.
भाइशंकर सॉलिसिटर ५६२, ७२.
भिडे. स. पा. १३०.३३,३५,३६, ३८,३९,४०,४१,४२,४४, १५१.
भिंगारकर श्रीपती बोवा ३०५.

## म

मणिभाई दिवाण ३८२,४२३.
मलबारी बहिरामजी ३५,१७६,१७९, ८४,८७,८८,२५०,५१,५४,
माधवराव सर टी ५५,१२९,१३०, ३७०,७२,७३.
मालवीय म मो. ४३३.
मित्र रमेशचंद्र २६७,५८,६२.
मेथा फेरोजशहा ३४,७३,७६,८४, ८७,१३३,३४,४०,३४०,४१, ७५,७७,७९,९०,४१०,३९, ४६,५५८,६४८,६५९.
मोडक वामन आबाजी ६५,१०५, १७६,८४,८९,३१६,३१९,
मॅक्समुलर ६२५,६२६,२८,३१, ३९.
मंडलीक वि. ना. ३,३४,७३,८४, ८७,१०९,१४५,६६,८३,२१७

## य

याज्ञिक जव्हेरलाल २७३,३३५, ३३७.४०१,४०९.
यंदे दा. सा. ७१,१४५.

र

रमाबाई पंडिता १२१,२४४,४५,
८३,३१३,३१६,२०.
राजवाडे वै..का. २५१,२९५,५१३.
रानडे बंडुनाना २७४.
रानडे महादेव गोविंद. ३३,६०,६५,
७३,७६,७८,८१,८८,८९,
१३७,३९,४०,६५,६७,७६,
७८,८०,८४,८८,८९,९१,९२,
९९,२०८,१२,१७,१८,२२५,
२७,३९,४४,४६,५४,५६,५७,
७२,८१,८५,८७,८८,८९,९१,
९४,ते३००,३०३,४ते७,९,१०,
१४,१६,१९,२६,२७,२९;४१,
४२,९३,९९,४००,४०३,४,६,
१२,२३,२९,३०ते३२,३८,४०
४२,४९,५३,५७ ते ६१,६४,
७३,७५,८३,८५ते९०,९४,९६,
५०२,६,४८,५१,६३,८५.
रानडे रमाबाई ९३,३०३,३०४,
३०८.
रँड ३५६,५२३,२४,३२,३४,४२,
४३,७७,७८.

ल

लागवणकर बाळशास्त्री २६५.
लाड भाऊ दाजी ८४.
लेले भाऊ शास्त्री २९७,५५२,
५८२.

व

वर्डस्वर्थ प्रो. ३५,३६,६४,१०९,
१४५,१६५,१८०.
वाकर्नास दि. ह. २३७.
वाच्छा सर दिनशा ३९१,४०६,४१४,
४४०,४६,
वारद आप्पासाहेब ५०३.
विंचूरकर बाळासाहेब ६६२
विद्वांस घोंडोपंत २३६,४६,४१०,
६३,५५८,७३,७५.
वेडरबर्न ३८८,९३.
वैद्य ग. भा. ५८२.

श

शारंगपाणी ३२,३५,३६.

स

साने. का. ना. १०५.
साने रा. मो. २७२,९४,३८८,९०.
साठे के. ब. ११४,१५,१२०.
साठे शि. ह ११८,१८४.
सेटलवाड चिमणलाल २६२,३५३,
९१,४०२,९,१०,१३,३२,
५५४.
स्टॅंचि. न्या. ५६३,६४,७१,८५,
८६.

ह

हॅरिस लॉर्ड १६८,३३३,४१,४५,
४७,४०७,२८,४९३ ते ९८,
५६३.
हुकुमचंद ईश्वरदास ३९४,९५

# प्रस्तावना.

लो. टिळक हे ता. १ आगस्ट १९२० रोजीं मृत्यु पावले, त्याबरोबर त्यांचें एखादें चरित्र लिहिलें जावें अशी सर्व महाराष्ट्रानें, जवळ जवळ एका आवाजानें, आपली इच्छा प्रदर्शित केली लोकमान्यांच्या चरित्रासंबंधीं अनेकांनीं अनेक रीतींनी सूचना प्रगट केल्या. त्यांतील कांहीं सूचना व्यक्तिशः आमच्याकडे पाठविण्यांत आल्या. महाराष्ट्रीय वाचकांची ही इच्छा शक्य तर पुरी करण्याचा प्रयत्न आपणहि करून पहावा अशा बुद्धीनें ता. २४ माहे आगस्ट १९२० च्या केसरींत लो. टिळकांचें चरित्र लिहिण्याचा आमचा संकल्प आम्हीं जाहीर करून, सर्वत्र पसरलेल्या टिळकभक्तांना व मित्रांना त्यांच्या संबंधीं असलेली माहिती पत्रें टिपणें वगैरे साधनें या कामीं सहकारिता-बुद्धीनें आम्हाला पुरविण्याची विनंति केली. आणि आम्हीं हातीं घेणार तें चरित्र पुढील सालच्या ( १९२१ ) फेब्रुवारी मार्चचे सुमारास प्रसिद्ध होईल अशी त्याच अंकांत जाहिरातहि दिली गेली हें वाचकांस कदाचित स्मरत असेल.

पण येथून पुढें अनेक प्रकारच्या उद्योगांत आम्ही सांपडल्यानें, व कांहीं दिवस आजारीहि पडल्यानें, १९२१ चा फेब्रुवारी–मार्च तर फुकट गेलाच, पण १९२१ –तल्या टिळकांच्या प्रथम श्राद्धतिथीसहि आमच्या हातून हें काम झालें नाहीं. येवढेंच नव्हे तर पुढील सालींहि (१९२२ आगष्ट) आमचा हा निश्चय फुकट गेला.

आमचा पूर्वसंकल्प तडीस न गेल्याबद्दल स्वतः आमच्याप्रमाणेंच ज्यांची निराशा झाली होती अशापैकीं कांहीं गृहस्थांनीं याच सुमारास स्नेहभावानें आमचा निषेध केला, व कांहींनीं आम्हाला पुनरुद्युक्त होण्याला उत्तेजन दिलें. मुंबईच्या 'क्रॉनिकल'लाहि पत्रें पाठवुन आम्हीच हें चरित्र लवकर लिहावें अशा सूचना कांहीं गृहस्थांनीं केल्या. यामुळें हें काम हातीं घेण्यास अधिक विलंब करूं नये असें आम्हालाहि वाटूं लागलें. चालचलाऊ काम मागें टाकण्याच्या इच्छेनें पुण्याबाहेरील दौऱ्यांचा पाय आम्हीं प्रथम किंचित् मागें घेऊन पाहिला. पण खुद्द पुण्यांत राहून तरी नित्यनैमित्तिक कामें बाजूस टाकूं म्हणणें हे पाण्यांत आकंठ बसून अंग कोरडें ठेवूं म्हणण्यासारखेंच व्यर्थ होय ही गोष्ट, आमच्याच काय पण आमच्याशीं नित्य कामकाज पडणाऱ्या इतरांच्याहि, निदर्शनास पूर्णपणें आली असेल. पुणें सोडून बाहेर जाऊन राहणें आम्हाला जितकें कठीण तितकेंच पुण्यांत राहून, म्हणजे इतर व्यवसाय सांभाळून, चरित्रलेखनाचें काम करणेंहि कठीण. पण गतवर्षी टिळकांच्या श्राद्धतिथीला जो संकल्प आम्हीं तिसऱ्यांदा जाहीर केला तो याहि सालीं फिरून चवथ्यांदा जाहीर करावा हें अगदीं जिवावर आलें. म्हणून खुद्द पुण्यांतच राहून व इतर सर्व कामें नेहमीप्रमाणें करीत

राहूनहि, म्हणजे अधिक श्रम पडले तरी ते पतकरून, टिळकांच्या चरित्रग्रंथाचा निदान एक खंड तरी येत्या आगस्टच्या आंत प्रसिद्ध करावाच करावा अशा उमेदीनें आम्ही या कार्याला लागलों. आणि सुदैवानें ही मर्यादित इच्छा तरी सफळ झाली याविषयीं मनापासून आनंद वाटतो.

लो. टिळकांचें चरित्र लिहिणें ही गोष्ट आजच्याहि घटकेला बरीच अवघड व नाजुक आहे. एक तर खुद्द टिळकांच्या हयातींत उठलेले वादाच्या धुळीचे लोट जमिनीवर बसण्याला व आरपार स्वच्छ दिसूं लागण्याला अडीच वर्षे सतत स्रवलेलें विस्मृतीचें दहिंवर पुरें झालेलें दिसत नाहीं. दुसरें असें कीं, टिळकांच्या चरित्रांत सरकारी नोकर आणि राष्ट्रीय पक्षांतील निरनिराळ्या ध्येयांचे व स्वभावाचे लोक यांचा इतका निकट व गुंतागुंतीचा संबंध आला कीं, त्यांतलि कांहीं कांहीं बाबींची खाजगी माहिती, कोणा लिहिणारास असली तरी, ती प्रकट करण्याची वेळ अद्यापि आलेली नाहीं. कांहीं हकीगती चारदोन पिढ्या गेल्यानंतर ऐतिहासिक म्हणून उघड रीतीनें सांगतां येतील, व त्या ऐकून हर्ष अमर्ष विषाद वाटणाऱ्या व्यक्ती नाहींशा झाल्यामुळें त्यांविषयीं शुद्ध कौतुकच शिल्लक उरेल. पण टिळकांना दिवंगत होऊन पुरीं तीन वर्षेंहि न झाल्याकारणानें अशा हकीगती प्रसिद्ध करणें हें काम आज सहजच अवघड होऊन बसतें. तथापि, या अडचणी लक्षांत घेऊनहि चरित्रलेखनाचें आजचें काम उद्यांवर ढकलणें योग्य होणार नाहीं. असें मनाशीं ठरवून आम्हीं त्या कार्यास लागलों. कारण आज प्रसिद्ध न करितां येण्याजोग्या गोष्टी पुढें प्रसिद्ध करितां येईपर्यंत थांबावें, तर दुसरे पक्षीं या विलंबामुळें आज स्मरणांत ताज्या असणाऱ्या दुसऱ्या कांहीं गोष्टी त्या वेळेपर्यंत स्मरणांतून नाहींशा व्हावयाच्या. मिळून बेरीज तीच येणार! काळाचीं दोन टोकें धरावयास जावें तर कोणतें तरी एक हातीं येतें व दुसरें सुटून जातें. या करितां चरित्रलेखनाचें काम न थांबवितां त्यांतील आज लिहितां येण्याजोग्या गोष्टी कोणी आज लिहाव्या, आज न लिहितां येण्याजोग्या गोष्टी पुढें ढकलून लिहितां येतील तेव्हां दुसऱ्या कोणी त्याहि लिहाव्या, व अशा रीतीनें अनेक हातांनीं व अनेक हप्त्यांनीं असलीं कामें पूर्ण करावीं, हाच मार्ग अधिक श्रेयस्कर होय. किंबहुना एक धार्मिक दाखला घ्यावयाचा तर असेंहि म्हणतां येईल की, ज्यानें देऊळ बांधावें त्यानें स्वतः त्यावर कळस न लावतां दुसऱ्यानें लावण्यासाठीं राखून ठेवावा, त्याप्रमाणें औचित्याच्या दृष्टीनें स्वतः आम्हाला आज या घटकेस ज्या हकीगती देतां आल्या तेवढ्याच आम्ही या ग्रंथांत दिल्या आहेत, इतर हकीगती कालांतरानें सांगणें किंवा इतरांनीं सांगणें हेंच योग्य ठरेल; व पुढें त्या तशा योग्य वेळीं योग्य लोकांकडून लिहिल्या जाऊन टिळकांच्या चरित्रग्रंथाला पूर्णता येईल असा आमचा भरंवसा आहे.

कांहीं हकीगती आज सांगतां येण्यासारख्या नाहींत म्हणून त्या वगळल्या ही

अपूर्णत्वाची एक बाब झाली. पण तशा दुसऱ्याहि कांहीं बाबी आहेत. विषयासंबंधानें सामान्यतः पूर्णत्वाची जी दृष्टी तीच विषय मांडण्याच्या पद्धतीसंबंधानेंहि असते. कांहीं चरित्रें केवळ माहिती देण्याच्या दृष्टीनें लिहिलेलीं असतात, कांहीं निवळ गुणवर्णनपर असतात, कांहींत या दोन्ही गोष्टींना बराचसा संक्षेप दिलेला असून त्यांत विषयानुसंधानानें मुख्यतः तात्विक विवेचनच असतें, व कांहीं केवळ एखादा विशेष पक्ष समर्थन करण्याकरितांच लिहिलेलीं असतात. या सर्व दृष्टींचा मेळ बसत नाहीं, व कोणीं तो बसविण्याचा प्रयत्न केला तर ती एक प्रकारची कंथा बनून तिचा विस्तारहि बेसुमार होतो, हें जाणून आम्हीं फक्त एकाच दृष्टीनें हा चरित्रग्रंथ लिहिला आहे. ती दृष्टी म्हणजे प्रकरणवार साधार भरपूर व जुळवून माहिती देण्याची. ही पद्धति सर्वांत अधिक नीरस ठरण्यासारखी असते. पण इतिहास-कथनाच्या पायावरच पुढें गुणवर्णन, तात्विक विवेचन, वगैरेंची इमारत बांधतां येते. यामुळें ज्याला सर्वांत कमी लेखनकौशल्य लागतें अशी व निवळ काबाड-कष्टाची पद्धति तेवढीच आम्ही स्वीकारून हा चरित्रखंड वाचकांना सादर केला आहे. इतर दृष्टी चालवून या चरित्राचे कांहीं भाग लिहिण्याची स्वतः आम्हांसहि हौस वाटते, नाहीं असें नाहीं. पण हल्लींच्या या खंडांत टिळकांच्या चरित्राचा फक्त सन १९०० पर्यंतचा, म्हणजे निम्माच किंवा निम्याहूनहि कमी, भाग आल्यामुळें आम्हांस तसें करितां येणें अशक्यच झालें आहे. म्हणून गुणवर्णन, तात्त्विक विवेचन, वगैरे कांहीं भाग आम्हांस लिहावयाचे ते या चरित्राच्या उत्तरार्धाच्या शेवटीं लिहिण्याचें आम्ही योजिलें आहे.

या चरित्र–ग्रंथाचीं साधनें मिळालीं तेवढ्यांचा उपयोग आम्हीं केलाच आहे, तथापि हीं साधनें जितकीं भरपूर असावीं तितकीं नाहींत हें कबूल करणें प्राप्त आहे. अशा साधनांत सामान्यतः खालील प्रकार असतात (१) पूर्वी वेळोवेळीं इतरांनीं लिहून ठेवलेले त्या त्या मुदतीपर्यंतचे म्हणूनच अपुरे चरित्रग्रंथ (२) स्वतः चरित्रविषयक व्यक्तीनें लिहून ठेविलेलें आत्मचरित्र किंवा त्या संबंधाचीं टिपणें (३) समकालीन खासगी वृत्तपत्रें वगैरेंतून, म्हणजे सार्वजनिक लेखांतून, आलेली माहिती (४) समकालीन पत्रव्यवहार (५) समकालीन लोक किंवा स्वतः चरित्र-विषयक व्यक्ती यांच्या रोजनिशा, इत्यादि. यांपैकीं नं. १ च्या सदराखालीं पड-णारीं कांहीं पुस्तकें उपलब्ध आहेत. लो. टिळक वारले तेव्हां, तसेंच पूर्वी वेळोवेळीं त्यांजवरील खटल्यांच्या हकीगती ग्रंथरूपानें प्रसिद्ध झाल्या तेव्हां, टिळकांचीं कांहीं चोटक चरित्रें प्रसिद्ध झालीं होतीं. पण त्यांहून सविस्तर असें चरित्र म्हणजे श्री. कृष्णाजी आबाजी गुरुजी यांनीं लिहिलेलें होय. या चरित्राचा उपयोग या पुस्तकाचे पहिले दोन भाग लिहितांना आम्हांस बराच झाला आहे. नं. २ च्या सदरांत पडण्यासारखा एकहि प्रबंध उपलब्ध नाहीं. टिळकांनीं आत्मचरित्र असें कधींच लिहिलें नाहीं, किंबहुना आत्मचरित्रपर अशा गोष्टीहि त्यांनीं लेखांत किंवा

व्याख्यानांत कधीं फारशा सांगितलेल्या नाहींत. नाहीं म्हणावयास चिरोलप्रकरणीं आपल्या वकिलाला माहिती देण्याकरितां म्हणून त्यांनीं चारदोन पानांची आपली एक सालवार जंत्री तयार केली होती. नं. ४ च्या सदरांत पडणारी माहिती फारच थोडी मिळाली. टिळकांचा पत्रव्यवहार अगदींच थोडा होता असें नाहीं. पण या चरित्रग्रंथाकरितां जाहीर विनंति केली असतांहि, आम्हाला महत्त्वाचीं अशीं टिळकांचीं दहापांच पत्रें देखील कोणाकडून मिळालीं नाहींत. मोठ्या किंवा लब्धप्रतिष्ठित माणसांना टिळकांकडून अनेक पत्रें गेलीं असतील, पण आमची विनंति आधीं सहसा अशा कोणा लोकांच्या कानावर गेली असली तरी, ते टिळकांचीं पत्रें हुडकून काढून आम्हांस पाठविण्याचे श्रम घेतील ही अपेक्षा आम्हीं तरी कां करावी ? लहानसहान किरकोळ माणसांना स्वतः टिळकांकडून गेलेलीं अशीं पत्रें थोडींच असणार, व तींहि त्यांनीं विशेष जपून ठेवलेलीं आहेत असें दिसत नाहीं. पण टिळकांचा उपकारी स्वभाव किंवा सामान्य दाक्षिण्यवृत्ति याहून अधिक मोठे विषय अशा पत्रांतून निघण्यासारखे नसणार, यामुळें तीं मिळविण्याचा विशेष प्रयत्नहि आम्हीं केला नाहीं. टिळकांना लोकांकडून आलेलीं पत्रें राखून ठेविलीं गेलीं असतीं तर हजारों मिळतीं. पण टिळकांचा नेहमींचा क्रमच असा असे कीं, त्यांना उपयोगी पडण्यासारखीं अगदीं निवडक अशीं पत्रें शिल्लक ठेवून ते बाकीच्यांचीं पुडकीं बांधून टेबलावर ठेवीत, व चारसहा महिन्यांनीं एकदां बसून सर्वांचा संहार करून टाकीत. पण आवक पत्रव्यवहाराच्या 'सामान्य प्रलया'ची ही कथा झाली. कारण ' विशेष प्रलय ' म्हणूनहि कांहीं होत. टिळकांवर खटले जरी तीनचार वेळच झाले तरी त्यांच्या घरावर झडती वारंटें येण्याची बातमी कित्येकदां तरी निघाली होती. अर्थात् अशी बातमी येतांच पहिलें काम म्हटलें म्हणजे कागदपत्र नाहींसे करणें! कारण झडतीमध्यें कोणाचा कसला कागद सांपडेल याचा नेम कोणी सांगावा ?

पांचव्या सदरांत पडणारे कागद आम्हास मुळींच मिळाले नाहींत. आपल्या इकडे आधीं रोजनिशा ठेवण्याची पद्धतच मुळीं कमी आहे, व कोणी ठेविल्या तरी त्यांनाहि सरकारी झडतींचें गंडांतर केव्हां येईल याचा नियम नसल्यानें त्या न ठेवण्याचें कामीं आळसाला भीतीची मदतच होते. रोजनिशांचा दुरुपयोग झाल्याचीं कांहीं ठळक उदाहरणेंहि वाचकांना आठवत असतीलच. मग रोजनिशी ठेवण्याची पद्धत चुकली म्हणा किंवा घेणारांनीं त्यांचा गैरवाजवी फायदा घेतला म्हणा. ग्लॅडस्टनचें चरित्र लिहीत असतां, वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, सर्व मोठ्या कामकाजाचे प्रचंड छापील अहवाल, कित्येक रोजनिशा, व आत्मचरित्ररूप टिपणें वगैरे मिळून सुमारें तीन लक्ष अस्सल कागदपत्रांचा उपयोग मोर्ले यांना झाला. अशा चरित्रांना स्वतः किंवा इतरांनीं लिहिलेल्या रोजनिशांचा किती उपयोग होऊं शकतो हें जॉन मोर्ले यांनीं लिहिलेलें ग्लॅडस्टन

साहेबांचें चरित्र ज्यांनीं वाचलें असेल त्यांना सांगण्याचें कारण नाहीं.

राहतां राहिली नं. ३ च्या सदरांत पडणारीं साधनें, म्हणजे वृत्तपत्रें वगैरे. याहि बाबतींत केसरी व ज्ञानप्रकाश यांखेरीज इतर वर्तमानपत्रांच्या जुन्या फायली आम्हास फारशा मिळूं शकल्या नाहींत. पैकीं केसरीच्या फायलीच आम्हाला या चरित्रग्रंथाला मुख्यतः उपयोगी पडल्या. १८८१ ते १८९९ पर्यंतच्या एकोणीस फायलींपैकीं सुमारें दहा फायलींतील लेखांचा टिळकांशीं प्रत्यक्ष संबंध येत असल्यामुळें, हें साधन बिनमोल ठरतें हें सांगावयास नकोच. निदान या अवधींत घडलेली कोणतीही गोष्ट स्वतः टिळकांना कशी दिसली किंवा वाटली हें तरी त्यावरून प्रत्यक्ष कळण्यासारखें होतें, म्हणून हीं फायलें म्हणजे टिळकांच्या सार्वजनिक रोजनिशाच म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि त्यांतहि ही एक उणीव आहे कीं, प्रतिष्ठित वर्तमानपत्राच्या पद्धतीप्रमाणें, संपादकासंबंधीं खाजगी गोष्टींचा त्यांत मागमूसहि आढळत नाहीं. ग्लॅडस्टनसाहेबांच्या त्या खाजगी रोजनिशा व टिळकांच्या या जाहीर रोजनिशा यांतील फरक उघडच दिसून येणारा आहे. लेखी रोजनिशांच्या अभावीं टिळकांचे आप्त व स्नेही हे खाजगी माहितीची वाण केवळ आपल्या स्मरणानें किती भरून काढणार? व ती भरून काढण्याचा प्रयत्न केला असतांहि तो फारसा सफल होऊं शकत नाहीं हें आम्ही अनुभवानें सांगूं शकतो. यांत खरा दोष कोणाचाच नाहीं. स्मरणानें बिनचुक व सुसंगत असें कोणी झाला तरी किती लिहिणार? जी गोष्ट इतरांची तीच स्वतः आमचीहि. आमच्या आठवणी झाल्या तरी त्या १८९६–९७ पासून पुढच्या, आणि हा पहिला चरित्रखंड तर आम्ही १८९९ अखेरच संपविला आहे. तथापि केसरीच्या फायलीखेरीज इतरत्रहि थोडथोडी माहिती आम्हांस मिळाली, व ती ज्यांकडून मिळाली त्या सर्वांचे आम्ही येथें एकवटच आभार मानितों. कोणत्या प्रकारची माहिती आमच्याकडे पाठविली असतां या चरित्रग्रंथाला उपयोगी पडेल याची नक्की कल्पना नसल्यानें, किंवा आम्हांला ती कल्पना देतां न आल्यानें, आपल्या संग्रहीं असलेली माहिती कोणाला यापूर्वी आम्हांस पुरवितां न आली तरी हा पूर्वार्ध वाचल्यावर ही कल्पना येऊन, ती माहिती कोणी आम्हाकडे यापुढें पाठविल्यास या चरित्राच्या दुसऱ्या खंडांत, किंवा याच खंडाची दुसरी आवृत्ति निघण्याचा सुप्रसंग आल्यास, तिचा आभारपूर्वक योग्य तो उपयोग केला जाईल.


शेवटीं, या चरित्रलेखनाचे कामीं ज्यांची ज्यांची म्हणून आम्हांस मदत झाली त्या सर्वांचे आभार आम्ही मनःपूर्वक मानतों. यांतील दोनतीन भागांची प्रत किंवा टिपणें करण्यास प्रथम पुणें अनाथ विद्यार्थीगृहांतील एकदोघे विद्यार्थी व आमचे कल्याणचे स्नेही गणेश कृष्ण फडके यांनीं मदत केली, व त्यानंतरहि फडके यांनीं अनेक उतारे करण्याचें काम आस्थापूर्वक केलें याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. परंतु हें पुस्तक लिहिण्याचें बहुतेक सर्व काम १९२२

आगस्टच्या दुसऱ्या आठवड्यापासून रीतसर सुरू झालें. तें काम मध्यंतरींचे दौरे व इतर कामधामाचे दिवस वगळून, आज तारखेपर्यंत एकसारखें करण्यास, म्हणजे आम्ही तोंडानें सांगितलेला मजकूर लिहिणें, तो लिहून होत असतां वेळोवेळीं उपयुक्त सूचना करणें, फायलींतून किंवा पुस्तकांतून संदर्भ काढून देणें, व मधून मधून कांहीं प्रुफें तपासणें, या सर्व कामांत केसरी मराठ्याचे उपसंपादक वर्गापैकीं श्री. गजानन विश्वनाथ केतकर बी. ए. एल् एल् बी. यांची आम्हांस सर्वतोपरी मदत झाली तिजबद्दल त्यांचे आम्ही फार आभारी आहों. सांगितलेलें काम म्हणून तर केतकरांनीं तें केलेंच, पण त्यांतल्याल्यांत आपल्या आजोबांचें चरित्र आपल्या हातानें लिहून होत असल्यानें आपण एक प्रकारें पितृऋणच अंशतः फेडीत आहोंत या बुद्धीनें त्यांनीं हें काम अत्यंत आस्थापूर्वक केलें असेल हें आम्ही सांगितलें पाहिजे असें नाहीं. आमचे मित्र व सहकारी श्री. धोंडोपंत विध्वंस यांची या कामीं मदत किती झाली असेल याची कल्पना वाचकांस सहज करतां येईल. जगद्धितेच्छु छापखान्याचे मालक केशव रावजी गोंधळेकर यांनींहि हें पुस्तक ठराविक मुदतींत प्रसिद्ध करण्याच्या आमच्या इच्छेला मान देऊन, विलंब न करितां तें छापून काढण्याचें कामीं विशेष लक्ष दिलें याबद्दल आम्ही त्यांचेहि आभारी आहोंत.

प्रस्तुत चरित्र-ग्रंथ लिहिण्याचें काम नाजूक व जोखमीचें असें आम्हास कां वाटतें हें प्रारंभीं सांगितलेंच आहे. तथापि महाराष्ट्रांतील वाचकवर्गाची इच्छा व आमचें कर्तव्य हीं दोन्हीं लक्षांत घेऊन विद्यमान परिस्थितींत तो ग्रंथ बनला तसा लिहून आम्हीं प्रसिद्ध केला आहे. त्यांतील अनेक दोषांची जाणीव वाचकांप्रमाणें आम्हालाहि आहे. तथापि संकल्पाप्रमाणें हा पहिला चरित्रखंड तरी लोकमान्य टिळकांच्या तृतीय श्राद्धतिथीच्या आधीं प्रसिद्ध करितां आला येवढ्यांतच आमचा स्वतःचा संतोष आहे, व वाचकांनींहि तो आहे तसाच गोड करून घ्यावा अशी आमची त्यांना सविनय विनंती आहे.

पुणें
चैत्र शु. पौर्णिमा शके १८४५
रविवार ता. १ एप्रिल सन १९२३

न. चिं. केळकर.



बाळ गंगाधर टिळक.

# भाग १ ला

# कुलवृत्तान्त

टिळकांचें मूळ ठिकाण रत्नागिरी जिल्ह्यामध्यें दापोली तालुक्यांत चिखलगांव हें होय. या गांवचें पेशवाई सरकारी वर्णन 'मौजे चिखलगांव, तर्फ जालगांव तालुके सुवर्णदुर्ग' असें होतें. हल्लीं रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोली तालुक्याच्या मामलतींत त्याचा अंतर्भाव होतो. चिखलगांव हें कांप–दापोलीच्या दक्षिण दिशेस सुमारें आठ मैलांवर आहे. कोंकणचा कोणता हि भाग सामान्यतः सृष्टिसुंदर असतो. तसाच हा हि आहे. सृष्टिसौंदर्या बरोबरच कोंकण प्रांतांतील लोकांना बुद्धिमत्तेची देणगी उच्च प्रतीची असते. पण कोंकणी लोकांत जसे कांहीं विशेष गुण तसेच कांहीं अवगुणहि आहेत. हे गुण व हे अवगुण मिळून असा एक सांचा निर्माण होतो कीं, 'कोंकण्या म्हटला म्हणजे त्याचें लक्षण अमुक असावयाचें व अमुक एक लक्षण असेल तर तो कोंकण्या असावयाचा' असा सामान्य नियम हि घालितां येईल. कोणास कोंकणस्थांची थट्टा किंवा मानखंडना करावयाची तर ते चितेपासून झालेले म्हणून 'चित्पावन' असें म्हणावें, किंवा कोंकणस्थांविषयीं अभिमानबुद्धि व्यक्त करावयाची तर 'ज्यांचें चित्त पावन म्हणजे पवित्र ते चित्पावन' अशी व्युत्पत्ति लढवितां येते. वास्तविक हें दोन्ही प्रकारचें शब्दसाधन काल्पनिक आहे. पण चित्पावनांच्या गुणावगुणमिश्रणाचा नियम मात्र अनुभवसिद्ध होय.

चित्पावनांना 'फिनिक्स' नांवाच्या पक्षाची उपमा बरोबर लागू पडते. हा पक्षी चितेपासून उत्पन्न होतो अशी पौराणिक दंतकथा अगर कविसंकेत ग्रीक वाङ्मयांत आढळतो. तो प्रायः एकलकोंडा राहतो. त्याला फारशी जूट आवडत नाहीं. तो जबरदस्त असून त्याची भरारी फार मोठी असते. तो इच्छामरणी म्हणून अमर या नांवास योग्य आहे. आपल्या एका स्थितीचा त्याला कंटाळा आला म्हणजे तो स्वेच्छेनें आपला देह जाळून घेतो, आणि आपल्या चितेपासून फिरून सतेज व दैदीप्यमान असा बाहेर पडतो. वरील गोष्टींपैकीं किती गोष्टी लक्षणेनें कोंकणस्थांना लागू पडतात हें स्पष्ट करुन सांगण्याचें कारण नाहीं. प्रत्येक जातींत कांहीं विशेष गुण असतातच. देशस्थ औदार्याबद्दल प्रसिद्ध आहेत. कऱ्हाडे हे मोठे टापटिपीनें वागणारे, सफाईदार व व्यवहारचतुर असतात. देशस्थांप्रमाणें कोंकणस्थ लोकांनीं आजपर्यंत राष्ट्रीय इतिहासांत बरीच कामगिरी केलेली आहे. देशस्थ लोकांत जसे साधुसंत निर्माण झाले तसेच कोंकणस्थांत वीर व मुत्सद्दी उत्पन्न झाले. इंग्रजी राज्यांत हल्ली कोणाच्या विशेष

वांटणीस आला असेल तर तो कोंकणस्थांच्या. चिरोल-साहेबांचीं पत्रें किंवा 'राजद्रोह कमिटीचा रिपोर्ट' घेतला तरी त्यांत 'चित्पावनांचा' उल्लेख मुद्दाम केलेला आढळतो.

ज्यू लोकांप्रमाणें चित्पावनजातीवर छळाचा छाप मारलेला आहे. पण या छळामुळेंच त्यांच्या हातून वीरश्रीचीं कृत्यें हि झालेलीं असण्याचा संभव आहे. कोंकण प्रांत श्रीपरशुरामानें वसविला. परशुराम ही कोंकणस्थांचीच देवता आहे. श्रीपरशुरामानें केवळ छळामुळेंच हातांत शस्त्र धरून ' शापादपि शरादपि ' ही ब्राह्मणांची जोडगोळी खरी करून दाखविली. परशुराम हा ब्राह्मण असून तो चित्पावन असावा असा तर्क सयुक्तिक दिसतो. 'गीतगोविंदा'त वर्णन केल्याप्रमाणें:—

"क्षत्रियरुधिरमयं जगदपगतपापम् ॥
स्नपयसि पयसि शमितभवतापम् ॥

परशुरामानें जी घोर कृति केली ती कदाचित् चित्पावन ब्राह्मणांच्या छळा-मुळेंच असेल. ऐतिहासिक काळांत कोंकणस्थ भट घराण्याचा छळ झाल्यामुळेंच तें देशावर गेलें व पेशवेपद पावलें. पण छळाचें हें आगंतुक कारण सोडून दिलें तरी कोंकण आणि बुद्धिमत्ता यांची सांगड मनांत कायमची पडलेली असते. रत्नागिरी हें जसें कोंकणप्रांताचें केंद्र तसेंच तें बुद्धिमत्तेचें हि केंद्र मानलें गेलें आहे. टिळककुलदीपक, बाळ गंगाधर टिळक, यांचा जन्म कोकणांत खुद्द रत्नागिरी शहरांतच झाला.

कुठलाहि लोकसमाज घेतला असतां तेथें 'चार गांवचे चार व चार घरचे चार' मिळाले असा तर प्रकार असतोच; पण हे चार गांवचे तरी मूळ कोठून आले असा विचार करूं लागल्यास, अनवस्थेच्या जाळींत शिरून अदृश्य व्हावें लागतें. टिळक व पुणें शहर यांचा संबंध आतां अखंड बनला आहे; पण टिळकांना तरी पुणें कोणी आंदण दिलें होतें? पुण्याचा ब्राह्मण ( Poona Brahmin) हा शब्द चित्पावनांना उद्देशून योजलेला असतो; पण चित्पावनांनीं पुण्याचें प्रथम दर्शनहि किती शतकांपूर्वी घेतलें नसेल याचा अंदाज करतां येण्यासारखा आहे. पुणें वरघाटापैकीं म्हणजे 'देशांत' मोडतें. आणि देश म्हटला म्हणजे तो देश-स्थांचा, किंबहुना त्यांपैकीं शुक्लयजुर्वेदी देशस्थांचा. तेहि पूर्वी उत्तरेकडून आलेले. पण कोंकणांत झालें तरी कोंकणस्थ हे मूळचे रहिवाशी नव्हत, तेथें हि ते बाहेरून कोठून तरी आले असले पाहिजेत. कोंकणांतील सारस्वत हे गौड असून त्यांचा संबंध बंगाल्यापर्यंत, म्हणजे गौड लोकांच्या मूळ वस्तीच्या ठिकाणापर्यंत, लावतां येतो.

कोंकणांतील ब्राह्मणांचा दुसरा मोठा संघ म्हणजे स्वतः कोंकणस्थ ब्राह्मणांचा.

पण तेहि उत्तरेकडून खालीं कोंकणपट्टीनें उतरत उतरत आले असावे, किंवा समुद्रापलीकडून हि आले असण्याचा संभव आहे. सत्यशोधक लोक हे दक्षिणी ब्राह्मणांना, विशेषतः कोंकणस्थ ब्राह्मणांना, उद्देशून 'हे या भूमींतलेच नव्हत परके आहेत,' असें हिणवण्याच्या बुद्धीनें म्हणतात म्हणून त्यांचा कोणास राग येवो, परंतु इतिहासदृष्ट्या ही गोष्ट कांहीं अगदींच खोटी नाहीं. आतां मराठ्यांना हिणवावयाचें तर ते देखील महाराष्ट्रांतले नव्हत, उत्तरेकडून आले आहेत, असें सप्रमाण सिद्ध करून देतां येईल. पण त्यामुळें कोंकणस्थ हे मूळचे कोंकणचे ठरतात असें नाहीं. इतिहाससंशोधनाची सुरी हातांत घेतली म्हणजे अशा रीतीनें वाटेल त्या समाजाच्या स्थानिक अभिमानाच्या चिंधड्या कोणासहि उडवून देतां येतात. कोंकणस्थांसंबंधानें खुद्द कै. विश्वनाथ नारायण मंडलिकांनीं हि असें कबूल केलें आहे कीं, चित्पावन ब्राह्मणांचे आद्य पूर्वज हे परप्रांतांतून जहाजांवर बसून आले खास; मग ते हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरीलच एकाद्या दूरच्या बंदरांत जहाजावर चढले म्हणा, किंवा कोंकणपट्टीच्या पश्चिमेस आरबी समुद्रापलीकडे असलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या किनाऱ्यावरून चढले म्हणा! हिंदुस्थानांत आल्यावर मग येथील पूर्वीच्या द्रविड ब्राह्मणसंघांत—पंचद्रविडांत त्यांची गणना होऊं लागली.

वर सांगितल्याप्रमाणें स्थानिक अभिमानाच्या चिंध्या करितां येत असल्या तरी अभिमान ही भावनाच अशी आहे कीं, मनुष्याला कोठें तरी एकाद्या स्थानावर खुंटी मारून तिला त्या भावनेची गांठ घट्ट मारून ठेवावी लागते. नाहीं तर सुकाणूं मोडलेल्या जहाजाप्रमाणें किंवा सडा तुटलेल्या वावडीप्रमाणें, तो वाहवत जाऊन कार्यशून्य व्हावयाचा. म्हणूनच महाराष्ट्रीयांनीं महाराष्ट्र आमचें म्हणावयाचें, देशस्थांनीं देश आपला म्हणावयाचा, व कोंकणस्थांनीं कोंकण हें खास आपलें म्हणावयाचें. इतकाच त्याचा अर्थ. कोंकणांत हि ब्राह्मणेतरांची वस्ती पुष्कळ आहे. परंतु निवळ किंवा भरदार ब्राह्मणवस्तीचे गांव जसे कोंकणांत आढळतात तसे ते देशावर आढळत नाहींत. नवी वसाहत होते तेव्हांच तिची वर्गवार रचना होऊं शकते. यामुळें पद्धतशीर ब्राह्मणवस्तीचे गांव कोंकणांत आढळतात. यावरूनच कोंकणांत कोंकणस्थ ब्राह्मण बाहेरून येऊन वसाहत करून राहिले असें सिद्ध करण्यास मदत होते. कोंकण भागांतील मुरूड हा गांव अशा पद्धतीनें वसलेला आहे. अशा वसाहतीचे ऐतिहासिक दाखले थोडे मिळतात; म्हणून या मुरूडगांवच्या मूळ वसाहतीची बखर, जी कै. मंडलिकांनीं १८६५ सालीं रॉयल एशियाटिक सोसायटीपुढें इंग्रजी निबंधांत गोंवून वाचली व प्रो. कर्वे यांनीं आपल्या आत्मवृत्ताच्या परिशिष्टांत मूळ मराठींत छापली आहे, ती वाचकांनीं अवश्य वाचावी. त्यांत जंगल तोडून वसतिक्षेत्र कसें सिद्ध केलें व कोणच्या पद्धतीनें व हेतूनें गांव कसा वसविला याचें मोठें मनोरंजक वर्णन आहे.

टिळक घराण्याची वसती चिखलगांवास अनेक पिढ्यांची. या घराण्याची कुलदेवता 'लक्ष्मीकेशव' नांवाची आहे. बळवंतरावजी टिळकांच्या पणजापूर्वी कोणता पुरुष केव्हां उदयास आला याची माहिती उपलब्ध नाहीं. हे पणजे मात्र 'उदयास आले' असें त्यांचें वर्णन करण्यास हरकत नाहीं. यांचें नांव केशव असें होतें. ते चिखलगांवचे खोत असत.

टिळक घराण्याची चिखलगांवची वस्ती किती जुनी याची नक्की माहिती मिळत नसली तरी, या गांवची खोतकी टिळक घराण्याकडे असल्यामुळें तेथील त्यांची वसती ही कदाचित् तीनचारशें वर्षांची असावी असें अनुमान करितां येईल. खोतीच्या वादाचे वेळीं कै. मंडलिकांनीं शेंकडों कागदपत्र व सनदा न्याय-कोर्टांत सरकाराविरुद्ध शाबीत करून घेतल्या, त्यांवरून व अवांतर गमकांवरूनहि रत्नागिरी जिल्ह्यापैकीं कांहीं भाग व कुलाबा जिल्ह्यापैकीं कांहीं भाग या क्षेत्र-मर्यादेंत मूळ खोती मिळालेल्या घराण्यांची वसती पेशवाईपूर्वीहि दोन—अडीचशें वर्षांची होती असें दिसतें. खोतकी हें वतन असून, बिनवसाहतीचे गांव वसविल्या-मुळें, आणि ओसाड पडलेली जमीन लागवडीस आणल्यामुळें, राजे लोकांकडून अनेक लोकांना तें देण्यांत आलेलें होतें. नवीन वसाहतवाल्यांच्या अंगचा साहसाचा गुण मोठा श्रेयस्कर असतो. साहसामध्येंच उत्कर्षाचीं बीजें असतात. वसाहत करणाऱ्याचे अंगीं साहसाप्रमाणेंच नव्या परिस्थितीशीं मिळवून घेण्याचा स्वभावहि बहुधा असतो. हा गुण ब्राह्मणेतरांतच होता किंवा असतो असें नाहीं. कोंकणांतील मूळ खोती वतनें ब्राह्मणांनीं संपादन केलेलीं अशीं कितीक आहेत. जंगल तोडणें, खाडीचें पाणी हटवणें, धरणें बांधून गोड्या पाण्याचे पाट बांधून आणणें, मूळ लागवडीस लागणारें भांडवल घालणें, कुळें पदरीं ठेवून पोसणें, व सर्व खोती गांवच्या जमीन महसुलाकरितां जामीन राहून तो सरकारांत वेळचे वेळीं भरणें, या गोष्टी निभावण्याला मनुष्य संपन्न व सकस्च असावा लागतो; व या त्याच्या गुणांचें बक्षिस म्हणजे वंशपरंपरागत भोगण्यास मिळणारें खोतकीचें वतन व खोतकीचे अनेक किरकोळ हक्क.

पण खोतकीची वृत्ति कुटुंबभरणाला सर्वथा पुरी पडतेच असें नाहीं. महत्त्वाकांक्षी मनुष्याला पुरेल असें क्षेत्र नुसत्या खोतकींत मिळत नाहीं. जुन्या काळची खोतकी म्हटली तरी मुख्यतः कुळाकडून सारा वसूल करण्याचें, म्हणजे एक प्रकारें कुळकर्ण्या—तलाठ्याचें काम. खोताची घरची म्हणून थोडीबहुत शेती असू शकते, पण कांहीं तरी अधिकाराचें काम केल्याशिवाय नुसता शेतकरी मनुष्य किंवा खोतही नांवारूपाला येऊं शकत नाहीं.

एकाद्या धंद्यांत केवळ पैसे मिळविल्यानें कुणालाहि तेज चढत नाहीं. हें तेज फक्त अधिकाराची जागा किंवा सार्वजनिक चारित्र्य यांच्या योगानेंच येतें. इंग्लंडांतील अनेक लोक, कोणी शेतीचा, कोणी यांत्रिक कारखान्याचा, कोणी

दलालीचा, कोणी दारूच्या भट्ट्यांचा, वगैरे उद्योग करून खूप गबर होतात. पण तेवढ्यानें त्यांना आपल्या ऐहिक ऐश्वर्याची कड पोचली असें वाटत नाहीं. म्हणून या संपत्तीच्या जोरावर ते पार्लमेंटांत शिरतात, व प्रधानमंडळांत शिरण्याइतकी बुद्धिमत्तेची देणगी नसली तरी जन्मांत निदान एकाद्या रॉयल कमिशनवर सभासद म्हणून नेमणूक करून घेतल्याशिवाय त्यांचें समाधान होत नाहीं. पेशवाईच्या काळांतहि तरतरीत बुद्धीच्या चित्पावन मुलांची प्रवृत्ति केवळ कोंकणची शेती करून समाधान पावत नसे. शेती हें फार तर नुसतें उपजीविकेचें साधन व तेंहि अत्यन्त दुष्कर. म्हणून लौकिकाची इच्छा धरणारा ब्राह्मण मुलगा निदान मामलत तरी मिळविण्याची खटपट करी. टिळकांच्या पणजाचा ( केशवरावांचा ) जन्म सन १७७८ सालीं झाला. म्हणजे पुढें पेशवाई अजून ४० वर्षे जिवंत होती. त्यांस लिहिणें वाचणें चांगलें येत असून शिवाय "घोड्यावर बसण्यांत वस्ताद, निशाण मारण्यांत पटाईत, पोहोण्यांत सराईत आणि स्वयंपाकांत तरबेज" असें जें त्यांचें वर्णन केलेलें आढळतें तें खोटें मानण्याचें कारण नाहीं. केशवराव उद्योगी व करारी असल्यामुळें त्यांनीं खटपट करून अंजनवेलची मामलत मिळविली. पण १८१८ सालीं पेशवाई बुडाल्यावर त्यांनीं ती सोडून दिली, आणि चिखलगांवास परत येऊन घरीं ते स्नानसंध्या करीत बसले. लवकरच मामलतीचें ऐश्वर्य ओसरून गरीबीहि आली. तथापि इतर उद्योग न करितां शेती व खोती यांच्या उत्पन्नावर मिळेल ती 'कुचरोटी कुचलंगोटी' असें करून त्यांनीं कसेबसे दिवस काढले.

केशवराव यांस रामचंद्र व काशीनाथ हे दोन मुलगे झाल्यावर त्यांची पहिली बायको रुक्मिणीबाई ही वारली. केशवराव मामलतीवर असतांना या बाई हयात होत्या, यामुळें त्यांना 'मामलेदारीण' हा किताब उपभोगावयास सांपडला. केशवरावांची दुसरी बायको दुर्गाबाई यांनाहि मुलें झालीं. सर्वांत वडील मुलगा रामचंद्र हा बळवंतरावजी टिळकांचा आजा. त्याचा जन्म सन १८०२ सालीं झाला. रामचंद्रपंतांस विद्या फारशी आली नाहीं. त्यांचें लग्न लहानपणींच होऊन त्यांस १८ वे वर्षी पहिला मुलगा गंगाधर हा झाला. ( १८२० ). हा गंगाधर म्हणजेच बळवंतरावजींचे वडील. घरची गरिबी म्हणून रामचंद्रपंतांनीं इंग्रजी मोजणीखात्यांत नोकरी धरली. त्यांच्या नशिबीं प्रवास पुष्कळ लिहिलेला होता. बळवंतरावजींच्या पूर्वजांच्या तिसऱ्या पिढीपासूनच त्यांच्या शाखेची वाढ आपल्या गांवाबाहेर होण्यास प्रारंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. रामचंद्रपंत बहुधा फिरतीवर असल्यामुळें गंगाधरपंतांना आपल्या आजाचा लळा फार असे. त्यांनीं त्यांना धुळाक्षर मुळाक्षर वगैरे शिकविलें. या सुमारास दाभोळास मराठी शाळा सुरू झाली. तेव्हां गंगाधरपंतांस या शाळेंत घालण्याकरितां दाभोळास ठेवण्यांत आलें. शाळेंतील विद्यार्थ्यांत वयानें किंचित् प्रौढ या नात्यानें त्यांनीं पूर्वीचा

" मालचाव्या " किंवा हल्लींचा मॉनिटर अथवा सेक्रेटरी याचेंहि काम केलें.

दाभोळच्या शाळेंतील अभ्यास संपल्यानंतर देशावर एकाद्या शाळेंत जाऊन पुढील अभ्यास करावा अशी गंगाधरपंतांनीं उमेद धरली, व बाप किंवा आजा यांचेकडून पैशाच्या दृष्टीनें विशेष मदत होण्यासारखी नसल्यामुळें ते स्वतःच्या हिंमतीवर पुण्यास आले. त्यावेळीं पुण्यास प्रसिद्ध असलेल्या केशवराव भवाळकरांच्या शाळेंत त्यांनीं इंग्रजी अभ्यासास सुरवात केली. सन १८३७ सालीं गंगाधरपंतांची आई रमाबाई ही पुण्यास येऊन मुलास भेटून नाशकास जात असतां मार्गांत महामारीचे वाख्यानें मृत्यु पावली. यावेळीं रामचंद्रपंतांस गंगाधर व गोविंद हे दोन मुलगे, व द्वारका नांवाची मुलगी अशीं तीन मुलें होतीं. पण कुटुंब वारल्यामुळें त्यांची व्यवस्था नीट करावी ती न करितां उलट स्वतः तेच वैतागून चित्रकूट येथें पेशव्यांचें एक घराणें होतें तिकडे निघून गेले. अशा रीतीनें अल्पवयांतच गंगाधरपंतांवर कुटुंबभरणाचा भार पडल्यामुळें त्यांना नाइलाजानें इंग्रजी शिक्षण सोडून देऊन शाळाखात्यांत शिक्षकाची नोकरी धरावी लागली; व ते प्राथमिक शाळेंत शिक्षकाचें काम करण्यास पुण्याहून कोंकणांत परत गेले. यानंतर त्यांचें लग्न झालें. त्यांच्या बायकोचें नांव पार्वतीबाई. या बाईस पहिली मुलगी काशी ही १८४६ सालीं झाली. पुढें आणखी दोन मुलीच झाल्या. त्यानंतर १८५६ सालीं मुलगा झाला. तेच बळवंतराव टिळक. या बाई १८६६ सालीं वारल्या.

गंगाधरपंतांस प्रारंभीं पांच रुपयांची नोकरी लागली. पुढें मालवणांस असतां त्यांना अवघे १० रुपये मिळत; तरी त्यांच्या भोंवतीं आश्रित विद्यार्थ्यांचा परिवार असे. सर्व प्रकारची स्वस्ताई व कोंकणची राहणी अगदीं साधी व बिनखर्ची असल्यामुळें कोणास एकादे वेळीं पंक्तीचें जेवण, कोणास ताकपाणी असें देऊन गंगाधरपंतांस आश्रित विद्यार्थ्यांचा परामर्ष घेतां येत असे; व तो ते आस्थेनें घेत. पुढें गंगाधरपंतांची बदली चिपळूणास १५ रुपयांवर झाली. अर्थात् त्या मानानें त्यांचा आश्रित-परामर्षहि वाढला. आपल्या धार्मिक वडिलांच्या सांगण्यावरून गंगाधरपंतांनीं कांहीं दिवस भोजनदक्षिणा देण्याचा परिपाठ ठेवला होता. त्यावरून दीड वर्षांत त्यांचे घरीं बाहेरचे व दक्षिणा देण्यासारखे १००० मनुष्य जेवले असा हिशेब काढतां आला. अनायासानें सहस्रभोजन घडलें!

गंगाधरपंत थोडे दिवस चिपळूणास राहिल्यावर तेथून त्यांची बदली खुद्द रत्नागिरीस २५ रु. पगारावर झाली. त्यावेळीं शिक्षक तयार करण्याचीं ट्रेनिंग कॉलेजें नव्हतीं व अमुक सर्टिफिकिटाला अमुक पगार असें 'स्केल'हि ठरलेलें नव्हतें. आतांच्या मानानें त्या वेळच्या मराठी मास्तरांचा पगार कमी होता तरी त्यांची विद्या मात्र आतांपेक्षां सरस असे असें म्हणतात. ट्रेनिंग् कॉलेजांत शिकण्याची सोय नसतांहि बुद्धिवान् मराठी शिक्षक अध्यापनाबरोबर स्वतःच्या अध्ययनाचें

काम सुरू ठेवीत. गंगाधरपंत हे स्वतःच्या शिक्षणानें संस्कृत व गणित या विषयांत बरेच प्रवीण झाले होते. त्यांचें गणिताचें अध्ययन शून्यलब्धीपर्यंत गेलें होतें, व संस्कृतविषयाच्या अध्ययनावरून तर त्यांना 'गंगाधरपंतां'पेक्षां गंगाधरशास्त्री या नांवानेंच अधिक ओळखीत. डॉ. रामकृष्णपंत भांडारकर व गंगाधरपंत ऊर्फ गंगाधरशास्त्री टिळक यांच्या स्नेहाला, रत्नागिरी शहरांतील उभयतांच्या वास्तव्यापेक्षां, उभयतांची संस्कृत विषयाची आवड हेंच कारण अधिक खरें होय. इंग्रजी शिकून पदवीधर बनतां न आल्यामुळें ज्यांचें ऐहिक दृष्ट्या बरेंच नुकसान झालें अशांपैकींच गंगाधरशास्त्री हे होत. बुद्धि तरतरीत असूनहि इंग्रजीचा अभ्यास झाला नाहीं, जन्मभर काम मिळालें तेंहि सामान्य दर्जाचें, म्हणजे प्रथम मराठी शिक्षकाचें व नंतर असिस्टंट डेप्युटी इन्स्पेक्टरचें. गंगाधरपंतांच्या हातून ग्रंथकर्तृत्वहि सामान्य प्रतीचेंच झालें. त्यांनीं इंग्लंडचा इतिहास, अंकगणित व लघुव्याकरण वगैरे शालोपयोगी पुस्तकें केलीं व त्यांतील कांहीं विद्याखात्यानें त्यांना त्यांचा मोबदला देऊन विकत घेतलीं.

रामचंद्रपंत चित्रकूटाकडे गेले ते पेशव्यांकडे कांहीं वर्षे कोठी—कामगार या नात्यानें राहून नंतर काशीस गेले. तेथें त्यांचा ताबडतोब संन्यास घेण्याचा विचार होता. पण त्यावेळीं बंड विझविण्याची धामधूम सुरू होती. अनेक गुन्हेगार इनसाफ चुकविण्याकरितां संन्यास घेतात किंवा बैरागी होतात अशा समजुतीनें, सरकारानें काशीस अंमल बसवून सरकारी दाखला दाखविल्याशिवाय कोणी कोणास संन्यास देऊं नये असा अन्तस्थ हुकूम फर्माविला गेला असल्याचें सांगतात; व हा दाखला मिळावा म्हणून म्हणा, किंवा संन्यासापूर्वी एक वेळ घराचें अखेरचें दर्शन घेऊन जाण्याची इच्छा झाली म्हणून म्हणा, रामचंद्रपंत हे काशीहून कोंकणांत परत आले. या वेळीं गंगाधरपंतांस मुलगा झालेला असल्यामुळें आजास नातवाचें तोंड पहावयास सांपडलें. रामचंद्रपंतांची खेप ऐहिक दृष्टीनेंहि सफल झाली. मात्र संन्यास घेण्याची रामचंद्रपंतांची इच्छा टळली नव्हती, यामुळें ते फिरून काशीस गेले. अखेर त्यांनीं संन्यास घेतला. सन १८७२ सालीं तेथेंच त्यांनीं समाधीहि घेतली.

गंगाधरपंतांच्या नशिबीं प्रथम दारिद्र्यच आलें; पण त्यांनीं उद्योगानें हळू हळू आपली सांपत्तिक स्थिति सुधारली. लहानपणीं घराण्यांतील मामलतीचें ऐश्वर्य गेलें, नुसत्या खोतीवर निर्वाह करण्याचा प्रसंग आला, कुटुंब वाढूं लागलें, यामुळें कलह सहजच सुरू झाला. केसोपंत मृत्यु पावेतोंपर्यंत घराण्यांत एकी नांदली; ती पुढें टिकली नाहीं. 'सीत आबैन मयातैन व अलफ' या सालीं घराण्याच्या व्यवस्थेसंबंधानें लिहिली गेलेली एक यादी पाहावयास मिळाली; तींत खालील वृत्तान्त दिला आहे. "ती॰ भाऊंचा काळ जाहला. पुढें कुटुंबांतील पुरुष कोणी बाहेर रोजगारावर व कोणी घरीं असे आहेत.

याजमुळें वगैरे घरगुती कितीएक कारणामुळें येकमेकांचे मनांत अनेक तऱ्हेचे आंदेशे येऊं लागले; व असे आंदेशे येऊन, दिवसें दिवस फूट होऊन, लौकिक राहणें कठीण असें जाणोन, आपल्या कुटुंबांतील माणसें लहान मोठीं जीं आहेत त्या सर्वांचें मनांतील हरयेक विशींचे आंदेशे दूर होऊन यथा मार्गें प्रपंच चालोन लौकिक संरक्षण व्हावा यास्तव सदरीं लिहिलें सर्वांचे मतें वर्तणूक व्हावी तशी खालीं लिहिलेलीं कलमें येणेंप्रमाणें. "–इ. इ.

यादींतील मुख्य कलमांचा मतलब असा कीं, 'भाऊंना दोन कुटुंबांचीं अपत्यें यामुळें सावत्रपणा; तथापि सरासरी पाहतां नफानुकसान विभागीं दोन्हीं संबंधी यांची बराबरी म्हणून सर्वानुमतें सखे–सावत्र मनांत न आणतां चौघा मुलांनीं एक विचारें व सर्वांत वडील मुलगा रामचंद्र–आप्पा याचे सांगण्याप्रमाणें चालावें व त्यानेंही सर्वांचें अनुमत घेत जावें. सर्वांचें देणें व येणें एकच धरून एकच यादीस लिहावें. त्यांतील कांहीं घराजिन्नस विकून कमी करावें व बाकी रोजगारी उत्पन्नावर फेडावें. घरांतील माहेरवासणींस अन्नवस्त्र द्यावें. घरच्या माघारणींस माहेराकडून कांहीं मिळाल्यास त्याजवर कोणी मालकी करूं नये. घरीं राहून रामचंद्रआप्पांनीं शेतीभाती करावी; बाहेर रोजगारी यांनीं जुजबी खर्चात प्रपंच भागवून शिल्लक पैसा रामचंद्रआप्पा यांजकडे पाठवावा व त्यांनीं कर्ज–फेडीची तजवीज करीत जावें. रोजगारी किंवा इतर कोणी फुटून निघाल्यास त्याला वतनदारीसुद्धां सर्व जिनगीपैकीं कांहींएक मिळण्याविषयीं त्याचा वारसा राहूं नये.' तात्पर्य, रामचंद्र-आप्पानें सर्वांचा सल्ला घेऊन पुढारीपणानें कुटुंबाचा सर्व कारभार करावा. सर्वांनींहि त्याचे आशेंत वागावें, व अशा रीतीनें प्रपंचाचा बंदोबस्त राखावा.

या यादीवर सर्वांनीं सह्या करून लक्ष्मीकेशव कुलस्वामीची शपथ घेऊन मान्यता दिली. व अशा रीतीनें विसकटून घातलेली घराण्याची घडी नीट बसविण्याचा सर्वांनीं प्रामाणिकपणें प्रयत्न केला. ही यादी ता. ३ जून इ. स. १८४६ ची आहे. व यादींतील व्यवस्था पुढें निदान १०–१५ वर्षें टिकली असें दिसतें. पण कोंकणांत प्रपंचाचीं साधनें अति अल्प मर्यादित, व कुटुंबवृद्धि फार. यामुळें घराण्यांतील एकी फार काळ टिकणें अशक्य आहे. देशावर पिढ्यान-पिढ्या पांचपन्नास मनुष्यें असलेलीं कुटुंबें एकत्र सुखानें नांदल्याचीं उदाहरणें पुष्कळ सांपडतात. अद्यापिहि कित्येक गांवीं कित्येक पाटलांचीं कुटुंबें येवढीं मोठीं असतात कीं, या कुटुंबांना लहानसें गांवच म्हटलें तरी चालेल. पण याचें कारण हेंच कीं, देशावर संसाराचीं साधनें, विशेषतः शेतकीची संपत्ति, मुबलक असते. कोंकणांतील मनुष्यांचा स्वभाव सडेतोड व त्यांचे अंगीं कृपणपणा विशेष, याचा दोष त्या लोकांकडे नसून खरोखर परिस्थितीकडेच आहे. भौतिक परि-स्थितीप्रमाणें मनुष्याचा स्वभाव बदलतो आणि त्याचे अंगीं निरनिराळे गुणदोष

येतात हा जो सिद्धान्त इंग्रज तत्ववेत्ता बकल यानें काढलेला आहे त्याचें पूर्ण समर्थन, कोंकण व देश या प्रांतांतील भौतिक परिस्थिति व त्या प्रांतांतील मनुष्यस्वभावाचे गुणावगुण यांची तुलना केली असतां सहज होणारें आहे. जेथें पांड अर्धा पांड येथपर्यंत शेतजमिनीची विभागणी होऊन बांध पडतात, अशा संकुचित क्षेत्रांतील लोक क्षुद्र व कृपण बुद्धीचे कां असतात, आणि देशावर जेथें नजर न पोंचेल इतक्या मोठमोठ्या शेतजमिनी एकेका नंबरांत असूं शकतात त्या प्रदेशांतील लोकांचीं मनें आल्यागेल्याचा हिशेब न करण्याइतकीं मोठीं कां असतात, याची मीमांसा अधिक स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं.

१८४६ च्या समाईकपणाच्या यादींतील एकोपा १८६० च्या सुमारास बिघडूं लागला. १८६५ सालीं कोर्टांत फिर्यादि अर्यादि सुरू झाल्या. तिन्ही कोर्टांपर्यंत वाद सांगण्यांत येऊन अखेर सालीं अव्वल हुकूमनाम्याची अंमलबजावणी होऊन पहिलें वांटप झालें. यांत खोतीवतनासंबंधीं मानपान, त्याचें उत्पन्न व खर्च हीं धाकट्या शाखेकडे देण्यांत आलीं, त्यावर रामचंद्र केशव यांचा हक्क राहिला नाहीं. बाकी हिस्से सारखे झाले. हें वांटणीपत्र पाहिलें म्हणजे कोंकणी लोकांच्या मिळकतीचें प्रमाण किती सूक्ष्म असूं शकतें हें दिसून येईल. ज्या मानानें मिळकत सूक्ष्म त्या मानानें मिळकतीवर हक्क सांगण्याची दृष्टि सूक्ष्म म्हणजे बारीक पाहाणारी असावी यांत आश्चर्य नाहीं. शब्दशः 'कुशाग्रानें'च जेथें वांटण्या कराव्या लागतात व मर्यादा ठरवाव्या लागतात तेथें ग्राहकबुद्धि 'कुशाग्र'च व्हावी ! अधिक स्थूल असून चालणार नाहीं. कोंकणांतील वकील अधिक वाकबगार कां ? व कोंकणांत काम करून आलेला मुनसफ पुढें वाटेल तसल्या भानगडींचे दावे तोडण्यास कां समर्थ मानला जातो ? याचें खरें श्रेय कोंकणांतील क्षेत्रसंकोचालाच आहे. वरील वांटणीपत्रकाप्रमाणें रामचंद्र केशव, म्हणजे टिळकांचा आजा, यांचे वांटणीस सुमारें ४७ एकर २३॥ गुंठे इतक्या क्षेत्रफळाची व १७ रु. ५ आ. ६ पै इतक्या आकाराची ( वरकससुद्धां ) कीर्दसार जमीन आली !

१८४६ च्या समाईकपणाच्या समजुतीच्या यादीविरुद्ध १८६५ सालीं फिर्यादी अर्यादींचें व वांटण्या पोट-वांटण्यांचें सत्र सुरू झालें तें पुढें ३५-४० वर्षेंपर्यंत एकसारखें चालूच होतें. पहिलें वांटप होण्याचे सुमारास टिळकांचे वडील देशावर आलेले होते. गंगाधरपंत पुण्यास आल्यावर ता. १७ जून १८६६ सालीं पुणें अदालतींत खरेदी केलेल्या स्टँपावर लिहिली गेलेली आपसांतील तडजोड व त्यावरहुकूम दापोली येथील मुनसफ कोर्टानें केलेल्या हुकुमनाम्याची नकल आम्हांस मिळाली. तिजवरून असें दिसतें कीं, या लवाद निवाड्यांत वादी म्हणून फक्त रामचंद्र केशव टिळक हेच एकटे लागलेले आहेत; कारण या वेळीं टिळकांचे आजे हयात असून कोर्टाचा व्यवहार सर्व त्यांच्या नांवें झाला. त्यांचें मुखत्यारपत्र

गंगाधरपंतांचे धाकटे बंधु टिळकांचे चुलते गोविंदराव टिळक यांस दिलें होतें. सार्‍या जन्मांत स्वतः टिळक हे आपल्या कोंकणच्या गांवीं एक आठवडाहि राहिले नसतील. कोंकणच्या मिळकतीचा त्यांनीं कधींहि उपभोग घेतला नाहीं व वडील वारल्यापासून, निदान स्वतः टिळक सज्ञान झाल्यापासून तरी, त्यांनीं कोंकणच्या मिळकतीवर मनानें पाणी सोडलें होतें. अखेर आपल्या मृत्युपत्रांत ती मिळकत त्यांनीं कुलदैवत लक्ष्मीकेशव यासच अर्पण केली आहे.

१८८९ सालीं चार दिवस टिळक कोंकणांत गेले होते. वडिलार्जित मिळकत वादग्रस्त होऊन राहिल्यामुळें आपल्या हिश्यापुरता निर्वेधपणा झाल्यास करावा, व आपल्या हिश्याचें उत्पन्न पूर्वसंकल्पाप्रमाणें ग्रामदेवता लक्ष्मीकेशव याला द्यावें असें टिळकांचे मनांत होतें. कोकणांतल्या आपल्या गांवच्या देवळांचा जीर्णोद्धार करणें हें देशावर येऊन उत्कर्ष पावलेल्या वंशजांचें काम आहे असें कोंकणचे लोक मानतात आणि तें योग्यच आहे; व हे वंशज देखील या कर्तव्यास जागतात असेंच अनेक घराण्यांचा इतिहास पाहिला तर आढळून येईल. नवीन देऊळ देशावर घर केलेल्या गांवीं बांधणें हें होतच नाहीं असें नाहीं. पण पहिला मान कोंकणांतील कुलदेवतेचें किंवा ग्रामदेवतेचें देऊळ उजविण्याचा. कोंकणांतील देवदेवींचे वार्षिक उत्सव म्हटले म्हणजे ते परजिल्ह्यांत पसरलेल्या सुखी ग्रामस्थांचें संमेलन आणि गैरहजर व हजर अशा प्रमुख ग्रामस्थांच्या 'डिरेक्टरी'चें वाचन असेंच ठरतें. दरवर्षी कोणी ना कोणी या देवांना कांहींतरी देणगी देतच असतो. असो; १८८९ च्या मार्च महिन्यांत गांवीं असलेला टिळकांचा एक नातेवाईक टिळकांना लिहितो "तुम्ही तिकडे गेल्यानंतर इकडील मजकूर तपशीलवार, देवळाचें काम चालू आहे, परंतु दगड काढणारे कुंभार चांगले मिळाले नाहींत. यामुळें दगड निघाले नाहींत आणि काम करणारेहि लोक कसबी मिळाले नाहींत. यामुळें नमुन्याप्रमाणें काम मुदतींत पुरें होईल असें वाटत नाहीं.............चिखलगांवांहून काल आलों. देवळाचें काम, दक्षिण व उत्तर बाजूच्या भिंतीहून कमानीचें काम काल सुरू झालें आहे."

देवळाचा जीर्णोद्धार करण्यास कोणी भेटला तरी कित्येक वेळां गांवच्या गांवकीमुळें व देवस्कीमुळेंहि अडथळे येतात. जे वाद उत्पन्नाच्या बाबतींत तेच देवस्थानच्या हक्कांच्या बाबतींत उभे राहतात. मालक जाग्यावर नसला, शेतें खंडानें दिलेलीं असलीं, व वसूलीचें काम तिन्हाइताकडे सांगितलें असलें, म्हणजे देशावरील मालकाच्या कोंकणी जमिनीचें सरकारदेणें भागण्याइतकाहि वसूल येत नाहीं. अशीच टिळकांच्या कोंकणी इस्टेटीचीहि स्थिति होती. खोती गांवचे अद्यापी धडेवांटप झालें नसल्यामुळें दस्त भरण्याची सगळी गुतागुत! दस्त देण्याची जबाबदारी एकीकडे, वसुलाची सवलत दुसरीकडे असा प्रकार होत असे. वरील गृहस्थ लिहितो—" निम्मे गांवचा धडा कलेक्टरमार्फत अर्ज करून पाडून घेतल्याशिवाय

कबुलायत देण्याचा इलाज राहिला नाहीं." धरलें तर चावतें व सोडलें तर पळतें अशी टिळकांच्या कोंकणी उत्पन्नाची स्थिति झाली होती. उगीच कुळांनीं किंवा नातेवाईकांनीं खावें त्यापेक्षां देवाला देऊन टाकलेलें बरें असा टिळकांचा विचार. पण धडेवांटप आणि चतुःसीमापूर्वक हिश्यांची आंखणी झाल्याशिवाय उत्पन्न निर्वेध होत नाहीं. शिवाय नांवानें आपला हिस्सा देवाला कोणी बक्षिस लिहून दिला तरी वांटप करून घेण्यास देव स्वतः वादी प्रतिवादी होऊन कोर्टांत थोडाच जाणार! म्हणून नुसतें उत्पन्न देवाला बक्षीस देऊन भागत नाहीं, तर वादी प्रतिवादी होऊन वाटप निर्वेध करून मग तें देवाला दिलें तर उपयोग. याकरितां टिळकांना मुखत्यारपत्रें देऊन कोर्टांत भांडावें लागलें. तसेंच टिळकांचे वडील रोजगारावर आल्यानंतर त्यांनीं भाऊबंदांतील कांहीं किरकोळ हिस्से विकत घेतले होते. या हि कारणानें त्यांना नांवानें वादी प्रतिवादी होऊन सव्यापसव्य करावें लागलें.

टिळक आपली वडिलार्जित व इतर मिळकत सालोसालच्या घुमावपत्रानें म्हणजे मक्त्याच्या कबुलीनें कोणास तरी, म्हणजे जवळच्याच एकाद्या आप्तास, देत असत. तथापि सरकार दस्त भरण्याची वेळ आली म्हणजे वसूल वेळीं न झाल्यामुळें एखादे वेळीं टिळकांना इकडूनच दस्ताचे पैसे पाठवावे लागत. घराण्यांतील कोणा बायांचें अन्नवस्त्राचें समायिक देणें राहिलें असल्यास त्याबद्दलहि इतर हिस्सेदारांबरोबर टिळकांना प्रतिवादी व्हावें लागे. जुन्या फारखती झाल्या त्यांत घराण्यांतील म्हाताऱ्या वारल्या म्हणजे त्यांच्या उत्तरकार्याकरितां लागणाऱ्या रकमेतही हिस्सेदारी असे; यामुळें कालांतरानें कोणी एकादी म्हातारी वारली म्हणजे त्या कार्याकरितांहि टिळकांना इकडून रुपये पाठवावे लागत व त्याच्या तिकीट लावलेल्या पावत्या येत! तात्पर्य, टिळक कोंकणचा ऋणानुबंध तोडूं म्हणते तरी, व हिश्याच्या मक्त्याचें उत्पन्न वीस बावीस रुपयांहून अधिक नसलें तरी, तो तुटण्यासारखा नव्हता. टिळकांचे चुलते हयात असेपर्यंत कोंकणचा व्यवहार देणें घेणें याविषयींच्या पत्रव्यवहाराची व इतर वर्दळ ते सोशीत. शिवाय टिळकांच्या सासुरवाडच्या गांवीं, म्हणजे लाडघर येथें, गोपाळ बल्लाळ बाळ यांचेमार्फत किरकोळ व्यापार टापार टिळकांच्या वडिलार्जित रकमेतून होत असे. शके १७९८ पासून १८०५ पर्यंत सुमारें २७५० रुपये खुद्द लाडघरास निरनिराळ्या लोकांना कर्जाऊ देऊन टिळकांच्या नांवें दस्तैवज करून घेतल्याची यादी पाहण्यांत आली. त्यावरून ऐकीव अनुमान दृढ होतें. फिर्यादि अर्यादींचा ससेमिरा त्यांच्या मागचा बरेच दिवस सुटला नव्हता. याचें कारण असें कीं, आपल्या इच्छेनें कोणी कोर्टांत न गेला तरी त्याला सिव्हिल प्रोसीजर कोडाप्रमाणें नामधारी कां होईना पण सामीलवादी अगर प्रतिवादी होण्याचें टळत नाहीं. अगदीं शेवटीं १८९४ सालीं दापोली कोर्टांत झालेल्या वांटणीच्या एका दाव्यांत टिळकांना सामील वादी

व्हावें लागलें होतें. व अखेर एका वांटपाचा लवाद निवाडा होऊन नोंदला गेला त्यांत खुद्द टिळकांच्या वांटणीला १ रु. ८ आ. १० पै इतक्या आकाराची धान्याची जमीन आणि ८ रु ११ आ. ९ पै इतक्या आकाराची खोती जमीन आली. यांतील कित्येक फाळणी नंबर ६ पै आकाराचेहि आहेत! १ रु. ८ आ. १० पै. इतक्या आकाराच्या जमिनींत ९–१० तुकडीं असून १ रु. ११ आ. ९ पैच्या जमिनींत सुमारें २५ तुकडीं आहेत. कायद्याच्या भाषेप्रमाणें वरील जमिनीबरोबर ह्यांतील सर्व "नदी, नाले, जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेप, झाड, माड, " हें सर्व टिळकांना मिळालें!! पण ही सगळी धनदौलत एकत्र केली तरी किती भरेल याची कल्पना वाचकांस सहज करतां येईल.

कोंकणांतील खोत म्हटला म्हणजे तो मोठा प्रतिष्ठित व संपन्न असला पाहिजे अशी लोकांची समजूत असते. त्याप्रमाणें टिळकांची वडिलार्जित स्थावर मिळकत मोठी असावी असा कित्येकांना भ्रम होता. 'तुम्ही काय घरचे श्रीमंत, कोंकणचे खोतीदार' असें वर्णन त्यांचे स्नेही त्यांना विनोदानें तर लावीतच; पण डे. ए. सोसायटीच्या लाइफ् मेम्बर लोकांत पुढें भांडणें होऊन एकमेकांत स्वार्थत्यागाची चढ्ढा होऊं लागली व उखाळ्या पाखाळ्या निघूं लागल्या, तेव्हां टिळकांच्या प्रतिपक्षीयांनीं टिळकांची ही धनदौलत जमेस धरून त्यांच्यावर आक्षेप घेतले असें म्हणतात. पण त्या आक्षेपांत खरा अर्थ किती होता हें वर दिलेल्या माहितीवरून कोणाच्याहि लक्षांत येईल. कोंकणांतील धनदौलतीचा उतारा बळवंतराव टिळकांना तर नव्हताच; पण त्यांचे वडील गंगाधरपंत यांनाहि तो फारसा मिळाला नाहीं. तथापि गंगाधरपंतांनीं आपल्या उद्योगानें आपल्या मिळकतींत भर घातली यामुळें बळवंतरावांचें बालपण आगरकरांसारखें अठरा विश्वे दारिद्र्यांत गेलें नाहीं, ही गोष्ट मात्र कांहीं खोटी नाहीं.

गंगाधरपंत सन १८६६ सालीं पुण्यास असतां त्यांनीं त्या सालचा जमाखर्च आढावा आपल्या हातानें लिहून ठेवलेला आम्हांस सांपडला आहे. त्यावरून गंगाधरपंतांची सांपत्तिक स्थिति आरशांत पाहिल्याप्रमाणें स्वच्छ कळून येते. जुन्या काळीं आपल्या लोकांना जमाखर्च लिहून ठेवण्याची संवय असे, ती फार चांगली होती. अलीकडे श्रीमान् सावकार, कारखानदार लोक हिशेब लिहून ठेवतात, पण मध्यम स्थितींतील लोकांत जमाखर्च लिहिणारांचें मान अति कमी आहे. फारच झालें तर एखाद्या रोजनिशींत कोणीं कच्चीं टिपणें करतात. पण पद्धतशीर रोजमेळाचे व आढावा काढलेले जमाखर्च फार थोडे. असो. गंगाधरपंतांची या सालची सुरवातीची श्रीशिल्लक २४३ रु. १३ आ. ३ पै इतकी होती. ११ महिन्यांचा पगार, भत्ता, महागाई व बक्षिस बुकें बरोबर फिरविण्याची खर्चाची मंजुरी, मिळून एकंदर जमा ९६६ रु. झाली; व व्याकरणाच्या पुस्तकविक्रीचें १०७ रु. १३ आ. ४ पै उत्पन्न आलें. इंग्लंडच्या इतिहासाचे ११७ रु.

मिळाले. सेव्हिंग बँकेंतील व्याज व कोंकणांतील वसूल मिळून १६१ रु. २ आ. ६ पै आले. शिवाय कित्येक दुबेरजीं खातीं मिळून सरसालची जमा ३६५९ रु. १३ आ. ४ पै इतकी नमूद आहे. खर्चाच्या बाजूस खालील रकमा आढळतातः— ५०५ रु. संसार खर्च १ सालचा. १७१ रु. रामचंद्र केशव टिळक यांस श्रीक्षेत्र काशी येथील खर्चास. स्वारी खर्च फिरतीवरील २४८. सेव्हिंग बँकेंत नवी ठेव ठेविली ती २०५ रु. पुस्तक छपाई खर्च ६५५ रु. एकूण सरसालचा खर्च ३६४३ रु. ८ आ. ८ पै व पुढील सालची श्रीशिल्लक १६ रु. ४ आ. ८ पै. सदर जमाखर्चाच्या वहींत १० वर्षे वयाच्या बळवंतराव टिळकांच्या करितां वेळोवेळीं खर्च पडला आहे त्यावरून यावेळीं म्हणजे १८६६ सालीं टिळक इंग्रजी शिकत होते असें दिसतें.

शालोपयोगी पुस्तकांच्या योगानें गंगाधरपंत यांस अवांतर थोडीबहुत मिळकत होत असे, हें वर दर्शविलेंच आहे. याशिवाय ते थोडासा देण्याघेण्याचा व्यवहारहि करीत. या व्यापारांत त्यांना प्राप्ति किती झाली असेल याचा अंदाज करतां येण्यासारखा नाहीं. पण एकंदरीनें ही प्राप्ति जुजबीच म्हणण्यास हरकत नाहीं. उलट एका व्यवहारांत त्यांना बराच तोटा झाला, ही गोष्ट मात्र निश्चित आहे. या व्यवहारांत गंगाधरपंतांबरोबर इतर अनेक लोकांना बूड आली, व ती सुप्रसिद्ध क्राफर्ड साहेब यांच्यामुळें, म्हणून या व्यवहाराची थोडीशी माहिती देतों. क्राफर्ड साहेब हे रत्नागिरीस कलेक्टर असतां त्यांनीं तेथें सन १८६३ च्या मे महिन्यांत 'सॉ मिल कंपनी' नामक समाईक भांडवलाचा कारखाना काढला. प्रथम हा कारखाना औद्योगिक शिक्षणाच्या शाळेच्या स्वरूपाचा व आटपसर होता व त्यांत सुतारकाम फार चांगलें होत असे. या सुतारकामाची अजूनहि प्रसिद्धि आहे ही गोष्ट खोटी नाहीं. पुढें या शाळेस मोठ्या कारखान्याचें स्वरूप देण्याचें ठरवून क्राफर्डसाहेबांनीं शेअर्स काढून कोंकण प्रांतांतील पुष्कळ लोकांकडून भांडवल जमविलें. कारखाना यशस्वी होण्याकरितां क्राफर्डसाहेबांनीं बरेच श्रम घेतले व युक्त्या योजल्या. ब्रह्मदेशाहून उंची सागवानी लाकूड जहाजें भरून थेट रत्नागिरी बंदरास आणावें, व कारखान्यांत सुतारकामगिरीचा माल तयार करून तो विकावा अशी त्यांची योजना होती. एकवेळ त्यांनीं पदरचे पैसे खर्च करून मोलमेनचें सागवानी लांकूड रत्नागिरीस आणविलेंहि. मुंबईच्या अनेक सरकारी इमारतींना, तसेंच जी. आय्. पीच्या मालाच्या डब्यांना लागणारें लाकूड कांहीं दिवस या कारखान्यांतून पुरविलें जात असे. तसेंच या कारखान्यांत तयार झालेले विद्यार्थी मुंबईस जाऊन सुतारकीचा धंदा चांगला करूं लागले होते. पण कांहीं वर्षांनीं कारखान्यास उतरती कळा लागली; व याचें कारण बहुधा हेंच असावें कीं, कारखान्याचा कारभार क्राफर्डसाहेब हे आपल्या मनाप्रमाणें चालवीत. आणि कोणच्याही कामांत क्राफर्डसाहेब शिरले कीं, त्यांत पैशाचा घोटाळा

झाल्याशिवाय रहावयाचा नाहीं ही गोष्ट बहुधा ठरलेलीच. तोच प्रकार याहि कारखान्याचा झाला.

अनेक समाईक भांडवलांच्या कारखान्यांच्या रीतीप्रमाणें या कारखान्यांतील भागीदारांना कांहीं वर्षेंपर्यंत ९ टक्के व्याज देण्यांत आलें व कागदोपत्रीं रिझर्व फंडहि शिल्लक दाखविण्यांत आला. पण १८६७ पासून कारखाना डबघाईस आला. क्रार्फर्ड साहेबांचें म्हणणें कीं, ' काम अलिकडे भरपूर मिळावें तसें मिळत नाहीं. आपण पदरचे पुष्कळ पैसे खर्च करून कारखाना कसा तरी चालू ठेविला. पण अखेर भांडवल पुरेसें नसल्यामुळें म्हणा, अगर इतर कारणामुळें म्हणा कारखान्याला व भागीदार लोकांना बूड आली. ' गंगाधरपंत टिळक हे एक भागीदार असल्याचें वर सांगितलें आहे. त्यांनीं १८७० सालीं पुणें जिल्ह्यांतील सुपें गांवाच्या मुक्कामाहून क्राफर्डसाहेबांना पैसे परत मिळण्याविषयीं लिहिलेल्या पत्राची, खुद्द गंगाधरपंत यांच्या हातची, नक्कल मिळाली ती या प्रकरणाच्या शेवटीं स्वतंत्र परिशिष्टांत दिली आहे.

गंगाधरपंत यांनीं १८७० च्या सप्टेंबरांत क्राफर्डसाहेबांस समक्ष भेटून विनंति केली होती; व भेटींतील आश्वासनाप्रमाणें लग्न उभें करून पुढील ९ आक्टोबर रोजीं साहेबमजकुरांस हें पत्र पाठविलें. परंतु त्याचा उपयोग झाला असें दिसत नाहीं. कारण २८ आक्टोबर १८७१ सालीं साहेबमजकुरांनीं सदर कारखान्याचे भागीदारांस एक जाहीरपत्र लिहिलें त्यांत, सदर कारखाना सरकारानें विकत घेऊन टाकावा अशी विनंति केल्याचें कळविलें आहे. तसेंच आजपर्यंत आपण ह्या कारखान्याच्या पायीं २४ हजार रुपये बूड सोसली, ४० हजार रुपयांचे शेअर्स स्वतः घेतले, व ते शेअर्स आपण कंपनीच्या नांवानें करून देत आहों, असेंहि सदर पत्रांत लिहिलें होतें. परंतु भागीदारांचें झालेलें नुकसान भरून येण्यासारखें त्यांत कांहींच नव्हतें. क्राफर्डसाहेब या वेळीं मुंबईस म्यु० कमिशनर असून एकदम आजारी पडून विलायतेस निघाले होते! या धांदलींत सदर कारखाना सरकारच्या गळीं उतरविण्याचा त्यांचा विचार होता; पण हा कावा साधलासें दिसत नाहीं.

तात्पर्य, गंगाधरपंत यांस क्राफर्डसाहेबांमुळें १ हजार रुपयांची ही ठोकर लागली. सन १८७२ सालीं जूनच्या २८ व्या तारखेस गंगाधरपंत यांनीं आपलें मृत्युपत्र लिहिलें. त्यांत हे एक हजार रुपये लोकांकडील येण्यांत दाखविले असून, रत्नागिरी येथील काका फडके यांच्या पांच पांचशें रुपयांच्या दोन पावत्या ( रत्नागिरी सॉ–मिल कंपनीच्या ) यांचा हवाला त्यांत दिला आहे. पण तो हवाला अखेरपर्यंत लोंबत राहिला असें वाटतें!

गंगाधरपंतांच्या मृत्युपत्रांत सुतळीतोडयासह सर्व मिळकतीची याद किंमती लावून दिली आहे. तिजवरून कोंकणच्या स्थावर वतनी तक्षिमेशिवाय घरांत

वडिलोपार्जित अशी नगद मिळकत काहींच नव्हती असें दिसून येतें. अखेर शिल्लक, लोकांकडील येण्यासह, सुमारें ८२९७ दाखविली आहे. ही मिळकत गंगाधरपंतांनीं सर्व स्वतःच्या कष्टानें मिळविली होती. तिच्यापैकीं १/३ त्यांनीं आपला धाकटा बंधू गोविंद रामचंद्र टिळक यांस सदर मृत्युपत्रानें देऊन २/३ हिस्सा म्हणजे अदमासें ५ हजार रुपये आपला मुलगा बळवंतराव टिळक यांस दिले. गंगाधरपंत यांचा अत्यंत हिशेबी व चोखपणाचा बाणा आयुष्यभर त्यांच्या वर्तनांत दिसून आला, तोच सदर मृत्युपत्रांतहि दिसून येत आहे. त्यांत आपल्या समाधिस्थ वडिलांच्या पुण्यतिथीला, आपल्या आजीच्या उत्तरकार्याला व स्वतःच्या वर्षश्राद्धापर्यंतच्या उत्तरकार्याला काय खर्च करावा येथपर्यंत तपशील दिलेला आढळतो !

आपल्या पश्चात् सर्व मिळकत आपल्या धाकट्या बंधूनें स्वाधीन ठेवून संभाळावी, आपल्या अज्ञान मुलाचा बी. ए. पर्यंत विद्याभ्यास करवावा, मुलगा सज्ञान झाल्यावरहि चुलत्या पुतण्यांनीं शक्य तितकें एकत्र राहावें, पुढें न जमल्यास कोंकणची सर्व मिळकत उभयतांनीं निम्मे निम्मे वांटून घ्यावी, आणि नगदी मिळकत वर दर्शविल्याप्रमाणें दोन हिस्से व एक हिस्सा याप्रमाणें वांटून घ्यावी असा सर्व खुलासा मृत्युपत्रांत स्पष्टपणें केला आहे. त्यांतील एक वाक्य खालीलप्रमाणें आहे. " माझा मुलगा बाळ गंगाधर टिळक याची बी. ए. ची परीक्षा होईपर्यंत कांहीं मदत लागल्यास सदरीं लिहिलेल्या रकमेंतून करावी " " कांहीं मदत लागल्यास " या शब्दावरून आपला मुलगा हुशार असल्यामुळें बहुधा स्कॉलरशिपा वगैरे मिळवून आपलें कॉलेजचें शिक्षण बिनखर्ची पदरांत पाडील असाच गंगाधरपंतांचा अदमास असल्याचें उघड होतें.

वरील सर्व हकीकतीवरून गंगाधरपंत हे हिशेबी, करारी, निश्चयी, स्वच्छमनाचे, उद्योगी व कर्तबगार गृहस्थ होते असें दिसून येईल. त्यांची घरची गरिबी नसती, व हौसेप्रमाणें त्यांना आपलें इंग्रजी शिक्षण तडीस नेतां आलें असतें, तर ते बी. ए. होऊन शिक्षणखात्यांत हेडमास्तर किंवा प्रोफेसर व्हावयाचे. परंतु केवळ इंग्रजी शिक्षण नसल्यामुळें ते मागें पडले. असिस्टंट डेप्युटी इन्स्पेक्टरच्या हुद्यापलीकडे त्यांना जातां आलें नाहीं, आणि गरीबीमुळें शालोपयोगी, म्हणजे पुष्कळ विक्री होऊन द्रव्यलाभ करून देणारीं, पुस्तकें लिहून त्यांना आपली महत्त्वाकांक्षा भागवून घ्यावी लागली. तथापि ते बुद्धिवान्, विद्यासंपन्न, व तरतरीत असा त्यांचे संबंधाचा सर्वांच्या मनांत ग्रह होता. स्वाभिमानाबद्दलहि त्यांची ख्याति असे. कोल्हापुरीं पुढें प्रसिद्धीस आलेले दिवाण माधवराव बर्वे हे पूर्ववयांत डेप्युटीएज्युकेशनल इन्स्पेक्टर होते तेव्हां गंगाधरपंत हे त्यांचे हाताखालीं असिस्टंट होते. दोघांचेहि स्वभाव तापट असल्यामुळें परस्परांचें बनत नसे. यामुळें गंगाधरपंतांचें असिस्टंट डेप्युटीची जागा मिळण्याचे कामीं कांहीं दिवस

नुकसानहि झालें. पण या वरिष्ठ—कनिष्ठांपैकीं वरिष्ठ बर्वे हे लोकप्रिय नसून कनिष्ठ गंगाधरपंत हे मात्र पुष्कळ लोकप्रिय असत. यावरून वागणूकींत खरा दोष असल्यास, निदान लोकमताप्रमाणें तरी, तो माधवराव बर्व्यांकडे असावा असें दिसतें. कर्मधर्मसंयोगानें बर्वे व टिळक यांजमधील तेढ पुढील पिढीपर्यंतहि चालली. केसरी व मराठा पत्रांतून बर्व्यांविरुद्ध जे लेख कोल्हापूरप्रकरणीं आले त्याचें कारण टिळकांनीं आपल्या वडिलांचा सूड बर्व्यांवर उगवला असें मात्र कोणी म्हणणार नाहीं; कारण बर्वे यांस यथार्थ म्हणा अगर अयथार्थ म्हणा नांवें ठेवणारे लोक टिळकांप्रमाणें इतरही हजारों होते, व त्यांचें वैर खचित आनुवंशिक नव्हतें. पण बर्वे व टिळक यांजमधील गैरसमज दोन पिढ्यांपर्यंत चालावा यांत कार्यकारणसंबंध नसून कर्मधर्मसंयोगच खरा. अधिकाऱ्यांना अप्रिय पण लोकांना प्रिय होणें ही गोष्ट बळवंतराव टिळकांनीं आपल्या वडिलांपासून उचलली नसली तरी वडिलांच्या पश्चात् पुढें चालविली ही गोष्ट मात्र प्रसिद्ध आहे.

गंगाधरपंत रत्नागिरीहून बदलून पुण्यास आले त्यावेळीं डॉ. भांडारकर हे रत्नागिरीस हायस्कुलांत मास्तर होते. गंगाधरपंतांना अनेक ठिकाणीं पानसुपाऱ्या वगैरे झाल्या त्या प्रसंगीं गंगाधरपंतांचें गुणवर्णन करण्याचें काम प्रायः डॉ. भांडारकरांनीं केलें, व तें मोठ्या हौसेनें आणि खऱ्या मनानें केलें. आपले वडील आणि रामकृष्णपंत भांडारकर यांच्यांतील स्नेहसंबंध बळवंतराव टिळकांनीं खासगी बाबतींत पुढें आमरण मनांत बाळगिला. कर्मधर्मसंयोगानें उभयतांचे व्यासंग, चरित्रक्रम, ध्येयें, संवयी वगैरे सर्व गोष्टी वेगवेगळ्या दिशांच्या ठरल्यामुळें, या मनांतील स्नेहसंबंधास प्रकट असें रूप आलें नाहीं. सर्व जन्मभर वादांतील प्रतिपक्षी हेंच त्यांचें सार्वजनिक नातें लोकांच्या डोळ्यांपुढें अढळ राहिलें. परंतु खासगी रीतीनें उभयतांची गांठ पडल्यास उभयपक्षीं पहिला उमाळा तरी पूर्वार्जित स्नेहसंबंधाचाच येई. हा आपल्या स्नेह्याचा मुलगा अशीच भावना भांडारकर यांची असे, व हे आपल्या वडिलांचे स्नेही अशा आदरबुद्धीनें व योग्य लीनतेनेंच टिळक भांडारकरांशीं वागत व बोलत. रत्नागिरीहून बदली झाल्यावेळीं एका पानसुपारीचे प्रसंगीं भांडारकरांनीं गंगाधरपंत टिळकांसंबंधानें खालील उद्गार काढले होते. " गंगाधरपंतांची विद्वत्ता, सदयता, कल्पकता, निस्पृहता, व निरलस वागणूक हे गुण अर्वाचीनांनीं कित्ता घेण्यासारखे आहेत. आज आपल्या हातांतला ठेवा, व्याकरणाचा सांठा, मराठी भाषेचा समुच्चय, गुरुशिष्यभक्तीचें दुर्मिळ होत चाललेलें भांडार आपण सोडीत आहोंत असें मला वाटतें. " गंगाधरपंत पुण्यास पहिल्यापासूनच असते तर कदाचित् ते कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारखे नांवालौकिकाला चढले असते. व तसें झालेंच असतें तर कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री या पितापुत्रांच्या जोडीप्रमाणेंच गंगाधरशास्त्री व बाळशास्त्री ही पितापुत्रांची जोडी लोकोत्तर ठरली असती!

## भाग १ ला परिशिष्ट (१) टिळकांचा वंशवृक्ष

केशव

दामोदर ( दादाजी )

कृष्णाजी

केशव

कृष्णाजी (मृ. शके १६८७) इतर तीन

केशव ऊर्फ केसोपंत — इतर दोन

रामचंद्रपंत (ज. स. १८०२ समाधि स. १८७२) — इतर तीन

गंगाधरपंत (ज. १३-८-१८२० मृ. ३१-८-१८७२) — गोविंदराव (जन्म १८३५ मृ. १९०४)

= ( पार्वतीबाई मृत्यु २४-७-१८६६ )

बळवंतराव (ज. २३-७-१८५६ मृ. १-८-१९२०)

= सत्यभामाबाई ( मृ. ७-६-१९१२ )

सौ. कृष्णाबाई (ज. १८८०) = (वि. गं. केतकर वकील नाशीक)

विश्वनाथ (ज. १८८३ मृ. १९०३)

सौ. दुर्गाबाई (ज. १८८९) = (पां. रा. वैद्य सरकारी इंजिनियर)

सौ. मथुबाई (ज. १८९१) = (डॉ. श्री. मो. साने प्रोफेसर लखनौ)

रामचंद्र (ज. १८९४)

श्रीधर (ज. १८९६)

लोकमान्यांनीं आपल्या हयातींत कांहीं एका कारणाकरितां आपल्या घराण्याचा वंशवृक्ष तयार केला होता. तो आणखी कांहीं माहिती मिळवून त्यांचे चिरंजीव श्रीधरपंत यांनीं ता. १ मार्च १९२१ रोजीं प्रसिद्ध केला. त्यावरून सुमारें

नऊ पिढ्यांच्या विस्ताराची माहिती उपलब्ध झाली आहे. तिजवरून असें दिसतें कीं, या घराण्यांतील एक पुरुष धोंडोपंत हा पानपतच्या लढाईवर गेला होता व तेथून परत येत असतां वाटेंत निवर्तला. त्यानंतर त्यांचा पुतण्या केशव ऊर्फ केसोपंत म्हणजे लोकमान्यांचा पणजा यांजपासून पुढें सुसंगत माहिती मिळते. या वंशवृक्षाच्या चार पांच मुख्य शाखा असून, प्रत्येक शाखेंत नांवारूपास आलेला एकाद दुसरा मनुष्य तरी आढळतो. या वंशापैकीं कोणी मुनसफ, कोणी इंजिनीयर, कोणी कवि या नात्यानें प्रसिद्धीस आले. कृष्णाजी गणेश टिळक हे सातान्यास सबजज् होते. गोपाळरावजी टिळक हे सिंधमध्यें व इतरत्र एक्झिक्युटिव्ह एंजिनीयरच्या हुद्यावर असून पेन्शन घेतल्यावर त्यांनीं बागलकोट येथें वास्तव्य केलें. विनायक विठ्ठल टिळक हे हायकोर्टांत असिस्टंट रजिस्ट्रार व पुण्यास स्मॉलकॉज कोर्ट जज् होते. हल्लीं त्यांनीं कोल्हापुरास घर केलें आहे. नारायण वामन टिळक हे आधुनिक कवींपैकीं एक प्रमुख कवि म्हणून प्रसिद्ध आहेत. टिळक घराण्यांत धर्मनिष्ठेचा गुण अनेक व्यक्तींमध्यें दिसून आला, तसाच धर्मांतराचा दोषहि या घराण्याचे वांटणीस आला आहे. कवी नारायण वामन व दुसरा एक विश्वनाथ मोरोबा या पुरुषांनीं परधर्माची दीक्षा घेतली होती. लोकमान्यांना या गोष्टीचें मनांतून मोठें वाईट वाटत असे. पण कोणच्याहि घराण्यांतील सर्वच माणसें मनासारखीं लाभणें शक्य नाहीं हेंहि ते पूर्णपणें जाणून होते. घराण्यांत जसा एखादा कुलदीपक निघतो तसा एखादा दिवटाहि निघावयाचा ! उपरिनिर्दिष्ट वंशवृक्षांत नमूद केलेल्याखेरीज, म्हणजे चिखलगांव येथील घराण्याखेरीज; टिळक घराण्याच्या इतर कित्येक शाखा पेण तालुक्यांतील वरसई व वावशी, पनवेल तालुक्यांतील पळस्पें, व मालवण तालुक्यांतील आचरें वगैरे गांवीं असून, दोन अडीचशें वर्षांपूर्वीच ज्या शाखांतील लोक चिखलगांव सोडून बाहेर गेले व ज्यांनीं पुढें कारणपरत्वें आपलीं आडनावें बदललीं अशाहि शाखा विद्यमान असल्याचें समजतें.

## भाग १ ला परिशिष्ट (२)

### गंगाधरपंतांनीं क्राफर्ड साहेबांस पाठविलेलें पत्र.

मेहरबान क्राफर्डसाहेब ईस्क्वायर बहादुर मुक्काम मुंबई, यांसीं गंगाधर रामचंद्र टिळक यांजकडून ऐसाजेः—माझे रत्नागिरी सॉमील कंपनींत प्रथम एक हजार रुपये होते. परंतु पुढें त्या कंपनींत आणखी भागीदार जोडले. त्या समयीं आमचा रिझर्व्हफंड वगैरे भांडवलांत असल्यामुळें आपणच आमचे दोन हजार रुपये केले आहां. दरसाल दर शेंकडा पंधरा टक्के सहज नफा पडेल असें मीं आपल्या मुखांतून एकदोन वेळ ऐकलें आहे. व दरसाल दर शेंकडा दहा टक्केप्रमाणें आपण चार वर्षां मागील नफा दिलाहि आहे. त्याच रीतीनें येत्या दिसेंबरांत चार वर्षें होतील. इतक्या मुदतीचे आठशें रुपये झाले. परंतु त्यांपैकीं एक पैसाहि

मला मिळाला नाहीं. आणि आम्ही तर मुंबई, पुणें, अमदाबाद वगैरे प्रसिद्ध ठिकाणांतील मोठमोठ्या धनाढ्य सावकारांसारखे नसून रत्नागिरी जिल्ह्यांतील कंगाल गरीबें आहों. मरणोन्मुख श्रम करून जे पैसे मिळविले ते आपल्या मांडीवर उरें ठेवून रत्नागिरी सॉमील कंपनींत आपल्या सांगण्यावरून ठेविले. त्याच्या अली-कडील चार वर्षांच्या नफ्याबद्दल एक पैसाहि मिळाला नाहीं. व आम्हांस अनेक व्यवहारांनीं पैसा मिळतो असें नसल्यामुळें या कंपनींतील नफ्यावर आमच्या मुला-बाळांचीं लग्नें वगैरे अवलंबून आहेत. माझे मुलाचें लग्न आज दोन वर्षेपर्यंत करावें असें मनांत आहे, परंतु सदरीं लिहिलेल्या कंपनींतील नफ्याचे रुपये येतील त्यांनीं हें कार्य करूं. कारण दुसऱ्याचे पैसे मागण्यापेक्षां आपल्या इच्छा मारणें हें मला अधिक चांगलें असें वाटतें. सबब इतके दिवस दम धरिला; परंतु आतां मुलगा मोठा झाला असून त्याचें लग्न करीत नाहीं म्हणून लोक हंसतात हेंही सहन होत नाहीं, हें आपणांस विदित करण्याकरितां मी तारीख १८ सप्टें-बर सन १८७० रोजीं आपणांस भेटलों. त्यावेळीं लग्नाच्या पूर्वी पत्र पाठवा म्हणजे तजवीज पाहूं असें आपण सांगितल्यावरून हें मुद्दाम पत्र पाठविलें आहे. आणि कोंकणांतील मुलगी पाहिली आहे. म्हणून फारच गरीबीप्रमाणें कार्य केलें तरी सोन्याचे वगैरे दागिने आणि कापड, अन्नखर्च, मजूरी वगैरे मिळून निदान एकहजार रुपये तरी पाहिजेत. सबब त्या फिकिरींत असून आपल्या सांगण्याप्रमाणें हें पत्र पाठविलें आहे. तरीं येत्या दिपवाळीच्या आंत मला पुणें कलेक्टर तिजो-रींतून निदान आठशें रुपये मिळण्यासारखी मनीआर्डर पाठवून द्यावी, आणि सदरहू रुपये माझ्या नांवें लिहावे. एकंदर कंपनीचा हिशेब होऊन रुपये मिळतील तेव्हां हे रुपये वजा करून बाकी मला द्यावे. कार्याचें काम आहे व पत्र पाठविण्यां-विषयीं आपण मला वचन दिलें आहां म्हणून भरंवशानें लिहिलें आहे. पैसा हातीं आल्याशिवाय लग्नाची तयारी व ठराव करतां येत नाहीं. आणि लग्नाचे मुहूर्त नजीक आले. तरी हें पत्र पावतांच निदान ८०० रुपये पाठविण्याची मेहरबानी झाली पाहिजे. जादा काय लिहूं हे अर्ज दास्त. ( सही ) आपला सेवक,

तारीख ९ आक्टोबर सन १८७०, मुक्काम पुणें. **गंगाधर रामचंद्र टिळक**

## भाग २ रा

# बालपण व विद्याभ्यास

टिळकांचा जन्म सन १८५६ च्या जुलई महिन्याच्या तेविसाव्या तारखेस रत्नागिरी येथें सदोबा गोरे यांचे घरीं झाला. हा दिवस हिंदू पंचांगाप्रमाणें शके १७७८ ची आषाढ कृष्ण षष्ठी सोमवार हा होय. नक्की जन्मवेळ सूर्योदयानंतर सुमारें दोन घटका होती. लग्नकुंडलीवरून पाहतां, ज्योतिर्षांच्याहि मताप्रमाणें, यावेळीं म्हणण्यासारखा अलौकिक योग असा कोणताच नव्हता. एक दोन योगांशिवाय बाकी सर्व कुंडली सामान्य प्रतीची असून कोणाहि ज्योतिष्याचें मन गुंतविण्यासारखी नाहीं असें म्हणतात. टिळकांचें जन्मलग्न कर्क असून, रवि स्वगृहीं, आणि नवमस्थानीं चंद्र व गुरु यांची युति, हेच काय ते दोन भाग्यदर्शक योग या कुंडलींत आहेत.

टिळकांच्या कुंडलीवरून जितकीं भविष्यें वर्तविलीं गेलीं, त्यांहून दुसऱ्या कोणत्याहि कुंडलीवरून आजवर अधिक भविष्यें वर्तविलीं गेलीं नसतील! पण त्याबरोबर हेंहि सांगितलें पाहिजे कीं, यांतील जितकीं भविष्यें चुकलीं तितकीं दुसऱ्या कोणत्याहि कुंडलीवरील भविष्यें चुकलीं नसतील. टिळकांचे वडील जुन्या विचारसरणीचे, फलज्योतिषावर विश्वास ठेवणारे, असे होते. त्यांनीं योग्य समयीं जन्मटिपण स्वहस्तें करून ठेवून आपल्या चिरंजिवाची कुंडली शास्त्रशुद्ध रीतीनें वर्तवून घेतली होती. तिजवरून टिळकांना द्विभार्यायोग आहे, असें भविष्य ठरलें होतें! पण टिळकांचें एकपत्नीव्रत सिद्धीस गेल्याचें प्रसिद्धच आहे.

टिळक उदयाला येऊन त्यांची कीर्ति होईपर्यंत त्यांच्या कुंडलींतील ग्रहांना कोणी फारसें चाळविलें नाहीं व त्रास दिला नाहीं; पण पुढें पुढें त्या ग्रहांना विश्रान्ति म्हणून कशी ती मिळेना. उलट त्यांच्या ग्रहांनींहि आपणास त्रास देणाऱ्या, उलथें पालथें करणाऱ्या, व आपल्या दशान दशा काढणाऱ्या ज्योतिष्यांवर जणू काय सूड घेण्याचा निश्चय केला असावा! हा सूड म्हणजे अर्थात् त्यांचीं भाकितें खोटीं पाडणें हा होय. टिळकांचे चरित्रांतील अनेक गोष्टी लोकोत्तर व प्रसिद्ध असल्यानें गतकालचीं भविष्यें मात्र बिनचूक ठरत; व तीं वर्तविण्याकरितां फलज्योतिषाचे नियमहि स्वतःची ओढाताण वाटेल तितकी करूं देऊन घडलेल्या गोष्टींशीं योगबल बिनचूक मिळतें करून देत. पण भविष्यकाळच्या भाकितांविषयीं हे वस्ताद ग्रह आपला असा कांहींतरी हातचा म्हणून राखून ठेवीत. सुदैवानें स्वतः टिळकांचा फलज्योतिषावर फारसा विश्वास नव्हता. भविष्यकथनाच्या गोष्टी ते सर्वस्वीं रिकाम्या करमणुकीच्या साधनांपैकींच एक असें मानीत;

निदान आपल्या उद्योगशीलतेला आणि निश्चयी स्वभावाला भविष्यकथनाच्या चाळ्याचा यत्किंचितहि उपसर्ग लागूं देत नसत म्हणून गोष्ट बरी. नाहीं तर भलतेंच व्हावयाचें. ज्योतिषग्रहांविषयीं त्यांची आस्तिक्य बुद्धि असली तरी, ग्रहांनीं ग्रहांचें काम करावें व आपण आपलें काम करावें, म्हणजे " Live and let live " या धोरणानेंच ते चालत असत.

बळवंतरावांच्या जन्मापूर्वी त्यांच्या मातोश्रींस तीन मुली झाल्या होत्या. त्यांच्या जन्माच्या वेळीं सर्वांत थोरली मुलगी ( म्हणजे त्यांचे भाचे केसरीचे म्यानेजर धोंडोपंत विद्वांस यांची आई काशीताई ) हिचें लग्नहि झालें होतें. पुत्रलालसेनें टिळकांच्या आईनें सूर्योपासना अनेक वर्षे कडक केली, व तिचें फल म्हणून हा मुलगा आपणांस झाला अशी या बाईची भावना असे. सूर्योपासनेनें त्यांना बरीच कृशता आली होती. त्यांची प्रकृति मूळचीच सुदृढ नव्हती; तथापि संकल्पाप्रमाणें व्रत सफल झाल्यानें बाईंना आपल्या अंगावर मुठभर मांस वाढलेंसें वाटल्यास नवल नाहीं.

टिळकांचें नांव बळवंत असें लोकव्यवहारांत चालू झालें तरी त्यांचें मूळचें नांव 'केशव' असें ठेविलेलें होतें ! अर्थात् केशव हें मुलाच्या पणजाचें व कुलस्वामीचें नांव म्हणून ठेविलें होतें. परंतु 'बाळ' म्हणून जें टोपणनांव लहानपणापासून घरच्या व्यवहारांत चालूं झालें तेंच पुढें कायम टिकलें.

ज्योतिष्यांप्रमाणें टिळकांच्या भाविक चाहत्या लोकांना, त्यांच्या पुढील चरित्रावरून, त्यांचें बालपणहि अलौकिक अशा लीलांत गेलें असें प्रतिपादणें सहजच आवडतें. पण बुद्धिमत्ता व हटवादीपणा या दोन गुणावगुणांच्या लीलांशिवाय त्यांच्या बालचरित्रांत कांहीं विशेष घडलें असें वाटत नाहीं. संस्कृताचें अध्ययन वडिलार्जित व मुलाची स्मरणशक्ति चांगली, यामुळें टिळकांना अगदीं लहानपणापासूनच संस्कृत श्लोक वगैरे शिकविण्यांत येऊं लागले. 'एक श्लोक पाठ करण्याला एक पै' याप्रमाणें मिळविलेल्या त्यांच्या स्वकष्टार्जित मिळकतीची रकम कदाचित् एखाद-दुसऱ्या रुपयापर्यंतहि गेली असावी. त्यांना घरीं अगर बाहेर खाण्याची खोड नसे. यामुळें शाळेंत एक वेळ शेंगा खाल्याचा खोटा आरोप शिक्षकानें त्यांच्यावर घातला, तो त्यांना सहन न होऊन त्यांनीं घरचा रस्ता सुधारला व शिक्षकाच्या अरेरावीचा निषेध केला अशी गोष्ट सांगतात. १८६१ सालच्या दसऱ्याचे मुहूर्तावर टिळकांना शाळेंत घालण्यांत आलें. त्यांचे पहिले गुरु भिकाजी कृष्ण पटवर्धन या नांवाचे होते. या गुरुजींच्या घराण्याचा व टिळकांचा ऋणानुबंध पुढील पिढीपर्यंतहि टिकला. घरचा एकटा मुलगा, व स्वतः बाप हुषार आणि मेहनती शिक्षक, यामुळें शाळेपेक्षां घरींच टिळकांच्या अभ्यासाची तयारी विशेष असे यांत आश्चर्य नाहीं.

मुंज होण्यापूर्वीच टिळकांचें पूर्णांक-अपूर्णांकांपर्यंत गणित, रूपावली, समासचक्र, निम्मा अमरकोश आणि ब्रह्मकर्माचा बहुतेक भाग पाठ झाला होता. १८६४

सालीं टिळकांची मुंज झाली. त्यावेळीं या मुलाचें आधींच झालेलें अध्ययन पाहून उपाध्याय व वैदिक गुरुजी यांना नवल वाटलें. पुढें दोन वर्षांनीं गंगाधरपंत असिस्टंट डे. एज्युकेशनल इन्स्पेक्टर होऊन पुण्यास आले ( १८६६ ). पुणें हें अर्थात् विद्येचें माहेरघर ! जी सोय टिळकांच्या वडिलांना मिळाली नाहीं, व मिळाली तेव्हां प्रथम अर्धवट टाकून द्यावी लागली, ती स्वतः बळवंतरावांना या बदलीमुळें आपोआप घरीं चालत आली. तसें न घडतें तरी गंगाधरपंत आपल्या मुलास हायस्कूलच्या विद्याभ्यासाकरितां निदान रत्नागिरीस तरी ठेवते; व विद्यार्थी तयार करण्याच्या दृष्टीनें रत्नागिरी हायस्कूलाचा लौकिक कांहीं वाईट नव्हता. पण पुण्यांत शिक्षणाचा प्रारंभ, घरीं हौसेनें आस्थापूर्वक शिकविणारा बाप, व पुस्तकें वगैरे उपकरणें हवीं तीं मिळण्याइतकी संपन्नतेची स्थिति, यामुळें सर्वच दृष्टींनीं दुधांत साखर पडल्यासारखें झालें. हा अनुकूल योग मात्र फार दिवस अबाधित टिकला नाहीं; कारण टिळकांचे वडील १८७२ सालीं वारले. परंतु लहानपणींच त्यांच्या शिक्षणाची भूमिका बळकट झाली होती, व गंगाधरपंतांनीं शाळेव्यतिरिक्त मुलाला जें कांहीं त्यांना शिकवितां येण्यासारखें होतें तें शिकविलें होतें. बहुतेक सर्व अंकगणित, समीकरणापर्यंत बीजगणित, युक्लिडचीं दोन बुकें इतकी टिळकांची तयारी इंग्रजी शाळेंत जाण्याच्या वेळींच होती. संस्कृतांत तर ते दहाव्याच वर्षीं इतके तयार झाले होते कीं, सामान्य श्लोक आपला आपण लावीत.

इंग्रजी शाळेंतील प्रवेशाच्या सुमारास टिळकांची आई त्यांच्या दहावे वर्षींच वारली, व त्यांच्या संगोपनाचें काम त्यांच्या चुलतीकडे आलें. टिळकांचा चुलता गोविंदराव हा लहानपणीं बरेच दिवस कोंकणांत होता. त्यांची विद्या तितपतच प्रथम झाली होती. तथापि ते मराठी मास्तरांइतकें सामान्यतः शिकलेले असून कोंकणांतील घरचा व्यवहार पाहण्याचें काम त्यांचेकडेच असे. गोविंदरावानीं कांहीं वर्षें सांवतवाडीस शाळा मास्तराचें काम केलें. पुढें पुण्यास मराठी शाळामास्तराची नोकरी केली. गोविंदराव गंगाधरपंतांपेक्षां १५ वर्षांनीं लहान तरी बळवंतरावांपेक्षां सुमारें २० वर्षांनीं वडील असल्यामुळें गंगाधरपंत फिरतीवर असतां बळवंतरावांचें घरचें सर्व करणें सवरणें त्यांजकडेच असे. १८७२ सालीं म्हणजे टिळकांच्या १६ व्या वर्षीं गंगाधरपंत वारल्यामुळें अर्थातच बळवंतरावांची सर्व व्यवस्था काकाच पहात. पण या सुमारास टिळकांचा हायस्कूलचा अभ्यास संपून ते गांवाबाहेर कॉलेजांत रहाण्यास गेले, कांहीं दिवस मुंबईस होते, व पुढें व एल् एल्. बी. होतांच मास्तर झाले. यामुळें बळवंतरावांची व्यवस्था अशी पाहाण्याचें काम काकांना फारसें उरलेंच नव्हतें. न्यू स्कूलांत शिरल्यानंतर कांहीं दिवसांनीं चुलते पुतणे विभक्त राहूं लागले. गंगाधरपंतांच्या मृत्युपत्रानें उभयतांच्या पैशाअडक्याचा व्यवहार आधींच वेगळा करून ठेवलेला होता. तरी कांहीं दिवसपर्यंत टिळकांचे काका त्यांचे घरची ने आण करीत व खर्च वेच वगैरे लिहीत. एकंदरीनें टिळ-

कांना प्रौढदशेंत वडील असे मनुष्य येवढेंच होतें; व काकांचेंहि पुतण्यावर मुलासारखें प्रेम असे. टिळक कर्ते झाल्यामुळें, व काकांचें शिक्षण अल्प असल्यामुळें, चुलत्यानें सल्लामसलत सांगावी व पुतण्यानें ऐकावी असा प्रकार फारसा उरलाच नव्हता. तथापि बळवंतरावांचे लोकांनीं गायलेले धन्यवाद ऐकून खऱ्या मनानें व अभिमानानें 'बळवंतराव आहेतच तसे' असें म्हणणारा, व १८९७ सालीं त्यांना शिक्षा झाली तेव्हां त्यांच्याकरतां प्रत्यक्ष ढळढळ रडणारा एवढाच प्रौढ नातेवाईक त्यांना लाभला असें म्हणण्यास हरकत नाहीं. बळवंतरावांनीं चुलत्याचा परामर्ष अखेरपर्यंत सर्व प्रकारें घेतला, त्यांचें कांहीं एक कमी पडूं दिलें नाहीं, व वेगळेपण होतें तरी भासूं दिलें नाहीं. काकांची मिळकत थोडी. त्यांचे दोघेहि चिरंजीव अप्रबुद्ध निघाले. हें लक्षांत आणून, वडिलांनीं मृत्युपत्रानें ठेविलेल्या मिळकतीचा आपला वांटा त्यांनीं होऊन काकांनाच दिला असें मनानें मानून तिच्या व्याजाचा उपयोग त्यांनीं प्रायः चुलत्याच्या संसाराकडेच केला.

टिळकांचे काका किती पद्धतशीर हिशोब ठेवीत याचा एक मासला म्हणून त्यांच्या एका रोजकीर्दीचा मथळा खालीं देत आहें:—

श्री लक्ष्मीकेशव प्रसन्न

" खर्चबंद खासगत रा. बाळ गंगाधर टिळक खोत मौजे चिखलगांव तर्फ जालगांव ता. दापोली जि. रत्नागिरी हल्लीं मु. पुणें संवत् १९३४ शके १७९९-१८०० ईश्वर व बहुधान्य नाम संवत्सरे कार्तिक शुद्ध प्रतिपदा व आश्वीन वा॥ अमावास्या ता. ६ नव्हेंबर सन १८७७ ते ता. ४ डिसेंबर १८७८."

या खालीं पैनपैचा तपशीलवार जमाखर्च दिला आहे. कोणी संशोधक भेटल्यास त्याला ह्या वह्यांतून तेव्हांच्या बाजार-निरखांची बोधप्रद माहिती मिळेल. गृहप्रपंच अर्थात् गरीबीचा. घरभाडें दरमहा दीड रुपया देत. घरीं बायकांना लुगडीं तीन सव्वातीन रुपयांचीं व 'खुद्दां'ना उपरणीं दीड रुपयापर्यंत असत. दोन छत्र्यांची मिळून किंमत एक रुपया दहा आणे पडली आहे. त्यावरून टिळकांनीं वापरलेल्या छत्र्यादि बहुधा मेणकापडी असतील. दुधास महिना चार रुपये पुरत. तांदूळ १२-१२।· रुपये पल्लयाचे मिळत व चालत. गहूं ९ रु. पल्ला मिळत. या वेळच्या महिन्याचा सामान्यतः आढावा ४० रुपयांवर दिसत नाहीं. सन १८७५ च्या जून जुलैच्या हिशेबांत टिळकांना डेक्कन कॉलेजांत मिळणाऱ्या दहा रुपयांच्या स्कॉलरशिपचा उल्लेख आहे.

टिळकांचे वडील गंगाधरपंत हे बळवंतरावजींना दहा वर्षांचे घेऊन पुण्यास आले तेव्हां प्रथम तुळशीबागेजवळील कॉन्ट्रॅक्टर दातार यांच्या वाड्यांत त्यांनीं बिऱ्हाड केलें. नंतर ते सोहनी यांचे वाड्यांत व तेथून भटांचे वाड्यांत राहावयास गेले. गंगाधरपंत हे याच वाड्यांत निवर्तले. पुढें १८८१ सालीं म्हणजे न्यू इंग्लिश स्कूल हें मोरोबादादा फडणवीसांच्या वाड्यांतून गद्रे यांचे

वाडयांत गेल्यावर, टिळकांचें बिऱ्हाड तांबे यांचे वाडयांत गेलें. तें तेथें १८८५-८६ सालपर्यंत होतें. नंतर तें फिरून, नारायण पेठेंत हल्लीं जठार यांचा वाडा आहे त्या जागीं मांडे यांचा वाडा होता, तेथें नेण्यांत आलें, व या ठिकाणीं १८९१-९२ पर्यंत राहिल्यावर तेथून टिळक हे सदाशिव पेठेंतील श्रीमंत विंचूरकर यांचे वाडयांतील धाकटया घरांत राहण्यास गेले. ते सन १९०४ पर्यंत तेथेंच होते व त्यानंतर ते नारायण पेठेंतील हल्लींच्या वाड्यांत म्हणजे श्रीमंत गायकवाड सरकारकडून खरेदी केलेल्या वाड्यांत राहावयास आले.

टिळकांचें इंग्रजी शिक्षण पुण्यांतील ' सिटीस्कूलांत ' झालें. तेथें त्यांनीं दोन वर्षांत तीन इयत्ता पुऱ्या केल्या. शाळेंतील शिक्षकाचें व त्यांचें फारसें बनत नसे. विद्यार्थी बुद्धिवान् व हट्टी असला म्हणजे असा बेबनाव सहजच होतो. या संबंधानें कृ. आ. गुरुजी लिहितात, "त्यानें (शिक्षकानें) गणित सांगितलें म्हणजे यानें ( बळवंतरावानें ) तें तोंडानें करावें. त्यानें पाटीवर म्हटल्यास ' पाटी कशाला पाहिजे ? ' म्हणून याचा प्रश्न आहेच. त्यानें स्मरणवही आणावयास सांगितली तरी ती कशाला हवी ? हा याचा प्रश्न. त्यानें फळ्यावर उदाहरण करावयास सांगितलें म्हणजे खडूनें हात कोण खराब करतो ? म्हणून तोंडानेंच सांगण्यास प्रारंभ करावा. असें कांहीं ना कांहीं प्रत्येक वेळेस याचें तेढें असावयाचेंच. एकदां शुद्ध लिहिणें सांगत असतां "संत" हा शद्ब तीन चार वेळ आला. तो या विद्यार्थ्यानें एकसारखा न लिहितां एकें ठिकाणीं ' संत ' दुसरीकडे ' सन्त ' तिसरे जागीं ' सऩ्त ' असें लिहून ठेविलें. शिक्षकानें पहिला शब्द कायम करून बाकीच्या चुका धरल्या. त्यावरून तंटा वाढला तो इतका कीं, अखेर तो हेडमास्तरपर्यंत जाऊन जेव्हां व्यवस्था लागली, व ती आपल्या मनाप्रमाणें लागली, तेव्हां स्वारी स्वस्थ झाली ! वरिष्ठांबरोबर तंटे करण्यामुळें याचें नांव हुषार पण तंटेखोर, बुद्धिमान् पण हट्टी अशा सदरांत गेलें. "

१८६९ सालीं टिळक पुणें हायस्कूलांत पांचव्या इयत्तेंत बसले. या सुमारास गंगाधरपंतांची पुण्याहून ठाण्यास बदली झाली. त्या वेळचे पुण्याचे डेप्युटी इन्स्पेक्टर सिताराम विश्वनाथ पटवर्धन यांचें व गंधाधरपंतांचें बनत नसे, म्हणून त्यांनीं आपली बदली करून घेतली होती. हायस्कूलावर त्या वेळीं जेकब साहेब हेडमास्तर होते. त्यांचे अमदानींत शिस्त हा गुण बुद्धिमत्तेपेक्षां अधिक मानला जात असे. कोणा एका पुस्तकावरून टिळकांचें व संस्कृत शास्त्र्यांचें भांडण झालें. त्यांत साहेबांनीं शास्त्रीबोवांचा पक्ष धरल्यामुळें टिळकांनीं सरकारी हायस्कूल सोडलें, व त्यावेळीं प्रसिद्ध असलेल्या बाबा गोखल्यांच्या शाळेंत ते जाऊं लागले; पण जेकब साहेब जाऊन कुंटे हे हायस्कूलचे हेडमास्तर झाल्यावर ते फिरून हायस्कूलांत परत आले.

टिळक हे अभ्यासाच्या कामांत स्वच्छंदी म्हणण्यापेक्षां स्वतंत्र बुद्धीचे होते

असें म्हणतां येईल. मात्र पुढील आयुष्यक्रमांत At the top of the Ladder ( सर्वांच्या वर ताण ) हे शब्द म्हणीदाखल जणूं काय डोळ्यांपुढें ठेवून जशी त्यांची वागणूक होत असे, तशी कदाचित् शाळेच्या अभ्यासक्रमांत नसावीसें वाटतें. वर्गांतील मुलांत पहिला नंबर नेहमीं हटकून मिळविणें ही महत्वाकांक्षा त्यांनीं बाळगिली नसेल किंवा साधलीहि नसेल. कोणी सांगावें ? परंतु सर्व मुलांपेक्षां कांहीं वैशिष्ट्य, अथवा इतरांना न सुचेल तें सुचण्याची पात्रता, इतर लोकांना सहसा साधणार नाहीं अशा रीतीनें काम करण्याची हातोटी, आपणांत आहे, हें त्यांनीं इतरांच्या निदर्शनास निःसंशय आणून दिलें होतें. वर सांगितल्याप्रमाणें 'संत' हा शद्ब त्यांनीं आपल्या शिक्षकांस अकल्पित रीतीनें तीन प्रकारचा लिहून दाखविला, यावरून हेंच अनुमान सिद्ध होतें. इतर चालचलाऊ विषयांत त्यांच्याहून अधिक मार्क मिळविणारीं मुलें वर्गांत असतील. परंतु, सशास्त्र वैय्याकरणी कोट्या, किंवा जुन्या सुभाषित पद्धतीनें रचलेले संस्कृत श्लोक यांच्या बाबतींत त्यांनीं इतरांस पुढें जाऊं दिलें नाहीं. गुरुजी यांनीं आपल्या पुस्तकांत दिलेले टिळककृत संस्कृत श्लोक जो कोणी वाचील त्यास वरील म्हणणें मान्य होईल. परीक्षेकरितां उदाहरणें घातलीं असतां, बाकीचीं सर्व सोडून सर्वांत अवघड असेल तेंच सोडवावयाचें, व हा मुलगा सोपीं उदाहरणें तर हटकून सोडवीलच याविषयीं शंका नाहीं, अशा प्रकारचें अनुमान परीक्षकाच्या अकलेवर सोंपवावयाचें, हीच गोष्ट त्यांनीं प्रायः अंगिकारिली.

टिळक इंग्रजी शाळेंत असतांच सन १८७१ च्या वैशाखांत त्यांचें लग्न झालें. त्यांची बायको कोंकणांतलीच असून, लग्नहि कोंकणांतच चिखलगांवीं झालें. टिळकांच्या कुटुंबांचें माहेरचें नांव तापीबाई असें असून, सासरचें सत्यभामा असें ठेविलें होतें. या मुलीचें घराणें म्हणजे लाडघर ( ता. दापोली ) येथील बाळ यांचे घराणें. हें कोंकणच्या रीतीप्रमाणें विशेष श्रीमंत नसलें तरी पाहुणचार व आदरातिथ्य यांविषयीं प्रख्यात होतें. या घराण्यांत दानधर्महि बराच चाले. गुरुजी यांनीं या बाळांची एक गोष्ट दिली आहे ती विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. कोंकणांत चोरट्यांच्या उपद्रवामुळें ( ! ) दागदागिने निरनिराळ्या ठिकाणीं धान्यांतून रात्रींच्या वेळीं खुपसून ठेवतात, व दिवसा खुणेनें बाहेर काढतात. बाळांच्या घरीं एकदां असें झालें कीं, दारावर भिकारी आला असतां, घरच्या कोणा माणसानें ओंजळभर तांदूळ घालावयास आणले, त्यांत सोन्याचा दागिना आला. तथापि भिक्षेकरितां वाढण्याला आणलेल्या तांदुळांत जें काय निघालें तें धर्मार्थच असें समजून, तांदुळांबरोबर दागिनादि भिक्षेकऱ्याच्या पदरांत टाकावयास बाळांनीं सांगितलें ! असो; नवरा मुलगा बळवंतराव व नवरी मुलगी तापीबाई उभयतांहि मातृविरहित असल्यामुळें उभयपक्षीं तो थोडासा कमीपणाच होता. टिळकांना लग्नांत कोणी रुसविल्याचें फुगविल्याचें सांगत नाहींत. पण

स्वतः बळवंतराव हे आषाढपाटीच्या वेडगळ वस्तूंऐवजीं तितक्या किमतीचीं उपयुक्त पुस्तकेंच मला द्या, असा आग्रह धरून बसल्याचें माल चरित्रकार लिहितो.

टिळकांच्या लग्नाच्या आधींच त्यांचे आजे काशीस निवर्तले होते; व लग्नानंतर थोड्याच दिवसांत म्हणजे १८७२ च्या ऑगस्टच्या एकतीस तारखेस गंगाधरपंतहि निवर्तले. पण टिळकांचा अभ्यास अर्थात् चालूच होता. त्यावर चुलत्यांची देखरेख होती म्हणण्यापेक्षां स्वतः बळवंतराव जेवढा अभ्यास मनानें करीत तेवढाच होई, हें म्हणणें अधिक खरें. तथापि या सालच्या डिसेंबर महिन्यांत बळवंतराव मॅट्रिक्युलेशन परीक्षेस बसले व पासहि झाले. परीक्षेंतील गणित विषयाचा कागद लिहितांना फक्त अवघड उदाहरणें तेवढीं सोडविण्याचें वर दर्शविलेलें धोरणच त्यांनीं पत्करिलें; व बाकीचीं उदाहरणें न सोडवितां थोड्याच वेळांत पास होण्याइतक्या मार्कांची तयारी करून ते उठून गेले. असो; पुढें कॉलेजच्या शिक्षणाची तरतूद होतीच. टिळकांना एखादी स्कॉलरशिप न मिळाली तरी घरखर्चानें कॉलेजांत जाऊन शिकण्याइतके घरचे पैसे होते; व कॉलेजहि पुण्याजवळच होतें. १८७३ सालीं टिळकांनीं डेक्कनकॉलेजांत प्रवेश केला. टिळकांचा जो क्रम हायस्कुलांत तोच कॉलेजांतहि दिसून आला. स्वतंत्र मनानें वाटेल तें व वाटेल तेवढेंच वाचावयाचें; पण फक्त परीक्षा पास होणें हें एक काम आहे व तें टाळतां येत नाहीं, हें लक्षांत ठेऊन नेमलेल्या पुस्तकांचाहि अभ्यास करावयाचा. एकपक्षीं कित्येक प्रसिद्ध अभ्यासी घोंट्या विद्यार्थ्यांप्रमाणें त्यांनीं रात्रीचा दिवस केला नाहीं, टिपण वह्या लिहून भरल्या नाहींत व घोकल्या नाहींत, किंवा शेंडीस दोरी बांधून रात्रभर दिवा जाळला नाहीं. तथापि, दुसरे पक्षीं विष्णुशास्त्र्यांप्रमाणें नेमलेल्या विषयांकडे त्यांनीं सर्वस्वीं दुर्लक्षहि केलें नाहीं. एकंदरीनें थोडें पण निवडक वाचावयाचें व तेंहि थोडक्या वेळांत, मग तेवढ्या वेळांत कोणी कानांशीं डंका वाजविला तरी तिकडे लक्ष द्यावयाचें नाहीं, व बाकीचा वेळ हसण्या--खेळण्यांत, विशेषतः बरोबरीच्या मंडळीशीं अनेक विषयांवर वादविवाद करण्यांत घालवावयाचा असा त्यांचा परिपाठ असे. पहिलें वर्ष तर त्यांनीं 'देवाला देण्या' करितां म्हणूनच मुद्दाम काढून ठेवलें होतें; मात्र त्यांत विशेष हेतु होता तो हा कीं, आपली शरीरप्रकृति वाईट आहे ती हटकून सुधारावयाची. या हेतूनें त्यांनीं अभ्यासाला दुसरेंहि नव्हे पण तिसरें स्थान नित्यक्रमांत दिलें होतें. सकाळचा बहुतेक वेळ ते तालीमखान्यांत मेहनत करण्यांत अगर नदीवर पोहण्यांत घालवीत; संध्याकाळचा वेळ प्रायः खेळण्यांत व हिंडण्याफिरण्यांत जाई; व रात्रीचा वेळ गप्पागोष्टी थट्टामस्करी करण्यांत जाई. मिळून कॉलेजच्या ठराविक तासांपैकीं जो काय थोडा वेळ अभ्यासाच्या वांटणीस येईल तेवढाच; व त्यांतूनहि ठराविक तासांतील सर्व वेळ वर्गांत जात असे असेंहि नाहीं.

हजेरी लागली कीं ह्यांची सुट्टी झाली. मग एखाद्या वेळीं प्रोफेसराचें व्याख्यान विशेष महत्त्वाचें असलें तरच हे तासाला बसावयाचे. एक दोन वेळां हजेरी देतांच टिळक बाहेर उठून गेल्याचें पाहून प्रिन्सिपॉल यांनीं असें कां म्हणून विचारलें असतां " यंदा मला परीक्षेस बसावयाचें नाहीं, नांवापुरती टर्म भरीत आहें " असा सरळ जबाब त्यांनीं दिला; व पूर्वसंकेताप्रमाणें ते एफ्. ए. च्या परीक्षेस पहिले वर्षी नापासहि झाले. पण त्यांची तालीमबाजीची परीक्षा मात्र पास झाली.

टिळक कॉलेजांत विद्यार्थि असतां जिनसीवाले हे एक वर्ष 'फेलो' होते. पुढें जरीं त्यांचीं सार्वजनिक व्याख्यानें तशींच कॉलेजांतीलहि होत. विद्वत्ता मोठी, वाचन दांडगें, पण परीक्षकांची दृष्टि एकीकडे तर ह्यांची भलतीचकडे. इतकेंहि होऊन विद्यार्थ्याला एकाद्या विषयावरील मोजकी उपयुक्त माहिती मिळेल असेंहि नाहीं. जिनसीवाल्यांचें व्याख्यान म्हणजे तो एक संग्रहच असे. त्यांत काय येईल असें विचारण्यापेक्षां काय येणार नाहीं असेंच विचारावें! इतकें असून आपण सांगितलेल्या माहितीचीं टिपणें विद्यार्थ्यांनीं वर्गांत घेतलींच पाहिजेत असा त्यांचा आग्रह असे. यामुळें भोळसट मुलांना आपल्या वह्या भरलेल्या पाहून आनंद होई, पण मार्मिक विद्यार्थि कंटाळून जात. या बाबतींत जिनसीवाले व टिळक यांचा तंटा झाला. पण प्रसंगोपात्त एका निराळ्या रीतीनें त्यांनीं जिनसीवाल्यांची खात्री करून दिली कीं, हा विद्यार्थि सामान्य नाहीं. असें सांगतात कीं, एके वेळीं प्रो. जिनसीवाले ह्यांनीं विद्यार्थ्यांना संस्कृत कविता करण्याकरितां 'मातृविलाप' हा विषय दिला होता. तेव्हां कविता करणारांत महादेव शिवराम आपटे ह्यांच्या-सारखे संस्कृतज्ञ प्रतिस्पर्धी असतां, जिनसीवाल्यांनीं टिळकांच्याच कविता सर्वांत पसंत ठरविल्या. त्यांनीं शेऱ्यांत लिहिलें कीं, 'कविता फार उत्तम. कांहीं कल्पना जुन्याच आहेत तथापि त्या या विषयाला चांगल्या जुळवून घेतलेल्या दिसतात. संस्कृत कविता रचण्याची तुमची हातोटी चांगली आहे व हा व्यासंग तुम्ही असाच चालू ठेवाल अशी आशा आहे.' टिळकांनीं हायस्कुलांत केलेल्या कविता व कॉलेजांतील कांहीं कविता पुढें परिशिष्टांत दिल्या आहेत. पण कविता करणें या विषयाची टिळकांना स्वभावतःच गोडी नसल्यामुळें त्यांनीं कॉलेजांतच या विषयाची कायमची रजा घेतली; व पुढेंहि काव्य या विषयाला ते एकंदरीनें मनानें कमीच मार्क देत. गायनशास्त्राचा किंवा कलेचा त्यांना जसा तिटकारा होता तसाच काव्य विषयाचा. 'तिटकारा' हा शब्द अधिक कठोर असला तरी, या दोन्ही विषयांची त्यांना मनापासून गोडी नव्हती याविषयीं मात्र शंका नाहीं. टिळकांना कागदाला टांक किंवा पेन्सिल लावण्याचा मनापासून कंटाळा होता. यामुळें, त्यांनीं जिनसीवाल्यांच्या व्याख्यानाच्याच काय पण इतर प्रोफे-सरांच्याहि व्याख्यानांचीं लेखी टिपणें अशीं फारशीं घेतलीं नाहींत. पण कोणतीहि गोष्ट एकदां मनावर घेतली म्हणजे ती पुरी करावयाची, या त्यांच्या स्वभावा-

प्रमाणें मेरी व इलिझाबेथ ह्यांच्या कारकीर्दीवर नमुनेदार टिपणें तयार करण्याचें त्यांनीं एकदां मनावर घेतांच, त्या विषयावरील दहा बारा पुस्तकें वाचून टिपणें इतकीं समर्पक तयार केलीं कीं, इतर विद्यार्थ्यांनींहि त्याच्या प्रती करून घेतल्या. तसेंच एकदां व्याकरणविषयाची चर्चा निघाली असतां टिळकांनीं अनेक व्याकरणांतील नियमांची निवड करून एक नवा प्रबंधच बनविला, व तोहि पुष्कळ लोकांना पसंत पडला असें म्हणतात.

तात्पर्य, अभ्यास करावयाचा तो थोडा व निवडक; आणि परीक्षेंत अमुकच दर्जा किंवा अमुकच बक्षीस किंवा स्कॉलरशिप मिळवीन अशी महत्त्वाकांक्षा धरलेली नसल्यामुळें, विद्यार्थी या नात्यानें टिळकांची कीर्ति विशेष झाली नाहीं. तथापि त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल, विशेषतः गणित व संस्कृत या विषयांसंबंधानें, समकालीन विद्यार्थ्यांत त्यांना बहुमान मिळे.

कॉलेजच्या पहिल्या वर्षीं त्यांनीं तालिमबाजीशिवाय दुसरें कांहींच केलें नाहीं, असें म्हणतां येईल! पण ती विद्या मात्र अभ्यासानें इतकी साध्य करून घेतली कीं, अवघ्या एका वर्षाच्या आंत आपल्या शरीरप्रकृतींत त्यांनीं जमीनअस्मानाचें अंतर पाडलें. प्रारंभीं डोकें लहान, पोट मोठें, हातपाय बारीक व शरीराची काठी ठेंगणी यामुळें एखाद्या रोग जडलेल्या, किंवा विशेष आवळलेल्या मुलासारखे ते दिसत. पण प्रत्यहीं दोन दोन तास तालमींत घालवून व जोर बैठकी यांची संख्या क्रमानें वाढवून, कुस्ती करून, पोहणें बोटिंग वगैरे इतर व्यायाम करून, व पुष्कळसें दूध पिऊन व पचवून त्यांनीं आपली अंगलट इतकी पालटली कीं, ते एक वर्षांत ओळखूं येईनासे झाले असें म्हणतात. या तालीमबाजीच्या उद्योगांत त्यांना जोडीदार म्हटले म्हणजे दाजी आबाजी खरे हे होत. दाजीसाहेबांची आंगलट पहिल्यापासूनच चांगली, व त्यांनाही तालमीचा नाद असल्यामुळें त्यांचें ह्यांचें जमे. थोड्याच दिवसांत बळवंतराव दाजीसाहेबांच्या बरोबरीला आले. एकमेकांकडून दंडावर अधिक बुक्या मारून कोण घेतो व सोसतो अशा विषयीं त्यांची स्पर्धा चाले. तालमीप्रमाणें क्लबांतहि या निश्चयी तालीमबाजांचा प्रभाव दिसून येऊं लागला. कारण येतां जातां धडकी दिल्यानें जशा क्लबाच्या भिंती कुरकुरूं लागल्या, तसाच, आपण मेहनतीनें भाजलेल्या पोळ्यांचें दिवाळें निघण्याचे प्रसंग वारंवार येऊं लागल्यामुळें आचारीहि कुरकुरूं लागला. कॉलेजांत शरीर वाढण्याचें मुलांचें प्रायः वयच असतें. त्यांतूनहि त्याला कसरत किंवा मेहनत यांची जोड, आणि दूध तूप गहूं यांचा खुराक मिळाल्यास, पुढें जन्मभर उपयोगी पडणाऱ्या पुस्तकी विद्येप्रमाणें शरीरसामर्थ्यहि कॉलेजांत कमावतां येणें ही स्वाभाविक व सोपी गोष्ट आहे. बळवंतराव टिळकांच्या बाबतींत तरी असें खास म्हणतां येईल कीं, कॉलेजांत संपादलेल्या पुस्तकी विद्येहून त्यांनीं मिळविलेल्या शरीरसंपत्तीनेंच पुढील आयुष्यांत त्यांचा अधिक उपयोग करून दिला. कारण

तरुण वयांत योग्य वेळीं ही खबरदारी त्यांनीं घेतली नसती तर पुढें इतके शारीरिक व मानसिक कष्ट सोसण्याला ते समर्थ झालेच नसते.

टिळक हे कधीं टेनिस किंवा क्रिकेट असले खेळ खेळल्याचें ऐकिवांत नाहीं. पण होडींत बसून दूरवर एकटयानें ती वल्हवीत नेणें आणणें, विशेषतः पाण्यांत पुष्कळ वेळ डुंबत राहणें, हे खेळ त्यांना मनापासून अधिक आवडत. पुढें त्यांचे 'बोटिंग' हि सुटलें; आणि डेक्कन कॉलेज इतकें जवळ असतां कधींकाळीं हौसेनें मुद्दाम उठून कॉलेजांत जाऊन या करमणुकीचें त्यांनीं मागाहून कधीं सेवन केल्याचें कोणी सांगत नाहीं. पण पोहण्याची हौस त्यांची अखेरपर्यंत कायम होती. एके प्रसंगीं बनारस येथें ते पोहून गंगापार झाल्याचें पुष्कळ लोक सांगतात. एकदां पाण्यांत उतार्णे पडल्यावर तास तासभर तसेंच राहण्यांत त्यांना हातखंडा असे; व अशा स्थितींत मौजेनें हातानें दशमी मोडून ते खात, असें जें गुरुजींनीं लिहिलें आहे त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. संध्याकाळच्या वेळीं कॉलेजच्या आवारांत ते भटकावयास निघत; याचा अर्थ लोक चालण्याचा व्यायाम करावयास जातात तसें मात्र नव्हे. या प्रकारच्या व्यायामाचा त्यांना नेहमीं कंटाळा असे; व मोठेपणांतील तीस पसतीस वर्षांत ते बाहेर फिरावयाला असे दहावीस वेळा तरी गेले असतील किंवा नाहीं याची शंकाच वाटते!

पण कॉलेजाच्या आवारांतील टिळकांचें भटकणें म्हणजे यदृच्छेनें वाटेल तिकडे जाणें व वाटेल तें करणें. या भटकण्याच्या त्यांच्या फेऱ्या रात्रीं दहा दहा वाजेपर्यंतहि चालत. कारण टिळकांना, कॉलेजांत काय किंवा एरवीं काय, आवशीं लवकर निजून सकाळीं लवकर उठून बाहेर पडण्याचा कंटाळा. किंबहुना जाग्रणाची मनापासून आवड असेंहि म्हटलें तरी चालेल. भटकण्याच्या ह्या फेऱ्या व हीं जाग्रणें यांत केव्हां केव्हां कुचेष्टेचाहि हेतु असे; मात्र या कुचेष्टेची कांहीं अंशी एक ठराविक दिशा होती. ही दिशा म्हणजे बरोबरीचे जे विद्यार्थी स्नेही हंसें करून घेण्यासारखे थेर करणारे असतील, त्यांचें त्यांनीं हटकून हंसें करावयाचें! कॉलेजांतील सर्वच विद्यार्थि अशा वयांत थोडेबहुत हूड असतात. त्यांना स्वतःची थट्टा कोणी केली तरी सोसते व दुसऱ्याची थट्टा करण्याची आवड असते. अशा स्थितींत टिळकांनीं हूडपणाच्या अमुक अमुक गोष्टी केल्या असें सांगण्यांत विशेष मातब्बरीहि नाहीं. उदाहरणार्थ, कोणी स्नेही शरीरप्रकृतीला फारच नाजूकपणानें जपतो असें दिसलें कीं, त्याचा नाजूकपणा नाहींसा होईपर्यंत त्याचे हे हाल करावयाचे. कोणी प्रकृति सुदृढ होण्याकरितां 'पेटंट' औषधें घेत असले तर त्यांच्या औषधाच्या बाटल्या यांनीं खिडकींतून बाहेर फेकून द्यावयाच्या, व 'तालमींत चल मी प्रकृति सुधारून देतों' असें म्हणावयाचें. यांचा एक स्नेही विशेष गुलहौशी होता. त्यानें हरप्रयत्नानें फुलें गोळा करून उन्हाळ्या दिवसांत तीं बिछान्यावर पसरून पुष्पशय्या करावी, व टिळकांनींहि त्याला 'तूं काय

बायको आहेस कीं काय ' असें म्हणून त्याची पुष्पशय्या रोज हटकून विसकटावी! अशा गोष्टी करण्यांत रात्रीं अपरात्रीं फिरणें, कोणाच्या दाराचीं भिंगें फोडून आंतून अडणें काढून कार्यभाग साधणें, किंवा भिंतीच्या कठड्यावर चढून मागच्या बाजूच्या खिडक्या उघडून त्यांतून खोल्यांत प्रवेश करणें असल्या गोष्टीस ते मागें घेत नसत. कॉलेजच्या आवारांतून हे एखाद्या स्नेह्याबरोबर अंधाऱ्या रात्रीं दहा दहा वाजतां भटकत असलेले दिसावयाचे, व असलीं हूडपणाचीं कृत्यें करावयाचे. यावरून टिळकांना त्यांच्या मार्मिक स्नेहीमंडळींनीं ' डेव्हिल ' (सैतान) ही पदवी दिली होती. तसेंच या वेळेपासूनच त्यांच्या अंगीं स्पष्टोक्ति व तोडून बोलण्याची संवय असल्यामुळें, कॉलेजांत त्यावेळीं चालू असलेल्या ' केनिलवर्थ ' नांवाच्या कादंबरींतील 'ब्लंट' नामक एका पात्राचें नांवहि त्यांना मिळालें होतें.

डेक्कन कॉलेजांत मुलें गेलीं म्हणजे सोंवळें ओंवळें थोडें कमीच होतें. तथापि सोंवळ्याचा नायनाट या कॉलेजांत परवां परवांपर्यंत झालेला नव्हता. एकहि मुलगा सोंवळ्यानें जेवावयास बसत नाहीं असा क्लब बहुधा एकहि नसे; व निदान असा एकाद दुसरा तरी क्लब असे कीं, ज्यांत सोंवळें न नेसणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेशच मिळत नसे. टिळकांची घरची परंपरा सोंवळें ओंवळें पाळण्याची असे, एवढेंच नव्हे तर त्यांची मनःप्रवृत्ति सामान्यपणें सोंवळें ओंवळें कॉलेजांतहि टिकवावें अशा प्रकारची होती. यामुळें ते स्वतः तर सोंवळ्यानें बसतच, पण कोणी सोंवळ्याचा मुद्दाम उच्छेद करूं लागला, तर त्याच्याशीं वाद किंवा कलागत करीत. सोंवळ्याची अतिशयोक्ति करणारे कर्मठ जिनसीवाले व तितकीच जोराची प्रतिक्रिया करणारे त्यांचे टीकाकार कॉलेजांत असल्यामुळें अशा वादाचे किंवा कलागतीचे प्रसंग सहज यावयाचे. तसेंच टिळकांचा पोशाख व रहाणी तेव्हांहि अगदीं साधीच असे. त्यावेळीं डेकन कॉलेजांत राहण्याचा खर्च फार येत नसल्यामुळें टिळकांसारख्या मध्यम स्थितींतील विद्यार्थ्याला वाटल्यास थोडीशी मिजास करतां आली असती, पण मनानेंच त्यांना ती नकोशी असे.

स्वभाववैचित्र्यासंबंधानें म्हणजे मानसशास्त्राच्या दृष्टीनें कॉलेज हें स्थान, विशेषतः त्यांतील भोजनवसतिगृह, मोठें चित्ताकर्षक असतें. कांहीं अर्धेमुर्धें शिक्षण मिळालेलें आहे, अशा स्थितींतलीं अल्पवयीं मुलें या ठिकाणीं एकत्र येतात; त्यांना वागणुकीचें किंचित् स्वातंत्र्य असें येथें प्रथमच मिळतें; आणि ज्यांची मर्यादा ठेवावी, किंवा आदबी राखावी असें वडीलधारेंहि तेथें कोणी नसतें. यामुळें अनेक विद्यार्थ्यांच्या स्वभावांत जे विशेष गुणदोष किंवा खांचाखोंचा असतात त्या तेथेंच प्रथम प्रगट होतात. एका टोंकास धूम्रपान मद्यपान वगैरे व्यसनाची आवड स्नेह्यासोबत्यांच्यामुळें कित्येकांना जडते, मेजवान्यांच्या प्रसंगानें मिष्ट पदार्थ सेवनाची संवय लागते, व स्वभावांत स्वार्थीपणा उन्मत्तपणा वगैरे येतात; तर दुसऱ्या टोंकास कॉलेजांत मिळणाऱ्या उदार शिक्षणानें यौवनोत्पन्न सद्भावनांना

मदत होऊन, या दोहोंच्या संगमानें पुढील सर्व जन्म सत्कार्याकडे निःस्वार्थपणानें लावण्याचें ध्येयहि विद्यार्थ्यांच्या मनःक्षितिजावर कॉलेजांतच उदित होतें. अर्थात् आतां कोणत्याहि टोकाचीं अशीं एकांतिक उदाहरणें विद्यार्थ्यांच्या एकंदर संख्येच्या मानानें थोडीं असतात हें खरें; तथापि सुशिक्षितांपैकीं वाईटांतल्या वाईट व चांगल्यांतल्या चांगल्या उदाहरणांचें मूळ बीज प्रायः कॉलेजांतच आढळतें यांत शंका नाहीं. ह्या दोन्ही टोकांना स्पर्श न करणारा, आणि धोपट मार्गानें जाऊन कोणीकडून तरी कॉलेजचें शिक्षण संपवून पुढें संसारयात्रा कशी सुखानें होईल या विचारानें गढून गेलेला, मध्यम विद्यार्थिवर्गच येथें फार मोठा असतो. पण उदार किंवा वरिष्ठ शिक्षणाची समाजांत स्तुति किंवा निंदा होणें, याची जबाबदारी वरील दोहोंपैकीं कोणत्या तरी एका टोंकास जाऊन पराक्रम करून दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांवरच असते. कोंकणांत भातशेती करतांना प्रथम एक लहानसा जमिनीचा तुकडा जाळून भाजून निकोप करून त्यांत भाताचें बीं पेरतात, व त्यांत रोपें उगवलीं म्हणजे मग तीं सर्व शेतभर लावतात. त्यांतील कांहीं थोडीं रोंवतांच वाळतात किंवा कुजतात, पुष्कळशीं मामुली पद्धतीप्रमाणें वाढून दर लोंबीमागें ठराविक पीक देतात, पण कांहीं थोडीं मात्र इतकीं उत्तम पोसतात कीं, त्यांच्या लोंब्या प्रदर्शनांत मांडण्याला किंवा नमुनेदार बियाणाला ( सीडसिलेक्शनला ) उपयोगीं पडतात. शिक्षणाच्या बाबतींत कॉलेज हें एक ' सीडबेडच ' होय.

टिळकांच्या वेळीं डेक्कन कॉलेजांत सुमारें शेंदीडशें विद्यार्थि होते. परंतु त्यांपैकीं किति थोड्यांचीं नांवें आपणांस ऐकूं येतात ? प्रसिद्धि किंवा कीर्ति ही नैमित्तिक मानिली तरी, किति थोड्यांच्या हातून लोकोत्तर नसलीं तरी खरीं लोकोपयोगीं कृत्यें पुढें घडलीं असें दाखवितां येईल ? टिळकांच्या बरोबर कॉलेजांत असतां पुढील आयुष्यक्रमांत टिळकांनीं पसंत केलेल्या धोरणाच्या अगदीं विरुद्ध दिशेचें धोरण पत्करून ज्यांनीं स्वतःचा नाश केला, किंवा आपल्या शिक्षणास लोकांकडून नांवें ठेऊन घेतलीं, अशा कोणी थोड्या व्यक्ति असतील त्यांचीं नांवें आम्हांस माहीत नाहींत. पण वर दर्शविलेल्या मध्यम मार्गानें जाणाऱ्या सुबुद्ध अशा टिळकांच्या अनेक स्नेह्यांचीं नांवें निरनिराळ्या रीतीनें पुढें आलीं आहेत. यांपैकीं कोणी उत्तम वकील, न्यायाधीश, वगैरे होऊन गेले, कित्येकांनीं पैसे पुष्कळ मिळविले, व बहुतेकांनीं आपला संसार चार लोकांच्या रीतीप्रमाणें केला; पण त्यांच्या मनांत किंवा कृतींत लोकोत्तरपणा नसल्यामुळें त्यांचीं नांवें प्रसिद्धीस आलीं नाहींत. इतकेंच नव्हे तर आपणापेक्षां टिळकांनीं उदार शिक्षणाचा खरा मोबदला आपल्या देशाला व समाजाला अधिक करून दिला असें तेच लोक आज प्रांजळपणें कबूल करितात. टिळकांपेक्षां अधिक हटकून परीक्षा पास होणारे, किंवा त्यांच्यावर नंबर मिळविणारे, किंवा पटाईत तिरंदाजाप्रमाणें युनिव्हर्सिटी-

तील बक्षिसें किंवा स्कॉलरशिपा नेमक्या तोडून पायाशीं पाडणारे असे विद्यार्थी टिळकांच्या वेळीं, त्यांच्या वर्गात किंवा त्यांच्या वरच्या खालच्या वर्गात, अनेक होऊन गेले. पण पुढें सार्वजनिक चरित्रक्रमांत जें यश स्वतः टिळकांना मिळालें तें यांपैकीं कोणालाहि मिळालें नाहीं. कारण जगांत स्वतः बुद्धिपेक्षां तिचा सदुपयोग हाच अधिक श्रेष्ठ आहे.

टिळकांच्या सहाध्यायी विद्यार्थ्यांपैकीं, म्हणजे एकाच वेळीं डेक्कन किंवा एलफिन्स्टन कॉलेजांत बरोबर किंवा वर खालीं असणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं, आप्पासाहेब शारंगपाणी, दाजीसाहेब खरे, श्रीधर बाळकृष्ण उपासनी, लक्ष्मण मोरेश्वर देशपांडे, मनोहरपंत काथवटे, महादेव भास्कर चौबळ, दादासाहेब खापर्डे, ओक शास्त्री, नारायणराव चंदावरकर, आर. डी. सेटना, दस्तुर, गोपाळराव आगरकर, वामनराव आपटे वगैरे गृहस्थांचीं नांवें कांहीं कमी कांहीं अधिक प्रसिद्ध आहेत. यामुळें यांपैकीं बहुतेकांनीं स्वीकारलेला मार्ग, आणि टिळक आगरकर आपटे वगैरे थोड्या लोकांनीं स्वीकारलेला मार्ग यांतील खरें अंतर काय, व खरें महत्त्व कशाचें या गोष्टींचें वेगळें विवरण करीत बसण्याचें कारणच नाहीं.

टिळकांच्या वेळच्या डेक्कनकॉलेजच्या प्रोफेसर मंडळींत केरोपंत छत्रे व प्रो. शूट ह्या नांवाचे दोघे प्रोफेसर हेच काय ते विद्यार्थीवर्गाला प्रिय होते असें सांगतात. केरोपंत छत्रे यांचें गणित व ज्योतिष या दोन विषयांतील प्रावीण्य प्रख्यातच आहे. छत्रे हे कांहीं दिवस ॲक्टिंग प्रिन्सिपॉलच्या जागेपर्यंत वाढले होते. सरकारच्याहि मनांत त्यांचेबद्दल आदरबुद्धि वसत असे. अर्धवट इंग्रजी शिकलेल्या ह्या गृहस्थानें डेक्कन कॉलेजच्या प्रिन्सिपॉलच्या जागेपर्यंत बढती मिळविली यावरून त्यांची बुद्धिमत्ता सर्वमान्यच असली पाहिजे हें उघड आहे. प्रो. छत्रे यांनीं गणित विषय बहुधा पुस्तकाच्या सहाय्यानें स्वतःच स्वतःला शिकविला म्हणतात. देशी व विदेशी पद्धतीच्याहि गणितशास्त्राचें ज्ञान त्यांना फार चांगलें होतें. ग्रहांचे वेध स्वतः घेणारा असा आपल्या आधुनिक सुशिक्षितांत हाच पुरुष प्रथम होऊन गेला. सूर्यावरील डाग आणि पृथ्वीवरील पर्जन्यवृष्टि यांमध्यें कांहीं अवश्य संबंध आहे, अशा अर्थाचा एक निबंध प्रो. छत्रे यांनीं लिहिला होता तो सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाच्या जुन्या एका अंकांत वाचकांस मिळेल. विद्वत्तेबरोबर प्रो. छत्रे यांचे अंगीं दुसरा एक मोठा गुण होता, तो म्हटला म्हणजे अत्यंत साधी वागणूक. थोरां मोठ्यांशीं किंवा लहानाशीं ते प्रायः एकाच रीतीनें म्हणजे प्रांजलपणानें, खेळीमेळीनें व निगर्वीपणानें वागत. साधेपणाच्या जवळ जवळ येणारा जो मूर्खपणा किंवा पोरकटपणा तो अंगीं असणारे 'लोक-प्रिय' प्रोफेसर डेक्कन कॉलेजांत मागें पुढें होऊन गेले. पण लोकप्रियतेंतहि फरक असतो. छत्र्यांची लोकप्रियता ही आदरनिष्ठ होती. देशी गुरुजींच्या पद्धतीप्रमाणें वाटेल त्या विद्यार्थ्यांनें त्यांजकडे वाटेल तेव्हां जाऊन

विषय समजावून घ्यावा. त्यांच्या घरीं विद्यार्थ्यांना मुक्तद्वार असे; म्हणजे जाण्या-येण्यालाच नव्हे, तर जेवण्यालाहि. पुष्कळ गरीब विद्यार्थ्यांना ते स्वतः फी वगैरे देत असत. त्यांची सर्वमान्यता दोन विशेष गोष्टींवरून चांगलीच दिसून येते. त्या ह्या कीं, ते वारल्यावर सरकारनें त्यांच्या कुटुंबाला तहाहयात शंभर रुपये पेन्शन ठरवून दिलें होतें. आणि त्यांच्या स्मारकफंडाचे सेक्रेटरी रानडे भांडारकरप्रभृति असून या फंडाची वर्गणी दहा अकरा हजारांवर गेली होती. त्या काळीं सार्वजनिक वर्गण्या ही गोष्ट जरा नवीनच असल्यामुळें स्मारक फंडाची ही मोठी रक्कम प्रो. छत्रे यांची विशेष लोकप्रियता दर्शविते यांत शंका नाहीं.

दुसरे लोकप्रिय प्रोफेसर म्हणजे प्रो. शूट हे होत. हे अर्थशास्त्र, इतिहास, नीतिशास्त्र वगैरे विषय शिकवीत. त्यांची शिकविण्याची पद्धति स्वतंत्र बाण्याची व मार्मिकपणाची असे. हे शिक्षक विद्यार्थ्यांना प्रिय असले तरी, ते विद्यार्थ्यांत फारसे मिसळत असें दिसत नाहीं. कांहीं दिवस प्रो. फॉरेस्ट हेहि डेक्कन कॉलेजांत गणितविषय शिकवीत होते. परंतु त्यांना तो विषय येत नसल्यामुळें त्यांचें विद्यार्थी-वर्गांत हसें होई. दुसरे वर्षी एफ. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर, टिळक हे एक टर्मभर मुंबईस एल्फिस्टन कॉलेजमध्यें राहिले होते. त्यावेळीं कॉलेजांत गणित शिकविण्याचें काम प्रो. हॅथॉर्नवेट यांजकडे होतें. परंतु त्यांचें गणितविषयांतील प्रावीण्य केवळ पुस्तकी व तांत्रिक होतें; मात्र त्यांची टापटीप व ठराविक विषय परीक्षेच्या दृष्टीनें जरूरीपुरता माहीत करून देण्याची पद्धत ही चांगली असे. या प्रोफेसरांचें शिकविणें एकंदरीनें टिळकांना पसंत पडलें नाहीं म्हणून ते पुण्यास परत आले, व स्वतःच्या मदतीनेंच गणितविषयाचा अभ्यास करून १८७६ सालीं बी. ए. च्या परीक्षेंत पास होऊन पहिल्या वर्गांत आले. वामन शिवराम आपटे हेहि गणित विषय घेऊनच पहिल्या वर्गांत पास झाले. ह्यांचा हातखंडा विषय म्हटला म्हणजे संस्कृत. तथापि आपण बुद्धिमत्तेच्या जोरावर वाटेल त्या विषयांत प्रावीण्य मिळवूं शकूं अशी त्यानीं स्नेही मंडळींत चुरशीमुळें प्रतिज्ञा केली होती म्हणतात, व ती खरी करून दाखविलीहि. १८७७ सालीं गणित विषयाचा अभ्यास करून टिळक एम्. ए. च्या परीक्षेस बसले, परंतु नापास झाले. तेव्हां एम्. ए. चा अभ्यास तसाच टाकून ते एल्. एल्. बी. कडे वळले. व १८७८ व १८७९ ह्या दोन सालांत अभ्यास करून १८७९ च्या डिसेंबरांत ते एल्. एल्. बी. पास झाले. पुढें पांच सहा वर्षांनीं फर्ग्युसन कॉलेज निघाल्यावर प्रोफे-सरीला योग्य अशी एम्. ए. ची परीक्षा द्यावी असें टिळकांच्या मनांत येऊन ते चार पांच महिने रजा घेऊन अभ्यास करण्याकरितां प्रो. ढेकणे यांजबरोबर पुण्यास हिराबागेंत एकीकडे जाऊन राहिले होते, व त्याच वर्षी परीक्षेस बसलेहि. परंतु त्याहि वर्षी ते नापास झाले. यापुढें त्यांनीं एम्. ए. चा नाद सोडला व पुढें लवकरच कॉलेजहि सोडलें.

टिळकांचें गणित व संस्कृत हे विषय चांगले असतां, केवळ गणित विषय घेऊन एका वर्षाच्या अभ्यासानें पहिल्या खेपेस ते नापास झाल्याबरोबर, त्यांनीं त्यावेळीं एम्. ए. चा अभ्यास कां सोडला व एल्. एल्. बी. चा मार्ग कां पत्करला हें नक्की कळत नाहीं. बी.ए.पास होईपर्यंत स्वतंत्र शाळा किंवा कॉलेज काढून शिक्षक किंवा प्रोफेसर म्हणून जन्मभर राहावें ही कल्पना त्यांचे मनांत आली असेल किंवा नाहीं याची शंका येणें स्वाभाविक आहे. निदान शाळा काढण्याविषयीं त्यांचे आणि आगरकरांचे बेत झाले ते, टिळक १८७९ च्या सप्टेंबरांत एल्एल्. बी च्या अभ्यासाकरितां, पुण्यास डेक्कनकॉलेजमध्यें येऊन राहिले असतां झाले असें दिसतें. दरम्यान एम्. ए. ची परीक्षा टाकून देऊन एल्.एल्. बीकडे टिळक वळले याचें कारण, शिक्षक न होतां हायकोर्टांत वकिली करावी अशी इच्छा टिळकांना कदाचित् झाली असावी. टिळकांबरोबर बी. ए. पास झालेले बरेच लोक एल्एल्. बी. कडेच गेले होते; एम्. ए. कडे गेलेले असे फारच थोडे. शिवाय रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक ह्यांचें उदाहरण कोंकणाशीं संबंध असलेल्या होतकरू तरुण पदवीधरांच्या डोळ्यांपुढें नित्य असे. मुंबईत ब्राह्मणवर्गांपैकीं सर्वांत प्रमुख म्हटले म्हणजे एक मंडलीकच होते. त्यांचा वकीलीचा धंदा मोठा, सरकारांत मान्यता फार, व लोकप्रियताहि पुष्कळ. विद्वत्तेंत ते अग्रगण्य नसले तरी पक्के विद्याव्यासंगी असून, संशोधनात्मक वगैरे निबंध लिहून त्यांनीं थोडेंबहुत नांव मिळविलें होतें. फेरोजशहा मेहेता यांच्या आदल्या पिढीचे राजकीय पुढारी म्हटले म्हणजे मंडलीक हेच होत, व फेरोजशहाप्रमाणें किंबहुना त्याहूनहि रतिभर अधिकच म्हटले तरी चालेल. ते निरस्पृह, रुबाबदार, साहेबलोकांशीं फटकून व बरोबरीच्या नात्यानें वागणारे असत. मंडलीक व टिळक ह्या दोघांचाहि तालुका दापोली हाच होता. एवढेंच नव्हे तर मंडलीक हे टिळकांचे वडील गंगाधरपंत ह्यांचे स्नेही असत. हा स्नेह अर्थात् गरीब श्रीमंतांतलाच होता. तथापि बळवंतराव टिळकांची बुद्धिमत्ता व तरतरी ह्यांची मंडलीकांना प्रत्यक्ष माहिती, व बळवंतरावांचें मंडलीकांच्या घरीं नेहमीं येणें जाणें असल्यामुळें, बापाच्या ऋणानुबंधाइतकाच मुलाचाहि ऋणानुबंध मंडलीकांशीं जडला होता. आणि खुद्द मंडलीकांनीं टिळकांना एम्. ए. न होतां एलएल. बी. कडे जाण्याचा उपदेश स्नेहबुद्धीनें किंवा मित्रवत्सलतेनें केला असण्याचा जितका संभव आहे तितकाच, मंडलीकांनीं न सांगताहि मंडलीकांकडे पाहून, त्यांच्यासारखें हायकोर्ट वकील व्हावें असें टिळकांच्या मनांत आपोआप येण्याचाहि संभव होता.

एल्एल्. बी. च्या अभ्यासक्रमापैकीं हिंदुधर्मशास्त्र हा विषय टिळकांचा मोठा आवडता होता. म्हणून हिंदुधर्मशास्त्राचे मुख्य ग्रंथ व त्याजवरील टीका वगैरेंचा अभ्यास टिळकांनीं फार लक्षपूर्वक केला होता. पण येथेंहि परीक्षेंतील यशापेक्षां खुद्द विषय हस्तगत करण्याकडेच त्यांचें विशेष लक्ष होतें. या वेळीं केलेला

धर्मग्रंथांचा अभ्यास टिळकांना पुढें अनेक सामाजिक वादांमध्यें चांगलाच उपयोगी पडला. कोणताहि विषय आयत्या वेळीं हातीं घेऊन त्यांत प्रावीण्य मिळविण्याची पात्रता टिळकांच्या अंगीं होती, हें पुढें अनेक वेळां सिद्ध झालें. तथापि शास्त्रार्थाचे वाद उपस्थित झाल्या वेळीं आपण अगदींच अपरिचित विषयावर लिहीत किंवा बोलत आहों असें त्यांना वाटत नसावें असें दिसतें. दुसऱ्या विषयांत त्यांचा प्रथमाभ्यास असला तर या विषयांत त्यांची केवळ उजळणी असे.

टिळक १८७२ सालीं मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास झाले. त्या सालीं त्यांचे बरोबर हीच परीक्षा पास झालेल्या लोकांत खालील नांवें आढळतात—कर्नाटकांतील प्रसिद्ध लिंगायत डेप्युटी कलेक्टर रुद्रगौडा अर्ताळ, मिरजेस पुष्कळ वर्षे हेडमास्तरी केलेले अण्णा अत्रे, बडोदें येथें मोठ्या अधिकारावर असलेले शिवरामपंत भिडे, डॉ. नानासाहेब देशमूख, डेप्युटी कलेक्टर रामचंद्र भीमराव जांभेकर, असि. सर्जन बाळाजी हरी करंदीकर, पेन्शनर मुन्सफ बापूसाहेब काथवटे व त्यांचे बंधू मुंबईचे नरहरपंत काथवटे, पेन्शनर मुन्सफ गोविंदराव केळकर, वर्ध्याचे वकील दामोदरपंत खरे, सुप्रसिद्ध संपादक व सुधारक बेहरामजी मलबारी शेट, सोलापूरचे वकील प्रभाकरपंत नागपूरकर, पावगी बंधू म्हणजे नारायण भवानराव व रावजी भवानराव, कोल्हापूरचे दिवाण रघुनाथ व्यंकाजी सबनीस, बडोद्याचे दिवाणबहादूर वासुदेव महादेव समर्थ, बडोद्याचे माजी न्यायाधीश अप्पासाहेब शारंगपाणी, कोल्हापूरचे गणपतराव कृष्ण सोहनी, नामदार श्रीधर बाळकृष्ण उपासनी, हायकोर्ट ट्रान्स्लेटर गणेश पांडुरंग वैद्य, इत्यादि. वऱ्हाडचे पुढारी नामदार दादासाहेब खापर्डे हेहि टिळकांबरोबरच मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास झाले होते.

१८७४ व १८७५ या दोन्ही सालीं डेकन कॉलेजच्या 'ज्युनियर स्कॉलर' मंडळींत टिळकांचें नांव आढळतें. स्कॉलरशिप दरमहा दहा रुपये मिळत असे. ७४ ते ७६ या तीन सालांत डेकन कॉलेजांत जिनसीवाले, दामोदरपंत केळकर, माधवराव आपटे ( वामनराव आपट्यांचे वडील बंधु ) काशिनाथ बापू पाठक वगैरे मंडळी, कोणी दाक्षिणा फेलो, कोणी राहिवासी विद्यार्थ्यांचे सुपरिंटेंडेंट असे होते. अनंतशास्त्री पेंढरकर व चिंतामणशास्त्री थत्ते हे शास्त्री संस्कृत शिकविण्याला पीटरसन व किलहॉर्न यांच्या जोडीला असत. एतद्देशीय प्रोफेसर असे एकटे केरूनाना छत्रे. व युरोपियन प्रोफेसरांत वर्डस्वर्थ ऑक्सनहॅम, किलहॉर्न, वेस्ट, बेंटी, शूट, लार्केन, एटकेन इत्यादि होते. १८७६ त बी. ए. च्या वर्गात असतांच टिळकांनीं एलूएल्. बी च्या कांहीं टर्म्स भरल्या. या वेळीं व पुढें लॉ कॉलेजांत लीय वेब जार्डिन वगैरे ब्यारिस्टर कायद्याचा विषय शिकवीत. वरील सर्व प्रोफेसरवर्गापैकीं वर्डस्वर्थ आक्सेनहॅम, शूट वगैरे शिक्षक या नात्यानें खरोखरच नामांकित असत. कायदा शिकविणारे प्रोफेसर अगदींच सामान्य होते.

विशेषतः बॅ. वेब हे इतके मुखदुर्बळ असत कीं, एका चौकोनी जाड्या नोटबुकांत लिहून आणलेलीं टिपणें वाचण्यापलीकडे त्यांचें व्याख्यान कधींही जात नसे. हजेरीनंतर एकदां खालीं मान घालून हीं टिपणें वाचण्यास त्यांनीं सुरुवात केली म्हणजे वेळ संपेपर्यंत ती मान ते कधींही वर काढीत नसत. वेबसाहेब हे जवळ जवळ वीस वर्षें लॉ-प्रोफेसर असून त्यांचे एकदोन ठराविक विषय या ठराविक पद्धतीनेंच ते शिकवीत. त्यांची बॅरिष्टरी कधींच चांगली चालणें शक्य नसल्यामुळें त्यांना सरकारांतून ही कायमची वर्णी देण्यांत आली होती.

१८७७ च्या पदवीदान-समारंभांत टिळकांनीं बी. ए. ची पदवी घेतली. या सालीं त्या काळाच्या मानानें पुष्कळच विद्यार्थी बी. ए. ची परीक्षा पास झाले. ही संख्या चाळीस होती. पैकीं बारा पहिल्या वर्गांत व अठ्ठावीस दुसऱ्या वर्गांत पास झाले. या चाळीसांपैकीं आठ डेक्कन कॉलेजचे होते. याच सालीं टिळकांबरोबर डेक्कन किंवा एल्फिन्स्टन या कॉलेजांतून बी. ए. ची परीक्षा पास होऊन पदवी घेतलेल्या लोकांत, वासुदेव गो. भांडारकर, सर नारायणराव चंदावरकर, पेन्शनर कलेक्टर आप्पासाहेब देशमूख, कवि गोविंद वासुदेव कानिटकर, हायकोर्ट वकील गंगाराम बापसोबा रेळे, मुन्सफ वागळे, वऱ्हाडांतील हेडमास्तर रोहिणखेडकर इत्यादि नावें आढळतात. टिळक बी. ए. झाले त्या वेळीं युनिव्हर्सिटींत आर्टस्-शाखेचे डीन वर्डस्वर्थ हे असून, सिंडिकेटमध्यें व्हाइस चान्सेलर गिब्स कौन्सिलर, वेडरबर्न, फॅरन बॅरिष्टर, रामकृष्णपंत भांडारकर व मंडलीक अशी मंडळी होती. काशिनाथपंत तेलंग हे संस्कृतच्या परीक्षकांपैकीं एक होते. परीक्षेच्या विषयांत इंग्रजी भाषा दोन पेपर, संस्कृत भाषा दोन पेपर, आवश्यक गणीत; युक्लीड व स्टॅटिक्स दोन पेपर, व फिरून पसंतीस घेतलेला विषय म्हणून गणीत, पैकीं तीन प्यूअर मॅथॅमॅटिक्स व एक ॲप्लाईड मॅथॅमॅटिक्स असा अभ्यासक्रम होता.


१८७९ सालीं टिळक एलएल. बी.ची परीक्षा पास झाले. त्यासंबंधाची पदवी त्यांना २० जानेवारी १८८० रोजच्या समारंभांत मिळाली. त्या सालीं २० विद्यार्थी ही परीक्षा पास झाले. त्यांच्या बरोबर एल. एल. बीची पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांत भडभडे व गाडगीळ असे दोन पहिल्या वर्गांत, आणि शिवरामपंत भांडारकर, विष्णुपंत भाटवडेकर, गोविंदराव कानिटकर, मनोहरपंत काथवटे, शारंगपाणी, उपासनी, टुल्लु ( ग्वाल्हेर संस्थानांतील न्यायाधीश ) व हायकोर्ट वकील दि. ब. गणपत सदाशिव राव हे दुसऱ्या वर्गांत पास झाले.

## भाग २ परिशिष्ट (१)

लोकमान्यांची जन्मकुंडली व राशिकुंडली स्पष्ट ग्रहांसह खालीं दिल्या आहेत.

### शके १७७८ आषाढ कृ. ६ सूर्योदयात् गत घ. २ प. ९

जन्मकुंडली.




राशिकुंडली.




जन्मकालचे स्पष्ट ग्रह.

| र | चं | मं | बु | गु | शु | श | रा | के | ल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ११ | ६ | २ | ११ | ३ | २ | ११ | ५ | ३ |
| ८ | १६ | ४ | २४ | १७ | १० | १७ | २७ | २७ | १९ |
| १९ | ३ | ३४ | २९ | ५२ | ८ | १८ | २९ | २९ | २१ |
| ५१ | ४६ | ३७ | १७ | १६ | २ | ७ | १६ | १६ | ३१ |

### जन्म तारीख २३ जुलै सन १८५६ रत्नागिरी येथें

वरील कुंडलींत दोन ठळक योग आहेत व ते पुष्कळ ज्योतिष्यांनीं मान्य केलेले आहेत. नवमस्थानचा गुरुचंद्रयोग असें दर्शवितो कीं ही व्यक्ति अलौकिक होऊन पुढारीपण, राष्ट्रगुरुत्वाचा मान वगैरे तिला मिळण्याचा संभव आहे. तसेंच द्वादशस्थानीं शनि व बुध, व भाग्यस्थानीं राहू असल्यामुळें टिळकांना अनेकवार कारागृहवास घडला असावा. शुभफल देणारा गुरु व अशुभफल देणारा शनि हे दोन्ही ग्रह टिळकांच्या कुंडलींत जोरावर आहेत.

ज्योतिष्यांचाहि ज्यावर मतभेद झाला असे ग्रहयोग या कुंडलींत कांहीं आहेत. फलज्योतिषशास्त्रांत झालें तरी नियमभेद व पद्धतिभेद बराच आहे, यामुळें असा मतभेद होतो. शिवाय एका प्रख्यात ज्योतिष्यानें १९०८ सालीं टिळकांच्या खटल्याच्या निकालाची तारीख व तिचा निकाल यासंबंधीं केलेलें भविष्य अकल्पित रीतीनें बरोबर ठरलें, पण पुढें त्याच ज्योतिषानें वर्तविलेलें त्यांच्या सुटकेसंबंधाचें नक्की भविष्य अगदीं चुकलें, असाहि प्रकार घडून आला. त्यांच्या निरनिराळ्या खटल्यांविषयींचीं आणि प्रवासांविषयींचीं भविष्यें निम्मीं बरोबर आलीं व निम्मीं

चुकलीं असें सांगितलें म्हणजे त्यांत घेण्यासारखें कांहींच उरलें नाहीं असें आपोआप ठरतें. ज्योतिष्यांप्रमाणें शीर्षसामुद्रिक व अंगुष्टसामुद्रिक यांनीं त्यांच्या हातांच्या तळव्याचे व अंगठ्याचे ठसे व डोक्याचीं मोजमापें घेतलेलीं होतीं; व या लोकांनीं आपापल्या शास्त्रांनुसार टिळकांचीं गुणदोषवर्णनें लिहिल्याची कांहीं टिपणें आढळलीं. पण त्यांना भविष्याचें स्वरूप अर्थात्च येत नाहीं. टिळक प्रसिद्धीला येण्यापूर्वींचें अशा प्रकारचें एकहि टिपण मिळत नाहीं !

---

## भाग २ परिशिष्ट (२)

## टिळकांनीं शाळेंत केलेल्या संस्कृत कविता

या खालीं दिलेल्या तीन संस्कृत कविता टिळकांनीं शाळेंत असतांना रचल्या होत्या असें दिसतें.

सदागुणज्ञः सुपरीक्षणाय यं ।
कवींद्रकाव्यामृतकांचनस्य वै ॥
करोति लोके निकषं न दुर्जनं ।
खलाय तस्मायहिताय मे नमः ॥१॥
कृशानुतापः कुरुते यथामलं ।
मलं गृहीत्वा वपनस्थजीवनं ॥
तथा करोत्येव च यः सतोहितः ।
खलाय तस्मै प्रथमं नमोस्तु ते ॥२॥
यथा पयस्येव घृतं हि वर्तते ।
तथापि लोके सहतेऽतितप्ततां ॥
प्रयाति शुद्धिं च तदा ततोमृतं
खलस्य तोषे कथिता तथाशुचिः ॥३॥

---

## टिळकांनीं कॉलेजांत केलेल्या संस्कृत कविता

### मातृविलाप

प्रसमीक्ष्य सुतं गुणालयं । विधिना संहृतजीवितं पुरा ।
जननी निपपात दुःखिता । धरणौ मोहवशं गता भृशं ॥ १ ॥
अथ सा जननी विमूर्छिता । प्रकृतिं प्राप्तवती यथा यथा ।
सुतजीवितनाशहेतुभि-। र्विष मोहैरभवत्तथाकुला ॥ २ ॥
बत ! हास्मि हता विधे त्वया । तनयस्यासुहृता न मे पुनः ।
रविणा सरसि प्रशोषिते । ननु जीवेच्छफरी तदाश्रया ॥ ३ ॥
पितरौ प्रथमं ततः सुतौ । हननस्य क्रम एष भो विधे ।
तनयः प्रथमं कथं त्वया । मम नीतः प्रतिकूलचारिणा ॥ ३ ॥

बहुकालमहो ! न संस्थितिं । सुत चाप्त्वा न कलासु वर्धनं ।
सकलैः सुजनैर्मुदेक्षितः । प्रतिपच्चंद्र इवासि निर्गतः ॥ ५ ॥
उपचारशतैर्विवर्धितः । प्रथमं सूचितभाविवैभवः ।
सहसैव दवाग्निना हतः । सुत बीजांकुरवद्गतो भवान् ॥ ६ ॥
न भवान् भवनाद्बहिर्गतो-।नुमतिं प्राप्य कदापि नो मम ।
अधुना परिहाय मां कथं । सुत ! नापृच्छ्य दिवं प्रयास्यसि ॥ ७ ॥
पदवी त्रिदशालयस्य सा, । विषमा भूतगुणादिसंकुला
सुगताद्य कथं सुत त्वया । गमनेऽल्पाध्वन एव सीदता ॥ ८ ॥
न कृतं करणीयमस्ति य---। दनुभूतानि सुखानि न त्वया ।
विततं विमलं यशो न ते । परलोकं कथमद्य गम्यते ॥ ९ ॥
वचनं न ममावधारितं । शिशुतायामपि जातक ! त्वया ।
विफलीकुरुषेऽद्य मे कथं । गिरमुत्थाय सुभाषयेति माम् ॥ १० ॥
नयने मम बाष्पपूरिते । सुत कृत्वाप्यपहृत्य जीवितं ।
तव देहविलोकरोधनं । कुरुतेऽतृप्त इवैतदंतकः ॥ ११ ॥
तव दूयत एव कोमलं । मृदु शय्या-विनिवेशितं वपुः
प्रसहेत तदेव हा कथं । अधुना तात चिताधिरोहणे ॥ १२ ॥
हृतपंकजकांतिलोचने । वदनं चैव सदेन्दुदर्शनम् ।
मधुरं वचनं वपुस्तव । सुभगं मन्मथगर्वहारि च ॥ १३ ॥
अनुचिंत्य च तान् गुणांस्तव । तनयातीव भवामि विव्हला ।
भ्रमरी हिमवृष्टिनाहतं । ननु शोचेदवलोक्य पंकजं ॥ १४ ॥
खलु किं न नु दत्तमार्थितं । सुत, निर्बंधपरेण यत्त्वया ।
प्रतिवक्षि न मां यतोऽबलां । कुपितोऽकारणमेव नंदन ॥ १५ ॥
गृहकर्मणि रक्तमानसा-। मशितव्यं न विलंब्य देहि मे ।
अयि पुत्रक ! को वदेदिदं । वचनं संप्रति मां गते त्वयि ॥ १६ ॥
भवनं तनयेन शोभते । न वृथेत्थं विबुधैर्निगद्यते ।
भुवनं हि विभाति मे वनं । सुरलोकं तनये गते द्रुतं ॥ १७ ॥
इति सा बहुशो व्यचिन्तयत् । तनयं चाप पुनर्विमूर्छतां ।
अवलोक्य हि मूर्छितां सुतो । व्यपनीतो दहनाय बांधवैः ॥ १८ ॥
अथ बंधुभिरग्निसात्कृतः । सुत इत्याद्यवगम्य विव्हला ।
विससर्ज हि शोकपावके । गुणिते स्नेहरसेन सा वपुः ॥ १९ ॥

बाष्पोदकेन नितरामभिषिच्यमान---।
स्तस्या न शोकदहनो निरतो हृदिस्थः ॥
प्रावर्ततातधिकतरं स पुनः प्रदीप्तो ।
निक्षेपितो जलनिधाविव वाडवाग्निः ॥ २० ॥

# भाग २ परिशिष्ट (३)

## रा. ब. शारंगपाणी यांच्या आठवणी

टिळकांचे मित्र रा. ब. शारंगपाणी यांना, टिळकांच्या इतर कांहीं स्नेह्यांबरोबर, आम्हीं विनंति केल्यावरून त्यांनीं टिळकांच्या संबंधीं आठवणीचें एक टिपण कृपा करून आमचेकडे पाठविलें त्यांतील कांहीं उतारे खालीं दिले आहेत. "१८७३ च्या जानेवारींत टिळक डेक्कन कॉलेजांत दाखल होण्याकरितां आले तेव्हां मी त्यांस प्रथम पाहिलें. यावेळीं ते अंगानें कृश, डोळे मिचमिचीत, डोक्याला खवडे पडलेले असे दिसत. पुढील दोन सालांत त्यांनीं तालीम करून आपलें रंगरूप सर्व बदलून टाकलें... ...नाशिककर व धुळेकर या मंडळींचा, म्हणजे सोंवळें नेसणारांचा, एक क्लब असे. त्यांत टिळक सामील झाले होते. त्यांच्या वागणुकींत धर्मनिष्ठपणा दिसून येत असे. पोषाख अगदीं साधा असे...त्यावेळच्या मुलांच्या पोषाखांत धरबंध नव्हता. क्वचित् उघड्याबोडक्यानें क्लबांतून जेवून परत येतांना वर्गाच्या खिडकीबाहेर उभें राहून नुस्तें "हिअर सर" अशी हजेरीवाल्यास आरोळी देऊन आपल्या खोलींत जावें, व मग अंगांत घालून वर्गांत येऊन बसावें, असें पुष्कळ विद्यार्थी करीत. टिळकांना जेवल्यावर सुपारी पुष्कळशी खाण्याची संवय असल्यानें तेही वरीलप्रमाणेंच करीत. अंगांत जुन्या चालीचा अंगरखा व डोक्याला उपरण्याची टापशी अशा पोषाखानेंहि टिळक केव्हां केव्हां वर्गांत बसत असत......पहिल्या सालीं काशिनाथ बळवंत ( बाबासाहेब ) पेंडसे हे सीनियर फेलो असून संस्कृत शिकवीत. टिळकांचें संस्कृत चांगलें असल्यामुळें ते भाषांतरें त्वरित करीत. टिळकांनीं कित्येक वेळां इंग्रजी कवितांचीं संस्कृतांत भाषांतरें केलीं होतीं. गणितविषयांपैकीं ॲनेलिटिकल जिऑमेट्री हा विषय टिळकांना विशेष आवडे. मी स्वतः 'बटलर्स सर्मन्स' हा विषय घेतला होता म्हणून टिळक मला दोष देत व म्हणत "गणित शिकण्याचें सोडून बटलरचीं सर्मन्स काय वाचीत बसतां?" प्रो. केरूनाना छत्रे यांना गणित विषयांतील शंका टिळक विचारीत त्यावरून हा मुलगा चांगला गणितज्ञ आहे असा त्यांचा पक्का ग्रह झाला होता...... ...कित्येक वेळां केरूनाना दुर्बिणींतून विद्यार्थ्यांना तारे वगैरे दाखवीत त्यावेळीं टिळक ते पाहण्याला मुद्दाम जात. कॉलेजांत अभ्यास करणारांचे तीन वर्ग होते. कित्येक रात्रीं जेवल्याबरोबर निजून मध्यरात्रीं उठून अभ्यास करून फिरून निजत. कित्येक आवशीच अभ्यास करून घेत. कित्येक आवशी इतरांबरोबर गप्पा मारून मग मध्यरात्रीं अभ्यास करीत. टिळक तिसऱ्या वर्गांपैकीं असत. त्यांना तेव्हांपासून जागरणाची मोठी हौस. ते स्वतः जागत व दुसऱ्यासहि जागवीत. ते एकलकोंडे नव्हते पण फार वाचाळहि नव्हते. मित्रमंडळींत ते मोकळ्या

मनानें वागत. आम्ही त्यांची निवडक मित्रमंडळी रात्रीं जेवल्यावर हटकून एके ठिकाणीं कोणाएकाच्या खोलींत जमत असूं...आपल्या मंडळींत टिळकांचा एक प्रकारचा दरारा असे. टिळकांची अभ्यास करण्याची पद्धति अॅनेलिटिकल म्हणजे विवेचक बुद्धीची असे. केवळ पुस्तकांतील विवेचनानें संतुष्ट न होतां स्वतः विषयाचे उभे आडवे विभाग पाडून स्वतःची बुद्धी चालवून त्या विषयाची कांहींतरी नवी मांडणी करीत.......नोटा घेतल्या तरी त्या दुसऱ्याच्या न घेतां स्वतःच्या तयार करीत. एल्‌एल्. बीच्या वेळीं आम्हीं एकत्र अभ्यास केला तेव्हां व्यवहारमयूख, मिताक्षरा वगैरे मूळग्रंथ त्यांनीं आम्हीं मिळून वाचले......व्यायाम मेहनत वगैरे बाबतींत टिळक सर्वांच्या पुढें असत. तालमींत दोन दोन तासहि घालवीत, पोहतांना अर्धा अर्धा तास पाण्यांत डुंबत, रात्रीं जागून सकाळीं थंड पाण्याच्या स्नानाला नळाखालीं बसले म्हणजे वीस वीस मिनिटें पाण्याची धार डोक्यावर धरीत. आमच्या एल्‌एल्. बीच्या परीक्षा झाल्यावर टिळकांचे चुलते मला भेटले व म्हणाले कीं तुम्ही बाळाला वकीली किंवा नोकरी करण्यास सांगा. परंतु या दोन्ही गोष्टी न करण्याचा टिळकांचा निश्चय प्रथमपासूनच मला माहीत असल्यामुळें ती गोष्ट त्यांचेजवळ काढून कांहीं उपयोग नाहीं असें मी त्यांस सांगितलें."

## भाग २ परिशिष्ट (४)–टिळकांचीं संभाषणें

[या दोन परिशिष्टांत टिळकांचे दोन संभाषणप्रसंग दिलेले आहेत. हीं संभाषणें अर्थात् शब्दशः वेळच्या वेळीं कोणीं उतरून घेतलेलीं नव्हत. किंबहुना आपल्या संभाषणाला कोणी ग्रंथकार महत्त्व देईल अशी कल्पना संभाषणांत सामील झालेल्या कोणाहि गृहस्थास तेव्हां येणें शक्य नव्हतें. पण अशा प्रकारचीं संभाषणें एक वेळ प्रत्यक्ष घडलीं ही गोष्ट त्यांत सामील असलेल्या गृहस्थांपैकीं निदान एकादोघांना अद्यापि फार आठवते. टिळक आगरकर गेले तरी उपासनी व शारंगपाणी हे अद्यापि हयात आहेत; व 'कर्मयोगी' मासिकाचे संपादक रा. एकनाथ यादव निफाडकर यांनीं रा. सा. उपासनी यांनीं सांगितलेल्या हकीकतीवरून हीं संभाषणें लिहून काढलीं व मागाहून तीं स्वतः उपासनी यांना दाखवून तपासूनहि घेतलीं. पुढें शारंगपाणी यांस तीं दाखविलीं तेव्हां त्यांनींहि त्यांत मूळच्या संभाषणांतील भाव यथातथ्य रीतीनें प्रगट केला आहे व तीं होत असतांच जणूं काय लिहून काढलीं गेलीं अशीं दिसतात असें सांगितलें. भावनेप्रमाणें बोलणाराच्या भाषणपद्धतीचेंहि अनुकरण लेखकानें आपणाकडून होईल तितकें केलें आहे. हीं संभाषणें येथें देण्याचें कारण इतकेंच कीं, टिळकांच्या पूर्वचरित्रासंबंधानें आम्हीं उपासनी शारंगपाणी वगैरे गृहस्थांना कांहीं माहिती पाठविण्यास विनंति केली होती. पैकीं शारंगपाणी यांनीं कांहीं थोडीं टिपणें पाठविलीं, व खालीं दिलेलीं दोन मनोरंजक संभाषणें स्वतः

उपासनी यांनीं आठवणीनें लिहून काढून पाठविलीं असतीं तशाच स्वरूपाचीं जवळ जवळ निफाडकर यांनीं तयार केलीं आहेत. खासगी संभाषण हें संभाषणाच्या रूपानें द्यावयाचें तर तें असेंच असणार हें उघड आहे. लॉर्ड मोर्ले यांनीं आपल्या 'आठवणीं'च्या पुस्तकांत व त्यांनीं लिहिलेल्या ग्लॅडस्टन साहेबाच्या चरित्रांतहि अशींच संभाषणें कोठें कोठें घातलीं आहेत, तींहि अर्थात् जागच्या जागीं टिपून घेतलीं नसलीं तरी विश्वसनीयच मानण्यांत येतात. उदाहरणार्थ, ग्लॅ. चरित्रग्रंथांतील बुक १० चॅपटर ५ खंड ७ यांतील संभाषण व आठवणींतील भाग २ पान ११ यांतील संभाषण पहा. ]

## (१) सोंवळें-ओंवळें

मुळेः— ( उपासन्यांना ) काय भटजी ! चाललांत जेवायला ?

उपासनीः— ( अगदीं साध्या भावनेनें ) हो.

टिळकः— हो राजेबहाद्दर !

आगरकरः— आम्ही येऊं का तुमच्या क्लबांत उपासनी !

उपासनीः— या की, आम्हांस आनंद वाटेल.

मुळेः— पण आम्ही तें गबाळें नाहीं नेसणार.

उपासनीः— मी तुह्माला शारंगपाण्यांचा पीतांबर आणून देतों.

आगरकरः— त्यांच्या लग्नापासून कधींहि न धुतलेला पीतांबर?

उपासनीः— मग धुतलेला माझा कद देतों.

आगरकरः— पण धुतलेलें हें आमचें कर्पास—वस्त्र कां चालूं नये ? हा जुलूम कां ? अमकेच नेसा; अमक्याच रीतीनें नेसा; अमक्याच गोष्टींची ड्रिल करा, अरे आहे काय हें सांग ? याला कांहीं आधार ? याचें कांहीं प्रयोजन तरी आहे काय ? आमच्या सोवळ्यानें आमचें स्वाभाविक कोवळें हृदय शिस्तीच्या नांवाखालीं निगरगट्ट करून टाकिलें आहे. तुम्हांला नाहीं असें वाटत टिळक ?

टिळकः— तुम्ही मला असे प्रश्न वारंवार कां विचारतां ? माझीं उत्तरें तुम्हांला रुचत नाहींत. तथापि तुमचा हल्ला निकराचा जरी असला तरी तो कळवळ्याचा आहे म्हणून मी आज निराळ्या पद्धतीनें उत्तर देतों. पण आतां हें असें जेवल्याशिवाय बोलत उभें राहून आमच्या शंकराला ( आचाऱ्याला ) त्रास देणें मला आवडत नाहीं. शिवाय आचारी रागावला कीं खर्च जास्त लागून अन्नही चांगलें मिळत नाहीं. मुळे आम्ही बुवा गरीब माणसें आहोंत.

आगरकरः— तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. तुम्ही गरीब असाल मी तर जन्माचा दरिद्री आहे. पण तुमची तयारी असेल तर मी आज जेवणार सुद्धां नाहीं. चला उपासनींच्या खोलींत बोलत बसूं

मुळे:— नाहीं रे बाबा. मला सपाटून भूक लागली आहे.

टिळकः— आणि मलाही खूप पोहण्यामुळें मनस्वी भूक लागली आहे. आगरकर, तुम्ही वादविवादापायीं शरीराची खराबी करून घेतां हें चांगलें नव्हे.

आगरकरः— अगोदर मन नंतर शरीर.

टिळकः— नव्हे, अगोदर धर्म आणि तो शरीराशिवाय नीट होत नाहीं शिवाय आतां आपणांला घाई कसली आहे ! आपण कांहीं कुठें पळून जात नाहीं. नीट मनसोक्त जेवा. म्हणजे मग प्रफुल्लित मनानें आपण बोलूं.

( नंतर जेवणखाण आटोपल्यावर व थोडा वेळ इतर किरकोळ गप्पा झाल्यावर आगरकरांच्या आग्रहावरून टिळकांनीं आपली बाजू मांडिली. )

टिळकः—हें बघा आगरकर, पहिल्या धडाक्याला शास्त्र सांगतों.

मुळे:— शास्त्र्याच्या मुलाला सर्वत्र शास्त्रच दिसतें.

टिळकः— स्वाभाविकच आहे. आजचें सगळें पाश्चात्य जग शास्त्र्याचेंच मूल आहे. आणि त्या पोराचें आपण कौतुक करतां. आजपर्यंत आपला मुलगा तेवढा बाळ्या आणि दुसऱ्याचा ढोंब्या असा स्वाभाविक प्रकार असे. पण हें इंग्रजी राज्य आल्यापासून आम्ही आमचें तें ढोर आणि दुसऱ्याचें मात्र पोर असें म्हणत आहों. असो. मुळे मध्येंच बोललांत म्हणून निरुपायानें समाचार घ्यावा लागला. ( आगरकरांकडे तोंड करून ) मला वाटतें मध्येंच कोणी बोलू नये. ( संमती मिळाल्यावर पुढें ) शास्त्र. सांगतें कीं कापसापेक्षां रेशीम जास्त उष्ण असतें आणि म्हणून तें केरकचरा किंवा अन्य तऱ्हेची घाण स्वतःवर राहूं देत नाहीं. तथापि त्याला कांहीं मर्यादा आहे. रेशमी वस्त्र झालें तरी तें धूत गेलेंच पाहिजे. पण तें वारंवार धुतलें म्हणजे लवकर फाटतें, आणि भारी किमतीच असल्यामुळें सामान्य लोक धूत नाहींत. माझें भाषण सामान्य जनसमूहाच्याच दृष्टीनें असतें हो. हें मात्र विसरूं नका. उलट कापसाचें वस्त्र रोज धूत गेलें असतां रेशमी वस्त्र नेसण्याचीच कां गरज असावी, आगकरांच्या भाषेंत, जुलूम कां असावा याचें

उत्तर सोपें आहे. वस्त्रांतर करणें शुद्धतेच्या दृष्टीनें इष्ट आहे. साहेब लोकसुद्धां जेवतांना पोषाक बदलतात आणि तेही जेवणाचा शक्य तितका रेशमी पोषाखच करितात. रावबाजींच्या सोंवळ्याच्या पराक्रमाबद्दल फाजिल विश्वासाची गोष्ट जमेस धरून तुम्ही सोंवळ्याचा धिक्कार करूं नका. आतां हा सोंवळें परिधान करण्याचा एक किरकोळ प्रकार आहे. तो इतर गाहस्त्याच्या प्रसंगीं केला नाहीं तरी चालेल; न केल्यास भयंकर पाप लागतें असें नाहीं, हें मी कबुल करतों; पण तसे महत्त्वाचे प्रसंग तुम्हांआम्हांवर आज येऊन पडले आहेत काय ? नाहींत. मग उगाच आपल्या अनंतकालापासून चालत आलेल्या रीतीवर शस्त्र कां उगारितां ?

आगरकर :—हा, हाच भयंकर अंधविश्वासाचा तोटा या सोंवळ्यामुळें होतो. टिळक तुमचीआमची गोष्ट निराळी आहे. चांगलें कोणतें आणि वाईट कोणतें हें तुम्हांआम्हांला समजतें. पण सामान्यजनपद झाडून रावबाजीसारखें बावळट आहे. मला हा बावळटपणा अगदीं खपत नाहीं. मग तो सोवळ्यांत असो कीं आगगाडी पुढें कोंबडीं, अंडीं, नारळ फोडण्यांत असो. आणि सगळ्या प्रकारांत जर कोणता अतिशय जालिम, कालियाच्या विषाचा बावळटपणा असेल तर तो गतानुगतिकत्वाचाच आहे. अनंतकालापासून चालत आलेले रिवाज म्हटले कीं माझ्या कपाळांत तिडिकच उठते. खरोखर अनंत काल म्हणजे काय, रिवाज कसे पडतात, आपण त्यांनीं कितपत बांधले जातों व जावयास पाहिजे वगैरे विषय फार फार विचार करण्यासारखे आहेत. पण विचार करतो कोण ? जो तो उठला कीं लागला ठेवायला बापाच्या पावलावर पाऊल. बाप तांबट तर मुलगाही तांबट, बाप हजाम तर मुलगाही हजाम; पण बाप कुंभार तर मुलगा भिक्षुक असा प्रकार आमच्या हिंदुस्थानांत चुकून होणार नाहीं. तेंच पाश्चात्त्यांकडे पहा. पण काय हो टिळक पाश्चात्यांचें नांव काढतांच तुम्ही असे मनांतल्या मनांत रागावतां कां ?

टिळकः— कारण त्यांची मला भीति वाटते म्हणून नव्हे, तर कोणत्याही गोष्टीचा साधक बाधक विचार व्हावा म्हणून मी बोलत नाहीं. राग येतो यांत शंकाच नाहीं. या पाश्चात्त्यांनीं आमचें राग येण्यासारखेंच नुकसान करणें चालवलें आहे. तथापि त्यांच्यांतहि कांहीं अत्युत्कृष्ट गुण आहेत ही गोष्ट मला आज मान्य आहे. माझे या विषयावर अजून पक्क विचार तयार व्हावयाचे आहेत. त्याचप्रमाणें

आगरकर तुम्ही सांगितलेले सगळे विषय खरोखरच विचार करण्यासारखे आहेत. पण विचार करतो कोण ? या तुमच्या प्रश्नाला सामान्य जनता हें उत्तर नाहीं. सामान्य जनता विचारवंत होईल तर आपण राजेच होऊं. इंग्रज आणि मराठे समसमान दर्जाचे मित्र होतील. आजच्याप्रमाणें धनीनोकरांचें त्यांचें नातें रहाणार नाहीं; पण तशी परिस्थिति कशी जुळवून आणितां येईल ह्याचा विचार आजच्या सुशिक्षित तरुणांनीं करावयाचा आहे. आगरकर, मी तुम्ही व या सर्व मित्रांनीं विचार चालविलाच आहे. त्या विचारांचें वर्गीकरण करून, कोणास कुठें कितपत संघशक्तीनें कार्य करितां येईल हें आपण ठरवूं. पण जोंपर्यंत ज्या सामान्य जनतेला शिकवावयाचें आहे तिचा बुद्धिभेद करूं नका. दमादमानें गोष्टी घ्या, गोंजारून गोंजारून शिकवा, असें माझें म्हणणें आहे.

आगरकरः—( तडफीनें ) माझा मतभेद आहे.—

(नंतर आगरकर सामान्य जनतेवर फार घसरले. त्यांचें भाषण ऐकवेल तितकें टिळकांनीं ऐकून घेतलें. पण पुढें असह्य झाल्यावर, उपासनींच्या संकेतावरून ते आपल्या खोलींत जाऊन निजले. )

## (२) आमचें शिक्षण आम्हींच सांभाळिलें पाहिजे

टिळकः— आगरकर, आज तुह्मांला वेळ आहे कां ? आपण आपल्या भावी कार्याची नक्की जाणीव करून घेऊं या. तुमचें व आमचें सार्वजनिक सेवेचें ध्येय कोठें कसें आणि कितपत जुळतें हें आपण बी. ए. च्या क्लासांत असतांनाच ठरविणार होतों. त्याला आज तीन वर्षें होऊन गेलीं. हें असें फुकट दिवस घालविणें चांगलें कां ?

उपासनी— आपण काय फुकट दिवस घालवितों ? परीक्षा पास होणें ही पूर्वतयारी नाहीं कां ?

आगरकरः—परीक्षा पास झालों म्हणजे आमची समाजांत प्रतिष्ठा वाढेल व तितकीच आम्हांला समाजसेवा जास्त करितां येईल, यापेक्षां परीक्षांची जास्त किंमत निदान मला तरी वाटत नाहीं. तसें पाहिलें तर मलाहि टिळकांसारखेंच, तीन वर्षें फुकट घालविल्यासारखें वाटतें. असो. हा विषय अत्यंत किरकोळ आहे. टिळक, तुमच्या विषयावर मीं थोडेच दिवस पण कसून विचार केला आहे. समाजसेवेचा मी सर्व बाजूंनीं थांग घेऊन

पाहिला. पण मला अजूनहि राजकीय सुधारणांच्या ऐवजीं सामाजिक सुधारणा करणेंच आजचें आमचें आद्य कर्तव्य आहे, असें वाटतें.

**उपासनी:—** हा कांहीं Common platform ( *एकमताचें आविष्करण* ) होत नाहीं. जी चर्चा बी. ए. च्या क्लासांत झाली तिचाच काथ्याकूट एम्. ए. च्या आणि एल्. एल्. बीच्या क्लासांत असतांना होत आहे.

**टिळक:—** हरकत नाहीं. द्वैतमताचें अद्वैत मत करणें कांहीं कमी फायद्याचें नाहीं. आजच्या वादविवादाची आपण मर्यादच ठरवूं या. आज आपण फक्त *समान* ध्येय होतें कीं नाहीं एवढेंच पाहूं. त्याची दिशा नंतर आंखून टाकूं. आगरकर, एकूण तुमच्या मतें अगोदर सामाजिक सुधारणा आणि नंतर राजकीय सुधारणा होणें जरूर आहे.

**आगरकर:—** होय. पुष्कळ विचार करून मीं हें मत निश्चित केलें आहे. अहो! अगोदर घर नंतर दार. ज्याचें घर मजबूत त्याचें दारहि मजबूत. ज्याला घरीं किंमत नाहीं त्याला बाहेर कोण विचारणार ? शेले म्हणतो " ज्याच्या घरीं बायकापोरांमध्यें अनन्वित जुलूम *थयमान करितो त्याच्या घरांतच त्याच्या बायकापोरांतच त्याच्या* अधःपतनाचें शाप संचार करितात " हें वर्णन आज आपल्या घरांना सर्वथैव लागू पडत नाहीं काय ? टिळक, तुमची—आमची गोष्ट निराळस आहे. पण एकंदर हिंदुसमाज लक्षांत घ्या. म्हणजे भुतांखेतांवरचा विश्वास, आगगाडीपुढें अंडीं व नारळ फोडणें, कुळधर्मापायीं कर्जबाजारीपणा स्वीकारणें, स्मशान—यात्रेंत प्रेताची विटंबना करणें आणि *विधवांचे—नको—बुवा*, तो प्रकार तर शिसारीचे शहारे उत्पन्न करितो ! टिळक तुम्ही मला काय वाटेल तें म्हणा, पण आपण तर घर सुधारा, घर सुधारा असाच डांगोरा पिटविण्याच्या तर्फेचे आहोंत.

**टिळक:—** पण मी कुठें तुमच्या विरुद्ध आहें ? अहो घर कुणाला नको असतें ? तुमचा शेले तर आमचे रामदासहि म्हणतात कीं "आधीं प्रपंच करावा नेटका." परंतु शेले नुसता बडबडला आणि रामदासांनीं "आधीं केलें मग सांगितलें." आगरकर, घर सुधारा, घर सुधारा, असा तुम्ही डांगोरा पिटविणार ना ? पिटवा कीं, आनंदानें पिटवा. जोरजोरानें पिटवा. पण माझ्यासारखा एखादा अज्ञानी तुमच्याकडे आला आणि म्हणाला कीं, " आगरकर,

घर सुधारा म्हणतां पण मला तर घरच नाहीं; मग मी काय करूं ?" तर तुम्हीं त्याला घर दिलें पाहिजे. दुसरा उपासनींच्यासारखा एखादा हुशार नागरिक तुमच्याकडे आला आणि तुम्हांला विचारूं लागला कीं, "आगरकर, घर म्हणजे काय हो ? आधीं घर मग दार म्हणतां, पण आधीं दार मग घर हें तर प्रत्यक्ष चर्मचक्षूंनाहि दिसतें" तर मग तुम्ही त्याची शंका फेडली पाहिजे. अहो, घर तर इवेंच हवें, घराकरितांच तर सगळ्या उलाढाली चालतात. इंग्रज लोक एथें आले, ते सर्व जगभर पसरले ते घराकरितांच. पण बाजाराशिवाय, दाराशिवाय, बाह्य जगाशिवाय घराचें अस्तित्व नसतें हें तुम्हांला मान्य आहे कीं नाहीं ?

आगरकर :—अलबत, अलबत. खऱ्या गोष्टी मी अमान्य कसा करीन? या मर्त्यलोकांत जोपर्यंत आमचें घर आहे तोंपर्यंत या मर्त्य लोकाच्या बाजारावर तें अवलंबून असतें यांत संशय नाहीं. खरोखर, टिळक, मी मूळांतच वेगळ्या मताचा मनुष्य आहें. मला वाटतें कीं, मनुष्याचें ध्येय अती उच्च असावें. त्याचा एक दशांश भाग जरी त्याला शेंकडों वर्षें पर्यंत प्राप्त झाला नाहीं तरी चालेल. तुम्ही बाजाराला या मर्त्य लोकाला फार महत्त्व देतां. इतकें कीं, विचार करितांना तुम्ही दुसऱ्या सृष्टि लक्षांत घेतच नाहीं. शेलेच्या एपिपासिडायन् काव्यांत वर्णन केलेलें दिव्य कौटुंबिक सुख किंवा आपल्या संस्कृत काव्यांतून वर्णन केलेलें स्वर्गसुख अशक्य कोटींतलें आहे असें मला वाटत नाहीं; तरी पण या मायिक बाजारापासून जर तुम्ही आरंभ केला आणि तेंच ध्येय पुढें ठेविलें तरी मला आतां असें सांगा कीं हा बाजार तरी कोण मांडतो ? घरांत उत्पन्न झालेलीं मनुष्येंच मांडतात ना ? " मला घरच नाहीं, आगरकर, मला घर द्या " असें म्हणणाऱ्या माणसाला मी त्याचा स्वभाव ओळखून घर देईन. आतां थोडेंसें विषयांतर होईल पण मी थोडासा गोल्डस्मिथच्या मताचा आहें. मला वाटतें कीं, कोणी कसाहि असो; त्याला कुटुंबपोषणाची ताकद असली तर त्यानें लग्न जरूर जरूर करावें. पण ज्याला ताकदच नाहीं अशा माणसाची आपण कींव करावी आणि त्याला जें देवानें दिलें नाहीं तें जिव्हाळ्याच्या माणसांचें प्रेमसुख आपण देण्याचा प्रयत्न करावा. आतां उपासनींसारख्या हुशार माणसाला मी सांगेन कीं मला तुमच्या प्रश्नाची खोंच समजली. पण ती लक्षांत घेऊनहि मी सांगतों कीं बाह्य जगांतील जी राजकीय परिस्थिति

आहे, तिचा तर अवश्यमेव विचार करा, करूं नका असें मीं कधींहि म्हटलें नाहीं; आज म्हणत नाहीं; व पुढेंहि म्हणणार नाहीं. पण राजकीय परिस्थिति ही बाह्य जगाची एक स्थिति आहे तेवढ्यापुरताच विचार करा असें माझें सांगणें आहे; आणि तो विचारहि घराकरितांच करा असा माझा आग्रह आहे. घराला तुम्ही राजकीय संज्ञा द्या कीं सामाजिक असें विशेषण लावा. शब्दाकरितां मी भांडत नाहीं. पण त्या शब्दांचे जे रूढ अर्थ आहेत त्या अर्थांनीं मी सामाजिक सुधारणा घराच्या बाबतींत लावतों. मला वाटतें कीं माझें बोलणें टिळकांना गैर वाटूं नये.

टिळकः— नाहीं, अगदीं गैर वाटत नाहीं. उलट आजचा दिवस चांगल्या शकुनाचा असला पाहिजे असेंच मला वाटतें. कारण आपण आज किती तरी शांत रीतीनें विचार करीत आहोंत. यावरून आगरकर, आपणां दोघांकडून महाराष्ट्राकरितां कांहीं तरी सुरेख सेवा खचित घडणार यांत शंकाच उरत नाहीं. असो; आगरकर, तुमचें मूळतत्त्व मला सर्वथैव मान्य आहे. घराकरितां सगळ्या चळवळी असतात, यांत मतभिन्नता नाहींच. तुमच्यासारखी माझी कविकल्पना नसली तरी घर ही एक मोक्षपदाची पायरीच आहे असें माझें शास्त्रीय मन मला सांगतें. तथापि ही पायरीच मजबूत असली पाहिजे. आगरकर, ध्येय उच्च असावें असें तुम्ही म्हणतां; पण मी सांगतों कीं, प्रत्येक जीवाचें ध्येय उच्च असतेंच. त्याला हवें असलेलें सुख मिळालें म्हणजे त्याची स्वाभाविक हांवच त्याला पुढलें ध्येय दाखवितें. पण सामान्य जनाला सामान्य ध्येयच प्रथम सर्वस्व वाटतें. आणि आम्हाला सामान्य जनाच्या दृष्टीनेंच विचार करायचा आहे. तेव्हां आज हिंदुस्थानच्या सामान्य मनुष्याच्या घराची परिस्थिति कोणती आहे हें पहावयाला हवें. पण मला अगोदर असें सांगा कीं हें पहातांना दृष्टि किती लांबच्या भविष्यकाळांत न्यायला तुम्ही तयार आहांत ?

आगरकरः—तुम्ही सांगाल तितकी लांब. मला सूर्यमंडळ भेदून विश्वामित्राच्या सृष्टीपलीकडे दृष्टि नेतां येईल.

टिळकः— ( हंसून ) नको, तितक्या दूरचा पल्ला आज नको. आपणाला सगळे लोक आजच कवि करावयाचे नाहींत.

आगरकरः— पण सगळे लोक मुत्सद्दीहि करूं नका हो. टिळक, एकवार कवि चालतील; पण ते जर कां मुत्सद्दी झाले तर दिल्लीआग्र्याचे घाणेरडे प्रकार सुरू होतील बरें.

टिळकः— त्याची तुम्हांला आज भीति नको. आगरकर, तुम्ही म्हणतां तितकें राजकारण बोकाळायला आपण मरून वर चार पिढ्याहि खपतील. असो. माझी एवढीच विनंती आहे कीं आजचा विचार करितांना भूतकाळांत स. १६३२ पासून तों भविष्यकाळांत निदान स. १९३० पर्यंत तरी आपली दृष्टि पोंचवली पाहिजे. मी एक गोष्ट कबूल करितों कीं राजकीय परिस्थिति ही घराची एक स्थिति आहे. पण ती एकच स्थिति आज वामनावताराप्रमाणें घराच्या आदि-मध्य-अंत्य या तिन्ही अवस्थांना व्यापून उरली आहे. कशी ती पहा. घरांतलें पहिलें स्थान देवांचें.

आगरकरः— देवांचें ? देवांचें कसलें, मुलांचें! दगडी म्हसोबाचें ? त्याचें घरांत स्थानच नाहीं. प्रत्यक्ष अंतरालांतून तुटून आलेल्या लहानग्या सोनुकल्याचें पहिलें स्थान.

टिळकः— ( स्वगत ) किती शुद्ध व पवित्र जीवात्मा हा ! खरोखर, असले साधु उत्पन्न होतात म्हणूनच स्थित जगाला ठोसे मिळून गति प्राप्त होते. पण या गतीला वळण मी दिलें पाहिजे. ( उघड ) आगरकर, मुलांना देवस्थानीं समजणारे तुम्हीच मला देव भासत आहांत. थट्टा नव्हे खरोखरच. ( हृदय आवरून ) असो. घरांतले देव जीं मुलें त्यांना आज जरी मुबलक दूधदुभतें व अन्न खायला मिळतें, तरी इतकें पुढें मिळत राहील काय ? आज आमचीं गुरें विलायतेला दरवर्षी फुगणाऱ्या संख्येनें जात आहेत. शेतसारा दर तीस वर्षांनीं वाढतो आहे. मुलांना शिक्षण कसें मिळेल तें तुम्ही स्वतःच अनुभवतां आहां. लष्करी खात्याकडे खर्च होतो त्याच्या कितव्या हिश्यानें शिक्षण दिलें जातें ? कसें दिलें जातें ? शूट साहेब गेले. नंतर यःकश्चित् आय्. सी. एस्. कां आला ? धार्मिक समजुती पहा. किती घाणेरड्या ? त्या कांहीं इंग्रजांनीं घाणेरड्या केल्या नाहींत. पण त्यांनीं आम्हांला त्या कामीं काय मदत केली ? आम्हाला मदत हवी फक्त शिक्षणद्वारें. आणि तीहि द्रव्यद्वारें. आमच्या मुलांना, बाळांना आम्हींच खरा धर्म सांगूं. इंग्रजांनीं आमच्या धर्मांत हात घालतां कामा नये. कारण त्यांना आमचा धर्म समजत नाहीं. 'A cow has no soul' असा त्यांचा प्रत्यक्ष आचार आहे. आमच्या मुलांची खाण्यापिणाच्या बाबतींत गैरसोय आणि शिक्षणाची ही असली अनवस्था ! मग आमच्या देवांचा देवपणा राहिला कुठें ? सामाजिक सुधारणा करा ! हो करा. मीहि सांगतों

सामाजिक सुधारणा करा. पण नुसत्या बोलण्यानेंच सुधारणा होत नाहींत. उद्योगाला लागा म्हणजेच त्या होतील. आणि मग तुम्हांला आढळून येईल कीं तुम्हाला सर्व ठिकाणीं सरकारशीं झगडावें लागेल.

आगरकर:—झगडूं. आम्ही आमच्या घराकरितां, देवाकरितां झगडूं. पण टिळक सरकाराबरोबर आम्हांला आमच्या अज्ञानाशींहि झगडावें लागेल. झगडाल तुह्मी ?

टिळक:— ती हृदयाची जखम आहे. तेथें मी गोड बोलून, किंबहुना मुळींच न बोलतां नुसत्या आचारानेंच जखम भरून काढीन. सरकाराशीं करण्याचा विरोध बाहेरचा आहे, तो पुष्कळसा कचरा आहे. म्हणून जोरानें झटकून टाकीन. मलीन पदार्थ लावून भांडें घुसून काढल्यास जास्त स्वच्छ होतें; या न्यायानें मी सरकारचा आभारी आहें.

आगरकर:— मतभेद होतो तो एथेंच होतो. सामाजिक जखम हृदयाची आहे असें समजून आज शेंकडों वर्षे इलाज झाला नाहीं. आज हृदयाची क्रिया बंद पडण्याची वेळ आली आहे. मलम लावतां ? लावा. पण लवकर लावा. आधीं लावा. खूप लावा. हृदय बंद पडून हिंदुस्थानचें प्रेत झाल्यावर त्याच्यावरचा बाहेरचा कचरा झाडून काय उपयोग ? टिळक, समाजाला हृदयाची उपमा दिलीत; ठीक केलें. पण आतां ती जखम भरून काढा. हृदयाकरितां बाहेरची स्वच्छता ठेवा.

टिळक:— अहो आगरकर, ही जखम तरवारीची नाहीं, भुकेची आहे. अन्न न मिळाल्यामुळें हृदय अशक्त झालें. एथें मलम नको. बाहेरून पोटांत अन्न गेलें पाहिजे; आणि अन्नाचें ताट आपल्या ताब्यांत नाहीं. तथापि मी आज एक मधलाच मार्ग सुचवितों. आपणां दोघांना चालू स्थितींचें, किंवा सर्वांगीण शिक्षण हातीं घ्यायला हरकत नाहीं ना ? शिक्षणासारख्या पवित्र कार्यांत तर आपला 'common platform' आहे ना ?

आगरकर:— ( विचार करून ) आहे. 'common platform' आहे. ठीक टिळक, ठीक सुचवलें. ठरलें. आमच्या देशाचें शिक्षण आम्हींच हातीं घ्यायचें. ठरली ना एकवाक्यता ?

टिळक:— ठरली.

उपासनी:— ठरली. आगरकर, टिळक, तुमचें दोघांचे मी अभिनंदन करितों.

---

## भाग ३ रा

# टिळकांपूर्वीचा महाराष्ट्र

टिळकांच्या सार्वजनिक चरित्रास न्यू इंग्लिश स्कूल उघडल्यापासून म्हणजे सन १८८० च्या जानेवारींत सुरवात होते हें खरें. तथापि त्यांच्या स्फूर्तीचें रहस्य समजण्याला त्यांच्या पूर्वकालच्या महाराष्ट्राचा वृत्तांत लक्षांत घेतल्याशिवाय चालणार नाहीं. टिळकांची स्फूर्ती ही कांहीं कोऱ्या मानसिक कागदावर महाराष्ट्रानें प्रथमच काढलेली परीक्षेची पुस्ती नव्हे. तिच्या कितीतरी चिताड आवृत्त्या खर्ड्यांच्या रूपानें पूर्वी अनेकांनीं काढल्या असतील; पण त्यांच्या चारित्र्याला यशःसिद्धी व कीर्ति यांच्या योगानें मिळणारा उठावदारपणा न लाभल्यानें, ते खर्डे जनविस्मृतिरूपी केरकचऱ्याच्या टोपलींत चुरगाळून टाकले गेले असल्यास नवल नाहीं. स्फूर्तिरूप पुस्ती काढण्याकरितां अक्षर घटविण्याचा हा उद्योग टिळकांपूर्वी सुमारें पन्नास वर्षे होत होता! पण कांचेवरून उन्हांत फोटो छापण्याचें काम सुरू असतां प्रथम नुसता किंचित् काळसरपणा, नंतर स्थूल रूपरेषा, नंतर शरीराचे उन्नत भाग, नंतर चेहऱ्यावरील अवयवांचा रेखीवपणा, आणि शेवटीं नेत्रांतील तेजोबिंदु, अशा अनुक्रमानें एकाच कांचेवरून एकाच कागदावर चित्र अधिकाधिक स्पष्ट उमटत जातें; तोच प्रकार महाराष्ट्राच्या राजकीय स्फूर्तीचाहि झाला. कांचेंतून बराच वेळ घेतलेला सूर्यप्रकाश, आणि स्वतः विकार पावून त्याचें चित्र बनविण्याची कागदाची पात्रता, या पूर्व कारणांबरोबर टिळकांच्या उत्तर चरित्रांतील यशःसिद्धीचें रसायन त्यांचें चरित्रचित्र इतरांच्याहून अधिक खुलण्यास साहाय-भूत झालें ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. कसेंहि असो. टिळकांच्या चरित्राचें मर्म समजण्याला महाराष्ट्राचा पूर्वेतिहास लक्षांत घेतला पाहिजे; व तो अवघा पन्नास साठ वर्षांचा असल्यामुळें फार मोठा आहे असेंहि म्हणतां येत नाहीं.

टिळकांनीं कॉलेजांत प्रवेश केल्यापासून (१८७२) ते मृत्युवश होईपर्यंत (१९२०) सुमारें पन्नास वर्षांचा काळ गेला. तितकाच तो १८७२ पूर्वी जाऊन मोजला असतां १८२२ हें वर्ष येतें. म्हणजे पुण्यास पेशवाईची अखेर झाल्यापासून अवघीं चारच वर्षे होतात. यामुळें पूर्वसंशोधनास एक प्रकारचें निश्चित व निर्णा-यक असें स्वरूप येऊं शकतें. पन्नास वर्षांच्या या दोन मोठ्या पिढ्यांत पुण्यां-तील जुनें स्वराज्य नष्ट झाल्यापासून, नवें स्वराज्य हातीं आलें नसलें तरी डोळ्यां-पुढें चांगलें दिसूं लागेपर्यंतचा, वृत्तांत सांठवितां येतो. फरक इतकाच कीं, प्रस्तुत पुढील पन्नास वर्षांतील फक्त एका व्यक्तिचरित्राचा विशेष विचार आम्हांस कर्तव्य असून, पहिल्या पन्नास वर्षांसंबंधानें एकंदर महाराष्ट्राविषयीं तो विचार कराव-

याचा आहे. यामुळें पुष्कळच संक्षेप द्यावा लागेल हें खरें; पण त्या काळाविषयीं माहितीहि इतकी तुटपुंजीच आहे कीं, या संक्षेपाचा आश्रय केल्याशिवाय गत्यं-तराहि नाहीं.

या पूर्वेतिहासाचे, नेहमींच्या पद्धतीनें, पांचचार विभाग पाडतां येतील. परंतु राजकीय, धार्मिक, सामाजिक, औद्योगिक अशीं नक्की तुटक खातीं न पाडतां सामान्यतः राजकीय स्थिति व सामाजिक स्थिति अशा दोन ढोकळ सदरांखालीं हें सिंहावलोकन करण्याचें आम्हीं योजलें आहे. तसेंच या काळांतील माहितीचीं साधनेंहि संकीर्णस्वरूपाचीं असल्यामुळें, जेथें स्पष्ट आधार दाखवितां येतील तेथेंच ते दाखविले असून, प्रत्यक्ष वाचावयास न मिळालेल्या किंवा निवळ स्मरणांत राहिलेल्या माहितीची गोळाबेरीज सामान्यतः दिली आहे.

१८१८ सालीं बाजीरावसाहेब पुणें सोडून गेले ते पुन्हां पुण्यास परत आले नाहींत. येवढेंच नव्हे तर भट पेशवे घराण्यापैकीं एकाहि शाखेचा कोणी मनुष्य पुढील पन्नास वर्षांत पुण्यांत कायमचा येऊन राहिला नाहीं. फुलगांव येथील बाजीराव पेशव्याचा वाडा १८६१ सालीं साडेसात हजार रुपयांस लिलावानें विकण्यांत आला. शनवार वाड्यांत नव्या कचेऱ्या बसल्या व बुधवार वाड्यांत लोक वर्तमान-पत्रांतून विलायतेंतील वर्तमान उत्सुकतेनें वाचूं लागले. बाजीरावाच्या मुलीचें लग्न उत्तरहिंदुस्थानांतच झालें, व दत्तक शाखांचे भाऊबंद उत्तरहिंदुस्थानांतच राहिले. बाजीरावाबरोबर प्रथम पुष्कळच मंडळी दक्षिणेंतून ब्रह्मावर्ताकडे गेली. परंतु तेथील त्यांचा जमाखर्च मर्यादित असल्यामुळें इकडून नवीन असें कोणीं फारसें गेलें नाहीं. हळु-हळु पुणें व ब्रह्मावर्त यांतील रहदारी कमी झाली. नानासाहेब, रावसाहेब वगैरे तरुण पेशवाई पिढीचें चरित्र तिकडेच होऊन बंडानंतर ती नामशेष झाली. बाजीरावाची मुलगी पुढें अनेक वर्षांनीं क्वचित् एकादेवेळीं इकडे येई, पण तिचा कोणी जाहीर सत्कार वगैरे केलेला आढळत नाहीं. पण तो कसा आढळणार? खुद्द रावबाजी मृत्यु पावल्याची बातमी इकडे आली तेव्हां ज्ञानप्रकाशादि वर्तमानपत्रांत त्यांच्या मृत्युले-खाची बोळवण वर्तमानसारासारख्या दहापांच ओळींत झालेली आढळते! मग त्यांच्या मुलीला कोण विचारतो? जित्या माणसांच्या अभावीं पेशवे घराण्यांतल्या एक-दोन स्त्रीपुरुषांचे तोतये मात्र पुण्यांत उमटल्याचें सांगतात. सवाई माधवरावाची बायको अवल इंग्रजींत तोतयाच्या रूपानें पुण्यांतील लोकांना दिसली होती; व शनवारवाड्याच्या आसपास राहणाऱ्या लोकांच्या भ्रांतिक कल्पनेला, बिनम्युनिसिपालिटीच्या अंधाऱ्या अमदानींत, कधीं तटावर तर कधीं दरवाजांच्या कमानींत, पूर्वीं वाड्यांत नांदलेल्या स्त्रीपुरुषांच्या आकृती दिसल्याचा भास झाल्यास नवल नाहीं. पेशवाई नष्ट झाल्याबद्दल खरोखर मनापासून लोकांना अत्यंत दुःख झालें होतें असें अवल इंग्र-जींतील लोकमतावरून, किंवा पाहिल्या पिढींतील सुशिक्षित लोकांनीं लिहिलेल्या त्या वेळच्या लेखांवरून दिसून येत नाहीं. १८५७ चें बंड झालें त्याचा विस्तार

नर्मदेखालीं फारसा आला नाहीं. स्वतः नानासाहेब पेशवे हेच जर बंडांत जुलमामुळें सामील झाले, तर इतर संस्थानिक व सरदार यांना मनांतून बंडाचा उमाळा कोठून येणार ? कोल्हापूर, रामदुर्ग, जमाखिंडी वगैरे संस्थानांत कोठें प्रत्यक्ष बंडखोरीचा तर कोठें नुसत्या संशयाचा प्रादुर्भाव झाला. परंतु त्यांत कांहींच अर्थ नव्हता. ग्वाल्हेर संस्थान हें ऐन बंडाच्या केंद्रांत होतें. पण तेथील ब्राह्मण दिवाणानें (राजे सर दिनकरराव राजवाडे यांनीं) इंग्रजांची बाजू सांवरली व बंड होऊं दिलें नाहीं.

सातारची गादी पेशवाईनंतर तीस वर्षें टिकली. पण तेवढ्या अवधींत पुष्कळ भानगडी होऊन, अखेर १८४८ त सातारचें राज्य खालसा होऊन, शिवाजीच्या या शाखेच्या वंशजाना लहानशा नेमणुकीशिवाय कांहीं शिल्लक राहिलें नाहीं. गेलेलें राज्य परत मिळविण्याची सनदशीर चळवळ अतिशय झाली. सातारकरांचे वकील रंगो बापूजी हे विलायतेस गेले; त्यांनीं सातारकरांच्या जुन्या ऋणानुबंधांतले पुष्कळ साहेबलोक वश करून घेतले; कंपनीच्या डायरेक्टरांचीं कोर्टें भरवून पुष्कळ वाद करविला. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. प्रतापसिंह महाराजांवरील मोठाले आरोप बनावट होते व त्या कामीं तयार झालेला पुरावा पुष्कळसा खोटा होता अशी कबुली बहुतेक मिळाली. परंतु राज्य खालसा झालें तें परत देण्याचा मात्र हुकूम झाला नाहीं. यानंतर सातारच्या गादीवर राजांच्या दोन पिढ्या झाल्या. परंतु सातारकरांचें नांव जें एकदां मागें पडलें तें पडलेंच. इंग्रजांशीं अंकितपणानें वागणें व अप्रसिद्धीची धूळ खात पडणें या गोष्टींची कमाल झाली. खालावलेल्या स्थितीची खंति वाटून, व जुन्या लौकिकाप्रमाणें पुढें मान्यता मिळण्याचा संभव नसल्यानें, सातारकर महाराज हें नांवच जवळ जवळ लुप्त झालें. ते पुण्यास तर कधीं आले गेले नाहींतच, पण साताऱ्यास देखील ते दर्शनाला महाग होऊन राहिले, आणि राज्यकारभार असा कोणताच हातीं न राहिल्यानें, इतर संस्थानिकांप्रमाणें, प्रसंगविशेषीं तरी नांव पुढें यावयाचें त्यासहि जागा राहिली नाहीं. शेवटीं हातीं उरलेलें खाजगी उत्पन्न व नेमणूक ही देखील कर्जाच्या पायीं जाण्याचा रंग आला होता. तसें झालें असतें तर दिल्लीच्या बादशहाचे वंशज ब्रह्मदेशांत भीक मागत असलेले आढळले अशी जी एक गोष्ट ऐकिवांत आहे तशी स्थिति सातारच्या राजघराण्यासंबंधानें होते कीं काय अशी भीति वाटत होती. पण सुदैवानें अजून तरी तो प्रसंग टळला होता.

ग्वाल्हेर व इंदूर येथील राज्यांत साताऱ्याहून पुष्कळ अधिक हालचाल शिल्लक राहिली. कारण तेथें इंग्रजांच्या अंकितपणानें कां होईना, पण सर्वाधिकारसंपन्न अशीं राज्यें नांदत होतीं. ग्वाल्हेर संस्थान पैशाच्या दृष्टीनें बरेंच समृद्ध राहिलेलें आढळतें. १८५७ सालीं बायजाबाई शिंदे यांनीं जो मोठा यज्ञ केला त्यांतील दानधर्माचीं वर्णनें ऐकलीं म्हणजे अहिल्याबाई होळकरणीचीच आठवण होते. या

यज्ञाकरितां शेंकडों मैलांवरून-दक्षिणेंतूनहि-" दक्षिणार्थ भिक्षुकगण पळत सुटला " होता. चिंतामणराव वैद्य यांनीं, वरसई येथील एका भिक्षुकानें लिहिलेली, बंडाची हकीगत छापली आहे. त्यांत वरील गोष्टीबरोबरच उत्तरहिंदुस्थानांतील तत्कालीन विषयांची बरीचशी मनोरंजक माहिती वाचावयास सांपडते. सदर भिक्षुक वर सांगितलेल्या यज्ञांत दक्षणा मिळविण्याकरितांच निघाला होता. पण तें दान पदरांत न पडतां वनवास व दुःख हीं मात्र त्याच्या पदरीं पडलीं. जयाजीराव शिंदे हे मोठे नामांकित होऊन गेले. त्यांची रसिकता व मनुष्यस्वभावाचें ज्ञान हीं वाखाणण्यासारखीं होतीं. त्यांची स्वारी या कालांत पुण्यास एकदां येऊन गेली यापलीकडे महाराष्ट्राशीं त्यांचा संबंध आला नाहीं; पण ते आले त्यावेळीं त्यांनीं पुण्याच्या लोकांना करावें तसें खुष केलें नाहीं. त्यांच्या तैनातीच्या लोकांची व पुणेंकरांची बाचाबाची झाली असें मात्र वर्तमानपत्रांवरून दिसतें. इकडे त्यांचीं इनामी वगैरे उत्पन्नांचीं गांवें कांहीं होतीं तींहि त्यांनीं इंग्रज सरकारकडून तिकडे मोबदला करून घेतलीं. शिंद्यांचे सुप्रसिद्ध पूर्वज महादजी-बुवा पाटील यांची समाधि पुण्याजवळ वानवडीस आहे. पण तिची देखील काळजी ग्वाल्हेर दरबाराकडून जितकी घेतली जावी तितकी तेव्हां घेतली गेली नाहीं. इंदूरच्या तीन पिढ्यांत तुकोजीराव होळकर हे नामांकित होऊन गेले. इंग्रज सरकाराशीं वाकून वागणारे असा त्यांचा महाराष्ट्रांत लौकिक होता, व महाराष्ट्रांतील लोकांशीं त्यांनीं आपला ऋणानुबंध शिंद्यांहून अधिक ठेविला होता. १८७४ सालीं त्यांची स्वारी पुण्यास येऊन कांहीं दिवस राहिली होती तेव्हां सार्वजनिक सभेला त्यांनीं चार हजार रुपयांची देणगी दिली. पुण्यांत इतर रीतीनेंहि त्यांनीं बराच दानधर्म केला. या दानधर्माच्या योगानें श्रीमंत तुकोजीराव हे पुण्यांत बरेच लोकप्रिय झाले होते असें, त्या वेळीं त्यांच्या संबंधीं एका शाहिरानें केलेल्या पुढील पोवाड्यावरून, दिसून येतें:—

"देवदयेनें नेत्र मिळाले यास्तव राजे इंदुरचे ।
राव तुकोजी पहा मिळाले समजा जनहो बुध वरचे ॥
असती राजे धनें भूमिनें मोठे हिंदुस्थानांत ।
त्यांनिं तुकोजीचरित्र कित्ता पूर्ण धरावा ध्यानांत ॥" इत्यादि

बडोदें संस्थान खुद्द मुंबई इलाख्यांतच आहे. तेथें महाराष्ट्रीयांची वस्तीहि बरीच. यामुळें बडोदें संस्थान हें मुळींच परकें वाटत नव्हतें. बडोदें संस्थानांत चाललेल्या दरबारी घालमेली खुद्द महाराष्ट्राच्या राजधानींत चालल्याप्रमाणें लोकांना समजत व त्यांचें चित्त गुंतवीत. विशेषतः मल्हारराव महाराज यांच्यावर बडोद्याचे रेसिडेंट कर्नल फेअर यांजला विषप्रयोग केल्याचा आरोप आला, त्या वेळीं हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि भागापेक्षां त्यांत महाराष्ट्रानेंच अधिक लक्ष घातलें. बाजीराव पेशव्यां-

प्रमाणें मल्हारराव महाराज गायकवाडांनाहि लोकांची खरी सहानुभूति नव्हती. त्यांचा कारभार लहरी व जुलमी असाच झाला. १८७३ सालीं त्यांच्या राज्यव्यवस्थेसंबंधीं कमिशन नेमण्यांत आलें होतें. त्यांत त्यांचें अनेक प्रकारचें दुर्वर्तन शाबीत झालें. शिलेदार सरदार यांच्या असाम्या कमी केल्या, इनामें व वंशपरंपरेच्या नेमणूका बुडविल्या, सावकार व पेढीवाले यांना जाच केला, नोकरांकडून भारी नजराणे घेण्याची पद्धती फैलावली, न्यायकचेऱ्यांतून अनान्वित प्रकार होऊं लागले, महाराजांचे खाजगी नोकर व प्रीतींतलीं माणसें पुंड झालीं, शहरांतील स्त्रियांनाहि सक्तीनें वेठीला धरून राजवाड्यांत राबविण्याला खेंचून नेण्यांत येऊं लागलें. वरील प्रकारचे आरोप कमिशननें शाबीत धरले. त्यांत कांहीं अतिशयोक्ति वगळली तरी सत्याचा अंश बराच होता. तथापि रेसिडेंट कर्नल फेअर यांचा या व इतर कामीं मल्हाररावांसहि पुष्कळच जाच झाला. दादाभाई नौरोजी हे या सुमारास कांहीं दिवस बडोद्याचे दिवाण होते. पण कर्नल फेअर यांचें व त्यांचें पटेना म्हणून त्यांना दिवाणगिरी सोडावी लागली. कर्नल फेअर यांचें गैरवर्तन सरकारासहि कबूल झालें व त्यांची बडोद्याहून त्यांनीं बदली देखील केली. पण इतक्यांत त्यांना विषप्रयोग केल्याच्या कटाची घटना झाली. त्यामुळें कमिशन नेमण्यांत आलें. बडोद्याच्या राज्यव्यवस्थेंत हात घालण्याचा हक्क तर सरकारानें पूर्वीं प्रस्थापित केलाच होता. पण महाराजांची चौकशी सामान्य माणसांकडून न होतां त्यांच्या बरोबरीच्या लोकांकडून व्हावी, आणि त्यांना उत्तम कायदेपंडितांची मदत मिळावी असा लोकमतानें हट्ट धरला व तो सिद्धीसहि गेला. बंगालचे चीफ जस्टिस सर रिचर्ड कौच, म्हैसूरचे चीफ कमिशनर सर रिचर्ड मीड, पंजाबचे कमिशनर मेलव्हिन यांच्या जोडीला ग्वाल्हेरचे व जयपूरचे महाराज आणि राजे दिनकरराव इतक्यांची कमिशनवर नेमणूक होऊन, सार्जंट बॅलन्टाईन नामक बॅरिष्टर महाराजांच्या बचावाकरितां देण्यांत आले. कमिशनमध्यें अखेर मतभेद झाला. आरोप शाबीत नाहीं असें शिंदेसरकारांनीं मत दिलें. जयपूरचे महाराज व राजे दिनकरराव यांचाहि अभिप्राय तसाच पडला. पण हिंदुस्थानसरकारानें आरोप शाबीत मानून मल्हाररावांना राज्यावरून दूर करण्याचें ठरविलें, ते स्वतः व त्यांचे सर्व वालीवारस यांचा राज्यावरील सर्व हक्क नष्ट करून टाकला; आणि गायकवाडघराण्यापैकीं एखादा मुलगा महाराणी जमनाबाईसाहेब यांचे मांडीवर दत्तक देण्याचें ठरविण्यांत आलें. मल्हाररावांस प्रथम अटक झाली तेव्हां, व त्यांना राज्यावरून दूर करण्यांत आलें तेव्हां, त्यांच्या पदरच्या अरब वगैरे लोकांखेरीज कोणीही गडबड करण्याची तयारी दाखविली नाहीं. महाराजांना बचाव करण्याची उत्तम संधि द्यावी इतकें म्हणण्यापुरतीच त्यांना लोकांची सहानुभूति उरली होती. बडोद्याच्या नवीन राज्यव्यवस्थेकरितां सर. टी. माधवराव यांना सरकारी दिवाण नेमण्यांत आलें. परंतु त्यांच्या बुद्धिमत्तेचा लौकिक बरा असला तरी, संस्थानच्या योग्य हक्कांचें ते कितपत

संरक्षण करतील याविषयीं लोकांना प्रथमपासूनच शंका होती, व ती पुढें खरीहि ठरली. नवीन महाराज अल्पवयी असल्यामुळें, नांवाचें संस्थान पण कारभार सर्वस्वीं इंग्रजसरकारचा अशी स्थिती अखेर बडोद्यांत अमलांत आली.

मोठे राजेरजवाडे सोडून दिले असतां सामान्य संस्थानिक व सरदार लोक यांची स्थिति तर विशेषच वाईट झाली होती. मोठ्या राजेरजवाड्यांची सांपत्तिक स्थिति तरी बरी होती. पण जहागिरदार, सरदार, इनामदार यांची श्रीमंती, सांठलेल्या डबक्यांतील पाण्यासारखी असल्यामुळें, व त्यांची मिजासखोरी कमी न होतां उलट वाढल्यामुळें ते बरेच खालावले. लष्करी पेषा व त्या पेषाची ताजी मिळकत ही नाहींशी होऊन, केवळ जमीनजुमल्याच्या उत्पन्नावरच सर्व भिस्त येऊन पडली. जमीनजुमल्याचें उत्पन्न म्हणजे तें घरच्या शेतीचें उत्पन्न नव्हे, तर कुळांकडून येणाऱ्या खंडाचें उत्पन्न! अर्थात् दिवसेंदिवस तें अधिक अनिश्चित व अपुरें होऊं लागलें. ज्यांना आपला वसूल आपल्या हातानें करण्याचा अधिकार होता, आणि ज्यांचे जुने दिवाणी फौजदारी अधिकार उरले होते, त्यांना वसूल होण्याला त्रास पडत नसे. पण ज्यांना सर्वस्वीं खालसांतील मुलकी अधिकाऱ्यांवर व न्यायकोर्टां-वर अवलंबून रहावें लागे त्यांचे फारच हाल होत. ब्राह्मण जहागिरदार सरदार इनामदार यांच्यांतहि जर आळस अज्ञान व मिजासीखोरपणा शिरला होता, तर मराठ्यांतहि तो असेल यांत काय आश्चर्य?

१८४९ सालांत गोपाळराव हरी यांनीं आपल्या एका लेखांत तत्कालीन सरदार लोकांविषयीं मोठा मार्मिक अभिप्राय दिला आहे. त्याचें तात्पर्य असें. पेशवाईअखेर जे सरदार बाजीरावास कंटाळून इंग्रजांना मिळाले त्या ब्राह्मण व ब्राह्मणेतरानांहि असें वाटलें कीं, इंग्रज राजा झाला तर पेशव्यांची ताबेदारी नोकरी आज करावी लागते ती चुकेल व घरबसल्या खावयास मिळेल. म्हणून त्यांनीं इंग्रजांना मान्यता देऊन सरकारनें जाहागिरी वगैरेंची केलेली व्यवस्था स्वीकारली. पण पुढें त्याच व्यवस्थेंत घातलेल्या कलमाप्रमाणें उत्पन्नें जप्त होऊं लागलीं तेव्हां केलें काय व झालें काय असें त्यांना वाटूं लागलें! "सरदारलोकांजवळ बसलें म्हणजे प्रथम पेन्शनाची गोष्ट. आतां जप्ती जाहली कसें करावें? इंग्रजांचें राज्य फार वाईट कारण आमचा सरंजाम गेला! कोणी म्हणतो माझें पेन्शन गेलें. आम्हांस पहिलें वाटत होतें कीं पुस्तदरपुस्त चालवितील. परंतु आतां कायदे फार वाईट निघाले.......इतके सरदार आहेत यांपैकीं एक जणास आणून पाहिलें कीं हा गृहस्थ कोणत्या उपयोगी पडेल? तर मला वाटतें कीं या पृथ्वीवर कोणतेंहि काम त्यांचे लायख सांपडावयाचें नाहीं. पंचवीस वर्षांपासून त्यांच्या वृद्धापकाळास आरंभ होतो. कितीकांस चाळिसाव्या वर्षी धरावयास दुसरे लोक लागतात. स्वतः लिहिणें पुसणें तर कोणासहि येत नाहीं. सर्वांस वकील व कारभारी पाहिजेत. ज्यांस वकील कारभारी नाहींत त्यांनीं दरबारांत जाण्याचे

दिवशीं एखादा मजूरदार तरी बरोबर करून नेला पाहिजे. यजमानास बोलावयाचें माहीत नाहीं. कारकुनांनीं पिसें लावून, कावळा करतात तसा करून, एजंटास भेटवावा. हे अमके म्हणून सांगावें. परंतु खाशे पाहिले म्हणजे नंदी किंवा शुद्ध नर्मदेंतले बाण. उठण्याची वेळ झाली म्हणजे महाराजांस उठा म्हणोन देखील सांगितलें पाहिजे. कारकुनानें म्हणावें 'आज साहेब फार खूष होता, आपल्यापाशीं फार बोलला, इतकें कोणापाशीं बोलत नाहीं.' मग यजमानांनीं म्हणावें आमचा दिवाणजी हुशार आहे. घरांत व्यवस्था पाहिली तर दरबारापेक्षां अधिक. पण वाण्याची उचापत आणि सरकारचें कर्ज! त्यास व्याज शेंकडा पंचवीस रुपये. सरकारी कामदार व पदरचे कारकून दोघे मिळून यांना फसवितात. ह्यांस उजाडल्यामावळल्याची खबर नाहीं व योग्यता कांहीं नाहीं. व्यापाराच्या कामांत उपयोग नाहीं, विद्वान नाहींत, चाकरी करण्यास बळकट नाहींत. सरासरी जिवंत मात्र असतात. त्यांचें जिणें फार वाईट आणि लज्जेचें आहे. यांनीं आतां सरंजामाची व पेन्शनाची आशा सोडावी व आपल्या सुधारणुकीस लागावें. अजून सरदार लोकांनीं सावधगिरी केली तर ते माणसांत येतील."

या कालावधींतील ब्राह्मणांचे दोन वर्ग करितां येतील. एक वर्ग भटभिक्षुक, शास्त्रीपंडित यांचा, व दुसरा कारकुनी पेशाचे ब्राह्मणांचा. पहिल्या वर्गासंबंधानें पाहतां असें दिसतें कीं दर उजाडल्या दिवशीं या वर्गाचें महत्त्व कमी कमी होत होतें. त्यांच्या महत्त्वाला, निदान धंद्याला तरी, बाजीरावशाहींत पुष्कळ तेजी होती. पेशवाईत दरसाल श्रावणमासीं जी दक्षिणा वांटली जाई तिचे आंकडे लाखावर गेलेले आढळतात. रयतेचा पैसा या एका वर्गावर इतका खर्च करणें आजच्या दृष्टीनें कोणालाहि अयोग्यच वाटेल. पण त्या काळीं युक्तायुक्ततेची ही दृष्टीच जन्मली नव्हती. तथापि वेदपारायण व संस्कृतविद्येचें संरक्षण येवढीच दृष्टी घेतली तर त्या विद्येला तेव्हां तें एक मोठेंच उत्तेजन होतें यांत शंका नाहीं. बाजिरावशाहींत तर विद्यासंपन्न ब्राह्मणाच्या परामर्षाखेरीज प्रत्यक्ष ब्राह्मणभोजनांचें स्तोमहि पंक्तींत पुष्कळच वाढलें होतें. सवा हात केळीचें पान व त्यावर वाढलेली पक्वान्नें आणि इतर थाट यांच्या गोष्टी ऐकल्या म्हणजे कोणाच्याहि तोंडाला पाणीच सुटावें! पेशवाई नष्ट झाल्यावर अर्थात् या खात्याला मोठाच धक्का बसला. तथापि ब्राह्मण धर्माचें सर्वस्व अद्यापि कायम असल्यामुळें, ब्राह्मण संस्थानिकच काय, ब्राह्मणेतर संस्थानिकहि ब्राह्मणांना दानधर्म बराच करीत.

पण भटभिक्षुकांविषयीं बाजीरावशाहीपासूनच एका तऱ्हेची हीनबुद्धी प्रचलित झाली होती. एक पुणेंकर लिहितो " भटभिक्षुक, आगांतुक, आचारी–पाणके वगैरे लोकांच्या व कचेऱ्यांच्या जागा आणि मंडईचा रस्ता एकच असल्यामुळें बाजाराचे दिवशीं मोठी पंचाईत पडते. रस्त्यामधून जावें तर गुराढोरांचा उपद्रव, कडेनें जावें तर भटभिक्षुकांचा उपद्रव ! " 'लोकहितवादी'नीं या विषयावर बरेंच

लिहिलेलें आहे. " आगंतुक ब्राह्मण, माधुकरी ब्राह्मण, कोंडींत ब्राह्मण, कचेरींत उमेदवार ब्राह्मण असे दीनवाणें हे लोक फिरतात, याची लज्जा स्वजातीस असू नये काय ? या देशांत धंदा फार वाढला आहे व सर्व लोक त्यापासून नफा घेतात; परंतु ब्राह्मण त्यांचे भागीदार नाहींत. यास कारण भिक्षा देणारे लोक होत." तसेंच:—"कोणी म्हणतो शतचंडी, कोणी म्हणतो अभिषेक, याप्रमाणें आळशी लोक स्वस्थ जेवण दक्षणा घेतात आणि बसतात धर्माचें रक्षण करीत नाहींत, कोकांस धर्मार्थी, धर्मतत्पर करावें तें नाहीं फक्त आपलें पोट आणि यजमानाची स्तुती अशी माल ते आळशी लोक कामें करतात व त्यांस जो पैका देतात तो कांहीं उपयोगाकरितां देत नाहींत. असा धर्म करणें हें फक्त आळशीपणाची वृद्धी करणें आहे. याप्रमाणें अनुष्ठानें जप वगैरे जितक्या ब्राह्मणांच्या मिळकती आहेत त्या सर्व अशाच आहेत व प्राचीन काळापासून चालत आलेल्या दक्षणा खिचडी, सभा, देवस्थानें आहेत यांची सुधारणा लोकांशिवाय होणार नाहीं." किंवा, " तस्मात् भट लोक जे आहेत ते केवळ भाडेकरी, परंतु मजुरदारांसारखे नव्हत; मजुरदार मजूरी करून उगेंच राहतात. परंतु हे मजूरी करण्यांत लोकांची नीति बिघडवितात. आणि त्यांमध्यें अज्ञान वाटवून दुर्गुणवृद्धी मनापासून करतात. " इत्यादि.

कारकुनी पेषाच्या ब्राह्मणांची स्थिति मात्र अशी खालावली नाहीं. जुना कारकुनी फड गेला त्या जागीं साहेबांची कचेरी आली इतकाच फरक. या ब्राह्मण वर्गाला मदत चालू ठेवणें सरकाराला इष्टच होतें, किंबहुना अपरिहार्यहि होतें. व ती मदत त्यांना इंग्रजी शिक्षणामुळें झाली. राज्य मिळविण्याइतकेंच राज्य चालविण्याचें काम अवघड असतें इंग्रजांना राज्य चालविण्याची कला माहीत होती तरी पण हिंदुस्थानांतील प्रत्यक्ष राज्यकारभाराची खातीं सुरू होऊन सुरळीत चालण्याला एतद्देशीय हुशार व सुशिक्षित माणसांची मदत असल्याशिवाय चाललें नसतें. ही मदत कारकुनी पेषाच्या लोकांनीं केली. त्यांनींच इंग्रज सरकारच्या राज्यस्थापनेच्या मार्गांतील कांटेकुटे झाडून काढले, जमीन मऊ करून सफाईची वळणें बांधून दिलीं आणि गुलाबपाणी शिंपडल्याप्रमाणें सर्व मार्ग सुखाचा व चैनीचा करून दिला. या बंदोबस्तामुळें रयतेचें जें कायमचें नुकसान झालें असेल त्याची जबाबदारी त्या अडाणी लोकांनीं या जाणत्या लोकांवर टाकल्यास कांहीं अंशी ती योग्यच होती. या पहिल्या अमदानींत साहेब लोक आपले हेडक्लार्क व शिरस्तेदार यांजवर अतिशय अवलंबून असत व जो दुसऱ्यावर अवलंबून राहतो त्याला तितक्यापुरता आपला अधिकारहि गमावून बसावें लागतें. शिरस्तेदार लोकांना हा अधिकार मिळाल्यानें

ते या पहिल्या काळांत मोठे वजनदार झाले होते व वजनाबरोबर थोडासा उन्मादहि आला होता. १८७२ सालीं विनायक कोंडदेव ओक यांनीं शिरस्तेदार या नांवाचें लहानसें पुस्तक गोष्टीच्या रुपानें प्रसिद्ध केलें. त्यांत कारकुनी पेशाच्या लोकांना अधिकाराची जागा मिळाली असतां, ते अधिकाराचा दुरुपयोग कसा करतात, जुलमी व अनीतिमान कसे बनतात याचें चित्र चांगलें रंगविलें आहे. हें पुस्तक त्या वेळीं बरेंच लोकप्रिय झालें होतें कारण त्यांतील वर्णनें बहुतेकांना पटण्यासारखीं होतीं. ओक लिहितातः—"सगळेच शिरस्तेदार रामदासस्वामी निघतील, तर ह्या लोकीं अप्रतिष्ठेचा वांटा कोण उचलील? हीं कारागृहें कोण बसवील? आणि यमाजी भास्कराकडचीं नरककुंडें कोण भरील?" सगळेच रामदास मिळणें लांबच पण निदान शेंकडा चारपांच शिरस्तेदार रामदास मिळणें त्या काळीं मुष्किलीचें होतें.

स्वार्थी हेतूंच्या आरोपांतून जगांत अर्थातच कोणीहि सुटत नाहीं. इंग्रजांनीं पेशवाईनंतर महाराष्ट्रांत नव्या पद्धतीचें शिक्षण हीतकरू पिढीस देण्यास सुरुवात कां केली याचीं उत्तरें वरील दृष्टीनें तीन देतां येतात. (१) सरकारला राज्यकारभार चालवावयाला नोकरलोकांची वाण पडूं नये म्हणून. (२) हिंदी लोकांना पाश्चात्य संस्कृतीचें वळण लागून ते परावलंबी बनावे व आपल्या व्यापारी मालाला कायमचें गिऱ्हाईक मिळावें म्हणून. (३) त्यांनीं धर्मांतर करून ख्रिस्ती बनावें म्हणून. हे तिन्ही हेतु इंग्रज राज्यकर्त्यांच्या मनांत नसतील असें कोणास म्हणवत नाहीं. पण त्यांत त्यांनाच नांवें ठेवण्यासारखें असें काय आहे? राज्यें कोणी मोक्षाकरितां मिळवीत नाहींत. आपला धर्म, आपली संस्कृती, आपला व्यापार हीं वाढविण्याची आकांक्षा मनांत बाळगणें योग्यच आहे. इंग्रज सरकारला राज्यकारभार सुयंत्रित चालण्याला नोकर हवे होते, पण त्याप्रमाणें जुने धंदे बसलेल्या मध्यम स्थितींतील तरुण लोकांनाहि पोट भरण्याकरितां नोकऱ्या हव्याच होत्या! व्यापारवृद्धीचा हेतु राज्यबुद्धीच्या मुळाशीं असतोच असें नाहीं. त्या दोन गोष्टी परस्पर उपकारी आहेत इतकेंच कायतें. हिंदुस्थानांतील आपलें राज्य गेलें तरी चालेल, फक्त व्यापार राहिला तरी बस्स आहे, असे मेकॉलेनें काढलेले उद्गार प्रसिद्धच आहेत. हिंदूलोकांना अपल्या धर्माचा प्रसार करणें माहित नाहीं म्हणून त्यांना दुसऱ्या कोणी स्वधर्मप्रसाराचें नांव काढलें कीं आश्चर्य वाटतें व संशय येतो. पण बौद्ध व मुसलमान लोकांनीं जें केलें तेंच ख्रिस्ती राज्यकर्त्या इंग्रजांनाहि करावेंसें वाटल्यास स्वाभाविकच होतें. बौद्ध व मुसलमान यांच्याप्रमाणें ख्रिस्त्यांनाहि 'तुम्ही जगाच्या पाठीवर माझ्या धर्माचा प्रसार करा' अशी ख्रिस्ताची स्पष्ट आज्ञा आहे. मिशनरी लोक हालअपेष्टा सोसून जे दक्षिणआफ्रिकेच्या निबिड अरण्यांतून धर्मप्रसार करण्याकरितां वणवणत हिंडतात, त्यांना स्वकीयांच्या

शीतळ राज्यछत्राखालीं शांततेनें व बिनधोक्यानें धर्मप्रसाराचा गोड घांस आयता खाण्यास मिळाला तर त्यांनीं तो कां सोडावा ?

पण इंग्रजांना लवकरच कळून आलें कीं, शिक्षणामुळें धर्मप्रसार असा फारच थोडा होतो; तो करण्याचीं इतर आडमुठीं साधनेंच अधिक यशस्वी ठरतात. प्रथम प्रथम इंग्रजी शिक्षणाच्या नूतनपणानें कित्येकांना भुरळ पडली खरी. पण तो प्रकार लवकरच थांबला. प्रार्थनासमाजिस्ट हे धर्मांतराला सर्वांत अधिक प्रवण. त्यांनीं हिंदु धर्माचें वैशिष्ट्य धिक्कारून जगांतील सर्व धर्मांतील उत्तमोत्तम तत्त्वें एकत्र करून नवा धर्मपंथ स्थापण्याचा विचार केला होता. अशा रीतीनें ज्यांचा एक पाय स्वधर्मांतून बाहेर निघाला त्यांचा दुसरा पाय परधर्मांत पडणें फार सोपें असतें. प्रार्थनासमाजिस्ट लोक तर गीतेच्या बरोबरीनें बायबलला मान देऊं लागले होते. असें असतां त्यांनींहि लवकरच असा निर्णय दिला कीं, हिंदुधर्मांत कांहीं व्यंगें असलीं तरी ख्रिस्ती धर्मानें झालें तरी सर्व शंकास्थानांना समर्पक उत्तर मिळतेंच असें नाहीं. स. १८७८ सालीं माधवरावजी रानडे यांनीं सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत या विषयावर एक लहानसा लेख लिहिला, त्यांत त्यांनीं मुंबईतील प्रार्थनासमाजाचे अध्वर्यू दादोबा पांडुरंग यांचेंच उदाहरण देऊन वरील गोष्ट सिद्ध केली होती. " It is a great relief to us to find that as the result of 50 years' study Dadoba, though he reveres the Holy Bible and has made Christianity the favourite study of his life, has failed to accept the current doctrines of the Christian religion. There is not a single point among the Cardinal doctrines of the Christian Churches to which Dadoba has been able to subscribe his unqualified adhesion, nay more, he has expressed his dissent from the philosophy and rationale of these doctrines with unumistakable freedom." धर्मसहिष्णुतेच्या परमावधीस गेलेल्या सुशिक्षित लोकांची जर ही स्थिति, तर सामान्य प्रतीच्या हिंदु लोकांवर शिक्षणानें, बायबलच्या अभ्यासानें किंवा मिशनरींच्या मोहक उपदेशानें, ख्रिस्तीधर्माची छाप न पडावी यांत आश्चर्य नाहीं.

इंग्रजी शिक्षणाच्या वाढीबरोबर हिंदु लोकांस ख्रिस्ती करण्याची मिशनरी लोकांची आकांक्षाहि वाढूं लागली, व त्याबरोबरच जबरदस्तीनें किंवा भुरळ पाडून बाटविल्याबद्दल दंगेहि वाढले. पहिल्या दमांत त्यांनीं चहूंकडून हल्ला चढविला. सरकारनें आपल्या हातीं शाळाखातें, किंबहुना कोणत्याहि शिक्षणाचें काम, ठेऊं नये अशी तक्रार त्यांनीं सुरू केली. हेतु हा कीं, हें खातें व हें काम सर्वस्वीं मिशनरी लोकांच्या हातीं ओघानेंच येईल. छापखाने काढणें, लहानसहान पुस्तकें तयार करविणें, रस्त्यावर उपदेशक उभे करून व्याख्यानें देणें हें तर त्यांचें काम सुरू होतेंच; पण ते कथाहि करूं लागले! पुण्यांतील हौदांना शिवून साधल्यास लोक बाटवावे, न साधल्यास निदान इंग्रजी राज्यांत आपणास येणारा वरिष्ठ

हक गाजवावा, असा त्यांचा उद्योग सुरू झाला होता. पण या सर्वांचा परिणाम फारसा होणार नाहीं, फार तर तेहतीस कोटी देवांत येशु ख्रिस्ताच्या मूर्तीची आणखी एक भर पडेल, पण हिंदुधर्माचा नाश होणार नाहीं, असें सुज्ञ लोकांनीं प्रथम पासून भाविष्य करुन ठेविलें होतें. १८६५ सालीं ज्ञानप्रकाशांत एक विद्वान् हिंदु लिहितोः—

"The disheartening disproportion between the unremitting labours of the Missionaries to christianise India and the success with which they have hitherto been attended is sufficient to cool the most violent ebullitions of religious enthusiasm."

ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसारामुळें होणारें हिंदुधर्माचें नुकसान महाराष्ट्रांतील लोकांच्या लक्षांत लवकरच आलें. वर्तमानपत्रांतून याविषयीं लेख येत परंतु ते मिळमिळीत असत उपदेशकाला खरा शत्रू उपदेशक हाच ठरतो. ख्रिस्ती मिशनरी व हिंदु धर्मोपदेशक यांच्या छकडी त्या जुन्या काळीं मोठमोठ्या गांवच्या चव्हाट्यावरून पहावयास सांपडत. मिशनरी एकदां हिंदुधर्माविरुद्ध बोलूं लागले म्हणजे त्यांचें तर्कशास्त्र वेडें वांकडें कसें धांवत सुटतें याचा अनुभव सर्वांस असतोच. अर्थात् त्यांना उत्तर देणारा उपदेशकही भावनाप्रधान वक्ताच असावा लागतो, व हें वक्तृत्वाचें बळ इंग्रजी शिकलेल्या वक्त्यांत प्रायः असत नाहीं. त्याला जुन्या पद्धतीनें शिकलेला व वेदांना अपौरुषेय मानणारा भाविक संन्यासी किंवा ब्रह्मचारीच हवा. टिळकांच्या पूर्वीच्या महाराष्ट्रांतील इतिहासांत विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनीं हिंदुधर्मावरील मिशनऱ्यांचे हल्ले परतविण्याची मोठींच कामगिरी केली. विष्णुबुवांचा जन्म सन १८२५ सालीं कुलाबा जिल्ह्यांतील निजामपूर पेट्यांपैकीं शिरवली या लहानशा खेड्यांत झाला. यांच्या वडिलांचें नांव भिकाजीपंत गोखले, हे विष्णुबुवा पांच वर्षांचे असतांना निवर्तले. घरच्या गरीबीमुळें विष्णुबुवांना प्रथम शेतकाम व नंतर कांहीं दिवस एका दुकानदाराकडे नोकरी करावी लागली. वयाच्या सोळाव्या वर्षी ठाणें जिल्ह्यांत कस्टम खात्यांत त्यांना नोकरी मिळाली. प्रथमपासूनच धार्मिक प्रवृत्ति असल्यामुळें, बुवांनीं नोकरीशिवाय बाकीचा वेळ धार्मिक वाचन, श्रवण व मनन यांत घालविला. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांना साक्षात्कार झाला. तेच स्वतः आपल्या आत्मचरित्रांत लिहितात "सप्तशृंगीच्या डोंगरावर परमेश्वरानें धर्मोपदेशाची आज्ञा दिली, मला दत्तात्रेयाचा वर आहे" सन १८६५ ते १८७१ पर्यंत ते मुंबईस समुद्रकाठीं धर्मपर व्याख्यानें देत व मिशनऱ्यांशीं वादविवाद करीत. कधीं कधीं सुधारकांशींही ते वादविवाद करीत. दोघांनांहि ते कोटिक्रमानें निरुत्तर करून टाकीत अशी प्रसिद्धी आहे. महाराष्ट्रास मिशनऱ्यांच्या कचाट्यांतून ज्यांनीं मुक्त केलें त्यांत विष्णुबुवा प्रमुख होत. आपल्या आत्मचरित्राशिवाय, मानवधर्मप्रकाश, भगवद्गीता—टीका 'सामान्य लोकसत्ता-

काचें दर्शक ' ओवीबद्ध प्रकरणें वगैरे पुस्तकें त्यांनीं लिहिलीं. ते १८७१ सालीं मुंबईसच कळपुळीच्या रोगानें वारले. " ह्या आपल्या मुंबई इलाख्यांत इंग्रजी अमलानंतर पुष्कळ ब्रह्मचारी व धर्मोपदेशकर्ते होऊन गेले पण विष्णुबुवासारखा ज्ञाता, सुविचारी, लोककल्याणेच्छु व कर्ता असा दुसरा आमचे पाहण्यांत आला नाहीं. " असें त्यांच्याविषयींच्या मृत्युलेखांत ज्ञानप्रकाश लिहितो.

मिशनरी लोकांना ही गोष्ट लवकरच कळून आली; तथापि त्यांनीं आपला शिक्षण-प्रसाराचा उद्योग मात्र सोडून दिला नाहीं. हा त्यांचा गुण घेण्यासारखाच म्हटला पाहिजे. असो, ख्रिस्तीधर्मप्रसार इंग्रजी शिक्षणाच्या अनुषंगानें न झाला तर न होवो, पण राज-कीय सत्ता तरी अबाधित राहील कीं नाहीं, किंवा शिक्षणानें तिलाहि धोका येईल असा विचार त्या वेळच्या इंग्रजांना न सुचणें अशक्य होतें. पण याहि बाबतींत कित्येकांनीं मन मोठें करून धोका सोसण्याची तयारी दर्शविली होती. लेफ्टनंट ब्रिग्ज हे मौंट स्टूअर्ट एलफिन्स्टनच्या भेटीस एकदां गेले असतां जवळच नवीन छाप-लेलीं मराठी पुस्तकें पडलीं होतीं. तीं पाहून ब्रिग्ज यानें विचारलें कीं 'हीं पुस्तकें कशाला ?' त्यावर एलफिन्स्टन यानें उत्तर केलें कीं 'मराठे लोकांना सुशीक्षित करण्याला. पण लक्षांत ठेवा कीं, हें सुशिक्षण म्हणजेच आम्ही आपलें चंबू-गवाळें आंवरून परत युरोपांत जाण्याचा राजमार्गच ठरणार आहे. '

मराठी पुस्तकें छापण्याचें काम मिशनरी लोकांनीं पेशवाई बुडण्याचे आधीं आठ वर्षें सुरू केलें होतें. मराठ्यांचें सिंहासन इंग्रजांच्या हातीं लागण्यापूर्वींच त्यांच्या मुद्रणकलेनें मराठी 'सिंहासनबत्तिशी' हस्तगत केली होती. पेशवाई बुडाल्यावर एल-फिन्स्टन यानें पहिलें काम शिक्षणप्रसाराचें केलें. १८२२ च्या आगस्टमध्यें मुंबईस बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. तिला मिळालेल्या पन्नासहजार रुपयांतून ग्रंथप्रसिद्धीचें काम सुरू झालें. हे ग्रंथ मुख्यतः शालोपयोगी असत हें सांगावयास नकोच. मराठ्यांना शिक्षण द्यावयाचें तें त्यांच्या जुन्या ग्रंथांचें द्यावें किंवा पाश्चात्य विद्येचें द्यावें हा वाद लवकरच संपून पाश्चात्य शिक्षणाचा विजय झाला, यामुळें जुन्या संस्कृत ग्रंथांचें मुद्रण करण्यापेक्षां नवे लहान सोपे मराठी ग्रंथ तयार करून छापणें हेंच अधिक आवश्यक ठरलें.

विद्या व दक्षिणा हीं परस्परांचें कार्य व कारण दोन्ही होऊं शकतात. पेश-वाईच्या काळीं किंवा त्याच्या पूर्वींहि सरकारांतून विद्येची सोय नसे. पण विद्यासंपन्न लोकांना दक्षिणा वांटण्याची चाल होती. कोणत्याहि देशांत सुप्रतिष्टित असलेल्या सरकाराला प्रजेच्या धर्मरक्षणाची म्हणून कांहींतरी व्यवस्था करावीच लागते. यामुळें सुधारलेल्या पाश्चात्य देशांतूनहि सरकारच्या अनेक खात्यांपैकीं धर्ममंडळ हें एक खातें असतेंच. मराठी राज्यांत धर्ममंडळ म्हणजे खास सरकारी पुरोहित, उपपुरोहित अशा तऱ्हेचा अधिकारी वर्ग म्हणून नेमलेला नव्हता. परंतु दरवर्षी निरनिराळ्या प्रसंगीं दक्षिणा वगैरे वांटल्या जात. शिवाय कोठें खिचडी, कोठें सदावर्त, कोठें रोजचा

बांधून दिलेला धर्मदाय, अशा पद्धतीनें विद्वान् व धार्मिक लोकांचा योगक्षेम चालविला जात असे. या द्रव्याश्रयावर उपजीविका करणारे विद्वान् शास्त्रीपंडित घरीं शिष्य पढवून विद्येची परंपरा चालवीत. अशांचा परामर्श घेण्याकरितां सरकारांतून जो पैसा खर्च होई तोच विद्यावृद्धीवर खर्च झाला असें समजण्यांत येत असे. पेशवाईत वार्षिक दक्षिणेची रकम किती वाढली होती या संबंधाची हकीकत 'डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी'नें छापलेल्या 'पेशव्यांच्या रोज-निशां'तून पहावयास मिळेल. अशा रीतीनें पेशवाई अखेरपर्यंत विद्येतून दक्षिणा निर्माण होत असे; परंतु पेशवाईनंतर या दक्षिणेंतूनच विद्या निर्माण होण्यास सुरवात झाली. बाजीरावशाही समाप्त झाल्यानंतर एलफिन्स्टन साहेबानें रमण्यांत ब्राह्मणांची कोंडी करून दक्षिणा देण्याची पूर्वीची चाल बंद केली; तथापि इतर देवस्थानांच्या उत्पन्नाबरोबर दक्षिणेचा खर्च त्यानें पुढेंहि चालू ठेविला. मात्र त्यानें त्याचें रूपांतर केलें. या दक्षिणा–फंडांतून प्रथम विद्येला उत्तेजन म्हणून बाक्षिसें देण्यांत येत. नंतर नाशिक व वाई या दोन प्रसिद्ध क्षेत्रांच्या ठिकाणीं हिंदुलोकांकरितां संस्कृत कॉलेजें काढण्याचा विचार चालू झाला. पण अखेर तो रहित होऊन १८२१ सालीं खुद्द पुण्यासच विश्रामबागवाड्यांत सरकारी संस्कृत पाठशाळा स्थापण्यांत आली; व तिच्याकरितां पन्नास हजारांची रकम बाजूला काढून ठेविली.

एकदोनवर्षांत या पाठशाळेंत सुमारें दीडशें विद्यार्थी शिकूं लागले. संस्कृत शास्त्र-ग्रंथांबरोबर धर्मशास्त्र व गणित हे विषय शिकविण्याची तेथें विशेष व्यवस्था झाली. पुढें मुंबईप्रमाणें पुण्यास एज्युकेशन सोसायटी स्थापन झाल्यावर १८४२ सालीं याच पाठशाळेला इंग्रजी शिक्षणाचा वर्ग जोडण्यांत आला. ता. ७ जून १८५१ रोजीं या संस्कृत व इंग्रजी वर्गांना मिळून 'पूना कॉलेज' हें नांव देण्यांत आलें. १८५५ सालीं एज्युकेशन सोसायटी मोडून सरकारी शाळाखातें निर्माण झाल्यावर, या कॉलेजची व्यवस्था डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांजकडे गेली. पुढें हें कॉलेज १८६३ सालीं विश्राम बागेंतून उठून वानवडीस गेलें, व तेथून १८६८ सालीं 'डेक्कन कॉलेज' या नव्या नांवानें संगमापलीकडे खंडोबाच्या माळावरील मोठ्या नव्या इमारतींत सुरू झालें. १८४२ सालीं जी इंग्रजी शाळा सुरू झाली तीच स्वतंत्र रीतीनें पुढें विश्रामबाग हायस्कूल म्हणून चालू राहिली. या विश्रामबागेंतच ट्रेनिंगकॉलेजचाहि एक वर्ग होता, व ट्रेनिंग कॉलेजच्या लोकांना अर्थात् निवळ मराठी असेंच उपयुक्त शिक्षण दिलें जाई. १८६३ च्या सुमारास हायस्कूल कॉलेज आणि ट्रेनिंग कॉलेज मिळून सुमारें ४०० विद्यार्थी शिकत असत. १८५७ सालीं मुंबई युनिव्हर्सिटी स्थापन झाली तेव्हां शाळापाठशाळा यांजवरील जुन्या पंडितांचा अधिकार संपून, त्या युरोपियनांच्या हाताखालीं देण्यांत आल्या. जुने पंडित निवळ मराठी जाणणारे म्हणून त्यांना संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें करण्याकडे नेमलें. मात्र त्यांतील कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारखे किंवा केरो-

पंत छत्र्यांसारखे जे इंग्रजी भाषाहि शिकले त्यांना ट्रेनिंग कॉलेजचा प्रिन्सिपाल किंवा सरकारी रिपोर्टर किंवा प्रोफेसर अशा वरिष्ठ हुद्याच्या जागा देण्यांत आल्या. कृष्णशास्त्र्यांनंतर रेव्हरंड मॅगडुगल, मेजर कँडी, रेव्ह. फ्रेजर, प्रो. ग्रीन, इ. आय. हॉवर्ड, रेव्ह. मरीमिचेल, प्रो. ड्रेपर, एड्विन अर्नोल्ड, डॉ. मार्टिन हौ, प्रो. रसेल, वुइल्यम वर्डस्वर्थ, डॉ. कीलहॉर्न, प्रो. फॉरेस्ट, व प्रो. शूट वगैरे युरोपियन लोक, कोणी प्रिन्सिपाल कोणी केवळ प्रोफेसर असे, टिळकांचा कॉलेजांतील शिक्षणक्रम संपेपर्यंत, पूना कॉलेज आणि डेक्कन कॉलेज यांत होऊन गेले. क्रमाक्रमानें इंग्रजीनें संस्कृताची जागा पूर्णपणें घेरली, व मराठीहि "मागें पडत चाललें. १८५६ सालींच मरीमिचेल यानें मोडी हस्ताक्षरावर अधिक लक्ष द्यावयास पाहिजे" असा कॉलेजच्या बुकांत शेरा दिला! व १८५८ सालीं एडविन अर्नोल्ड यांनीं तर असें लिहिलें कीं " Most of the advanced Students are better scholars in English than in Marathi" मुंबईत तर मराठी हें पुण्याहूनहि आधींच मागसलेलें. तात्पर्य, गतवर्षीं मराठी भाषाविषयाकरितां स्वतंत्र प्रोफेसर नेमीपर्यंत, मेजर कँडी यांच्या स्मरणार्थ एका मराठी निबंधाकरितां ठेवलेल्या एका लहानशा बक्षिसाखेरीज, मराठी भाषेच्या अध्ययनाचा मागमूस देखील महाराष्ट्रांतील या मुख्य कॉलेजांत नव्हता.

नव्या शिक्षणयुगाच्या सुरवातीला शिक्षक व परीक्षक दोघेहि युरोपियनच असणार हें उघड आहे. चांगले युरोपियन येत पण ते सहसा टिकत नसत. वाईट युरोपियन टिकाऊ असत पण कामाला निरुपयोगी. एडविन अर्नोल्ड, डॉ. हौ वगैरे शिक्षक पहिल्या प्रतीचे होत. पणं दोघेही लवकरच हिंदुस्थान सोडून गेले. डॉ. हौ हा जर्मन असून मोठा संस्कृत पंडित होता. तो सुरवातीस अवघ्या दीडशें रुपये पगारावर आला. पुढें त्याला पांचशें रुपये पगार होऊन सरकारांतून देणग्याहि मिळाल्या. तथापि तो नाराज होऊन राजिनामा देऊन परत गेला. कँडी, कर्कहॅम् हे दुसऱ्या प्रतीचे युरोपियन. कँडी साहेब भोळवट व थोडासा मूर्खहि, कर्कहॅम पक्का वस्ताद. कँडी साहेबाला मराठी ज्ञानाची घमेंड, व त्यामुळें त्याच्या मराठीच्या अज्ञानाचें प्रदर्शन वरचेवर होई. कर्कहॅम हुशार पण आळशी. १८६५ च्या सुमारास तो पुणें हायस्कूलचा हेडमास्तर होता; पण स्वारी तीन तीन दिवस शाळेंत यावयाची नाहीं; किंवा कोण मास्तर काय करतो याकडे पहावयाची नाहीं. युनिव्हर्सिटींत परीक्षक बहुधा सगळे युरोपियन. कँडीसाहेबांनीं मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेस मराठीचा पेपर काढला त्यांत एक प्रश्न असा होता. "Analyse and give the meaning of डोचकें कीं बोचकें, डोकें कीं फोकें," आणि ऑक्झेनहॅम साहेबांनीं भूगोलावरील प्रश्नांत खालील प्रश्न घातला होता "Name the chief towns on any European river with a course chiefly on the parallel of the longitude." एलफिन्स्टन कॉलेजमध्यें

एक प्रोफेसर गणीत शिकवीत. ते आलजिब्रा उघडून Omit म्हणजे वाचूं नका या अर्थी O हें अक्षर व Read म्हणजे वाचा या अर्थी R हें अक्षर, येवढेंच विद्यार्थ्यांस सांगत!

टिळक बी. ए. होण्यापूर्वी वीस वर्षें, म्हणजे १८५६ सालीं मुंबई युनिव्ह-र्सिटीचा कायदा मंजूर झाला. १८६१ सालीं या युनिव्हर्सिटीचें पहिलें क्यालेंडर प्रसिद्ध झालें त्यावरून १८५९ सालापासूनची, म्हणजे महाराष्ट्रांतील सुशिक्षित लोकांच्या पहिल्या पिढीसंबंधाची, माहिती मिळते. १८५७ सालीं पुणें कॉले-जांतून मॅट्रिक्युलेशनला विद्यार्थी पाठविण्यांत येऊं लागले. यापूर्वी हायस्कूल व कॉलेज मिळून एकच संस्था होती. तिचे येथून पुढें दोन भाग झाले. १८५९ सालीं पुणें कॉलेजांतून प्रवेशपरीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांत बाबा गोखले, व्यंकटराव रामचंद्र, विष्णु बाळकृष्ण सोहोनी यांचीं नांवें आढळतात. रामकृष्ण-पंत भांडारकर, वामन आबाजी मोडक, महादेव नारायण परमानंद, माधवराव रानडे, खंडेराव बेदरकर, बाळ मंगेश वागळे, जनार्दन सखाराम गाडगीळ वगैरे मंडळी याच सालीं मॅट्रिक्युलेशन पास झाली, पण ती मुंबईच्या शाळेतून. यांच्याहि पूर्वी डॉ. सखाराम अर्जुन राऊत, डॉ. सिताराम विठ्ठल वगैरेंचीं नांवें मेडिकल कॉलेजांत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांत आढळून येतात. त्यांनीं मॅट्रि-क्युलेशन परीक्षा दिली नव्हती; कारण तेव्हां मॅट्रिक्युलेशन परीक्षाच मुळीं अस्ति-त्वांत नव्हती. प्रवेशपरीक्षेशिवायच त्यांचा कॉलेजांत प्रवेश झाला होता! १८६२ मध्यें जे विद्यार्थी पास झाले त्यांत माधवराव कुंटे यांचें नांव आढळतें. मॅट्रिक्युलेशन परीक्षेच्या विद्यार्थ्यांची संख्या लवकरच वाढली. १८७६ सालीं ती ११०० वर गेली होती. १८६२ सालीं वामन आबाजी मोडक हे एकटेच गृहस्थ बी. ए. झाले. तेथून पुढें टिळक बी. ए. होईपर्यंत खालीलप्रमाणें बी. ए. ची संख्या वाढत गेली. १८६३ ( ३ ), १८६४ (५), १८६५ ( ७ ), १८६६ ( ७ ), १८६७ (११), १८६८ (२०), १८६९ (२)! १८७० (१८), १८७१(१२), १८७२ (१०), १८७३ (२०), १८७४ (१९), १८७५ (२७), १८७६ (१८), १८७७ (४०). म्हणजे टिळक बी. ए. होण्यापूर्वी १७९ बी. ए. झाले होते. पण ते बी. ए. झाले त्या सालापासून या संख्येला अधिक भरती येऊं लागली. तीच गोष्ट एल्एल्. बी. च्या पदवीधरांसंबंधानेंहि घडून आलेली दिसते. एल्एल्. बी. ची डिग्री घेणाऱ्या लोकांचीं नांवें १८६६ सालापासून नमूद झालेलीं आढळतात. १८६६ सालीं दोनच एल्एल्. बी. झाले; ते माधवराव रानडे व बाळ मंगेश वागळे हे होत. पुढें १८६७ सालीं २, ६८ मध्यें ३, ६९ मध्यें ३, ७० मध्यें ६, ७१ मध्यें १३, ७२ मध्यें ०(!) ७३ मध्यें १, ७४ मध्यें ३, ७५ मध्यें २, ७६ मध्यें ५, ७७ मध्यें ३, ७८ मध्यें ४ व ७९ मध्यें ६,

मिळून चौदा सालांत ५३ एल्एल्. बी. झाले होते. पण टिळकांनीं पदवी घेतली त्या म्हणजे १८८० सालीं एकदम २० एल्एल्. बी. झाले.

टिळक एल् एल्. बी. झाले त्या सालीं मुंबई इलाख्यांत एकंदर शाळा पांच हजारांच्या आंत व एकंदर विद्यार्थी पावणे तीन लक्ष होते. सर्व प्रकारचीं मिळून कॉलिजें आठ, एक आर्टस्कूल, ४८ हायस्कुलें, १७७ मिडल स्कूल्स, दोन वैद्यक-वर्ग, पांच धंदेशिक्षणाचे वर्ग व बाकी प्राथमिक शाळा होत्या. मुलींच्या शाळांची संख्या २८४ होती व ट्रेनिंगचे वर्ग नऊ होते. एकंदर विद्यार्थ्यांपैकीं ब्राह्मण शेंकडा २३, इतर हिंदू ५९ व मुसलमान शेंकडा १० असत.

अशा मर्यादित शिक्षणाचेहि दुष्परिणाम लोकांस थोडथोडे दिसूं लागले होते. ज्ञानप्रकाशांत विद्यार्थ्यांचा एक शुभचिंतक लिहितो:—"प्रस्तुत या देशांत विद्यावृद्धीचा क्रम चालू आहे. त्या योगानें विद्यार्थ्यांचीं शरीरें कृश व अशक्त होतात आणि त्यांस नेटानें टिकून कॉलेजांतील अभ्यास संपून, युनिव्हर्सिटीच्या परिक्षा देतां येत नाहींत किंवा दिल्यास त्यांच्या प्रकृति फार क्षीण व दुर्बळ होतात." तथापि विद्यावृद्धि थांबवावी असें एकान्तिक विधान कोणी कधीं केल्याचें आढळत नाहीं. १८६१ सालीं विश्रामबागेतील बक्षिससमारंभ पाहून लोक खूष झाले; आणि पन्नास हजार रुपये खर्चून पुण्यास बोर्डिंग काढावें व त्याच्या व्याजांतून पन्नास पाऊणशें तरी गरीब विद्यार्थ्यांची फुकट शिक्षणाची सोय करावी अशी सूचना झाली होती. ती त्यावेळीं तावडतोब अमलांत आली नाहीं खरी; परंतु इतर रीतीनें शिक्षणाची वाढ थांबली नाहीं, वाढतच गेली.

पुरुषांचेंच शिक्षण जेथें इतकें कमी होतें तेथें स्त्रियांचें शिक्षण मागसलेलें असल्यास नवल नाहीं. स्त्रीशिक्षणाचें नुसतें नांव पुढें येण्यापूर्वींच स्त्रीशिक्षणाविषयीं वाद जोरानें चालू होते. पूना नेटिव जनरल लायब्ररींत एकदां घडलेला एक संवाद एका 'पिशाच्यानें' ज्ञानप्रकाशांत दिला आहे:—

**जुना शास्त्री**:—तुम्ही कांही दिवसांनीं बायकांच्या पायां पडाल.

**तरुण**:—होय, बायको गंधर्व आहे, बायको घराचा आत्मा आहे.

**शास्त्री**:—अर्थ सांगण्याची तुमची शैली फार उत्तम आहे.

**तरुण**:—वाहवारे पेशवाई शहाणे, "रामः रामौ" केलें म्हणजे अक्कल येत नाहीं.

**शास्त्री**:—बरें महाराज, येस फेस केल्यानें येऊं दे.

इतकें सांगून ' पिशाच्य ' पुढें लिहितें, "बायको घराचा आत्मा आहे तर सूर्य पाणी आहे व समुद्र कौलार आहे. आमच्या वेळीं बायको चार पुरुषांच्या दृष्टीस पडेल काय भगदूर आहे अशी स्थिती होती. विलायतेंत राणी राज्य करते, तिच्या नवऱ्याला कोणी विचारीत नाहीं, तसें हिंदुस्थानांतहि पुरुषानें सकाळीं उठल्याबरोबर बायकोस बारा साष्टांग नमस्कार घालावे असा नियम होणार आहे."

१८७१ च्या सुमारास जानेवारी महिन्यांत पुण्यास 'विचारवती स्त्री सभा' या नांवाची संस्था स्थापन झाली. अशा संस्थेविषयीं लोकमत तेव्हां अनुकूल असणें शक्य नव्हतें. सभेंत अवघे सात आठ स्त्री-सभासद होते. ज्ञानप्रकाश हें पत्र सामान्यतः प्रथमपासूनच मध्यम सुधारणावादी होतें. स्त्रीशिक्षणाला तत्वतः त्याची प्रतिकूलता नव्हती. तथापि ता. ९ जानेवारी १८७१ चा ज्ञानप्रकाश लिहितो— "स्त्रियांची सभा आजपर्यंत आमच्या इलाख्यांत कोठेंहि झाली नव्हती व कदाचित् सर्व हिंदुस्थानांत आजपर्यंत कोठें झाली नसेल. अशी ही नवीन गोष्ट लोकांस दाखविण्याचा प्रसंग आमच्या शहरानें आणला हें पाहून अत्यानंद होतो." पण हे उद्गार थोडेसे उपरोधिकच होते; कारण ज्ञानप्रकाश पुढें लिहितो "पण आज अशी सभा भरविणें म्हणजे रांगतां येत नाहीं त्यास पळावयास लावण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे, असेंहि कित्येक लोकांचें मत आहे."

टिळकांनीं बी. ए. ची पदवी घेतली त्या सालीं पदवीदान समारंभाचे वेळीं झालेल्या भाषणांत नमूद करण्यासारखें विशेष कांहीं आढळत नाहीं; परंतु त्यांनीं एल्एल्. बी. ची पदवी घेतली त्या सालीं चान्सेलर या नात्यानें सर रिचर्ड टेंपल यांनीं जें भाषण केलें तें बरेंच महत्त्वाचें होतें. Floreat Academia हा शुभाशिर्वाद कसा फळाला येत चालला होता हें वर जे पदवीधरांचे वाढते आंकडे दिले आहेत, त्यांवरून दिसून येईलच. पण त्याहीपेक्षां विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं, युनिव्हर्सिटीच्या द्वारें विद्या देणारांची व घेणारांची दृष्टी अधिक विकसित होऊं लागली होती. पदव्या मिळविण्याचा एक हेतु सरकारी नोकऱ्या मिळविणें हा होता, पण वरिष्ठ नोकऱ्यांची संख्या अद्यापि विशेष वाढली नव्हती. सरकारी रेव्हिन्यू खात्यांत मामलेदारांच्या जागा पुष्कळ. पण १८८० सालपर्यंत त्यांत पदवीधरांना बिनपदवीधरांच्या आधीं प्रवेश मिळत नव्हता. हायर स्टँडर्ड परीक्षा झालेला पदवीधर व बिनपदवीधर दोघे एकाच रांगेला बसविले जात असत. ही अडचण सर रिचर्ड टेंपल यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं बिनपदवीधरांआधीं पदवीधरांना, सर्वच नसल्या तरी कांहीं विशेष प्रमाणानें, मामलती देण्याचें ठरवून, हें नवीन धोरण १८८० सालच्या पदवीदानसमारंभांत जाहीर केलें. टेंपलसाहेब हे ब्राह्मणांचा द्वेष करीत असले तरी एकंदरीनें शिक्षणाचे चाहते होते; व पदवीधरांना इतरांहून सरकारदरबारीं अधिक मान मिळाला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. पण नुसत्या पुस्तकी विद्येनें या देशाच्या लोकांचें भागणार नाहीं ही गोष्ट लक्षांत घेऊन, त्यांनीं बी. एस् सी. ची पदवी नवीन स्थापण्याचा तेव्हां उपक्रम केला होता, व तीहि गोष्ट या भाषणांत त्यांनीं जाहीर केली. तोंडीं परीक्षा बंद करणें वगैरे इतर कित्येक सुधारणांचीहि वाटाघाट यापूर्वीच चालू होती. दोन वर्षांपूर्वीपासून मॅट्रिक्युलेशन परीक्षा मुंबईखेरीज इतर ठिकाणीं घेण्याची, म्हणजे परगांवच्या विद्यार्थ्यांची अधिक सोय लावण्याचीहि, व्यवस्था झाली होती. निरनिराळें

शिक्षण देऊन, निरनिराळे धंदे करण्याला, तरुण पिढीला तयार करावें हा युनिव्ह-सिटीचा सर्वसाधारण हेतु होताच. पण कोणचेंहि शिक्षण मिळविलें तरी सुराज्य-व्यवस्थेला उपयुक्त असा प्रत्येक पदवीधर व्हावा, किंबहुना या दिशेनें सुशिक्षित लोक जी पात्रता दाखवितील तीच त्यांची खरी योग्यता मानावी, असें सर रिचर्ड टेंपल यांचें मत होतें. "I should consider the success of natives as civil administrators to be the truest test of that combined mental and moral training which our education seeks to give."

पण सर्वच पदवीधर किंवा सुशिक्षित लोक व्यावहारिक धंद्यांत पडतात किंवा सरकारी नोकरींत गडप होऊन जातात असें नाहीं; तर शिक्षणानें मनुष्याला विचाराची स्वतंत्र दिशाहि सुचणें अगदीं स्वाभाविक आहे हें टेंपलसाहेबांना इंग्लंडच्या अनुभवावरून पूर्णपणें माहीत होतें. तसें झालें असतां ते कदाचित् असंतुष्ट राहतील, सरकासविषयीं कदाचित् त्यांना अप्रीति वाटूं लागेल, आपल्या मनांतील असले विचार ते प्रगट केल्याशिवाय राहणार नाहींत, व इतर लोकां-नाहि मग ते पटूं लागतील, आणि अशा रीतीनें समाजांत सरकारावर टीका करणाऱ्या लोकांचा एक वर्ग कायमचा निर्माण होईल ही गोष्ट त्यांना माहीत होती. पण इंग्लंडांतील सुशिक्षित लोकांच्या रीतीप्रमाणें, या आपत्तीनें न भितां तिचा आपल्या भाषणांत त्यांनीं उघडपणें स्वीकारच केला. "खुल्या दिलानें तरुण सुशिक्षित लोक बोलले म्हणून तेवढ्यामुळें त्यांना आम्ही राजद्रोही गणणार नाहीं. सुशिक्षित वर्ग कृतघ्न बनला तर त्याचें पाप स्वतः त्याच्या माथ्यावर राहील. त्यामुळें शिक्षण-दानाचा हात आम्ही आंखडून धरणार नाहीं. असंतोषाची भावना सुशिक्षिताला शोभते किंवा काय हें ठरविण्याचें काम आम्ही स्वतः त्याच्या विवेकबुद्धीवरच सोपवूं"—वगैरे उदार मतदर्शक उद्गार त्यांनीं आपल्या भाषणांत काढले होते. पण देशी भाषेंतील वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करण्याचा कायदा याच सुमारास गव्हर्नर जनरल लॉर्ड लिटन यांनीं मंजूर करवून घेतलेला असल्यामुळें, टेंपल साहेबांच्या मनांत खरोखर काय डवचत होतें, आणि त्यांच्या तोंडून निघालेल्या या उदार उद्गारांत केवढा मोठा आंकडा वाद समजावयास पाहिजे होता हें तत्कालीन लोक पूर्णपणें ओळखून होते. टिळक एल्‌एल्. बी. होण्यापूर्वीं पांचसहा वर्षे शास्त्रीबोवांच्या निबंधमालेचा जन्म झालेला असून, या अवधींत तिनें बरीच खळ-बळ उडवून दिली होती. आणि टेंपलसाहेब वरील भाषण करीत असतां आंग्लो-इंडियन पत्रांनीं रंगविलेलें सुशिक्षित तरुण महाराष्ट्रीयाचें विकृत भेसूर चित्र त्यांच्या मनःश्चक्षूंपुढें उभें नव्हतें असें कोण म्हणेल ?

१८६५ पर्यंत वकिलीच्या धंद्याचा महाराष्ट्रांत विशेष फैलाव नव्हता. तथापि १८७४ सालीं पुण्यांत ३५।३७ वकील होते असें एका यादीवरून समजतें. कायद्यांचीं कलमें पुस्तकांतून दाखवितां आलीं तर मोठीच बहादुरी ! १८६५ सालीं पुण्यास

अदालतींत वकिलांची लेखी परीक्षा झाली. ३१ उमेदवार परीक्षेस बसले होते. पुस्तकांची मदत घेऊन प्रश्नांचीं उत्तरें लिहिण्यास परवानगी होती. अडीच खणांच्या जागेंत हे सर्व उमेदवार मांडीस मांडी लाऊन बसविले होते, व खुशाल एकमेकांनीं एकमेकांस विचारून उत्तरें लिहिण्याचा क्रम सुरू ठेवला होता ! त्या वेळचा एक विनोदी टीकाकार म्हणतो, "उमेद्वारांचा एकमेकांशीं स्नेहभाव व परीक्षकांची त्यांवर मेहरनंजर पाहून आम्हांस संतोष झाला. ह्या जगांत येऊन आपल्या बंधुजनांस होईल तितकें सहाय्य करावें हा मनुष्याचा धर्म होय. या धर्मावर चित्त ठेऊन परीक्षक व उमेद्वार परीक्षेच्या वेळीं वागत होते हें पाहून कोणास आनंद झाल्यावांचून राहणार आहे?" परीक्षेचा निकालहि हातोहात झाला. मुख्य परीक्षक असिस्टंट जज्ज यांना ज्या भाषेंत उमेदवारांनीं उत्तरें लिहिलीं त्या मराठीचा गंधहि नसतां, त्यांनीं एकदोघां सल्लागारांच्या मदतीनें एकदोन घटकेंत कागद तपासून निकालहि सांगितला. टीकाकार म्हणतो, " अशा भातुकलीच्या परीक्षेपेक्षां चिठ्या टाकूनच निकाल कां नाहीं सांगितला ?" चांगल्या वकिलांची उणीव भरून निघावी म्हणून पुण्यांत सरकारी लॉ क्लास निघावा, व महिना पांच रुपये फी ठेविली तरी पुष्कळ उमेदवार येतील असा अदमास कित्येकांनीं केला होता. जेथें खुद्द कायदेपंडित वकील ते जर असे, तर तेथें असेसर ज्यूरर वगैरे लोक कसे असतील ? न्याय इन्साफाकरितां कोर्टांत जाणें हा आपणांवर एक जुलूम असें निमंत्रित असेसरांना वाटे. त्या काळचा पत्रकार लिहितो " एकदां एका खटल्यांत आम्ही पुणें अदालतींतील एका असेसरास विचारिलें कीं कैदीवर गुन्हा शाबीत आहे असा आपण कशावरून निर्णय केला ?" त्यांनीं उत्तर दिलें " जाऊं द्या हो, कशाचें शाबीत आणि कशाचें गैरशाबीत. कांहींतरी बोललें पाहिजे ना ?"

ब्राह्मणेतर हे ब्राह्मणांच्या मानानें शिक्षणांत मागासलेले होते. तथापि ब्राह्मणेतरांतील सुशिक्षित पिढीचा जन्म टिळकांच्या बरोबर किंवा त्यापूर्वीहि पांच चार वर्षें झाला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. या पिढींत अग्रस्थानाचा मान जोतिराव गोविंदराव फुले यांनाच दिला पाहिजे. त्यांचा पणजा सातारा जिल्ह्यांतील खातगूण या गांवचा वतनदार चौगुला होता. तेथील कुळकर्ण्यापासून त्याला फार त्रास झाल्यानें त्यानें कुळकर्ण्याचा खून करून, तो पुणें जिल्ह्यांतील पुरंदर तालुक्यापैकीं खानवडी या गांवीं येऊन राहिला. त्याचा मुलगा शेटिबा हा पुढें पुण्यास आला. त्याच्या तिघां मुलांनीं माळ्याचा धंदा केला. पेशवे सरकारांत फुले यांच्या घरचा फुलांचा पुडा नित्य जाऊं लागला. यामुळें, या कुटुंबाचें आडनांव मूळचें गोऱ्हे असें होतें तें जाऊन पुढें फुले असें पडलें. या तीन मुलांपैकीं गोविंदराव याच्या पोटीं जोतिराव हे १८२७ सालीं जन्मले. त्यांना लहानपणापासून शिकण्याचा नाद असे. शेजारीं राहणाऱ्या एका मुसलमान मुनशीच्या उपदेशा-

वरून व मे. लिजिट साहेबांच्या मदतीनें जोतिराव इंग्रजी शाळेंत जाऊं लागले. पुढें तेव्हांच्या पुण्यांतील प्रमुख ब्राह्मण मंडळीपैकीं सदाशिवराव गोवंडे, सखाराम यशवंत परांजपे वगैरे मंडळीचा त्यांचा स्नेह जमला. जोतिरावांच्या अंगीं लहानपणापासून स्वदेशाभिमानाचें वारें शिरलें होतें; आणि वासुदेव बळवंत फडक्यांप्रमाणें फुलेहि फडके यांचे गुरु लहुजीबुवा यांच्या हाताखालीं गोळिबार दाण्डपट्टा वगैरे गोष्टी शिकले. 'गुलामगिरी' नामक पुस्तकांत जोतिराव यानीं असें लिहिलें आहे कीं, या विद्या इंग्रज सरकारला पालथें घालण्याच्या उद्देशानें मीं शिकलों व या कामीं मला 'सुधारल्या भट विद्वाना'पासून स्फूर्ति मिळाली होती. पण पुढें ही गोष्ट आपण बरोबर केली नाहीं असें त्यांस वाटूं लागलें होतें. आणि पुढें तर त्यांनीं ब्राह्मणशातीचा मोड करण्याकरितां सत्यसमाज नामक पंथाचीच स्थापना केली.

वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत ते इंग्रजी, मराठी व गणित हे विषय चांगले शिकले, व अभ्यासाच्या हौसेमुळें ते आजन्म विद्यार्थीच राहिले. १८४८ सालीं बुधवार पेठेंतील भिड्यांच्या वाड्यांत त्यांनीं मराठे लोकांकरितां मराठी शाळा घातली. आपल्या पत्नीस त्यांनीं स्वतः मराठी शिकविलें होतें, व तिला याच शाळेंत त्यांनीं शिक्षक म्हणून मदतीस घेतलें होतें. या शाळेंत मुलीही घेतल्या जात. आपल्या सुनेनें शाळेंत शिक्षकिणीचें काम करणें ही गोष्ट जोतिरावांच्या वडिलांना आवडली नाहीं, व बापाकडून मुलाला या कामीं बराच त्रासहि झाला. लवकरच सरकारी मुलींची शाळा निघाल्यावर जोतिरावांनीं ही शाळा बंद केली. तसेंच नानाच्या पेठेंतील अस्पृश्यांकरितां एक शाळा त्यांनीं काढून कांहीं दिवस चालविली, व नंतर ती म्युनिसिपल कमिटीचे ताब्यांत दिली. पंढरपूरच्या अनाथ मुलांच्या गृहाप्रमाणें त्यांनीं पुण्यास एक गृह काढून, पोरक्या मुलांकरितां केलेल्या या सोयीच्या जाहिरातीहि लाविल्या. त्या अर्थातच लोकांना आवडल्या नाहींत. स. १८५२ सालीं विश्रामबागेच्या वाड्यांत दरबार भरवून स्त्रीशिक्षणप्रसाराच्या कामगिरीबद्दल बहुमानार्थ म्हणून २०० रु. किंमतीची एक शाल सरकारानें त्यांना दिली. साहेब लोकांपैकीं सर आर्स्किन पेरी व कर्नल मेडोज टेलर व पुढें गोपाळराव देशमूख, रा. ब. मदन श्रीकृष्ण, तुकारामतात्या, नारायणराव परमानंद वगैरे लोक जोतिरावांना चाहत असत. मिशनरी लोकानींहि त्यांना आपली गुणज्ञता दर्शवून आपल्या ताब्यांतील मुलींच्या शिक्षणाचें काम त्यांच्याकडे सोपविलें.

१८७३ सालीं सप्टेंबरच्या २४ व्या तारखेस त्यांनीं 'सत्यशोधक' समाजाची स्थापना केली. या समाजाचे हेतु प्रसिद्धच आहेत. ब्राह्मणेतर लोक शिक्षणाच्या मार्गास लागावे, त्यानीं ब्राह्मणांची गुलामगिरी टाकून द्यावी, हा तर या समाजाचा मुख्य हेतु होताच; पण ब्राह्मणेतर समाजानें सामाजिक सुधारणा करावी, मद्यपानासारख्या व्यसनापासून निवृत्त व्हावें वगैरे गोष्टींचाहि उपदेश ते या समाजाच्या द्वारें करीत. "मी कोणत्याहि जातीच्या घरीं अन्नग्रहण करीन" असें स्वतःविषयीं

त्यांनीं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलें होतें. 'जातिभेद विवेकसार'नांवाचा जातिभेद —खंडनपर ग्रंथ मुंबईचे तुकाराम तात्या पडवळ यांनीं लिहिला, तो छापविण्याची कोणाची हिंमत होईना म्हणून जोतिरावांनीं पुढें होऊन तो छापला असें म्हणतात. 'गुलामगिरी' 'आसूड,' 'सत्सागर,' 'इषारा,' 'ब्राह्मणांचें कसब' 'सार्वजनिक सत्यधर्म' वगैरे पुस्तकें त्यांनीं स्वजातिकरितां लिहिलीं. या पुस्तकांची भाषा व त्यांतील विवेचनपद्धति दोन्ही निर्दोष किंवा सुसंस्कृत नव्हतीं; पण ब्राह्मणेतर समाजाचें हृद्गत प्रगट करणारीं पुस्तकें या नात्यानें त्यांना विशेष महत्त्व आहे. जोतिरावांच्या स्फूर्तीनें व शिकवणीनें ब्राह्मणेतर समाजांत सत्यशोधक समाजाचीं मतें प्रसृत करणारी बरीच मंडळी निर्माण झाली. त्यांत धोंडिराम नामदेव, कृष्णराव भालेकर, गणपत सखाराम पाटील, नारायण मेघाजी लोखंडे, डॉ. संतूजी रामजी लाड, गणपतराव मल्हार बोकड, भाऊ कोंडाजी पाटील, माधवराव घाटवळ, दर्याजीराव थोरात, भाऊ पाटील वगैरे मंडळी सामान्यतः प्रसिद्ध आहेत.

सत्यशोधक समाजाची स्थापना झाल्यानंतर ब्राह्मणेतर पक्षाचें वर्तमानपत्र हवेंसें वाटूं लागलें, तेव्हां जोतिराव यांच्या कामाठी येथील मंडळीनें जोतिरावांना १२०० रुपयांचा एक छापखाना घेऊन दिला. पण जोतिरावांच्या हातून वर्तमानपत्र न निघाल्याकारणानें कृष्णाजी पांडुरंग भालेकर यांनीं स्वतःच्या पैशानें छापखाना विकत घेऊन १८७७ च्या जानेवारीपासून 'दीनबंधु' नांवाचें साप्ताहिक वर्तमानपत्र सुरू केलें. पण पैशाची कमतरता व सहकारी लेखकांची कमतरता असल्यामुळें १८७९ सालीं तें पत्र त्यांना लोकांचे स्वाधीन करावें लागलें. पुढें तें रामजी संतुजी आवटे, नारायण मेघाजी लोखंडे, दामोदर सावळाराम यंदे वगैरे मंडळीनें चालविलें. सदर पत्राचा या पुढील इतिहास येथें सविस्तर देण्याचें कारण नाहीं. येथें इतकेंच दर्शविण्याचा आमचा हेतु आहे कीं, ब्राह्मणेतर समाजामध्यें न्यू इंग्लिश स्कूलच्या स्थापनेपूर्वीच सार्वजनिक चळवळ सुरू झाली होती, व या समाजाचें एक चांगलें पत्रहि केसरीच्यापूर्वीं तीन वर्षें जन्मास आलें होतें! तथापि टिळक आगरकर वगैरे मंडळी विद्वान असून त्यांनीं केलेला स्वार्थत्याग त्या काळच्या ब्राह्मणेतर मंडळीसहि पटला होता ही गोष्ट निराळी. टिळक आगरकर तुरुंगातून सुटून आले त्या वेळीं त्यांच्या सत्कारांत हे ब्राह्मणेतर पुढारी सामील होते, व जोतिराव फुले यांनीं कोल्हापूर प्रकरणांत रामशेट उरवणे यांजकडून टिळकांच्या जामिनकीबद्दल दहा हजार रुपयांची जबाबदारी घेवविली असें म्हणतात. रायगडावरील शिवाजीमहाराजांच्या मोडकळीस आलेल्या समाधीची हकीकत दीनबंधु पत्रांत प्रथम प्रसिद्ध झाली होती, व पुण्यास चाफळकर स्वामींच्या अध्यक्षतेखालीं शिवाजीस्मारकासंबंधानें सभा भरली त्याला जोतिराव हजर होते. जोतिराव फुले हे ता. २७ नव्हेंबर १८९० रोजीं वारले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं निबंधमा-

लेंत जोतिराव फुले यांच्या ग्रंथावर जी कडक टीका केली आहे त्यांतील कांहीं भाग केवळ प्रतिक्रियारूप पण कांहीं खरोखर समर्थनीय असाहि आहे. तथापि, टिळकांच्या पूर्वी महाराष्ट्राची स्थिति कशी काय होती याचें सामान्य निरीक्षण करितांना, ब्राह्मणेतरांची चळवळ टिळक सार्वजनिक कार्यांत पडूं लागण्यापूर्वीची आहे, आणि स्वतः जोतिराव हे विशेष विद्वान् नसले तरी, आपल्या सार्वजनिक हितबुद्धीच्या कळकळीमुळें—विशेषतः शिक्षणविषयक प्रयत्नामुळें—सहजच प्रसिद्धीस आले होते हीच गोष्ट मुख्यतः आम्हांस येथें दर्शवावयाची आहे.

शिक्षणाप्रमाणें वाङ्मयाची वाढहि अर्थात् बेताचीच होती. त्या सालच्या सरकारी रिपोर्टांत एकंदर मुंबई इलाख्यांत छापखान्यांची व ग्रंथादिकांची संख्या खालील-प्रमाणें आढळतेः—छापखाने मुंबईत ४८, महाराष्ट्रांत २३, गुजराथेंत १५. पुस्तकें मुंबई ५३१, महाराष्ट्र ४६५, गुजराथ ९४. भाषेच्या दृष्टीनें १०७ इंग्रजी, २०८ मराठी, २०५ गुजराथी अशी वर्गवारी होते. मासिक वगैरे पुस्तकें १५१. एकंदर वर्तमानपत्रें ८३ पैकीं दोन इंग्रजी, दहा आंग्लोमराठी. देशी भाषेंतील वर्तमनापत्रें ७१. देशी भाषेंतील वर्तमानपत्रांपैकीं ३४ मराठी, ३१ गुजराथी. एकंदर पुस्तकसंग्रहालयांची संख्या ८७ होती. शिळा छापखाने सुमारें पंचवीस होते. वर्तमान पत्रांत अधिक खप एका गुजराथी वर्तमानपत्राचा होत असून त्याच्या जास्तींत जास्त १६५० प्रति निघत. हजार प्रतींवर खपणारीं वर्तमानपत्रें ६ व पांचशें प्रतीवर खपणारीं वर्तमानपत्रें १४ होतीं. त्यावेळच्या वर्तमानपत्रांपैकीं कांहीं नांवें, लोकांच्या अद्यापि लक्षांत असून कांहीं तर अद्यापिहि चालू आहेत. ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, सुबोधपत्रिका, ज्ञानोदय, वर्तमानदीपिका, शुभसूचक, पूर्णचंद्रोदय, वैष्णव-पंच, धूमकेतु, जगन्मित्र ( रत्नागिरी ), बेळगांवसमाचार वृत्तवैभव नेटिवओपीनियन, नागपूर क्रॉनिकल, सिंधियन, प्रभाकर, दर्पण इ०

महाराष्ट्रांत मुद्रणकलेचा जन्म १८२२ पर्यंत झाला नसला तरी महाराष्ट्रांतील पहिला छापखानेवाला पेशवाई बुडण्याचे आधीं १८ वर्षें जन्मास आला होता. हे मुद्रक म्हणजे गणपत कृष्णाजी हे होत. त्यांच्या हयातींत व नंतर छापखाने पुष्कळच निघाले; परंतु त्यांनीं केलेल्या कायम ठशांच्या स्वतंत्र वळणांच्या योगानें त्यांचें नांव अद्याप लोकांच्या तोंडीं आहे. हें वळण डौलदार असून तें गणपत कृष्णाजींचें स्मारकच होय. हे भंडारी जातीचे गृहस्थ टॉमस ग्रॅहॅम नामक एका मिशनरी गृहस्थाच्या छापखान्यांत नोकर होते. स्वतंत्र झाल्यावर एक लांकडी यंत्र व शिळांचे तुकडे जुळवून आणि शाईहि करून त्यांनीं शिळा छापखान्यास प्रारंभ केला, व सन १८३१ सालीं पाहिलें छापील पंचांग काढलें! अपूर्वाईमुळें तें तेव्हां आठ आण्यांस विकत असे! १८३६ सालीं दादोबा पांडुरंग यांनीं आपलें व्याकरण गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत छापलें. पुढें सात वर्षांनीं त्यांनीं टाईपांचा कारखाना व छापखाना सुरू केला. मूळ विशेष शिक्षण नसतां स्वावलंबन व महत्त्वाकांक्षा

या दोन गुणांनीं त्यांनीं आपलें नांव केलें. त्यांना महाराष्ट्रांतील ' क्याक्स्टन ' म्हणण्यास हरकत नाहीं. गणपत कृष्णाजी यांच्या मरणानंतर रावसाहेब मंडलीक हे त्यांच्या छापखान्याचे कांहीं दिवस ट्रस्टी होते; व पुढें पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांनीं सन १९०० पर्यंत त्याची व्यवस्था पाहिली. अखेर १९१४ सालीं कांहीं बेकायदेशीर पुस्तकें त्यांत निघाल्यामुळें तो छापखाना सरकारजमा झाला ! तथापि त्याच्या जुन्या अमदानींत निघालेले शेंकडों ग्रंथ, विशेषतः धर्मविषयक ग्रंथ, हे त्या छापखान्याचें नांव, मराठी ग्रंथसंग्रहालयें आहेत तोंपर्यंत, खास चालवितील.

ज्ञानप्रकाश हें पत्र पुण्यास १८४९ च्या फेब्रुवारी महिन्यांत सुरू झालें. तें कृष्णाजी त्र्यंबक रानडे नांवाचे गृहस्थाकडून शुक्रवार पेठेंतील बारामतीकरांचे, म्हणजे हल्लींच्या दाते यांचे वाड्यांत ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापलें जात असे. तें दर सोमवारीं प्रसिद्ध होई. त्याचा आकार प्रथम सुमारें १०×८ इंच इतका असून त्याचीं आठ पृष्ठें असत. तें शिळा छापावर छापलें जात असे. अशा पत्राची वार्षिक वर्गणी तेव्हां दहा रुपये होती ! पत्राच्या प्रति थोड्या खपणार म्हणून किंमत जास्ती ठेऊन जमाखर्चाचीं तोंडें मिळवावीं असा पत्रकर्त्यांचा हेतु असावा. पुढें सुमारें १५ वर्षांनीं हें पत्र खिळा छापावर निघूं लागलें व वर्गणीहि कमी झाली. ज्ञानप्रकाशाच्या पुढील इतिहासांत त्याचीं अनेक रूपांतरें झालीं. प्रथम निवळ मराठी, नंतर इंग्रजी-मराठी, कांहीं दिवस आठवड्यांतून दोनदां व पुढें दैनिक असे त्याच्या स्वरूपांत फेरबदल झालेले प्रसिद्ध आहेत. या पत्राला वेळोवेळीं पुण्यांत असलेली अनेक प्रतिष्ठित मंडळी संपादक म्हणून लाभली. केसरी निघण्या-पूर्वीच्या काळांत कृष्णशास्त्री चिपळूणकर, बाबा गोखले वगैरे गृहस्थ ज्ञानप्रकाश चालवीत असत. महादेव गोविंद रानडे हेहि ज्ञानप्रकाशांत केव्हां केव्हां इंग्रजी लेख देत असें म्हणतात.

ज्ञानप्रकाशाच्या इंग्रजी व मराठी लेखांत समतोलपणा नसे. इंग्रजी लेख जाड्या विद्वानांनीं लिहिलेले, मराठी संपादकीय लेख मध्यम सुशिक्षितानें लिहि-लेले, आणि अवांतर मजकूर—मुख्यतः पत्रव्यवहार—हा अगदीं सामान्य माणसांनीं लिहिलेला असे. यामुळें कोणच्या तोलाच्या बातम्या किंवा कविता छापाव्या याला कांहींच प्रमाण नसे. उदाहरणार्थ ता. १७ आक्टोबर १८६१ सालच्या ज्ञान-प्रकाशांतील उतारा पहाः—

" आपल्या सुंदर पत्रांत छापण्याकरितां कांहीं कविता पाठविली आहे. त्यास आपण कृपा करुन जागा देतील अशी ( ! ) आहे.

श्लोक ( चाल वामनी )

हवा थंड आहे तया बेळगांवीं
वळें बहु त्यां बळें बाळगावीं ।

आळस करितां बहुदुःख वाटे
शरीर सुद्धां फुटती खवाटे ॥

**आर्या.**

माढे ग्रामीं मुनसफ, नाम विनायक पिताचि आपाजी ।
यातें जो निंदितसे तो नर जाणा खराचि हो पाजी ॥ इत्यादि ”

या सारख्या किंवा याहून हास्यास्पद अशा अनेक कविता त्या वेळच्या वर्तमानपत्रांत संपादकाच्या मंजुरीनें छापलेल्या सांपडतात. पण तसले अधिक मासले देऊन जागा अडविण्यांत अर्थ नाहीं. . . .

पुण्यांतील ज्ञानप्रकाशाप्रमाणेंच मुंबईतील ‘इंदुप्रकाश’ वर्तमानपत्र जुनें असून त्या काळीं बरेच प्रसिद्ध होतें. हें १८६४ सालीं रा. विष्णू परशुराम पंडित यांनीं सुरू केलें. यांचा जन्म १८२७ सालीं सातारा येथें झाला. तेथेंच त्यांनीं राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर यांच्यापाशीं संस्कृत अध्ययन केलें व पुढें इंग्रजीचा अभ्यास करण्यास ते पुण्यांस आले. १८५५ सालीं त्यांनीं शाळाखात्यांत नोकरी पत्करून धारवाड, मालेगांव वगैरे ठिकाणीं शिक्षकाचें काम केलें. १८६४ सालीं त्यांनीं नोकरीचा राजीनामा देऊन इंदुप्रकाश काढला. पुनर्विवाहोत्तेजक मंडळी स्थापण्यांत हेच प्रमुख होते. १८७० सालीं श्री शंकराचार्यांच्या समोर पुनर्विवाहासंबंधानें वादविवादसभा झाली ती घडवून आणण्यांत मुख्यतः यांचाच हात होता. १८७४ सालीं त्यांनीं स्वतः पुनर्विवाह केला पण पुढें दोनच वर्षांत म्हणजे १८७६ सालीं ते मृत्युवश झाले.

१८७२ च्या मार्च महिन्यांत एका “ वर्तमानपत्रें वाचणाऱ्या”नें ज्ञानप्रकाशांत एक सविस्तर पत्र दिलें आहे. त्यावरून तत्कालीन मराठी वर्तमानपत्रांची स्थिति लक्षांत येते. तो लिहितोः—“मराठी मजकुरासंबंधानें मुंबईत इंदुप्रकाशाचा नंबर पहिला येतो. त्याची भाषा पोक्त, संभावीत असते. त्यांत राजकीय विषयाची भरती पण अवांतर लोकोपयोगी विषय नसतात. लेख लांब व कंटाळवाणे. एकंदरीनें मतें चांगलीं. पत्रव्यवहार पुष्कळ असतो. पण जिल्ह्यानिहाय बातमीदार नसत. बातमी प्रायः इंग्रजी पत्रावरून घेतलेली. ‘ नेटिव्ह ओपिनियन ’ पत्रांतील इंग्रजी लेख कडक व निःपक्षपाती, पण हेळसांडीमुळें पत्राचें महत्त्व कमी झालें. त्यांतील मराठी भाग पहिल्यापासूनच सामान्य. भाषा साधारण. ‘हिंदु रिफॉरर्मर’ हें नांव इंग्रजी पण इंग्रजी मजकूर थोडा व त्रुटित. चुका वगैरे फार. मराठी मजकूर बरा पण तब्बेती कारखाना. क्वचित् मोरकटपणाहि असतो. मुंबईतील इतर वर्तमानपत्रें रद्दी. ‘ज्ञानोदय’ पत्रांत वर्तमानसार बरें, पण लेख केवळ धार्मिक. ‘स्वदेशहितेच्छू’ नामक नवें पत्र निघें. होतकरू वाटतें. किंमतहि दीड रुपया. पण अद्यापि लोकांत बस बसलेला नाहीं. पुण्यांतील पत्रांपैकीं ज्ञानप्रकाश उत्तम; पण इंदुप्रकाशाइतकी लोकांत मान्यता नाहीं. त्यांत संस्कृत

शब्द किंवा भाषेचा नटवेपणा नाहीं. कधीं फार कडक तर कधीं पोरकट असे लेख येतात. पत्रव्यवहारांत थट्टा व कुचेष्टा विशेष. वर्तमानसार ठीक नसतें. इंग्रजी लेख भाषेच्या दृष्टीनें चांगले, पण नियमित शिस्तवार नसतात. 'ज्ञानचक्षू'नें इंग्रजी मजकूर घालून सुधारणा केली होती. किंमतहि कमी. पण रंग टिकाऊ नाहीं असें म्हणतात. कोंकणांतील 'अरुणोदय,' 'जगन्मित्र' हीं पत्रें बरीं. 'सूर्योदयां'तील लेख विशेष चांगले. अरुणोदयाची व्यवस्था चांगली. सूर्योदयानें इंग्रजी टाकून निवळ मराठी घेतलें. बाहेरगांवीं 'बेळगांव समाचार' व 'महाराष्ट्रमित्र' हीं कांहीं बरीं. शेतकरी वगैरे वर्गांना उपयुक्त अशी माहिती सर्वत्रच कमी." शेवटीं गांवोगाव लायब्ररया स्थापन होऊन वर्तमानपत्रें वाचून दाखवावीं अशी सूचना या गृहस्थानें आपल्या पत्रांत केली आहे. विश्रामबागेंतील शास्त्री मंडळींनीं एक वर्तमानपत्र चालविण्याचें योजलें होतें. पण शास्त्रीपंडित आणि वर्तमानपत्रें या दोन गोष्टी परस्परविरोधी असें ठरवून ज्ञानप्रकाशानें या कल्पनेची थट्टा केली होती व तें पत्र पुढें निघालेंहि नाहीं. वर्तमानपत्रांची संख्या कमी असण्याला शिक्षणाचा प्रसार कमी हें तर एक कारण होतेंच; पण हल्लीं ज्या वर्तमानपत्रांना १ पैसा टपाल हंशील पडतें त्याला तेव्हां १ आणा हंशील पडे. १८७१ च्या फेब्रुवारीत हें हंशील १ आण्यापासून अर्ध्या आण्यावर उतरविण्यांत आलें.

नव्या शिक्षणामुळें महाराष्ट्रांतील रीतरिवाज सहजच पण नकळत बदलत होते. ता. १८ सप्टेंबर १८७१ च्या ज्ञानप्रकाशांत एका गृहस्थानें खालीलप्रमाणें पन्नास वर्षांत पुण्यांतील रीतरिवाजांत पडलेल्या फरकाचें वर्णन केलें आहे. "धर्मश्रद्धेस पंख फुटून उडूं लागली आहे. आंगरखे जाऊन अबडू, पाटलोणी, कोट निघाले. इष्टकन्या बुटें पायांत चढविल्यावांचून आतां मनुष्य शोभतच नाहीं. जुनीं पागोटीं जाऊन गोंडेदार लोकरीच्या खलाशी टोप्या घातलेले लोक चहूंकडे दिसतात. पूर्वीं क्वचित् थंडीच्या दिवसांत कोणी डोईस रुमाल बांधीत. आतां कंफर्टर बांधूं लागले आहेत. बनातीच्या मगजीच्या गोंडे लावलेल्या बंड्या जाऊन शर्टें निघालीं. मखमली किनखापी खोगिरें रद्द होऊन ढुंगणापुरतें कातडें तट्टावर घालून कित्येक लोक बसतात. पूर्वीं उन्हाळ्यांत पाण्यांत वाळा घालून गार करून पीत. आतां सोडावाटर लेमनेटच्या बुचांचे फटफट आवाज जिकडे तिकडे ऐकूं येतात. काठीचें टिकोरें हातीं घेतल्याशिवाय आतां कोणी बाहेर पडत नाहीं. पूर्वीं शंकराचार्य एकच होते, आतां घरोघर झाले आहेत! पूर्वीं देवडीवर पहाऱ्याला माणसें ठेवीत, हल्लीं बांड्या शेपटींचीं कुत्रींच कोठें कोठें आढळतात! हल्लीं कलाल श्रीमंत होत चालले आहेत. धर्मपंथहि निराळे स्थापन होत आहेत" इत्यादि.

१८६६ पर्यंत दळणवळणाच्या सोयी हल्लींच्या मानानें फार कमी होत्या. विलायतेचें टपाल जाण्यायेण्यास एक महिना लागे. विलायतेस जाणाऱ्या हिंदी लोकांची संख्या फारच कमी होती. १८६८ सालीं सिव्हिल सर्व्हिस परीक्षेस

महाराष्ट्रांतील पहिला विद्यार्थी गेला. त्याचें नांव श्रीपाद बाबाजी ठाकूर. यापूर्वी मुंबईहून कांहीं व्यापारी मात्र विलायतेस जात असत. श्रीपाद बाबाजींच्या पूर्वी १८६४ सालीं फेरोजशहा मेथा बॅरिष्टरीकरितां विलायतेस गेले. दादाभाई अर्थात् त्यापूर्वींच गेले होते. त्या वेळीं विलायतेंतील हिंदी विद्यार्थी हाताच्या बोटावर मोजण्याइतके असत. माधवराव रानडे ब्राह्मण नसते तर कदाचित् फेरोजशहा यांच्या आधींच विलायतेस जावयाचे, पण विलायतेस गेल्यानें ब्राह्मणज्ञाती-कडून पडणाऱ्या बहिष्कारास तेव्हांचे महाराष्ट्रीय ब्राह्मण फार भीत. १८७२ सालीं विलायतेस पार्लमेंटरी कमेटी नेमली जाऊन हिंदुस्थानच्या जमाखर्चाची चौकशी व्हावयाची होती तिजपुढें सार्वजनिक सभेनें साक्ष देण्याकरितां महाराष्ट्रीय प्रतिनिधी पाठविण्याची योजनाहि केली होती. परंतु प्रायश्चित्ताच्या अडचणीमुळें विलायतेस जाण्यास कोणी तयार होईना. परदेशगमननिषेधाचे वाद तेव्हां जोरांत चालू होते. पण अशाही वेळीं विलायतेस पैसे मिळविण्याकरितां जाण्याची कल्पना मनांत येणारा एक तरी महाराष्ट्रीय होता हें पाहून समाधान वाटतें. १८७१ च्या ज्ञानप्रकाशांत एकानें पत्र पाठवून संपादकास विचारलें आहे कीं, विलाय-तेंत मराठी शाळा घालून पैसे मिळवितां येतील कीं नाहीं? त्या वेळीं ही कल्पना अर्थात् अशक्यप्राय होती. हल्लीं कान्हेरेशास्त्री यांनीं इकडील तत्वज्ञानाबरोबर थोडेसें मराठी शिकवून खुद्द लंडनमध्यें पोट भरतां येतें हें सिद्ध केलें आहे. असो, याच सुमारास विलायतेंत हिंदूंचें देवालय बांधण्याची कल्पना निघाली होती, व तिला उद्दे-शून ज्ञानप्रकाशकारांनीं 'ईश्वर-पार्वती विलायतेस जाणार' असें विनोदानें वर्णन केलें होतें. पण जसा तेव्हांचा हिंदु समाज तसा त्यांचा देव, दोघेहि परदेशगमनाला भिणारे! याचा परिणाम आज असा दिसून येतो कीं लंडन येथें हिंदूंचें देवालय बांधण्याची कल्पना अजून कल्पनेंतच आहे, पण सर्वत्र खुशाल संचार करणाऱ्या मुसलमानांची मशीद विलायतेंत 'वोकिंग' येथें कधींच बांधली जाऊन तेथें मुल्ला-मौलवींची वस्ती कायमची झाली आहे. विलायतेस जाण्याच्या सोयी, व काळें पाणी वलांडून जाण्याची ब्राह्मण समाजाची अनुज्ञा, यांचा सकृद्दर्शनीं प्रत्यक्ष संबंध फारसा नाहीं. पण प्रवासाच्या सोयी जसजशा वाढतात तसतसा मनुष्य त्यांचा फायदा घेऊन अधिकाधिक प्रवास करूं लागतो, व ज्या मानानें प्रवास करण्याची बुद्धि व क्रिया फैलावते त्या मानानें प्रवासविषयक धार्मिक बंधनेंहि-आपोआप शिथिल होतात. असो. मुंबईहून कोंकणाकडे १८६१ च्या सुमा-रास आगबोटी सुरू झाल्या, तथापि आठवड्यांतून एखादीच बोट जात येत अस-ल्यामुळें कोंकणपट्टीचा प्रवास मचव्यांतूनहि करावा लागे. व कोंकणाकिनाऱ्याची सडक अद्याप व्हावयाची होती यामुळें रहदारी बेताचीच असे. पुण्यामुंबईच्या दरम्यान आगगाडीचें दळणवळण बरेंच सुरू झालें होतें; व त्याबरोबरच पुण्या-हून बाहेरगांवच्या चौफेर सडका करण्याचें काम सुरू झालें होतें. १८६५

सालीं कात्रजचा घाट व त्यांतील बोगदा तयार होऊन सातारा–बेळगांव–बंगलोर हा रस्ता वाहूं लागला. टपालची ने–आण बहुतेक भागांत घुंगुरवाल्या शिपायांकडूनच होत असे. पुणें कोल्हापूरच्या दरम्यान मात्र टपालचे टांगे सुरू झालें होते. १८६५ सालीं पुणें शहर व लष्कर मिळून अवघें एकच पोष्ट ऑफिस होतें, व सर्व पुणें शहरांत मिळून टपालाची जी एकच पेटी होती ती बुधवाऱ्या वाड्यांत असे. वर्तमानपत्रांतून त्यावेळीं एक मोठी तक्रार म्हणजे शहरांत निरनिराळ्या ठिकाणीं पत्रें टाकण्यास खांब उभे करावे ही होती!

टिळक कॉलेजांतून बाहेर पडण्याच्या वेळीं महाराष्ट्रांत भयंकर दुष्काळ पडला होता. धारण खरोखरच पांच शेरांहूनहि खालीं गेली होती. दुष्काळनिवारण कसें करावें याची सरकारासहि मोठीच काळजी पडली होती, व तें काम त्यांचे हातून समर्पक रीतीनें पार पडणें शक्य नसल्यामुळें दुष्काळी मृत्युसंख्या भयंकर वाढली होती. पण या नैमित्तिक आपत्तीपेक्षांहि महाराष्ट्राची खरी नित्याची आपत्ति हीच अधिक भयंकर होती, व ही आपत्ति म्हणजे महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा. ही स्थिति येण्याला वास्तविक एकच कारण होतें असें नाहीं. मूळ महाराष्ट्रांतील खडकाळ जमिनीचा नापीकपणा, पावसाची टंचाई, तळीं व कालवे यांचा अभाव, गवतचाऱ्याची कमतरता, गुरांची गैरसोय वगैरेमुळें शेतकरी व कुणबी यांचा निर्वाह नुसत्या जिराईत जमिनींत येणाऱ्या व अर्धवट पोसलेल्या पिकाच्या उत्पन्नाच्या आधारावर कसा तरी रडुखुडू चालतो. कुणब्याच्या घरचें मूळचें भांडवल नाहीं. जुन्या काळीं लष्करी पेशा सर्व गांवांतून थोडाबहुत पसरल्यानें महाराष्ट्रांतील रोडक्या संपत्तींचें का होईना पण अभिसरण वाहत्या झऱ्यासारखें जिवंत होतें. पण इंग्रजी राज्य झाल्यापासून, जमिनींत कमरेइतक्या पुरलेल्या माणसाप्रमाणें, किंवा दावें लावून गोठ्यांत बांधलेल्या जनावराप्रमाणें, खालच्या वर्गाची स्थिति झाली. सालअखेर जमाखर्चाची तोंडमिळवणी झाली नाहीं कीं सावकाराचें घर पहावें लागे; आणि त्या घरांत कुणब्याचा एकदां पाय पडला कीं, कोळी हा माशीभोंवतीं आपल्या तंतुपाशाचें जाळें झराझर पसरून तिला सजीव मृत्यूचा अनुभव आणून देतो, तीच गत महाराष्ट्रांतील सावकारी कुळाचीहि होई.

हे सावकार एकाच जातीचे होते असें नाहीं. मारवाडी, गुजर, मराठा, वाणी, ब्राह्मण, कोणीहि असो, सावकारी व्यवहाराची पद्धतच अशी कांहीं पडून गेली होती कीं, चरकांत सांपडलेल्या जनावराप्रमाणें शेपटीपासून सुरुवात होऊन अखेर शिंगें मोडून कुळानें बाहेर पडावें. कुळाचें अज्ञान व कपटी सावकाराचा द्रव्यलोभीपणा याला कायद्याची मदत सरळ होत असे. आपण हातांत कर्जाचे रुपये मोजून घेतों तेवढे कुळास खरे माहीत. मग कर्जरोख्यांत नक्की कोणते शब्द घातले, त्याला कोणची किती जमीन तारण किंवा गहाण लावून दिली, व्याज मुदलाचा हिशेब कसा मांडला गेला, नांवें लिहिलेली रकम कशी फुगत गेली, पावत्यांतून कप-

टाचे शब्द कसे पडत गेले, कोर्टांत वकीलानें काय सांगितलें, मुनसफानें न्याय कसा दिला या गोष्टींचें सविकल्पक ज्ञान त्याला केव्हांच होत नसे. शेवटीं हुकुमनामा होऊन, जमीन व घरदार लिलावाला निघून, उंबरठा किंवा शेताची हद्द ओलांडून बाहेर पाऊल टाकावें लागलें म्हणजे एकंदर प्रकाराची स्थूल कल्पना येऊन त्याचे डोळ्यांपुढें काजवे खेळूं लागत. असल्या अनुभवानें गरीब सात्विक मनुष्याला देखील प्रतिकारबुद्धि सुचूं लागते. मग तामसी मनुष्य सूड घेण्याला प्रवृत्त होईल यांत काय नवल! गांवोगांव अशी स्थिति झाल्यानें सावकारांविरुद्ध कट होऊं लागले, त्यांजवर बहिष्कार पडूं लागले, व शेवटीं दरोडे घालून त्यांचीं नाकें कापणें व खून करणें यापर्यंत पाळी आली. पुढें सावांत चोर मिसळले जाऊन खरें गाऱ्हाणें बाजूस रहावें, आणि भलत्या रीतीनें भलत्यावरच घाला पडावा असेंहि होऊं लागलें. सावकार म्हटला म्हणजे त्याचें घर केव्हां लुटलें किंवा जाळलें जाईल याचा नियम नाहींसा झाला. गांजलेल्या कुळांच्या टोळीनें सावकाराच्या घरीं शिरून, आपले सर्व कर्जरोखे परत मागून घेऊन, आपल्याच हातानें फाडून टाकावे, किंवा ते न मिळतील तर त्याचे सर्व कागदपत्र व जमाखर्चाच्या वह्या बाहेर काढून रस्त्यावर जाळाव्या असें होई. अत्याचारी नसलेलीं कुळेंहि स्वस्थ बसलीं होतीं असें मात्र नाहीं. त्यांनीं कित्येक गांवांतून बहिष्काराची चळवळ सुरू केली होती, आणि सावकाराचें काम काज करणाऱ्या महाराचेंहि बलुतें छाटून टाकलें होतें. सावकाराची जमीन कोणी करूं नये व केली तरी त्याला खंड घालूं नये अशी चळवळ सुरू होती; मात्र ही चळवळीची लाट नुसत्या महाराष्ट्रावरच पसरलेली नसून गुजराथेंतहि तिचा थोडाबहुत प्रसार झाला होता. कारण गुजराथेंतले सावकार झाले तरी ते महाराष्ट्रीय सावकारांचेच बंधू. यामुळें गुजराथेंतहि थोडीबहुत गडबड झाली. परंतु दंग्यांचें खरें पीक पुणें व नगर जिल्ह्यांतच आलें. अखेर शेतकऱ्यांचें ऋणविमोचन करण्याबद्दल कमीशन बसवून कायदा झाला तोहि महाराष्ट्रापुरताच झाला. टिळक कॉलेजांत असतांना या दंग्याधोप्यांच्या बातम्या त्यांना वर्तमानपत्रांतून वाचावयास व कर्णोपकर्णीं ऐकावयास मिळत. या दंग्याधोप्यांकरितां कमींत कमी हजार लोक तरी पकडले गेले असावे, व निदान पांचशें लोकांवर तरी लहानमोठ्या दंग्यांची शाबिती झाली असावी. १८७६ च्या दुष्काळांत रा. ब. रानडे यांच्या प्रेरणेनें पुणें सार्वजनिक सभेनें जी चळवळ केली तिचाहि परिणाम विद्यार्थिदशेंत टिळकांच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं; व पुढें सार्वजनिक सभा हातीं आल्यावर स्वतः टिळकांनीं सरकारच्या दुष्काळव्यवस्थेबद्दल व शेतसाऱ्याच्या जुलमाबद्दल जी चळवळ केली तिचें मूळ वीस वर्षांपूर्वींच्या या आठवणींतच असलें पाहिजे असें आम्हांस वाटतें.

वरिष्ठ दर्जाचे राजकारणाच्या दृष्टीनें पाहतां हिंदुस्थानच्या डोक्यावर पार्लमेंटच्या कायद्यानें दास्यत्त्वाचा शिक्का अद्यापि पडावयाचा होता. पुढें चार वर्षांनीं, लॉर्ड-

लिटन यांच्या कारकीर्दींत, व्हिक्टेरिया राणीनें 'हिंदुस्थानची बादशाहीण' असा किताब घेतल्याचें दिल्ली येथील बड्या दरबारांत जाहीर केलें तेव्हां ही गोष्ट घडून आली. तोंपर्यंत इंग्लंड व हिंदुस्थान यांचा संबंध काय आहे याचें कायदे-पंडितांनाहि समर्पक वर्णन थोडक्या शब्दांत देतां आलें असतें कीं नाहीं याची शंकाच वाटते. खरोखर कांहीं म्हणतां आलें असतें तर असेंच म्हणावें लागलें असतें कीं दिल्लीच्या बादशहाकडून मिळविलेल्या मुखत्यारपत्राच्या आधारावर, रावबा-जींनीं दिलेल्या दानपत्राच्या आधारावर, सातारकर महाराजांना राज्यांतून काढून लावून त्यांची जागा बळकाविल्याच्या वहिवाटीच्या आधारावर, तात्पर्य अशा विविध प्रकारच्या अधिकारांच्या डळमळीत आधारावर, राणीसरकारचें राज्य बसलें होतें. कंपनीसरकारच्या जागीं राणीसाहेब आल्या खऱ्या, परंतु जें आडांत असेल त्याहून पोहऱ्यांत अधिक कोठून येईल ? जितका कायदेशीर अधिकार कंपनीला तितकाच राणीसरकाराला. एलिझाबेथ राणीच्या वेळीं ईस्ट इंडिया कंपनी व विलायतसरकार यांच्या दरम्यान सतराव्या शतकांत जो कायदेशीर संबंध जडला त्याचीं पुढें अनेक परिवर्तनें झालीं. त्यांपैकीं १८५८ चा कायदा ही कायमची निर्णा-यक अशी व्यवस्था होती. पण त्या कायद्यानें हिंदुस्थानचे लोक व विलायत-सरकार यांचा खरा संबंध ठरला नाहीं, किंवा व्यक्तहि झाला नाहीं. प्रजेची संमति हाच राजाच्या मालकीचा व भोगवट्याचा मुख्य कागद; व तो कागद हिंदुस्थानची बादशाहीण हा किताब राणीनें घेतल्यानें, व हिंदी प्रजेनें तो घेऊं दिल्यानें, विलायतसरकारच्या पदरांत पडला. पण यापूर्वीं चारदोन वर्षें राणीसाहेबांना बादशाहीण बनण्याचे डोहाळे लागले होते, व ते हिंदुस्थानच्या लोकांकडून कसे काय पुरविले जाणार याची चांचणी घेण्याकरितां त्यांनीं आपला ज्येष्ठ पुत्र एड-वर्ड प्रिन्स ऑफ वेल्स याला हिंदुस्थानांत पाठविलें होतें. त्याचा सत्कार इकडे मनाजोगा झाल्यानें विलायतच्या राजेराण्यांना हिंदुस्थानचे बादशाहा बादशाहिणी बनविण्याची कल्पना मुक्रर ठरून ती पुढें सिद्धीस नेण्यांत आली. उलट पक्षीं हिंदु-स्थानांतील राजेरजवाड्यांवर व तहनाम्यामुळें स्नेहांकित म्हटलेल्या दोस्तांवरहि, इंग्रज सरकारची सत्ता किती चालूं शकते याचा प्रत्यय बडोद्याचे मल्हारराव महा-राज गायकवाड यांच्यावर विषप्रयोगाचा आरोप घालून त्यांना पदच्युत करण्यानें आलाच होता. मुंबई इलाख्याचा सर्व कारभार गव्हर्नर व दोन कौन्सिलर पहात होते. कायदेमंडळांत एकहि सभासद लोकांनीं निवडलेला नसून, सरकारनें नेम-लेल्या सभासदांत ज्यांना इंग्रजीचा गंध नव्हता असेहि कांही काहीं होते.

या जुन्या पिढीच्या काळीं महाराष्ट्रांतील राजकारण अगदीं साधें होतें. खरें स्थानिक स्वराज्य देखील नसल्यामुळें एकादा रस्ता अरुंद किंवा अस्वच्छ असला तरी त्या विषयींची तक्रार हें राजकीय गाऱ्हाणें असेंच समजलें जाई. 'गेलें' या दृष्टीचा स्वराज्य शब्द लोकांना माहीत होता; 'मिळवावयाचें' या दृष्टीचा स्वराज्य शब्द

कोणाच्या तोंडीच काय पण मनांतहि त्या वेळीं येत नव्हता. सर्व राष्ट्राची मिळून राष्ट्रीय सभा जन्मास येऊन सुमारें वीस बावीस वर्षांची होईपर्यंत स्वराज्य हा शब्द तिच्याहि तोंडून कधीं निघाला नाहीं, तर महाराष्ट्रांतील अव्वल पिढीच्या राजकारणांत तरी तो कोठून येणार! राजकीय दृष्ट्या दिवसेंदिवस आपली अवनति होत चालली आहे हें तत्कालीन लोकांना दिसत होतें; पण ती थांबविण्याकरितां लोकांत जी जागृति किंवा संघशक्ति निर्माण व्हावयास पाहिजे होती तिचा नुकता कोठें प्रारंभ होता. इनाम कमीशन, नक्त नेमणुकांची कारवाई, दारूचा प्रसार, जंगलाची वाढ, वगैरे बाबतींत राज्यकारभाराची कदर भासूं लागली होती, व रोकडी हानि अनुभवास येऊं लागली होती. पण व्यक्तिशः अर्ज करण्यापलीकडे राजकीय चळवळ म्हणून कांहीं असते ही कल्पना अद्यापि उदित व्हावयाची होती. साहेब लोक, विशेषतः सोजिर लोक, नेटिव लोकांशीं इतक्या बेगुमानपणें व अपमानास्पद रीतीनें वागूं लागले होते कीं, कर्णोपकर्णी किंवा वर्तमानपत्रांतून आलेल्या दुःखकारक कथा ऐकून लोक मनांत तळमळत. पण त्या तळमळीच्या मानानें कठोर उद्गार प्रचलित वर्तमानपत्रांतूनहि निघत नसत. लोकक्षोभ अवान्वित कोठकोठें होत नसे असें नाहीं. हिंदूंना बाटविण्याच्या कामीं पुष्कळ मिनशऱ्यांनीं लोकांच्या हातचे रट्टे खाल्ले होते. १८७१ सालीं वसई येथें इनकमटॅक्स कलेक्टर हंटर यास पंचवीस असामींनीं धरून बेदम मारलें. बाजारपेठेंत एखाद्या गोऱ्या अधिकाऱ्यावर गर्दी व धक्काबुक्की झाल्याचीं उदाहरणें घडत. १८५७ चें बंड जुनें म्हटलें तरी, कलकत्ता हायकोर्टचे जस्टिस नॉर्मन व गव्हर्नर जनरल लॉर्ड मेयो अशा बड्या गोऱ्या लोकांचे खूनहि झाले. प्रसंगविशेषीं अंगावर हात न पडण्याइतकी कांहीं इंग्रजांची सद्दी किंवा इभ्रत अभेद्य–कवच नाहीं हें लोकांच्या नजरेस येऊं लागलें होतें. पण चौफेर, सार्वजनिक व अखंड अशा प्रकारचीं राजकीय चळवळ अद्यापि सुरू झाली नव्हती.

टिळक सार्वजनिक कार्यांत पडूं लागण्यापूर्वी महाराष्ट्रांतील जुन्या पिढीची स्थिति काय होती याविषयीं स्वतः टिळकांनींच आपलें मत एकदां बोलून दाखविलें होतें. ता. १८ मार्च १९०१ रोजीं विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या पुण्यतिथीनिमित्त टिळकांनीं व्याख्यान दिलें, त्यांत शास्त्रीबोवांच्या व्यक्ति–विषयक कडक टीकेचें समर्थन करितांना या मुद्याचें खालील आशयाचें विवेचन त्यांनीं केलें होतें:—

कोणत्याहि समाजांत पुढारीपण प्राप्त होण्यास केवळ विद्वत्ताच लागते असें नाहीं. पेशवाईनंतर कांहीं दिवस जुन्या खानदानीच्या लोकांना महत्त्व चिकटून राहिलेलें होतें. लोक व सरकार दोघेहि त्यांना मानीत. व नवीन शिक्षणहि तेव्हां वाढलें नव्हतें. अर्थात् अशा वेळीं हे खानदानीचे लोकच पुढारी गणले जात. पण लौकरच ते निरुद्योगी व निरुपद्रवीहि बनले! हळू हळू सरकारहि त्यांना मान देईनासें झालें. दांत व नखें काढून घेतलेल्या वाघाप्रमाणें "सांपळ्यामध्यें व्याघ्र

सांपडे बागकामुळें मारिती खडे!" अशी त्यांची स्थिति झाली. पुढें नवीन शिक्षणाच्या शाळा सुरू झाल्या व त्यांत शिकलेले लोक हातीं धरणें हेंच सरकारास अधिक सोयीचें वाटूं लागलें. राज्यकारभाराच्या दृष्टीनें हें ठीकच होतें. पण शाळांतून धर्म व नीति यांचें शिक्षण मिळण्याची सोय केलेली नव्हती. यामुळें पहिल्या पिढीच्या सुशिक्षित लोकांची मनःस्थिती भयंकर व शोचनीय झाली. जुन्या सामाजिक बंधनांबद्दल त्यांच्या मनांतील आदर नाहींसा झाला. शिक्षण सदोष व थोडें, पण तेवढ्यानेंच संसार थाटण्यासारखा पगार व सरकारी मान्यता मिळूं लागल्यानें, इकडे अधिकारमद वाढला व तिकडे समाजाची टवाळी करण्याची बुद्धीहि वाढली. १८३७ पासून १८७४ पर्यंतच्या दरम्यान दोनतीन पिढ्या सुशिक्षितांच्या झाल्या. पहिल्या पिढीला गोपाळराव हरींची पिढी म्हणतां येईल. या पिढींत विद्येचा संस्कार थोडा व स्वतः गोपाळराव हरी हे या बाबतींत अपवादच होते. दुसरी पिढी माधवराव रानडे, कुंटे यांची या पिढीला, पहिल्या पिढीपेक्षांहि समाजबंधनाचा आळा कमी. त्याचा परिणाम असा झाला कीं विद्या, नीतिमत्ता, धर्मनिष्ठा, व्यवस्थित आचरण आणि गृहस्थिति यांचा एकमेकांशीं जो नित्य संबंध असावा लागतो, व जो असल्याखेरीज विद्वान् लोकहि पुढारीपण घेऊन राष्ट्राचा उत्कर्ष करण्यास पात्र होत नाहींत, तोच संबंध इंग्रजी शिक्षणानें पहिल्यानें तोडून टाकला. समाजस्थितींतील केवळ दोषांकडेच त्यांची दृष्टी वेधूं लागली. परकीय शिक्षक व मिशनरी यांची या कामास मदतच झाली. निवळ तार्किक वादाचीं उत्तरें समाजसंरक्षणाला पुरीं पडेनात. समाज सुधारकांतहि मिशनरी लोकांचा हल्ला परतविण्याची बुद्धी नव्हती असें नाहीं. पण ब्रह्मसमाज किंवा प्रार्थनासमाज अशा प्रकारचे नवीन धर्मपंथ स्थापून समाजसंरक्षण करूं ही आपली समजूत चुकीची किंवा हास्यास्पद आहे हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. सरकारी मान्यता किंवा थोडेंबहुत इंग्रजी शिक्षण असली चुटपुटती सामुग्री नवीन धर्मपंथ स्थापूं पाहणारास पुरेशी नाहीं हें त्यांना समजलें नाहीं. नवीन धर्मपंथ स्थापण्याच्या भरांत त्यांनीं ख्रिस्तीधर्मप्रसारावर फारशी प्रतिक्रिया केली नाहीं. पण स्वतःला मात्र बहिष्कृतासारखें करून घेतलें. नव्या पिढीचे अव्वातव्वा आचार, विचार, आहार वगैरे लोकांच्या नजरेस पडूं लागल्यानें ते यांना नांवें ठेवूं लागले. हजारों वर्षांची जुनी समाजव्यवस्था चुटकीसरशी उडवून देऊं असें म्हणून जुन्यांस वाटेल तशीं नांवें ठेवणारा उपहासास्पद झाल्यास त्यांत लोकांकडे काय दोष! पण १८७५ नंतर केवळ धार्मिक आणि सामाजिक सुधारणेनें राष्ट्राचें कार्य पुढें पडणार नाहीं असें नवीन पिढीस दिसून आलें. सरकारी नोकरीखेरीज इतर अनेक रीतींनीं शिक्षणाचा उपयोग समाजास करून देण्याला वाव आहे, व संघशक्तीनें काम करण्याचा पायंडा पडल्यास त्याचा उपयोग विशेष होईल, ही कल्पना मनांत आल्यापासून पुढारीपणाचें तोंड फिरलें. पोक्त विचार, दृढ व सतत

अभ्यास, सदाचरण, नीतिधैर्य किंवा स्वार्थत्याग हे गुण जुन्या चळवळीच्या पुरस्कर्त्यांच्या अंगीं नजरेस येत नव्हते. उलट त्यांचें वर्तन व आचार यांत एक प्रकारची शिथिलता व आचरटपणा आढळून येत होता. स्वतःच्या आचरणानें तरुण मंडळीस अव्यवस्थितपणाचा व नीतिदौर्बल्याचा कित्ता हे घालून देत होते. उतू गेलेलें दूध शेवटीं आगींत पडतें तशी पहिल्या दोनतीन पिढ्यांतील पुढाऱ्यांच्या चळवळीची स्थिति झाली. नुसत्या बुद्धिमत्तेपेक्षां पुढारीपणास इतर कांहीं अधिकार लागतो ही गोष्ट उघड दिसून आली. विष्णुशास्त्र्यांच्या टीकेचा रोख व्यक्तिमात्रापेक्षां अव्यवस्थितपणाच्या मदावरच विशेष होता.

टिळक–चिपळूणकरांच्या टीकाविषयाचें एक अत्यंत सौम्य उदाहरण म्हटलें तरी तें माधवराव कुंटे यांचें होईल. माधवराव कुंटे हे विद्वत्तेच्या दृष्टीनें रानड्यांचे खालोखाल होते. पुण्याच्या हायस्कूलच्या हेडमास्तराची जागा हा त्या वेळचा मोठा मान त्यांना मिळाला होता. ते चांगले वक्तेहि होते. "Vicissitudes of Aryan Civilisation" हें त्यांचें पुस्तक पाहिलें म्हणजे गहन विषयांतहि त्यांची गति थोडी बहुत चाले असें दिसतें. उद्योगीपणाबद्दल त्यांची ख्याती होती. पेन्सिलीचा एक कारखाना त्यांनीं आरंभिला होता. गायनशास्त्र शिकण्याचें मनांत येतांच त्याच्याहि खटपटीस ते कांहीं काळ बसले. पण त्यांच्या विद्वत्तेंत व स्वभावांत आचरटपणाची मोठीच गोम होती, ती पदोपदीं दिसून येई. लिहिणारा फर्डा पण कोठें वाहवेल याचा नियम नाहीं. बोलावयास उभे राहिले कीं इंग्रजी भाषेचा मुसळधार पाऊस पडे, पण मग त्यांत कोठचीं किती गटारें वाहून येतील याचा नियम नाहीं. गायनशास्त्राचा अभ्यास अगदीं एकांतांत करणें अवघड खरें, पण कुंटे यांच्या कर्कश चढ्या आवाजाची तालीम सुरू झाली कीं सगळ्या आळीला नकोसें होऊन जाई. 'जितके माझे बाप तितकेच श्राद्धाला ब्राह्मण सांगेन' असें उत्तर भाविक आईला सांगण्याइतका अर्वाच्यपणा, पण वेळ पडली म्हणजे पायांत चाळ घालून चिपळ्या घेऊन भजन करण्याची तयारी! शाळेंत मुलांना शिस्त व अभ्यास शिकविणारे हेडमास्तर स्वतः कसे बसत किंवा मुलांना काय बोलत, याचें वर्णन आम्हीं लिहिणें म्हणजे स्वतःच शिष्टाचार सोडणें होय. १८७२ सालीं ज्ञानप्रकाशांत "मी कोण व माझें नांव काय" या मथळ्याखालीं एक पत्र छापलें होतें, त्यांत कुंटे हे मुलांशीं बोलतांना किती आचरटपणाचे शब्द वापरीत याचें दिग्दर्शन केलें होतें. व बहुधा कुंट्यांनाच उद्देशून शास्त्रीबोवांनीं एके ठिकाणीं असें लिहिल्याचें स्मरतें कीं, जगांतील असतील नसतील ते कुशब्द आणून यांच्या डोक्यावर घातले तरी ते अपुरेच होतील.

जुन्या पिढीचें हें वर्णन एकंदरीनें खरें असलें तरी इंग्रजी राज्याविषयीं खरी राजनिष्ठा लोकांत ओतप्रोत भरली होती असें नाहीं. मराठेशाही नष्ट होऊन अवघीं पन्नास वर्षेंच झालेलीं असल्यामुळें तिची आठवण कशी बुज-

णार! येवढेंच नव्हे तर, ती कित्येकांच्या डोक्यांतून उसळी मारून वर प्रगटहि होत असे. या दृष्टीनें टिळकांपूर्वीच्या महाराष्ट्रांतील राजकारणाच्या इतिहासांत वासुदेव बळवंत फडके याला एक विशिष्ट स्थान मिळतें. देशाकरितां डोकें फिरवून आत्मघातापर्यंत मजल नेणाऱ्या लोकांची परंपरा महाराष्ट्रांत जुनी आहे. माधवराव रानड्यांनीं सरकारी नोकरींतून साधें सर्वांगसुंदर राजकारण उभें केलें; पण त्याहीपलीकडे जाऊन फडके यांनीं सरकारी नोकरींत असतांच खुद्द बंडाची चळवळ केली. या दोन्ही उदाहरणांवरून, सरकारी नोकरीची गरज महाराष्ट्रांत किती मोठी असते पण राजसेवेचा परिणाम सरकारी नोकरांच्याहि मनावर किती थोडा होतो, हें उघड दिसून येतें. बंगाल्यांतील भावी तरुणांप्रमाणें फडके यांच्याहि मनानें असें घेतलें होतें कीं, राजकीय चळवळीला राजमार्गानें न मिळणारें द्रव्य आडमार्गानें पुष्कळ मिळवावें व त्याच्या जोरावर सरकार हलवून सोडावें. शिकारी व लष्करी पेशाचे सर्व खेळ खाजगी रीतीनें फडके हे शिकलेले असून, १८७६–७७ च्या दुष्काळांत रामोशी वगैरे लोकांनीं परस्पर घातलेल्या दरोड्यांचा मुहूर्त समजून फडके यांनींहि आपल्या उद्योगास प्रारंभ केला, व ही दरोडेखोर मंडळीच हातीं धरली. पण साध्यसाधनांचा कांहींच मेळ बसण्यासारखा नव्हता. मांगरामोशांनीं फडके यांचें उच्च ध्येय धुडकावून लावून दरोडेखोरीचा नुस्ता धंदाच फैलावला, व या कांटेरी तारेच्या जाळ्यांत गुंतलेलें आपलें अंग फडके यांस काढून घेतां न आल्यामुळें तेहि निवळ बंडखोर ठरून अखेर फांशीं गेले. नानासाहेब पेशव्यांनंतर ज्याचें नांव घेतांच इंग्रज कावरेबावरे होत असा फडके हाच प्रथम झाला. वासुदेव बळवंताच्या दंग्याचीं अद्भुतरसात्मक वर्णनें अद्यापीहि ऐकूं येतात. खुद्द टिळकांचा एक जवळचा नातलग या बंडांत सामील होता असें म्हणतात. त्याच्याकडून टिळकांनीं कॉलेजच्या उमेदींत किती तरी मनोरंजक गोष्टी ऐकल्या असतील!

पण वासुदेव बळवंत फडक्यासारखे लोक अर्थातच अपवादात्मक होत. राजकारणाचें पाऊल कायमचें पुढें पडावयाचें तर तें धिमेपणानेंच पडणारें होतें हें उघड आहे. आणि भरतीच्या वेळीं जशी पहिलीहून दुसरी लाट अधिक जोरदार व दूरवर जाणारी आणि दुसरीहून तिसरी अधिक दूर जाणारी असते, व या क्रमानें भरती भरते; तशीच महाराष्ट्राच्या राजकारणाची भरती पहिल्या पिढीपेक्षां दुसरी पिढी एकंदरीनें अधिक जोमदार, तिच्याहून पुढील पिढी अधिक स्वतंत्र विचाराची, तिच्याहून पुढील पिढींत स्वातंत्र्याच्या इच्छेबरोबर स्वार्थत्यागाची बुद्धी अधिक उदित झालेली या परंपरेनें, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यापर्यंत येऊन पोचली होती. आणि चिपळूणकरांनीं प्रारंभीं नोकरींत शिरून नंतर ती सोडून जें कार्य आरंभिलें, तें टिळक आगरकरांनीं नोकरींत न शिरतांच अंगिकारिलें, हें राष्ट्रीय भावनेच्या नैसर्गिक परिणतीस योग्य असेंच होतें. या दृष्टीनें वरील सामान्य विवेचन पुरें करून टिळकांपूर्वीच्या दोन तीन पिढ्यांत झालेल्या पुण्यामुंबईतील

पांच चार प्रमुख महाराष्ट्रीयांचीं अल्प चरित्रें खालीं देत आहों. अशीं चरित्रें जितकीं द्यावीं तितकीं थोडींच होणार, तथापि स्थलसंकोचास्तव पांचचारच दिलीं आहेत. शिवाय हीं चरित्रें म्हणजे ते त्या काळचे एक प्रकारचे मासले होत, त्यांच्यांत बरोबर कालानुक्रमाला धरून प्रगतीही हटकून दिसेलच असें मात्र नाहीं.

डॉ. भाऊ दाजी लाड हे टिळकांपूर्वींच्या पिढींतील एक अति सुप्रसिद्ध गृहस्थ होऊन गेले. त्यांचें मूळ घराणें गोमांतकांतलें व त्यांचा जन्म १८१८ सालचा. लहानपणीं घरच्या गरीबीमुळें ते मुंबईस आले तेव्हां मातीचीं सुंदर चित्रें करून पोट भरीत. पुढें ते बुद्धिबळें खेळण्यांत विशेष प्रवीण व यशस्वी झाल्यामुळें, प्रथम मुंबईचे मोठमोठे गृहस्थ व त्यानंतर खुद्द गव्हर्नरसाहेब यांच्यापर्यंत त्यांची ओळख झाली; व असा बुद्धिमान् मुलगा शिक्षणाविणें फुकट दवडला जाऊं नये म्हणून त्यांनीं "केवळ भाऊंकरितां शाळा स्थापन केली तीच पहिली सरकारी मराठी शाळा होय" असें म्हणतात (म. सारस्वत एप्रिल १९२२ पृ. ३१). एकदां शाळेंत प्रवेश झाल्यावर ते शिकत शिकत ग्रँट मेडिकल कॉलेजपर्यंत सहज पोंचले, व या कॉलेजांतील पाहिले G. G. M. C. भाऊ दाजीच होत. दया, क्षमा, शांती, गोडवेपणा या त्यांच्या अंगच्या गुणांची शिक्षणांत भर पडून त्यांचा डॉक्टरीचा धंदा अतीशय फळाला आला. साहेब लोकांना ते मोठे प्रिय असत. त्यांचें या लोकांत प्रिय नांव डॉ. बॉब हें असे. पण दुसरे पक्षीं आपल्या समाजांतील गरीब निराधार लोकांचेहि ते वाली असत. मुंबईचा नॉर्थब्रुक बाग त्यांनींच गरीब लोकांकरितां स्मारकाच्या चळवळीचा फायदा घेऊन स्थापला. विठोबा मल्हारी या गरीब शिंपी मनुष्यावरील अन्यायाच्या खटल्यानें एक वेळीं मुंबईत चळवळ उडाली होती, त्या वेळीं भाऊ दाजी यांनीं हजारों रुपये खर्च करून त्याला न्याय मिळवून दिला. भाऊ दोन वेळां मुंबई शहराचे शेरीफ नेमले गेले. डॉक्टरीचा धंदा सांभाळून त्यांनीं इतर विद्यार्जन व वाङ्मय-सेवा पुष्कळ केली. शिलालेख व ताम्रपट यांचा त्यांना फार नाद असे, व या विषयावर त्यांनीं कांहीं निबंधहि लिहिले आहेत. वनस्पतींवर त्यांनीं कांहीं पुस्तकें लिहिलीं व रक्तपित्तीच्या रोगावर बैराग्यागोसाव्यांच्या मदतीनें वनस्पती मिळवून उत्कृष्ट औषध तयार केलें. सुप्रसिद्ध एडवर्ड रेहॅटसेक हा हंगेरियन भाषापंडित भटार-खान्यांत चिलीम फुंकित वेडा होऊन बसलेला पाहून, डॉ. भाऊ दाजी यांनीं त्याला बाहेर काढून पैसे देऊन सन्मार्गास लाविलें, यामुळें त्याची सुधारणा इतकी झाली कीं विल्सन कॉलेजांत त्याला लॅटीन व गणिताचा प्रोफेसर नेमण्यांत आले. नाट्य-कलेचाही भाऊंना शोख असे. सांगलीकर नाटकमंडळी मुंबईस गेली म्हणजे घरीं तिकीट विक्रीचें हपीस ठेवण्यापासून त्यांनीं सर्व प्रकारची मदत करावी. रा. सा. मंडलीकांचे ते मोठे स्नेही असून सामाजिक बाबतींत जुन्या नव्या मतांची तोंड-मिळवणी करण्यांत ते मोठे कुशल असत. भाऊ दाजी १८७३ त निवर्तले.

महादेव शास्त्री कोल्हटकर हेहि एक त्या काळचे विद्वान् व रसिक गृहस्थ

होते. हे थांईचे रहिवासी. पुणें येथलि पाठशाळेंतील ज्योतिष व व्याकरण या शास्त्रांचा अभ्यास केल्यावर, स्कॉलरशिप देऊन पांच वर्षे इंग्रजी शिकण्याकरितां ज्या विद्वान् तरुण शास्त्री लोकांना सरकारनें कँडीसाहेबांच्या हाताखालीं प्रथम दिलें, त्यांत कोल्हटकर प्रमुख होते. मुंबईस त्यांनीं बाळशास्त्री जांभेकर यांचे हाताखालीं अध्ययन केल्यावर, १८५१ सालीं पुण्याची संस्कृत पाठशाळा आणि इंग्रजी शाळा एक होऊन पूना कॉलेज बनलें त्यांत महादेव शास्त्री यांना मराठीचे प्रोफेसर नेमण्यांत आलें. नंतर सेंट्रल बुकडेपोचे क्युरेटर असतांच ते १८६५ सालीं वयाच्या त्रेचाळिसाव्या वर्षी वारले. हे मोठे वक्ते व लेखक असत. शाळेंतील त्यांचीं व्याख्यानें ऐकण्यास परगांवचे लोकहि येत. कोलंबसाचें चरित्र, अर्थशास्त्र, अथेल्लो नाटकाचें भाषांतर वगैरे पुस्तकें व कांहीं कविताहि त्यांनीं केल्या आहेत. त्यांचें इंग्रजी शिक्षण एकंदरीनें थोडेंच झाल्यानें ते विद्याखात्यांत चढावे तितके चढले नाहींत. तथापि महादेवशास्त्री म्हणजे त्या पिढीचा एक नामांकित मनुष्य.

त्या काळच्या नमुनेदार गृहस्थांत गोपाळराव हरी देशमूख हे प्रमुख होत. यांचें शिक्षण मूळ थोडें असतांहि तें त्यांनीं स्वतःच्या प्रयत्नानें पुष्कळच वाढविलें. किंबहुना जन्मभर त्यांनीं विद्यार्थी या नात्यानें ज्ञान संपादण्याचा अविरत उद्योग केला. त्यांना लेखक किंवा ग्रंथकार असें म्हणतां येत नाहीं. त्यांचा कोणताहि लेख टिपणांच्याच स्वरूपाचा आढळतो. म्हणजे त्यांत कांहींतरी नवीन माहिती मिळवून ग्रथित केलेली दिसून येते. पण हीं टिपणें त्यांचीं त्यांना स्वतःला उपयोगी असलीं तरी तीं तशींच ठेऊन त्यांच्या साहाय्यानें निष्कर्षभूत असा एखादा निबंध केव्हांतरी लिहावा असा त्यांचा प्रघात नव्हता. टिपणें जसजशीं तयार होतील तसतशीं तीं लोकांच्या माहितीकरितां प्रसिद्ध करण्याचा क्रम त्यांनीं ठेविला होता. जो कोणी भेटेल त्याला विचारून माहिती मिळवावी, इंग्रजी ग्रंथ वाचून त्यांवरूनहि टिपणें करावीं, व एखाद्या वर्तमानपत्रांत ती माहिती प्रसिद्ध करावी असा त्यांचा नित्य परिपाठ असे. ‘ लोकहितवादी ’ या नांवानें त्यांनीं लिहिलेले बहुतेक लेख जवळ जवळ अशाच स्वरूपाचे आहेत. विद्यार्जनाच्या दुकानांतील रोजकीर्द असेंहि नांव त्यांच्या ग्रंथांना देतां येईल. टिपणें प्रसिद्ध करणें हें दिसण्यांत कसेंसेंच दिसतें. पण छापखाने व वर्तमानपत्रें ही गोष्ट तेव्हां अगदींच नवी म्हणून कौतुकाची, असल्यामुळें वर्तमानपत्रांत कोणी काय छापावें याला नियमच नव्हता; व जें काय छापलें जाईल त्याची वाचणारास अपूर्वाईच वाटे. इतर देशांतूनहि मुद्रणकला नवी सुरू झाली तेव्हां निघालेलीं वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें यांतूनहि असेच टिपणांच्या स्वरूपाचे लेख लिहिलेले आढळून येतात.

चर्चा वादविवाद ही गोष्ट तेव्हां सर्वस्वीं नवीन नसली तरी, वर्तमानपत्रांतून ती माजण्याइतकीं पुष्कळशीं वर्तमानपत्रें नसत; व सार्वजनिक चळवळ ही गोष्ट तर माहीत

नव्हतीच नव्हती. ज्ञानार्जनाचा व्यापार व विनिमय हल्लीं घाऊक होतो तो तेव्हां किरकोळीनें होत असे. एखाद्या प्रांतांत एकच लहानसें वर्तमानपत्र असलें तर त्याला दुसऱ्याशीं वाद करण्याला जागा किंवा प्रसंगच असत नाहीं. आज वर्तमानपत्रांतील लेखांना जाहीर व्याख्यानाचें, संभाषणाचें, किंवा पंडित सभेंतील वादाचें स्वरूप आहे तसें या जुन्या काळीं नसून, तें केवळ आत्मगत भाषणाचें होतें. त्या वेळचीं वर्तमानपत्रें हीं 'वर्तमानपत्रें' हें नांव आजच्याहून अधिक सार्थ करणारीं होतीं.बाजारांत, गुजरींत, चव्हाट्यावर, अड्ड्यावर, गर्दींत माणसें भेटलीं असतां, मुंग्यांप्रमाणें क्षणभरच तोंडास तोंड देऊन एकमेकांना नुसती बातमी सांगून जशीं पुढें जातात, त्याच रीतीनें तेव्हांचीं वर्तमानपत्रें संक्षिप्त हकीकत लिहून जातां जातां क्वचित् एखादें वाक्य टीकेचें लिहीत. अशाहि वेळीं लिहिणारांना मतें नव्हतीं असें नाहीं, तर मतें प्रतिपादन करण्याचा जसा आखाडा हल्लीं पडला आहे तसा तो तेव्हां पडलेला नव्हता. फार तर मत ओघानें बोलून जात, पण त्याची साधकबाधक चर्चा होत नसे. तेव्हांचीं वर्तमानपत्रें म्हणजे खाणींतून उकरून काढलेल्या अनगड हिऱ्याच्या दगडासारखीं म्हटलीं तर, हल्लींचीं वर्तमानपत्रें त्याच दगडाला घांसून हजारों पैलू पाडलेल्या व किरणांचें जाळें पसरणाऱ्या गुलाबी फुलाच्या हिऱ्यासारखीं ठरतात. तेव्हांचें वर्तमानपत्र वाचणें म्हणजे एखाद्या अंधाऱ्या बोगद्यांतून दुसऱ्या टोंकास दिसणाऱ्या उजेडांतील वस्तु न्याहळण्यासारखें असे. हल्लींचें वर्तमानपत्र वाचणें म्हणजे प्रदर्शनांत कित्येक वेळां कृत्रिम आरसेमहाल तयार करतात त्यांत उभें राहिल्यासारखें वाटतें ! तें असें कीं, जिकडे पहावें तिकडे एकाच्याच अनंत मूर्ति चकचकतात.

असो, गोपाळराव हरी हे 'क्षणशः कणशः श्चैव' या सुप्रसिद्ध न्यायानें कणाकणांनीं विद्या स्वतः मिळवून लोकांना ती देणारे उपकारी गृहस्थ कसे होते हें त्यांचीं पुस्तकें पाहिलीं असतां कळून येईल; व त्यांचा विद्याव्यासंग आणि बहुश्रुतपणा यांचें कौतुक करितांना विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं त्यांजवर केलेली बहुधा सगळी टीका लक्षांत न घेतली तरी चालण्यासारखी आहे. सरकारी नोकर, रावबहादुर, सुधारकच नसले तरी सुधारणाप्रिय, इत्यादि अनेक बाजू लक्षांत घेऊन शास्त्रीबोवांनीं त्यांच्यावर टीकेचा मारा केला. पण लोकहितवादींची बुद्धी शुद्ध असून त्यांच्या मनांतहि खरोखर नांव ठेवण्यासारखें असें फारसें कांहीं नव्हतें. आपल्या लोकांना जगाचें ज्ञान फार थोडें आहे, ते आपली दृष्टी जितकी व्यापक करितील तितकें हितच होईल, जुन्या समजुतींत व चालीरीतींत फरक झालाच पाहिजे, व प्रत्यक्ष कार्य हातून झालें न झालें तरी मनुष्यानें ज्ञानसमृद्ध तरी असलें पाहिजे हाच मुख्यत गो. ह. देशमुखांचा उपदेश असे. ते आपल्या बुद्धिमत्तेवर जिल्हा जज्जाच्या जागेपर्यंत चढले; व १८६०–६२ चे सुमारास हिंदुधर्मशास्त्रांतील आधुनिक निर्णयांचा डायजेस्ट किंवा व्यवस्थित संग्रह करण्याचें काम सरकारानें

त्यांजकडे दिलें असल्याचेंहि आढळतें. १८८८–८९ सालीं म्हातारा अगदीं पिकला तरी, पुणें शहरांत जर कोठें एखादी लहानशी सभा, किंवा वाकडेवाड्यांतील स्माल साहेबांचें साप्ताहिक मिशनरी व्याख्यान असलें तरी त्यालाहि काठी टेकीत ते आलेले आम्हीं पाहिले आहेत. तात्पर्य, गोपाळराव हरि देशमुख म्हणजे ज्ञानार्जनाच्या हौसेची त्या कालांतील ती एक प्रत्यक्ष मूर्तीच होती असें म्हणतां येईल. लोकहितवादींविषयीं विष्णुशास्त्री चिपळूणकरहि लिहितातः—

" लोकहितवादी हे स्वदेशहितार्थ उद्योग करूं लागल्यास आज सुमारें चाळीस वर्षें होत आलीं. इतक्या काळांत देशस्थिति सुधारण्याच्या निमित्तानें ज्या ज्या उलाढाली झाल्या त्या सर्वांत हे आपल्या नामाभिधानाप्रमाणें प्रमुखत्वानें वागत आले आहेत. अद्यापिहि त्यांचें उतार वय झालें असतां व राजसेवेचा भार त्यांच्या डोईवरून उतरला असतां त्यांचा लोककल्याणानिमित्तक उद्योग अव्याहत चालू आहे.........ऐन साठीच्या अमलांतहि प्रस्तुत ग्रंथकाराचें ठिकाणीं नाउमेदीचें व सुस्तपणाचे उद्गार आढळत नाहींत. देशहितार्थ उलाढाल करण्याविषयीं हव्यास, ग्रंथरचना, सभापांडित्य वगैरेविषयीं त्यांची हौस हीं सर्व नव्या दमाच्या तरुण बांडांतहि आढळणार नाहींत अशीं या वयांतील पुरुषाचे ठायीं आज घटकेला तरतरीत आहेत. लोककल्याणाच्यानिमित्त सतत दीर्घकाळ परिश्रम करणें व कामाविषयीं सदोदित उत्साह बाळगणें या गोष्टींच्या संबंधानें सर्वांनीं व विशेषतः आमच्या अलीकडील कमकुवत मंडळीनें रावबहादुरांचा कित्ता घेणें अत्यंत उचित होय."

नामदार रा. ब. कृष्णाजी लक्ष्मण नूलकर सी. आय. ई. हेहि टिळकांच्य पूर्वीच्या पिढींतील एक नामांकित नमुनेदार गृहस्थ होत. यांचा जन्म टिळकांच्या पूर्वी सव्वीस वर्षें झाला. यांचें घराणें मूळ सावंतवाडीकडचें असून त्यांचे एक चुलते संकेश्वर येथील जगद्गुरूंच्या ऐहिक संसाराचे व्यवस्थापक होते. यांच्या आठव्या वर्षी वडील वारले व आई सती गेली. चौदाव्या वर्षापर्यंत यांना इंग्रजीचा गंधहि नव्हता, तथापि विद्येची हौस व स्वावलंबन हे दोन गुण त्यांजमध्यें प्रमुख असल्याकारणानें, त्यांनीं इकडून तिकडून खाजगी प्रयत्नानें थोडीबहुत इंग्रजी विद्या संपादन केली. कर्मधर्मसंयोगानें पोलिटिकल एजंट जनरल जेकब यांची नजर या दैववान् मुलावर गेली व तो हुशार, देखणा पाणीदार असा पाहून त्यांनीं त्याला आपला खाजगत कारकून नेमला व पुढें आपल्या कचेरींत हेडक्लार्कची जागा दिली. रा. सा. मंडलीक हेहि याच सुमारास (१८५०-५५) सरकारी नोकरींत होते. त्यांची आणि नूलकरांची मोठी मैत्री असे. मंडलीक हे प्रथम भुज येथें अकौंटंट, नंतर सर बार्टल फ्रियर यांचे खासगी कारकून, व नंतर मुंबईस शाळा तपासनीस असे चढत चढत गेले, व त्यांनींच आपल्या जागीं नूलकर यांना सर बार्टल फ्रियर यांजकडून नेमविलें. पुढें मुंबईचें सेक्रेटेरियट, काठेवाड

पोलिटिकल एजन्सी, मुंबईचें स्मॉलकॉज कोर्ट व शेवटी कच्छ संस्थानचा दरबार अशा जागीं क्रमानें मोठमोठीं हुद्यांचीं कामें करून ते १८७६ सालीं पुण्यास येऊन सुखवस्तु म्हणून राहिले. १८७८ सालीं त्यांना सार्वजनिक सभेचें चेअरमन निवडण्यांत आलें, व ते त्या जागेवर १८८७ पर्यंत राहिले होते. दरम्यान १८८४ सालीं मुंबईसरकारनें जंगलच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमलें त्यावर एक सभासद म्हणून त्यांची नेमणूक झाली, व याच कामगिरी-करितां पुढें त्यांस सी. आय. ई. ही पदवी देण्यांत आली. तसेंच शेतकऱ्यांना ऋण-मुक्त करण्यासंबंधीं नेमलेलें कामिशन, मुंबई कायदेकौंसिल, व शेवटीं वरिष्ठ कायदे-कौंसिल, इत्यादिकांवर सरकारतर्फे त्यांची नेमणूक झाली होती. तात्पर्य त्या काळीं सरकारदरबारीं जेवढा मोठा मान खाजगी मनुष्याला मिळण्यासारखा होता तेवढा त्यांना मिळून चुकला होता. हल्लीं सार्वजनिक सभेंत नूलकरांचें छायाचित्र आहे तें पाहिलें तर त्यांच्या अंगचे प्रमुख गुण कोणालाहि सहज कळून येतील.

नूलकरांचा चेहरा रुबाबदार असून ते मोठे स्वाभिमानी असत. पुण्यास आल्या-बरोबर पुणेकरांस हे प्रतिष्ठित पेन्शनर आयते रिकामे म्हणून एक मोठें निधानच लाभलें. अनेक प्रकारच्या सार्वजनिक चळवळींत पुढारी होण्याविषयीं त्यांना विनंति करण्यांत येऊं लागली. शहर म्युनिसिपालिटींत त्यांची निवडणूक झाली, पण तेथील काम अगदीं किरकोळ व किचकट असें त्यांना वाटूं लागलें. शिवाय मोठमोठ्या हुद्यांवर असल्याकारणानें एका वरिष्ठाशिवाय कोणाकडून शब्द खालीं पडलेला पाहण्याची संवय नाहीं, व म्युनिसिपालिटीसारख्या संस्थेंत तर मतभेद होणार आणि चार लोक चार प्रकारचें बोलणार. यामुळें म्युनिसिपालिटींतील सभा-सदाची जागा त्यांनीं आपण होऊनच सोडून दिली. सार्वजनिक सभेचे चेअरमन या नात्यानें त्यांनीं आठनऊ वर्षें काम केलें हें वर सांगितलेंच आहे. या ठिकाणीं त्यांनीं मोठ्या निर्भीडपणानें काम केलें असें सांगतात. निर्भीडपणानें याचा अर्थ रा. ब. रानडे यांना न जुमानतां असा करण्यास हरकत नाहीं. वास्तविक नूलकर हे रानड्यांपेक्षां वडील व जुने सरकारी नोकर या नात्यानें प्रतिष्ठित. नूलकरांना युनिव्हर्सिटीच्या पदव्या नव्हत्या हें तर खरेंच; पण शिवाय माधवराव रानडे यांच्यासारखी व्यापक बुद्धी व उद्योगप्रियताहि नव्हती. यामुळें या वृद्ध-तरुण विरोधांत हुशारी व शहाणपण यांच्या दृष्टीनें रानड्यांचें तेज अधिक पडे. पण मी पदवीधर नसलों तरी मलाहि पण ज्ञान आहे, व प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव मला आहे तितका रानड्यांना नाहीं अशी त्यांची स्वाभिमानबुद्धी नेहमीं जागृत असे. शिवाय रानड्यांच्यापेक्षां नूलकरांमध्यें स्पष्टवक्तेपणा व एक प्रकारची बुद्धीची स्वातंत्र्य-प्रियता अधिक होती यामुळें ते पुष्कळ वेळां रानडे यांचें चालूं देत नसत. रानडे ज्यांना अप्रिय असा पुणें शहरांत व खुद्द सार्वजनिक सभेंतहि एक पक्ष होता. त्यांना रानड्यांशीं झुंजावयाला हें एक धेंड बरें आहे असें वाटे, व दोघांची कुस्ती

लावून देऊन ते अनेक वेळां मौज पहात. नूलकरांनीं फारेस्ट कमिशनवर लोकपक्षाची बाजू बरी सांभाळली, पण संमतिवयाच्या बिलाला त्यांनीं संमति दिल्यामुळें शेवटीं पुण्यांतील लोक त्यांच्यावर नाराज झाले. नूलकर हे ता. २८ मार्च १८९३ रोजीं महाबळेश्वरास वारले. नूलकरांची सरकारी नोकरी पन्नाशीच्या आंतच संपली व पुढें दहाबारा वर्षे त्यांनीं सार्वजनिक कार्य केलें तें त्या वेळच्या मानानें असावें तितकें स्वतंत्र बाण्याचें होतें. न्यू इंग्लिश स्कूलची तरुण मंडळी पुढें आलेली पाहून त्यांना आनंद होत असे; पण एका सार्वजनिक सभेव्यतिरिक्त त्यांनीं इतर स्थानिक कामांत विशेष लक्ष घातल्याचें दिसत नाहीं.

टिळकांच्या पूर्वींच्या निकट पिढीचे पुण्याचे प्रख्यात राजकीय पुढारी म्हटले म्हणजे कै. महादेव गोविंद रानडे हे होत. एका अर्थानें ते नुसते पुण्याचे गुरु नसून सर्व हिंदुस्थानचे गुरु होते असें म्हणतां येईल. असा कोणताहि प्रांत नाहीं कीं, ज्यांतील सुशिक्षित लोक त्या काळीं रानड्यांना विद्वत्ता, राजकारणाचें ज्ञान व स्वदेशप्रीति या बाबतींत प्रत्यक्ष गुरुस्थानीं मानीत नव्हते. किंबहुना, गेल्या वीसबावीस वर्षांत अनेक नवीन राजकीय पुढारी या भूमींत निर्माण झाले व त्यांनीं हा देश अकल्पित अशा उन्नतिप्रत नेला, तरी रानड्यांचें नांव घेतांच त्यांच्या योग्यतेचें स्मरण होऊन अजून देखील प्रत्येक समंजस मनुष्य मनानें त्यांना वंदनच करितो. अलौकिक बुद्धिमत्ता, दीर्घ व सतत व्यासंग, देशाबद्दलची खरी कळकळ, विद्यार्जनाचें स्वाभाविक जडलेलें व्यसन, अचुक कल्पकपणा वगैरे अनेक गुणांनीं माधवरावजींचें चरित्र बोधप्रद असून महत्त्वाचें झालें आहे—अशा प्रकारची सामान्य स्तुति तर टिळकांनीं रानड्यांच्या मृत्युलेखांत केलीच आहे; पण टिळकांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्यांनीं रानड्यांचें म्हणून जें वैशिष्ट्य पुढें दाखविलें आहे तें खरोखरच मार्मिकपणाचें आहे. तें असें कीं, "महाराष्ट्रांतील तेज अनेक कारणांनीं सर्वस्वीं नष्ट होऊन तो एक थंड गोळा बनला असतां, त्यांत फिरून जिवंतपणाची ऊब कशी येईल, व तो गोळा आपले हातपाय कसे हालवूं लागेल याचा रात्रंदिवस विचार करून, आणि तें दुर्धर काम स्वतः अंगावर घेऊन त्याकरितां जिवापाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथम माधवरावजींनींच केली असें म्हटलें पाहिजे." महाराष्ट्रांतील जुन्या थोर घराण्यांतील लोक घरच्या सुखवस्तुपणामुळें आयदी बनले व पुणें पाठशाळेंतून तयार झालेले बहुतेक सर्व नवे विद्वान नोकरींत शिरून निस्तेज झाले. अशा स्थितींत रानडे यांनीं केलेल्या कामगिरीचें महत्त्व व त्यांच्या स्फूर्तीचें तेज सहजच विशेष ठरतें, आणि मौज ही कीं हा सर्व पराक्रम त्यांनीं सरकारी नोकरींत राहूनच केला.

रानडे यांच्या सर्वमान्यतेच्या आड येण्यासारखी एक गोष्ट होती ती अशी कीं या देशाची सुधारणा सर्वच अंगांनीं झाली पाहिजे असें मनानें घेतल्यामुळें त्यांनीं प्रार्थनासमाज, विधवापुनर्विवाह, धर्मसहिष्णुत्व वगैरे गोष्टींवर विशेष भर दिला. पण या

तीनहि गोष्टी तेव्हां समाजांत अप्रिय असल्यामुळें त्यांच्या राजकीय कर्तृत्वासहि संसर्गदोषानें लोक नाकें मुरडीत. तथापि लोक आपणांस काय म्हणतील याविषयीं सर्वदा पूर्णपणें उदासीन राहून, बारा आणि बारा चोवीस तास हरएक प्रकारच्या चळवळीची चर्चा व उद्योग त्यांनीं आजन्म ठेविला होता. लोकमताची जशी त्यांनीं पर्वा केली नाहीं, तशीच सरकारच्या अवकृपेचीहि त्यांनीं पर्वा केली नाहीं. इंग्रज लोकांचा गुण घेतला तरी व्यक्तिशः त्यांच्याशीं केव्हांहि लगट करावयाची नाहीं, फाजील स्नेहसंबंध ठेवावयाचा नाहीं, उदारमताचा दिमाख दाखविण्याकरितां त्यांचे घरीं जेवणखाणास जाणें किंवा स्वतःच्या घरीं त्यांना जेवणखाणास बोलावणें या गोष्टी होतांहोईतों टाळावयाच्या, त्यांजकडून अपमान होईल असे सर्व प्रसंग युक्तीनें टाळावयाचे, व त्यांच्याशीं मतभेद असेल तो लिहून बोलून स्पष्ट दाखवावयाचा; तात्पर्य दुसऱ्याचा उपमर्द तर करावयाचा नाहीं व स्वतःचा प्रतिष्ठितपणाहि गमवावयाचा नाहीं, अशी जी मध्यम स्वभावाच्या थोर मानी मनुष्याची वागण्याची ढब असते ती रानडे यांना सर्वस्वीं साधली होती. तेलंग–भांडारकरांना युनिव्हर्सिटीचे व्हाइसचान्सेलर सरकारनें नेमलें, पण रानड्यांना तो मान सरकारनें केव्हांहि दिला नाहीं, याचें कारण त्यांची विद्वत्ता कमी असें नसून त्यांच्याबद्दल सरकारची मनांतून इतराजी अधिक हेंच होय. तसेंच तेलंगानंतर त्यांना सरकारनें हायकोर्टातील हिंदी न्यायाधीशाची जागा दिली ती देखील केवळ नाइलाज म्हणून. त्यांनीं एल्एल्. बी. व अॅडव्होकेट या दोन्ही परीक्षा दिलेल्या असतांहि वकीली करण्याचा त्यांना मनापासून कंटाळा एवढ्याकरितां ते सरकारी नोकरींत शिरले. त्यांनीं दादाभाईप्रमाणें पोटाचा स्वतंत्र धंदा केला असता, किंवा विष्णुशास्त्री व टिळक यांसारखा स्वार्थत्याग करून एखादी शिक्षणसंस्था काढली असती तर त्यांच्या लौकिकांत अर्थात् अधिकच भर पडली असती. पण त्यांनीं अमुक केलें असतें तर त्यांची कीर्ति अधिक झाली असती असें म्हटलें तरी, सरकारी नोकरी करून त्यांतच त्यांनीं जी देशसेवा केली तीहि सर्व देशानें गुरूच्या स्थानीं मानण्याइतकी अलौकिक ठरली, हीच विशेष कौतुकाची गोष्ट होय. नोकरीचें बंधन रानडे इतकेंच समजत कीं, अगदीं उघडपणें सरकारी नोकरानें राजकीय चळवळ करूं नये; किंचित् सूक्ष्म पडदा ठेवला म्हणजे काम झालें. शिवाय ते जी चळवळ करीत तीहि अशा उत्कृष्ट पद्धतीनें करीत कीं खुद्द सरकारलाहि उघड नांव ठेवण्यास त्यांत जागा सांपडूं नये. खुद्द राष्ट्रीयसभेचें जनकत्व ज्या दोनचार गृहस्थांच्या योजकतेकडे दिलें पाहिजे त्यांत रानडे यांची प्रमुखत्वानें गणना होते; व त्यापूर्वीहि पुण्यांत जी दंगलीची चळवळ झाली तिलाहि कारण रानडेच आहेत अशी सरकारची समजूत होण्याइतका त्यांचा आणि पुण्यांतील चळवळींचा संबंध निकट होता.

माधवरावांच्या पूर्वीच्या व बरोबरीच्या पिढींत विद्वान् पुष्कळ झाले व त्यांतील

कित्येकांनीं सार्वजनिक कार्यांत लक्ष घालण्याचा थोडाबहुत प्रयत्न हि केला. पण " यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः " या न्यायानें देशसेवेचें मर्म रानडे यांनींच खरें करून दाखविलें. लोकांप्रमाणें सरकारलाहि माधवराव यांच्या-बुद्धीचा उपयोग हायकोर्टापेक्षां वरच्या दर्जाच्या एखाद्या ठिकाणीं करितां आला असता. पण तो करितां आला नाहीं हा सरकारचा दोष होय, माधवरावजींचा नव्हे असें टिळकांनीं म्हटलें आहे, व तें योग्यच आहे. अडचणींची सबब सर्वांनाच असते. तींतून कोणीच सुटलेला नाहीं. तथापि त्यांतूनहि राष्ट्रसेवेचा भगवा झेंडा हातीं घेऊन रानडे यांनींच महाराष्ट्राला सार्वजनिक कार्यकर्तेपणाचा धडा घालून दिला. सुदैवानें त्यांच्या मागून येणारी सुशिक्षित लोकांची पिढी स्वार्थत्यागाच्या दृष्टीनें त्यांचेहि पुढें गेल्यानें महाराष्ट्राचें पाऊल रानड्यांच्या मृत्यूनंतर मागें न येतां पुढेंच पडलें. तथापि गोपाळराव गोखले हे तर रानड्यांचे प्रत्यक्ष शिष्यच होते; आणि टिळक हे जरी अनेक बाबतींत रानड्यांचे प्रतिपक्षी होते, तरी उत्कर्षाच्या शिखराला टिळक पोंचले असतांहि रानडे यांच्या गुणांसंबंधानें बोलण्याचा प्रसंग आल्यास तेहि कृतज्ञता व पूज्यबुद्धी मनांत ठेऊनच बोलत असत.

ज्ञानाचे बाबतींत, टिळक रानड्यांना पूर्वकालीन हेमाद्रि किंवा माधवाचार्य यांची उपमा देत असतच; पण ज्ञानाप्रमाणें, रानडे यांनीं उत्तेजन देऊन पुढें आणलेल्या संस्थाहि अशाच विविध स्वरूपाच्या होत्या. वक्तृत्वसमारंभ, वसंत-व्याख्यानमाला, औद्योगिक परिषद, प्रदर्शन, फीमेल हायस्कूल, प्रार्थनासमाज, लायब्ररी, सार्वजनिक सभा—तात्पर्य पुण्यांत अशी कोणतीहि सार्वजनिक संस्था नव्हती कीं जिच्या उघड किंवा गुप्त चालकांत रानडे नव्हते. सरकाराला ही गोष्ट पुष्कळ दिवस कळून चुकली होती, व टेंपलशाहीत रानड्यांवर राजद्रोहाचा खटला न झाला तरी आरोप आल्याशिवाय राहिला नाहीं. १८७४ पासून ७९ पर्यंत राजकीय चळवळीच्या महोदयाचा पूर्वरंग पुण्यांत अनेक अंगांनीं दिसून येत होता. सन १८७४–७५ सालीं, बडोद्याचे अधिपति मल्हारराव गायकवाड यांच्यावर तेथील रेसिडेंट कर्नल फ्रेअर यांना विषप्रयोग करण्याचा आरोप ठेऊन कमिशनमार्फत त्यांची चौकशी करण्यांत आली. या प्रकरणांतील सर्वच गोष्टी अजब होत्या. मल्हाररावासारखा बेबंद, तऱ्हेवाईक सुलतानी संस्थानिक. रेसिडेंट तेहि कातडीनें गोरे पण सुलतानच. त्यांची सुलतानी इतकी अजब कीं दादाभाई नौरोजीसारख्या सात्विक मनुष्याला वैतागून बडोद्याची दिवाणगिरी सोडून द्यावी लागली. व आरोपहि असला भयंकर कीं त्याची जाहिर रीतीनें चौकशी झाल्या-खेरीज समाधान कोणालाच नाहीं. येवढ्या मज्या संस्थानिकाला आरोपी करून इन्साफ करण्याचा हा इंग्रजी राज्यांत दुसरा प्रसंग. या प्रकरणाचा गवागवा सर्व हिंदुस्थानभर झाला. पण महाराष्ट्रानें त्या प्रसंगीं आपलें वैशिष्ठ्य दाखविलें. तो प्रकार असा. कमिशन नेमलें तेव्हां चौकशी व्हावयाची ती अर्थात् दुतर्फी.

सरकारच्या बाजूला कायदेपंडितांचा तोटा नव्हता; कारण पैशालाहि तोटा नाहीं. पण मल्हारराव अटकेंत असल्यामुळें पैशाचे बाबतींत ते सर्वस्वीं पराधीन. पुढें कांहींतरी प्रसंग येणार असें पाहतांच महाराजांनीं बऱ्याच मोठ्या रकमा लांबविण्याचा प्रयत्न केला होता, पण तो फसला. लाखों रुपयांच्या नोटा खाजगी तिजोरींतील शिलका, जडजवाहीर वगैरे सर्व इंग्रज अंमलदारांनीं जप्त करून मोहोरबंदींत टाकून दिल्यामुळें वकील बॅरिष्टर वगैरे करण्यास लागणाऱ्या पैशाकरितांहि महाराजांना सरकारच्या तोंडाकडे पहावें लागलें. महाराजांना या कामीं पैसा किती द्यावा याची घासाघीस सुरू झाली. मल्हाररावांतर्फे जेफर्सन व पेन हे सॉलिसिटर काम करीत होते. त्यांनीं डिफेन्सकरितां एकंदर चार लक्ष बत्तीस हजार रुपयांचें अंदाजपत्रक केलें होते. पण सरकार येवढी रकम देण्यास तयार होईना. अखेर मल्हाररावांनीं व्हाइसरायसाहेबांना अशी तार केली कीं गांठी पैसा नसल्यामुळें माझ्या बचावाचें काम लोळत पडलें आहे. तरी मला बडोद्याच्या खजिन्यांतून दोन लक्ष रुपये तरी तावडतोब द्यावेत, त्यांचा हिशेब सॉलिसिटर देतील.

"Deeply pained to learn from my solicitors that preparations for my defence are at a standstill for want of funds, their requirements for legitimate expenses not granted. Promises of ample opportunity for vindicating my innocence thus practically ignored. Private purse attached. Rani's marriage ornaments and money seized. My character, liberty and kingdom at stake." ही तार खाजगी होती. परंतु अशा तारेचा गवगवा झाल्याशिवाय कसा राहणार? तारेचा सुगावा लागतांच सर्व महाराष्ट्रभर गोंधळ उडून गेला. मल्हाररावांबद्दल व्यक्तिशः विशेष सहानुभूति होती असें नाहीं. पण आरोप ठेवून बचावाकरितां जरूर तो पैसाहि न देणें हा उलट सरकारी कटाचाच एक प्रकार आहे असें सर्व लोकांच्या मनानें घेतलें. पण या खऱ्या अगर मानीव कटाचा सक्रिय निषेध करण्याची स्फूर्ति फक्त पुण्यानेंच दाखविली. पुणेकरांनीं बडोद्यास व व्हॉइसराय साहेबांना एकदम तार केली कीं महाराजांच्या बचावाकरितां महाराष्ट्र एक लक्षपर्यंत वर्गणी देण्यास तयार आहे; त्यांना जरूर ती कायदेपंडितांची मदत द्यावी. पुढें सरकारानें दोन अडीच लक्ष रुपये खर्चास दिले; विलायतेहून मोठा बॅरिस्टर येऊन कमिशनपुढें बचावाची जी योग्य तजवीज व्हावयाची ती झाली; व पुण्याला एक पै सुद्धां खर्च पडला नाहीं. या कामीं पुण्याचें जसें बाहेर नांव झालें तसेंच सरकारच्या डोळ्यांत पुणें खुपूंहि लागलें. पुण्यांत गुप्त पोलिसांचा सुळसुळाट झाला. तार वास्तविक राजरोसपणें सहीनिशीं गेली होती. पण कोणत्याहि गोष्टीच्या मुळाशीं काय आहे हें उलथून पालथून पाहण्याची सरकारची वानरवृत्ति प्रसिद्धच असल्यामुळें त्यांनीं बारीक शोध चालविला होता. असल्या शोधांत प्रमुख माणसांवर

संशय यावगाचाच, तसा तो माधवरावजी रानड्यांवर आला; व फार दिवस पुण्यास राहिल्याचें निमित्त करून त्यांची बदली नाशकास करण्यांत आली.

श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांनीं आपल्या पुस्तकांत या वेळच्या एका संभावित गुप्त पोलिसाची हकीकत दिली आहे ती फार मनोरंजक वाटते. या भल्या प्रतिष्ठित गृहस्थानें पुण्यास श्रीमंतीचा थाट करून आणि अनेक करमणुकींच्या साधनांनीं आपल्या घरीं अड्डा पाडून पुष्कळ सद्गृहस्थ नादीं लावले होते. ही बातमी सितारामपंत चिपळूणकरांच्या उदाहरणानें रानड्यांना कळल्यावर, त्यांनीं याचीं पत्रें कोठून येतात जातात याचा छडा लावण्याकरितां गुप्त शोध चालविला. तेव्हां तो गृहस्थ गुप्तपोलीस असें ठरलें. " तिसरे दिवशीं सकाळीं सितारामपंत चिपळूणकर येऊन म्हणाले कीं परवां व काल मीं टपालाचा सगळा शोध लावला. त्या गृहस्थाचें टपाल शिपायाबरोबर येत नाहीं. ते पहांटे उठून फिरावयास म्हणून बाहेर जातात, ते प्रथम एका रस्त्यानें निघून वांकडीं तिकडीं वळणें घेऊन डेवटीं जनरल पोष्ट ऑफिसमध्यें जाऊन टपाल आपल्याच हातीं घेतात, व पाठविण्याकरितां तयार केलेलें टपाल बरोबर नेऊन आपल्या हातानेंच पेटींत टाकतात. काल त्यांच्या मागोमाग पुष्कळ अंतरावर मी होतों, त्यामुळें येतांना वाटेंत मला हें फोडलेल्या पत्राचें कव्हर सांपडलें त्याजवर सिमल्याचा छाप आहे. एकंदर गोष्टींवरून आपण घेतलेल्या संशयाला जागा पुष्कळ आहे असें आम्हालाहि आतां वाटू लागलें आहे. पोस्ट ऑफिसांतील एका मित्रानें मला आतांच सांगितलें कीं या गृहस्थांचा पत्रव्यवहार कलकत्ता व सिमला येथील गव्हर्मेंट सेक्रेटरीशीं असावा असें दिसतें. कारण त्यांच्या नांवावर यांचीं बरींच पत्रें जातात. " सितारामपंत चिपळूणकरांत गुप्तपोलिसाची हुशारीहि होती असें उघड दिसतें! गुप्तपोलिसाचा संशय व मेलेल्या उंदराची घाण दोन्ही सारखींच; कारण दोन्ही येतांच लोक घरें टाकून जातात. या सिमलेवाल्या गुप्तपोलिसाच्या पुणेकर मित्रांनींहि एका दिवसांत त्याचें घर वर्ज्य केलें, व तोहि एका रात्रींत बिऱ्हाड आटोपून अदृश्य झाला.

पण दुसऱ्याच्या टपालावर नजर ठेवण्याची रानड्यांची ही विद्या स्वतः त्यांनाहि लवकरच फळास आली. नाशकाहून त्यांची बदली धुळ्यास झाली तरी त्यांच्यावरचा संशय दूर झाला नव्हता. १८७९ सालीं वासुदेव बळवंत फडके याच्या बंडाची धामधूम सुरू होती. तींतच ता १६ मे रोजीं रानडे पुण्यास असतां, बुधवारवाडा व विश्रामबागवाडा हे दोन्ही रानडे याच नांवाच्या एका गृहस्थानें जाळले. पण तेवढ्यावरून पुढें कैक महिने, त्यांचें टपाल सरकारी हुकमानें फोडण्यांत येऊं लागलें; आणि ही केवळ संशयाची गोष्ट नसून, स्वतः पत्रें फोडणारे असि. कलेक्टर डॉ. पोलन यांनींच रानड्यांच्या जवळ माफी मागून ती कबूल केली. रानड्यांच्या नांवें पत्रें येत त्यांत दंगे, लुटालुटी, कारस्थानें वगैरे अनेक गोष्टी असत. वासुदेव बळवंत फडके किंवा हरी रामोशी हे बिचारे धुळ्यास रानड्यांना

पत्रें कशाला पाठवतील ? त्यांना असलीं पत्रें लिहविणार पोलीस व फोडविणार सरकार. पण रानड्यांनीं तीं सर्व जशींच्या तशीं परत पोलिसाकडे पाठवावीं. असा क्रम अनेक दिवस चालू होता. कालांतरानें रानड्यांविषयीं सरकारची दृष्टी निवळली, पण महाराष्ट्रांतील चळवळीचे सूत्रचालक म्हणून त्यांच्यावरचा राग सर्वस्वीं गेला नाहीं. रानडे पुढें धुळ्याहून पुण्यास आले, पुण्याहून मुंबईस गेले व त्यांनीं प्रथमपासून आरंभिलेला कार्यक्रम तसाच शेवटास नेला. रानडे व टिळक यांच्या स्वभावांत पुष्कळ फरक होता तरी टिळकांना रानड्यांपासून पुष्कळच स्फूर्ती मिळाली यांत शंका नाहीं.

शेवटीं जी एक संस्था टिळकांच्यापूर्वी पुण्यांत निघून चांगली नांवारूपासही आली होती, किंबहुना ज्या संस्थेमुळें त्यावेळीं पुण्याचें नांव तत्कालीन राजकारणांत गाजलें, तिजविषयीं दोन शब्द लिहून हें लांबत चाललें प्रकरण पुरें करूं. ही संस्था म्हणजे सार्वजनिक सभा होय. १८६७ सालापासून पुणें येथें 'पुणें असोसिएशन' या नांवाची संस्था मुंबई असोसिएशनच्या धर्तीवर निघाली होती. ती निघण्याचें कारण त्यावेळीं पर्वती संस्थानची स्थिति अतिशय वाईट झालेली असून ती सुधारावी अशी लोकांना इच्छा झाली होती हें होय. पर्वतीचे पंच असत, पण हिशेब नीट ठेवले जात नसत व नेमणुकीचा पैसा योग्य रीतीनें खर्च होत नसे. हें सर्व घडवून आणण्याकरितां एक खासगी सभा भरली तिलाच पुढें जाहीर स्वरूप आलें; तिच्यातून पुढें ही पुणें असोसिएशन निघाली, तिच्या कल्पनेंतून पुढें सार्वजनिक सभा निघाली, व अखेर स्वतः पुणें असोसिएशन सार्वजनिक सभेंत मिळून जाऊन एकजीव झाली. या कामीं काशिनाथपंत गाडगीळ, काशिनाथपंत नातू, काशिनाथपंत मराठे व केशवराव गडबोले वगैरे मंडळीं प्रमुख होती. पर्वती संस्थानाप्रमाणें इतर अनेक बाबतींत लक्ष घालण्याचें ठरून या सभेस प्रातिनिधिक स्वरूप देण्यांत आले, व त्याकरितां पन्नास हजारावर सह्या करून दिलेल्या मुखत्यारपत्रांचा पाया रचण्यांत आला. ही सभा श्रीमंत व गरीब दोन्ही प्रकारच्या लोकांचा समावेश करणारी असावी, व लोकांप्रमाणें सरकारदरबारींहि तिला मान्यता मिळावी, याकरितां अध्यक्ष उपाध्यक्षांच्या जाग्यावर महाराष्ट्रांतील प्रमुख संस्थानिक व सरदार यांचीं निवडणूक करण्यांत आली. सभेचे पहिले चिटणीस सरदार राजमाचीकर, सरदार गोखले, बाबा गोखले वकील व गणेश वासुदेव ऊर्फ काका जोशी आणि पांडुरंग पंत कर्वे असे होते. यापैकीं जोशी हेच विशेष उद्योगी व खटपटी असत. यांनीं त्या काळांत एक प्रकारें पुण्याचें नांव परप्रांतातहि केलें व अजूनही त्यांचें नांव लोक आदरानें घेतात.

जोशी यांचा जन्म १८२८ सालीं झाला. प्रथम घरच्या गरिबीमुळें यांना सरकारी नौकरी धरावी लागली. पण पुढें हायकोर्ट वकिलीची परीक्षा देऊन ते पुण्यास वकिलीचा धंदा करूं लागले व त्यांत पुढें आले. पण धंद्यापेक्षांहि सार्व-

जनिक चळवळींत त्यांचे लक्ष अधिक असें यामुळें त्यांना सार्वजनिक काका हें नांव मिळालें होतें. मल्हारावमहाराज यांच्यावर कमिशन बसलें तेव्हां एक लक्ष रुपयांची मदत करण्याची जी तार पुण्याहून गेली ती मुख्यतः यांच्याच स्फूर्ति-मुळें! उलट गरीब शेतकरी वगैरे लोकांच्या कल्याणाचीहि यांना फार काळजी वाटत असे. पुण्यातील लवाद कोर्टाची स्थापना मूळ यानींच केली, व महाराष्ट्रां-तील स्वदेशी चळवळीचेही उत्पादक हेच होत. एकादी चळवळ नांवारूपाला आणण्याकरितां जो लहरी, पण धीट व करारी स्वभाव अवश्य असतो तो यांच्या-मध्यें पूर्ण होता. १८६९ च्या पूर्वी सार्वजनिक काका यांचा पोषाख इतर लोकां-प्रमाणें मोठा प्रतिष्ठित व छानछोकीचा असे; पण स्वदेशीचें तत्त्व पटून त्याची चळवळ सुरू करिताच त्यांनीं स्वतःचा पोषाख एकदम सर्वच्यासर्व बदलला. सैनाचा पांढराशुभ्र व इस्त्री केलेला कडकडीत अंगरखा जाऊन त्याचे जागीं खादीचा अंगरखा आला. रेशिमकाठी धोतरांची जागा कंदी शेल्यानें घेतली. नेसण्याचें धोतर दाभणकाठी झालें व चक्रिदार पागोटें जाऊन त्याचें जागीं अटेरवजा जाडेंभरडें कंदी पागोटें येऊन बसलें. स्वदेशीचें हें व्रत काकांनीं जन्मभर पाळलें. सार्वजनिक सभेच्या जोडीला पुण्यास व्याख्याते निर्माण करण्याकरितां निघालेल्या वक्तृत्व सभेस त्यांनीं पुष्कळ मदत केली. स्वतः ते जरी विद्वान् वक्ते नव्हते तरी त्यांचें भाषण कळकळीमुळें परिणामकारक होई. त्यांच्या अंगच्या इतर गुणांपेक्षांही चळवळ करण्याचा गुण अधिक जबरदस्त होता. पुण्यातील सार्वजनिक सभेच्या धर्तीवर, महाराष्ट्रभर सार्वजनिक सभा नांव धारण करणाऱ्या स्थानिक पोट सभांचें जाळें पसरावें या हेतूनें त्यांनीं स्वतः हिंडून पत्रव्यवहार करून व पगारी, बिन पगारी उपदेशक पाठवून फार खटपट केली, व त्या प्रयत्नाच्या बीजाला आलेले अंकुर अजूनही कित्येक शहरीं जिवंत दिसत आहेत.

कोणत्याहि राष्ट्राचा इतिहास त्यांतील संस्थांचा इतिहास हाच होय. कोण-तीही संस्था म्हटली म्हणजे ती अनेक व्यक्तींच्या संघटित प्रयत्नांचें फळ असतें. जें फळ एकांत नाहीं तें अनेकांत मिळून लाभतें; जे गुण एकांत नाहींत ते अने-कांस मिळून कार्यास उपयोगी पडतात. म्हणून संस्था ही जशी व्यक्तीपेक्षां अधिक बलवान्, चिरायू असते व तसेंच तिला समाजाचें प्रातिनिधिक स्वरूपहि अधिक असतें. याच्या उलट कदाचित् असें म्हणतां येईल कीं जें दहांचें काम तें कोणा-चेंच नव्हे, जी जबाबदारी दहांवर वाटून गेली ती शेवटीं खरी कोणावरच उरत नाहीं. परंतु प्रत्यक्ष अनुभव पाहतां काम वाटून गेल्यामुळें मोडलेल्या संस्थांपेक्षां काम सुसंघटित झाल्यामुळें कार्यक्षम व टिकाऊ झालेल्या संस्थांचींच उदाहरणें कोणत्याहि देशांत अधिक आढळतील. महाराष्ट्रांत इंग्रजी शिक्षणापूर्वी धार्मिक संस्था नव्हत्या असें नाहीं. परंतु ऐहिक संसार व राजकारण या बाबतींत संस्था

बनवून संघटित कार्य करणें हें तितकें माहीत नव्हतें. त्याची सुरुवात इंग्रजी शिक्षणानंतर झाली. १८७१ सालीं शिंदेसरकार पुण्यास आले होते त्या वेळीं, महाराजांनीं द्रव्यद्वारा मदत केल्यास ती मिळण्याला सत्पात्र अशा संस्था कोणत्या याची ज्ञानप्रकाशानें एक यादी दिली होती. तींत खाली दिलेल्या संस्थांचा समावेश झाला होताः—(१) लायब्ररी (२) स्त्रियांचें नॉर्मल स्कूल (३) मुलींची शाळा (४) नव्या पेठेंतील भिक्षागृह (५) खाजगी इंग्रजी शाळा (६) ज्ञानप्रकाश ज्ञानचक्षू हे कारखाने (७) डेक्कन कॉलेज (८) सार्वजनिक सभा (९) वक्तृत्वोत्तेजक सभा (१०) कौशल्यशिक्षक सभा. या यादीवरून महाराष्ट्रांतील संस्थांचें जाळें विणण्यास नुकताच कोठें प्रारंभ झाला होता व याहि थोड्या संस्थांसंबंधानें तेव्हां फारसा अनुकूल ग्रह नव्हता हें निबंधमालेच्या वाचकांस माहित असेलच. आजमितीस झालें तरी संस्था नामधारी असून तिचें काम फारसें होत नाहीं असाहि प्रकार आढळत नाहीं असें नाहीं. तथापि हा दोष समान मानला तरी, संस्थांची संख्या, त्यांच्या कार्याचें वैचित्र्य, त्यांच्या संग्रही असलेलें मनुष्यबळ व द्रव्यबळ आणि त्यांच्याकडून सदोषस्थितींतहि होणारी प्रत्यक्ष चळवळ व जागृति या दृष्टीनें टिळकांपूर्वीच्या काळांत व नंतरच्या काळांत जमीन अस्मानाचें अंतर पडलेलें आहे, हें कोणासहि कबूल करावें लागेल. व हें अंतर पडण्यास स्वतः टिळक व त्यांची सहकारी मित्रमंडळी यांनीं कशा प्रकारची मदत केली हीच टिळकांच्या चरित्रावरून दिसून येणारी मुख्य गोष्ट असल्यामुळें तिचेंच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष वर्णन पुढील अनेक भागांत वाचकांस वाचावयास मिळणार आहे.

## भाग ४ था

# न्यू इंग्लिशस्कूलची स्थापना

गुम्सफी किंवा वकिली करावयाचीच नाहीं असें टिळकांचें नक्की केव्हां ठरलें हें ठरविणें थोडेसें कठीण आहे. तथापि एल्‌एल्. बी. चा अभ्यास करीत असतांहि, कायद्याच्या ज्ञानाचा उपयोग पैसे मिळविण्याकडे आपण करूं नये असा विचार त्यांच्या मनांत अनेक वेळां येऊन गेलेला असावा यांत मुळींच शंका नाहीं. इतक्या जुन्या काळीं टिळकांनीं मनानें वकिलीवर बहिष्कार घातला त्याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं, आज महात्मा गांधी ज्या कारणाकरितां न्यायकोर्टावर बहिष्कार घालावा म्हणतात त्या कारणाकरितां टिळकांनाहि तो तेव्हां घालावासा वाटत होता. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं, त्यांचा बहुतेक सर्व जन्म न्यायकोर्टांत भांडणें भांडण्यांत गेला, मग तीं स्वतःचीं असोत अथवा दुसऱ्यांचीं असोत. पंचायत पद्धति त्यांना मान्य नव्हती असें नाहीं. शक्य तेथें तिचा उपयोग करून घेण्यास ते स्वतः तयार असत व दुसऱ्यासहि तसाच सल्ला देत. पण जेथें पंचायत पद्धति प्रतिपक्षी मान्य करीत नाहीं, तेथें दावा व्यर्थ बुडूं द्यावयाचा किंवा खरा हक्क सोडावयाचा-आणि अशा रीतीनें स्वतःचें नाहक नुकसान करून घ्यावयाचें—याला मात्र त्यांची कधीं तयारी नसे. तथापि कायद्याच्या भांडणांत झालें तरी कायद्याचें ज्ञान विकून पैसे मिळवावे, ही गोष्ट त्यांना मुळीं कमीपणाची वाटत होती. म्हणूनच एल्‌एल्. बी. ची परीक्षा पास झाली असतांहि, त्यांनीं जरी एका अर्थानें जन्मभर वकिली केली, तरी दुसऱ्या अर्थानें मुळींच कधीं वकिली केली नाहीं. ते हायकोर्टाची सनदच काढते व मुंबईस जाऊन वकिलीकरितां राहते, तर इतर धंद्यासारखा तो एक धंदा म्हणून ते सनदेवर पुष्कळ पैसे मिळविते. पण आपल्या शिक्षणाचा समाजसेवेच्या कामीं इतर कांहीं तरी स्वतंत्र रीतीनें उपयोग होतो किंवा नाहीं हें आधीं ठरवून मग फार तर वकिली करावी, इतकें तरी त्यांनीं निश्चित ठरविलें असावें. स्वतः कायदेशास्त्राच्या ज्ञानाबद्दल त्यांना फार आदर व अभिमान असे. वर्तमानपत्राचा धंदा करून राजकारणांत पडूं इच्छिणारा मनुष्य त्यांजकडे आल्यास, त्याला 'एम्. ए. पेक्षांहि तूं एल्‌एल्. बी. हो' असा सल्ला ते प्रायः देत; व तोच त्यांनीं स्वतः अंमलांत आणला होता. टिळकां-पूर्वीं एल्‌एल्. बी. होऊन वकिली न करतां शाळामास्तरचें काम पत्करणारा एक तरी पदवीधर मुंबई युनिव्हर्सिटींत निघाला असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. त्या दृष्टीनें पाहतां, लोकांपेक्षां कांहीं अधिक किंवा अपूर्व, किंवा अलौकिक असें करून दाखविण्याची जी आवड टिळकांच्या मनांत जन्मभर होती, तीच 'एल्‌एल् बी. मास्तर' होण्यांत त्यांनीं प्रगट केली, यांत शंका नाहीं. कॉलेजांत

शिकत असतां टिळकांचीं सामाजिक व राजकीय मतें काय होतीं याचें दिग्दर्शन मागें करण्यांत आलेंच आहे. त्यावरून, सुशिक्षित लोकांनीं समाजाला विशेष रीतीनें उपयोगी पडावें असें टिळकांचें मत प्रथमपासून होतें, व हें घडून यावयाचें तर वकिलीपेक्षां शाळामास्तरीच अधिक उपयोगी पडेल असें टिळकांनीं मनाशीं ठरविलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

समाजाची सेवा करावयाची तर ती करण्याला मुख्य दोन मार्ग. जुन्या पिढीला उपदेश करणें व नव्या पिढीला शिक्षण देणें. पैकीं पहिला मार्ग अनुसरणें हें प्रायः पालथ्या घागरीवर पाणी घालण्यासारखेंच होय. कारण जुन्या पिढीचे पुढारी आधींच वृद्ध किंवा पोक्त असावयाचे. त्यांच्या बुद्धीचा विकास होऊन गेलेला असतो. संसारांत त्यांचे पाय रुतून गेल्यामुळें ते काढून घेऊन नव्या दिशेनें धांवणें त्यांना होत नाहीं. शिवाय मनुष्य एकदां लब्धप्रतिष्ठित बनला म्हणजे त्याला आपलें धोरण पालटणें जड जातें. यामुळें जुन्या पिढीला उपदेश करून फारसा उपयोग होत नाहीं. निदान तरुणांनीं वृद्धांना किंवा वडिलांना उपदेश करणें म्हणजे अशक्यतेला अप्रयोजकपणाची जोड मिळावयाची. याकरितां नव्या मनूचें प्रवर्तन करणारे लोक नेहमीं तरुण शिष्यांच्या पिढीवर विश्वास ठेवितात. जगांतील सर्व धर्मगुरूंनीं नव्या धर्माचा प्रसार केला तो तरुणांच्या द्वारानें. शिवाय सुशिक्षित तरुणाला शाळा व कॉलेज यांचें प्रेम जसें वाटतें तसें इतर संस्थांचें वाटत नाहीं. विद्यादानांत स्वाभाविक गुणच तसा आहे. पूर्वीं काय किंवा आतां काय सुशिक्षितांत वकिलापेक्षां प्रोफेसरालाच मान अधिक. यामुळें टिळकांना लोकसेवेला प्रारंभ करावयाचा तो एखादी शिक्षणसंस्था स्थापूनच करावा असें वाटलें असावें.

शाळा काढण्यापूर्वीं शिक्षकवर्गाविषयीं टिळकांचीं मतें काय होतीं हें कळण्यास साधन नाहीं. पण टिळकांना ज्यांच्यापासून अंशतः स्फूर्ति मिळाली, किंवा निदान शाळा काढण्याच्या उद्योगांत त्यांना जे सन्मान्य सहकारी लाभले त्यांची, म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचीं मतें, याविषयीं काय होतीं हें सांगतां येतें. 'शालापत्रक' नामक मासिक पुस्तकाच्या सन १८७२ च्या जानेवारीच्या अंकांत विष्णुशास्त्री यांनीं 'शिक्षकाचें काम' या विषयावर लिहिलेला निबंध त्यांच्या 'किरकोळ लेखसंग्रहांत' छापला आहे. त्यांत त्यांनीं खालील प्रकारचे विचार प्रकट केले आहेत. " हल्लीं विद्येचा फार फैलाव झाला, व अभिरुचि वाढली, असें वाटतें पण ती भ्रांति आहे. केवळ सरकारी चाकरीच्या लोभानेंच आमचे लोक विद्या शिकतात. त्यांना विद्येचें व्यसनच काय पण साधारण आवडहि नसते. युनिव्हर्सिटीचे झगे अंगांतून काढतांना त्याबरोबरच स्वदेशाभिमान, विद्याभिरुची, दुर्जनतिरस्कार वगैरे सणावाराच्या दिवशीं घालावयाचीं जीं मनाचीं अलंकारभूषणें तींहि ते काढून ठेवतात. स्वतः शिक्षकालाच आपल्या कामाची थोरवी वाटत नाहीं; मग ती इतरांना कशी वाटावी ? उपाय नाहीं म्हणून शिक्षकाचें काम

करावयाचें ही जी त्यांची समजूत तीच लोकांची. पूर्वी गुरुविषयीं शिष्याचे मनांत पूज्यबुद्धि असे. हल्लीं ती नाहीं. उभयपक्षीं संबंध केवळ स्वार्थाचा. शिकविण्याचे विषयहि बांधलेले. धर्म, नीति वगैरेचें वारें देखील शिक्षणाला लागूं नये अशी सरकारची व्यवस्था. पण ही स्थिति बदलून शिक्षण चालू असतां शिक्षक जर विद्यार्थ्यांच्या मनांत विद्येची खरी थोरवी भरून देऊन तिच्या अभ्यासानें होणाऱ्या अनिर्वाच्य सुखाची त्यांना चट लावून उत्साह उत्पन्न करतील तर शिक्षण हें, ठिसूळ न बनतां तरवारीच्या पोलादासारखें कठीण व लखलखीत होऊन, फार दिवस धिन्दाड करून ज्या अरिष्टरूपी राक्षसांनीं या देशास जेरीस आणलें त्यांचें निर्दाळण करील, व तेणेंकरून सुशिक्षित लोक व त्यांचे कारागीर म्हणजे शिक्षक यांचें दिव्य यश भूमंडळावर मिरवेल." पेरिक्लिस्, अलकिबाइडीज्, शिकंदर वगैरे पुरुषांना देशकार्यक्षम करण्याला त्यांचे विद्यादाते गुरुच कारणीभूत झाले, ही गोष्ट शास्त्रीबोवांनीं या लेखांत मुद्दाम नमूद केली आहे. व महाराष्ट्रांतील भावी पिढी अशीच देशकार्यक्षम व्हावयाची तर तिलाहि वेळींच उत्तम शिक्षक लाभले पाहिजेत अशी त्यांची खात्री होती.

जी विचारसरणी विष्णुशास्त्र्यांची तीच टिळकांची असल्यास नवल नाहीं. कारण या उभयतांमध्यें स्वभावभेद कांहीं कांहीं गोष्टींत असला तरी दोघांची विचारसरणी राष्ट्रीय बाबतींत एकच होती असें दिसतें. निबंधमालेमुळें शास्त्रीबोवांचा लौकिक वाढला, व त्यांतल्या त्यांत तरुण विद्यार्थीवर्गांत ते फारच लोकप्रिय झाले होते. शिवाय सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन स्वतंत्र खाजगी शाळा पुण्यास काढण्याचा त्यांचा विचार असल्याचें लोकांना समजलें होतें. पण एका मनुष्यानें शाळा काढून ती कशी निघणार ? अर्थात् एखादी चालू जुनी संस्था हातीं घेणें, किंवा नवीन शाळा चालविण्यास पुरतील इतक्या सहकारी शिक्षकांचा संच जुळविणें, हे दोन मार्ग वरील अडचण दूर होण्यास उपलब्ध असतात. पैकीं पहिला मार्ग अधिक सुलभ. खासगी शाळांची वाण पुण्यास केव्हांहि पडणारी नव्हे. शास्त्रीबोवा पुण्यास येण्यापूर्वी दोन खासगी इंग्रजी शाळा चालू होत्या. एक सुप्रसिद्ध बाबा गोखले यांची. हे गृहस्थ वकील होण्यापूर्वी शाळामास्तर होते. इंग्रजी ज्ञानाबद्दल यांचा लौकिक विशेष होता. पुण्यांतील त्या वेळच्या मिशनरी शाळांबरोबर टक्कर देणारी म्हणून बाबांच्या शाळेचा लौकिक होता. शिवाय, स्वतः विष्णुशास्त्री बी. ए. च्या वर्गांत एक दोन वर्षें लोंबकळल्यामुळें, १८७१ सालीं याच शाळेंत त्यांनीं शिक्षकाचें कामहि केलें होतें. कालांतरानें बाबा गोखले यांची वकिली बरी चालूं लागल्यामुळें त्यांनीं आपली शाळा १८७६ सालीं बंद केली होती. अर्थात् तिचें पुनरुज्जीवन केल्यास एका जुन्या संस्थेची परंपरा चालविण्याचें श्रेय लाभण्यासारखें होतें. पण या दृष्टीनें विशेष विचार करण्यापूर्वी हुसन्याव एका चालू असलेल्या खासगी इंग्रजी शाळेच्या चालकांनीं शास्त्री-

बोवांची गांठ घेऊन, आपल्या शाळेस येऊन मिळण्याविषयीं त्यांना आग्रहाची विनंति सुरू केली. ही शाळा म्हणजे ' धी पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशन' ही होय. तिचे चालक वामन प्रभाकर भावे यांची कर्तबगारी शिक्षकापेक्षां व्यवस्थापक या नात्यानेंच अधिक होती. नेटिव्ह, युरोपियन, मिशनरी, लष्करी अधिकारी—जो कोणी प्रतिष्ठित मनुष्य भेटेल त्याला शाळा पहाण्यास आग्रहानें बोलवावयाचें व त्याला पानसुपारी करून त्याचा चांगला शेरा घ्यावयाचा, या कामांत भावे यांचा हातखंडा असे. पण त्यांच्या अंगीं स्वाभिमानी बाणेदारपणाचा गुण फारसा नव्हता. इतकेंच काय, पण युरोपियन मिशनरी लोक व अधिकारी वर्ग यांच्याशीं वर्तणूक ठेवण्याच्या बाबतींत भावे व चिपळूणकर यांच्यामध्यें उत्तर दक्षिण ध्रुवांइतकें अंतर होतें. ही गोष्ट शास्त्रीबुवांना माहीत होती. भावे यांच्या शाळेस ते जाऊन मिळते तर सहजच त्यांच्याकडे मुख्य अध्यापकाचें काम आलें असतें तरी, वरील कारणामुळें या भानगडींत पडण्याकडे त्यांचें मन घेईना. व्यवस्थापक या नात्यानें भावे रोज एक लब्धप्रतिष्ठित मनुष्य शाळा पाहण्यास घेऊन येणार, व सरकारी आश्रयानें प्रतिष्ठेत वाढलेला मनुष्य दिसला कीं शास्त्रीबोवा कपाळास आंठ्या घालून दुसरीकडे तोंड फिरविणार. या दोन गोष्टी कशा जमाव्या ? शिवाय या संस्थेतील इतर शिक्षकवर्गांत नामांकित किंवा तरतरीत असा एकहि मनुष्य नव्हता. असल्या नादानांच्या मेळ्यांत सांपडून आपण कार्य तें काय करणार, असें शास्त्रीबोवांस वाटणें स्वाभाविकच होतें; व काय करावें याविषयीं त्यांचा निश्चय होईना.

पण इतक्यांत वर दर्शविलेल्या दोन मार्गांपैकीं दुसरा व अधिक सोयीचा मार्ग कर्मधर्मसंयोगानें त्यांच्यापुढें आयताच मोकळा झाला. त्याचा प्रकार असा. उंच जागेवर पाणी सांचलें असतां खालीं अनेक ठिकाणीं स्वतंत्र रीतीनें झरे उमळतात. ज्या वातावरणांत वाढल्यानें शास्त्रीबोवांच्या मनांत स्वातंत्र्याची स्फूर्ति झाली, त्याच वातावरणांत त्यांच्या खालोखालच्या पिढींतील तरुण मुलें वाढत होतीं; मग त्यांच्याहि अंगीं स्वातंत्र्याची स्फूर्ति झाली असल्यास काय नवल ? व खरोखरच या सुमारास डेक्कन कॉलेजांत वास्तव्य करून राहणाऱ्या कांहीं विद्यार्थ्यांच्या मनांत हीच स्फूर्ति उत्पन्न झाली होती असें प्रत्ययासहि आलें. कारण या सुमारास टिळक, आगरकर वगैरे विद्यार्थिदशेंत असतांच, जगांत आपण पुढें काय करावें याविषयीं मोठ्या उत्सुकतेनें व गंभीरपणानें विचार करीत होते. आपल्या डुंगरीच्या तुरुंगवासवर्णनाच्या पुस्तकांत आगरकर लिहितात, "मी एम्. ए. करितां व टिळक एल्. एल्. बी. करितां अभ्यास करण्यासाठीं कॉलेजांत राहिलों असतां, सरकारी नोकरी न पत्करितां देशसेवेंत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशीं निश्चय केला, त्या दिवसापासून आम्हीं जें जें बोललों चाललों होतों त्याची तुरुंगांत पुनः पुनः आठवण होऊन अनेक वेळां पुनरावृत्ति होत असे." शास्त्रीबुवा टिळकांपेक्षां सहा वर्षांनीं वडील; व टिळक बी. ए. होण्यापूर्वीं दोन वर्षें निबंधमाला सुरू झाली.

असून, नॅटिव्ह गॅझेट पत्रांत तिच्या राजद्रोही स्वरूपाविषयीं उघड गवगवाहि झाला होता. तथापि टिळकांनीं आपली सर्व स्फूर्ति शास्त्रीबोवांपासूनच घेतली होती, असें मानण्यास फारसें कारण नाहीं. निबंधमाला सुरू होण्यापूर्वीच टिळक व त्यांचे सहाध्यायी यांचीं कॉलेजमध्यें परस्परांत काय काय संभाषणें होत, याविषयीं उपलब्ध असलेल्या माहितीवरून असें दिसतें कीं, शास्त्रीबोवांच्या दीपज्योतीनें टिळकांच्या स्फूर्तीची ज्योत पेटलेली नसून, शास्त्रीबोवा व टिळक या दोघांच्याहि ज्योति परिस्थितीच्या विद्युत्प्रवाहावर स्वतंत्रपणें पेटल्या गेल्या होत्या. टिळकांची स्फूर्ति शास्त्रीबोवांपासून न मिळतां ती आगरकरांपासून मिळालेली होती असें एक विधान कित्येकांनीं केलेलें आमचे पाहण्यांत आहे; पण यालाहि फारसा आधार आहे असें आम्हांस वाटत नाहीं. कसेंहि असो, शास्त्रीबोवा राजिनामा देऊन पुण्यास येण्याच्यापूर्वीच टिळक–आगरकर यांचें भावी आयुष्य सार्वजनिक कार्यांत, विशेषतः शिक्षणविषयक कार्यांत, घालविण्याचें ठरलें होतें. यामुळें शास्त्रीबोवा नवीन इंग्रजी शाळा काढणार अशी बातमी समजतांच, या उभयतांनीं शास्त्रीबोवांना भेटून आपलें मनोगत कळविलें; आणि तुम्ही शाळा काढीत असाल तर आम्हीहि येऊन तुम्हास मिळतों असें सांगितलें यांत नवल नाहीं. टिळक–आगरकरांबरोबर भागवत व करंदीकर असे इतरहि दोन तरुण विद्यार्थी या शुभ संकल्पांत सामील होते. पैकीं भागवत म्हणजे बाळाजी आबाजी भागवत हे पुढें हायकोर्ट वकील झाले, आणि अखेर इंदूर संस्थानांत बरींच वर्षें न्यायखात्यांतील अधिकाऱ्याचें काम करून हल्लीं सदर संस्थानांतील पेन्शन उपभोगीत आहेत. कॉलेजांत त्यांचा ऐच्छिक विषय इतिहास हा असून त्यांचे अंगीं बहुश्रुतपणा दिसून येई. करंदीकर म्हणजे व्यंकटेश बाळाजी करंदीकर, हे बी. ए. झाल्यावर ग्रँट मेडिकल कालेजमध्यें गेले, व पुढें एल्. एम्. ऍंड एस् होऊन सरकारी नोकरींत असिस्टंट सर्जनपर्यंत वाढले. मूळ विचारांत टिळक–आगरकरांबरोबर हे दोघेहि होते. पण पुढें लवकरच त्यांनीं आपल्या विचाराची दिशा बदलली. असो. १८७९ च्या सप्टेंबर महिन्यांत एके रात्रीं टिळक–आगरकर हे शास्त्रीबोवांस नारायण पेठेंतील त्यांच्या घरीं भेटले, व त्यांनीं आपला बेत त्यांना कळविला. तेव्हां शास्त्रीबोवांस अर्थातच अतिशय आनंद झाला. कारण नवी शाळा व नवे शिक्षक हाच मार्ग एकंदरीनें अधिक श्रेयस्कर हें त्यांच्याहि मनाला पटण्यासारखेंच होतें. ता. १३ सप्टेंबर १८७९ रोजीं शास्त्रीबोवांनीं आपले धाकटे बंधु लक्ष्मणराव यांस एक पत्र पाठविलें त्यांत, आपला संकल्प हवातसा तडीस नेण्याचा योग अकल्पित रीतीनें सिद्धीस गेल्याची सुख खबर मोठ्या ऐटीनें त्यांनीं खालील शब्दांनीं लिहिली:—

"The memorable 1st of October is approaching. I shall enjoy the pleasure of kicking off my chains that day. Mr. Agarkar (going for M. A.), Mr. Tilak (going for L. L. B.), Mr. Bhagwat and

Karandikar (appearing for B. A.) have tendered proposals for joining me in the enterprise. This they have done of their own accord. We have settled 1st of January for the hoisting of the standard. Such a battery must carry the High School instantaneously before it."

" ता. १ आक्टोबरचा संस्मरणीय दिवस जवळ येत चालला आहे. गुलामगिरीच्या बेड्या लाथेनें तोडून टाकून मोकळा होण्याचें सुख त्यादिवशीं मला अनुभवावयास मिळणार आहे. टिळक, आगरकर, भागवत, करंदीकर यांनीं आपण होऊन मजकडे येऊन (शाळा काढण्याच्या) माझ्या धाडसाच्या कृत्यांत सामील होण्याचें स्वतःच्या खुषीनें कबूल केलें आहे. ता. १ जानेवारी १८८० हा दिवस आमचें निशाण उभारण्याला आम्हीं मुक्रर केला आहे. अशा तोफखान्यापुढें (सरकारी) हायस्कूल किती वेळ टिकाव धरणार? तें तात्त्वडतोब जमीनदोस्त झालेंच पाहिजे." मात्र ता. १ जानेवारी रोजीं शाळा उघडण्याऐवजीं ती ता. २ रोजीं उघडली इतकाच वेळेंत फरक झाला. पण उपरिनिर्दिष्ट गोलंदाजांपैकीं त्यादिवशीं फक्त दोघेच वीर मोर्चेबंदीवर हजर झाले. तोफ डागण्याचें काम शास्त्रीबोवा व टिळक यांच्यावरच येऊन पडलें. याचें कारण, एम्. ए त नापास झाल्यानें आगरकरांचा अभ्यास आणखी एक वर्षाचा शिल्लक राहिला होता, व थोडक्याकरितां पदवी बुडवून शाळेला येऊन मिळण्यांत आगरकरांपेक्षांहि शाळेचेंच नुकसान अधिक. त्यांनीं वर्षभर मागें रहावें असा सल्ला त्यांना मिळाला, व तो सर्व प्रकारें योग्यच होता. करंदीकर व भागवत यांची गोष्ट तशी नव्हती. त्यांच्या उत्साहावर दुसऱ्या कोणी फुंकर घातला म्हणा, किंवा स्वतः त्यांची बुद्धीच मागाहून चळली म्हणा, त्यांची हौस आयत्यावेळीं थिजली खरी. तें कसेंहि असो; त्यांच्यावांचून या नव्या शाळेचें कांहीं अडलें नाहीं; उलट त्यांच्याहून अधिक खंबीर व हुषार माणसें संस्थेला लवकरच लाभलीं; व तोफेचा गोळा जो एकदां सुरू झाला तो पुढें केव्हांहि थांबला नाहीं. पण शास्त्रीबोवांच्या हौशी इच्छेप्रमाणें सरकारी हायस्कूलचा किल्ला प्रत्यक्ष जमीनदोस्त झाला नाहीं. शास्त्रीबोवांचा राग हायस्कूलावर दोन कारणांनीं होता. तें सरकारी म्हणून, व विशेषतः त्याचे अध्यक्ष माधवराव कुंटे म्हणून! पण शास्त्रीबोवांनीं आपल्या तोफांचा कितीहि भडिमार केला तरी, हायस्कूलच्या तटामागें सरकारी खजिन्यांतील रुपयांचीं पोतीं, व सरकारच्या हुकुमालाच काय पण त्याच्या साध्या कृपाकटाक्षालाहि वश असणाऱ्या पालकांच्या मुलांची शिबंदी उभी असल्याकारणानें, किल्ला जरी जागजागीं ढांसळला, त्यावरचें निशाण मोडून पडलें, तरी दरवाजाचे बुरूज जमीनदोस्त झाले नाहींत. मात्र शास्त्रीबोवांच्या नवीन शाळेनें आपलें प्रस्थ थोड्याच महिन्यांत पुण्यांत इतकें चांगलें बसविलें कीं, सरकारी हायस्कूलांतील विद्यमान व भावी विद्यार्थ्यांच्या पहिल्या पहिल्या रांगा ओस पडल्या,

आणि कुंत्यांचा नूर पुष्कळच उतरला. असलीं विक्षिप्त " रोमँटिक पोरें " प्रत्यक्ष पराक्रम कितीसा करणार ? अशी जी त्यांची गुर्मी होती ती खास जिरली. फार काय पण रे. प्रि. मॅक्किकन यांनीं असे लेखी उद्गार काढले कीं, ' सरकारी मदत कोणत्याहि प्रकारें न घेतां किंवा घेण्याची आशाहि न धरतां, पुण्यांतील ही संस्था अशा धडाडीनें उच्च शिक्षणाचें काम करूं लागली असल्यानें, दरसाल ११–११॥ हजार रुपये खर्च करून पुण्याचें सरकारी हायस्कूल कां चालू ठेवावें हा प्रश्नच आहे.' सरकारी हायस्कूलचा खर्च पुढें कमी होण्याऐवजीं उलट वाढूंच लागला, व शिक्षणाचा मगदूर किंवा विद्यार्थ्यांची संख्या कोणत्याहि रीतीनें वाढली नाहीं; असें असतां खर्चाच्या भरीस भर म्हणून युरोपियन हेडमास्तर या शाळेवर नेमण्याचें सरकारनें १८९० पासून ठरविलें! पण हा तांत्रिक तोडगाहि फुकट गेला. तरी सरकारनें हायस्कूल बंद न करतां, तें सन १९१२ सालीं, शहराबाहेर नेऊन इंग्लंडांतील ' पब्लिक ' स्कूलच्या धर्तीवर, म्हणजे श्रीमंतांकरितां श्रीमंती थाटानें चालवावयाचें ठरविलें, व त्यावर दहा पंधरा लक्ष रुपयेहि मंजूर झाले. पण पुढें जागेची पंचाईत; नंतर महायुद्धामुळें काटकसरीची जरूरी, व शेवटीं विद्याखात्यावर जबाबदार दिवाणाची नेमणूक झाली. या सर्व कारणांमुळें सन १९२२ च्या मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेस हें सरकारी हायस्कूल एकदांचें बंद झालें. विष्णुशास्त्र्यांच्या तोफेंतून सुटलेल्या गोळ्यांना विश्रामबागेच्या किल्ल्यांत बेचाळीस वर्षे दबा धरून बसावें लागलें. पण राजकारणाच्या वातावरणांत जरूर ती उष्णता उत्पन्न झाल्यावर त्या गोळ्यांनीं अखेर आपला स्फोट केलाच केला, सोडला नाहीं. गोलंदाजापेक्षां दारूचें आयुष्य अधिक ठरलें !

तारीख १ जानेवारी १८८० रोजीं ही नवीन शाळा उघडण्याचा समारंभ यथाविधि झाला. पण आदलेच दिवशीं उत्तररात्रीं शास्त्रीबोवांचे घरीं एक अपमृत्यु झाल्याकारणानें, त्यांना किंवा इतरानांहि त्या सर्व दिवसभर शिक्षणाचें वगैरे काम रीतसर करितां आलें नाहीं. तें काम व्यवस्थितपणें ता. २ रोजीं सुरू झालें. नव्या संस्थेचाच काय पण जुन्या शिक्षणसंस्थांचाहि एखाद्या मोठ्या सुटीनंतरचा पहिला दिवस असाच किरकोळ हडेलहप्पींत जात असतो. त्याप्रमाणें याहि शाळेंत पहिल्या दिवसाचें काम मुलांचीं नांवें पटावर नोंदण्यापुरतेंच झालें. नवीन शाळेंत सुरवातीच्या हजेरींत १९ मुलें असलीं तरी, मुलांची पटावरील संख्या भरपूर म्हणजे पहिल्याच दिवशीं दीडशेंपर्यंत झाली; व ती पुढें एकसारखी वाढतच गेली.

शाळेच्या सुरवातीस शास्त्रीबोवा व टिळक हे दोघे होतेच, पण त्यांच्याबरोबर इतरहि कांहीं होतकरू माणसें होती. तीं म्हणजे माधवराव नामजोशी, वासुदेवशास्त्री खरे, नंदर्गीकरशास्त्री, हरी कृष्ण दामले, कृष्णराव मांडे, व मुळे हीं होत. पैकीं नामजोशी हे विशेष परीक्षा वगैरे पास झाले नसतांहि, स्वावलंबी संपादक व व्यवहारचतुर आणि उद्योगी असे सार्वजनिक कार्यप्रेमी, म्हणून पुण्यांतील प्रमुख

लोकांना त्यांची हळू हळू माहिती होत होती; व पुढील पांच सात वर्षांत आपल्या उलाढाली स्वभावानें व धीटपणानें त्यांनीं लोकांत व सरकार दरबारांत आपलें वजन खूप वसविलें ही गोष्ट प्रसिद्धच आहे. वासुदेवशास्त्री खरे हे या सुमारास काशिनाथ नारायण साने व जनार्दन बाळाजी मोडक यांचे बरोबर काव्येतिहास-संग्रहाच्या संपादकाचें काम करीत असत. त्यांच्याकडे विशेषतः या मासिक पुस्त-कांतील संस्कृत भाग दिलेला होता. खरेशास्त्री हे पुढें सुप्रसिद्ध कवि, नाटककार, व इतिहाससंशोधक झाले, हें मराठी वाचक वर्गास विदित आहेच. नंदर्गीकरशास्त्री यांनीं पुढें वृद्धापकाळपर्यंत या शाळेस चिकटून राहून संस्कृत शिकविण्याचें काम केलें. हरी कृष्ण दामले यांजकडे मागाहून शास्त्रीबोवांच्या किताबखान्याची म्हणजे पुस्तकाच्या दुकानाची व्यवस्था आल्यामुळें त्यांनी शाळा सोडली व किताबखाना मोठ्या भरभराटीस आणला. त्यांनीं कांहीं शालोपयोगी पुस्तकें प्रसिद्ध केलीं; पण मुख्यतः कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं आरंभलेलें 'अरेबियन नाइटस्'चें मराठी भाषां-तर पुरें केलें. मांडे यांचा श्रीशिवाजी या नांवाचा छापखाना व त्याच नांवाचें वर्त-मानपत्र १८८० सालापूर्वीपासूनच चालू होतें; व भरींत भर म्हणून शिक्षकाचेंहि काम त्यांनीं पत्करलें. त्यांचें वर्तमानपत्र व छापखाना हीं दोन्हींहि पुढें नांवारूपास आलीं नाहींत; तथापि वक्तृत्वोत्तेजक सभेचे चिटणीस वगैरे सार्वजनिक कामें त्यांनीं यथा-शक्ति केलीं. तात्पर्य, या नवीन शाळेच्या प्रथम शिक्षकवर्गांत अशींच माणसें आलीं होतीं कीं ज्यांना सार्वजनिक कार्याची थोडीबहुत तरी गोडी होती.

ही नवीन शाळा बुधवारपेठेंतील सुप्रसिद्ध मोरोबादादा फडनवीस यांच्या वाड्याच्या पुढील चौकांत उघडली गेली. हा वाडा त्या वेळीं चांगल्या स्थितींत होता, व चौकांत जागाहि पुरेशी होती. शाळेचें नांव 'न्यू इंग्लिश स्कूल' असें इंग्रजींच ठेवण्यांत आलें. कारण तींत सर्व शिक्षण फक्त इंग्रजी हायस्कुलाच्या सात इयत्तांचेंच व्हावयाचें होतें. राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना याहि वेळीं लोकांच्या मनांत उदित झालेली होती. परंतु तिला बाचारंभण किंवा नामधेय अजून मिळालेलें नव्हतें इतकेंच. कारण त्या वर्षी मे महिन्याच्या सुट्टीकरितां शाळा बंद होण्याच्या वेळीं शास्त्रीबोवांनीं जें इंग्रजींत लेखी भाषण वाचून दाखविलें त्यांत राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना अनेक अंगांनीं झळकत होती. या भाषणांत त्यांनीं पुण्यांतील इतर मृत किंवा मृतप्राय अशा शिक्षणसंस्थांचा तुच्छतेनें उल्लेख केला, व अवघ्या तीन महिन्यांत या शाळेंतील मुलांची संख्या ५०० पर्यंत गेल्याविषयीं सहजच अभि-मान व्यक्त केला. विरुद्ध बाजूचे सरकारी शाळाधिकाऱ्यांचे प्रयत्न, त्यांच्या जोडीला लोकांची नेहमींची अनास्था, वगैरे अडचणींतून शाळेनें खरोखरच अकल्पित रीतीनें आपलें डोकें इतकें वर काढलें होतें. या भाषणांतील शब्द किंचित् उद्दाम वृत्तीचे होते यांत शंका नाहीं. पण शास्त्रीबोवा व त्यांचे तरुण सहकारी मित्र यांनीं तत्का-लीन लब्धप्रतिष्ठितांकडून खुळे, वेडे, टाकाऊ, भ्रांतिष्ट, शेख महंमदी, माथेफिरू

असल्या शेलक्या विशेषणांची वृष्टि सोसलेली होती. या वेळचे विश्रामबाग हायस्कूलचे हेडमास्तर वामन आबाजी मोडक यांनीं, या भाषणापूर्वी थोडे दिवस, आपल्या शाळेचा वार्षिक अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविला त्यांत, हायस्कुलांतील विद्यार्थ्यांची संख्या न्यू इंग्लिश स्कूलमुळें कमी झाली ही गोष्ट कबूल करावी लागत असतांहि, तिचा परिहार करण्याचे हेतूनें, खालील वाक्यें घातलीं होतीं. "येथें कांहीं उनाड व हुच्चे तरुण लोकांनीं एक नवीन खासगी शाळा काढल्यामुळें तूर्त आमच्या शाळेंतील संख्या कमी झाली आहे. परंतु अशा शाळांची स्थिति केवळ कुत्र्याचे...झाडाप्रमाणें क्षणिक असल्यामुळें आमच्या शाळेची संख्या नेहमींची कमी होण्याची फारशी भीति नाहीं." मोडकांसारख्या पोक्त, शांतवृत्तीच्या, धार्मिक प्रवृत्तीच्या आणि स्थिरपदस्थ मनुष्याच्या तोंडून जर असले शब्द निघतात, तर ते कानांत सलत असतां, कार्यसिद्धीच्या व उत्कर्षाच्या भरांत, शास्त्रीबोवांच्याहि तोंडून किंचित् उद्दामपणाचे शब्द निघाले असल्यास तें क्षम्यच मानलें जाईल. प्रतिपक्षाच्या प्रयत्नांना "Little interested doings of little folks" व "Mean devices of disappointed malice" 'क्षुद्र लोकांचीं क्षुद्र कारस्थानें' आणि 'निराशाग्रस्त मत्सरी लोकांचे दुष्ट प्रयत्न' अशीं विशेषणें लावलीं गेलीं हें खरें; पण तीं सर्वस्वीं अन्यायाचीं होतीं असें प्रि. मोडक यांच्या अहवालांतील वरील उतारा वाचल्यावर कोणी म्हणणार नाहीं.

असो. शास्त्रीबोवांच्या भाषणांतील इतर मुद्दे खालीलप्रमाणें होते. "आमच्या शाळेंत शिक्षकांप्रमाणें विद्यार्थ्यांनाहि पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य दिलें जातें. दर तासाला हातांत छडी घेऊन वर्गांवरून तपासणीची घस्त घालीत जाणारा हेडमास्तर येथें भेटणार नाहीं. सरकारी इन्स्पेक्टराचा बागुलबोवा केव्हां फेरी घालील काय कीं, अशी दहशत शिक्षकांनाहि वाटावयाला नको. नवा हेडमास्तर आला कीं तो आपल्या लहरीप्रमाणें पोशाख चालचलणूक वगैरेची नवीन शिस्त पाडतो, व तिचा अंमल चोपून करवितो, ही आपत्तिहि येथें अनुभवास येणार नाहीं. सरकारी शाळांतून पाहिलें तर धड्याळ व वेळापत्रक यांच्या यंत्रांत सांपडून शिक्षक कळसूत्री बाहुल्याप्रमाणें कामें करीत असतात; व पोटाला भाकर मिळावी म्हणून वरिष्ठाची आशा शेळपटपणानें पाळून व स्वाभिमान गिळून वरिष्ठांच्या गुरगुरण्याच्या आवाजांत मेंढरांप्रमाणें मुठींत जीव धरून काळ कंठीत असतात. आमच्या शाळेंत अनादिसिद्ध अशी वेताची छडी दिसणार नाहीं, किंवा कोणा विद्यार्थ्यानें योग्य शिस्तीचें अतिक्रमण केल्यास तिकडे दुर्लक्ष केलें जाईल असेंहि नाहीं. तथापि पंतोजी या एका शब्दांत जी कदर पूर्वानुभवानें सांठविलेली आहे ती या ठिकाणीं बरीच सौम्य झालेली विद्यार्थ्यांना आढळून येईल. शाळातपासनीस हा जसा शिक्षकांना बागुलबोवा वाटणार नाहीं तसाच विद्यार्थ्यांनाहि शिक्षक हा बागुलबोवा वाटणार नाहीं. परिप्रश्नपद्धतीनें ज्ञान मिळविण्याची मोकळीक विद्यार्थ्यांना हवी

तितकी मिळेल. विचाऱ्या विद्यार्थ्यानें माहिती मिळण्याकरितां प्रश्न विचारावे, आणि अज्ञानी शिक्षकानें अज्ञानाची लाज झांकण्याकरितां उगीच गुरगुरावें किंवा उलट विद्यार्थ्यांवर खेंकसून तोंड टाकावें, असेंहि येथें होऊं दिलें जाणार नाहीं. तरुण विद्यार्थी हे बोलूनचालून भावनाप्रधानच असतात ही गोष्ट लक्षांत ठेऊन, त्यांच्या खुल्या उद्गारांना उमॅटपणा हें भलतें नांव आम्हाकडून देण्यांत येणार नाहीं; व त्यांच्या प्रगतिशील प्रवृत्ति केवळ शिस्तीच्या वजनाखालीं दडपून टाकल्या जाणार नाहींत. "

विद्यार्थ्यांनाहि त्यांनीं जो उपदेश केला तो समंजसपणाचाच होता. ते त्यांना म्हणाले " बाबांनों, झोंपा काढून, किंवा उनाडक्या करून, पैशापासरी शिष्यवृत्त्या खाऊन बी. ए. म्हणून गांवीं परत गेलें कीं लोकांनीं अद्भुतदर्शन म्हणून आपल्या भेटीस यावें, हे जुने दिवस आतां गेले. हल्लीं जीवनकलह दसपट तीक्ष्ण झाला आहे. धकाधकीचा मामला जोरांत चालला आहे. म्हणून सुट्टयांच्याहि दिवसांत तुम्हांला झटून अभ्यास केला पाहिजे. धनुष्याची दोरी नेहमींच चढवून ठेऊं नये हें खरें, पण अभ्यास व करमणूक यांच्या आलटापालटीनें दोहोंचाहि मेळ घालावा. खेडेगांवीं जाणाऱ्या विद्यार्थ्यांनीं सृष्टिसौंदर्य व सुख यांचा लाभ घ्यावा. पुण्यासारख्या मोठ्या शहरांतून सार्वजनिक हितबुद्धीनें अनेक लोकांनीं अनेक संस्था निर्माण करून ठेविलेल्या असतात त्यांचाहि लाभ विद्यार्थ्यांना सहज मिळण्यासारखा असतो." शास्त्रिबोवांनीं दिग्दर्शित केलेल्या बऱ्याच गोष्टी प्रथम प्रथम तरी अनुभवास आल्या खऱ्या. पण कालांतरानें याहि शाळेचें स्वरूप हळू हळू कसें बदललें याचा इतिहास बराच मनोरंजक होईल. जोंपर्यंत सरकारी ग्रँट घेतली जात नव्हती तोंपर्यंत इन्स्पेक्टरचा बागुलबुवा दिसण्याचें कारणच नव्हतें, पण पुढें ही स्थिति पालटली. कारण सरकारी ग्रँट मागण्यांत व घेण्यांत येऊं लागली. आणि खासगी शाळेंतील शिक्षक इन्स्पेक्टरला व्यक्तिशः जरी फारसे भीत नाहींत, तरी संस्थेला जास्त ग्रँट मिळण्याला इन्स्पेक्टरची शिफारस अवश्य असल्यानें, स्वतःकरितां नसलें तरी संस्थेकरितां त्यांना किंचित् दबून नमून वागावें लागतेंच. स्वतः शास्त्रीबोवा हे वेळापत्रकाला फारशी किंमत देणारे नव्हते, तरी त्यांनीं इतर शिक्षकांच्या वेलाप्रांतावर अतिक्रमण केल्यास कुरकुर अगदींच होत नसे असें नाहीं. पुढें पुढें तर, म्हणजे वामन शिवराम आपटे हे शाळेचे सुपरिंटेंडेंट झाल्यापासून, घड्याळ वेळापत्रक व छडी या तिहींचा अम्मल बराच करडा सुरू झाला. पण त्यामुळें शाळेची लोकप्रियता किंवा वैशिष्टय कमी झालें असें मात्र कोणी मानिलें नाहीं. तात्पर्य, शास्त्रिबोवांच्या भाषणांतील सर्वच मुद्यांना राष्ट्रीय शिक्षणाच्या दृष्टीनें सारखेंच महत्त्व नसलें तरी, जुन्या सरकारी शाळांचें जें ध्वनि-चित्र त्यांनीं पांच चार वाक्यांत कुशलतेनें रंगविलें आहे तें यथार्थतेमुळें कोणा-सहि हृदयंगम वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

न्यू इंग्लिशस्कूलची परिणति होऊन त्याच्या स्थापनेपासून बरोबर पांचव्या वर्षी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचें फर्ग्युसन कॉलेज उघडण्यांत आलें. तेव्हांपासून पुढें कॉलेजचेंच नांव लोकांत विशेष चालतें होऊन त्या मानानें शाळेचें नांव किंचित् मागें पडलें. अर्थात् या शाळेचा स्वतंत्र असा इतिहास या पहिल्या पांच वर्षांत झाला तोच खरा; व या मुदतींतील तिचा इतिहास खरोखरच मोठा स्फूर्तिदायक वाटतो. विद्यार्थ्यांची संख्या पहिल्याच दिवशीं हजर १९ व पटावर १५० पर्यंत गेल्याचें वर दर्शविलें आहेच. ही संख्या १८८० सालच्या अखेर ३३६, १८८१ त ५०१, १८८२ त ५९३, १८८३ त ७३२, १८८४ त १००९ अशा रीतीनें वाढत गेली. शिक्षकांतील पदवीधरांची संख्याहि याच मानानें वाढत गेली हें सांगणें नकोच. युनिव्हर्सिटीच्या प्रवेश परीक्षेंत यश मिळण्याचें प्रमाणहि असेंच वाढलें. मॅट्रिक्युलेशनला पाठविलेल्या विद्यार्थ्यांत शेंकडा ७०–७५ सहज पास होत. १८८४ त हें प्रमाण शेंकडा ८९ पडलें; व गव्हर्नरसाहेबांच्या प्रायव्हेट सेक्रेटरींनीं या गोष्टीबद्दल शाळेला मुद्दाम अभिनंदनपर पत्र पाठविलें. शाळेच्या लौकिकामुळें पुण्यांतलेच काय पण बाहेरगांवचेहि बुद्धिमान विद्यार्थीहि या शाळेंत येत. किंबहुना शहरापेक्षां बाहेरगांवच्या विद्यार्थ्यांचाच भरणा शाळेंत अधिक होता. अशीं वेंचक मुलें, व वामनराव आपट्यांसारखे मेहनती शिक्षक, यामुळें जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिपसारखे विद्यापीठाचे बहुमान मिळण्याचा मक्ता पहिल्या पांच वर्षांत न्यू इंग्लिश स्कूललाच मिळाल्यासारखा झाला होता. बडोदें येथील प्रो. भास्करराव आर्ते, मरहूम ओरिएंटल ट्रान्सलेटर भास्कर विष्णु जोशी, प्रो. पानसे, शिवराम महादेव परांजपे वगैरे मंडळी याच पहिल्या अमदानींतील 'स्कॉलर' होत.

विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळें पूर्वीची जागाहि पुरेनाशी झाली. दोनच वर्षांत शाळेच्या चालकांना स्वतःची स्वतंत्र इमारत हवी असें वाटूं लागलें. १८८३ च्या पूर्वीच शाळा मोरोबादादांच्या वाड्यांतून काढून शनवारांत गद्रे यांच्या वाड्यांत नेण्यांत आली होती; व तो वाडा खरेदी करण्याचे प्रयत्न सुरू होते. पण त्या एका वाड्यानेंहि भागेल असें पुढें दिसेना. सुदैवानें गद्रेवाड्याला लागूनच श्री. होळकरसरकार यांचा वाडा आहे तोहि शाळेस मिळण्याचा संभव दिसूं लागला; व थोड्याच दिवसांत वाडा शाळेच्या ताब्यांत देण्याचा हुकूमहि झाला. या दोन वाड्यांत मिळून सुमारें १३०० विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय होण्यासारखी असल्यामुळें, शाळेच्या दोन शाखा करण्याची आपत्ति टळली.

पण शाळेला अशा प्रकारच्या सोयी व सवलती मिळण्यालाहि खरें कारण म्हटलें म्हणजे तिच्या मुख्य चालकांची कीर्ति. ही कीर्ति तीन चार तऱ्हेनें वाढली होती. चिपळूणकर, टिळक, आगरकर, नामजोशी वगैरे मंडळींचा स्वार्थत्याग ही पहिली गोष्ट. दुसरी गोष्ट वरील गृहस्थांच्या जोडीला लाभलेलें सहकारी शिक्षकमंडळ. यांत नामजोशी, माधवराव गोळे, वासुदेवराव केळकर, नारायणराव धारप, यशवंत

नागेश रानडे, गोपाळराव नंदरगीकर, नागोपंत बापट, रामभाऊ जोशी, हरिभाऊ आमडेकर यांचा समावेश होतो. यांपैकीं गोळे, केळकर, धारप, नामजोशी हे पुढें संस्थेचे तहाह्यात सभासदच झाले, व नंदरगीकर, बापट, जोशी वगैरे कायमचे शिक्षक म्हणून राहिले. यांपैकीं बहुतेकांनीं आपल्या विषयांत प्रावीण्य मिळविल्याचें प्रसिद्धच आहे. मात्र केवळ स्वार्थत्यागाच्या दृष्टीनें पाहतां टिळक, आपटे, आगरकर, गोळे व केळकर येवढ्यांसच तें श्रेय विशेष देतां येईल; व त्यांतल्या त्यांतहि पहावयाचें तर ही कसोटी टिळक, आगरकर या दोघांना जितक्या रीतीनें लागूं शकते तितकी ती इतरांनाहि लागूं शकत नाहीं. टिळकांनीं हायकोर्टची सनद हातांत पडली असतांहि शिक्षकाची जागा पत्करली; व शास्त्रीबोवांप्रमाणें त्यांनींहि पहिल्या वर्षी एक पै देखील न घेतां शाळेचें काम केलें. आगरकरांनींहि पदवी घेतांच आपल्या मातोश्रींस पत्र लिहून असें कळविलें होतें कीं, "आपल्या मुलाच्या मोठमोठ्या परीक्षा होत आहेत, आतां त्याला मोठ्या पगाराची चाकरी लागेल व आपले पांग फिटतील असे मोठाले मनोरथ, आई, तूं करीत असशील; पण मी आतांच तुला सांगून टाकतों कीं विशेष संपत्तीची, विशेष सुखाची हाव न धरतां मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार !" आपटयांची मात्र गोष्ट अगदींच तशी नव्हती. आपटे हे शाळेला येऊन मिळाले ते मुख्यतः आत्मस्फूर्तीनें नव्हे, तर एक प्रकारच्या चुरशीनें. त्यांना त्या वेळीं त्यांच्या मनाजोगी एकादी प्रोफेसरची किंवा असिस्टंट प्रोफेसरची जागा मिळती तर ती सरकारी शाळाखात्यांतहि त्यांनीं पत्करली असती. किंबहुना एम्. ए. ची परीक्षा पास होतांच पुणें येथील रविवारपेठेंत फडके यांचे वाड्यांत मिशनरी शाळा होती तिची हेडमास्तरी तात्पुरती पत्करून, नोकरी मिळण्याबद्दल सरकारी विद्याधिकाऱ्यांकडे त्यांनीं रीतसर अर्जहि केला होता. पण त्यावेळचे डायरेक्टर चॅटफील्डसाहेब यांनीं त्यांना कल्याणच्या एका अँग्लो व्हर्न्याक्युलर स्कूलवर फक्त सत्तर रुपयांची नोकरी देऊं केली तो त्यांना सहजच अपमान वाटला. या तापलेल्या लोखंडावर टिळक व नामजोशी यांनीं आपल्या संस्थेस येऊन मिळण्याबद्दल आग्रहाचे जे घावावर घाव घातले त्यांनीं आपटे यांचें मन स्वार्थत्यागास निम्में अधिक तयार झालें होतें. इतक्यांत त्यांचे सासरे सुप्रसिद्ध गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका हे वारल्यामुळें, आणि आपटे यांनीं पुण्यास राहाणें अधिक सोयीचें ठरल्यामुळें, अखेर त्यांनीं संमति दिली. पण शाळेस येऊन मिळण्यापूर्वी त्यांनीं आपल्या फायद्याच्या अशा कांहीं अटी इतर चालकांकडून कबूल करून घेऊन राखून ठेवल्या. त्यांतील मुख्य ही कीं, शाळेव्यतिरिक्त काम करून जर आपल्या मिळकतींत भर टाकतां आली तर तिला कोणी हरकत घेऊं नये. शिवाय अंगांतील तरतरी दक्षता कामाची हौस यामुळें, शास्त्रीबोवांसारखे वडील लोक शाळेंत असतांहि, शाळेचा मुख्याधिकार आपल्या

हातीं यावा अशी त्यांची इच्छा होती; आणि शिस्तीची अंमलबजावणी करण्याच्या बाबतींत चिपळूणकरांपेक्षां आपटे हेच अधिक योग्य अशी सर्वांची खातरी असून युनिव्हर्सिटींत त्यांनीं मिळविलेला मान इतर सर्वांहून अधिक भारी होता; यामुळें मुख्याधिकार त्यांजकडे देणें हें जसें अपरिहार्य तसें इष्टहि होतें. या इष्टापत्तीला मान देऊन चिपळूणकरांसुद्धां इतर चालकांनीं सुपरिंटेंडेंट हा नवा हुद्दा निर्माण करून, त्यासह शाळेच्या देखरेखीचा सर्व अधिकार आपटे यांजकडे खुषीनें दिला. केळकर व गोळे हे अशा वेळीं संस्थेस येऊन मिळाले, कीं कोल्हापूरच्या प्रकरणामुळें शाळेवर एक प्रकारचें संकट आलें होतें. त्या प्रसंगाला अनुलक्षून सहानुभूतीनें ते प्रथम काम करूं लागले, व थोड्याच दिवसांत संस्थेच्या आवडीमुळें ते तहाह्यात सभासद म्हणून चिकटून गेले.

न्यू इंग्लिशस्कूलच्या कीर्तीचें तिसरें कारण म्हटलें म्हणजे टिळक व आगरकर यांजवर झालेला कोल्हापूर प्रकरणांतील खटला; व चौथें कारण शाळेच्या चालकांनीं दुसऱ्याच वर्षापासून सुरू केलेलीं केसरी व मराठा वर्तमानपत्रें. परंतु या दोन्ही मुद्द्यांसंबंधानें आम्ही पुढें स्वतंत्र प्रकरणेंच लिहिणार आहों याकरितां त्यांची विशेष चर्चा येथें करीत नाहीं. येथें फक्त या शाळेनें मिळविलेला लौकिक पुण्यांतच नव्हे, तर पुण्याबाहेर व सरकारदरबारींहि, किती पसरला होता येवढेंच सांगून हें प्रकरण पुरें करूं. यालाहि कारण कांहीं अंशीं खटल्यामुळें झालेला गवगवा हें असेल. तथापि त्या खटल्यांत ज्यांना ज्यांना प्रसिद्धी लाभली, त्या सर्वांचीच ती तशी टिकली नाहीं; यावरून खटल्याव्यतिरिक्त असेंहि या शाळेला व तिच्या प्रमुख चालकांना कांहीं स्वतंत्र महत्त्व होतें हें उघड ठरतें. १८८२ सालीं ना० रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं शाळेची मोठी स्तुति करून, चालकांच्या हातून स्वतःच्या वैभवसंपन्न शाळेचें ठिकठिकाणीं जाळें पसरावें आणि लोकांच्या मदतीनें ही एक प्रचंड संस्था व्हावी अशी इच्छा प्रकट केली होती. मंडलीक हे टिळकांच्या वडिलांचे स्नेही व महाराष्ट्रीय, म्हणून त्यांच्या अभिप्रायाला कदाचित् कोणी फारशी किंमत दिली नसती. तथापि प्रो. वर्डस्वर्थ हे कांहीं एतद्देशीय गृहस्थ नव्हेत. पण त्यांच्यावरहि या शाळेनें पहिल्या दोनच वर्षांत छाप पाडली. ते आपल्या अभिप्रायांत लिहितात "शाळेनें मिळविलेलें यश पाहून मला खरोखरच आश्चर्य वाटतें. इंग्रजी शिक्षणानें हिंदी समाजांत जी एक नवी नैतिक शक्ति निर्माण केली आहे तिचेंच ही शाळा हें एक उदाहरण असें मी मानतों. सुशिक्षित लोकांनीं सरकारी नोकरीची अपेक्षा न धरितां, सर्व प्रकारच्या धंद्यांत स्वावलंबनाच्या सामर्थ्यानें वरिष्ठ स्थान व कीर्ति मिळवावी यासारखी उदात्त भावना दुसरी कोणती? व हिंदुस्थानच्या भावी इतिहासावर अशा भावनेचे चिरस्मरणीय परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहींत!" याच्याहि पलीकडे मजल मिशनरींची. कारण त्यांना शिक्षण हें खासगी लोकांच्या हातीं रहावें असें मना-

पासून वाटत असलें तरी, होतां होईतों तें मिशनरी लोकांच्या हातीं, व आत्मोद्भव नसले तरी आत्मसदृश लोकांच्या हातीं, रहावें अशी त्यांची फार इच्छा. तथापि पुण्याचे सुप्रसिद्ध मिशनरी डॉ० मरेमिचेल यांनींहि न्यू इंग्लिश स्कूलनें सरकारी हायस्कूलावर ताण केल्याचें उघड सर्टिफिकेट दिलें आहे. दुसरे मिशनरी, मुंबईचे डॉ. मॅकिकन यांच्या अभिप्रायाचा उल्लेख मागें एके ठिकाणीं केलाच आहे.

याहिपेक्षां महत्त्वाचा अभिप्राय एज्युकेशन कमिशनचे अध्यक्ष सर वुइल्यम हंटर यांचा होय. हें कमिशन मुंबईस आलें तेव्हां न्यू इंग्लिश स्कूल तर्फें त्यापुढें वामन शिवराम आपटे यांची साक्ष झाली. या साक्षींत सरकार व खासगी शिक्षण-संस्था यांच्यासंबंधाविषयीं जे सिद्धान्त मांडण्यांत आले होते ते कमिशनला बरेच पटले. मुख्य मुद्दा असा होता कीं, शिक्षणाचें काम जर हळू हळू लोकांनीं आपल्या हातीं घ्यावें अशी सरकारची खरी इच्छा असेल, तर सरकारनें त्यांना पैशाची मदत तर करावीच, पण त्यांच्या संस्थांच्या अंतर्व्यवस्थेंत ढवळाढवळ करूं नये; व त्यांच्या घटना कांहींशा सदोष असल्या तरी त्या आपोआप स्वाभाविक रीतीनें सुधारण्यास जागा ठेवावी. हा मुद्दा कमिशनला पटून आपल्या रिपोर्टांत त्यानें तो बराच उचलून धरला आहे. सरकारी ग्रँटच्या स्केलासंबंधानेंहि आपटे यांनीं सूचना केल्या होत्या. या साक्षीचा, कमिशननें न्यू इंग्लिशस्कूलास दिलेल्या भेटीचा, व या संस्थेंतील मंडळींच्या परिचयाचा मिळून अध्यक्ष डॉ० हंटर यांच्या मनावर जो उत्कृष्ट परिणाम झाला तो त्यांनीं आपल्या अभिप्रायांत खालीलप्रमाणें लिहून ठेविला आहे. "या शाळेचा उत्कर्ष पाहातां मी असें खात्रीनें म्हणूं शकतों कीं, हिच्या तोडीची एकहि शाळा मला सर्व हिंदुस्थानांत दिसून आली नाहीं. सरकारी ग्रँट बिलकूल न घेतां ती सरकारी हायस्कूलाशीं बरोबरीच काय पण वरचष्माहि मिरवूं शकते. इतर देशांतील शाळांशीं तुलना केली तरी देखील तिचा निकाल या संस्थेतर्फेंच द्यावा लागेल!' खुद्द इलाखाधिपति सर जेम्स फर्गसन व लॉर्ड रे यांचें मत न्यू इंग्लिश स्कूलविषयीं फार चांगलें होतें ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. विशेषतः लॉर्ड रे हे विद्येचे मोठे भोक्ते असून टिळक—नामजोशी प्रभृतींनीं त्यांना अगदीं मोहून टाकलें होतें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. यापलीकडचें व सर्वांत मोठें सर्टिफिकेट म्हटलें म्हणजे मुंबईच्या अँग्लो इंडियन दैनिकांचें. पण त्यांनाहि न्यू इंग्लिशस्कूलविरुद्ध बोलतां येण्यासारखें कांहीं नव्हतें. टाइम्सकारांच्या मतें "या शाळेनें सरकारी मदत देण्याची जुनी पद्धत मोडून टाकून तिच्या जागीं एक नवीन पद्धत सुरू होण्यास भाग पाडण्याइतकी मोठी कामगिरी केली." कोल्हापूर प्रकरणांत बर्व्यांची बाजू उचलून धरून टिळक—आगरकरांना शिक्षा झालीच पाहिजे असा आग्रह या अँग्लो इंडियन पत्रांनीं तेव्हां धरिला होता, पण हल्लीं तो सर्व राग विसरून जाऊन, गव्हर्नरसाहेबांस लोक मोडता घालीत असतांहि त्यांनीं या शाळेला भेट दिली हें योग्य केलें असें मुंबईच्या या पत्रांनीं

प्रतिपादिलें, व पुण्याची ही शाळा खरोखरच चालत्या काळांत तरी अलौकिक आहे अशी कबुली त्यांनीं दिली.

विष्णुशास्त्री चिपळूकरांनीं न्यू इंग्लिश स्कूलचा पाया घातला ही गोष्ट खरी, तथापि वास्तविक पाहूं जातां त्यांत शिक्षक या नात्यानें त्यांची कामगिरी थोडेच दिवस झाली. त्यांच्या हाताखालीं शिकलेले लोक त्यांच्या शिकविण्याच्या पद्धतीविषयीं आख्यायिका सांगतात त्या बऱ्याच मनोरंजक आहेत. त्यांच्या विद्वत्तेबद्दल प्रश्नच नव्हता. त्यांची शिकविण्याची हौस इतकी दांडगी असे कीं वेळापत्रकानें ठरविलेला तास केव्हां निघून गेला हें त्यांचें त्यांना अगर विद्यार्थ्यांनाहि कळत नसे. परंतु नेमलेला विषय किंवा पुस्तक हें पद्धतशीर रीतीनें शिकवून अमुक एका वेळेंत संपवावयाचें या विचारानें त्यांच्या मनास कधींहि स्पर्श केला नाहीं. एका विषयावरून दुसऱ्या विषयावर शिकवीत शिकवीत सहज जाणें, क्वचित् गैरलागू अवांतर विषयांतच रंगून जाणें, असले प्रमाद त्यांच्या शिक्षणांत नेहमीं होत असें सांगतात. परंतु ते जें विद्यार्थ्यांना सांगत त्यांतून तरुण मुलांच्या शुद्ध भावना व स्वदेशप्रीति वगैरे गोष्टी हीं पोसलीं जाण्यास बरीच मदत होई. मात्र असें करितांना कळत न कळत व्यक्तिविषयक निंदाहि त्यांचे हातून घडत असे; किंबहुना त्यांचीं व्याख्यानें म्हणजे तोंडानें पढविलेली दुसरी एक निबंधमालाच असे. शास्त्रीबोवांचे चरित्रकार लिहितात "विद्यार्थ्यांचे अल्प समजुतीनें त्यांस असें वाटूं लागलें कीं, विष्णुशास्त्री यांचेपेक्षां इतर शिक्षकमंडळी बरी." कारण ते रिकाम्या दुसऱ्या गोष्टींत न शिरतां त्यांचें लक्ष फक्त ग्रंथपाठाकडे असे. शिवाय शाळेची व्यवस्था ठेवण्याचे बाबतींत वामनराव आपटे यांचें तेज अधिकाधिक पडूं लागल्यानें विद्यार्थ्यांच्या मनांत हळूहळू शास्त्रीबोवांना पहिल्याऐवजीं दुसरें स्थान मिळूं लागलें. ज्या मनसोक्त स्वातंत्र्याच्या इच्छेनें आपण शाळा काढली तिची अल्कपित वाढ व उत्कर्ष याचीच, एका दृष्टीनें, आपल्या स्वातंत्र्याला अडचण होत आहे असेंहि शास्त्रीबोवास भासूं लागलें असल्यास नवल नाहीं. शिवाय शाळेच्या बरोबरीनें किंबहुना थोडें अधिकच त्यांचें लक्ष आपल्या इतर आवडत्या उद्योगांकडे लागलेलें होतें. न्यु इंग्लिश स्कूलांत बुकांचा खप पुष्कळ असल्यामुळें शास्त्रीबोवांच्या किताबखान्याची चलती झाली होती. तसेंच चित्रशाळेची व्यवस्था शास्त्रीबोवांचे स्नेही वासुदेवराव जोशी यांजकडे दिली होती. तिकडेहि त्यांना मधून मधून पहावें लागे. निबंधमाला सुरूच होती. १८८१ सालीं केसरी व मराठा हीं पत्रें व आर्यभूषण छापखाना सुरू झाल्यापासून त्यांचा कांहीं वेळ तिकडेहि जाई. तात्पर्य, एका बाजूनें शास्त्रीबोवांचें लक्ष शाळेकडून कमी होऊं लागलें, व दुसरीकडे शाळाहि बेसुमार व्यापामुळें शास्त्रीबोवांच्या ध्येयापासून थोडथोडी ढळूं लागली. शास्त्रीबोवांचा स्वभाव संकुचित असल्यामुळें ते शाळेंतील शिक्षकवर्गाशीं मन मोकळें करून फार वेळ बोलत बसत नसत. वर्तमानपत्रासंबंधानेंहि तसेंच. कोल्हापूरप्रकरण एवढें मातलें परंतु त्यांतहि शास्त्रीबोवांनीं

फारसें लक्ष घातलें नाहीं. ता. ५ मार्च १८८२ रोजीं आपल्या बंधूला पाठविलेल्या पत्रांत ते लिहितातः–

"हल्लीं सुरू असलेल्या खटल्यांतील हकिकत सर्वांस माहीतच आहे. खटला चालू होईल तेव्हां आणखीहि कांहीं हकिकत कळून येईल. तथापि या प्रकरणांत माझा फारच थोडा संबंध आलेला आहे. टिळक व आगरकर यांनींच या प्रकरणाची चौकशी खासगी रीतीनें केली व आपल्या मनानेंच ते या प्रकरणांत शिरले आहेत."

ता. १७ मार्च १८८२ रोजीं शास्त्रीबोवा मृत्यू पावले. अशा रीतीनें न्यू इंग्लिश स्कूलशीं त्यांचा संबंध अवघा सव्वा दोन वर्षें टिकला. व त्या अवधींतहि आपटे हे शाळेचे सुपरिंटेंडेंट झाल्यापासून, त्यांनीं शाळेच्या कांहीं बाबतींतून आपलें अंग च काढून घेतलें. पण शास्त्रीबोवांनीं या संस्थेच्या मुळांत प्रारंभींच जें खत घातलें तें जोमदार असल्याकारणानें, उत्पादक गेला तरी संस्था पुढें चालूच राहिली. शास्त्रीबोवांसंबधानें हें कांहींसें विस्तृत विवेचन करण्याचें कारण इतकेंच कीं टिळक व शास्त्रीबोवा यांचा संबंध प्रारंभीं मुख्यतः न्यू इंग्लिश स्कूलच्या द्वारें आला; व या शाळेच्या पूर्वेतिहासांतच तो संपला. शास्त्रीबोवांप्रमाणेंच टिळकांनाहि या काळीं भाषणसंभाषणाची विशेष आवड नसल्यानें, या दोघांचे रहस्यप्रसंग किंवा वादविवाद झाल्याचें कोठें उल्लेखिलेलें आढळत नसून, स्वतः टिळकांच्याहि भाषणांत अशी माहिती कधीं फारशी निघालेली आठवत नाहीं.

टिळकांची शाळेंत शिकविण्याची तऱ्हा शास्त्रीबोवांहून वेगळी असे. मुख्य विषय सोडून ते ठराविक वेळांत अवांतर गोष्टी फारशा बोलत नसत. विद्यार्थ्यांशीं थट्टामस्करीहि ते कधीं करीत नसत. तथापि शिक्षणविषयक शिस्तीच्या बाबतींत ते शास्त्रीबोवांहून अधिक काळजी घेत असले तरी, वामनराव आपट्यांहून ती कमी घेत असें सांगतात. विशेषतः परीक्षांचे कागद किंवा एक्सरसाईज बुकें वगैरे तपासण्याचा त्यांना बराच कंटाळा असे. गणितविषय शिकवितांनाहि ते फळ्याकडे वगैरे न जातां स्मरणशक्तिच्या जोरावर लांब लांब उदाहरणेंहि तोंडानें सोडवीत. आगरकरांच्या शिकविण्यांत शास्त्रीबोवांसारखा दूरान्वय नव्हता, व टिळकांच्या पद्धतीप्रमाणें तुसडपणाहि नव्हता. विषयाला संभाळून पण हंसत खेळत व विनोद करीत ते शिकवीत. आपटे यांची सर कोणाहि शिक्षकास आली नाहीं. न्यू इंग्लिश स्कूलला ओळीनें शंकरशेट स्कॉलरशिपांचा मान मिळण्याचें श्रेय आपट्यांसच आहे. ते नेमका होतकरू विद्यार्थी निवडून काढून त्याला जवळ घेऊन परीक्षेच्या दृष्टीनें त्याची करून तयारी करीत. किंबहुना आपटे लाभले नसते तर शिस्तीच्या दृष्टीनें कोणत्याहि शाळेचा बाहेर जो लौकिक राखला जाणें अवश्य असतें तो कदाचित् राखलाहि गेला नसता.

## भाग १ वा

# केसरी व मराठा

न्यू इंग्लिश स्कूल स्थापून एक वर्ष होण्याच्या आंतच या संस्थेला दोन शाखा फोडण्याची कल्पना तिच्या चालकांच्या मनांत उत्पन्न झाली. पैकीं एक शाखा सरळ वर फुटणारी व एक बाजूस फुटणारी अशी होती. सरळ फुटणारी शाखा अर्थात् शाळेचें कॉलेज होणें ही होय; व तेढी शाखा म्हणजे छापखाना व वर्तमानपत्रें ही होय. पैकीं पहिली कल्पना नैसर्गिक असली तरी तिला दृश्य स्वरूप येणें हें बऱ्याच अंशीं परावलंबी होतें. विद्यार्थी, शिक्षक व जागा यांपैकीं पुण्यास कोणत्याच गोष्टीची वाण पडण्याचें कारण नव्हतें. परंतु 'शेळीचे कान गोसाव्याच्या हातीं' म्हणतात त्याप्रमाणें, कॉलेज काढणारे व त्यांत शिकणारे दोघेही तयार झाले तरी त्यांना परवानगी देणें हें युनिव्हर्सिटीच्या हातीं होतें. ही परवानगी कशी मिळाली वगैरे हकीकत पुढें योग्य ठिकाणीं दिलीच आहे. दुसऱ्या कल्पनेच्या बाबतींत मात्र न्यू इंग्लिश स्कूलच्या तरुण चालकांना स्वतःच्या पायावर हवें तेव्हां उभें राहातां येण्यासारखें होतें. छापखाना किंवा वर्तमानपत्र या दोन्ही गोष्टी त्या वेळीं महाराष्ट्रास अपरिचित नव्हत्या. खुद्द पुण्यास ज्ञानप्रकाश, किरण, शिवाजी, वगैरे छापखाने असून वरीलपैकींच दोन तीन नांवांचीं, व शिवाय ज्ञानचक्षु वगैरे इतर कांहीं वर्तमानपत्रें चालू होतीं. मुंबईसहि छापखाने वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें सुरूच होतीं. लिहिण्याची संवय व हौस यांच्या दृष्टीनें न्यूस्कूलच्या मंडळींत कांहीं कमतरता नव्हती.

स्वतः विष्णुशास्त्री हे यापूर्वी सहा वर्षे निबंधमाला मासिक पुस्तक काढीत असून, उत्कृष्ट वाङ्मयलेखक व मार्मिक टीकाकार या नात्यानें त्यांची कीर्ति कायमची प्रस्थापित होऊन राहिली होती. दुसरे नामजोशी हे तर हौशी संपादक म्हणून यापूर्वी प्रसिद्धीस आल्यामुळेंच त्यांना या शाळेच्या संस्थेंत घेण्यांत आलें होतें. नामजोशी यांची हौस इतकी असे कीं, स्वतः ते आपलें वर्तमानपत्र तर लिहीतच, पण जरूर पडल्यास मजकूर कंपोज करून स्वतः वर्तमानपत्राच्या घड्या घालूनहि तयार करीत. कोणी असेंहि सांगतात कीं स्वतःच कित्येक वेळां अंक वांटण्यास मनुष्य न मिळाल्यामुळें, पहाटें उठून पुण्यांतील वर्गणीदारांचे घरीं अंक टाकून, सकाळीं उघडपणें मित्रमंडळींच्या घरीं जाऊन "कां आजचा अंक वाचलांत कीं नाहीं?" असें म्हणण्यापर्यंत त्यांची तयारी होती. पण ही प्रायः अतिशयोक्ति असावी. आगरकरांना लहानपणापासूनच लिहिण्याचा नाद असे. अगदीं लहानपणीं ते कऱ्हाडास असतां तेथील मुन्सफ, भगवंत भीमत नागपूरकर, हे आपलें घरीं रविवारच्या सभा भरवीत.

त्यांत आगरकरांनीं एक दोन वेळ इतके चांगले निबंध वाचले होते कीं या ते लहान मुलानें लिहिलेले असणें शक्य नाहीं, त्याला दुसऱ्या कोणा तरी प्रौढ विद्वानानें लिहून दिले असले पाहिजेत, अशी त्यांवर श्रोत्यांची टीका झाली म्हणतात. डेक्कन कॉलेजांत असतांना त्यांनीं मराठींत निबंध लिहून बक्षिसेंहि मिळविलीं होतीं. किंबहुना लिहिणें व शिकविणें या दोन व्यवसायांपैकीं लिहिण्याचा व्यवसायच त्यांना अधिक प्रिय होता असें म्हटलें तरी चालेल. पुढें वामनराव आपटे येऊन मिळाले. त्यांना पुस्तकें लिहिण्याची हौस असल्यामुळें निदान छापखान्याच्या कल्पनेला तरी त्यांच्याकडून पूर्ण पाठिंबा मिळण्यासारखा होता. ते विद्वान् असल्याकारणानें वर्तमानपत्रें निघाल्यास त्यांत लिहिण्याची त्यांचे अंगीं पात्रता अर्थातच होती; आणि केसरी व मराठा सुरू झाल्याबरोबर मराठा पत्रांत लेख लिहिण्यास त्यांनीं सुरुवातहि केली. नाहीं म्हणावयास मांडी मोडून बसून हातांत लेखणी घेऊन लिहिण्याची मनांतून विशेष हौस नाहीं असे काय ते टिळकच. यामुळें छापखाना व वर्तमानपत्रें यांच्या कल्पनेचा उगम मूळ टिळकांच्या मनांत न होतां खरोखर तो नामजोशी व शास्त्रीबोवा यांच्या मनांतच झाला, व टिळकांनीं त्या कल्पनेला मागाहून संमति दिली हीच गोष्ट खरी आहे.

वामनराव आपटे शाळेस येऊन मिळाल्यानंतर दोन तीन महिन्यांनीं एक दिवस त्यांचे घरीं श्राद्धानिमित्त टिळक आगरकर वगैरे सर्व मंडळी भोजनास जमली असतां, त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत बराच खल होऊन केसरी व मराठा या नावांचीं वर्तमानपत्रें जानेवारी १८८१ पासून काढण्याचें मुक्रर ठरलें. पण हीं दोन पत्रें नेहमीं कोणा दुसऱ्याच्या मालकीच्या छापखान्यांत छापून काढणें शक्य नव्हतें. ज्यांचीं वर्तमानपत्रें त्यांचाच छापखाना असणें अधिक इष्ट, असा विचार ठरून ही मंडळी प्रथम छापखाना उभारण्याच्या प्रयत्नास लागली. छापखाना काढावयाचा म्हणजे भांडवल पाहिजे. पण याहि बाबतींत नामजोशांच्या कल्पनेचा धागाच उपयोगीं पडला. तो असा. नामजोशांचें स्वतःचें वर्तमानपत्र ज्या 'किरण' छापखान्यांत निघत होतें, तो केशव बल्लाळ साठे नांवाच्या एका गृहस्थांकडे गहाण पडला होता. साठे यांनीं, त्यांच्या कबजांत आलेल्या व त्यांना निरुपयोगी अशा या छापखान्याची सर्व अडगळ शनिवार पेठेंतील आप्पासाहेब मांडे यांच्या शिवाजी छापखान्यांत आणून टाकली होती. ही माहिती असल्यामुळें तेंच सामान विकत घ्यावें असें नामजोशी यांनीं सुचविलें व मंडळीतर्फे साठे यांच्याशीं बोलणें सुरू केलें. साठे यांचे चोवीसशें रुपये कर्ज देण्यास मंडळींपैकीं कोणाजवळहि तेव्हां सामर्थ्य नव्हतें. पण उलट साठे हेहि धंदेवाईक छापखानेवाले नसल्यामुळें त्यांना देखील आपणाजवळ गहाण पडलेल्या लोखंडाचें ओझें जडच झालें होतें; व आपण परक्या घरीं ठेविलेल्या छापखान्याच्या सामानाला हळू हळू पाय फुटूं लागले अशीहि शंका आली होती. यामुळें हस्तेंपरहस्तेंं किंम-

तीची फेड पत्करून, साठे यांनीं तो छापखाना मंडळीकडून समाईक कर्ज-रोखा लिहून घेऊन त्यांना देऊं केला. हा सौदा ठरतांच मंडळीस मोठा आनंद झाला. व ही बातमी प्रसिद्ध होण्यापूर्वीच छापखान्याचें सामान एकदम मोरोबा-दादांचे वाड्यांत नेणें जरूर वाटल्यावरून ही सर्व उलाढाल एका रात्रींत घडवून आणली गेली. या प्रसंगास उद्देशूनच लोकमान्य केव्हां केव्हां मौजेनें व अभिमानानें असें सांगत कीं, "मी या खांद्यावरून आर्यभूषण प्रेसच्या टाईपांच्या पेट्या वाहून नेल्या आहेत." आणि कारण पडलें असतां पुढेंहि स्वतः पायावर उभे राहून छापखान्यांतील यंत्र मोडण्याजोडण्याचें काम टिळक स्वतः करीत हें ज्यांनीं पाहिलें असेल त्यांना वरील विधानांत अतिशयोक्ति असेल असा संशयहि णार नाहीं.

अशा रीतीनें शाळेचें हें धाकटें पण अधिक प्रतापी भावंड, म्हणजे छापखाना तच्याच जोडीला मोरोबादादांचे वाड्यांत येऊन बसला; व 'आर्यभूषण' या नांवानें याचें डिक्लेरेशन गणेश मोरेश्वर सोहोनी या गृहस्थांकडून करविण्यांत आलें. सोहोनींांस मुंबईच्या जगदीश्वर छापखान्यांत असलेल्या कामाचा थोडाबहुत अनुभव आलेला असून, ते नामजोशांच्या पूर्वपरिचयाचेहि होते म्हणून छापखान्याचे व्यवस्थापक याः ाल्यानें त्यांची नेमणूक करण्यांत आली. छापखान्यास पहिलेंच काम शास्त्रीबोवांच्या निबंधमालेचें मिळालें. मालेचा सासष्टावा अंक हाच या छापखान्यांत छापलेला तिचा पहिला अंक असून, त्यांत केसरीचें उद्देश—पत्रक प्रसिद्ध झालें आहे. आर्यभूषण छापखान्यासंबंधानें निबंधमालेच्या ६ व्या वर्षांतील शेवटच्या अंकांत खालीलप्रमाणें उल्लेख आढळतो:—

"गेल्या वर्षीच्या उपसंहारांत सांगितलेला जो छापखाना तो हा होय. यांत पूर्वोक्त विद्यालयीन (न्यू इंग्लिश स्कूलची) मंडळीच भागीदार असून त्यांच्या परिश्रमांवर हेंहि अवाढव्य काम सुरू झालें आहे. आजपर्यंत इतर सर्व व्यापारांप्रमाणें छापखान्याचा उद्योगहि अविद्वान् व अडाणी लोकच प्रायः करीत आले आहेत यामुळें अज्ञानध्वंसनाविषयीं केवळ वज्रच असें जें मुद्रणयंत्र त्याचा प्रभाव व्हावा तितका अद्याप प्रकट झाला नाहीं. तो झाला असतां आज उघड माध्यांनीं जे आपले उजतत निर्भयपणें खुशाल मिरवीत आहेत अशा बिचाऱ्या कितीक मैनाकांस समुद्राच्या तळीं जाऊन दडून बसावें लागेल."

शास्त्रीबोवांनीं दिलेला हा तडाखा व ही दहशत बिचाऱ्या कोणत्या छापखानेवाल्यांस उद्देशून होती हें माहीत नाहीं. पण आम्ही नव्या पिढीच आंग्लविद्याविभूषित विद्वान लोक लाथ मारूं तेथें पाणी काढूं अशी जी धमक शास्त्रीबोवांच्या प्रत्येक उद्गारांत व कृत्यांत असे तिचा मासला वरील उताऱ्यांत दिसून येतो. जॉनसन कांहीं बोलला किंवा त्यानें कांहीं लिहिलें तरी तें व्हेल माशाप्रमाणें हालचालीप्रमाणें अंगी प्रचंडप्रमाणच असावयाचें असें त्याच्या एका टीकाकारानें म्हटलें आहे.

त्याचीच आठवण वरील उतारा वाचतांना आम्हांस झाली. नुसता छापखाना सुरू केला हें सांगण्याचा प्रसंग, पण त्यांतहि समुद्र व मैनाक पर्वत असल्या उदात्त कल्पना! पण आर्यभूषण छापखाना हें अज्ञानध्वंसनाचें वज्र अशी जी शास्त्रीबोवांची तेव्हां दृढ समजूत होती ती त्यांच्या कर्तबगारीनें खरी ठरली नाहीं असें कोण म्हणेल?

वर केसरीचें उद्देशपत्रक म्हणून जें सांगितलें त्यावर चिपळूणकर, टिळक, आपटे, आगरकर, नामजोशी व डॉ. गणेश कृष्ण गर्दे अशा सहा असामींच्या सह्या आहेत. यांपैकीं डॉ० गर्दे हे तेवढे केसरीच्या मालकीच्या भागीदारींत नव्हते. पण त्याऐवजीं छापखान्याचे म्यानेजर गणपतराव सोहोनी यांस भागीदारींत घेण्यांत आलें होतें. मालकीच्या कागदावर, म्हणजे त्यावेळीं अर्थात् साठे यांस दिलेल्या कर्जरोख्यावर, न्यू स्कूलच्या मंडळींच्या या सह्या व्यक्तिशः होत्या; कारण तेव्हां शाळा ही सोसायटी म्हणून रजिष्टर केली नव्हती. पण वस्तुतः समाईक रीत्या न्यू इंग्लिश स्कूलकडेच हा छापखाना व हीं वर्तमानपत्रें यांची मालकी आहे अशी समजुत होती, व त्याप्रमाणें शाळेच्या उत्पन्नांतून या कारखान्यांना वेळोवेळीं पैसे दिले घेतले गेल्याचें आढळतें. किंबहुना या मालकीच्या जबाबदारीच्या कारणांमुळेंच पुढें इतर तंट्यांत भर पडून उभयतांची फारकत करावी लागली. डॉ. गर्दे हे भागीदारांत नसण्याचें कारण असें दिसतें कीं, त्यांना छापखान्याशीं कांहींएक संबंध ठेवावयाचा नव्हता; पण वर्तमानपत्रांत लिहिण्याला गर्दें यांचा उपयोग होईल अशी त्यांच्या बुद्धिमत्तेवरून टिळक, आगरकरांची समजूत झाली होती. उलट वर्तमानपत्रांचा आपणास उपयोग होईल असा गर्दें यांचा माल पक्का कयास असून त्याविषयींचा पुरावा जवळ जवळ केसरीच्या प्रारंभापासून मिळतो. गर्दे यांनीं केसरींत प्रारंभीं किंवा नंतर किती लेख लिहिले याची माहिती आम्हांस नाहीं; परंतु त्यांच्या औषधाच्या प्रशस्त जाहिराती जवळ जवळ पहिल्या अंकापासून केसरींत आढळतात. कित्येक वेळां तर खुद्द अंकाच्या आंतल्या बाजूस मजकुराच्या मागें पुढें या जाहिरातींना जागा न मिळाल्यामुळें, अंकाएवढ्या पुरवणीवर केसरीचें मुख्य हेडिंग व त्या खालचा सर्व मायना घालून त्या जाहिरातींची प्रसिद्धी करण्यांत आलेली आढळते! गर्दे यांचा हा ऋणानुबंध केसरी अद्याप पाळीत असल्याचें वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

पहिल्या वर्षाच्या केसरीच्या अंकांत शास्त्रीबोवा, आगरकर व टिळक यांचे लेख सरमिसळ येत असत. वाङ्मयाविषयक लेख चिपळूणकर लिहीत असत. इतिहास, अर्थशास्त्र व निवळ सामाजिक असल्या विषयांवरचे लेख आगरकर लिहीत. धर्मशास्त्र व कायदा या संबंधाचे लेख टिळकांचे असत. एखाद्या अग्रलेखाखेरीज शास्त्रीबोवा, व मुद्दाम आपणाकडे नेमून घेतलेल्या विषयाशिवाय टिळक हे वर्तमानपत्राच्या इतर गोष्टींत फारसें मन घालीत नसत. किरकोळ लिहिणें आगरकरांकडे असावें असें

दिसतें. कारण त्यांत त्यांचा विनोद, विनमुर्वतखोरपणा व रोमँटिकपणाची लकेर, ही दिसून येतात. नवनीतासंबंधाच्या लेखांत खालीलप्रमाणें वाक्य वाचलें कीं तो लेख शास्त्रीबोवांच्या हातचा हें कोणीहि सांगूं शकेल. उदाहरण, "ज्या बिचाऱ्या धोंगड्या कवीनें (तुकाराम) शिवाजीमहाराजांचा आदरसत्कार नाकारला त्याच्या कपाळीं दोन शतकांनंतर तीच संभावना द्वीपांतरवासी प्रभूच्या हस्तें येऊन त्याच्या जयन्तीच्या प्रीत्यर्थ २४ तोंडें मोकळे करण्याचा संकल्प सुटला, ही गोष्ट मनांत आली असतां भर इंग्रजी राज्यांत किती मोंगलाई आहे हें कोणाच्याहि मनांत बिंबल्यावांचून राहणार नाहीं" (के. अं. ४)

केसरीच्या सातव्याच अंकांत बहिष्कार या विषयावर लेख आलेला आहे. त्याच्या पांच पंचवीस ओळी वाचतांच तो लेख टिळकांचा असावा याविषयीं कोणाचीहि खात्री पटते. "बहिष्कार ही आपल्या शास्त्रकर्त्यांनीं कित्येक पातकांस शिक्षा म्हणून सांगितली असून, इंग्लिश ग्रंथकारांनीं शिक्षेचे जे दैविक, लौकिक व राजकीय असे त्रिविध भेद सांगितले आहेत, त्यांतील मधल्यांत त्याचा अंतर्भाव होतो. त्यास जें धर्माचें स्वरूप आलें आहे तें केवळ आनुषंगिक होय, व आपल्यांत धर्म व कायदा यांचें धर्मग्रंथांतून एकाच ठिकाणीं विवेचन झाल्याकारणानें आपली अशी समजूत झाली आहे." असा हा आर्य व आंग्ल धर्माचा आणि कायद्यांचा मेळ घातलेला पाहिला किंवा, "राजा कालस्य कारणम्" "स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः" असलीं संस्कृत वचनें आढळलीं, किंवा पूर्वीच्या राजनीतींतहि फेरफार झाला पाहिजे, भांडून घेतल्याखेरीज आतां कांहीं एक मिळणार नाहीं, राजकीय शिक्षा लोकमतावरच अवलंबून असते, राजाज्ञेचा प्रभाव लोकमतावर कधींच पडत नाहीं–असलीं तुटक व ठांसलेलीं विधानें दृष्टीस पडलीं म्हणजे तो लेख टिळकांचा असें कोण म्हणणार नाहीं? "इंग्रजी पोप कवीनें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, 'कवितेचा ध्वनि कवितेच्या अर्थाचा प्रतिध्वनि असावा' म्हणजे अर्थाप्रमाणें भाषा चढत उतरत जावी,"–असला इंग्रजी कवितेचा हवाला लेखांत आला कीं हे टिळक खास नव्हेत, आगरकर हें कोणीहि ओळखावें. "कुटुंबांत एकत्र राहाणें चांगलें नाहीं" हा विचार शुद्ध आगरकरी. किंवा "पंधरा वर्षांपासून पोरें उत्पन्न करण्याचें काम सुरू होऊन चाळिसाव्या वर्षीं देखील थांबेनासें झाल्यामुळें लोकसंख्या इतकी वाढली आहे कीं, एखाद्या पावसाळ्यांत वरुणमहाराजांनीं किंचित् करडी नजर केली कीं गरीब लोकांस पोटचीं पोरें किंवा आपलेच हातपाय चावून खाण्याचा प्रसंग येऊन ठेपतो, अशा वेळीं एकानें मर मर मरावें आणि बाकीच्यांनीं गले-लठ्ठाप्रमाणें बसून खावें हें ठीक दिसत नाहीं"–यांतील ग्राम्य शब्दरचना विष्णुशास्त्री किंवा टिळक यांचे लेखणींतून कधींहि निघणार नाहीं, तो विनोदी स्पष्टवक्तेपणा आगरकरांचाच असणार याविषयीं शंका कशाला?

याशिवाय वर्तमानसाराच्या सदराखालीं चमत्कारिक मथळे घालून अद्भुत किंवा

शुष्क बातम्या दिल्या जात व त्यांत ग्राम्यपणाहि असे, यावरून म्यानेजर किंवा इतर कोणी अलबते गलबते यांचाहि हात प्रारंभीं केसरींत शिरत असे असें दिसतें. "शाबास रामभटजी" "जर्मनींत रामभटजीबोवांचें उड्डाण" "हिन्दुस्थानांत इंग्रजांची काय फॅ फॅ उडून गेली आहे" "एका माकडाच्या विलक्षण प्रेमाची गोष्ट" असले चुटके वाचून दुसरें अनुमानच निघत नाहीं. माधवराव नामजोशी हेहि "पुणें म्युनिसिपॉलिटी," "जकातीच्या तक्रारी" वगैरेविषयीं लिहून स्थानिक राजकारण लोकांचे डोळ्यांपुढें ठेवीत असत. केसरीच्या चौथ्या अंकापासूनच कर्नाटकांतील बातमीपत्र छापण्यास सुरुवात झाली होती. यावरून न्यू स्कूलच्या कीर्तीच्या डंक्यावरून भावी केसरीपत्राविषयीं परप्रांतांतीलहि लोक उत्सुक होऊन बसले होते असें दिसतें. पत्रें पाठविणारांस सूचना या सदराखालीं, मांत्रिकानें भुताशीं बोलावें त्याप्रमाणें, संपादक अदृश्य बातमीदाराशीं मनोरंजक संवाद करीत असल्याचेंहि मधून मधून आढळतें. नाट्य, ललित वगैरे विषयांवर फार्सवजा संवाद एखादा दिसून येतो. हल्लीं टीचभर वाटणाऱ्या क्रीडाभुवनांतील क्लबाविषयीं तेव्हां उत्तर प्रत्युत्तर मोठ्या गंभीरपणानें चाललेलें पाहून मौज वाटते. नाटक विषयाला मज्जाव मुळींच नव्हता! उलट, 'आर्योद्धारक मंडळी'च्या नाट्यप्रयोगाविषयीं स्तुतिपर लेख आढळतात. या कंपनीच्या विरुद्ध, तसेंच शाळेंत होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाटकप्रयोगाविरुद्ध असणाऱ्या लेखांस "लिहून आलेला मजकूर" याहून अधिक मान्यतेची जागा दिलेली दिसत नाहीं. उलट प्रो. केरूनाना छत्रे, बाबा गोखले, दामोदर विद्याधर गोखले, शिवराम हरी साठे असल्या पुढारी लोकांच्या सहीवर आर्योद्धारक नाटक मंडळीचा अथेल्लोचा नाटक प्रयोग 'पुनः एकवार' (हें थिएटरबाहेरील वन्स् मोअरच होय) होण्याविषयीं विनंतिपत्र पांचव्या पानावर केसरीच्या मथळ्याखालीं छापलेलें आढळतें. याच्या उलट, आयर्लंडची स्थिति वर्णन करतांना, "स्वातंत्र्यरूपी अमोलिक दक्षणा मिळण्यास नरमेध–यज्ञाशिवाय इतर लौकिक साधनें व्यर्थ होत, हा जो ऐतिहासिक सिद्धान्त त्यास बाध कोणी आणावा" असे स्पष्टोद्गार संपादकीय लेखांत आढळतात; त्यावरून या संपादक मंडळीचें मन ललितविषयाप्रमाणें गंभीर विचारांच्या विषयांतहि अनिरुद्धपणें वावरत होतें असें उघड दिसतें.

अशा प्रकारची 'संपादित' विषयांची, लेखनपद्धतीची व लेखक–स्वभावांची खिचडी या पहिल्या वर्षाच्या केसरींत दिसून येत असल्यामुळें, त्यावर निर्णायक असा कोणत्याहि विशिष्ट मताचा छाप अद्याप पडलेला नव्हता, व संपादकीय धोरणांत ती एक संयुक्त भांडवलाची कंपनी होती असेंच म्हणावें लागतें. प्रारंभीं अर्थात् असें होणारच. पण दुसऱ्या तिसऱ्या वर्षापासून हा प्रकार हळू हळू कमी होऊं लागला. १८८१ अखेर कोल्हापूरप्रकरणीं केसरींतून लेख येण्यास सुरुवात झाली होती व १८८२ च्या प्रारंभीं अब्रुनुकसानीचें प्रकरण कोर्टांतहि

गेलें होतें. या प्रकरणीं टिळक व आगरकर यांजवर खटला झाल्यानें ते लेखक-वर्गातून कांहीं वेळ गळले. आपटे हे मराठ्यांतील अनुनुकसानकारक लेखांचे लेखक; पण टिळकांच्या डिक्लरेशनमुळें ते निभावले. फक्त त्यांना अधिक लेख लिहून वरील दोघांची उणीव भरून काढावी लागली. खटला चालू असतां १८८२ च्या मार्चमध्यें विष्णुशास्त्रीहि वारले. यामुळें नामजोशी यांना केसरींत लिहिण्याचें काम अधिक पडूं लागलें.

केसरीचा आकार पहिल्या वर्षाच्या २६ अंकांपर्यंत बराच लहान म्हणजे डेमी चार पेजी होता, तो २७ व्या पासून रॉयल चार पेजी करण्यांत आला. या सालचा केसरीचा ४० वा हा एकटाच अंक वरच्या प्रमाणाहून दुप्पट आकाराचा असा काढण्यांत आला. त्याच्या खुलाशादाखल संपादकांनीं वाचकांस स्फूटसूचनेंत असें कळविलें होतें कीं, "पुरवणी काढण्याऐवजीं ऐनजिनसी अंकच आम्ही काढून पाहिला आहे." पण या स्फूट सूचनेची भाषा एखाद्या सुशिक्षित संपादकाच्या लेखणींतून उतरलेली नसून एखाद्या फाजील कारकुनानें लिहिलेली दिसते. या वर्षाच्या प्रारंभीं केसरीच्या प्रति सुमारें १८०० खपत होत्या, त्या कोल्हापूर-प्रकरणाच्या दुमदुमीमुळें सप्तेंबरच्या सुमारास ३५०० जवळ जवळ उडूं लागल्या होत्या, हा खप पाहून व्यापारीहि जाहिराती घेऊन धांवूं लागले. त्यांना नाहीं म्हणतां येईना, होय म्हणतां येईना! बातमीपत्रें लिहिणारे व मजकूर लिहून पाठविणारे 'पत्रांना कचऱ्याची टोपली दाखवूं नका' म्हणून विनवूं लागले. यामुळें केसरीचा आकार वाढवावा अशी इच्छा झाली. 'इंदुप्रकाश'एवढ्या आकाराचें निव्वळ मराठी पत्र अल्प म्हणजे अवघ्या एक रुपया किंमतींत देतां यावें अशी केसरीकारांची इच्छा. पण एकदम पुष्कळसा उदार आश्रय मिळाला तर तें होणार; व वाचक लोकांना तशी स्पष्ट सूचनाहि करण्यांत आली होती. पण एका आठवड्यांत हें सर्व स्वप्न एकदम अनुभवास कसें यावें? तात्पर्य हा धाडसी अंक नुसता नमुन्याचाच ठरून, एकेचाळिसावा अंक फिरून जुन्या आकाराचा निघाला; व संपादक महाराज, व्यवस्थापक महाशय, तृषित वाचकमंडळ व जाहिरातेच्छु व्यापारी या सर्वांचे मनोरथ जागचे जागींच जिरले. यापुढें केसरीचा आकार १८८३ अखेरपर्यंत पूर्वीचाच राहिला, व १८८४च्या जानेवारीपासून तो डबल क्राउनइतका झाला. १८८४–८५ सालांत केसरीचा खप चार साडेचार हजार प्रति इतका होऊं लागला, व आगरकर हे संपादक असत तोंपर्यंत ते हा आंकडा मोठ्या आढ्यतेनें केसरीच्या मुखपृष्ठावर छापीत.

परंतु या खपाच्या मानानें जमाखर्चाचीं तोंडें मिळून वर थोडा नफा उरावा तो माल उरत नसे. अगदीं प्रथम छापखान्यांत व वर्तमानपत्रांत तोटा येत असून न्यू स्कूलच्या पिशवींतून मधून मधून उसन्या रकमा आणाव्या लागत. मराठा पत्र हें तेव्हां अर्थात्च बुडीत खातें होतें; व संपादकांना मोबदल्याची अपेक्षा नव्हती

तरी मराठ्याच्या कागदाचा खर्चच डोईजड वाटे. केसरीचा खप पुष्कळ परंतु वर्गणी थोडी. त्या वेळच्या ज्ञानप्रकाश, ज्ञानचक्षु, पुणेंवैभव, शिवाजी यासारख्या वर्तमानपत्रांचीहि वर्गणी केसरीच्या दुपटीहून अधिक होती. जाहिरातींचे दरहि तेव्हां म्हणण्यासारखे चढले नव्हते. सोळा ओळींपर्यंत एक रुपया व पुढें प्रत्येक ओळीस दीड आणा हा दर १८८३ च्या फेब्रुवारी पावेतों होता. येथून पुढें १० ओळींपावेतों रुपया हा दर करण्यांत आला. कोल्हापूरप्रकरणांतील खटल्यामुळें जास्त कमी खर्च येऊन कर्ज झालें होतें, व साठे यांच्या छापखान्यावरील कर्जाचे हप्ते बरेचसे थकत असत. शिवाय सोहोनी यांची व्यवस्था असावी तितकी काटकसरीची नव्हती; यामुळें टिळक, आगरकर हे डोंगरी तुरुंगांतून १०१ दिवस कैद भोगून परत येऊन पाहतात तों, छापखाना व वर्तमानपत्रें यांचा कर्जबाजारीपणा हें एक नवीनच संकट त्यांच्यापुढें वाढून ठेवलेलें दिसलें. या संकटानें व कांहीं अंशीं खटल्याच्याहि दहशतीनें आपटे यांनीं आपण होऊन वर्तमानपत्रांचा संबंध सोडला. तीं तुमचीं तुम्हींच सांभाळा, असें टिळकांना तुरुंगांतून येतांच पहिल्याच भेटींत त्यांनीं सांगितलें, व पुढें न्यू इंग्लिश स्कूलांतील भांडणांत वर्तमानपत्रांचा संबंध येई तेव्हां टिळक, नामजोशी व केळकर यांविरुद्ध ते आगरकरांची बाजू घेत. तुरुंगांतून आल्यापासून टिळकांचें वर्तमानपत्रांतील लिहिणें होतें त्याहूनहि कमी झालें. त्यांच्या ऐवजीं वासुदेवराव केळकर लिहूं लागले. मराठ्यांत लिहिण्याचें काम नामजोशी यांनीं आपल्या हौसेनें आपणाकडे हळू हळू अधिकाधिक घेतलें, व आगरकरांचें केसरींतील लिहिणें अधिकाधिक फैलावल्यानें मुख्य संपादक तेच ठरले. व ही व्यवस्था सामान्यतः ता. २२ आक्टोबर १८८७ पर्यंत, म्हणजे टिळक हे केसरीचे डिक्लरेशन करून जबाबदार संपादक होईपर्यंत, अशीच टिकली. आतां केसरीचें जोडीदार पत्र जें मराठा त्याविषयीं कांहीं माहिती देऊन मग फिरून या दोन्ही पत्रांकडे मिळून वळूं.

मराठा पत्राचा पहिला अंक रविवार ता. २ जानेवारी १८८१ रोजीं निघाला. त्याचा आकार डेमी असून पृष्ठसंख्या ८ होती. त्या काळीं मासिकांवर किंवा वर्तमानपत्रांवर व्यक्तिशः संपादक किंवा प्रकाशक यांचें नांव जबाबदारीच्या अर्थानें घालण्याची कायदेशीर सक्ति नसल्यामुळें, मराठ्याच्या अखेरीस "Printed and published for the proprietors at the Aryabhushan Press No. 520, Budhawar Peth, Poona." एवढेच शब्द असत. दर्शनी पृष्ठावर "The Maratha with which is incorporated the Deccan Star" (यांतच "डेकन स्टार" हें पत्र सामील केलें आहे ) असा उल्लेख आहे; व याला अनुलक्षूनच मराठ्याचा पहिल्या वर्षाचा पहिला अंक असतांहि त्यावर "न्यू सीरीज" (नवी आवृत्ति) असे शब्द बाजूला घातलेले असावे. मराठ्याच्या उद्देशपत्रिकेवर चिपळूणकर, गर्दे, आपटे, टिळक, आगरकर, नामजोशी अशा अनुक्रमानें सह्या आहेत.

'डेक्कन स्टार' हें वर्तमानपत्र नामजोशांच्या मालकीचें होतें. पण तें त्यांनीं हौसेनें चालविलें असलें तरी यशस्वितेनें चालविण्यास लागणारीं साधनें त्यांचेजवळ नव्हतीं. कुच रोटी कुच लंगोटी असें करून त्यांनीं तें चालविलें होतें. असें पत्र मराठ्यांत सामील करून घेतल्यानें मराठ्याच्या चालकांना "गुडवुईल" किंवा मालमत्ता यांच्या रूपानें कांहीं विशेष फायदा होणार होता असें नाहीं. मुख्य फायदा हाच होता कीं, एकाकी व अप्रसिद्ध असतांहि आपल्या पायावर उभा राहून इंग्रजी वर्तमानपत्र चालविणारा एक हौशी व हुषार लेखक मराठ्याच्या चालकवर्गांत सामील होतो. व खरोखरच नामजोशी यांनीं मराठ्याला जरूरीच्या वेळीं मजकुराची वाण केव्हांहि पडूं दिली नाहीं. पुणें म्युनिसिपालिटीचा कारभार व घटना, मुंबईसरकारच्या दरबारशीं होणारीं कारस्थानें व औद्योगिक चळवळ या विषयांवर त्यांना नेहमीं कांहीं ना कांहीं तरी नवीन कल्पना सुचत, व ते नवीन चळवळी निर्माण करीत. यामुळें त्यांचा मराठ्याला उपयोग होत होता असें म्हणण्यापेक्षां मराठ्याचा त्यांना उपयोग होत होता म्हणणें अधिक खरें ठरलें असतें. 'डेक्कन स्टार'चा संपादकच स्वतः सामील करून घेतला तर त्याचें मालकीचें पत्रहि त्याबरोबर सामील करून घ्यावें हें रीतीचेंच होतें; पण पहिल्या वर्षाच्या अखेरीस सामील वर्तमानपत्र म्हणून 'डेक्कन स्टार'चें नांव मराठ्याच्या मुखपृष्ठावरून काढून टाकण्यांत आलें! बारा महिन्यांचें शरपंजरी शयन पुरें झालें, पुढील वर्षापासून 'डेक्कन स्टार' अंतर्धान पावला तरी वाचकांना किंवा मूळ संपादकालाहि फारसें दुःख होण्याजोगें नव्हतें; यामुळें मराठ्याचो जोड—नामाभिधानाची उपाधी टळली.

मराठा हा केसरीच्या आधीं दोन दिवस जन्मास आला. यामुळें वडीलपणाचा मान या इंग्रजी भावंडाकडे सहजच येतो. पुढें १८९१ चे सुमारास जेव्हां या दोन वर्तमानपत्रांत पंडिता रमाबाई वगैरे एक दोन विषयांवर परस्परविरोधी मतें प्रसिद्ध होऊं लागून एकप्रकारची भाऊबंदकी सुपली, तेव्हां केसरीकार हे मराठ्याविषयीं लिहितांना कित्येक वेळां 'आमचे दादा' किंवा 'वडील बंधु मराठाकार' असा उल्लेख कुचेष्टेनें करीत, तो वर लिहिल्याप्रमाणें मराठा हा केसरीच्या आधीं दोन दिवस जन्मला या गोष्टीस उद्देशून होता हें सांगावयास नकोच. दादा हे भोळे असावयाचे असा जगाचा नियम आहे तसा मराठाहि भोळा आहे असें म्हणावयाचा केसरीचा हेतु. पण हा यदृच्छाप्राप्त ज्येष्ठकनिष्ठभाव इतर रीतीनींहि संपादला गेला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. मराठ्याची भाषा इंग्रजी; (पुष्कळ परप्रांतीय किंवा परदेशीय लोकांना मराठ्याची भाषा मराठी नसून इंग्रजी आहे हें समजावून सांगण्यास आम्हांस अजूनहि बराच वेळ खर्चावा लागतो!) व केसरीची भाषा मराठी; येवढ्याच भेदामुळें खरोखर या दोन पत्रांच्या लेखनपद्धतींत पुष्कळ

फरक नेहमींच पडलेला आहे. परकी भाषा आपण कितीहि शिकलों तरी तींत देशी-भाषेइतकें जोरदार लिहितां येत नाहीं. पण ओजस्वितेच्या दृष्टीनें जो हा दोष तोच दाक्षिण्याच्या दृष्टीनें गुण दिसतो. सर्व हिंदुस्थानांत जें वर्तमानपत्र वाचलें जाणार त्यांतील विषय व विचार एकाद्या विवक्षित प्रांतांतच वाचल्या जाणाऱ्या वर्तमान-पत्रापेक्षां अधिक व्यापक स्वरूपाचे असणें अपरिहार्यच होय. यामुळें प्रांतिक विषयांवर स्वभाषेंत लिहितांना, संपादक हवेंतसें तोंडसुख घेऊं शकतो, व्यक्तिनिर्देशें स्वतः मळवून घेतो, कुचाळी किंवा कुचेष्टा करतो, व क्वचित् ग्राम्य भाषाहि वापरतो. पण परभाषा ही असे गुन्हे न घडण्याची एक अप्रत्यक्ष जामीनकीच असते. बेडी घातलेल्या पायाची लाथ किंवा हातकड्या घातलेल्या हाताची बुक्की ही अर्थात् कमीच लागणार. त्यांतूनहि इंग्रजी शिकणारे आपण हिंदी लोक अभिजात इंग्रजी वाङ्मय वाचून पाढिक बनलेले असतों, यामुळें बर्क किंवा शेक्सपियर यांच्या प्रौढ आणि डौलदार भाषासरणीचें एकादें वाक्य स्वयं-स्फूर्तीनें आमच्या तोंडून वेळीं निघूं शकेल; पण साधी, सोपी, ग्राम्य, खुमासदार अशी शिवी इंग्रजींतून आम्हांस देतां येणार नाहीं. या बाबतींत कोणताहि गोरा सोजीर नामदार गोखल्यांसारख्या पटाईत इंग्रजी लेखकाचा पराभव करूं शकेल.

तात्पर्य मराठा लिहिणाऱ्याच्या डोळ्यांपुढें सर्व हिंदुस्थान किंवा विलायतेंतील इंग्रज वाचकवर्गहि असल्यामुळें, आणि त्याचें भाषाज्ञान एकांगी व मर्यादित असल्यामुळें, मराठ्यांतील लेख केसरींतील लेखांपेक्षां प्रायः अधिक प्रौढ, दमदार, नेमस्त व दाक्षिण्ययुक्त असे वाटतात. किंबहुना एकाच मनुष्यानें, एकाच विष-यावर, एकाच आठवड्यांत मराठा व केसरी या पत्रांत लेख लिहिले तरीहि वरील भेद प्रत्ययास येतो. असा इतरांप्रमाणें आम्हांसहि अनेक वेळां अनुभव आलेला आहे. पण त्याची दुसरीहि एक बाजू अशी आहे कीं, केसरी स्वभाषेंतून लिहिला गेल्यामुळेंच तो आपलें भक्ष्य अधिक अचुक हुडकून काढूं शकतो, व अधिक तडफेनें त्याचा संहार करूं शकतो. मराठीपेक्षां इंग्रजी वाचकवर्ग इतर प्रांतांप्रमाणें महाराष्ट्रां-तहि पुष्कळ कमी हें तर झालेंच, परंतु महाराष्ट्रीय मनुष्यास खुद्द टिळकांनीं केस-रींत लिहिलेला लेख जितका पटत असे किंवा त्याच्या मनांत तो भिनत असे तितका त्यांचा मराठ्यांतील लेख कधीं पटला नाहीं व भिनला नाहीं. या कारणामुळें केसरीचा खप मराठ्याच्या खपाहून नेहमींच पुष्कळ अधिक असे. मराठ्याच्या जमाखर्चीचीं तोंडें गेल्या चाळीस बेचाळीस वर्षांत, व खुद्द टिळक संपादक असतांहि, मिळालीं नाहींत ही गोष्ट उघडपणें सांगण्यास कांहींच हरकत नाहीं. साप्ताहिक इंग्रजी पत्रांचें नशीबच खोटें. त्यांचा जम सर्व हिंदुस्थानांत कोठेंच बसला नाहीं. खुद्द जातिवंत इंग्रजानें चालविलेला मुंबईचा "चँपियन," व खुद्द इंग्रजापेक्षांहि अधिक चांगली इंग्रजी भाषा लिहिणारा मलबारींचा "इंडियन स्पेक्टेटर" किंवा नट-राजनूचा "इंडियन सोशल रिफॉर्मर" यांनाहि हाच अनुभव आल्याचें त्यांनीं

जाहीर केल्याचें आमच्या वाचनांत आहे. म्हणून केसरीनें म्हणजे धाकट्या भावंडानें मिळवून वडील भावंडास म्हणजे मराठ्यास पोसावें असेंच आजवर घडत आलेलें आहे. मराठ्याची वर्गणी सुरुवातीस सालीना टपालखर्चासह आठ रुपये म्हणजे केसरीच्या त्या वेळच्या वर्गणीच्या आठपट होती. मराठ्याच्या आठ पानांची छपाई व कागदखर्चहि तसाच मोठा होता. जाहिरातींचा दर बारा ओळींस एक रुपया याप्रमाणें होता; परंतु मराठ्याचा प्रसार अल्प असल्याकारणानें जाहिरातीचें उत्पन्न मराठ्यास कधींच फारसें लाभलें नाहीं. तें इतकें कीं, मराठ्याच्या जमाखर्चाचा अंदाज करितांना तें लक्षांत न घेतलें तरी चालण्याजोगें होतें; व प्रायः जाहिरातींची जागा जाहिरातींच्या दरांच्या जाहिरातीनेंच अडवलेली आढळते !

पण अशा रीतीनें खर्च अंगावर भरूनहि मराठा पत्र काढण्याचें काय कारण? याचें उत्तर हेंच कीं त्या वेळच्या व त्या लोकांच्या राष्ट्रीय भावनेच्या उद्गारांना इंग्रजी तोंडहि फुटल्याशिवाय तिचें समाधान होणें शक्य नव्हतें. राजकीय विषयांवरील विचार स्वकीयांना समजून सांगण्याला केसरीचा जो उपयोग तोच, ते विचार इंग्रज राज्यकर्ते किंवा परप्रांतीय हिंदी लोक यांना सांगण्याला मराठ्यासारख्या इंग्रजी पत्राचा उपयोग. इंग्रजी शिक्षण मिळविलेल्या विद्वानांना इंग्रजींत लेख लिहिण्याची आवड असणें अगदीं स्वाभाविक होय. ही नुसती आवड नव्हे तर संवयहि बनून जाते. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे निबंधमालेसारखें मासिक पुस्तक चालवून त्यांत आंग्लमय किंवा आंग्लप्राय बनलेल्या सुशिक्षितांवर कोरडे ओढीत असतां स्वतः ते आपल्या बंधूला व स्नेह्यांना इंग्रजींत पत्रें लिहीत हा एक प्रकारचा "वदतोव्याघाता"चा दोषच नव्हे काय? पण हा दोष अद्यापिहि आपणांतून गेलेला नाहीं. रानडे–गोखलेच कांय पण चिपळूणकर–टिळकहि खासगी पत्रव्यवहार मराठीपेक्षां इंग्रजींतूनच अधिक करीत हें प्रसिद्ध आहे. पण मराठा वर्तमानपत्र काढण्याचा हेतु इंग्रजी भाषेंत लिहिण्याच्या हौसेपेक्षां उपयोगाला अनुलक्षूनच अधिक होता. मराठींत पुष्कळ लिहिलें पण सरकारदरबारीं तें भाषांतर करून वाचणार कोण? आपलें हितचिंतक व मदतगार इंग्लंडांतहि आहेत, त्यांना आपल्या गोष्टी खुलासेवार व मार्मिकपणें कशा कळवितां येणार? खरेंच बोलावयाचें तर त्या वेळच्या आम्ही सुशिक्षित लोकांत असा दृढ विश्वास होता कीं, सरकारी इंग्रज अधिकारी किंवा त्रयस्थ इंग्रज लोक यांच्या गळ्यांत कोणतेंहि गाऱ्हाणें बिनतोड बांधलें, किंवा त्याविषयींचा युक्तिवाद त्यांच्या गळीं उतरविला म्हणजे आपला कार्यभाग बहुधा हटकून होणार. चळवळ हवी पण ती स्वकीयांपेक्षां परकीयांच्या शिक्षणाकरितांच अधिक हवी. चळवळ म्हणजे पुष्कळसें शिक्षण–फारशी कृति नव्हे.

सरकाराजवळ महाराष्ट्राचें मनोगत पदोपदीं व परोपरी कळवील असा दुभाष्या नाहीं व सरकार तो ठेवूंहि इच्छित नाहीं. ओरिएंटल ट्रॅन्सलेटर आधीं वाचणार

कितीं, त्यांतून भाषांतर करणार किती, व अनुग्रहापेक्षां निग्रहाच्या दृष्टीनेंच तो देशी वर्तमानपत्रांकडे अधिक पाहाणार. यामुळें त्याचे रिपोर्ट एकांगी, संक्षिप्त, तुटक, चुकीच्या भाषांतरानें किंवा खोडसाळपणानें दूषित झालेले असणार. याकरितां प्रजेनें थोडी झीजहि सोसावी, पण मध्यस्थाचे वरील सर्व दोष ज्यांत राहाणार नाहींत असा कायमचा दुभाष्या आपण होऊन सरकारास सुलभ करून द्यावा, याकरितां मराठा हें पत्र काढलें गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. मराठ्याच्या पहिल्या अंकांतील आत्मनिवेदनरूप लेखांत त्याच्या संस्थापकांनीं पत्राचा हेतु खालीलप्रमाणें दिला आहे. " Our true primary duty will be to interpret, petition and instruct, and advocacy may be said to form the second part of our real work." हें दुभाष्याचें काम त्या काळीं दोन दोन भाषेंत चालविल्या जाणाऱ्या इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, सुबोधपत्रिका यासारख्या अँग्लो व्हर्न्याक्युलर पत्रांकडून थोडेंबहुत केलें जात असे. पण या तरुण महाराष्ट्रीय मंडळीस हें काम वेडगुजरी व अपुरें वाटलें, म्हणून अँग्लोव्हर्न्याक्युलर पत्राऐवजीं त्यांनीं केसरी हें निव्वळ मराठी व मराठा हें निव्वळ इंग्रजी पत्र काढण्याचें ठरविलें. संपादकीय लेखांप्रमाणेंच मराठ्याचा दुसराहि एक भाग त्यांनीं योजिला होता. तो मात्र सरकारापेक्षां स्वकीयांच्या शिक्षणाकरितां होता. यांत नामांकित इंग्रजी वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें वगैरेंतून उतारे किंवा मोठ्या लेखांचे सारांश देण्याचा हेतु होता. या भागास उद्देशून शास्त्रीबोवांनीं निबंधमालेंत मराठ्याचें वर्णन खालीलप्रमाणें केलें होतें:—

" ( मराठा पत्र ) वाचलें असतां बहुतेक मोठमोठीं इंग्रजी वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें वाचण्याचें श्रेय येण्यासारखें आहे. व त्यामुळें दूरदूरच्या गांवीं सरकारी कामामुळें ज्यांस राहणें पडतें व जगांत काय चाललें आहे हें समजण्याचा ज्यांस चांगलासा मार्ग नसतो त्यांस तें विशेष उपयोगाचें आहे. "

आपण घेतलेलें नांव 'मराठा' असें असलें तरी आपली दृष्टि संकुचित व आपला अभिमान केवळ प्रांतीय स्वरूपाचा नाहीं असें सांगून मराठ्यानें पहिल्याच लेखांत असें म्हटलें होतें कीं, आमच्या इतिहासप्रसिद्ध नांवावरून कोणाला कदाचित् अशी भीति वाटेल कीं, आम्ही इतरांच्या मुलखांवर स्वाऱ्या व हल्ले करूं लागूं, पण ही भीति निराधार आहे. मराठा हें पत्र कांहीं थोड्या पुणेकर ब्राह्मणांच्या हातीं राहिलें तरी तें कोणत्याहि विशिष्ट जातीचा अगर वर्गाचा बेसुमार अभिमान धरणार नाहीं; व या प्रतिज्ञेचें शक्य तितकें आजवर पालन झालें आहे असें आम्हांस वाटतें.

पहिल्या वर्षांत मराठ्यांत इतर विषयांबरोबर कोल्हापूर संस्थानावर विशेष कडक लेख आले; व यासंबंधानें विशेष माहिती आम्हीं पुढें कोल्हापूर प्रकरणावरील भागांत देणार आहोंत. येथें इतकेंच सांगतों कीं, कोल्हापूरच्या खटल्यांत

टिळकांना शिक्षा होऊन ते सुटून आल्यावर त्यांनीं फिरून मराठ्याचें डिक्लरेशन केलें नाहीं. वासुदेवराव केळकर यांच्याकडेच टिळकांच्या गैरहजेरींत मराठ्याचें संपादकत्व आलें. तें त्यांजकडे ३ सप्टेंबर १८९१ पर्यंत होतें. या दिवशीं टिळकांकडे केसरी व मराठा या दोन्ही पत्रांची पूर्ण मालकी येऊन, त्यांनीं या दोन्ही वर्तमानपत्रांचे जबाबदार संपादक म्हणून डिक्लरेशन केलें. पण ही गोष्ट घडून येण्याचा थोडासा पूर्व वृत्तान्त आहे तो सांगितला पाहिजे. हा वृत्तान्त एक दोन वर्षांचा नसून सुमारें सात वर्षांचा आहे. शिवाय यांत मतभेदाच्या तीन चार बाबींचा वेगवेगळ्या रीतीनें विचार करणें सोईचें होणार आहे. या चार बाबी म्हणजे ( १ ) फक्त न्यू इंग्लिश स्कूल व कॉलेज किंवा डेक्कन एज्युकेशन सोसायटी हीं कोणत्या तत्वांवर चालविलीं जावीं. म्हणजे तिच्या घटकांनीं प्रत्यक्ष पगाराची अपेक्षा किती ठेवावी, सोसायटीचें काम संभाळून कां होईना पण इतर काम त्यांनीं अंगावर घ्यावें किंवा नाहीं, निदान द्रव्योत्पादक असें काम हातीं घ्यावें किंवा कसें. ( २ ) डेक्कन एज्युकेशन सोसायटी, तिचे सभासद आणि छापखाना व वर्तमानपत्रें यांचा संबंध राहावा अगर राहूं नये व राहिल्यास तो कसा असावा. (३) सोसायटीचा कांहीं संबंध नसतांहि, मतभेदाच्या बाबतींत स्वतः केसरी व मराठा या पत्रांचाच, समायिक मालकीच्या दृष्टीनें, परस्पर संबंध कसा राहावा. ( ४ ) सार्वजनिक मतभेदामुळें किंवा व्यक्तिगत स्वभावभेदामुळें होणारीं भाडणें. पैकीं पहिल्या बाबीसंबंधानें स्वतः लोकमान्य टिळकांनीं सोसायटी सोडतेवेळीं राजिनामा दिला त्यांत सविस्तर विवेचन केलें असल्यामुळें त्याचा सारांश दिला असतां या मुद्याचें काम भागेल असें आम्हास वाटतें. दुसऱ्या मुद्यासंबंधानें सामाजिक बाबतींतील मतभेदावरून डे. ए. सोसायटींतील टिळक पुरस्कृत एक पक्ष व आगरकर पुरस्कृत दुसरा पक्ष यांचें, झुंज सुमारें चार वर्षें सतत कसें चाललें होतें, व शेवटीं १८८७ सालीं टिळकपक्ष विजयी होऊन वर्तमानपत्रापुरते आगरकर बाहेर कसे पडले याचा वृत्तान्त द्यावा लागेल. तिसऱ्या मुद्यासंबंधानें केसरी मराठा हीं पत्रें व आर्यभूषण छापखाना यांच्या परस्पर सांपत्तिक संबंधाविषयीं प्रथम कांहीं माहिती देऊन, नंतर शेवटीं सोसायटीपैकीं वर्तमानपत्रांच्या संबंधांत उरलेले एकटे वासुदेवराव केळकर यांची व टिळकांची फूट होण्याचा प्रसंग कसा आला, केळकरांनीं वर्तमानपत्रें कशीं सोडून दिलीं, व एकट्या टिळकांनीं आर्यभूषण छापखाना व वर्तमानपत्रें यांची भागीदारी तोडून तीं व त्याबरोबरच कर्ज घेऊन ते सर्वस्वी स्वतंत्र कसे बनले हें सांगावें लागेल. चौथा मुद्दा म्हणजे हौसेनें व एका उच्च ध्येयाला मोहून सोसायटींत एकत्र आलेल्या या तरुण लोकांचे स्वभावभेदामुळें वेगवेगळे पंथ होऊन प्रत्येकाला वेगवेगळी दिशा कशी लागली, हा मनोरंजक बोधपर पण खेदकारक वृत्तान्तच होय.

---

## भाग ६ वा

# कोल्हापूर प्रकरण व पहिली शिक्षा

कोणत्याहि देशांत सार्वजनिक कामांत पडणाऱ्या मनुष्याची तुरुंगांत जाण्यापर्यंत तयारी असावी लागते. सन १८८२ च्या पूर्वी हिंदुस्थानांत तुरुंग नव्हते किंवा लोक बंदिवासांत पडत नसत असें नाहीं. तथापि खासगी गुन्हे करून तुरुंगांत जाणें व सार्वजनिक चळवळींत गुन्हे घडून तुरुंगांत पडणें यांत पुष्कळ अंतर आहे. सन १८८२ च्या पूर्वी या दुसऱ्या प्रकारच्या गुन्ह्याकरितां हिंदुस्थानांत एकहि मनुष्य तुरुंगांत पडला नसेल असें कसें म्हणावें ? कारण १८५७ च्या बंडांत शेंकडों अपराधीच काय पण निरपराधी लोकसुद्धां फांशी गेले, मग तुरुंगवासांत पडले असल्यास नवल काय ? पण आमचें विधान मुख्यतः शांततेच्या राजकीय चळवळीच्या संबंधाचें आहे. इतर कोणाला हा मान यापूर्वी मिळालेला असो अगर नसो; पण टिळकांना तरी हा मान महाराष्ट्रांत पहिल्यानेंच मिळाला. व तोहि त्यांच्या वयाच्या पहिल्या पंचविशींत. १८८२ सालीं त्यांना चार महिन्यांची साध्या कैदेची शिक्षा झाली व तुरुंगवासाच्या चरित्रांतला त्यांचा उपनयन संस्कार झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही शिक्षा स्वरूपतः एका व्यक्तीची बदनामी केल्याच्या आरोपाकरितां झाली होती हें खरें. तथापि वस्तुतः हें व्यक्तिव्यक्तींचें भांडण नव्हतें व त्यांत कोणासहि व्यक्तिस्वार्थ साधावयाचा नव्हता. या बदनामीचे खटल्याला राजकीय चळवळीचें आंतून जाड अस्तर लागलेलें होतें. व त्याचें प्रत्यंतर हेंच कीं या शिक्षेचा वार टिळकांवर झाला तरी त्यानें त्यांच्या व्यक्तिचारित्र्याला यत्किंचितहि जखम न होतां त्यांना एक प्रकारचा कीर्तिलाभच घडला.

न्यू स्कूलच्या मंडळींनीं केसरी व मराठा हीं पत्रें सुरू केलीं तेव्हांच ' हे लोक नुसते पंतोजी नसून देशाभिमानी, समाजाभिमानी असे उद्योगशील व चळवळे लोक होणार ' हें भाकीत उघडच ठरलें. यापूर्वी पुण्यांत ज्ञानप्रकाश वर्तमानपत्र चालू होतें. तथापि त्याला विद्वान् व राजकारणप्रिय असे संपादक न मिळाल्यामुळें लोकांना तें फारसें आवडत नव्हतें. वर्तमानपत्रांकरितां जसा छापखाना असूं शकतो तसेंच छापखान्याकरितांहि वर्तमानपत्र असूं शकतें. या दुसऱ्या प्रकारच्या वर्तमानपत्राची स्थिति बिनवारशी पोरक्या पोराप्रमाणें असते. कोणी वेळेवर येऊन घोटभर दूध घातलें तर घातलें, नाहीं तर त्यानें खुशाल उपास काढावे ! यामुळें तें कधींहि बाळसें धरीत नाहीं, त्याकडे पाहून कोणाचें मन प्रसन्न होत नाहीं, व त्याच्या हातून कांहीं कार्य होईल असा विश्वासहि कोणास

पटत नाहीं. केसरी व मराठा हीं पत्रें लेखकांच्या हौसेनें व उद्यमप्रियतेनें निघालेलीं असल्यामुळें, त्यांना लेखांची उणीव पडत नसे; येवढेंच नव्हे तर हे लेख विद्वान व पाणीदार माणसें लिहितात असें तेव्हांच दिसून आलें, व कोठें कोणाचें राजकीय दुःख असेल तर तें चव्हाट्यावर आणण्याला हें एक सत्तेचें व सोईचें द्वार निर्माण झालें असा लोकांना भरंवसाहि वाटूं लागला.

आतां दुःख राजकीय असलें तरी त्याची हकीकत खरी असेल तीच छापणें न्यायाचें होय. पण या बाबतींत सामान्य लोकांच्या अंगीं भोळेपणा व भावना–प्राधान्य असून, त्यांच्या जोडीला कायद्याचें अज्ञानहि असतें. यामुळें ते वाटेल त्या खऱ्या खोट्या, वास्तविक वा काल्पनिक, अशा सर्व प्रकारच्या हकीकतींची सरमिसळ करून वर्तमानपत्रांकडे पाठवितात. यांत पाठविणाराचा हेतु प्रायः संपादकास गोत्यांत आणावयाचा नसून केवळ आपल्या विचारास प्रसिद्धी मिळविण्याचाच असतो खरा. पण मजकूर प्रसिद्ध करण्याची जबाबदारी सर्वस्वीं संपादकावर असल्यामुळें त्याला अशी माहिती छापणें अगर न छापणें हें एक संकटच होऊन बसतें. खऱ्याखोट्याची निवड पुष्कळ वेळां खुद्द जाग्यावर जाऊन देखील एकादें वेळीं पक्की होत नाहीं. मग ती संपादकाच्या खोलींत बसून कशी होणार? बरें; फाजिल व्यवहारचतुर माणसाप्रमाणें परक्या बातमीदारांवर सहसा विश्वास न टाकतां अविश्वासच टाकीत गेल्यास, धारिष्ट व तत्परता हे जे दोन गुण संपादकांच्या अंगीं अवश्य लागतात ते आपल्या अंगीं नाहींत असें ठरून शीलाला बट्टा लागणार. अशा अडचणींत स्वतः संपादकाच्या मनाला तळमळ असेल तरच कांहीं चळवळ होईल. मग त्याबरोबर कांहीं चुकाहि होवोत.

ही तळमळ केसरी व मराठा पत्रांच्या तरुण संपादकमंडळांत निःसंशय होती. म्हणून त्यांचा कल सावधगिरीपेक्षां धारिष्टाकडेच अधिक वळला. आपल्या तळमळीचा व हौसेचा फायदा अविचारी उतावळे किंवा दुष्ट लोकहि घेण्याचा संभव आहे ही गोष्ट त्यांना माहीत नव्हती असें नाहीं. किंबहुना या गोष्टीस उद्देशूनच 'पत्रें पाठविणारास सूचना' या मथळ्याखालीं तारीख १३ सप्टेंबर १८८१ च्या केसरींत खालील शब्दांनीं चुणचुणीत इशारत दिली गेली होती. "दप्तरासंबंधानें आम्ही चर्चा करितों म्हणून कांहीं लोक मोठीं तऱ्हेवाईक पत्रें आमच्याकडे धाडीत असतात. असें करणारांचा मतलब कांहीं असो. पण सर्व बातमीदारांनीं इतकें लक्षांत ठेवावें कीं खात्रीलायक सह्या देऊन ते लिहितात तो मजकूर खरा आणि साधार अशी आमच्या दिलाची खात्री झाल्यावांचून आम्ही कोणचेंहि पत्र छापणार नाहीं. टवाळ लोकांच्या हुच्चपणाच्या लेखास केराच्या करंडींतच स्थान मिळावयाचें." पण दुर्दैवानें तरुण केसरीकारांच्या व्यवहारचतुरपणाची ही दर्पोक्ति व्यर्थ ठरण्याची वेळ लवकरच आली. केसरी मराठा पत्रांच्या या जागता पाहरेवाल्याला गोता देणारी धाडसी मंडळी याच्चींच जन्मास येऊन

चार पावसाळे अधिक खाऊन राहिली होती. आणि एकादे वेळीं फरशी केलेल्या जागेंतच जसा एकदम भोसका पडून गुडघ्याइतका पाय जावा, त्याचप्रमाणें खोटीं बनावट व घोर बदनामी करणारीं बातमीदारांचीं पत्रें छापल्याबद्दल संपादक महाशयांना तुरुंगांत जावें लागलें !

केसरी व मराठा पत्रांत पहिल्या सालीं चळवळीच्या स्वरूपाचे लेख आले त्यांत बरेचसे देशी संस्थानासंबंधाचे होते. ब्रिटिश सरकारावरहि टीका येत असे; पण खुद्द खालसामुलखांत जो अन्याय होतो त्याहून पोलिटिकल एजंट रेसिडेंट वगैरे हस्तकांच्या हातून अधिक होतो. देशी संस्थानांत अन्यायाचा नुसता धुडगूस घातला जातो अशी समजूत हल्लींप्रमाणें तेव्हांहि होती, व हल्लींइतकीच तेव्हां ती खरीहि होती. फरक असल्यास तो हाच कीं लोकांमध्यें देशी संस्थानांसंबंधानें आज जें प्रेम वसत असेल त्यापेक्षां तें तेव्हां खास दसपट अधिक वसत होतें. चाळीस वर्षांपूर्वी आपल्या लोकांना कदाचित असा विश्वास वाटत असावा कीं, एकाद्या देशी संस्थानास जर सुदैवानें हुषार न्यायी व पाणीदार अधिपति लाभला, तर तो आपल्या सुराज्यव्यवस्थेनें व प्रजावात्सल्यानें इंग्रज सरकारला लाज आणील; आणि 'हें चित्र पहा व तें चित्र पहा ' असें अभिमानानें दाखवावयास सांपडेल. आज चाळीस वर्षांनंतर हा विश्वास फारसा उरलेला आहे असें म्हणतां येत नाहीं. शिवाय राजकारणाची प्रगति अलीकडे पुष्कळ झाल्यामुळें स्वराज्याची (लोकसत्तेची) तहान सुराज्यानें स्वदेशी राजाहि भागवूं शकत नाहीं हा सिद्धांत दृढ प्रस्थापित झाला आहे. तें असो. पण प्रस्तुत मुद्दा हा कीं, केसरी व मराठा हीं पत्रें जन्मास आलीं त्या काळीं देशी संस्थानिकांबद्दल अत्यन्त प्रेम वाटत असून, पोलिटिकल एजंट व रेसिडेंट यांजबद्दल अत्यन्त अविश्वास वाटत असे. आणि त्यांच्या धोरणानें व तंत्रानें चालणारे नेटिव्ह दिवाण व कारभारी यांच्याविषयीं तर एकप्रकारें द्वेषबुद्धीच वाटे. इंग्रज सरकार हें काय बोलून चालून परकेंच ! त्यांना आमच्या देशी संस्थानांचें हित व्हावें असें कसें वाटणार ? पण दिवाण व कारभारी हे आमच्या हाडामांसाचेच ना ? मग त्यांना संस्थानाबद्दल अभिमान कां वाटूं नये ? येवढा पगार खातात तर इनामदारी राखून आपल्या धन्याच्या तर्फे इंग्रजसरकारशीं त्यांनीं कां झगडूं नये ? असें प्रत्येकास सहजच वाटे. पण अनुभव पहावा तो अगदीं उलट. " रविरपि न दहति तादृक् यादृक् परिदहति वालुका–निकरः । अन्यस्मात् लब्धपदो नीचः प्रायेण दुःसहो भवति ॥ " ही उक्तीच पदोपदीं खरी ठरत असे. एक वेळ एजंट किंवा रेसिडेंट पुरवला, कारण तो परका म्हणून दूर तरी राहतो. पण दिवाण किंवा कारभारी नको, कारण त्याला वरिष्ठ राजकारणापासून तो राजवाड्यांतील खासगीच्या कान्याकोंपऱ्यापर्यंत प्रवेश सुलभ असावयाचा, व हातीं सत्ताहि भरपूर. यामुळें वर्तमानपत्रांत देशी संस्थानावर लेख

या वेळीं यावयाचे म्हटलें म्हणजे त्यांत हे दिवाण व हे कारभारी यांजवर हल्ला प्रायः ठेवलेलाच असावयाचा !

पहिल्याच वर्षी केसरींमध्यें कोल्हापुरांतील राज्यकारभारासंबंधानें लेख येऊं लागले, व ते पुढील सालीं विकोपास जाऊन खटला झाला. तथापि केसरीनें समाचार घेतलेलें हें पहिलेंच देशी संस्थान नव्हे. कारण त्याच्याहि पूर्वीं बडोदें संस्थानासंबंधानें केसरींत लेख येत होते. यापूर्वी कांहीं वर्षें बडोद्याचे अधिपति मल्हारराव गायकवाड हे पदच्युत झाले असून, दत्तक घेऊन गादीवर बसविलेले छोटे सयाजीराव महाराज यांना अद्याप मुखत्यारी मिळावयाची असल्यामुळें, सर्व कारभार दिवाणाचे हातीं होता; व त्यांवर इंग्रज सरकारची देखरेख असे. या वेळचे बडोद्याचे दिवाण सुप्रसिद्ध राजा सर टी. माधवराव हे होते. यांनीं त्रावणकोरास दिवाणगिरींत लौकिक मिळविला होता. पण हे स्वतः महाराष्ट्र ब्राह्मण असतांहि इंदूरच्या मराठी दरबारांत त्यांचें फारसें तेज पडलें नाहीं. बडोद्यास तर त्यांच्याविषयीं लोकांत अप्रीतीच होती. याचें खरें कारण असें असावें कीं, सयाजीरावमहाराज हे हुशार व सुशिक्षित असल्यामुळें, ते संस्थानचा कारभार लवकरच मुखत्यारीनें हातीं घेऊन पूर्वीच्या अमदानीचा दुर्लौकिक धुवून काढतील अशा आशेनें लोक मोठे आतुर झाले होते; पण तरुण राजपुत्राला मुखत्यारी मिळण्यापूर्वीचा काल हा एकप्रकारें संधिकाल असल्यामुळें आपल्याला काय हवें नको तें साधून घेण्याला इंग्रज सरकारलाहि ही मोठीच संधि मिळालेली असते. मुखत्यारी हवी तर सरकारचें ऐकलें पाहिजे, अशा बुद्धीनें तरुण संस्थानिक सरकारच्या अटी मान्य करितो; व या अडचणीच्या अटी घालण्यास किंवा त्या अटींची फलश्रुति आधींच पदरांत पाडूनहि घेण्यास इंग्रज सरकारला दिवाण व कारभारी यांची फार मदत होते.

राजा सर. टी. माधवराव यांनीं अशा संधिकालांत इंग्रजसरकारचें हित पाहिलें व आपल्या धन्याचें अनहित केलें अशी लोकांना जबरदस्त शंका आली होती. कोणीकडे निःस्वार्थी दादाभाई कीं ज्यांनीं बडोदेसंस्थानच्या हिताकरितां दिवाणगिरीवर लाथ मारली; व कोणीकडे सर. टी. माधवराव कीं ज्यांनीं आपल्या बढतीकरितां बडोदें संस्थानचे हक्क खुशाल गमवावयास काढले. माधवरावांनीं किरकोळ सटर फटर सुधारणा बडोद्यास बऱ्याच केल्या होत्या. पण लोकांची विवेकबुद्धि जागृत असल्यानें त्यांनीं भुलून न जातां मुख्य मुद्यावर नजर ठेविली होती. बडोद्याच्या नवीन राज्यपद्धतीचा मसुदा 'कॉनस्टिटयूशन' आणि बडोदा 'कॉन्टिंजण्ट' म्हणजे तैनाती फौज वगैरे बाबतींत भलत्या कबुल्या देऊन या दिवाणसाहेबांनीं संस्थानचें कायमचें नुकसान केलें ही गोष्ट त्यांना रुचली नाहीं. शिवाय मद्रासी लोक जिकडे तिकडे कचेऱ्यांतून भरले, गुर्जर लोकांचा योग्य मान राखला नाहीं, सयाजीमहाराजांवर विनाकारण कदर ठेविली, त्यांना स्वतंत्र राजकीय शिक्षण मिळूं

नये म्हणून सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांसारखीं साधनेंहि त्यांना मिळण्यास हरकत केली, वगैरे अनेक किरकोळ दोषारोप त्यांजवर होते ते वेगळेच. केसरी मराठ्यांत या प्रकरणावर वर्षभर मोठे चुरचुरित व मुद्देसूद लेख आले होते. पण दुर्दैवानें ही टीका विकोपास गेली नाहीं.

कोल्हापूरची स्थिति दुर्दैवानें बडोद्याहून अधिक नाजुक होती. तेथील मुख्य धनी शिवाजीमहाराज वेडे झाल्याचा संशय येऊन लोकांस दुःख होत होतें व त्याहून दुर्दैवाची गोष्ट ही कीं, करवीरकर महाराजांना वेड लागण्याला त्यांच्या पदरचे दिवाण हेच कारणीभूत आहेत अशी लोकांना, खोटीच कां होईना पण जबरदस्त, शंका आली होती. यामुळें कोल्हापूरचे कारभारी रावबहादुर माधवराव बर्वे यांच्या मानानें बडोद्याचे दिवाण सर टी. माधवराव हे पुष्कळ बरे असें लोकांना वाटे. महाराजांचे बाल्यावस्थेंत कोल्हापूरची दौलत परस्वाधीन असतां, म्हणजे इंग्रज सरकार हे ट्रस्टी व दिवाण हे त्यांचे पगारी मुनीम असतां, दरबारी खजिन्यांतील लक्षावधि रुपयांचा चुराडा झाला. निरुपयोगी भव्य इमारती, चैनीचीं नक्षीदार कामें वगैरे करून कारभाऱ्यांनीं दरबारचें दिवाळें वाजविण्याची वेळ आणली वगैरे, असे लोकप्रवाद सुरू होते. केसरी--मराठ्याचें धाडसी धोरण पाहून कोल्हापुरांतील राजपक्षपाती लोकांना अर्थातच उत्तेजन आलें; व त्यांनीं संपादकांकडे सर्व हकिकती पाठविण्यास सुरुवात केली. अशा रीतीनें क्रिया व प्रतिक्रिया सुरू होऊन कोल्हापूर प्रकरण हें केसरी-मराठ्यांतील वाचण्याचा एक महत्त्वाचा विषय असें लवकरच होऊन बसलें. ता. ११ आक्टोबर १८८१ च्या केसरींत खालील शब्द आढळतात. " कोल्हापूर छत्रपतीमहाराजांची सध्यांची अशी स्थिति आहे कीं, ती ऐकून पाषाणहृदयाच्या देखील काळिजाला घरे पडतील. महाराजांचे प्राण जाऊन शव हातीं आल्यावर आमचे लॉर्ड साहेब जागृत होणार काय ? कोणत्याहि कारणानें छत्रपतीच्या जिवास अपाय झाला तर त्याचा कलंक बादशाही राणीच्या आणि तिच्या प्रतिनिधींच्या कपाळीं आल्यावेरीज राहाणार नाहीं. "

हे शब्द तर कडक आहेतच, पण त्यांहून कितीपट अधिक कडक टीका लोक खासगी संभाषणांतून करीत असतील, व दिवाण माधवराव बर्वे यांची आपल्या धन्यासंबंधाची गुन्हेगारी किती खरी मानीत असतील, याचें अनुमान वरील शब्दांवरून सहज करितां येईल. याचें प्रत्यंतर पुण्यास ता. २४ नोव्हेंबर रोजीं रात्रीं आनंदोद्भव नाटकगृहांत भरलेल्या जाहीर सभेंत मिळालें. सभेस हजारों लोक आले होते. वृद्ध पेनन्शर गोपाळराव हरी देशमूख हे अध्यक्ष होते. मुख्य भाषण कोल्हापूरचे एक पुढारी वकील सदाशिव पांडुरंग ऊर्फ नाना भिडे यांचें झालें. हे धंद्यानें वकील तर होतेच, पण कोल्हापूरचे दत्तकमहाराज यांची पहिल्या घरची आई राधाबाईसाहेब यांचे मुखत्यारपत्र त्यांनीं या कामीं घेतलें होतें. महाराज हा राधाबाईसाहेबांच्या पोटचा गोळा, म्हणून त्यांनाच

त्यांची खरी कळकळ असें लोकांना वाटणें साहजिक होतें. भिडे यांनीं श्रोतृ-मंडळीस तास दोन तास आपल्या सहज वक्तृत्वानें भारून टाकलें. व त्यांत आलेली विसंगतता व ग्राम्यता ही करुणरसाला देखील उपकारक व्हावी अशीच त्या विषयांतील मूळ हकिकतीची भयानक भूमिका होती.

भिडे यांनीं सांगितलेल्या हकिकतीचें तात्पर्य असें होतें कीं, कोल्हापूरकर महाराज हे वास्तविक वेडे नसून त्यांजवर हा वृथा आळ कारमाऱ्यांनीं आणलेला आहे. यांत महाराजांच्या दत्तक घराण्यांतील एक आई सामील असून महाराज व त्यांचें कुटुंब यांची निर्दयपणें ताटातूट करण्यांत आलेली आहे. आणि महाराजांचा बंदिवासांत अत्यंत छळ केला जात असून, त्यांना जपण्याकरितां म्हणून ठेवलेले गोरे डॉक्टर व रखवालदार यांच्या हातून लवकरच त्यांचा खूनहि होण्याची भीति आहे. ही भयंकर हकीकत लोकांनीं कल्पनेनें पूर्वी ताडलीच होती, पण नाना भिडे यांच्या रसभरित वाणीनें ती प्रत्यक्ष ऐकल्यावर पुण्याचे लोकांस काय वाटलें असेल याची कल्पना सहजच करतां येईल. ता. २९ नोव्हेंबर १८८१ च्या केसरींत वरील सभेची हकीकत देऊन शिवाय संपादकांनीं अग्रलेखांत खालील टीका केली होती:—

"कोल्हापुरायेवढें संस्थान आणि त्यांत इतके दिवस येवढें खूळ माजून रहावें आणि चाबकाचा मार काय, छड्या, काय, रंगमहालांतील लज्जास्पद व अधमाधमतेचा प्रकार काय—हें सर्व चालावें आणि इंग्रज बहादरांस त्याची खबरही नसावी, किंवा त्याकडे एकसारखा कानाडोळा करण्यांत यावा, ही आमच्या सरकारच्या राजनीतीस व व्यवस्थेस अतिशय काळिमा आणणारी गोष्ट आहे. जें आमचें सरकार कैद्यांचे हाल होऊं नयेत म्हणून तजविजी करतें त्यांच्या कानीं बिचाऱ्या छत्रपतीचा आक्रोश येतच नाहीं कीं काय?" केसरीनें असेंहि म्हटलें कीं, कोणाची जिंदगी उपटावयाची असली कीं, त्याला उगाच वेडा ठरवून इस्पितळांत कोंडतात अशीं वर्णनें विलायती कादंबऱ्यांत आपण वाचतों त्यांतलाच हा प्रकार. मात्र येथें तो खरोखर घडणारा आहे. ग्रीन कॉक्ससारख्या गोऱ्या रखवालदाराचें दर्शन जर महाराजांना अप्रिय तर त्यांना दूर करून ममतेची त्यांच्या पहिल्या घरची आई त्यांच्या शुश्रूषेला कां ठेऊं नये? विलायती औषधांचा महाराजांना वीट आला असेल तर देशी वैद्यांचें औषध देऊन पहावें. तात्पर्य डोक्याला त्रास झालेल्या मनुष्याला त्याच्या छंदानेंच वागविलें पाहिजे; त्याच्या कलाविपरीत केल्यानें तो वेडा नसला तरी वेडा व्हावयाचा. राधाबाईनीं गव्हर्नरसाहेबांची कलकत्यास गांठ घेतली, पण डाक्तरी इलाज थकल्याशिवाय आईच्याहि ताब्यांत महाराजांना देतां येत नाहीं असें सांगून त्यांनीं बिचारीची निराशा केली.

टाइम्स वगैरे इंग्रजी पत्रांतून ही चर्चा सुरू असून ते असा सल्ला देत कीं महाराजांना विलायतेस पाठवावें. पण कट करून महाराजांना मारतील अशी जेथें शंका तेथें

हा उपदेश कसा पसंत पडणार ? शिवाय या पूर्वीचेच महाराज, म्हणजे राजाराम-महाराज, युरोपच्या प्रवासांत तिकडेच इटलीमध्यें फ्लॉरेन्स शहरीं वारले; तेव्हां हा दाखलाहि मोठासा उत्तेजक नव्हता. ता. ६ डिसेंबरच्या केसरींत महाराजांना थोडासा पण खरा बुद्धिभ्रंश झाल्याचें कबूल केलें होतें. पण महाराजांना संताप उत्पन्न होण्याचीं खरीं कारणें जगापुढें मांडण्यासारखीं नाहींत, गोऱ्या डॉक्टरांना तीं समजत नाहींत किंवा जाणून बुजून ते तिकडे दुर्लक्ष्य करितात, म्हणून हल्लींच्या रीतीनें त्यांची शुश्रुषा चालल्यास ते सुधारण्याची आशा नको, असें म्हटलें होतें. या पूर्वी नाना भिडे यांनीं या प्रकरणांत, पुढें जीं बनावट ठरलीं तीं पत्रें पुण्यांतील अनेक लोकांना, व त्याबरोबरच केसरीमराठ्यांच्या संपादकांना दाखविलीं असें दिसतें; कारण त्याच अंकांत केसरी म्हणतो, "कोल्हापूरच्या संबंधानें जे कागदपत्र आमच्या पाहण्यांत आले आहेत त्यांवरून रा. ब. माधवराव बर्वे यांच्या राक्षसी अंतःकरणाविषयीं आमची बालंबाल खात्री झाली आहे. आज रोजीं त्यांचीं काळीं कृत्यें उजेडांत आणतां येत नाहींत, यास आमचा नाइलाज आहे. पण तीं इतकीं घोर आहेत कीं, तीं ऐकून सहृदय पुरुषाच्या अंतःकरणास घरे पडतील व आकाशपाताळ एक होऊन जाईल."

इकडे ॲंग्लो इन्डियन पत्रांतून दुसरी बाजू तितक्याच जोरानें भडक रंगविली जात होती. त्यांचे बातमीदार लिहीत कीं, महाराज हे खरोखर वेडेच आहेत; राधाबाईसाहेबांच्या पक्षाचे व पुण्याचे सर्व लोक जसे बाहेरून तसेंच आंतूनहि काळे आहेत; धामधूम करून पैसा उपटण्याचा त्यांचा हेतु आहे; व कारभारी बर्वे हे सर्वस्वी निःस्वार्थी व निरपराधी आहेत. त्यावर अर्थात् केसरीनें टोला दिला कीं, इंग्रजी पत्रांचाहि निःस्पृहीपणाचा व निराभिलषतेचा डौल पोकळ असतो. बर्वे कारभारी आमचाच नेटिव्ह मनुष्य मोठ्या पदाला चढलेला, मग त्याला विनाकारण दूषण देऊन आम्हांला काय लाभ ? माधवरावांचीं पापें तोंडानें उच्चारवत नाहींत, व तीं कदाचित् देहान्त प्रायश्चित देण्यासहि योग्य ठरतील ! अद्याप गुन्हेगारीचीं पत्रें किंवा इतर कागदपत्र केसरींतून प्रसिद्ध झाले नव्हते. पण बर्व्यांची बेअब्रू व्हावयाची ती होऊन गेलीच होती. म्हणून प्रत्यक्ष पत्रें प्रसिद्ध झालीं अगर न झालीं तरी बर्व्यांना फिर्यादीनें सोक्षमोक्ष करून घेणें प्राप्त होतें. इकडे गटारयंत्र सुरूच होतें; कोणी म्हणत कीं कोल्हापुराहून एक मनुष्य ' तीन चकोत्री काबीज करण्याकरितां वीस हजारांचे तोडे घेऊन आला आहे;' कोणी म्हणत 'बर्वे सस्पेंड होऊन त्यांच्यावर बर्डवुड वेडरबर्न यांचें कमिशन बसणार '! इकडे १८८१ च्या अखेरीस बडोद्यास सयाजीरावमहाराजांना मुखत्यारी मिळून लोकांच्या आशेचें झाड वाढीस लागलें. अधिकारदानसमारंभाचे प्रसंगीं हजर राहून मानपत्र देण्याचा मान पुणें सार्वजनिक सभेला मिळाला होता, व तारीख २७ डिसेंबरच्या १८८१ च्या केसरींत नवीन महाराजांना प्रौढपणें दोन उपदेशाचे शब्द लिहून केसरीनें बडोदें-प्रकरणाची

रजा घेतली. केसरीनें केलेल्या या ' एकदम सबुरीचा ' कित्येकांनीं विपरीत अर्थहि केला. कोणी म्हणाले कीं केसरीची थोडी बोटचेपी झाली असेल म्हणून नांगी पडली. कोणी म्हणे कोल्हापूरप्रकरणांत फिर्याद दाखल झाल्यामुळें केसरीनें संस्थानावर लेख लिहिण्याचें टाकून दिलें. पाहूं जातां यांपैकीं एकहि गोष्ट खरी नव्हती हें सांगावयास नकोच. बडोदें प्रकरण वास्तविक स्वाभाविक रीतीनेंच संपलें होतें. नवे महाराज गादीवर बसले यामुळें दिवाणाचें वर्चस्व कमी झालें ! एका वर्षांत लहान आकाराच्या केसरींत एका बडोद्याच्या विषयावर इतके लेख आल्यामुळें स्वतंत्र निबंध वगैरे लिहिणें कमी झालें याविषयीं वाचक तक्रारहि करूं लागले. आणि फिर्याद झाली तरी संपादक डगणारे नव्हते म्हणून व फिर्यादीच्या अंगभूत नवे उद्योग निर्माण होत असल्यामुळें, बडोदें सोडून देऊन कोल्हापूर प्रकरण त्यांना विशेष रीतीनें हातीं घेणें योग्यच होतें.

" पुढील वर्ष याहीपेक्षां सुखाचें येवो " अशी आशा, १८८२ सालच्या पहिल्याच अंकांत, केसरीनें मागील सिंहावलोकन करतांना व्यक्त केली होती. पण परमेश्वरी इच्छा निराळी होती. नाना भिडे यांनीं आणलेलीं बनावट पत्रें यापूर्वींच ज्ञानप्रकाशांत साद्यंत प्रसिद्ध झालीं. बर्वे कोल्हापूर सोडून पुण्यास आले. यावरून लाच लुचपतीनें या प्रकरणाची एक दाबादाबी तरी होणार, किंवा बर्वे कोल्हापुरास रामराम ठोकणार व त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला होणार असे अनेक तर्क चालू होते. केसरीनें तर बर्व्यांनीं फिर्याद करावीच असें आव्हान करून ता. १७ जानेवारीच्या अंकांत ज्ञानप्रकाशांतील पत्रें उध्दृतहि केलीं. पण बर्वे हेहि सोक्षमोक्ष करून घेण्याकरितांच पुण्यास आले होते. त्यांनी सरकारकडे फिर्यादीची परवानगी मागितली ती मिळाली, व फिर्यादीचे कागद मुंबईस सरकारी सॉलिसिटरकडे दाखल झाले. केसरीनेंहि ता. २४ जानेवारीच्या अंकांत या फिर्यादीस अनुलक्षून असें जाहीर केलें कीं, " आपण संकल्पित व्रतास अनुसरून बोल सत्य करून दाखविण्यास तयार आहों, पण लोकांनींहि योग्य ती मदत करावी." अखेर मुंबईस फिर्याद दाखल होऊन पोलीस कोर्ट मॅजिस्ट्रेट मि. वेब यांच्यापुढें बुधवार ता. ८ फेब्रुआरी रोजीं चौकशीस सुरवात झाली. फिर्यादीतर्फे ' इनव्हेन्यारिटी ' हे बॅरिस्टर असून क्लीव्हलंड व लिटल हे सॉलिसिटर होते. आणि आरोपीतर्फे फेरोजशहा मेथा हे बॅरिस्टर असून शापुरजी व ठाकुरदास यांच्या मदतीनें ते काम चालवीत होते.

केसरी व मराठा हीं पत्रें न्यू स्कूलच्या चालकांपैकीं जे विशेष हौशी होते त्यांच्या विशेष खटपटीनें निघालीं. मूळ प्रसिद्धीपत्रकावर सहा सात गृहस्थांच्या सह्या होत्या. तथापि मराठ्याकरितां टिळक हे जबाबदार संपादक, व केसरीकरितां आगरकर अशी व्यवस्था ठरली होती. शास्त्रीबोवा चिपळूणकर यांचें लक्ष केसरीकडे विशेष असे, व मराठ्यांत खरोखर टिळकांपेक्षांहि नामजोशी आपटे

वगैरे मंडळींच अधिक वेळां लिहीत. तथापि, खटला एक टिळक व एक आगरकर यांजवर झाला हें कायद्याप्रमाणें ठीकच होतें. पत्रें प्रसिद्ध करणें न करणें या गोष्टी मुख्यतः टिळकांच्या सल्ल्यानेंच ठरल्या. पण पत्रें छापण्यापूर्वी त्यांतील मजकुराचा समावेश करून गव्हर्नरसाहेबांकडे अर्ज झाला त्यावर टिळकआगरकरांप्रमाणें वामनराम आपटे यांनींहि सही केली होती; व आरोपविषयक पत्रेंहि त्यांनीं पाहिलीं होतीं. कारण या वेळीं टिळक, आगरकर व आपटे एकाच वाड्यांत रहात असून त्रिवर्गांनींहि त्यांची वाटाघाट केली होती. केवळ कायद्याच्या अडचणीमुळें बर्व्यांस आपटे यांना आरोपी करतां आलें नाहीं; पण मराठ्यांतील संपादकीय लेख वस्तुतः आपटे यांचाच होता. वरील अर्जांत आगरकर टिळक यांचेबरोबरच आपट्यांनीं असें लिहिलें होतें कीं आम्ही सार्वजनिक मताचे मुखत्यार म्हणून अर्ज पाठवितों; पुढें व साक्षींतहि आपट्यांनीं इनक्वेन्यारिटी यांचे प्रश्नास उत्तर देतांना असें सांगितलें कीं " आम्ही वर्तमानपत्रकर्ते व त्यांत लिहिणारे या नात्यानें सार्वजनिक मताचे मुखत्यार आहोंत असें आम्हांला वाटलें."पण या मुखत्यारीतील खटल्याचा भाग मात्र सुदैवानें आपटे यांच्या वांटणीस आला नाहीं. केसरी मराठ्याचे मालकांपैकीं तुम्ही आहां कीं नाहीं या प्रश्नास आपट्यांनीं मोघम उत्तर दिलें, कीं 'या पत्राच्या प्राप्तीचा वांटा मी घेत नाहीं. " पण खरोखर प्राप्तीचा अर्धा वांटा नको म्हणण्यासारखाच होता!

असो. प्रे. सिडेंसी माजिस्ट्रेट मि. वेब यांचे पुढें २९ फेब्रुवारी १८८२ रोजीं खटला अखेर निघून तो त्यांनीं सेशनकमिट केला, व आरोपींकडून हजर राहण्याबद्दल २००० चा मुचलका व एक एक हजाराचे दोन जामीन घेतले. हें व्हावयाचें म्हणून ठरलेंच होतें. खटला कमिट होण्यापूर्वी फेरोजशहा मेथा यांनीं फिर्यादीनें आपला सर्व पुरावा दाखल न केल्याबद्दल तक्रार केली. मराठ्यांतील लेख सद्धेतूनें लिहिले असल्यामुळें ते पिनल कोडच्या ४९९ कलमांत सांगितलेल्या अपवादाखालीं येतात, बर्वे व टिळक यांचा द्वेष असल्याचें शाबीत नाहीं, टिळकांनीं पत्रें छापण्यापूर्वी तीं खरीं खोटीं पाहण्याविषयीं योग्य काळजी घेतली होती, सद्धेतु शाबीद करण्याला याहून अधिक कांहीं लागत नाहीं, वर्तमानपत्रांत छापण्यापूर्वी या पत्रांचा उपयोग गव्हर्नरकडे पाठविलेल्या अर्जांत केला होता व या प्रकरणाची उघड चौकशीहि व्हावी अशी विनंतीहि केली होती, पण चौकशी झाली नाहीं म्हणून पत्रें प्रसिद्ध करावीं लागलीं, वगैरे युक्तिवाद बॅ. मेथा यांनीं केला.

या फिर्यादींत एकंदर पांच आरोपी होते. (१) नाना भिडे (२) केशव नारायण बखले (३) वामन गोविंद रानडे (४) बाळ गंगाधर टिळक (५) गोपाळ गणेश आगरकर. पैकीं मराठ्याकरितां एकटे टिळक, केसरीकरितां टिळक व आगरकर, ज्ञानप्रकाशाकरितां एकटे वामनराव रानडे, आणि भिडे बखले हे

स्वतः आपणापुरते—असे आरोपी करून निरनिराळे खटले भरण्यांत आले होते. ते मॅजिस्ट्रेटपुढें व सेशनांत तसेंच निरनिराळे चालले. चारहि खटल्यांची सेशनांत सुनावणी होऊन ज्यूरींचे अभिप्राय सांगून झाल्यावर मग सर्व आरोपितांना मिळून एकदम शिक्षा सांगण्यांत आली.

या ठिकाणींच हेंहि सांगून टाकणें योग्य होईल कीं, केसरी मराठा व ज्ञानप्रकाश याप्रमाणें इतर कित्येक पत्रांतून बर्व्यांविरुद्ध बेअब्रूकारक लेख आले होते व आक्षेपित पत्रेंहि उध्दृत केलीं गेलीं होतीं. नेटिव ओपिनियन हें पत्र मोरो विठ्ठल वाळवेकर हे छापीत असत. सदर वाळवेकरांनीं ता. २२ जुलै १८८२ रोजीं बर्वे यांना त्यांच्या सॉलिसिटर मार्फत पत्र लिहून माफी मागितली. शिवाय १५ ऑगस्टच्या पत्रांत त्यांनीं असेंहि कळविलें कीं नेटिव ओपिनियन पत्रांत बर्व्यांविरुद्ध जे संपादकीय लेख प्रसिद्ध झाले ते आरोपी केशव नारायण बखले यांनेंच लिहिले होते. खरें खोटें कोणास ठाऊक, पण एवीं तेवीं बखले सुटत नाहींत असें पाहून, एकाच भटावर अनेकांचीं श्राद्धें उरकून घ्यावीं त्याप्रमाणें, मुंबई क्षेत्रांत वाळवेकर यांनीं बखल्यांच्या द्वारें हा प्रायश्चित्तविधि उरकून घेतला असावा. ठाणें येथील अरुणोदय पत्रानें ता. २४ जुलै रोजीं माफी मागितल्याचें पत्र सादर केलें, व त्यांत आपणास माहिती मिळाली ती कोल्हापूरचे कोणी वासुदेव गोविंद जोशी यांनीं दिल्याचें कबूल केलें. खरी माहिती दिल्याशिवाय सुटका नव्हती हें उघड आहे. तथापि, फिर्यादीपक्षानें क्षमायाचनेच्या जोरावर आपल्या शत्रूंचीं नांवें काढून घेतलीं व देणारांनींहि तीं दिलीं! अशा रीतीनें अरुणोदय पत्राचे संपादक काशिनाथ विष्णु फडके हे मुक्त झाले. सातारा येथील 'महाराष्ट्र मित्राचे' संपादक गणेश नारायण कोल्हटकर यांनीं ता. ६ आक्टोबर १८८१ च्या अंकांत बराच कडक लेख लिहिला होता. 'महाराष्ट्र मित्रावर'हि खटला भरण्यांत येऊन तो मॅजिस्ट्रेट वेब यांचे पुढें सुनावणीस निघाला तेव्हां कोल्हटकर यांनीं माफी मागण्याचें कबूल केलें. ती त्या दिवशीं मंजूर करण्यांत आली नाहीं. पण पुढें पांच दिवसांनीं बर्वे यांचे सॉलिसिटरला माफी मागण्याचें पत्र लिहून, शिवाय माहिती देणारे लोकांचीं नांवें सांगून, त्यांचीं स्वदस्तुरचीं बातमीपत्रेंहि कोल्हटकरांनीं हजर केलीं, तेव्हां त्यांची माफी पटली. तसेंच 'पुणें वैभवा'चे संपादक शंकर विश्वनाथ केळकर यांनीं पांचचार अंकांत बर्व्यांविरुद्ध लेख लिहिले होते त्याबद्दल ३ सप्टेंबर १८८२ च्या अंकांत त्यांनींहि माफी मागितली. भिडे, बखले, रानडे आणि टिळक व आगरकर इतक्यांवर खटले शाबीत होऊन शिक्षा झाल्यामुळें बर्व्यांना या इतर लोकांवर पुढें फिर्यादी चालविण्याचें कारण उरलें नाहीं, व त्यांनीं माफी देऊन त्यांजवरील खटले काढून घेतले.

कोल्हापूरप्रकरणासंबंधानें लोकमत काय होतें हें पूर्वी दिलेल्या हकीकतीवरून लक्षांत येण्यासारखेंच आहे. कोणत्याहि लोकापवादासंबंधानें प्रायः जी गोष्ट

घडून येते तीच बर्वे यांजवरील लोकापवादासहि लागू आहे. म्हणजे प्रत्यक्ष न्याय-कोर्टांत कोणी आपली अब्रू साफ करवून घेतली तरी, कांहीं किरकोळ बाबी किंवा निदान कांहीं किरकोळ माणसें तरी अशीं शिल्लक उरतात कीं न्यायकोर्टाच्या निकालाचा परिणाम त्यांचेवर होऊं शकत नाहीं. बर्वे यांजवरील मोठे आरोप मुळांतच खोटे होते, व ज्या पत्रांच्या आधारावर ते रचले गेले होते तींच बनावट ठरलीं, यामुळें त्यांसंबंधानें लोकांच्या संशयाचें निराकरण झालें. तथापि, कोल्हापूर-कर महाराजांना, म्हणजे आपल्या धन्याला, त्यांनीं जितक्या सदयतेनें वागवावयास पाहिजे होतें तितकें वागविलें नाहीं, हें लोकांचें मत मात्र कायम राहिलें. आणि पोलिटिकल एजंटच्या तंत्रानें बर्वे हे चालत ही गोष्ट तर मुळींच खोटी नव्हती. पण या प्रकरणांत मुख्य प्रश्न उत्पन्न होतो तो बर्व्यांसंबंधाचा नसून, टिळक-आगरकरां सारख्यांनीं असल्या बनावट पत्रांवर भरंवसा कसा ठेविला, तीं आपल्या वर्तमान-पत्रांत कशीं उद्धृत केलीं, व अशा पत्रांच्या जोरावर इतके कडक संपादकीय लेख कसे लिहिले, हाच प्रश्न कोणासहि सुचण्यासारखा आहे. याचें उत्तर दोन तीन तऱ्हेनीं देतां येईल. पण प्रथम न्यायकोर्टांत स्वतः टिळक आगरकर यांनीं, त्यांच्या तर्फेच्या वकिलांनीं, व इतरांनीं काय सांगितलें हें पाहूं.

मॅजिस्ट्रेट वेब यांचेपुढें भिडे व ब्रखले यांजवरील खटला चालू असतां ता. ८ मार्च रोजीं फिर्यादीचा साक्षीदार या नात्यानें टिळकांची जबानी झाली. त्यांत बर्वे यांच्या पत्रासंबंधानें त्यांनीं खालीलप्रमाणें हकीकत सांगितली. "नाना भिड्यांनीं तीं पत्रें मला दाखवून तीं वामनराव रानड्यांकडून मिळाल्याचें सांगितलें. त्यांनीं जास्त कांहीं सांगितलें नाहीं व मी विचारिलें नाहीं. वामनराव रानड्यांची व माझी फक्त ओळख आहे. मी त्यांना विचारितां तीं खासगी खात्यांतून मिळाल्याचें ते बोलले. 'कोणी दिलीं म्हणून विचारतां खात्रीलायक मनुष्यानें दिलीं, त्याचें नांव योग्य वेळीं बाहेर फोडूं असें म्हणाले. ती योग्य वेळ अद्याप आली नाहीं. मी जेव्हां जेव्हां त्यांस विचारीं तेव्हां तेव्हां ते हेंच उत्तर देत. मला अजून तें नांव कळलें नाहीं. रानड्यांना मी पुष्कळ वेळां भेटत असें व त्यांना भेटल्यावरच मी अर्ज पाठविला."

टिळकांवरील खटल्यांत नाना भिडे यांची साक्ष वेब साहेबांपुढें झाली त्यांत भिड्यांनीं या पत्रासंबंधानें खालीलप्रमाणें मजकूर सांगितला. "तीं पत्रें ज्ञानप्रकाशाचे मालक वामनराव गोविंद रानडे यांनीं मला पुण्यांत दिलीं. मीं तीं पाहिल्यावर मोठमोठ्या हुद्देदारांस दाखविलीं. विनायक रघुनाथ काळे पेन्शनर सदर अमीन, हरि अनंत गवाले शहर फौजदार कोल्हापूर, रा. ब. गोपाळराव गोविंद फाटक फर्स्ट क्लास सबजज् पुणें, यांना व याशिवाय इतर कित्येकांसहि दाखविलीं. ते म्हणाले कीं जर आम्हास साक्ष देण्यास जावें लागेल तर आमचीं नांवें सांगूं नका. हे लोक म्हणजे विष्णुपंत आण्णासाहेब भोपटकर, भोरचे कारभारी, रा. ब. महादेव गोविंद

रानडे जज्ज् वगैरे होत. तीं पत्रें मीं टिळकांसहि दाखविलीं व त्यांनीं सरकारास अर्ज केल्यावर तीं मला परत मिळालीं......मी टिळकांचे घरीं अनेक वेळां गेलों. हीं पत्रें कोठून आणिलीं असें टिळकांनीं मला विचारिलें. मी म्हणालों चांगल्या ठिकाणाहून, (म्हणजे वामनराव रानडे यांजपासून). वामनरावांस तीं कोठून मिळालीं हें टिळकांनीं मला विचारलें नाहीं. तुम्हांस पत्रें कशीं मिळालीं हें मी वामनराव रानडे यांस विचारलें. ते म्हणाले तुम्ही काळजी करूं नका. ज्या गृहस्थांचे हातीं असल्याप्रकारचीं पत्रें पडण्याचा संभव आहे त्यांपासूनच मीं तीं आणलीं आहेत. तो खासगीकडे नोकर आहे. पत्रें पाहिल्यावर तीं खरीं आहेत असें मला वाटलें; कारण त्यांतील मजकुराचा मला अनुभव आहे. वामनरावांनीं पत्रें कोणाकडून आणलीं याची फक्त मला ऐकीव माहिती आहे. तीं वामनरावांनीं खासगींतून आणलीं येवढें खरें इ०" पण ही गुप्त गोष्ट पुढें सेशनांत प्रगट करावी लागलीच.

वामनराव रानडे यांच्यावरील खटला चालू असतां तारीख १३ जुलै रोजीं रामचंद्र विश्वनाथ जोशी ऊर्फ शेगुणशीकर याची महत्वाची साक्ष झाली. हींत या पत्रांची सर्व हकीगत त्यानें शपथेवर सांगितली. त्याच्या साक्षीचा सारांश असा. शेगुणीकर हा कोल्हापूरचा राहणारा नव्हे; तथापि तो कामकाजानिमित्त कोल्हापुरास येत जात असे. १८८१ च्या नवंबरच्या २७ अगर २८ तारखेस तो सहज कामानिमित्त रामभाऊ ऐनापूरकर नांवाच्या गृहस्थाच्या घरीं गेला. ते दोघे स्नेही होते. उभयतांचें नातेंहि असे. या दिवशीं रामभाऊ घरीं नव्हता, तथापि शेगुणशीकर यानें आपल्या गांवीं एक पत्र लिहावयाचें होतें म्हणून रामभाऊचें दप्तर त्याच्या बाहिणीजवळ मागितलें. त्यांत पत्र लिहिण्याकरितां कोरा कागद हुडकीत असतां १०–१५ पत्रांची एक गुंडाळी त्याच्या हाताला लागली. तसेच दप्तरांत कोरे कागदहि मिळाले. पत्र लिहून झाल्यावर त्यांनीं गुंडाळी कशाची म्हणून पाहिलें तों बर्वे यांनीं रामभाऊ ऐनापूरकर आपटे वगैरे लोकांना लिहिविलेलीं कांहीं पत्रें, व कांहीं स्वतः बर्व्यांनीं सही केलेलीं पत्रें सापडलीं. त्यांत कोल्हापूर प्रकरणाचा, विशेषतः महाराजांसंबंधींचा, मजकूर होता. म्हणून तीं त्यानें गुपचुप खिशांत घातलीं व घेऊन गेला. दुसरे दिवशीं वामनराव रानडे यांची गांठ पडली असतां शेगुणशीकरानें त्यांतील कांहीं पत्रें आणून रानडे यांस दिलीं. रानड्यांनीं त्याला विचारतां "आणखीहि कांहीं पत्रें आहेत पण तीं मागाहून देईन" असें त्यानें सांगितलें आणि त्याप्रमाणें लगेच कांहीं पत्रें दिलीं व पुढें ४–५ दिवसांनीं उरलेलीं पत्रें पुण्यास रानडे यांजकडे रजिस्टर पोस्टानें पाठवून दिलीं ! " हीं पत्रें तुम्हांस अमुक रीतीनें मिळालीं असें, कारण पडल्यास, तुम्ही कोर्टास सांगाल काय ?" असें रानड्यांनीं शेगुणशीकर यांस विचारिलें तेव्हां त्यानें होय म्हटलें होतें; व अखेर तें वचन खरेंहि केलें. पत्रें 'खाजगींतून मिळालीं हें खरेंच

होतें; कारण रामभाऊ ऐनापूरकर हा बर्वे यांचा खाजगी कचेरींतील विश्वासू नोकर होता! येवढेंच नव्हे तर या विश्वासाबद्दल लोक बर्व्यांस नांवें ठेवीत कारण ज्या ज्या ठिकाणीं महाराजांवर त्यांना नको असा मनुष्य दिमतीला मुद्दाम लादला असा अपवाद लोकांच्या बोलण्यांत निघे, तेथें रामभाऊ ऐनापूरकराचेंच नांव हटकून गोंवलें गेलेलें आढळावयाचें. बर्व्यांचा विश्वासू नोकर किंवा हेर म्हणून वेड्या महाराजांच्या तैनातीस ते कोठेंहि गेले तरी हटकून ऐनापूकरची नेमणूक व्हावयाची!

वामनराव रानडे यांचें लक्षच, हीं पत्रें हातीं येण्यापूर्वींपासून, महाराजांच्या या प्रकरणांत गढून गेलेलें असल्यामुळें त्यांना हीं पत्रें म्हणजे आयतें एक मोठें घबाड किंवा ईश्वरी देणगी हातीं लागली असें वाटणें स्वाभाविक आहे. हीं पत्रें घेऊन वामनराव पुण्यास तावडतोब निघून गेले व त्यांनीं तेथें तीं अनेक लोकांना दाखविलीं. नाना भिडे हे त्यांतीलच एक होत. भिड्यांनीं तीं टिळक आगरकर वगैरेंना दाखविलीं, तेव्हां त्यांनाहि सर्व कची हकीकत लक्षांत घेतां तीं खरीं आहेत असें भासलें. पण टिळकांनीं नुसत्या आभासानें आपलें समाधान करून न घेतां कायद्याच्या दृष्टीनें जितकी म्हणून पत्रांची शहानशहा करणें शक्य होतें तितकी केली. ही शहानशहा करण्याचे अनेक प्रकार होते. पत्रांतील मजकुराचा लोकप्रवादाशीं कितपत मेळ पडतो, लोक बोलतात त्यांतला तपशील पत्रांत कांहीं आहे कीं नाहीं—याचें सूक्ष्म निरीक्षण तर टिळकांनीं केलेंच; पण पत्रें कोठून कशीं आलीं याविषयीं जो स्वतंत्र तपास केला त्यावरूनहि हीं पत्रें रामभाऊ ऐनापूरकराकडे मिळणें सर्वस्वीं संभवनीय असेंच त्यांना आढळून आलें. वामनराव रानडे व नाना भिडे दोघेहि संभावित. भिडे मुखत्यावर वकील; पण रानडे हा तर पक्का सनदी वकील असून त्याची प्रातीहि बरीच असे. अशा अनुभविक वकीलानें ज्या पत्रांवर विश्वास ठेविला त्यांवर टिळकांनींहि विश्वास कां ठेऊं नये? रानडे किंवा भिडे यांना टिळकांस गोत्यांत आणण्याचें कांहींच कारण नव्हतें; किंबहुना ज्ञानप्रकाश पत्रांत हीं पत्रें त्यांनीं छापवून त्याबद्दलची जबाबदारी स्वतःचे शिरावर घेतली, यावरूनहि पत्रांवर त्यांचा स्वतःचा विश्वास होता हें उघड उघड ठरतें.

पत्रांतील मजकुरासारखा मजकूर खुद्द कोल्हापुरास लोक उघडपणें बोलत असतां बर्व्यांनीं कांहींच इलाज पूर्वीं केला नाहीं. अंबाबाईच्या देवळांत जाहीर सभा भरून भाषणें झालीं तीं कांहीं लपून छपून किंवा निनांवी नसतां, त्याहि लोकांवर फिर्याद करण्यांत आली नाहीं. पत्रांतील कांहीं मजकुराचा पडताळा कोल्हापूर येथें कमिशन गेलें असतां, व पुढें सेशनांत, कांहीं साक्षीदारांनीं आपल्या जबानींत दिला. उदाहरणार्थ प्रीतीराव रताजीराव चव्हाण, म्हणजे महाराजांचे मामा, यांनीं शपथेवर जबानी देऊन, आपला छळ होत असल्याची हकिकत स्वतः महा-

राजांनीं त्यांना कशी सांगितली हें निवेदन केलें. विनायक रघुनाथ काळे हे कोल्हापुरास तेहतीस वर्षें सदर अमीन होते. त्यांनीं तीन पत्रांवरील जांभळ्या शाईचें अक्षर व सह्या बर्व्यांचा आहेत, तसेंच नाना भिड्यांनीं हीं पत्रें आपणांस पूर्वीं दाखविलीं व त्यासहि तेव्हांच आपण सह्या ओळखल्याचें सांगितलें होतें. असें शपथेवर सांगितलें. या सर्व गोष्टींची पक्की चौकशी टिळकांनीं पूर्वीं केली होती येवेंढच नव्हे तर त्याहूनहि एक विशेष गोष्ट त्यांनीं केली ती ही कीं, तीं पत्रें त्यांचे स्नेही गोपाळराव फाटक सबजज व खुद्द रावबहादुर रानडे यांना दाखविलीं; व या उभयतांनींहि या पत्रांवर आपला विश्वास बसतो असें टिळकांस सांगितलें होतें. हीं पत्रें रा. ब. रानड्यांच्या जवळ एक महिनाभर ठेवण्यांत आलीं होतीं. कारण पुण्यांतील सुशिक्षित तरुण लोकांचे पुढारी रानडे हेच होते; शिवाय ते विवेकी शांत डोक्याचे कायदेपंडित असा त्यांचा योग्य लौकिक होता. रानड्यांनीं हीं पत्रें पाहून त्यांवर विश्वास टाकला ही गोष्ट नाना भिडे यांचे तोंडून शपथेवर कोर्टांत सांगितली गेली हें वर आलेंच आहे. व टिळकांना स्वतः आरोपी झाल्यानें साक्षीदार होतां आलें नाहीं पण तें होतां आलें असतें तर, त्यांनींहि ही गोष्ट शपथेवर सांगितली असती. कारण ही गोष्ट आम्ही स्वतः खुद्द टिळकांचे तोंडून अनेक वेळां ऐकली आहे.

खटला सेशनांत गेल्यावर रावबहादुर रानडे यांना त्यांस असलेली माहिती त्यांनीं शपथेवर सांगावी अशी विनंति करण्यांत आली होती; पण रानडे यांनीं तसें करण्याचें नाकारिलें. किंबहुना, आमच्या साक्षी काढाल तर आम्ही कानावर हात ठेऊं, आम्हांस कांहीं एक माहीत नव्हतें असें सांगूं, अशी अप्रत्यक्ष रीतीनें धमकी हि दिली असें म्हणतात. रानड्यांची साक्ष झाली असती तर, नुसतें त्यांचें नांव भिड्यांच्या तोंडून निघण्यापेक्षां, टिळकांना पुष्कळच अधिक उपयोग झाला असता. कारण, प्रस्तुत पत्रांवर रानड्यांनीं विश्वास टाकला म्हणून जरी तीं खरीं ठरत नव्हतीं, किंवा टिळकांची जबाबदारी हि कमी होत नव्हती, तरी पत्रासंबंधानें जितकी चौकशीपूर्वक खात्री करून घेणें शक्य होतें तितकी टिळकांनीं अगर आगरकरांनीं करून घेतली कीं नाहीं येवढाच वादग्रस्त असा मुद्दा कोर्टापुढें होता; व त्याचा निर्णय करण्याला मात्र रानड्यांच्या जबानीनें खचित उपयोग झाला असता. 'डोंगरीच्या तुरुंगांतील १०१ दिवस' या पुस्तकांत आगरकरांनीं राजकारणाच्या तंट्यांत पडणाऱ्या लोकांना कांहीं व्यावहारिक सूचना केल्या आहेत त्यांत नं. ३ ची सूचना खालीलप्रमाणें आहेः—" सहीनिशी लेखी जबान्या घेऊन ठेवणें... हे राजेश्री भले, हे सालस, हे काय कोर्टापुढें पाहिजे त्या वेळीं हजर राहून त्यांना माहीत आहे तें कोणाची भीडमुर्वत न ठेवितां सांगतील, तेव्हां यांच्या सहीसुद्धां यांची अगोदर लेखी जबानी घेऊन ठेवण्याची कांहीं एक आवश्यकता नाहीं, अशा दिमतीवर कार्यहितेच्छूनें बसूं नये. प्रेम, विश्वास वगैरे चटसारें एकीकडे ठेऊन नास्तीक बनावें, व जगांतील हरएक मनुष्य जबरा लफंगा आहे,

असें मानून आपल्या उपयोगाचें जें म्हणून त्याला ठाऊक असेल त्याचे त्याच्याकडून टांचण करवावें व त्यावर त्याची सही घ्यावी; आणि असलीं सगळीं टांचणें वेळ येईपर्यंत एखाद्या मजबूत लोखंडी पेटींत घालून ठेवावी ! " वरील शद्ब आगरकरांनीं कोणास उद्देशून लिहिले हें स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं ! पण दुर्दैवानें या उपयुक्त सूचना स्वतः आगरकरांच्या हि लक्षांत फार दिवस राहिल्या नाहींत, हें पुढें ग्रामण्य प्रकरणावरून कळून येईलच ! सेशनकोर्टांत टेरी नांवाचा एक ड्राईंग मास्तर अक्षरशास्त्रज्ञ म्हणून साक्षीला आणला होता, त्यानें पत्रावरील सह्या व अक्षर हुबेहूब बर्व्यांच्या अक्षरासारखें आहे, मात्र तें ट्रेसिंग करून म्हणजे गिरवून काढलें असावें असा अभिप्राय दिला. उलट खुद्द बर्व्यांनीं शपथेवर सांगितलें तें असें कीं या सह्यांचें व इतर हि अक्षर माझ्या अक्षरासारखें मुळींच नाहीं. इतक्या संशयग्रस्त स्थितींत रावबहादुर रानडे किंवा राव. फाटक, तसेंच कोल्हापूरची बर्व्यांची परिचित मंडळी, यांचा अभिप्राय घेऊन मग पत्रांचा उपयोग टिळकांनीं केला, तेव्हां आणखी खबरदारी तरी त्यांनीं कोणची घ्यावयाची उरली होती ? असा युक्तिवाद टिळकांच्या वकिलाला साधारपणें करतां आला असता.

पण ती बाणी फसली. टिळकांचा खटला सेशनांत निघण्यापूर्वी भिडे बखले आणि रानडे या तिघांच्याहि खटल्याचा निकाल लागून, प्रत्येक खटल्यांत आरोपीस ज्यूरीनें सर्वानुमतें दोषी ठरविलें होतें. यामुळें पुढें टिळक व आगरकर यांचा सर्व आधार गडगडला. ता. ६ जुलै १८८२ रोजीं पहिल्या खटल्यांत भिड्यांना दोषी ठरविण्यांत आल्याबरोबर, टिळक व आगरकर यांचे वकील व स्नेही यांनीं त्यांच्यामागें असा लकडा लाविला कीं, तुम्ही अजून तरी बर्वे यांची माफी मागा म्हणजे तुमच्या वरचा खटला बहुधा काढून घेण्यांत येईल. या सल्लागारांत मुंबईचे अनेक प्रतिष्ठित लोकहि होते. त्यांना बर्वे हे खटला काढून घेतील असा विश्वास वाटण्याला काय कारणें असावीं तें आज सांगतां येणें कठीण आहे. तथापि तशीं आश्वासनें ते देत होते खरे. दुसरे कित्येक स्नेही म्हणत कीं, "एवीं तेवीं खटला या थराला आला, आतां माफी मागण्यांत फारसें भूषण नाहीं. माफी न मागितल्यानें शिक्षा भोगावी लागेल हें खरें, पण केसरीनें लिहिलेले शब्द परत घ्यावें लागणार नाहींत हा काय थोडा फायदा झाला ? ज्यांनीं तुम्हांस पत्रें दिलीं ते ती गोष्ट शपथेवर सांगतात. ज्यानें ती मूळ मिळविलीं तो ती गोष्ट शपथेवर सांगतो. ज्यांनीं सह्या ओळखल्या त्यांनींहि शपथेवर सांगितलें आहे. भिडे, बखले किंवा रानडे यांनीं माफी मागितली नाहीं. उलट ब्रॅन्सन् व फेरोजशहा यांनीं भिडे यांचे तर्फे दणदणीत डिफेन्स दिला, व पत्रें बनावट नाहींत अशी जोराची तक्रार कोर्टापुढें मांडली. असें असतां तुम्ही माफी मागून या सर्व लोकांना तोंडघशी पाडणें हें योग्य नाहीं. शिवाय वामनराव रानडे यांचे खटल्याचा निकाल

अद्यापि लागलेला नाहीं, त्यांनाहि या तुमच्या माफीची अडचणच होईल. इतकें-हि असून तुम्ही माफी मागितली तरी बर्वे खटला काढून घेतीलच हें कशावरून ? म्हणजे माफी परी माफी द्याल, व शिक्षेपरी शिक्षाहि होईल." आणि अखेर, प्रतिकूल मत देणाऱ्या या स्नेह्यांचेंच भाकीत खरें ठरलें !

ता० ६ जुलै रोजीं संध्याकाळीं भिडे यांच्या खटल्याचा निकाल झाला. त्या रात्रीं मुंबईस टिळक व आगरकर यांचे बिन्हाडीं सल्ला मसलतीचें बडें कौन्सिल भरून चार प्रहर वाद झाला. टिळक व आगरकर हे दोघेहि माफी मागूं नये या मताचे व खंबीर होते. पण त्यांच्या मुंबईकर मित्रांपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. पत्रें खरीं असोत वा खोटीं असोत, पण महाराजांना वाईट रीतीनें वागविण्यांत येत होतें ही गोष्ट शाबीत होण्यासारखा पुरावा बराच होता; व त्यापैकीं एक पुरावा कोल्हापुरचे एक मोठे मराठा सरदार, किंबहुना एक संस्थानिक, यांच्या कांहीं पत्रांवरून मिळण्यासारखा होता. हीं पत्रें प्रत्यक्ष हातांत असल्यामुळें टिळकांना हि थोडा धीरं वाटत होता. पण इकडे पत्रें खोटीं ठरल्याप्रमाणें, हा मौल्यवान पुरावाहि त्यांच्या हातीं राहूं शकत नाहीं असेंहि निश्चित झालें. कारण या उपरिनिर्दिष्ट मराठे सरदारांचीं पत्रें परत मिळावीं, त्यांचा उपयोग केला जाऊं नये, असा जोराचा प्रयत्न सुरू झाला; व त्या कामीं टिळकांच्या खुद्द स्नेह्यांच्या हि भिडा त्यांना येऊन भिडल्या. कोल्हापूरचे माजी सर न्यायाधीश बळवंतराव जोशी हे एका बाजूस टिळकांचे स्नेही व दुसरे बाजूस वरील सरदारांचेहि मोठे स्नेही होते. पण सरदार साहेब आपलीं पत्रें अखेर पुराव्यांत दाखल होऊं देण्यास नाकबूल असल्यानें, रावबाहादुर जोशी यांनीं तीं पत्रें परत मागण्याचा आग्रह धरला. रात्रभर भवति न भवति होऊन अखेर मराठे सरदारांचीं पत्रें पुराव्यांत द्यावयाचीं नाहींत असें ठरलें, व जोशी यांच्या देखत तीं पत्रें टिळकांनीं आपल्या हातानें जाळल्यावर बर्वे यांस लेखी माफी देण्याचा सल्ला यांनीं स्वीकारला, त्याप्रमाणें दुसरे दिवशीं, म्हणजे ७ जुलै रोजीं, टिळक व आगरकर यांच्या सहीनिशी माफी मागण्याचें पत्र बर्वे यांजकडे रवाना करण्यांत आलें. या पत्रांत कांहींच राखून ठेविलें गेलें नव्हतें. माफी सरळ व स्पष्ट मागितली होती. "ज्यावेळीं आम्ही वर्तमानपत्रांत विधानें केलीं त्यावेळीं तीं साधार आहेत असेंच प्रामाणिकपणानें आम्हांस वाटत होतें, व म्हणूनच तीं आम्हीं केलीं; व ज्यांनीं आम्हांस माहिती पुरविली त्यांजवर आमचा तेव्हां अविश्वास नव्हता, विश्वासच होता. पण ती माहिती व तीं पत्रें आतां भिडे यांच्या खटल्यांत खोटीं ठरल्यामुळें आमचीं विधानेंहि निराधार ठरतात, व आम्ही अशा माहितीवर इतका विश्वास टाकला याबद्दल आम्हाला अत्यन्त वाईट वाटतें. हें पत्र आम्ही लिहून दिल्यानंतर हि तुम्ही काय करावें ( म्हणजे खटला काढून घ्यावा अगर न घ्यावा ) ही गोष्ट सर्वस्वी तुमच्या मर्जीवर राहील; व तुम्ही कांहीं हि केलें अगर

न केलें तरी आज या पत्रांत आम्ही जी दिलगिरी प्रदर्शित करीत आहोंत ती आमच्या पत्रांत तशीच निरंतर राहील. " ही माफी बर्व्यांच्या हातांत पडल्यावर सेशनांतील खटल्याचें सर्व स्वारस्य अर्थातच संपलें !

ता. १५ जुलै रोजीं एकट्या टिळकांवरचा खटला सुनावणीस निघाला. मराठ्यांतील तीन आर्टिकलांबद्दल तीन निरनिराळे आरोप होते. फिर्यादीतर्फे इनव्हेर्‍यारिटी बॅरिस्टर व टिळकांच्या तर्फे काशिनाथ त्रिंबक तेलंग बॅरिस्टर असे काम चालवीत होते. सुनावणीस प्रारंभ होतांच टिळकांची माफी फुकट गेली हें ठरलेंच! इनव्हेर्‍यारिटी यांनीं माफीच्या पत्राचा उल्लेख सुरवातीसच केला. पण त्याबरोबर त्यानीं असें सांगितलें कीं या क्षमायाचनेंत फारसें पुण्य नाहीं. कारण गळ्याला प्रत्यक्ष तात लागल्यावर आरोपींना ही माफी सुचली. केसरी मराठा पत्रांतील लेखांनीं सगळ्या कोल्हापुरांत विष कालविलें गेलें; व माफी देऊन या पत्रावरील खटला बर्व्यांनीं काढून घेतला तर त्यांनाच लोक उलट म्हणूं लागतील कीं, यांची बाजू पडती होती म्हणून माफी देण्याची बतावणी करून ती बाजू बर्व्यांनीं कोणीकडून तरी सांवरून धरली. टिळक–आगरकरांना प्रत्यक्ष शिक्षा झाल्याशिवाय अज्ञानी लोकांच्या मनांतील किल्मिष जाणार नाहीं !

बर्वे, डॉ. मर्फी व वामन शिवराम आपटे यांच्या मुख्यतः जबान्या झाल्यावर, तेलंगांनीं फिर्यादीच्या पुराव्यावर टीका करतांना मुख्य भर याच गोष्टीवर दिला कीं, १८७९ पासून देशी वर्तमानपत्रांतून बर्व्यांविरुद्ध लोक टीका करीत असतां त्यांनीं कांहींच इलाज केला नाहीं. तसेंच खुद्द कोल्हापुरामध्यें सभांत भाषणें झालीं त्याचें हि पारिपत्य झालें नाहीं. यावरून दूर पुण्यास राहाणाऱ्या टिळकांसारख्या लोकांनीं या बातम्यांवर विश्वास ठेवल्यास नवल नाहीं.

नंतर नाना भिडे, वामनराव रानडे, विनायकराव काळे, हरिपंत गबाळे वगैरेंच्या साक्षी झाल्यावर बॅ. इनव्हेर्‍यारिटी यांचें भाषण व न्यायमूर्ति जस्टिस् लॅथम् यांचा समारोप होऊन ता. १७ जुलै रोजीं ज्यूरीनें निकाल सांगितला. त्यांत पहिल्या आरोपावर सर्वानुमतें आणि दुसऱ्या व तिसऱ्या आरोपांवर सात विरुद्ध दोन अशा मतभेदानें टिळकांस दोषी ठरविण्यांत आलें. यानंतर आगरकर व टिळक मिळून जो खटला होता त्याची सुनावणी पांच दहा मिनिटांत संपली. कारण दोघांनींहि अपराध कबूल केला व पुरावा द्यावयाचा नाहीं म्हणून सांगितलें. शेवटीं सर्व पांचहि आरोपींना एकत्र करून शिक्षा सांगितल्या त्यांत टिळक व आगरकर व बखले यांना प्रत्येकीं चार महिने साधी कैद, आणि भिडे व रानडे यांना दोन वर्षांची साधी कैद व १००० रुपये दंड याप्रमाणें शिक्षा देण्यांत आल्या. या दोन्ही दंडाच्या रकमा बर्वे यांना फिर्याद खर्चाकरितां बहाल करण्यांत आल्या. टिळक, आगरकर व बखले हे एवढ्यावरच सुटले; पण भिडे व रानडे यांनीं शपथेवर खोट्या जबान्या दिल्या आणि बनावट कागद-

पत्रांचा उपयोग केला याबद्दल निराळे खटले करण्याची मंजुरी कोर्टास फिर्यादीनें मागितली पण ती कोर्टानें दिली नाहीं. मात्र रामभाऊ शेगुणशीकर हा या सर्व बनावट पत्रांचा उत्पादक म्हणून त्याजवरहि असेच खटले करण्यास मंजुरी मागण्यांत आली व न्यायमूर्तींनीं ती दिलीहि.

अशा रीतीनें या कोल्हापूर प्रकरणांतील मुख्य खटल्याचा निकाल झाला. पण लोकांची संशयनिवृत्ति सर्वस्वीं झाली असें म्हणतां येत नाहीं. खुद्द केसरीनें खटल्याच्या निकालासंबंधानें दुसऱ्या दिवशीं, म्हणजे १८ जुलैच्या अंकांत खालील वाक्य लिहून मुग्ध टीका केली. "या खटल्यांत जो न्याय झाला त्याचें स्वरूप वर्णन करितां येत नाहीं." दीनबंधु पत्रानें खालील टीका केली होती:—"कोल्हापुरांतील लोकांना फिर्यादीविरुद्ध वागल्याबद्दल बक्षिसें मिळत आहेत, पण ब्रिटिश हद्दींतील जे लोक आरोपीतर्फे साक्षीस आले त्यांचें पारिपत्य ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून अद्यापि होत नाहीं. हा मनांत राहिलेला संशय फेडल्यास बर्वे यांची अब्रू धुतलेल्या मोत्यांप्रमाणें साफ होईल." लोकांचे मनांतील संशय न जाण्याला दुसरेंहि एक कारण म्हटलें म्हणजे कोल्हापूरकर महाराजांची दुःखद स्थिति. इकडे खटला सुरू असतांच केसरीनें ता. २७ जून १८८२ च्या अंकांत "कोल्हापूरच्या राजास पुण्यांतून हालविण्याचें इंगित काय?" या मथळ्याखालीं, डॉक्टर लोकांच्या सल्याच्या नांवावर महाराजांचे जे हाल चालले होते त्यांचें स्पष्ट वर्णन केलें होतें. "डॉक्टरांची तब्येत लागली कीं करा औरत बंद, मारा शरीराच्या पाहिजे त्या भागावर पलिस्तर, दामटा हवा तितका हिंडायला, घाला हवा तसा खाना, करा पाहिजे त्याला भेटण्याची बंदी!" पुण्याहून उचलून महाराजांना नगरास नेऊन ठेवण्याचें कारण काय ? व काळजी घेण्याला नोकरच ठेवावयाचे तर कॉक्स व ग्रीन यांच्यासारखे गोरेच कशाला ? 'मराठा' पत्राच्या एका बातमीदाराजवळ खुद्द महाराजांनीं असे उद्गार काढले कीं, "थोड्याच दिवसांत मला मल्हारराव ठरावें लागणार!" व अखेर खरोखरच मल्हाररावांपेक्षांहि अधिक दुःखद असाच महाराजांचा शेवट झाला. पुढें थोड्याच दिवसांत माधवराव बर्वे यांचा एकुलता एक पुत्र निवर्तल्यामुळें, ईश्वरानें त्यांनाहि पाहून घेतलें असें म्हणण्याला मोळ्या भाविक लोकांना हि संधि मिळाली. पण जगांत न्याय आणि अन्याय याची कसोटी खरी लागणें ही गोष्ट एकंदरीनें मुष्किलीचीच आहे. न्यायकोर्टांत कोठल्या तरी एका बाजूनें न्याय व्हावा लागतो ही गोष्ट खरी. पण कोणच्याहि फिर्यादींत न्यायाधीश जो निकाल देतो तो खरा असला तरी, शेवटचा म्हणून जो शब्द तो लोकांच्याच हातीं राहतो. लोकमत तें लोकमत; त्याला नियम नाहींत व त्यावर अपीलें हि नाहींत.

असो. शेवटीं टिळक व आगरकर यांची बंधमुक्तता होऊन त्यांचा सत्कार कसा झाला व लोकमतानें त्यांच्या पुरता तरी अखेर निकाल आपल्या अधिकारांत

कसा दिला हें सांगून हें प्रकरण पुरें करूं. तथापि त्याच्याहि पूर्वी या खटल्यांतील इतर आरोपींबद्दल दोन शब्द लिहिणें जरूर आहे. बखले हे गृहस्थ मूळचे कोल्हापूरचे राहाणारे. त्यांचे स्वतःचे अंग या प्रकरणांत स्वतंत्र रीतीनें असें फारच थोडें होतें. नाना भिडे यांचें त्यांजवर वजन असे, व त्यांच्याच सांगण्यावरून मुंबई गव्हर्नराकडे बखले यांनीं बर्व्यांविरुद्ध इंग्रजींत अर्ज केला व सही घातली. भिडे हे गृहस्थ मात्र वेगळ्या प्रकारचे होते. संस्थानी मुखत्यार वकीलाचे सर्व गुण त्यांच्या अंगीं परिपूर्ण होते. त्यांच्या वक्तृत्वांत ग्राम्य विनोद खूप असे. मुंबईस खटला चालू असतां कोर्टांत जेव्हां जेव्हां म्हणून हंशा पिकला, तेव्हां तेव्हां तो सर्व भिडे यांच्या विनोदामुळेंच. 'शेक् हॅन्ड' या इंग्रजी शब्दाचा जाणून बुजून 'शिखंडी' हा उच्चार करून, नाना भिडे यांनीं भर हायकोर्टांत उच्चारिलेली कोटी लोकांच्या तोंडीं अद्याप आहे! महाराजांची जनक आई राधाबाई हिचें मुखत्यारपत्र भिडे यांनीं घेतलेलें असल्यामुळें, त्यांना वकिली धंद्यांतहि ठोकर लागली असें कोणी म्हणेल तो म्हणो. तथापि बर्वे कारभारी हे बेइमानी असून महाराजांच्या छळास कारणीभूत झाले असल्याविषयीं त्यांच्या मनांत दृढ विश्वास होता; व तो अखेरपर्यंत नाहींसा झाला नाहीं हें स्वतः आम्हांस माहीत आहे. वामनराव रानडे हे तर सनदी वकील असून ज्ञानप्रकाश वर्तमानपत्राशीं त्यांचा संबंधहि होता. त्यांच्या मनांत बर्वे यांजविषयीं किल्मिष पक्कें व प्रामाणिकपणाचें होतें. त्यांनीं हायकोर्टांत आपला मुकदमा आपणच चालविला व सुमारें २॥ तास डिफेन्स दिला तो अगदीं निमुर्वतखोर व ठणठणीत असाच होता. त्यांनीं ज्यूरीला स्पष्ट सांगितलें कीं, पत्रांचे बाबतींत मी इतकी खटपट केली ती राधाबाईचा प्रतिनिधी म्हणून नव्हे; तर कोल्हापूरसंस्थानचे हिताची खरी कळकळ माझ्या मनांत असल्यानें. या फिर्यादींत सरकारचें अंग म्हणूनच त्यांनीं गव्हर्नरास केलेले अर्ज बर्व्यांकडे दिले.

टिळक व आगरकर यांना शिक्षा फर्माविल्यानंतर त्याच दिवशीं सायंकाळीं डोंगरीच्या तुरुंगाकडे त्यांची रवानगी झाली. शिक्षेची मुदत जरी चार महिने होती तरी चांगल्या वर्तणुकीमुळें त्यांना सुमारें १९ दिवसांची सूट मिळून १०१ दिवसांतच त्यांची बंधमुक्तता झाली. या १०१ दिवसांच्या चरित्राचें वर्णन आगरकर यांनीं या विषयावरील एका पुस्तकांत केलें आहे, त्यांत तेथील उभयतांची दिनचर्या वर्णिली आहे. तुरुंगवासांत उभयतांची बरीच उपासमार झाली. टिळकांचें वजन येवढ्या अवधींत २४ पौंड आणि आगरकरांचें १६ पौंड कमी झालें. शरीरापुढें इलाज चालत नाहीं. पहिल्या दिवशीं अन्न पुढें येऊन दोन तीन शितें गेल्याबरोबर ओकारी झाली. आगरकर लिहितात. "तुरुंगांत गेल्याबद्दल आम्हास कधींच वाईट वाटलें नाहीं, पण तेथलें अन्न पुढें आलें म्हणजे मात्र वाईट वाटे! १३ फुटांच्या चौरस खोलींत अहोरात्र राहाणें, कांदा भाकर खाणें, अन्नांत मिरच्या व लसूण, निजण्याच्या घोंगडींत सुरवंट, भिंतींत ढेकूण

अशा स्थितींत काय सुख लागणार हें दिसतच आहे. पुढें २५ दिवसांनीं लिहिण्या-वाचण्याची परवानगी मिळाली; पण शरीर व मेंदू क्षीण झाल्यामुळें लिहिण्या वाचण्या-लाहि मन लागेना. हे दोघे स्नेही तीन वर्षांपूर्वी डेक्कन कॉलेजांतील रम्य खोल्यांत बसून जे मनोरथ करीत त्या सर्वांची पुनरावृत्ति त्यांजकडून बसल्या बसल्या येथें नित्य होई. एकादे वेळीं त्यांचा वाद इतका भराला येई कीं, जवळचे रखवालदार व शिपाई 'हळू बोला' म्हणून इशारा देत, आणि त्याच भरांत 'रात्रिरेव व्यरंसीत्' असें घडे. याच संभाषणांमध्यें "फिरून तुरुंगांत यावें लागलें तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत त्या गोष्टी कोणत्या" याचा उभयतांनीं विचार केला होता. "लिहिणाराचा अनुभव काय तो सध्यां एकाच तुरुंगाचा आहे" असें आगरकरांनीं लिहिलें आहे. पण या शब्दांत फेरबदल करून लिहिण्याचा प्रसंग या उभयतां-पैकीं आगरकरांना आला नाहीं. टिळकांच्या नशिबीं मात्र 'अनेक' तुरुंगांचा अनुभव पाहाण्याचें होतें, व यासंबंधानें हकिकत पुढें प्रसंगोपात्त येणारच आहे.

आगरकरांचें तुरुंगवासाविषयींचें मत एकाच अनुभवानें निःसंशय असें बनलें होतें कीं, निःसीम संसारचतुर मनुष्य, ज्याचें पर्यवसान प्रायः तुरुंगवासांत होईल अशा, फंदांत पडत नाहीं. सरकाराशीं सामना करण्यास जो उभा राहील त्यानें आपल्या बाजूची फारच मजबुती केली पाहिजे असेंहि आगरकरांनीं ठरविलें.

टिळक आगरकरांची सुटका नुसत्या दंडावर न होतां त्यांना ऐनजिनसी कैदेची शिक्षा झाली याबद्दल लोकमत बरेंच खवळलें. अनेक सभाहि भरविण्यांत आल्या. प्रि. वर्डस्वर्थ, ना. मंडलीक वगैरे प्रतिष्ठित लोकांनीं पुढाकार घेऊन सर जेम्स फर्ग्युसन यांज-कडे अर्ज करून टिळक–आगरकरांची शिक्षा माफ व्हावी अशी विनंति केली होती; पण त्याचा उपयोग झाला नाहीं. तथापि लोकांनीं खरें लोकमत प्रदर्शित करण्या-करितां हे दोघे सुटून आल्यावर त्यांचा जाहीर सन्मान करण्याचें ठरविलें. या कामीं दीनबंधु पत्रानें असें सुचाविलें कीं, "अन्यायानें या उभय होतकरूंस कारागृह प्राप्त झालें आहे; तर त्यांच्या मनांतून सजेविषयीं तिळमात्र न राहूं देण्याकरितां ते सुटतील तेव्हां त्यांस मानपत्र द्यावें व तुरुंगांतून सुटतेवेळेस एका मोठ्या रथांत त्यांस बसवून वाजत गाजत इच्छिलेलें स्थळीं पोचवावें. असें कर-ण्यास आम्ही मुखत्यार आहों."

आक्टोबर ता. २६ गुरुवार रोजीं सकाळीं टिळक व आगरकर यांची डोंगरींतून सुटका झाली त्यावेळीं त्यांचे सत्कारार्थ बाहेर २ हजारांवर लोक जमले होते. दीनबंधू पत्राचे संपादक रा. लोखंडे, दामोदर सावळाराम यंदे वगैरे ब्राह्मणेतर मंडळी या समा-रंभांत ब्राह्मणांच्याहि पुढें होती. उभयतांना गाडींत घालून लोकांनीं शहरांत आणलें; आणि मुरारजी गोकुळदास यांचा बंगला, दीनबंधूपत्राची कचेरी, युनियन क्लब, माधवदास रघुनाथदास यांचा बंगला, वगैरे ठिकाणीं शेंकडों हजारों लोकांनीं त्यांचा सत्कार केला. परगांवाहूनहि या प्रसंगास लोक आले होते. खडकी

स्टेशनवर डेक्कन कॉलेजांतल्या मंडळींनीं त्यांचा सत्कार केला. पुणें स्टेशनवर अर्थातच पुष्कळ लोक जमून त्यांनीं टिळक–आगरकरांना समारंभानें गांवांत आणून सकाळीं रा. हरी रावजी चिपळूणकर यांच्या बंगल्यांत, व सायंकाळीं मोरोबादादांचे वाड्यांत सार्वजनिक सभेमार्फत त्यांना जाहीर पानसुपारी करण्यांत आली.

लोकसेवेंत शारीरिक दुःख व सन्मानसुख यांचा जो सजोड साक्षात्कार घडतो तो घेण्यांत टिळकांचा सर्व जन्म पुढें जावयाचा होता त्यांतील हा पहिला अनुभव अशा रीतीनें कोल्हापूरप्रकरणाच्या निमित्तानें त्यांना मिळाला. कोल्हापूर व टिळक यांचा अत्यंत निकट संबंध जन्मभर रहावा असा ईश्वरी संकेतच होता असें दिसतें. पण पहिला संबंध व दुसरा संबंध यांमध्यें जमीन अस्मानाचें अन्तर कसें पडावयाचें होतें हें पुढें ओघानें वाचकांस दिसून येणारच आहे.

ता. ९ जानेवारी सन १८८३ च्या केसरीच्या अंकांत 'साल गुदस्तां'चें सिंहावलोकन करतांना आगरकरांनीं या खटल्यास उद्देशून जी टीका केली तिजवरून, न्यायकोर्टानें शिक्षा दिली तरी, कोल्हापूरप्रकरणासंबंधीं टिळक-आगरकरांच्या मनांतील अढी गेली नव्हती हें चांगलें दिसून येतें. आणि खरोखरच ही अढी जाणें शक्य नव्हतें. बर्व्याविरुद्ध छापलेलीं पत्रें बनावट ठरल्यानें त्या पत्रांचा आधार घेऊन केसरीला यापुढें बर्व्याविरुद्ध लिहितां येत नव्हतें हें खरें. पण त्या पत्रांमुळें बर्व्याविरुद्ध झालेला पूर्वग्रह सर्व कसा दुरुस्त होणार ? आगरकर लिहितातः— "मराठा आणि केसरी पत्रांचे तरुण कर्ते बेहुमार कडक भाषा लिहीत असतील. पण हीं दोन पत्रें जन्मास येण्यापूर्वींच, करवीरस्थ प्रभूच्या संबंधानें इंगळ लागण्यासारखे चरचरीत लेख लिहून, ज्या नेमस्त मुम्बापुरस्थ पत्रानें महाराष्ट्रीय जनमनाला अगोदरच वणवा लावून सोडला होता, त्यांत अशाप्रकारचे लेख आले आहेत कीं नाहींत असा संशय ज्याला पडूं नये त्याला पडला. तेव्हां सांप्रतकालच सत्पक्षाला प्रतिकूल आहे असें मानण्याकडे सर्व लोकांच्या अन्तःकरणाची प्रवृत्ति होणें हें अगदीं साहाजिक आहे. द्वेष नसतां सद्बुद्धीनें लिहिलेल्या लेखांकरितां कोर्टानें दिलेल्या जबर शिक्षा जशा लोकांच्या लक्षांत राहतील, तसेंच कोल्हापूरच्या वेड्या राजाला चाबकाखालीं झोडणें जरूर होतें हें डॉ० मर्फी यांचें कोर्टांतील उत्तरीह लोकांच्या चांगलेंच लक्षांत राहील. वादग्रस्त पत्रांतील गोष्टींची सिद्धता करितां न येण्यास अनेक कारणें होतीं. राजाच्या कुटुंबाचा लौकिक राखण्यासाठीं कागद पत्र आम्हीं कोर्टापुढें हजर करीत नाहीं असें न म्हणतां, कोल्हापुरास गेलेल्या कमिशनपुढें कांहीं प्रतिष्ठित लोकांनीं मोकळ्या मनानें खऱ्या जबान्या दिल्या असत्या, तर खटल्याचा निकाल कदाचित वेगळ्या प्रकारचा झाला असता. बनावट पत्रें हातीं येण्यापूर्वींच ज्या ऐकीव हकीकतीच्या जोरावर बदनामीचे लेख लिहिले गेले ती हकीकत पुराव्यानें शाबीत होण्यास अशा प्रकारें प्रतिबंध न होता, तर पत्रें बनावट ठरतीं तरी त्याचा हिशेब नहव्ता वगैरे विधानें सदर लेखांत केलीं आहेत.

शेवटीं आपल्या इतर व्यवसायबंधूंना केसरीनें अशी मित्रत्वाची सूचना दिली आहे कीं, जबाबदारीचे लेख लिहितांना आपल्या सरकारच्या भलेपणावर, आपल्या समाजांतील बड्या बड्या धेंडांच्या उमद्या पोकळ थापांवर, व आपल्या येथील भेकड संस्थानिकांच्या शब्दावर किंवा धैर्यावर कधींहि फारशी भिस्त ठेवूं नये !"

कोल्हापुरप्रकरणाचा न्यायकोर्टापुरता अशा रीतीनें शेवट झाला, तरी वेडा ठरविलेला कोल्हापूरचा राजा जोंपर्यंत नगरच्या किल्ल्यांत हाल भोगीत होता, तोंपर्यंत हें प्रकरण लोकांच्या मनांतून जाणें शक्य नव्हतें. किंबहुना त्याचे युरोपियन रक्षक त्याला फार हाणमार करितात अशा बातम्या पसरत असल्यामुळें, डोंगरींतील टिळक-आगरकरांकडे लोकांचें जितकें लक्ष लागलें होतें त्याहीपेक्षां नगरच्या तुरुंगवासांतील राजाकडे तें अधिक लागलें होतें. अखेर ता. २५ डिसेंबर रोजीं भयंकर मारामारी होऊन हतभागी शिवाजीमहाराज मृत्युमुखीं पडले अशी बातमी, मृत्यूनंतर बराच काल लोटल्यावर प्रसिद्ध झाली तेव्हां तर सर्व महाराष्ट्रभर हलकल्लोळच झाला. मृत्यूची बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी नगरचे फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट जॉपसाहेब व कलेक्टर एल्फिस्टन यांनीं बंगल्यांतील लोकांचे जाबजबाब घेऊन आधीं ते सरकारकडे पाठविले. पण ते सर्व जसेच्या तसे प्रसिद्ध न करितां सरकारानें फक्त जॉपसाहेबांचा अभिप्राय तेवढा प्रसिद्ध केला ही गोष्ट लोकांना संशयास्पद वाटली. वेड्या राजानें आपला संरक्षक ग्रीनसाहेब यास मारलें ही गोष्ट खरी; पण शुद्धीवरील ग्रीनसाहेबानेंहि राजाला उलट मारलें ही गोष्ट सिद्ध ठरली.

महाराजांना मृत्यु आला तो ग्रीनच्या धक्काबुक्कीनें आला, तथापि ग्रीन यास अपराधी ठरवितां येत नाहीं, मात्र महाराजांच्या वारसांनीं वाटेल तर ग्रीनवर फिर्याद करावी, असें जॉपसाहेबांनीं जातां जातां विधान केलें. तसेंच महाराजांची दातखीळ बसून बराच वेळ झाला, व डॉ. बर्वे यांना ताबडतोब बोलवा असें महाराजांचा हुजऱ्या मल्हारी हा सांगत असतांहि ग्रीननें त्यास लवकर बोलाविलें नाहीं वगैरे गोष्टी उघडकीस आल्या त्याहि उघडच संशयास्पद होत्या. ता. १८ डिसेंबरपर्यंत महाराजांची स्प्लीन कांहीं वाढली नव्हती; मग पुढें अवघ्या आठ दिवसांतच नुसता धक्का लागल्याबरोबर प्राण जाण्याइतकी बेसुमार ती कशी वाढली याविषयींहि खुलासा होईना. या सर्व कारणांमुळें ग्रीनची चौकशी व्हावी असा लोकांनीं आग्रह धरिला, पण सरकारनें तो मनावर घेतला नाहीं. महाराज बेवारसी म्हणून त्यांची बडदास्त ठेवणें व त्यांना गोरे बॉडिगार्ड नेमणें याची जबाबदारी ज्या अर्थीं सरकारनें आपल्या अंगावर घेतली, त्या अर्थीं वस्तुतः सरकार हेंच महाराजांचें वारस ठरतें. म्हणून जॉपसाहेबांच्या सूचनेप्रमाणें ग्रीनचा इनसाफ करण्याविषयींची फिर्याद देण्यास सरकारनेंच पुढें झालें पाहिजे असाहि युक्तिवाद घालून पाडून करण्यांत आला. पण सर्व व्यर्थ. धन्याचा धनी कोणी नाहीं, त्याचप्रमाणें सरकारावर

सक्ति किंवा फिर्याद कोण करूं शकणार ? अर्थात् सर्व लोक आपल्या मनांत हळहळत राहिले पण त्यांचा कांहीं इलाज चालेना. महाराजांना ममतेच्या माणसांपासून मुद्दाम दूर ठेवणें, त्यांना डोळ्यासमोर नकोत अशीं माणसें त्यांच्या दिमतीला देणें, थारेपालट करण्याच्या सबबीवर त्यांना राजकोटाहून निलगिरीस, निलगिरीहून महाबळेश्वरास, महाबळेश्वराहून पुण्यास, पुण्याहून नगरास फिरवून त्यांची धिंड काढणें, या गोष्टींना अनुसरूनच ग्रीनची उघड चौकशी न करणें ही गोष्ट होती; व सरकारचें कोणत्याहि रीतीनें पारिपत्य करितां येणें शक्य नसल्यानें लोकांना जळफळण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता.

हा जळफळाट ता. २२ जानेवारी १८८४ च्या केसरीच्या अंकांत व्यक्त करितांना आगरकरांनीं काळजाला घरें पडण्यासारखी टीका केली ती अशीः— "आम्हांस तर या प्रकरणाचा इतका किळस आला आहे कीं, थोडा अन्याय शिक्षेवांचून जगांत राहिला तरी फिकीर नाहीं, पण त्या हतभाग्य राजाच्या संबंधानें या ग्रीनचें नांव पुनः पुनः आमच्या कानीं येण्याचें टळेल तर फार नामी होईल ! आतां झाल्या गोष्टींचा काथ्याकूट करून कांहीं फायदा नाहीं. पुढें काय करावें याचा आतां नीट विचार केला पाहिजे. आतां जो दत्तक घ्यावयाचा तो बराच मोठा झालेला मुलगा घेतला म्हणजे तो वेडा आहे किंवा नाहीं, पुरुष आहे किंवा नाहीं, आई पाहिल्याबरोबर चवताळतो किंवा नाहीं, वगैरे गोष्टींची चिकित्सा करण्यास नीट होईल. थोडासा निबर असा मुलगा पाहून घेतल्यास कांहींसा खाष्ट व अडाणी मिळेल खरा; पण मग त्याला घोड्याचे चाबूक खाण्याची किंवा वाढलेल्या प्लीहेवर दाब बसल्यानें डोळे पांढरे होऊन प्राणोत्क्रमण होऊं लागलें असतां तीर्थोदकाऐवजीं ग्रीनच्या हातची व्हिस्की पिण्याची पाळी येणार नाहीं. तें कसेंहि असो. परंतु ता. २५ डिसेंबरची ती काळरात्र, अहमदनगरच्या किल्ल्यांतील करवीरकरमहाराजांचा तुरुंगवास, जवळ मायाममतेचें कोणी नाहीं अशा स्थितींत निराशेनें बेफाम झालेल्या अर्धवेड्या महाराजांचा संताप, व त्यांचा ग्रीनसारख्या आडदांड धटिंगण सोजिराशीं मारामारीचा प्रसंग, हा सर्व देखावा डोळ्यांपुढें आणला असतां मन अजूनहि कावरें बावरें व उदास होऊन जातें व महाराजांना निष्ठुरतेनें वागविण्यांत सद्‌बुद्धीनेंच पण जो दुराग्रह मुंबईसरकारनें दाखविला तो लक्षांत घेतला असतां The way to hell is pavea with good intentions म्हणजे ' अधःपात किंवा नरक यांना जाऊन पोंचण्याचा रस्ता चांगल्या हेतूंच्या फरसांनींच बांधून काढलेला असतो' ही इंग्रजी म्हण खरी आहे असें वाटूं लागतें. "

दुर्दैवी शिवाजीमहाराजांचा अन्त दुःखकारक झाला, पण त्यामुळें पुढें कधींहि न सुधारणाऱ्या या प्रकरणाचा शेवट तरी लागला. अर्थात् गेले ते दिवस वाईट खरे, पण पुढें येणारे दिवस तरी चांगले येतील अशी आशा बाळगतां आली तरी

दुःखांत सुख मानतां येईल, असें कोल्हापूरच्या सर्व हितचिंतकांस वाटत होतें. गत-दुःखाला भावीसुखाचा अनुबंध जोडतां येण्याजोगी स्थिति उत्पन्न करण्यासारखा एक तरी मनुष्य आहे असें पुष्कळांस वाटूं लागलें. हा मनुष्य म्हणजे कागल संस्थानचे अधिपति श्री. आबासाहेब घाटगे हे होत. कोल्हापूरचा खटला सुरू असतां वर्व्यांच्या टीकाकारांना आबासाहेबांकडून बराचसा सहानुभूतिपूर्वक आश्रय मिळाला होता. शिवाजीमहाराजांच्या स्थितीविषयीं आबासाहेब घाटगे हे हरएकप्रकारें अनुकम्पा प्रकट करीत, व टिळक-आगरकरांतर्फे कमिशनपुढें कांहीं पुरावा देण्यासहि ते तयार होते. पण आयत्यावेळीं आबासाहेबांवर अकल्पित रीतीनें वजन पडून त्यांना तो पुरावा देतां आला नाहीं, व त्यांचा संबंध येणारीं टिळकांच्या ताब्यांत असणारीं पुराव्याचीं कांहीं पत्रें आबासाहेबांच्या मोहबतीखातर टिळकांना जाळावींहि लागलीं. अर्थात् कोल्हापूरप्रकरणीं आरोपीतर्फे आबासाहेबांचा बाह्यतः जो संबंध यावयाचा व जो उपयोग व्हावयाचा त्या सर्वाला टिळक-आगरकर हे मुकले ही गोष्ट खरी. तथापि आंतून मनानें कां होईना, पण आपल्याविषयीं, विशेषतः मृत्युमुखीं पडलेल्या करवीरच्या राजाविषयीं, खरी कळकळ व सहानुभूति बाळगणारा कोल्हापूरच्या लगत्याचा एक उमदा मराठा संस्थानिक आहे हेंच टिळक–आगरकर प्रभृतींना उमेदीचें व समाधानाचें एक मोठें भांडवल असें वाटत असे. पुढें रिकाम्या झालेल्या कोल्हापूरच्या गादीवर कोण मुलगा बसवावा ह्याचा विचार होऊन, श्री. आबासाहेब यांचे द्वितीय चिरंजीव यशवंतराव बाबासाहेब यांनाच दत्तक देऊन बसवावें असें जेव्हां सरकारनें ठरविल्याचें प्रसिद्ध झालें, तेव्हां त्या गोष्टीनें कोल्हापूरप्रकरणीं शिक्षा भोगून आलेल्या व अद्यापि तुरुंगांत शिक्षा भोगीत असलेल्या निरपेक्ष टीकाकारांना समाधान मानण्यास जागा झाली असे उद्गार केसरीनें काढले.

आबासाहेब लोकप्रिय व सुशिक्षित होते. रीजंट् या नात्यानें त्यांनीं केलेला कारभार सुखावह झाला. यामुळें आबासाहेबांच्या चिरंजीवांना कोल्हापूरची गादी मिळाल्याचा सर्वांना आनंदच होता. पूर्वीच्या महाराजांची दुर्दशा होण्याला त्यांच्या घरचा कोणी कर्ता सवरता पुरुष त्यांची काळजी घेण्याला व निगा राखण्याला जवळ नव्हता हें जें एक कारण तें तरी नवीन योजनेंत टळण्यासारखें होतें. म्हणजे आबासाहेबांसारखा पाठीराखा बाप असल्यामुळें, नव्या महाराजांचें कसें होईल, दुष्ट लोक त्यांचा छळ करतील व सरकारांतहि त्याची दाद लागणार नाहीं, ही तरी आपत्ति खास टळणार होती, या विचारानेंच लोकांना मोठें समाधान वाटलें. सातारच्या घराण्यांतील मुलगा दत्तक घ्यावा, व फार दिवसाचें सातारा–कोल्हापूर येथील भोसल्यांच्या घराण्यांतील द्वैत मोडून टाकावें, अशीहि एक सूचना पुढें आली होती-परंतु ती अनेक दृष्टींनीं अव्यवहार्य ठरली. सातारच्या घराण्यापेक्षांहि आबासाहेब घाटग्यांचें प्रेम लोकांना यावेळीं अधिक वाटत होतें. तें इतकें कीं आबा-

साहेबांनीं आपला मुलगा कोल्हापूरच्या गादीवर बसण्याकरितां दत्तक दिला त्यांत त्यांनीं आपला स्वार्थ साधला नाहीं तर उलट तो परोपकार केला, असेंच लोक म्हणत. कदाचित् पूर्वीच्या दुःखद अनुभवावरून तसें म्हणण्याचीच ती वेळ होती. पैशाचें किंवा ऐश्वर्याचें लोभानें पोटचा गोळा परकी कुळांत घालविण्यास तयार होण्याला, कोल्हापूरच्या लोकांवरील प्रेम, कोल्हापूर-दौलतीचें अभीष्ट चिंतन, भोंसले घराण्याशीं असलेला निकट संबंध, व आपल्या हाताखालीं असलेल्या गादीची कळकळ, या सर्व गोष्टींनीं आबासाहेबांच्या भिडस्त स्वभावावर वजन पाडलें नसतें तर त्यांनीं आपला मुलगा कोणत्याहि आमिषाकरितां दत्तक दिला नसता असेंच लोक मानीत. कां तर मृत्युमुखीं पडलेल्या शिवाजी-महाराजांकडून त्यांच्या जनक मातापित्यांना वेळोवेळीं लिहून गेलेल्या पत्रांतील हृदयद्रवक शब्द लोकांच्या स्मरणांतून अजून गेले नव्हते. आणि राजाची गादी हा शब्द कानाला गोड न लागतां दुःखदच वाटावा अशी त्या क्षणीं लोकांची चित्तवृत्ति उदास व वैराग्यशील बनली होती!

ता. १७ मार्च १८८४ रोजीं नवीन छत्रपति महाराजांना यथाविधि दत्तक देऊन त्यांना राज्याभिषेक करण्यांत आला. या प्रसंगीं पुणें सार्वजनिक सभेला दरबारास अगत्याचें आमंत्रण आलेलें होतें; व अभिषेकसमारंभानंतर रीजंट या नात्यानें आबासाहेबांना उद्देशून मानपत्र वाचण्याचा बहुमान सार्वजनिक सभेतर्फे सितारामपंत चिपळूणकर यांना मिळाला. हें मानपत्र बरेंच खुबीदार होतें. कारण तें नुसतें गुणवर्णनपर नसून, पूर्वी घडलेल्या दुःखकारक प्रसंगाचा त्यांत उल्लेख होता. पूर्वीच्या सरकारी अमदानींत इमारती वगैरेवर दरबारचा अतोनात पैसा विनाकारण खर्च करुन उधळपट्टी केली गेली होती तिचा स्पष्ट निषेध केला होता. उलट आबासाहेबांनींहि उत्तर देतांना, पुणे सार्वजनिक सभा ही सर्व महाराष्ट्र देशाचा प्रागतिक वकील बनली आहे, व तिनें सर्व लोकांकडून आपल्या दक्षतेबद्दल शाबासकी व मान मिळविला आहे असे प्रशंसापर उद्गार काढले. तात्पर्य, केसरी मराठ्याचे संपादक कोल्हापूरप्रकरणीं तुरुंगांत गेले त्याचा मोबदला पुण्याला मिळाल्याशिवाय राहिला नाहीं. कांहीं कालपर्यंत पुणें व कोल्हापूर हीं एकजीव बनलीं, येवढेंच नव्हे तर पुढें टिळक-आगरकरांनीं पुण्यास कॉलेज काढण्याची जी उमेद धरली तिला मूर्तस्वरूप येण्याला कोल्हापूरच कारणीभूत झालें. तें असें कीं, कोल्हापूरदरबारनें स्वतः बरीच रक्कम या कॉलेजच्या स्थापनेकरितां दिली, आणि आबासाहेबांच्या मदतीनें महाराष्ट्रांतील संस्थानिकांकडूनहि बऱ्याच देणग्या मिळाल्या. सर जेम्स् फर्ग्युसन्, मुंबईचे त्यावेळचे गव्हर्नर, यांनीं आपल्या मुलाला कोल्हापूरची गादी दिली याबद्दल आबासाहेबांची कृतज्ञता, कोल्हापूरप्रकरणीं टिळकआगरकरांनीं निरपेक्ष बुद्धीनें मोठी चळवळ केली याबद्दल त्यांच्याविषयीं कोल्हापूरकरांची कृतज्ञता, पुण्याचे लोक देशी संस्थानिकांचे पाठीराखे आहेस

या खालीमुळें त्यांचेविषयीं महाराष्ट्रांतील संस्थानिकांच्या मनांत उत्पन्न झालेली आदरबुद्धी, वगैरे सर्व गोष्टींचा मिलाफी परिणाम म्हणजेच पुण्यांतील पहिल्या खासगी कॉलेजाची फर्ग्युसन् कॉलेज या नांवानें प्रतिष्ठापना होय. तसेंच पुढें सन १८९५ सालीं हें कॉलेज चतुःशृंगीच्या मैदानांतील नव्या शोभिवंत इमारतींत रहावयास गेलें त्यावेळचाहि प्रवेशसमारंभ छत्रपति करवीरकर महाराज यांच्याच हस्तें करण्यांत आला. अशा रीतीनें कोल्हापूर व पुणें यांचा स्नेहसंबंध जडला तो पंधरा वर्षेंपर्यंत अखंड टिकला. पण एकवेळ जडलेले ऋणानुबंध कायमचे टिकतील तर हें जग नश्वर कसें म्हणतां येईल ? किंवा Vanity of human wishes म्हणजे मानवी मनोरथांचें वैयर्थ्य एरवीं कसें सिद्ध होणार ? दुर्दैवानें पुढील एकाच पिढींत पुणें व कोल्हापूर यांतील हा स्नेहसंबंध विसकटला. आणि अखेर अखेर टिळक काय किंवा गोखले काय किंवा फर्ग्युसन कॉलेज काय, यांच्याशीं कोल्हापूरच्या नवीन छत्रपतींनीं कशा प्रकारचें नातें ठेविलें हें महशूरच आहे. प्रस्तुत चरित्रग्रंथाच्या पुढील कित्येक प्रकरणांत या विपरीत नात्याचा उल्लेख मधून मधून करण्याचा प्रसंग येणारच आहे.

असो; शेवटीं या प्रकरणीं आणखी एकदोन गोष्टी सांगावयाच्या राहिल्या आहेत तेवढ्या सांगून हें प्रकरण पुरें करतों. कोल्हापूरच्या खटल्यांत टिळक व आगरकर हे डोंगरीच्या तुरुंगांत १०१ दिवस कैदेची शिक्षा भोगून ता. २६ आक्टोबर १८८२ रोजीं सुटले त्यावेळीं त्यांचा मोठा सत्कार झाला हें मागें सांगितलेंच आहे. बखले चार महिन्यांनीं सुटून आले. भिडे व रानडे यांस दोन वर्षांची शिक्षा झाली होती ती भोगून ते परत आले तेव्हां त्यांचाहि योग्य रीतीनें सत्कार झाला हें ता. १ जुलै १८८४ च्या केसरींतील खालील उताऱ्यावरून दिसून येईलः—"गेल्या शुक्रवारीं नाना भिडे व वामनराव रानडे हे मेलगाडीनें पुण्यास आले त्यावेळीं त्यांचें आदरातिथ्य करण्यासाठीं व त्यांना मानानें गांवांत आणण्यासाठीं पुण्यांतील बरीच शिष्ट मंडळी आगगाडीच्या स्टेशनावर गेली होती. वरील गृहस्थ गाडींतून उतरल्यावर सर्वांकडून आनंदप्रदर्शन झालें व नंतर मंडळी चालत चालत ज्ञानप्रकाशांत आली. तेथें एक दोन भाषणें झाल्यावर पानसुपारी वगैरे वाटण्यांत येऊन मंडळी आपापल्या घरीं मोठ्या आनंदांत गेली." या गृहस्थांचें मुंबई मुक्कामीं आदरातिथ्य कसें झालें याबद्दल नेटिव्ह ओपिनियन मधून खालील उतारा घेतला आहे तो वाचून वाचकांस आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं. "ज्यावेळीं मि. नानाभाई दांस पानसुपारी झाली त्याच वेळेस श्री ठाकुरद्वारांत बर्वेप्रकरणांत सांपडलेले मि. रानडे व भिडे यांसहि पानसुपारी झाली. लोकांची दाटी इतकी झाली होती कीं, एवढ्या आवारांत लोकांस उभें राहण्यासहि जागा मिळाली नाहीं. मि. रानडे हे मुंबईसच तुरुंगांत होते. ते सकाळीं ७ वाजतां सुटले. त्यावेळीं तुरुंगाजवळ सुमारें ४०० लोक असून मि. रानडे यांस घोड्याच्या

गार्डीतून हारतुरे घालून थाटानें गांवांत आणलें. मि. भिडे यांस ठाण्याहून आणून उभयतांस वर लिहिल्याप्रमाणें पानसुपारी झाली. यावेळेस दोन तीन सुरस भाषणें झालीं. नंतर मि. भिडे व रानडे यांस एक एक नागपुरी उपरण्याची जोडी बक्षीस दिली व मुलांकडून सुरस कविता म्हणविल्या. "

कोल्हापूरप्रकरणांत लोकसहानुभूति व लोकप्रियता हीं जी टिळकांस एकदां विकटलीं तिनें, प्रेमळ मातेप्रमाणें, टिळकांना आजन्म अंतर दिलें नाहीं. विष्णुशास्त्री चिपळूणकरांबरोबर टिळकांनीं स्वार्थत्यागपूर्वक खासगी स्वतंत्र शाळा स्थापली या गोष्टीमुळें त्यांच्याविषयीं लोकांची जी आदरबुद्धि बसली ती कोल्हापूरप्रकरणीं त्यांच्यावर खटला होऊन ते संकटांत आले व तुरुंगांत पडले यामुळें अधिक दृढच झाली. टिळकांचें नशीब म्हणा कांहीं म्हणा, संकटसमयीं त्यांना सकारण व अकारण दोन्ही प्रकारच्या मित्रांची वाण मुळींच भासली नाहीं. कोल्हापूरप्रकरणीं फिर्याद झाली तेव्हां टिळकांचा सार्वजनिक चरित्रक्रम अवघा एक दीडच वर्षांचा असतां, त्यांच्याकरितां, किंबहुना त्यांना न कळत, त्यांच्या जामिनाची तयारी झाली. भवानीपेठेंत उरवणे नांवाचे गुळाचे मोठे अडते व व्यापारी होते. त्यांनीं, टिळकांची तोंड ओळख नसतां, त्यांच्या जमानतीखातर ५००० रुपयांची थैली कोर्टांत नेऊन गुदरली असें सांगतात. या शेटजींचा व टिळकांचा स्नेह पुढें आमरणान्त होता; शेटजींच्या मरणोत्तर त्यांच्या उभयतां चिरंजीवांनींहि तो तसाच चालविला. उरवण्यांची पेढीही एकप्रकारें टिळकांची गंगाजळीच होती. केव्हां उणेंदुणें पडल्यास मध्यरात्रींहि या पेढीची मदत टिळकांना होई. पण सर्व व्यवहारांत टिळकांचा निरपेक्षपणा उरवणे मंडळींना दिसून येत असल्यामुळें, पुढें शेटजींच्या उभय मुलांत वांटणीचा तंटा सुरू झाला तेव्हां उभयतांनीहि टिळकानांच आपले पंच नेमून दिले, व टिळकांनींहि परिश्रमपूर्वक उभयतांनाहि समाधानकारक होतील अशा वांटण्या करून दिल्या. टिळकांवर पुढें आलेल्या संकटांत त्यांना अकारण मित्र व मदतगार बरेच लाभले तरी त्यांची उरवण्यांविषयींची आठवण नेहमीं जागृत असे, व मित्रमंडळींत ते नेहमीं उरवण्यांचें उदाहरण देऊन म्हणत कीं, " पांच हजार रुपये ठेऊन माझी ओळख नसतांहि मला जामीन राहण्याला उरवणे शेट तयार झाले हें पाहून मला तर फारच अचंबा वाटला, व सार्वजनिकसेवेचें फळ फार दूर असत नाहीं अशी सार्वजनिक आयुष्यक्रमाच्या उंबरठ्यावरच मला खात्री पटली. " उरवणे शेटजींप्रमाणें वकील लोकांनींहि पुढें येऊन या प्रकरणीं टिळक—आगरकर, भिडे—रानडे या सर्वांच्या तर्फे काम चालविण्याला मदत दिली. या डिफेन्स फंडाचा नक्की आंकडा किती जमला याची माहिती लागत नाहीं; तथापि त्या वेळच्या मानानें तो बराच मोठा असावा. कारण ब्रान्सन् फेरोजशहा मेथा सारख्या बॅरिस्टरांना रोजी फी देऊन ठेवण्यांत आलें होतें. सर्व आरोपींच्या डिफेन्सचें काम एक विचारें सुरू असून सदर बॅरिस्टरांचा

सर्वांना यथावकाश उपयोग झाला. पुणे मुंबईस सभा भरून जाहीर वर्गण्या झाल्या. या वर्गण्या एकंदर कामाला पुरेशा ठरल्या नाहींत; व ठाकोरदास सॉलिसिटर यांनीं अगदीं निःस्वार्थ बुद्धीनें काम केलें. तरी केसरी मराठ्याला कर्जच झालें. तथापि आपणांस झालेलें कर्ज कसें फिटेल या विषयींच्या चिंतेपेक्षां लोकांनीं अकाल्पित रीतीनें आपणांवर जे उपकार केले ते कसे फिटतील याचीच चिंता टिळक-आगरकरांना अधिक वाटत होती; व ती वाटावी इतक्या मोठ्या प्रमाणांत या पहिल्याच संकटांत टिळक-आगरकरांना लोकांची सहानुभूति मिळाली एवढी गोष्ट निर्विवाद आहे.

---

## भाग ६ परिशिष्ट (१)

### कोल्हापूरप्रकरणीं आगरकरांचे विचार.

[ 'डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे १०१ दिवस' हा लेख आगरकरांनीं लिहिला त्यांतील 'आमचे' या शब्दाचा अर्थ आगरकर व टिळक यांचे. हा लेख लिहिला जात असतां, निदान त्याचा विचार मनांत चालू असतां, आगरकर व टिळक हे एकत्र होते. यामुळें या लेखास टिळकांच्या चरित्र ग्रंथाधारांत महत्त्वाचें स्थान ओघानेंच येतें. टिळकांच्या चरित्रांतील या भागासंबंधानें या लेखाहून अधिक अस्सल व पहिल्या प्रतीचा पुरावा मिळणें शक्यच नाहीं. म्हणून या लेखांतील कोल्हापूरप्रकरणासंबंधी दोन तीन उतारे खालीं दिले आहेत ]

" कैद्यांना 'द्वेषाच्या' चार्जांतून मुक्त करून अविचाराचे लेख लिहिल्याबद्दल शिक्षेची सुनावणी केल्यानंतर हायकोर्ट उठलें, व मंडळी खालीं तोंड घालून आपल्या घरीं चालती झाली. नंतर आम्हांला माडीवरून खालीं आणून तळमजल्यांतल्या एका कोठडींत ठेविलें. सहा वाजतांच्या सुमारास घोड्याच्या दोन गाड्या आणून त्यांत आम्हांस व्यवस्थेनें बसविलें; व आमच्या बंदोबस्ताकरितां बरोबर शिपाईलोकांचा पहारा देऊन बिनभाड्याच्या घराकडे आमची रवानगी केली. आमच्या समजुतीप्रमाणें देशाच्या बऱ्यासाठीं आम्हीं आरंभिलेले उद्योग, करवीरस्थ प्रभूचें चांगलें व्हावें म्हणून आम्हीं लिहिलेले लेख, खटला उभा राहिल्यावर आम्हांस व आमच्या मित्रमंडळीस पडलेली दीर्घ यातायात, लोकांची आमच्यावर बसलेली प्रीति आणि त्यांच्याशीं आमचें वर्तन, आमच्या देशाची स्थिति, आणि जगांतील न्यायपद्धति वगैरे अनेक विषय झपाट्यानें आमच्या डोक्यांतून जात आहेत तों आमच्या गाड्या तुरुंगाच्या दारापाशीं येऊन ठेपल्या. त्यांतून

खालीं उतरून दिंडींतून आंत शिरतांना मनाची काय स्थिति झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. आंत गेल्यावर आम्ही थोडा वेळ स्वस्थ बसलों; नंतर वरचे कपडे उतरून टाकल्यावर सरकारी वार्डरानें खालपासून वरपर्यंत आमची झडती घेतली व आम्हांस तुरुंगचे पोषाख दिले.

* * *

"आपआपसांत हळू हळू गोष्टी सांगण्याखेरीज, किंवा अकरा वाजल्यावर बराकींत कोंडून घातल्यावर तेथें फिरण्याखेरीज दुसरी कांहींहि करमणूक नसे. टिळकांचा आणि माझा नाना तऱ्हेच्या विषयांवर वाद करण्यांत पुष्कळ वेळ जाई. कित्येकदां तर आम्हीं रात्रींच्या रात्री बोलत घालविल्याचें मला आठवतें. मी 'एम्. ए.' करितां व टिळक 'एल्एल्. बी.' करितां अभ्यास करण्यासाठीं कालेजांत राहिलों असतां सरकारी नौकरी न पत्करितां देशसेवेंत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशीं निश्चय केला त्या दिवसापासून आम्हीं जें जें बोललों चाललों होतों त्याची पुनः पुनः आठवण होऊन अनेक वेळां पुनरावृत्ति होत असे. अमुक गृहस्थाला क्यांपमध्यें भेटायाला गेलों असतां परत येतांना काळोखांत वाट चुकून बारावर दोन वाजण्याच्या सुमारास फिरतां फिरतां वंडावर कसे येऊन ठेपलों; शाळेच्या संबंधानें विष्णुशास्त्र्यांशीं बोलणें लावण्यास गांवांत गेलों असतां कालेजाला परत येतांना थंडीनें कितीतरी कुडकुडलों; वचन दिलें असतां शाळा आणि छापखाना काढला त्या वेळेस कोणकोणत्या लोकांनीं मागें घेतलें; असल्या फंदांत न पडणारे कोण कोण मनुष्य त्यांस घेरतां आले; आपले मूळचे हेतु कोणते, व ते कितपत सिद्धीस गेले आहेत; शास्त्रीबोवांच्या अकालीं मृत्यूनें आपल्या उद्योगांस केवढा धक्का बसला; आम्हीं आरंभिलेलीं कामें आमच्या हयातींत, व आमच्या पाठीमागें कित्येक वर्षे अप्रतिहत चाललीं तर आमच्या देशस्थितीवर त्यांचा काय परिणाम होईल; या देशावर इंग्रजांचे राज्य झाल्यानें त्याचें कोण कोणत्या बाबतींत हित आणि अनहित होत आहे; लोकशिक्षण उत्तरोत्तर जारीनें पसरत गेलें तर हिंदुस्थानची भावी स्थिति काय होईल; नेटिव संस्थानांची सुधारणा होण्यास काय उपाय करावे; देशभाषा युनिव्हर्सिटींत आणण्याला कोणती युक्ति काढावी; शाळा आणि कालेज बांधण्यास पैसे कसे गोळा करावे; कोल्हापूर प्रकरणांत आपली चुकी किती, आणि आपणांस भोगावी लागत असलेली शिक्षा कितपत न्याय्य आहे; आपण या तऱ्हेनें येथें अडकून राहिल्यानें लोकांच्या मनावर काय परिणाम होईल; व आपल्या शाळेचें आणि छापखान्याचें किती नुकसान होईल; आणीबाणीच्या प्रसंगीं आपणांस कोण कोण मित्र उपयोगीं पडले; व पुढें कोणा कोणाच्या मदतीवर आणि शब्दावर अवलंबून राहतां येईल; आतांप्रमाणें फिरून तुरुंगांत न येण्यासाठीं कोणत्या गोष्टींची खबरदारी ठेविली पाहिजे. इ०

"कोल्हापूर प्रकारणाच्या संबंधानें अनेक तर्क झाले आहेत. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, हा खटला पुण्यास चालता तर याचा निराळाच परिणाम झाला असता; दुसऱ्या कांहीं लोकांचें असें मत आहे कीं, या खटल्यांतील जूरींत सगळे किंवा निम्मेपेक्षां अधिक नेटिव लोक असते तर त्यांनीं वर्तमानपत्रकर्त्यांस निरपराधी ठरविलें असतें. तिसऱ्या एका पंथाचे लोक आहेत त्यांना असें वाटत आहे कीं, पत्रकर्त्यांस पैशाचें पाठबळ नव्हतें म्हणून ते बुडाले. कोणाची कल्पना आहे कीं, या कामांत आम्हाला सरकारच प्रतिकूळ असल्यामुळें आम्हाला अपयश आलें. कोणाची समजूत अशी आहे कीं, आम्हीं अखेरीस क्षमा मागितली ही फार वाईट गोष्ट केली व कित्येकांस तर आम्हांस शिक्षा झाली ती ठीक झाली असें वाटत असेल. यांपैकीं कोणाचें म्हणणें खरें, किंवा कोणाचें खोटें, अथवा कोणाच्याच म्हणण्यांत कांहीं हांशील नाहीं, याचा निश्चय करणें आम्ही आपल्यावर घेत नाहीं. पोलिस कोर्टांत आणि हायकोर्टांत लोकांच्या पुढें बऱ्याच गोष्टी आल्या आहेत, व जो तो आपापल्या समजुतीप्रमाणें आम्हांस किंवा इतरांस बरें वाईट म्हणत आहे. आमचें म्हणणें असें होतें कीं, हें कोल्हापूर प्रकरण कोणत्या तरी न्यायासनापुढें यावें, तें आमच्या इच्छेप्रमाणें एकदांचें आलें. तसें झाल्यावर त्या ठिकाणीं न्याय करण्यास बसलेल्या न्यायाधीशाच्या आणि जूरीच्या नजरेला जी गोष्ट आली तीच योग्य व मान्य असें घेतलें पाहिजे. कारण असें न केलें तर कोणत्याही कज्जाचा कोठेंच निकाल लागावयाचा नाहीं. आतां जज्जानें आणि जूरीनें केलेला निकाल सर्वांसच संमत पडेल असें नाहीं. थोडा बहुत मतभेद हा होणारच, व तो होणें हें स्वाभाविक आहे. तथापि सरकारानें ज्यांच्याकडे कोणत्याही गोष्टीचा निवाडा करण्याचा पूर्ण अखत्यार दिला, त्यांच्या विचाराला जें आलें तेंच आनंदानें मान्य करणें हेंच प्रत्येक सुशिक्षित, सुजाण, व धर्मतत्त्वज्ञाचें कर्तव्यकर्म आहे. साक्रेटिसाला असें पक्कें ठाऊक होतें कीं, मला जी शिक्षा होत आहे ती अगदीं अन्याय्य आहे; तरी त्याच्या न्यायाधीशांच्या नजरेला जी गोष्ट आली ती त्यानें संतोषानें मान्य केली. मनुष्य ज्या अर्थी सर्वज्ञ नाहीं, त्या अर्थी त्याच्या हरएक कृत्यांत चूक होण्याचा संभव आहे. साक्रेतिसावर आणलेल्या आरोपांची चौकशी करण्यास दहा पांच लोक बसले होते असें नाहीं. आथेन्सच्या प्रजासत्ताक राज्यांतील लोकांच्या बहुमतानें तो दोषी ठरला, व त्याला विषप्राशन करावें लागलें ! पण कालांतरानें त्याच्या संबंधानें येवढें मतांतर झालें कीं, तो भला ठरून त्याचे पांच सहाशें न्यायाधीश अगदीं चुकले अशी लोकांची खात्री झाली, व आतांपर्यंत सर्व सुधारलेल्या राष्ट्रांचा हसाच ग्रह आहे.

"सत्यमेव जयते" हा पूर्वापार चालत आलेला जो सिद्धांत आहे, त्याची पूर्तता होण्यास बराच काळ लागतो; कारण सत्यांत म्हणजे कांहीं नैसर्गिक सामर्थ्य आहे, असें नाहीं; असें असतें तर त्याला तत्काळ यश येतें. कधींना कधीं तरी पगडा बसतो याचें कारण इतकेंच आहे कीं, सत्यावलंबन हें बहुतेकांचें फायदेशीर

आहे. या बहुतेकांचें ज्या वेळेस प्राबल्य होतें, त्या वेळेस सत्याचा जय होतो; उलट पक्ष प्रबल असतो तोंपर्यंत सत्य दडपून राहतें. आतां साक्रेतिसाच्या आणि आमच्या युगांत जमीन–अस्मानाचें अंतर पडलें आहे, व राज्यपद्धति, न्याय वगैरेंच्या संबंधानें लोकांच्या आचारविचारांत पुष्कळच तफावत पडली आहे, व सत्यअसत्य विवेचनाचा कांटा अधिक सूक्ष्म होत चालला आहे, हें समंजस वाचकांस सांगायाला पाहिजे असें नाहीं. असो, जगांतील न्यायपद्धति बुद्धि-बळांच्या खेळासारखी आहे. प्रतिपक्षाच्या शहांत न येतां आपण त्याला शह देणें आणि अखेरीस मात करणें हें ज्याच्या त्याच्या कल्पनेवर, अनुभवावर, बुद्धि-सामर्थ्यावर व इतर उपकरणांवर अवलंबून असतें. यांपैकीं कांहीं कमी पडलें तरी दुसऱ्या पक्षाचा उत्कर्ष होण्याचा संभव असतो. जो ज्या बाजूला असतो त्याला अनुसरून त्याचें वर्तन चाललेलें असतें. फ्रान्सचा राजा चवदावा ल्युई यानें प्रजेवर इतका जुलूम केला कीं, त्याच्या पाठीमागें दोन पिढ्यांनीं फ्रान्सांत जबरदस्त राज्यक्रांति होऊन प्रजासत्ताक राज्याची स्थापना झाली; पण ल्युईला असें कधीं वाटलें नाहीं कीं माझ्या आचरणानें माझ्या प्रजेस त्रास होत आहे.

"ल्युईसारखेंच इंग्लंडाच्या दुसऱ्या जेम्स राजाचें वर्तन होतें. हे राजश्री राज्यासनास मुकले तरी त्यांना आपलें करणें वाईट दिसलें नाहीं. येवढेंच खरें आहे कीं कोणताही पक्ष असो, तो जेथपर्यंत अधिकारारूढ असतो, तेथपर्यंत त्याच्या चुकीच्या करण्याला देखील कोणी नांवें ठेवण्यास धजत नाहीं, कारण तसें केल्यानें त्याच्या कडून दण्ड होण्याचा संभव असतो. आनंदी–राघोबांनीं राज्यलाभासाठीं सख्ख्या पुतण्याला मारेकऱ्यांच्या स्वाधीन केलें; पण तुम्हीं केलेलें कृत्य अत्यंत निंद्य होय, व याला देहांत प्राय-श्चित्ताखेरीज दुसरें प्रायश्चित्त नाहीं, असें खडखडीत तोंडावर सांगण्यास धजणारा सगळ्या पेशवाईत एक रामशास्त्री मात्र होता! अधिकाऱ्याला आड येणारानें हातांत शिर घेऊन मरण्यास तयार असलें पाहिजे. अन्याय करणारे अधिकारी मरून जाऊन पिढ्या दोन पिढ्या गेल्यावर त्यांच्या वर्तनाची चर्चा करणें सोपें असून बिनधोक्याचें आहे. सखारामबापूसारख्या हट्टी वृद्ध कपीला स्वपक्षाला वळवून घेण्यासाठीं नानांनीं गंगाबाईस अत्यंत अश्लाघ्य युक्ति सांगितली, नानांचें आणि गंगाबाईचें बळकट सूत होतें, नानांच्या जाचामुळें सवाई माधवरावांनीं माडीवरून उडी टाकली, वगैरे ऐतिहासिक गोष्टी आतां आम्हीं खुशालपणें बोलतों, व न भितां त्यांच्या विषयीं वादविवाद करितों. पण मनांत आल्याबरोबर पाहिजे त्याला तापल्या तोफेवर बांधून मारण्याचें सामर्थ्य जोंपर्यंत नानाच्या मन-गटांत होतें तोंपर्यंत अमुक अमुक प्रकारचें तुमचें वर्तन अयोग्य आहे असा त्यांच्यापुढें चकारशब्द देखील काढण्याची कोणाची छाती नव्हती. उलट त्यांच्या वागणुकीची तारीफच होत असे. शिंदे, होळकर, गायकवाड, सावंत, भोसले, सचीव, प्रतिनिधि, कागलकर, पटवर्धन वगैरे घराण्यांतील जुन्या पुरुषांच्या वर्त-

नाविषयीं ग्रांडडफ साहेबानें आपल्या इतिहासांत जशी चर्चा केली आहे तशी चर्चा या घराण्यांतील प्रस्तुत पुरुषांविषयीं आम्हीं करूं म्हटलें तर आमचें कसें चालेल ?

"कोणी एखादा निर्भीड घटिंगण हवें तें बोलत सुटला तर त्याला असले विचार तोंडावाटे बाहेर काढतां येणार नाहींत असें नाहीं; पण असें करितांना त्यानें आपल्या जिवावर उदार झालें पाहिजे. जिवाची परवा न करितां जगाचें कल्याण करण्याच्या मिषानें असें करण्यांत प्रतिष्ठा मानणारे ग्यालिलीओ, क्रानमर, रामशास्त्री यांसारखे वेडे पीर कोठें कोठें असतात, पण निःसीम संसार-चतुर जो आहे तो अशांचें अनुकरण कधींही करणार नाहीं ! अधिकाऱ्याला आड जाण्यानें जसें कोणाचेंही कल्याण होणें नाहीं, तसेंच सरकाराला विरोध करणाऱ्यानेंही आपल्या संसारसुखावर तिळांजली सोडावा. कारण सरकार म्हणजे अधिकारीसमुच्चय यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं. अज्ञान गरीब लोकांना सरकारचा मोठा बागुलबोवा वाटत असतो, पण ज्यांनीं सरकार आणि प्रजा या विषयावर थोडाबहुत विचार केला आहे त्यांना असें पक्कें ठाऊक असतें कीं, व्यक्तिविशेष अधिकाऱ्याला ज्याप्रमाणें अहंकार, लोभ, सौजन्य, मैत्री, आपलेपणा, परकेपणा वगैरे बऱ्यावाईट मनोवृत्ति असतात, त्याप्रमाणें अधिकारीसमुच्चयरूप जें सरकार त्यालाही असतात; भेद इतकाच कीं व्यक्तिविशेष अधिकारी हट्टास पेटल्यानें कोणाचेंही नफा–नुकसान जितकें करूं शकतो त्यापेक्षां सरकाराला अधिक करतां येतें. बाकी सरकारानें अमक्याला चांगलें म्हटलें, आणि तमक्याला वाईट म्हटलें म्हणून तो तसा होतो हें थोडेंच आहे.

"अनेकदां असें होतें कीं, सरकार आणि प्रजा यांच्या नफानुकसानीचा परस्परांशीं अत्यंत विरोध असल्यामुळें अति नीच पुरुषाला हातीं धरून सरकाराला त्याचा बडेजाव करावा लागतो. ब्रह्मघ्न लिंबकजीसाठीं बाजीनें पाजीपणा करून आपल्या या राष्ट्राच्या स्वातंत्र्याची राळ केली, हें सर्वांस विदित आहेच. ज्याप्रमाणें प्रासादिक कवि आपल्या कल्पनावैचित्र्यामुळें शुष्क पदार्थाला देखील नसतें माहात्म्य आणून देतात, त्याप्रमाणें सरकारही अगदीं हलकट मनुष्याला नसता थोरपणा देऊं शकतें. ज्याप्रमाणें स्विफ्टासारख्यानें केरसुणीचें वर्णन केलें तर तें देखील लोकांस मनोरम होईल असें स्टेलास वाटलें, त्याप्रमाणें सरकारानें ज्ञानशून्य पशूस जरी अधिकारावर नेमून त्याची पाठराखणी केली तरी त्याचाही लोकांना मोठा बाऊ वाटणार आहे. मागें एका रोमन बादशहानें अधिकाराच्या जोरावर आपल्या छिनाल बायकोस सेनेट सभेकडून देवी म्हणविलें आणि आपल्या विवाहाचा वर्षदिवस तरुणतरुणींनीं पतिव्रतेच्या स्थंडिलापुढें अगरु जाळून साजरा करावा असा ठराव केला ! सरकारी सत्तेचें सामर्थ्य केवढें आहे हें

पहाण्यास इतकें दूर जायला पाहिजे असें नाहीं. आपल्या येथील कायदे करणाऱ्या मंडळांत मधून मधून कशा प्रकारच्या इसमांची नेमणूक होते, हें लक्षांत आणा म्हणजे झालें. तात्पर्य काय कीं सरकार म्हणून जरी स्वर्गीय वस्तु नाहीं, व सरकारचे सर्व अधिकार सरकाराला लोकांपासून प्राप्त झालेले असतात, तरी ते फार दिवस त्याच्याकडे असल्यानें तें त्याच्याच जोरावर लोकांशीं शिरजोरपणा करूं लागतें. व त्यांना आपले गुलाम करून टाकण्याचा प्रयत्न करितें; असें झालें म्हणजे लोकांत पिढीजात कांहीं तरतरी असल्यास ते औदासीन्यनिद्रेतून जागे होतात, आणि अरेराव झालेल्या सरकाराला दोन समजुतीच्या गोष्टी सांगून वळणावर आणितात. अशा प्रकारचे लोक ज्या देशांत नसतात त्या देशचें सरकार प्रजेचे किती हाल करील याचा नेम नसतो. सरकार जुलमी, आणि प्रजा मुग्ध असल्यानें थोड्या वेळांत उभायतां लयास जातात. आपल्या हक्कांच्या संरक्षणासाठीं अधिकाऱ्यांशीं किंवा सरकाराशीं जे भांडण घालतात त्यांना त्या भांडणांत यश मिळण्याची आशा नसते.

"सारांश, सरकार व प्रजा यांतील युद्धप्रसंग एका पक्षास साधक आणि दुसऱ्या पक्षास बाधक असा असतो. तशांत ज्या ठिकाणीं परदेशस्थ सरकार व तें एखाद्याचा न्याय करण्याच्या भरीं पडतें, त्यांवेळेस त्याच्याशीं सामना करण्यास उभें राहणाऱ्यानें फारच मजबुती केली पाहिजे. आपलें सरकार असें विलक्षण आहे कीं अगोदर कोणाला कांहीं माहिती द्यावयाचें नाहीं, व कोणीं कांहीं गैर माहितीमुळें चुकीचा मजकूर लिहिला कीं कर त्याचा पुरावा म्हणून लागलें हात धुऊन त्याच्या पाठीला! वास्तविक पहातां ज्या गोष्टीशीं लोकांचा निकट संबंध असतो, त्या संबंधाची माहिती सरकारानें आपण होऊन वेळच्या वेळेस लोकांस द्यावी, व त्यांच्या खोट्या समजुती दूर कराव्या. अमेरिकेंतील सरकार सरकारी ग्याझेटांतून अशा प्रकारची माहिती वारंवार प्रजेस देतें असें ऐकिवांत आहे. आपल्यापैकीं कोणास थेट सरकाराशीं किंवा त्याच्या एखाद्या अधिकाऱ्याशीं यशाच्या आशेनें कोडतांत तंटा घालायचा असल्यास त्यांनीं पुढें लिहिलेल्या गोष्टींबद्दल मुख्यत्वेंकरून खबरदारी ठेवावी. ( १ ) बरेंच मोठें डबोलें हातांत पाहिजे. पैशासारखी दुसरी मजेदार वस्तु जगांत नाहीं. हा वाटोळा असल्यामुळें एका फ्रेंच ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें विशेष घर्षणाशिवाय पाहिजे त्या ठिकाणीं याचा सहज प्रवेश होतो. पाहिजे तो किंवा ती वश करण्यास याच्या सारखा दुसरा पंचाक्षरी मिळणें कठीण. " मूकं करोति वाचालं, पंगुं लंघयते गिरिम्; यत् कृपा तमहं वंदे परमानंद माधवं " या पद्यांत माधवाच्या ठिकाणीं रुपक असें पाठांतर केलें असतां पैशाच्या सामर्थ्याचें खरें वर्णन होणार आहे. अथवा असलें पाठांतर करण्याचीही जरूर नाहीं; कारण माधव हा लक्ष्मीपति आहे, तेव्हां माधव याचाच अर्थ रुपया असा केला म्हणजे झालें!

ज्यानें कशाचें तोंड खुलें केलें त्याला कशाचीही वाण नाहीं; म्हणूनच कवीनें कोठेंसें म्हटलें आहेः—

धनैर्निष्कुलीनाः कुलीना भवन्ति धनैरापदं मानवा निस्तरन्ति ।
धनेभ्यः परो बान्धवो नास्ति लोके धनान्यर्जयध्वं धनान्यर्जयध्वम् ॥

ज्याला विपुल द्रव्याची अनुकूलता असेल त्याला जगाच्या प्रस्तुत स्थितींत खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें करण्यास फारसा त्रास पडणार नाहीं. द्रव्यविहीनांचे मनोरथ मात्र गतभर्तृकांच्या स्तनाप्रमाणें जागच्या जागीं विकास आणि लय पावतात. ( २ ) कागदाची सामुग्री. खटला उभारण्यापूर्वी जो जो म्हणून महत्त्वाचा कागद असेल तो हातांत घेऊन ठेवला पाहिजे. अस्सल मिळाला तर फारच चांगलें झालें; तो दुष्प्राप्य असेल तर त्याची हुबेहुब नक्कल तरी पाहिजेच पाहिजे. तशांत तिच्यावर एखाद्या जबाबदार कामगाराची निशाणी घेऊन ठेवतां आल्यास बरेंच काम होईल. अमुक अमुक माझ्या मित्राकडून किंवा अमक्या तमक्या भलत्या मनुष्याकडून मला हव्या त्या वेळेस मिळण्याचा संभव आहे असें म्हणत कोणाच्याही हवाल्यावर बसलें कीं काम हुकलें म्हणून समजावें. उपयोगाला येणारें चिटोरेंन् चिटोरें वेळेच्यापूर्वी काबीज करून ठेविलें पाहिजे. एकदां गडबड सुरू झाली म्हणजे अगदीं साधीं चिटोरीं दुष्प्राप्य होतात, व कधीं तर मोठ्या सुरक्षित जाग्यांतून तीं अंतर्धान पावतात हें सर्वांनीं ध्यानांत ठेवावें.

( ३ ) सर्वांनिशीं लेखी जबान्या घेऊन ठेवणें. हा माझा बाप, ही माझी बायको, ही माझी आई, हा माझा सासरा, हा माझा जिवलग मित्र, हे श्रीमंत, हे गरीब, हे राजश्री, हे भले, हे सालस, हे काय कोर्टापुढें पाहिजे त्या वेळेस हजर राहून त्यांना माहित आहे तें कोणाची मुर्वत न ठेवितां सांगतील तेव्हां यांच्या सहीसुद्धां यांची अगोदर लेखी जबानी घेऊन ठेवण्याची कांहीं एक अवश्यकता नाहीं, अशा दिमतीवर कोणत्याही कार्यहितेच्छूनें बसूं नये. प्रेम, विश्वास वगैरे चटसारें एकीकडे ठेऊन पक्के नास्तिक बनावें, व जगांतील हरएक मनुष्य जबरा लफंगा आहे असें मानून आपल्या उपयोगाचें जें म्हणून त्याला ठाऊक असेल त्याचें त्याच्याकडून टांचण करवावें, व त्यावर त्याची सही घ्यावी; आणि असलीं सगळीं टांचणें वेळ येईपर्यंत एखाद्या मजबूत लोखंडी पेटींत घालून ठेवावीं ! (४) वकीलांचें मत. कोणतेंही काम हातीं धरण्यापूर्वी त्यांतील सर्व कागद पत्र एखाद्या कायदेवाल्या भटास दाखवावे; व त्यांवर त्यांचें लेखी मत घेऊन ठेवावें. या कृत्यास जो भट पहावयाचा तो चांगला धोरणवाला घनपाठी दशग्रंथी वैदिक असून जिकडे तिकडे वाखाणलेला असावा. त्याला असें म्हणावें कीं, बाबारे, दीडदेंच्या ठिकाणीं दोनशें घे, पण जें मत द्यावयाचें तें नीट आपलें पोथीपुस्तक पाहून दे. असें केल्यानें प्रथम थोडासा खर्च झाला असें वाटेल खरें, पण पुरावा कसा प्रकारचा पाहिजे, किती कमी आहे, व बाकीचा कसा मिळवावा वगैरेचें ज्ञान आधीं

झाल्यानें पुढचा पुष्कळ त्रास चुकतो, व एकंदरीनें नफा होतो. ( ५ ) किर-कोळ तयारी. जागोजाग कुशल बातमीदार पाहिजेत. त्यांनीं रात्रंदिवस गुप्तपणें जिकडे तिकडे घिरट्या घालीत असावें. कोणाची काय खटपट चालली आहे, समाजांत लोक काय बोलतात, प्रतिपक्षाकडील कशी काय तयारी आहे वगैरे गोष्टी नीट रीतीनें टेहळून गुपचिप्पणें वेळच्या वेळीं वर्दी देणाऱ्या विश्वासुक बातमीदारांशिवाय धामधुमीच्या वेळेस कामाचा चांगला जम बसत नाहीं. तसेंच दहापांच तरी मोठमोठ्या युरोपियन लोकांच्या ओळखी असाव्या, म्हणजे त्यांच्या कडून त्यांच्या समाजांत ऑफिशील वर्गात जी चर्चा चालली असेल ती कळते, व तदनुसार नवीन वळणें बांधण्यास ठीक पडतें. याशिवाय प्रत्येक समाजांत मध्यस्थ म्हणून एका जातीचे प्राणी आहेत. त्यांच्या मदतीनें एखादे वेळेस बेमालूम रीतीनें कामगिरी उरकतां येते. म्हणून याजपैकीं एक दोघे अंगाखालीं राखून ठेवले असले तर बरें. सारांश काय कीं, मास्तर, डाक्तर, बालिष्टर, कोणीका असेना; जो जो म्हणून प्रसंगीं उपयोगी पडण्यासारखा असेल त्याला बगलेंत मारून ठेवावा. दुसरी एक महत्त्वाची सूचना करावयाची अगदींच विसरलों ती ही कीं, " शिववंदनकामाहीं वंदावा प्रथम देव नंदी न ! " या न्यायानें प्रत्येक मोठ्या देवालयांतील आणि गृहमठांतील द्वारपालांच्या अंगावर एकेक तुकडा टाकून ठेवलेला असला म्हणजे महादेवापर्यंत प्रवेश होण्यास बिलकूल अडचण पडत नाहीं !

---

## भाग ६. परिशिष्ट (२)
### डोंगरीमहात्म्य वर्णन

[ या खालीं दिलेल्या कविता डोंगरीच्या तुरुंगांतच सन १९०८ च्या आक्टोबर महिन्यांत लिहिल्या गेल्या. व त्या सुचण्याचें कारण हेंच कीं, टिळक-आगरकरांना अब्रुनुकसानीच्या गुन्ह्याकरितां या तुरुंगांतील ज्या बराकींत पूर्वी ठेवण्यांत आलें होतें त्याच बराकींत प्रस्तुतच्या कविता रचणारासहि १४ दिवस राहण्याचा योग आला होता. टिळक-आगरकरांच्या वेळचा एक म्हातारा वॉर्डर त्यांच्या विषयीं अर्धवट स्मरणानें कांहीं गोष्टी सांगे. कविता रचणाराला शिक्षा झाली ती न्या. दावर यांच्या अब्रुनुकसानीच्या गुन्ह्याकरितां. या अब्रुनुकसानीला कारण न्यायमूर्तींनीं टिळकांना दिलेली सहा वर्षांची शिक्षा व विशेषतः शिक्षा देतांना उच्चारलेले अब्रुनुकसानीचे शब्द ! अशा रीतीनें डोंगरीच्या तुरुंगाशीं टिळकांचा संबंध १८८२ पासून १९०८ पर्यंत अखंड राहिला होता. यामुळें १८८२ सालाच्या प्रकरणाच्या शेवटीं १९०८ सालीं रचलेलें डोंगरी महात्म्यवर्णन परिशिष्ट म्हणून घातलें आहे ! ]

( चाल–फटक्याची )

इहलोकीं दरबार यमाचा अनुदिनिं कारागृहिं भरतो
पापपुण्य झडतिला निघोनी मनुज मोकळा तो होतो ॥ ध्रु० ॥

(१) प्राकारावृत पुरी डोंगरी अन्वर्थक हें नांव तिला
उंच उंचशा भयाण भिंती पहाडसम चौबाजूला ॥ १ ॥
कभिन्न काळे दरवाजे ते दोन दिशेला असति उभे
मेघडंबरी त्यावरि केली मेघशबलशा नीलनभें ॥ २ ॥
समंत भार्गी वस्ति दाटली जशा वारुळामधिं मुंग्या
परि अंतरिं शून्यता राखिती उभ्या संगिनी त्या नंग्या ॥ ३ ॥
जरी म्हणावें स्मशान येथें हातपाय तरि वावरती
सदन म्हणावें तरी मनुष्यें मुकीं भुतासम आचरती ॥ ४ ॥
सदन म्हणा वा स्मशान येथें सदा नांदतो यमराजा
परलोकाचा अनुभव देई मनुजा, चालु न दे गमजा ॥ ५ ॥

* * * *

(२) द्वारामागें द्वार लागलें प्रवेश दुर्घट तो मोठा
वर्दी देउनि उभे रहावे घटका दो घटका घंटा ॥ १ ॥
यमदूतांच्या संगति वांचुनि संचारासी वाव नसे
शुष्ककाष्ठ पाठिचें पाठिशीं सदा लपेटुनि तें बैसे ॥ २ ॥
कारभार करणार यमाचा त्यासी 'जेलर' ही संज्ञा
प्रमाण शिरसावंद्य तयाची कोणि न अवमानिति आज्ञा ॥ ३ ॥
कामधाम तरि चिठ्ठिचपाटी; व्हा जाउनि त्या पुढति उभें
शिका प्रथम नम्रता नीचपण उचित दंडधर कालसभे ॥ ४ ॥
भेट कुणाची हवी तरी ती क्षणमितशा अवधींत मिळे
अधिक उणें बोलण्यास चोरी यमसचिवाचे कान खुले ॥ ५ ॥

* * * *

(३) आंत बंदिजन जे सांपडले वर्णु तयांची काय गती
बोल बोलण्या तद्विषयक मम जीभ धरितसे बहु खंती ॥ १ ॥
पंजरस्थ पिक मोर सारिका यांचें हृद्गत अजि कळलें
प्रवेश परकायेंत न केला अनुभव बीज परी फळलें ॥ २ ॥
ऐकतसे सिद्धांत आजवरि गहनाचि आत्मौपम्याचा
प्रकाश पडला हृदयीं तयाचा कुंठित हो म्हणुनी वाचा ॥ ३ ॥
स्वातंत्र्यासम इरहर दुसरें प्राण्या जगतीं सौख्य नसे
विघात करि जो त्या सौख्या त्या सम अधमाधम तोचि असे ॥ ४ ॥

व्यक्ति असो वा राष्ट्र असो तत्पापाची खुणगांठ खरी
स्वतंत्रता हानिची आपदा अतुल तिजसि सम ना दुसरी ॥ ५ ॥

* * * *

(४) बंदिजनांचा नित्य दिनविधी सूत्रबद्ध जणुं रेखटला
अनंत कल्पें अबाधित असा चालु असे हो हा खटला ॥ १ ॥
दो घटका रात्रीसि उठोनी अशुचि शौच मार्जन करणें
वदनि येत तरि स्फुट न वदा हरिनामादिक प्रातःस्मरणें ॥ २ ॥
जरि मजुरीची कैद तुम्हाला सण पुढतीं घ्या खोलाया
इतरहि अथवा कर्म नीचतर उरकाया सारा बाह्या ॥३ ॥
दस घंट्याला करा तयारी भोजनविधिची गर्दि उठे
कदान्नमय तीं दोन वर्तुळें त्यावरि तुरिचें दाट घुटें ॥ ४ ॥
घृतदुग्धादिक शाक लवण वा गरम मसाला तो विसरा
करा साजरा पाणि घोटुनी शिमगा दिपवाळी दसरा ॥ ५ ॥

* * * *

(५) दिन ओसरतां रांठ कांबळ्यावरति देहयष्टी पसरा
झोंप न ये तरि जन्मजन्मिच्या कर्मांची ती टीप करा ॥१॥
मत्कुण दंशहि नरशोणितपी चावचावुनी करिति दशा
अंशभागि त्यां करा वरा मग सक्तीनें शिबिराज यशा ॥ २ ॥
अळेपिळे घ्या वळा तळमळा योगासनविधि सर्व करा
ठाव न सोडा शद्व न काढा खुशाल मग सुखशेज करा ॥ ३ ॥
आस्तिकता ती येत नास्तिका अहृदयहि प्रेमी बनतो
क्षणभर सद्गुरु रामकृष्ण वा आयवाय बाबा म्हणतो ॥ ४ ॥

* * * *

(६) दो घटका रात्रीस होतसे ठायींठायिं नाकेबंदी
फिरुं न शके कोणिही होउ तो चोरसाव वा फटफंदी ॥ १ ॥
सवाल करितां जबाब द्यावा सांकेतिकशा शद्वाचा
यमकिंकर तो हत्यार सांवरि अडखळली जरि लव वाचा ॥ २ ॥
शिपाइमाई पूर्वरात्रिं बहु सक्त हुषारी दाखवितो
परि माध्यान्हीं डोळ्यावरतीं झांपड येउनि तो पडतो ॥ ३ ॥
घंटानादें उठे खडबडे सजीव होतां जसें मढें
अलकाऱ्या ललकाऱ्या देउनी आलवेलीचा मंत्र पढे ॥ ४ ॥

* * * *

(७) कारागृह हें ब्रह्मस्वतंत्राचि चौप्राकारांतरि वसलें
जिवशिव साचित् प्रकृतिपुरुष गुणउपाधि त्यांतचि सांठवले ॥ १ ॥
एक नियंता समस्वरूपी इतर सर्व त्याची लीला
सुखदुःखादिक भोग मोक्ष वा देत असे तो मनुजाला ॥ २ ॥
स्वस्थानासी कधिं नच सोडी परी मनानें वावरतो
दूतपाश पसरुनी करविं त्या सर्व कार्यभर आवरितो ॥ ३ ॥
गरुडपुराणचि दुजें असे हें जेल कायदा त्या म्हणती
स्केलकोष्टकें मांडुनि करिती पापापुण्याची गणती ॥ ४ ॥
उठबशा अंधारकोठडी दंड पाश फटके खोडे
प्रायश्चित्त प्रकार येथिल वर्णावे तितुके थोडे ॥ ५ ॥

* * * *

(८) भलाबुरा हा भेद न येथें एकतत्त्व कीं शिरगणती
धर्मजाति वा नीति सुजनता विवेक यांचा नच करिती ॥ १ ॥
न्यायदेवता अंध अशी ही त्रैलोक्यीं विख्याति असे
राव रंक समसमान ऐसा खासा अनुभव देत असे ॥ २ ॥
कोर्ट कायदा चाळण, तीच्या छिद्रांतुनि खालीं पडती
धान्य रजःकण रत्न मौक्तिकें एका मापामधिं भरती ॥ ३ ॥
खुनी डकाइत निपट भामटे ठग बदफैली कीं अमली
परोपकारी धार्मिक सात्विक जनतेचे किंवा वाली ॥ ४ ॥
सकल संग्रहीं यमप्रभूच्या भेदभाव नाहीं त्याला
श्यामकर्ण खर त्याच दावणीं कामधेनु नंदी ढवळा ॥ ५ ॥

---

इहलोकीं दरबार यमाचा अनुदिनिं कारागृहिं भरतो
पापपुण्य झडतिला निघोनी मनुज मोकळा तो होतो ॥ ध्रु ॥

## भाग ७ वा

# फर्ग्युसन कॉलेजची स्थापना

एल्एल्. बी. ची परीक्षा पास होतांच शिक्षणविषयक काम आरंभिण्याचें टिळकांनीं ठरविलें त्यावेळीं, त्यांच्या मनांत एकदमच एक खासगी कॉलेज काढावें असें होतें. पण हायस्कूल काढण्याइतकीहि मंडळी पहिल्या झपाट्यास मिळाली नाहींत, मग कॉलेज एकदम कसचें निघतें ? म्हणून कॉलेजच्या दुधाची हौस त्यांना आरंभीं शाळेच्या ताकावरच भागवून घ्यावी लागली. तथापि, कॉलेज काढण्याची त्यांची कल्पना समूळ जिरून गेली असें झालें नाहीं; उलट ती अनेक कारणांनीं वाढीसच लागली. कोल्हापूर प्रकरणामुळें टिळक-आगरकरांना प्रसिद्धि लाभली, सामान्य लोकांची सहानुभूति मिळाली, थोरामोठ्यांच्या ओळखी झाल्या, राजे रजवाड्यांकडून उदार आश्रय मिळण्याचा संभव दिसूं लागला. टिळकांमागून आगरकर, आगरकरांमागून आपटे, आपट्यांमागून गोळे, केळकर, धारप असे लायख होतकरू पदवीधर न्यू स्कूलला येऊन मिळाले. न्यू इंग्लिशस्कूलमधील विद्यार्थ्यांची संख्या भराभर वाढली. मॅट्रिक्युलेशन परीक्षेत पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचें प्रमाण इतर हायस्कूलच्या मानानें विशेष पडूं लागलें. जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळणें हा न्यू स्कूलचा मक्ता होऊन बसला. रिपनशाहींत उदार शिक्षणाची चलती झाली. हंटर साहेबांचें एज्युकेशन कमिशन बसून शिक्षणविषयक खासगी प्रयत्नांना सरकारी उदाराश्रय देण्याचें धोरण कायम झालें, शेवटीं न्यू स्कूलमध्यें एकत्र जमलेल्या तरुण विद्वानांनीं जन्मभर एकत्र राहून शिक्षणविषयक ध्येयच अनुसरण्याचें योजिलें; व डेक्कन एज्युकेशन सोसायटी ( दक्षिणहिंदुस्थान विद्याप्रसारक मंडळी ) बनविण्यांत येऊन तिचे तहाह्यात सभासद ठरले. यामुळें पुढची पायरी म्हणजे कॉलेज काढणें हीच होती; व १८८४ च्या अखेरीस कॉलेजची कल्पना फळाला आली.

टिळक न्यू इंग्लिश स्कूलांत शिक्षकाचें काम करूं लागले त्यावेळीं, शिक्षकांमध्यें उचनीच भेदभाव नसल्यानें, कोणी कोणच्या इयत्तेस काय शिकवावें याचा निर्बंधच नव्हता. अगदीं पहिल्या दुसऱ्या इयत्तेवर जाऊन एखादा तास घेण्याचें काम पडलें तरी कोणी हि तें हौसेनें करी. ती एक प्रकारची मौज किंवा भूषणच वाटे. तथापि ही सर्व मंडळी तरतरीत व होतकरू असल्यामुळें ते आपणांस न्यू इंग्लिश स्कूलचेहि 'प्रोफेसर' असें मानीत. याचा अर्थ असा कीं, आम्ही आज शाळा म्हणून काढली तरी तिनें आमच्या महत्त्वाकांक्षेचें समाधान व्हावयाचें नाहीं. आम्ही कॉलेज तर काढूंच, बी. ए., एम्. ए. च्या विद्यार्थ्यांना शिकवूंच; पण

युनिव्हर्सिटींत हि प्रवेश करून सुधारणांनीं ती हलवून सोडूं अशी उमेद त्यांना वाटत असे. 'कॉलेज सोडलें आणि कॉलेज काढलें' अशा शब्दांनीं व्यक्त करितां येण्यासारखी कामगिरी करावी, अशी जी टिळकांची हौस ती त्यांना प्रारंभीं दाबून धरावी लागली. पण शाळेच्या दुसऱ्या वर्षांतच मातबर पदवीधरांची इतकी भरती झाली कीं, कॉलेज काढणें ही गोष्ट तळहाताच्या मळासारखी वाटूं लागली. आपटे व टिळक यांचे संस्कृत व गणित हे दोन विषय तयार. आगरकर हे इतिहास व अर्थशास्त्र यांत निष्णात. चिपळूणकर यांचे इंग्रजी व संस्कृत दोन्ही विषय तयार असत. आपटे यांची इंग्रजी शिकविण्याचीहि तयारी होती. गोळे हे पदार्थविज्ञानशास्त्रांत एम्. ए. झालेले व केळकर हे इंग्रजींत निष्णात. अशी सर्व विषयांतील शिक्षकांची तयारी होती. सुदैवानें १८८२ सालीं लॉर्ड रिपन यांनीं नेमलेलें एज्युकेशन कमिशन फिरतीवर मुंबई इलाख्यांत आलें त्यामुळें या तरुण मंडळीच्या महत्त्वाकांक्षेला वाचा फुटण्याला मोठीच मदत झाली. कमिशनपुढें वामनराव आपटे यांनीं स्वतः सोसायटीचें जें उच्च ध्येय मांडलें व सामान्यतः सरकारी मदत घेणाऱ्या शिक्षणसंस्थांच्या हक्कांची जी बाणेदार वकिली केली तिचा परिणाम स्वतः कमिशनवर किती झाला हें, कमिशनचे अध्यक्ष सर वुइल्यम हन्टर यांच्या न्यू इंग्लिश स्कूलवरील अभिप्रायाचा उल्लेख मागील प्रकरणांत केला आहे त्यावरून दिसून येईलच. मुंबई युनिव्हर्सिटींतील प्रमुख लोकांवरहि तसाच परिणाम झाला. प्रिन्सिपॉल वर्डस्वर्थ, आक्झेन हॅम्, डॉ० मॉकिकन् वगैरे युरोपिन आणि भांडारकर, रानडे, तेलंग वगैरे हिन्दी विद्वानांवर न्यू स्कूलच्या मंडळींची इतकी छाप पडली कीं, कॉलेज काढण्याची परवानगी मागितल्यास त्यांची संमति मिळण्यास उशीर नव्हता. चिपळूणकर वारण्यापूर्वींच काशिनाथपंत तेलंग हे न्यू इंग्लिश स्कूल पहावयास आले होते व त्यांना हें दणदणीत हायस्कूल व त्याचे ते तरतरीत शिक्षक पाहून मोठें कौतुक वाटलें. आणि त्यांनीं या मंडळींत बोलून हि दाखविलें कीं, हायकोर्टांत वकिली करण्यापेक्षां या शाळेंत शिक्षक म्हणून येऊन राहिलों तर मला कितीतरी आनंद होईल. पण हें घडून न येण्याला त्यांच्या मार्गांत काय ती एकच नड होती. त्यांनीं मिळविलेल्या रुपयांचा पहिला लक्ष पूर्वींच भरून गेला होता; व दुसऱ्याची तेवढी अद्यापि भरती व्हावयाची होती!

एज्युकेशन कमिशनपुढें दिलेल्या साक्षींत आपटे यांनीं खालील मुद्यांवर जोर दिला होता. (१) शिक्षणाच्या सोई वाढविणें. (२) शिक्षण अधिक स्वस्त करणें. (३) सरकारी पद्धतीनें दिलें जाणारें शिक्षण सुधारणें. (४) खासगी शाळा शक्य तितक्या स्वतंत्र राहाणें. (५) सरकारची पैशाची मदत घेऊनहि शाळांची अन्तर्व्यवस्था खुली राहाणें. (६) शिक्षण इंग्रजीच्या ऐवजी देशी भाषांतून अधिक देणें. (७) शिक्षणाचे नमुने इंग्लंडहून न आणतां येथेंच बनविणें. (८) शिक्षणविषयक शालोपयोगी पुस्तकें इकडेच तयार करून तीं शिकविणें. (९) वरिष्ठ

शिक्षण हिन्दी लोकांच्या हातीं राहाणें. या सर्वांना मिळून त्यांनीं राष्ट्रीय शिक्षण हें नांव दिलें होतें. आपटे यांची कमिशनच्या सभासदांनीं उलट तपासणी घेतली त्यांत त्यांनीं वरील मुद्यांचें फार समर्पक रीतीनें समर्थन केलें. शिक्षणानें परक्या संस्कृतीचे पदवीधर निर्माण न करितां देशाभिमानी कर्ते पुरुष निर्माण करणें हेंच या राष्ट्रीय शिक्षणाचें ध्येय असून, अशा सुशिक्षित लोकांच्या हातून देशाचा सामाजिक व राजकीय दर्जा वाढेल व परिणामीं शांततेनें पण खात्रीनें राज्यक्रांति घडून येईल अशी त्यांची अपेक्षा होती. १८८३ सालच्या शाळेच्या रिपोर्टांत आपण कॉलेज वगैरे काढण्याकरितां १८८४ सालीं काय तजवीज करणार व १८८५ सालीं काय घडवून आणणार हें चालकांनीं निश्चितपणें लिहिलेलें असून या सर्वांचा हेतु खालीलप्रमाणें व्यक्त केला आहेः—

"We have undertaken this work of popular education with the firmest conviction and belief that of all agents of human civilization Education is the only one that brings about material moral and religious regeneration of fallen countries and raises them up to the level of most advanced nations by *slow and peaceful revolutions.*"

ता. २४ आक्टोबर सन १८८४ इसवी रोजीं सर वुइल्यम वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखालीं गद्रयांच्या वाड्यांत पुणें शहरांतील प्रमुख गृहस्थांची सभा भरली; तींत डेकन् एज्युकेशन सोसायटीची रीतसर स्थापना करण्यांत आली. प्रारंभीं वेडरबर्न साहेबांनीं 'न्यू स्कूलच्या' चालकांची योग्य स्तुति केल्यावर वामनराव आपटे यांनीं सोसायटीच्या स्थापनेचा ठराव पुढें मांडला. व त्यावेळीं त्यांनीं असें बोलून दाखविलें कीं, कॉलेज वगैरे काढण्याचा उपक्रम लोकांनीं द्रव्याची भरपूर मदत केल्याशिवाय होणार नाहीं; व लोकांनीं दिलेल्या पैशाचा योग्य तोच उपयोग होतो याची खात्री होण्याकरितां प्रतिष्ठित लोकांची व्यवस्थापक मंडळी असणेंहि जरूर आहे. ही मंडळी निवडण्याचा ठराव टिळकांनीं मांडला, त्या मंडळींत मंडलीक, वेडरबर्न, वर्डस्वर्थ, तेलंग, नारायणभाई दांडेकर, यशवंत मोरेश्वर केळकर इत्यादि गृहस्थ होते. तिसरा ठराव डॉ. भांडारकर यांनीं मांडला. तो मांडतांना ते म्हणाले कीं, 'सात निरपेक्ष व उदार अशा पदवीधरांनीं आपल्या छातीवर निग्रहानें शाळा स्थापून नांवारूपास आणली, व कर्तबगारीनें लोकांच्या उदार आश्रयास पात्र करून घेतली.' विशेषतः टिळकांसंबंधानें बोलतांना भांडारकर म्हणाले, "या सात गृहस्थांच्या अग्रभागीं एका फर्स्ट क्लास् एल्‌एल्‌ बी. चें नांव आहे. हा गृहस्थ या खासगी शिक्षणाच्या नादीं न लागता व स्वहिताकडे पाहून सरकारी नोकरी धरता तर रावसाहेब होऊन कोठें तरी चैनींत असता."
शेवटीं मंडलीक व वर्डस्वर्थ यांना ट्रस्टी नेमून व सोसायटीचे नियम मंजूर

करून सभा विसर्जन झाली. प्रारंभीच्या सात सभासदांत टिळक, नामजोशी, आपटे, आगरकर, केळकर, गोळे व धारप अशी मंडळी होती.

सोसायटीची स्थापना हा कॉलेजच्या स्थापनेचा पायाच होता. ४ वर्षेपर्यंत ' न्यू इंग्लिशस्कूल ' सारखी संस्था दणदणीत चालविल्यानें त्याच्या चालकांनीं कॉलेज चालविण्याची पात्रता उघडच सिद्ध केली होती ता. १३ फेब्रुवारी १८८४ रोजीं सर जेम्स फर्ग्युसन न्यू इंग्लिशस्कूल पहाण्यास आले तेव्हांपासूनच कॉलेजच्या कल्पनेस विशेष जोर आला होता, व पुढें एक वर्ष संस्थेला वर्गणीदार आश्रयदाते वगैरे जमविण्याच्या पूर्वतयारींत गेलें.

१८८४ च्या डिसेंबरच्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत मुंबई युनिव्हर्सिटीच्या सिंडिकेटनें सेनेट सभेला अशी शिफारस केली कीं, पुण्यांत नुकतीच स्थापन झालेली डेक्कन एज्युकेशन सोसायटी फर्ग्युसन कॉलेज काढणार आहे त्याला तीन वर्षें-पर्यंत पी. ई. च्या परीक्षेस उमेदवार पाठविण्याची परवानगी द्यावी; व तीन वर्षांत तें चांगल्या रीतीनें चालेल अशी सेनेटची खात्री झाल्यास युनिव्हर्सिटीनें हें कॉलेज निरंतरचें आपल्या पोटांत घ्यावें. ही आनंदाची वार्ता आगरकरांनीं खालील विनोदी शब्दांनीं केसरींतून जाहीर केलीः—" हें फर्ग्युसन कॉलेजचें गौड-बंगाल काय आहे तें लवकरच वाचकांपुढें आणण्याचा आमचा विचार आहे. पण त्या प्रसंगीं त्यांनीं व इतरांनीं खबरदार असावें, कारण ती हकीकत वाचल्या-बरोबर खिशांतील रुपये पटापट उड्या टाकून दक्षिण हिंदुस्थान विद्याप्रसारक मंडळीकडे येऊं लागले तर आम्ही जबाबदार नाहीं." याच सुमारास डेक्कन कालेजमध्यें लॉ क्लास निघण्याची परवानगी मिळून त्यावर माधवराव रानडे यांस कायद्याचीं व्याख्यानें देण्यास नेमलें. व हा क्लास खुद्द येरवड्यास डेक्कन कॉलेजमध्यें न भरतां येरवडा व पुणें यांचे दरम्यान ससून इस्पितळाजवळ कोठें तरी काढल्यास, डेक्कन कॉलेज-प्रमाणें फर्ग्युसन कॉलेजांतील विद्यार्थ्यांसहि या क्लासचा उपयोग होईल असें लोकमत प्रकट होऊं लागलें. म्हणजे फर्ग्यूसन कॉलेज निघण्याचें आधींपासूनच तें डेक्कन कॉलेजच्या बरोबरीनें आपला हक्क सांगूं लागलें.

ता. २ जानेवारी १८८५ रोजीं फर्ग्युसन कॉलेज उघडण्यांत आलें. कॉले-जांतील मुलांच्या संख्येच्या दृष्टीनें गद्रेवाडा सुरवातीस पुरेसा होता. होळकर-सरकारच्या कृपेनें गद्रेवाडा कायमचा मिळाला होता; तथापि कॉलेज अशा इमा-रतींत निरंतर ठेवणें सोईचें नव्हतें, म्हणून शक्य तर शनवारचा वाडा आपणांस कॉलेजकरितां मिळावा अशी सोसायटीनें सरकारकडे विनंति केली, व सरकार-नेंहि असें कळविलें कीं, वाड्यांतील जागा देऊं पण इमारत तुमची तुम्ही बांधून घ्यावी. पण पुढें शनवारवाड्याच्या जागेसंबंधानें सरकारांतून नकार येऊन त्याचे ऐवजीं बुधवारवाड्याची जागा देऊं करण्यांत आली. पुढें बुधवारवाड्याचे ऐवजीं नाना-वाडा तरी देण्यांत येणार होता. परंतु सोसायटीनें बुधवारवाड्याचीच जागा पसंत

केली. सुमारें सत्तर हजार रुपये जमविण्यांत आल होते. फरासखाना बुधवारवाड्याचे जागेंत सामील करून सोयीची इमारत बांधल्यास सुमारें दीड लाख रुपये लागतील असा अंदाज सुप्रसिद्ध इंजिनियर वासुदेव बापूजी कानिटकर यांनीं करून इमारतीचा नकाशा व बांधकाम करवून देण्याचेंहि कबूल केलें.

गुरुवार ता. ५ मार्च १८८५ चे दिवशीं सायंकाळीं कॉलेजच्या नवीन इमारतीची कोणशिला बसविण्याचा समारंभ मोठ्या थाटानें झाला. सबंध बुधवारच्या रस्त्यावर प्रचंड मंडप, दुतर्फा नक्षीचें काम, शुभ्र छत, जंगी हंड्याझुंबरें, बाहेर उंच कमान, सर्वत्र निशाणांची गर्दी, केळीच्या खांबांचीं लांबच लांब तोरणें, अशा रीतीनें रस्त्याचा दिवाणखाना बनवून दिला गेला होता. कॉलेजची प्रास्ताविक हकीकत सांगून झाल्यावर सर जेम्स फर्ग्युसन यांनीं चिपळूणकर, टिळक, आपटे, प्रभृति मंडळींचा मुद्दाम नामनिर्देश करून, व त्यांच्या देशाभिमानाची वाखाणणी करून, असें सांगितलें कीं, "ज्या जागेवर मी उभा आहें ती जागा या देशाच्या इतिहासांत फार प्रसिद्ध आहे. व ती तुमच्या सोसायटीला देऊन सरकारनें केवळ आपलें कर्तव्यच केलें." या समारंभाच्या आदले दिवशींच हुजूर पागेंतील मुलींच्या शाळेच्या नव्या इमारतीचा दगड बसविण्यांत आला होता. ही जागा श्रीमंत सांगलीकर यांची असून ती त्यांनीं फीमेल् एज्युकेशन सोसायटीला ९९ वर्षांच्या करारानें दिली होती. इंग्रजसरकार काय किंवा हिंदी राजेरजवाडे काय, दोघांनाहि लोकांना देण्यासारखी अशी देणगी सामान्य शिक्षणाहून दुसरी कांहीं राहिलीच नव्हती. मिरजेच्या खरे शास्त्र्यांनीं नाना फडणीसांचें चरित्र लिहिलें त्यांतील शेवटचें वाक्य असें होतें कीं, नाना फडणीस यांचा नातू हल्लीं सरकारी शाळेंत मॅट्रिक्युलेशनच्या वर्गांत आहे. इंग्रजांनीं पेशव्यांच्या प्रजाजनांना जणूं नामशेष झालेल्या बुधवारवाड्याची बखळ जागा परभाषा व परविद्या शिकविण्याकरितां द्यावी, या गोष्टींतील अपकर्षाचा ध्वनि, व खरे शास्त्र्यांच्या वरील वाक्यांतील अपकर्षक ध्वनि एकमेकांस जुळते नाहींत असें कोण म्हणेल! पण या बाबतींत सर्वांत सांगण्यासारखी गोष्ट ही कीं, फर्ग्युसन कॉलेजचा हा कोणशिला समारंभ फुकट गेला, व ही कोणशिला कांहीं वर्षांनीं उचलून चतुःशृंगीच्या मैदानांत नेऊन फिरून स्थापित करावी लागली!

पुढील थोडीशी हकीकत अलीकडे ओढून सांगावयाची तर ता. ११ जानेवारी १८९२ रोजीं सायंकाळीं फर्ग्युसन कॉलेजच्या पायाच्या दगडाचें स्थलान्तर गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांच्या हस्तें थाटानें करण्यांत आलें! पायाच्या दगडाला सुखहि नाहीं व दुःखहि नाहीं. पूर्वी त्याला समारंभानें बुधवार चौकांत बसविलें होतें तेव्हांहि समारंभाचा थाट, व आतां स्थलांतर झालें तरीहि थाट तसाच. दोन्ही वेळेला गव्हर्नरसाहेबांचा हात त्याला लागला. खालचे पाये वेगळे, गव्हर्नरांचे हात वेगळे, पण दगड तोच. संस्थांची परंपरा

अशानेंच अखंड राहले. १८९२ पासून फर्ग्युसन कॉलेजला बी. ए. चा वर्ग चालविण्याची परवानगी मिळून कॉलेज पूर्णतेस पोहोंचलें होतें. टिळकांनीं फर्ग्युसन कॉलेजचा त्याग केला होता, तथापि केवळ संस्थेविषयीं त्यांच्या मनांत वांकडें असण्याचें कारण नव्हतें; व तसें वांकडें नव्हतेंहि. १२ जानेवारी १८९२ च्या केसरींत टिळक लिहितात, "चतुःशृंगीच्या मैदानांत इमारत उभी झाली म्हणजे कॉलेजास त्याच्या योग्यतेप्रमाणें सत्तेचें घर होईल. व ज्या पायावर न्यू स्कूल, फर्ग्युसन कॉलेज या दोन संस्था रचल्या आहेत तो पाया दिवसानुदिवस दृढतर होऊन गव्हर्नरसाहेबांनीं सांगितल्याप्रमाणें या दोन्ही संस्थांच्या चालकांच्या निरपेक्ष बुद्धीचीं व मेहेनतीचीं फळें महाराष्ट्रदेशभर सर्वत्र दृष्टीस पडतील. कॉलेजच्या चालकांची ही इच्छा पुरी होऊन नेटिवांनीं चालविलेल्या या संस्थेचा व त्याबरोबर तिच्या चालकांच्या सद्धेतूंचा उत्कर्ष होवो असें आम्ही इच्छितों."

फर्ग्युसन कॉलेज सुरू होतांच त्याचा बस फार चांगला बसला. प्रथम फक्त प्रीव्हियसच्या वर्गाला परवानगी मिळाली. शिक्षकांच्या बाबतींत या मंडळीला अडविणें युनिव्हर्सिटीला शक्य नव्हतें. दुसरी अडचण जागेची. पण सातव्या इयत्तेच्या चार चार, पांच पांच, तुकड्या जेथें चालविल्या जातात तेथेंच पी. ई. चा म्हणजे आठव्या इयत्तेचा एक वर्ग चालविण्यास काय हरकत? कोणत्याहि संस्थेला एकदम स्वतःची मोठी इमारत बांधतां येणें शक्य नाहीं हें युनिव्हर्सिटीला माहीत असल्यानें न्यू स्कूलच्या जागेंतच कॉलेजचा क्लास काढण्यास परवानगी देण्यांत आली, व गद्रे वाड्यांतील सुरूच्या दालनांतील मुख्य दिवाणखान्यांत हा वर्ग भरूं लागला. कॉलेजवर देखरेख करणारें एक मंडळ पाहिजे अशीहि एक अट घालण्यांत आली होती; पण भांडारकर, ऑक्झेनहॅम सारखे लोक बोर्डाचे सभासद व्हावयास प्रथमच मिळाल्यानें तीहि अडचण दूर झाली.

गद्रेवाडा हा पुण्यांतील पेशवाईच्या काळचे प्रसिद्ध सावकार गद्रे यांचा होय. पुढें तो गायकवाड सरकारांनीं विकत घेतला. न्यू इंग्लिश स्कूल या वाड्यांत जाण्याचे वेळीं तो श्रीमंत जमनाबाई राणीसाहेब यांची मुलगी तारा बाबा (सावंतवाडीचे संस्थानिक यांना दिलेली राजकन्या) यांच्या नांवावर होता. तो वाडा मिळविण्याची कामगिरी शाळेमार्फत टिळकांकडे सोंपविण्यांत आली होती. ज्यांचे नांवावर वाडा होता त्यांना स्वतःला त्याची गरज नव्हती. परंतु एकास गरज नसलेल्याहि जिनसा त्यांची गरज असलेल्या दुसऱ्यांना सहजासहजीं मिळूं शकत नाहींत. म्हटलें तर काम क्षुल्लक पण तें करण्याला टिळकांना दोन तीन महिने पायपिटी करावी लागली. वाडा खरेदी देण्यास जमनाबाईसाहेबांची संमति मिळाली म्हणजे मग त्यांच्या मुलीची मिळणार, व स्वतः जमनाबाईसाहेबांची संमति मिळण्याला त्यांना ज्यांचा सल्ला पटेल असा खासा मनुष्य मिळावयास पाहिजे! हा मनुष्य हस्तगत होण्याला सातारा जिल्ह्यां-

तील माण तालुक्यांत टिळकांना कित्येक दिवस मुक्काम करावा लागला. लहरी बिनमुर्वतखोर लोकांच्या हातून काम व्हावयाचें तर तें त्यांच्या छंदानेंच घ्यावें लागतें; व माण तालुक्यांतील या गृहस्थांकडून काम करवून घेण्यास बरेच दिवस तळ देऊन एकाद्या परराष्ट्रीय राजकारणाप्रमाणें टिळकांना धिम्मेपणानें वकिली करावी लागली. हें झाल्यावर ते वडोद्यास गेले व तेथून कागदपत्र घेऊन सावंतवाडीस जाऊन वेंगुर्ल्यांवरून पुण्यास परत आले. गद्रे यांचा व शेजारचा होळकर यांचा वाडा मिळून शाळा व कॉलेज यांचें काम तूर्त भागल्यासारखें होतें. पी० ई० चा वर्ग बसे तो दिवाणखाना मेहरपींचा होता तरी पण त्यांत भरपूर उजेड नसे व हल्लीं ज्या प्रकारच्या इमारती कॉलेजांना सामान्यतः लाभतात त्या मानानें पाहातां फर्ग्युसन कॉलेजला लाभलेली जागा फारशी स्फूर्तिदायक नव्हती.

पण कॉलेजच्या विद्यार्थ्यांना शिकविणारे शिक्षक मात्र स्फूर्तिदायक होते यांत शंका नाहीं. आपट्यांचें शिकविणें मोठें टापटिपचें असे. ते वर्गांत बसले असतां कोणी हूं का चूं करीत नसे. त्यांचें बोलणें किंचित तोंडांतल्या तोंडांत व बोबडें असे तरी त्यांची पद्धत ऐटदार, आढ्यताखोर असल्यामुळें मारदस्तपणा येत असे. कोणीहि विद्यार्थी त्यांच्याशीं लगट करूं शकत नसे. अवांतर विषय बोलून ते एक क्षणहि फुकट घालवीत नसत; व विद्यार्थ्यांना नेमकीं उपयोगीं पडतील अशीं टिपणें ते देत असत. गोखले यांना नुकती मिसरूड फुटूं लागली असून त्यांचा गौरवर्ण कोवळा चेहरा व विनयशीलता यांचा परिणाम त्यांच्या शिक्षणाबरोबर मुलांच्या मनांवर अनुकूल होई. वर्गांतील मुलांत मूल म्हणून शोभून जाण्यासारखे असतां ते प्रोफेसर होऊन मुलांस शिकवितात याचें विद्यार्थ्यांना मोठें कौतुक वाटे. टिळक हेहि वर्गांत अत्यन्त मितभाषणी असून विषय सोडून अवांतर शब्दहि बोलत नसत. वस्तऱ्याच्या धारेप्रमाणें त्यांच्या बुद्धीची तीव्रता हजरजबाबीपणांत व कोणत्याहि शंकेचें बरोबर निराकरण करण्यांत विद्यार्थ्यांना दिसून येई. प्रो. केळकर यांची पद्धति आपट्यांप्रमाणेंच असे. पण त्यांच्या व्याख्यानाची गाडी बरीच जोरानें धावे. त्यांना शंका विचारण्यास मुलें फारशीं धजत नसत; कारण शंका विचारणाऱ्या मुलावर तुटून पडून त्याचाच प्रथम पाणउतारा करण्याची त्यांना किंचित् लकब असे. त्यांचे डोळे टपोरे व गरगरीत असून त्यांत किंचित् तांबुसपणाची झांक येत असल्यानें ते ज्याकडे रोखून पहात तो विद्यार्थी खंबीर नसला तर भेदरूनच जावयाचा. गोळे हे बरेच बोबडे व अडखळत बोलत. त्यांना विषयाचें ज्ञान चांगलें असे परंतु केळकरांच्या मेलट्रेनच्या पुढें गोळ्यांचें व्याख्यान हें दर स्टेशनावर थांबत जाऊन कशी तरी मजल गांठणाऱ्या शुद्र ट्रेनप्रमाणें वाटे. आगरकरांच्या वर्गांत मात्र विद्यार्थ्यांना घरीं बसल्यासारखें वाटे. त्यांचा चेहरा प्रशांत असून त्यांच्या तोंडावर हसरेपणाची स्वाभाविक झांक असे. आणि मुद्दाम गांभीर्य आणण्याकरितां ते डोळे मिटीत किंवा वर चढवीत तेव्हां-

हि पण विद्यार्थी मनांत समजे कीं हा गंभीरपणाचा निव्वळ बहाणा आहे. त्यांना दम्याचा विकार असल्याकारणानें शिकवितांना वरचेवर खोकला येई व विद्यार्थ्यांच्या अज्ञानाविषयीं जेव्हां ते अनुकंपा दाखवीत तेव्हां शिक्षकामध्येंहि प्रकृतीच्या दृष्टीनें अनुकम्पा वाटण्यासारखें कांहीं आहे असें विद्यार्थ्यांना वाटून दोघेहि क्षणभर समानधर्म होत. आगरकरांचें शिकविणें विद्यार्थ्यांना पटण्यासारखें पण पाल्हाळिक असे. त्यांना आठवण झाली म्हणजे कोणत्या विषयांत काय बोलतील व फटकळपणानें काय दाखला देतील याचा नियम नसे. पुढें भांडणें माजल्यावर आगरकर जेव्हां " तुम्ही वेळेवर वर्गावर जात नाहीं " असा दोषारोप टिळकांवर करीत तेव्हां टिळकहि त्यांना उत्तर देत कीं, " तुम्ही वर्गावर नेमके वेळेवर जात असाल, पण भाकडकथा सांगण्यांत वेळ दवडतां तसा मी दवडीत नाहीं. तुम्ही तासभर शिकविलें व मी पाऊणतास शिकविलें, दोन्हींचीहि बेरीज बरोबरच." तात्पर्य, कॉलेजांतील प्रत्येक शिक्षकाची पद्धत वेगळी असली तरी विषयज्ञानाच्या दृष्टीनें प्रत्येकजण विद्वान् व प्रोफेसरीच्या कामाला योग्य असाच होता.

कॉलेजमध्यें टिळकांनीं गणित व संस्कृत दोन्ही विषय चांगले शिकविले. फळ्याकडे कधीं न जातां तोंडानें उदाहरणें सोडविणें हें कदाचित् खालीं शाळेच्या वर्गांत पटण्यासारखें होतें; पण या खोडीमुळे कॉलेजच्या वर्गांतील सामान्य विद्यार्थ्यांची कुचंबणा होई. संस्कृत विषयांतलि मेघदूत व भर्तृहरीचें नीतिशतक हीं पुस्तकें ते शिकवीत व तीं फार मार्मिकपणें शिकवीत असें सांगतात. टिळकांच्या लेखांशीं निकट परिचय असणाऱ्याला त्यांना गीतेखालोखाल भर्तृहरीच्या नीतिशतकांतील अवतरणें सुचत असें आढळून येईल.

कॉलेज सुरू झाल्यापासून पुढें दोन वर्षांच्या आंतच त्याजवर एक इष्टापत्ति कोसळली. ती अशी कीं, फर्ग्युसन कॉलेजची मंडळी हुशार तरतरीत व कॉलेजसारखी संस्था चालविण्यास योग्य असें पाहून, तो उदारमतवादित्वाचा मनु असल्यामुळें, मुंबई सरकारच्या मनांत असें आलें कीं, डेक्कन कॉलेज ही संस्था फर्ग्युसन कॉलेजच्याच लोकांच्या हातीं द्यावी. पण उदारमतवादित्वांत कांहीं अनिष्ट हेतूंचीहि भेसळ होती. ती अशी कीं डेक्कन कॉलेज हें एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यांत देऊन सरकारास आपला कांहीं खर्च वांचवावयाचा होता. ही बचत आपण प्राथमिक शिक्षणावर खर्च करूं असें सरकार म्हणत होतें; कदाचि त्यानें तसें केलेंहि असतें. पण येथें दुमतास थोडीशी जागा होती. प्राथमिक शिक्षणाप्रमाणेंच वरिष्ठ शिक्षण देण्याची जबाबदारीहि सरकारावरच आहे कीं नाहीं? त्यावेळचें सरकार म्हणे, " फारशी नाहीं " व बरेच लोक म्हणत, "आहे, सगळी तुमच्यावर आहे." कसेंहि असो, इतकें निश्चित आहे कीं, मुंबईसरकारनें आपण होऊन डे. ए. सोसायटीशीं असें बोलणें लाविलें कीं दोन्हीं कॉलेजें

तुम्ही चालवा; व त्याबद्दल तुम्हाला सालीना सुमारें २३ हजार रुपये ग्रँट देऊं.

डे. ए. सोसायटीनें ही व्यवस्था मान्य करावी म्हणून त्याबरोबरच सरकारनें अशी दहशत ध्वनित केली कीं, गुजराथ व सिंध येथील कॉलिजांना मदत करणें सरकारला अवश्य असल्यामुळें, व डेक्कन् कॉलिज हल्लींच्या खर्चानें चालवून शिवाय या दोन कॉलिजांस मदत करण्याइतका पैसा सरकारजवळ नसल्यामुळें, कदाचित् सरकारला डेक्कन् कॉलिज बंदच करावें लागेल. वास्तविक डेक्कन् कॉलिज हातीं घेण्याचा मूळचा इरादा किंवा महत्त्वाकांक्षा सोसायटीला नव्हती. तथापि डेक्कन् कॉलिज आपल्या हातीं घेतल्यानें तें जुनें संस्थान बुडणार नाहीं; फर्ग्युसन् कॉलिज हें नवें व अपुरें असल्यामुळें तेंच एक वेळ बुडलें तरी चालेल; शिवाय तें बुडलें तरी त्याच कॉलिजच्या चालकांच्या हातांत डेक्कन् कॉलिज आल्यास, नेटिव लोक वरिष्ठ शिक्षणाची संस्था स्वतंत्र रीतीनें चालवून यशस्वी करूं शकतात हें जगाला दाखविण्याची संधि हवी ती अनायासानेंच मिळणारी होती; इत्यादि विचारानीं सोसायटीच्या लोकांनीं प्रथम मुंबई सरकारच्या योजनेस मान्यता दर्शविली. खरोखरच मोठ्या उमेदीची अशीच ती गोष्ट होती. हें सर्व घडून येतें तर बारा वर्षांपूर्वी जेथें विद्यार्थीपणाचे खेळ टिळक खेळले तेथें प्रिन्सिपॉल किंवा व्हाइस् प्रिन्सिपॉल म्हणून टिळक वावरले असते !

पण या योजनेला दोन गंडांतरें उत्पन्न झालीं. न्यू इंग्लिश स्कूलच्या तरुण चालकांविषयींची संशयबुद्धि व तुच्छतेची भावना निघून गेली होती; तथापि ही तरुण मंडळी आपल्या स्वतंत्रतेच्या बाण्यामुळें जुन्या पुढाऱ्यांना डोईजड होणार असें वाटूं लागलें होतें. डेक्कन् कॉलेजहि त्यांचे हातीं गेल्यास त्यामहत्त्वाच्या संस्थेमुळें यांच्या महत्त्वांत उलट भरच अधिक पडणार हें त्यांस खपेना. कांहीं लोकांच्या डेक्कन् कॉलेजविषयींच्या फाजील अभिमानास याच वेळीं उकळी फुटली. त्यांचें म्हणणें, नेटिव लोकांच्या हातीं कॉलिज जाणें म्हणजे काय गोष्ट आहे ! तेथें पूर्वीसारखे युरोपियन प्रोफेसर महादेवाप्रमाणें वरिष्ठतेनें नांदले पाहिजेत; व शेवटीं कायद्याच्या तक्रारीचीहि वाण पडूं नये, म्हणूनच कीं काय, सर जमशेटजी जीजीभाई हे पुढें येऊन म्हणूं लागले कीं, "माझ्या बापजाद्यांनीं डेकन कॉलिजच्या इमारतीकरितां लाखों रुपये दिले ते हें कॉलिज सरकारी राहील म्हणून. कॉलिज खासगी केल्यानें मृत देणगीदाराचा विश्वासघात होतो." शेवटीं किमानपक्ष म्हणून असें सुचविण्यांत आलें कीं, फर्ग्युसन कॉलिजच्या लोकांच्या हातीं डेक्कन कॉलेज द्यावयाचें तर निदान दोन प्रोफेसर गोरे असावे. नाहींतर सर्व बुडेल ! अखेर सरकारनें दुरुस्त सूचना म्हणून अशी पुढें आणली कीं, डेकन कॉलिजच्या व्यवस्थेकरितां एक स्वतंत्र बोर्ड करावें. तें डे० ए० सोसायटीचाच एक भाग असें मानावें. त्यांत सोसायटीचे ५।६ व सरकारचे तीन प्रतिनिधि असावे. सर्व सांपत्तिक जबाबदारी सोसायटीनें सांभाळावी. सरकारनें दोन युरोपियन प्रोफेसरांच्या निम्या पगाराकरितां

म्हणून दहा हजार रुपये, व इतर दहा हजार मिळून सालीना २० हजार रुपये ग्रँट द्यावी. तीन हजार रुपये स्कॉलरशिपचे ठरले त्यांतून एक हजार रुपये पारशीकरितां ठेवावे. तांव डेक्कन कॉलेजांत पी. ई. चा वर्ग ठेवूं नये, तो गावांत ठेवावा. बाकीचे वर्ग कॉलेजांत न्यावे. डेक्कन पण ही व्यवस्था सोसायटीस सर्व दृष्टींनीं अनिष्ट वाटून अखेर त्यांनीं ती नाकारली. कारण मिश्र बोर्ड चांगलें नांदणार नाहीं. दोन युरोपियन प्रोफेसर संस्थेमध्यें अरेराव होणार निदान भांडणें करणार. मिशनरी कॉलेजसारखे होऊन सरकारचा अधिक ताबा सोसायटीवर चालणार, शिवाय व्यवस्था चांगली चालली तर युरोपियन लोकांनाच श्रेय मिळणार. तात्पर्य, सोसायटीवर खरा विश्वास असेल तर सर्व कॉलेज व भरपूर ग्रँट बिनशर्त द्या, नाहींतर आम्हास कॉलेज नको, असें म्हणून सोसायटीनें सरकारी योजनेस नकार दिला. हें पाहून सरकारनेंहि असें जाहीर केलें कीं, पूर्वी फर्ग्युसन कॉलेजला विशेष मदत देण्याची जीं अभिवचनें दिलीं गेलीं तीं सर्व रद्द समजावीं. यावर केसरीनें अखेर टीका केली कीं, "डेक्कन कॉलेज दिलें नाहीं तर नको. पण फर्ग्युसन कॉलेज पुढें मागें टक्कर मारण्यास आमच्या पुण्यग्रामीं उभें खास राहाणार ! " व अखेर हें भविष्य खरें ठरलें ही गोष्ट अनुभव-सिद्धच आहे.

भाग ८ वा

# टिळक विरुद्ध आगरकर

टिळक-आगरकर हे न्यू इंग्लिश स्कूलांत आले ते येतांना सामाजिक बाबतींतला आपला मतभेद आपल्या बरोबरोबरच घेऊन आले. किंबहुना न्यू स्कूलांत येण्यापूर्वी डेक्कन कॉलेजांत विद्यार्थी असतांनाच त्यांच्यामधील हा मतभेद प्रगट झाला होता, हें भाग २ च्या परिशिष्टावरून दिसून आलेच असेल. प्रथम हे मतभेद विकोपास गेले नाहींत. केसरी हें एकच पत्र असलें तरी त्यांत लिहिणारे लोक अनेक आहेत हें सर्वांना कळून चुकलें होतें. वाचक वर्गाप्रमाणें लेखक वर्गहि सहिष्णु असून परस्परांच्या मताविरुद्ध कांहीं लेख केसरी—मराठ्यांत आल्यास त्याबद्दल त्यांना कागाळी करितां येत नसे, व ते करीतहि नसत. या सहिष्णुतेस एका शहाणपणाच्या योजनेनें चांगला वाव मिळाला होता. ती योजना अशी कीं, एखाद्या लेखकास एखाद्या विषयावर सर्वसामान्य अशा मतास सोडून जाणारे, किंवा अत्युत्कट, विचार व्यक्त करावयाचे असल्यास त्यानें ते आपल्या सहीवर लिहावे; किंवा सही न घातल्यास ' लिहून आलेला मजकूर ' या व्यापक सदराखालीं ते छापावे; म्हणजे भाषा विचारसरणी यावरून लेख कोणाचा हें प्रायः वाचकांस उमजून येऊन, स्वमतप्रकाशनाचें श्रेय व्यक्तिमात्रास मिळेल; शिवाय संपादकीय धोरणाला चित्रविचित्रत्वाचें किंवा चंचलतेचें दूषण लागणार नाहीं. माधवराव गोळे वगैरे गृहस्थ असे प्रच्छन्न लेख मोठ्या आवडीनें लिहीत. प्रायः केसरीशीं त्यांचीं मतें जुळत, व तीं न जुळत तेव्हां ते उपरिनिर्दिष्ट सवलतीचा फायदा घेत. पण गोळे हे केसरीचे संपादक केव्हांहि नसल्यानें त्यांना आपल्या मताचा हेका चालविण्याचा हक्क हि नव्हता.

पण आगरकरांची गोष्ट वेगळी होती. ते स्वतः संपादक असल्यामुळें मतभेदाची अडचण त्यांना फार भासली. आपली मतें लिहावीं तर न्यू स्कूलांतील आपले समान अधिकारी लोक नाखुष होणार. त्यांची मतें लिहावीं तर तीं गोष्ट स्वतःच्या विवेक-बुद्धीला नापसंत. लिहून आलेला मजकूर म्हणून आपला लेख घालावा तर आपल्याच घरांत हवें तसें बसण्या उठण्याच्या चोरीची लाज वाटावी. आणि स्वतःच्या सहीवर लेख प्रसिद्ध करावा तर स्वतः घरधनी असतां आपण आपल्यालाच भाडेकऱ्याप्रमाणें भाडेचिठ्ठी लिहून देण्याचा प्रसंग ! पण न्यू स्कूलच्या मंडळींत सामाजिक बाबतींत प्रायः टिळकांच्याच बाजूचें बहुमत असे, आणि आगरकर हे केसरीचे संपादक होते तरी त्यांच्या एककली विचारांचा जाच इतरांना दुःसह होत असे यामुळें आगरकरांना लवकरच पडतें घ्यावें लागले.

१८८१ साल केसरीचें पहिलें व कौतुकाचें म्हणून निभावलें. शिवाय विष्णुशास्त्री हे सर्वांत वडील व प्रौढ असल्यानें त्यांचेंच धोरण चाललें. शास्त्रीबोवा व टिळक यांच्या दरम्यान सामाजिक बाबतींत हि फारसा मतभेद नव्हता. १८८२ साल कोल्हापूरप्रकरणाच्या धामधुमींत गेलें. परराज्याशीं लढाई सुरू असतां स्वराज्यांतील लोकांत बहुतकरून एकी नांदते ही गोष्ट अनुभवसिद्धच आहे. १८८३ साल कांहींसें स्वास्थ्याचें गेलें व यासालीं 'न्हाणवलीचा शास्त्रदृष्ट्या विचार ' 'धर्मांशा पाळण्याची मर्यादा ' वगैरे विषय केसरींत आले तरी, रिपनशाहीचा ऐन अम्मल चालू असल्यामुळें, प्रातिनिधिक राजसत्ता, स्थानिक स्वराज्य, इल्बर्ट बिल, आयर्लंड वगैरे राजकीय विषयांनाच अधिक महत्त्व आलें होतें. न्हाणवली या विषयारील निबंधांत एवढेंच प्रतिपादन केलें गेलें होतें कीं, गर्भदान संस्कार हा वैकल्पिक आहे, मूलांत प्रचलित पद्धतीचा गर्भदान संस्कार दिलेला नाहीं, म्हणून तो संस्कार कमी केला तरी वैदिकधर्माविरुद्ध आचरण होत नाहीं. निदान पुण्यांत चालू असलेली न्हाणवलीची मिरवणूक बंद करण्यास तरी कांहींच प्रत्यवाय नाहीं. हा लेख टिळकांचा होता असें समजतें.

पण अशा विचारसरणीनें सुशिक्षितांत तट पडण्याचा संभव नव्हता. या विषयावरील शेवटल्या लेखाच्या शेवटीं लेखकानें स्पष्ट सांगितलें आहे कीं, केसरीचें सामाजिक धोरण मध्यम प्रतीच्या उदारमतवादित्वाचें राहणार. केसरी लिहितो " उगाच धर्माची उठाठेव करून लोकांचीं मनें दुखविण्याचा केसरीचा इरादा नाहीं. ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज वगैरे भानगडींत तो आपण होऊन पडूं इच्छित नाहीं. तथापि व्यवहारावर लिहिणें आपलें कर्तव्य आहे असें त्यास वाटतें. म्हणून जेव्हां एखादी चाल निरर्थक व ग्राम्य असून तिचा धर्माशीं अज्ञानानें उगाच संबंध जोडलेला असतो ( अशा चाली बऱ्याच आहेत व त्यांचा सवडीनुसार विचार करण्याचा आमचा मानसहि आहे ) तेव्हां त्यांतील बिंग बाहेर काढण्यास तो कधींहि मागें पुढें पाहाणार नाहीं. मग तेवढ्याकरितां धर्मावर लिहावयास लागलें तरी हरकत नाहीं. गर्भदानासारखी शुष्क, निरर्थक, ग्राम्य व आपल्या हातांतील चाल जर आम्हांस सोडवत नाहीं तर बालविवाह वगैरे घोर चाली कशा सुटणार ? असल्या विषयावर निबंध लिहून त्याचें खरें स्वरूप लोकांपुढें आणणें हें केसरी आपल्या कर्तव्यापैकींच समजतो. व मग त्यावर मनमुराद तोंड सोडण्यांतच ज्यांस पुरुषार्थ वाटतो ते आपली मनीषा यथावकाश, यथाशक्ति सुखेनैव पूर्ण करोत. केसरी आपले समजाप्रमाणें आपलें काम बजावील. " अनुहुंकुरुते घनध्वनिम् न हि गोमायुरुतानि केसरि । "

आमच्या मतें वरील लहानसा उतारा केसरीच्या सामाजिक व धार्मिक विषयांतील अनादि धोरणासंबंधानें फारच समर्पक आहे. तो असा कीं, सामान्य सुशिक्षित वर्गाच्या धोरणाप्रमाणेंच केसरीलाहि धर्मशास्त्र, रूढ असा चालीरीति,

आणि व्यवहार या सर्वांविषयीं तात्त्विक चर्चा करून व धर्मशास्त्राचें खरें शिक्षण देऊन उचित व्यवहाराची दिशा दाखविण्याची इच्छा होती; पण सुधारणेचें हें सर्व काम त्याला उपदेश व शिक्षण यांच्या सहाय्यानेंच साधावयाचें होतें. हें कार्य करीत असतां एकांतिक मताच्या जुन्या पिढीशीं जरी केसरीला वाद घालावा लागला व टीका सहन करावी लागली तरी त्याला केसरीची तयारी होती; पण दुसरे पक्षीं ज्या कोणत्या गोष्टी केसरीस करावयाच्या नव्हत्या त्याहि स्पष्टपणें सांगणें जरूर आहे. उदाहरणार्थः—शिक्षण देऊन लोकांचीं मनें केसरीला उदार बनवावयाचीं होतीं याचाच अर्थ, केसरीला उदारमतवादित्वाच्या सिध्यर्थ परक्यांची, विशेषतः सरकारी कायद्यांची वगैरे, मदत घ्यावयाची नव्हती. तसेंच धर्मचर्चा करून रूढी व शास्त्र यांच्यांतील मतभेद दर्शवून सारासार विचार प्रवर्तित करण्याचा जरी केसरीचा इरादा होता तरी केसरीला नवीन धर्म किंवा धर्मपंथ स्थापन करावयाचे नव्हते, तर सनातन धर्माविषयींचा अभिमानच दृढ करावयाचा होता.

हीं मतें एकट्या टिळकांचींच होतीं असें नसून न्यूस्कुलांतील बहुमत त्यांच्या बाजूचें होतें. पण आगरकर हे मात्र एकान्तिक मताचे अभिमानी आणि मनास रुचेल तें बोलणारे अशा बिनतोडीच्या मार्गाचे असल्यामुळें तेच तेवढे फुटून वेगळे पडत. १८८३ सालचें केसरीचें फाइल चाळलें असतां सामाजिक, किंवा ज्याला सुधारकी म्हणतां येईल अशा, अनेक विषयांवर निबंध प्रसिद्ध झालेले त्यांत आढळतील. परंतु १८८४ सालीं न्यू स्कूलच्या मंडळींतील सामाजिक मतभेदाची कुरबूर प्रथम बाहेर उमटूं लागली. त्याचें निमित्त कारण बालविवाहाच्या प्रतिबंधास सरकारी कायद्याची मदत घ्यावी कीं नाहीं, हा प्रश्न पुढें आला हें होय. मुंबईचे मलबारी शेट यांनीं अस्तिपक्षीं वाद सुरू केला; व सरकार दरबारीं त्यांचा प्रवेश असल्यामुळें सरकार कायदा करतें कीं काय अशी भीति खरोखरच लोकांना पडली; तेव्हां या वादास विशेष जोर आला. मलबारी शेटजींचें असें म्हणणें कीं, होतें "बालविवाह बंद होण्यास अल्पवयांत लग्न झालेल्या मुलाला युनिव्हर्सिटीच्या परीक्षेस बसूं देऊं नये, तसेंच कोणत्याहि सरकारी खात्यांत त्याला नोकरी देऊं नये, व याच्याहि उपर सरकारानें कायदा करून ही चाल थांबवावी." या विषयावर केसरीला लिहिण्याची वेळ आली तेव्हां पंचाईत पडली. सुधारकवर्गांतहि एका बाजूस रानडे कुंटे, मोडक तर दुसऱ्या बाजूस तेलंगप्रभृति मंडळी अशी दुही माजली. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत जो एक लेख प्रसिद्ध झाला त्यांत तर धेडगुजरी विचार प्रगट झाले. यालाच अनुसरून केसरीच्या लेखांतहि दुमत दिसूं लागलें. ता. १८ नोव्हेंबर १८८४च्या केसरींत तेलंगांना अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही बाजू मांडलेल्या असून, २५ नोव्हेंबरच्या केसरींत तर "बालविवाहाचा निषेध

कायद्यानें करावा किंवा नाहीं याविषयीं आम्हीं स्पष्टपणें कांहींच सांगत नाहीं" असें म्हटलें आहे.

केसरीनें कायदेवाल्यांची तशीच बिनकायदेवाल्यांची बाजू सविस्तर मांडण्यांत अनेक अंक घालविले. ता. २ डिसेंबरच्या अंकांत तर 'कायदा-पक्षावलंब करणाऱ्या आमच्या मित्रद्वयांचें म्हणणें असें आहे' असें वर लिहून एक लेख नुसत्या अवतरण चिन्हांतच पत्रकर्त्यांच्या स्फुटसूचनेखालीं देण्यांत आला! अखेर ही कुचंबणा ता. १६ डिसेंबर १८८४ च्या अंकांत, केसरीकर्ते आगरकर यांनीं आपलीं व्यक्तिशः मतें आपल्या सहीनिशी लिहिल्यानें संपली. या लेखांत आगरकर लिहितात, कीं बालविवाह बंद करण्याकरितां सभा वगैरे स्थापणें हा विचार कुचकामाचा ठरतो. रॉबर्ट नाईट यांच्या लेखावरून प्रतिबंधक कायद्याची कल्पना आपणांस सुचली, पण आपल्या मित्रांना ती पसंत पडेना तेव्हांपासून आजपर्यंत तीन वर्षें या प्रश्नाची चर्चा होत आहे. 'मलबारी शेट यांनीं हा वाद उपस्थित केल्यापासून मंडळी चिथरून गेली आहेत म्हणून आपलें मत स्पष्ट लिहिण्याची जरूरी प्राप्त झाली.'

यावर कोणी म्हणेल कीं, आगरकर हे स्वतः केसरीचे संपादक असतां त्यांनीं आपल्याच पत्रांत आपल्याच सहीनें लेख कां लिहावा? यावर आगरकरांनीं असें उत्तर दिलें कीं, "नांव घालून लेख छापण्यांत कांहीं मातब्बरी आहे असें आगरकरांना बिलकूल वाटत नाहीं. पण बालविवाहाच्या निषेध-साधनाविषयीं त्यांचे आणि त्यांच्या मित्रांचे विचार जुगत नसल्यानें त्याना या मार्गाचें अवलंबन करावें लागत आहे. माझ्या जिवलग मित्रांनीं, आम्ही आरंभिलेल्या समाईक उद्योगाची जबाबदारी प्रत्येकाकडे थोडथोडी वांटून देण्याचा ठराव करून, माझ्या माथ्यावर केसरीचें प्रकाशत्व ठेविलें, त्यामुळें महत्त्वाच्या प्रश्नावर केसरी एडिटोरीयल कॉलमखालीं जे अभिप्राय यावयाचे ते अर्थात् मला पसंत असून, निदान त्यांतील बहुतेकांस तरी पसंत असले पाहिजेत, व शेंकडा ९९$\frac{3}{4}$ बाबतींत असतात. पण या बाबतींत माझा बाकीच्यांशीं चार आण्यांचा विरोध आहे व तो आम्हां उभयतांसहि फार महत्त्वाचा वाटत आहे. आतांपर्यंत मंडळींवर माझे विचार न लादतां या विषयाच्या संबंधानें जितके लेख लिहवले तितके लिहिले. पण अलीकडे या वादानें पुण्यांत फारच उचल खाल्ली असल्यानें, मंडळीसाठीं दबून दबून लिहिण्याचा क्रम सोडून एकवार मोकळेपणीं कायद्याची बाजू दाखवावी अशी माझी इच्छा आहे. उलटपक्षास 'मराठ्या' सारखे रथी महारथी धनुष्यें सज्ज करून बाणावर बाण सोडीत आहेत. लवकरच केसरीराजाहि आपल्या पंजांत सांपडलेल्या आपल्या वर्गीयांवर चाल करून जाणार आहे. अशा निकराच्या माऱ्यांतून जीव बचावून सुटणें हेंच फार श्रेयस्कर होय." ता. १६ डिसेंबरच्या अंकांतील आगरकरांच्या सहीवरचा लेख अपूर्ण स्थितींत आहे. पण पुढें ता. २३च्या अंकांत किंवा ३० च्याहि अंकांत लेख पुरा झालेला आढळत नाहीं. याचें

कारण कळत नाहीं. १८८५ च्या जानेवारीच्या अंकांतहि या विषयाची पूर्तता आगरकरांकडून झालेली दिसून येत नाहीं. याचें कारण कदाचित् असें असेल कीं, १८८५ च्या जानेवारीच्या दुसऱ्या तारखेस फर्ग्युसन कॉलेज उघडण्याचा समारंभ झाला. या आनंदोत्सवांत मतभेदाचा हा सामाजिक प्रश्न बुडून गेला असल्यास नवल नाहीं.

पण हा वाद येथेंच संपला असें मात्र नाहीं. मुंबईसरकारनें बालविवाहाच्या प्रश्नावर विद्वान् लोकांचे अभिप्राय मागविले होते; व पुढें बालविवाहाच्या जोडीला असंमत वैधव्य हें कायदा करून बंद पाडण्याच्या प्रश्नाची मलबारी शेटनीं भर घातली. पण यापुढें आगरकरांची बाजू पडती ठरून केसरींत त्यांच्या विरुद्ध मताचे लेख सर्रास येऊं लागले. मात्र फिरून स्वतःच्या सहीवर असा आगरकरांनीं लेख लिहिलेला आढळत नाहीं. या सालीं रा. ब. रानडे यांच्या मतावर केसरींतून उघड हल्ला होण्यास सुरवात झाली. ता. १२ मे १८८५च्या केसरींत त्या सालच्या डेक्कन कॉलेजच्या ग्यादरिंगच्या प्रसंगीं जीं भाषणें झालीं त्यांत बरींच धर्मविषयक व समाजविषयक असून तीं भांडारकर व रानडे यांस राग आणणारीं होतीं. याच प्रसंगास उद्देशून केसरीचा एक बातमीदार केसरीला खालीलप्रमाणें लिहितो, " आक्षेपकांच्या बोलण्याचा ओघ धर्मावर लोटला व त्यामुळें रानडे यांची नेहमींची शांत व गंभीर वृत्ति खवळून जाऊन त्यांनीं जो भडिमार केला त्याखालीं स्पेन्सर, मिल, लेके, सेजविक् हीं जंगी जंगी तत्त्ववेत्त्यांचीं प्रकरणें, डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपॉल सेलबीसाहेब, फर्ग्युसनचे तरुण नेटिव्ह प्रोफेसर व उभय कॉलेजांतील धर्मलंड विद्यार्थी मंडळी चीत होऊन जाते कीं काय अशी सर्वांस भीति पडली. रानडे शांत आहेत अशी त्यांची प्रसिद्धि आहे. तथापि जीं मतें त्यांच्या मनांत फार वर्षांपासून खिळून राहिलीं आहेत त्यांना कोणी डिवचलें असतां साधारण मनुष्याप्रमाणें माझेंच खरें असा आग्रह त्यांची बुद्धिहि घेऊन बसते व ते संतापून जातात. आमचा देश स्वतंत्र असून माधवरावजींकडे त्याचा पोपपणा असता तर त्यांनीं तेथें धर्मयुद्धें आरंभलीं असतीं असें वाटतें. "

१८८५ सालापासून केसरींत पूर्वीप्रमाणें सामाजिक विषय फारसे येतनासे होऊन राजकीय, औद्योगिक, परराष्ट्रीय अशा विषयांवरच अधिक लेख येऊं लागले. सामाजिक सुधारकांनीं सरकारी कायद्याच्या बाजूस अधिकाधिक खेचल्यामुळें सनातन धर्माला अनुकूल अशी प्रतिक्रिया उलट सुरू झाली. कुऱ्यांविषयीं आदर पूर्वीपासूनच कमी, पण रानडे व भांडारकर यांच्या सामाजिक व धार्मिक मतांमुळें केसरी व मराठा हीं पत्रें त्यांजवर उघड टीका करूं लागलीं. ता. ९ जून १८८५ च्या केसरींत " ऑनरेबल रा. ब. रानडे बाटले " अशा मथळ्याखालीं एक टीकात्मक अग्रलेख आला. त्याचें तात्पर्य इतकेंच होतें कीं, रा. ब. च्या कांहीं उद्गारांना, ते प्रार्थना समाजांत शिरल्याचा पश्चात्ताप झाल्याचा, वास येत होता.

रानडे हिन्दुधर्माचा मोठेपणा गाऊं लागले; वर्णसंकराविषयीं उद्गार काढण्यास भीति वाटून सनातन धर्मात जाऊन पडण्याची इच्छा त्यांना होऊं लागली; शिवकवच, रामरक्षा वगैरेंचा घोष शाळांतून चालावा, दक्षिससमारंभाप्रमाणें श्रावण्यांचेहि समारंभ शाळांतून व्हावे असा उपदेश ते करूं लागले; असा उल्लेख करून केसरी लिहितो, " आम्हां हिन्दुधर्माभिमान्यांना ही गोष्ट मोठ्या उत्साहाची आहे. पण सामाजिकांच्या नजरेस ती जेव्हां स्पष्टपणें येईल तेव्हां त्यांस अत्यंत खेद होईल व आपला बडा आधार गेला असें वाटून दीर्घ अशौच धरण्याची पाळी येईल. " रानडे व भांडारकर दोघेहि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक सभेंतले पुढारी असल्यामुळें उभयतांच्या स्नेहसंबंधास या मतभेदाची अडचणच होऊं लागली. आगरकर वगैरेंनीं रानडेपक्षाचा अंगीकारहि तितक्याच उघडपणें केला व शाळेंत व शाळेबाहेर भांडणें सुरू झालीं.

अजूनहि केसरींत 'उत्तम न्हाविणी पाहिजेत' अशा सारखे लेख प्रसिद्ध करावयाचे तर, 'लिहून आलेला मजकूर' ही एक ओळ वर घातली असतां अग्रलेखाच्या जागेंत आगरकरांना वतनदारी हक्कानें जागा मिळे. बिचारे वर्तमानपत्रांतील कॉलम आपलें भांडण या मजलीपुढें नेत नाहींत, पण सोसायटींतील खासगी भांडणें बरींच विकोपास जाऊं लागलीं. केसरींत पाहिलें तर निर्विवाद राजकीय विषयांवर बहुतेक लेख येत असल्यामुळें बाहेरून लोकांना सर्व सामसूम आहे असें वाटे. पण आंत किती खळबळ चालू होती हें त्याचें त्यास माहीत. 'आधीं सामाजिक का आधीं राजकीय' या वादग्रस्त विषयांवरील चर्चेची दंगल अद्यापि पुढेंच व्हावयाची होती. पण ता. १५ सप्टेंबर १८८५ च्या केसरींत " पारतंत्र्यामुळें आमच्या लोकांची स्थितिच अशी झाली आहे कीं, राजकीय बाबतींत सुधारणा झाल्याखेरीज आमची सामाजिक स्थिति सुधारावयाचीच नाहीं " असें ठाम मत संपादकांनीं दिलें होतें. यावरून या सुमारास आगरकरपक्ष पूर्णपणें मागें पडून टिळकपक्ष केसरींतील लष्करी ठाणें काबीज करून बसला होता, व ही गोष्ट डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील बहुमतास मान्य होती असें अनुमान निघतें.

मलबारी शेट यांच्या धामधुमीस आळा घालणारा यावेळीं सुदैवानें एक प्रतिष्ठित युरोपियनच भेटला. त्यानें मलबारी शेटनां खालील आशयाचें उत्तर दिलें. " तुमच्या उतावीळपणानें अनुकूल परिणाम घडणार नाहीं. बालविवाहाचे परिणाम वाईट आहेत खरे; पण कांहीं सुधारक लोक त्यांची विनाकारण अतिशयोक्ति करतात. हिन्दु विधवांची स्थिति इटालींतील मठवासिनी अविवाहित स्त्रियांहून अधिक वाईट नसेल. वैधव्याची स्थिति सर्वस्वी असंमत असते असें नाहीं. कांहींना त्यांत सुखहि लागेल. कांहीं ती स्थिति धर्मश्रद्धेच्या बळावर पोशीत असतील. कांहींचें दुःख मनाजोग्या व्यवसायांत गढून गेल्यामुळें विसरून

जात असेल. लोकांना सर्व प्रकारें शिक्षण देऊन आंकडे मांडून, खरें शास्त्र कोणतें खोटें कोणतें याची चर्चा करून, जी सुधारणा होईल तीच टिकाऊ होईल. लोकांत नवीन रीतीनें उत्साह आणला पाहिजे. राजकीय सुधारणेचा सामाजिक सुधारणेवर अवश्य परिणाम घडतो. प्रमाणसिद्ध शास्त्र व राजकीय शिक्षण या दोन गोष्टींनींच इंग्लंडमध्येंहि समाजसुधारणा झाली." वगैरे युक्तिवाद वर्डस्वर्थ साहेबांनीं मोठ्या शान्तपणें केला होता. सर वुइल्यम वेडरबर्न यांचेंहि मत असेंच होतें.

सुदैवानें काशिनाथपंत तेलंग यांनींहि अशाच प्रकारचें मत ता. २२ फेब्रुवारी १८८६ रोजीं मुंबईंत एका व्याख्यानांत प्रतिपादिलें. जिव्हेला जसें द्राक्ष गोड लागतें, तसें तेलंगांचें भाषण कानाला गोड लागतें, अशी त्यांची ख्याति असे. तें ऐकतांना एखादा स्वच्छ जलप्रवाह मंजूळ शब्द करीत वाहतो कीं काय असें वाटे. प्रतिपक्षीहि त्यांचें भाषण मन लावून ऐकत; व तडजोडीचा युक्तिवाद करण्याचा विषय जेव्हां त्यांच्या भाषणास आधारभूत असे तेव्हां तर त्यांचें वक्तृत्व फारच बहारीचें होई. प्रस्तुत व्याख्यानांत त्यांनीं मुख्य मुद्दा हा सांगितला कीं, अमुक प्रकारची सामाजिक स्थिति असेल तरच अमुक प्रकारची राजकीय स्थिति प्राप्त होऊं शकते असें म्हणतां येणार नाहीं. सामाजिक सुधारणेच्या आधीं राजकीय सुधारणा करण्यास लागूं नये हें म्हणणें बरोबर नाहीं. हिंदू गृहें हे येथून तेथून गुलामखाने आहेत, ही गोष्ट खोटी आहे. शिवाजी किंवा पेशवे हे बालविवाहापासूनच जन्माला आले; व त्यांनीं जे पराक्रम केले त्याला इंग्रजी शिकणाऱ्या मुलांच्या संस्कृतीचा आधार नव्हता. सातव्या शतकांतील हिन्दुगृहस्थिति आजच्या आमच्या गृहस्थितीहून अधिक चांगली नव्हती; तरी राजकीय स्थिति अत्यंत उज्वल होती. इंग्लंडांत ट्यूडर राजांशीं भांडून ज्यांनीं हक्क मिळविले त्यांची गृहस्थिति सर्वोत्तम होती असें नाहीं. आणि आजच्या इंग्रजांच्या गृहस्थितींत तरी सुधारणा नको आहे कोठें ? सामाजिक सुधारणा घडवून आणतांना कार्यशकटाच्या चक्रास कमींत कमी घर्षण होईल असेंच धोरण स्वीकारलें पाहिजे. सामाजिक व राजकीय सुधारणा या अवघड किल्ल्यासारख्याच आहेत; राजकीय सुधारणा हस्तगत करणें हीच गोष्ट त्यांतल्या त्यांत अधिक सुसाध्य आहे. कारण या किल्ल्यावर स्वारी करण्याविषयीं सर्व हिन्दी प्रजाजनांचें ऐकमत्य असून सर्वांस सारखी उत्सुकता वाटत आहे. सामाजिक सुधारणेची गोष्ट तशी नाहीं. कित्येक वेळीं एक किल्ला हस्तगत करून त्यावरून दुसऱ्या किल्ल्यावर मारा करितां आल्यामुळेंच तो हस्तगत होऊं शकतो. त्याचप्रमाणें हिन्दुस्थानांत राजकीय सुधारणेचा किल्ला हस्तगत ल्यास त्यावरून सामाजिक सुधारणेच्या किल्ल्यावर भडिमार करितां येईल. टीकाच्च समाजसुधारक बनलें पाहिजे असें नाहीं. रानड्यांसारख्या अलौकिक उदारांना मनुष्याला सर्व सुधारणांना एकदम हात घालतां येईल, पण बहुतेक

लोकांचें बुद्धिसामर्थ्य फार माफक असतें; यामुळें त्याचा व्यय फार जपून केला पाहिजे. शेवटीं तेलंगांनीं निष्कर्ष असा काढला कीं, "सध्यांच्या आमच्या देशस्थितींत विद्वान लोकांच्या बुद्धिसामर्थ्याचा बराच भाग राजकीय सुधारणेकडे व कांहीं थोडा मात्र सामाजिक सुधारणेकडे लागला पाहिजे."

तेलंगाच्या व्याख्यानावर अनुकूळ टीका करतांना केसरीनें जातां जातां मलबारी शेटना असा टोला दिला कीं, पारशी समाजांत अद्यापि पुष्कळ सुधारणा व्हावयाची आहे, तिकडे त्यांनीं लक्ष द्यावें, उगाच परोपकारबुद्धीची घोडी करून तीवर स्वार होऊं नये!

१८८५ सालच्या डिसेंबरांत पहिली राष्ट्रीय सभा मुंबईस भरली, हें प्रसिद्धच आहे. पण ती प्रथम पुण्यास भरविण्याचा विचार होता. शिवाय या राष्ट्रीय सभेची मूळ कल्पना सामाजिक चर्चेतून उगम पावली, व प्रथम कांहीं काळपर्यंत ही राजकीय स्वरूपाची होईल असा कित्येकांचा तर्क नव्हता, किंबहुना कित्येकांची तशी इच्छाहि नव्हती. राष्ट्रीय सभेचें मूळ शोधीत जाणें ही एक मनोरंजक गोष्ट आहे, व हें मूळ ता. ८ डिसेंबर १८८५ च्या केसरींत खालील स्फुटसूचनेंत गोंवलें गेल्याचें आढळतें.

"पुण्यास लवकरच एक जंगी कॉन्फरन्स म्हणजे सभा होणार आहे. या सभेस इतर इलाख्यांतील सार्वजनिक सभेसारख्या सभांचे डेलिगेटस् म्हणजे प्रतिनिधि आणविण्याचा बेत आहे. या कॉन्फरन्सच्या पुरस्कर्त्यांचा, तें भरविण्यांत, असा हेतु आहे कीं, सर्व हिन्दुस्थानच्या संबंधानें अतिशय महत्त्वाचे जे सामाजिक विषय आहेत त्यांचा उहापोह होऊन, जे हक्क सरकारपासून घेणें जरूर आहे असें ठरेल, त्या हक्कांचें संपादन होण्यासाठीं जे उपाय करावयाचे त्यांचा निश्चय झाल्यावर ते घडवून आणण्यासाठीं सर्व हिन्दुस्थानभर एकमेकांच्या साहाय्यानें, एक दिलानें, व एकोप्यानें परिश्रम चालावे. हा हेतु तडीस गेल्यास ब्रिटिश सरकारच्या अमलाखालीं आतांपर्यंत संकीर्ण असलेले जे महाराष्ट्र, कानडा, बंगाल, सिंध, मध्यप्रान्त, वायव्यप्रान्त इत्यादि राष्ट्रमणि, ते अन्योन्यसाधारण अशा कार्यसरांत गुंफिले जाऊन राष्ट्रीय संबंधांत त्यांची एकमाला होईल; व असें झाल्यास "कलौ संघे शक्तिः" या वाक्याची पूर्तता होऊन आमच्या सुधारणेचें पाऊल आतांपेक्षां थोडेंसें जलदीनें पडूं लागेल. अशा प्रकारच्या कॉन्फरन्सचें खरें स्वरूप व महत्त्व ज्यांना दूरचा विचार करण्याची संवय नाहीं त्यांच्या लक्षांत येणार नाहीं. पण ज्यांना राष्ट्राच्या सुधारणा कशा होतात हें इतिहासवाचनानें किंवा विचारानें कळून आलें असेल, त्यांना हीं कॉन्फरन्सें भरविणारांस शाबासकी दिल्यावांचून राहवणार नाहीं. प्रथम प्रथम या सभांचा भावल्यांच्या खेळासारखा खेळ होईल. पण तसा झाल्याखेरीज पार्लमेंटचें

जात असेल. लोकांना सर्व प्रकारें शिक्षण देऊन आंकडे मांडून, खरें शास्त्र कोणतें खोटें कोणतें याची चर्चा करून, जी सुधारणा होईल तीच टिकाऊ होईल. लोकांत नवीन रीतीनें उत्साह आणला पाहिजे. राजकीय सुधारणेचा सामाजिक सुधारणेवर अवश्य परिणाम घडतो. प्रमाणसिद्ध शास्त्र व राजकीय शिक्षण या दोन गोष्टींनींच इंग्लंडमध्येंहि समाजसुधारणा झाली. " वगैरे युक्तिवाद वर्डस्वर्थ साहेबांनीं मोठ्या शान्तपणें केला होता. सर वुइल्यम वेडरबर्न यांचेंहि मत असेंच होतें.

सुदैवानें काशिनाथपंत तेलंग यांनींहि अशाच प्रकारचें मत ता. २२ फेब्रुवारी १८८६ रोजीं मुंबईत एका व्याख्यानांत प्रतिपादिलें. जिव्हेला जसें द्राक्ष गोड लागतें, तसें तेलंगांचें भाषण कानाला गोड लागतें, अशी त्यांची ख्याति असे. तें ऐकतांना एखादा स्वच्छ जलप्रवाह मंजूळ शब्द करीत वाहतो कीं काय असें वाटे. प्रतिपक्षींहि त्यांचें भाषण मन लावून ऐकत; व तडजोडीचा युक्तिवाद करण्याचा विषय जेव्हां त्यांच्या भाषणास आधारभूत असे तेव्हां तर त्यांचें वक्तृत्व फारच बहारीचें होई. प्रस्तुत व्याख्यानांत त्यांनीं मुख्य मुद्दा हा सांगितला कीं, अमुक प्रकारची सामाजिक स्थिति असेल तरच अमुक प्रकारची राजकीय स्थिति प्राप्त होऊं शकते असें म्हणतां येणार नाहीं. सामाजिक सुधारणेच्या आधीं राजकीय सुधारणा करण्यास लागूं नये हें म्हणणें बरोबर नाहीं. हिंदू गृहें हे येथून तेथून गुलामखाने आहेत, ही गोष्ट खोटी आहे. शिवाजी किंवा पेशवे हे बालविवाहापासूनच जन्माला आले; व त्यांनीं जे पराक्रम केले त्याला इंग्रजी शिकणाऱ्या मुलांच्या संस्कृतीचा आधार नव्हता. सातव्या शतकांतील हिन्दुगृहस्थिति आजच्या आमच्या गृहस्थितीहून अधिक चांगली नव्हती; तरी राजकीय स्थिति अत्यंत उज्वल होती. इंग्लंडांत टयूडर राजांशीं भांडून ज्यांनीं हक्क मिळविले त्यांची गृहस्थिति सर्वोत्तम होती असें नाहीं. आणि आजच्या इंग्रजांच्या गृहस्थितींत तरी सुधारणा नको आहे कोठें? सामाजिक सुधारणा घडवून आणतांना कार्यशकटाच्या चक्रास कमींत कमी घर्षण होईल असेंच धोरण स्वीकारलें पाहिजे. सामाजिक व राजकीय सुधारणा या अवघड किल्ल्यासारख्याच आहेत; राजकीय सुधारणा हस्तगत करणें हीच गोष्ट त्यांतल्या त्यांत अधिक सुसाध्य आहे. कारण या किल्ल्यावर स्वारी करण्याविषयीं सर्व हिन्दी प्रजाजनांचें ऐकमत्य असून सर्वांस सारखी उत्सुकता वाटत आहे. सामाजिक सुधारणेची गोष्ट तशी नाहीं. कित्येक वेळीं एक किल्ला हस्तगत करून त्यावरून दुसऱ्या किल्ल्यावर मारा करितां आल्यामुळेंच तो हस्तगत होऊं शकतो. त्याचप्रमाणें हिन्दुस्थानांत राजकीय सुधारणेचा किल्ला हस्तगत झाल्यास त्यावरून सामाजिक सुधारणेच्या किल्ल्यावर भडिमार करितां येईल. सर्वांनींच समाजसुधारक बनलें पाहिजे असें नाहीं. रानड्यांसारख्या अलौकिक बुद्धीच्या मनुष्याला सर्व सुधारणांना एकदम हात घालतां येईल, पण बहुतेक

लोकांचें बुद्धिसामर्थ्य फार माफक असतें; यामुळें त्याचा व्यय फार जपून केला पाहिजे. शेवटीं तेलंगांनीं निष्कर्ष असा काढला कीं, "सध्यांच्या आमच्या देशस्थितींत विद्वान लोकांच्या बुद्धिसामर्थ्याचा बराच भाग राजकीय सुधारणेकडे व कांहीं थोडा मात्र सामाजिक सुधारणेकडे लागला पाहिजे."

तेलंगाच्या व्याख्यानावर अनुकूळ टीका करतांना केसरीनें जातां जातां मलबारी शेटना असा टोला दिला कीं, पारशी समाजांत अद्यापि पुष्कळ सुधारणा व्हावयाची आहे, तिकडे त्यांनीं लक्ष द्यावें, उगाच परोपकारबुद्धीची घोडी करून तीवर स्वार होऊं नये!

१८८५ सालच्या डिसेंबरांत पहिली राष्ट्रीय सभा मुंबईस भरली, हें प्रसिद्धच आहे. पण ती प्रथम पुण्यास भरविण्याचा विचार होता. शिवाय या राष्ट्रीय सभेची मूळ कल्पना सामाजिक चर्चेतून उगम पावली, व प्रथम कांहीं काळपर्यंत ही राजकीय स्वरूपाची होईल असा कित्येकांचा तर्क नव्हता, किंबहुना कित्येकांची तशी इच्छाहि नव्हती. राष्ट्रीय सभेचें मूळ शोधीत जाणें ही एक मनोरंजक गोष्ट आहे, व हें मूळ ता. ८ डिसेंबर १८८५ च्या केसरींत खालील स्फुटसूचनेंत गोंवलें गेल्याचें आढळतें.

" पुण्यास लवकरच एक जंगी कॉन्फरन्स म्हणजे सभा होणार आहे. या सभेस इतर इलाख्यांतील सार्वजनिक सभेसारख्या सभांचे डेलिगेटस् म्हणजे प्रतिनिधि आणविण्याचा बेत आहे. या कॉन्फरन्सच्या पुरस्कर्त्यांचा, तें भरविण्यांत, असा हेतु आहे कीं, सर्व हिन्दुस्थानच्या संबंधानें अतिशय महत्त्वाचे जे सामाजिक विषय आहेत त्यांचा उहापोह होऊन, जे हक्क सरकारपासून घेणें जरूर आहे असें ठरेल, त्या हक्कांचें संपादन होण्यासाठीं जे उपाय करावयाचे त्यांचा निश्चय झाल्यावर ते घडवून आणण्यासाठीं सर्व हिन्दुस्थानभर एकमेकांच्या साहाय्यानें, एक दिलानें, व एकोप्यानें परिश्रम चालावे. हा हेतु तडीस गेल्यास ब्रिटिश सरकारच्या अमलाखालीं आतांपर्यंत संकीर्ण असलेले जे महाराष्ट्र, कानडा, बंगाल, सिंध, मध्यप्रान्त, वायव्यप्रान्त इत्यादि राष्ट्रमणि, ते अन्योन्यसाधारण अशा कार्यसरांत गुंफिले जाऊन राष्ट्रीय संबंधांत त्यांची एकमाला होईल; व असें झाल्यास " कलौ संघे शक्तिः " या वाक्याची पूर्तता होऊन आमच्या सुधारणेचें पाऊल आतांपेक्षां थोडेंसें जलदीनें पडूं लागेल. अशा प्रकारच्या कॉन्फरन्सचें खरें स्वरूप व महत्त्व ज्यांना दूरचा विचार करण्याची संवय नाहीं त्यांच्या लक्षांत येणार नाहीं. पण ज्यांना राष्ट्राच्या सुधारणा कशा होतात हें इतिहासवाचनानें किंवा विचारानें कळून आलें असेल, त्यांना ही कॉन्फरन्सें भरविणारांस शाबासकी दिल्यावांचून राहवणार नाहीं. प्रथम प्रथम या सभांचा भावल्यांच्या खेळासारखा खेळ होईल. पण तसा झाल्यावेरीज पार्लमेंटचें

स्वरूप त्यास कधींच येणार नाहीं. सध्यां दिवसच असे आले आहेत कीं अशा खटपटी केल्याशिवाय आम्हांस गत्यन्तर नाहीं."

तेलंगांच्या म्हणण्याप्रमाणें पुष्कळशा लोकांनीं राजकीय सुधारणेचें काम व कांहीं थोड्या लोकांनीं सामाजिक सुधारणेचें काम आपल्या हातीं घेतलें पाहिजे, व या दोन्ही सुधारणांच्या बाबतींत श्रमविभाग झाला तर तो अधिक इष्ट होय असें टिळकांचें मत पूर्वीपासून होतें. टिळक हे राजकीय सुधारणा तेवढीच घेऊन बसतात, सामाजिक सुधारणेचें काम ते कोणत्याहि रीतीनें करीत नाहींत असा त्यांजवरील आक्षेप प्रसिद्ध आहे. पण राजकीय व सामाजिक सुधारणांचें बोडणच कालविलें पाहिजे असें टिळकांचें मत प्रथमपासून नव्हतें, व सोसायटींतील बहुमतहि याच धोरणाचें होतें. ता० ४ जानेवारी १८८७ च्या केसरींत अशा प्रकारचें बोडण राष्ट्रीय सभेंत भरण्याच्या कल्पनेचा निषेध केलेला आढळतो. वर दर्शविल्याप्रमाणें राष्ट्रीय सभा भरविणारांच्या मूळ हेतूंत राजकीय व सामाजिक अशी भेसळ झाली होती, परंतु पहिल्या राष्ट्रीय सभेंत जो ठराव व जी चर्चा झाली ती बहुतेक राजकीय स्वरूपाची होती. यावरून टिळक व केसरी यांच्याप्रमाणें हिन्दुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांच्या पुढाऱ्यांनाहि राष्ट्रीय सभेला सामाजिक स्वरूपापेक्षां राजकीय स्वरूप अधिक असावें हेंच धोरण पसंत पडल्याचें उघड दिसतें.

दुसऱ्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं सामाजिक पक्षानें पुन्हां उचल खाल्ली व अँग्लो-इन्डियन पत्रांनीं तिला पाठिंबा दिला. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. या विषयास उद्देशून केसरी लिहितो (४ जानेवारी १८८७) "एका दगडानें दोन पक्षी पाडण्याचा प्रयत्न करणें हें सहसा कोणासहि हितावह होत नाहीं. ज्याला जो विषय प्रिय त्यानें सवड सांपडेल तेथें आपलें घोडें पुढें ढकलण्याचा प्रयत्न करावा हें अगदीं स्वाभाविक आहे. पण बहुधा असलीं घोडीं एकत्र होत नाहींत म्हणून बरें. नाहीं तर त्यांनीं जिकडे तिकडे समाजांत उत्पात करून दिला असता. एकमेकांची दृष्टादृष्ट होतांच असलीं तट्टें अगोदर एकमेकांविरुद्ध खिंकाळूं लागतात, मग एकमेकांवर चालून जातात, पुढें त्यांची लाथाडी सुरू होते, अखेरीस एकमेकांचे लचके तोडण्यावर प्रकरण येऊन ठेपतें. यासाठीं शहाण्या मनुष्यांनीं होतां होईल तों यांची गांठ पडूं देऊं नये. एकाच विषयांत निष्णात होण्यास बुद्धीला कमीपणा नाहीं. पण पुढाऱ्यांची इच्छा जेथें तेथें आपला पगडा बसावा, ज्या त्या गोष्टींत आपणास ढवळाढवळ करतां यावी, व प्रत्येकानें आपणास भजावें, जो उठला तो सर्वसंग्रहालय होऊन बसण्याची इच्छा धरणार. बरें, अनेक कामें हातीं घ्यावीं तर तीं सर्व चांगलीं करण्याची योग्यता नाहीं, व ती योग्यता असली तरी एखादें काम हातीं धरून तें लोकांची भीति न बाळगतां तडीस नेण्याचें धैर्य नाहीं. आम्हांस तर राजकीय व सामाजिक

सुधारणांचें बोडण एकाच पातेल्यांत भरण्याची कल्पना अगदीं आचरटपणाची व अविचाराची दिसते. अनेक समाजाचे लोक एकत्र आल्यास गोंधळ मात्र व्हावयाचा; व उगीच एकमेकांचीं उणीं निघून मनें दुखविलीं जावयाचीं. मिश्र समाजांत सामाजिक वाद सुरू झाला कीं, प्रत्येकजण आपणाखेरीज इतरांना रानटी ठरविणार. डोक्याला पांढरीं फडकीं गुंडाळतात म्हणून पारशी बायका रानटी; बायकांना जनान्यांत ठेवतात म्हणून मुसलमान रानटी; शेंड्या ठेवून गंध लावतात म्हणून हिन्दु रानटी; गोरे लोक शौचास पाणी घेत नाहींत व बायकांशीं फारच सलगीचा संबंध ठेवतात म्हणून ते रानटी. ”

१८९५ सालीं, सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरूं द्यावयाची नाहीं व या दोन सभा इतक्या अलग ठेवावयाच्या कीं त्यांचा अप्रत्यक्ष विटाळहि एकमेकांस होऊं नये, असा जो वाद टिळकपक्षानें पुण्यास उत्पन्न केला ( अथवा पुण्याच्या धर्माभिमानी पक्षानें उत्पन्न केला व टिळकांनीं उचलून धरला ) ती उपरिनिर्दिष्ट तत्वाची एक प्रकारें व्यावहारिक अतिशयोक्ति असें म्हणतां येईल. पण १८९५ च्या या वादाचें मूळ १८८७ च्या केसरीच्या लेखांत सांपडतें, व हें मत एकट्या टिळकांचें नसून सोसायटींतील बहुमत यावेळीं या बाबतींत त्यांच्या बाजूचें होतें ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

हिन्दु लोकांच्या सामाजिक चालीरींतींत सरकारनें जरूर तर हात घालावा हें सुधारकांचें म्हणणें, व सरकारशीं ज्यांचा अधिक निकट परिचय असे लोक म्हटले म्हणजे प्रायः सुधारकच यामुळें सुधारकांचें म्हणणें तें सर्व देशाचें म्हणणें असा सरकारचा ग्रह होणें, हें स्वाभाविक होतें. पण हा ग्रह खोडून काढण्याची इच्छा सनातनवादी बहुजनसमाजाला व्हावी हेंहि तितकेंच स्वाभाविक होय; व या बाबतींतला पहिला मोठा प्रयत्न मुंबईतील माधवबागेंतील जंगी जाहीरसभेच्या द्वारें झाला. ही सभा रविवार ता० ५ सप्टेंबर १८८६ रोजीं माधवबागेंत भरली. या सभेस जमला एवढा थोरला अचाट समुदाय यापूर्वी अशा कामाकरितां मुंबईस काय किंवा मुंबईबाहेर काय कोठेंहि जमला नसावा. अध्यक्षस्थानीं रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक हे होते. शिवाय तेलंग, देशमुख, शांताराम नारायण, वरजीवनदास वगैरे मुंबईतील ठळक मंडळी आली होती. अध्यक्षांनीं गुजराथींत भाषण केलें. नंतर कृष्णसुखराम मेहेता यांनीं हिंदुस्थानसरकारास पाठविण्याच्या अर्जाचा नमुना वाचून दाखविला. त्यास दाजी आबाजी खरे यांनीं अनुमोदन दिलें.

येथपर्यंत सर्व ठीक झालें. पुढें ईश्वरलाल दवे नांवाचा गृहस्थ अर्जाचे विरुद्ध बोलूं लागला. तेव्हां चोहोंकडून टाळ्यांचा गजर व आरडाओरड सुरू झाली; व त्यास खालीं बसावें लागलें. नन्तर काशीनाथपंत तेलंग हे आपली उपसूचना मांडण्यास उभे राहिले. त्यांची उपसूचना अशी होती कीं, “ बालविवाह व असंमत वैधव्य यांसंबंधानें कायदा करण्याचा सरकारचा जो हेतु त्याविरुद्ध

हिन्दुस्थानसरकाराकडे अर्ज पाठवावा पण त्या अर्जांत असें लिहावें कीं, ' बाल-विवाड व असंमत वैधव्य ह्या दोहोंपासून होणारे वाईट परिणाम आम्हांस पूर्ण-पणें ठाऊक आहेत. पण ते आमचे आम्हीच सुधारले पाहिजेत सरकारनें त्यांत हात घातल्यास उलट नुकसान होईल'. ही उपसूचना सभेस मान्य नव्हती. तिच्यावर अध्यक्षांनीं मतें घेतलीं तेव्हां तेलंग, गोकुळदास पारेख, चंदावकर, गोपाळराव देशमूख, वामनराव मोडक, दवे वगैरे सुमारें सत्तेचाळीस लोक पुढें आले. आणखीहि कांहीं लोक पुढें आले असते पण गर्दीमुळें त्यांस पुढें येतां आलें नाहीं असें म्हणतात, व हें शक्यहि आहे. अखेर अर्जाचा मसुदा हजारों मतांनीं मंजूर झाला. या सभेस जव्हेरीलाल याज्ञिक यांनीं सहानुभूतीचें पत्र पाठविलें होतें. पुण्यांतील वेदशास्त्रोत्तेजक सभेकडून सभेला सहानुभूतीची तार गेली होती. शिवाय पुण्याहून गृहस्थ शास्त्री, वैदिक वगैरे पन्नास पाऊणशें प्रमुख लोकांच्या सहीचें एक पत्र मंडलीक यांजकडे वेगळें पाठविण्यांत आलें होतें. पण विशेष सांगण्याची गोष्ट ही कीं, स्वतः टिळकांखेरीज माधवराव नामजोशी, वासुदेवराव केळकर, माधवराव गोळे, नारायणराव धारप, परशरामपंत पाटणकर व वामनराव आपटे इतक्या डे० ए० सोसायटीच्या सभासदांच्या सह्या हि या पत्रावर होत्या. शिवाय माधवराव कुंटे, सितारामपंत चिपळूणकर, शिव-राम हरी साठे, वासुदेव बापूजी कानिटकर, रामचंद्र सखाराम गुप्ते, वामन विष्णु लेले, वगैरे सह्याहि लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. प्रमुख सही नाहीं अशी आगरकरांची, यावरून सोसायटींत सामाजिक विचारांच्या बाबतींत बहुमत टिळ-कांच्या बाजूचें होतें; व आगरकरांचीं मतें एकान्तिक होतीं, ही गोष्ट उघड दिसते. अर्थात् डे० ए. सोसायटींत सामाजिक मतभेदांमुळें जीं रणें माजलीं असतील त्यांचा दोष आगरकरांकडे येतो हेंहि उघड आहे.

माधवबागेच्या सभेत आपले सर्व प्रयत्न फुकट गेले असें पाहून, सभेच्या कामावर व शिस्तीवर अनेक प्रकारचे आक्षेप घेण्यास सुधारकांनीं सुरवात केली. पण तो सर्व प्रयत्न फुकट गेला. कारण या एकाच सभेनें सरकारची पुरी खात्री झाली कीं, सामाजिक व धार्मिक बाबतींत कायद्यानें हात घालणें ही गोष्ट लोकांना खरोखरच अप्रिय आहे. वरील आक्षेपास उद्देशून केसरी लिहितो, " आतां पुनरपि त्यांनीं आपली अधिक बेअब्रू करून घेण्याचें नादीं न लागतां स्वस्थ रहावें हें बरें. हा आमचा उपदेश त्यांनीं मान्य न केल्यास त्यांत हिंदुसमाजाचें काय नुकसान होणार ? उत्पतितोऽपिहि चणकः शक्तः किं भ्राष्ट्रकं भङ्क्तुम् ! "

पुण्यांतील लोक आतां रावबहादूर रानड्यांच्या मागें लागून त्यांना म्हणूं लागले कीं, मलबारी प्रकरणांत तुम्ही मलबारींना काय लिहिलें आहे तें कळवा. कारण मलबारी शेटनीं रानड्यांच्या संमतिपत्राचा फायदा घेऊन सरकारास असें कळविलें कीं, रानड्यांनीं आपला अभिप्राय हिंदुसमाजाच्या तर्फे म्हणून दिला आहे.

कांहीं गृहस्थांनीं तर रावबहादुरांस पत्र लिहून उत्तर मागितलें, पण त्यांस रानड्यांकडून सरळ उत्तर आलें नाहीं. आपण हिंदुसमाजाच्या तर्फे लिहिलें नसतांनाहि जर परभारें कायदेवाले लोक आपल्या नांवाचा फायदा घेऊन काम साधीत आहेत तर कशाला त्यांच्या आड या ? असें वाटून, मलबारी यांस धाडलेल्या लेखाबद्दल ज्याचा तो जबाबदार आहे, एवढाच जबाब त्यांनीं दिला.

ता. १३ सप्टेंबर १८८६ रोजीं पुण्यांतील प्रमुख शास्त्रीमंडळींचें डेप्युटेशन गव्हर्नरसाहेबांची भेट घेण्याकरितां कौन्सिल हॉलांत गेलें. मंडळीची ओळख करून देण्याचें काम सर वुइल्यम वेडरबर्न यांनीं पत्करिलें होतें. डेप्युटेशनच्या वतीनें वे. सं. रामशास्त्री आपटे यांनीं आपलें म्हणणें कळविलें. या डेप्युटेशननें आगांतुकी केलेली नव्हती; तर इतर सर्व लोकांबरोबर जुन्या पद्धतीच्या शास्त्रीमंडळींचाहि अभिप्राय मिळवावा असें सरकारनेंच ठरविलें होतें. रामशास्त्रयांनीं असें सांगितलें कीं, हिंदु लोकांच्या विवाहविषयक चालींसारख्या नाजूक विषयांसंबंधानें सरकारनें कायदा करणें गैरवाजवी आहे. हा मुंबईसरकारचा निश्चय सर जेम्स फर्ग्युसन यांनीं १८८५ सालच्या मार्च महिन्यांत, पुण्यास मुलींच्या हायस्कूलच्या इमारतीच्या पायाचा दगड बसवितांना जाहीर केला होता, तरी मलबारी शेटनीं आपली चळवळ थांबविली नाहीं; उलट मुंबईसरकारचेच एक कौन्सिलर मेल्व्हिलसाहेब यांनीं कायद्याचा एक मसुदाहि केला; सबब शास्त्रीलोकांना आपलें म्हणणें सरकारपुढें मांडणें जरूर झालें. तें असें कीं सरकारच्या आडून हिंदुधर्मावर हल्ला होत असल्यामुळें लोकांना भीति वाटत आहे. " शास्त्रीलोकांनीं असेंहि सांगितलें कीं, " मताधिक्य दिसून आलें तरी लग्नाचा शास्त्रोक्त धर्मविधि कोणासहि बदलण्याचा अधिकार नाहीं, व सरकारनें धर्मांत हात घालणें हें राणीच्या जाहीरनाम्याविरुद्ध आहे. " त्यावर गव्हर्नरसाहेबांनींहि उत्तर दिलें कीं " अशा कामीं सरकार एकतर्फी निकाल करणार नाहीं. मेल्व्हिलसाहेबांनीं मसुदा केला तो व्यक्तिशः त्यांच्या मताप्रमाणें केला आहे."

पण पुढें गव्हर्नरसाहेब शास्त्रीमंडळीला हळूंच असेंहि म्हणाले कीं, सांप्रत चालू असलेल्या खरोखरच अनिष्ट अशा चालीरीति सुधारण्याकरितां, सरकार सोडलें तरी, तुम्ही जुन्या चालीचे लोक स्वतः काय प्रयत्न करितां ? त्यावर शास्त्री लोकांनीं असें सांगितलें कीं, शास्त्राशांना अनुसरून कसें वागावें याचा निर्णय करण्याकरितां शास्त्री वगैरे लोकांची एक कायमची सभा स्थापण्याचा विचार आहे. शेवटीं जातां जातां शास्त्रीमंडळींनीं सरकाराकडून संस्कृत विद्येला अधिक आश्रय मिळण्याची विनंति केली, तिला गव्हर्नरसाहेबांनीं खर्चात काटकसर करण्याला फायनॅन्स कमिटी बसली आहे असें उत्तर दिलें ! तरी शास्त्रीमंडळींनीं सुरापानाचा प्रश्न काढलाच. त्यावर गव्हर्नरसाहेबांनीं

सांगितलें कीं आपल्या सूचना महत्त्वाच्या आहेत, व त्या महत्त्वाच्या लोकांकडून आल्या आहेत असें आम्ही वरिष्ठ सरकाराला कळवूं !

१८८६ सालीं सामाजिक सुधारणेच्या वादाला आणखी एका गोष्टीनें अवचित भर पडली. ही गोष्ट म्हणजे दादाजी विरुद्ध रखमाबाई हा सुप्रसिद्ध खटला होय. या दाव्यांत व त्यांतून उत्पन्न झालेल्या वादांत सामाजिक सुधारणेसिद्धर्थ नवीन कायदा करण्याचा प्रश्न नव्हता, तर जुन्याच कायद्यांची अम्मलबजावणी कशी व कितपत करावी असा तो प्रश्न होता. सोसायटींतील टिळक-पक्ष व आगरकरपक्ष यांच्या भांडणास हा विषय दोन वर्षें पुरला. केसरीनें, म्हणजे सोसायटींतील बहुमतानें, दादाजीचा पक्ष स्वीकारला होता व आगरकरांनीं रखमाबाईचा स्वीकारला होता हें उघड आहे. या दाव्याची हकीकत थोडक्यांत अशी आहे. १८७१ सालीं मुंबईत डॉ. सखाराम यांनीं एका पाचकळशे जातीच्या विधवेशीं पुनर्विवाह केला. या विधवेस पूर्वीच्या लग्नापासून झालेली एक मुलगी होती. तिचें नांव रखमाबाई. आपल्या आईबरोबर रखमाबाई ही डॉ. सखाराम यांच्या घरीं राहावयास आली. रखमाबाईच्या बापाची मिळकत तिच्या पुनर्विवाहित आईला न मिळतां तिला स्वतःला मिळावयाची होती, व ही मिळकत आपल्या ताब्यांतून जाऊं देऊं नये म्हणून डॉ. सखाराम यांनीं आपला जवळचा एक नातलग दादाजी म्हणून होता त्याच्याशीं रखमाबाईचें लग्न लावून दिलें. दादाजी स्वतः घरचा गरीब असे; व डॉ. सखाराम हे त्याला पोशीत. त्याचें शिक्षण सामान्य प्रतीचें होतें. लग्न झाल्यावर त्याला क्षयरोगाची भावना झाली, पण तींतून तो कसाबसा बचावला. पुढें दादाजीचें व डॉ. सखाराम याचें बनेना, व याकरितां डॉ. सखाराम यांनीं त्याची बायको घरीं ठेवून घेतली, त्याजकडे पाठविली नाहीं. रखमाबाई विशेष शिकलेली नव्हती, परंतु रिकामपणामुळें 'आर्यमहिलासमाजा'च्या चिटणीशीचें काम तिला कोणी दिल्यानें तिला वास्तविक योग्यतेपेक्षां अधिक प्रसिद्धि मिळाली होती.

पुढें दादाजी हा रखमाबाईस घरीं येऊन नांदण्यास बोलावीत असतां तिनें ती गोष्ट नाकारली. इतक्यांत डॉ. सखारामहि वारले. तेव्हां दादाजीनें आपली बायको ताब्यांत मिळावी म्हणून हायकोर्टांत ता. १२ मार्च १८८४ रोजीं फिर्याद केली. व हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें आपल्याला दादाजीच्या ताब्यांत दिलें जाण्याचा संभव आहे असें पाहून, रखमाबाईनें मुंबईच्या ॲंग्लो इंडियन वर्तमानपत्रांत पत्रें प्रसिद्ध करून आपलें दुःख वेशीवर बांधून, सुधारकांकडून फुकटची सहानुभूति मिळवावी व हायकोर्टाच्या मनावर वजन पाडावें असा घाट घातला. रखमाबाई आपल्या सहीनें पत्रें प्रसिद्ध करी, पण तीं लिहिण्याइतकेंहि शिक्षण तिला नव्हतें. दादाजीचें शिक्षण तिच्याहून कमी नव्हतें. तथापि ती त्याला आपल्या पत्रांत अशिक्षित कूली ( मजूर ) अशा शब्दांनीं उल्लेखी. बिचाऱ्या दादाजीला मात्र पत्रें लिहून देण्याइतकीहि सहानुभूति कोणी दाखवीना. असो; या दाव्यांतील मुख्य

मुद्दा हा होऊन बसला कीं, रखमाबाईच्या संमतीनें ज्या अर्थी तिचें लग्न झालें नाहीं त्या अर्थी दादाजीला कायद्याचे सक्तीनें तिला आपल्या घरीं आणून नांदविण्यास कोर्टानें मदत देऊं नये. या मतास वास्तविक विद्यमान कायद्यांत कांहींच आधार नव्हता. तथापि न्यायमूर्ति पिन्हे यांनीं दाव्याचा निकाल रखमाबाईतर्फे केला. (ता. २१ सप्टेंबर १८८५) पुढें या निकालावर दादाजीनें अपील केलें; त्यांत चीफ जस्टिस सार्जंट व जस्टिस बेले यांनीं पिन्हेसाहेबांचा निकाल फिरवून दादाजीचा आपल्या बायकोवर हक्क शाबीत धरला.

या निकालावर दुमत माजलें. हायकोर्टाचा निकाल हिंदुधर्मशास्त्राला अनुसरून असल्यामुळें, या धर्मशास्त्रालाच अडाणी व रानटी म्हणण्याखेरीज पुढारलेल्या सुधारकांना दुसरा मार्ग उरला नाहीं. इकडे रखमाबाईनेंहि आपणांस हायकोर्टानें नवऱ्याच्या घरीं जाण्याचा हुकूम केला तरी तो आपण अमान्य करणार, व जरूर तर त्याकरितां शिक्षाहि सोसणार, असा निश्चय जाहीर केला. यामुळें तर तिचे देव्हारे फारच माजले. तिच्या खर्चाकरितां फंड गोळा होऊं लागला. मलबारी शेट हे या प्रकरणांत होतेच. त्यांनीं फंडास दोनशें रुपये देऊन सुरवात केली. पण एक महिन्याचे आंत रखमाबाई नवऱ्याचे घरीं न गेल्यास हायकोर्टानें तिला चार महिन्यांची शिक्षा सांगितली होती तिचें काय होणार ? या प्रश्नाला उलट महत्त्व येऊन, निकालापूर्वी लोकमताचा कांटा जो तिच्याविरुद्ध झुकत होता तो या शिक्षेच्या मुद्द्यामुळें आतां तिच्या बाजूस झुकूं लागला. अशा स्त्रीला अशा नवऱ्याच्या घरीं सक्तीनें पाठविण्याचा हक्क धर्मशास्त्राला व कायद्याला नाहीं ही जी बाजू सुधारकांनीं उचलून धरली होती, ती लवकरच खालीं बसली. पंडित भीमाचार्य झळकीकर यांसारखे शास्त्री पुढें येऊन त्यांनीं धर्मशास्त्राच्या ग्रंथांतील वचनांचा मारा केला. पण सुधारकांचे प्रतिपक्षी जे तात्विक दृष्ट्या दादाजीच्या नवरेपणाच्या हक्काची बाजू उचलून धरीत होते, तेच आतां सामोपचारानें असें म्हणूं लागले कीं, दादाजीची हक्कशाबिती झाली यांतच जुन्या मताचा हवा तेवढा विजय झाला. म्हणून दादाजीनें यापुढें मजल नेणें बरें नव्हे. कारण अशा स्त्रीला तुरुंगांत घातल्यापासून त्याला किंवा इतर कोणाला काय लाभ होणार ? व अशी नाखुश स्त्री घरांत आणली तर ती सुखानें नांदणार तरी कशी ? तात्पर्य, यापुढें दादाजीनें तिचा नाद सोडून द्यावा. व अखेर त्यानें तो नाद सोडून दिलाहि.

पण सुधारक व सनातनी यांच्यांतील द्वैत त्यामुळें कांहीं कमी झालें नाहीं. निरनिराळ्या दृष्टीनें पाहतां या दोन्ही पक्षांचा निम्मा जय व निम्मा पराजय झाला. पण आहे ती स्थिति कायम राहाण्यांतहि यशाची बाजू सनातनी पक्षाकडेच झुकत होती; कारण रखमाबाईला प्रत्यक्ष तुरुंगवास घडला नाहीं याचें कारण तिच्या नवऱ्यानें पुढें गय केली इतकेंच ! पण सुधारकांच्या मनांत हें शल्य बोंचतच राहिलें. ही स्थिति कायद्यानें दुरुस्त करावी कीं नाहीं असा वाद फिरून सुरू

झाला. आमच्या चालीरीतींत सरकारचा हात कशाला ? असा सनातनी पक्षाचा सवाल पूर्वींच्याच जोरानें पुढें आला. या वादांत वर्डस्वर्थ, तेलंग, कीर्तिकर वगैरे गृहस्थ त्यांतल्यात्यांत सनातनी पक्षाच्या बाजूचे, मात्र रखमाबाईस तुरुंगांत घालूं नये एवढेंच म्हणणारे होते. मलबारी, रानडे वगैरे लोक उलट बाजूस होते. डॉ. कीर्तिकर हे सुधारक असतां त्यांनीं या प्रश्नाच्या चर्चेत सुधारकांवर खूप कोरडा ओढला होता. कीर्तिकर लिहितात, "रखमाबाईच्या अवस्थेबद्दल कळकळ कां वाटावी ? हिंदुलोकांत बाळपणीं लग्न झालेल्या स्त्रिया काय थोड्या आहेत ! कोणत्या तरी स्त्रीनें रखमाबाईसारखा अविचारानें आपल्या भ्रताराचा त्याग केला आहे काय ? प्रत्यक्ष नवऱ्याचा त्याग करण्याइतका कठोरपणा जर विद्येच्या योगानें येत असेल तर बेहत्तर आहे कीं, तसली दुष्ट विद्या आमच्या मुलींस मुळींच देऊं नये."

कित्येकांनीं रखमाबाईला डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या पदवीला नेऊन बसविलें होतें, त्याचा केसरीनें तर कडकडीत धिःकार केलाच. परंतु सुधारकांतल्याहि कांहींना ही तुलना पसंत नव्हती. केसरी रखमाबाईच्या विरुद्ध होता तरी स्त्रीशिक्षणाच्या विरुद्ध नव्हता. त्याला आनंदीबाईसारख्या सुशिक्षित स्त्रीचा अभिमान वाटत असे. केसरी लिहितो (२९ मार्च १८८७) "रखमाबाईचें नांव आनंदीबाईच्या समवेत घेणें हें महापातक आहे. आनंदीबाईनें हिन्दुस्त्रीसमाजाच्या खऱ्या खऱ्या यातनांचे निवारणाकरितां आपलें आयुष्य, आपली बुद्धि व आपलें सर्वस्व खर्ची घालण्याचा निश्चय केला. रखमाबाईनें ज्ञानलवदुर्विदग्ध होऊन धर्मरूढी व विचार यांचा तिरस्कार करून आपल्या पूर्वजांच्या मूर्ख(!) चालींतून मोकळें होण्याचा हट्ट धरला आहे. आनंदीबाईनें आपला उदार हेतु परिपूर्ण करण्याकरितां आपले परमप्रिय इष्टमित्रांचा विरह सहन करून अनिवार विघ्नराशींतून आपला मार्ग आक्रमीत तीन वर्षें आपणास देशत्यागहि करविला. रखमाबाईनें आपली निःसीम स्वेच्छाचारिता राखण्याकरितां व पितृगृहाचा त्याग न व्हावा म्हणून सर्व जगापुढें आपली अननुकरणीय वर्तणूक मांडली. आनंदीबाईनीं स्वधर्म, स्वाचार, व स्वरूढी यांचा योजनसहस्राचे किंवा अर्धगोलाचे अंतरावरहि अल्पमात्र त्याग केला नाहीं; परंतु रखमाबाईनें सुखसमाधानानें नांदत असलेल्या अनंत कुटुंबांत तंट्याचें बीज रोवण्याकरितां, व मलबारी पंथांत नग्निकांपासून पलिग्नी विधवांपर्यंत सर्वांस गोंवून टाकण्याकरितां, कायावाचामनेंकरून जें जें करणें शक्य होतें तें तें करून ठेविलें आहे. आनंदीबाईची मूर्ति शांतपणें सर्व कुलीन स्त्रीपुरुषांच्या हृदयांत निरंतर वास करील. तिच्या यशःपटहाचा नाद हिन्दूस हिन्दुत्व आहे तोंपर्यंत त्यांच्या कानास सुख देईल. रखमाबाईची टिमकी मात्र मुंबापुरस्थ व इतरत्र सुधारकांनीं कितीहि आवेशानें बडवली तरी या खटल्याचा एकदां निकाल लागल्यावर लवकरच फुटून जाईल."

काशीनाथपंत तेलंग ह्यांनीं ह्या प्रसंगीं नेहमींहून अधिक स्पष्टपणें बोलून आपलें असें मत जाहीर केलें कीं, "रखमाबाईच्या मदतीकरितां जी कमिटी निर्माण झाली आहे तिचा सदर बाईला कैद होऊं नये एवढा हेतू आपणास मान्य आहे. पण कमिटी वास्तविक यापलीकडे जात आहे. म्हणून कमिटीनें दोन तीन गोष्टी करूं नये, व आपण करणार नाहीं असें जाहीरहि करावें. त्या गोष्टी या, "हिंदु-लोकांतील लग्नासंबंधीं हक्कस्थापनाचा दावा कोर्टानें चालवूं नये असें आम्ही मागूं नये. लहानपणीं लग्नें करण्याची चाल मोडण्याचा ह्या कमिटीशीं संबंध असूं नये. हायकोर्टाच्या निकालावर प्रीव्ही कौन्सिलला अपील करूं नये, कारण हायकोर्टानें दादाजीची फिर्याद घेतली आहे व ती घेण्याचा त्याला अधिकार आहे. दुसरें, रखमाबाईच्या लग्नाला तिची संमति नव्हती हा मुद्दा पुढें आणण्याच्या भान-गडींत आपण पडूं नये; कारण हा मुद्दा आपण पत्करिला कीं, हिन्दुसमाजाचें व आपलें वैर जुंपलेंच; व मग मी त्यांत समाजाच्याच बाजूला जाईन."

तेलंगासारख्याचे असे विचार असतां वामनराव मोडकांनीं 'केसरी' 'नेटिव्ह ओपिनियन,' वगैरे पत्रांनीं अंगिकारलेल्या धोरणावर बरीच टीका केली; व त्यांचे धर्मसमर्थनाचे विचार त्यांच्या संपदकांना मिळालेल्या उदार शिक्षणास शोभत नाहींत असें हिराबागेंतील एका व्याख्यानांत सांगितलें; आणि हे राष्ट्रीय वृथाभिनाची हांजी हांजी करणारे लोक समाजांतील वाईट चालीरीतींना उत्तेजन देतात असा दोषहि दिला. ह्या गोष्टीस अनुलक्षून केसरीनें ता. ३१ मे १८८७ च्या अंकांत आपल्या सामाजिक धोरणाचा खुलासा मुद्दाम केला आहे. "खरोखर वाईट अशा एतद्देशीय रीतीभातींस केसरी कधींहि दोष दिल्यावांचून राहिला नाहीं. त्या हळू हळू परंतु खास दूर केल्या पाहिजेत, असेंच केसरीनें सदासर्वकाळ मत दिलें आहे. परंतु या गृहस्थांचें हळु हळु निराळें व आमचें निराळें. यांचें हळु हळु म्हणजे एकदम कायदा; व आमचें हळू हळू म्हणजे ज्ञानप्रसार. ह्यास आम्ही काय करावें ?"

रावबहादूर रानडे ह्यांनीं पुण्यांत याच सालच्या मे महिन्यांत, वक्तृत्वसमारंभाच्या समारोपाच्या वेळीं वक्त्यांच्या भाषणावर टीका करतांना, 'स्त्रीपुरुषांचा विवाहसंबंध व त्याची अंमलबजावणी' या विषयावर जंगी भाषण केलें. त्यांत त्यांचा मुद्दा असा होता कीं, हल्लींचा कायदा स्त्री व पुरुष या दोघांसहि सारखाच लागू आहे. मात्र केवळ व्यवहारांत तो स्त्रियांपेक्षां पुरुषांना कमी कडकपणानें वागवितो. स्त्रियांस शास्त्रकारांनीं फारच सवलतीनें वागविलें आहे, व त्या दोषी असल्या तरी त्यांना घरांत नांदवून घेतल्या पाहिजेत; व्यभिचारिणी स्त्रीचाहि त्याग करूं नये; कारण 'रजसा शुध्यते नारी' असें वचन आहे. नवराबायकोच्या परस्पर फिर्यादी कोर्टांत घेतल्या जाव्या व ठरावाची योग्य अंमलबजावणीहि व्हावी; परंतु ज्या रीतीनें अम्मल केला असतां त्रास अधिक होऊन वैमनस्य वाढतें, अशा रीतीनें अम्मल होऊं नये. धर्मशास्त्रानें स्त्रियांच्या पोषणाचें तारतम्य स्त्रियांच्या

वर्तनाप्रमाणें ठेविलें आहे. निर्दोषी स्त्रीस पति नांदवीत नसेल तर पतींकडून अन्नवस्त्र जास्ती किंवा कमी देववावें इंच शासन. परंतु नांदणुकीसाठीं पुरुषास किंवा स्त्रीस दंड किंवा शिक्षा ठेवूं नये, व हें हल्लींच्या कायद्यांत नसेल तर कायदा तितका दुरुस्त करावा."

या व्याख्यानास टिळकांनीं लगेच पुढच्या केसरींत ( ७ जून १८८७ ) सप्रमाण उत्तर दिलें. "सभां वा न प्रवेष्टव्यं वक्तव्यं वा समंजसम्" हें मनूंतील अवतरण घालून सुरवातीसच खालीलप्रमाणें कडक शब्दांनीं केसरीनें हल्ला केला आहेः–"भारती युद्धांत ज्याप्रमाणें शिखंडीस पुढें करून वृद्ध पितामहास जिंकण्याचा पांडवांनीं प्रयत्न केला होता, त्याप्रमाणेंच कांहीं अंशीं पुरातन आर्यधर्माची खच्ची करण्याच्या इराद्यानें, हिंदुशास्त्रकारांची स्त्रियांवर सदय दृष्टि आहे असें मनांत आणून, रखमाबाईस पुढें करून, तिच्या आड्न आमच्या पुरातन धर्मावर गोळ्या झाडण्याचें साहस सुधारकांनीं मांडलें होतें; व त्यांना अशी बळकट आशा होती कीं, या स्त्रीछत्राखालीं बृहन्नडेप्रमाणें आपण सहज विजयी होऊं. पण त्यांच्या दुर्दैवानें हा जो त्यांनीं अखेरचा उपाय योजिला त्याची व त्याबरोबरच त्यांच्या वृथा मनोरथाची एकदम वाताहात झाली." नंतर धर्मशास्त्रांतील प्रमाण ग्रंथ व त्यांची सरणी यांविषयीं सप्रमाण विवेचन करून, व एकवाक्यतेचें महत्त्व सांगून, टिळकांनीं असें प्रतिपादन केलें कीं, स्मृतिग्रन्थांत स्त्रियांचें रक्षण करणें याचा अर्थ नुसता स्त्रियांनीं स्वतंत्र रीतीनें उदरपोषण करूं नये; त्या कशाहि असल्या तरी पुरुष नातलगांनीं त्यांना थोडें तरी पोटगीदाखल दिलेंच पाहिजे, असा अर्थ नाहीं. स्मृतिकारांनीं स्त्रियांचें स्वातंत्र्यच काढून घेतलें आहे. रक्षण याचा अर्थ स्वतंत्र रीतीनें वागूं देऊन संकटापासून रक्षण असा नव्हे, तर स्त्री ताब्यांत ठेवावी असाच त्याचा अर्थ आहे. खिस्ती धर्मशास्त्रांत आदामनेंहि आपल्या मुलीशीं म्हणजे ईव्हशीं शरीरसंबंध केला अतएव रा. ब. म्हणतात कीं, " न स्त्री स्वातंत्र्यमर्हति " याचा अर्थ अत्यन्त संकोचाचा घ्यावा लागतो ! अहो युक्तिः । अहो अकांडपांडित्यप्रकर्षः । कोठें महाभारत ! कोठें मनू ! व कोठें आमचे रावबहादूर ! वेदवाक्यांतून आगगाडी किंवा तारायंत्र काढण्याचा प्रयत्न जितका असमंजस आहे तितकाच स्मृतिग्रंथांतून स्त्रीस्वातंत्र्यपर वचनें काढण्याचा होय."

पुढील लेखांत, पतित्यागास स्मृतिकारांनीं राजदंड सांगितला आहे हें सिद्ध करून शेवटीं टिळक लिहितात–" हल्लींपेक्षांहि जुने शास्त्री अधिक कडक होते. हल्लीं नवऱ्याची फिर्याद दिवाणींत तरी होते. पूर्वीं ती फौजदारींत होत असे. वस्तुतः रावबहादुरांस धर्मशास्त्राच्या मानगडींत पडण्याची मुळींच जरूर नव्हती. आजकाल कोणतीहि सुधारणा करणें असल्यास डॉ. कीर्तिकर म्हणतात त्याप्रमाणें ती सयुक्तिक, आवश्यक व सुकर आहे कीं नाहीं एवढाच खरोखर

विचाराचा भाग असतो. असा विचार करण्यास आमचेकडून कोणतीहि हरकत नाहीं; पण जेव्हां रावबहादुरांसारखे विद्वान व अनुभविक लोक स्वपक्षसमर्थनार्थ आपल्या ज्ञानाच्या व चातुर्याच्या जोरावर लोकांस मोहून टाकण्यास प्रवृत्त होतात तेव्हां आम्हांसहि आमच्या वाचकांच्या डोळ्यांत थोडें अंजन घालावें लागतें."

डे.ए. सोसायटींतील बहुमत निदान या वादापुरतें तरी टिळकांच्या बाजूचें होतें असें आम्ही म्हटलें आहे; व त्याचें प्रत्यन्तर हेंच कीं, वामनराव आपटे हे इतर बाबतींत या वेळीं सोसायटींतले टिळकांचे प्रतिपक्षी असतां त्यांनींहि या सामाजिक विषया-वर एक निबंध लिहून रा. ब. रानडे यांचें म्हणणें खोडून काढलें. आपटे लिहि-तात " पिन्हे साहेबांनीं रखमाबाईसारखा निकाल दिला त्या दिवशीं सुधारकांना वाटलें कीं, आपल्या देशांतील रानटी व अन्यायी अशा बालविवाहपंथाचा विध्वंस होऊन आजपासून न्यायमूर्तींचा अवतार या हिन्दभूमितलावर झाला. असंमत विवाह ज्यांस असंमत होता त्या लोकांना अत्यानन्द होऊन ते त्या भरांत नाचूं लागले. शृंगाररसाभिज्ञ न्यायाधिशाकडून हा न्याय मिळाल्याबरोबर त्यांच्या स्तुत्यालापांनीं त्रिभुवन दणाणून गेलें. आजपासून स्त्रीजातीच्या उन्नतीस आरंभ झाला असा प्रवाद ऐकूं येऊं लागला. कारलाइल येथील धर्मोपदेशकांस खुद्द रख-माबाईनेंहि लिहिलें कीं, जर चौकशीअन्ती खटल्याचा निकाल फिरला नसता तर हजारों स्त्रियांचें अकोट कल्याण होऊन स्त्रीदास्यविमोचनाचा ध्वज आज चहूं-कडे फडकत राहिला असता. पण दैवाची गति विचित्र आहे. पिन्हे साहेबांचा निकाल फिरल्यामुळें सुधारक दुःखसागरांत गटंगळ्या खाऊं लागले व सर्वत्र हाहाःकार झाला." सुधारकांची थट्टा हे 'आगगाडी सुधारक' अशा शब्दांनीं करून आपटे म्हणतात, " अशा सुधारकांच्या अग्रणींनीं आपल्या मठांतून आज्ञा-पत्रें काढून हा निकाल न्यायविरुद्ध आहे असें फर्माविलें!" आपट्यांनीं स्त्रियांच्या संबंधानें स्मृतिकार खरोखर काय म्हणतात याचें सविस्तर विवेचन करून टिळकांचेंच समर्थन केलें. सहधर्मचारिणी या शब्दाचा रानड्यांचा अर्थ बरोबर नाहीं, स्त्रियांना सुबुद्ध व सुशिक्षित करणें हें मात्र कर्तव्य आहे, सर्वच हक्क सारखे म्हणण्यांत अर्थ नाहीं. कायद्याच्या दृष्टीनें आपटे यांनीं असें सांगितलें कीं, १८७६ मध्यें यमुनाबाईविरुद्ध एन्. एम्. पेंडसे या खटल्यांत मेल्व्हिल व वेस्ट या न्यायाधिशांनीं असा निकाल दिला कीं, स्त्रीच्या जिवास अपाय होईल तरच तिला नवऱ्याच्या घरीं जाण्यास भाग पाडतां येणार नाहीं; एरवीं तिला सुटका नाहीं. व १८७७ सालीं कलकत्ता हायकोर्टांत गार्थ व पॉन्टिफिक्स या न्यायमूर्तींनीं दुर्व्यसनी नवऱ्याचाहि या बाबतींत हक्क अबाधित मानिला. तेव्हां रखमाबाईची स्थिति याहून पुष्कळ चांगली. अर्थात् सुधारकांनीं तिची तळी उच-लून धरण्यांत अर्थ नाहीं. इ०

१८८७ ची वसंत व्याख्यानमाला बहुधा या सामाजिक वादानेंच दुमदुमून

गेली. एकदां डॉ० गर्दे यांच्या व्याख्यानावर वादविवाद होत असतां रा० ब० रानडे व वामनराव आपटे यांची समक्षच चकमक झडली. रानड्यांचें म्हणणें स्त्रीशिक्षणाची मजल नृत्यगायनापर्यंतहि जाऊं शकते. आपट्यांचें म्हणणें स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत आज भलभलते प्रकार शिरवाल तर कदाचित् स्त्रियांच्या जन्माचें मातेरें होईल. आपटे यांचें असेंहि म्हणणें पडलें कीं, आम्ही पुरुषच जर मुळीं इंग्रजी हें जुलमानें शिकतों तर स्त्रियांवर इंग्रजी शिक्षण मुद्दाम कां लादावें ?

हा सर्व प्रकार पाहून पुष्कळ लोक मोठ्या बुचकळ्यांत पडले. आगरकरांचीं मतें पहावीं तर अशीं. टिळकांचीं अशीं. आपट्यांचीं अशीं. सोसायटींतील पक्षभेद पहावे तों एका प्रकारचे, बाहेरचे पहावे तों दुसऱ्या प्रकारचे. लोकांची समजूत अशी कीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या तहाहयात सभासदांच्या मालकीचीं किंवा मतांचीं केसरी व मराठा हीं पत्रें, आणि सोसायटींत तर रानड्यांचें वजन अधिक. आपटे देखील टिळकांचे पक्षपाती ! तेव्हां हें सर्व गौडबंगाल आहे तरी काय ? या शंकेला उद्देशून ता० २८ जून १८८७ च्या केसरींत संपादकांनीं खालील खुलासा केलेला आढळतो. " हल्लींच्या लाइफ मेंबरांत केसरी मराठ्याशीं संबंध नाहीं असे लोक आले ( गोखले भानू वगैरे कीं काय ? ) त्या दिवशींच हीं दोन्हीं पत्रें लाइफ मेम्बरांचें ऑर्गन ( मत दर्शविणारीं ) नाहींत असें झालें. लाइफ मेम्बरांपैकीं कांहींचा संबंध या पत्रांशीं आहे. येवढ्यावरून त्यांत येणाऱ्या लेखांची जबाबदारी सर्वांच्या माथ्यावर मारतां येत नाहीं." हा खुलासा आगरकरपक्षाच्या लोकांची कुचंबणा दूर करण्याकरितां घातला असावा हें उघड दिसतें. कारण अद्यापि केसरीचे प्रकाशक व एडिटर आगरकर अशी लोकांची बाहेर समजूत, व आंतील लेख तर सुधारकांविरुद्ध ! शेवटीं ही कुचंबणा १८८७ च्या आक्टोबर महिन्याच्या अखेरीस एकदाची संपली. ता. २५ आक्टोबरच्या केसरीच्या अंकांत पहिलेंच पांच ओळींचें स्फुट महत्त्वाचें आलें, तें असें " आजपासून रा० बाळ गंगाधर टिळक बी. ए. एल्एल्. बी. हे केसरी पत्राचे प्रकाशक झाल्यामुळें प्रकाशकत्वाची जबाबदारी त्यांच्याच शिरावर आहे. रा. गोपाळ गणेश आगरकर एम्. ए यांच्यावर ती जबाबदारी राहिली नाहीं. "

अशा रीतीनें आगरकर यांचा केसरीशीं ६।७ वर्षें असलेला संबंध कायमचा तुटला, व पुढें एक वर्षानें गोपाळराव गोखले यांच्या साहाय्यानें आगरकरांनीं 'सुधारक' हें पत्र काढलें. अजूनहि पूर्वींचे संबंध लक्षांत घेऊन, आगरकरांनीं स्वतंत्र वर्तमानपत्र काढून आधींच पण आंतल्याआंत असलेल्या दुहीला जाहिरातीनें जोर आणूं नये, वाटल्यास आपली सही घालून केसरींत मजकूर लिहावा, असें टिळकांचें म्हणणें होतें. पण तें म्हणणें आगरकरांना रुचलें नाहीं. एका अर्थानें आगरकरांचें म्हणणें बरोबर होतें. केवळ सामाजिक विषयावर मनाप्रमाणें निखालस एकान्तिक मतें लिहून सुधारणा प्रवर्तन करणें हेंच जर आगरकरांनीं आपलें ध्येय ठरविलें असलें, तर

स्वतःच्या सहीनें केसरींत एखाद दुसरा लेख लिहून त्यांची हौस कशी भागणार ? केसरीतील जागा स्वतः केसरीच्या संपादकासच आपल्या कामाला पुरेशी पडण्यासारखी नव्हती. फार तर दर अंकांत त्यांना आगरकरांच्या लेखास एक दोन कॉलमच जागा देतां आली असती; व कित्येक वेळां लेख मागें ठेवावा लागला तर आगरकरांचा त्याबद्दल गैरसमज होऊन त्यांना वैषम्यहि वाटलें असतें. शिवाय, केसरी मराठा हीं पत्रें जर डेकन एज्युकेशन सोसायटी या संस्थेचीं म्हणून चाललीं असतीं तर, एखाद्या कॉलेज मॅगेझिनमध्यें जसे अनेक लेखक आपल्या सहीवर निरनिराळे लेख लिहितात त्याचप्रमाणें, केसरी मराठ्यांतहि सोसायटींतील निरनिराळ्या सभासदांचे लेख आप-आपल्या सहीवर प्रसिद्ध होत राहिले असते. त्यांत कांहीं वावगें झालें नसतें. पण सोसायटीनें या पत्रांची मालकी व जबाबदारी केव्हांच झिडकारून टाकली होती. बरें, खुद्द सोसायटीच्या कामांच्या बाबतींत जरी सर्व सभासदांचें एकमत व रहस्य असतें, आणि वर्तमापत्रांतील मजकुरापुरताच वाद असता, तरी टिळकांच्या सूचनेंत कांहीं स्वारस्य असतें. पण मतभेदामुळें आंत व बाहेर दोन्ही ठिकाणीं सभासदांच्या मनाचें आभाळ फाटलें असल्यामुळें, टिळकांच्या सूचनेप्रमाणें आगरकरांनीं आपल्या सहीवर केसरींत लेख लिहिण्याचें कबूल करून एक ठिगळ जोडून कांहीं फारसा फायदा नव्हता. शिवाय टिळक आगरकर हीं दोन्हीं नांवें केसरीच्या वाचकांना प्रमाण व प्रिय वाटत असलीं तरी, एकाच अंकांतील शेजार शेजारच्या रकान्यांत अगदीं परस्परविरोधी सामाजिक मतें प्रतिपादन केलेलीं नित्य वाचून उडणारा घोटाळा वाचकांनीं तरी किती दिवस सोसला असता ह्याचाहि संशयच आहे.

तात्पर्य, ज्या कारणाकरितां टिळकांना पुढें सोसायटींत राहणें अशक्य झालें त्याच कारणाकरितां आगरकरांनाहि आधीं केसरी सोडणें भाग पडलें, असें आम्हांस वाटतें. सोसायटींत अंतस्थ वादांत टिळकांविरुद्ध बहुमत आणि सामाजिक वादांत आगरकरांविरुद्ध बहुमत. यामुळें टिळक व आगरकर ह्या दोघांचेंहि सुख दुःख सारखेंच होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. आतां टिळकांनीं सोसायटी सोडल्यावर वेगळी शाळा किंवा कॉलेज काढून सोसायटीशीं स्पर्धा केली नाहीं; व आगरकरांनी मात्र केसरी सोडल्यावर स्वतःचें असें वर्तमानपत्र काढून केसरीशीं स्पर्धा सुरू केली असाहि एक आक्षेप येतो. परंतु सूक्ष्म दृष्टीनें पाहातां त्याचेंहि उत्तर देतां येण्यासारखें आहे. टिळकांनीं शाळा व कॉलेज काढलें असतें, व स्वतः ते त्याचे मालक सुपरिंटेंडेंट किंवा प्रिन्सिपॉल झाले असते तरी आपल्या संस्थेतील शिक्षक किंवा प्रोफेसर मंडळींना त्यांना केवळ नोकराच्या रीतीनें न वागवितां जवळ जवळ बरोबरीचे मित्र या नात्यानें वागवावें लागलें असतें. पण असल्या या नव्या प्रपंचांतील स्वाभाविक अडचणी, विशेषतः टिळकांचा एकतेरी स्वभाव व स्वातंत्र्यप्रियता, हीं लक्षांत घेतलीं म्हणजे पूर्वीच्या

अनुभवावरून ते शाळा किंवा कॉलेज काढण्याचे भानगडींत पडले नाहींत ही गोष्ट त्यांनीं योग्यच केली असें म्हणावें लागतें. उलट वर्तमानपत्र हा एकखांबी तंबू होऊं शकतो, त्याचा डेरा वाटेल तेव्हां उभारावा, व वाटेल तेव्हां मिटवावा; त्याचें सर्व काम जरूर तर एकट्यालाच करतां येतें. यामुळें वर्तमानपत्र चालविणें सुलभ ठरतें. अर्थात् केसरी हातीं घेऊन तो एकतंत्री चालविण्यांत जें टिळकांनीं साधलें तेंच आगरकरांनीं सुधारक काढून साधलें. आतां प्रत्यक्ष दोन वेगळीं वर्तमानपत्रें निघाल्यामुळें त्यांतील झगडे वाढले हें स्वाभाविकच होतें. पण भांडणें मिटविण्याचा उभयपक्षींहि असा काय मोठा उपक्रम किंवा कळकळीचा प्रयत्न सुरू होता कीं, वेगळीं वर्तमानपत्रें निघण्याच्या गोष्टीलाच फक्त दोष ठेवावा ? सुधारक न निघता तरी ज्ञानप्रकाश, पुणेंवैभव व केसरी असा हा तिरंगी सामना पूर्वी सुरू होता, तोच आतां चौरंगी सामना सुरू झाला इतकाच फरक !

तात्पर्य, आगरकरांनीं स्वतंत्र वर्तमानपत्र काढलें, हा वादांतील आक्षेप म्हणून बरोबर नाहीं. तरी त्यांनीं केसरी हातचा जाऊं दिला ही गोष्ट मात्र फारशी समर्थनीय नाहीं. सोसायटीनें जेव्हां छापखाना व वर्तमानपत्रें हीं सोसायटीपासून अलग केलीं तेव्हां आगरकरच संपादक होते. नंतर कांहीं दिवस वर्तमानपत्रें सर्व सभासदांच्या मालकीचीं म्हणून चालविल्यावर, तीं पुढें वाटेल त्या एकानें घेऊन सांभाळावीं व चालवावीं, सर्वांना त्याशीं कारण नाहीं, असा बूट निघाला तेव्हां आगरकर हे केसरीचे संपादक असल्यामुळें त्यांनाच तीं प्रथम देऊं करण्यांत आलीं. पण कर्जाच्या सबबीवर त्यांनीं तीं स्वतःकडे घेण्याचें नाकारलें ! वास्तविक या कर्जास अमुक एकच सभासद जबाबदार किंवा कारणीभूतहि होता असें म्हणतां येत नाहीं; स्वतः आगरकर हेहि त्या कर्जाला अंशतः कारणीभूत होते. बरें जीं पत्रें व छापखाना वासुदेवराव केळकर व टिळक यांना कर्जासह पत्करितां आलीं, तींच आगरकरांनीं पत्करून चालवावयास व त्यांतून आपलीं स्वतंत्र मतें मनसोक्त प्रतिपादन करण्यास काय हरकत होती ? पण आगरकरांच्या अंगीं टिळकांइतका करारीपणा असला तरी टिळकांइतका कर्तेपणा नव्हता.

खुद्द आगरकरांच्या अमदानींत केसरीचा खप बराच वाढला होता. ३७०० हून अधिक प्रति खपतात अशीं अक्षरें आगरकर मोठ्या अभिमानानें केसरीच्या शिरोभागीं केव्हां केव्हां घालीत. असें होतें तर केसरी त्यांनीं हातचा सहसा घालवावयास नको होता. तसें न झाल्यामुळें १८८४ ते १८८७ या सालांत आगरकरांना वादांत थोडें थोडें मागें हटत जावें लागलें; मनसोक्त लिहिण्याची हौस फिटली नाहीं. उघड सहीवर अगर लि. आ. म. ह्या मथळ्याखालीं लेख लिहावे लागले व शेवटीं आपण होऊन केसरीचे प्रकाशकत्व टिळकांच्या हातीं द्यावें लागलें, हा टिळक व आगरकर ह्यांच्या युद्धांतील आगरकरांचा पराभव असेंच म्हणण्यास हरकत नाहीं. सुधारक निघाल्यावरहि त्याची स्थिति काय झाली; गोखल्यांची इंग्रजी लेखनाची

हौस व आगरकरांची मराठी लेखनाची हौस हीं एकाच पत्रांत कोंडल्यामुळे वाचकांच्या दृष्टीनें इंग्रजी रकान्यांनीं मराठीचें व मराठी रकान्यांनीं इंग्रजीचें मांस तोडून कसें खाल्लें, पहिल्या वर्षाच्या अखेरीस आगरकर व गोखले ह्यांना सालीना पन्नास रुपये पगार कसा पडला; याच्या उलट टिळकांच्या अंगच्या व्यावहारिक ज्ञानामुळें छापखाना व वर्तमानपत्रें समाईक मालकीतून काढून व्यक्तीच्या मालकीचीं करण्याचे वेळीं दिवेघेवी झडल्या व आढावे काढण्याला टिळकांनाच कसें नेमण्यांत आलें; नवीन म्यानेजर ठेवून त्याजकडून कारखान्याची सुधारणा करण्याचें कामहि टिळकांकडेच कां दिलें; व पुढें १८९१ सालीं मराठा व केसरी आणि वासुदेवराव केळकर व टिळक ह्यांच्यांत बेबनाव होऊन दोन्हीं पत्रांचा मालक कोणीतरी एक व्हावा अशी तोड निघाली तेव्हां एका अंगास छापखाना आणि दुसऱ्या अंगास वर्तमानपत्रें व त्याच्या डोक्यावर सात हजारांचें कर्ज अशा वांटण्या मांडल्या असतां, टिळकांनीं कर्जासह वर्तमानपत्रें ही वांटणी कशी पत्करली; पुढें तें कर्ज फेडून कारखाना सुव्यवस्थ व संपन्न कसा केला-हें सर्व खुलासेवार सांगण्याचें हें स्थळ नव्हे. तथापि येथें टिळक विरुद्ध आगरकर ह्या युद्धांत आगरकरांचा पराजय होण्यास त्यांचे अंगीं व्यावहारिक ज्ञान व वर्तमानपत्र यशस्वी करण्याची धमक नव्हती, व या दोन्ही गोष्टी टिळकांच्या अंगीं होत्या, ह्या अनुमानाचा उल्लेख करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

ता. २५ आक्टोबर १८८७ रोजीं टिळक हे आगरकरांऐवजीं केसरीचे प्रकाशक म्हणून जाहिर झाले. त्यावेळच्या छापखान्यांच्या कायद्याच्या उदासीन वृत्तीमुळें हल्लींप्रमाणें वर्तमानपत्रांवर प्रकाशकाचें किंवा संपादकाचें नांव स्पष्टपणें लिहिण्याचें कारण नव्हतें. टिळक केसरीचे प्रकाशक झाले तरी पत्राच्या चौथ्या पानाच्या शेवटीं नेहमींप्रमाणें "आर्यभूषण छापखान्यांत मालकाकरितां छापून प्रसिद्ध केलें" येवढेच शब्द येत असत. ज्यानें ता. २५ चा अंक वाचला नाहीं त्याला टिळक हे केसरीचे प्रकाशक झाल्याची बातमी कर्णोपकर्णीं किंवा खुद्द केसरींतील अंतर्गत पुराव्यावरून मिळेपर्यंत अर्थातच थांबावें लागणार होतें. तथापि याच अंकापासून केसरीच्या दृश्य व जडस्वरूपांत एक फेरफार घडून आला. तो हा कीं, यापूर्वीं अग्रलेख व स्फुटसूचना यांपुरता ग्रेटप्रायमर म्हणजे किंचित् डगळ असा टाइप घालण्यांत येत होता; परंतु लिहावयाचें पुष्कळ व जागा थोडी असें भासूं लागल्यामुळें, वरील मजकुरालाहि पायका म्हणजे बारीक टाइप वापरण्यांत येऊं लागला. आर्यभूषण छापखान्याची स्वतःची टाइप फौंडरी होती; पण बारीक चांगल्या वळणाच्या टाइपाला लागणाऱ्या मोट्रीसा नव्हत्या. परंतु मुंबईच्या गणपत कृष्णाजी प्रेसच्या मालकांनीं आपल्या जवळील पायक्याच्या ठशांनीं, म्हणजे पंचांनीं, नवीन मोट्रीसा तयार करून त्या आर्यभूषणला विकत दिल्या, व अशा रीतीनें आर्यभूषण छापखान्यांत लागेल तेव्हां हवा तितका पायका टाइप पाडण्याची

व्यवस्था झाली. केसरीच्या वाचकांना ग्रेटप्रायमर टाइप वाचावयास अधिक सोयिचा असला तरी, बारीक टाईप घातल्यानें तेवढ्याच जागेंत थोडा अधिक मजकूर मावतो ही हौशी वाचक व हौशी लेखक या दोघांच्याहि दृष्टीनें सोयच झाली म्हणावयाची.

आगरकरांनीं केसरीचें प्रकाशत्व सोडून दिलें तरी स्वतंत्र वर्तमानपत्र काढण्याचा त्यांचा विचार एकदम ठरला नाहीं. पुढें कांहीं दिवस आगरकर हे लिहून आलेला मजकूर या सोईच्या सदरांत केसरींत लेख लिहीत. अशा प्रकारची स्वतंत्रता लाभल्यावर त्यांच्या लेखांत निर्भीडपणा पूर्वींहूनहि अधिक विनटला यांत आश्चर्य नाहीं. पुढच्याच म्हणजे त्रेचाळिसाव्या अंकांत 'लिहून आलेला मजकूर' म्हणून "फीमेल हायस्कुलांतील शिक्षणक्रम" या मथळ्याखालीं केसरीच्या अग्रलेखाहूनहि मोठा असा आगरकरांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत सदर हायस्कुलांतील शिक्षणक्रमावर पूर्वी केसरींत ओळीनें जे चार टीकात्मक अग्रलेख आले होते, त्याला मोठें वक्तृत्वपूर्ण असें उत्तर दिलें आहे. या लेखांतील चार दोन वाक्यें कोठेंहि पाहिलीं कीं, 'अरे, नांव नसलें तरी ही आगरकरांची लेखणी' असें कोणीहि एकदम उद्गारल्यावांचून राहणार नाहीं.

या लेखांत आगरकरांनीं केसरीकारांना 'परशुरामाचा अवतार' असें निंदागर्भ विशेषण लाविलें आहे. हें विशेषण सुचण्याचें कारण, केसरीचे नवे प्रकाशक कोंकणस्थ ब्राह्मण व स्वतः आगरकर हे कऱ्हाडे हें असावें अशी कुत्सित शंका क्षणभर तरी मनांत येत नाहीं काय? परशुरामानें बापाची आज्ञा मान्य करून आईचा शिरच्छेद केला, अशा अर्थाचें संस्कृत अवतरण या लेखावर घातलें आहे. आणि हिंदुधर्मशास्त्रप्रणेत्या आपल्या पुरुषपूर्वजांच्या वचनांचा आधार घेऊन स्त्रियांना अज्ञानपंकांत गळ्याइतक्या रुतलेल्या ठेवावयाच्या हा त्यांचाहि एक प्रकारचा शिरच्छेदच होय! अशा रीतीनें दाखला समर्पक बसतो हें खरें. तथापि, "तुम्ही कोंकणस्थ ब्राह्मण म्हणजे आपल्या आयांचे काळ" असें आगरकर खोकत खोकत पण चिडून जाऊन त्वेषानें समोर असलेल्या टिळकांना म्हणत आहेत, असें चित्र हा लेख वाचतांना वाचकाच्या डोळ्यांपुढें उभें राहतें. या लेखांतील एक दोनच वाक्यें आम्हीं उदाहरणार्थ देतों:—"बेहत्तर आहे, यापेक्षां धर्मत्याग करूं, भाषात्याग करू, आचार व रूढि झुगारून देऊं, परंतु अंतःकरणाची व बाह्याचरणाची अत्युन्नति जोडूं! या निकराचे प्रसंगीं जर आज आमची हिंदुस्थानावर सत्ता असती तर या समर्थी हिंदुधर्मशास्त्रें व तत्प्रतिपादक यांस आम्हीं अग्निशुद्धच करून घेतलें असतें......... सर्व बुद्धिमान विचारी व समंजस लोकांस हात जोडून येवढेंच मागणें आहे कीं, आपलें मनःपूर्वक सहाय्य देऊन, या सुधारणाशकटाची धुरा मानेवर घेऊन धुरंधरपणें ती तडक धवल गिरीचे मस्तकावर पोंचवून, आजपर्यंत राजर्षींनीं, ब्रह्मर्षींनीं, भट्टाचार्यांनीं किंवा

साधुसंतांनीं कोणीहि कधीं संपादिलेलें नाहीं असें महाद्‌ श्रेय तुम्ही संपादा ! "

केसरींतील आगरकरांचे लेख यापुढें क्रमाक्रमानें कमी होत जाणार म्हणून या लेखांत स्त्रियांच्या स्थितीसंबंधानें त्यांनीं केलेल्या वर्णनापैकीं चार जळजळीत वाक्यें अधिक द्यावींशीं वाटतात तीं येथें देतों. " स्वयंपाकिणीचें किंवा मोलकरणीचें काम उत्तम करणें ही स्त्रीजातीच्या गुणांची या देशांत कमाल समजली जाते. व या त्यांच्या गुणांचा अलभ्य लाभ आपणांस जितका लवकर होईल तितका करून घेण्याकरितां देशाचा देश दहापंधरा वर्षांच्या आंत विवाहादि सर्व कार्यें आटोपून स्वस्थ होतो ! मग ह्या महान गुणवती सहधर्मचारिणीकरितां आमचे तरुण बांड आपली सर्व बुद्धि व करामत खर्च करून द्रव्यार्जनास आरंभ करितात; व स्वयंपाकीण व मोलकरीणबाईस आपलें कौशल्य पूर्णपणें खर्चितां येईल असें एखादें अमंगल घर घेऊन ठाम होतात ! ही स्थिति आमरण सोसणें यास या देशांत कुटुंबसुख असें नांव आहे, व तें आम्हीं सुधारक हिराकून नेऊं म्हणून केसरीकार व त्यांचे अनुयायी भयचकित होऊन गेले आहेत ! एका दृष्टीनें ही महामूढ कुटुंबिनी परिसाप्रमाणें गणिली पाहिजे; कारण एक वेळ घरांत खाण्यास अन्न नसलें तरी चालेल, मुलें लेंकरें घरींदारीं उघडीं वाघडीं हिंडलीं चालतील, पतिरायांनीं राजापुरी पंचावर सर्व दिवस कंठला तरी चालेल, परंतु घरधनिणीचे हातीं पायीं व गळ्यांत सोन्यारुप्याचे व पाचमौक्तिकांचे कृत्रिमालंकार असले पाहिजेत, व तशा त्या विभूषित कर्णेंद्रियांनीं तिनें आपलीं झाडसारवणादि घर्षणप्रधान गृहकृत्यें आटोपलीं पाहिजेत. "

वास्तविक फीमेल हायस्कूलच्या शिक्षणक्रमावर केसरीनें अग्रलेखमालिका लिहून जी टीका केली तींतील बरेच मुद्दे कोणाहि समंजस मनुष्यास पटल्यावांचून राहाणार नाहींत. मुलींना शिक्षण द्यावयास पाहिजे हें कोणासच नाकबूल करतां येत नाहीं. पण विद्यमान फीमेल हायस्कुलांत सगळें घळण व सगळें धोरण विलायती थाटाचें या गोष्टीची चीडहि मनांतून आल्यावांचून राहणारी नाहीं. गावांत दुसरी मुलींची शाळा नाहीं म्हणून नाइलाजानें या शाळेंत लोकांना आपल्या मुली पाठवाव्या लागत ही गोष्ट वेगळी. पण तेथील सर्व शिक्षणक्रम नसला तरी लकब बाडगेपणाची होती. त्यांत पदोपदीं विलायती चालीरीतींचें अनुकरण ठेसून भरलेलें होतें, यांत मुळींच वाद नाहीं. नाइलाज म्हणून स्वतः टिळक हे देखील आपली वडील मुलगी या शाळेंत पाठवीत होते. पण तेथील शिक्षणांत व शिस्तींत दिसून येणारे दोष जर त्यांनीं उघड करून दाखवून विधायक सूचनाहि केल्या तर त्यांत त्यांना दोष कोणी कसा लावावा ! पूर्वीं शारदासदनाच्या दुधानें तोंड भाजल्यावर पुणें फीमेल हायस्कूलचें ताक देखील फुंकूनच प्यावें असें सांगणारावर सावधगिरीच्या अतिशयोक्तीचा दोष येण्यासारखा नव्हता. विला-

यतेस जाऊन शिकून आलेली हिन्दी स्त्री चालकांना मिळती तर त्यांनीं तिला या शाळेची सुपरिंटेंडेंट कदाचित् आनंदानें नेमलें असतें हें खरें. पण तिच्या अभावीं नेमलेली इंग्रज बाई सगळी शिस्त व शिक्षण विलायती सांच्यांतून ओतून काढणार हेंहि कांहीं खोटें नव्हे. आणि कालांतरानें स्त्रीशिक्षणाचे कट्टे पुरस्कर्ते प्रो. कर्वे यांनीं स्त्रियांकरितां वेगळ्या व स्त्रियांनाच योग्य अशा शिक्षणाच्या कनिष्ठ व वरिष्ठ संस्था काढून केसरीच्या या टीकेचें अप्रत्यक्ष समर्थन केलेलें आहे. आगरकरांनीं आपल्या उत्तरांत जर असें म्हटलें असतें कीं "केसरीनें दाखविलेले दोष बरोबर आहेत, परंतु केसरीला हवी तशी निर्दोष शिक्षणसंस्था काढण्याची स्फूर्तिमय विधायक सूचना जर केसरी करीत नाहीं तर त्याच्या नुसत्या विध्वंसक टीकेनें आहे त्या अर्धवट सोईचा विध्वंसच होणार" तर तें बरोबर वाटलें असतें. पण तसें न करतां त्यांच्या प्रतिक्रियारूप टीकेनें, मार्मिक सारासाराची भूमि टाकून देऊन, एकदम रोमँटिक सुधारणेचा धवलगिरी गांठला !

पण खुद्द केसरींत चाललेले आगरकर व टिळक यांचे जे वाद त्यांचा विचार या प्रकरणांत अधिक लांबविण्याचें कारण नाहीं. पुढील वर्षांत आगरकर यांनीं स्वतंत्रपणें 'सुधारक' हें वर्तमानपत्र काढलें. यापुढील त्यांचे वाद सुधारक व केसरी यांतून सुरू झाले. सुधारकाच्या पहिल्याच अंकांत 'सुधारक काढण्याचा हेतु' या विषयावर टिळकांचें नांव न घालतां पण टिळकांनां उद्देशून खालील वाक्यें लिहिलीं आहेत. " लोकमताची सुधारणा व्हावी तरी कशी ? जो तो अस्तित्वांत असलेल्या लोकमतापुढें जाण्यास भिईल तर त्यांत बदल व्हावा कसा ? लोकाग्रणींनीं हें काम पत्करिलें नाहीं तर तें कोणी पत्करावयाचें ? जो तो या लोकमताच्या बागुलबोवास भिऊन दडून बसेल तर कोणत्याहि समाजाला उन्नतावस्था येणार नाहीं. इतकेंच नाहीं तर त्याची चालू स्थिति सुद्धां कायम न राहतां उलट त्यास उतरती कळा लागून अखेर त्याचा ऱ्हास होईल. म्हणून कोणीतरी लोकमतांतील दोषस्थलें दाखविण्याचें व समाजातील बहुतेक लोकांस अप्रिय परंतु पथ्यकर विचार त्यांच्यापुढें आणण्याचें अनभिमत काम करण्यास तयार झालेंच पाहिजे. असें करण्यास लागणारें धैर्य ज्या समाजांतील कांहीं व्यक्तींच्या सुद्धां अंगीं नसेल, त्या समाजानें वर डोकें काढण्याची आशा कधींहि करूं नये. जे कोणी कोणत्याहि मिषानें किंवा रूपानें लोकांपुढें लोकाग्रणी म्हणून मिरवूं लागले असतील त्यांनीं लोकांची मर्जी संपादण्यासाठीं, अथवा त्यांजकडून आपली पाठ थोपटून घेण्यासाठीं, किंवा परोपकाराचें ढोंग करून स्वहित साधण्यासाठीं, त्यांच्या दोषांचें किंवा दुराग्रहांचें संवरण किंवा मंडन करणें अत्यंत लज्जास्पद होय. असे लोकाग्रणी यांस सुमार्ग न दाखवितां केव्हां एखाद्या खड्डयांत नेऊन घालतील हें सांगवत नाहीं. "

पुढें ग्रामण्य वगैरे एक दोन प्रकरणीं, टिळक व आगरकर—ऊर्फ केसरी व

सुधारक–यांच्यांतील वादांचा उल्लेख फिरून एक दोन वेळ करावा लागणार आहे. यामुळें आगरकरांसंबंधाचें विवेचन तूर्त येथेंच संपवूं. त्यापूर्वी येवढेंच सांगितलें पाहिजे कीं, सुधारक चालविण्याच्या कामीं आगरकरांस गोपाळराव गोखले यांची जोड मिळाली होती; व दोघांनाहि आपापल्या आवडत्या भाषेंत लिहिण्यास वाव मिळावा म्हणून सुधारकांत इंग्रजी व मराठी असा दोन्ही प्रकारचा मजकूर घालण्यांत येत असे. गोपाळराव गोखले हे सन १८८५ सालीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीला येऊन मिळाले. ते वयानें लहान पण बुद्धीनें तरतरीत असून गणितविषयांत बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गांत पास झाले होते. गणितविषयांत निष्णात असणाऱ्या होतकरू मनुष्याला त्यावेळीं, इंजिनियरिंग कॉलेजच्या अखेरच्या परीक्षेंत त्याचा पहिला नंबर आल्यास, एक्झिक्युटिव्ह इंजिनियरची म्हणजे बऱ्याच मोठ्या पगाराची जागा मिळण्याचा संभव असे. त्याप्रमाणें गोपाळराव हे प्रथम तिकडे जाऊन दाखल झाले देखील. परंतु पुढें तो मार्ग न पटून नुकत्याच निघालेल्या फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसरीचें काम त्यांनीं पत्करिलें. गोपाळराव नेहमीं सांगत कीं, मी सोसायटीला येऊन मिळालों तो मूळ केवळ टिळकांच्या उदाहरणाच्या स्फूर्तीनें. पण पुढें सोसायटींत आल्यावर एकंदरीनें आगरकरांचीच मतें त्यांना अधिक पसंत पडूं लागली. केसरी–मराठा वर्तमानपत्रांशीं, गोखले सोसायटींत आले त्यावेळीं, सोसायटीचा संबंध सर्वस्वीं तुटला नव्हता; तरी सदर पत्रांत गोखले यांनीं कधीं लिहिण्याचें काम केलें नाहीं.

गोखले पुण्यांत आल्यावर लवकरच माधवरावजी रानडे यांची नजर त्यांच्या होतकरूपणावर गेली, व गोपाळरावजांचें जाणें येणें रानड्यांचे घरीं सुरू झाल्यामुळें केसरी व मराठा पत्रांविषयीं आधींच प्रतिकूल असलेलें त्यांचें मन अधिक प्रतिकूल झालें. गणितविषयाप्रमाणें गोखले यांचा इंग्रजी हा विषयहि फार तयार होता. प्रथम ते न्यू इंग्लिश स्कूलमध्यें इंग्रजी शिकवीत. त्यावेळीं त्यांचें इंग्रजी पाठांतर किती उत्तम होतें, इंग्रजी कवितांच्या ओळींच्या ओळी किंवा उत्कृष्ट इंग्रजी गद्यांचीं वाक्येंच्या वाक्यें घडाघड पाठ म्हणून ते विद्यार्थ्यांस कसे चकित करून सोडीत असत, याविषयीं त्यांच्या हाताखालीं शिकलेले लोक अजूनहि गोष्टी सांगतात. पुढें कॉलेजमध्यें देखील गणितविषयाप्रमाणें इंग्रजी विषयहि ते शिकवीत. तात्पर्य, रानडे यांच्या सालमींत राजकीय विषयांच्या अध्ययनास सुरवात झाल्यानें, व इंग्रजी भाषेची आवड त्यांना जात्याच असल्यानें, गोखल्यांना एकादें वर्तमानपत्र आपले विचार लिहावयास हवेंच होतें, व आगरकरांचा सुधारक त्यांचे उपयोगी पडला. गोखले हे सामाजिक सुधारणेचे मनांतून कट्टे पुरस्कर्ते असतां त्यांनीं आगरकरांप्रमाणें त्याविषयाचें जोराचें प्रतिपादन आपल्या लेखणीनें कधींच फारसें केलें नाहीं, किंवा प्रो. कर्वे यांच्याप्रमाणें समाजसुधारणाविषयक संस्था काढणें वगैरे उद्योगहि

केले नाहींत. त्यांचा सर्व भर राजकारणावर होता. यामुळें त्यांच्या सुधारकांतील लेखांत सामाजिक सुधारणेपेक्षां राजकारणाचे विषयच अधिक येत.

अशा रीतीनें 'सुधारका'ला हे दोन आपापल्या परीनें उत्कृष्ट लेखक लाभले. परंतु वर दिलेल्या सुधारकांतील उताऱ्यांत आगरकरांनीं दर्शविल्याप्रमाणें, या पत्रांतील मतें लोकांना अप्रिय होतीं यामुळें त्यांचा प्रसार केसरीइतका झाला नाहीं. सुधारकाच्या पहिल्या वर्षाच्या अखेरीस आगरकरांनीं वार्षिक सिंहावलोकन करतांना थोडासा सांपत्तिक आढावा दिला होता, त्यांत ते व गोखले यांना सुधारकाचा छपाई वगैरेचा खर्चवेंच वजा जातां दरमहिना चार रुपयेप्रमाणें पगार पडला असें लिहिलें होतें असें म्हणतात! पण ही गोष्ट वरील दोघांपैकीं कोणासहि दूषणास्पद नसून एक प्रकारें भूषणास्पदच आहे. लोकांना अप्रिय असलेले विचार आगरकरांसारख्या तीक्ष्ण लेखणीच्या शल्यानें काळजांत भोंसकले जात असतां, पुराणमतवादी लोक त्याला उदार आश्रय देतील हें तर संभवनीय नव्हतेंच. पण सुधारणापक्षपाती असा सुशिक्षित समाज महाराष्ट्रांत बराच मोठा असतांहि, व विशेषतः त्यांतील प्रमुख लोक मोठमोठ्या पगारांच्या जागांवर असतांहि, त्यांच्या हातून सुधारक संपन्न स्थितींत जगवला गेला नाहीं, व महिना चार रुपये इतकें संपादकीय वेतन आपणास मिळाल्याचें जाहीर करण्याची पाळी आगरकरांवर आली ही मात्र खचित आश्चर्याची गोष्ट होय!

गोखले यांचे बरोबर किंवा मागाहून आलेली मंडळी केसरी–मराठ्यांत क्वचित फारशी लिहीतच नसत. त्यांचा संबंध डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील भांडणापुरताच टिळकांशीं आला. जुन्या मंडळींपैकीं गोळे हे मार्मिक लेखक असत; तथापि ते अगदींच प्रसंगविशेषीं लिहीत. गोळे व केळकर यांचा स्वभाव विनोदी असल्यामुळें ते केव्हां केव्हां एकजुटीनें लिहीत.

आगरकर व केळकर यांच्याशिवाय इतर कोणाशीं वर्तमानपत्रांच्या बाबतींत टिळकांचा विरोध आला नाहीं. सोसायटीच्या सर्व सभासदांत वर्तमानपत्रांतून लिहिण्याची हौस असणारे हे तिघेच निघाले. पैकीं केळकरांनीं १८९१ सालीं केसरी मराठा सोडल्यावर वेगळें वर्तमानपत्र काढलें नाहीं. यापुढील त्यांचा जीवनक्रम लक्षांत घेतां, वर्तमानपत्राबरोबरच सार्वजनिक कामाचीहि रजा त्यांनीं घेतली होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कॉलेजांतील शिकविण्याचें काम तेवढें त्यांना अखेरपर्यंत चिकटून राहिलें होतें. आगरकर व टिळक यांनीं मात्र आयुष्याच्या अखेरपर्यंत वर्तमानपत्रांशीं जागता संबंध ठेवला. पण या दोघांच्या सामाजिक विचारसरणींत उत्तरदक्षिणध्रुवाइतकें अंतर असल्यामुळें त्यांच्यातील मतभेद हा सोसायटींतील मतभेद व टिळकांनीं सोसायटी सोडल्यावर त्यांच्यांतील मतभेद हा सर्व महाराष्ट्रांतील मतभेद होऊन बसला. व तसा तो व्हावा अशींच बुद्धिवान, स्वार्थत्यागी, मताभिमानी हीं दोन्हीं माणसें होतीं.

तीक्ष्ण मतभेद असतांहि हे दोघे एकमेकांना मनांतुन चाहत असत. सार्वजनिक वादांत शिवीगाळ झाली असतांहि अखेरच्या दुखण्यांत आगरकरांना टिळकांची आठवण होऊन त्यांनीं त्यांस मुद्दाम भेटीला बोलावून आपलें दुःख हलकें केलें. त्याचप्रमाणें केसरींतला आगरकरांवरील मृत्युलेख लिहीत असतां टिळक घळघळां रडत होते व तो दोन कालमचा लेख लिहिण्याला त्यांना या उमाळ्याचा अडथळ्यामुळें चार तासहि पुरले नाहींत असें सांगतात. या लेखांत टिळकांनीं असें लिहिलें आहे कीं, मृत्यूच्या उग्र स्वरूपापुढें बारीकसारीक मतभेदाच्या गोष्टी आपण विसरून गेलों व जुन्या आठवणी जागृत होऊन बुद्धि व लेखणी गोंधळून गेली. आगरकर हे मूळचे गरीब स्थितींतील असतां त्यांनीं आपल्या शिक्षणाचा उपयोग द्रव्य न मिळवितां समाजाचें ऋण फेडण्याकरतांच केला या गोष्टीला योग्य महत्त्व देऊन टिळकांनीं आगरकरांना त्या पिढीच्या अनेक पुढाऱ्यांहूनहि श्रेष्ठ ठरविलें; तसेंच या लेखांत आगरकरांच्या लेखनकौशल्यासंबंधानें टिळकांनीं असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, "देशी वर्तमानपत्रास हल्लीं जर कांहीं महत्त्व आलें असलें तर तें बऱ्याच अंशीं आगरकर यांच्या विद्वत्तेचें व मार्मिकतेचें फल होय यांत शंका नाहीं." शिवाय हे शब्द मृत्युलेखांतले म्हणून औपचारिक असें मानण्याचें कारण नाहीं. कारण यानंतर २१ वर्षांनीं म्हणजे १९१६ सालीं आगरकरांच्या श्राद्धतिथीच्या उत्सवाच्या संबंधानें केसरींत लिहिण्याचा प्रसंग आला, तेव्हांहि त्यांनीं वरील प्रकारचेच निर्व्याज स्तुतीचे उद्गार काढले होते असें वाचकांस आढळेल.

"सत्याचा, करारीपणाचा एकनिष्ठतेचा आणि स्वार्थत्यागाचा महिमा इतका विलक्षण आहे कीं, भरभराटीच्या पाठीस लागलेल्या मनुष्यासहि दारिद्र्यांत राहून पूर्ण एकनिष्ठेनें देशसेवेस लागणाऱ्या मनुष्याचा महिमा अखेर गावा लागतो." ..."आपल्या कर्तबगारीनें व्यावहारिक उन्नति आपण प्राप्त करून घेऊं असा निश्चित भरंवसा असतां, आगरकरांप्रमाणें मनोदेवतेस साक्ष ठेऊन संकटें विपत्ति हाल अपेष्टा सोसूनहि मी आपले देशकार्याचें मनोगत पूर्ण करीन असें म्हणणारे पुरुषच खरे धीर पुरुष होत." या दोन वाक्यांवरून आगरकरांविषयींची आदरबुद्धि टिळकांच्या मनांत किती खोल वसत होती हें दिसून येईल. टिळक आगरकरांचा मतभेद सामाजिक बाबतींत झाला असला तरी आगरकरांचा मोठेपणा त्यांच्या विशिष्ट प्रकारच्या सामाजिक मतामुळें होता ही गोष्ट टिळकांना मान्य नव्हती. विचार व मतें हीं मनाचीं पांघरुणें होत, पण मोठेपणा हा स्वतःसिद्ध किंवा कमावलेल्या मनांत असतो असें टिळकांचें मत असल्यामुळें, आगरकर हे पक्के सुधारक म्हणून मोठे, किंवा उच्छृंखलपणें मतें बोलून दाखविणारे म्हणून मोठे, असें या श्राद्धतिथीच्या दिवशीं ध्वनित करणाऱ्यांची टिळकांनीं उलट कुचेष्टाच केली आहे. ते लिहितात "जणूं काय सुधारणेखेरीज आगरकरांनीं

कांहींच कामगिरी केली नाहीं...आगरकरांचीं राजकीय मतें काय होतीं याची यांनीं चौकशी कधीं केली होती काय? १८८८ सालापर्यंत केसरींत जे राजकीय विषयावर लेख आले ते बहुतेक आगरकरांचे आहेत आणि त्यानंतर सुधारकांतहि अशा प्रकारचे बरेच निबंध आले आहेत; या सर्वांचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां असें दिसून येईल कीं, आगरकर हे पक्के स्वराज्यवादी होते...राजकीय व औद्योगिक अवनति पाहून त्यांचें चित्त केशवपनादि चालींच्या निरीक्षणापेक्षांही अधिक संतप्त व दुःखित होत असे, व याला मिल्ल स्पेन्सर यांनीं प्रतिपादन केलेल्या स्वराज्याच्या तत्वाखेरीज दुसरा उपाय नाहीं अशी त्यांची पक्की खातरी झाली होती. जो तार्किकपणा समाजसुधारणेसंबंधानें त्यांच्या अंगीं वसत होता तोच तार्किकपणा त्यांनीं राजकीय बाबींवरील आपल्या लेखांतहि पूर्णपणें उपयोगांत आणिला आहे......ज्यांना बाकीच्या बाबती पहावयाच्या नव्हत्या त्यांना सगळा आगरकर नको होता. किंबहुना तो त्यांच्या पचनींहि पडला नसता." आगरकरांचें तर्कचक्र राजकीय, सामाजिक वगैरे सर्व बाबींत एकसारखेंच अप्रतिहत चालत असे ही आगरकरांच्याविषयींची गोष्ट टिळकांच्या मनाला पुरी पटली होती. मनुष्य चुकला असला तरी प्रामाणिक होता हाच आगरकरांचा मोठेपणा. त्यांचें श्राद्ध करणारे सामाजिक बाबतींत आगरकरांसारखे तर्कवश पण राजकीय बाबतींत मात्र कर्कश तर्क सोडून मवाळ बनलेले असा टिळकांनीं आक्षेप घेतला होता व तो बरोबर होता. आगरकरांचें लहानपणच काय पण त्यांचें सर्व आयुष्य गरीबींत गेलें. त्यांनीं आपल्या जीवाची चैन अशी कोणत्याहि प्रकारें कधीं केली नाहीं, व शिक्षक या नात्यानें आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजाऊन उरलेला सर्व वेळ आपल्या मनास पटणाऱ्या अशा विचारांचें चिंतन व उपदेश करण्यांत ते घालवीत, या दृष्टीनें पाहतां स्वतः टिळकांनींच म्हटल्याप्रमाणें " स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमान् एकः सतामग्रणीः " या वचनाप्रमाणें आगरकरांची गणना महाराष्ट्रांतील मोठ्या मनुष्यांतच केली पाहिजे यांत शंका नाहीं.

भाग ९ वा

# भांडणें व राजीनामा

१८८७ सालीं टिळक हे केसरीचे प्रत्यक्ष प्रकाशक व प्रसिद्धपणें संपादक झाले व आगरकरांना केसरी सोडावा लागला. हा टिळकांचा जय व आगरकरांचा पराजय झाला खरा. पण दैवहि याच सुमारास दुसरी एक गोष्ट घडवून आणण्यांत गुंतलें होतें; व ती घडून आल्यानें वरच्या जयापजयाचा उलटा वचपा निघणारा होता. ही गोष्ट म्हणजे टिळकांचें व सोसायटींतील इतर समासदांचें जुळेनासें झाल्यामुळें टिळकांना सोसायटी सोडून द्यावी असें वाटूं लागलें. १८८९ सालीं त्यांनीं सोसायटींतून कांहीं महिन्यांची रजा घेतली. व ही रजा संपून परत आल्यावर फिरून कांहीं दिवसांनीं राजीनामाच दिला. हा राजीनामा टिळकांच्या स्वातंत्र्यप्रियतेचें निदर्शक होतें. तथापि, त्यांचे प्रतिपक्षी सोसायटींत कायम राहून स्वतः टिळकांना मात्र अनिच्छेनें सोसायटी सोडावी लागली. अर्थात् अनिच्छेनें आगरकरांनीं केसरी सोडला हा जसा त्यांचा पराभव, तसाच अनिच्छेनें टिळकांनीं सोसायटी सोडली हा त्यांचाहि एक प्रकारें पराभवच म्हटला पाहिजे.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या तहाह्यात सभासदांतून आपलें नांव काढून घेण्याचा निश्चय झाला असें टिळकांनीं १४ आक्टोबर १८९० रोजीं सोसाटीस लिहून कळविलें. त्यानंतर १५ डिसेंबर रोजीं टिळकांनीं सविस्तर राजीनामा लिहून सोसायटीकडे पाठविला त्यांत आपण सोसायटी कां सोडीत आहों याचीं कारणें त्यांनीं दिलीं आहेत. हा राजीनामा हल्लीं सोसायटीच्या दप्तरीं आहे, पण आजवर तो प्रसिद्ध होण्याचें कारण नव्हतें. प्रसंगविशेषीं वादाच्या भरांत टिळकांनीं किंवा त्यांच्या प्रतिपक्षीयांनीं या राजीनाम्यांतील एकाद दुसऱ्या मुद्याचा उल्लेख जाहीर रीतीनें केलेला आहे. परंतु सर्व मुद्दे एकत्र सुसंगत रीतीनें आजवर लोकांपुढें आलेले नाहींत. याकरितां ते संक्षेपानें येथें देण्याचें योजिलें आहे.

प्रथम आपणास सोसायटी सोडावी लागत आहे याबद्दल खेद प्रदर्शित करून टिळक लिहितात, " ११ वर्षांपूर्वी आपणांपैकीं कांहीं लोक एकत्र आलों. आज इतके दिवस, आपणांपैकीं बहुतेकांनीं, कांहीं एक प्रकारचें ध्येय डोळ्यांपुढें ठेऊन, मेहनत केली, विरोध सोसला, उपहास करून घेतला, निराशा गिळली. यामुळें आज सोसायटी सोडून जातांना मला किती दुःख होत असेल याची कल्पना तुम्हीच करा. निदान माझ्या तरी आयुष्यांतील महत्त्वाकांक्षा या सोसायटीचेंकाम

म्हणजे शिक्षणविषयक काम करणें हींच होती. पण असें असूनहि अखेर ना-इलाजानें मला ही संस्था सोडून जावें लागत आहे. अलीकडे आमच्यापैकीं कित्येकांत आपलें जुनें धोरण व तत्त्वें सोडण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे. ज्या ज्या वेळीं ती दिसली त्या त्या वेळीं मी तक्रार केली. पण एकमेकांनीं परस्पर टाकून बोलावें किंवा मनांत जळफळावें येवढाच त्याचा परिणाम झाला. मी ज्या गोष्टी नमूद करणार आहे, त्या क्षुल्लक आहेत व त्या कोणीहि मनावर घेऊं नये असें एखाद्यास वाटेल. पण लोकांना त्या क्षुद्र दिसल्या तरी आपल्या संस्थेच्या इतिहासाच्या दृष्टीनें मला त्या महत्त्वाच्या वाटतात. तुम्ही वाटेल तर त्यांना क्षुद्र म्हणा, पण या संस्थेच्या पुढील इतिहासांत तरी त्या घडून येऊं नयेत येवढेंच मी इच्छितों.

"जे हवे ते सर्व कागद मजपुढें नाहींत म्हणून कांहीं अंशीं मला स्मरणानेंच लिहावें लागत आहे. पण थोडक्यांत सांगावयाचें तर आज आपणांत जी फूट होत आहे तिचें मुख्य कारण हेंच कीं, आपले स्वभाव परस्पर जुळले नाहींत व अदमासाबाहेर द्वेष माजला. तहाहयात सभासद म्हणून संस्थेत जे लोक घ्यावयाचे ते वेळोवेळीं घेतांना आपण अधिक काळजी घेतली असती, किंवा कमी उदारबुद्धि दाखविली असती, तर बरें झालें असतें. मूळचीं तत्त्वें धर्मतत्त्वांप्रमाणें मानून, एक तीं कडकडीत पाळावीं तरी किंवा संस्था सोडून तरी जावें, अशी सक्ति आपण कित्येकांवर केली असती तर बरें झालें असतें. आपणांसर्वांत एक-जण कोणीतरी मुख्य असून निदान त्याचें तरी आपण पूर्ण निष्ठेनें ऐकतों असें असतें तरीहि बरें झालें असतें. एकाच परंपरेचीं व विचाराचीं माणसें नसतां तीं अशा कामानिमित्त एकत्र येणें याचाच हा परिणाम. सोसायटीचे मूळ उत्पादक आम्ही समवयस्क होतों व ऐहिक तत्त्वांवर विशिष्ट कार्याकरितां एकत्र जुळलों. जरी स्वभावभेद माहीत होता तरी, स्वार्थत्याग करून केवळ एक साध्य साधण्याकरितां एकत्र येत असल्यामुळें, स्वभावभेद कार्यांत विरून जाईल असेंहि वाटलें होतें. हातीं घेतलेलें काम अवघड, फळ दिसूं लागण्याला फार अवकाश, आपण माणसेंहि लहान दर्जाचीं, यामुळें आपण मुख्य कार्याविषयीं निष्ठा व उत्साह दाखवूं तरच यश लाभेल, अशी मूक भावना. व प्रथम कांहीं दिवस सर्व गोष्टी सुरळीत चालल्याहि. यामुळें संस्थेच्या पदरीं फारसा पैसा नसतांहि तिचा बोज वाढला, व तिला नैतिक सामर्थ्य प्राप्त झालें. पण पुढें तत्त्वांचीं बंधनें सुटूं लागलीं, व्यक्तिमहात्म्य वाढूं लागलें, हितसंबंध फैलावूं लागले, इतर धंदे आपणांत शिरले, यामुळें आचारविचाराला व्यग्रता आली. वाद सुरू झाले, पक्ष बनले, मत्सर वाढला, द्वेष उत्पन्न झाला, तोंड मिळवणी कठीण झाली, स्वार्थत्याग स्वावलंबन व साधेपणा यांची आमच्या आमच्यांत थट्टा सुरू झाली, व त्याचा कंटाळाहि येऊं लागला! डिसेंबर १८८९ मध्यें होळकरसरकारनीं दिलेल्या

सातशें रुपयांसंबंधीं आगरकर व मी यांजमधील पत्रव्यवहार हें त्यांचें एक उदाहरणच होय.

" या संस्थेंत शिरतांना मूळ उद्देश काय होता हें माझ्या समजुतीप्रमाणें मी सांगतों. १८७९ च्या जुलै-ऑगस्ट महिन्यांत मी एल्.एल्. बी. च्या अभ्यासाकरितां डेक्कन कॉलिजांत जाऊन राहिलों होतों. तेव्हां आगरकर भागवत करंदीकर यांनीं व मी मिळून हिन्दी लोकांनीं मिशनरी पद्धतीनें खासगी शाळा कां व कशा चालवाव्या याची चर्चा केली. अशा शाळा यशस्वी होण्याला स्वार्थत्याग हा असला तरच निभेल हें उघड होतें. सर्वांनीं एकच काम करावें, बरोबरीचे नात्यानें वागावें, श्रमविभाग सारखा व्हावा, खासगी नफ्याच्या बाबी ठेऊं नयेत–हा मार्ग अवघड दिसला तरी यशाला तोच नेणार याविषयीं आम्हा सर्वांचें एकमत होतें. त्याप्रमाणें आम्ही पुण्यांतील एका पुढारी गृहस्थाला कळविलें कीं जास्तींत जास्ती पाऊणशें रुपये पगार देण्याची व्यवस्था होण्याइतका फंड आपण जमवीत असाल तर आम्ही जन्मभर शिक्षणाच्या कामाला वाहून घेण्यास तयार आहों, व असें झाल्यास शिक्षण कदाचित् मोफतहि देतां येईल. त्यांनीं आम्हांस उलट कळविलें कीं तुम्ही म्हणतां तें ठीक आहे. पण तुम्ही कार्याला प्रत्यक्ष सुरुवात करून दाखविल्याशिवाय लोक मदत देण्याला पुढें येणार नाहींत. या उत्तरानें आमची निराशा झाली, पण आम्ही आपला हेतु सोडला नाहीं.

" इतक्यांत विष्णुशास्त्री चिपळूणकर हे सरकारी नोकरी सोडून नवीन शाळा काढणार असें समजल्यावरून आम्हीं त्यांजकडे जाऊन आपला बेत कळविला. त्यांनींहि पुढाकार घेण्याचें कबूल केलें, व १८८० च्या प्रारंभीं शाळा उघडण्याचें ठरलें. दरम्यान भागवत व करंदीकर यांच्या मनांत चलबिचल झाली, यामुळें विवक्षित गृहस्थांचीं नांवें न घालतां केवळ आपल्याच सहीनें शास्त्रीबोवांनीं १५ डिसेंबर १८७९ रोजीं शाळेचें जाहीरपत्रक काढलें. त्यांत मूळ हेतूंची कोणत्याहि तऱ्हेनें बडेजावी न करतां शिक्षण सुलभ व स्वस्त करणें येवढाच हेतु त्यांनीं लिहिला. ही बडेजावी केली नाहीं हेंच एकाअर्थी बरें झालें. कारण मनुष्याची बुद्धि स्थिर राहात नाहीं व निश्चय डळमळतो हें करंदीकर व भागवत यांच्या उदाहरणावरून तर दिसून आलेंच; पण खुद्द आगरकरांनाहि वरिष्ठ फेलोची जागा मिळतांच त्यांनींहि शाळेस येऊन मिळण्याचें काम एक वर्ष पुढें ढकललें. यामुळें ता. १ जानेवारी १८८० रोजीं शास्त्रीबोवा व मी असे दोघेच उरलों. इतक्यांत नामजोशीहि येऊन मिळाले व लोक त्यांच्याविरुद्ध अनेकप्रकारें बोलत असतांहि शास्त्रीबोवांनीं त्यांना घेतलें. नंतर आम्हांला येऊन मिळण्याविषयीं मी वामनराव आपट्यांना विनंति केली, पण त्यानीं तेव्हां ती नाकारली. यामुळें अधिक माणसें मिळण्याविषयीं आमची प्रथम निराशाच झाली. पण पुढें आपटे यांचें दुसरीकडे मोठ्या नोकरीचें न साधल्यामुळें ते आमचेकडे आले. प्रथम कांहीं दिवस आम्ही त्यांना

आमच्याहून अधिक पगार दिला व पुढें आगरकर येऊन मिळतात असें पाहून आपट्यांनींहि कायम सभासद होण्याचें कबूल केलें. तथापि अवांतर कांहीं तरी काम करून अधिक पैसा मिळवावा अशी आपटे यांची इच्छा प्रथमापासून उघड दिसत होती व त्यांच्याच उपक्रमामुळें नामजोशी यांचें 'स्टार' हें वर्तमानपत्र घेऊन त्याचें नांव बदलून मराठा हें इंग्रजी व केसरी हें मराठी पत्र आम्ही सुरू केलें.

"१८८१च्या प्रारंभीं आगरकर हे येऊन मिळाले व चिपळूणकर, मी, नामजोशी, आपटे, आगरकर मिळून एक शाळा व दोन पत्रें चालवूं लागलों. शास्त्रीबोवा हे स्वतः निवळ हेडमास्तर राहिले व आपट्यांकरितां आम्हास सुपरिंटेंडेंटची जागा निर्माण करावी लागली. तेथेंच थोडीशी उद्देशभिन्नता प्रथम दिसूं लागली. असो; प्रथम सर्वांना काम बरेंच पडत असे, पण पात्रतेप्रमाणें कामें वांटून दिलीं होतीं. क्वचित् मतभेद अगर जोराचा वादहि होई. पण सर्वांच्या डोळ्यांपुढें एकच कार्य असल्यामुळें तंटे झाले नाहींत. गरजेप्रमाणें कोणास कमजास्त पैसे लागल्यासहि आम्ही देत असूं. पहिल्या वर्षीं चिपळूणकर व मी यांनीं एक पैहि घेतली नाहीं. १८८२ च्या मार्च महिन्यांत कोल्हापूरप्रकरण उपस्थित झालें, पण या संकटानें आमच्यांत कांहीं वेळ एकीच अधिक झाली. समानहक्काचे प्रश्न यावेळीं पुढें आले नाहींत. बाहेरून लोकांचीहि मदत बरी झाली. यामुळें खटला होऊनहि संस्था निभावली. वासुदेवराव केळकर यांचा आमचा परिचय खटल्याच्या वेळींच झाला. ते व माधवराव गोळे १८८३ सालीं येऊन आम्हाला मिळाले. पण १८८२च्या आक्टोबरमध्यें आम्ही तुरुंगांतून सुटून येतांच, किंबहुना आम्हास पानसुपारी झालेल्या जागींच आपट्यांनीं आम्हांस स्पष्ट सांगितलें कीं, यापुढें वर्तमानपत्राशीं कांहीं एक संबंध न ठेवतां मी शालोपयोगी पुस्तकें हातीं घेणार. केसरी व मराठा हीं पत्रें चालविणें हें शाळेच्या दृष्टीनें अवांतर काम म्हटलें तरी शाळा काढण्याच्या मूळ हेतूस तें पोषकच होतें. पण पुस्तकें लिहिण्याची गोष्ट वेगळी. पुढें सप्टेंबरांत एज्युकेशन कमिशन पुण्यास आलें त्यावेळीं आपट्यांनीं संस्थेमार्फत जी साक्ष दिली तींत आमचा मूळ उद्देश मिशनऱ्यांसारखें निःस्वार्थीपणानें वागण्याचा व महाराष्ट्रभर शाळांचे जाळें पसरविण्याचा होता असें स्पष्ट सांगितलें होतें.

"आमचीं पहिलीं तीन वर्षें शाळा व वर्तमानपत्रें दृढमूल करण्यांत गेलीं, व त्याकरितां आम्ही लोकांच्या शिव्या व उपहास यांचा वर्षाव सोसला. या गोष्टी पुढच्या सुखाच्या काळांत येऊन संस्थेस मिळालेल्या लोकांना काय माहीत ! १८८३-८४-८५ या तीन सालीं आम्ही आपल्या संस्थांची घटना सुदृढ केली. कोल्हापूरप्रकरणांतील कर्ज अद्यापि थोडेंसें शिल्लक होतें; पण कर्ज असतें तेव्हां भांडणेंहि होत नसतात. यामुळें आम्हीं बनविलेली घटना स्थिरमूल होऊन त्यांत स्वार्थत्यागाचीं तत्त्वें आम्हांस गोंवतां आलीं. १८८४च्या फेब्रुवारी महिन्यांत सर जेम्स

फरगसन हे संस्थेला भेट देण्यास आले, व याच सुमारास आबासाहेब घाटगे कागलकर यांनीं संस्थेला उदार आश्रय दिला. गव्हर्नरसाहेबांपुढें जें उद्देशपत्रक वाचण्यांत आलें त्यांतहि थोडा पगार घेऊन महाराष्ट्रभर शाळा पसरणें व खाजगी कॉलेज काढणें हें ध्येय असल्याचें लिहिलें होतें. कॉलेजचा हेतु आमच्यासारखे स्वार्थत्यागी पदवीधर शिक्षक मिळविण्याचाच होता. घटनेच्या पोटनियमांत सर्वांनीं महिनावार पगार थोडा घ्यावा व प्रसंगविशेषीं ग्रॅच्युटी घ्यावी आणि तीन हजार रुपयांचा विमा उतरावा असें ठरलें. या सर्व सूचनांत मी पुढाकार घेतला होता. या योजनेचा हेतु हा कीं, संस्थेबाहेरच्या उद्योगांत लक्ष घालण्यास किंवा प्राप्तीची इच्छा धरण्यास कोणास जागा राहूं नये.

" जेजुइट मिशनरी लोकांचे नियम याहूनहि अधिक कडक आहेत. त्यांच्याहून आम्हाला अधिक मिळकत देऊं केल्यावर इतर लोभ न ठेवतां जर आम्ही एकनिष्ठेनें काम केलें नाहीं, तर आम्ही स्वतःला देशभक्त म्हणवून घेण्यास काय अधिकार ? असो. अशा रीतीनें १४ आक्टोबर १८८४ रोजीं डेक्कन एज्युकेशन सोसायटी रजिस्टर झाली व १८८५ च्या जानेवारींत फर्ग्युसन कॉलेज निघालें.

" शाळा व कॉलेज दोहोंनाहि सरकारी ग्रँट मिळूं लागली; व सोसायटीची सांपत्तिक स्थिति सुधारली. मात्र सोसायटी रजिस्टर झाल्यामुळें आर्यभूषण छापखाना, केसरी व मराठा पत्रें हीं संस्थेच्या मूळ मालकीचीं असलीं तरी यापुढें वेगळीं ठेवावीं लागलीं. १८८५ पासून १८८९ पर्यंत संस्थेचें काम यंत्रांत बसल्यासारखें झालें. पण त्याचमुळें अवांतर गोष्टींकडे लक्ष लागण्यास सुरवात झाली. थोडें सुख मिळूं लागल्याबरोबर आमच्या जुन्या गरिबी स्थितीचा आम्हींच तिरस्कार करूं लागलों; व आम्हांला अधिक लाभ व्हावा अशी इच्छा झाली. सुस्थितींत येऊन मिळणाऱ्या नवीन सभासदांना तर ती अधिकच बाधली. नव्यांनीं जुन्यांना घेरलें व मिशनरी तत्वानें वागणाऱ्या लोकांचें बहुमत नाहींसें झालें. हेंच हल्लीं विकोपास गेलेल्या तंट्याचें मूळ कारण. एकदां भांडणें सुरू झाल्यावर कोणी काय साधनें योजलीं हा मुद्दा गौण आहे. भांडणें उत्पन्नच कां झालीं हा मुद्दा मुख्य. २१ आक्टोबर १८८५ रोजीं प्रत्येक सभासदाच्या नांवावर निघणाऱ्या कमीजास्त हिशेबी बाक्यांवर तंटा झाला; व सर्वांचे पगार सारखे धरून हिशेब करावे व ज्याकडे बाकी अधिक निघेल त्यानें पैसे परत भरावे असें ठरलें. हें समतेचें तत्व दिसण्यांत बरें दिसलें पण पुढें त्यांतूनच वाद निघाला.

" १८८६ सालीं छापखान्यासंबंधाचे वाद सुरू झाले. छापखान्याची सांपत्तिक स्थिति शाळेइतकी चांगली नव्हती. त्याचें कर्ज फिटत होतें पण वर्तमानपत्रांतील लेखकांना पगार सुटत नसे. आमच्यापैकीं कित्येक लोक आपला सगळा वेळ एक पै न घेतां छापखाना—वर्तमानपत्राकडे देत; व व्यक्तिविषयक मतें बाजूस ठेऊन संस्थेच्या सामुदायिक मतांना धरून चालत. पण इतर कित्येकांनीं

पैसे मिळवण्याचे धंदे सुरू केले होते. यांतच वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विषयांसंबंधीं मतभेदाची भर पडल्यामुळें, ज्याला मतांचा विटाळ होणार नाहीं असा छापखाना मात्र सोसायटीकडे ठेऊन वर्तमानपत्रें तेवढीं वेगळीं काढावीं अशी सूचना पुढें आली. पण ती अव्यवहार्य ठरून छापखाना व पत्रें दोहोंचाहि संबंध सोसायटीनें तोडावा असें ठरलें. १८८६ च्या जूनचे सुमारास मी संस्थेच्या विनंतीवरून हिशेब तपासून आढावे काढले व आक्टोबरमध्यें छापखाना, पत्रें व त्यावरील कर्ज हीं सर्व वासुदेवराव केळकर यांनीं आपणांकडे घेतलीं. आगरकर केसरींत लिहिणारे, म्हणून त्यांना हें सर्व तुम्ही संभाळतां कां म्हणून विचारलें. पण ते म्हणाले मला एडिटर व्हावयाचें नाहीं व असलीं कर्जबाजारी छापखाना व पत्रें मला नकोत. हें सर्व बंदच कां कराना असें हि ते म्हणत. पण केसरी लोकप्रिय असून चांगला चालत होता म्हणून पत्र बंद करूं नका, व दुसरा कोणीच नको म्हणत असेल तर मी सर्व जबाबदारी घेऊन तीं सांभाळतों, असें मी स्वतः म्हणत होतों. पण अखेर केळकरांनींच तीं घेतलीं. छापखान्याची व्यवस्था करण्यास मुंबईहून हरी नारायण गोखले यांस बोलावण्याचें ठरलें. पण ते, मी मदत देण्याचें वचन दिलें तरच येणार, म्हणून माझें नांव केळकरांच्या जोडीला घालून, कारण पडेल तेव्हां मी वर्तमानपत्रांचा मालक आहेच ( Next hypothecated owner ) असें घेऊन चालवें असें ठरलें. तथापि गोखले व केळकर यांचा करार स्वतंत्र झाला; मी त्यांत नव्हतों.

" छापखाना व वर्तमानपत्रें हीं वेगळीं केल्यामुळें आतां तरी तंटा संपेल असें वाटलें होतें. प्रथम सर्वांनीं ही व्यवस्था मान्य केली. पण पुढें आगरकरांना त्याचा पश्चात्ताप होऊन, आपलीं सामाजिक मतें जाहीर करण्याचें साधन हातचें गेलें असें त्यांना वाटूं लागलें. गोळ्यांप्रमाणें तुम्ही वाटेल तर आपल्या सहीवर लेख लिहा, केसरी तुमचाच आहे, असें त्यांना सांगण्यांत आलें. पण तें त्यांस पटेना. बरें वर्तमानपत्र तुम्हींच सांभाळा असें म्हटलें तर पैशाची जबाबदारी आपण घेणार नाहीं असें म्हणत. पण मतें एकाचीं व पैशाची जबाबदारी दुसऱ्याची हें कसें व्हावें? आगरकर म्हणत कीं केसरींतीं जुनीं पुराणीं मतें आपल्या संस्थेचा नाश करतात, कारण सुधारकांची सहानुभूति आपल्याकडून जाते. पण केळकर बहसा कोणास न दुखवितां लिहीत, व सोसायटींतील बहुमत त्यांच्या बाजूला असे, तरी हि आगरकर तक्रार करीत. एकदां रानड्यांवर आलेल्या टीकेबद्दल 'गव्हर्निंग बॉर्डी'त भांडारकरांनीं आक्षेप घेतला. तेव्हां आगरकर व गोखले यांनीं पूर्वीची जूट फोडून वेगळा भाव दर्शविला, व भांडारकरांची साथ केली. केळकर म्हणत कीं, वर्तमानपत्रांतील मतें हीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीचीं मतें नाहींत असें वाटेल तर मी जाहीर करतों. पण आगरकर म्हणत "तसें नाहीं, केसरी–मराठ्यांतील मतें व्यक्तिशः तुमचीं एकट्याचींच आहेत असें तुम्ही जाहीर करा."

पण कोणता शहाणा संपादक असें करील ? वर्तमानपत्राला त्यांत कमीपणाच आहे. तात्पर्य; फिरून फूट पडली व भांडणें झालीं. आगरकर व गोखले यांना वाटे कीं, वजनदार व सुधारक लोक आपल्या बाजूचे. म्हणून ते इतरांना दुर्धारक म्हणूं लागले. शेवटीं त्या दोघांनीं मिळून १८८८ च्या आक्टोबर महिन्यांत स्वतंत्र आपलें म्हणून 'सुधारक' वर्तमानपत्र काढलें. पण अशा रीतीनें दोन वर्तमानपत्रांमुळें उत्पन्न झालेलें भांडण न तुटतां त्यांत तिसऱ्या वर्तमानपत्रानें उलट भरच घातली.

" त्यांतच आपट्यांच्या पुस्तकांचीहि भर पडली. आजवर आपटे हे एकटेच शालोपयोगी पुस्तकें काढीत असत. पण या सुमारास आर्यभूषण छापखान्याचे नवे मॅनेजर हरिपंत गोखले यांना नफ्याच्या दृष्टीनें 'संस्कृत डिक्शनरी' काढावी असें वाटलें. त्यांनीं प्रथम आपट्यांना विचारलें, व त्यांनीं नाहीं म्हटल्यावर गोखल्यांनीं मुंबईचे लक्ष्मणराव वैद्य यांना विचारलें. त्यांनीं आपट्यांच्या संमतीनें होय म्हटलें. यावेळीं आपटेहि स्वतः एक संस्कृत डिक्शनरीच, पण मोठी डिक्शनरी, तयार करीत होते. त्यांना या छोट्या डिक्शनरीचें वैषम्य वाटून त्यांनींहि स्वतःची एक छोटी डिक्शनरी काढली. छापखाना व सोसायटी यांचा फिरून तंटा निघाल्यामुळें मी मध्यस्थी केली. पण आगरकरांनीं "तुम्ही आपट्यांचा द्वेष करतां" असें म्हणून माझ्यावरच उलट आरोप केला. मला जर आपट्यांचा द्वेष करावयाचा तर मी स्वतःच नसती का एखादी डिक्शनरी काढली ? पण मला तें कर्तव्य नव्हतें. मी छापखान्याचा सल्लागार या नात्यानें फायदेशीर म्हणून सल्ला दिला. तो आपट्यांना हितविरोधी वाटला त्याला मी काय करूं ? तात्पर्य, छापखाना वेगळा काढला तरी भांडण मिटलें नाहीं, याचें कारण सोसायटींतल्या सभासदांनीं बाहेरचें पत्करलेलें काम व त्यामुळें उत्पन्न होणारा हितविरोध. होळकरांच्या ७०० रुपयांची तीच गोष्ट. कारण प्रथम ही रकम सोसायटीला देण्यांत आली असून, मागाहून त्यांतील ४०० रुपये आगरकरांना 'वाक्यमीमांसा' या पुस्तकाबद्दल बक्षीस द्यावे, व फक्त तीनशें रुपये सोसायटीच्या इतर सभासदांनीं घ्यावे, असा हुकूम आणविण्यांत आला. नामजोशांचेंहि लक्ष असेंच शाळेबाहेरच्या उद्योगांकडे असे. पण त्यांना बाहेरचेंच काम सांगण्यांत आलें असल्यामुळें प्रथम तंटा झाला नाहीं. तथापि हळू हळू नामजोशांचीं बाहेरचीं स्वतःचीं कामेंच फार वाढलीं; व नामजोशी माझे स्नेही असतांहि त्याबद्दल त्यांस मी उघड दोष देत असें. आतां नामजोशी कॉलेजांत शिकवीत नसत यामुळें तें डोळ्यांवर येत नसे. पण कॉलेजच्या शिक्षकांचें तसें नाहीं. म्हणून बाहेरचें काम तरी करूं नये, किंवा त्या कामानें मिळणारे पैसे सोसायटीकडे जमा करावे, असा निर्बंध घातल्याशिवाय गत्यन्तर नाहीं. मिशनरी सोसायट्यांत असे नियम याचकरितां घालतात."

"शाळेकरितां पुस्तकें लागतील तीं कोणी करावीं असा तंटा राहूं नये म्हणून

१८८८ सालीं असा नियम करण्यांत आला कीं, जाहिरात देऊन पुस्तक मागवावें व चांगलें ठरेल तें विकत घ्यावें. पण पुढच्याच वर्षी हा नियम मोडून सोसायटीनें गोखल्यांचें गणितावरील पुस्तक पत्करून मंजूरहि केलें."

"सोसायटीच्या सभासदानें पगार पोटापुरता घ्यावा असें प्रथम ठरलें होतें. ही रक्कम सुरवातीस ७५ रु. होती. पुढें दक्षिणाफेलोशिपचा पगार लक्षांत घेऊन ही मर्यादा १०० पर्यंत वाढविली. हेंहि दुसऱ्याकरितांच केलें. कारण आगरकर व मी हे दोघे ४० रु. पगारावर कायमचे बांधून घेण्यास तयार होतों, व प्रथम कांहीं दिवस आम्ही ४० रुपयेहि घेतले नाहींत. पण आगरकरांनीं पुढें मत बदलून, 'गरजेप्रमाणें पगार' हें तत्व टाकून देऊन 'संस्थेच्या सांपत्तिक स्थितीप्रमाणें पगार' हें तत्व पुढें आणिलें. हें पाहून मला आश्चर्य वाटलें; व आमच्या जुन्या स्वार्थत्यागाचें उदाहरण देतांच "तुम्हालाहि पूर्वीच्या वर्षांचा शिलकी पगार वाटेल तर देऊं" असें ते म्हणाले. पण पुढें पगार अधिक मिळावा म्हणून कांहीं आम्ही आधींचा स्वार्थत्याग केला नव्हता. शिवाय सर्वांना सारखाच पगार म्हटलें म्हणजे, ज्याला अधिक गरज त्यानें बाहेर काम करावें असें ओघानेंच आलें. १८८७च्या फेब्रुवारीच्या ५ व्या तारखेस, स्वतः आगरकरांना थोडा अधिक पगार हवा होता व ग्रॅच्युइटी घेणें त्यांना नापसंत होतें म्हणून, सर्वांचेच पगार सारखे वाढवावे अशी सूचना त्यांनीं आणली. ही सूचना मंजूर होण्यांत माझा व्यक्तिशः नफाच होता, पण मी सूचनेस विरोध केला. माझें तत्व असें होतें कीं, पोटापुरता पगार मिळत असेल तर संस्थेला ४ पैसे अधिक मिळाले म्हणून लगेच आपला पगार वाढवून घेऊं नये. संस्था कायमची श्रीमंत झाली तर गोष्ट वेगळी. आगरकरांसच आज गरज असेल तर त्यांनीं वाटल्यास स्वतःपुरती ग्रॅच्युइटी घ्यावी. माझें म्हणणें लोकांना पटून आगरकरांनीं आपल्याकडे वळवून ठेवलेलें बहुमत त्यामुळें ढांसळलें. यामुळें आगरकरांना फार राग आला. त्यांनीं व गोखल्यांनीं आपला हेतु साधण्याकरितां नियम बदलण्याचाच घाट घातला. तेव्हां यापुढें संस्थेंत राहून भांडणें भांडत बसण्यांत अर्थ नाहीं, असें मला वाटूं लागलें. सोसायटीचे मूळ उद्देश उलथून पाडण्याला कच्चें बहुमत चालतें, पण सामान्य गोष्टीला मात्र सर्वानुमत पाहिजे हें अर्थात् विपरीत होय. शिवाय, आगरकर हे छापखान्याला ३०० रु. कर्ज देण्याला नाकबूल असतां, व नामजोशांनीं मागितलेल्या ग्रॅच्युइटीस विरुद्ध असतां, गोखल्यांना ३०० रु. कर्ज देण्याची सूचना त्यांनींच पुढें आणली. सोसायटीच्या सभासदांनीं शाळेबाहेर कसें वर्तन ठेवावें याविषयीं मतभेदहि सुरू झाला. ग्रॅन्ट मिळण्याकरितां हिशेब कसे ठेवावे याविषयींहि वाद माजला. शाळेला हस्तकौशल्याचे शिक्षणाचा वर्ग व बोर्डिंग जोडावें कीं नाहीं, युरोपियन प्रोफेसर कॉलेजांत घ्यावा कीं नाहीं, यावरूनहि तंटे झाले. कॉलेज कोणीकडून तरी मोठें व्हावें, मग तत्व बुडालें तरी हरकत

नाहीं, असें मत बनल्याचें दिसून येऊं लागलें. तात्पर्य, जुनीं तत्वें शिथिल झालीं इतकेंच नव्हे तर अगदीं तद्विरुद्ध अशीं तत्वें अमलांत येऊं लागलीं."

"मी आज चार वर्षे जुन्या नव्याची घडी बसविण्याचा प्रयत्न करीत आहें; पण प्रत्येक वेळीं तंटा निघून शेवट लागत नाहीं. म्हणून मी कंटाळून १८८९मध्यें सहा महिने रजा घेतली. त्या सालीं जूनमध्यें जुने तंट्याचे प्रश्न निघून समेट झाल्यासारखा वाटला. पण तो टिकला नाहीं. शाळेबाहेर कोणी काम पत्करूं नये असें ठरलें असतांहि नियमाला अनेक अपवाद निर्माण करण्यांत आले. १८९० मध्यें पहिल्या बी. ए. चा वर्ग सुरू झाल्याकारणानें फिरून नव्या जबाबदारीमुळें एकी होईल असें वाटलें होतें; पण गोखल्यांना सार्वजनिक सभेच्या सेक्रेटरीचें काम पत्करूं दिल्यामुळें फिरून बेबनाव झाला. गोखल्यांपूर्वीं हीच जागा मला देऊं केली असतां मी ती पत्करली नाहीं. शेवटीं १४ आक्टोबर १८९० रोजीं माझ्यासंबंधानें निंदाव्यंजक ठराव सोसायटीनें केल्यामुळें मला सोसायटींत राहाणें अशक्यच झालें. प्रत्येकाला त्याच्या मार्गांत मी कांटा आहें असें वाटावें, माझे फिरकोळ दोष फुगवून दाखवावे, व शेवटीं शिक्षक म्हणून मी नालायक आहें इतकें म्हणण्यापर्यंत मजल यावी, मग राहण्यांत अर्थ काय? मजवर दोषारोप केल्यानें मूलतत्वांचे वाद मिटूं शकत नाहींत. मी उर्मट किंवा टाकून बोलणारा असेन, पण तो मुख्य मुद्दा नाहीं. कित्येक म्हणतात कीं, निःस्वार्थीपणाचें हें नुसतें स्तोम असून माझा खरा हेतु आत्मश्लाघा व आत्मप्रतिष्ठा हा होय. पण मी नवीन तत्वें वादाला काढलीं नाहींत, माझें भांडण जुन्या करितांच होतें; व त्यापासून आम्ही च्युत झालों कीं नाहीं हे कोणीहि पहावें. नव्या सभासदांना वाटतें कीं प्रतिष्ठेला चढण्याची डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही एक नुसती पायरी आहे. आम्ही जुने सभासद याकडे या दृष्टीनें पहात नाहीं. मूलतत्वाची हानि करून घेऊन शिवाय स्वार्थत्याग करण्यांत काय फायदा? मूलतत्वांविरुद्ध झालेलें बहुमत कितपत मानावें हा प्रश्नच आहे. निदान बहुमतच विरुद्ध झालें तर सोसायटी तरी सोडून दिली पाहिजे. जुनीं तत्वें शब्दांनीं तुम्ही बदलीत नाहीं, पण त्याविरुद्ध आचरण मात्र करितां. समेटाचे मीं पुष्कळ प्रयत्न केले पण ते फुकट गेले. जी गोष्ट लोकांनीं करूं नये असें मी म्हणतो ती स्वतः मीं केली आहे असाहि एक आरोप मजवर येतो. मी कॉंग्रेसचें काम कांहीं दिवस केलें पण तेव्हां मी प्रत्यक्ष रजेवर होतों, किंवा रजेचा बेत मी जाहीर केला होता. १८८९ पूर्वीं मला कॉंग्रेसचें काम देण्यांत येत होतें. पण तें मीं नाकारिलें. मी पहिल्या ९ वर्षांत कांहींच बाहेरचें काम केलें नाहीं. मला शाळेंतलें काम करून थोडीबहुत वकिलीहि करतां आली असती. छापखान्याचेंहि काम मी मजकरितां केलें नाहीं. कॉंग्रेसचें काम अगदीं तात्पुरतें होतें. तसेंच बडतर्फ झालेल्या मामलेदारांसंबंधाचेंहि!"

" माझ्यामध्यें दोष नाहींत असें नाहीं. मी टाकून तोडून बोलून पुष्कळांना दुखाविलें आहे. पण पुष्कळ वेळां तींहि प्रतिक्रियेपुरतें. पण मी जें जें बोललों तें संस्थेच्या हिताच्या दृष्टीनें. असो; मी तुमच्यामध्यें राहण्यानें निरंतर भांडणें होण्यापेक्षां मी सोडून जावें हें बरें. त्यामुळें मूलतत्वें बुडतील, पण भांडण तरी वांचेल. मी आज शाळा सोडल्यामुळें सर्व जन्माचें ध्येय सोडलें असेंच मला वाटतें. पण त्याला इलाज नाहीं."

टिळकांचा हा राजिनामा २२ कलमी असून त्याचीं सुमारें चाळीस पृष्ठें आहेत. इतका विस्तृत राजीनामा देण्याचा मूळ टिळकांचा हेतु होता किंवा नाहीं, माहीत नाहीं. हा विस्तृत राजीनामा म्हणजे वस्तुतः राजीनाम्याचीं कारणें सविस्तर दिलेली कलमबंद कैफियत आहे. हा राजीनामा ता. २१ नोव्हेंबर १८९० रोजीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कौन्सिलापुढें निघाला. त्या वेळीं सभेंत खालील आशयाचे ठराव झालेः—

प्रोफेसर वामन शिवराम आपटे यांनीं प्रो. टिळक व प्रो. पाटणकर यांच्या राजीनाम्यासंबंधाचे कागदपत्र वाचून दाखविले. त्यावर कौन्सिलचे चेअरमन यांनीं सूचना केली कीं, टिळक व पाटणकर हे तहाहयात सभासदत्त्वाचा राजीनामा देऊन सोसायटी सोडून जात आहेत याबद्दल कौन्सिलला खेद वाटतो. यावर रावसाहेब विष्णु बाळकृष्ण सोहनी आणि डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं अशी उपसूचना आणिली कीं, वरील प्रकारचा खेदप्रदर्शक ठराव करण्यापूर्वी, सदर दोघां गृहस्थांना राजीनामा देण्याचीं त्यांचीं कांहीं कारणें असल्यास तीं ता. ६ डिसेंबर १८९० पूर्वी, कळवावीत असें कळविण्यांत यावें. ही उपसूचना मंजूर झाल्यावर रावबहादुर माधवरावजी रानडे यांनीं टिळक व नामजोशी यांचे दरम्यान झालेला कांहीं पत्रव्यवहार वाचून दाखविला. टिळक व सोसायटीचे इतर सभासद यांच्या दरम्यान वादाचे जे मुद्दे असतील त्यांचा निकाल तिऱ्हाईत पंचमार्फत करून घेणें शक्य आहे किंवा कसें अशाविषयीं तो होता. पण तो प्रश्न तेव्हां तितकाच राहून, ता. १५ डिसेंबर १८९० रोजीं फिरून चर्चेस निघाला, तेव्हां वामनरावजी आपटे यांनीं असें सांगितलें कीं, हा वाद तोडण्याकरितां तिऱ्हाईत पंचाकडे देण्यापासून कांहीं फायदा होईल असें वाटत नाहीं. मग चेअरमन यांनीं टिळकांची कैफियत वाचावी असें सुचविलें. पण अखेर असा निर्णय झाला कीं, हे सर्व कागदपत्र योग्य त्या तजविजीकरितां कौन्सिलच्या म्यानेजिंग कमेटीकडे देण्यांत यावे.

डॉ. भांडारकर यांनीं टिळकांचा राजीनामा वाचून त्यावर खालील शेरा लिहून ठेविला होता. "टिळकांचा राजीनामा मीं वाचून पाहिला त्यावरून तो परत घेण्याविषयीं टिळकांचें मन वळवितां येईल असा संभव दिसत नाहीं. टिळक व सोसायटींतील त्यांचे सहकारी लोक यांच्या दरम्यान पुष्कळ वर्षांची तेढ वाढलेली आहे हें उघड दिसतें. टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें सोसायटींत ज्या तत्त्वांवर तहाहयात सभासद

घ्यावयाचें मूळ ठरलें होतें त्यांत पुढें फरक झाला कीं काय हें सांगतां येत नाहीं. निदान त्याची चर्चा करण्याचें कारण नाहीं. मात्र राजीनाम्यांतील एका विधानाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. त्यांत म्यानेजिंग बोर्डावर अप्रामाणिकपणाचा सरळ आरोप केला आहे व बोर्डानें त्याला उत्तर देण्यास सांगणें कौन्सिलला प्राप्त झालें आहे." पुढें ता. २ फेब्रुवारी १८९१ रोजीं कौन्सिलची सभा झाली. तेव्हां मूळ टिळकांचें विधान व म्यानेजिंग बोर्डाचें उत्तर यांचा विचार होऊन सेल्बी साहेबांच्या सूचनेवरून असा ठराव करण्यांत आला कीं, 'टिळकांनीं केलेला आरोप सर्वस्वीं निराधार आहे असें कौन्सिलला वाटतें.' हा ठराव, गोखले व आपटे यांच्या सूचनेवरून, टिळकांकडे पाठविण्यांत आल्यावर त्यांनीं ता. १९ फेब्रुवारी रोजीं या ठरावास प्रत्युत्तर दिलें. त्याचा फिरून २८ एप्रिल १८९१ च्या सभेंत विचार होऊन सेल्बी व भांडारकर यांच्या सूचनेवरून असा ठराव करण्यांत आला कीं, सर्व गोष्टींचा विचार करतां कौन्सिलचें असेंच मत आहे कीं, अप्रामाणिकपणापर्यंत मजल नेण्याचा जो आरोप टिळकांनीं इतर सभासदांवर केला तो सर्वस्वीं निराधार आहे. वर सांगितलेल्या कोणत्याहि ठरावाविरुद्ध कौन्सिलच्या कोणाहि सभासदानें प्रतिकूल मत नोंदविल्याचें दिसत नाहीं. या शेवटच्या ठरावावर मात्र प्रो. धारप यांनीं कोणत्याच बाजूला मत दिलें नाहीं असा उल्लेख नमूद आहे.

टिळकांचा राजीनामा इतका विस्तृत आहे कीं, त्यासंबंधानें वेगळें लिहिण्याचें असें कांहींच उरत नाहीं. व त्यांच्या प्रतिपक्षियांकडून या कैफीयतींतील मुद्दे खोडून टाकून केलेलें सविस्तर असें विवेचनहि कोठें पाहण्यांत आलें नाहीं. टिळकांनीं सोसायटी सोडल्याचा उल्लेख अखेरपर्यंत पुण्यांतील वादांतून केव्हां केव्हां आला. १९१६ सालीं टिळकांच्या ज्युबिलीच्या प्रसंगीं, अभिनंदनपर असा 'बाल-शिक्षण-माले'चा 'टिळक अंक' पुण्यांतील गणेश महादजी घाटवळ यांनीं काढला त्यांत टिळकांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटी कां सोडली या विषयावर एक लेख हरि रघुनाथ भागवत यांनीं लिहिला. त्यांतील कांहीं विधानांसंबंधानें ज्ञानप्रकाश वगैरे पत्रांतून वाद झाला. तसेंच १९१९ सालीं टिळक विलायतेहून परत आल्यावर त्यांना मानपत्र देण्याचा समारंभ झाला त्या प्रसंगीं टिळकांनीं राजीनाम्यांत काय लिहिलें काय न लिहिलें याविषयीं वादाची थोडी चकमक झडली. परंतु टिळकांच्या राजीनाम्यांतील मुख्य मुद्यासंबंधानें साधक बाधक अशी चर्चा कोठें झालेली आढळत नाहीं. टिळकांच्या पक्षपाती लोकांनीं त्यांना चांगलें म्हणावें व आगरकरांच्या पक्षपाती लोकांनीं आगरकरांना चांगलें म्हणावें ! पण या पक्षपाती समर्थनाशीं राजीनाम्यांतील मुख्य मुद्यांचा कांहींएक संबंध पोंचत नाहीं.

सामाजिक सुधारणेसंबंधीं आगरकर व टिळक यांचा जो वाद केसरीच्या संपादकीय क्षेत्रांत चालू होता त्याचा निकाल १८८७ सालींच लागला होता. केसरीचें संपादकत्व निर्विवादितपणें टिळकांकडे आलें होतें, व आगरकरांनींहि आपलें स्वतंत्र वर्तमान-

पत्र काढून आपल्या मतस्वातंत्र्याला खास मालकीची व चौचाकी गाडी खुशाल जाईल येवढी मोठी वाट करून दिली होती. अर्थात् छापखाना--वर्तमानपत्रें हा सोसायटींतील संकीर्ण कलहाचा एक विषय असला तरी टिळक--आगरकरांपुरता तो संपला होता. यामुळें टिळकांच्या राजिनाम्यांत या वादाचा महत्त्वानें उल्लेख नाहीं. उरलेला व खरा वाद सोसायटीच्या रचनेच्या मूलतत्त्वांसंबंधाचा होता. यांतील एक मूलतत्त्व असें कीं, सोसायटीच्या प्रत्येक सभासदानें आपला सर्व वेळ व बुद्धि सोसायटीलाच दिली पाहिजे. या वादांत आगरकर हे टिळकांचे प्रतिपक्षी म्हणून सामील असले तरी खरे प्रतिपक्षी आपटे, गोखले वगैरे मंडळीच होती. आपटे यांची ते सोसायटींत आले तेव्हांपासूनच या तत्त्वाच्या बंधनापासून मुक्तता झाली होती; व गोखले वगैरे मंडळी ही नवीन असल्यानें त्यांना या बंधनापासून मुक्तता झाल्यास हवी होती. येऊन जाऊन आगरकर हेच काय ते असे एक गृहस्थ होते कीं, जे टिळकांबरोबर मूळच्या संकल्पांत सामील होते, व ज्यांच्यावर टिळकांना मूळ संकल्पाची सक्ती करितां आली असती. पण आगरकर हे मनानें खंबीर व स्वार्थत्यागी होते तरी केवळ परिस्थितीमुळें मूळसंकल्पांतील बंधन ढिलें करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होऊं लागली. दुसरें कारण हें कीं आपटे, गोखले वगैरे मंडळींच्या कारणानें सोसायटींतील बहुमत या प्रभृतींचेंच बनलें. या तत्त्वाच्या मुद्यावर बहुमत आपल्याविरुद्ध आहे ही गोष्ट टिळकांना कबूल होती. उलट त्यांचें म्हणणें असेंच होतें कीं, अशा प्रश्नावर बहुमत असलें तरी मूळ तत्त्व सोडण्यांत येऊं नये, तें अमलांत रहावें, असें म्हणण्याचा अल्पसंख्याक लोकांना हक्क असावा.

करड्या दृष्टीनें पाहिलें तर टिळकांचें म्हणणें बरोबर होतें, पण संस्थेंतील बहुमताला बदलतां येत नाहीं अशी गोष्ट सहसा नसते. येऊन जाऊन मोठ्यांत मोठें उदाहरण म्हटलें म्हणजे एकाद्या कंपनीच्या मेमोरँडम ऑफ असोसिएशनचें. पण जरूर तितकें बहुमत मिळालें असतां थोडेसे कागदी घोडे नाचवून कंपन्यांची उद्देशपत्रिकाहि बदलतां येते. आतां टिळकांचा आग्रह बरोबर किंवा चूक असला तरी बहुमतापुढें ते कांहीं करूं शकत नव्हते. यामुळें स्वतः त्यांनाच राजीनामा द्यावा लागला व तो त्यांनीं दिलाहि. हें व्हावयाचें तसेंच झालें. पण डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही जेजुइट लोकांच्या धर्मसंस्थांप्रमाणें चालविण्याचा मूळ उत्पादकांचा संकल्प होता हें जें टिळकांचें विधान तें उलट पुराव्यानें कोणी खोडून काढलेलें पाहण्यांत आलेलें नाहीं. तसेंच आगरकरांसंबंधानें, म्हणजे इंदूरसरकाराकडून मिळालेल्या ७०० रुपयांच्या देणगीसंबंधानें टिळकांनीं असें स्पष्ट विधान केलें होतें कीं, इंदूरकर महाराजांकडून उभयतांना बोलावणें आलें तेव्हां ते कांहीं तरी रक्कम देणगी म्हणून देतील अशी उभयतांना कल्पना आली; पण संभावनेदाखल मिळणारी रक्कम स्वतःकरितां न घेतां केवळ संस्थेकरितांच स्वीकारण्याचा संकल्प, जाण्यापूर्वी स्पष्टपणें करूनच, आपण महाराजांकडे गेलों; पण पुढें रक्कम मिळाल्या-

वर आगरकरांचें मन पालटलें व शेवटीं आगरकरांनीं आपल्या हिश्याची रकम खासगींकडे घेतली व टिळकांनीं ती घेतली नाहीं. या स्पष्ट विधानांना खुद्द आगरकरांनीं किंवा इतरांनींहि कलमवार स्पष्ट उत्तर दिलेलें नाहीं. टिळकांनीं देणगीचा आपला हिस्सा सोसायटीकडे जमा केला कीं नाहीं ही गोष्ट निर्विवाद पुराव्यानें सिद्ध होणारी आहे, व ती खरी असेल तर महाराजांकडे जाण्यापूर्वी केलेल्या संकल्पाच्या टिळकांच्या विधानाला उघडच खरेपणा येतो. केवळ आगरकरांना कमीपणा देण्याकरितां आपली निम्मी रकम सोसायटीकडे जमा करण्याचा डाव कपटानें खेळून टिळकांनीं आगरकरांना तोंडघशीं पाडलें असेल असें मानण्यास आधार नाहीं.

शाळेला ग्रँट घ्यावी कीं नाहीं हाहि या वादांतील एक मुद्दा म्हणून पुढें येत असतो. सरकारी ग्रँट घेतल्यानें शिक्षणसंस्थांच्या चालकांचें स्वातंत्र्य नष्ट होतें याकरितां सरकारी मदत घेऊं नये असें टिळकांचें म्हणणें; व ग्रँट घेण्याला हरकत नाहीं असें इतरांचें म्हणणें. हा एक मुद्दा राजीनाम्याला कारणीभूत होता किंवा नाहीं असा वाद १९१९ च्या कलहांत पुढें आला होता. परंतु खुद्द राजीनाम्यावरून पाहतां या मुद्याला महत्त्व दिलें गेलें नव्हतें. सरकारी ग्रँट शाळेला किंवा कॉलेजला घेऊं नये असें टिळकांचें म्हणणें असणें शक्य नाहीं. सरकारचा पैसा झाला तरी तो लोकांचाच, मदतीच्या रूपानें तो मिळेल तेवढा घ्यावा, पण तो घेण्यानें स्वातंत्र्य कितपत जातें व कितपत राहतें हा सूक्ष्म प्रश्नच काय तो टिळकांच्या व इतरांच्या दरम्यान वादाचा होऊं शकला असता. या वादांत मतांची कसोटी पाहण्याची वेळ टिळक हे सोसायटी सोडून जाईपर्यंत कधीं आली नव्हती, असें आम्हांस वाटतें. या मुदतींत शाळा व कॉलेज यांची प्रगतीच एकसारखी सुरू होती. सरकारची मदत घेण्यांत येत होती, व सोसायटीच्या लोकांविषयीं सरकारचें मन अद्यापि कलुषित झालेलें नव्हतें. यामुळें सरकारानें शिस्तीचा कांटेलगाम खेंचला व सोसायटीच्या तोंडाला जखम झाली असें कधींच घडलें नाहीं. याची खरी कसोटी १८९७ सालीं व त्यापुढें आली. तेव्हां टिळक सोसायटींत असते तर माल पूर्वी कधीं न निघालेला हा वाद निघाल्याशिवाय राहिला नसता; व तो निघाला असता तर टिळकांचे व इतरांचे अभिप्राय कसे पडले असते व कोणीं काय केलें असतें याची कल्पना वाचकांना आम्हीं न सांगतांच येईल. कसेंही असो; १८८९ सालीं ग्रँटच्या या प्रश्नाला प्रत्यक्ष महत्त्व आलेलें नव्हतें येवढी गोष्ट निर्विवाद आहे.

असो; राजीनाम्यांतील किरकोळ गोष्टी सोडून दिल्या असतां मुख्य तत्वाचा असा एकच मुद्दा राहतो; व तो हा कीं सोसायटीच्या सभासदांनीं फावल्यावेळीं शिक्षणाव्यतिरिक्त कामें पत्करावीं कीं नाहीं व त्या कामांपासून होणारी द्रव्यप्राप्ती खासगी मानावी कीं नाहीं. टिळकांच्या राजीनाम्याचा सर्व झोंक असा कीं हा

तत्वाचा वादच फुटीला खरा कारणीभूत झाला. आमच्या मतें तत्वाचा वाद खरा होता तरी इतर बाबतींत सोसायटीच्या सभासदांचीं मनें परस्पर कलुषित झालीं व व्यक्तिद्वेष माजला, तो माजला नसता तर, हा तत्वाचा वाद दुस्तर झाला नसता. नामजोशी व टिळक यांचीं तरी सर्वच तत्वें कोठें जुळणारीं होतीं ? पण असें असतांहि त्यांचें व टिळकांचें अखेरपर्यंत भांडण न होतां निभलेंच कीं नाहीं ? त्याचप्रमाणें आपटे, आगरकर यांचें व टिळकांचें इतर बाबतींत जुळलें असतें तर या तत्वाच्या बाबतींत त्यांचें भांडण इतकें विकोपास गेलें नसतें. पण या सर्व लोकांचीं मनें परस्पर इतकीं बिनसून गेलीं होतीं कीं एका खासगी बैठकीस त्यांचें बसणें उठणें बंद पडत चाललें होतें; व शाळेंत एके ठिकाणीं बसणें भागच पडे तेव्हांहि भांडणें इतकीं विकोपाला जात कीं, एखाद्या वेळीं विद्यार्थ्यांनींहि ती गंम्मत पहात बसून आपापसांत टीका करावी. परस्परांना दोष देण्याघेण्याची प्रवृत्ति एकदां सुरू झाली म्हणजे निमित्ताला वाण पडूं शकत नाहीं. पगारवाढ किंवा पैशाची वांटणी या बाबतींत टिळकांनीं मोडता घालावा. व अवक्तशीरपणा, कामांत कुचराई, असले आरोप करून आपटेप्रभृतींनीं टिळकांना कमीपणा आणण्याचा प्रयत्न करावा, अशा गोष्टी हरहमेश घडत. आणि लढाईंत योध्यांपेक्षां बाजारबुणगेंच अधिक हानि करितें,. या म्हणीप्रमाणें तत्वापेक्षां व्यक्तिविषयक कुरबुरीमुळेंच सोसायटींतील एकी नष्ट होऊन टिळकांना राजीनामा द्यावा लागला.

तत्वत: बहुमताचा सिद्धान्त मान्य करणारे असे टिळक असले तरी, उलटमताच्या लोकांत निमूटपणें बसून वागणें किंवा वादांत मौन स्वीकारणें या गोष्टी त्यांच्या स्वभावांतच नव्हत्या. शेवटीं बहुमत विरुद्ध असल्याकारणानें वाद व मानहानि यांची वाढ होऊं लागली व इतकेंहि सोसून मनानें मानलेलें ध्येय साधत नाहीं तें नाहींच, असें पाहून टिळकांनीं राजीनामा दिला हेंच बरें केलें, असें म्हणावें लागतें. कारण एरवीं त्यांच्या स्वभावाला सुख लागलें नसतें; व शाळेबाहेर पडल्यानें त्यांचें हातून जें उत्कट राजकीय कार्य घडून आलें तें घडलें नसतें. बरोबरीचा दर्जा व बरोबरीचें कर्तृत्व ज्यांचें आहे अशा लोकांत पुष्कळ वेळ नांदून काम करणें हें टिळकांना साधत नाहीं, जेथें जाईन तेथें मी माझेंच चालवीन असा त्यांचा आग्रह असतो व तोच फुटीला कारणीभूत होतो, असा त्यांच्या प्रतिपक्षाचा एक कायमचा आरोप त्यांच्यावर होता; व तो खरा मानला तर टिळकांनीं राजीनामा देऊन बाहेर पडणें हे जसें श्रेयस्कर तसेंच शहाणपणाचेंहि होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कसेंहि मानलें तरी ज्या ध्येयाकरितां टिळकांनीं वकीली वगैरे न करितां शिक्षणसंस्था काढली तें ध्येय सुमारें आठ वर्षांतच टाकून देऊन त्यांना आपल्या आयुष्यक्रमाची दिशा बदलावी लागली येवढें निश्चित आहे.

## भाग १० वा

# क्रॉफर्ड प्रकरण

डेक्कन एज्युकेशन सोसायटी सोडण्याचा निश्चय टिळकांच्या मनानें जसजसा होऊं लागला तसतसें बाहेरच्या सार्वजनिक कामांत पडण्याची योजना ते मनानें करूं लागले. राष्ट्रीय सभेचें काम हें त्यांपैकीं एक होतें. १८८५ सालची पहिली राष्ट्रीय सभा पुण्यास भरावयाची होती, पण ती कांहीं कारणानें पुण्यास भरली नाहीं. पुढें तीन वर्षें राष्ट्रीय सभा बाहेरच्या प्रांतांतून म्हणजे कलकत्ता, मद्रास, अलाहाबाद वगैरे ठिकाणीं फिरून आल्यावर पुन्हां मुंबईची पाळी आली तेव्हां १८८९ सालची राष्ट्रीय सभा पुण्यास भरवावी असा शूट निघाला. याही वेळीं थोडासा मतभेद होऊन मुंबईकर पुढारी पुण्याचा हक्क बुडवून ती सभा फिरून मुंबई शहरींच भरवतील असा रंग दिसूं लागला. पुणेंकरांना याचें सहजच वैषम्य वाटलें. लोकमान्यतेस पात्र झालेल्या बुद्रुग व पोक्त सार्वजनिक सभेचें ठाणें पुण्यास आहे, सबब पहिला नाहीं तरी निदान दुसरा मान मुंबईनें पुण्यास द्यावा असा हक्क पुणेकर सांगूं लागले. यासंबंधीं पुण्यास खाजगी सभा भरली तींत राष्ट्रीय सभेकरतां मुद्रित खर्चाची गोष्ट निघतांच २५ शें रुपयांचे आंकडे जागचे जागीं पडले; व मुंबईकरांचें मन न दुखवितां पुण्यास सभा आणावी अशाविषयीं मुंबईस जाऊन खटपट करण्याकरतां बळवंतराव टिळक व माधवराव नामजोशी यांना पुणेकरांनीं आपले वकील म्हणून पाठविलें. पण ही वाकिली अखेर साधली नाहीं.

तथापि वरील गोष्टीवरून हें दिसून येईल कीं, रा० ब० रानडे वगळले असतां पुण्याचें राजकीय बाबतींतलें पुढारीपण टिळकांकडेच येऊन राहिलें होतें. मात्र त्यांच्या जोडीला माधवराव नामजोशी यांचाही निर्देश केला पाहिजे. कारण यापूर्वीं दोन तीन वर्षेंपर्यंत, म्हणजे फर्ग्युसनसाहेबांच्या कारकीर्दीची अखेर व रे साहेबांच्या कारकीर्दीची अव्वल, या अवधींत नामजोशांनीं आपल्या उद्योगप्रियतेनें पुढारीपण मिळविलें होतें. पुण्यास राष्ट्रीय सभा झाली असतां रा. सा. मंडलीक यांना अध्यक्षस्थान द्यावें असें पुणेकरांचें मत होतें. पण सभा मुंबईसच ठरली व रा. सा. मंडलीक हे ता. ९ मे १८८९ रोजीं वारले. यामुळें पुणेकरांचे सर्वच बेत ढासळले. या सालीं मुंबई इलाख्याची दुसरी प्रांतिक सभा भरविण्याचा मान मात्र पुण्यास मिळाला. या सभेची व्यवस्था जुन्या प्रांतिक कॉंग्रेस कमिटीकडेच असे. पण या कॉंग्रेस कमिटीचा कारभार बराचसा शिथिल असल्याची तक्रार होती. बाहेर गांवाहून प्रतिनिधी मंडळी बरीच आली; पण खुद्द पुणें शहरच्या

वतीनें प्रतिनिधींची निवडणूकहि झाली नाहीं! मुंबईचे पुढारी सभेस आणण्याचाहि प्रयत्न झाला नाहीं. या गोष्टींनीं जुन्या व्यवस्थेस एक प्रकारें दूषणच लागलें, व त्यांदेबदल करण्याकरतां पुढील प्रांतिक सभेचे सेक्रेटरी म्हणून टिळक, नामजोशी, व गोपाळराव गोखले या त्रिवर्गाची नेमणूक झाली. रा० ब० रानड्यांचें शिष्यत्व पत्करून व आगरकरांचे स्नेही आणि सुधारकाचे संपादक या नात्यानें गोपाळराव गोखल्यांनीं सार्वजनिक चरित्रांत प्रवेश केला होता; व त्यांच्या तरतरीतपणावरून त्यांच्या कर्तृत्वाविषयीं लोकांच्या मनांत आशा उत्पन्न होऊं लागली होती.

राष्ट्रीय सभेसंबंधाचें पुणें प्रांतांत खटपट करण्याचें काम १८८९ पासून टिळकांकडे आलें तरी तें अर्थात् फार अल्प, म्हणजे केव्हां तरी करण्याचें व अगदीं थोड्या वेळांत किंबहुना फावल्या वेळांत केव्हां तरी उरकण्यासारखें होतें. पण याशिवाय दुसरी एक महत्त्वाची कामगिरी टिळकांकरतां या सुमारास आपोआप निर्माण होत होती. व ती टिळकांनीं जरी यदृच्छेनें पत्करली तरी तिनें थोडक्यांत टिळकांच्या अंगचे कर्तेपणाचे गुण लोकांच्या निदर्शनास आणले. ही कामगिरी म्हटली म्हणजे क्रॉफर्ड प्रकरणासंबंधाची होय. या कामगिरीचे दोन भाग होते. एक क्रॉफर्डसाहेबांच्या लांचलुचपतीचे प्रकार जाहीर रीतीनें सिद्ध करून नाकानें वांगीं सोलणाऱ्या युरोपिअन लोकांची नीतिमत्ता कितपत असते हें चव्हाट्यावर आणावयाचें. पण या कामीं स्वतः मुंबईसरकारानेंच पुढारीपण घेतलें असून टिळकांसारख्या खाजगी लोकांनीं करण्याची कामगिरी थोडी होती. तथापि दुसरी कामगिरी अधिक अवघड व हिंदी लोकांच्या हिताची होती. ती कामगिरी म्हणजे ज्या मामलेदार वगैरे लोकांनीं क्रॉफर्डसाहेबांस लांच चारल्याच्या जाहीर कबुल्या सरकारच्या सांगण्यावरून दिल्या व स्वतःस दोषी ठरवून घेतलें त्यांना सरकारानें पुढें अंगाबाहेर टाकल्यावर त्यांचेवर फौजदारी खटले होऊं नयेत, व त्यांना मिळालेल्या माफीबरहुकूम त्यांचे अधिकार निदान पगार कायम रहावेत अशाविषयीं खटपट करणें ही होय. व्यक्तिशः टिळक व क्रॉफर्डसाहेब यांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नव्हता. पुण्याच्या पुढारी गृहस्थांपैकीं एकाचाच क्रॉफर्डसाहेबांशीं स्नेह, व तोहि जीवश्च कंठश्च असा स्नेह होता. हे गृहस्थ सितारामपंत चिपळूणकर हे होत. टिळकांचा क्रॉफर्डशीं संबंध म्हटलाच तर त्यांच्या वडिलांचे, म्हणजे एका अर्थानें स्वतः त्यांचे, हजार दोन हजार रुपये रत्नागिरी येथील सॉ मिल् कंपनींत बुडाले यापुरताच पूर्वी आलेला होता. परंतु ती गोष्ट मनांत ठेवून टिळक क्रॉफर्ड प्रकरणांत पडले असा अर्थ नाहीं. पण क्रॉफर्ड प्रकरणीं टिळकांनीं जें काम केलें त्याचा सूड क्रॉफर्डसाहेबांनीं मात्र पुढें उगवून घेतला. तो असा कीं १८९७ सालीं टिळकांना शिक्षा झाली हें विलायतेस क्रॉफर्डसाहेबांना कळतांच त्यांनीं सर्व चित्पावन ब्राह्मणांवर, विशेषतः पुण्यांतील चित्पावनांवर व पुणेरी वर्तमानपत्रांवर हे सर्व दुष्ट आहेत, सर्प आहेत, उकिरड्यावर लोळणारे आहेत, वगैरे शेलक्या

शब्दांनीं यथेच्छ तोंडसुख घेऊन एक भिकार चोपडें प्रसिद्ध केलें व तें आपल्या खर्चानें वांटलें.

असो. टिळकांनीं क्रॉफर्ड प्रकरणीं कोणती कामगिरी केली हें सांगण्यापूर्वी क्रॉफर्ड प्रकरण हें काय होतें याची थोडक्यांत संगतवार माहिती देणें योग्य होईल. क्रॉफर्डसाहेब हे एक अस्सल इंग्रज सिव्हिलियन होते. ते मोठे बुद्धिमान असत. पण बुद्धिमान् मनुष्यांच्या अंगीं असणारा आळसहि त्यांच्या अंगीं पूर्णपणें वसत होता. महिना महिनाभर ख्याली खुशालींत रहावें, व काम तुंबलें म्हणजे एखाद्या रात्रीं अवशीच्या प्रहरीं टेबलावर एका बाजूस शेलक्या प्रकरणांचा डोंगर रचावा, दुसरे बाजूस दारूच्या बाटल्या व सिगारेटच्या पेट्या ठेवून द्याव्या; व उजाडेपर्यंत तीं प्रकरणें, ती दारू, व त्या विड्या सर्व संपवून सूर्योदयाच्या वेळीं साहेबांनीं पांघरुणांत शिरून ऐन माध्यान्हीची मध्यरात्र करावी, असा त्यांचा प्रघात असे. ते लिहिणार मोठे फर्डे असत; व त्यांचे कित्येक भाविक भुत्ये, साहेब एकाच वेळीं डाव्या उजव्या हातानें निरनिराळे दोन दोन रिपोर्ट किंवा शेरे लिहूं शकतो असें मानीत. त्यांचा स्वभाव अत्यंत खर्चिक असून ते ज्या जिल्ह्यांत असतील त्या जिल्ह्यांतील सुखावलेल्या सर्व युरोपिअन स्त्रीपुरुषांचा अड्डा त्यांच्या बंगल्यांत कायमचा पडलेला असे. या स्त्रीवर्गाला जिच्या तिच्या लायकीप्रमाणें मोत्यांच्या हारापर्यंतहि क्रॉफर्ड साहेबांकडून देणग्या मिळत. हा सर्व पैसा ढोळस पगारांतून किंवा आंधळ्या भत्त्यांतूनहि पुरा पडणें अर्थातच शक्य नव्हतें; व लांचलुचपतीची खोड साहेबमजकुरांना अगदीं पहिल्यापासूनची होती. या लांचापैकीं कांहीं ते कर्ज म्हणून घेत व कांहीं देणगी म्हणून स्वीकारीत. पण त्यांच्या तर्फे एक गोष्ट सांगणें न्यायाचें होईल; ती ही कीं त्यांचा स्वभाव खरोखर दिलदार व सरदारी असून, त्यांनीं ज्यांचा लांच घेतला त्यांचीच काय पण ज्यांचा न घेतला त्यांचीहि कामें करून दिलीं. त्यांनीं कोणाच्या डोक्यांत दगड घातला असेल तर तो सरकारच्याच. किरकोळ नोकऱ्या वगैरे तर बोलावयासच नको; पण जमिनीच्या देणग्या व वतनाच्या सोडवणुकी या त्यांच्याइतक्या आजवर कोणत्याही साहेबानें दिल्या किंवा केल्या नाहींत. नेटिव लोकांत मिळून मिसळून वागण्याची त्यांची हातोटी कांहीं विशेषच होती. त्यांतल्यात्यांत कोंकणप्रांत हा त्यांना फार प्रिय वाटे. रत्नागिरी ही ते आपल्या जन्मभूमीप्रमाणें मानीत. अस्सल कोंकणी मराठी भाषा तर ते इतकी उत्कृष्ट बोलत कीं, पडद्याआडून ऐकल्यास युरोपिअन बोलतो कीं नेटिव बोलतो हें कोणासहि कळून यावयाचें नाहीं. रत्नागिरी येथील सुप्रसिद्ध धनिक सावकार काका फडके यांना ते प्रत्यक्ष चुलत्याप्रमाणें मानीत; व लहर लागेल तेव्हां अभावितपणें काकांच्या माजघरापर्यंत जाऊन बसून गोष्टी बोलून हवा तो पदार्थ मुद्दाम मागून घेऊन खात असत असें म्हणतात. तात्पर्य,

नेटिव लोकांशीं इतक्या खेळीमिळीनें वागणारा दुसरा कोणी सिव्हिलियन झाला नाहीं ही गोष्ट अगदीं निश्चित होय.

एवंगुणविशिष्ट अशाहि क्रॉफर्डसाहेबांच्या दोषांची बाजू फार दिवस झांकून राहाणें मात्र शक्य नव्हतें. ज्या मानानें जनतेंत त्यांचे मित्र त्या मानानें सरकारदरबारीं त्यांचे शत्रु वाढले. कोणी साहेब हा सरकारचें नुकसान करतो म्हणून नाराज, कोणी हा गोऱ्या लोकांच्या नीतिमत्तेला काळिमा लावतो म्हणून रुष्ट, कोणी हा नेटिवांशीं फाजील सलगीनें वागून अधिकारी इभ्रतीस बट्टा लावतो म्हणून नाखुष, व कोणी आपल्या घरच्या बायकांस यानें दिलेल्या मौल्यवान देणग्यांच्या कारणानें मनांतून खट्ट व क्रुद्ध. क्रॉफर्डसाहेबांच्या अपराधांचें माप शीग भरून सांडायला लागण्यास अर्थातच पुष्कळ दिवस गेले. ज्या बेअब्रूच्या भावनेनें वरिष्ठ साहेब लोकांना क्रॉफर्डसाहेबांचें करणें मनांतून आवडत नसे तीच बेअब्रू चव्हाट्यावर येण्याच्या भीतीनें ते साहेबमजकुरांच्या दोषाविष्करणास मागें घेत. पण अखेर लॉर्ड रे यांच्या कारकीर्दीत क्रॉफर्डसाहेबांची यापुढें गय न करण्याचा निश्चय झाला. मुंबई सेक्रेटरीएटमध्यें या प्रकरणाचा खल गुप्त रीतीनें बरेच दिवस चालू होता, व ता. २४ जून १८८८ रोजीं ओमॅनीसाहेब पोलिस इन्स्पेक्टर जनरल यांची या कामीं नेमणूक झाली. चौकशीस शेवटचें निमित्त कारण म्हटलें म्हणजे खानदेशांतील भडगांव येथील सरकारी शेतें खेमजी जिवा नांवाच्या व्यापाऱ्यास, लांच घेऊन, फार थोड्या किंमतीनें विकलीं हें झालें. युरोपिअनांपैकीं रिची, नेलर, म्यूर, मकेंझी व न्यूजंट हे गृहस्थ क्रॉफर्डविरुद्ध उभारणी करण्यांत प्रमुख असून, नेटिव कामगारांपैकीं भीमभाई किरपाराम, बाबासाहेब पेंडसे वगैरे मंडळी पुढारी होती. क्रॉफर्डसाहेब कमिशनर व पेंडसे हे यांचे नेटिव असिस्टंट व मुख्य हुजुर चिटणीस असल्यामुळें त्यांना सर्व गोष्टींची कच्ची माहिती होती; व मामलेदार वगैरे मंडळी सर्व त्यांची अंकित असल्यामुळें पुराव्याची मुख्य किल्लीहि त्यांचेच हातीं होती. खलबतांत प्रथम मामलेदारांपासून जबरीनें लांच खाल्ल्याचे स्पष्ट पुरावा असलेले दोनतीन मुकदमे उभे करावे, व एकांतून दुसरें, दुसऱ्यांतून तिसरें, अशीं सर्व प्रकरणें हळू हळू पिंजून बाहेर काढावीं असें ठरलें. मामलेदारांस खाजगी बोलावून घेऊन, त्यांना लांच चारल्याची कबुली देण्यास उभें करण्याचें काम पेंडसे यांजवर सोंपविण्यांत आलें होतें. पण तें फार अवघड होतें. कारण मामलेदारांनीं अशी कबुली देणें म्हणजे आपल्या हातानें आपला गळा कापून घेण्यासारखेंच होय. साक्षीदार या नात्यानें मामलेदारांना लांच दिल्याच्या गुन्हाची माफी तरी सरकारानें देणें अवश्य होतें, व योग्यायोग्यता पाहून ती माफी देण्याचा अधिकार अखेर चौकशीच्या हुकमाबरोबरच ता. २८ जून रोजीं सरकाराकडून ओमॅनी साहेबाकडे पाठविण्यांत आला. हा माफीचा मुद्दा महत्त्वाचा असून टिळकांनीं क्रॉफर्ड प्रक-

रणीं केलेल्या कामगिरीचा मुख्य संबंध त्याशींच असल्यामुळें तो मुद्दा वाचकांनीं बळकट ध्यानांत धरून ठेवावा.

असो; क्रॉफर्डसाहेबांविरुद्ध पुरावा गोळा करण्याचें काम दुसऱ्या एका अर्थानें फारसें कठीण नव्हतें. सावजें पकडून आणून साहेबांस लांच मिळवून देणारे व त्या कामांत स्वतःही पैसे खाऊन गबर होणारे ठराविक लोक म्हणजे एजंट कोण होते, पैसे देऊनहि कामें कुणाचीं बुडलीं, वगैरे गोष्टी सामान्य लोकांच्या तोंडी झाल्या होत्या. कारण लांचाचीं अनेक कामें भरल्या चावडीवरहि होत. गोऱ्या लोकांची वस्ती व वागणूक जितकी दूर तितकी त्यांना या प्रकरणांतली माहितीहि कमी. आशाळभूत चहाडखोरांकडून त्यांना बरीच माहिती कळत असे. पण माहिती झाली तरी ती मनांत दाबून ठेवण्याकडेच त्यांचा कल. ओमॅनी-साहेब आपल्या रिपोर्टांत लिहितात, " काळे लोक तेवढे लबाड व तोंडासारखें बोलणारे असा आम्हा युरोपियनांचा समज असतो. तेव्हां आपण होऊनच आपल्या-पैकीं एकाद्याविरुद्ध एखादें प्रकरण उघडकीस आणण्यास आम्ही गोरे लोक धजत नाहीं." क्रॉफर्डसाहेबांना जगापुढें ओढण्यास युरोपियन लोकांना पूर्वी दोन तीन प्रसंग आले होते पण ते त्यांनीं दाबले. हल्लींहि चौकशीची मुख्य अडचण ही कीं, एकमेकांविरुद्ध एरवीं बोलणाऱ्या जाती व व्यक्ति पुष्कळ असल्या तरी आपलें अंग उघडें पडूं नये म्हणून जो तो या चौकशीस विरुद्ध. कोणी म्हणे शेवटीं इंग्रज तेवढे एक होतील व आम्ही कबुल्या देणारे नेटिव लोक तेवढे तोंडघशीं पडूं; व खरोखरच शेवटीं तसें होण्याचा प्रसंग आला होता!

या प्रकरणीं दोन पक्ष झाले होते. एक पक्ष म्हणे कीं, साहेब सिव्हिलिअन; कधीं नव्हे तो आयता लांचाच्या खटल्यांत सांपडून, सरकार त्याची चौकशी करण्यास निघालें; आपणां काळ्या लोकांना हे गोरे नेहमीं लांचखाऊ म्हणतात; तेव्हां या वेळीं मामलेदारांनीं कबुलीजबाब देऊन कां होईना साहेब मरतो तो मरावा; नेटिवांची निंदा करणाऱ्या गोऱ्या लोकांच्या तोंडावर टाकायला आयता उपयोगी पडेल. दुसरा पक्ष म्हणे यांत गोरा मरतो हा मुख्य मुद्दा नसून आपण काळे लोक कबुल्या देऊन स्वतःस गुन्हेगार ठरवितों हा मुख्य मुद्दा आहे. आधीं लांच देऊं नये; निदान दिला तर मग कबूल तरी करूं नये. त्यांत नामर्दपणा व चहाड-खोरीचा दोष पदरीं येतो. चोरीचें कोल्हें खाकेंत दडवून ठेवलें त्यानें खाकेंतील मास फाडून खालें तरी चालेल; पण प्राण गेला तरी तें बाहेर न काढणें हाच खरा पुरुषार्थ. सरकारदरबारचें काम म्हटलें म्हणजे त्यांत लांचलुचपत ही असा-वयाचीच. म्हणून लांच दिल्यापेक्षां दिल्याचें कबूल केल्याचा गुन्हा अधिक मोठा ठरतो!

पुण्यांत केसरीप्रभृति बहुतेक लोक पहिल्या पक्षाचे होते; आणि सिताराम-पंत चिपळूणकर, श्रीधर विठ्ठल दाते व ज्ञानप्रकाश हे दुसऱ्या पक्षाचे होते. पण

प्रारंभीं तरी पहिल्याच पक्षाचा जय होऊन भीमभाई पेंडसे वगैरे अधिकाऱ्यांना केसरी व लोकमत यांचा पाठिंबा मिळाल्यामुळें, मामलेदारांनीं भराभर कबुली-जबाब दिले, व पेंडसे हे केवळ सदसद्विवेकबुद्धीच्या प्रेरणेनें या कामांत पडले ही गोष्ट ओमॅनीसाहेबानेंहि नमूद केली आहे. किंबहुना पेंडशांच्या कडकडीत निस्पृहते-मुळेंच या खटल्यांतील पुराव्याची उभारणी झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. तोच प्रकार भीमभाईचाहि. पुरावा तयार होऊन क्रॉफर्डवर बाजू शेकणार असें पाहून या धांदलींत आपला माथा उजळ करून घ्यावा अशा बुद्धीनेंहि कांहीं लोक आपण होऊन पुढें आले. त्यांत क्रॉफर्डसाहेबांचे कांहीं हस्तकहि होते, पण त्यांचीं नावें आम्ही येथें सांगत नाहीं. यांपैकीं कांहीं हस्तकांनीं व पोलिसांनीं उलट क्रॉफर्डसाहेबांवर हेर नेमले. एजंट असामींत हणमंतराव जहागीरदार, कृष्णराव ढोले, काजी अब्बास, स्पायर्ससाहेब, फार काय पण कित्येक भट-भिक्षुकहि होते. बाळाजी गंगाधर साठे यांच्यासारखे दुटप्पी वागणारेहि कांहीं होते. क्रॉफर्डप्रकरणाचे धागे कोंकण कर्नाटक प्रांतींहि पुष्कळ निघाले.

हें सर्व खलबत खुद्द पुण्यास चाललें असतां क्रॉफर्डसाहेबांस त्याची फारशी बातमी नव्हती; व ते रजा घेऊन सिलोनला जाणार अशी वदंता होती. हणमंतरावप्रभृति एंज-टांना मात्र चौकशीची चाहूल लागली; व ते कागदपत्रें वगैरेंचा नाश करून आपा-पल्या बंदोबस्ताला सरसावले. मुंबई कौन्सिलमध्यें किंचित् दुमत असल्यामुळें जम-लेल्या थोड्या पुराव्यावर वारंटें काढून प्रथम हणमंतराव इनामदार याजवरच खटला करण्याचें ठरलें. त्याप्रमाणें ता. १६ जुलै १८८८ रोजीं हणमंतरावाला कैद केलें, क्रॉफर्डसाहेबावर खटला भरला नसल्यानें त्यास नुसतें सस्पेंड केलें, व उघड चौकशीस प्रारंभ झाला. क्रॉफर्डच्या वतीचे जे मामलेदार कबुलीजबाब देण्यास प्रथम नाक बूल झाले त्यांना सस्पेंड केलें. क्रॉफर्डला सोडविण्यास मोठमोठे पारशी जामीन उभे राहिले; पण पुढें असें ठरलें कीं, क्रॉफर्ड याजवर खटला न भरतां कमिशन नेमावें, म्हणजे पुष्कळ प्रकरणें चौकशीस एकदम येतील. आणि क्रॉफर्डप्रकरणाचा पाय लंगडा होण्यास येथूनच खरी सुरुवात झाली. युरोपिअनांची अब्रू जाते या सबबी-वर पुष्कळ युरोपिअन अधिकारीहि गुप्त किंवा उघडपणें विरोध करूं लागले. कांहीं गोऱ्या पोलीस अधिकाऱ्यांनीं या चौकशींतील स्पेशल ड्यूटी नाकारली. गोऱ्या पोस्ट मास्तर जनरलानें क्रॉफर्ड व त्याचे हस्तक यांचीं खासगी पत्रें पोष्टांत पकडणें ही साधी गोष्टहि नाकारली. हल्लीं पोलिसांना पोष्टखातें किती मदत करतें हें प्रसिद्धच आहे ! आगष्ट १८ पासून हणमंतरावावर खटला सुरू झाला व त्यास दोन वर्षांची साधी कैद व दोन हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली. शिक्षा झाल्यावर हणमंतरावानें ता. २१ आक्टोबर रोजीं कबुलीजबाब दिला. क्रॉफर्डनें अखेर आपणांस सर्वस्वीं सोडून दिलें याबद्दल त्यास वाईट वाटलें, व त्यामुळेंच त्यानें कबुली दिली. हणमंतरावानें व इतरांनीं एजंट म्हणून हजारों लाखों रुपये

मिळविले; पण ते बहुधा आले तसेच गेले. ऐन अमदानींत हणमंतरावाची मिजास एखाद्या राजाप्रमाणें होती. उन्हाळ्यांत त्याच्या घरांतलि तिसऱ्या मजल्यावरून बर्फाच्या पाण्याचे पाट निघालेले गटारास मिळत, व गुलाबी सरबताशिवाय त्याचे माडीवर दुसरें कांहीं कोणी पीतच नसे. खुद्द रेव्हिन्यु कमिशनरास मुठींत ठेवणारा हा मांत्रिक गाद्यागिरद्यांवर लोळत असतां मिंधे अगर आश्रितभूत मामलेदार याच्या पायाशीं अदबीनें बसून तोंडाला पदर लावून बोलत असें एकानें वर्णन दिलेलें आम्हांस स्मरतें.

असो. क्रॉफर्डसाहेब सस्पेंड झाल्यावर बंगला सोडून हॉटेलांत रहावयास गेले. ता. १७ रोजीं रात्रीं ते बेपत्ता झाल्याचा बोभाटा झाला, व क्रॉफर्डच्या सहीचें एक पत्र असें सांपडलें कीं, "काळजी व अपमान दुस्सह झाल्यामुळें मी मुळा नदींत जीव देण्याकरतां गेलों. माझें प्रेत तुम्हांला होळकरपुलाजवळ सांपडेल." या पत्रावर विश्वास ठेवून, किंवा साहेबास पळून जाण्याला मुदत देण्याकरतां, त्यांचे बंधु लेस्ली क्रॉफर्ड, मुंबईचे एक सॉलिसिटर, यांनीं इतर साहेब लोक जमवून नदींत होड्या घालून सकाळपर्यंत प्रेताचा शोध करण्याची धामधुम मांडली. पण ओमॅनीसाहेबांस हें खरें न वाटून त्यांनीं जवळपासच्या स्टेशनांची नाकेबंदी केली. दुसऱ्या दिवशीं पहांटेस पुणें स्टेशनावर पांढऱ्या दाढीचा आणि अंगांत पायघोळ मळकट अंगरखा घातलेला, तसेंच टोपी डोळ्यावर बरीचशी ओढून घेऊन गळ्याभोंवतीं हातरुमाल गुंडाळलेला एक युरोपिअन मेलगाडींत चढला, असें पुणें स्टेशनावर पाळत ठेवणारे पोलिस इन्स्पेक्टर जेफ्रिस यांनीं ओमॅनीसाहेबांस कळविलें, व त्यांनीं ती बातमी मुंबईच्या पोलिसांस कळविली. इकडे क्रॉफर्डसाहेब कल्याणास उतरून मचव्यानें मुंबईस जाणार होते. पण शेवटीं आगगाडीनेंच भायखळ्यास जाऊन व्हिक्टोरिया हॉटेलांत उतरले व त्याच दिवशीं तेहेरान नांवाची आगबोट सिलोनला जाणार होती तिचें तिकीट मिळविण्याची खटपट त्यांनीं चालविली. पण तें मिळण्याचे आधींच मुंबई पोलिसांनीं त्यांस पकडिलें. पुण्यास आणल्यावर सत्तर हजार रुपयांचा जामीन घेऊन त्यांस मोकळें करण्यांत आलें. पुण्याचे कलेक्टर मि० व्हायड्ल यांजपुढें क्रॉफर्डसाहेबांवरचा फौजदारी खटला ता० १ आगष्ट रोजीं सुरू होणार होता. पण पुढें कमिशन नेमण्याचें ठरलें. क्रॉफर्ड साहेबांचें म्हणणें आपली चौकशी मुंबई हायकोर्टापुढें व्हावी. हेतु हा कीं, युरोपिअन ज्यूरी मिळून अनायासानें सुटका होईल व मग सरकारच्याहि हातीं कांहीं रहाणार नाहीं.

हणमंतरावास शिक्षा होतांच इतर पांचपन्नास लोकांच्या पोटांत सहजच भीतीचा गोळा उठला. आपण आपल्या तोंडानें कबुल्या दिल्या; कोणी कबुल्या दिल्या नसल्या तरी पुरावा होणार; व जी शिक्षा एजंटाला तीच शिक्षा स्वतः लांच देणाराला! पण ता० २ ऑक्टोबर १८८८ च्या केसरींत टिळक लिहितात, "लोकांनीं आपणांस माहीत असलेली हकीकत सांगून न्यायास पूर्ण सहाय्य दिलें पाहिजे.

सत्तेपुढें शहाणपण नाहीं या न्यायानेंच लोकांनीं लांच दिली हें जाणून सरकार या घाणेरड्या प्रकरणांत मुख्य अपराध्याशिवाय इतरांना फाजील त्रास देणार नाहीं अशी आमची समजूत आहे." व त्या योगानें या लोकांना विश्वास वाटला.

ता. २३ ऑक्टोबर १८८८ रोजीं पुणें येथील कौन्सिल हॉलांत क्रॉफर्ड-कमिशनच्या कामास सुरुवात झाली. कमिशनचे अध्यक्ष वुइल्सनसाहेब असून, क्रॉस्थ्वेट वगैरे गृहस्थ कमिशनचे सभासद होते. साहेबांना डिफेन्सच्या कामीं भरभक्कम मदत होती. सरकारतर्फे अॅडव्होकेट जनरल लॅथम व बॅरिस्टर जार्डीन हे असून क्रॉफर्डसाहेबांतर्फे बॅरिस्टर इन्व्हेरॅरिटी हे काम चालवीत होते, व त्यांस त्यांचे भाऊ, चिरंजीव, शिवाय गंगारामभाऊ म्हस्के वकील वगैरे साह्य करीत होते. अखेर जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यांत कमिशनचें काम संपलें. व स्वतः बॅ. लॅथम यांनींच पुराव्यावर टीका करून शेवटीं असें सांगितलें कीं, "ह्या चौकशीपासून साऱ्यांसच वाईट वाटलें. आम्ही क्रॉफर्डसाहेबावर होईल तितकें न घसरतां काम चालविलें पण आम्हांला आपला पक्षहि सांभाळवयाचा होता. आपण जर क्रॉफर्डसाहेबांस निर्दोषी ठरविलें तर त्यापासून आम्हांस संतोषच होईल; आणि साहेबांना आपलें निर्दोषित्व स्थापन करतां आलें नाहीं असें जर आपण म्हणाल तर त्यापासून आम्हांस अत्यंत खेद होईल. त्यांत एकट्या क्रॉफर्डची नाचक्की नाहीं. साऱ्या इंग्लिश लोकांच्या कीर्तीला काळिमा येणार आहे!"

हें स्वतः सरकारी वकिलाचें या कामांतलें भाषण! मग आरोपींचा वकील काय म्हणाला असेल हें सांगावयासच नको. एप्रिल १८८९ च्या अखेरीस कमिशनचा रिपोर्ट स्टेट सेक्रेटरींकडे जाऊन त्यावर त्यांचा खलिताहि आला. कमिशननें लांचाचा आरोप नाशाबीत धरला व स्टेट सेक्रेटरींनीं हा निकाल मान्य केला. पण आपल्या ताब्यांतील लोकांकडून साहेबांनीं कर्जें काढलीं हा आरोप शाबीत धरून स्टेट सेक्रेटरींनीं क्रॉफर्डसाहेबांना नोकरींतून कमी केलें. अशा रीतीनें जो मुद्दा शाबीत व्हावयाचा तो नाशाबित, व जो शाबीत करण्याची फारशी जरूर नव्हती तो शाबीत असा प्रकार झाला. गोरी कातडी हीच सद्‌गुणाची साक्ष आणि काळी कातडी हाच अविश्वासाचा आधार असें झालें. मुंबईसरकारानें कमिशनच्या ठरावावर टीका करून क्रॉफर्डसाहेब दोषी आहेत असें दाखविलें होतें. लांच खाणारे एजंटाला दोन वर्षें शिक्षा व दोन हजार दंड आणि लांच खाल्लेल्या क्रॉफर्डास कांहींच नाहीं! तसेंच क्रॉफर्डसाहेब लांचाच्या आक्षेपांतून निसटले आणि मामलेदार मात्र लांच दिल्याच्या कबुलीजबाबांत अडकून पडले. ज्या धूर्त पक्षानें कबुलीजबाब देणाऱ्यांस दोष दिला होता त्यांचेंच म्हणणें शहाणपणाचें असें म्हणण्याची पाळी आली. पुढें तर असें झालें कीं, क्रॉफर्डसाहेब विलायतेस निघून गेले, त्याच्या बायकोस सरकारानें पेनशन ठरवून दिलें, आणि इकडे मामलेदार लोक वटवाघळासारखे लोंबत राहून, सर्व अँग्लो-इंडियन पत्रांनीं ब्राह्मण लोकांवर

हत्यार उचललें. हे निलाजरे, लांचखाऊ, कबूलजबाबी, मामलेदार न्यायाच्या कामाला अयोग्य असें कांहीं हायकोर्टाचे जज्ज म्हणूं लागले. कोण मामलेदार ठेवावा कोण काढावा याविषयीं निवडानिवड सुरू झाली. तिकडे पार्लमेंटमध्येंही लॉर्ड रे यांच्याविरुद्ध क्रॉफर्डच्या मित्रांनीं झोड उडविली.

प्रथमपासून कबुलीजबाब देणाऱ्या मामलेदारांचा पक्ष केसरीनें उचलून धरला असल्यामुळें, मामलेदारांचें काय होणार याविषयीं टिळकांना चिंता उत्पन्न झाली. यामुळें १८८९ च्या मे महिन्याच्या अखेरीपासून ते या कामीं झटून पडूं लागले. येथें एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही कीं, कबुली–पक्षाचें समर्थन टिळकांनीं केसरींतून तर केलेंच होतें; पण पेंडसे व भिमभाई कृपाराम यांजकडे टिळकांचें या दिवसांत नेहमीं जाणें येणें असून, त्यांच्या खलबतांतहि ते असत. बाबासाहेब पेंडसे व टिळक ह्यांचा पूर्वीचा स्नेह विशेष नव्हता; पण तो या प्रसंगीं दृढ झाला. भिमभाईदेखील टिळकांचे चहातेच होते. तात्पर्य टिळकांची व त्यांच्या पत्रांची मदत ही प्रत्यक्ष लोकमताची मदत या नात्यानें, पेंडसे व भिमभाई यांना नुसती ग्राह्यच नव्हे तर मौल्यवानहि वाटत होती. एकट्या सितारामपंत चिपळुणकरांखेरीज पुण्यांतील बहुतेक प्रमुख लोक कबुलीजबाब देण्यास अनुकूल असून रानडे, गोखले, टिळक, व डे. ए. सोसायटींतील मंडळी ही सर्व यापुरती एकमताची होती. चिपळुणकरांचें येणें जाणें क्रॉफर्डसाहेबांकडे फार असे. पण चिपळुणकर अत्यंत निःस्वार्थी, लांचलुचपतींत कधींहि न पडणारे, एका पैशानेंहि कोणाचे मिंधे राहणारे नव्हत. असें असतां राजकारणाचा अभ्यास व सरकारी कामकाजाचा व्यासंग या मुळें क्रॉफर्डसाहेबांस चिपळुणकरांची फार मदत होत असे. साहेब लोकांना भेटून सरकारी माहिती काढणें व त्यांजकडून सार्वजनिक कार्यास होईल तितकी मदत मिळविणें ह्यांत सितारामपंत चिपळुणकरांचा हातखंडा असे. आणि शेवटीं क्रॉफर्डसाहेबांच्या अंगावर आभाळ कोसळलें, तेव्हां अशा वेळीं मित्रानें मित्राला दगा देणें हा कृतघ्नपणाचा कळस असें वाटून, पुण्यांतील सर्व लोकांस न जुमानतां, क्रॉफर्डसाहेबांविषयीं आपली सहानुभूति अगदीं उघडपणें दाखविण्याचा क्रम त्यांनीं सुरू ठेवला. व याचें प्रायश्चित्तहि त्यांना भोगावें लागलें. क्रॉफर्डप्रकरणावर सार्वजनिक सभेला इतर विषयांप्रमाणेंच मत प्रदर्शित करणें प्राप्त; सभेंतील फार मोठें बहुमत क्रॉफर्डविरुद्ध, आणि स्वतः चिपळुणकर तर सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी! चिपळुणकर म्हणत मी क्रॉफर्डविरुद्ध लिहिणार नाहीं. सभेंतील लोक म्हणत आमचें मत तुम्हांस लिहिणें प्राप्त आहे. शेवटीं मतभेदाच्या कात्रींत चिपळुणकर सांपडले, व गोपाळराव गोखले ह्यांच्या मित्रांनीं सेक्रेटरीचें काम गोपाळरावांस मिळावें अशी महत्त्वाकांक्षा धरली. यामुळें अखेरीस चिपळुणकरांना आपल्या जागेचा राजिनामा द्यावा लागला.

टिळकांना अशा रीतीनें कोणी कात्रींत धरलें नव्हतें, पण मामलेदार संकटांत

पडले ही गोष्ट त्यांचे मनाला जाचूं लागली. ता. २१ मे १८८९ च्या केसरींत टिळकांनीं लिहिलें कीं, खरी साक्ष देण्याच्या अटीवर मामलेदारांना माफी दिली गेली आहे व त्यांनींहि खरी साक्ष दिली आहे, तेव्हां आतां त्यांची माफी त्यांच्या पदरांत पुरी पडली पाहिजे. मामलेदारांच्या एका केसालाही धक्का लावण्यास सरकारला अधिकार पोंहोंचत नाहीं, तसें केल्यास मोठा विश्वासघात होईल. क्राफर्डसाहेबांना जर लांचाच्या मुद्यावर शिक्षा नाहीं तर मामलेदारांना तरि कां? 'अशा डागळलेल्या मामलेदारांचें वजन रयतेवर कसें पडावें' याहि आक्षेपास केसरींत समर्पक उत्तर दिलें होतें. या सुमारास पुण्यास प्रांतिक सभा भरली तींत क्राफर्डप्रकरणीं मुंबईसरकारनें पत्करलेल्या धोरणाचा बहुमान केला होता. पण ही सभा प्रायः ब्राह्मण लोकांची, इतर जात त्यांत कमी, अशा युक्तिवादानें 'टाईम्स'नें सभेच्या ठरावास हरताळ फांसण्याचा बेत केला. सभेच्या विषय नियामक कमिटींत या विषयावर थोडा मतभेद झाला होता ही गोष्ट खरी. तथापि, अखेर मोठ्या सभेंत वरील ठराव फक्त एकदोन मतांखेरीज सर्व मतांनीं पास झाला; आणि ठरावाची सूचना सभेंत मांडण्याचें काम टिळकांकडेच देण्यांत आलें होतें.

मुंबईसरकारानें नऊ मामलेदारांचे अधिकार काढून घेतले. कित्येकांची बढती थांबविल्याचीहि बोलवा ऐकूं येऊं लागली. तात्पर्य कबुलीजबाब देणें ही गोष्ट एकंदरीनें वेडेपणाची ठरून मुंबईसरकारचे माफीचे अभयवचन अधोगतीस जाण्याचा रंग दिसूं लागला. ज्यांनी कबुलीजबाब दिले नाहींत ते लोक आतां मिशांवर ताव देऊं लागले! ता. २५ जूनचा केसरी भीतभीत लिहितो "अधिकार काढून घेतल्यानें ज्यांची बेअब्रू झाली या लोकांना, आपलें वचन स्मरून, मुंबईसरकार द्रव्यद्वारा तरी नुकसान भरून देईल काय?" इकडे पुण्यांत श्रीधर विठ्ठल दात्यांसारखे कांहीं प्रतिष्ठित कुचेष्टेखोर होते त्यांनीं या दुर्दैवी मामलेदारांच्या मागें निराळाच ससेमिरा लावला. अशा लोकांना कामावर ठेवूं नये, पगार देऊं नये, येवढेंच फार तर 'अँग्लो इंडियन' पत्रें म्हणत. पण दाते यांनीं गणपतराव साठे नांवाच्या गृहस्थास पुढें करून फौजदारी फिर्यादींचेंच शुक्लकाष्ट त्यांच्या मागें लाविलें. दात्यांचा मामलेदारांवरील राग त्यांनीं लांच दिल्याबद्दल नव्हता तर तो कबूल केल्याबद्दल होता. लांचलुचपत हा दरबारी अरण्यांतील एक राजमार्गच होय असें ते मानीत. स्वतः त्यांची कारकीर्द दारू–कामांतील घडाबाजीप्रमाणें गाजलेली असून, ते बडतर्फ झाल्यानंतर पुण्यांत कायदेबाजी करून आपला लौकिक व द्रव्यसंचय वाढवीत होते. त्यांना मामलेदारांचें हें करणें मेषपात्रीपणाचें वाटलें, व त्यांस अद्दल घडवावी या हेतूनें, लांच दिल्याच्या आरोपाकरितां, फौजदारी कोर्टांत त्यांचा इन्साफ व्हावा म्हणून तिऱ्हाईताकडून त्यांनीं फिर्याद टाकविली. यांत मुद्दा असा निघाला कीं, फौजदारी गुन्ह्याबद्दलची फिर्याद सरकारनेंच करावी? किंवा वाटेल त्या मनुष्यास फौजदारी कायद्याचें चक्र प्रचलित करतां येतें? या

मुद्याचा निकाल हायकोर्टांत अस्तिपक्षीं झाला; तथापि साक्ष्यांनीं उपस्थित केलेलें प्रकरण पुढें चालविण्यांत हांशील नाहीं असें म्हणून कागदपत्र हायकोर्टानें माजिस्ट्रेटकडे परत पाठविले.

डागळलेल्या मामलेदारांची खरोखर कींव करण्याची सोडून उलट त्यांजकडे निंदाव्यंजक रीतीनें बोट दाखविणाऱ्या देशी व विदेशी दोन्ही लोकांवर टिळकांनीं केसरींतून हल्ला चालविला, व त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें या विषयास त्याच्या योग्यतेप्रमाणें राजकीय स्वरूप देऊन एकदम लोकमताचें धोरण त्यांनीं पालटविण्याचा प्रयत्न केला. बिचारे मामलेदार कबूल झाले हा त्यांचा दोष व दुष्कर्म, पण "रावबहादूर महादेव वासुदेव बर्वे यांजपासून तों अनंत भट पाळंग्यापर्यंत व बड्या कामदारांपासून तो कचेरी कारकुनापर्यंत पारशी, ब्राह्मण शेणवी, लिंगायत, मराठे, परभु, कुणबी, मुसलमान वगैरे सर्व जातींच्या व सर्व प्रकारच्या लोकांनीं हात साधेल तसा आपला फायदा करून घेतला त्याची वाट काय? आपला हात गुंतला म्हणून दुष्कर्मांचा परिस्फोट करण्यास मार्ग घ्यावें, इतकेंच नव्हे तर मागें राहून नीतिमत्तेचा कोरडा ढोल घालावा हें अश्लाघ्य आहे. पण एका मोठ्या अंमलदारानें सर्व प्रांतच्या प्रांत बिघडवून टाकावा याचें खरें बीज काय?" असा प्रश्न उपस्थित करून टिळक त्याचें उत्तर देतात कीं, आम्हीं हिंदुलोक स्वभावतः गरीब असून, त्यांतूनहि परराज्याखालीं सांपडलेले, तेव्हां आमचे सर्व व्यवहार 'राजा कालस्य कारणं' या न्यायास अनुसरून व्हावे हें ठीकच आहे. लांच देणारे देतांना चरफडले असतील, पण दिल्याशिवाय काफर्डी दरबारांत जर प्रवेशच नाहीं तर ते बिचारे काय करणार? खुद्द मुंबईसरकारास या बातम्या कैक वर्षें असतां त्यांच्याहि हातून या कामीं कांहीं प्रतिकार झाला नाहीं. व लोकांचीहि समजूत अशीच कीं इंग्रज इंग्रजाला कसले मारतात? तात्पर्य, बिघडल्याचा दोष पर्यायानें सरकारावरच येतो, हें जाणून सरकारनें वचनाला खंबीर राहून मामलेदारांना न्याय द्यावा.

सप्टेंबर १८८९ मध्यें हें काम टिळकांच्या प्रयत्नानें अधिक नेटाला लागून त्यास सार्वजनिक स्वरूप आलें. तारीख १ सप्टेंबर १८८९ रोजीं कबूतरखान्यांत पुणेंकरांची जंगी जाहिरसभा भरली. सभेच्या विनंतिपत्रावर रावबहादूर रानडे, भांडारकर, बेदरकर, देशमुख, बाबामहाराज, तुळाजीराव राजे, नबाब अली-मर्दीखां वगैरे झाडून सर्व प्रतिष्ठित लोकांच्या सह्या होत्या. सभेचा हेतु मुंबई-सरकारच्या धैर्याचें अभिनंदन करून, शिवाय मामलेदार लोकांस दिलेलें वचन सर्वस्वी पूर्ण करावें अशाविषयीं विनंती करण्याचा होता. सभेचा विस्तीर्ण मंडप भरून शिवाय सर्वत्र लोक पसरले होते. सभेस दहापांच मुसलमान दोनचार पारशी, करकॅम् (एज्युकेशनल् इन्स्पेक्टर) ग्रॅटहागिअरी (बॉम्बे गॅझेटचे संपादक) वगैरे अनेक मंडळी होती. अध्यक्षस्थानीं रावबहादूर नूल-

कर होते. त्यांनीं प्रास्तविक भाषणांत सांगितलें कीं " नेटिवांवर दोष टाकून चोराला साव ठरवूं पाहण्याचा हा प्रयत्न चाललेला आहे. नेटिवांनीं आजवर माहिती दिली नाहीं असें सरकार म्हणतें पण सरकारच्या सर्वज्ञतेचा डौल येथेंच कसा कोठें जातो ?" सभेंत पहिली सूचना रा. ब. भिडे व माधवराव नामजोशी यांनीं मांडली. यांत सरकारच्या धैर्याचें अभिनंदन केलें होतें. नामजोशी म्हणाले, 'नेटिवांनीं पुढाकार घेतला म्हणूनच क्रॉफर्डप्रकरणांतील घाण बाहेर आली.' दुसरा ठराव बॅ. गाडगीळ यांनीं पुढें मांडला. त्यास टिळकांनीं अनुमोदन दिलें. हाच ठराव वस्तुतः मुख्य होता व त्यांत मामलेदारांस दिलेलें वचन पूर्ण करण्याचा आग्रह होता. तिसरा ठराव प्रो. गोखले व काशिनाथपंत नातू ह्यांनीं पुढें मांडला. त्यांत गोऱ्या वर्तमानपत्रांच्या एकतर्फी लेखांचा निषेध केला होता.

ही सभा दोन तऱ्हेनें महत्त्वाची होती. एक असें कीं, टिळकांनीं आजवर चालविलेल्या खासगी दीर्घ प्रयत्नाचें तें फळ होतें. दुसरें कारण हें कीं, कित्येक लोकांच्या मतें, टिळकांनीं गेल्या नऊ वर्षांत जाहिर सभेंत खरोखर भाषण असें केलें तें याच सभेंत पहिल्यानें ! यापूर्वी एखाद्या कांग्रेसमध्यें किंवा प्राव्हिन्शिअल कॉन्फरन्सच्या एखाद्या बैठकींत टिळक दहावीस वाक्यें बोलले असतील; पण जाहीर सभेंत असे ते कधीं फारसे आलेच नव्हते. यावेळीं पुण्याची आवडती वसंत व्याख्यानमाला ऐन भरभराटींत होती. पुण्यांतील कोणा प्रमुख वक्त्याचें तोंड तींत उघडलें नाहीं असें सहसा घडलें नसेल. तथापि टिळकांचें नांव व्याख्यान मालेच्या यादींत किंवा उपवक्त्यांत कोठेंहि आढळत नाहीं. असो; या सभेची सर्व उठावणी प्रायः टिळकांनींच मूळ केली. यापूर्वी त्यांनीं व्यक्तिशः मामलेदारांचें अर्ज लिहून देण्याचे काम चालविलें होतें. बिचारे मामलेदार तोंडघशीं पडून अनाथासारखे झाले होते ! त्यांनीं स्वतः एकत्र होऊन जाहीर चळवळ करावी अशी त्यांची स्थिति नव्हती. त्यांना 'पेकट' मामलेदार असें नांव लोकांनीं दिलें होतें. यामुळें दररोज कोठें तरी खासगी रीतीनें जमावें व जो कोणी सहानुभूति दाखविणारा भेटेल त्याजपाशीं आपलें दुःख सांगावें एवढाच त्यांचा क्रम सुरू होता. कायद्याचें ज्ञान, परदेशची माहिती, तुलनात्मक विचार, वगैरे गोष्टी त्यांना स्वतःला सुलभ नव्हत्या. पण टिळकांनीं या कामांत लक्ष घातल्यापासून ही उणीव भरून निघाली. सरदार खासगीवाले ह्यांचे वाड्यांत रावसाहेब घारपुरे म्हणून एक पेन्शनर गृहस्थ टिळकांचे परम स्नेही रहात असत; व अलीकडे टिळकांनीं सोसायटी सोडून दिल्यापासून संध्याकाळीं बसून गप्पा मारण्याचा त्यांचा अड्डा घारपुऱ्यांचे घरींच पडला होता. अर्थात् सुईमागें दोरा या न्यायानें ही मामलेदार मंडळीहि तेथेंच जमूं लागली. होतां होतां क्रॉफर्डप्रकरणांतील खलबतांचें तें एक केंद्रस्थानच बनलें. या सुमारास टिळकांनीं विलायतेंत विल्यम् डिग्बी ह्यांच्या मार्फत मामलेदारांसंबंधानें एखादें बिल खुद्द

पार्लमेंटांत आणण्याची खटपट चालविली होती, हें त्या उभयतांच्यामधील पत्र-व्यवहाराचे जे उल्लेख पुढें दिले आहेत त्यांवरून दिसून येईलच.

सभेंत टिळकांनीं केलेलें भाषण सर्वांत अधिक सविस्तर व मुद्देसूद होतें. त्यांच्या भाषणाचें तात्पर्य असें होतें कीं, 'अभयवचन न पाळणें हा विश्वासघात, व तो स्टेट सेक्रेटरीस काय पण पार्लमेंटासहि करतां येत नाहीं. मामलेदारानें पैसे भरून अधिकार विकत घेतला असेल, परंतु त्यामुळें तो नोकरीस नालायख होतो असें पीनलकोड सांगत नाहीं. विलायतचा सन १५५२ चा कायदा हिंदुस्थानास १८१९ सालीं लागू केला गेला खरा; पण अभयवचनानें कायद्याचे उल्लंघनाचा दोष टळतो. १७२५ सालीं, विलायतेंत लार्ड चान्सेलरच्या हाताखालच्या नाझरापैकीं लार्ड मॅक्लीस फील्ड ह्यांनीं पन्नास पन्नास हजार रुपये लांच देऊन कांहीं अधिकाराच्या जागा विकत घेतल्या. हणमंतराव व अष्टेकर ह्याप्रमाणें लाटसाहेबांनींहि एजंट नेमले होते. भर पार्लमेंटातील ही गोष्ट. पुढें खटला झाला तेव्हां पुरावा गोळा करण्याकरितां हल्लींसारखीच तेव्हांहि माफी द्यावी लागली; व हें अभिवचन पुरें पाडण्याकरितां अवघ्या दोनच दिवसांत पार्लमेंटनें कायदा पास करून टाकला. आणि आतां मात्र क्राफर्डप्रकरणीं पार्लमेंटांत गोंधळ घालीत बसले आहेत. पार्लमेंटचा हा दाखला मुंबईसरकारानें मानला पाहिजे. विलायतेंत माफीचें बिल पार्लमेंटनें मंजूर केल्यानंतर साक्षीदारानें साक्षी दिल्या. इकडे मामलेदारांनीं सरकारचें अभिवचन हा कायदा असेंच मानून साक्षी आधीं दिल्या. मिळून फरक काय झाला? विलायतेंत ते लोक जर नोकरींत राहण्यास लायक तर मामलेदार नालायक कां? शिवाय मामलेदारांमध्यें सरकारास निवडानिवड करण्याचा अधिकार नाहीं. तात्पर्य, मामलेदारांनीं या वेळीं दिली हीच मदत मोठी असें मानून भेदाभेद न करतां सर्वांस नोकरीवर ठेवावें.'

अखेर मुंबई सरकारनें आठ मामलेदार तर बळी दिलेच. पण बाकीच्यांचें रक्षण करण्याकरितां हिंदुस्थानसरकारानें सिमला येथें आपल्या कौन्सिलांत एक बिल आणलें. मात्र त्यांत कोणत्याहि मामलेदारावर या प्रकरणीं फिर्याद दिवाणी अगर फौजदारी चालणार नाहीं एवढाच मजकूर होता. अर्थात् नोकरीवरून दूर होण्याचा प्रश्न रहातो, व ही नुकसानभरपाई कशी व्हावी याचा कोठें निश्चयात्मक उल्लेख नव्हता. पण केसरीनेंहि अजून धीर सोडला नव्हता. लार्ड रे ह्यांच्या नीतिप्रियतेवर केसरीचा विश्वास होता. टिळक लिहितात कीं, मी खोट्या करारावर सही करीत नाहीं असें कौन्सिलर वॉटसन ह्यानें जसें लार्ड क्लाइव्ह यास ठणठणीत सांगितलें, तसेंच या प्रसंगीं लार्ड रे हे लार्ड लॅन्सडाऊन यांस हें बिल मला मान्य नाहीं, असें ठणठणीत सांगतील अशी अद्यापि आशा आहे. व कदाचित् हेंच सांगण्याकरितां लार्ड रे सिमल्यास गेले असें म्हणतात. इकडे रा. ब. नूलकर हे वरिष्ठ कायदे कौंसिलांत सभासद होते, त्यांच्या विनंतीवरून लोकमत अजमा-

वण्याकरितां म्हणून बिलाचें दुसरें वाचन पुढें ढकलण्यांत आलें. या अवधींत बहुतेक मोठमोठ्या गांवांतून सरकारास तारा किंवा अर्ज जाऊन " तुम्हीं आपलीं वचनें कायदेशीर करून घेऊन अक्षरशः पाळावीं हें मत लोकांनीं सरकारच्या कानांशीं नेऊन भिडविलें. पण सरकारानें वचन मोडलेंच तर पुढें काय करावयाचें ? हा प्रश्न शिल्लक उरलाच होता. ता. १७ आक्टोबर रोजीं हें बिल फिरून कौंसिलांत निघालें, तेव्हांचीं भाषणें जराशीं भीतिप्रदच होतीं. स्कोबलसाहेबांनीं पहिल्यानेंच ठेवून दिलें कीं, ही सर्व चळवळ मामलेदार लोकांच्या कांहीं थोड्या स्नेह्यांचीच आहे. इतर कौंसिलरांचीं अशींच भाषणें होऊन बिल अखेर होतें तसेंच पास झालें. अर्थात् पुढील खटपट करण्याची जागा पार्लमेंट एवढीच उरली. केसरी लिहितो " खटला सुरेख आहे व त्यांत सांपडलेलीं माणसें विद्वान आहेत. त्यांच्या हातूनही जर आपलें काम तडीस गेलें नाहीं तर मग इतरांची गोष्ट कशाला ? "

पण खरें बोलावयाचें तर या मामलेदारांपैकीं एकहि हें काम हातीं घेऊन विलायतेपर्यंत पोंहोंचविण्याला पुढें आला नाहीं. हे विद्वान मामलेदार बारा होते. पण त्यांची भिस्त एका निराळ्या विद्वानावरच या कामीं होती; व ते विद्वान् म्हणजे स्वतः टिळक. पुढें ता. २८ आक्टोबर रोजीं हिंदुस्थानसरकारचा ठराव प्रसिद्ध झाला, त्यावरून मामलेदारांची अखेर वासलात कशी लागावयाची हें नक्की कळलें. मुंबईसरकारानें वर असें लिहिलें होतें कीं, नोकरीवरून दूर केलेल्या मामलेदारांना वचनभंगाबद्दल व नुकसानीदाखल पूर्वीं मिळत असलेला भरपगार पुढेंहि द्यावा, शिवाय मिळणारी बढती द्यावी आणि योग्य वेळीं भरपूर पेन्शनहि द्यावें. तथापि बढती खेरीज करून बाकी सूचना वरिष्ठसरकारनें मान्य केल्या. त्याप्रमाणें लक्ष्मण मोरेश्वर देशपांडे, लक्ष्मण चिंतामण फडके, रामचंद्र यशवंत चौबळ, बाळकृष्ण गोविंद शिंदेकर, देवराव कचेश्वर, गणेश पांडुरंग ठकार, विष्णु रघुनाथ केळकर, मोरो रघुनाथ दिवलकर, वासुदेव रामचंद्र पटवर्धन, सखाराम चिमणाजी जोशी, रामराव हणमंत राजगुरु आणि जनार्दन एकनाथ सहस्रबुद्धे इतक्या लोकांस नोकरीवर ठेवण्यांत आलें. बाकी, पूर्वी नोकरीवरून दूर केलेल्या आठांखेरीज, वामन दाजी नगरकर, विठ्ठल टिकाजी, काशिनाथ विनायक भावे व भगवंत बळवंत प्रधान ह्या चौघांसहि नोकरीवरून दूर करण्यांत आलें. ही निवडानिवड कांहीं तरीच होती !

पण या सर्वांचें भांडण पार्लमेंटपुढें कोण मांडणार ? या बाबतींत टिळकांना आशेची एक जागा दिसूं लागली. ती अशी कीं, पुढें लवकरच डिसेंबरांत मुंबईस भरणाऱ्या राष्ट्रीय सभेकरितां मि. चार्लस ब्रॅडलॉ हे विलायतेंतून येणार होते व त्यांच्या कानांवर हा प्रकार घातल्यास ते कांहीं मदत करतील असा टिळकांना भरंवसा होता. शेवटीं विलायतेंत डिग्बीसाहेबांमार्फत टिळकांनीं या कामीं काय खटपट केली ह्याची थोडीशी माहिती देऊन हें प्रकरण पुरें करूं.

मि. डिग्बी यांचें पत्र ( ता. १० जानेवारी १८९० ) " माझ्या सूचना

तुम्हांस मान्य झाल्या हें पाहून बरें वाटतें. कलकत्ता रिव्हूयूतील बॅरिस्टर ह्या सहीचें आर्टिकल पाठविलें तें पोंहोंचलें. त्यांत कायद्याच्या दृष्टीनें चांगला विचार केला आहे. पार्लमेंट सुरू होतांच, कोणते कागदपत्र टेबलावर ठेवण्याकरितां मागावयाचे याची याद करून तशी सूचना सभेपुढें आणितों. ब्रॅडलॉसाहेबांकडे एक वजनदार डेप्युटेशन पाठवून त्यांना क्रॉफर्डप्रकरणीं सर्व समजूत करून देण्याची तुमची योजना चांगली आहे. ते आपल्या कामास मिळाले तर बराच उपयोग होईल. १८३२ च्या पूर्वी स्वतः पार्लमेंटमध्यें लांचलुचपतीचा प्रकार किती होता याला उद्देशून तुम्ही काढतां तीं अनुमानें बरोबर आहेत. गरीब मामलेदारांनाच अशा स्थितींत दोष देणें बरोबर होणार नाहीं, हें कोणीहि कबूल करील. पार्लमेंटच्या लोकांस हा मुद्दा सांगण्यास बरा आहे."

पत्रः-( ता. ३१ जानेवारी १८९० ). "तुम्ही ब्रॅडलॉसाहेबांच्या अनेक वेळां मुलाखती घेतल्याची जी हकीकत लिहलीत ती वाचून मला बरें वाटलें. सरकारी ठराव, क्रॉफर्डसाहेबाच्या कर्जाच्या यादी, आणि 'इंग्लिश लोकांच्या दृष्टीनें क्रॉफर्ड प्रकरण कसें दिसेल' या विषयावर बी. जी. या सूचक अक्षरांच्या सहीनें पाठविलेलें पॅम्फ्लेट पोहोंचलें. दुर्दैवानें त्याची एकच प्रत आहे, तरी यापुढील कागदांच्या निदान दोन दोन प्रती तरी पाठवाव्या असें त्यांनीं (ब्रॅडलॉनीं) सांगितलें आहे. म्हणजे त्यांना व मला आपआपल्या ठिकाणीं कागद वाचतां येतील. ( या पॅम्फ्लेटासंबंधानें अशी माहिती मिळते कीं, या एकाच विषयावर दोन निरानिराळीं पॅम्फ्लेटें लिहून विलायतेस पाठविण्यांत आलीं होतीं. पैकीं एक बी. जी. या सहीचें म्हणजे अर्थात् बळवंतराव टिळक ह्यांनीं लिहिलेलें व दुसरें त्यावेळचे डिस्ट्रीक्ट जज व भावी न्यायमूर्ती कॅन्डीसाहेब यांनीं लिहिलें होतें. ज्याप्रमाणें टिळकांचा मामलेदारांच्या तर्फे पार्लमेंटांत प्रयत्न चालला होता तसाच, लॉर्ड रे यांच्यावरहि ही बाजू एका अर्थानें शेकत असल्यानें त्यांच्या पक्षाच्या अँग्लो इंडियन लोकांनीहि आपल्याकडून असाच प्रयत्न चालविला होता; व कँडी साहेबांनीं लिहिलेलें हें पॅमफ्लेट त्या उद्योगापैकींच होतें. पुढें ब्रॅडलॉ व इतर लोकांच्या हातीं ही दोन्हीं पॅमफ्लेटें गेलीं तेव्हां त्यांनीं बी. जी. ह्या सहीवर लिहिलेलेंच पॅमफ्लेट दोहोंतून पसंत केलें. बी. जी. म्हणजे कोण हें त्यांस माहित नव्हतें. ) " उभयपक्षांतील कांहीं प्रमुख लोकांच्या भेटी घेऊन त्यांजकडून ब्रॅडलॉ साहेबांना मदत मिळण्याची खटपट मी करून पहात आहें. मामलेदारांचा सत्पक्ष असल्याची ब्रॅडलॉ साहेबांची पुरी खात्री झाली आहे, व हें प्रकरण पार्लमेंटपुढें आणण्याचा त्यांचा निश्चय झाला आहे, हें मी तुम्हांस खात्रीनें सांगतों. म्हणून आतां तुम्ही किंवा तुमचे कोणी दक्षिणी स्नेही यांना याकरितां विलायतेस येण्याचें कारण उरलें नाहीं असें मी सांगतों. स्वतः तुम्ही येतां तर तुमच्याशीं मिळून हें काम करण्याला मला फारच आनंद झाला असता;

पण त्याची आतां विशेषशी गरज नाहीं. ब्रॅडलॉ व मी दोघांनीं बसून विचार केला त्यांत आम्हीं असें ठरविलें कीं, (१) राणीच्या भाषणाला उपसूचना करण्याच्या वेळीं हें प्रकरण पुढें आणूं नये. (२) तसेंच पहिल्या कांहीं दिवसांतहि या विषयींची सूचना पार्लमेंटपुढें आणूं नये. कारण, या प्रकरणाला एकदां नुसता हात लागून तें मागें पडलें कीं पडलेंच. (३) व्हाइसरॉयच्या कौंसिलनें त्यांना हवा तसा कायदा (मामलेदारांसंबंधीं) केला तरी, येथें स्टेटसेक्रेटरी यांना त्याला नकार लावतां येतो. त्या उद्देशानें ब्रॅडलॉ हे बहुधा अंडर सेक्रेटरीला प्रश्न विचारतील. व नकारार्थी उत्तर मिळेल तर तें खुद्द स्पीकरला भेटून बिल पास झाल्यापासून सहा महिन्यांच्या आंत या प्रश्नाचा निकाल लागणें जरूर आहे हें समजावून देऊन चर्चेला लवकर संधी देण्याविषयीं विनंती करतील. तसेंच फर्स्ट लॉर्ड ऑफ धी ट्रेझरी ह्यांची संमति मिळवावी लागेल; ती मिळविण्याची खटपट केल्यास तीहि मिळेल असें ब्रॅडलॉ यांस वाटतें. तात्पर्य पार्लमेंट उघडल्यावर सुमारें दोन महिन्यांनीं हा प्रश्न पुढें आणतां येईल असें वाटते. त्यापूर्वीं तुम्हांकडून आलेल्या सर्व कागदपत्रांचें टिपण व सारांश काढून पार्लमेंटच्या सभासदांच्या हातीं पडेल, अशी खटपट मी करितों."

पत्रः–(ता.७ फेब्रुवारी १८९०) "तुमचें पत्र पोहोंचलें; पण त्यास कलमवारीनें उत्तर आजच लिहितां येत नाहीं. कारण तें पत्र ब्रॅडलॉ यांनीं आपणाजवळ मुद्दाम ठेवून घेतलें आहे. कारण ते मला म्हणाले कीं, टिळकांच्या पत्रांतील सूचना खरोखर फारच मौल्यवान् आहेत. ब्रॅडलॉ यांनीं पार्लमेंटपुढें आणण्याच्या आपल्या ठरावाच्या शब्दांत कांहीं फेरफार केला असून त्याची प्रत मी तुमच्याकडे लवकरच पाठवितों."

पत्रः–( ता. २५ एप्रिल १८९० ) "मुंबई सरकारानें जिल्हाधिकाऱ्यांचीं मतें मिळविलीं त्याची प्रत तुम्हीं गुप्तपणें मिळवून पाठविली ती पोंहोंचली. मी ती गुप्तच ठेविली. ओमॅनीसाहेब लंडनला आले आहेत. त्यांचें व ब्रॅडलॉसाहेबांचें बोलणें चालणें सुरू झालें आहे. माझी व ओमॅनिसाहेबांची गांठ लवकरच पडेल. ता. ६ मेच्या पूर्वीं मामलेदारांचा प्रश्न पार्लमेंटपुढें निघेलसें वाटतें. माझी तार तुम्हांस पोंहोंचली असेल. तुमच्या मार्गांत मी बिलकुल आडकाठी आणणार नाहीं, असें सर जॉन गॉर्स्ट यांनीं ब्रॅडलॉ यांस आश्वासन दिलें आहे. दोन तास तरी वादविवाद चांगला होईल असें वाटतें. रॅडिकल पार्टीच्या चाबुकस्वाराला (व्हिप) आपला चाबूक तयार ठेवण्याची मी विनंती करीत आहें. तुम्हीं पाठविलेले गुप्त कागदपत्र सरकारी रीतीनें प्रसिद्ध होण्याच्या सुमारास खासगी रीतीनें कित्येक सभासदांना घरबसल्या मिळतील अशी व्यवस्था मी करतों. ब्रॅडलॉ यांनीं मागितलेले कागद पार्लमेंटपुढें आजच ठेवण्यांत आले. त्यांत अजूनहि कांहीं कमी दिसतात, तेहि मागवूं."

पत्रः–( ता. ३१ मे १८९० ) "मागील तार रूटरच्या एजन्सीमार्फतच पाठविण्याची व्यवस्था मी केली. व्हॉइसरॉयच्या कौंसिलानें मंजूर केलेल्या बिलास नुसता नकार देऊन भागणार नाहीं, तर पार्लमेंटांत वेगळें पुरवणी बिल आणावें लागेल, ही जी तुमची सूचना ती तुमच्या कारणांसह ब्रॅडलॉ यांजपुढें मी ठेविली आहे. लॉर्ड रे यांस मी भेटणार आहें. ब्रॅडलॉ यांनीं आपली सूचना पुढें कां ढकलली याचीं कारणें तुम्हास मागील पत्रावरून कळलीं असतीलच."

पत्रः–(ता. १३ जून १८९०) "आणखी कोणते कागद मागवावयाचे त्यांची यादी ब्रॅडलॉसाहेबांपुढें मी ठेवीत आहें. पार्लमेंटचा सर्व वेळ हल्लीं प्रधानमंडळ घेत आहे. खासगी लोकांना बिलें आणण्यास अडचण झाली आहे."

पण अखेर वरील अडचणच दुस्तर ठरून पुरवणी बिल वगैरे कांहीं आलें नाहीं. तथापि याहून अधिक प्रयत्न होण्यासारखाहि कांहीं नव्हता. ब्रॅडलॉसाहेबांच्या वजनामुळेंच लागलें तर हें प्रकरण नेटाला लागणार होतें. पण हौस ऑफ कामन्सच्या अधिकारी पुढाऱ्यांपुढें त्यांचें काय चालणार ! फुरसुतीच्या अभावाच्या कारणानें अनेकांचे अनेक प्रयत्न पार्लमेंटांत निष्फळ होतात हें प्रसिद्धच आहे. त्यांतलाच हाहि प्रकार झाला व एकदां हें प्रकरण जें मागें पडलें तें पडलेंच. तथापि हेंहि सांगितलें पाहिजे कीं, मामलेदारांसंबंधीं न्यायाचें माप जरी भरपूर पदरांत पडलें नाहीं तरी टिळकांच्या व इतरांच्या प्रयत्नानें बरेंच काम झालें होतें. सरकारानें कमिशनचा निकाल झाल्यावर असें धोरण ठरविलें कीं, लांचलुचपतीचा प्रकार झाला तरी लांचांच्या रकमा प्रत्यक्ष क्राफर्डसाहेबांपर्यंत पोंचल्याचा सबळ पुरावा नाहीं म्हणून साहेबमजकुरांस या मोठ्या आरोपांतून मुक्त करावयाचें. कर्जें घेतल्याची कबुली क्राफर्डसाहेबांना द्यावीच लागली. तेव्हां त्याबद्दल त्यांना दोषी ठरवून बडतर्फीची शिक्षा देणें भाग पडलें. लांचलुचपत झाली पण त्याचा पैसा प्रत्यक्ष क्राफर्डसाहेबांना पोंचला नाहीं तर त्याची वाट काय झाली याचें सरकारनें उत्तर असें ठरविलें कीं, लांचाच्या सर्व रकमा क्राफर्ड-साहेबांचे मुख्य दलाल हणमंतराव व इतर किरकोळ दलाल यांनीं साहेबांच्या नांवावर स्वतःच खाल्ल्या. तो पैसा किंवा त्याची बातमीहि त्यांनीं क्राफर्डसाहेबाला दिली नाहीं ! बरें ज्यांकडून कर्जेंहि घेतलीं नाहींत अशा लोकांचीं कामें साहेबानें करून दिलीं. तीं कां तर त्याचें उत्तर असें ठरलें कीं, निवळ त्यांच्या अंगच्या भलेपणामुळें. मामलेदार वगैरे लांच देणाऱ्या लोकांचे तीन वर्ग करण्यांत आले. जुलमानें, जबरदस्तीनें किंवा संकट टाळण्याकरितां नाइलाजानें म्हणून त्यांनीं लांच दिले, त्यांना मेहेर नजर करून कांहींना नोकरींत ठेविलें व त्यांची बढती फक्त कांहीं दिवस बंद केली व कांहींना कामावरून दूर केलें. मात्र, त्यांचा पगार चालू ठेवण्यांत आला. पण कोणच्याहि तऱ्हेची जुलूम जबरदस्ती नसतां केवळ लांच खाणारा साहेब भेटला म्हणून लांच देऊन आपलें काम करून घेणाऱ्या

किंवा अवकृपा वांचविणाऱ्या लोकांना तिसऱ्या वर्गांत ढकलण्यांत आलें. आणि त्यांच्यावर खटले न करण्याइतकीच मेहेरनजर करून, त्यांना कामावरून विनपगारी बडतर्फ करण्यांत आले. कामावर राहिलेल्या मामलेदारांचीं उदाहरणें देशपांडे, जोगळेकर वगैरे होत. कामावरून काढले पण पगार चालू ठेविला अशीं उदाहरणें म्हटलीं म्हणजे बापट, कुमठेकर, पटवर्धन वगैरेंचीं. आणि पगार न देतां बडतर्फ केले अशीं उदाहरणें विंझे, कलवडे वगैरेंचीं होत. टिळकांची खटपट मुख्यतः दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांकरितां होती. त्यांचें म्हणणें असें कीं, कबुलीशिवाय लांचाचा दुसरा पुरावा मिळणें शक्य नव्हतें आणि कबुल्या दिल्या त्या माफीच्या वचनावर विश्वास ठेवून दिल्या. अर्थात् अशा कबुलींत निष्पन्न झालेल्या गोष्टींतून फिरून श्लेष काढून हा असा व तो तसा हें म्हणणें बरोबर नाहीं. माफी म्हणजे माफी. मग त्यांत दुसरा विचार नाहीं, असेंच व्हावयास पाहिजे होतें. पण सरकारनें ही विचारसरणी मान्य केली नाहीं. कसेंहि असलें तरी कांहीं थोड्या अगदीं नाठाळ, मूर्ख किंवा लोभी मामलेदारांखेरीज बाकीच्यांची सोय या चळवळीनें चांगली लागली. पेन्शनदाखल घरबसल्या पगार घेऊन शिवाय त्यांपैकीं कोणी परीक्षा देऊन वकीलीचा धंदा करूं लागले, कोणी नेटिव्ह संस्थानांतून नोकरीस गेले, कोणी स्थानिक स्वराज्यांत नोकऱ्या धरल्या व अशा रीतीनें दुहेरी पैसे मिळविले. आणि पुढे पुढे तर या प्रकरणांत सांपडलेल्या मामलेदारांचा दोष इतका विसरला गेला कीं सरकारानें त्यांना रावसाहेब रावबहादुर अशा बहुमानाच्या पदव्याहि दिल्या. एखाददुसरा मामलेदार लांचलुचपतींत सांपडला असता तर त्याला दयामाया न दाखवितां सरकारनें बडतर्फ करून व खटला भरून चिरडून टाकलें असतें. पण एकदम पूर आला म्हणजे खळमळ जशी धुवून जाते तसा या प्रकरणांत प्रकार झाला व पुष्कळ मामलेदार एकाच गुन्ह्यांत सांपडून क्रॉफर्डसाहेबाच्या जिवाकरितां सरकाराला कानाडोळा करावा लागल्यामुळें 'क्रॉफर्ड—मामलेदार' या शब्दांतील दोषाचा ध्वनि देखील लोपून तो एक प्रेक्षणीय किंवा ऐतिहासिक पुरुष असा होऊन बसला. कारण 'क्रॉफर्डमामलेदार' हें नांव उच्चारतांच, 'या मामलेदारानें लांच दिला' असा विचार प्रामुख्यानें मनांत न येतां, 'ज्या क्रॉफर्डनें लांच खाल्ली व नाकानें वांगी सोलणाऱ्या साहेब लोकांची नीति ज्याच्यामुळें चव्हाट्यावर आली, त्याला फजीत करण्यास कारणीभूत झालेला असा भला मनुष्य' हाच विचार मनांत येत असे.

मामलेदार लोकांकरितां टिळकांनीं मेहनत किती केली हें त्यांपैकीं अद्यापि कांहीं लोक हयात आहेत ते गौरवानें सांगत असतात. मामलेदारांतहि पुष्कळ बी. ए. होते, पण त्यांतील एकाच्याहि अंगीं टिळकांनीं केली तशी चळवळ करण्याची कर्तृत्वशक्ती नव्हती. ही चळवळ संपल्यावर कृतज्ञताबुद्धी दर्शविण्याकरितां मामले-

दार लोकांनीं टिळकांना रुप्याचें एक घड्याळ व उपरणें नजर केलें. टिळकांजवळ अखेरपर्यंत असलेलें व पुष्कळ लोकांनीं पाहिलेलें रुप्याच्या बारिक गोफांतील घड्याळ तें हेंच होय.

क्रॉफर्डसाहेब विलायतेस गेले ते पुढें पुष्कळवर्षेपर्यंत इकडे परत आले नाहींत. तेथें बसून सरकारावर त्यांनीं सूड काय घेतला हे माहीत नाहीं. पण आपल्या प्रकरणांत कबुलीजबाब देणारे बहुतेक ब्राह्मण होते हा दंश मनांत ठेऊन त्यांनीं वेळीं अवेळीं ब्राह्मणांची नालस्ती तिकडील वर्तमानपत्रांतून चालविली होती. १८९७ सालीं रँडसाहेबाच्या खुनानंतर क्रॉफर्डसाहेबांनीं एकदम वर उसळी मारून आपल्या द्वेषबुद्धीच्या टीकेचा शेणसडा इतका उडविला कीं, त्याचे शिंतोडे पुण्यापर्यंत येऊं शकले. सुमारें आठवर्षांपूर्वी क्रॉफर्डसाहेब हिंदुस्थानांत एकवार आले होते. माथेरान मुक्कामीं एका स्नेह्यानें त्यांची व प्रस्तुत लेखकाची आपल्या घरीं मुद्दाम भेट करविली, तेव्हां साहेब कांहीं लाभाच्या अभिप्रायानें इकडे आलेले असल्यामुळें त्यांनीं कोणाची फारशी निंदा केली नाहीं उलट टिळकांबद्दल दोन बरे शब्द बोलून महाराष्ट्र व कोंकणप्रांत यांची गोडस्तुतीच केली. १८८८ सालीं पुण्यास क्रॉफर्डकमिशन बसलें होतें. तेव्हां प्रस्तुत लेखक विद्यार्थीदशेंत असून तो ही कमिशनची मौज पाहण्यास गेलेला असून, कौंसिलहॉलमध्यें प्रवेश करून घेण्यास त्याला गर्दीत चोपदाराचे तोबे खावे लागले होते; व आंत शिरल्यावर क्रॉफर्डसाहेब कोणते तें पाहण्याकरितां बसल्या जागेवरून त्याला मान उंच करकरून पहावें लागल्यानें अखेर ती दुखूं लागल्याचें पक्कें स्मरतें. तेच क्रॉफर्डसाहेब माथेरान येथें आपणास मुद्दाम भेटण्यास आले असें पाहून, विशेषतः त्यांचा तो गरिबीचा पोषाख व अदबीचें बोलणें चालणें पाहून, प्रस्तुत लेखकाला किती मौज वाटली असेल याचा विचार वाचकांनींच करावा.

## भाग ११ वा

# केसरी व मराठा-(२)

## (१८८७ ते १८९१)

१८८९ पासून टिळक हे शिक्षणाव्यतिरिक्त दुसरा कांहीं तरी धंदा करण्यास मोकळे झाले. स्वतःच्या उपजीविकेच्या दृष्टीनें त्यांनीं दोन धंदे योजिले. एक कापूस वठण्याची जिनिंग फॅक्टरी काढणें, व दुसरा लॉ क्लास सुरू करणें. जिनिंग फॅक्टरी काढणें हें काम भांडवलाचें असून तींत घालण्याइतका पैसा टिळकांजवळ अर्थातच नव्हता. तथापि सुमारें दहा पंधरा हजार रुपये लोकांकडून कर्ज काढून त्यांनीं या धंद्यांत घातले. जिनिंग फॅक्टरी काढण्याला मोंगलाईतील लातूर हें गांव पसंत करून, दुसरे दोन भागीदार मिळवून, तिसऱ्या हिश्शाच्या भागीदारीनें टिळकांनीं या कारखान्यास सुरवात केली. दुसरे दोन भागीदार पुण्यांतील आबासाहेब परांजपे पर्चीकर व गणपतराव सहस्रबुद्धे असे होते. दुसऱ्या दोन भागीदारांपैकीं पर्चीकर हे हा कारखाना चालविण्यास स्वतः कधींच गेले नाहींत. सहस्रबुद्धे हे स्वतः जात; व टिळकांच्यातर्फे त्यांचे भाचे धोंडोपंत विद्वांस हे पाठविण्यांत आले होते. लातूर हा गांव बारशीरोड (कुर्डुवाडी) स्टेशनापासून सुमारें पन्नास मैल लांब असून तिकडील रस्ताहि मोंगलाई थाटाचा. बारशी लाइट रेल्वे तेव्हां झाली नव्हती. अशा वेळीं इतक्या लांबीवर कारखाना काढून स्वतः आपण त्याची देखरेख करूं असें टिळकांना वाटण्याचा फारसा संभव नव्हता. तथापि दुसरे भागीदार जातीनें हजर राहणार व आपल्यातर्फे आपला भाचा हजर राहणार; आपण फारच झालें तर ऐन मोसमांत एक दोन वेळ खेपा घातल्या म्हणजे काम होईल; अशा समजुतीनें त्यांनीं या कामास हात घातला व कारखाना प्रथम कांहीं दिवस बरा चाललाहि. धोंडोपंत यांनीं नुकत्याच मॅट्रिक्युलेशन व यू. एस्. एफ् परीक्षा देऊन टाकिल्या होत्या. परंतु त्यांना सरकारी नोकरी करावयाची नव्हती, व टिळकांचा किंवा स्वतः त्यांचा ज्यांत उपयोग होईल, असा दुसरा कारखाना अद्यापि निघाला नव्हता. धोंडोपंतांची वतनवाडी कोंकणांत असून नसल्यासारखीच होती. त्यांच्या घराण्याचा परामर्ष टिळकांनींच पूर्वीपासून घेतलेला, व धोंडोपंताना टिळकांनीं देशावर आणलें ते फिरून कोकणांत न धाडण्याच्या उद्देशानें.

१८८२ सालीं तुरुंगांतून सुटून येतांच टिळकांनीं धोंडोपंतास कोकणांतून आपल्याजवळ आणलें. तेव्हांपासून ते शाळेचा अभ्यास करून मामांचें घरगुती कामकाज करीत. अर्थात् कारखान्याची कल्पना येतांच त्यावर धोंडोपंतांना म्यानेजर म्हणून नेमण्याचीहि कल्पना आली, व तें काम धोंडोपंत पुढें सात वर्षे करीत

होते. १८९७ सालीं ते पुण्यास आले; व टिळकांवर पहिला राजद्रोहाचा खटला झाला, तेव्हांपासून मात्र ते पुण्यासच कायमचे राहिले. १८९७ सालीं टिळक तुरुंगांत असतांच, आर्यभूषण छापखान्याचे मालक हरि नारायण गोखले ह्यांनीं आर्यभूषण छापखान्यांत केसरी छापण्याचें नाकारल्यामुळें, तो दुसरीकडे छापण्याची व्यवस्था करणें आणि केसरीचा बटवडा व जमाखर्च वगैरे गोष्टी आर्यभूषणमधून काढून केसरीकरितां स्वतंत्र कचेरी ठेवून त्या चालविणें, या कामांत त्यांचा जो पाय एकदां तेव्हां गुंतला तो पुढें कायमचाच गुंतला. असो; लातूरच्या कारखान्याचें काम प्रारंभापासून धोंडोपंतांच्या हातूनच झालें. सहस्रबुद्धे हे बुद्धिवान व दिलदार परंतु लहरी व मिजाशी असल्यामुळें कामाचा भार धोंडोपंतांवरच पडे; व धाकटेपणाच्या नात्यानेंहि पडलें अडलें सर्व त्यांना करावें लागे. १८९७ सालीं धोंडोपंत पुण्यास आले त्यापूर्वी सहस्रबुद्धे हेहि आपला हिस्सा परिचींकर यांस विकून परत आले होते. या व इतर अनेक कारणांनीं कारखान्याचीं पहिलीं कांहीं वर्षे सरास नफा न होतां, कांहीं वर्षे तोट्याचीं व कांहीं थोडीं नफ्याचीं अशीं गेलीं. ह्याचें तात्पर्य इतकेंच कीं, या कारखान्यापासून टिळकांच्या उपजीविकेला कांहीं मदत झाली नाहीं. कारखान्याच्या उत्पन्नांतून कर्जाचें व्याज फिटलें म्हणजे मिळविलें, अशी स्थिति बरींच वर्षे चालली.

न्यू स्कूल सोडल्यावर १८९७ पर्यंत टिळकांच्या उपजीविकेचें खरें साधन लॉ क्लास हेंच होतें. क्रॉफर्डप्रकरणांतून टिळक मोकळे झाल्यावर कांहीं दिवसांनीं केसरींत टिळकांच्या लॉ क्लासची जाहिरात प्रगट झाली. त्यावेळीं टिळक सदाशिव पेठेंत विंचूरकर यांचे वाड्यांत राहात असून, तेथेंच हा लॉ क्लास उघडण्यांत आला. प्रथम एक व नंतर दोन्ही (पहिल्या व दुसऱ्या वर्षाचा) लॉ क्लास सुरू झाले. ते पुढें १८९९ पर्यंत चालू होते. परंतु १८९६ च्या अखेरीपासून पुण्यास प्लेगचा प्रादुर्भाव झाल्यामुळें व केसरी मराठ्याचें काम वाढल्यामुळें, लॉ क्लास कायमचा बंद करण्यांत आला. लॉ क्लासांत स्वतः टिळकांना महिन्याचे सुमार दीडशें रुपये मिळत व तेवढ्यावर त्यांचा संसाराचा सर्व खर्च भागे. लॉ क्लासांत टिळकांना आपल्या जोडीला दुसरा एकादा शिक्षक घ्यावा लागे, व विष्णुपंत गोखले (गणेश सदाशिव मराठे ॲक्च्युअरी ह्यांचे मेव्हणे व हुरंगाबाद येथील वकील), विष्णु अनंत पटवर्धन (क्रॉफर्डप्रकरणांतील एक मामलेदार व नंतर पुण्यांतील वकील), दिनकर हरि वाकनीस बी. ए. एल्‌एल्. बी. (पुण्यांतील वकील), लक्ष्मण रघुनाथ गोखले (पुण्यांतील वकील) व नरसिंह चिंतामण केळकर इतके गृहस्थ लॉ क्लासच्या कामीं वेळोवेळीं टिळकांचे जोडीदार असिस्टंट होते. लॉ क्लासमध्यें टिळक हे हिन्दु लॉ, एव्हिडन्स ॲक्ट, कॉंट्रॅक्ट ॲक्ट, इक्विटी वगैरे त्यांतले त्यांत कठीण असे विषय शिकवीत. हिन्दुधर्मशास्त्र हा त्यांचा हातखंडा विषय असल्यामुळें त्यावरील त्यांचीं व्याख्यानें उत्कृष्ट होत, व गांवांतील तरुण वकील मंडळीहि

केव्हां केव्हां तीं ऐकावयास येत. निदान हिन्दु लॉ संबंधानें त्यांचें वाचन कोणत्याहि तारखेपर्यंत अगदीं भरपूर व ताजें असून, हिन्दु लॉचें कलमबंदी डायजेस्ट किंवा कोड करण्याचा पुष्कळ दिवस त्यांचा विचार होता. लॉ क्लास चालू असतांच थोडी अधिक फुरसत मिळती तर तें त्यांचें पुस्तक लिहूनहि झालें असतें. आणि टिळकांचें हिन्दु लॉचें ज्ञान किती चोख होतें हें ज्यांना माहीत आहे त्यांना हा डायजेस्ट सर्वमान्य झाला असता, व सहासात वर्षे चालविलेल्या लॉ क्लासनें त्यांना जितकें उत्पन्न दिलें तितकें सर्व कदाचित् या एकट्या पुस्तकानें त्यांना मिळवून दिलें असतें, याविषयीं शंका वाटणार नाहीं. कारण कायद्याचीं पुस्तकें लोकप्रिय झालीं म्हणजे तीं ग्रंथकर्त्याला अगणित पैसा मिळवून देतात ही गोष्ट सर्वांना ठाऊकच आहे.

डे० ए० सोसायटी सोडल्यावर टिळकांना फॅक्टरी व लॉ क्लास अशीं उपजीविकेचीं साधनें पहावीं लागलीं याचें कारण १८९१ पर्यंत केसरी त्यांच्या मालकीचा पूर्णपणें झाला नव्हता. आगरकर केसरींतून निघाल्यानंतर आर्यभूषण छापखाना आणि केसरी व मराठा हीं वर्तमानपत्रें मिळून संयुक्त कारखाना मानला जात असून वासुदेवराव केळकर, हरि नारायण गोखले, व स्वतः टिळक असे तीन संयुक्त भागीदार त्यांत होते. १८८८ च्या सुमारास केसरीचे वर्गणीदार सुमारें पांच हजारांपर्यंत वाढले होते; व नुसत्या केसरीची प्राप्ति बरी होती. पण इंग्रजी पत्र मराठा हें प्रथमपासूनच आंतबट्ट्याचें मूळ होतें. शिवाय, छापखान्याचे टाईप व इतर सामान वरचेवर बाहेरून विकत आणण्यास खर्च पडे. याकरितां केसरीला स्वतःचें एक मशिन असावें, व स्वतःचें मालकीची टाइप फाउन्डरीहि असावी असें वाटूं लागलें. अर्थात् अधिक भांडवल म्हणजे अधिक कर्जाचा बोजा; शिवाय पूर्वी टिळक व वासुदेवराव केळकर यांचीं मतें जरी एक होतीं तरी, १८९१ मध्यें 'रमाबाई' प्रकरणानें व इतर अनेक गोष्टींनीं उभयतांचीं मतें तंतोतंत जुळेनाशीं झालीं. आणि केसरींत मुख्यत्वेंकरून लिहिणार टिळक व मराठ्यांत मुख्यत्वेंकरून लिहिणार वासुदेवराव केळकर असे असल्यामुळें एकाच विषयावर केसरी व मराठा पत्रांत परस्पर विरुद्ध असेहि लेख मधून मधून येत असत. यामुळें हीं दोन पत्रें कोणाच्या तरी एकाच्याच मालकीचीं केलीं पाहिजेत हें उघड दिसून येऊं लागलें. इकडे हरिपंत गोखले हे निव्वळ छापखान्याच्या दृष्टीनें कारखान्याकडे पाहाणारे, त्यांना मराठ्याच्या बुडीत खात्याचें वैषम्य वाटूं लागलें. मिळून दोन्हीं वर्तमानपत्रें कोणी तरी एकानें घ्यावीं व छापखाना एकानें किंवा इतर दोघांनीं मिळून घ्यावा असें ठरलें. गोखले वर्तमानपत्रें घेऊं शकतच नव्हते; व तो त्यांना छापखान्यावर बोजाच वाटे. तेव्हां ते छापखाना घेणार हें ठरलेंच. पण त्यांच्या जोडीला टिळक येणार किंवा प्रोफेसर केळकर येणार ही गोष्ट अद्यापि ठरावयाची होती. टिळकांप्रमाणेंच प्रो. केळकर हेहि सव्यसाची म्हणजे इंग्रजी व मराठी दोन्ही भाषा लिहिण्यांत बाकबगार आणि

संपादकीय कामांत दर्दी व हौशी; यामुळें दोन्हीं पत्रें घ्यावयाचीं तर टिळक व प्रो. केळकर हे दोघे हि तीं घेण्याला आपापल्या परीनें पुरे लायक! पण हाहि लढा सुटण्यास दोन कारणें होतीं. एक असें कीं, केळकर हे अद्यापि कॉलेजांत प्रोफेसरीचें काम करीत असून त्यांच्या संसारापुरता त्यांना पगार तिकडून मिळत होता. शिवाय कारखान्याचें धडेवांटप करण्यांत आलें तेव्हां फायदेशीर पण भांडवल वरचेवर थोडथोडें नवें घालावें लागणारा छापखाना एका बाजूस, व आढाव्यांत निघालेलें एकंदर तिसऱ्या हिश्याचें सात हजार कर्ज व दोन्हीं पत्रें मिळून दुसऱ्या बाजूस, अशी वांटणी झाली. शिवाय स्वमतप्रसाराची हौस ही जर स्वतंत्र गोष्ट म्हणून विचारांत घेतली तर वासुदेवराव केळकर ह्यांच्यापेक्षां टिळकांच्या अंगीं ती अधिक होती ही गोष्ट निर्विवाद होय. तात्पर्य वांटणी उचलतांना कर्जासह वर्तमानपत्रें उचलण्यास टिळकच पुढें आले; व १८९१ पासून तीं त्यांनीं आपल्या मालकीचीं केलीं. तथापि टिळकांना यापुढें कॉलेजचा पगार चालू राहिला नाहीं; व कर्जफेडीकरितां व मराठ्याचा खर्च चालविण्याकरितां केसरींतील नफाहि कांहीं वर्षें परस्पर तोडून देणें भाग होतें. याकरितां दोन्ही वर्तमानपत्रांचा छपाईचा खर्च, मराठ्याच्या संपादकाचा पगार, केसरीच्या बटवड्याचा वगैरे सर्व खर्च, या गोष्टी या नफ्यांतून वजा करून कर्जफेड व्हावी म्हणून हें सर्व काम आर्यभूषण छापखान्याकडे म्हणजे गोखले यांजकडेच ठेवावें लागलें. कारण कर्ज फिटेपर्यंत टिळकांना स्वतंत्र छापखाना काढणें शक्य नव्हतें. उरला छापखाना, तो गोखले व केळकर यांनीं कर्जाच्या वांट्यासह समायिक मालकीहक्कानें घेतला; व टिळकांना आपल्या वर्तमानपत्रांचें कर्ज फेडण्यास पांच सहा वर्षें तरी लागणारीं असल्यामुळें केसरीव्यतिरिक्त स्वतंत्र अशीं उपजीविकेचीं साधनें त्यांना अर्थातच पहावीं लागलीं.

केसरीच्या बाबतींत टिळक-आगरकरांखालोखाल, व मराठ्याच्या बाबतींत टिळकांहूनहि अधिक, असा संबंध वासुदेव बाळकृष्ण केळकर यांचा १८९१ च्या पूर्वी आलेला होता. प्रो. वासुदेवराव केळकर हे मूळ कल्याणचे राहणार. हल्लीं त्यांचें स्वतंत्र घरहि कल्याणास आहे. त्यांचें बी. ए. पर्यंतचें शिक्षण मुंबईस झालें. युनिव्हर्सिटीच्या परीक्षेंत त्यांना इतिहास व अर्थशास्त्र या विषयांत वरचा क्लास व सोन्याचें पदक असा बहुमान मिळाला होता. शिवाय इंग्रजी भाषा हा विषय त्यांच्या आवडीचा असे. पुण्याशीं त्यांचा संबंध येण्याचें कारण त्यांचे मामा गोपाळराव फाटक हे १८८०-८१ चे सुमारास पुणें येथें प्रिन्सिपल सदर अमीन होते. त्यांजकडे टिळक वगैरे न्यू इंग्लिशस्कूलच्या मंडळींचें जाणें येणें असे. कोल्हापूरप्रकरणांतील बनावट पत्रें ज्याप्रमाणें टिळक—आगरकरांनीं माधवरावजी रानडे वगैरे लोकांना छापण्यापूर्वी दाखविलीं होतीं त्याप्रमाणें तीं सदर फाटक यांस हि दाखविलीं होतीं. पुढें हीं पत्रें त्यांना दाखवून खात्री करून घेतल्याबद्दल फाटक यांची साक्ष काढण्यांत येणार होती, पण असल्या बड्या लोकांच्या सर्वच साक्षी

कांहीं कारणामुळें रद्द करण्यांत आल्या. तथापि फाटक यांची या प्रकरणांत सांपडलेल्या तरुण मंडळींविषयीं सहानुभूति कायम होती, व त्यांचेच सांगण्यावरून, टिळक आगरकरांना शिक्षा झाल्यावर, वासुदेवराव केळकर हे न्यू इंग्लिश स्कूलला येऊन मिळाले. प्रथम शाळेंत शिक्षक या नात्यानें त्यांनीं इतका चांगला लौकिक मिळविला कीं, फर्ग्युसन कॉलेज निघण्याचें ठरलें त्यावेळीं इंग्रजीच्या प्रोफेसराची जागा त्यांना सर्वांचे आधीं देण्यांत आली. ते सभांतून जरी कधीं भाषणें करीत नसत तरी वर्गांत इंग्रजी शिकवितांना इंग्रजी चांगलें व अस्खलित बोलत. इंग्रजी कादंबरी किंवा नाटक दोन्हीहि ते चांगलें शिकवीत. पण शिकविण्याइतकीच लिहिण्याचीहि पात्रता त्यांचे अंगीं असल्यामुळें, प्रथमपासून त्यांना केसरी मराठ्याच्या संपादकवर्गांत सामील करून घेण्यांत आलें होतें. सुमारें १८८३ पासून १८९१ पर्यंत मराठापत्र बहुतांशीं त्यांनींच चालविलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांना मदत फक्त नामजोशांची मिळत असे. केसरीबरोबर मराठा हातीं येईपर्यंत टिळकांनीं या इंग्रजी वर्तमानपत्रांत लिहिलेंच असलें तर अगदीं क्वचित् लिहिलें असेल. केळकर मराठा दोन दिवसांत लिहून काढीत व त्यांची भाषा सरळ, शुद्ध व भारदस्त असे. मराठा काढीत असतांच ते "इंग्लिश ओपिनियन्स् ऑन इंडिया" या नांवाचें एक मासिक पुस्तक कांहीं थोडे दिवस काढीत असत. विलायतेस वर्तमानपत्रांतून निरनिराळ्या विषयांवर येणारे उतारे कातरून ते वर्गणीदारांना विकण्याचा धंदा कांहीं लोक विलायतेंत करीत असतात. हिन्दुस्थानासंबंधाचे असले उतारे इकडे आणवून ते सदरील मासिक पुस्तकांत जसेच्या तसे छापले जात व संपादक या नात्यानें केळकर त्यांस फक्त एक लहानशी प्रस्तावना जोडीत. पण या कामांत त्यांचा अर्थात् फार थोडा वेळ खर्च होई. लेख पुरविण्याच्या दृष्टीनें मराठ्याचे जबाबदार संपादक केळकर असल्यानें त्यांना फर्ग्युसन कॉलेजांत इंग्रजी शिकविण्यापलीकडे दुसरें कांहीं काम मुद्दाम दिलेलें नसे. व मराठ्याचें काम ते विनबोभाट पार पाडीत.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीशीं वर्तमानपत्रांचा संबंध रहावा किंवा नाहीं हा वाद सुरू झाला तेव्हां आपटे हे हा संबंध तोडण्यास प्रथमच तयार झाले. व हा संबंध तोडूं नये असें म्हणणारांत टिळक, केळकर व नामजोशी हे प्रमुख होते. आगरकर हे वर्तमानपत्रांत लिहिण्याचे हौशी, तथापि कारणपरत्वें सोसायटींतून वर्तमानपत्रांस पैसे देण्याला ते प्रतिकूल असत. तसेंच छापखाना व वर्तमानपत्रें चाललीं पाहिजेत खरीं पण तीं निदान निष्कर्जी तरी चाललीं पाहिजेत अशी त्यांची अपेक्षा असल्यामुळें छापखान्यांत मंडळी बसून कर्जाच्या भानगडी निघाल्या म्हणजे त्यांचें पित्त खवळे. यामुळें, कांहींहि होवो पण वर्तमानपत्रें व छापखाना हीं जिवंत ठेवावींच अशा मताचे टिळक, केळकर व नामजोशी येवढेच उरले. सामाजिक मतांच्या दृष्टीनें पाहातां टिळक व आगरकर हे दोघे दोन टोकांस होते.

आपटे हे आत्यंतिक समाजसुधारणेचे भोक्ते नसत. स्त्रियांच्या शिक्षणांत नृत्य-कलेचाहि समावेश व्हावा, किंवा " रजसा शुध्यते नारी " असले विचार प्रदर्शित व्हावे, याविरुद्ध उघड जाण्याइतके ते पुराणमताभिमानी, पण संमतिवयाचें बिल सरकारानें केल्यास त्यांत वावगें कांहीं नाहीं असें मानण्याइतके सुधारक होते. यामुळें केव्हां आगरकरांच्या बाजूला तर केव्हां टिळकांच्या बाजूला असे ते रहात. केळकर हे पुराणमतवादी मुळींच नव्हते, तथापि वर्तमानपत्रांतून मत प्रगट व्हावयाचें तें जुन्या मतांना धिक्कारून प्रगट होऊं नये, व सरकारानें तर धार्मिक सामाजिक बाबतींत हात घालूं नये असा त्यांचा उघड आग्रह होता. यामुळें सामाजिक मतभेदांत सोसायटीमध्यें आगरकर यांचा गट अल्पसंख्याक व टिळकांचा गट बहुसंख्यांक असे. आगरकरांनीं केसरींतून आपलें अंग काढून घेतल्यानंतर टिळक व वासुदेवराव केळकर यांची गट्टी वर्तमानपत्रांचे बाबतींत तरी पुढें तीन चार वर्षें कायम टिकली. सोसायटी व छापखाना-वर्तमानपत्रें यांची फारखत झाली तेव्हां छापखान्याला कर्ज होतें, व हें कर्ज टिळक व केळकर या दोघांनींहि पत्करून वर्तमानपत्रें चालू ठेवण्याचा निश्चय केला. ही फारखत होण्यापूर्वी सोसायटीतर्फे छापखान्यावर देखरेख ठेवण्याकरितां टिळकांचीच नेमणूक झाली असल्याचें मागें एक ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे; व हें घडून आल्यावर अर्थात टिळकांची जबाबदारीहि अधिकच वाढली. केळकरांनीं पत्रें सांभाळावीं व टिळकांनीं छापखाना सांभाळावा असा एकप्रकारें आपसांतील समजुतीनें श्रमविभागच ठरल्यासारखा झाला होता; व ही वाढलेली जबाबदारी सांभाळण्याकरितां टिळकांना जुना व्यवस्थापक काढून नवा नेमावा लागला. जुने व्यवस्थापक गणपतराव सोहोनी यांचा कारभार थोडा ढिला असे. त्यांनीं जमाखर्चाचीं तोंडें मिळतीं ठेवण्याची खबरदारी घ्यावयाची नाहीं, उधार वसुलीची हयगय करावयाची, खर्च माल हवा तसा चालू ठेवावयाचा, आणि कारखान्यांतील पगाराची तारीख आली म्हणजे टिळकांकडे जाऊन पैशाची कांहीं तरी सोय लावा म्हणून तगादा करावयाचा. अर्थात् ही जिकीर कोणासहि सोसण्यासारखी नव्हती. "आम्ही कोणी पैसा न घेतां वर्तमानपत्रांत लिहितों, व फुकट चालविलेल्या वर्तमानपत्रांसह येवढा छापखाना तुमच्या स्वाधीन केला असतां फिरून पगाराकरितां लागणारें कर्ज उभारण्याची चिंता आम्हीच वहावी, ही कारभाराची रीत कोणची ? " असें टिळक नेहमीं म्हणत. अखेर सोहोनी यांनीं व्यवस्थापकाचें काम सोडून दिलें व त्यांचे जागीं हरि नारायण गोखले यांची नेमणूक करण्यांत आली.

हरिपंत गोखले हे मूळ मुरुडगांवचे राहिवासी. त्यांनीं लहानपणापासून मुंबईस येऊन गणपत कृष्णाजी, नेटिव्ह ओपिनियन वगैरे छापखान्यांत कारकुनीचीं व इतर कामें केलेलीं होतीं. त्यांचा व टिळकांचा जुना स्नेहसंबंध, यामुळें टिळकांची

त्यांना मदत असे. न्यू स्कूलांत आल्यावर वामनराव आपट्यांनीं आपलें संस्कृत गाइडचें पुस्तक बाहेर काढलें तें मुंबईस हरिपंत गोखले यांनीं घेऊन आपल्या जबाबदारीवर छापलें. त्यावेळीं टिळकांनींच त्यांना सात आठशें रुपये कर्ज दिलें होतें व त्यांत गोखल्यांना फायदाहि झाला होता. गोखल्यांनीं इतर कांहीं पुस्तकेंहि अशींच छापविलीं होतीं. या माहितीमुळें, आर्यभूषण छापखान्याची व्यवस्था गोखले यांचे स्वाधीन केली असतां आपल्या देखरेखीखालीं ती चांगली चालेल अशा समजुतीनें, टिळकांनीं गोखल्यांना पुण्यास आणून छापखाना त्यांचे स्वाधीन केला. गोखले यांचेजवळ घालण्यास भांडवल नव्हतें, तथापि कर्जाचा हिस्सा पत्करण्यास ते तयार झाल्यामुळें त्यांना भागीदारींत घेण्यांत आलें; व टिळक, केळकर, गोखले असे तिघे मिळून छापखाना व दोन्हीं वर्तमानपत्रें यांचे मालक व त्याजवरील कर्जाला जबाबदार असें ठरून, छापखाना व वर्तमानपत्रें ही निवळ खासगी इस्टेट बनली. मात्र न्यू इंग्लिश स्कूलचा त्यांच्याशीं असलेला जुना परंपरासंबंध अगदींच तुटूं नये म्हणून तो वासुदेवराव केळकर यांच्या द्वारें शिल्लक ठेवण्यांत आला. तो असा कीं, केळकर हे मोबदल्याची अपेक्षा न ठेवतां दोन्ही वर्तमानपत्रें चालविणार त्याअर्थीं कॉलेजांतील इतर प्रोफेसरांइतकाच त्यांनाहि पगार द्यावा, पण कॉलेजांत शिकावण्याचें काम त्यांना इतरांहून कमी ठेवावें. या व्यवस्थेस सोसायटीच्या सभासदांनीं संमति दिली. अशा रीतीनें टिळक व वासुदेवराव केळकर यांची जूट सन १८९० पर्यंत टिकली. पण टिळकांनीं सोसायटीचा राजीनामा देऊन सार्वजनिक कार्यांत अधिक लक्ष घालण्याचें ठरविलें तेव्हांपासून, छापखान्याप्रमाणें वर्तमानपत्राच्या अंतरंगाच्या व्यवस्थेंतहि अधिक लक्ष घालणें त्यांना प्राप्त झालें; व यामुळें या उभयतांच्या मतांमध्यें जी भेदरेषा लहानशी होती ती दिवसेंदिवस मोठी होऊं लागली किंवा निदान ती उभयतांना अधिकाधिक दृष्टोत्पत्तीस येऊं लागली.

एकदां मतें बिनसत चाललीं म्हणजे तीं अनेक कारणांनीं अधिकाधिक बिनसतच जातात. टिळक व वासुदेवराव केळकर यांचेंहि असेंच झालें. कॉलेजमधील एकत्र बैठक संपली. छापखाना व वर्तमानपत्रें यांचा संबंध दोघांशीं होता परंतु त्यांच्या कचेरींत नित्य बैठक एकाचीहि नव्हती. संपादक मजकूर घरून लिहून पाठवीत व प्रुफेंहि बहुधा घरींच तपासीत. छापखान्याच्या देखरेखीसंबंधानें कमजास्त असल्यास हरिभाऊ गोखले हे टिळकांच्या घरीं जाऊन हकीगत सांगत व त्यांजकडून सूचना घेत. रिकाम्या वेळांतील उभयतांचे उद्योग व त्यांना अनुसरून बैठकीचे स्नेहीसोबती वेगवेगळे. वासुदेवराव केळकर हे वर्तमानपत्र लिहिण्याखेरीज इतर कोणत्याहि सार्वजनिक कार्यांत कधींच लक्ष घालीत नसत. उलट टिळकांनीं कॉलेज् सोडलें पण वर्तमानपत्रें हातीं घेतलीं नाहींत अशा काळींहि एकामागून एक अनेक सार्वजनिक कार्यें अंगावर घेतलीं. त्यांना एका वेळीं एकच काम पुरत असे, पण त्यावेळीं त्यांत ते इतके गढून गेलेले असत कीं इतर गोष्टींचें भान त्यांना नसे. कॉलेजांतून

टिळकांची बैठक उठल्यावर ती त्यानंतर कायमची घरींच आली असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रथम कांहीं दिवस मामलेदारांचें प्रकरण चालू होतें तेव्हां तुळशी-बागेजवळ श्रीमंत खासगीवाले यांचे वाड्यांत त्यांचे स्नेही बाबासाहेब घारपुरे पेन्शनर हे रहात, त्यांच्या घरीं मामलेदार वगैरे रोज संध्याकाळीं जमत व तो एक प्रकारचा क्लबच होऊन राहिला होता. यानंतरची टिळकांची संध्याकाळची बैठकीची जागा म्हटली म्हणजे सार्वजनिक सभेतील क्लब. घारपुरे यांच्या घरच्या क्लबांत भांडणें शिरलीं नाहींत, पण सार्वजनिक सभेच्या क्लबांत जुन्या–नव्या मवाळ–जहाल दोन्ही पक्षांचे पुढारी व अनुयायी एकत्र जमत असल्यामुळें भांडणांना तोटा नव्हता हें सांगावयास नकोच. हीं भांडणें पुढें परमावधीला गेल्यावर टिळकांनीं या क्लबांत जाण्याचें बंद केलें; व १८९१-९२ च्या चळवळी-पासून मंडळींत येण्याजाण्याचा अड्डा स्वतः त्यांचे घरीं जो एकदां पडला तो अखेरपर्यंत एकसारखा वाढतच गेला. डोंगराळ मुलखांत उगम पावून, आपल्या प्रवाहाला हवें तेवढें पात्र निर्माण करून, आसपासचे सर्व ओढे–नाले आपणांत मिळवून घेऊन, अफाट बनत जाणाऱ्या नदीचा देखावा आपल्या डोळ्यांसमोर कोणत्याहि पिढींतील मनुष्यास पहावयास सांपडत नाहीं. तो टिळकांच्या लोकसंग्रहाच्या बाबतींत गेल्या पिढीला खचित पहावयास सांपडला.

दुसरे पक्षीं वासुदेवराव केळकर यांनीं सार्वजनिक असें कार्य अंगावर न घेत-ल्यानें उरलेल्या वेळांत निवळ करमणुकीच्या अनेक साधनांकडेच त्यांचें लक्ष गुंतून राहिलें. त्यांनीं या सुमारास शेक्सपियरच्या नाटकांवरून 'त्राटिका' आणि 'वीरमणी-शृंगारसुंदरी' हीं नाटकें मराठींत तयार केलीं. पैकीं पहिलें त्यावेळीं उदयोन्मुख असणाऱ्या शाहूनगरवासी नाटक मंडळीनें फारच चांगलें बसविलें. वासुदेवराव केळकर हे मोठे मार्मिक रसिक व स्वतः अभिनयपटु असल्याकारणानें, त्यांनीं मोठी मेहनत घेऊन सुप्रसिद्ध नट गणपतराव जोशी यांना स्वतःच्या नाटकांतीलच काय पण हॅम्लेटसारख्या गूढाभिप्राय नाटकांतील अवघड स्थलें उत्कृष्ट रीतीनें समजावून दिलीं होतीं. पण हा आवडता व्यासंग पुढें अनावर झाल्यामुळें वासु-देवरावजींची बैठक केवळ नाटकमंडळींतच पडूं लागली. या गोष्टी सांगण्याचें कारण इतकेंच कीं, वासुदेवरावजींचा हा दिनचर्याक्रम टिळकांच्या स्वभावाला पट-ण्यासारखा नसल्यामुळें, त्यांच्या खेदांत भर तर पडलीच नाहीं परंतु होता तोहि खेद गोडावत चालला. त्याचा परिणाम असा झाला कीं, तीव्रमतभेदाचा पहि-लाच प्रसंग आला त्याबरोबर उभयतांना व्यवहारांतील फारकत करून टाकावी असें वाटलें. हरिपंत गोखले आल्यानें छापखान्याची प्रगति झाली ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं; तथापि, छापखाना व पत्रें निष्कर्जी झालीं नाहींत. जुन्या फरफटीनें ओढत आलेलें कर्ज कांहीं शिल्लकच होतें. शिवाय हरिपंत गोखले यांना वर्तमान-पत्रें हीं सावत्र मुलांप्रमाणें वाटत. आणि आढावा काढतां एकवीस हजार रुपयांचे

कर्ज निघालें तें कोणी घ्यावें असा प्रश्न उपस्थित झाला. छापखाना व केसरी हीं दोन्हीं नफ्याचीं खातीं असल्यामुळें कर्ज दोघांवरहि वांटून जाण्यास हरकत नव्हती. त्याप्रमाणें छापखान्यावर चौदा हजार व वर्तमानपत्रांवर सात हजार या प्रमाणें कर्जाची वांटणी झाली. छापखाना व वर्तमानपत्रें यांची अशी वांटणी होण्याचें ठरल्यावर, एकानें वांटण्या केल्या म्हणजे हवी ती वांटणी उचलण्याचा हक्क दुसऱ्यास येतच असतो म्हणून प्रथम टिळक कर्जासह छापखाना घेण्यास तयार झाले. "वर्तमानपत्रें हींच जर निवळ नफ्याची बाजू असें तुम्ही म्हणतां तर ती तुम्हींच घ्या व सातहजार रुपये कर्ज घ्या, मी छापखाना घेतों " असें टिळक म्हणूं लागले. पण गोखले व वासुदेवराव केळकर यांना पक्कें माहीत होतें कीं, टिळकांना निवळ छापखान्याची आवड नसून त्यांना खरी गोडी वर्तमानपत्रांची व या साध्याचें अवश्य साधन म्हणूनच त्यांना छापखाना हवा होता. तात्पर्य, टिळकांनीं छापखाना घेतला कीं ते स्वतःचीं वेगळीं वर्तमानपत्रें काढतील व ते तीं लोकप्रिय करतील याविषयीं शंका नसल्यामुळें, आपल्या हातचीं केसरी–मराठा वर्तमानपत्रें निस्तेज होतील व त्यामुळें त्यांचें उत्पन्नहि घटेल, असें पाहून गोखले व केळकर यांनीं एक नवीनच शर्त घातली कीं छापखाना घेईल त्यानें स्वतःचीं वर्तमानपत्रें काढूं नयेत. या नव्या अटीनें पारडें एकदम फिरलें व टिळकांना सात हजार रुपयांच्या कर्जासह वर्तमानपत्रें स्वतःला घेऊन चौदा हजार कर्जासह छापखाना इतर भागीदारांस सोडून देणें प्राप्त झालें.

या फारकतीस पंडिता रमाबाई प्रकरण हें निमित्तमात्र झाल्याचें वर सांगितलेंच आहे. खुद्द या प्रकरणासंबंधानें थोडीबहुत माहिती एका वेगळ्या प्रकरणांत आम्ही देणार असल्यामुळें ती सर्व फिरून येथें देण्याचें कारण नाहीं. रमाबाईसंबंधाचा वाद १८९१ च्या जून महिन्यामध्यें जाहीर रीतीनें सुरू झाला व या विषयावर टिळकांनीं पांचचार लेख झणझणीत लिहिले. सुधारक, सुबोधपत्रिका वगैरे पत्रें सहजच पंडिता रमाबाईच्या बाजूचीं, किंवा विशेष सूक्ष्म रीतीनें बोलावयाचें तर रमाबाईशीं सहानुभूति दाखविणाऱ्या भांडारकर, रानडे प्रभृतींच्या बाजूचीं होतीं. पण त्यांत अकस्मात मराठा पत्राचीहि भर पडली. सरकार व सामाजिक-सुधारणा यांच्यासंबंधापुरते वासुदेवराव केळकर हे टिळकांच्याच मताचे होते; पण निवळ भांडारकर-रानडे यांच्यापुरता वाद उत्पन्न झाला, तेव्हां वासुदेवराव केळकर यांची सहानुभूति त्यांच्याकडे वळली, व मराठ्यांतून केसरीच्या धोरणाविरुद्ध लेख येऊं लागले. याचा फायदा प्रतिपक्षीयांनीं सहजच घेतला. ते म्हणूं लागले कीं, पहा मराठेकर्ते देखील केसरीकारांविरुद्ध ! या मुद्यावर टिळकांनीं केसरींत खालीलप्रमाणें उत्तर दिलें, "आमच्या लिहिण्यावर पहिला आक्षेप असा आहे कीं, आमचीं मतें आमचे मित्र व बंधु यांच्याहून भिन्न आहेत. जणूं काय सर्व बंधूंचीं व मित्रांचीं मतें एक असावीं असा ईश्वरी संकेतच आहे ! आमच्या बंधूचें मत निराळें होऊं नये अगर त्यांस कोणी गणेशटोपी घालूं नये याचा

आम्ही कधींहि जिम्मा घेतला नाहीं. अमुक एका मनुष्याचें मत भिन्न असलें म्हणजे तो आपला मित्र किंवा बंधु होत नाहीं, अशी ज्यांची कल्पना असेल त्यांनीं या गोष्टीस पाहिजे तितकें महत्त्व द्यावें. आमचें कुलव्रतच असें आहे कीं हायकोर्टाच्या जजापासून तों (सुबोध) पत्रिकेच्या एडिटरांपर्यंत कोणाचीहि भीड-मुर्वत न धरितां, किंवा माझा बाप, काका, मामा, भाऊ, बायको, मुलगे यांचें अमुक मत आहे याचा विचार न करितां जें आपणांस खरें दिसेल तें सकारण लोकांपुढें मांडावें. आणि ईश्वराच्या कृपेनें केसरीकारांची प्रस्तुत अशी स्थिति आहे कीं, त्यास कोणाहि रावबहादुराची पर्वा न ठेवितां किंवा त्यापासून आपल्या अमुक एक संस्थेचें नुकसान होईल ही गोष्ट मनांत न आणतां लिहिण्यास मोकळीक आहे. अशा स्थितींत आम्हीं आमच्या बंधूंप्रमाणें या विषयाचें गुळखोबरें केलें नाहीं हें साहजिक आहे."

वास्तविक मराठा पत्रानें रमाबाईंची बाजू सर्वस्वीं घेतली होती असें नाहीं. या वादांतील कित्येक मुद्यांवर मराठ्यांतून वासुदेवराव केळकरांनीं सुबोधपत्रिकेस नांवेंहि ठेविलीं होतीं. पत्रिकेनें बहकून जाऊन केसरीला हव्या तशा शिव्या दिल्या हें मराठ्याला न खपून पत्रिकेच्या सत्यप्रियतेच्या ब्रीदाची मराठ्यानें टरहि उडविली. खुद्द पंडितेला मराठ्यानें असा उपदेश केला होता कीं, शारदा-सदनावरील दूषण टाळावयाचें तर तिनें जबाबदार चालकमंडळ नेमावें, व संस्थेंत हिन्दु-मुलींना आपले आचारविचार पाळण्यास किती मोकळीक राहील किंवा मिशनरी लोकांची पैशाची मदत घ्यावयाची तर ख्रिस्ती मुली सदनांत घेणें किंवा हिंदु मुलींचा ख्रिस्तीधर्मप्रचाराशीं संबंध किती व कसा टाळला जाईल, या गोष्टी पक्क्या ठरवून स्पष्ट जाहीर कराव्या. केसरीच्या लिहिण्यावर मराठ्याचा आक्षेप इतकाच कीं, रमाबाईंनीं सदनांतील मुली या वेळपर्यंत खरोखर बाटविल्या नसतां लोकांचा तसा निष्कारण गैरसमज होतो, व त्यांतहि मुख्य हानि हीच कीं संस्थेंतील सामान्य शिक्षणाचा फायदा इतर रीतीनें हिंदु मुलींना जो घेतां येतो त्यापासून अशा टीकेनें त्या व त्यांचे पालक परावृत्त होतील. पुराणमतवादी लोकांना म्हणजे केसरीकर्ते टिळक यांना उद्देशून मराठ्यानें असें लिहिलें होतें कीं, "शारदासदन हें सर्वस्वीं पुराणमतवादी पद्धतीनें चालेल किंवा चालावें अशी फुकट्या हिंदु-समाजानें अपेक्षा तरी कां करावी ? त्यांतल्यापेक्षां अधिक जुन्या पद्धतीचें शिक्षण पाहिजे असल्यास त्यांनीं स्वतः वर्गणी जमवून स्वतंत्र संस्था कां काढूं नये ? सरकारी शाळेंत जितक्या बेताची धार्मिक दृष्ट्या तटस्थ वृत्ति राहूं शकते तितकी पंडिता रमाबाईंची राहिली म्हणजे बस झालें."

झाल्या गोष्टी इतक्याच लक्षांत घेतल्या तर मराठा कर्त्यांची टीका अगदीं अयोग्य होती असें म्हणतां येत नाहीं. पण वासुदेवराव केळकर यांना रमाबाईंची वृत्ति तटस्थ राहील अशी आशा वाटत होती, व बाईंची ही वृत्ति खास टळणार व

शारदासदनांतील मुली पुढें-मागें बाटणार असें भविष्य मनांत पक्कें बिंबल्यानें केसरींत कडक टीका येत होती, आणि शेवटीं टिळकांचेच म्हणणें खरें झालें! ता. १ सप्टेंबरच्या अंकांत केसरी लिहितो " शारदासदन ही संस्था खिस्ती समजून ज्यांस आपल्या मुली तेथें पाठवावयाच्या असतील त्यांनीं तो मार्ग खुशाल स्वीकारावा असें आम्ही मागेंच सुचविलें आहे." व टिळकांनीं मनांत केलेलें भविष्य तें हेंच असें या वाक्यांतून स्पष्ट दिसतें. केसरींतील विधानाबद्दल कोर्टांत बेअब्रूची फिर्याद होणार असेंहि लोक बोलत होते. पण तो प्रसंग टळला. कारण टिळकांचें भविष्य खरें ठरून रानडे-भांडारकर यांना शारदासदनाचा संबंध लवकरच जाहीर रीतीनें सोडून द्यावा लागला. पण इकडे आर्यभूषण व केसरी-मराठा पत्रें यांच्या फारकतीची कल्पनाहि वर सांगितल्याप्रमाणें नेटाला लागून फारकतीचा कागद तयार झाला. ता. १३ सप्टेंबर १८९१ च्या मराठ्यांत वासुदेवराव केळकर यांनीं मराठा पत्राचें संपादकत्व सोडल्याचें जाहीर झालें, व केसरी व मराठा हीं पत्रें टिळकांच्या एकट्याच्या मालकीचीं झालीं. तथापि, हीं दोन पत्रें छापण्याला टिळकांच्याजवळ वेगळा छापखाना किंवा तो काढण्यास लागणारें भांडवलहि नव्हतें. यामुळें मालकीच्या दृष्टीनें आर्यभूषण छापखान्याचा संबंध सुटला तरी हीं पत्रें छापण्याचें काम या छापखान्यांत करणेंच प्राप्त होतें. या कामीं स्वतः टिळकांनीं घालून दिलेल्या व्यवस्थेच्या परंपरेचा फायदा पत्रें छापून निघण्याला, एक इकडची नवी काडी तिकडे न करितां, मिळण्यासारखा होता. दुसरे पक्षीं छापखान्यालाहि या दोन वर्तमानपत्रांचें काम भरपूर, कायमचें व टिकाऊ असें असल्यामुळें हवेंच होतें. गोखले व केळकर यांच्या कर्जाची फेड मुख्यतः वर्तमानपत्रांच्या नफ्यांतूनच व्हावयाची असल्यामुळें, या पत्रांचें काम व व्यवस्था ही गोखल्यांना देखील कर्जफेडीला एक प्रकारची आपल्या हातीं जामिनकी असेंच वाटण्यासारखें होतें. टिळकांनाहि वेगळें हपीस मांडून केसरी-मराठ्याची व्यवस्था आपल्या हातीं घेणें सोईचें नव्हतें. ते घरचे एकटे, विश्वासु मदतगार कोणी नाहीं. भाचे धोंडोपंत विद्वांस हे शिक्षण अपुरें संपवून व्यवहारांत पडले, पण कर्ज काढून लातुरास कापूस वठण्याची गिरणी घातली त्या कामावर धोंडोपंतासारखा आपल्या विश्वासाचा मनुष्य नेमणें हें वर्तमानपत्राचे हिशेब ठेवण्यांत त्यांना गुंतविण्यापेक्षां अधिक इष्ट होतें. तात्पर्य, हीं सर्व कारणें एकवटल्यानें मालकीपुरती फारखत झाली तरी केसरी व मराठा हीं पत्रें पूर्वीप्रमाणेंच आर्यभूषण छापखान्यांत पुढेंहि छापत राहिलीं गेलीं. वर्तमानपत्रांच्या शेवटीं "हें पत्र पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत मालकाकरितां छापून प्रसिद्ध केलें" या छापील ठशाच्या मायन्यांत एक अक्षराचाहि फेरबदल झाला नाहीं. मात्र हिशेबाच्या वह्यांतून फारकतीचा अंमल जमाखर्चाच्या रूपानें एकदां होऊन नवीन संबंधानुरूप कांहीं नवीन खातीं पडलीं इतकेंच काय तें. भावानें भावाच्या घरांत भाडें देऊन राहावें, तसा यापुढें आर्यभूषण छापखाना व हीं

वर्तमानपत्रें ५ांचा संबंध उरला. हाहि संबंध पुढें सन १८९७ सालीं निम्मा-शिम्मा तुटला. ती ओघानें घडून येणारी किरकोळ गोष्ट असल्यामुळें १८९७ च्या हकीकतींत योग्य ठिकाणीं सांगितली जाईलच. पण १८८० सालीं केसरी व मराठा या पत्रांच्या उत्पत्तीची जी कल्पना न्यू इंग्लिश स्कूलच्या तरुण चालक मंडळींच्या मनांत झाली तिला दृश्य स्वरूप येऊन, तिच्या परिणतीबरोबरच तिजमध्यें विकार घडत आले, व इतर सर्व आद्य सहकारी लोकांचा संबंध सुटून या पत्रांचा संबंध अखेर एकट्या एका टिळकांकडे कसा आला हें येथवर संकलितपणानें सांगितलें. या पत्रांच्या संपादक वर्गात पुढें अर्थातच नवे लोक आले. पण पैशाच्या दृष्टीनें मालकी, व धोरण ठरविण्याच्या दृष्टीनें पूर्ण अखत्यारी, ही टिळकांकडे १८९१ सालीं आली तेव्हांपासून ती त्यांच्या मृत्युकालपर्यंत तशीच अबाधित राहिली. म्हणून या दोन दृष्टींपुरती केसरी–मराठा पत्रांच्या इतिहासाची समाप्ति येथेंच होते येवढें सांगून हें प्रकरण पुरें करूं.

---

# भाग ११ परिशिष्ट (१)

## केसरी छापण्याची व्यवस्था

आर्यभूषण प्रेस पुणें ता. १४-१०-९२

राजमान्य राजश्री बाळ गंगाधर टिळक केसरी व मराठा पत्राचे मालक मुक्काम पुणें यांसी—

साष्टांग नमस्कार विनंति वि. आम्ही तुम्हापासून केसरी व मराठा हीं दोन वर्तमानपत्रें छापण्याचें व त्यांची व्यवस्था पाहाण्याचें काम ता. १-१-९२ पासून दोन वर्षे पावेतों खालील शर्तीवर मक्त्यानें घेतलें आहे.

१. दोन्हीं वर्तमानपत्रें छापणें, तीं वेळच्या वेळीं गांवांत वांटणें, बाहेर रवाना करणें, पत्ते वगैरे छापणें लावणें, वर्तमानपत्रास वगैरे कागदांचा पुरवठा करणें, वर्गणी व जाहिरातीबद्दल पत्रव्यवहार करणें, जाहिरातीचे ठराव करणें, व दर ठरविणें वगैरे, वर्गणीचा व जाहिरातीचा वसूल करणें, त्याचा हिशेब ठेवणें, आणि जाहिराती मिळविणें वगैरे, सर्व कामें दोन्ही वर्तमानपत्रांबद्दलचीं आम्ही करूं. हिशेब स्वतंत्र ठेऊं. करार पुरा झाल्यावर तो आपल्या हवालीं करूं. मध्यंतरीं हिशेब तुम्हास लागल्यास तुम्ही पहावा.

२. तुमच्याकडे दोन्ही पत्रांचा वेळच्या वेळा मजकूर पुरविणें व त्याबद्दल व्यवस्था करणें हें काम आहे. व त्याचा खर्च तुम्ही करावा. बाकी आजपर्यंत चालत आलें आहे तें सर्व काम व खर्च आम्हीं करूं.

३. केसरी व मराठा पत्रांवर ७००० सात हजार रुपये कर्ज आहे त्याचें व्याज रकम रुपये ६००० सहा हजार रुपयांचें दरमहा दर शेंकडा ०८ आठ आणेप्रमाणें व रकम रुपये १००० एक हजारचें दरमहा दर शेकडा ०१० दहा आणेप्रमाणें मिळोन येकूण व्याज ४३५ चारशें पसतीस रुपये व कर्जापैकीं (मुदलापैकीं) १००० एक हजार आम्ही पहिले (सन १८९२ अखेर) वर्षी देऊं. व दुसरे वर्षी म्हणजे सन १८९३ अखेर रकम रुपये ६००० सहा हजारचें व्याज दरमहा दर शेंकडा ०८ आठ आणे प्रमाणें तीनशें साठ रुपये व मुदला-पैकीं एक हजार रुपये आम्ही देऊं. याशिवाय आपणास दरवर्षी ९६० नऊशें-साठ रुपये देणेचे ठरले आहेत ते दरमहा ८० रुपयेप्रमाणें देत जाऊं.

४. केसरीचा आकार डबल डेमीपर्यंत वाढला अगर ३०० तीनशेंपर्यंत वर्गणीदार कमी अथवा जास्त झाले तर हे करार कायम समजावे. साइज वाढला तर मजकुराची व्यवस्था बदलावी लागेल. यापेक्षां जास्त फेरफार होईल तर वर लिहिल्या शर्तीत दोघांच्या विचारें फेरफार करावा.

५. दोन वर्षांनंतर ह्या कराराप्रमाणें चालवयाचें किंवा नाहीं याचा ठराव सन १८९३ सालीं आक्टोबर महिन्यांत करावा. म्हणजे सामान्यतः तीन महिन्यांच्या नोटिशीखेरीज एकमेकांनीं हा करार मोडूं नये.

६. करार मोडून कदाचित् हिशेब देणे घेणेचा प्रसंग आल्यास फक्त छपाई-बद्दल व टपाल रवाना करणेंबद्दल व गावांत वांटणेंबद्दल १७५ एकशें पंचाहत्तर रुपये प्रमाणें आकारावे.

७. वर्तमानपत्रांतील मजकुराबद्दल जबाबदारी आमच्यावर नाहीं. त्यासंबंधानें नुकसान व खर्च जो होईल तो तुम्ही सोसावा. मजकुराची कापी आम्हीं तुम्हास परत करूं.

८. करार संपेल तेव्हां म्हणजे सन १८९३ दिजंबर अखेर कराराचे दोन्ही सालांबद्दलची जी वर्गणी येणें राहील ती पुढील सहा महिन्यांत येईल. तेवढी तुम्ही आमची आम्हास वसूल करून द्यावी. करार संपण्यापूर्वी पुढील सालची जी वर्गणी येईल ती आम्ही तुम्हास देऊं. जाहिरातीबद्दल इनसरशनप्रमाणें तुटका हिशेब करून, करारापुढें जे पैसे आमचेकडे येतील ते आम्ही तुम्हास परत करूं. सदर कराराचे दोन वर्षांतील जाहिरातीच्या इनसरशनबद्दल जें आमचें येणें राहील तें करार संपल्यानंतर जें वसूल होईल तें आम्हास द्यावें.

येणेंप्रमाणें करारानें मक्ता घेतला आहे त्याप्रमाणें व्यवस्था ठेवूं. कळावें. हे विनंति

आपला

(सही) हरी नारायण गोखले,

म्यानेजर आर्यभूषण छापखाना.

---

भाग १२ वा

# संमतिवयाच्या बिलाचा वाद

टिळक सार्वजनिक कार्यात उघडपणें लक्ष घालूं लागल्यापासून त्यांनीं ज्या चळवळी केल्या त्यांची त्रोटक हकीगत कांहीं पूर्वी दिलीच आहे, व कांहीं पुढें ओघानें येणार आहे. आतां याच अवधींत ते ज्या निरनिराळ्या वादांत गुंतले गेले होते त्यांचीहि थोडी हकीगत देण्याचा आमचा विचार आहे. आपण नेहमींच असें पाहतों कीं, वादाशिवाय चळवळ नाहीं, व चळवळीशिवाय वाद नाहीं; यामुळें चळवळ आणि वाद हे शब्द समानार्थीच नसले तरी त्यांची प्रायः समव्याप्ति असते असेंच आढळून येईल. टिळकांनी केलेल्या कांहीं चळवळी स्वतःच्या कल्पनेनें नवीन उभारलेल्या असल्या तरी त्यांच्या बऱ्याचशा चळवळींचें उगमस्थान तत्कालीन वादांमध्येंच सांपडतें. या दृष्टीनें या चळवळी परस्वाधीन खऱ्या, तथापि वादांचे अनुयोगी व प्रतियोगी हे एकाच भूमींत जन्मलेले व नांदणारे आणि एकाच भूमीच्या कल्याणार्थ आपापल्या परीनें झटणारे असल्यामुळें, वाद कोणीहि उत्पन्न केले असले तरी ते देशाच्या विद्यमान स्थितीमुळें उत्पन्न झालेले असून समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीनें अपरिहार्यहि होते. परंतु टिळकांचें मोठेपण यांतच आहे कीं, कोणताहि वाद उत्पन्न झाला तर त्यांत शिरून, आणि पुरांत पोहावयास पडलेल्या मनुष्याप्रमाणें जोरानें पाणी तोडून, ते यश घेऊन बाहेर पडत व त्यानें आपल्या उद्दिष्ट धोरणाची प्रगतीच करीत. त्यांच्या स्वभावाला कलहप्रिय दूषणास्पद हें नांव योग्य असो वा नसो, त्यांच्या मनाची ठेवण मात्र अशी होती कीं, प्रतिपक्षी जितका अधिक जोरदार व वादाची बाजू अंगावर जितकी अधिक कोसळलेली, तितकें त्यांचें तेज धैर्य व बुद्धिमत्ता हीं अधिक चमकत असत यांत मात्र शंका नाहीं. यांतील बरेचसे वाद आतां जळून गेलेल्या शेगटीप्रमाणें निवाले आहेत, व तसले वाद फिरून उत्पन्न होण्याचा फारसा संभवहि नाहीं. यामुळें आज या वादांचें पर्यालोचन केवळ इतिहासकौतुकाच्या दृष्टीनेंच करावयाचें आहे. तथापि टिळकांच्या अंगच्या स्वभावगुणांचा परिचय या निरीक्षणानें होणारा आहे. १८९० ते १८९७ या सात सालांतील मुख्य वाद म्हटले म्हणजे (१) संमति वयाचा कायदा (२) ग्रामण्यप्रकरण (३) रमाबाईचें शारदासदन (४) हिंदुमुसलमानांचा तंटा (५) पुण्यांतील अकरावी राष्ट्रीय सभा व मंडपप्रकरण आणि (६) सार्वजनिक सभेंतील क्रांति इत्यादि होत. यांपैकीं एका हिंदुमुसलमानांच्या दंग्याच्या वादांतच काय तो सरकारचा थोडाबहुत संबंध येतो. बाकीचे वाद आपापसांतीलच होते. या अनेक वादांची हकीगत आतां आम्ही यथाक्रम देणार आहों. पैकीं प्रथम संमतिवयाच्या कायद्याची चळवळ घेऊं.

१८८७ च्या सुमारास मलबारी शेटजींचा सामाजिक सुधारणांचा कायदा मिळविण्याचा प्रयत्न बहुतेक गारठून गेला होता. पण त्यांनीं तो उद्योग सर्वस्वीं सोडून दिला नव्हता. त्यांना कायदा न मिळाला तरी कायदा मिळण्याच्या त्यांच्या निवळ सूचनेनें सुशिक्षित समाजांत खूप खळबळ उडवून दिली होती, किंबहुना दोनतीन निरनिराळ्या स्पष्ट मतांचे तटहि पाडले होते. सुधारणावादी संख्येनें अगदीं अल्प असले तरी केवळ त्यांच्या शहाणपणाच्या आधारावर सुधारणांचा कायदा करावा असें म्हणणारा एक पक्ष; ज्यांना सुधारणा हव्या असतील त्यांनीं त्या स्वतः घडवून आणण्यास स्वतःला बांधून घेण्याची व त्याविरुद्ध आचरण घडल्यास शिक्षा सोसण्याची शपथ घेऊन, अशा शपथेच्या बळकटीकरितां पण आपणा स्वतःपुरता कायदा मागून घ्यावा हा दुसरा पक्ष; व सुधारणेला अनुकूल असें मत बहुजनसमाजांत रूढ झाल्यावर सर्व समाजाला एकच शिस्त लागावी म्हणून केवळ अल्पसंख्याकांवर बळजबरी करण्याकरितां कायदा मागण्यास हरकत नाहीं असें म्हणणारा तिसरा पक्ष, असे हे तीन तट पडले होते. या तिघांचे जाहीर वादविवाद वर्तमानपत्रांतून सुरू होते. इकडे मलबारी शेट यांनीं हिंदुस्थानांत आपलें साधत नाहीं असें पाहून विलायतेंत गुप्तपणें आपली चळवळ चालविली. विलायतेंतील गोऱ्या लोकांच्या मताच्या आधारावर हिंदी लोकांवर सामाजिक सुधारणेचा कायदा लादणें म्हणजे द्राविडीप्राणायाम व जुलमाचा कळस असें कोणीहि म्हणेल. पण सरकार व हिंदी लोक हे दोन नाहींत आणि विलायतेंतले गोरे लोक झाले तरी ते आपलेच सख्खे व वडील भाऊ असें मानणाऱ्यांपैकीं मि. मलबारी हे असल्यामुळें, त्यांना या प्रयत्नांत विपरीत असें कांहींच वाटलें नाहीं. त्यांनीं विलायतेंत जो आपला कार्यक्रम प्रसिद्ध केला त्यांत खालील कलमें होतीं:—

१ बारा वर्षांच्या लग्न झालेल्या मुलीशींहि संभोग झाला तर नवऱ्यालादेखील कायद्यानें शिक्षा व्हावी.

२ बायको ताब्यांत घेण्याबद्दल किंवा तिनें नवऱ्याचे घरीं नांदण्याबद्दल फिर्याद चालूं नये.

३ लहानपणीं ज्यांचीं लग्नें झालीं असतील, त्यांस वयांत आल्यावर एकमेकांस पसंत नसल्यास काडी मोडून देण्याचा अधिकार असावा.

४ कोणालाहि आपल्या मुलाचें किंवा मुलीचें लग्न वाटेल तेव्हां करण्याची मुभा असावी. त्याच्याविरुद्ध जातींतील किंवा इतर कोणी बोलल्यास त्यांस शिक्षा व्हावी.

५ विधवेनें पुनः लग्न केल्यास पूर्वीच्या नवऱ्याची इस्टेट तीस मिळावी.

६ पुनर्विवाहाचा विधि सोपा करून मॅजिस्ट्रेटपुढें एक दोन शपथा घेतल्या म्हणजे तेंच लग्न समजावें.

७ मुरळ्या वाहणें बंद करावें.

८ पुनर्विवाह वगैरे सुधारणेकरितां कोणी मंडळी स्थापन झाल्यास तिचे नियम अमलांत येण्यास कायद्यानें मंजुरी द्यावी.

९ मुलींस व विधवांस शाळेंत पाठविण्याच्या कारत चांगल्या सोयी असाव्या व त्या शिकल्यानंतर त्यांस योग्य चाकऱ्या देण्याची तजवीज व्हावी.

वरील कार्यक्रमापैकीं नं १च्या कलमांतूनच मोठा वाद माजला. तीच संमतिवयाच्या कायद्याची चळवळ होय; व याच चळवळींत टिळक हे वाद-मतंगज किंवा "पटाईत भांडखोर" म्हणून प्रथम प्रसिद्धीस आले. डे. ए. सोसायटींतील भांडणें परमावधीस गेलीं तरी तीं खासगी स्वरूपाचीं होतीं. पुण्याबाहेर त्यांची कोणास फारशी माहिती नव्हती, व टिळकांच्या राजीनाम्याला इतर दृष्टीनें महत्त्व असलें तरी त्यामुळें त्या वेळीं बेबनावाचा डंका फारसा वाजला नाहीं. पण संमतिवयाच्या बिलाचे वेळीं त्यांनीं वादांत डॉ. भांडारकरांसारख्या बड्या बड्या धेंडांशीं एकदम युद्धाची गांठ घातली यामुळें या इलाख्यांतच काय पण इतर प्रांतांतहि टिळकांचें नांव एकदम प्रसिद्धीस आलें.

मलबारी शेटजींच्या गुप्त कारवाईचा उल्लेख ता. १२ आगस्ट १८९० च्या केसरींत आढळतो; व ता. ३० सप्टेंबरपर्यंत ही कारवाई इतकी पिकली कीं 'कायदा मागण्याचा अर्ज' या मथळ्याखालीं केसरीला मुद्दाम अग्रलेख लिहून, कायदा मागण्याच्या अर्जावर सह्या घेण्यास धूर्त लोक येतील तरी सावध रहावें अशी भोळ्या लोकांना इशारत द्यावी लागली. भावी कायद्याविषयींच्या विनंतीचे अर्ज सुधारक मंडळींतून गांवोगांव रवाना झाले; व या अर्जांचा आधार घेऊन हिंदुस्थान सरकारानें पिनलकोडाच्या ३७५ व्या कलमांत दुरुस्ती करण्याचें बिल पुढें आणावें, असा विलायतसरकारकडून इकडच्या सरकारास परवाना किंवा हुकूम पाठविण्यांत आलाच होता. पण बिल पुढें येण्यापूर्वीच आक्टोबर महिन्यांत सुधारणेच्या वादाचें तोंड व्यापक स्वरूपानें पुण्यांत लागलें होतें व त्यांत वर दर्शविलेल्या तीन तटांचीं किंवा गटांचीं मतें स्पष्ट झालीं होतीं.

या कामीं पुराणमताभिमानी लोकांनींच प्रथम उचल केली. वे. शा. सं. रामदीक्षित आपटे, बाळासाहेब नातू, माधवराव बर्वे, तात्यासाहेब खासगीवाले, सरदार पुरंदरे, रास्ते, कृष्णशास्त्री राजवाडे, नारायण भिकाजी जोगळेकर वगैरे लोकांच्या सहीचें निमंत्रणपत्रक निघून ता. २६ ऑक्टोबर १८९० रोजीं तुळशीबागेंत जाहीरसभा भरविण्याचें ठरलें.

या आमंत्रणपत्रिकेस लक्ष्मण कृष्ण नूलकर, रामचंद्र भिकाजी जोशी, वैजनाथ काशिनाथ राजवाडे, रामचंद्र मोरेश्वर साने, गोविंद वासुदेव कानिटकर, हरि नारायण आपटे, वासुदेव गणेश जोशी वगैरे कांहीं लोकांनीं प्रतिसूचना पाठविली. त्यांत ते लिहितात कीं, "सामाजिक गोष्टींत सरकारनें हात घालूं नये या मताचे आम्ही आहों. पण हल्लींच्या काळास अनुरूप असा कन्याविक्रय, बालवृद्धविवाह, विधवांचें

वपन वगैरे याविषयीं सुधारणा घडवून आणणें इष्ट आहे. ही गोष्ट हिंदुसमाजानें आपण होऊन न केल्यास, कायदा नको म्हणणें हें काळास अनुसरून नाहीं. वरील गोष्टीचा विचार केला नसल्यास आम्हीं पुढील प्रतिसूचना आजच्या सभेपुढें आणणार आहों:—

' आमच्या समाजांतील बालविवाह, कन्याविक्रय, बालवृद्धविवाह, विधवाकेशवपन इत्यादि गोष्टींपैकीं प्रत्येक बाबतींत समाजानें आपण होऊन सुधारणा करण्याचे संबंधानें आजपासून सहा महिन्यांचे आंत सभा भरवून, राजपुतान्यांतील लोकांनीं जसे नियम केले आहेत, तसे नियम आपले लोकस्थितीचे मानानें करण्याची, व केलेले नियम अमलांत आणण्याची, झटून तजवीज करावी.'

शिवाय टिळक, गोपाळ विनायक जोशी, वासुदेव गणेश जोशी, सिताराम गणेश देवधर, रामचंद्र भिकाजी जोशी, विष्णु अनंत पटवर्धन, विनायक त्रिंबक चिपळूणकर, आणि गोपाळ रघुनाथ नंदरगीकर ह्यांनीं दुसरी एक (उप) प्रतिसूचना पाठविली. ती अशी:—"आपण सरकारास अर्ज करणार आहां त्यासंबंधानें आमची विनंती इतकीच आहे कीं, ज्यांस कायदा नको असेल त्यांचें म्हणणें आपण रीतसर सरकारास कळवालच; परंतु जर कोणाचा कांहीं एक सुधारणा करण्याचा निश्चय असून त्याप्रमाणें करणारे त्यास बरेच मिळाले तर, त्यांपैकीं जे वचन दिल्याप्रमाणें वर्तन करणार नाहींत त्यांस सरकारांतून कडक शिक्षा मिळावी, एवढ्याचबद्दल आमच्या तर्फे सभेपुढें ठराव आणून त्यांस एका शातीचे निदान दोनशें लोक मिळाल्यास त्यांच्या सह्या घेऊन तो अर्ज सरकारकडे पाठविण्याची तजवीज करावी. आजमित्तीस ज्या सुधारणा होणें इष्ट आहेत त्या—

१ मुलीचें लग्न सोळा वर्षांचे आत करूं नये.
२ वीस वर्षांचे आंत मुलाचें लग्न करूं नये.
३ पुरुषाचें लग्न चाळीस वर्षांपुढें होऊं नये.
४ चाळीस वर्षांपुढें लग्न करणें झाल्यास विधवेशीं करावें.
५ दारू पिणें बंद असावें.
६ हुंडा घेण्याची चाल अजीबात बंद करावी.
७ प्राप्तीचा दहावा भाग सार्वजनिक कामाकडे (या मंडळीच्या कामाकडे) द्यावा.
८ विधवेचें वपन करूं नये.

या सर्व गोष्टी ज्यांस कबूल आहेत, त्यांच्या सह्या घेऊन वर लिहिल्याप्रमाणें करण्याची मेहेरबानी करावी."

शिवाय टिळक यांनीं एकट्यानींच या आमंत्रणपत्रिकाकारांस आपणापुरती एक लेखी विनंती पाठविली होती. त्यांत ते म्हणतात:—"आमंत्रणपत्रिकेच्या प्रति-

सूचनेविषयीं माझें असें म्हणणें आहे कीं, कायद्याची मदत घेऊन साऱ्या समाजावर एकदम सुधारणा लादण्यापासून फायदा न होतां गैरफायदाच होण्याचा संभव आहे. तेव्हां ज्यांना सुधारणेची खरी कळकळ आहे त्यांनीं सुधारणा अमलांत आणण्याबद्दल स्वतःस बांधून घ्यावें. या बंधनाप्रमाणें वर्तन न घडल्यास तो अपराध समजून त्याबद्दल कडक शिक्षा ठेवण्याविषयीं सरकारास विनंती करावी. जे हा मार्ग स्वीकारतील तेवढ्यांपुरतीच ही शिक्षा लागू होईल. अशा प्रकारें बांधून घेण्यास जे तयार आहेत त्यांनीं आपलीं नांवें सभेंत कळवावीं. माझ्या मतें ज्या सुधारणा होणें अवश्य आहेत त्या मीं नमूद केल्या आहेत. सदर सुधारणा अमलांत आणल्या असतां जातीबाहेर टाकण्याची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. २०० लोकांच्या सह्या मिळाल्या म्हणजे तेवढ्यापुरताच सरकारपाशीं कायदा मागण्याची तजवीज करतां येईल. सह्या कुटुंबवत्सल व ब्राह्मण जातीच्या लोकांच्याच मुख्यतः पाहिजेत. समाजाच्या सुधारणेस कायदाच पाहिजे असें प्रतिपादणाऱ्या लोकांपैकीं अशा रीतीनें स्वतःस कायद्यानें बांधून घेणारे किती आहेत, हें कळण्यास हा मार्ग उत्तम आहे."

तुळशीबागेंतील सभेच्या पूर्वीची हकीकत देतांना केसरीच्या अग्रलेखांत असें म्हटलें आहे कीं, "कायदा नको म्हणणारांपैकींच कांहीं जणांनीं, या सभेंत कायदा नको इतकेंच फक्त न म्हणतां, अमुक अमुक सुधारणा समाजांत होणें इष्ट आहे, अशाबद्दल ठराव करावा असें बाळ गंगाधर टिळक ( हे सभेंत मुख्य भाषण करणार असें प्रसिद्ध झालें होतें म्हणून ) यांजकडे बोलणें सुरू केलें. टिळक यांनीं त्यांस असें सांगितलें कीं 'माझें मतहि सुधारणेस अनुकूलच आहे; परंतु ज्यांचे विचार सुधारले नाहींत त्यांच्या गळ्यांत सुधारणा कायद्यानें बांधणें मला अगदीं प्रशस्त वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर तें अन्यायाचें व जुलमाचें कृत्य आहे. करितां अर्जांत कायदा नको यापलीकडे कांहीं एक न घालतां, मी आपल्या भाषणांत पुनर्विवाहासारखा एखाद–दुसरा विषय सोडून बालविवाहनिषेध वगैरे गोष्टी कोणी अमलांत आणल्यास त्याचा समाजाकडून छळ होऊं नये असें सांगण्यास तयार आहें.' टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें जर प्रतिपक्षानें ही गोष्ट कबूल केली असती तर मुलींचीं मोठेपणीं लग्नें करणें, हुंडा न घेणें, बालवृद्धविवाह बंद करणें, वगैरे गोष्टींत स्वतः सुधारणा करण्यास कोणी तयार असेल तर त्यास समाजाकडून कांहीं हरकत नाहीं व ती सुधारणा पाहून हळुहळू रूढीहि बदलत जाईल ही गोष्ट तुळशीबागेंतील सभेंत मान्य झाली असती.

परंतु सुधारकांस ही गोष्ट पसंत पडली नाहीं व त्यांनीं अठरा सह्यांनिशीं एक पत्र लिहून आपण प्रतिसूचना आणणार आहों असें तुळशीबागेंतील सभेचे उत्पादकांस कळविलें. त्या प्रतिसूचनेवरून असें दिसून येईल कीं, जरी कायदा नको ही गोष्ट ह्या मंडळीस कबूल आहे, तरी समाजास या लोकांनीं सहा महिन्यांची

मुदत दिली होती, एवढ्या मुदतींत समाजाचे हातून तशी गोष्ट न घडल्यास स्वभावतःच त्याचा अर्थ कायदा असावा असें कोणासहि वाटेल. पण खुद्द या १८ गृहस्थांचा असा बिलकूल उद्देश नव्हता असें त्यांचें म्हणणें आहे. हें पत्र सभेपुढे येणार असें जेव्हां टिळक यांस समजलें तेव्हां त्यांनीं वरीलपैकीं एक-दोघांस असें स्पष्ट सांगितलें कीं, " हा घरसोडीचा प्रकार कांहीं उपयोगी नाहीं. समाजास नोटीस देणारे तुम्ही कोण ? अमुक एक सुधारणा जर तुम्हांस इष्ट वाटत असेल तर ती स्वतः तुम्ही अमलांत आणा, लोकांस उदाहरण घालून द्या, आणि अमलांत आणण्याकरितां जर कायदा पाहिजे असेल तर तो आपल्याच पुरता मागून घ्या; परंतु ही गोष्ट जर तुम्हास मान्य नसेल तर माझ्या मताप्रमाणें मला तुमच्या प्रतिसूचनेस उपप्रतिसूचना आणावी लागेल. टिळकांच्या उपप्रति-सूचनेचा आशय असा आहे कीं, 'सुधारणा करा सुधारणा करा—ही किटकिट आतां पुरे झाली, जर तुम्हास खरोखरच सुधारणा कर्तव्य आहे, तर ती तुम्ही करावयास लागा; व आपल्या पिशवींचें तोंड थोडें सैल करून मिशनरी लोकां-प्रमाणें, समाजानें जी गोष्ट करावी असें तुम्हांस वाटतें तिचा, लोकांस उपदेश करा व त्यांचीं मनें वळवा. ज्या समाजांत आपणास रहावयाचें आहे त्याच्या समजुती-विरुद्ध जी गोष्ट आपणास करवत नाहीं ती त्याच्यावर कायद्यानें लादणें अगदीं सर्वथा भित्रेपणाचें काम आहे. टिळक ह्यांची उपप्रतिसूचना परस्परसुधारकांस पसंत पडली नाहीं. प्रतिसूचना करणाऱ्या अठरा गृहस्थांपैकीं तिघांनीं यावर सह्या दिल्या. कायदेवाल्यांचे अग्रणी खुद्द रा. ब. रानडे यांसहि त्यांतील कलम १.व ४ हीं पसंत पडलीं नाहींत. प्रो. गोपाळ गणेश आगरकर यांनीं तर साफ सांगि-तलें कीं, सर्व लोकांकरितां जर सरकारनें कायदा दिला नाहीं तरच मग असल्या पत्रकाचा विचार करूं. टिळक ह्यांची उपप्रतिसूचना विचारास निघाल्यावर आणखी दोनतीन सूचना अध्यक्षांकडे आल्या. तेव्हां इतक्या सर्वांचा विचार असल्या प्रचंड सभेंत होणें अशक्य आहे असें वाटून सभेच्या उत्पादकांनीं ठराव केला कीं, ज्याअर्थी या सर्व प्रतिसूचना व उपसूचना करूं इच्छिणारे गृहस्थ लोकांच्या अनुमतीखेरीज त्यांच्यावर सुधारणेचा कायदा लादूं नये या मुख्य तत्वास अनुकूल आहेत त्याअर्थीं याबद्दल सभेंत विचार करण्याची जरूरी नाहीं ! मलबारी शेट-जींच्या सूचना सभेस समजून देऊन मग कायदा नको या संबंधाच्या अर्जाचा नमुना वाचून दाखवावा, म्हणजे आपलें काम आटपलें ! नंतर दुसरे कोणास कांहीं बोलणें असल्यास ते बोलतीलच. तसेंच अर्ज नुसता सभेंत पसंत करून धाडल्यास मग " तो कोणास ऐकूंच गेला नाहीं " इ. इ. कुत्सित सुधारकांच्या कल्पना निघतात; करितां त्यावर चारपांच हजार सह्या घेऊनच तो पाठवावा म्हणजे बरें, असाहि त्याच वेळेस निकाल करण्यांत आला."

ठरल्याप्रमाणें तुळशीबागेंत सभा भरली. सभेस जवळ जवळ पांचहजार लोक

आले होते. सुधारक मंडळी लपून छपूनच होती. वे. शा. महामहोपाध्याय राम-दीक्षित आपटे हे अध्यक्ष झाले. मलबारी शेटजींच्या नऊ सूचना बा. गं. टिळक यांनी सभेस वाचून दाखवून त्या अमलांत आल्या असतां समाजाची कशी अवस्था होईल हें थोडक्यांत सांगितलें. आणि मलबारी शेटजींचे पूर्वीचे प्रयत्न, सामाजिक रीतीभातींत सरकार बहुजनसमाजाच्या विरुद्ध पडणार नाहीं असा १८८६ सालीं झालेला सरकारी ठराव, संभोगानुमतीचें वय वाढविण्याच्या खट-पटीचें बीज व इतिहास, त्यासंबंधीं केलेल्या अर्जांतील लंगडेपणा, व सोशल कान्फरन्समध्यें घडलेला प्रकार, वगैरे गोष्टींचीहि थोडीशी माहिती त्यांनीं दिली. सरते शेवटीं या सभेचा उद्देश, लोकमताविरुद्ध सरकारनें कायदा करूं नये असा अर्ज सरकारकडे पाठविण्याचा असून, ज्याचें त्याप्रमाणें मत आहे त्यानें अर्जावर सही द्यावी, व ज्याचें मत भिन्न असेल त्यानें कायदेवाल्यांच्या अर्जावर सही द्यावी, अगर या सभेकडे कोणी अर्ज पाठविला असतां आम्ही तो सरकारकडे पाठवूं असें टिळक यांनीं सांगितलें. रा. ब. जोगळेकर यांनीं अर्ज वाचून दाखविला व प्रतिसूचना आणणारे लोकांपैकीं एक गृहस्थ बोलण्यास उभे राहून सुरुवात करणार तों जोगळेकर यांनीं अध्यक्षांच्या आज्ञेनें सांगितलें कीं "आमचें काम आटोपलें. सह्या घेणें त्या घरोघर घेतल्या जातील. आतां सुधारकांचें म्हणणें ऐकून घेण्याचें असल्यास घ्यावें. परंतु एक थोडासा अपरिचित असा गृहस्थ बोलण्यास उठल्या-मुळें व सह्यावाल्या अठरांपैकीं कोणीहि पुढें न आल्यामुळें मंडळी सभेंतून निघून गेली ।"

पण हा वाद येथें संपला नाहीं. कारण यानंतर फिरून ता. १ नोव्हेंबर १८९० शनवार रोजीं 'जोशी हालां'त एक सभा भरली होती. तिचा निर्दिष्ट उद्देश मुख्यतः टिळक ह्यांच्या वरील उपप्रतिसूचनेबद्दल वादविवाद करण्याचा होता. व कांहीं सुधारकाग्रणी, ज्यांस तुळशीबागेंत हजर राहून आपलीं मतें प्रदर्शित करतां आलीं नाहींत त्यांस, मोकळेपणें व निर्धास्तपणें आपले विचार कळवितां यावे हेंहि इष्ट साधावयाचें होतें, हेतु हा कीं तेणेंकरून उभय पक्षांच्या म्हणण्याचा पूर्ण विचार होऊन कांहीं तडजोड पडावी. सभेचें अध्यक्षस्थान रा. रा. ब. नूलकर यांनीं पत्करिलें होतें. टिळक म्हणाले, " आपल्या समाजाची सुधारणा करण्यासंबंधीं वाक्पांडित्य फार झालेलें आहे. तथापि सुधारणा करावयाची ती कोणाची अशा प्रश्नाचा विचार करतांना आपणाला जनसमूहाची सुधारणा करावयाची हें बीज आहे. याकरितां सुधारणेसाठीं जनसमूहाची व आपली ताडातोड करण्याचा प्रयत्न केल्यास सुधा-रणा होणें शक्य नाहीं. त्यास उदाहरण हेंच कीं, पुनर्विवाहासारख्या निर्विवाद सुधारणा इष्ट असून बहुतेक सुधारकांस त्या आपल्या कुटुंबांत अमलांत आणणें अशक्य वाटत आहे. याकरितां सुधारणा ही ज्याची त्यांनीं सुरू करून आपल्या उदाहरणानें दुसऱ्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नाहींपेक्षां रिकामें

शब्दपांडित्य करण्याचा कांहींएक उपयोग नाहीं. तर सुधारक लोकांकडून सर्व लोकांस सुधारण्याचा उद्देश धरून काय सुधारणा शक्य आहेत व त्या कोणत्या साधनांनीं अंमलांत आणाव्या याचा विचार करावा. माझींहि मतें सुधारणेस अनुकूल आहेत. परंतु तीं याच तत्वास अनुसरून आहेत व म्हणूनच तीं आपणास अमलांत आणण्यासारखीं आहेत असा माझा समज आहे. त्या तत्वांचें स्वरूप अशाप्रकारचें आहे कीं, समाजांत सहज होण्यासारखें काय आहे, कांहीं अडचणी सोसून किंवा टाळून करण्यासारखें काय आहे, व मुळींच करितां येणार नाहीं असें काय आहे—म्हणजे आपल्या धर्मशास्त्रास अनुसरून कार्याकार्य गोष्टींस विधि, विकल्प व निषेध अशीं तीन बंधनें घालतां येतील. यांत ज्या गोष्टी निषिद्ध मानल्या आहेत त्या मुळींच करावयाच्या नाहींत. परंतु ज्यांविषयीं विकल्प आहे किंवा प्रायश्चित्त आहे त्या करण्यास जातिभ्रंशाचा प्रत्यवाय येऊं शकणार नाहीं, व तें धर्मसमजुतीच्या उलट जाणें असेंहि होणार नाहीं. असा विचार करून धर्मशास्त्राचें उल्लंघन न करितां ज्या गोष्टी आपणास करतां येतील, त्या आपणापुढें मांडाव्या व त्यांचा आपण विचार करून कांहीं निकाल होत असल्यास घ्यावा असा आजच्या सभेचा उद्देश आहे. मुलींचें लग्न सोळावें वर्षीं केलें म्हणजे ज्या कायद्यासंबंधानें वादविवाद चालू आहे त्याची आपणास जरूरच राहणार नाहीं. ऋतु प्राप्त झाल्यास विवाहकालीं शांति केल्यानें धर्मसंबंधीं अडचणींचें निरसन होतें. प्राचीन शास्त्रासंबंधीं व अर्वाचीन समाजस्थितीसंबंधीं विचार एकत्र केले म्हणजे, ज्यांस प्रवर्तक व्हावयाचे आहे त्यांनीं १६ वर्षांची इयत्ता करण्यास कांहीं बाध येत नाहीं. दारू पिण्यासंबंधीं मला असें वाटतें कीं आपण आपली सुधारणा करणें अत्यंत जरूर आहे. 'टेंपरन्स असोसिएशन' म्हणजे बेतानें मद्यपान करणाऱ्या मंडळ्या करण्यांत कांहीं हंशील नाहीं. माझें मुख्य मत हेंच कीं, कोणतीही सुधारणा करणें ती तत्वप्रवर्तकांनीं आधीं स्वतः केली पाहिजे. तसेंच या तत्वांचा लोकांमध्यें प्रसार करण्याकरितां मिशनरी लोकांच्या संस्थेप्रमाणें एक संस्था करण्यासाठीं आपल्या प्राप्तीचा कांहींएक अंश देत जाणें जरूर आहे. त्याचे योगानें देशांत ठिकठिकाणीं सुधारणेस लोकमत अनुकूल करण्याचा प्रयत्न करावयाचा, व स्वतःच्या उदाहरणानें अशा प्रयत्नानें व त्यापासून होत चाललेल्या फायद्यांच्या निदर्शनानें, सुधारणेचें पाऊल पुढें पाडावयाचें. अशा रीतीनें विचार करून शें दोनशें जी काय मंडळी तयार असतील त्यांनीं आपल्या सह्या देऊन आपणास सदरहू सुधारणा अंमलांत आणण्याविषयीं बांधून घ्यावें, व आपण केलेले नियम आपल्या मंडळीवर बजावले जाण्याबद्दल सरकारकडून आपले नियम नोंदून घ्यावे. अशा रीतीनें लोकप्रवर्तनाचें काम आज हजारों वर्षें ब्राह्मण करीत आले आहेत, व इंग्रजी शिक्षणानें तेंच काम आपण विशेष चांगल्या तऱ्हेनें करूं लागल्याशिवाय इंग्रजी शिक्षणानें आपलीं मनें प्रकाशित झालीं असें मी समजणार नाहीं." नंतर रा. ब. रानडे बोलले

त्याचा आशय असा कीं, टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें आम्हीं मंडळी स्थापन केली होती व सह्या घेण्याचेंहि काम केलें होतें. पण त्या दोहोंपासून कांहीं निष्पत्ति झाली नाहीं. टिळकांच्या सूचना पसंत पडणारे लोक थोडेच सांपडतात. टिळकांनीं जी सुधारणेची पायरी धरली आहे ती आम्हांविरुद्ध नाहीं, इतकेंच नव्हे तर ते आमच्याच पक्षाकडले आहेत असें आतां आम्हांस स्पष्ट समजलें.

भांडारकर यांनीं टिळक व रानडे ह्यांच्या मतांत भेद काय असें विचारलें असतां टिळक म्हणाले. " रा. ब. रानड्यांचें म्हणणें केवळ रूढ होत असलेल्या आचारास बंधन घालण्यापुरतेंच आहे, व त्यानें जरी थोडाबहुत कार्यभाग झाला तथापि रूढीचें पाऊल पुढें पडण्यास त्यांत कांहीं तजवीज केली नाहीं. व माझ्या सूचनेंत ती केलेली आहे." पण अशा गोष्टींचा कायमचा निकाल कधींच लागत नसतो. यामुळें हा वाद असाच पुढें चालूं राहिला.

अखेर संमतिवयाचें बिल ता. ९ जानेवारी १८९१ रोजीं कलकत्ता येथें वरिष्ठ कायदेकौन्सिलांत सर अँड्रयू स्कोबल यांनीं पुढें आणिलें. सन १८८२ च्या फौजदारी कायद्यांतील ३७५ कलमाप्रमाणें पुरुषाचा स्त्रीशीं विशेषस्थितीमध्यें होणारा शरीरसंबंध हा 'जबरीसंभोग' नांवाचा गुन्हा समजला जातो. त्यापैकीं एक स्थिति म्हणजे संभोगकालीं स्त्रीची संमति मिळो वा न मिळो, स्त्री दहा वर्षांहून कमी वयाची असणें ही होय. या कलमामध्यें विवाहित, तशाच अविवाहित, स्त्रियांच्या संमतीचें वय दहांच्या ऐवजीं बारा करावयाचें हाच या बिलांतील मुख्य भाग होता. बिल पुढें मांडतांना स्कोबल यांनीं सामान्यरीत्या असें सांगितलें कीं, या बिलानें कोणताहि नवा गुन्हा निर्माण केला जात नाहीं. पूर्वी जो गुन्हा असेल, तोच पुढें असेल; नसेल तो नसेल. पण वयाच्या दृष्टीनें जें कृत्य पूर्वी दहा वर्षांवर वय म्हणून गुन्हा ठरलें नसतें तें बारा वर्षांचें वय होईपर्यंत गुन्ह्याचें ठरेल, इतकाच फरक. एक, अकालीं होणारा व्यभिचार बंद करून मुलींचें रक्षण करणें, व दुसरा त्यांच्याच रक्षणाकरितां अल्प वयांतील संभोग बंद करणें, या दोन हेतूंनीं हें बिल पुढें आणलें आहे असें स्कोबल यांनीं सांगितलें. या बिलानें हिन्दुलोकांच्या विवाहपद्धतींत ढवळाढवळ करण्याचा सरकारचा विचार नाहीं व बालविवाह हा विषय या बिलापासून अगदीं अलग आहे म्हणून हिंदुधर्माभिमानी लोकांनीं याला विरोध करण्याचें कारण नाहीं असेंहि त्यांनीं बजाविलें. हिंदुस्थानामध्यें सृष्टिक्रमानुसार मुलींना सामान्यपणें १२ व्या वर्षांपूर्वी ऋतुप्राप्ति होत नाहीं म्हणून १२ ही वयोमर्यादा या बिलांत घातली होती. या बिलाअन्वयें पोलिस अधिकाऱ्यास लोकांच्या खाजगी बाबतींत ढवळाढवळ करण्यास सांपडूं नये याकरितां, जो कोणी मनुष्य आपले स्वतःचे बायकोविरुद्ध हा गुन्हा करील अशा मनुष्यावर वारंट न काढतां त्यास पोलिसानें समन्सानें पकडावें, अशीहि दुरुस्ती सुचविण्यांत आली होती. सर रमेशचंद्र मित्र यांनीं या बिलास विरोध

केला. या कायद्यामुळें देशामध्यें चोहोंकडे अस्वस्थता पसरेल, हा त्यांचा मुख्य मुद्दा होता. समजा उद्यां इंग्लंडमध्यें असा कायदा केला कीं कोणाहि मनुष्याचें प्रेत पुरलें न जातां तें जाळलेंच पाहिजे, कारण हवाशुद्धीच्या मानानें पाहिलें असतां दहनविधि फारच चांगला आहे, असा कायदा केला तर इंग्लडमध्यें काय स्थिति होईल ? सारांश विद्येच्या योगानें लोकमत सुधारल्याशिवाय अशा धार्मिक विषयामध्यें कायदा करणें अप्रशस्त असून, त्या योगानें हिंदूंच्या लग्नविधीमध्यें गुपचूप व हळू हळू होणारी सुधारणाहि मागें पडेल अशी भीति सर रमेशचंद्र यांनीं प्रदर्शित केली. रा. ब. कृष्णाजी लक्ष्मण नूलकर यांनीं या कायद्यास पुष्टी दिली. हिंदुधर्माचीं प्रमाणें परस्परविरोधी व भिन्न भिन्न असल्यामुळें धर्मसंबंधाची अडचण फारशी महत्त्वाची नाहीं असें त्यांचें मत पडलें. इकडे जातां जातां त्यांनीं सुधारकांनाहि एक टोला दिला. ते आपल्या भाषणांत म्हणालेः—"ज्या बाबतींत कायद्याच्या मदतीनें सुधारणा करणें जुलुमाचें होणार आहे त्या बाबतींत, कायदा पाहिजे ! कायदा पाहिजे ! अशी ओरड करून सुधारक म्हणविणारे लोक आपल्या कर्तव्यापलीकडे ओढ घेत आहेत, हें एक देशाचें दुर्भाग्य म्हणावयाचें. कारण या त्यांच्या बेफामपणामुळें विरुद्धपक्षहि खवळून जाऊन कायद्याचें नांव निघालें कीं तो आम्हांस नको असा आग्रह धरून बसतो. हल्लींचा कायदा आमच्या सुधारणा—मार्गावरचा पहिला स्तंभ आहे, असें म्हणून या सुधारकांनीं समाजाचें नुकसान मात्र आरंभिलें आहे." सरते शेवटीं कौंसिलचे अध्यक्ष व्हाइसरॉयसाहेब यांनीं समारोपवजा भाषण केलें. राणीच्या जाहिरनाम्यांत धर्मसंबंधीं जें वचन आहे त्याचा भंग या कायद्यानें होतो ही समजूत चुकीची आहे असें त्यांनीं सांगितलें व लोकांना हें बिल पसंत पडेल अशी आशा प्रदर्शित केली. हें बिल विचाराकरितां ध्यावें आणि या कायद्याचीं कारणें व हेतु इंडिया गॅझेट व इलाखानिहाय गॅझेटांमधून प्रसिद्ध करावीं या सूचना पास झाल्या. सारांश, बिल पुढें आणणारे व त्यावर अनुकूल प्रतिकूल भाषणें करणारे, या सर्वांच्या मनांत या बिलाला पुराणमतवादी लोकांकडून कसून विरोध होऊन सुधारक व पुराणमतवादी यांच्यामध्यें वादाचें रण माजणार ही भीति पदोपदीं दिसून येत होती. व त्याप्रमाणें झालेंहि!

ता. २० जानेवारीच्या केसरींतील या विषयावरील अग्रलेखांत हिंदूंच्या सामाजिक व धार्मिक आचारविचारांत हें बिल हात घालीत नाहीं अशी व्हाइसरॉयसाहेबांची समजूत कशी चुकीची आहे हें स्पष्ट दाखविलें आहे. बारा वर्षांच्या वयापर्यंत संभोगवयाची प्रतिबंधक मर्यादा केली म्हणजे त्या वयाच्या आंत ऋतुप्राप्त झालेल्या स्त्रीचें गर्भाधान करणें गैरकायदा होणार आहे, व ऋतुप्राप्तीनंतर अमुक दिवसांचे आंत गर्भाधान केलेंच पाहिजे, तेव्हां हा कायदा या एका गोष्टीमध्यें धर्माचारास विरोध करील हें निर्विवाद आहे. अर्थात् रमेशचंद्र मित्र यांचेंच मत सर्व हिंदुसमाजाच्या मताचे यथार्थ दर्शक असून नूलकरांचें भाषण धर्मदृष्ट्या

निषिद्ध होय असा केसरीनें स्पष्ट अभिप्राय दिला आहे. सुधारक वर्गाच्या डोक्यांत संचार करणारे विविध विचार सरकारचे कानीं जितके जलद जातात तितके स्वधर्मरक्षक जुन्या मंडळींचे जात नाहींत. तथापि, या वेळीं जुन्या मताच्या हिंदूंनीं न मागसतां सुधारकांहूनहि अधिक पुढाकार घेऊन, आपली वास्तविक रूढी काय व तिचें अपरिहार्य आचरण मोडतां येणार नाहीं कसें हें तावडतोब कळविलें पाहिजे अशी केसरीनें या अग्रलेखाचे शेवटीं सूचना केली आहे.

यापुढें सुमारें महिना दीड महिना वादास विलक्षण ऊत आल्यामुळें, या विषयावर अनुकूल–प्रतिकूल पत्रव्यवहार, निरनिराळ्या सभांच्या हकीकती इत्यादि याच विषयावरील मजकुरानें केसरीचे रकानेच्या रकाने भरून गेलेले दिसतात. ता. २७ जानेवारीच्या केसरींतही याच विषयावर अग्रलेख आलेला आहे. स्कोबलसाहेबांनीं १२७ मुलींत ६ मुलींस १२ वर्षांपूर्वी ऋतु प्राप्त होतो असें प्रमाण सांगितलें होतें. याच प्रमाणाचा आधार घेऊन " शेंकडा पांच लोकांस या बिलानें नाहक काळें पाणी पहावें लागणार" असें केसरीनें म्हटलें आहे. रा. ब. नूलकर यांनीं भूतदयेच्या दृष्टीनें बिलाचें समर्थन केलें होतें. पण १२ वर्षांच्या काल्पनिक मर्यादेपेक्षां आमच्या शास्त्रांतील ऋतुप्राप्तीची नैसर्गिक मर्यादाच भूतदयेस अधिक धरून आहे असें दाखवून केसरी म्हणतोः—"रा. ब. स ही भूतदयेची कोटी कोठून आठवली न कळे. सरकारानें या देशांत दारूचा प्रसार करून हजारों लोकांचा जीव व धन यांचा चूर केला तरी त्याचा बंदोबस्त आमचा आम्हींच केला पाहिजे असें ज्या रा० ब. नीं प्रतिपादन केलें होतें त्यांची भूतदया याच प्रकरणीं इतकी कशी उदयास आली कोण जाणें ! " हा गुन्हा नॉन कॉग्निझिबल केला तरीही लोकांची भीति नाहींशीं होणार नाहीं, अर्थात् जुन्या मताच्या लोकांनीं आपलें स्पष्ट मत यावेळीं निर्भीडपणें सरकारपुढें मांडावें अशी विनंति करून हा लेख संपविला आहे.

बिल पुढें आणणारे स्कोबल व व्हाइसरॉयसाहेब या दोघांनींहि हें बिल हिंदूंच्या धर्मसमजुतीस बाध आणणारें नाहीं असें सांगितलें असतां, नूलकर किंवा तेलंग यांच्यासारखे सुधारक, या बाबतींत हिंदू शास्त्र व रूढी यांस महत्त्व न देतां त्यांना खुशाल धाब्यावर बसवावें असें म्हणूं लागले. उलट भाण्डारकरांसारखे दुसरे कांहीं शास्त्रज्ञ सुधारक या बिलाला शास्त्राधार आहे असें दाखवूं लागले. टिळकांनीं या दोघांचाहि स्पष्ट निषेध केला. हिंदुधर्मशास्त्राच्या आज्ञांस तुच्छ लेखणाऱ्या नूलकर, तेलंग यांच्या सारख्यांस उत्तर देणें फारसें अवघड नव्हतें. पण भांडारकरांसारख्या विद्वानानें पुढें आणलेल्या शास्त्रार्थांचें सप्रमाण खंडन करून पुराव्याचें माप बिनतोड त्यांच्या पदरांत घालण्याचें काम तितकें सोपें नव्हतें. हें दुसरें काम करण्यांतच लोकमान्यांची सूक्ष्म बुद्धिमत्ता व शास्त्रीय वादविवाद कौशल्य हीं उत्कटपणें दिसून आलीं.

हें विल धर्मशास्त्रांच्या आड येणारें आहे या मुद्यावर तेलंग यांनीं असा अभिप्राय दिला होता कीं, " राजाज्ञेचें उल्लंघन न करितां, धर्माज्ञेचें उल्लंघन केल्यापासूनच जें पाप लागणार आहे त्याची निवृत्ति एखाद्या भटाच्या अंगावार चवली फेकून देऊन अगर दोन तीन मिनिटें नाक धरून करावी ! " हिंदुधर्माविषयींच्या या बेपर्वाईचा केसरीनें पुढील तीव्र शब्दांत निषेध केला आहेः—" हिंदु रीतिरिवाजांबद्दल अशा रीतीनें उपहासास्पद लिहिण्याचें धाडस मिशनरी अगर नास्तिक लोकांखेरीज दुसऱ्या कोणाच्याच हातून होणार नाहीं असें वाटतें. इंग्रजी विद्येनें आमची धर्मश्रद्धा उडत चालली आहे असें जरी मानलें तरी, आपल्या पुरातन रीतीभातींचा व त्यांचा ज्यांस अभिमान आहे त्यांचा आपण असा तिरस्कार करावा हें आमच्या शहाणपणास व सभ्यपणास शोभत नाहीं. "

तेलंगांवर टीका करतांना टिकळांची जी तुच्छताबुद्धि दिसून येते ती निदान प्रारंभीं तरी डॉ. भांडारकरांवर टीका करितांना दिसून येत नाहीं. याचीं कारणें दोन तीन असावीं. तेलंग हे जरी टिळकांपेक्षां वयानें थोडे अधिक असले तरी दोघेहि एकाच पिढींतले असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण भांडारकर हे जुन्या पिढीचे, टिळकांच्या खुद्द वडिलांच्या बरोबरीचे, शिवाय वडिलांचे स्नेही, या नात्यानें ते भांडारकरांस जवळ जवळ वडिलांसारखाच मान देत. शिवाय तेलंग हे जरी संस्कृत विद्येंत निपुण होते तरी त्यांची विद्वता वकिली थाटाची, व डॉ. भांडारकर यांची विद्वत्ता नव्या पंडितगिरीबरोबरच जुन्या शास्त्रीपणाच्या बाण्याची होती. याहीपेक्षां भांडारकरांविषयीं आदर वाटण्याला एक कारण असें कीं, भांडारकर हे जरी प्रार्थनासमाजिष्ट होते तरी त्यांची धार्मिक बुद्धि व आस्तिकपणा तेलंगांहून अधिक होता असें टिळकांना वाटे. या सर्व गोष्टींचा परिणाम मनावर होऊन भांडारकरांविरुद्ध वादांत शिरतांना, भीष्माचार्यांवर पहिला बाण टाकण्याचे वेळीं अर्जुनाच्या मनाची जी स्थिति झाली असेल तीच भांडारकरांवर हत्यार उपसतांना टिळकांची झाली असेल यांत शंका नाहीं, पण हे भांडारकर झाले तरी या वादांत त्यांचा पाडाव करणें हेंच आपलें कर्तव्य आहे असा मनाशी निश्चय केल्यावर.

गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम् ।
आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन् ॥

हें मनुवचन टिळकांच्या लेखणींतून निघालें. व भांडारकरांची प्रथम माफी मागून त्यांच्याशीं टिळकांनीं झुंज सुरू केलें.

भांडारकरांचा पहिला मुद्दा विवाहकालाविषयीं होता. त्यास उत्तर देतांना टिळकांनीं असा युक्तिवाद केला कीं, सूत्रकालापूर्वी जरी विवाह प्रौढवयांत होत असत, तरी सूत्रकालापासून पुढें या वयोमर्यादेचा संकोचच होत चालला. ऋतुकालानंतर तीन वर्षेपर्यंत बापानें लग्न करून देण्याची वाट मुलीनें पहावी व नंतर आपला पति आपणच शोधावा, याचा अर्थ ऋतुकालापूर्वीं लग्न करूं नये किंवा

होत नव्हतें असा होत नाहीं. 'बाराव्या किंवा आठव्या वर्षी विवाह होणाऱ्या मुलीला किती वयाचा नवरा असणें इष्ट आहे' अशाविषयींचा उल्लेख जर मनूंत सांपडतो तर इतक्या लहान वयांत लग्न होऊं शकतें हें सिद्धच आहे. चांगला वर न मिळाल्यास मरेपर्यंतहि मुलीस अविवाहित ठेवण्यास शास्त्राची हरकत नाहीं हें खरें; पण त्यामुळें स्मृतींत उल्लेखिल्याप्रमाणें, चांगला नवरा मुलगा मिळाल्यामुळें आठव्या वर्षी लग्न झालें तर त्याला कांहीं शास्त्राची आडकाठी नाहीं!

दुसरा मुद्दा गर्भाधानकालाचा. टिळकांचें म्हणणें कीं, या बाबतींत विज्ञानेश्वरादि निबंधकारांना भांडारकरांपेक्षां खचित अधिक प्रामाण्य दिलें पाहिजे. भांडारकरांची सर्व भिस्त आश्वलायन गृह्यपरिशिष्टावर होती. पण त्यांचा परिशिष्टवाक्यांचा अर्थ चुकला. कारण संस्कार व त्यासंबंधींचा होम हीं दोन्हीं एकाच वेळीं व्हावीं लागतात; व भांडारकरांनीं असें म्हटलें होतें कीं, प्राजापत्य होम व गर्भाधान संस्कार हे दोन विधि वेगळे मानतां येतात. गर्भाधान हें जर प्रथम ऋतुकालीं झालें पाहिजे, व ऋतु जर बाराव्या वर्षापूर्वी येऊं शकतो हें बिल पुढें आणणारांनींच कबूल केलें आहे, तर गर्भाधानसंस्कारहि त्या ठिकाणीं १२ वर्षांच्या आंत होणार व नवीन बिलाप्रमाणें तो गुन्हा ठरणार! एवंच, विशिष्ट धर्मविधीला गुन्हा ठरविल्यानें कायदा धर्मांत हात घालतो असेंच सिद्ध होतें हा टिळकांचा मुद्दा. टिळक कोटीबाजपणानें लिहितात, "रेल्वे टाइमटेबलमध्यें जर 'आज मंगळवारीं सकाळीं एक गाडी पुण्याहून निघेल व ती मंगळवारीं संध्याकाळीं मुंबईस जाऊन पोचेल,' अशीं दोन वाक्यें आलीं तर दोन्ही मंगळवार आजचेच घेतले पाहिजेत, एक आजचा व एक पुढच्या आठवड्याचा असा घेतां येत नाहीं. बारा वर्षांच्या आंत ऋतुप्राप्त होणें ही गोष्ट क्वचित् घडणारी असली तरी, या प्रथमऋतुकालींच गर्भाधान करण्याची शास्त्राची आज्ञा असल्यानें, एक धर्माचा तरी गुन्हा करावा किंवा पिनल कोडाचा तरी गुन्हा करावा अशी निनतोड आपचि उत्पन्न होणार. अर्थात् कायद्यापेक्षां शास्त्राला मान देणें प्राप्त होतें व त्यामुळें कायदा जुलमाचा ठरतो."

भांडारकरांच्या या चुकीच्या युक्तिवादाला मळकट वस्त्र्याचा दृष्टान्त टिळकांनीं दिला, आणि तेलंगांनाहि त्यांनीं असा टोला दिला कीं, यांना वकीली करण्यापुढें शास्त्रार्थ तपासण्यास वेळ कोठून मिळणार? त्यांचा शास्त्रार्थ वेळांत वेळ काढून दिलेला, अर्थात् तो चुकीचा असणार. तेलंगांचा मुद्दा असा कीं, या कायद्यानें राणीच्या जाहिरनाम्यांत हात घातलासा होत नाहीं. जाहिरनाम्यांत असे शब्द आहेत कीं, 'जे प्राचीन हक्क व रीतरिवाज चालत आले असतील त्यांवर योग्य नजर द्यावी अशी आमची इच्छा आहे.' तेलंगांनीं प्राचीन व योग्य या दोन शब्दांवर भर देऊन संमतिबिल व जाहिरनामा यांच्या विरोधाचा परिहार सुचविला होता. त्यावर कोटीबाज टिळक म्हणतातः—"वा! शब्दांचा कीस असा काढावयाचा तर दावबंद-

दिवाकरौ असे शब्द सनदेंत असतात, म्हणून सनदेंतील दान आमावास्येच्या रात्रीं, म्हणजे जेव्हां चंद्रहि नाहीं व दिवाकरहि नाहीं तेव्हां, जर कोणी गिळंकृत करण्यास हरकत नाहीं असें म्हणेल तर त्याच्या शहाणपणाची तारिफच केली पाहिजे." गर्भाधान हा काम्य विधि असल्यामुळें त्यांत कायद्यानें हात घातला तर धर्मांत हात घातलासें होत नाहीं या मुद्यावर टिळक म्हणतात "प्रार्थनासमाजाचे दृश्य मांदिरांत अदृश्य देवाची नेत्रनिमीलनपूर्वक भक्ति करणें, अगर निर्गुण परमेश्वरासंबंधानें अगाध अज्ञानसागरांत साशंक गोते खात बसणें, हेंच जर धर्माचें मुख्य लक्षण असेल तर आजच्या बिलानें धर्मांत कोणत्याहि प्रकारें हात घातला नाहीं ही गोष्ट आम्हांस सर्वशा मान्य करावी लागेल. परंतु जोंपर्यंत सर्व हिंदु लोकांचा असा समज झाला नाहीं, जोंपर्यंत आहार लग्न मूर्तिपूजा, वगैरे काम्य गोष्टींचाहि आम्ही धर्मांत अंतर्भाव करितों, तोंपर्यंत काम्य धर्मांत सरकारानें हात घालावा असें आम्ही कधींहि म्हणणार नाहीं."

केसरीचें मत प्रगट होतांच बिलाविरुद्ध जाहीर सभा होण्यास सुरुवात झाली. मुंबईचे एक पुढारी तेलंग हे बिलाला अनुकूल होते म्हणून तेथेंहि प्रतिकूल मत कांहीं थोडें नव्हतें. बालविवाहाच्या दृष्टीनें मुंबईतील सर्व गुजराथी भाटिया वगैरे समाज दक्षिणी लोकांच्याहि आधीं या चळवळींत सामील होणारा होता. त्यांना व त्यांच्या धर्मगुरूंना राजारामशास्त्री बोडस व भीमाचार्य झळकीकर वगैरे दक्षिणी पंडित, व महादेव चिमणाजी आपटे, लक्ष्मण रामचंद्र वैद्य, प्रो. जिनसीवाले, जमियतराम नानाभाई, चिमणलाल सेटलवाड, वगैरे कायदे-पंडित व इतर गृहस्थ मिळाले. बंगाल्यांतहि ही चळवळ जोरांत सुरू झाली. सर रमेशचंद्र मित्र, उमेशचंद्र बानर्जी, सुरेंद्रनाथ बानर्जी, जमिनदार, महामहोपाध्याय वगैरे मंडळी बिलाला प्रतिकूल होती. उमरावतीस सभा भरली तींत मुधोळकर वकिलांनीं बिलाचें मंडन व दादासाहेब खापर्डे यांनीं खंडन केलें. या सभेंत मुधोळकरांनीं असें एक विधान केलें कीं, ज्यांना पाश्चात्य सायन्स व वाङ्मय अवगत आहे त्यांनाच विद्वान् म्हणतां येईल. हें विधान अतिशयोक्त असल्यामुळें त्यावर पुष्कळ टीका झाली. पुढें उमरावतीस दुसरी मोठी जाहीरसभा भरुन बिलाचा स्पष्ट निषेध करण्यांत आला. मुंबईस माधवबागेंत मोठमोठ्या सभा भरूं लागल्या. एका सभेंत कायदेपंडित महादेव चिमणाजी आपटे यांनीं मोठेंच भाषण केलें. त्यांनीं मुख्यत: असें सांगितलें कीं, बिलांतून बारा वर्षांच्या आंतील ऋतुकालीन समागम वर्ज केल्यास बिल करणारे भूतदयेनें प्रेरित झाले आहेत असें मानतां येईल, व येवढा अपवाद त्यांत घातल्यास सरकार धर्मांत हात घालतें हा दोषारोप शिल्लक राहणार नाहीं. याशिवाय हें बिल मंजूर झाल्यानें लोकांवर जुलूम कसकसा होऊं शकेल याचें त्यांनीं वकिली थाटाचें वर्णन खूप रंगविलें. प्रथम वाटेल त्यास या कामीं फिर्याद करण्याची मुभा मिळणार. फिर्याद झाली

कीं म्याजिस्ट्रेट वारंट सोडणार. म्याजिस्ट्रेट म्हणजे वाटेल तो म्याजिस्ट्रेट. दिसण्यांत थोडासा पुरावा झाला कीं, खटल्याची सेशनांत रवानगी झालीच पाहिजे. सेशन हें जिल्ह्याच्या ठिकाणीं चालणार. अर्थात् साक्षिपुराव्याचा त्रास किती, वकिलाचा खर्च किती याची कल्पना आलीच. ज्यूरीचा अधिकार बहुधा कोठें नाहींच. असेसरांनीं साहेबाला भिऊन आरोपी गुन्हेगार ठरवावा व साहेबानें आरोपीनें केलेला प्रकार अमानुष ठरवून भारी शिक्षा द्यावी. शिक्षा प्रत्यक्ष न दिली तरी गुन्ह्याच्या कलमांत ती काळेपाण्यापर्यंत सांगितलेली आहे. गुन्हेगार सुटेल म्हणावें तर स्वतः आपटे यांनीं आपला अनुभव सांगितला कीं शेंकडा पांच चारच आरोपी सुटतात, व बाहेरगांवीं तर निरपराधी असूनहि आरोपी होऊन उभें राहण्याचा प्रसंग कोणाहि मनुष्याच्या वैऱ्यावर सुद्धां न यावा ! यानंतर आपटे यांनीं सांगितलेला मुद्दा तर फारच पटण्यासारखा होता. फौजदारी कज्जांत स्त्रियांना जातीनें साक्षीदार म्हणून कोर्टांत जाणें टळत नाहीं. पहिल्या चौकशीपासून स्त्रियांना पोलिसापुढें हजर रहावें लागणार, जाब द्यावे लागणार. खटला सुरू झाल्यावर अर्थात् पहिली साक्ष आरोपीच्या बायकोचीच व्हावयाची. केवळ बारा वर्षांच्या आंतील मुलगी साक्षीच्या पिंजऱ्यांत उभी राहणार. तिला नवऱ्यासंबंधानें जबानी द्यावी लागणार. आणि साक्षींतील विषय तर बोलावयासच नको. तात्पर्य, एकाद्या मुलीची तिच्या नवऱ्याचे हातून झालेली दुर्दशा एकीकडे, व वरील सर्व अनर्थ दुसरीकडे, हें लक्षांत घेतां अनिष्टतेचें पारडें खरें कोणीकडे झुकतें याचा विचार कोणालाहि करितां येईल. आपटे म्हणाले, हा सर्व प्रकार लक्षांत येण्याला एखादें नाटकच कोणी लिहिलें पाहिजे. त्याहीपुढें जाऊन ते म्हणाले. "मी स्वतः असें पुस्तक लिहिण्याच्या प्रयत्नांत आहें आणि कदाचित् थोडेच दिवसांत तें तयारहि होईल !" या विषयावर एक नाटक अखेर रंगभूमीवर आलेंच. पण तें नाटकें लिहिण्याविषयीं आधींच प्रसिद्ध असलेल्या नारायण बापूजी कानिटकरांनीं लिहिलें. आनंदाश्रम संस्थेच्या संस्थापकानें लिहिलेलें, बारा वर्षांच्या आंतील वयाच्या मुलीवरील जबरीसंभोगाचें, नाटक लोकांस वाचावयास मिळतें तर खरोखरच मौज झाली नसती काय ? पण आपट्यांच्या भाषणांत वकीली पेचाच्या कोट्यांप्रमाणें कांहीं गंभीरपणाचा युक्तिवादहि होता. ते म्हणाले, असल्या बिलापेक्षां एकदम सोळा वर्षेपर्यंत मुलीचें लग्न करणें हा गुन्हा आहे असेंच कां एकदम ठरवीत नाहीं ? सर्वांत वाईट हें होतें कीं, या बिलाची स्फूर्ति मूळ इंग्रजांच्या भूतदयेनें झालेली नसून आपल्यांतील उपद्यापी सुधारकांकडून झाली ! या ठिकाणीं टिळकांचा उल्लेख करून आपटे म्हणाले, थोड्या दिवसांपूर्वीं टिळकांनीं असा प्रयत्न केला होता कीं, आपापल्या मुलींच्या लग्नाचें वय वाढविण्याबद्दल आपखुषीनें लोकांनीं स्वतःच कागदावर सह्या करून बांधून घ्यावें व त्याविरुद्ध वर्तन केल्यास दंड घ्यावा, पण तें मात्र सुधारकांना मानवलें नाहीं ! सुधारकांचा हा फक्त पहिला

पेंच आहे म्हणून लोकांनी याच वेळीं उलट चळवळ केली पाहिजे. हें बिल यावयाचें अशी पांच वर्षांपूर्वीपासून बोलवा होती. या कल्पनेची उत्पत्ति इंग्लंडात राहणारे पांचपंचवीस हिंदी लोक, व हिंदुस्थानांतल्या कामांत कांहीं तरी लक्ष घालावें म्हणून धाळणारे पांचपन्नास इंग्रज लोक, यांच्या संभाषणांतून मूळ निघाली!

१८८६ सालीं मलबारी शेट यांनीं प्रौढविवाहाचा कायदा मागण्याची चळवळ केली तेव्हां लॉर्ड डफरिन यांनीं अभिप्राय मागवून शेवटीं असलें बिल पुढें आणूं नये असें ठरविलें. याविषयीं हिंदुस्थानसरकारानें पूर्वीच्या एका अर्जास उत्तर दिलें होतें तें नमूद करण्यासारखें आहे म्हणून खालीं देतोः—

"ज्ञातीच्या रिवाजाप्रमाणें जे सद्वर्तनाचे नियम आहेत त्यांहून स्वतंत्र आणि कांहीं महत्त्वाच्या बाबतींत वेगळे असे नियम, हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारांनीं केलेल्या कायद्यानें घालून दिले आहेत हें खरें आहे. आणि या नियमांच्या योगानें या देशांतील लोकांच्या चालीरीतींत, रिवाजांत व विचारसरणींत फरक पडत चालला आहे असा हितकारक परिणामहि झाला असेल. परंतु लोकांस नीतिशिक्षण मिळणें हा कायद्याचा परिणाम जरी होत असला तरी, केवळ हें शिक्षण मिळावें ह्या हेतूनेंच कायदा करण्याचें हातीं घेऊं नये. लोकांवर वजन पडण्याचे कामीं एकीकडून कायदा व एकीकडून ज्ञाती आणि पूर्वापार रिवाज असा जेव्हां प्रसंग येतो, तेव्हां कायद्याची सरशी होण्यास कायदा आपल्या नेहमींच्या स्वाभाविक मर्यादेच्या आंत असला पाहिजे. त्या मर्यादेबाहेर जाऊन त्यानें लोकमताशीं प्रत्यक्ष विरोधी होऊं नये......ह्या सूचनांपैकीं प्रत्येक सूचनेस अनुकूल अशीं जरी पुष्कळ कारणें दाखवितां येतात, तथापि लोकांस नित्य अनुभवास येणारें महद्दुःख आहे, आणि तें दूर करण्यास कायद्याची आवश्यकता आहे, आणि हिंदू ज्ञातींतील वजनदारीनें किंवा संख्येनें मोठ्या अशा एकाद्या भागानें तो कायदा असावा असें मागणें केलें आहे, असें होईपर्यंत कायदे करून (चालीरीतींत) जो नियमित हात घालावा म्हणून म्हणणें आहे तेवढा देखील हात घालणें इष्ट नाहीं असें हल्लीं आलेल्या सल्ल्यावरून गव्हर्नर-जनरलसाहेब यांचे नजरेस येतें."

ता. ७ फेब्रुवारी १८९१ रोजीं खाजगीवाल्यांच्या वाड्यांत पुण्यांतील शास्त्री लोकांची सभा भरून हें बिल मंजूर होणें धर्मविरुद्ध आहे असा निर्णय ठरला व तो प्रमुख शास्त्री मंडळींच्या सहीनिशीं प्रसिद्धहि करण्यांत आला. नागपूर व बनारस या ठिकाणच्या शास्त्र्यांनींहि याच प्रकारचा अभिप्राय दिला. रविवार ता. १ फेब्रुवारी रोजीं माधवबागेंत हिंदुजातींतील प्रमुख दीडशें लोकांची सभा भरली होती. सभेंत प्रमुख गुजराथी व्यापारी, राजारामशास्त्री बोडस, भीमाचार्य झळकीकरशास्त्री, महादेव चिमणाजी आपटे, प्रो. जिनसीवाले वगैरे मंडळी हजर होती. या सभेंत पुढील रविवारीं म्हणजे ता. ८ रोजीं माधवबागेंतच मोठी सभा भरविण्याचें ठरलें.

या पहिल्या सभेची हकीगत देतांना केसरीनें पुढीलप्रमाणें लोकांस इशारत दिली आहे:—" पुणें, सातारा येथें पूर्वींच सभा झाल्या, व इतर इलाख्यांतून विशेषतः बंगाल व वायव्य प्रांतांत सभांची तर झोडच लागली आहे. तेव्हां लोकांनीं अजून तरी उद्योगास लागावें. वेळ थोडा राहिला, करतां फिरून सूचना केली आहे. एकाच ठिकाणीं दोन दोन किंवा दोनदां सभा झाली तरी हरकत नाहीं. आपण आपलें कर्तव्य केल्यावर सरकारासहि कांहींतरी करावें लागेल."

ठरल्याप्रमाणें माधवबागेंत ता. ८ रोजीं दुसरी सभा झाली. अध्यक्षस्थान रा. ब. नाना मोरोजी यांनीं पत्करिलें होतें. सभेस किमानपक्ष ८०००।९००० जनसमूह जमला होता, असें केसरीच्या बातमीदारानें लिहिलें आहे व तें खरेंहि दिसतें. कारण बिलाविरुद्ध तयार केलेल्या अर्जावर जागच्या जागीं ५००० सह्या मिळाल्या. या सभेस टिळक हजर होते व त्यांनीं पुण्याच्या वतीनें सभेचें अभिनंदन केलें. बाहेर कांहीं विरुद्ध हस्तपत्रकें वांटण्याखेरीज सुधारकांना या सभेंत कांहीं करतां आलें नाहीं.

त्याच्या पुढच्या रविवारीं म्हणजे १५ तारखेला पुण्यास प्रचंड सभा भरली. म्युनिसिपालिटीच्या परवानगीनें शनवारवाड्यापुढील पटांगणांत मंडप उभारण्यांत आला होता. मंडपांत चार हजार व बाहेर तीन हजार मिळून एकंदर सात हजार समाज जमला होता. सरदार तात्यासाहेब खाजगीवाले यांची अध्यक्षस्थानीं नेमणूक झाली. फेमकर शास्त्री, डॉ. गर्दे, बाळशास्त्री लागवणकर यांचीं भाषणें झालीं. टिळकांनीं अर्ज वाचून दाखविला व जागच्या जागीं अर्जावर २५०० सह्या झाल्या. प्रो. जिनसीवाले यांच्या वक्तृत्वाचा केसरींत पुढील शब्दांत उल्लेख केलेला आहे:—

" प्रो. जिनसीवाले यांचें वक्तृत्व सर्वांस ठाऊक आहेच. त्यांतूनहि मनास उल्हास उत्पन्न करणारा विस्तीर्ण लोकसमाज व तोहि मोठ्या उत्सुकतेनें व व्यवस्थेनें प्रो. साहेबांचें भाषण ऐकून घेण्यास तयार असलेला, आणि व्याकरण न्यायाचे सरळ तावडींत सांपडलेल्या सुधारकांच्या चुक्यांसारखा विषय; इतकी सामुग्री सिद्ध असतां प्रोफेसर जिनसीवाले यांचें भाषण लोकांस आवडलें इतकें म्हणणें म्हणजे त्या ठिकाणीं जो प्रकार झाला त्याच्या चतुर्थांशहि आम्हांस वर्णन करितां येत नाहीं असें म्हटलें पाहिजे." प्रो. जिनसीवाल्यांच्या विद्वत्तापूर्ण परंतु पाल्हाळिक वक्तृत्वाचें विनोदी वर्णन टिळक केव्हां केव्हां करीत असत त्यावरून वर दिलेलें विनोदी वर्णन टिळकांच्या हातचेंच हें कोणीहि सांगूं शकेल.

याच वेळीं फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपाल वामन शिवराम आपटे यांचीं या बिलास अनुकूल अशीं दोन पत्रें टाईम्स ऑफ इंडिया पत्रांत प्रसिद्ध झालीं. आपटे हे आपला शिक्षकाचा व ग्रंथकर्तृत्वाचा व्यवसाय सोडून सार्वजनिक गोष्टींत फारसे पडत नसत. पण याच वेळीं त्यांना या विषयावर लिहिण्याची बुद्धी झाली

व त्यास तसेंच कारण होतें. फर्ग्युसन कॉलेजांतील शिक्षणाचा उद्देश तेथील विद्यार्थ्यांना स्वदेशाभिमानी करावयाचें, त्यांना पाश्चात्य विचारांचें वारें देखील लागूं द्यावयाचें नाहीं असा आहे, असें टिळकांच्या अभिप्रायावरून टाइम्सपत्रकर्त्यांनीं प्रतिपादन केलें होतें, त्याचें खंडण करण्याकरितां व फर्ग्युसन कॉलेजाविषयीं लोकांत त्यायोगें फार वाईट ग्रह उत्पन्न होईल या भीतीनें आपट्यांनीं हीं पत्रें लिहिलीं होतीं. या पत्रांत टिळकांनीं प्रदर्शित केलेले विचार कॉलेजांतील बहुतेक शिक्षकांस नापसंत आहेत असें म्हटलें होतें. त्यावर केसरीकार लिहितातः—"बरें झालें; टिळक गेल्या वर्षा अखेरच राजिनामा देऊन मोकळे झाले. ते जर हल्लीं कॉलेजांत असते तर हल्लींच्या प्रसंगीं वामनरावजींवर कोणता प्रसंग गुदरता याची कल्पनाहि आमच्यानें करवत नाहीं. 'टिळक हल्लीं कॉलेजांत शिकवीत नाहींत' येवढे शब्द लिहितां आल्यानें वामनरावजींस या वेळीं मोठें समाधान वाटलें असेल यांत शंका नाहीं." 'बहुतेक' हा शब्द वापरल्यामुळें टिळकांच्या मताचे अजूनहि कांहीं शिक्षक कॉलेजांत शिल्लक आहेत असें सुचित होतें. यांनांहि तितक्याच तांतडीनें रजा देऊन वामनरावजींनीं आपला मार्ग निष्कंटक करावा अशी अखेरीस केसरीनें सूचना केली आहे.

संमति बिलास प्रतिकूळ असणाऱ्यांची सभा भरल्यानंतर आपणहि अनुकूल असणाऱ्यांची एखादी सभा भरवावी अशी कल्पना सुधारक मंडळींच्या मनांत येणें स्वाभाविक होतें. अशा सभेला लोक किती येणार हा प्रश्नच असल्यामुळें, मुळीं अशी सभाच भरवावी कीं नाहीं येथून सुधारकपक्षांत विचार सुरू झाला असल्यास नवल नाहीं. मुळींच सभा न भरविली तर तें अर्थात् सुमार. बरें, सभा भरविली आणि थगदीं थोडे लोक आले तर झांकली मूठ सव्वा लाखांची तीहि उघडून दाखविल्यासारखें होणार ! या सुमारास सातारा येथें भरलेल्या अनुकूल सभेची हकीगत स्वतः आम्हीं ऐकिली होती ती अशी. नेटिव जनरल लायब्ररीच्या दिवाणखान्यांत, म्हणजे जेथें पांचपन्नासहि खुर्च्या मावणार नाहींत अशा जागेंत, सरकारी वकीलांनीं पुढाकार घेऊन 'जाहीर सभा' भरविली. पण मांडलेल्या खुर्च्यांतीलहि पुष्कळ खुर्च्या रिकाम्या पडल्या, तेव्हां एका विनोदी गृहस्थानें पुढच्या रांगेंतील मोकळ्या खुर्च्यांवर वेबस्टरच्या डिक्शनरीसारखी मोठमोठीं बुकें मांडून ठेविलीं ! पुण्यास कदाचित् श्रोतृगणाची इतकी तूट पडली नसती. यामुळें सुधारकांच्या खाजगी सभेंत जाहीरसभेचा वाङ्‌निश्चय झाल्यावर समारंभाची जागा व तिथि ठरविण्यांत आली. पण जाहिरसभेंत वाटेल त्यास घेणार नाहीं असेंहि मनानें ठरविण्यांत आलें. विशेषतः या बहिष्काराचा रोंख विद्यार्थ्यांवर होता हें सांगावयास नकोच. अर्थात् सभेची वेळ जवळ येऊं लागली तसतशी ही सभा निवडक गाळींव सुधारकांची होणार असा अदमास दिसूं लागला; व सभेच्या जाहिराती डकविल्या गेल्या त्यांतहि 'कायदा पसंत असणारांनींच यावें' अशी सूचना

लिहिलीहि गेली. ऐन सभेच्या वेळीं दारावर कांहीं चालक मंडळी पोलिसांची मदत घेऊन उभी राहिली आणि कायद्याला अनुकूल असलेल्या ठरावाच्या व अर्जाच्या कागदांवर जो सही करील त्यासच आंत सोडण्यांत येऊं लागलें.

बाहेर मंडळी विचारूं लागली कीं, 'अहो, ठरावावर सही जर बाहेरच करावयाची तर आंत जाऊन काय करावयाचें ? हा काय दक्षिणेचा रमणा आहे, म्हणून सह्या घेऊन लोकांना आंत कोंडता ? सह्याकरितां गांवांतून कागद-फिरवा म्हणजे झालें; हा सभेचा फार्स कशाला ? ' कोणी म्हणूं लागले कीं, आम्हांस बिलाचें तत्व मान्य आहे, परंतु कलमांत आम्हांस कांहीं दुरुस्त्या सुचवावयाच्या आहेत. कोणी म्हणाले, आमच्या डोळ्यांदेखत हा सभेचा फार्स करितां तर आंत जाऊन काय वादविवाद होतो तो ऐकूं कां देत नाहीं ? अर्जांतूनहि कांहीं ओळखीचीं कुळें आंत शिरलीं होतीं त्यांना 'तुम्ही अन्यायाची आगळीक करीत आहां' असें बजावण्यांत आलें; उलट विद्यार्थ्यांवर बहिष्कार असतांहि अनुकूल मताचीं मुलें तेवढीं आंत घेतलीं. तेव्हां बाहेरच्या विद्यार्थ्यांस अर्थातच चेव आला व मोठमोठ्यानें हमरीतुमरी सुरू झाली. लोक सभेकडे येतच होते व तंटा सुरू झाला तेव्हां अधिकच गर्दी जमली. यावेळीं पोलिस इन्स्पेक्टर स्मिथसाहेब तेथें आले व गर्दी मोडूं लागले. तेव्हां लोक म्हणूं लागले, जाहिरातीप्रमाणें अर्जावर सह्या करून आंत जाण्यास आम्ही तयार झाल्यावर आम्हाला अडविण्याचा कोणास अधिकार नाहीं. तेव्हां स्मिथसाहेब आंत जाऊन डॉ. भांडारकर यांस भेटले. तेव्हां भांडारकर म्हणूं लागले कीं, 'सभा खाजगी आहे जाहिराती कोणी लाविल्या हें आम्हांस माहीत नाहीं.' यावर केसरी लिहितो " धर्मछद्म अगर पुण्यकपट अगर भामटेगिरी बाहेर काढणाऱ्या नीतिमीमांसकांनींच...या उत्तराचा विचार करावा ! " स्मिथसाहेबांनीं विचार करून असें ठरविलें कीं, भांडारकरांची समजूत त्यांच्यापुरती खरी असली तरी वस्तुस्थितीशीं ती मिळती नाहीं. म्हणून ते म्हणाले, लोकांना आंत येऊं द्या आंतील बंदोबस्त मी ठेवितों. ही गोष्ट प्रौढ चालकांस मानवेना, पण विशेष उत्साही तरुण म्हणूं लागले कीं 'तें कांहीं नाहीं बाहेरच्या लोकांच्या नाकावर टिच्चून सभा करूं.' हें शब्द कानीं जातांच बाहेरचे लोक खवळून त्यांनीं धोंडे विटा, चिखल, धूळ यांचा एकसारखा मारा सुरू केला. खरे सभावाले व आंत घुसलेले तोतये सर्व मिळून अवघे दोनतीनशें लोक होते. अशा गर्दीतच रा. ब. भिडे यांना अध्यक्ष नेमून इंग्रजी मराठी अर्जाचें वाचन उरकून घेण्यांत आलें. तेव्हां सदाशिवराव परांजपे ( हे हल्लीं शाळाखात्यांतील एक पेन्शनर आहेत.) यांनीं बिलांत नक्की वयाच्या ऐवजीं रजोदर्शनाची मर्यादा घालावी अशी सूचना आणिली. पण बाहेरच्या माऱ्यापुढें सभेचें काम चालणें अशक्य होऊन सभा उधळली गेली. कांहीं लोक मुकाट्यानें निघून गेले. कांहींना इतरांनीं सोडवून घरीं पोंचविलें, व कांहीं मंडळी तेथून उडून त्याच कंपौंडांत असलेल्या

केळकर मास्तरांच्या घरांत शिरली. इतक्यांत क्रीडाभुवनाचे दरवाजे उघडले गेले मंडळी आंत घुसली, आणि मग " खुर्च्यांचे वेत फाड, जाजमांना भोकें पाड, बाकें मोड, कुंड्या फोड, दारें तोड, खिडकींतून धूळ फेक, असे प्रकार सुरू झाले." इतक्यांत तांतडीचा निरोप पोंचून पो. सु. मॅकफर्सन् हेहि तेथें आले, व हळू हळू गर्दी मोडल्यावर त्यांनीं डॉ. भांडारकर यांस बरोबर माणसें देऊन घरीं पोंचतें केलें. सारांश इजा अशी कोणास झाली नाहीं पण दंगल मात्र बरीच झाली.

वर केळकर मास्तरांच्या घरांत मंडळी जाऊन बसली म्हणून सांगितलें त्यांत प्रमुख असेच लोक होते. टिळक नामजोशी वगैरे मंडळी वास्तविक बिलाला प्रतिकूळ असतांहि, उपसूचना सुचविण्याच्या निमित्तानें सह्या देऊन, आंत गेली तीहि भांडारकर वगैरेंबरोबर येथेंच होती. या कोंडलेल्या जागेंतील लोकांना हुसकून बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू झाला तेव्हां, टिळक लोकांना जा म्हणून सांगतील तर लोक निघून जातील अशा समजुतीनें कित्येकांनीं टिळकांस 'तुम्ही बाहेर जाऊन लोकांना समजाऊन सांगा' अशी विनंति केली. आणि त्या वेळची माहिती लोक सांगतात तिजवरून ही विनंति मान्य करून बाहेरच्या लोकांना समजविण्यास जाण्याला टिळक उठलेहि. पण इतक्यांत नामजोश्यांनीं त्यांचा आंगरखा ओढून प्रतिसूचना देऊन खालीं बसविलें. याचा अर्थ उघड होता. टिळकांनीं ही नसती जबाबदारी व तिजवरून निघणारीं भलतीं अनुमानें आपल्या अंगावर कां घ्यावीं ? टिळकांनीं सांगितल्यानें जे लोक निघून गेले ते मूळ टिळकांच्याच सूचनेवरून आले नसतील हें कशावरून ? अखेर टिळकांनीं जाऊन लोकांना कांहीं सांगितलें नाहीं; व गर्दी आपोआप मोडली. तरी ते व बाहेरचे लोक यांचा संबंध प्रतिपक्षानें जोडून दिलाच. दुसरीहि एक सबब टिळकांना न जाण्याला होती. टिळक सभेला गेले तेव्हां त्याबद्दल त्यांना नांवें ठेवणारेहि लोक कांहीं बाहेर होतेच. ते म्हणत, "आम्ही सूचना उपसूचना कांहीं जाणत नाहीं. टिळकांनीं बिलाचें तत्व मान्य आहे येवढी तरी लेखी संमति आंत जाण्याकरितां कां द्यावी" ? आमचीं त्यांचीं मतें खरोखर एक. त्या अर्थी त्यांनीं आमच्यांतच बाहेर उभें रहावें. पण सभेविरुद्ध मत उभयतांचें एकच असलें तरी सभेचा गोंधळ करून ती उधळून देण्याचे मार्ग सर्वांचे एकच नसतात, व कांहींचे निवळ दंडेलीचे असले तर कांहींचे अधिक चतुराईचे असतात, हें मर्म त्यांना माहीत नव्हतें. पण या उघड मतभेदाचा फायदा घेऊन नामजोशांची सूचना पटल्यावर टिळक म्हणूं लागले कीं, बाहेर जाऊन लोकांची समजूत काढण्याला तुम्ही मला सांगता पण लोक मजवरहि नाराजच आहेत; त्यांनीं मलाच धरून ठोकलें तर त्याची जबाबदारी कोण सांभाळणार ?

दुसरे दिवसापासून मुख्य संमतिबिलाचा वाद किंचित् बाजूस पडून क्रीडा-

भुवनांतील या दंग्याचा वादच कांहीं दिवस पुढें आला; व त्याचें सविस्तर वर्णन करण्यापूर्वी खुद्द क्रीडाभुवनासंबंधानें दोन शब्द लिहितों. 'क्रीडाभुवन' हें नांव जरी मोठें आहे तरी खेळावयाच्या एका लहानशा मोकळ्या जागेपेक्षां तें अधिक कांहीं नव्हतें. ही जागा म्हणजे कृष्णाजी रघुनाथ ऊर्फ तात्या केळकर, पुणें येथील विश्रामबाग वाड्यांतील सरकारी हायस्कुलांतील जुन्या पिढीचे एक सन्मान्य शिक्षक, यांच्या घराच्या आवारांतील मोकळी जागा. ही औरस चौरस फार तर १०० फूट लांब व १०० फूट रुंद इतकी भरेल. पण अवघ्या पुण्यांतील सुशिक्षित लोकांना एकत्र जमवून खेळण्याला किंवा सभा वगैरे भरविण्याला याहून दुसरी जागा तेव्हां नव्हती. नाहीं म्हणावयास सार्वजनिक सभेचा जोशी हॉल नामक दिवाणखाना होता. परंतु, जाहीरसभेला तो नेहमींच पुरण्यासारखा नव्हता. शिवाय चार सुशिक्षित लोकांना संध्याकाळीं मोकळ्या हवेंत बसून गप्पा गोष्टी मारण्याला किंवा पाय मोकळे करण्याला या शिवाय सोय नव्हती. हल्लीसारखे खेळण्याचे अनेक क्लब व जिमखाने तेव्हां पुण्यांत नव्हते. अशा वेळीं असी मंडळी क्रीडाभुवनाच्या पटांगणांत येऊन एखादी सतरंजी टाकून जेठे मारून या 'क्रीडाभुवनांत' बसावयाची. या जागेंत पुढें कालांतरानें एक लॉन–टेनिस खेळण्याचें 'कोर्ट' झालें, व चार तरुण हौशी लोक आपापसांत वर्गणी भरून हा क्लब चालवीत, व निवाऱ्यांत बसण्याचें कारण पडल्यास तात्या केळकर यांच्या घराचा आश्रय ही मंडळी घेत. या घराचे मालक कृष्णाजीपंत केळकर हे विद्यार्थिवर्गांत प्रिय असून बहुधा प्रत्येक सार्वजनिक कार्यांत असावयाचेच. लोकप्रिय मनुष्य व सोईची मोकळी जागा यांचा मेळ पडल्यावर चार मंडळींचा अड्डा तेथें हटकून पडावयाचाच, त्याप्रमाणें तो येथेंहि पडलेला असे. कालांतरानें डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीची कचेरी येथें आली ती केळकरांचे मृत्यूपर्यंत तेथेंच होती, आणि क्रीडाभुवनांत सभा भरण्याची परंपरा सार्वजनिक सभेचा नवा दिवाणखाना बांधल्यापासून जरी किंचित् हटली, तरी वसंत व्याख्यानमाला मात्र या जागेंत सन १९१६–१७ सालपर्यंत होत असे. कारण उन्हाळ्यांत तेथें मोकळ्या हवेंत बसून व्याख्यानें ऐकावयास सांपडत. अशा रीतीनें क्रीडाभुवन हें नांव पुण्याच्या सुशिक्षित लोकांच्या तोंडांत प्रथमपासून खेळणारें असून ही मोकळी जागा म्हणजेच पुण्यांतील एक संस्था असें मानलें जात असे, व केसरीच्या पहिल्या एकदोन सालांत या संस्थेसंबंधीं कांहीं लेखहि आले होते. पुढें वसंत व्याख्यानमालेला अधिकाधिक गर्दी होऊं लागली तेव्हां ती जागा अपुरी पडूं लागली. हल्लीं श्रीशिवाजी मंदिराची विस्तीर्ण जागा लाभल्यापासून क्रीडाभुवन स्मरणांतूनहि जाऊं लागलें, व पूर्वीच्या सभेच्या जागेवर हल्लीं इमारती बांधल्या गेल्यामुळें ती मोकळी जागाहि पण नाहींशी झाली. अशा प्रकारचें हें क्रीडाभुवन पुण्यांतील लोकपक्षाच्या पहिल्या लढाईचें रणक्षेत्र बनलें, व अजूनहि

क्रीडाभुवनाचें नांव उच्चारलें असतां तेथील लॉन टेनिस क्लब, व्हर्नाक्युलर ट्रन्सलेशन सोसायटीची कचेरी, तात्या केळकरांचे घरांतील बैठकीचा अड्डा, किंवा वसंत व्याख्यानमालेचें मैदान—यापेक्षां संमतिवयाच्या वादांतील दंग्याची जागा म्हणूनच तिची आठवण कोणाहि धड स्मृतीच्या अस्सल पुणेंकरास होते.

असो. वर सांगितल्याप्रमाणें क्रीडाभुवनांतील दंग्याचा दुसरा दिवस उजाडतांच वर्तमानपत्रांतील वादाचा दंगा सुरू झाला. पहिली चकमक या दंग्यासंबंधानें टाईम्स ऑफ इंडिया व ज्ञानप्रकाश यांत प्रसिद्ध झालेल्या मजकुरानें झडली. दंग्याच्या दिवशीं रात्रींच पुण्याहून एक तार मुंबईच्या पत्रांना गेली तींत टिळक नामजोशी आणि दंगेखोर लोक यांचा संबंध जोडून देण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता. ती तार डॉ. भांडारकर यांनीं केली अशी बातमी केसरीला समजली असल्याचें दिसतें; व नांव न घेतां मनुष्याची ओळख पटविण्यासारखें खालील वाक्य केसरींत आलें होतें तें असें:——"लोकांच्या माऱ्यानें केळकरांच्या घरांतील कोंडमारा पत्करून 'नारायण नारायण' असें आपल्या मनोवृत्तीस क्षणभर दाबून ठेऊन मोठ्यानें निराकार ईश्वराचा नामघोष करणाऱ्या मंडळींपैकीं एकानें तार पाठविली!" सुधारकानें तर स्पष्ट लिहिलें कीं, 'टिळक सभेस आले नसते तर दंगा न होता.' त्यावर केसरी लिहितोः—'दंग्याच्या वेळीं सर्वकाळ टिळक सुधारक मंडळीच्या नजरेखालीं असतां जर त्यांच्यावर असे आरोप, तर ते त्यांच्या नजरेआड असते किंवा टिळक उठून बाहेर गेल्यानें दंगा थांबला असता तर त्यांनीं काय म्हटलें असतें हें दिसतच आहे.' मद्रासच्या हिंदू पत्रालाहि अशाच अर्थाच्या तारा गेल्या. केसरीच्या पुढील कांहीं अंकांत या दंग्याचा वाद थांबलेला दिसतो, पण त्याचें कारण वाद मिटला होता असें नव्हे, तर तो फौजदारी कोर्टांत गेल्यामुळें आंगाशीं येण्यासारखें कांहीं लिहूं नये म्हणून. पोलिसांनीं तावडतोब हें प्रकरण हातीं घेऊन पांच असामींवर पोलीस ॲक्टाप्रमाणें सिटी मॅजिस्ट्रेट कोर्टांत फिर्याद केली. हे पांच आरोपी म्हणजे (१) गणेश वासुदेव घोटवडेकर, (२) विष्णु व्यंकटेश ऊर्फ दत्तोपंत बेहेरे, (३) वासुदेव गणेश जोशी (चित्रशाळा) (४) पुरुषोत्तम नरहर दामले, (५) केशव रामचंद्र रानडे (किवळेकर). यांच्यावर पोलिसाचा हुकूम अमान्य केल्याचा आरोप ठेवण्यांत आला. असला दंगा म्हटला म्हणजे त्यांत विद्यार्थ्यांचा संबंध न येणें हें अशक्यच होतें. त्यावेळीं विद्यार्थी म्हणजे मुख्यतः न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेजचे विद्यार्थी. विद्यार्थ्यांचें वर्तन या प्रसंगीं अश्लाघ्यपणाचें झालें होतें याबद्दल केसरीनेंहि कबूली दिली होती; पण त्यांचें शक्य तितकें समर्थनाहि केलें होतें. अशा सभांना विद्यार्थी मौजेखातर जातातच! सभेंत उद्धटपणाचें वर्तन करणें हें, केसरी म्हणतो, त्यांना जुन्या पुढाऱ्यांनींच शिकविलें! शिवाय घरीं आईबापांच्या तोंडून सुधारक मास्तरांची निंदा विद्यार्थ्यांच्या कानीं अहर्निश पडत असते याचाहि परिणाम तोच! पुण्याच्या वक्तृत्वोत्तेजक सभेच्या समारंभांत

विद्यार्थ्यांनीं कित्येक वेळां परीक्षकांच्या घंटेचें काम आपल्या टाळ्यांनीं करावयाचा प्रघात पाडलेला होता! तो अर्थात् मुलांच्या परीक्षेचाच प्रसंग! जाहीर सभा ही अर्थात् वेगळी बाब. पण एक ठिकाणीं लागलेली संवय दुसरे ठिकाणींहि प्रगट व्हावयाचीच! ता. ३ मार्च (१८९१)च्या केसरींत फर्ग्युसन कॉलेजचा एक जुना विद्यार्थी लिहितोः—"पुण्यांतले विद्यार्थी, नसता मोठेपणा आणून रिकाम्या पंचायतींत पडत असतात. ते उतावळी टीका करितात व अनधिकारानें चर्चेंत भाग घेतात. हिराबागेंत माधवराव कुंटे यांच्या भाषणांतहि हे अडथळा करितात. भांडारकरांसारख्या विद्वान् गृहस्थांस अभद्र शिव्या देऊन त्यांनीं परवांच्या सभेंत आपलें तोंड विटाळिलें." वरील आक्षेप नुसत्या पुण्यांतील विद्यार्थ्यांनाच लागू होतात असें थोडेंच आहे! विद्यार्थी तितके येथून तेथून सारखेच. क्रीडाभुवन सभेच्या आधीं दहावीस वर्षें असेच दंगे करीत आलेले, तिसऱ्या पिढीचे, व आतां केस पिकून जमिनीला तोंड लागण्यास आलेले विद्यार्थी आम्हांस माहीत आहेत! विद्यार्थ्यांवरील असला आक्षेप निघून जाण्याचें दिवस येतील तेव्हां निम्मी अधिक सृष्टी इकडची तिकडे कदाचित् झालेली आढळेल!

ता. १८ मार्च रोजीं, दंग्यांतील आरोपींवर फिर्याद केली होती तिचें काम सुरू झालें. पोलीसतर्फे इन्स्पेक्टर स्मिथ हे काम चालवीत असून आरोपीतर्फे महादेव चिमणाजी आपटे यांना मुद्दाम मुंबईहून आणविण्यांत आलें होतें. आपटे हे सुप्रसिद्ध वकील असून शिवाय या वादांत ते सुधारकांविरुद्ध होते. प्रथम साक्ष तुकाराम फौजदार याची झाली. त्यानें दंग्याची हकीगत सविस्तर सांगितली. त्याच्या म्हणण्याप्रमाणें नूलकर हे दारावर उभे राहून कोणास आंत घ्यावें व घेऊं नये हें सांगत होते. बाहेर सुमारें दोन हजार लोक जमले होते. लहान थोर सर्वच दंगा करीत होते. टिळक व नामजोशी हे बाहेर नव्हते; पण इतर पुढारी लोकांस उत्तेजन देत होते. एकंदर पोलीस आठ दहाच असल्यामुळें धरपकड करितां आली नाहीं. नंतर राजन्ना लिंगू वकील यांची साक्ष झाली. त्यांना उलट तपासणींत सभेस येण्याचा हक्क कोणास होता व कोणास नव्हता याविषयीं प्रश्न विचारण्यांत आले. दुसऱ्या दिवशीं आत्मारामपंत नूलकर यांची साक्ष झाली. हेच गृहस्थ दारावर उभे होते. त्यांनाहि आपट्यांनीं उलटतपासणींत पुष्कळ छेडलें. टाइम्समध्यें आलेली तार आपण नेऊन दिली असें त्यांनीं कबूल केलें; पण तार कोणी लिहून दिली याचें नांव ते सांगेनात. नंतर स्वतः डॉ. भांडारकर यांची साक्ष झाली. सभेंत जातांना व सभेंतून बाहेर पडून घरीं जातांना आपणास पोलिसांची मदत घ्यावी लागल्याचें त्यांनीं कबूल केलें. केळकर मास्तरांच्या घरांत दारें लावून बसल्या वेळीं 'ब्लॅक होल'ची आठवण झाल्याचें त्यांनीं सांगितलें. उलट तपासणींत, जाहिराती कोणी लिहिल्या वाटल्या याची माहिती नसल्याचें त्यांनीं सांगितलें. सभेचें वर्णन, ती 'सार्वजनिकहि होती व

खाजगीहि' होती असें डॉ. भांडारकर यांनीं दिलें, तेव्हां कोर्टांत हंशा झाला असल्यास नवल नाहीं. ते पुढें म्हणाले "हुर्यो शद्ब ऐकतांच मी म्यालों व खालीं पहात आंत गेलों." तारेसंबंधानें विचारिलें तेव्हां भांडारकर म्हणाले "ही तार कोणी पाठविली याचें उत्तर मी दिलेंच पाहिजे काय?" तितकाच जबाब घेऊन वकील आपटे म्हणाले 'माझा आग्रह नाहीं, वाटेल तर सांगू नका.' खटला करण्याविषयीं भांडारकर म्हणाले, खटला व्हावा अशी मात्र आमची इच्छा नाहीं असें आम्हीं पोलिसांस सांगितलें होतें. रा. ब. भिडे यांच्या साक्षींत त्यांनीं बेहेरे हा बोलका व तापट म्हणून त्याचे भोंवतीं घोळका जमला होता असें सांगितलें. आणखी किरकोळ साक्षीदार झाल्यावर आरोपींचे जबाब झाले. घोटवडेकर आपल्या जबाबांत म्हणाले, मी आंत जाऊन बाहेर आलों कारण मला तेथें घेईनांत. मी बिलाला प्रतिकूल नाहीं, मात्र एखाद दुसरी सूचना केली असती. सभा सुरू झाल्यावर मी पर्वतीकडे गेलों. बेहेरे यांनींहि 'आपणास आंत घेतात कां याची थोडा वेळ वाट पाहून निघून गेलों' असें सांगितलें. वासुदेवराव जोशी हे मुळीं बाहेर उभेच नव्हते; सभेला जाण्याचा हक्क सांगून ते केळकरांच्या घरांत जाऊन बसले होते. दामले हेहि आंत होते, आणि रानडे पंचवीस मिनिटें वाट पाहून कंटाळून गेले. आरोपींतर्फे रामभाऊ साने ज्ञानप्रकाशाचे संपादक व इतर दोघांच्या साक्षी झाल्या. त्यांनीं घोटवडेकर बेहेरे सभा संपण्याच्या आधीं परत जातांना पाहिले होते.

डिफेन्सतर्फे आपटे यांचें भाषण फारसें लांब झालें नाहीं. त्यांचे मुख्य मुद्दे असे होते कीं, दंगा झाला पण तो साध्या स्वरूपाचा होता. सभा खाजगी होती हें भांडारकरांचें म्हणणें बरोबर नव्हतें. ज्यावर सह्या घेतल्या त्या अर्जामध्यें देखील बिलांत कांहीं दुरुस्त्या सुचविल्या होत्या. तेव्हां आणखी इतर दुरुस्त्या सुचविणारांस हरकत होणें योग्य नव्हतें. जाहिरातीनें बोलाविलेली सभा आयते वेळीं खाजगी कोण म्हणणार? स्वत:आरोपीनीं दगड धूळ फेकल्याचा पुरावाच नव्हता. उलट भिडे यांच्या मुलानें हातांतील काठीनें कांहीं मुलांस मारलें म्हणून तीं चवताळलीं व त्यांनीं धूळ फेकली. आरोपी सभेंत प्रवेश होण्याच्या हक्काकरितां भांडत होते हा दंगा नव्हता. शेवटीं आपटे यांनीं सांगितलें कीं, पुण्यांतील सुधारक पक्षानें सभेचे ठिकाणीं बंदोबस्त बरोबर ठेविला नाहीं असा सुधारक पत्रांतून आक्षेप घेतल्यामुळेंच ही फिर्याद झाली, एरवीं झाली नसती. अखेर ता. २३ रोजीं सिटी मॅजिस्ट्रेट मि. प्लंकेट यांनीं खटल्याचा निकाल सांगितला. त्यांत जवळ जवळ आपटे यांची विचारसरणी पत्करून व आरोपींविरुद्ध दंग्याचा पुरावा नव्हता म्हणून पांचहि असामींस सोडून दिलें! खटल्यांतील निकालावर केसरींत टीका येण्यासारखें कांहीं नव्हतेंच; पण या प्रसंगानें केसरीनें कडाडून, ज्या सुधारक मंडळींनीं संमतिबिलाचा चंचुप्रवेश करविला त्यांना घरभेदी असें

ठरवून त्यांचा संबंध तोडला पाहिजे, व आज जर यांना थारा दिला तर उद्यां केव्हां तरी 'इतका अनर्थ खिळ्यानें केला' असें म्हणण्याची पाळी येईल असा लोकांस इशारा दिला. अशा रीतीनें हें क्रीडाभुवनप्रकरण संपलें.

दरम्यान दोहों बाजूंनीं चळवळ सुरूच होती. माधवबागेंतील सभेचा इष्ट परिणाम होऊन बिलांत कांहींतरी फेरबदल करावयास पाहिजे असें लोकमत मुंबईस प्रचलीत होऊं लागलें. मुंबईसहि फेब्रुवारीअखेर अनुकूल अशी एक सभा झाली पण तीहि बिलाला सर्वस्वीं अनुमोदन देणारांची नव्हती. अपराधाची शिक्षा कमी करावी व फिर्याद करण्याचा अधिकार फक्त स्वतः मुलीस किंवा तिच्या पालकास द्यावा हें योग्य आहे असें लोक बोलूं लागलें. मुख्य सुधारणा वया संबंधाची होती. जव्हेरबागेंत सभा झाली तेव्हां डॉ. अण्णा कुंटे यांनीं बारा वर्षांचें वय काढून टाकून रजोदर्शनाची मर्यादा घालावी असें सुचविलें होतें. अध्यक्षस्थानीं जव्हेरलाल याज्ञिक होते. पण सभेंत पुष्कळ गोंधळ झाला व सभेचें काम आवरतें घ्यावें लागलें. सभेस चंदावरकर, भालचंद्र वगैरे मंडळी गेली होती. पण तेलंग दहा एक मिनिटें येऊन कांहीं न करितां निघुन गेले. सभेंत डॉ. कुंटे यांस जी उपसूचना आणूं दिली नाहीं तिच्यावर कुंत्यांशिवाय गणपत सदाशिव राव हायकोर्ट वकील, इच्छाराम सूर्यराम देसाई, गुजराथी पत्राचे संपादक, वीरचंद गांधी वगैरे लोकांच्या सह्या होत्या. पुण्यास व मुंबईस वैद्य लोकांच्या सभा भरून त्यांत असा निर्णय दिला गेला कीं, वैद्यकशास्त्राचे जे प्रख्यात आचार्य त्यांनांहि ऋतुप्राप्तीचें वय निश्चित असें ठरवितां आलें नाहीं म्हणून बिलांत वयाचा उल्लेख न करितां ऋतुप्राप्ती हीच मर्यादा घालावी. . . . . . . .

पुरुषांप्रमाणें स्त्रियांची या बिलास संमति पाहिजे, कारण त्यांचेंच हित या बिलानें मुख्यतः पाहिलें आहे, म्हणून मुंबईस स्त्रियांची एक अनुकूल सभा भरविण्यांत आली. पुण्यास मात्र अशी सभा भरणें शक्य नव्हते. पण दुर्दैवानें मुंबईच्या सभेचें चालकत्व पंडिता रमाबाईकडे व अध्यक्षस्थान मिस् सोराबजी बाईकडे गेल्यामुळें सभेचा फारसा उपयोग झाला नाहीं. सौ. काशीबाई कानिटकर यांनीं बिलाचें समर्थन केलें; पण दुसरी एक बाई उठून म्हणाली सरकाराला कायदा करा असें म्हणण्यापेक्षां पंच नेमून त्यांचे हातीं दंड दिलेला अधिक बरा. या बाईनें काशीबाईस उघड प्रश्न विचारला कीं, या बिलाअन्वयें तुमच्या जांवयावर उद्यां खटला झाला तर तो तुम्हांस आवडेल काय ? काशीबाई पडल्या हाडाच्या हिंदू. त्यांच्यानें उत्तर देववेना. रमाबाईहि हाडाच्या हिंदूच, पण धर्मांतरानें त्यांचे विचार सर्वच बदलले होते. काशीबाई निरुत्तर झालेल्या पाहून रमाबाई म्हणाल्या 'बेहेत्तर आहे, मुलीपेक्षां जांवई अधीक नाहीं.' यावर केसरी म्हणतो " ठीकच आहे. खिस्ती लोकांस असा प्रसंग यावयाचा संभवच नाहीं. त्यांतूनहि जांवई अशा अपराधाबद्दल कैदेंत गेलाच तर घटस्फोटाचा मार्ग त्यांच्यांत खुला

आहेच." शेवटीं सभेंत अर्जावर कांहीं सह्या झाल्या, कांहीं झाल्या नाहींत. कांहीं स्त्रिया म्हणाल्या, आम्हीं घरीं विचारलें नाहीं सह्या कशा कराव्या ?

मुंबईस-पुणें शहरांबाहेर अनुकूल सभा फारशा झाल्याच नाहींत. कित्येक ठिकाणीं प्रतिकूल सभा भरविण्याचा आव आणून त्याच खटपटींतून कांहीं अनुकूल निघाल्यास पहावें असे फसवाफसवीचे प्रयत्न झाले, पण ते फसले. सोलापुरास अशीच एक गोष्ट घडली. एके दिवशीं संध्याकाळीं सरकारी हायस्कुलांत नवीन बिल समजून सांगण्याकरितां म्हणून मंडळी जमविण्यांत येऊन, डि. जज्ज टागोरसाहेब व कांहीं वकील तेथें आले. जमलेल्या मंडळीस जाहीर सभेचें स्वरूप कदाचित् देण्याचा संभव आहे असा संशय येतांच, सोलापूरचे प्रसिद्ध व्यापारी रावसाहेब वारद यांनीं हळूच एक इशाऱ्याचें छापील पत्रक मंडळींत वांटलें " दोन पक्षांचें म्हणणें ऐकून मग वाटेल त्या पक्षाकडे विचार करून सह्या द्या." येवढेंच त्या पत्रकांत लिहिलें होतें. अखेर मतें घेण्याच्या वेळीं होय होय, नाहीं नाहीं, असें होऊन सभा संपली. पुढें तीन दिवसांत मोठी जाहीर सभा स्वतः वारद यांचे अध्यक्षतेखालीं भरली. सभेला पांच हजार लोक होते. टिळक व नामजोशी यांना तार करून पुण्याहून बोलाविल्यामुळें ते सोलापूरच्या या सभेस गेले होते. प्रतिकूळ सभांतुन नूलकरप्रभृति कायदेकौन्सिलांतील सभासदांना लोकमत कौन्सिलांत मांडण्याविषयीं आज्ञा, सरसकट सुधारक वर्गाचा निषेध, लोकमत खवळलें असल्याची सरकारास सूचना, पार्लमेंट सभेस अर्ज करण्यास संमति व त्याला लागणारा खर्च उभारण्याची तयारी वगैरे गोष्टी होत होत्या. पुणें हें प्रतिकूळ चळवळीचें केंद्र असल्यामुळें तेथें पुनः एक जाहीर सभा पूर्वींहून मोठ्या प्रमाणावर शनिवारवाड्यापुढील पटांगणांत २९ मार्च रोजीं भरली. सभेला सुमारें दहा हजार लोक होते. दुकानें बंद होतीं. अध्यक्षस्थानीं पुण्यांतील प्रसिद्ध बहुश्रुत नागरिक बंडूनाना रानडे हे होते. सभेंत नामजोशांनीं विलायतेंत चळवळ करा असें सांगितलें. टिळकांनीं ता. १९ रोजीं व्हाइसरॉय साहेबांनीं केलेल्या भाषणावर टीका केली, व जाहिरनाम्याच्या शब्दाची ओढाताण चालली आहे त्या अर्थीं खुद्द राणीसरकाराकडेच अर्ज करून जाहिरनाम्याचा अर्थ ठरवून घ्यावा असें सांगितलें. शेवटीं प्रो. जिनसीवाले यांचें भाषण होऊन जागचेजागीं १५०० रु वर्गणी वसूल झाली. बाळासाहेब नातू यांस खजिनदार निवडून, एक सबकमेटीहि या कामाकरितां नेमण्यांत आली.

मुंबईस ता. १९ एप्रिल रोजीं सभा भरून, पार्लमेंट सभेस या कायद्याविरुद्ध अर्ज करावा व राणीसरकारच्या जाहिरनाम्याचा खरा अर्थ कोणता याविषयीं कायमचा निर्णय करून घ्यावा असें ठरलें. जुन्नर येथें ता. १३ रोजीं सभा भरून पार्लमेंट सभेस अर्ज पाठविण्याच्या ठरावास अनुमोदन देण्यांत आलें व गांवमार्फत वर्गणी जावी म्हणून वर्गणी घेण्याचें कामहि सुरू झालें.

पण अनुकूल प्रतिकूल सभांची ही दंगल चालू असतां ता. १९ मार्च रोजीं वरिष्ठ

कौन्सिलांत सर्व लोकमत धाब्यावर बसवून हें बिल पास केलें गेलें. यानंतर अर्थात् ही चळवळ मंदावली. मे महिन्यांत पुणें येथें भरलेल्या प्रांतिक सभेंत टिळकांनीं पुढील ठराव मांडला:—"संमतिबिलाचे संबंधानें जें लोकमत प्रसिद्ध झालें त्याचा योग्य विचार करणें हिंदुस्थानसरकारास आवडलें नाहीं, ह्याबद्दल कान्फरन्सला फार दिलगिरी वाटते." या ठरावावरील भाषणांत टिळकांनीं लोकमतावर जोर दिला. लोकमताचा सरकारनें आदर केला नाहीं ही गोष्ट राजकीय उन्नतीच्या दृष्टीनें बरी झाली नाहीं हा त्यांचा मुख्य मुद्दा होता. रा. वामनराव लेले यानीं ठरावास अनुमोदन दिलें व तो बहुमतानें पास झाला.

ता. ३१ मे रोजीं भायखळ्याच्या बाजूस फिरून एक जंगी जाहीरसभा झाली. तिचा विशेष हा होता कीं, हिंदु लोकांप्रमाणें मुसलमानहि सरकारच्या निषेधाकरितां सभेंत सामील झाले होते. वास्तविक संमतिबिल हें नुसत्या हिंदूनांच लागू होणारें नव्हतें. त्यापासून उपसर्ग असलाच तर तो सर्व जातींना होणार होता; परंतु मुसलमान समाज त्या वेळीं मागसलेला असल्यामुळें या प्रश्नांत त्यांनीं कधीं लक्षच घातलें नव्हतें. पण हिंदु लोकांनीं इतकी चळवळ केलेली पाहून त्यांच्यांतल्याहि कांहीं जाणत्या लोकांना चळवळीचें मर्म लक्षांत आलें, व या जाहीर सभेचें अध्यक्षस्थान घेण्यास एक प्रसिद्ध मुसलमान गृहस्थ मिळाला. यांचें नांव मौलवी हिदायतुल्ला. हे इंग्रजसरकारच्या दरबारांत तुर्कस्थानच्या वतीनें वकील होते. सभेंत कांहीं भाषणें उर्दूहि झालीं, व हिंदु व मुसलमान लोक जाहीर सभेंत उत्साहानें एकत्र आलेले पाहून हिंदुमुसलमानांच्या एकीचें महत्त्व अनेकांच्या दृष्टीपुढें मूर्तिमंत येऊन, हें ऐक्य सदोदित राहील अशी आशाहि मौलवीसाहेबांनीं प्रदर्शित केली. पण अशी आशा प्रदर्शित होणें म्हणजेच तें ऐक्य मूळचें नाहीं अशी अप्रत्यक्ष कबूली दिल्यासारखेंच होतें; व या सभेंत हिंदुमुसलमान एकत्र आल्यानें एकीचा भास क्षणभर झाला व आल्हादकारकहि वाटला तरी तो दुर्दैवानें पुढें फार दिवस टिकला नाहीं. भवितव्यतेच्या तासावर उलट्या बाजूनें टोला वाजविण्याची लहर दैवाला पुढें लौकरच आली; व मुंबई शहरांतल्या संमतिबिलाच्या चळवळींत समाविष्ट झालेल्या हिंदुमुसलमानांच्या ऐक्याच्या जय शब्दाचा प्रतिध्वनि विराम पावतो न पावतो तोंच 'हिंदुमुसलमानांचा दंगा' या खेदकारक शब्दांची आरोळी लोकांच्या कानीं येऊं लागली.

दरम्यान संमतिवयाच्या बिलाच्या चळवळीचा विसर पडण्यासारख्या इतर गोष्टीहि हळू हळू घडूं लागल्या होत्या, व या मुद्यावरील चळवळीचा पूर या नवीन पाटांच्या द्वारें ओसरूं लागला होता. अशा नवीन चळवळींपैकीं शारदासदनाची चळवळ ही एक असून तिची हकीकत आम्ही स्वतंत्र रीतीनें पुढील एका भागांत देणार आहों. पण खुद्द मुंबईत सुधारकाग्रणी भांडारकर व तेलंग यांच्या संबंधानें दुसराच एक वाद निघाला, व त्यांतहि कित्येक सुधारकांच्या अंगीं असणाऱ्या

तामसीपणाबरोबर बोलकेपणाचा दुर्गुण लोकप्रत्ययास आला. त्या योगानें संमतिवयाचें बिल फिरलें नाहीं तरी, त्याला मुख्य आधार देणाऱ्या सुधारकांविरुद्ध लोकांचें मत आधींच जें कलुषित झालें होतें तें आणखी कलुषित मात्र झालें. या सुमारास डॉ. भांडारकर यांनीं ११ मे रोजीं आपल्या गतभर्तृका कन्येचा पुनर्विवाह रा. सा. गोपाळराव पाणंदीकर नांवाच्या गृहस्थाशीं केला. या मुलीचें लग्न बाराव्या वर्षी झालें असून पुढें लवकरच तिच्यावर वैधव्याचा प्रसंग ओढवला. भांडारकर यांनीं दाखविलेल्या मनोधैर्याबद्दल केसरीनें त्यांचें अभिनंदन करून असें म्हटलें होतें कीं, सुशिक्षित वजनदार घराण्यांतून प्रत्यक्ष कृतिरूप सुधारणा होईल तरच ती लोकांना हळू हळू पटेल. सामाजिक सुधारणा करण्याचा खरा हाच मार्ग होय. भांडारकर यांच्या समाजाला, म्हणजे मुंबईच्या सारस्वत लोकांना, ही गोष्ट आवडली नाहीं. यामुळें त्यांजवर टीकेचा भडिमार होऊं लागला. त्यांजवर बहिष्कार घालण्यापर्यंत पाळी आली.

या संबंधानें ता. ७ जून रोजीं मुंबईस शेणव्यांच्या ठाकुरद्वारीं सारस्वत ज्ञातीची सभा भरली होती. सभेस वास्तविक दोनतीनशेंच लोक होते. सभेंत अर्थातच जुन्या मताचें प्राबल्य होतें व सभेस हरकत करणारे कांहीं नरम गरम सुधारकहि होते. अध्यक्षस्थानीं एक वृद्ध कुलीन सारस्वताची नेमणूक झाली. प्रथम ठराव पुढें आला त्यांत इतकेंच म्हटलें होतें कीं झालेली हकीगत धर्मगुरु स्मार्त वैष्णव सांप्रदायी मठांचे स्वामी यांजकडे कळवावी, व ते आज्ञापत्र देतील त्याप्रमाणें करावें. या ठरावाला विरोध करण्यास सदानंद भांडारे हे उठले. त्यांनीं इंग्रजींत भाषण करण्यास प्रारंभ करतांच लोकांचा शुकशुकाट सुरू झाला, आणि मला मराठींत बोलतांच येत नाहीं असें त्यांनीं म्हटल्यावर उलट तो वाढला. आक्षेपकांनीं भांडारकर हे स्मार्त आहेत व सभा बोलावणारे वैष्णव आहेत असल्या पोरकट आक्षेपापासून सुरवात केली. आम्ही बहिष्कार घाला म्हणत नाहीं पण स्वामी आज्ञा देतील तसें करूं असा सभेचा हेतु सांगण्यांत येतांच, सुधारक चवताळले व स्वामींना काय अधिकार असें म्हणूं लागले. भांडारे यांनीं आपल्या व इतरांच्या धर्मनिषिद्ध कृत्यांची यादी सांगून, स्वामी आमचें काय करतात तें करूंद्यात असें आव्हान केलें. इतक्यांत एका पोरवयी तापट सुधारकानें आपल्या पायांतला जोडा वृद्ध अध्यक्षाच्या अंगावर फेकला. हा अपमान सहन न होऊन अध्यक्ष उठून गेले व सभा गोंधळांतच बरखास्त झाली. सभेच्या आधीं मुंबई ग्याझेट पत्रांत अशी स्पष्ट सूचना करण्यांत आली होती कीं, भांडारकरांसारख्यांवर मुंबईचे लोक बहिष्कार घालणार म्हणजे काय? सुधारक लोकांच्या अंगांत धैर्य असेल तर त्यांनीं असली सभा होऊं देतां कामा नये; व आपल्या आंग्लो इंडियन गुरूच्या या चिथावणीवरून मुंबईतील कांहीं सुधारकांनीं हें दुष्कृत्य केलें असें लोक सहजच म्हणूं लागले. सभा उधळली, भांडारकर बहिष्कृत झाले व न झाले दोन्हीं सारखींच

ठरली. पण दोनतीन महिन्यांपूर्वीच क्रीडाभुवनाच्या सभेंत गोंधळ होऊन बाहेर दंगा झाला या सर्व गोष्टींचें खापर पुराणमतवादी लोकांच्या डोक्यावर फोडण्यांत आलें होतें, ते अशिक्षित पशु अशी त्यांची संभवना सुधारकांकडून होत होती, व टिळकांना अशा लोकांचे पुढारी ठरवून या दोषारोपाचा मोठा वांटा त्यांच्याकडे देण्यांत येत होता. ती बाजू उलटविण्यास मुंबईतील शेणवी लोकांच्या या सभेंतील गोंधळाचा टिळकांना चांगलाच उपयोग झाला.

ता. १६ जूनच्या केसरींत टिळकांनीं असा रोखठोक प्रश्न उपस्थित केला कीं, क्रीडाभुवनांतील सभा आणि ठाकुरद्वारांतील सभा यांत अंतर ते काय राहिलें? फक्त कित्येक बाजूंची आलटापालट झाली. पुण्याची सभा सुधारकांनीं भरविली ती जुन्या मताच्या लोकांनीं मोडली; मुंबईस जुन्या मताच्या लोकांनीं सभा भरवली ती सुधारकांनीं मोडली! पुण्यास विटा व धूळ येवढीच फेकण्यांत आली; मुंबईच्या सभेंत अध्यक्षांवर जोडा फेकण्यांत आला. पुण्यास लोकांना सभेंत घेईनांत म्हणून दंगा झाला; मुंबईस दंगा करणारे लोक खुद्द सभेंतच होते. पुण्यांत सभा भरविणाऱ्या एका सुधारकाच्या मुलानें छडीनें लोकांना मारिलें असा उल्लेख खुद्द मॅजिस्ट्रेटच्या निकालांतच दिलेला आहे; मुंबईची सभा बोलावणाऱ्या सनातनी लोकांनीं इतरां कोणास आगळीक केली नाहीं. पुण्याच्या दंग्यांत विद्यार्थी बरेच होते; मुंबईच्या दंग्यांत प्रौढ सुधारकहि होते. दुसरी एक गोष्ट सुधारकांविरुद्ध दाखविण्यांत आली, ती ही कीं सारस्वतांतील तेलंगासारखे कित्येक सुधारक म्हणविणारे पुनर्विवहास हजर होते पण पंक्तीस जेवावयास मात्र बसले नाहीत! पुण्यामुंबईच्या सभेंत फरक इतकाच कीं एकींतून फौजदारी खटला निष्पन्न झाला, दुसरी चर्चा करितां, करितां निकालांत निघाली. स्वतः स्वार्थत्यागपूर्वक व लोकनिंदा सोसण्यास तयार होऊन सन्मान्य रीतीनें सुधारणेचें कृत्य म्हणून सुधारणा न करितां, सुधारक लोक नुसता बखेडा मात्र माजवितात आणि जुन्या लोकांना शिव्या देतात, असें दर्शवून केसरीनें एका वाक्यांत या प्रकरणाचा उपसंहार केला. "खऱ्या सुधारणेची तुम्हास कळकळ असल्यास त्याप्रमाणें आचरण करा म्हणजे झालें." टिळकांच्या या टीकेस बळकटी येण्यास दुसरें एक कारण यानंतर लवकरच घडलें. तेलंगानीं भांडारकरांच्या पंक्तीला बसून पुनर्विवाहांत जेवण केलें नाहीं ही गोष्ट तर झालीच; पण प्रौढविवाहाचें मंडन करणारे तेलंग यांनीं आपल्या आठ किंवा दहा वर्षांच्या मुलीचें लग्न वडिलांच्या आग्रहाची सबब सांगून केलें. कर्मधर्मसंयोगानें पुढें टिळकांनाहि आपल्या वडील मुलीचें लग्न करण्याचा प्रसंग आला; पण तें त्यांनीं तिच्या वयाच्या पंधराव्या वर्षापर्यंत केलें नाहीं.

१८९१ च्या जूनमध्यें पुण्यास संमति बिलाची प्रत्यक्ष चळवळ इतर रीतीनें शांत होऊन ती फक्त नाटकाच्या रूपानें सुरू होती. पार्लमेंट सभेकडे करण्याच्या

अर्ज वगैरे गोष्टी जागच्याजागींच थबकलेल्या दिसतात. इंग्लंडांत जाऊन चळवळ करण्यासारखा हा विषय नाहीं, व हजारों सह्या घेतलेला असा अर्ज पार्लमेंटला पाठविला तरी त्याला कोणी भक्कम पुरस्कर्ता असल्याशिवाय तो नुसता अर्जांच्या कंठाळींत पडून राहणार, हें टिळक नामजोशी वगैरेंना माहीत होतें. अशा कामीं प्रत्यक्ष अर्जापेक्षां अर्ज करा असें म्हणत राहण्याचा उपयोग होतो इतकाच अर्जांच्या चळवळींतिल ग्राह्यांश होय! संमति बिलाच्या नाटकाचीहि गोष्ट तशीच होती. कांहीं दिवस हे प्रयोग पुण्यास झाले; पण लवकरच त्यांची गोडी संपली. प्रत्यक्ष चळवळीच्या वेळीं उभयपक्षीं मनावर गंभीर वृत्तीचा व रागाच्या आवेशाचा जो ताण पडला होता तो नाटक पहात असतां हास्यविनोदांत विरून गेला. ज्ञानप्रकाशानें नाटककार कानिटकर व त्यांचे आभार मानणारे नामजोशी यांच्यावर टीका केली. पण केसरी लिहितो " कानिटकर यांस कोणीच शेक्सपियर समजत नाहीं आणि नामजोशी यांस कोणी शंकराचार्यांचीं वस्त्रें देत नाहीं. मग त्याबद्दल येवढा खटाटोप कशास पाहिजे. " या वाक्यावरूनच नाटक प्रयोगाच्या अवस्थेंत मूळ चळवळीला शिथिलपणा आला होता हें सिद्ध होतें.

आतां शेवटीं एका मुद्याचा उल्लेख करून हें प्रकरण संपवितों. तो असा. संमतिवयाच्या कायद्याची याचवेळीं इतकी जरूरी होती कीं काय व बिलाच्या उत्पत्तीचें खरें कारण कोणतें ?

या मुद्यासंबंधानें आम्हांस असें वाटतें कीं, बारा वर्षांच्या वयाच्या आंतील, विवाहित होवो वा अविवाहित होवो, अल्पवयी मुलीवर बलात्कार होऊन मनुष्यमात्राच्या दयाबुद्धीवर ताण पडण्यासारखे अनेक प्रकार नेहमीं होत होते म्हणून हें बिल पुढें आलें असें दिसत नाहीं. दहा वर्षांपर्यंतच्या मुलींच्या संरक्षणाची तजवीज खुद्द पीनलकोडांतच होती, व स्कोबल किंवा इतर कोणीं बिलाला अनुकूल असणाऱ्या लोकांच्या तोंडून अशी माहिती निघालेली आढळत नाहीं कीं, दहा ते बारा वर्षे वयाच्या दरम्यानच्या स्थितींत असणाऱ्या मुलींवर झालेल्या बलात्काराकरितां पुष्कळ खटले भरले अगर भरण्यासारखे होते पण कायद्यांत वयोमर्यादा बारांपर्यंत वाढविलेली नाहीं म्हणून गुन्हेगारांस शिक्षा करितां आल्या नाहींत! स्कोबलसाहेबांनीं सांगितल्याप्रमाणें गुन्ह्याचें कृत्य जुनेंच, पण वयोमर्यादा वाढवून गुन्हेगारांना पकडण्याचें जाळें थोडें अधिक मोठें करावें येवढाच बिलाचा हेतु होता. पण वरपांगीं जरी असें सांगण्यांत आलें तरी सद्धेतूनें कां होईना पण या कायद्याच्या भयानें मुलींचीं लग्नेंच बारा वर्षांच्या आंत होऊं नयेत असें घडवून आणण्याचा कायदेवाल्यांचा हेतु असावा असें दिसतें. आतां बिलास विरोध करणारा मनुष्य सकृद्दर्शनीं दयाविहीन दिसण्याचा प्रसंग होता. बारा वर्षांच्या आंतील मुलींवर जबरी झाली तरी या लोकांना त्याचें कांहींच नाहीं, असें वादांत कोणीं म्हटलें असतें, तरीहि तें चालण्यासारखें होतें. पण

बिलाच्या विरोधकांची ही निवळ बदनामी होय. मुलींच्या दृष्टीनें पाहतां ही गोष्ट त्यांना पसंत होती असें नाहीं. पण एक चांगली म्हणून गोष्ट करूं जातां तिनें, परिणामतः कां होईना, अनेक वाईट गोष्टी घडून येत असतील तर ती न केलेलीच बरी असें लोक म्हणत. पण विरोधकांना मनांतून विशेष राग येण्याचें कारण असें दिसतें कीं, प्रौढ विवाहाची जी सामाजिक चळवळ यापूर्वीं सुरू झाली होती ती कांहीं मर्यादेपर्यंत तरी कायद्यानें, म्हणजे लोकांवर एक प्रकारच्या सक्तीनें, साध्य करून घ्यावयाची असा कायदेवाल्यांचा हेतु होता, असें त्यांना मनांतून वाटत होतें. आणि राजकारणाची दृष्टी सोडून दिली असतां हा कायदा पास झाल्यानें फारसें कांहीं बिघडलें नाहीं असें जरी आम्हांस वाटतें, तरी प्रौढ विवाहाच्या चळवळीचा पुर्वेतिहास लक्षांत घेतां, भूतदयेपेक्षां सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या विशिष्ट मार्गाविषयींच्या आग्रहांतच त्याची उत्पादक स्फूर्ति होती हें निर्विवाद आहे. सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय राजकीय हक्कांस आपण अपात्र आहांत ही टोंचणी कित्येक सुधारकांच्या मनांत एकसारखी टोंचत होती. लोकांकडून सुधारणा होण्याची वाट पहावी तर राजकीय सुधारणेच्या प्रारंभास फारच वाट पहावी लागणार म्हणून प्रथम तांतडीनें सामाजिक सुधारणा करण्याच्या मार्गास लागूं या, व लोकांवर विसंबण्यापेक्षां कायद्याच्या उपयोगानें जर सामाजिक सुधारणा हटकून तावडतोब घडून येईल तर ती घडवून आणून आणि इंग्रज लोकांचे मत अनुकूल करून घेऊन राजकीय प्रगतीच्या मार्गास मग लागतां येईल असा त्यांचा विचार होता. बिलास विरोध करणाऱ्या लोकांची दृष्टी अर्थात अगदीं याच्या उलट होती.

## भाग १३ वा

# टिळक व ग्रामण्य प्रकरण

सामाजिक सुधारणेच्या वादांत टिळकांचा पांच चार तत्वांबद्दल विशेष आग्रह असे. (१) सामाजिक सुधारणेपेक्षां राजकीय सुधारणेचें महत्त्व परराज्याखालीं हिंदी लोकांना अधिक आहे. (२) याकरितां सुशिक्षित लोकांनीं राजकीय सुधारणा आधीं हातीं घेतली पाहिजे. (३) श्रमविभागाच्या तत्त्वावर राजकीय सुधारणा व सामाजिक सुधारणा यांचें काम वेगळ्या व्यक्तींनीं हातीं घेतलें तर तें अधिक बरें. (४) सामाजिक सुधारणा ज्याला पुढारीपणानें करावयाची त्याचें चरित्र, विशिष्ट सुधारणाविषयांखेरीज इतर दृष्टींनीं, आक्षेपार्ह नसलें पाहिजे, व त्यानें धैर्यानें व प्रत्यक्ष कृति करून आपलें कार्य पुढें ढकललें पाहिजे. नुसती तोंड-पाटिलकी उपयोगी नाहीं. (५) कोणत्याहि सामाजिक किंवा धार्मिक सुधारणेच्या बाबतींत ज्ञानप्रसार हेंच मुख्य साधन, व एकट्यानें फार पुढें न जातां लोकांना बरोबर घेऊन जाणें हेंच मुख्य धोरण असलें पाहिजे. वरील बहुतेक तत्त्वें पहिल्या एक दोन पिढीच्या सुधारकांना मान्य नव्हतीं. यामुळें त्यांचा व टिळकांचा निरंतर झगडाच झाला. हा झगडा १८८२ ते १८९२ हीं दहा वर्षें फार कसून चालला होता. बालविवाह, असंमत वैधव्य, रखमाबाई-दादाजी प्रकरण वगैरे बाबतींत टिळकांना, म्हणजे टिळकांच्या पक्षाला, जय मिळून सामाजिक बाबतींत कायदा मागण्याची चळवळ हाणून पाडली गेली होती. पण सुधारकांनीं संमतिवयाच्या बिलाच्या कामीं आपला सूड उगवून घेतला, व पीनल कोडच्या दुरुस्तीनें अखेर आपलेंच मत यशस्वी झालें असें समाधान त्यांनीं मानून घेतलें.

नुसत्या या वादाचा इतिहास वाचणारांना, टिळक हे मूर्तिमंत धर्माचे अभिमानी असें वाटेल. व एका अर्थानें तें खरेंहि होतें. कारण जुन्या धर्माचा व चाली-रीतींचा योग्य अभिमान बाळगण्यांत टिळकांनीं कधींहि कसूर केली नाहीं; व केसरीसारख्या विद्वान व जोरदार पत्रानें सुधारकांच्या स्वेच्छाचारास जर इतका कसून विरोध केला नसता तर सामाजिक बाबतींत हवे तसे कायदे लोकमताच्या नांवावर करून घेणें मुळींच कठीण नव्हतें. परंतु जुन्या धर्माच्या व चालीरीतींच्या अभिमानाचे दुसरेहि एक हक्कदार होते. आणि ते इतके एकांतिक मताचे कट्टे सना-तनी होते कीं, त्यांच्यांत व सुधारकांत तर उत्तर दक्षिण ध्रुवांइतकें अंतर होतेंच; पण केसरीलाहि ते सुधारकांच्या वर्गांतच काढीत! फरक इतकाच कीं, रानडे मोडक प्रभृति लोक प्रगट सुधारक, व डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील टिळकांसुद्धां सर्व मंडळी ही प्रच्छन्न सुधारक! आणि म्हणूनच अस्सल सनातनी पुणेकर ब्राह्मण

म्हणत कीं, उघड शत्रु पुरवला पण हा प्रच्छन्न शत्रु नको. कारण केसरीच्या पहिल्या कांहीं वर्षांत आगरकरांनीं स्वैरसुधारणावादित्वाचे लेख हवे तितके लिहून घेतले, व त्यांस इतर लोकांकडून प्रतिरोध झाला नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं आगरकरांस विरोध सुरू होऊन मलबारी वगैरे स्वैर सुधारकांस प्रतिकूल असे लेख केसरींत येऊं लागले हें वेगळें; पण केव्हांहि झालें तरी, जेव्हां जेव्हां म्हणून सामाजिक विषयांवर केसरींत लेख येत तेव्हां तेव्हां, सरकारी कायद्याची मदत न घेऊन केवळ ज्ञानप्रसारानेंच कां होईना, पण जुन्या चालीरीतींत सुधारणा हळू हळू झाली पाहिजे असें केसरी उघडपणें प्रतिपादित असे!

पण येवढें देखील पुण्यांतील अस्सल सनातनी पक्षाला खपत नसे. त्यांचें म्हणणें जुनें आहे तें सर्व तसेंच असावें. तें शास्त्रपुनीत आहे इतकेंच नव्हे तर युक्तिसिद्धहि आहे! जुन्या चालीरीतींत सामोपचारानें कां होईना पण कांहीं तरी फरक करावा या म्हणण्यांत त्या चालीरीती वाईट आहेत असाच ध्वनि निघतो व तो यांना खपण्यासारखा नव्हता. उदाहरणार्थ, बालविवाह हाच प्रश्न घेतला तर त्यावर पुण्यांत तीन मतें पडत. बालविवाह हा अनिष्ट असल्यामुळें सरकाराकडून कायदा करवून घेऊन तो बंद केलाच पाहिजे, हें अस्सल सुधारकांचें मत. मध्यम पक्ष केसरीचा. तो म्हणे कीं, बालविवाह हा एकंदरींत अनिष्ट आहे, व कित्येक जातींतून या आचाराची जी अतिशयोक्ति होते ती तर निःसंशय अनिष्ट होय. तथापि हळू हळू लोकांना या गोष्टी नव्या दृष्टीनें शिकविल्या असतां जरूर ती सुधारणा आपोआप घडून येईल. पण कायद्याची मदत घेणें हें बालीववाहाइतकेंच अनिष्ट असून, एकवेळ बालविवाह क्वचित् कोठें उरला तरी चालेल पण तो मोडण्याकरितां कायदा नको, व त्याला बहुजनसमाजानें कसून विरोध केला पाहिजे. तिसरा पक्ष अस्सल सनातनी लोकांचा. त्यांचें म्हणणें बालविवाह वाईटच आहे हें म्हणणें शास्त्रसंमत नसून युक्तिसिद्धहि नाहीं. बालविवाहाच्या दुष्परिणामाइतकेच प्रौढविवाहाचे परिणामहि घातक आहेत म्हणून एक सोडून दुसरें पत्करलें तरी रड ही राहणारच. मग आहे तेंच बरें म्हटलें व संभाळून नेलें तर त्यांत काय वाईट? आपल्या वैभवसंपन्न अशा ऐतिहासिक काळांत बालविवाह आचारांत होता. आणि बालविवाह जर अवश्य वाईटच तर हें वैभव आपणांस कसें मिळालें?

या तीन मतांपैकीं प्रत्येक मत अतिशय जोरानें व स्पष्टपणानें प्रतिपादन करणारें असें एकेक वेगळें वर्तमानपत्र तेव्हां पुण्यांत होतें. अस्सल सुधारकी लेख लिहिणारें सुधारकपत्र १८८८ पर्यंत जन्मास यावयाचें होतें. ज्ञानप्रकाशपत्राला अमुक एकच अशी सामाजिक बाजू नव्हती. त्याला जसा संपादक ज्या वेळीं भेटेल तसें त्याचें मत. ज्ञानप्रकाश हा रानड्यांचा चहाता असला तरी तें खरें सुधारकीपत्र म्हणतां येत नव्हतें. केसरींतहि वर दर्शविल्याप्रमाणें यथा प्रसंग दोन्ही प्रकारचे लेख येत. रेशमी

कपड्यांत तापता म्हणून एक प्रकार असतो त्याप्रमाणें केसरीच्या सामाजिक मतांचा प्रकार होई. 'तापत्या'ची विणकर अशी असते कीं, एकच भाग जसा उजेडांत धरावा त्याप्रमाणें तांबडाहि दिसतो व जांभळाहि दिसतो. इकडे सुधारकांशीं भांडावयाचें असेल तेव्हां केसरीला पूर्ण धर्माभिमान नाहीं असें म्हणेल कोण ! पण शांततेच्या काळांत सामाजिक विषयावरील केसरींतील लेख वाचले म्हणजे 'अरे, हा तर सुधारक' असें एकाद्यास सहज वाटलें असतें. केसरीनें जुन्या लोकांस कधीं फारसें तोडून लिहिलें नाहीं. पण अमक्या जुन्या रूढींत अमुक सुधारणा केली तर ती इष्ट आहे; धर्मशास्त्राचा असावा तितका निकट परिचय नसल्यानें धर्मसंमति किंवा धर्मनिषेध याविषयीं सामान्य लोकांच्या कल्पना भ्रामक असतात; व जुनें हें जरी पुष्कळसें चांगलें असलें तरी नव्यांतहि चांगलें व घेण्यासारखें असें थोडेंबहुत असतेंच असें केसरी म्हणे. एकांतिक किंवा अस्सल सनातनी पत्र म्हटलें म्हणजे त्यावेळीं पुणेवैभव हेंच होतें. पुणेवैभवाचे संपादक शंकर विश्वनाथ केळकर या नांवाचे असत. हे गृहस्थ विशेष शिकले सवरलेले नसल्यामुळें त्यांच्या लिहिण्यांत विद्वत्तेची लजत कोठेंच नसे. पण अशिक्षित लोकांत एक प्रकारचा मार्मिकपणा, विनोद, व समयसूचकता हीं असतात, तीं सर्व या केळकरांत होतीं. शिवाय ग्राम्य शब्द किंवा कल्पना यांच्या उल्लेखांत कसलीहि मर्यादा म्हणून मानावयाचीच नाहीं असल्या निश्चयाचें वरदान ज्यांना असतें, त्यांची भाषा व लेखनपद्धति प्रतिपक्षावर हल्ला करण्याचे कामीं अकुंठगति असते हें प्रसिद्धच आहे. व त्याच अर्थानें 'पुणें-वैभवा'चें लिहिणें अकुंठगति होतें. शिवाय अंगावर आलें असतां माफी मागण्याचा गुण पुणें-वैभवांत दांडगा होता. यामुळें टाकून लिहिण्याची जबाबदारी हा काय पदार्थ असतो हें संपादकाच्या गांवींहि नव्हतें. कोर्टांत येण्यापूर्वी किंवा कोर्टांत आल्यावर माफी मागून त्यावरील अनेक खटले निस्तरले होते. कसेंहि असो. केसरी हा जितका सुशिक्षित लोकांना प्रिय तितकाच पुणेवैभव हाहि सामान्य जनतेला प्रिय होता. हरतऱ्हेचे पदार्थ आंत ओवेरल्यानें समाराधनेतील आमटी रुचकर बनते, तसाच पुणे-वैभव हाहि सामान्य लोकांना त्यांतील शिव्या, ग्राम्य विनोद, चुटके, घुटके, कादंबऱ्या वगैरेंनीं सरस वाटे. प्रसिद्ध कादंबरीकर्ते हरि नारायण आपटे यांची पहिली कादंबरी, म्हणजे 'आजकालच्या गोष्टींतील मधली स्थिति' ही पुणें वैभवांतूनच प्रथम खंडशः प्रसिद्ध झाली होती. राजकारणात पुणे वैभवाला फार कळत नसे. मात्र हे सरकार चांगलें नाहीं, विशेषतः सामाजिकदृष्टया इंग्रज व सर्व युरोपियन हे सरसकट वाईट असतात, या सिद्धान्ताचें निर्विकल्पक ज्ञान पुणे-वैभवाच्या अंगीं चांगलें भिनलेलें होतें. संपादक राजकारणांतील दर्दी नसल्यामुळें राजकीय असे लेख पुणे-वैभवांत थोडे येत. पण सुधारक लोकांच्या स्वैरकल्पना व त्यांतील कांहींचे निरर्गल प्रलाप यांनीं पुणें-वैभवाच्या टीकेला निरंतर खाद्य पुर-

विलें जात असे. व त्यांतल्या त्यांत शांततेच्या काळीं त्याची दृष्टि केसरी-कडेहि वळे!

नाहीं म्हटलें तरी केसरींत पूर्वी सामाजिक विषयावर पुष्कळच लेख आले. आगरकर हे विनोदी व विद्वान लेखक तर असतच, परंतु ग्राम्यशब्दप्रयोगाच्या दृष्टीनें पाहिलें तर आपल्या परीनें आगरकर हे पुणे वैभवासहि हार गेले नसते. 'उत्तम न्हाविणी पाहिजेत' 'सास्वांना नोटीस' वगैरे त्यांच्या अनेक मार्मिक लेखांतून अशीं कित्येक स्थळें दाखवितां येतील कीं, जेथें विद्वन्मान्य अशी सदभिरुचि हटकून सुटली. कित्येक लोक उघड असें म्हणत कीं, "एवढा तुमचा एम्. ए. पण तो सुद्धां जर स्पष्टोक्तीला आळा घालीत नाहीं तर आमचा बिचारा पुणेवैभवकार तर काय बोलून चालून अशिक्षितच. स्पष्टोक्तीबद्दल त्याला तरी नांवें कां ठेवावीं!" आगरकर व पुणे-वैभवकार यांचा क्रिया-प्रतिक्रियारूप सामना चालला म्हणजे स्पष्टोक्तीची रंग-पंचमी व क्वचित् धुळवडहि होई. पण येवढ्यानेंच भागत नसे. सामाजिक विषयावर टिळक व गोळे वगैरे लोक बरेच वेळां लिहीत, व हे लेख खरोखरच निर्दोष असत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांत भाषेचा उच्छृंखलपणा नाहीं, कोणाचा अनादर नाहीं, कोणास तुटून लिहिलेला शब्द नाहीं; तर केवळ युक्तिवाद भरलेला असून तो वाचून समंजस मनुष्याच्या मनावर कांहीं कांहीं जुन्या अनिष्ट अशा चालीरीतींचे दोषाविष्करणाचा परिणाम फार चांगला होत असे. उदाहरणार्थ, दत्तक मुलगा घेण्याचा प्रघात परंपरापुनीत आहे. तथापि दत्तक न घेतला तर कोणी धर्मविरुद्ध आचरण करितो असें होत नाहीं, व नव्या दृष्टीनें पाहिलें तरी उगीच एकादा कुठला तरी मुलगा दत्तक घेऊन त्याला आपलें सर्वस्व देऊन टाकण्यापेक्षां तीच मिळकत परोपकाराकडे लावली तर राष्ट्रदृष्ट्या अधिक फायदा आहे, असें टिळकांनीं या विषयावरील निबंधावलींत प्रतिपादिलेलें आढळेल. पुण्यांत या वेळेला 'न्हाणवल्या' रस्त्यांतून पालखींत घालून वाद्यें वाजवीत मिरवीत नेण्याची अनिष्ट चाल होती. पण न्हाणवलीची मिरवणूक हा शास्त्रयुक्त गर्भाधानांतील विधि नाहीं, किंबहुना गर्भाधानसंस्कारहाच मुळीं वैकल्पिक आहे, असें प्रतिपादन केलेले केसरींत आढळेल. पुनर्विवाहाविरुद्ध केसरीनें लिहिलें तसेंच, पुरुषानेंहि अनेक विवाह करण्याविरुद्ध केसरीनें लिहिलें आहे. इतकेंच नव्हे, पण शक्य तर अविवाहित राहून देशसेवा करण्यांत आयुष्य घालविणें हा मार्ग श्रेष्ठ आहे, स्त्रियांनीं देखील अविवाहित राहून जन्म घालविण्याचा निश्चय केल्यास त्यांत वावगें कांहीं नाहीं, असें टिळकांनीं वेळोवेळीं प्रतिपादिलेलें आहे. स्त्रीशिक्षणाच्या चोचल्यांची किंवा अयुक्त शिक्षणक्रमाची केसरीनें टर उडविली असली तरी स्त्रीशिक्षण हें इष्ट आहे असेंच टिळकांनीं प्रतिपादन केलेलें आढळेल. डॉ. आनंदीबाई जोशी किंवा काशिबाई कानिटकर यांसारख्या सुशिक्षित स्त्रियांबद्दल टिळकांनीं केसरींतून केव्हांहि आदरबुद्धिच दर्शविली आहे. फार काय पण पंडितारमाबाईच्या अंतिम

हेतूंबद्दल संशय उत्पन्न होईतोंपर्यंत त्यांच्यावर त्यांनीं हत्यार उचललें नाहीं. तात्पर्य, सामाजिक सुधारणेचा जो उपयुक्त असा राजमार्ग तो सोडून टिळकांचे लेख, आगरकर हे केसरीचे संपादक असतां व त्यानंतरहि, या किंवा त्याहि बाजूस फारसे ढळले नाहींत.

पण असल्या मध्यम मार्गाच्या सौम्य सयुक्तिक उपदेशाकरितांहि केसरीला म्हणजे आगरकरांना व टिळकांनाहि पुणेवैभवाच्या शिव्या खाव्या लागत असत. केसरी हा धर्माभिमानी ही समजूत इतर लोकांची काय असेल ती असो; पण त्या समजुतीस पुणेवैभवांत कोठेंहि थारा मिळाला नाहीं. किंबहुना त्यांतल्या त्यांत आगरकरांपेक्षां टिळकांवरच पुणेवैभवाचा प्रथम प्रथम अधिक रोष असे. आगरकर हे आपल्या अद्भुत स्पष्टोक्तीनें स्वतः होऊनच शत्रु निर्माण करावयाचे, व त्यांच्या स्पष्टोक्तीला पुणेवैभवानें उलट चार शिव्या हासडल्या तरी तिन्हाईत त्यास फिटास-फीट झाली असेंच म्हणार. केसरींतील टिळकांच्या लेखांशीं सामना करावयाचा म्हणजे एक तर शिव्या अस्थानीं ठरून सहानुभूति टिळकांकडे जावयाची; व दुसरी गोष्ट, हा सामना करावयाला युक्तिवादाचें बळ पाहिजे. टिळकांनीं उगीच एकाद्या स्मृतिवचनाची ओढाताण केली असें गृहीत धरून चाललें तरी ती ओढाताण करण्याला धर्मशास्त्राचें जितकें ज्ञान जरूर पाहिजे तितकें पुणेवैभवकारांकडे कोठून येणार? आणि टिळकांचा खाक्या तर असा कीं, ते सामाजिक विषयां-वर लिहूं लागले असतां शास्त्रवचनांत बसावयाचे व शास्त्रवचनांत उठावयाचे! अर्थात् अशा गृहस्थाला सनातन धर्माचा अभिमान नाहीं या आक्षेपाचें लांकूड डोक्यांत घालून चीत करतां येत नाहीं. पुण्यांतील पुष्कळ धर्माभिमान्यांना टिळ-कांच्या या गुणावगुणांच्या मिश्रणाची मोठी नड व जाचणूक झाली होती. आगरकरांनीं भपकेदार रंगांनीं भावी सुशिक्षित स्त्रीचें चित्र रंगविलें तर त्याच्या खालीं हळूच वेश्या किंवा विश्वयोषिता हीं अक्षरें लिहून आपलें नालस्तीचें काम करण्यास पुणेवैभवाला मोठें सोईचें वाटे. पण टिळक जेव्हां लिहीत कीं स्त्रियांना सुशिक्षण जरूर दिलें पाहिजे, परंतु त्या स्त्रीधर्माला निरुपयोगी न होतील, त्यांच्या हातून संसार चांगला चालेल, व त्यांची धर्मबुद्धि नष्ट होणार नाहीं असेंच दिलें पाहिजे—तेव्हां फिकट अशा रंगांनीं काढलेल्या स्त्रीशिक्षणाच्या या चित्राखालीं विटं-बनेचा शब्द काय लिहावा हें तर पुणेवैभवकारांस सुचत नसे; व इकडे स्त्री-शिक्षणाची कल्पनाच मुळीं त्यांना पसंत नसल्यामुळें असलें सौम्य चित्र पाहूनहि त्यांच्या मनाचा जळफळाट झाल्याशिवाय रहात नसे!

असो. पुण्यांतील सामाजिक लोकमताच्या वरील पक्षोपन्यासावरून एक गोष्ट दिसून येईल; ती ही कीं, टिळक जुन्या किंवा नव्या कोणत्याहि पक्षांत मोडण्या-सारखे नव्हते. यामुळें त्यांना दोन्ही पक्ष शत्रूप्रमाणेंच लेखीत असत. केव्हां ते दोघांवरहि हल्ला करीत, व केव्हां दोघांचाहि हल्ला त्यांना परतवावा लागे.

दुधारी तरवारीचा पट्टा हातांत घेऊन त्यांना तो आपल्या अंगाभोंवतीं नेहमीं फिरवितां येई. सामाजिक कायद्यांना टिळकांनीं विरोध केल्यामुळें 'टिळकांना उदार शिक्षण असून तें फुकट गेलें असें म्हणण्याची पाळी आली' असें वामनराव मोडकांना वाटलें. आणि कायद्याचा मुद्दा सुटल्यावर, टिळकांनीं शत्रूच्या मुलखांत घुसून हल्ला चढविण्याचेंच धोरण पत्करल्यामुळें, ते रा. ब. रानडे प्रभृति व्यक्तींवर अधिक तुटून पडूं लागले, व सुधारकांच्या दृष्टीनें, त्यांनीं सामाजिक परिषदेंतहि बखेडा आरंभिला. नागपूर येथें खापर्ड्यांच्या अध्यक्षतेखालीं, राष्ट्रीय सभेच्या वेळीं, जी सामाजिक परिषद भरली तीच टिळक हजर असलेली अशी बहुधा दुसरी व शेवटची सामाजिक परिषद होय. त्या सभेंत शिरून टिळकांना हें दाखवावयाचें होतें कीं, सामाजिक परिषद राष्ट्रीय म्हणतात त्यांत अर्थ नाहीं. या परिषदेस प्रतिनिधि म्हणून येतात त्यांना खरें प्रातिनिधिक स्वरूप नसतें. एकटे रानडे सभेचीं सर्व सूत्रें चालवितात. ठरावांचे विषय व भाषा सर्वमान्य नसते. व सामाजिक परिषदेचे ठराव कोणीहि बंधनकारक मानीत नसल्यानें ती जवळ जवळ निरुपयोगीच आहे. इत्यादि इत्यादि. पण त्यांतल्या त्यांत या सामाजिक परिषदेस हजर राहण्याचा टिळकांचा हेतु हा असावा कीं, सामाजिक बाबतींत कायदा मागण्याच्या तत्वास राष्ट्रीय नामक सामाजिक परिषद मान्यता दर्शवील तर तसें न घडावें अगर त्याला उघड विरोध तरी दिसून यावा. "राष्ट्रीय सभेची पंगत उठून गेल्यानंतर या पाहुण्या सभेचा समारंभ त्यांतल्या त्यांतच उरकत असे. म्हणून आजपर्यंत त्याची कोणी विशेष काळजी केली नाहीं. परंतु गेल्या दोन वर्षांत जे प्रकार घडून आले त्यांमुळें या पाहुण्याचें खरें स्वरूप लोकांस व सरकारास कळून येणें जरूर आहे" असें पुष्कळांस वाटूं लागलें होतें, व हें स्वरूप प्रकट करण्याचा प्रयत्न टिळकांनीं त्या सालीं मुद्दाम केला. नेहमींप्रमाणें परिषदेच्या प्रारंभीं रा. ब. रानडे हे आपल्या लोकांना घेऊन विषयनियामक कमिटी करून बसले. तेव्हां टिळक तेथें जाऊन त्यांनीं रानड्यांना कांहीं प्रश्न विचारले. प्रथम सरळ उत्तरें येईनात. शेवटीं रानड्यांनीं लेखी प्रश्नास तोंडीं उत्तरें दिलीं. पण त्यांत मुद्याची गोष्ट कबूल केली गेली कीं, ही विषयनियामक कमिटी रीतसर निवडलेली नाहीं. असल्या गोष्टी घडून येऊं लागल्यामुळें सुधारक लोक टिळकांच्या जाचाला त्रासून गेले. याच सभेंत टिळकांच्या तोंडून अमुक एक गोष्ट खोटी आहे असा शब्द निघाल्यावरून तो त्यांनीं परत घ्यावा न घ्यावा या वादावरून गोंधळ माजला, व टिळक जेव्हां 'मी माझा शब्द खरा आहे असें सिद्ध करून देईन' असें म्हणाले तेव्हां सभेचे अध्यक्ष रा. खापर्डे यांनीं टिळकांस अशी धमकावणी दिली कीं, 'आपण आग्रह धराल तर मला आपणांस येथून जावयास सांगावें लागेल!' याच सालच्या राष्ट्रीय सभेच्या प्रसंगीं कॉंग्रेस कँपांत वाद निघाला असतां "टिळक स्वर्गवासी होतील तेव्हांच आमचा हा तंटा मिटेल" असे शब्द रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे

यांच्या तोंडून निघाल्याचें ऐकलें" असें लोक सांगतात. तात्पर्य, टिळक व सुधारक लोक यांचा बेबनाव येथवर जाऊन पोंचला होता. पुण्यांतील अस्सल सनातनी पक्षालाहि टिळकांचा जाच फार दिवस होत होता. पण त्यांना टिळकांस पकडींत धरून ठेंचण्याला, व त्यांच्या तोंडावरील सनातनी मताचा बुरखा ओढून घेऊन त्यांनाहि सुधारकांच्या पंक्तींत ढकलून आपल्या समजुतीप्रमाणें त्यांचें खरें स्वरूपाविष्करण करण्याला, आजवर चांगलीशी संधि मिळाली नव्हती. पण कर्मधर्मसंयोगानें ती संधि याच सुमारास, म्हणजे टिळक सनातनधर्माचा कड घेऊन सुधारकांशीं कसून भांडत होते अशा वेळींच, मिळाली. ती पंचहौद मिशनांतील चहा व त्यामुळें उत्पन्न झालेलें ग्रामण्यप्रकरण ही होय. पण याच वेळीं टिळकांच्या हातांतील दुधारी पट्ट्याची फेंक किती चलाखीची व सफाईची होती हेंहि लोकांना दिसून आलें. १८९२ सालांत टिळक एका बाजूस वळून रानड्यांवर शब्दप्रहार करीत तर लगेच दुसऱ्या बाजूस वळून बाळासाहेब नातूंना निखाऱ्यांवरून ओढीत आहेत असा जो प्रकार दिसून येतो तो येरवीं केव्हांहि कोणास पहावयास मिळाला नसता. येवढी प्रस्तावना करून या सुप्रसिद्ध ग्रामण्यप्रकरणाची हकीगत खालीं थोडक्यांत देतों.

ग्रामण्यप्रकरणाला मूळ कारण पंचहौद मिशनमधील चहापान. पण त्यालाहि कारण गोपाळराव जोशी ही एकच व्यक्ति! गोपाळराव जोशी ही एक मोठी विचित्र वल्ली होती. त्यांचें शिक्षण बेताचेंच होतें, तरी सामाजिक प्रगतीच्या बाबतींत ते बरेच पुढें असत. पण मनाची जात थोडी कुत्सित असल्यामुळें सोपपत्तिक चर्चा, विधायक सूचना, वगैरे रीतसर न करतां त्यांना आपल्या समाजाला हरएक बाबतींत नांवें ठेवून कुचेष्टा करण्याची फार आवड असे. त्यांचा स्वभाव मोठा विनोदी, आणि बोलण्यांत जीभ बिनहाडाची, असल्यामुळें ते कोणाविषयीं केव्हां काय बोलतील व कसें हसें उत्पन्न करतील ह्याचा नियम नसे. नाहीं म्हणावयास त्यांनीं विधायक अशी एक गोष्ट केली व तीहि फारच धाडसाची आणि खरोखरच वाखाणण्यासारखी होती. तेवढ्या एका गोष्टीकरितां कां होईना, त्यांना बाकी सर्व खून माफ करावे असें पुष्कळांना वाटे. ती गोष्ट म्हणजे त्यांनीं आपली बायको अमेरिकेस डॉक्तरीण होण्याकरितां अगदीं अल्प वयांत व असहाय्य स्थितींत पाठविली, व तीहि आपल्या समाजाला धाडसाचें उदाहरण घालून देण्याकरितां. सुदैवानें त्यांना स्त्रीहि या धाडसाच्या कामांत त्यांच्या तोलाची मिळाली होती, व तिनें अशा स्थितींत अमेरिकेंत जाऊन फार हाल व कष्ट सोसून पण सुव्यवस्थित राहून वैद्यकीची एम्. डी. डिग्री मिळविली. दुर्दैव इतकेंच कीं, त्या विद्येचा उपयोग आपल्या लोकांना करून देण्याला बिचारी फार दिवस जगली नाहीं. पण तिच्या विद्येचा उपयोग न झाला तरी तिनें घालून दिलेला धाडसाचा धडा सदैव अनुकरणीय राहील. ह्या एका गोष्टीमुळें गोपाळराव हे प्रसिद्धीस आले; व या दृष्टीनें त्यांना

मिळालेली प्रसिद्धी यथायोग्यच होती. पण कोणत्याहि गोष्टींत वाहवण्याचा गोपाळरावांचा स्वभाव असल्यामुळें, हिन्दुधर्माची थट्टा करण्याच्या बाबतींत त्यांनीं जें कृतीचें धाडस दाखविलें, तें त्यांच्या अंगावर आलें. धर्म म्हणजे ती एक थट्टेची गोष्ट आहे, हवें त्यानें हवें तेव्हां हव्या त्या धर्मांत जावें, धर्मांतराचा विधि ही थट्टा होय, धर्मांतर केलेल्या व न केलेल्या मनुष्यांत कांहींच फरक नसतो, असले कांहीं सिद्धांत सिद्ध करण्याच्या भानगडींत पडून, त्यांनीं पुण्याच्या संगमावर चार लोकांदेखत बाप्तिस्मा घेतला, व तो घेतल्यावर या बाप्तिस्म्यांत कांहीं अर्थ नाहीं असें म्हणून पुनः गंध लावून ते पाद्रीभटाच्या अंगावर उलट तुटून पडूं पाहूं लागले. यामुळें त्यांना ख्रिस्ती म्हणतां येत नाहीं ही ख्रिस्त्यांना अडचण झाली, व ते हिन्दु आहेत असें हिंदूंना म्हणतां येईना. कुचेष्टखोरपणाची मजल जो गृहस्थ स्वतःच्या बाबतींत इतकी दूरवर नेऊं शकतो, तो दुसऱ्याचा मुलाजा काय धरणार ! सनातन धर्माभिमानी जुन्या पक्षाची चेष्टा तर गोपाळराव अनिवार करीतच; परंतु सुशिक्षित लोकांवरहि म्याडपणाचा आरोप करून त्यांच्या अंगीं खरा सुधारकी बाणाच नाहीं, त्यांचें उदार शिक्षण सगळें फुकट गेलें, असें म्हणून ते त्यांचीहि चेष्टा करीत!

अशा या लहरी मनुष्याच्या कल्पक डोक्याला १८९१ च्या आक्टोबरमध्यें अशी एक कुचेष्टेची कल्पना आली कीं, या भोंदू व म्याड सुशिक्षित लोकांना फशीं पाडावें व फजित करावें. ती कल्पना त्यांनीं मोठ्या चतुराईनें सिद्धीस नेली. गोपाळरावांचा मिशनरी लोकांत येण्याजाण्याचा बराच प्रघात असे. त्याचा फायदा घेऊन त्यांनीं पुणें येथील वेताळ पेठेंतील पांच–हौद मिशनच्या शाळेंत, तेथील मुख्य शिक्षक रे. रिव्हिंगटन व तेथीलच एक सिस्टर यांजकडून, पुण्यांतील शें पन्नास सुशिक्षित गृहस्थांना व्याख्यानासंबंधानें म्हणून निमंत्रणें केलीं. त्यांतील पांच पन्नास लोक गेले. निमंत्रणांतून बहुतेक कोणीहि ठळक मनुष्य सुटला नव्हता. जे कोणी विशेष अडचणीमुळें गेले नाहींत असे प्रसिद्ध लोकहि फारच थोडे. सुधारणेसंबंधाचा वाद पुण्यांत जोराचा सुरू असतां एकीकडे रा० ब. रानडे व दुसरीकडे बळवंतराव टिळक अशीं माणसें या निमंत्रणावरून गेलीं, यावरून तेथें कांहीं घोटाळा होणार आहे अशी कोणासहि साधारण शंका देखील आली नाहीं. गोपाळरावांचें गुपित फारच सुरक्षित राहिलें होतें असें दिसतें. तथापि या कटांत एक दोन साक्षीदार होतेच, अशी गोष्ट मागाहून उघडकीस आली. जुन्या पक्षाच्या लोकांस आमंत्रणें मुळींच नव्हतीं; कारण ते यावयाचेच नाहींत हें माहीत. पुण्यांतले सुशिक्षित लोक मात्र व्याख्यानाला चटावलेले, व ते मिशन हौसमध्येंहि बोलावले तरी यावयाचेच, अशा समजुतीनें व अनुभवजन्य विश्वासानें जी गोळी गोपाळरावांनीं झाडली, ती त्यांतील बहुतेकांना बिनचुक लागली !

पंचहौद मिशनमधील व्याख्यान यथातथाच झालें. पण ही उणीव भरून काढण्याकरितांच कीं काय म्हणून, मागाहून टेबलावर चहा बिस्किटें आणून ठेवण्यांत

आलीं. या व्यवस्थेत गोपाळराव जोशी हे होतेच. त्यांनीं मिशनरीसाहेबाला कटांत घेतलें होतें कीं नाहीं माहीत नाहीं. पण चहा देणें ही गोष्ट अगदीं आयते वेळीं घडून आलेली नसून, चहा द्यावयाचा संकल्प मात्र, भलेपणानें कां होईना, आधींच ठरलेला असावा. झालें, प्रत्येकापुढें चहा व बिस्किटें येऊन बसलीं. त्यांचें सेवन करावें अशी जरी सर्वांनाच इच्छा नव्हती तरी आपणांपुढें हे पदार्थ मांडलेहि जाऊं नयेत असें निक्षून सांगण्याचें धैर्य मात्र कोणास झालें नाहीं. खिस्त्याच्या हातचा चहा घेतला तर आपले लोक जसें वाईट म्हणणार, तसेंच चहा आपल्यापुढें ठेवलाहि जाऊं नये इतका त्याचा विटाळ मानलेला दाखविला तर कदाचित् मिशनरीहि हंसणार! शिवाय इंग्रज लोकांत खाण्याचा पदार्थ पुढें आणून ठेवण्यापलीकडे आपल्यांतल्या प्रमाणें तो घ्याच असें म्हणून आग्रह करण्याची चाल नाहीं, यामुळें सहज बचाव करतां येईल असेंहि पुष्कळांना वाटलें. गप्पागोष्टी चालूच होत्या. तेव्हां कांहींनीं तो चहा पिऊन फस्त केला, कांहींनीं घोटभरच घेऊन त्याचा मान केला, कांहींनीं त्याला नुसता हात लावण्याचा देखावा करून तो दूर सारला, व कांहींना ही ब्याद आपल्या समोरून कोणी उचलून घेऊन जाईल तर बरें असेंहि वाटत असावें. पण आपल्यासमोरच्या या (चहाच्या) पेल्यांत लवकरच संकटमय असें वादळ होणार अशी कोणासच शंका आली नाहीं; व मौज ही झाली कीं चहाचें पाणी अखेरपर्यंत भरून राहिलेल्या या चषकसमुद्रांत वादळ न होतां जे पेले कोरडे झाले त्यांतच वादळ उठलें! ऑलिम्पस पर्वतावर बसून देवता वादळें उठवितात ( असा ग्रीक पुराणांतला संकेत आहे ) त्याप्रमाणें गोपाळराव जोशी हे मात्र यत्किंचितहि न हंसतां चहा पिणाऱ्यांच्या तोंडाकडे पाहून आपल्या मनांत असें म्हणत असावे कीं, 'सांभाळा वादळ सिद्ध होत आहे'!

पण इतक्या या लोकांना मिशन हौसमध्यें नेऊन चहा प्रत्यक्ष पाजण्यापेक्षांहि ते चहा प्याल्याचा बोभाटा होण्यांत अर्थात् अधिक स्वारस्य होतें; व लगेच गोपाळराव जोशांनीं 'पुणे-वैभव' कचेरीकडे धांव घेऊन, जीं कांहीं माणसें मिशन-हौसमध्यें आलीं नव्हतीं त्यांसुद्धां जीं आलीं होतीं त्यांचीं नांवें प्रसिद्ध केलीं. गोपाळरावांचें काम झालें! आतां ते बाळासाहेब नातू आहेत, ते रानडे आहेत, ते टिळक आहेत. जेवढा गोंधळ घालतील तेवढा थोडा. तो पहावयाला नारदमूर्ति गोपाळराव हे गाईसारखे गरीब तोंड करून आपले बाजूला उभे!

भरलेल्या जठरांत एकादा विषारी कण गेला म्हणजे जसें सगळें अन्न ढवळून निघतें, तशी स्थिति पुणे-वैभवाच्या या अंकानें सगळ्या पुण्याची केली. गोपाळरावांच्या कटाचा यत्किंचित् मागमूस लागता तर स्वतः टिळक पंच हौद मिशनमध्यें न जाते, येवढेंच नव्हे, तर त्यांनीं हरप्रयत्नानें आपल्या मित्रांना तरी थांबवून वांचविलें असतें. पण दैवच गोपाळरावांचें साथीदार. कारण टिळकांचीहि सावधगिरी या चहाच्या पेल्यांत न बुडती तर ग्रामण्याला असा रंग कसा चढला असता?

टिळक न जाऊन नुसते रानडेप्रभृति सुधारक गेले असते, तर या प्रकरणाच्या बाबतींत टिळकांनीं कोणचा पक्ष स्वीकारला असता हें अनुमानणें जरासें कठीणच आहे. तसें होतें तर रानड्यांची मजा त्यांनीं अधिक मोकळ्या मनानें पाहिली असती. पण स्वतः ते या चहाच्या पुरांत सांपडल्यानें त्यांना स्वतःला तरून जाणें तर प्राप्त होतेंच, परंतु रानड्यांनाहि पाठीवर घेऊन त्यांच्या करितां दोन हात अधिक नेटानें टाकणें टिळकांना जरूर झालें. प्रवासांत कोण कोणाच्या पंक्तीला येईल याचा नियम नसतो, अशा अर्थाची एक म्हण इंग्रजींत आहे; व सुधारणेच्या वादांत निखालस शत्रूप्रमाणें हमरीतुमरीनें भांडणारे टिळक व रानडे हे समायिक प्रतिवादी होऊन ज्याच्या करणीमुळें एका दावणीस बसले, त्या गोपाळराव जोशांची तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे.

मिशनहौसमध्यें चहा घेतलेल्या लोकांचीं नांवें प्रसिद्ध झाल्याचा मुख्य परिणाम असा झाला कीं, सनातन धर्माभिमानी पक्षाला या बंडखोरीची उपेक्षा करणें अशक्य झालें. "तुमच्यांत कांहीं पाणी असेल तर तें आतां दाखवा. हा पहा धर्मा-विरुद्ध होणाऱ्या बंडाचा जाहिरनामा 'पुणेवैभवा'च्या चावडीवर लावला गेला!" असा सवाल नातूप्रभृतींना येऊन पडला; व त्यांनाहि ती इष्टापत्तीच वाटली असावी. गोपाळराव जोशांचा मात्र दोन्हीकडून जयच होता. नातू हटून गप्प बसले तर गोपाळराव म्हणणार "आतां धर्मशास्त्राचीं पोथ्यापुस्तकें चुलींत घालून हांडाभर पाणी तापेल तेवढें तरी तापवून आंघोळ करा." शंकराचार्य यांत पडले तर गोपाळराव म्हणणार "यांचा अधिकार किती पोकळ आहे हें आयतें कळून येईल बरेंच झालें." चहावाल्यांनीं नेट धरून बाजू जिंकली तर गोपाळराव म्हणणार "अहो! हें असें एकदां व्हायलाच पाहिजे होतें. समाजाच्या पोटांतील भिडेची फुगवटी किती दिवस जपून ठेवावयाची?" आणि चहावाले जर हटले आणि शंकराचार्याला शरण गेले तर गोपाळराव म्हणणार "या नादान लोकांचें ढोंग मला एकदां चव्हाट्या-वर आणावयाचेंच होतें. आमचे हे असले सुशिक्षित व असले सुधारक!"

धर्माभिमान व सरदारी व त्याहूनहि विशेष म्हणजे आग्रहीपणा यामुळें धर्मा-भिमानी पक्षाचें पुढारीपण बाळासाहेब नातू यांच्याकडे आलें होतें. त्यांनीं शंक-राचार्यांकडे फिर्याद अर्ज गुदरण्याचा निश्चय केला. दरम्यान पुणे-वैभवांत प्रसिद्ध झालेलीं कांहीं नांवें उगीच खोटीं असल्यामुळें वैभवकर्त्यांवर पुणें मॅजिस्ट्रेट कोर्टांत बेअब्रूची फिर्याद होऊन, त्यांना दोनशें रुपये दंड झाला. पण जे खरेच गेले होते व ज्यांनीं चहा घेतला होता त्यांचा निकाल शंकराचार्यांशिवाय दुसरा कोण लावणार? म्हणून श्रींच्या दरबारांतून प्रतिवादींना नोटिसा निघून प्रकरण सुरू झालें. प्रायः अशा प्रश्नांचा निकाल गांवांतील एखाद्या सच्छिष्याला पंच नेमून शंकराचार्य करीत असतात. पण येथें निम्मा गांव वादी व निम्मा प्रतिवादी असें असल्यामुळें, श्रींना असें वाटलें कीं दोन त्रयस्थ माणसें पाठवूनच याचा

निकाल करावा. म्हणून व्यंकटशास्त्री निपाणीकर व न्यायगुरू बिंदुमाधवशास्त्री धर्मसर्वाधिकारी यांना शिक्कामोर्तब देऊन पुण्यास रवाना करण्यांत आलें. व या धार्मिक मुकदम्यांत पौष व. २ दिवशीं कामास सुरवात झाली.

जानेवारी १८९२ अखेर ग्रामण्य कमिशनचें काम पुण्यास जोरानें सुरू झालें. पुनर्विवाहाच्या वादानंतर असल्या सभेचा फिरून हाच काय तो प्रसंग. ब्राह्मणेतर मंडळी असल्या वादांत कशाला लक्ष घालतील? पण ज्ञातीचें काम म्हणून ब्रह्मवृंदांखेरीज कमिशनला इतरांस येण्याची मोकळीक ठेवली नव्हती. पूर्वपक्ष उत्तरपक्ष यांची बरीच भवति न भवति चाले; व एकादे वेळीं काम विकोपासहि जाई. वास्तविक कमिशन ज्यांना मान्य होतें त्यांनीं येऊन सरळ हकीकत सांगून टाकली असती तर काम एक दोन दिवसांतहि संपतें. पण सक्तीचा अधिकार हातीं असलेल्या सरकारी न्यायकोर्टांतील दावे वर्षानुवर्ष रेंगाळलेले जर आपण पाहातों, तर मग येथें काय बोलावयासच नको. बेचाळिसांपैकीं कित्येकांनीं कमिशनला ओळखीत नाहीं म्हणून धुडकावून लावलें. कित्येक हजर झाले पण त्यांनीं कमिशनचा निकाल मानावयाचा किंवा नाहीं याचा निकाल आपल्याच हातीं ठेवला. कित्येक कमिशनची गंमत पाहण्याकरितां व कित्येक त्याची थट्टा करण्याकरितां हजर झाले होते. कमिशनविषयीं श्रद्धा किंवा आपणांवर आलेल्या आरोपविषयीं खरा पश्चाताप एकालाहि झालेला नव्हता. पण जो असा खरा पश्चाताप होण्यासारखा तो धर्मात्मा मिशनऱ्याचे बंगल्यावर चहा पिणार नाहींच, पण प्रायः जाणारहि नाहीं.

ग्रामण्यांतील वादींना श्रींनीं कमिशन पाठविलें व आरोपींनीं त्याचा अधिकार कबूल केला, या गोष्टींत धन्यता वाटून त्यांनीं हें प्रकरण होईल तेवढें लांबविलें, लोळविलें व रंगविलें. मिशन हौसमध्यें चहापार्टी झाली व प्रतिवादींपैकीं पुष्कळ तेथें हजर होते, या गोष्टी प्रतिवादींच्या जबाबावरून ठरण्यासारख्या असतांहि त्यांचा प्रत्यक्ष पुरावा देण्यांत त्यांनीं उगाच काळ घालविला. अखेर रे. रीव्हिंगटन यांच्या साक्षीपर्यंत पाळी आली.

ग्रामण्य कमिशन हें जर न्याय इनसाफाचें काम करीत होतें तर त्याचें काम चालू असतां कोणीहि टीका प्रतिटीका करणें योग्य नव्हतें. पण हें कोर्टच असें होतें कीं याची अदबी कोणीहि ठेवूं नये. बेअदबी वाटेल त्यानें करावी. यामुळें कमिशन सुरू असतांच वादी प्रतिवादींतील भांडणें व त्यांवरील लोकांच्या टीका पुण्याच्या वर्तमानपत्रांतून सरास चालू होत्या.

मूळ फिर्याद अकरा असामींची होती. त्यांत कांहीं गृहस्थ व भिक्षुक होते. पण त्यांपैकीं सात असामींनीं फिर्याद अर्जी खरी करून दिल्यावर अशी पुरशीस दिली कीं, आम्हास अभियोगाच्या म्हणजे रीतसर फिर्यादीच्या पद्धतीनें काम चालवावयाचें नसून, आपण फक्त ऐकलेली हकीगत श्रीचरणीं निवेदन केलेली

आहे, संस्थानच्या सांप्रदायाप्रमाणें चौकशी होऊन निकाल व्हावा. हा विज्ञप्तीचा प्रकार झाला; व यानें वादीवरील जबाबदारी निघून जाते. हे सात वादी म्हणजे गोविंदराव गद्रे वकील, नरसोपंत व गणपतराव साठे हुंडीवाले, नारायण भिकाजी जोगळेकर, वामन नाईक केळकर, लक्ष्मणराव ओक व नानासाहेब फडतरे. पण दुसरे पांच वादी अधिक लढाऊ होते. पहिल्या सातांना धर्मशास्त्राचें ज्ञान नसून हुजत घालण्याची ईर्षाहि नव्हती. पण इतर पांच म्हणजे बाळासाहेब नातू, सरदार ढमढेरे, विष्णुपंत व वामनराव रानडे, व नारायणराव पटवर्धन यांनीं अभियोगपद्धतीनेंच काम चालविण्याचा आग्रह धरला. अर्थात् पुरावा देणें व शास्त्रार्थ लढविणें याची जबाबदारी त्यांनीं पत्करली. यामुळें काम विनाकारण पुष्कळ दिवस लांबलें. या वादींचा हेतु असा कीं प्रतिवादीनीं चहा पिण्याचा अपराध मुद्दाम जात मोडण्याकरितां केला म्हणून त्यांना प्रायश्चित्तच नाहीं. अर्थात् बहिष्काराच्या आगींत त्यांनीं, त्यांच्या सर्व कुटुंबांनीं, व तत्संसर्गीयांनींहि आजन्म पिचत राहावें. केवढी ही जबरदस्त महत्त्वाकांक्षा! सारासार विचार पाहतां, जे आरोपी कमिशनपुढें आलेच नाहींत ते ब्राह्मण जातीला झिडकारणारेच असल्यामुळें त्यांचें या वादींच्या हातून कांहींच वांकडें होणार नव्हतें. पण पुष्कळसे ग्रामण्य-कमिशनपुढें हजर झाले. अर्थात् त्यांनीं ज्ञातीचा अधिकार मानला येवढ्यावर संतुष्ट होऊन, सामान्य प्रायश्चित्तें सांगून, हा तंटा वादीनीं मिटविला असता तर त्यांचा मुख्य मतलब साधून थोडक्यांत गोडी झाली असती. कमिशनला मान वांकविणाऱ्या प्रतिवादींत रानडे व टिळक असलीं धेंडें असल्यावर ग्रामण्याचा वास्तविक अधिक विजय तो काय व्हावयाचा होता? पण बाळासाहेब नातू म्हणजे मुख्य वादी हे हट्टी व आग्रही लोकांचे मूर्धाभिषिक्त राजे होते! त्यांना स्वतःला धर्मशास्त्राची माहिती नव्हती, तरी पुण्यांतील व बाहेरील चार शास्त्री कनवटीस लावण्याची ऐपत व उमेद होती. आणि फारा दिवसांनीं या ग्रामण्याच्या म्हणजे धर्माचरणाच्या वादाच्या गळवाला सूज आली होती, तेव्हां तें होईल तितकें अधिक सुजवावें व फुटल्यावरहि पुष्कळसें वाहवावें अशी त्यांनीं सहजच इच्छा धरली.

या गोष्टीस अनुलक्षून टिळक लिहितात "ग्रामण्य प्रतिवादी जात मोडण्याकरितां चहा प्यावयास गेले, व चहा पिण्यास धर्मग्रंथांत प्रायश्चित्त नाहीं, हे दोन मोठेच किल्ले सरदार नातू यांना सर करावयाचे आहेत. परंतु कलिकालाच्या प्रभावामुळें पूर्वीच्या राज्यांत जसें त्यांस यश आलें असतें तसें आतां आलें नाहीं. दोन्ही किल्ले सर करण्याकरितां दारूचीं म्हणून जीं पोतीं भरून ठेवलेलीं होतीं तीं सर्व बाजरीचीं निघालीं, आणि वादींनीं सर्वथा मूकभावाचें ग्रहण केलें! ४२ लोक जात मोडण्याकरितां चहा पिण्याला गेले ही गोष्ट शाबीत करण्याला वादींना पुरावाच मिळेना. ते कोठल्यातरी वर्तमानपत्रानें कांहींतरी लिहिल्याचा उतारा देत.

रेव्हिंग्टनसाहेब साक्षीस येईना. पूर्वी बेअब्रूच्या एका खटल्यांत तो साक्षीस गेला तेथेंहि, त्यानें हे लोक आमच्याकडे जात मोडण्याकरितां चहा पिण्यास आले होते असें सांगितलें नव्हतें. गोपाळराव जोशी हाहि एक या मुद्यावरील साक्षीदार. पण त्याला साक्षीस बोलावण्याची वादींची छाती होईना. व वर्तमानपत्रें प्रतिवादीविरुद्ध पुराव्यास ग्राह्य कशीं असें विचारिलें म्हणजे वादी फिर्यादअर्जाकडे बोट दाखवून म्हणत 'जें कांहीं आहे तें त्यांत आहे.' दुसरा मुद्दा प्रायश्चित नाहीं म्हणण्याचा. या संबंधानें कमिशननें वादींना शास्त्राधार दाखवा म्हणून आव्हान केलें तेव्हांहि, 'आमचें जें कांहीं आहे तें त्यांत आहे' हेंच उत्तर. पण याच वादींनीं यापूर्वीं आपले हातांत कायदा घेऊन, जणूं काय यांतले सर्व शास्त्र-विस्त्र चटसारें आपणांस माहीत आहे असा आव आणून, ४२ पैकीं जे कोणी म्याड अगर गरीब बिचारे यांच्या तावडींत सांपडले त्यांजकडून किंवा तत्संसर्गीयांकडून मिशा काढीव, १५ पावल्या घे, कोणास २ तर कोणास ४ कृच्छ्रें सांग, असा प्रायश्चित्ताचा पुंडावा मांडला होता. अशा रीतीनें आमच्याचें काम कुजत पडलें. टिळक दंड थोपटून धर्मग्रंथांचा भारा बांधून कमिशनपुढें शास्त्राधाराचा वाद करण्यास उभे राहिले तेव्हां वादींना शास्त्राधार सुचेना. गावांत पुराव्याचा बोभाटा करण्याकरितां चतुःशाखीय ब्रह्मवृंदांची म्हणून सभा बोलावण्यांत आली. पण अखेर कालातिक्रम झाल्यावरहि चार शाखा तर नाहींतच पण एकाच शाखेचे २५-३० पाचुंदे पाला गोळा झाला. सभेचा हेतु कमिशनपुढें झालेला पुरावा वाचून दाखविणें हा होता. पण ग्राह्य असा पुरावा कोणता हें ठरेना. यामुळें तो बेत फसला. तिन्हाइतांनीं कमिशनला अमुक पुरावा ग्राह्य व अमुक अग्राह्य हें सांगणें म्हणजे निवळ उद्धटपणा होय. पण याहि पलीकडे जाऊन, कमिशनविषयीं अविश्वास दाखविण्यांत येऊन जमलेल्या लोकांनीं अशी चर्चा सुरू केली कीं, कमिशनर शास्त्री कांहींहि निकाल देवोत, अखेर गांवची जातगंगा ज्यांना पुनीत मानील तेच खरे पुनीत ! व कमिशनला बाजूला ठेवून खुद्द श्रीकडे डेप्युटेशन पाठवून, 'आमच्या म्हणण्याप्रमाणें निकाल द्या' अशी श्रींना विनंति करण्याचें ठरलें. वादीचे मुख्य म्हणणें हें कीं, चहा घेण्याला प्रायश्चित्त कां नाहीं तर आमचे वाडवडील कधीं परक्याच्या हातचा चहाच पीत नव्हते. तेव्हां धर्मग्रंथांत असल्या अपूर्व अपराधाला प्रायश्चित्त कसें सापडणार? याला प्रतिवादींचें उत्तर असें होतें कीं, शास्त्रांत ज्यास प्रायश्चित्त सांगितलें नाहीं तो दोषहि होऊं शकत नाहीं. बरें, पूर्वजांना अज्ञात अशा पदार्थांचें सेवन करणें हाच अपराध मानला, तर बटाटें खाणें हाहि अपराध होईल. कारण आमच्या पूर्वजांना बटाटेच माहीत नव्हते. तो पदार्थ अमेरिकेंतून इकडे आला आहे. उलट वास्तविक असेंहि म्हणतां येत नाहीं कीं, अमुक एक पदार्थ पूर्वजांना माहीत नव्हता म्हणून तो कितीहि वाईट असला तरी खुशाल खावा,

त्याला प्रायश्चित्त नाहीं. हिन्दु शास्त्रकारांना अमुक एक माहीत नव्हतीं म्हणून तीं जनावरें किंवा पक्षी आतां खाल्ले तर चालतील काय? तात्पर्य, अज्ञात पदार्थांचाहि सादृश्यानें विचार करावा लागतो. ब्राह्मणेतरांच्या हातच्या चहा पिण्यानें जात बाटते म्हणावी तर बर्फ खाणारे, सोडा वॉटर पिणारे, कांदे खाणारे हेहि कायमचे जातिबाह्य ठरतील.' टिळक म्हणत, ब्राह्मणेतरांचा चहा ज्यानें मुद्दाम घेतला त्यालाहि कांहींतरी प्रायश्चित्त असेल, पण तेंहि ब्राह्मणानें कांदे खाणें, किंवा व्याजबट्टा करणें याच्या प्रायश्चित्ताहून कमीच असणार!

या सुमारास भीमाचार्य झळकीकर यांनीं ब्राह्मणेतरांच्या हातचें अन्नपाणी घेणारास लागू पडण्यासारखीं कांहीं प्रायश्चित्तांचीं वचनें केसरींत छापलीं. टिळकपक्षानें हि हींच वचनें कमिशनपुढें मांडलीं होतीं. एका वचनांत तर पेज, दूध, चणे, चुरमुरे, इत्यादि भट्टींत भाजलेले पदार्थ शूद्राच्याहि हातचे चालतात असें भीमाचार्यांनीं दाखविलें होतें. पण हें वचन वादीपक्षाला मान्य होण्यासारखें नव्हतें. कारण त्यांत क्षौर कोठें सांगितला नव्हता! आणि टिळकप्रभृति लोकांच्या मिशांवर बाळासाहेब नातूप्रभृतींचा मुख्य कटाक्ष असून, प्रतिवादींच्या मिशा काढू तरच आम्ही खरे सनातनवादी अशा प्रतिज्ञा करकरून वादी आपल्या मिशांवर ताव देत होते!

असो. अशा रीतीनें प्रतिपक्षास निरुत्तर करून सामान्य लोकांना हें प्रायश्चित्त प्रकरण नीट समजाऊन देण्यासाठीं टिळकांनीं केसरीच्या दोन अंकांत सर्व शास्त्राधार मूलवचनांसह विशद करून सांगितला. इकडे कमिशननें फिर्यादीचा निकाल वैशाख व॥ १ शके १८१४ रोजीं पुणें मुक्कामीं जाहीर केला. त्याचा सारांश असा—प्रथम वादींनीं ४६ गृहस्थांवर फिर्यादी केल्या, पण पुढें निरनिराळ्या कारणांवरून ९ असामींचीं नांवें कमी केलीं. म्हणून उरलेल्या ३७ वरच काम चाललें. चवकशींत मुख्य मुद्दे ५ निघाले ते असे. (१) किती प्रतिवादी पंच हौद मिशनमध्यें गेले ? (२) त्यांतले कोणी जात मोडण्याच्या उद्देशानें गेले होते कीं काय ? (३) गेलेल्यांपैकीं कोणी कोणी काय काय पदार्थ सेवन केले ? (४) त्यांपैकीं शास्त्रनिषिद्ध गोष्टी अशा किती शाबीत झाल्या? (५) असल्यास प्रायश्चित्त आहे कीं नाहीं व कोणत्या प्रकारचें ? याचा निर्णय करतांना कमिशनर शास्त्री यांनीं वादींचा वर्तमानपत्रीं पुरावा अग्राह्य करून, व कांहीं तोंडीं पुरावा अविश्वसनीय मानून, (कारण प्रत्यक्ष एक साक्षीदार रामचंद्र बाळकृष्ण लेले हे हिन्दुधर्म सोडून ख्रिस्ती बनलेले होते) तसेच गोपाळराव जोशांचा पुरावा 'ढुंगणाचें सोडून डोईस गुंडाळल्याप्रमाणें' अव्यवस्थित व खोडसाळ असा ठरवून, आणि रेव्हिंग्टनसाहेबांचा सर्व आधार गोपाळराव जोशी म्हणून त्यांचाहि पुरावा विशेष जमेस न धरतां, शेवटीं असा सिद्धांत काढला कीं, अमुक मनुष्यानें अमुकच पदार्थ सेवन केला असें वादींकडून सिद्ध झालें नाहीं. कित्येकांनीं

आपल्यावरील चहा घेतल्याचा आरोप पुणेंवैभवावर मॅजिस्ट्रेटपुढें बेअब्रूची फिर्याद करून खोडून काढला असतां, वादींनीं त्यांजवर फिरून काम चालविलें यावरून वादींचा अभियोग आग्रहीपणाचा आहे. पुष्कळ लोकांनीं चहा घेतला असें कबूल केलें अगर शाबीत झालें आहे, पण ब्राह्मणांपैकीं बिस्किटें कोणीहि खाल्लयाचें शाबीत झालें नाहीं. चहा पिण्यानें तो पिणारांनीं ब्राह्मणधर्म प्रतिकूल-वर्तन केलें, तथापि जात मोडण्याचा त्यांचा हेतु नव्हता. मूळ निमंत्रणपत्रिकेवरूनहि तसा हेतु दिसत नाहीं. चहा हा केवळ मिशनहाउसच्या सभागृहांत गोपाळराव जोशी यांच्या कारस्थानानें अगदीं आयत्या वेळीं पुढें करण्यांत आला, वगैरे लिहून कमिशननें खालीलप्रमाणें व्यक्तिशः निकाल दिला. "हरी नारायण आपटे, बळवंत-राव मराठे, नारायणराव देवस्थळे, रामचंद्र भिकाजी जोशी, रामकृष्ण भिकाजी कुल-कर्णी, विष्णुदास नानाभाई, रामचंद्र बाळकृष्ण लेले हे मिशन हाऊसमध्यें गेलेच नव्हते, व वादीनींच त्यांचीं नांवें कमी केलीं. सबब ते प्रायश्चित्तांतून मोकळेच झाले. हरिभाऊ आठवले, विष्णु अनंत पटवर्धन, गोपाळराव पानसे या तिघांचा निकाल ब्रह्मवृंदांकडून पूर्वींच झाला होता म्हणून त्यांना प्रायश्चित्त सांगण्याचें कारण उरलें नाहीं. मिशनहाउसमध्यें गेले पण चहा न घेतल्याचें सिद्ध झालें असे ८ असामी म्हणजे प्रो. पी. एन्. पाटणकर, विनायकराव आपटे, रघुनाथ-राव पंडित, सखारामपंत फडके, गोविंदराव देवल, डोंगरे मास्तर, खंडेराव बेद-डकर व बाळकृष्णपंत सोमण. पण यांनीं चहा न घेतला तरी त्यांनीं ब्रह्मकूर्चो-पवासपूर्वक यथाशक्ति दक्षणादान करावें अशी शिक्षा सांगण्यांत आली. नुसतें मिशन हाउसमध्यें जाण्याबद्दल हें प्रायश्चित्त! मिशन-हाउसमध्यें हजर असून चहा घेतलेले ४ ते असे-बळवंतराव टिळक, वासुदेवराव जोशी, रामभाऊ साने आणि सदाशिव-राव परांजपे. पैकीं टिळकांनीं चहा घेतल्यानंतर श्रीक्षेत्र काशीस जाऊन सर्व प्रायश्चित्त घेतल्याचा खात्रीलायक दाखला दिला. शिवाय पुण्यासहि दोन कृच्छ्रें प्रायश्चित्त केलें. म्हणून त्यांनीं आणखी प्रायश्चित्त घेण्याचें कारण नाहीं असें कमि-शननें ठरविलें. व बाकी तिघांनीं चांद्रायण एक व सांतपन हें प्रायश्चित्त घ्यावें असा हुकूम झाला! ८ जणांनीं ज्ञाताज्ञातदोषनिवारणार्थ प्रायश्चित्त मिळण्याबद्दल अर्जच दिला होता. सबब त्यांना तो त्यांचा अर्ज बहाल करून सर्व-प्रायश्चित्त घेण्याचा हुकूम झाला. हे आठ इसम म्हणजे रा. ब. माधवराव रानडे, रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे, रा. ब. चिंतामण नारायण भट, रावसाहेब गोविंदराव कानिटकर, सितारामपंत देवधर, वामनराव रानडे आणि वामनराव परांजपे. शेवटीं प्रतिवादीपैकीं गैरहजर असणारे १६ निघाले. त्यांनीं कमिशनला दादच दिली नाहीं. त्यांनीं चहा घेतल्याबद्दल खात्रीहि पटली नव्हती. तथापि त्यांना एक सांतपन व एक चांद्रायण प्रायश्चित्त सांगण्यांत आलें. हे सोळा म्हणजेः— प्रो. वासुदेवराव केळकर, अण्णा वांगीकर, रामभाऊ मोडक, गंगाधरपंत जोशी,

व्ही. के. राजवाडे, गोपाळराव गोखले, जगन्नाथपंत कुलकर्णी, विठ्ठलराव सासवडकर, केशवराव गोडबोले, विनायकराव चिपळूणकर, शंकरराव जोशी, प्रो. पानसे, धामणे, अंकेश्वर आणि काजवेकर.

ग्रामण्यप्रकरणांतला हा दुसरा अंक येथें समाप्त झाला. पण वरील निकालानें हें प्रकरण मिटण्याऐवजीं आणखी चिघळलें. ज्यांनीं शंकराचार्यांचा अधिकार अमान्य करून कमिशनकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं, ते सर्वांत सुखी ठरले. सुधारणाभिमान्यांच्या दृष्टीनें यांनीं अर्थात् मोठें धैर्य दाखवून वीरकृत्य केलें. पुण्यांत ते अर्थात् बहिष्कृत ठरले, पण बहिष्काराची त्यांनीं परवा केली नाहीं. ज्यांनीं आपण होऊन प्रायश्चित्त मागितलें त्यांना तें मिळाल्याकारणानें लचांडांतून आपण सुटलों असें वाटलें. पण त्यांतील कांहीं बडे सुधारक असल्यामुळें सुधारकपक्षाकडून त्यांच्यावर मोठा गहजब झाला. रानडे व भट यांना जे लोक सुधारणागुरु मानीत होते ते आतां त्यांचा धिक्कार करूं लागले. मुंबई गॅझेटांत रानड्यांवर उघड हल्ला झाला. त्याला रानड्यांनीं उत्तर दिलें कीं, 'हेकट धर्माभिमानी लोकांनीं आपला छळ मांडला म्हणून प्रायश्चित्त घेऊन आपण त्यांची खोड मोडली; व तीहि अनेक मित्रांच्या आग्रहास्तव.' भटांनीं आपल्या वृद्ध मातोश्रींची सबब सांगितली. प्रायश्चित्त म्हणजे पश्चात्ताप नव्हे, तें फक्त लोकमनोरंजन आहे असें उभयतांकडून सांगण्यांत आलें. इकडे भाऊसाहेब नातू यांच्या घरीं वसंतपूजा होऊन ग्रामण्यकमिशननें ज्यांना शुद्ध केलें त्यांना उघड पंक्तीस घेण्यांत आलें.

ब्रह्मवृंदाला अगदींच झिडकारणारे किंवा उलट पहिल्याच धक्क्याला अष्टांगप्रणिपात करणारे जे लोक निघाले त्यांच्याविषयीं चर्चेस फारशी जागा नव्हती. पण ज्यांनीं हातानें प्रायश्चित्तें घेतलीं असतां तोंडानें तीं व्यर्थ ठरविलीं, ज्यांना प्रायश्चित्तें सांगितलीं पण ज्यांनीं तीं पुण्याबाहेर केल्यानें आपला प्रायश्चित्तविधि पहाण्याचें सुख धाळासाहेब नातूप्रभृतींना मिळूं दिलें नाहीं, त्यांच्याविषयींच वाद अधिक माजला. जे उघड बहिष्कृत ठरले त्यांच्याकडे कोणी जेवण्याखाण्यास जात नव्हता, पण इतरांच्या घरीं त्यांचे स्नेही व आश्रित जेऊं खाऊं लागले. पण विरुद्ध पक्षास तें मान्य न होऊन त्यांनीं त्यांजवर संसर्गदोष लादला. एवंच ग्रामण्यकमिशन होऊन फुकट गेलें; व गांवांतला बखेडा तसाच राहिला. कमिशनच्या निकालानें वादी व प्रतिवादी हीं नांवें जरी मोडलीं, तरी त्या वजावणीच्या घोटाळ्यांत शुक्ल व कृष्ण या नांवांचे दोन नवे पक्ष निर्माण झाले. नांवावरून या पक्षांचे गुण म्हणजे आरोपित गुण दिसून येतात. शुक्ल म्हणजे पांढरे स्वच्छ, धुतल्या तांदुळांसारखे, पवित्राचरणी, धर्माभिमानी लोक. व कृष्ण म्हणजे अर्थात बाटगे लोक. कोणी म्हणे अहो, हे कमिशनचे शास्त्रीच टिळकांस फितूर झाले! कोणी म्हणे शास्त्रीलोक बाटग्यांचा पक्षपात कसा करतील? पण निर्णयपत्रांतील शास्त्रार्थच चुकला. कोणी म्हणत अहो, चुकला तोच बरोबर.

" प्रायश्चित्तें यथाशास्त्र करावीं, यांतील 'यथाशास्त्र' या शब्दांतच काय ती म्यानखाची मेख आहे. निकालाचें शास्त्र कमिशनच्या हातीं पण अंमलबजावणीचें तर आमच्या हातीं आहे ना ? " झालें ! या आगींतील ठिणग्या इतर गंजींवर पडून त्याहि पेटूं लागल्या. सारस्वत ब्राह्मण म्हणूं लागले " चित्पावन ब्राह्मण हे असेच नेभळे." ते म्हणत, धैर्याचे महामेरू सारस्वत डॉ. भांडारकर हेच खरे, कारण त्यांनीं आपल्या कन्येचा पुनर्विवाह आपल्या हातानें लावला. सुधारणे-च्या कार्यास पुढारी पाहिजे तर तो असाच. रानड्यांच्या नादान आचरणानें " सुधारणेच्या जरीपटक्याचा हत्ती निशाणासह चिखलांत बुडून मेला. "

हा प्रसंग साधून टिळकांनीं अशी टीका केली कीं, रानडेप्रभृति सुधारकांना सुधारणेचें नुसतें ढोलकें पिटावयाला पाहिजे, त्यांच्यांत खरें मनोधैर्य नाहीं. इकडे वेळ पडली असतां कृतीनें ताठ उभे राहाण्याची अंगांत ताकद नाहीं, तिकडे समाजाला बरोबर घेऊन हळू हळू त्याला सुधारणामार्गावर पुढें न्यावें तर तेंहि नाहीं. यांना सुधारणा तर एकदम व्हावयास पाहिजे पण ती करण्याची वेळ आली म्हणजे मात्र हे कोणातरी आई–बहिणीचे मागें दडणार. ता. ७ जून १८९२ च्या केसरींत टिळक लिहितात, " आमच्या बंधूस यक्षिणीच्या कांडीनें सुधारणा करणें आहे व आमच्या मतें देशकाल व समाज यांची स्थिति लक्षांत आणून मग काय सुधारणा करणें असेल ती करावी. आम्ही सर्वच संसारी आहों. सर्वांसच इष्ट आप्त, सोयरे, असून त्यांनीं आपणाबरोबर व आपण त्यांच्याबरोबर आनंदानें राहावें अशी इच्छा आहे. अशा स्थितींत जी सुधारणा करणें असेल, ती सर्वच आपल्या मर्जीप्रमाणें होईल असें नाहीं. कांहीं प्रसंगीं समाजाचें म्हणणें आपणास कबूल करावें लागेल पण कांहीं प्रसंगीं आपलें म्हणणें समाजास ग्राह्य होईल. असा देवघेवीचा प्रकार चालू राहिला म्हणजे, जी सुधारणा होईल तीच कायम समजावयाची. ज्याला केवळ आपल्या डोक्यांतल्या कल्पना अमलांत आणवयाच्या असतील त्यानें सहाराच्या वाळवंटांत आपलें झोंपडें बांधून तेथें खुशाल मनःपूत आचरण करावें. परंतु ज्यास समाजांत राहणें आहे, त्यानें वर सांगितलेल्या तडजोडीच्या प्रकाराचा स्वीकार केला पाहिजे." खुद्द रानड्यांना तडजोडीचें तत्व मान्य नव्हतें असें नाहीं. सामाजिक विषयांवरील तडजोडीचीं तेलंगांचीं मतें तर प्रसिद्ध आहेत. ते पुनर्विवाहाचें मंडण करीत, पण हरप्रयत्नानें पुनर्विवाहिताची पंगत मात्र चुकवीत. बालविवाहाचा ते निषेध करीत, परंतु आपल्या बापाच्या आज्ञेखातर त्यांनीं आपल्या मुलीचें लग्न लहानपणींच केलें. किंबहुना या गोष्टीस उद्देशूनच, वर दर्शविल्याप्रमाणें सारस्वतांतील खऱ्या समाजसुधारकांचें नांव घेण्याची वेळ येई तेव्हां, कोणी तेलगांचें नांव न घेतां भांडारकरांचेंच घेई.

असो. प्रस्तुत प्रसंगीं टिळकांनीं केसरींत रानड्यांचा त्यांच्या टीकाकारांपासून बचावच केला, पण जातां जातां त्यांना नांवें ठेवूनच केला. उलटपक्षीं खुद्द रानड्यांनीं

तरी काय केलें ? इकडे स्वतः प्रायश्चित्त घेतल्याचें त्यांनीं समर्थन केलें, पण जातां जातां हिंदुसमाजावर दगड फेकलेच. टिळक म्हणतात. " वीस वर्षांपूर्वी साहेब लोकांच्या हातचा नुसता मोरावळा घेतल्याबद्दल कृष्णशास्त्री चिपळूणकरांना सक्षौर प्रायश्चित्त घेऊन वरती पांचशे रुपये दंड भरावा लागला. आज साहेबाच्या हातचा चहा घेऊन फक्त दोन कृच्छ्रांनीं शुद्धि होते, ही प्रगति काय थोडी झाली ? प्रायश्चित्त म्हणजे पश्चात्ताप नव्हे, तें फक्त पापनाशक कर्म होय. पश्चात्तापानेंहि पापक्षय होतच नाहीं असें मात्र म्हणतां येत नाहीं. शिवाय एकाद्या गोष्टीस प्रायश्चित्त आहे एवढ्यानेंच तो मोठा गुन्हा आहे असें म्हणतां येत नाहीं. कांहीं रूढाचार न पाळल्याबद्दल त्यांना प्रायश्चित्त हवें. पण एकादा रूढाचार मुद्दाम सोडून देण्याकरितां कोणी प्रायश्चित्त घेण्यास तयार झाला तर त्याला जुन्या व नव्या दोन्ही मंडळींनीं शिव्या देण्यास तयार व्हावें, हें दुर्दैव आहे. खुद्द श्रौताचारांनाहि हें लागू. मग स्मार्ताचारांना कोण विचारतो ? देशकालानुरूप कांहीं आचार सोडावेच लागतात. कुमारिलभट्टानें किंवा शंकराचार्यांनीं सर्व जुन्या श्रौताचारांचा आग्रह धरला नाहीं, म्हणूनच हिंन्दुधर्म जगला; नाहीं तर आम्ही सर्व बुद्ध झालों असतों. खुद्द अग्निहोत्राचा आचार जाणून बुजून टाकून देऊन वर्षांतून एक वेळ श्रावणीच्या वेळीं प्रायश्चित्तानें काम भागतें, तर स्पर्शास्पर्श दोषाबद्दल प्रत्याम्नायद्वारा प्रायश्चित्त करीत गेल्यास सामाजिक प्रगति होऊन शिवाय योग्य धर्माभिमान राहूं शकतो."

लौकरच रावबहादुर रानड्यांनीं हिराबागेंतील आपलें लेखी व्याख्यान प्रसिद्ध केलें. त्यांनीं आतां टिळकांच्या युक्तिवादाप्रमाणेंच समर्पक युक्तिवाद केला होता. त्यांचें समर्थन करून टिळक लिहितात, " रा० ब. च्या पहिल्या इंग्रजी पत्राचा विपर्यास करून त्यांना विनाकारण दोष देण्यांत ज्या वेदशास्त्रशून्य धर्माभिमानी गृहस्थांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं, ते या लेखास नांवें ठेवतीलच. धर्म म्हणजे काय कळत नाहीं, लोकांनीं सांगितला असतां समजण्याची अक्कल नाहीं, शास्त्रवचनाची एकहि पंक्ति लागत नाहीं, आणि खुद्द शंकराचार्यांच्या अधिकाऱ्यांनीं दिलेला निकाल ज्यांना मान्य होत नाहीं, त्यांनीं धर्माच्या बाबतींत लोकाग्रणीत्व मिळवावें, हें दुर्भाग्य आहे. कोणाचे इष्टमित्र दारुबाज असले, कोणाच्या येथें शूद्र पण्य स्त्रियांस विश्रान्तिस्थान मिळालें, अथवा ज्यांना निष्कृति नाहीं असले भयंकर गुन्हे कोणाच्या येथें घडले, तरीहि ज्यांना प्रतिष्ठितपणें समाजांत वावरतां येतें, त्यांनीं शास्त्रशून्यत्वाचेंच भूषण मानून, पूर्वापार धर्माचे आपण संरक्षक आहोंत असें सोंग आणावें, हें लज्जास्पद होय."

बाळासाहेब नातूंना स्वतः शास्त्र कळत नव्हतें. पण भाऊशास्त्री लेल्यांसारखे कांहीं चिकित्सक 'पुणें वैभवां'तून टिळकांच्या शास्त्रार्थावर टीका एकसारखी करीत होते. 'सुबोधपत्रिका' 'जगद्धितेच्छु' वगैरे पत्रकारहि आतां याच दंगलींत

सामील झाले होते. 'सुबोधपत्रिकेनें' शास्त्रार्थाची उठाठेव करणें, म्हणजे एका ग्राम्य म्हणीप्रमाणें विधवेनें कुंकवाची उठाठेव करण्यापैकींच होतें! लहानसहान पत्रें या वादांत पडत याचें कारण यावेळीं शास्त्रार्थ न सांगेल तो पापी असें होऊन राहिलें होतें. व लुंगे सुंगे अप्रसिद्ध लोकहि इकडून तिकडून मिळविलेलें एकाद्या शास्त्रावचनाचें मोरपीस तरवारीप्रमाणें परजूं लागत. रानड्यांनीं प्रायश्चित्त घेतलें एवढ्याकरितां गोपाळराव गोखले, वासुदेवराव जोशी वगैरे मंडळीच्या गळ्यांत ते प्रायश्चित्त घेईनात म्हणून सुधारक-अग्रणींत्वाची माळ कित्येक घालूं लागले. उलट रा ब. चिंतामणराव भटांसारखे सुधारक म्हणूं लागले कीं, प्रो. गोखले ह्यांच्यासारखे दहापांच लोक समाजांतून बाहेर पडले तर त्यापासून समाजाचें पाऊल पुढें पडेल अशी आशाहि नाहीं. प्रायश्चित्तप्रकरणीं घरीं नवराबायकोंत झालेलीं बोलणीं वर्तमानपत्रांतून तिऱ्हाईत प्रसिद्ध करूं लागले. गांवांतील शुक्लकृष्णांचा बखेडा अधिकच माजला. कांहींच्या घरच्या जेवणावळी बंद पडल्या व कांहींच्या घरीं जेवणावळी दारें लावून गुप्तपणें होऊं लागल्या. नवीन लग्नें ठरवितांना निषिद्ध गोत्राप्रमाणें कृष्णपक्षाचा पदर कोठें चुकून लागतो कीं काय हें शुक्लपक्षीयांना डोळ्यांत तेल घालून पहावें लागे. कित्येक शुक्लपक्षीयांनीं संसर्गराक्षसाच्या भीतीमुळें घरच्या सासुरवासणी व माहेरवासणी यांना माहेरीं किंवा सासरीं पाठविण्याचें टाळतां येईल तितकें टाळलें. पुण्यांत लाख वस्ती असतां बेचाळिसांना इतिहासप्रसिद्ध महत्त्व आलें. व बहिष्कृत म्हणून घेण्यास फारशी लाज न वाटतां पुष्कळ कृष्णपक्षीय लोक तें भूषणच म्हणून मिरवीत.

सर्वांत तारांबळ व तिरपीट उडाली पुण्यांतील भिक्षुकांची. पूर्वी त्यांचा एक अड्डा असे, ते आतां दोन झाले. भिक्षुकराज्यांत धार्मिक राजकारणाचा संचार होऊन दर्भे फौजदार व पळीपंचपात्रीवाले गुप्तपोलीस नेमण्यांत आले! खरें अराजक म्हणजे काय असतें ह्याचा लोकांना अनुभव येऊं लागला. बाळासाहेब नातू वगैरे ग्रामणी असें घेऊन बसले कीं, शंकराचार्योंच्याकडे निकालाचा अधिकार खरा, पण त्यांनीं दिलेला निकाल सशास्त्र किंवा अशास्त्र हें ठरविणार पुण्यांतील ब्रह्मवृंद. आणि तें शास्त्रसुद्धां आम्ही म्हणूं तेंच खरें. केसरी लिहितो, 'मोरशास्त्री साठे, त्रिंबकशास्त्री शाळिग्राम, असलीं विद्वद्रत्नें मूर्ख ठरून, आधुनिक पंचांगविके, खर्डेघाशे, विकटोपर्यंत अध्ययन करून सर्वज्ञत्वाचा आव घालणारे षड्शास्त्री, वकील हेच जेथें वेदशास्त्रज्ञ आणि महापंडित मानले जातात, असल्या 'ज्ञानलवदुर्विदग्धां' ची फारशी मातब्बरी नाहीं. पुण्याच्या ग्रामण्याचा निकाल शंकराचार्यांनीं दिला; व बाहेरगांवीं तो मान्य झाला. पण पुण्यांतील वादींना तेवढा तो मान्य नाहीं. रानड्यांसारखे एवढे सुधारक, त्यांनीं शंकराचार्यांना मान लवविली; आणि बाळासाहेब नातूंसारखे धर्माभिमानी म्हणविणारे, ते कृतीनें आचार्यपीठाचा नाश करूं लागले. खुद्द शंकराचार्यच बहिष्कृत होण्याची

पाळी आली. शिवाय पुण्यांतील या भांडणामुळें सगळेंच सार्वजनिक काम बस-ल्यासारखें झालें. या सुमारास पुण्यास ए. ओ. ह्यूमसाहेब आले. त्यांच्या सत्कारसमारंभांतहि बेकी दिसून आली. शेवटीं गांवांतील लोकांनीं त्रासून जाऊन हा गोंधळ मोडण्याकरितां शंकराचार्यांकडे अर्ज केला. तेव्हां श्रींनीं धर्माभिमानी वादी मंडळीस लिहिलें कीं, "तुमचें काय म्हणणें असेल तें समक्ष आम्हास कळवावें. गांवांत बखेडा माजवूं नये."

दरम्यान—टिळकआगरकरांच्या दरम्यान—एक व्यक्तिविषयक झटपट झाली. ता. १४ नोव्हेंबर १८९२च्या सुधारकांत टिळकांवर अशी टीका आली कीं, टिळक हे वटवाघुळासारखे आहेत. त्यांना धर्माभिमानी आपल्यांत घेत नाहींत, व ते एका अर्थानें खरोखर सुधारक असतां सुधारकांच्या पंक्तींत उघडपणें जाऊन बसण्याला कचरतात. या टीकेला उत्तर सोपें होतें. कोणत्याहि बाबतींत पक्ष असे दोनच कां असावे? मताच्या सूक्ष्मतेप्रमाणें तीन किंवा अधिकहि पक्ष असूं शकतील; व ज्याला आपल्या स्वतंत्र विचाराचें समर्थन युक्तिवादानें करण्याची धमक असेल त्यानें अमुकच दोन पक्षांपैकीं कोणाकडे तरी असलेंच पाहिजे असें नाहीं. त्याचा पक्षहि वेगळाच होऊं शकेल. पण वरील टीका करतांना आगरकरांनीं मध्येंच एक वाक्य असें घुसडून दिलें होतें कीं, धर्माभिमानी म्हणविणारे टिळक खिस्त्याच्या हातचा चहा घेतात एवढेंच नव्हे, तर स्टेशनावरील मुसलमान किंवा पार्तुगीज मेसमन्च्या हातचा भात खाण्यास ते मागें घेत नाहींत. असें असतां, ग्रामण्याची उगाच उठाठेव प्रतिवादीच्या बाजूनें त्यांनीं चालविली आहे. या आरोपाला २२ नोव्हेंबर १८९२च्या केसरींत टिळकांनीं स्पष्ट नकारार्थी उत्तर दिलें तरी आगरकरांचा आग्रह सुटेना. ऐकीव गोष्टीवर सर्वस्वीं अवलंबून राहून कोणास बेअब्रूकारक अशीं विधानें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करूं नयेत, कारण प्रसंग आल्यास मोठीं माणसें सुद्धां पुढें येऊन पुरावा देण्यास कचरतात, किंवा पुरावा खोटा ठरतो, या गोष्टींची अद्दल आगरकरांना पूर्वी घडली होती; व आपल्या व्यवसायबंधूंना त्यांनीं आग्रहतेनें उपदेशहि केला होता. पण पक्षांधतेमुळें या वेळीं स्वतः आगरकरांनाच या उपदेशाचा विसर पडला. ज्यांच्या आधारावर आगरकरांनीं मुसलमानाच्या हातचा भात टिळकांनीं स्टेशनावर खाल्ल्याचें विधान केलें, त्यांनीं खरें खोटें करण्याची वेळ आली तेव्हां आगरकरांना दगा दिला. तरीहि ते आपलें विधान परत घेईनात.

शेवटीं कोर्टांत फिर्याद करण्यापर्यंत प्रसंग आला. फिर्याद लिहून झाली व दोन प्रहरीं ती कोर्टांत गुदरणार इतक्यांत सकाळीं माधवराव रानडे स्वतः होऊन टिळकांच्या घरीं गेले, व तुम्ही फिर्याद दाखल करूं नका असें म्हणूं लागले. टिळक म्हणाले, "ठीक आहे. त्यालाहि माझी तयारी आहे. पण आगरकरांनीं आपला आरोप परत घेतला पाहिजे." याला रानडे कबूल झाले, कारण आरोप खोटा ही

गोष्ट रानड्यांना खासगी चौकशींत कळून आली होती. अखेर, ता. ४ डिसें-बरच्या सुधारकांत आगरकरांनीं टिळकांची माफी मागितली. बेअब्रूच्या खटल्यांत माफी मागण्याचा आगरकरांवर हा दुसरा प्रसंग. पहिल्या प्रसंगीं माफी मागूनहि त्यांना शिक्षा भोगावी लागली, या खेपेस माफी मागितल्यानें ती वांचली इतकाच फरक. पण कांहीं झालें तरी आगरकर डौलदार लिहिण्यांत मोठे हौशी खरे. टिळकांची माफी मागतांनाहि त्यांनीं त्या लेखावर " बोलणें फोल झालें." असा मथळा घातला होता. रानड्यांकडून टिळकांनीं कबूल करून घेतलेल्या माफीच्या अटींत मथळ्याचें हें कलम खास नव्हतें. पण लिहिणारा गडीच हौशी. टिळकांनाहि या मथळ्याचा दुसरा चरण येत होता. त्यांनीं लिहिलें, "बोलणें फोल झालें" एवढेंच नव्हे तर 'डोलणेंहि वांया गेलें.' टिळक लिहितात, "टांका आगळें हवे तसे चार शब्द लिहिण्याची केसरीच्या माजी एडि-टरांची संवय त्यांच्या नवीन आश्रमांत तरी 'सुधारेल' अशी आम्हास उमेद होती; पण पळस कोठेंहि गेला तरी त्यास पानें तीनच अशी जी पुरातन म्हण आहे तिची सत्यता या प्रकारावरून अधिकच प्रत्ययास येते."

पण आगरकरांनींहि, घसरतां घसरतां, माफीच्या लेखांतच टिळकांना एक कोंपरखळी मारली होती. त्यांनीं असें लिहिलें होतें कीं, " टिळकांनीं स्टेशनावर मेस्मनच्या हातचा भात खाल्ला ही गोष्ट असिद्ध म्हणून परत घेतली, पण ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिणें व मुसलमानाच्या हातचा भात खाणें, ह्यांत फार अंतर असल्याचा जो बहाणा टिळक करतात, त्यांत मात्र फारसा अर्थ नाहीं. आम्ही तरी तीं दोन्हीं कृत्यें धर्मदृष्टया सारखींच समजतों." यावर टिळकांनीं दिलेलें उत्तर मोठें मासलेवाईक आहे. ते लिहितात " रसायनरीत्या कोळसा व हिरा एकच म्हणून लोकांच्या हिऱ्याचा कोळशाच्या बुद्धीनें जर कोणी अपहार करूं पाहील, अगर स्वपरस्त्रीचा मला भेद वाटत नाहीं म्हणून परस्त्रीचा अभिलाष करील, तर तो लोकसमाज व कायदा ह्या दोहोंच्याहि दृष्टीनें सारखाच गुन्हेगार होईल. आपण गोमूत्र, गोमय, व गाईचें दूध खातों तर गाय खाण्दासहि कोणती हरकत आहे ? ही जुनी कोटीहि अशाच प्रकारची आहे." कोटीनें कोटी उड-विण्यांत टिळकांइतका हजरजबाबी मनुष्य क्वचितच आढळेल.

पुण्यांतील ग्रामण्याचा बखेडा मोडण्याकरितां, खुद्द श्रींनीं वादींना समक्ष येऊन आपलें म्हणणें कळवा, असें लिहिल्याचें वर सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें वादी पक्षाची मंडळी १६ डिसेंबर १८९२ रोजीं कुरुंदवाडास श्रींकडे गेली. लगेच दुसऱ्या दिवशीं रा. ब. रानडेपक्षांतर्फे राघोपंत नगरकर वकील जाऊन पोहोंचले व स्वतः टिळकहि ता. १८ रोजीं तेथें पोहोंचले. पण टिळक एकटे गेले नाहींत, तर ग्रामण्य कमिशनचा निकाल आम्हास मान्य आहे असें म्हणणाऱ्या पांच पन्नास गृहस्थांचें सैन्य बरोबर घेऊन गेले. यावेळीं श्रींचे कारभारी भडकमकर हे होते

आणि पूर्वी कमिशनच्या शास्त्र्यांना प्रतिवादी पक्षानें सामील करून घेतल्याचा संशय जसा वादी पक्षास आला होता, तसाच यावेळीं श्रींच्या कारभाऱ्यांना वादी पक्षानें फितूर करून घेतल्याचा संशय प्रतिवादींना आला होता. टिळक हे विद्वान व मोठे पुढारी म्हणून श्रींच्या दरबारीं जसा त्यांना मान, तसाच बाळासाहेब नातू प्रभृति हे बोलून चालून धर्माभिमानी तेव्हां त्यांना हे मान कां नसावा ? व्यंकटशास्त्री निपाणीकर न्यायगुरू व बिंदुमाधवशास्त्री हे सर्वधर्माधिकारी, यांना टिळकांनीं वश करून घेतलें, तर आपण मुख्य कारभाऱ्यालाच वश करून घेऊं म्हणजे झालें, असा विचार वादीपक्षानें केला असावा. ता. १८ रोजीं सायंकाळीं सभेला सुरवात झाली. याहि वेळीं श्री स्वतः हजर नव्हते. त्यांनीं आपलें प्रतिनिधित्व, म्हणजे वादाची व्यवस्था लावण्याचें काम, कुरुंदवाडचे अधिपति बापुसाहेब व बाळासाहेब कुरुंदवाडकर यांजकडे सोंपावून त्यांना सर्व प्रकरणाबरोबर आपला अभिप्राय पाठविण्यास सांगितलें होतें.

प्रथम नगरकरांनीं कारभाऱ्यांविरुद्ध प्राथमिक स्वरूपाच्या वकिली तक्रारी केल्यावर, टिळकांनीं प्रतिवादींचें म्हणणें सविस्तर मांडलें. तें असें कीं, “ श्रींना वाटेल तर अजूनहि तिऱ्हाईत विद्वान पंच नेमून निर्णय व्हावा. व पंचांसमोरनुसता कागदीच नव्हे तर तोंडीसुद्धां पुरावा व चर्चा व्हावी.’ नंतर लेखी चर्चेस सुरवात झाली. जाति मोडण्याच्या उद्देशानें चहासेवन हा मुद्दा असून, शिवाय पूर्वीच्या कमिशनचा निकाल पक्षपाताचा व अन्यायाचा होता कीं काय हाहि एक मुद्दा होता. बिस्किटें कोणी खाल्याचा पुरावा नसतां, तीं टेबलावर होतीं एवढ्यावरून तीं खाल्लीं असें अनुमान करावें असाहि एक मुद्दा बाळासाहेब नातूंनीं काढला. त्याला टिळकांनीं उत्तर दिलें कीं, “स्वतः बाळासाहेब नातू हे गणेश खिंडींत गार्डन पार्टीला जातात, तेव्हां तेथें बिस्किटेंच काय पण दारूहि ठेवलेली असते; यावरून नातू हे दारू पितात असें अनुमान निघेल. व ते दारू प्यायले नाहींत असें नातूंना शाबीत करावें लागेल. पण तें बरोबर होणार नाहीं. तसेंच हेंहि.” रावसाहेब कानिटकर यांस पूर्वीच्या निकालास अनुसरून वादीपक्षानें प्रायश्चित्त दिलें असतां, तो निकाल मान्य नाहीं असें त्यांना आतां म्हणतां येत नाहीं; ते एस्टॉपेल झाले. असेंहि टिळकांनीं सांगितलें व बरोबर नेलेला वासुदेवभट काळे–वादी पक्षांतलाच एक भिक्षुक–यांस पुढें करून त्याची प्रतिज्ञेवर जबानी घेऊन वरीलप्रमाणें सिद्ध केलें. तेव्हां उभयतां श्रीमंतांची वादीपक्षाच्या दुराग्रहाविषयीं खात्री होऊन त्यांनीं उभयपक्षांस विनंति केली कीं, दोघेहि सामोपचारानें थोडेथोडे मागें घेऊन, आजच्या आज हा वाद मिटविण्याची कृपा करा व उभयपक्षाची मंडळी आमच्या पंक्तीस एकत्र बसून साखरभात खाऊन जा. पण बाळासाहेब नातू मोठे श्रीमंत असले तरी साखरभात स्वतः खाण्याची किंवा दुसऱ्यास खाऊं घालण्याची लजत त्यांस फारशी नव्हती. म्हणून वादीपक्षानें ही विनंति अमान्य केली. प्रायश्चित्तें चुकीचीं

कशीं आहेत, हें बाळासाहेब सांगेनात; व प्रायश्चित्तांचा निकाल मान्यहि करीनात. 'वादीपक्ष आपलें डोकें पुण्यास विसरून कुरुंदवाडास गेला होता. मग तो काय बोलणार ?' असा एक टोला केसरींत दिलेला आढळतो. मग त्याचा अर्थ काय असेल तो असो. तात्पर्य, पुण्यांतील सामाजिक अराजकता मोडण्याचा हाहि प्रयत्न असाच फुकट गेला. कुरुंदवाडकरांनीं आम्ही आपला अभिप्राय श्रींस कळवितों, व प्रायश्चित्तांचा निकाल अशास्त्र आहे अशी लेखी तक्रार वादी–पक्षाकडून आल्यास तिची प्रत तुम्हांस देऊं, असें प्रतिवादींस कळविलें व उभयपक्षीय लोक बहुधा गेले तसेच पुण्यास परत आले.

पुढें उभयतां कुरुंदवाडकरांनीं आपले अभिप्राय श्रींकडे पाठविले. पैकीं श्रीमंत बापूसाहेब यांनीं असा अभिप्राय दिला कीं, "कमिशननें जे लोक प्रतिवादींतून कमी केले व ज्यांचीं प्रायश्चित्तें ब्रह्मवृंदांकडून झालीं त्यांबद्दल कांहींच म्हणावयाचें नाहीं, पण टिळकप्रभृति अकरा असामींनीं चहा घेतल्याचें सिद्ध होत आहे. चार कबूल करीत आहेत व इतर पंधरांवर चहा व बिस्किटें सेवन केल्याचा संभवनीय अपवाद दोषारोप लागू पडतो. संशयाचा फायदा आरोपींस द्यावा, हा नियम एरवींच्या व्यवहारांत ठीक असेल पण धर्मांत तो लागू नाहीं. संशयाबद्दलहि धर्मांत प्रायश्चित्त आहे. याकरितां संशयाचीं नवीन प्रायश्चित्तें व कमिशननें दिलेलीं जुनीं प्रायश्चित्तें याचा विचार श्रींनीं शास्त्री सभेकडून करवावा. तसेंच या प्रकरणाचा अखेर निकाल लागण्यापूर्वीं संसर्गी लोकांना प्रायश्चित्त नाहीं असें श्रींनीं ठरविलें तें बरोबर नाहीं." बाळासाहेब कुरुंदवाडकर यांचा अभिप्राय थोडा वेगळा पडला. तो असा होता कीं, "थोर विद्वान लोकांनीं धर्मविरुद्ध कर्म करणें हें त्यांना कमीपणा आणणारें आहे. तरी पूर्वीं झालेलीं प्रायश्चित्तें योग्य झालीं अशी श्रींची खात्री झाली असेल तर पुन्हां नवीन देण्याचें कारण नाहीं. शिवाय कालमानाप्रमाणें जें योग्य दिसेल तें केलें पाहिजे." या अभिप्रायानें श्री फिरून बुचकळ्यांत पडले, असें दिसतें. तिसरे पंच माधवराव भडकमकर कारभारी, पण त्यांचा अभिप्राय मात्र सर्वस्वीं वादीपक्षाला अनुकूल; यामुळें श्रींकडून अखेर निकाल कांहींच लागेना. ज्या अनेक शास्त्र्यांकडून अभिप्राय मागविले, त्यांचा निष्कर्ष बाळासाहेब नातू यांनीं असा प्रसिद्ध केला कीं, चहा पिणारांनीं प्रत्यक्ष क्षौरपूर्वक प्रायश्चित्तें नवीं केलीं पाहिजेत व विकल्प असेल तर डोक्याचें वपन न झालें तरी चालेल, पण मुखावरील श्मश्रूंचें झालेंच पाहिजे. पण श्रींच्या दरबारीं टिळकांनींहि थोडी किल्ली फिरविली होती असें दिसतें. वादीपक्षाकडून श्रींकडे वरचेवर तगादा जाई कीं, त्रिवर्ग अधिकाऱ्यांच्या अभिप्रायासह श्रींचा ठराव लवकर प्रसिद्ध व्हावा. श्रींच्या मनांत हें प्रकरण कसें तरी संपवून घ्यावें असें होतें. पण कारभारी भडकमकर यांनीं ' श्रींनीं योजलेला ठराव योग्य नाहीं, प्रतिवादी हे पश्चात्ताप कबूल करतील तरच प्रायश्चित्तार्ह आहेत, प्रायश्चित्तें द्याव-

याची तर सक्षौर दिली पाहिजेत, टिळकांचें क्षेत्राच्या ठिकाणीं झालेलें प्रायश्चित्त या ठिकाणीं जमेस धरतां येत नाहीं,' वगैरे अभिप्राय श्रींना ठरवून कळविले; व शेवटीं असेंहि लिहिलें कीं, 'श्रींचीं अनुमानें चुकीचीं व तद्दूषित ठराव भयंकर आहे. व याउप्पर श्रींचा ठराव, जो पूर्वीच्या ठरावाशीं विसंगत आहे, तोच मी प्रसिद्ध करावा अशी श्रींची आज्ञा होईल तर ज्या ठरावानें मजवर, व श्रींवर व संस्थानावर जगाचा दोष येणार व शास्त्रविरुद्ध वर्तन होणार तो प्रसिद्ध करण्याची जबाबदारी आपले शिरावर घेण्यापेक्षां मी चाकरीचा राजीनामा देईन.

तात्पर्य, वादी, प्रतिवादी, पंच व श्रींचे कारभारी ह्या सर्वांना शास्त्र कळत होतें; आणि ज्याला शास्त्र कळत नव्हतें म्हणावयाचें, अशी व्यक्ति फक्त एकच व ती खुद्द श्री, असें ठरलें ! ही श्रींची शोभा ! कारभारी श्रींना लिहितात "बार अंक पंचावन्नाच्या आज्ञापत्राविरुद्ध बार अंक एक्यांयशीचें आज्ञापत्र आहे. म्हणून मी तें प्रसिद्ध करीत नाहीं." पण पंचावनचें आज्ञापत्र ज्या श्रींनीं काढलें, त्यांनीच एक्यायशीचें ! अशा रीतीनें प्रतिवादींनीं श्रींनीं संभाळून धरलें; तर वादींनीं त्यांचें कारभारी संभाळून धरले; आणि यजमान व कारभारी ह्यांच्या तंट्यांत हें ग्रामण्य प्रकरण पुढें अनंत काल असेंच भिजत पडलें. या सर्व प्रकरणांत बाळासाहेब नातू यांचा रोख टिळकांच्या मिशांवर कितपत होता हें लोकांना काय माहीत ? उलट त्यांच्या नजरेला जें पडत असे, ते असें कीं, टिळकांच्या मिशा अखेरपर्यंत शाबूत राहिल्या व त्यांचें लेही बाळासाहेब नातू ह्यांचा मुखश्मश्रू मात्र महिना पंधरा दिवसांनीं खर्ची पडे ! अशा रीतीनें हें प्रकरण दोन वर्षे निकरानें चालून शेवटीं अराजकतेच्या रसायनांत विरून गेलें. वादी पक्षाला शास्त्री लोकांच्या अभिप्रायाची बळकटी पुष्कळ होती यांत शंका नाहीं. पण अखेर शंकराचार्यांचा अधिकार न जुमानतां ज्यांनीं ग्रामण्य धिडकारलें ते प्रायश्चित्ताशिवाय तसेच राहिले; व कमिशनच्या निकालानुसार ज्या ज्या प्रतिवादींनीं जीं जीं प्रायश्चित्तें एकदां केलीं, तींच कायम राहिलीं. फिरून नवीं झालीं नाहींत. सर्वसाधारण लोकसमाज हळू हळू हें प्रकरण विसरून गेला. ग्रामण्य चालू असतांना उत्पन्न झालेले बंध आपोआप ढिले पडले, लेही सोबती एकत्र बसून जेऊन खाऊन वरती ग्रामण्याच्या गोष्टी तोंडीं लावूं लागले. बिचाऱ्या माहेरवासणी सासुरवाशींचा त्रास चुकला. फार काय पण, पुढें लवकरच स्वतः टिळक व बाळासाहेब नातू हेहि हरएक सार्वजनिक बाबतींत ग्रामण्याच्या गोष्टी न काढतां सहकारिता करूं लागले !

१८९५ सालीं राष्ट्रीय सभा व सामाजिक परिषद या वादांत हे दोघेहि एक बाजूस होऊन सुधारकांशीं लढले. परंतु भांडणांत तहान लागली तरी यापुढें ते कधीं एकमेकांच्या घरीं पाणीहि प्यायले नाहींत ! ता. १३ एप्रिल सन १९०० रोजीं टिळकांच्या घरीं वसंतपूजेचा समारंभ झाला. त्याप्रसंगीं रीतीप्रमाणें बाळा-

साहेब नातूंना आमंत्रण झालें. दोघेंहि तुरुंगांतून सुटून आले असून राजकारणांत पूर्वीहून अधिक एकजीव झाले होते. तरी मुद्याची गोष्ट निघतांच टिळकांना पत्र पाठवून नातूंनीं खालील रोकडे प्रश्न विचारिलेच:—"मिशन हाऊसमध्यें चहा पिणें, व आपणां उभयतांवर जीं संकटें अलीकडे आलीं त्या कामांत आपल्या स्वतःस भोजनाचा वगैरे संसर्ग जाहला, या दोन्ही दोषांस सक्षौर शास्त्रोक्त प्रायश्चित्त पाहिजे असें आपण मानतां काय? मानीत असल्यास आपण त्याबद्दल येथें प्रायश्चित्त न घेतां तीर्थाचे ठिकाणीं जाऊन जें प्रायश्चित्त घेतलें त्यांत या दोन्ही दोषाबद्दल प्रायश्चित्त आपण केलें आहे काय? सदरहू-बद्दल उत्तर तात्बडतोब यावें अशी विनंति आहे." त्यावर टिळकांनींहि तसेंच सडेतोड उत्तर दिलें. "आपलें आतांच पत्र आलें तें पावलें. जी हकीकत घडली आहे ती आपणास विदितच आहे. माझ्याकडे आंत बाहेर दोन प्रकार नसतात. याउप्पर आपणास मर्जीस वाटेल तशी तजवीज करावी." जगांत मनुष्याला एकेक गोष्ट प्रिय असते. ती त्याचा जन्म गेला तरी जात नाहीं. टिळक व नातू यांचा स्नेह आजन्म टिकला. पण नातूंनीं टिळकांना एका गोष्टीची बहाली कधींहि केली नाहीं. ती त्यांच्या मुखश्मश्रूंची!

पंचहौद मिशनमध्यें पुरुषांबरोबर सुमारें दहाबारा बायकाहि गेल्या होत्या. त्यांत श्रीमती रमाबाई रानडे, श्री. काशीबाई कानिटकर, रा० ब. भिडे यांची सून वगैरे होत्या. त्यांच्यापुढें झनाना मिशनमधील ख्रिस्ती बायांनीं चहाचे पेले आणून ठेविले. पण त्या सर्वांनीं तो घेण्याचें नाकारिलें. रमाबाईसाहेबांनीं 'आमच्या आयु-ष्यांतील कांहीं आठवणी' या पुस्तकांत या प्रकरणीं एक भाग लिहिला आहे. त्यांत प्रस्तुत विषयावर कांहीं अस्सल प्रत्यंतर-पुरावा मिळतो. मिशन हाउसमधील चहापार्टीनंतर लौकरच रा० ब० रानडे यांच्या घरीं एक मेजवानी झाली. तिला चाळीस पंचेचाळीस ब्राह्मण मंडळी असून, डॉ. विश्राम, रा० ब० नारायणभाई दांडेकर, रा. ब. मानकर वगैरे चारदोन ब्राह्मणेतर मंडळीहि होती. कलिमूर्ति गोपाळराव जोशी हेंहि या मेजवानीस हजर होते. रानड्यांच्या घरची पंगत, तींत ब्राह्मण ब्राह्मणेतर हा भेद कोण पाळणार? सर्व मिळून मिसळून बसले होते. गोपाळरावांना आगींत तेल ओतण्याला हें एक साधन आयतेंच मिळालें. त्यांनीं या पंक्तीचा थेट नकाशा काढून, कोण कोठें कोणाजवळ जेवावयास बसले होते व ब्राह्मणेतरांबरोबर जेवल्यानें इतर सगळे ब्राह्मण कसे बाटले, याची माहिती दुसरेच दिवशीं पुणेवैभवांत सविस्तर छापली! रानडे यांची गोष्ट या बाबतींत टिळकांहून वेगळी होती. आधीं ते बोलून चालून सुधारक. त्यांच्यासंबंधानें मिशन हाउसमध्यें चहा घेतल्याची बातमी प्रसिद्ध झाली तरी त्यांचें कोण काय करणार? धर्माभिमानी लोकांनीं त्यांना आधींच बाटगे म्हणून बनवून ठेविलेले. वास्तविक या प्रसंगीं त्यांनीं चहाचा पेला तोंडालासुद्धां लावला नव्हता. ही गोष्ट त्यांनीं

प्रसिद्ध केली असती तर त्यांच्या शब्दावर लोकांनीं विश्वास ठेवला असता व त्यांच्या मार्गे कोणी लागलेंहि नसतें. रानड्यांनीं प्रायश्चित्ताचा कांहीं तोडगा करावयाचें मनांत आणलें असतें तर त्यांना ती गोष्ट फार सोपी होती; कारण वासुदेवशास्त्री अभ्यंकर व श्रीपतिबोवा भिंगारकर हे बडे भिक्षुक त्यांचे मोठे ऋणानुबंधी, शिवाय घरीं कायमचे पुरोहित, पुराणिक वगैरे आश्रित होतेच. तसेच आणखी दोन वैदिक ब्राम्हण सालीना १०० रु. देऊन कायमचे घरीं ठेवले होते. हेतु हा कीं, ग्रामण्यासारख्या अडचणी उपस्थित झाल्या तरी, स्वतःला काय पण आपल्या पक्षांतील इतर मंडळींनाहि, वेळीं अवेळीं अडचण पडूं नये. अशा गृहस्थांपैकीं कोणाच्याहि घरीं होमहवनादि संस्कार, व्रतेंवैकल्यें किंवा लग्नमुंजी निघाल्या म्हणजे या ब्राह्मणांनीं त्याजकडे जाऊन बिनबोभाट कार्य उरकून द्यावें असा परिपाठ असे. अशी स्थिति असल्यामुळें स्वतः रानड्यांना प्रायश्चित्त घेण्याचें फारसें कारण नव्हतें. घरीं त्यांची वडील बहीण मोठी कर्मनिष्ठ होती. पण घरचे धार्मिक व्यवहार चालविण्याला वर सांगितल्याप्रमाणें ब्राह्मण मंडळींची सेना केव्हांहि सिद्ध असल्यामुळें अक्कांना कुरकुर करण्यास कांहीं जागा नव्हती. पण सुधारक पक्षांतील रानडे काय किंवा दुसऱ्या पक्षांतील टिळक वगैरे काय, यांच्या एकट्यापुरता हा प्रश्न नव्हता. त्यांच्याबरोबर त्यांची स्नेही मंडळी या संकटांत सांपडलेली ती सर्वच सारख्या ऐपतीची नव्हती. व त्यांच्या घरची बायकामंडळी तर या ग्रामण्यानें अधिक नडलेली. किरकोळ पूजा अर्चा वगैरे नडल्या तर त्याचा जाच पुरुषांना होत नाहीं फक्त बायकांनाच होतो. पण लग्नकार्य वगैरेंचा संबंध फक्त स्त्रियांपुरता येत नसून, त्या गोष्टी घरच्या पुरुषांनाहि नडविणाऱ्या असतात.

ज्याला धर्मकृत्य कोणचेंहि करावयाचें नाहीं, किंवा ज्याला आपल्या घरीं चार माणसें जेवणाखाण्याला बोलवावयाचीं नसतात, त्याला बहिष्कार मुळींच जाणवत नाहीं. जन्मच्या जन्म अशा रीतीनें स्वयंबहिष्कृत स्थितींत काढलेल्या गृहस्थांचीं उदाहरणें आम्हास माहीतहि आहेत. पण ज्यांचा प्रकार असा नाहीं, त्यांना बहिष्कार जाणवण्याचे प्रसंग केव्हां तरी येतातच. संपन्न व सुशिक्षित मनुष्य हे प्रसंगविशेषी प्रयत्नानें निस्तरूं शकतो व न निस्तरले तर एक प्रकारच्या गमतीनें ते तो सोसतो. पण गरीब व अशिक्षित यांचे हाल होतात. संघांत राहणें हीच मनुष्याची शक्ति व हेंच त्याचें सुख. 'Man is a gregarious animal' हें जर खरें तर बहिष्कृत होणें त्याचें संकट व हेंच त्याचें दुःख असें म्हणण्यास काय हरकत ? कित्येक जातींत पाणी व गुरगुडी तोडणें ही जवळ जवळ फांशीइतकी कडक शिक्षा ठरते. सुशिक्षितांनाहि बहिष्कार ही केवळ करमणूक होते असें मात्र नव्हे. स्वतः टिळकांना याचा अनुभव बराच आला. ते धार्मिक कृत्यें टाकून बसलेले नव्हते व चार लोकांनीं घरीं यावें जावें असाच त्यांचा स्वभाव असे. पण ग्रामण्य चालू होतें तोंपर्यंत त्यांना कांहीं लोकांच्या संगतीस व पंगतीस मुकावें

लागलें. पण विशेष अडचण त्यांच्या घरीं १८९२ व १८९३ सालीं जीं दोन कार्यें झालीं तेव्हां अनुभवास आली. १८९३ सालीं त्यांचा थोरला मुलगा विश्वनाथ याचा व्रतबंध झाला. त्यावेळीं ब्राह्मण मिळेना. १८९३ सालीं त्यांच्या थोरल्या मुलीचा विवाह झाला. त्याहि वेळीं तीच अडचण ! या दुसऱ्या प्रसंगीं त्यांना व्याही जर जुन्या मताचा मिळता तर पंचाईतच व्हावयाची. पण त्यांचे व्याही बापूसाहेब केतकर हे स्वतः सुधारक व प्रार्थनासमाजिस्ट असल्यामुळें खुद्द व्याह्यांकडून येणारी अडचण टळलेली होती. या दोन्ही प्रसंगीं, पुण्यांत जो एक ठराविक उपाध्या बहिष्कारांत पडलेल्या लोकांकरितां तयार करून ठेवण्यांत आला होता, त्याच्याकडूनच टिळकांनीं आपलें याज्ञिक चालवून घेतलें. हा उपाध्या रानडे यांनीं घरचा आश्रित म्हणून संभाळला होता. त्याचा उपयोग कृष्णपक्षांतील लोकांस होई. पण याज्ञिक चालविणार ब्राह्मणापेक्षां स्वयंपाक करणाऱ्या ब्राह्मणाची अधिक अडचण कोणासहि भासणार. टिळकांना हातांत पोथी घेऊन कोणतेंहि धर्मकृत्य स्वतः सहज चालवितां येण्यासारखें होतें; व ग्रामण्य जोरांत असतां एकदां त्यांनीं पोथीवरून घरची श्रावणी स्वतः चालविली होती. पण ही गोष्ट केवळ नमुन्यादाखल होती. स्वतः यजमानाला एक हात पोथीकडे अडवून लग्न किंवा मुंज असल्या मोठ्या संस्कारांतलें वैदिक कृत्य चालविणें अशक्य होय. एक वेळ तेंहि तो चालवील. पण समाराधनेच्या स्वयंपाकाचें काय ? टिळकांना होमापुरता किंवा स्वतःच्या जेवणापुरता भात शिजवितां आला असता. पण लग्न-मुंजींतलीं शेंकडों पानें कशीं जेवणार ? व विशेष गंमत ही कीं, पुण्यांत टिळकांना कसा तरी एक उपाध्या मिळाला तरी आचारी मात्र मिळेना ! कित्येक वेळां टिळकांच्या कुटुंबाला शेजारणी बायांकडून जिन्नस पान्नस करवून घ्यावे लागले, व त्यांच्या एका संस्थानिक मित्रानेंच बाहेरून जेव्हां आपले आचारी पुरवले तेव्हांच लग्नमुंजीच्या समाराधना उठल्या.

मंगलकार्याची अक्षत कसबा पेठेंतल्या गणपतीच्या देवळांत बहिष्कृत टिळकांना नेऊं द्यावी कीं नाहीं हाहि एक प्रश्न निघाला होता. व तेथें मात्र टिळकांनीं प्रत्यक्ष प्रतिकार करण्याचें ठरविलें होतें. ते अक्षतसमारंभ असा कधीं करीतच नसत. टांग्या-गाडींतून एक पुरुष, एक बायको, व तिसरा उपाध्या अशी मंडळी जाऊन आपणाकडून बिनबोभाट अक्षत देण्याची त्यांची चाल असे. पण टिळकांच्या घरची अक्षत तीन माणसांची म्हटली तरी तिचा वाजंत्र्याशिवाय बोभाटा हा व्हावयाचाच! त्यांतूनहि ते यावेळीं बहिष्कृत असल्यानें त्यांच्या अक्षतीवर देवळांतल्या पुजाऱ्याकडून हटकून नजर राहावयाचीच ! पहिल्या कार्याच्या दिवशीं प्रश्न निघाला तेव्हां टिळकांनीं उपाध्याला सांगितलें कीं, संध्याकाळीं तुम्ही निमूटपणें अक्षत घेऊन गणपतीच्या देवळांत जा, व तुम्हाला कोणी हरकत केली तर जवळच मी आनंदोद्भव थिएटरांत सभेंत बसलों असेन तेथें येऊन मला सांगा, मग मी येतों व

कोण हरकत करील तें पाहातों. पण देवळांत कोणी हरकत न केल्यानें तो प्रसंग टळला. लग्नकार्याप्रमाणें श्राद्धपक्षासहि अडचण येई. पण देवस्थानीं व पितृस्थानीं बसण्यास प्रत्यक्ष ब्राह्मण न बोलावतां, कैक दिवस टिळकांनीं चटावर श्राद्ध करून घेतलें. चटासारखा पवित्र, शुचिर्भूत, बिनबोलका, स्वयंपाकास नावें न ठेवणारा, दक्षणा अधिक न मागणारा ब्राह्मण दुसरा कोणता मिळणार ? पण चटाचे हे गुण चालता बोलता ब्राह्मण क्षण स्वीकारण्यास मिळेनासा झाला म्हणजे कोणासहि आठवावयाचे !

पुरुषांच्या या नैमित्तिक अडचणी, व सासर माहेर करणाऱ्या मुलीं-बाळींमुळें घरच्या बायकांच्या अडचणी, यांच्याच योगानें अखेर प्रायश्चित्तांना तोंड लागलें. प्रथम वर्ष सहा महिने कोणी दाद दिली नाहीं, पण पुढें कांहीं कांहींचें निभेना. स्वतः टिळकांच्या अडचणी वर सांगितल्याच आहेत; व रानडेपक्षांतील मंडळींच्या अडचणीहि कांहीं कमी नव्हत्या. ती मंडळी रानड्यांच्याकडे येऊन हळू हळू आपली हकीकत सांगत व भीत भीत प्रायश्चित्तांचा प्रश्न काढीत; व म्हणत कीं " आमच्या बायका–मंडळींना विशेष त्रास झाला आहे. त्या म्हणतात जे चहा प्यायले ते मोकळेच राहिले, आणि शिक्षा काय ती आमच्या मुलींना भोगावी लागत आहे. प्रत्येक सण आला कीं त्या असंतुष्ट असतात व त्यांच्या डोळ्यांना पाणी आल्याशिवाय राहात नाहीं. आज दोन वर्षांत गांवांत दिलेल्या आमच्या मुलींचें एकदांहि माहेरीं येणें झालें नाहीं. त्या कंटाळून वरचेवर निरोप पाठवतात; तें ऐकून आमच्या बायकामंडळींना फार वाईट वाटतें. " रानडे यांच्या आक्कांनीं एकदां त्यांना असें विचारिलें कीं, " तुम्ही स्वतः चहा घेतला नाहीं तर तसें प्रसिद्ध करून मोकळे कां होत नाहीं ? उगीच लोकांकडून दोष व अपवाद कां घेतां ? " त्यावर रानड्यांनीं उत्तर दिलें कीं, "असें कसें करितां येईल ? मी जर मंडळींतला आहें व त्यांच्यापैकींच एक आहें असें म्हणवितों, तर त्यांनीं जी काय गोष्ट केली ती मी केली नसली तरी केल्यासारखीच आहे. चहा पिणें किंवा न पिणें यांत कांहीं पापपुण्य आहे असें मला वाटत नाहीं. पण ज्या अडचणींत आपल्यामध्यें उठणारी बसणारी चार मंडळी गुंतली आहेत त्यांतून एकटे सुटून जाणें मला कधींच आवडणार नाहीं. येऊन जाऊन भिक्षुक मंडळीचीच अडचण ना ? तुम्हाला किती माणसें पाहिजेत तितक्यांची तजवीज होईल. या संबंधानें बराच खर्च ठेवावा लागेल त्याला कांहीं उपाय नाहीं. "

पण या कोटिक्रमानें त्यांच्या बहिणीचें समाधान झालें नाहीं. इतरांची ही अडचण त्यांच्या नजरेस येऊं लागून प्रायश्चित्ताचें काय करावें याचा रानड्यांना विचार पडूं लागला. १८९२ सालीं रावसाहेब गोविंदराव कानिटकर मुनसफ हे मे महिन्याच्या सुटींत घरीं आले व त्या सालीं त्यांच्या घरीं दोन कार्येंहि व्हावयाचीं होतीं. तेव्हां त्यांचे वडील वासुदेव बापूजी

ऊर्फ दादासाहेब कानिटकर हे गोविंदरावांना शंकराचार्यांच्या निकालाची वाट न पाहतां प्रायश्चित्त घेऊन गुंता मोडून टाकण्याविषयीं आग्रह करूं लागले. पण स्वतः गोविंदराव व त्यांचें कुटुंब काशीताई हीं ऐन उमेदींत असल्यामुळें त्यांचा तत्वाचा ताठरपणा कमी झाला नव्हता. ते रानड्यांकडे येऊन काय करावें म्हणून विचारूं लागले. तेव्हां तूर्तातूर्त तोड म्हणून रानड्यांनीं असें सांगितलें कीं, सुटींत तुम्ही सर्व मंडळी लोणावळ्यास येऊन आमच्याकडेच रहा म्हणजे झालें; व कानिटकरहि त्याप्रमाणें पुणें सोडून लोणावळ्यास राहावयास गेले. ही गोष्ट दादासाहेबांच्या मनाला फार लागली. ते मुलाला वरचेवर पत्रें लिहीत कीं, "तूं प्रायश्चित्त घेऊन घरीं ये व मला म्हातारपणीं संतुष्ट कर." अखेर गोविंदरावांनीं हीं पत्रें रानड्यांना दाखविलीं तेव्हां त्यांनीं असा निर्णय दिला कीं, "सर्व मानहानि व कमीपणा सोसूनहि तुम्ही आपल्या वडिलांना संतुष्ट केलें पाहिजे. हेंच तुमचें कर्तव्य होय." तेव्हां गोविंदरावांनीं उलट रानड्यांना खोडा असा घातला कीं, तुमच्याबरोबर आम्ही, तुम्ही प्रायश्चित्त घेणार नाहीं तर आम्हीं तरीं कां घ्यावें ? आणि आम्ही घ्यावें असा तुमचा खरा सल्ला असेल तर तुम्हीहि आमच्याबरोबर घेतलें पाहिजे. याच सुमारास राघोपंत नगरकरांना पुढें करून पुण्यांतील रानडे पक्षाची आणखी दहा पंधरा मंडळी लोणावळ्यास येऊन त्यांनींहि असा आग्रह सुरू केला कीं, आम्हा सर्व मंडळींच्या सुटकेकरितां म्हणून कां होईना तुम्ही प्रायश्चित घेतलें पाहिजे. तेव्हां रानड्यांनीं सांगितलें कीं, "मी प्रायश्चित्त घेतल्यानें जर तुमची नड निघून जाते तर मी तें खुशाल घेईन, अडून बसणार नाहीं."

झालें, त्याप्रमाणें प्रायश्चित्ताचा दिवस ठरला, व नगरकरांनीं सर्व तयारी केल्यावर रानडे पुण्यास एक दिवस जाऊन प्रायश्चित्त घेऊन परत आले. या गोष्टीचे अनेक परिणाम झाले. आक्कांनीं दादांना धन्यवाद दिला. रमाबाईसाहेबांनीं मनांतून आपल्या भोळ्या व भिडस्त पतीला पुष्कळच नांवें ठेविलीं. आपल्या नवऱ्याची मानहानि होत आहे व तीहि इतर लोकांकारितां असें वाटून त्यांना रडें कोसळलें. सुधारकचमूंत अतिशय असंतोष व गवगवा होऊन कांहींनीं तर मुंबईच्या इंग्रजी वर्तमानपत्रांतून माधवरावजींवर उघड टीकाहि केली. पुढें एकदां रमाबाईनीं स्वतः उघड दोष देऊन रानड्यांना प्रायश्चित्त कां घेतलें म्हणून विचारिलें. तेव्हां त्यांनीं सरळ उत्तर दिलें कीं, "तुला ही गोष्ट न विचारितां समजावयास पाहिजे होती. आपले मुली मुलगे लग्नाचे अकडले नव्हते व घरचीं धर्मकृत्येंहि यथास्थित चालू आहेत. अर्थात् मी प्रायश्चित्त केवळ दुसऱ्यांकरितां घेतलें. ही गोष्ट मी न सांगतांहि तुझ्या लक्षांत यावयास पाहिजे होती. मी जशी ही गोष्ट पूर्ण विचारांतीं केली तशीच विकारवश न होतां तूंही थोडा विचार करतीस तर तुला कळून आली असती." दुसऱ्याकरितां अंगिकार-

लेल्या या दोषाचें बक्षीस म्हणजे, दुसऱ्याला आपण सुखी केल्याची जाणीव हेंच होय; व हें बक्षीस स्वतः गोविंदराव कानिटकर प्रायश्चित्त घेऊन वडिलांना सुखी करून, हसतमुख असे पुण्याहून लोणावळ्यास परत आले तेव्हां रानड्यांना मिळून चुकलें.

ती हकीगत बहिनीसाहेबांनीं मोठ्या गोड शब्दांनीं खालीलप्रमाणें वर्णिली आहे. "ते प्रायश्चित्त घेऊन लोणावळ्यास आले त्यावेळीं स्वतः व्हरां-ड्यांत एका आरामखुर्चीवर बसून, भावोजी वर्तमानपत्रें वाचीत होते तें ऐकणें चाललें होतें. सदर गृहस्थ पायरीजवळ आलेले पाहून व हंसून स्वतः त्यांना विचारलें कीं, 'कां कसें काय झालें ?' त्याबरोबर ते लागलीच म्हणाले कीं, "आपण म्हटल्याप्रमाणेंच मला दाखला आला. वडिलांच्या खऱ्या प्रेमाचा व त्यामुळें होणाऱ्या सुखाचा अनुभव मला या वेळेस आला. प्रायश्चित्त घेऊन मी उठल्याबरोबर 'आतां वडिलांना नमस्कार करा' असें ब्राह्मणांनीं मला सांगितलें, म्हणून मी दादांच्याजवळ जाऊन नमस्कार करण्यास खालीं वांकलों व नमस्कार केला, तोंच दादांनीं मला पोटाशीं धरून अगदीं मिठी घातली आणि ते गहिं-वरून म्हणाले कीं, 'इतक्या माणसांत तूं आज माझें तोंड उजळ केलेंस.' असें म्हणतांना त्यांच्या डोळ्यांतून पाणी येऊं लागलें व तें पाहून माझ्याहि डोळ्यांतून पाणी आल्यावांचून राहिलें नाहीं. यापूर्वीं दादा इतक्या प्रेमानें वागल्याचें किंवा त्यांच्या डोळ्यांतून अश्रु आल्याचें मी कधीं पाहिलें नव्हतें. अगदीं प्राय-श्चित्त घेण्याच्या वेळेपर्यंत आपण करतों हें बरें नाहीं असें मलाहि वाटत होतें. पण ही दादांची वागणूक पाहून आपण केलें तें चांगलें केलें असें मला वाटलें."

रानड्यांच्या उलट टिळकांची हकीकत होती. ग्रामण्याची अडचण त्यांनाहि कशी जाणवत होती हें वर दिलेंच आहे. पण त्यांनीं जें प्रायश्चित्त घेतलें तें घरच्या किंवा कोणा बाहेरच्या मंडळीच्या आग्रहावरून नव्हे. रानड्यांप्रमाणें टिळकांच्या प्रायश्चित्तावर त्यांचे कोणीहि स्नेही अडून राहिले नव्हते; व कोणी अडून बसले असले तरी त्यांच्या सोईकरितां मनानें मानलेली असली वैयक्तिक मानहानि टिळकांनीं कधींहि सोसली नसती. घरीं पहावें तों त्यांना आग्रह करील असे जबरदस्त माणूस कोणीच नव्हतें, टिळकांचें कुटुंब अगदीं जुन्या वळणांतलें, व त्यांतूनहि आशिक्षित व भिडस्त. टिळकांच्या हट्टी स्वभावाची माहिती असल्यामुळें अमूक असें करा व तमूक असें करूं नका असें अडून बसून सांगण्याची त्यांना कधींच संवय नव्हती. पुण्यांत घरचें वडील मनुष्य म्हणजे टिळकांचे चुलते. पण चुलत्यांच्या मानानें पुतण्याचा दर्जा इतका वाढला होता कीं, बळवंतरावांना अमुक करा असें सुचविण्याचा अधिकार आपणांस आहे असें काका मानीत नसत. पण याहून विशेष गोष्ट टिळकांमध्यें होती ती ही कीं, त्यांना

घरच्या किंवा बाहेरच्या नातलगांपेक्षां किंवा स्नेह्यांपेक्षां, एकंदर जनसमाजाचीच जरब अधिक असे.

समाजाला बरोबर घेऊन जावें, त्याला सोडून जाऊं नये, ही गोष्ट रानडे केवळ धोरण म्हणून पाळीत. पण टिळकांच्या सामाजिक आचारनीतींतलें तें एक आद्य तत्वच होतें. त्यांचा वाद असला तर एकंदर समाजाशीं नव्हता. खिस्त्याच्या हातचें चहापाणी घेणें हा धार्मिक गुन्हा ठरून गळ्याशीं बसलाच तर प्रायश्चित्त-रूपी शिक्षा देण्याचा समाजाचा अधिकार जरूर मान्य केलाच पाहिजे, असें त्यांचें मत होतें. पण समष्टिरूप समाजाचा अधिकार मान्य केला तरी आपणाशीं भांडणाऱ्या प्रतिपक्षीय व्यक्तींच्या हेकेखोरपणाचा जुलूम चालूं द्यावयाचा नाहीं असाहि त्यांचा बाणा असे. "प्रायश्चित्त घ्यावें किंवा न घ्यावें हें माझें मला कळतें, यांत मी दुसऱ्याचें ऐकणार नाहीं. आणि प्रायश्चित्त घ्यावयाचेंच झालें तर तें ह्या त्या रीतीनें, हवें तेथें, माझें मी घेईन." टिळकांच्या मताप्रमाणें प्रायश्चित्त घेणें हें तुरुंगवासाच्या शिक्षेप्रमाणें मानलें तरी, तो तुरुंग एकाच ठिकाणीं नाहीं, असेल तेथें तो बंदिस्त नाहीं व बंदिस्त असेल तेथेंहि त्याचे अधिकारी ठरलेले नाहींत. कोठें तरी तुरुंगांत जाऊन बसून आल्याचा दाखला असला म्हणजे झालें! म्हणून त्यांनीं काशीयात्रेची संधि साधून व सर्व प्रायश्चित्त घेऊन आपखुषीनें घेतलेल्या शिक्षेचा दाखला खिशांत बाळगून ठेवला होता.

धार्मिक वादाप्रमाणें टिळकांच्या दृष्टीनें यांत एक स्थानिक वादहि गुंतला होता. रान-ड्यांना कोणाशीं भांडावयाचें नव्हतें. म्हणून त्यांनीं सरळपणें खुद्द पुण्यास येऊन जवळ जवळ जाहीर रीतीनें प्रायश्चित्त घेतलें, व पंचहौद-मिशन चहापानाच्या आरोपा-करितां तें घेतलें अशी सरळ कबुली दिली. टिळकांनीं या वादांतील प्रत्येक अंगा-संबंधानें व उपांगासंबंधानें वाद घातला. चहापानाकरितां प्रायश्चित्त घेतलें असें कोणी म्हटलें तर, चहा म्हणजे नुसतें पाणी, दूध, साखर व चहाचा पाला! हीं खिस्त्याच्याहि हातून घेतलीं तरी त्यांत दोष नाहीं, असें स्मृतिग्रंथावरून सिद्ध करण्यास ते तयार! टिळकांनीं प्रायश्चित्त घेतलें नाहीं असें कोणी म्हटल्यास, हा विधि मी काशीस गंगास्नानानें व पुण्यास सर्वप्रायश्चित्तरूपानें उरकलेलाच आहे, असेंहि प्रतिपादण्याची त्यांची तयारी. चहाकरितां प्रायश्चित्त घेतलें असें कोणी म्हटलें तर चहापानाच्या पातकाचा संकल्प किंवा उच्चार केला नव्हता अशी शपथ वाहण्यास ते मोकळे! स्थानिक लोकांशीं जुळून नड दूर होण्याचा संभव असल्यास, "शंकराचार्य दूर आहेत, ते बरे आहेत आपण एकजीव झाल्यास बिचारे शंकराचार्य काय करणार?" असलें व्यावहारिक सत्य ते बोलून दाखवीत. बरें, श्रींचें आज्ञापत्र आणून गांवच्या प्रतिपक्षांची खोड मोडतां येत असेल, तर मग शंकराचार्यांच्या अधिकाराला टिळकांसारखा भक्कम आधारस्तंभ दुसरा कोण मिळणार? श्रींनीं पाठविलेले न्यायाधीश शास्त्री अनुकूल पाहून टिळकांनीं नातूप्रभृति वादीपक्षाची

अपात्रता ठरवून फजिती उडवून दिली; व एकादा अधिकृत शास्त्री प्रतिकूल भेटता तर त्याच्या डोक्यांत स्मृतिग्रंथांतील आधार विद्वत्तेच्या जोरावर हाणून त्याला चीत करण्यास दंड ठोकून ते तयार होते. तात्पर्य, स्वधर्माचा अवमान न करतां समाजाला होईल तितकें धरून चालावयाचें येवढेंच मुख्य ध्येय टिळकांनीं आपल्या डोळ्यांपुढें धरून ठेविलें होतें आणि तेवढें साधतां आलें म्हणजे मग 'श्री' पासून 'श्रीमंतां' पर्यंत प्रसंग पडेल त्याप्रमाणें वाटेल त्याशीं झगडून व्यक्तिवर्चस्व स्थापित करावयाचें, असला ग्रामण्याचा हा सगळा खेळ आहे असें मानूनच टिळक चालत असत. यामुळें रानड्यांच्या वागणुकींत सरळपणा दिसला व टिळकांच्या वागणुकींत वक्रता दिसूं लागली. पण याचें कारण हेंच कीं, प्रतिपक्षी अनेक असले तरी रानड्यांना कोणाशींच भांडावयाचें नव्हतें, व रानड्यांपेक्षांहि टिळकांना प्रतिपक्षी अधिक असतां सर्वांशीं झगडूनहि मी जय मिळवीनच मिळवीन अशी महत्त्वाकांक्षा टिळकांना होती !

पुणें-वैभवांत चहापार्टींतील लोकांचीं नांवें प्रसिद्ध झाल्यावर टिळक कोणता पक्ष घेणार हा मनोरंजक प्रश्न सहजच उपस्थित झाला. नेहमींप्रमाणें सुधारकांचे प्रतिस्पर्धी म्हणून त्यांनीं पुणें-वैभवाचा पक्ष उचलावा तर स्वतः तेच चहापार्टींत सांपडले होते. सुधारकांचा पक्ष उचलावा तर त्यांची एकंदरीनें सहानुभूति पुराणमतवाद्यांकडे होती. त्या वेळची माहिती असलेले एक गृहस्थ सांगतात कीं, नातूपक्षानें जर टिळकांना प्रथमच किंचित् सवलत देऊन सहानुभूतीनें वागविलें असतें, तर आपल्या पक्षातर्फे सुधारकांशीं भांडण्याला वकील म्हणून टिळक लाभले असते. पण नातूपक्षाकडे सूक्ष्म विवेक ही गोष्ट केव्हांच नव्हती. कोणतीहि गोष्ट अगदीं एका टोंकापर्यंत नेऊन खेंचावयाची, व तेथेंच खुंटिला वेढा देऊन दोरी तुटेपर्यंत ताणून धरावयाची, हें त्यांचें धोरण नेहमींचेंच असे. यामुळें या प्रसंगीं टिळक हे नातूपक्षाचे वकील न बनतां प्रतिवादी बनले. बरें टिळकांनीं सुधारकांचा पक्ष सर्वस्वीं घेतला होता असेंहि म्हणतां येत नाहीं. टिळकांच्या प्रायश्चित्तासंबंधानें नातूपक्षानें जशी दुराग्रहाची चूक केली तशीच पुणें-वैभवावर पूर्वी फिर्याद करण्याच्या बाबतींत सुधारकांनींहि चूक केली. पुणें-वैभवानें चहापार्टीच्या लोकांचीं नांवें प्रसिद्ध केलीं तीं सर्व बरोबर होतीं; कोणी चहा घेतला न घेतला इतक्यापुरताच खऱ्याखोट्याचा वाद कदाचित् निघूं शकला असता. पण सुधारक-पक्षांतील कांहीं लोकांनीं वकिली बाण्यानें असा वाद मांडला कीं, या बेअब्रूच्या फिर्यादींत खऱ्याखोट्याचा प्रश्न नसून, जातीधर्माविरुद्ध कृत्य केल्याची बातमी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्यामुळें, ती जातीबाहेरच्या लोकांतहि प्रसिद्ध झाली. या गोष्टीविषयीं कोणी एकादें हँडबिल काढून फक्त स्वजातीच्या लोकांतच वांटलें असतें तर त्यांत आक्षेपार्ह कांहीं नव्हतें. पण जरूरीपेक्षां अधिक प्रसिद्धी " एक्सेसिव्ह पब्लिकेशन " हा गुन्हा या प्रसंगीं घडला, अशा मुद्यावर फिर्याद

मांडण्यांत आली ! स्वतः टिळकांचें नांव प्रसिद्ध झालें होतें तरी पुणें–वैभवावर या बाबतींत फिर्याद व्हावी असें टिळकांचें मत नव्हतें; व फिर्याद होतांच त्यांच्या सहानुभूतीचें पारडें पुणें–वैभवाकडे झुकून त्यांनीं संपादकाच्या बचावास मदतच केली. ही फिर्याद न होती तर टिळक सर्वस्वीं सुधारकपक्षाकडे या बाबतींत राहिले असते. पण तें वरील कारणाकरितां घडून आलें नाहीं. उलट नातूंनींहि या चहाप्रकरणाचा फायदा घेऊन, टिळक हे ढोंगी आहेत, त्यांचा धर्माभिमान तोंडदेखला आहे, व वेळ आल्यास ते जातिधर्माविरुद्ध वागण्यास तयार होतील हें चहा प्रकरणावरून सिद्ध होतें, असा त्यांजवर उघड दोषारोप केला. यामुळें नातूपक्ष त्यांच्या मदतीस मुकला. इतकेंच नव्हे तर अखेरपर्यंत जें भांडण जुंपून राहिलें तें मुख्यतः टिळक व नातूपक्ष यांमध्येंच राहिलें.

---

## भाग १३ परिशिष्ट ( १ )

### एक अंतरंगांतला सवाल

पुणें ता. १३ एप्रील सन १९००

राजमान्य राजश्री नामदार बळवंत रावजी टिळक स्वामींचे शेवेसी पोष्य बळवंत रामचंद्र नातु वि. वि. आज आपले येथें वसंतपूजेचा समारंभ असोन, त्या समारंभास येणेंबद्दल आपलेकडून आमंत्रण आलें असल्यामुळें, खालील गोष्टींची माहिती स्वतःचे उपयोगाकरितां पाहिजे म्हणून विचारीत आहें, ती मेहेरबानी करून देण्यांत यावी.

१ मिशनहौस मध्यें चहा पिणें व आपणां उभयतांवर जीं संकटें आलीकडे आलीं त्या कामांत आपणा स्वतःस भोजनाचा वगैरे संसर्ग जाहाला या दोन्ही दोषांस सक्षौर शास्त्रोक्त प्रायश्चित्त पाहिजे असें आपण मानतां काय ?

२ मानीत असल्यास आपण त्याबद्दल येथें प्रायश्चित्त न घेतां तीर्थांचें ठिकाणीं जाऊन जें प्रायश्चित्त घेतलें त्यांत या दोन्ही दोषांबद्दल प्रायश्चित्त आपण केलें काय ?

सदरहूबद्दल उत्तर ताबडतोब यावें अशी विनंति आहे. कळावें बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती.

बळवंत रामचंद्र नातु

Dear Sir,

If you really desire to have my company this night, I hope you will kindly answer the questions put by Shrimant Balasaheb with sincerity & oblige.

Yours obediently
B. R. VAIDYA.

13—4—1900.

## भाग १४ वा

# पंडिता रमाबाईचें शारदासदन

पंडिता रमाबाईच्या शारदासदनाचा वाद बहुतेक वर्तमानपत्रांतून लिहिण्यापुरताच झाला. त्याला इतर फांटे फारसे फुटले नाहींत. हा वाद समजण्यास प्रथम पंडिता रमाबाईविषयीं थोडी हकीगत सांगणें जरूर आहे. पंडिता रमाबाई कांहीं दृष्टींनीं खरोखरच एक लोकोत्तर स्त्री होऊन गेली. हिंदुसमाजाच्या दृष्टीनें त्यांच्या चरित्राचा शेवट हा जसा खेदकारक, तसाच त्यांच्या बालपणचा वृत्तांत अद्‌भुत या सदराखालीं पडण्यास योग्य आहे.

या बाईचे वडील अनंतशास्त्री डोंगरे हे मंगळूर म्हणजे दक्षिण कानडा जिल्ह्यांत पश्चिम घाटाच्या पायथ्याशीं माळहेरंवी गांवीं रहात असत. शास्त्री यांनीं बालपणीं घरांतून पळून जाऊन सहा वर्षेपर्यंत गुरूजवळ वेदाध्ययन केलें. शृंगेरीमठाचे एक अधिपति हे त्यांचे या वेळचे गुरुबंधु होत. पुढें ते पुण्यास येऊन बाजिराव पेशवे यांचे गुरु रामचंद्रशास्त्री साठे यांच्याजवळ शास्त्राध्ययन करूं लागले. बाजिरावाची बायको वाराणशीबाई या संस्कृताचें अध्ययन करून, शुद्ध व मधुरवाणीनें संस्कृत श्लोक म्हणत. तें पाहून अनंतशास्त्री यांनींहि आपल्या घरच्या स्त्रियांना संस्कृत शिकविण्याची प्रथम प्रतिज्ञा केली म्हणतात. साठेशास्त्री बाजिरावाबरोबर ब्रह्मावर्तास गेल्याबरोबर, अनंतशास्त्री घरीं परत जाऊन वडिलांचें कर्ज वारण्याकरितां म्हैसूरचे महाराज वडेर यांचे सभापंडित रामशेषशास्त्री द्रवीड यांच्या घरीं राहिले.

दहा वर्षे म्हैसुरास काढून पुष्कळ पैसा, व पालखी—चवरी वगैरे सन्मान मिळवून अनंतशास्त्री परत घरीं गेले आणि कर्जवाम वारून वडिलांना घेऊन काशीयात्रेस निघाले. यात्रेंत त्यांची स्त्री वारली. तिला त्यांनीं प्रतिज्ञेप्रमाणें संस्कृत शिकविलें होतें. यात्रा संपूर्ण करून वडिलांची रवानगी परत करून दिल्यावर, त्यांनीं काशीस राहून आणखी शास्त्राध्ययन केलें. पुढें नेपाळास जाऊन व तेथें मानसन्मान पावून परत आल्यावर गुजराथ व दक्षिण या प्रांतांत ते प्रवास करूं लागले. पैठण मुक्कामीं वाईचे कोणी माधवराव अभ्यंकर यांची त्यांची गांठ पडली. हे सहकुटुंब वैतागानें काशीस चालले होते, व त्यांचा हा प्रवास प्रत्यक्ष साष्टांग नमस्कार घालीत सुरू होता! त्यांचेबरोबर एक नऊ वर्षे वयाची अंबाबाई म्हणून कन्या होती. अनंतशास्त्र्यांचें वय या वेळीं ४४ वर्षांचें होतें. तरी ते निरोगी व सतेज पाहून त्यांनीं त्यांच्याशीं आपल्या मुलीचें लग्न लाविलें व आपण काशीस निघून गेले.

अनंतशास्त्री आपल्या गांवीं परत गेल्यावर त्यांनीं प्रतिज्ञेप्रमाणें पूर्वीच्या बायकोसारखेंच हिलाहि संस्कृत शिकविण्यास सुरुवात केली. पुढें घरचा अनेक प्रकारचा

त्रास चुकविण्याकरितां ते रानांत दूर जाऊन राहिले; ते इतके एका बाजूस कीं, प्रत्यक्ष वाघाच्या वस्तींत म्हणण्यास हरकत नाहीं. तेथें एक झोंपडी बांधून त्यांनीं आश्रम थाटला व त्यांच्या कीर्तीमुळें तेथें त्यांजकडे अनेक विद्यार्थी शास्त्राध्ययनास येऊन राहिल्यामुळें तेंच गुरुकुल बनलें. अनंतशास्त्री हे पढिक शास्त्री असले तरी मोठे चिकित्सकबुद्धीचे होते; यामुळें बऱ्याच रूढ धर्मसमजुतींविरुद्ध असलेलीं आपलीं मतें ते उघड बोलून दाखवीत. या कारणानें त्यांचे शास्त्रीलोकांशीं वाद होऊन शंकराचार्यांपर्यंत त्यांची कागाळी गेली होती, व या कागाळीला उत्तर म्हणून त्यांनीं शास्त्राधारनिर्णयाचा एक ग्रंथहि लिहिला होता.

या आश्रमाच्या क्षेत्राला 'गंगामूलपर्वत' म्हणत; कारण तेथें तुंगा, भद्रा वगैरे नद्या उगम पावतात. अनंतशास्त्री व त्यांची अल्पवयी स्त्री हीं दोघेंहि उद्योगी व धाडशी असल्यामुळें, त्यांनीं त्या भयाण जंगलांत झाडी वगैरे तोडून सात आठ माणसांचें कुटुंब, वीस पंचवीस विद्यार्थी, व शेंदोनशें गुरें इतक्यांचा चरितार्थ चालेल येवढें कृषिक्षेत्र निर्माण केलें. हरतऱ्हेच्या फुलझाडांच्या सुंदर बागाहि केल्या. या ठिकाणीं अनंतशास्त्र्यांच्या स्त्रीनें आपलें संस्कृताचें अध्ययन बरेंच वाढविलें, व शास्त्री परगांवीं जात तेव्हां लक्ष्मीबाईच विद्यार्थ्यांना पुढचे पाठ सांगत! या ठिकाणीं शास्त्री साडेबारा वर्षे राहिले. त्यांस सहा मुलें झालीं. पैकीं रमाबाईसह आणखी एक मुलगी कृष्णाबाई व मुलगा श्रीनिवास येवढींच जगलीं. रमाबाईचा जन्म सन १८५८च्या एप्रिल महिन्यांत वैशाख शुद्ध दशमीस झाला.

अनंतशास्त्र्यांनीं कृष्णाबाईचें लग्न मातोश्रींच्या आग्रहामुळें अल्पवयांत करून जावई घरजावई केला. पण तो वाईट निघून त्यानें आपल्या व सासऱ्याच्या संपत्तीची लूट केली. इतकी कीं, म्हातारपणीं अनंतशास्त्र्यांना अठरा विश्वें दारिद्र्य आलें. सर्व कुटुंबाची उपासमार होऊं लागली. तेव्हां शास्त्री जलसमाधि घेण्यास तयार झाले. परंतु तो बेत सिद्धीस जाण्याच्या आधींच बिचारा वारला. अर्भकांच्या दुर्दैवानें वडिलांच्या पाठोपाठ आई लक्ष्मीबाई हीहि कष्टांनीं वारली. या वेळीं रमाबाईंना दारोदार हिंडून भाकरीतुकडा मागावा लागला म्हणतात! रमाबाई व श्रीनिवास या अल्पवयी मुलांना आपल्या मातोश्रीची प्रेतयात्रा अर्धवट उरकून घ्यावी लागली! पुढें देशत्याग करून हे बहीणभाऊ प्रवासाला निघाले व निवळ उपजीविका करीत करीत तीं दोघें कलकत्त्यास पोंचलीं. उभयतांची संस्कृत विद्या त्यांना या कामीं उपयोगीं पडली. श्रीनिवास हा शास्त्र शिकला होता व रमाबाईलाहि हजारों श्लोक तोंडपाठ येत असत. शेवटीं दुःखाचा कडेलोट करण्याकरितांच कीं काय रमाबाईचा भाऊहि मरण पावला.

सन १८७८ त मुंबईस अशी बातमी आली कीं, कोणी रमाबाई म्हणून बावीस वर्षांची अविवाहित महाराष्ट्रीय स्त्री कलकत्त्यास प्रगट झाली असून, तिनें तेथील विद्वान् पंडितांस चकित करून सोडलें आहे. बाई पंडिता असून शीघ्र कवयित्रीहि आहे.

प्रो. टॉने, पंडित महेशचंद्र न्यायरत्न वगैरेंनीं तिचा जाहीर सन्मान केला. महाराज ज्योतींद्रमोहन टागोर यांनीं व आनंदमोहन बोस यांनीं या कवयित्रीस स्त्रियांकडून मानपत्र देवविलें. उत्तर प्रत्युत्तरें संस्कृतांतच झालीं. स्त्रीचा सन्मान करण्याकरितां कलकत्त्यास १८७८ त भरलेली ही त्याप्रकारची पहिलीच सभा होय. आपल्या भाषणांत रमाबाईंनीं पुरातनकालीन स्त्रियांची योग्यता, त्यांचें विद्याविषयक प्रेम, समाजांत मिळून मिसळून स्त्रियांनीं व्यवहार करण्याची रीत, प्रौढविवाहाची जुनी चाल व नवीन काळांत अशा विवाहांची आवश्यकता वगैरे मुद्यांचें विवरण केलें होतें. १८७९च्या ११ आगस्टच्या इंदुप्रकाशांत रमाबाईंनीं असें वाचलें कीं, सौ. अनुसूयाबाई नामक एक ब्राह्मण स्त्री उत्तम संस्कृताध्ययन करून भागवतादिकांचा अर्थ सांगते. तेव्हां त्यांना अतिशय आनंद होऊन त्यांनीं अनुसूयाबाईंना मुद्दाम अभिनंदनपत्र पाठविलें होतें. १८८० सालच्या मे महिन्यांत रमाबाईच्या भावास कलकत्यास देवाज्ञा झाल्यावर, बाईचा विचार मुंबईस येऊन राहण्याचा होता व त्यांना तसें आमंत्रणहि गेलें होतें. त्या मुंबईस आल्यानें स्त्रीशिक्षणाच्या कार्यास मोठी मदत होईल अशी आशा स्थानिक सुधारकांना सहजच वाटत होती. पण पुढें रमाबाई आसामांत गेल्या असतां सिल्हट येथें, तेथील वकील बिपिन बिहारीदास मेधावी एम्. ए. बी. एल्. यांच्याशीं बाईचा ब्राह्मो समाजाच्या विधीप्रमाणें विवाह होऊन तो १८७२ च्या तिसऱ्या कायद्याप्रमाणें रजिष्टर झाला.

पण बाईच्या मागें दुर्दैव हात धुवून लागलेलें असल्यामुळें अवघ्या एकोणीस महिन्यांनीं त्यांचा पतिहि अकस्मात् वारला. यावेळीं रमाबाई गरोदर असून पुढें लवकरच त्यांना एक मुलगी झाली. तिचें नांव मनोरमा. ही मुलगी मात्र अखेरपर्यंत त्यांना लाभली. ( तिनें खिस्ती धर्माची दीक्षा घेतली असून ती बी. ए आहे, व अविवाहित राहून केडगांव येथील मुक्तिसदनांत ती आपल्या आईच्या कार्याला सर्व प्रकारें हातभार लावीत असे. ) आपल्या नशीबात संसारसुख नाहीं असें वाटून रमाबाई जन्मभर अविवाहित राहण्याच्याच विचारांत होत्या. पण त्यांच्या विचारास बाध येण्यापुरताच त्यांना संसारसुखाचा लाभ घडला.

यानंतर रमाबाई बंगाल्यांत राहिल्या नाहींत. त्या मुंबईकडे आल्या. पण मुंबईस न राहतां १८८२साली त्या एकदम पुण्यास येऊन दाखल झाल्या. त्यांना पुण्यास कोणीं निमंत्रण केलें, अगर पूर्वसंस्कार त्यांच्या मनांत जागृत झाला, किंवा महाराष्ट्राच्या अभिमानानें मुंबईची राजधानी टाकून त्या पुण्यास आल्या हें कळत नाहीं. कसेंहि असो, चार वर्षापूर्वी पुणेकरांनीं त्यांचें नुसतें नांव कानानें ऐकलें असलें तरी त्यांना आतां मूर्तिमंत पाहून पुणेकर चकित झाले असतील यांत शंका नाहीं. पण त्यांचें तेज, त्यांचें तारुण्य, त्यांची विद्वत्ता, त्यांचें वैधव्य, या सर्व गोष्टींचा परिणाम दोन निरनिराळ्या रीतींनीं लोकांच्या मनावर झाला. रानडेप्रभृति सुधारकांना स्त्रीशिक्षणाच्या दृष्टीनें हें एक मोठें निधानच लाभलें असें वाटूं लागलें. पण उलट, जुन्या विचा-

रांच्या लोकांना समाजावरती एक आपत्ति ओढवत आहे असें वाटलें असल्यास नवल नाहीं. सुधारकांची दृष्टी रमाबाईचें कर्तृत्व व समाजसेवा यांजकडे होती, व जुन्या लोकांची दृष्टी बाई दिसते चांगली पण निघेल कशी कोणास ठाऊक याकडे होती. रानड्यांना रमाबाईस पाहून उपनिषदांतील स्त्रियांची आठवण झाली असेल; व पुराणमतवादी पढिक विद्वानांच्या तोंडांतून, त्यांना पाहून, " अनृतं साहसं माया" हा श्लोक सहज निघाला असेल. बाईचीं पुण्यास पुराणें व व्याख्यानें होऊं लागलीं. दोन्ही प्रकारच्या भावनांचे लोक तीं ऐकण्यास जाऊं लागले. बाई धीट, दुसऱ्यावर छाप ठेवणारी, व हजरजबाबी असल्यामुळें कोणी तिच्याशीं प्रत्यक्ष गांठ घालून वाद किंवा निषेध केला नाहीं. पण पुण्यांतील रिकामटेकड्या अड्डयांवर संध्याकाळीं चालणाऱ्या टीकेंत बाईनीं आपल्या अतर्क्य चरित्रानें पुष्कळच भर टाकली.

१८८२ सालींच रमाबाईनीं पुण्यास ' आर्यमहिला समाज ' स्थापन केला व पुढच्या वर्षी त्याचीच शाखा मुंबईस स्थापन केली. या समाजाचे उद्देश काय असतील हें तपशीलवार सांगण्याचें कारण नाहीं. स्त्रीसमाजाची सर्वांगीण उन्नति हा त्याचा मुख्य हेतु असून त्यांतील दोनतीन कलमें मात्र ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत; तीं अशीं:—

(१) समाजाच्या द्वारें होणारीं कृत्यें व्यक्तिविशेषक नसून सार्वजनिक आहेत म्हणून सभासदांनीं कांहीं विशेष आग्रह किंवा पक्षपात करूं नये. (२) समाजांत सर्वांचा अधिकार सारखा आहे, यामुळें कोणी कोणाची जाति, कुल, धन व पद यांवर नजर देऊं नये. (३) समाजाच्या स्त्रीसभासदांनीं पक्षपात व दुराग्रह सोडून " आमचा प्राण आहे तोंपर्यंत आम्ही आमच्यानें होईल तितकें साह्य करूं " अशी प्रतिज्ञा करावी.

या समाजाच्या हितचिंतक वर्गांत पुढें मुंबईचे अनेक प्रमुख सुधारक सामील झाले हें सांगावयास नकोच. पण रानडे, भांडारकर, वामन आबाजी मोडक, सदाशिव पांडुरंग केळकर वगैरे लोकांच्या नांवांनीं समाजाला जशी कांहीं मदत झाली असेल, तशीच त्यांच्यामुळें समाजाविषयीं लोकांत प्रतिकूल भावना होण्यासहि मदत झाली असेल यांत नवल नाहीं. याच सालीं सर वुइल्यम हंटर यांचें एज्युकेशन कमीशन पुण्यास आलें. त्यापुढें अर्थात् रमाबाईची साक्ष झाली. तिचा साहेब मजकुरांच्या मनावर इतका चांगला परिणाम झाला कीं, विलायतेस परत गेल्यावर त्यांनीं रमाबाईच्या उत्तरांचें इंग्रजींत भाषांतर करविलें, ( या वेळपर्यंत रमाबाई इंग्रजी चांगलेंसें शिकल्या नव्हत्या ) तीं वेगळीं छापविलीं, आणि एडिंबरो येथें याच विषयावर त्यांनीं एक व्याख्यान देऊन आपल्या या अपूर्व माहितीनें श्रोत्यांस चकित करून सोडलें. कारण हेंच कीं, त्याकाळीं हिंदुस्थानांत अशी सुशिक्षित

धीट व पोक्त विचाराची कोणी स्त्री असेल असें विलायतच्या लोकांच्या स्वप्नींहि आलें नव्हतें!

'तुम्ही कमीशनपुढें कोणत्या आधारानें साक्ष देतां' असें हंटरसाहेबांनीं बाईंस विचारलें तेव्हां त्यांनीं दिलेलें उत्तर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. "स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केल्याबद्दल ज्यांचा अतीशय छळ झाला, लोकांनीं ज्यांच्या मार्गांत अनेक अडचणी उपस्थित केल्या व ज्यांच्यावर बहिष्कारहि घातला, अशा एका गृहस्थाची मी कन्या असून स्त्रियांचा दर्जा वाढविण्यासाठीं आजन्म कार्यमग्न रहावें असा मी निश्चय केला आहे." याच साक्षींत स्त्रीशिक्षणविषयक विधायक सूचनांबरोबरच स्त्रियांच्या औषधोपचारांसंबंधींहि कांहीं योजना त्यांनीं सुचविल्या होत्या; व या बाबतींतील त्यांची साक्ष व्हिक्टोरिया राणीच्या वाचनांत आली तेव्हां त्यांच्याच सूचनेनें पुढें लेडी डफरिन फंड, स्त्री डाक्टरिणी व इस्पितळें वगैरेंची सुरुवात झाली असें रमाबाईंच्या एका चरित्र लेखकानें म्हटलें आहे.

पुण्यास असतांना रमाबाईंनीं इंग्रजी शिकण्यास सुरुवात केली. पण हिंदुस्थानांत मिळणारें इंग्रजीचें ज्ञान संपादूनच त्यांच्या महत्त्वाकांक्षेचें समाधान होण्यासारखें नव्हतें. म्हणून त्यांनीं विलायतेस जाण्याचा विचार केला. त्यांच्या पूर्वचरित्रांतील अद्भुत गोष्टी लक्षांत घेतां पूर्ण स्वावलंबन त्यांचें अंगीं मुरलें होतें, आणि मी विलायतेस कां जाऊं व कशी जाईन याची शंकाहि त्यांचे मनांत कधीं आली नसेल, असेंच कोणासहि वाटेल. शिवाय दुसऱ्याहि दोन गोष्टी परस्परविरोधक, पण विलायतेस जाण्याची त्यांचें इच्छित हें कार्य घडवून आणण्यास अनुकूल अशाच झाल्या. त्यांनीं महिलासमाज काढला खरा, परंतु त्यांत त्यांच्या हौसेप्रमाणें जितक्या मुली याव्या, किंवा जितक्या स्त्रीपुरुषांनीं त्यांच्या कार्यांत उडी घालून त्यांस मदत करावी असें त्यांना वाटत होतें, तितक्यांकडून तसें झालें नाहीं. यामुळें महाराष्ट्रीय समाज आपणास चाहत नाहीं, आपली योग्यता ओळखीत नाहीं, याचा त्यांना सहजच विषाद वाटला.

दुसरें कारण असें कीं, बाईंनीं संस्कृताचें अध्ययन केलें असलें तरी तें केवळ व्युत्पत्तिदृष्ट्या. धर्मशास्त्राची त्यांना आवड होती असें दिसत नाहीं. त्यांना संस्कृत काव्य पुष्कळ पाठ येत होतें, पण त्यांनीं एकहि उपनिषद वाचलेलें नव्हतें. बाईंना केशवचंद्र सेन यांनीं "तुम्हीं वेदाध्यान केलें आहे काय?" असा प्रश्न केला. तेव्हां त्यांनीं नाहीं असें उत्तर दिलें व तें खरेंच होतें. "स्त्रियांस वेदाध्ययनाचा अधिकार नाहीं आणि धर्मांशेविरुद्ध वागणें हें पाप आहे" असें कारण त्याच्या समर्थनार्थ त्यांनीं दिलें. पण हें कारण मात्र त्यांनीं खरें दिलें असें आम्हास वाटत नाहीं. त्यांच्या वडलांनीं त्यांना काव्य–व्याकरण पढविलें, परंतु वेदपाठ दिला नाहीं; म्हणून त्यांनीं वरील उत्तरांत आपल्या वडिलांना ओझरता टोला दिला असेल. पण वेदाचें छापील पुस्तक मिळत असतां तें वाचणें

हें धर्माज्ञेविरुद्ध पाप, असें वाटून त्यांनीं माघार घेतली असेल असें मात्र म्हणवत नाहीं. उपनिषदें वाचून त्यांची वृत्ति हिंदुधर्मतत्वाविषयीं साशंक झाली. सिल्हट येथें आपल्या पतीच्या ग्रंथसंग्रहांतील बंगाली बायबल त्यांनीं वाचलें त्याबरोबर त्यांचा कल खिस्ती धर्माकडे होऊं लागला ! मेधावी हे ब्राह्मो होते तरी त्यांना खिस्ती होणें आवडत नव्हतें, व पतिसमागम लाभला असता तर रमाबाई त्यांना काडी मोडून देऊन खिस्ती झाल्या नसत्या असेंहि आम्हांस वाटतें. परंतु पतिनिधनानंतर, त्यांना बंधन उरलें नाहीं, व चांगल्या अर्थानें कां होईना पण मनःपूत वागण्याचा त्यांचा निश्चय झाला असावा.

पुण्यास आल्यावर हुजुरपागेंतील मुलींच्या शाळेच्या सुपरिंटेंडंट मिस् हरफर्ड-बाई यांची व रमाबाईची ओळख झाली. या बाई शाळेच्या मुख्य असतां घरोघर जाऊन बायबलचा प्रसार करण्याचें काम करीत असें म्हणतात. यावरूनच केसरीनें या शाळेविषयीं घेतलेल्या आक्षेपांत तथ्य होतें हें दिसून येईल. हरफर्डबाईकडून रमाबाईना खिस्ती करण्याचें काम घडेना तेव्हां त्यांनीं, सराईत सोनाराच्या हातून कान टोंचण्याकरितांच कीं काय, रे. निमाया गोरे या नेटिव खिस्ती गृहस्थांची व रमाबाईची गांठ घालून दिली. अशा संगतीमुळें व परिस्थीतीमुळें विलायतेस जाण्याच्या रमाबाईच्या हेतूस चांगलेंच पुष्टीकरण मिळालें असेल यांत आश्चर्य नाहीं. मिस् हरफर्ड यांच्या व पुण्यांतील मिशनरींच्या सहाय्यानें बाई अखेर विलायतेस गेल्या, व तेथेंच कांहीं दिवसांनीं त्यांनीं आपल्या मुलीसह बाप्तिस्मा घेतला. विलायतेंतील स्त्रीशिक्षणसंस्थांची सुव्यवस्था व उर्जित दशा, तसेंच पतित स्त्रियांविषयीं समाजाची अनुकंपा, व इंग्लंडांतील सुधारणेचें एकंदर वैभव हीं पाहून रमाबाईनीं आपला देश न टाकला तरी धर्म टाकून दिला. पुण्यांतील लोकांनीं आपल्याला अनास्था दाखविली याचा सूड घेण्याकरितां त्या बाटल्या असें कोणी म्हणतात, पण तें मात्र आम्हांस खरें वाटत नाहीं.

विलायतेंत त्यांचें इंग्रजीचें अध्ययन आणि संघटित संस्थांचें निरीक्षण पुष्कळच वाढलें. चेल्टनहॅम कॉलेजमध्यें त्यांना संस्कृताच्या अध्यापिका नेमण्यांत आलें. इंग्लंडनंतर अमेरिका ओघानेंच येतें. कर्मधर्मसंयोगानें बाई ज्या दिवशीं अमेरिकेंत गेल्या तो दिवस सुप्रसिद्ध सौ. डॉ. आनंदीबाई जोशी यांना त्यांच्या अमेरिकन युनिव्हर्सिटीकडून पदवी मिळण्याचाच होता असें म्हणतात. अमेरिकेंतच यांनीं 'उच्च जातीच्या हिंदू स्त्रिया' हें पुस्तक लिहिलें. पुढें हिंदुस्थानास यावें असा त्यांनीं विचार केला व आपल्या कार्यास मदत मिळविली. अमेरिकेंत स्वामी विवेकानंद यांनीं परिचित वर्गांत हिंदुस्थानाविषयीं मतक्रांती कशी घडवून आणली हें ज्यांना माहीत आहे, त्यांना रमाबाईसारख्या तेजस्वी तरुण स्त्रीनें अमेरिकन लोकांवर तीच छाप पाडली असेल याची कल्पना कोणासहि करितां येईल.

स्वतः रमाबाई ख्रिस्ती असल्यामुळें अमेरिकन मिशनरी लोकांची मदत त्यांना चांगली मिळाली. हिंदुस्थानांत गेल्यावर रमाबाईच्या हातून दहा वर्षेपर्यंत होणाऱ्या कार्याच्या खर्चाचा भार त्यांनीं आपल्या शिरावर घेतला. स्त्रियांना सामान्य शिक्षण द्यावें, धर्मशिक्षण शाळेंत देऊं नये, दिलेंच तर तें मात्र ख्रिस्ती धर्माचें द्यावें, पण संस्था नांवानें ख्रिस्ती ठेविलीच पाहिजे असें नाहीं, अशा शर्ती व सवलती त्यांनीं मिळविल्या व त्याप्रमाणें ता. ११ मार्च १८८९ रोजीं मुंबई येथें 'शारदासदन' नांवाची संस्था स्थापन केली. सदनाच्या उद्देशपत्रिकेंत असें लिहिलें होतें कीं, 'शाळेंत प्रथम निराश्रित उच्च वर्गांतील विधवा व इतर निराश्रित उच्च वर्गांतील स्त्रिया यांची सोय करून, मग सवड राहिल्यास इतरांस घेतलें जाईल.' शाळेंतील सामान्य शिक्षणाशिवाय नीति, मर्यादा, व्यवहार, गृहव्यवस्था, इत्यादींचेंहि शिक्षण देण्यांत यावयाचें होतें. इतरतऱ्हेच्या धंदेशिक्षणाचीहि तजवीज करण्यांत आली होती. कोणी फी दिली तरी वाहवा न दिली तरी वाहवा. प्रथम निराश्रित विधवा व नंतर निराश्रित स्त्रिया अशांना बोर्डिंगांत बिनखर्चीं राहण्याची सोय करण्यांत येणार होती. सदनाची शाळा चौपाटीच्या विल्सन कॉलेजच्या मागें घालण्यांत आली होती. सदनाला अर्थात् एखादें सल्लागार सहाय्यक मंडळ हवेंच होतें, व त्यांत रानडे, भांडारकर, गोपाळराव हरी, लालशंकर उमीयाशंकर, शंकर पांडुरंग पंडित, महिपतराम रूपराम, तेलंग, मोडक, आत्माराम पांडुरंग, डॉ. काणे वगैरे मंडळी होती.

हें सदन कसें काय चालतें तें पाहण्याकडे अर्थात सर्वांचे डोळे लागून राहिले होते. बाई ख्रिस्ती असल्यामुळें तिच्या हेतूविषयीं अनेक लोक सहजच साशंक होते; व लवकरच त्यांना आपली शंका खरी होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. केसरी हा अशा शंकितांपैकींच एक होता. तेव्हां त्याला मिळालेली माहिती त्यानें ताबडतोब प्रसिद्ध केली. २१ डिसेंबर १८८९ च्या 'ख्रिश्चन वुइकली' नामक न्यू यॉर्क येथील पत्रांत खालील मजकूर आला होता, "शारदासदनांत हल्लीं सात बालविधवा विद्यार्थिनी आहेत. त्यांपैकीं दोघींनीं आपली ख्रिस्ती धर्मावरील प्रीति व्यक्त केली. दररोज रमाबाईबरोबर त्या प्रार्थनेस येत असतात. आणखी एक तर आपखुषीनें एका मिशनऱ्याकडून शिक्षण घेत असते. यावरून तेथील विद्यार्थिनींस मतस्वातंत्र्य आहे तें अपायकारक नाहीं व ही संस्था ख्रिस्ती आहे असें स्पष्ट कळून येईल." असलें विधान ख्रिस्ती पत्रांत आलेलें पाहून सदनाचें खरें बेंड फुटलें, असें शंकितांना कळून चुकलें. संस्था नांवानें ख्रिस्ती असूं नये व हिंदू स्त्रियांस तींत प्रवेश असून, त्यांचें मतस्वातंत्र्य राखलें जाईल असें इकडे जाहीर व्हावें व शाळेंत ज्या गोष्टी प्रत्यक्ष घडून येतात त्यांना अनुलक्षून मिशनरी पत्रानें ही संस्था ख्रिस्तीच आहे असें वर्गणी जमविण्याकरितां

कां होईना, अमेरिकन लोकांस कळवावें, हा समजुतीचा घोंटाळा फार दिवस टिकणें अर्थात्‌च शक्य नव्हतें.

या वेळीं केसरी हा शंकितांपैकीं असला तरी, त्याचे त्या वेळचे संपादक वासुदेवराव केळकर यांची रमाबाईच्या उद्योगाला मनांतून सहानुभूति होती. यामुळें ता. २८ जानेवारी १८९० च्या केसरींत वरील माहिती प्रसिद्ध करितांना असें स्पष्ट लिहिलें होतें कीं, संस्था उपयुक्त म्हणून तिच्याबद्दल ही बातमी प्रसिद्ध झाल्यानें बेभरंसा उत्पन्न होईल हें जरी खरें तरी, मिळालेली माहिती मुद्दाम मागें ठेऊन "आम्हीं फसलों, तुम्ही आम्हांस वेळींच सावध कां केलें नाहीं ?" असा आपणावर आरोपहि राहूं नये. शाळा व्यावहारिक शिक्षणाकरितां आहे धर्म-शिक्षणाकरितां नाहीं हें खरें, तरी प्रत्येक विषयांत धर्म विचार जर वेळीं अवेळीं इकडून तिकडून घुसूं लागतील तर त्यांचा ठराविक परिणाम व्हावयाचाच. म्हणून शाळेंत स्त्रिया पाठविणारांनीं, त्या ख्रिस्ती होणें जर त्यांना खपत नसेल तर या माहितीचा खुलासा करून घ्यावा अशी केसरीनें स्पष्ट सूचना दिली होती.

या लेखास उत्तर म्हणून मिस् हॅमलिन् बाईनीं केसरीकडे उपरिनिर्दिष्ट थोर गृहस्थांच्या सहीचें प्रसिद्धीपत्रक पाठविलें. त्यांत "येथें जात, रीतभात, अगर धर्ममतें यांच्याशीं विरोध न येईल अशा प्रकारचें शिक्षकांकडून व व्यवस्थापकांकडून वर्तन ठेविलें जाईल" असें लिहिलें होतें. अर्थात् केसरीनें पुढें विचारिलें कीं, "वरील उद्देशपत्रिका खरी, तर मुली ख्रिस्ती धर्माकडे कशा वळतात ?" केसरींतील लेख पाहून, रमाबाई वर्गणीकरितां बाहेर हिंडत होत्या त्यांनीं ता. २ फेब्रुवारी १८९०. रोजीं केसरींत आपल्या सहीचें पत्र पाठवून असें लिहिलें कीं, "आम्हीं शिक्षणांत अगर खाजगी भाषणांत आमचीं धर्ममतें जोरानें मांडित नाहीं. उलट एका मुलीच्या आईबापांनीं आपली अज्ञान मुलगी ख्रिस्ती होण्याकरितां माझ्या स्वाधीन केली तरी ती अज्ञान म्हणून मी तिला दीक्षा दिली नाहीं. शाळेंतील कोणी मुली सोंवळें, उपवास, तुळशीपूजा वगैरे करितात त्यांस आम्ही हरकत करीत नाहीं. इतक्याहि उपर तुम्ही विशेष उपाय सुचवा ते आम्ही योजूं."

पण 'शारदासदन ही ख्रिस्ती संस्था आहे.' या आक्षेपावर रमाबाईनीं अधीक स्पष्ट व खडखडीत उत्तर दिलें. त्या लिहितातः— "आमच्या देशबंधूंनीं आम्हांस योग्य आश्रय व उत्तेजन दिलें असतें तर शारदासदन ही ख्रिस्ती संस्था होण्याची कांहींच जरूर नव्हती. तीस ख्रिस्ती संस्था होऊं नये म्हणून पूर्वी पुष्कळ प्रयत्न झाला होता व अजूनहि तो सुरू आहे. हिंदूलोक असली शाळा घालण्या-करितां पैसे देईनात म्हणून मी ख्रिस्ती लोकांपाशीं भिक्षा मागितली. आतां तुम्ही ती शाळा चालविण्यास सिद्ध असाल तर आमच्या ख्रिस्ती आश्रयदात्यांकडून या गोष्टीस बिलकुल अडथळा येणार नाहीं. तुम्ही खर्च द्या, हवे ते शिक्षक नेमा. एखाद्या हिंदू बाईला शाळेची मुख्य करा, तसें झालें तरी मूळ हेतूस अनुसरून

आम्ही ख्रिस्ती लोक तुम्हांस मदतच करूं. कोणतेंहि काम स्वतः करण्यापेक्षां लोकांच्या कामांतील दोष दाखविणें हें फार सोपें आहे, हें आम्हाला आणि तुम्हालाहि माहित आहे."

विधायक काम करणारा मनुष्य विध्वंसक टीकाकाराच्या गळ्यांत केव्हांहि अशा रीतीनें घोंगडें अडकवूं शकतो हें उघडच आहे. "व्हायला पाहिजे हें तुम्हा-आम्हाला कबूल, आम्ही करतों हें तुम्हाला सदोष वाटतें हेंहि कबूल, मग तेंच काम तुम्हाला निर्दोष वाटेल त्या रीतीनें तुम्ही कां करीत नाहीं ?" या प्रश्नानें अनेक वादांत अनेकांना कुंठित केलेलें आहे. मुंबईचे सुधारक सदाशिव पांडुरंग केळकर यांनींहि याविषयीं केसरीस पत्र लिहून संस्थेचे साहाय्यकारी चिटणीस म्हणून त्यांनीं असें जाहीर केलें कीं, "सहाय्यकारी मंडळाचें मत रमाबाईच्या मताशीं तंतोतंत जुळणारें नाहीं." सुधारक मंडळीलाहि अर्थातच हा विचार पडला. "संस्था वाटेल तर सर्व खर्च देऊन हिंदू करा." यांत एक प्रकारची धमकावणी गर्भित होती; ती अशी कीं, तसें न होईल तर माल सांभाळा ! मी संस्था ख्रिस्ती करीन. ज्याचा पैसा त्याची फर्मास. वास्तविक सहाय्यक मंडळींनीं हें आव्हान तेव्हांच स्वीकारून, मोठी वर्गणी जमवून, संस्था आम्ही हिंदू ठेवून चालवितों असें म्हणावयास पाहिजे होतें; व मुंबईसारख्या धनिक शहरांत गुजराथी व महाराष्ट्रीय पुढाऱ्यांच्या खटपटीनें तितकी वर्गणी जमलीहि असती. पण विध्वंसक टीकाकार यांचें टीकेचें कामहि जसें परस्पर म्हणजे बिनखर्चाचें, तसेंच साहाय्यकारी मंडळींचें साहाय्यहि त्यांच्या नांवाचें होतें, पैशाचें नव्हतें. रमाबाईनीं दोघांनाहि एकच रोकडा सवाल टाकला होता व तो रोकड रुपयांचा होता. पण टीकाकारांना स्त्रीशिक्षणाविषयीं मनांतून खरी स्फूर्ति व जळजळीत उत्साह नव्हता म्हणून, आणि सुधारकांना कळकळ असली तरी स्वार्थत्यागपूर्वक, इतर कामें टाकून, स्वतःच्या आवडीचें असें एकच काम घेऊन जन्म घालविण्यास त्यांची तयारी नव्हती म्हणून—मिळून दोन्ही कारणांनीं रमाबाईच्या आव्हानास सक्रिय समर्पक उत्तर मिळालें नाहीं. प्रो. कर्वे यांच्यासारखा मनुष्य पुढें कार्यक्षेत्रावर आल्यामुळें या दोन्ही गोष्टींचा मेळ बसून, धर्मानें हिंदू राहून स्त्रीशिक्षण व स्त्रीसहाय्य हे हेतु यथाशक्ति सिद्ध करणारी संस्था निघाली व ती तशी निघाली म्हणूनच रमाबाईना न मिळालेली मदत हिंदुसमाजाकडून कर्वे यांच्या संस्थेला मिळाली.

असो. टीकाकार व साहाय्यकारी मंडळ यांपैकीं खर्चाची मदत कोणाहीकडून होणारी नव्हती. तथापि साहाय्यकारी मंडळाकडून त्याच्या प्रतिष्ठित नांवाची तरी मदत मिळण्यासारखी होती, ती बाईंना हवी होती; व याकरितां केसरींत बाईंनीं लिहिलेल्या पत्राला या मंडळींनीं दिलेला दोष व त्यामुळें त्यांनीं घातलेलें नवीन नियमन हीं दोन्हीं रमाबाईनीं मान्य केलीं. केळकर यांनीं आपल्या पत्रांत कपटाच्या आरोपापासून बाईंना मुक्त केलें; परंतु "या कामांत त्यांची दूरवर दृष्टि पोंचली नाहीं;

त्यांच्या विषयींच्या शंका निराधार असल्या तरी साहजिक आहेत " इतकी तरी कबूली त्यांना मंडळातर्फे द्यावी लागली.

ता. १८ फेब्रुवारीच्या अंकांत केसरी लिहितो कीं, बाईचा हिंदू लोकांवरील आक्षेप आम्हीं समजलों. परंतु अशा संस्थेला हिंदू लोकांकडून हवी तितकी वर्गणी न मिळण्याचें कारण हेंच कीं, तरुण विधवा व स्त्रिया यांनीं अशा शाळांतून स्वतंत्रपणें रहावें:ही कल्पना हिंदू समाजास मानवण्याला अद्यापि थोडा अवकाश आहे. मग उगीच उतावळेपणा दाखवून आपल्या व लोकांच्या जीवाचा संताप करून कां घ्यावा ? बाईची संस्था खाजगी असती तर आम्हीं केवळ दोष दाखविण्याचें लघुत्वहि पत्करिलें नसतें. बाईनीं "शारदासदनाभोंवतालीं एखादा जंगी अभेद्य कोट घालून सार्वजनिक दृष्टी त्यांत शिरूं दिली नसती, तर आम्हाला तरी ही उठाठेव कशाला हवी होती? दोष दाखविण्यांत झाला तरी संस्था सुधारून वाढावी हाच आमचा हेतु."

अशा रीतीनें टीका करीत असतांहि केसरीची बाईस किंचित् तरी सहानुभूति होती; पण केसरीनें प्रसिद्ध केलेल्या माहितीचा फायदा घेऊन पुणे-वैभव वगैरे पत्रांनीं बाईवर काय वाटेल ते लेख लिहिण्यास सुरुवात केली, हेंहि केसरीला खपलें नाहीं. या पत्रांनीं बाईवर इतका गहजब केला कीं, त्या ख्रिस्ती धर्माचें शिक्षण बळेंच देत होत्या असेंच क्षणभर घेऊन चाललें तरी त्यांची टीका अश्लाघ्य ठरते. बाईविषयीं केसरीची 'पूर्वीची बुद्धी' अद्याप कायम होती. बाई चुकल्या असतील पण चुकत नाहीं कोण ? त्यांना चुकीचा इषारा द्यावा पण निर्दयपणें निर्दालन करूं नये. त्यांजकडून यथाशक्ति होणारा उपयोग करून घ्यावा असेंच केसरीला अद्यापि वाटत होतें.

कर्मधर्मसंयोगानें हिंदूंनीं ख्रिस्तीधर्माची दीक्षा घेणें हा विषय दुसऱ्या एका रीतीनेंहि याच वेळीं लोकांपुढें आला होता. गोपाळ विनायक जोशी म्हणजे डॉ. आनंदीबाई जोशी यांचे पति, यांच्या विनोदमिश्रित कुटिल बुद्धीचें वर्णन मागें एका प्रकरणांत आम्हीं दिलेंच आहे तथापि या धर्मांतराच्या विषयाला लागू म्हणून पुण्यांतील ग्रामण्याप्रमाणें ख्रिस्तीधर्म-विटंबनेची त्यांनीं जी एक गमतीदार लीला याचवेळीं केली तिचाहि उल्लेख येथें करणें जरूर आहे. कारण शारदासदनावरील आक्षेपांत झालें तरी हिंदूंचें धर्मांतर होण्याची भीति हीच मुळाशीं होती. या सुमारास मिशनरी लोकांची थट्टा करण्याकरितां म्हणा, किंवा धर्मांतर ही अगदीं क्षुल्लक गोष्ट आहे, तिला मुळांत कांहींच अर्थ नाहीं व लोक तिला उगाच महत्त्व देतात असें लोकनिदर्शनास आणण्याकरितां म्हणा, गोपाळराव जोशी यांनीं एक भोळा व अधाशी मिशनरी गांठला, व चल मी तुला एक सुशिक्षित हिंदू येशूच्या कळपांत जाहीर रीतीनें शिरणारा देतों असें भासवून नादाला लाविलें.

आणि अमुक दिवशीं अमुक वेळीं आपण संगमावर जाऊन बाप्तिस्मा घेणार अशी वर्तमानपत्रांतून जाहिरातहि दिली.

ही जाहिरात वाचून शारदासदानाच्या घोंटाळ्यानें झालेली लोकांच्या विचारांची खळबळ अधिकच वाढली. गोपाळराव धर्मांतर करून स्वयंबहिष्कृत होणारच; परंतु धर्मांतर केल्यानेंहि मनुष्य व्यवहाराला बहिष्कृत होण्याचें कारण नाहीं व हेंच आपण सिद्ध करून देणार आहों, असा एक नवीन मनोरंजक वादाचा मुद्दा त्यांनीं उपस्थित केला. व त्यांनीं दीक्षा घेण्यापूर्वींच पुढें त्यांच्याशीं कसें वागावयाचें हा वाद लोकांत जोरानें सुरू झाला. जोशी यांचें धर्मांतर रमाबाईच्या धर्मांतरासारखें नसून कांहीं तरी त्यांत गूढ असा अभिप्राय आहे असें विचारी मनुष्यास वाटण्यास जागा होती व केसरीनेंहि खालील शब्दांनीं या विचारास चलन दिलें होतें:—"ज्या गृहस्थानें धर्मांतर केल्याशिवाय पृथ्वीप्रदक्षिणा केली, इतकेंच नव्हे तर कै. डॉ. आनंदीबाई जोशी या धर्मांतर केल्याशिवाय परत आल्या, याचें श्रेयहि बऱ्याच अंशीं ज्यासच द्यावयास पाहिजे, व ज्यानें अमेरिकेंत असतां आर्यधर्मतत्वाचें व्याख्यानरूपानें समर्थन केलें, तो गृहस्थ आज सहसा धर्मांतर करण्यास प्रवृत्त होईल असें आम्हांस तर वाटत नाहीं." एक गोपाळराव खिस्ती झाल्यानें येवढ्या मोठ्या हिंदुसमाजाची कितीशी हानि होणार? पण त्यांनीं उपस्थित केलेला प्रश्न महत्त्वाचा खरा. हिंदू लोक अनेक देव व दैवतें मानतात, त्यांतच कोणी येशु खिस्त हाहि एक माझा देवच आहे असें म्हटलें तर त्याला हरकत कशी घेतां येणार? इतर सर्व हिंदुधर्माचे रीतरिवाज बरोबर पाळावयाचे, त्यांपासून किंचित्‌हि भ्रष्ट व्हावयाचें नाहीं; फक्त तेहतीस कोटी देवांत आणखी एक खिस्ताची भर टाकावयाची, यांत काय पाप? दशावतारांत वेदविरोधी बुद्धाची गणना केल्यानें हिंदू बौद्ध ठरत नाहीं. मोहरमामध्यें हातांत गंडा बांधून कोणी हिंदू नाचला व त्यानें महंमद पैगंबराला मान दिला म्हणून तो मुसलमान होत नाहीं. प्रार्थनासमाजिष्ट वेद, कुराण, बायबल, वगैरे धर्मग्रंथ सारख्याच योग्यतेचे समजतात म्हणून कांहीं ते हिंदू नाहींसे होत नाहींत. तर मग खिस्त हाहि आपला देव म्हटल्यानें कोणी हिंदु समाजबहिष्कृत कां व्हावा?

पण गोपाळरावांनीं हें एक कांटेरी तारेचें कोडें जितकें हिंदूंच्या पोटांत खुपण्याकरतां तितकेंच मिशनऱ्यांचें आंतडें फाडण्याकरितां निर्माण केलें होतें. त्यांना असें दाखवावयाचें होतें कीं, खिस्ती दीक्षा घेणारा मनुष्य जर फिरून आपल्या धर्मांत येईल, व समाज त्याला घेईल, तर तें एक मोठेंच कार्य झालें. कां कीं, एकाचा जसा हिंदुधर्मांत पुनः संग्रह करावयाचा, तसाच इतरांचा; व पूर्वी स्वतः किंवा वाडवडिलांच्या चुकीनें जे हजारों हिंदू खिस्ती धर्माच्या जाळ्यांत सांपडले आहेत त्यांना तें जाळें तोडून परत हिंदुधर्मांत येण्याच्या मार्गाची ती एक सूचनाच होणार होती. खिस्ती धर्मदीक्षेची थट्टा

करण्याकरितांच मुख्यतः गोपाळराव ती घेणार होते. केसरीचा अंदाज असा होता कीं, गोपाळरावांच्या या तडजोडीस हिंदूंपेक्षां ख्रिस्तीच अधिक प्रतिकूळ होतील; कारण आमच्या हिंदु देवांपेक्षां ख्रिस्तदेव हाच खरा असहिष्णु आहे. त्याला जोडीदार देव खपत नाहीं.

या नवीन चळवळीचा परिणाम शारदासदनाच्या जुन्या चळवळीवर झाला. या वर्षाच्या आगस्ट महिन्यापर्यंत हा वाद चालू राहून मिस् हॅमलिनबाईंना खरी हकीगत कळविण्याकरितां पुण्यास यावें लागलें. त्यांचें या विषयावर जोशी हॉलांत ता. ३० जुलै रोजीं व्याख्यान झालें. तेव्हां रानडे, नूलकर, देशमुख, भिडे, गोपाळराव गोखले, लक्ष्मण मोरेश्वर देशपांडे, विनायक नारायण आपटे वगैरे मंडळींनीं शारदासदनास यथाशक्ति मदत देण्याचें फिरून वचन दिलें. ही जाहीर खबर केसरीनें प्रसिद्ध केली; तथापि त्यावर प्रतिकूळ टीका केली नाहीं. केसरींतील येथपर्यंतचे या प्रकरणावरील लेख त्यांच्या भाषासरणीवरून वासुदेवराव केळकर यांच्या हातचे दिसतात. या सुमारास संमतिवयाच्या बिलाचा वाद सुरू झाला व १८९० सालच्या कलकत्ता येथील राष्ट्रीयसभेहून परत येतांच टिळकांनीं या बिलाचा वाद चालविण्याकरितां केसरी आपल्या हातीं घेतला. येथून त्यांचें व वासुदेवराव केळकर यांचें बनेनासेंच झालें. पूर्वी अनेक दिवस वाद चालून टिळकांनीं वर्तमानपत्रें घ्यावीं व इतरांनीं छापखाना घ्यावा असा निर्णय होण्याचा कल दिसूं लागला होता, व संमतिवयाचा वाद संपण्याचे सुमारास केसरी हा धड टिळकांचा नाहीं व धड केळकरांचा नाहीं अशी स्थिति संपादकीय दृष्ट्या झाली होती.

या सुमारास कित्येक आठवडेच्या आठवडे केसरींत एकदोन कॉलमहि चांगला मजकूर आल्याशिवाय जात. व ता. ९ जूनच्या केसरीच्या अंकांत अग्रलेखाच्या जागीं, " पुस्तकांची पोंच, आभारपूर्वक स्वीकार व अभिप्राय " मथळ्याखालीं, सुमारें वीस पुस्तकांवर दोन कॉलम अभिप्रायाचे सटरफटर पॅरिग्राफ घातलेले आढळतात. यांत, तीन आणे किंमतीची मुलांची स्मरणवही, चार आणे किंमतहि देखील ज्यास फार भारी असें मत ज्यावर दिलें गेलें, असलें "हिंदुस्थानांतील लोकमत" नांवाचें चोपडें, दीड आणा किंमतीचा "मुंबईचा संगीत वाटाड्या" व दीड आणा किंमतीची शिराळ्याची छोटी काँग्रेस असलीं पुस्तकें आहेत. केसरीच्या अग्रलेखाच्या स्थानीं ज्यांच्यावरील अभिप्रायाला जागा मिळाली, त्या या पुस्तकांचें भाग्य मोठेंच म्हटलें पाहिजे. पण करणार काय? एखादी इमारत एकखांबी असतांहि ती उचलून घेऊन नीट करावयाची असतां, वेळीं तो खांब देखील काढून टाकून व वेड्यावांकड्या कांहींतरी कैच्या देऊन, चार दिवस कशी तरी इमारत सांभाळावी लागते. त्यांतलाच केसरीचा हा प्रकार झाला म्हटल्यास हरकत नाहीं.

पण पुढच्याच अंकापासून ही स्थिति निःसंशय सुधारलेली दिसते. कारण ता. १६ जूनच्या केसरींतच टिळकांच्या लेखणींतून उतरलेला अग्रलेख त्यांत आलेला दिसतो. त्याच्या डोक्यावरील "खलः सर्षपमात्राणि परछिद्राणि पश्यति" हें अवतरण व दीड कॉलमच्या लेखांत पांचचार जाड्या अक्षरांतील पोटमथळे आलेले आहेत. पण तसेंच दुसरें गमक यांत आहे व तें म्हणजे अनेक महिन्यांनीं रमाबाई प्रकरणावर पुन्हां आलेलीं चरचरीत स्फुटें. मिस्. हॅमलिन यांच्या पुण्यांतील खटपटीस अनुसरून यापूर्वी कित्येक महिने पुण्यास शारदासदनाची एक शाखा स्थापन झाली होती. परंतु त्यांत घोंटाळेहि सुरू झाले होते. या विषयावर लिहितांना संपादकीय पूर्वपरंपरा ठेवलीसें दाखविण्याकरितां केसरीनें अशी प्रस्तावना केली कीं, रमाबाईनीं जुळविले इतके पैसे आमच्यानें आज जुळवत नाहींत म्हणून आम्हीं सदनाविरुद्ध आजवर फारसें लिहिलें नाहीं; परंतु सत्य केव्हां तरी जगापुढें आलेंच पाहिजे व तें जितकें लौकर येईल तितकें चांगलें.

या सुमारास हॅमलिनबाई पुण्याहून निघून गेल्या व सदनांत धर्मशिक्षण दिलें जाणार नाहीं या आश्वासनाविरुद्ध वर्तन सुरू झालें. म्हणून सदनाचा मुख्य हेतु स्त्रीशिक्षण नसून शुभवर्तमानप्रसाराचा आहे असें लोकांस वाटूं लागलें. रा. ब. रानडे सल्लागारमंडळांत होते पण त्यांची विचासरणी अशी कीं ' विधवांची शाळा मिशनरी लोकांची असली म्हणून काय झालें. त्यापासून कांहींतरी आपला फायदा होणारच. पंडिता रमाबाईनीं धर्मांतर केलें म्हणून आमच्या स्त्रियांस शिकविण्यास त्यांस काय हरकत आहे. आपण बरें तेवढें घ्यावें वाईट तेवढें सोडून द्यावें.' यावर टीका करून केसरी म्हणतो, "अशा सल्लागारांच्या माथ्यावर लोकांस फसविल्याचा दोष बसेल. स्त्रीशिक्षणाचें पांघरूण घेऊन आमच्यांत घुसूं पाहाणाऱ्या खिस्ती बाया व त्यांस सहाय्य करणारे व्यवस्थापक—मग ते कितीहि विद्वान् अगर राजविभूषित असोत—त्यांस आम्ही आपल्या समाजाचे, हिंदुत्वाचे आणि स्त्रीशिक्षणाचे सुद्धां शत्रूच समजतों "

या टीकेला उत्तर म्हणून, रानडे यांनीं ज्ञानप्रकाशांत ता. १७ जून रोजीं पत्र लिहिलें. त्यांत पं. रमाबाईकडून मुद्दाम आणविलेलें पत्रच बहुतेक छापलेलें असून, त्यांतील हकीगत स्वतः आपण व भांडारकर यांनीं खरी असल्याची खात्री करून घेतली आहे असें सर्टिफिकीट दिलें होतें. रमाबाईच्या पत्रावरून असें दिसतें कीं, सदनाच्या व्यवस्थेसंबंधानें अमेरिकेहून मिशनरी आश्रयदात्यांकडून नवी खुलासा व सूचना मागविल्या होत्या; त्या येईपर्यंत रानडे, भांडारकर वगैरे मंडळीनीं आपले राजिनामे देण्याचें तहकूब केलें. दरम्यान बाईनीं मराठा, केसरी, शिवाजी, पुणेंवैभव, ज्ञानप्रकाश वगैरे पत्रांतून आलेल्या आक्षेपांचा स्पष्ट इनकार केला होता. ता. २३ जूनच्या केसरींत 'शारदासदन व रानडे यांची मध्यस्थी' या सदराखालीं ' जनोऽविद्वान् एकः सकलमभिसंधाय कपटैः '

या अवतरणाखालीं सदनावरील आक्षेप पुनः एकवार देले होते. या आक्षेपांस खरें उत्तर असें एकहि नाहीं असें म्हणून, केसरीनें पुढें असें लिहिलें कीं, रानडे-प्रभृतींच्या सदनाच्या कारभारांत हात घालण्याचा अधिकार अमेरिकेंतील मिशनरींनीं काढून घेतलेलाच आहे; परंतु ही गोष्ट ते जाहीर करीत नाहींत, लपवून ठेवतात. मंडळीस सदनांत चहा पिण्यास जाण्याचा किंवा कोरडा सल्ला देण्याचा शुष्क अधिकार असेल, पण सदनांत खिस्ती धर्मशिक्षण दिलें जाणार नाहीं अशी हमी घेण्यास रानडे तयार नाहींत. पंडितेसारख्या उच्छृंखल अधुनिक कामंदकीच्या वृत्तीस आळा घालणें म्हणजे वाऱ्याची मोट होय. त्या आपणास हवी तशी व्यवस्था ठेवणार, वाटेल तर त्या तुळशीवृंदावनहि उडवून देणार ! व तें नको म्हणण्यास रानड्यांना अधिकार नाहीं. तात्पर्य, रानडे हे स्वतः फसून दुसऱ्यांनाहि फसविण्यास कारण होत आहेत.

ता. ७ जुलैच्या अंकांत 'सदनावरील बाई व कोठीवरील बाई' या मथळ्याखालीं कोणा कृष्णाबाई नांवाच्या स्त्रीचें पत्र केसरीस आलेलें छापलें आहे. कृष्णाबाई ही रमाबाईची सख्खी आतेबहीण. त्यांजकडे सदनांतील कोठीचें काम दिलें होतें. सदर पत्रांत तिनें सदनांत काय काय प्रकार होतात याचें थोडें वर्णन दिलें आहे. या बाईचें व त्या बाईचें पटेना तेव्हां ती सदनांतून निघून गेली. " माझ्याबद्दल खोटें नाटें लिहून कळविलें आणि सदनाची अब्रू राखण्याकरितां माझी अब्रू खराब केली " असा या बाईनें आरोप केला. तिनें आणखी असेंहि लिहिलें कीं, पालकांनीं आग्रह केला तरी मुलीस तुळशीपूजा करूं देत नाहींत, अगर हिंदु देवळांत जाऊं देत नाहींत किंवा उपास करूं देत नाहींत. वेळ जातो, उशीर होतो, वाईट लोकांची संगति घडते अशा सबबी सांगतात. केसरीला हें बरेंच कूळ मिळालें. गमतीखातर मुली जर खिस्ती देवळांत नेण्यांत येतात, तर गमतीखातर तरी त्यांना हिंदू देवळांत कां नेण्यांत येऊं नये, हा प्रश्नच आहे. आपण राजिनामे दिले तरी सदनास अपाय करूं नये असा रानड्यांचा हेतु. पण बाई एक ठक तर आपण सात ठक म्हणून अद्यापि संबंध ठेवितों असें म्हणणारेहि कांहीं सल्लागार होते. पण ही त्यांची हुशारी फुकट. मंडळ मोडलें तें कागदपत्रांनिशीं जाहिर कां करीत नाहीं, असा केसरीचा सवाल. पण त्याला स्पष्ट उत्तर मिळेना.

ता. १४ जुलैच्या केसरींत तर पुराव्याचें माप प्रतिपक्षाच्या पदरीं घालण्याकरितां केसरीनें कांहीं निशाण्या प्रसिद्ध केल्या. पैकीं नं. (१) च्या निशाणींत १८८५ सालीं बाईनीं रॉसेल येथें व्याख्यान दिलें, त्यांतील उतारा आहे. या उताऱ्यांत खरोखरच खालील वाक्य होतें " या थोर बाईच्या मनांत असें आहे कीं, हिंदु विधवांस शिक्षण देऊन, आपण स्वतः ज्या खिस्तीधर्माच्या सुखाचा अनुभव घेत आहों त्या धर्माचा हिंदुलोकांस उपदेश करण्याकरितां त्यांना ( विधवांना ) तयार करून

पाठवावें." निशाणी नं. (२) हा रमाबाईच्या पुस्तकांतीलच एक उतारा आहे. त्यांत बाईनें अमेरिकन लोकांना मदत देण्याविषयीं प्रार्थना केली असून त्यांतील एक वाक्य असें आहेः—" शुभवर्तमानाच्या प्रसाराचा मार्ग सोपा होण्यासाठीं हिंदू लोकांच्या जनान्याची कुलुपें तोडून त्यांचे दरवाजे प्रथमतः खुले करणें हें सर्वांत अधिक महत्त्वाचें, अशा समजुतीनेंच मी पैशाबद्दल विनंति करण्याचें धैर्य केलें आहे." इतर निशाण्यांतूनाहि अशींच कांहीं विधानें आहेत. उदाहरणार्थ मुलींना बायबलें देऊं, ख्रिस्तीधर्मप्रसाराकरितां प्रार्थना करूं; इत्यादि.

या साळ्याभोळ्या प्रकाराचें वर्णन टिळकांनीं खालील शब्दांनीं केलें आहे. " हिंदुधर्मास आग लावण्याची पंडिता रमाबाईची बिलकुल इच्छा नाहीं. फक्त घरांत पोरें बाळें आहेत अशी संधी पाहून घरावर या बाई निखारे आणून ओतणार. आणि मोठ्या कळवळ्यानें ' देवा, माझ्या मनुष्याच्या हातून जें अल्प काम व्हावयाचें तें झालें आहे; पुढील वाट लावणार तूं समर्थ आहेस ' अशी प्रार्थना करणार! ही देवपूजा चालली असतांना आमचे रा. ब. तुतारी किंवा शिंग वाजविण्यास तयार आहेतच. ' तूप व विस्तव एके ठिकाणीं आणून 'देवा, येवढें तूप पातळ कर' अशी मी नुसती प्रार्थना करितों, तूप पातळ होण्यास जबाबदार मी नाहीं, असें म्हणणारा व रमाबाई हीं एकाच माळेंत बसतात." असें म्हणून मुली बाटल्यांची जबाबदारी रा. ब. रानडे यांच्या डोक्यावर राहील अशी स्पष्ट धमकी केसरीनें दिली होती. बाईविरुद्ध शाबीत करतां आलेल्या एका गोष्टीची किंमत त्यांच्या दहा नाकमूल्यापेक्षां अधिक आहे ही गोष्ट, केसरी म्हणतो, "रमाबाईचे राघूसारखे बोल ऐकण्याचें नादांत किंवा तिच्या कस्तूरीपरिमलगुणग्रहणांत सुधारककर्त्यांच्या लक्षांतून घसरली असावी. " केसरीनें शेवटीं असें ठरविलें कीं, रमाबाईचें विधवामिशनगृह हें सरकारी किंवा मिशनरी शाळांपेक्षांहि वाईट. सरकार धर्मशिक्षणाविषयीं तटस्थ असतें व मिशनरी हे बोलून चालून बाटविण्याच्या उद्देशानें आलों असें म्हणतात. पण बाईच्या शाळेंत शिक्षणाचें ढोंग आणि बाटविण्याचा हेतु. याहून अधिक लिहिण्याचें तें काय राहिलें ! केसरीनें लोकमत खरें प्रदर्शित केलें व रानड्यांना उत्तरच देण्यास राहिलें नाहीं असें लोक म्हणूं लागले.

अखेर ता. १३ आगष्ट १८९३ रोजीं शारदासदनाचे बोस्टन येथील अमेरिकन अधिकारी यांना, डॉ. भांडारकर, माधवराव रानडे व चिंतामणराव भट यांनीं पत्र लिहून आपला संबंध कायमचा तोडून टाकला. ते लिहितातः—

"We have strong reasons to believe, that many of the girls are induced to attend her (Ramabai's) private prayers regularly and read the Bible, and that Christian doctrines are taught to them. Pandita Ramabai has also shown her active missionary

tendencies by asking the parents and guardians of girls to allow them to attend her prayers and in one case at least, to become Christians themselves; and we are assured that two of of the girls have declared to their elders that they have accepted Christ. Such a departure from the original understanding cannot fail, in our opinion, to shake the stability of the institution and alienate public sympathy from this work. We are sorry, our individual remonstrances with the Pandita Bai have proved of no avail. If the Sadan is to be couducted as an avowed proselytising institution we must disavow all connection with it."

याच सुमाराला हिंदुमुसलमानांच्या दंग्यांमुळें सदनांतील मुली घरोघर पोंचविण्यांत आल्या व ही गोष्ट आयतीच पथ्यावर पडली. कारण भांडारकर रानडे यांचा राजिनामा वाचून बहुतेक पालकांनीं मुली आल्या त्या घरींच ठेवून घेतल्या. रानडे भांडारकर प्रभृतींच्या पत्राला पंडिता बाईनें आपलें उत्तर सुधारकांत प्रसिद्ध केलें. तसेंच प्रि. आगरकर यांच्याशीं याच विषयावर बाईचा संवाद घडला, तोहि प्रसिद्ध झाला होता. रानडे वगैरे संबंधानें बाईचें म्हणणें असें कीं, ही मंडळी व्यवस्थापक बोर्डांत चारदोन वर्षें असतांहि त्यांनीं हल्लींच्या गोष्टींचा गवगवा पूर्वी केला नाहीं. याचा अर्थ आक्षेपार्ह गोष्टी पूर्वींपासून घडत असून, त्यांकडे रानडे वगैरेंनीं दुर्लक्ष केलें किंवा त्या चालूं दिल्या असा होतो. पण हें खरें दिसत नाहीं. निदान केसरीनें तरी त्यांजवर असला आरोप केला नव्हता. रानड्यांचें या बाबतींत अज्ञान होतें; पण तें अज्ञानच त्यांना कमीपणा आणणारें आणि लोकांची गैरसमजुत करणारें होतें, इतकाच केसरीचा आक्षेप. बाईनीं एक मजल पुढें जाऊन आपला बचाव करण्याकरितां उलट रानड्यांवर हल्ला करून आक्षेपित गोष्टींचें प्रत्यक्ष ज्ञानच त्यांच्या गळ्यांत घातलें. आगरकर यांजजवळ तर बाईनीं स्पष्ट सांगितलें कीं, "सदनांत येतांना मुलीचा हिंदुधर्म असला तरी त्यांतून ती बाहेर पडतांना तो हिंदूच राहील असा जिम्मा माझ्यानें घेववत नाहीं." वीस मुली ख्रिस्ती धर्मोपदेशाला हजर राहतात व त्यांचें धर्मांतर न होण्याची हमी घेण्याचें बाई नाकारतात याचा अर्थ उघडच आहे.

तात्पर्य, आगरकरांनाहि कबूल करावें लागलें त्याप्रमाणें, आपणावर कोणचेंहि दृढ बंधन करून घेण्याची बाईंना इच्छा नव्हती व शक्तीहि नव्हती. आगरकरांनीं तरी सदनाचा अर्थ "हलक्या जातींच्या अनाथ मुलींसाठीं ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या असामान्य ब्राह्मण स्त्रीनें चालविलेलें मिशनरी स्कूल" असा केला व तो बाईनींहि प्रांजलपणें मान्य केला. अशा रीतीनें रानडेप्रभृति सुधारकांना बाईच्या सहवासामुळें कमीपणा आला. पण त्यांत एकच फायदा

झाला तो असा कीं, कांहीं झालें तरी आम्ही हिंदू हे हिंदूच राहणार, खिस्ती धर्म हा परका आहे तो आम्हांस नको, आमच्या धर्मसहिष्णुतेची किंवा स्त्रीशिक्षणाविषयींच्या इच्छेची मजल खिस्ती होण्यापर्यंत जात नाहीं, असें दर्शविण्याइतकें तापट वर्तन त्यांच्या हातून जाहीरपणें घडलें. धर्मांच्या भांडणांत असा निकाल केव्हां तरी एकदां लागावा लागतो, आणि विश्वबंधुत्वाच्या कल्पनेच्या राज्यांतहि तुटक आंखीव खास प्रांत ज्याचे त्याचे म्हणून असतात, असावे लागतात, व ठेवणें योग्य होतें, हें रानड्यांसारख्या निर्विकार शांतिब्रह्मरूप मनुष्याच्या कृतीनें हडसून खडसून सिद्ध झालें; हा या वादांतील एक लाभच म्हटला पाहिजे.

शारदासदनांतून मुली काढल्या खऱ्या, पण त्यांची पुढें सोय काय करावयाची हा प्रश्न सहजच उपस्थित झाला. सदनावर टीका करणाऱ्यांच्या डोक्यावर ती एक यथान्याय जबाबदारीच येऊन पडली. विध्वंसक टीकाकारांची खरी कसोटी विधायक कार्यक्रम पुढें येऊन उभा असतो तेव्हांच उतरते. शारदासदनांतून निघालेल्या मुलींच्या शिक्षणाची कांहीं तरी सोय करणें अवश्यच होतें. त्याप्रमाणें खटपट होऊन, फीमेल हायस्कुलांत दहा मुली घेण्याची व्यवस्था झाली.

यापुढील हकीकत विशेष देण्यासारखी नाहीं. रानडेप्रभृतींची अखेर बाईंच्या खऱ्या हेतुसंबंधानें पक्की खात्री झाली म्हणून त्यांनीं सल्लागारमंडळाचे कायमचे राजिनामे दिले. बाईनाहि या सल्लागारांपासून पैसा किंवा मुली वगैरे कोणत्याहि बाबतींत मदत होण्याची आशा नव्हती, यामुळें त्यांनींहि अधिक आग्रह न धरितां, आपल्या मागची एक उपाधी आयतीच टळली व आपण स्वतंत्रपणें वावरण्यास मोकळे झालों, याविषयीं आनंद मानिला. या मंडळींनीं सोडल्यावरहि बाईंचें काम कांहीं वर्षें पूर्वींच्याच मिश्र धोरणाला अनुसरून चाललें होतें. परंतु श्रेष्ठ जातींच्या कुलविधवा किंवा अविवाहित तरुण स्त्रिया पुष्कळशा जमवून व शिकवून हिंदुसमाजांतील स्त्रीदास्यविमोचनाकरितां त्यांना मोकळ्या पेरावयाच्या, ही जी बाईंची कल्पना, ती साध्य होण्याचा संभव दिसेना.

१८९५ च्या नोव्हेंबर महिन्यांत अशी बातमी आली कीं, पंडिता रमाबाईंनीं शारदासदनांतील दहाबारा मुली व बाया एकदम बाटविल्या. पूर्वीं धर्मांतर होत असे पण व्यक्तिशः व किरकोळ होत असे. धर्मांतराचा हा व्यापार आतां घाऊक रीतीनें चालूं लागला, आणि धर्माच्या बाबतींत कट्टया निग्रही असणाऱ्या ज्या स्त्रिया त्याहि डझनांनीं बाटूं लागल्या, असें पाहून शारदासदनासंबंधानें लोकांना चीड आली असल्यास नवल नाहीं. लोक म्हणूं लागले कीं, खिस्ती लोकांच्या पैशावर चाललेल्या सदनांत मुली अखेर बाटविल्या जाणार हें सांगण्याला कोणी ब्रह्मदेव खालीं उतरावयाला नको होता. पण भोळे सुधारक फसले, आणि कोणी स्त्रीशिक्षणाच्या मोहक नांवामुळें तर कोणी अनाथ विधवांच्या कळवळ्यामुळें

मोहांत पडून आपल्या भावजया, बहिणी, मुली, सदनांत घालून हिंदुधर्माबाहेर कायमच्या लोटून दिल्या !

बाईंना हें माहीत नव्हतें कीं, कोणत्याहि समाजाचें पोट अशुद्ध झालें म्हणून फोडावयाचें तरी तें बाहेरून फुटत नसतें. त्याला पोटांतच प्रवेश करावा लागतो. पोटांत प्रवेश केलेल्याला पोट फोडून बाहेर निघतां येतें, आंत कायमचें गुरफटून रहावें लागत नाहीं किंवा पचूनहि जावें लागत नाहीं. कचानें संजीवनी विद्या शिकतांना असेंच केलें होतें. स्वतःचा प्राण देऊन त्याची रक्षा केल्यामुळेंच त्याचा शुक्राचार्यांच्या पोटांत प्रवेश झाला, व पोटांत प्रवेश झाला, म्हणूनच त्याला संजीवनी विद्या प्राप्त झाली व तो स्वतः फिरून सजीव झाला. गुरूचें पोट चिरून तो बाहेर आला, पण बाहेर येऊन त्यानें गुरूला फिरून जिवंत केलें, व अशा रीतीनें शिष्याला विद्या मिळाली, गुरूचें गर्वहरण झालें व दोघेही जिवंत राहिले. रमाबाईंनीं याच तत्वाचें अवलंबन केलें असतें व स्वतःच्या वडिलांची परंपरा राखून हिंदुधर्माच्या अभिमानी म्हणवून व राहून त्या समाजाशीं झगडल्या असत्या, तर त्यांना स्त्रीशिक्षण व स्त्रीदास्यविमोचन या दोहोंचेंहि कार्य थोडथोडें तरी साधतां आलें असतें. त्यांना प्रथम हिंदुसमाजाकडून एकदम हजारों लाखों रुपये मिळाले नसते, पण जे थोडे मिळून कार्य झालें असतें तें पायाशुद्धच झालें असतें. पण हें हातून होण्याला सुसंस्कृत मनाचा स्वार्थत्याग लागतो. बाईंनीं जन्मभर अविवाहित राहून सतत उद्योग करून एकप्रकारचा स्वार्थत्यागच केला. परंतु खिस्ती लोकांची मदत घेऊन आणि संघटित प्रयत्नांचा एकदम अजब चमत्कार दाखवून मोठा पराक्रम करूं अशी बाईंनीं महत्त्वाकांक्षा धरली. या दोन्ही गोष्टींत त्यांचें धोरण चुकलें.

असो, अमेरिकन मिशनरी लोकांशीं केलेला दहा वर्षांचा करार संपल्यावर शारदासदन उघडउघड खिस्ती मिशन बनलें. बाईंनीं पुण्याहून मुक्काम हलवून केडगावास नेला व संस्थेचें शारदासदन हें नांव बदलून 'मुक्तिसदन' हें नांव घेतलें. मुक्ति म्हणजे अर्थात खिस्तोदय मुक्ति. अशा रीतीनें पुण्याहून रमाबाई दूर गेल्यामुळें लोकहि पुढें त्यांच्याविषयीं चर्चा करीतनासे झाले. पूर्वी वासुदेवराव केळकर यांनीं केसरींत लिहिल्याप्रमाणें आतां खरोखरच गोष्ट घडून आली ! म्हणजे आपल्या सदनाभोवतीं एखाद्या किल्याप्रमाणें गोट बांधून बाई बसल्या. आंतबाहेर मज्जाव झाला व मग कोणासच सदनासंबंधानें चर्चा करण्याचें कारण राहिलें नाहीं. १८९७ सालीं दुष्काळ पडला त्यांत मध्यप्रांतांतून वगैरे पुष्कळशा मुली आणून बाईंनीं आपलें मुक्तिसदन गजबजविलें, व दुष्काळनिवारणार्थ मिशनरी लोकांकडून आणलेल्या पैशानें मुक्तिसदनाची भरभराट झाली. सदनांतील मुलींना वागविण्यासंबंधानें व त्यांचें स्वातंत्र्य नष्ट झाल्यासंबंधानें कित्येक तक्रारी पुढेंहि होत होत्या. सदनांत मुली फुसलावून नेल्याच्या कागाळ्याहि एकदोन वेळां लोकांच्या कानीं आल्या. व एकदां प्रकरण खुद्द डि. मॅजिस्ट्रेटपर्यंतहि गेलें होतें म्हणतात. परंतु क्वचित्

केव्हां इतर मिशनरी लोकांशींहि जो प्रकार घडतो तसाच येथें घडला. याहून समाजानें त्यांत अधिक लक्ष घातलें नाहीं.

बाईंच्या स्तुतिपरहि एक शब्द सुचतो, तो येथें सांगणें योग्य होईल. बाई तेजस्वी होत्या यामुळें त्यांनीं आपल्या समाजाप्रमाणें युरोपियन अधिकाऱ्यांचीहि कधीं फारशी भिड ठेविली नाहीं. प्लेगच्या धामधुमींत अधिकाऱ्यांकडून व त्यांच्या हस्तकांकडून अनेक प्रकारचे अत्याचार घडले, त्यावेळीं एकीकडे गोपाळराव गोखले हे आपल्या कांहीं अतिशयोक्त विधानांबद्दल माफी मागण्यास तयार झाले असतां रमाबाईनीं जाहीर रीतीनें अधिकाऱ्यांच्या कित्येक दुष्कृत्यांचा निषेध केला. यामुळें "नारि असुनि सत्यपणा तूंच राखिला" हें त्यांचें संगीत गुण-वर्णन पुण्याच्या लोकांच्या तोंडीं बरेच दिवस राहिलें होतें.

आम्हीं प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें, बाईंचा सर्वच वृत्तांत अद्भुत झाला. डॉ. आनंदीबाई यांच्या संबंधानें किंवा सौ. काशीबाई कानिटकर यांच्या संबंधानें केसरींत केव्हांहि आदरयुक्त असेच उद्गार—केव्हां केव्हां खुद्द टिळकांच्या लेखणीं-तूनहि—निघाले होते हें लक्षांत घेतां, बाईंची दिशा जर किंचित् दुसरीकडे वळली असती तर टिळकांनींहि त्यांचें कौतुक केलें असतें असें आम्हांस वाटतें. टिळक हे स्त्रीशिक्षणाच्या विरुद्ध होते हें तर खरें नाहींच, पण कोणत्याहि सुशिक्षित स्त्रीचा कल समाज संभाळून नेऊन सुधारण्याकडे दिसला किंवा तिला राष्ट्रीय राजकार-णाची किंचित् आवड आहेसें दिसलें तर ते सर्टिफिकिटानें, लेखानें किंवा सभांतून तिचें गौरव करून उत्तेजन देण्यास मागें घेत नसत. परंतु सुशिक्षित स्त्रियांचा विनय सुटला किंवा त्यांचें बोलणें चालणें अथवा त्यांचा बोलबाला प्रमाणाबाहेर जातोसा दिसला कीं त्यांस खपत नसे. टिळकांच्या स्वभावावरून पाहतां पंडितांबाईंच्या प्रथमदर्शनाचे वेळींच त्यांनीं नाक मुरडलें असेल, व कपाळास आठी घालून पाहिलें असेल असेंहि वाटतें. आणि बाईंच्या भोंवतीं सुधारकांचा वेढा पडलेला पाहून, बाईंच्या हातून खरें समाजोपयुक्त असें काम कोणतेंहि होणार नाहीं, असेंच त्यांच्या मनानें घेतलें असेल यांत शंका नाहीं. टिळकांची ही उपजत बुद्धीच अखेर खरी ठरली. व त्यांनीं सर्व जन्मभर बाईंना समाजशत्रु म्हणूनच लेखिलें! तात्पर्य हीं दोन माणसें आपापल्या परीनें कर्तृत्ववान् व तेजस्वी, पण त्यांच्या ग्रहांचा असा हा शत्रुयोग होता. यामुळें परस्पर गुणांची जाणीव असतांहि उभ्या जन्मांत कोणाहि एकाच्या तोंडून दुसऱ्याविषयीं गुणवर्णनपर असा शब्द निघाला नाहीं.

## भाग १५ वा

# हिंदु-मुसलमानांचे दंगे

१८९३-१८९४ सालीं पुण्यास हिंदुमुसलमानांचीं भांडणें झालीं त्यांचें बीज वास्तविक पुण्यांतलें नव्हतें. तें पुण्याबाहेरूनच आलें होतें. सांथीच्या तापाप्रमाणें जातिविषयक भांडणांची एक प्रकारची लाट येत असते. प्रथम एकाद्या ठिकाणीं कांहीं आकस्मिक कारणानें तंटे होतात. तेथील बातम्या वर्तमानपत्रांच्या द्वारें बाहेर पसरतात. शिवाय जातीजातीच्या ऋणानुबंधी लोकांचीं परस्पर खासगी पत्रें जातात, त्यांतून हकिगती लिहिण्यांत येतात. येवढेंच नव्हे तर वर्तमानपत्रांतून जाहीर रीतीनें ज्या प्रकारचे उद्गार येत नाहींत त्या प्रकारचे म्हणजे रागाचे, द्वेषाचे, चिथावणीचे उद्गार खासगी पत्रांतून प्रायः असतात. वर्तमानपत्रें असल्या हकिगती प्रसिद्ध करितात तरी त्यांचा एकंदर झोंक दंग्याधोप्यांचा निषेध करण्याचाच असतो; पण खासगी पत्रव्यवहारांत बेजबाबदारपणें लिहितां येतें. यामुळें सत्याचें विकृत व अतिशयोक्त रूप त्यांत उमटत असून शिवाय चिथावणी देणाऱ्या दुष्ट प्रवृत्तीला भरपूर वाव मिळतो. आणि या सर्वांत सरकारी अधिकाऱ्यांच्या धोरणाची भर पडते. एकदां एके ठिकाणीं स्थानिक अधिकाऱ्यांनीं अशा भांडणाच्या कामीं कांहीं चूक केली असली तरी वरपर्यंत समर्थनच होत जातें. आणि व्यक्तींच्या चुकीला सरकारी ठरावानें एकदां धोरणाचें स्वरूप आलें, म्हणजे मग विवेक सुटून, तेंच सर्व ठिकाणच्या लोकांच्या बोकांडीं बसतें. हिंदुस्थानांतील प्रत्येक जातीला अशा प्रकारचा अनुभव केव्हांना केव्हां तरी आलेला आहे.

जातीजातींतील भांडणांना राजकारणाचें स्वरूप त्यांत सरकारचा हात अयोग्य रीतीनें पडल्यामुळेंच आलेलें आहे. शाळेंतील मुलांच्या भांडणांत थोडीबहुत परस्पर मारामारी, गुद्दागुद्दी होऊन प्रकरणें संपतात, आणि होताहोईतों तीं तशींच संपावी असें गंभीर व मार्मिक पंतोजींचें धोरण असतें. पंतोजींनें मुलांच्या या भांडणांत न पडण्यापासून मुख्य फायदा असा असतो कीं, मुलांनीं आपापसांत गुद्दागुद्दी करून मारामारी संपविली असतां तिच्या दुष्परिणामांबरोबर जरूर त्या स्वावलंबनाचाही धडा मुलांना मिळतो. पंतोजी कमकुवत मुलांना संभाळण्याकरितां त्यांच्यामागें शाळेबाहेर किंवा शाळेंतहि कसा व किती राहणार ? भांडणाला टपलेलीं मुलें पंतोजीच्या गैरहजेरींत किंवा नजर चुकवून केव्हां केव्हां भेटणारच. अशा भेटींत तीं आपले दावे आपल्या हातानें थोडेबहुत उगवून घेणारच ! म्हणून पंतोजीकडे तक्रार न जातां परस्पर हे दावे तुटतील तितके सर्वच दृष्टीनें चांगले, असें खुद्द पंतोजीलाहि वाटत असतें. पण शाळेंतील या भांडणाचे परिणाम इतके क्षुद्र

असतात कीं, पंतोजींनीं त्यांत लक्ष न घातलें तरी एकंदरीनें फारसें बिघडत नाहीं. पण जातीजातींतील भांडणें नुसत्या हातातोंडानें संपत नाहींत. त्यांत दगड, धोंडे, काठ्या, हत्यारें आणि विस्तव असलीं घातक साधनेंहि योजण्यांत येतात व बेसुमार प्राणहानीपर्यंतही मजल जाते. यामुळें पडत्या बाजूला सरकारी मदतीचा आश्रय घेणें जरूर पडतें; आणि समाजांत शांतता राखण्याचें काम सरकाराचें असल्यामुळें, कोणी जातीनें न बोलावलें तरी त्यास मध्यें पडावें लागतें. पण मध्यें पडतांना सरकारी हुकुमांत किंवा अंमलबजावणींत फिरून व्यक्तिदोष शिरून कित्येक ठिकाणीं भांडण मिटावयाचें त्याऐवजीं तें विकोपाला जाण्याचा संभव असतो, व तशीच कांहीशीं गोष्ट ह्यॅरिसशाहींतील हिंदुमुसलमानांच्या दंग्यांत झाली.

पुण्यांतील हिंदुमुसलमान यांचे पुर्वापारचे संबंध विशेष द्वेषाचे होते असें खरोखर म्हणतां येत नाहीं. गोवध व मशिदीच्या आसपास वाद्यें वाजवणें या गोष्टी नव्या नाहींत; शेंकडों वर्षे चालू आहेत. मनांतून सलोखा असला म्हणजे या दोन्ही गोष्टी बिनबोभाट पार पडतात. कोठें कोठें तंटे होते, पण कांहीं चालू वहिवाटीच्या जोरावर व कांहीं न्यायकोर्टाच्या निर्णयांनीं संपत असत. निवळ दंडेलीवर प्रकरणें थोडीं येत. उलट हिंदु व मुसलमान हे दोघेहि इतर कांहीं रीतींनीं स्नेहबद्ध असत. हिंदूंनीं ताबुतांत मोहरमच्या सणांत ताबूत करावे, फकिऱ्या बांध्याव्या, व सोंगें घेऊन नाचावें; मुसलमान गवयांनीं हिंदु शिष्य पदरीं बाळगावे व त्यांना शिकवावें; आखाड्यांतील हिंदु वस्तादांनीं मुसलमानांच्या मुलांना कुस्ती शिकवावी; अशा गोष्टी हरहमेश चालत. भाऊमहाराजांच्या बागेतल्या प्रमाणें हिंदूंचे देव आणि मुसलमानांचे फकीर शेजारीं नांदत. पुण्यांतील कित्येक सरदारी वाड्यांतून देवडीच्या एका कोपऱ्यांत हिंदु शिपाई लोकांनीं बसविलेला आपला गणपति किंवा मारुति व दुसऱ्या कोपऱ्यांत मुसलमान शिपायांनीं ठेवलेला एकाद्या अवलियाच्या नांवाचा दगड किंवा पिराचा पंजा आढळेल. आजहि किबे वाड्यांत ज्ञानप्रकाश छापखान्याचे व्यवस्थापक बसतात त्या लहानशा जागेत कोनाड्यांत असलेंच मुसलमानांचें देवस्थान असून, दर गुरवारीं छापखान्याच्या खर्चातून माळ, धूप, रेवड्या व खोबरें यांची व्यवस्था नेमानें केली जाते. असें असतां, पुण्यांत जो हिंदुमुसलमानांचा दंगा झाला त्याला परठिकाणाहून आलेली दंग्याची लाट व सरकारी अधिकाऱ्यांचें पक्षपाताचें धोरण हींच मुख्यतः कारणीभूत झालीं, हें पुढील हकीकतीवरून आपोआप दिसून येईल. टिळकांचा संबंध कोठल्याहि दंग्यांत कशाच रीतीनें आला नाहीं. खुद्द पुण्यास झालेल्या दंग्याच्या खटल्यांत त्यांचें नांवहि कोठें साक्षीपुराव्यांत आलें नाहीं. तथापि, दंग्यामुळें उत्पन्न झालेल्या राजकीय चळवळींत त्यांचें नांव प्रमुखपणानें आलेलें असून, मुसलमान लोक टिळकांना पुष्कळ दिवस आपले शत्रु समजत. चिरोलसाहेबांनीं तर, जातीजातींत भांडणें लावून अस्वस्थता उत्पन्न करणारे कळीचे

नारद, असें त्यांना मनांतून लेखिलें आहे. मवाळपक्षहि त्यांना मुसलमानांचें शत्रुत्व करण्याबद्दल व्यर्थ दोष देत असे. हे सर्व दोषारोप कोणत्या कारणानें त्यांच्यावर आले त्याची माहिती देतांना प्रथम मुंबई–पुण्यांतील दंग्यांचें वर्णन देणें जरूर आहे.

मुंबई शहरांतले जुन्या पिढीच्या आठवणींतले दंगे १८५० सालचे. ते पारशी व मुसलमान यांचे दरम्यान घडले. त्या सालीं बैरामजी गांधी नामक पारशी वर्तमानपत्रकारानें महंमद पैगंबराचें चित्र आपल्या वर्तमानपत्रांत छापलें. चित्र अर्थात् काल्पनिकच असलें पाहिजे. कारण मुसलमान हे आपल्या देवाचीं चित्रें काढीत नाहींत. पण चित्र बरोबर कीं चुकीचें, यापेक्षां चित्रच कां काढलें या गोष्टीचा मुसलमानांस राग आला व त्यांनीं या एका गृहस्थाच्या चुकीकरितां सगळ्या पार्शी जातीवर हत्यार उपसलें. घर पारशी कीं चोप, असा प्रकार कांहीं दिवस चालू होता. पारशांची वस्ती मुंबईतहि मुसलमानांच्या मानानें कमी. शिवाय दंगेखोर लोकांची संख्या मुसलमानांत अधिक, यामुळें या दंग्यांत पारशांना पुष्कळ मार बसला व सरकारला दंगा थांबविण्यास बरीच मेहनत पडली. यानंतरचा दंगा १८७४ सालचा. या खेपेस कारण असें झालें कीं, रूस्तमजी जालभाई नामक एका पारशी ग्रंथकारानें वॉशिंगटन आयर्व्हिंग नामक अमेरिकन ग्रंथकाराच्या कांहीं लेखांचें भाषांतर प्रसिद्ध केलें. त्यांत महंमद पैगंबरास अनुलक्षून कांहीं मजकूर आला होता, तो मुसलमान लोकांना अपमानास्पद वाटला. याहि प्रसंगीं जुम्मा मशिदींतून बाहेर पडून दीन दीन करीत ते शहरांत पसरले व सांपडेल त्या पार्शास त्यांनीं सरसकट चोप दिला. हा दंगाधोपा चार दिवस चालू होता, व मुसलमान लोक पोलिसांना अनावर झाल्यानें सरकाराला लष्कराचीहि मदत घ्यावी लागली. या दोन्ही प्रसंगांवरून मुसलमानांच्या दंग्यांना कारण किती स्वल्प पुरतें हें दिसून येणार आहे.

१८९३ सालच्या दंग्यांत मुसलमानांचा मोर्चा हिंदूंवर वळला. या दंग्याचें खरें कारण मुंबईत घडलें नसून प्रभासपट्टणास घडलें. प्रभासपट्टण हें गांव जुनागड संस्थानच्या हद्दींत आहे. जुनागडचा राजा मुसलमान नबाब असतो. तथापि राजा कोणत्या जातीचा हा प्रश्न या दंग्यांना फारसा लागू नाहीं. दंगा मूळ ताबुतांच्या समारंभांत घडून आला. दंगा म्हटला म्हणजे जे जे प्रकार व्हावयाचे ते सर्व तेथें घडून आले. या दंग्यानंतर धरपकड व खटले यांचें सत्र सुरू झालें. दंग्यांत नुसत्या मनुष्यांची हत्या झाली इतकेंच नव्हे तर देवळेंहि भ्रष्ट करण्यांत आलीं. देवांच्या मूर्ती फोडून जाळण्यांत आल्या. देवळांतील साधुसंत, गोसावी, यात्रेकरू या लोकांना कारण नसतां अंगावर तेल ओतून जाळण्यांत आलें. दोन वर्षांपासून ही धुसफूस चालू असून, दोन वर्षेंपर्यंत ताबुतांची परवानगी रद्द करण्यांत आली होती. या सालीं ती फिरून दिली तों असा प्रकार झाला. या वेळीं संस्थानचा कारभार

प्रत्यक्ष इंग्रज सरकारच्या हातीं कांहीं कारणानें होता. व या सरकारावर हिंदु व मुसलमान दोघांचाहि अविश्वास. यामुळें दंग्याची चौकशी होऊन योग्य शासन घडावें अशी हिंदूंना तळमळ लागली असून, शक्य तितका मुसलमानांचा बचाव व्हावा अशी मुसलमानांची खटपट सुरू होती. खटला चालणार व चौकशी होणार त्या कामीं दोघांहि जातींना आपापले बॅरिस्टर वगैरे द्यावेसे वाटूं लागलें. बॅरिस्टर द्यावयाचे म्हणजे पैसे जमवायाला हवे, व पैसे जमवायाचे तर जाहीर सभा भरवून भाषणें करून आपापल्या जातींत जागृति करावयास हवी. आणि हें सर्व व्हावयाचें म्हणजे त्याच त्या विषयाची चर्चा, आवेशयुक्त भाषणें, भावनांचें उद्दीपन, वस्तुस्थितीची अतिशयोक्ति किंवा तिचा विपर्यास इत्यादि प्रकार ओघानें आलेच. बरें हें टाळावें म्हटलें तर झाल्या गोष्टींचा योग्य प्रतिकार तरी कसा व्हावयाचा ?

या बाबतींत गुजराथी लोक मनांतून फार दुःखी झाले होते. प्रभासपट्टण हें गुजराथी लोकांचें मोठें पवित्र क्षेत्र. तेथें हा प्रकार झालेला पाहून मुंबईच्या गुजराथी लोकांनीं आंतून बरीच खटपट करून माधवबागेंत एक प्रचंड सभा भरविली. या सभेचें मुख्य चालकत्व लक्ष्मीदास खिमजी नांवाच्या व्यापाऱ्याकडे होतें. हे गृहस्थ मोठे दानशूर, धर्माभिमानी व स्वभावानें करारी व तापट असत. या सभेंत भाषणें झालीं त्यांत मुख्यतः कसून चौकशी होऊन न्याय मिळावा अशी मागणी ठरावाच्या रूपानें केली होती; आणि निराश्रित झालेल्या हिंदु लोकांच्या कुटुंबांस मदत करण्याकरितां फंड काढण्याचें ठरलें. जव्हेरीलाल याज्ञिक हे गृहस्थ मोठे शांत डोक्याचे व विचारी असा त्यांचा लौकिक होता, व तेहि या जातिविषयक सभेस हजर असून त्यांतला मुख्य कार्यभाग त्यांनीं केला यावरून सभेचें स्वरूप कशा प्रकारचें असेल याची कल्पना होईल. पण या सभेच्या योगानें मुसलमान लोकांनाहि आपली सभा भरवावी अशी इच्छा उत्पन्न झाली, व ती भरविण्यांत आली. याहि सभेचें चालकत्व अमीरुद्दीन तयबजीसारख्या शांत पुढारी मुसलमानाकडे होतें. यावरून त्याहि सभेचा हेतु स्वजातीपैकीं संकटांत सांपडलेल्या मुसलमानांना मदत देण्याचा व खरा न्याय मागण्याचा होता यांत शंका नाहीं. पण या दोन्ही सभांतून झालेल्या भाषणांत आवेशाच्या दृष्टीनें बराच फरक होता. मुसलमान वक्त्यांचीं भाषणें नेहमींच भावनोद्दीपक असतात. त्यांत विवेकाचा भाग थोडा असतो. इंग्रज लोकांना या दोन्ही सभा निरर्थक व अनिष्ट वाटत होत्या. व पुढें मुंबईत दंगे झाले त्यांची जबाबदारी इंग्रज वर्तमानपत्रकारांनीं तर या सभांवरच टाकली !

पण या सभांच्या मागें जी कारवाई सुरू होती तीच दंग्यांना खरी कारणीभूत झाली यांत शंका नाहीं. प्रभासपट्टणच्या दंग्यापासून मुसलमान समाजावर अभावितपणें एक प्रकारची फाजील आवेशाची लाट आली. पट्टणहून धर्मगुरूंचे दूत मुंबईस आले, व मुंबईहून बाहेर अनेक ठिकाणीं ते गेले. नगरास आऊन एक

मुसलमान दंग्याखोऱ्यांना उत्तेजन देत होता असें त्यावेळीं उघडकीस आलें होतें. कोठें प्रभासपट्टण व कोठें अहमदनगर ! मुंबईची तरी गोष्ट एक वेळ वेगळी मानतां येईल; कारण गुजराथी व मुसलमानी व्यापाऱ्यांची ती मुख्य राजधानी. कोणत्याहि हिंदु किंवा मुसलमान धर्मकृत्यास पैशाची मदत व्हावयाची तर तिला प्रारंभ मुंबईतच होणार. पण अहमदनगरचे मुसलमान दरिद्री त्यांच्याकडून वर्गणी कसली मिळणार ? पण तेथेंहि मुसलमान दूत गेले होते. याचा अर्थ दंग्याचा विस्तार सर्वत्र करावा असा त्यांचा हेतु होता, व दंगा करावयाला दरिद्री खालच्या वर्गांचेच लोक या कामीं अधिक उपयोगी पडतात. असो; अशा प्रकारच्या कारवाईनेंच खुद्द मुंबईतील दंगे झाले तरी घडून आले.

ता. ११ आगष्ट १८९३ रोजीं मुंबईस फारच मोठा दंगा झाला. लोकांना आधीं कोणत्याहि प्रकारचा इषारा नसतां, तिसरे प्रहरचे सुमारास, क्रॉफर्ड मार्केटाजवळील जुम्मामशीदींतून मुसलमान लोक बाहेर पडले ते थेट हनुमान लेनमधील महादेवाच्या देवळावर धांवले. याचें कारण मागाहून असें सांगण्यांत आलें कीं, या अकरा तारखेस गुजराथी हिंदूंचा 'दिवसर' नामक सण पडला असून मशीदीलगतच्या या देवळांत अनेक प्रकारचीं वाद्यें वाजवून हिंदूंनीं मुसलमानांस चीड आणली होती. पोलिस अधिकाऱ्यांना या भावी दंग्याची थोडीशी कुणकुण लागली असल्यानें, त्यांनीं आसपास एक पोलिसपार्टी ठेऊन दिली होती; या टोळीनें मुसलमानांच्या या पहिल्या टोळीस अडथळा करून परत मशिदीच्या आवारांत नेऊन कोंडलें. पण मशिदींत प्रार्थना करण्याकरितां म्हणून जमलेले मुसलमान लोक हा दंगेखोरांचा मुख्य जमांव नसून, या टोळीचा हल्ला ही सर्व शहरभर दंगा करण्यास सुरुवात करण्याची एक ठराविक खूण होती इतकेंच काय तें. ही टोळी मशिदींत शिरतांना तिचे हातीं काठ्या नव्हत्या; पण बाहेर पडतांना मात्र हातांत काठ्या घेऊनच ती बाहेर पडली. मशिदींत काठ्या अगाऊच जमवून ठेविल्या होत्या ही गोष्ट मागाहून शाबीतहि झाली. या पूर्वसंकेताचें प्रत्यंतर हेंच कीं, मशिदीजवळील दंगा कह्यांत येण्यापूर्वींच भेंडीबाजार, कामाठीपुरा, ग्रांटरोड वगैरे बाजूला दंगा पसरून जोरांत आला व या बाजूचीं कित्येक देवळें भ्रष्टहि झालीं. इस्पितळांकडील रस्ते मुसलमानांनीं अडवून धरल्यामुळें जखमी लोकांना तिकडे नेणेंहि पोलिसांस मुष्किलीचें झालें.

दुसरे दिवशीं हिंदूंनीं प्रतिकारार्थ दंड हातीं घेतला. मुंबई शहरांत हिंदूंची लोकसंख्या मुसलमानांपेक्षां पुष्कळ अधिक; व गिरणींतले मराठे मजूर स्वभावतः गरीब असले तरी आत्मसंरक्षणार्थ हातांत काठी घ्यावयास ते तयार असतात. यामुळें या दुसरे दिवसाच्या दंग्यांत हिंदूंची सरशी झाली. पुढेंहि हा दंगा दोन दिवस चालू होता; व तो एकंदरीनें इतका अनावर झाला होता कीं, कुलाब्याहून तोफा आणून त्या पायधुणीवर डागाव्या लागल्या, आणि मुंबईचें लष्कर अपुरें पडेल

म्हणून बाहेरगांवाहून तीन हजार लष्करी शिपायांची मदत मागावी लागली. साठ-पाउणशें खून झाले, तीन साडेतीनशें लोकांना जखमा झाल्या, हजारों लोक भीतीनें मुंबई सोडून बाहेर गेले, व या पांचचार दिवसांत जीव किंवा मालमत्ता यांपैकीं एकहि सुरक्षित नव्हतें. खुद्द राणीसरकाराकडून गव्हर्नरसाहेबांना सहानुभूतीचा संदेशहि आला. सुमारें १२०० लोक दंग्याच्या आरोपावरून पकडण्यांत आले. स्पेशल मॅजिस्ट्रेट लोकांची नेमणूक करावी लागली. सिव्हिल व्हालंटिअर लोक पोषाक चढवून पाहरा करूं लागले. हायकोर्ट वगैरे कचेऱ्या बंद ठेवाव्या लागल्या. शेवटीं लीमेटफर्ड रायफल बंदुकांच्या गोळ्या सुटूं लागल्या तेव्हां दंगेखोरांना थोडा वचक बसला.

ता. १५ रोजीं थोडी शांतता होऊन म्युनिसिपल कमिशनर ऑकर्थ यांच्या बोलावण्यावरून सर्व जातींच्या पुढाऱ्यांची सभा भरविण्यांत आली, व फिरून हिंदुमुसलमानांची दिलजमाई झाली हें दाखविण्याकरितां गाड्यांतून सर्व जातींचे पुढारी घालून त्यांस शहरांतून मिरवीत फिरविण्याचें ठरलें. दंगा पक्का थांबल्यावर तो थांबविण्याची जबाबदारी डोक्यावर घेण्याला सहजच अनेक पुढारी पुढें येऊं लागले ! मुंबईच्या दंग्याचा यापुढील वृत्तांत देण्याचें कारण नाहीं. यापुढील मनोरंजक भाग इतकाच कीं, वर्तमानपत्रांतून नेहमींचें वाग्युद्ध सुरू झालें; व बैल निघून गेल्यावर बैल पळून न जाण्यासारखा झोंपा कसा तयार करावा याविषयीं उपयुक्त सूचना पुढें येऊं लागल्या. कोणी सभावाल्यांकडे मुख्य दोष देऊं लागले, कोणी गोरक्षणी चळवळीला हरकत घेतली, व कोणी केवळ मुसलमानांच्या अज्ञानाकडे बोट दाखवून आपलें समाधान केलें. पण मनुष्य अज्ञानी झाला म्हणून काय झालें ! त्यानें क्षुल्लक कारणावरून दंग्यास प्रवृत्त होण्याचें कारण नाहीं, व अशा क्षुल्लक कारणावरून जे दंग्याला प्रवृत्त होतात त्यांची गय न करतां त्यांना दहशत बसेल असा बंदोबस्त राखला पाहिजे. हा जो खरा बोध यांतून घ्यावयाचा, तो कोणीच स्पष्टपणें बोलून दाखवीना.

हें अप्रिय काम मराठी वर्तमानपत्रांत केसरीनें प्रमुखत्वानें प्रथम केलें. ता. १५ आगष्टच्या अंकांत केसरीनें असें स्पष्ट लिहिलें कीं, "मुसलमान लोक शेफारून गेले आहेत व ते जर शेफारले असले तर त्याचें मुख्य कारण सरकारची फूस हें होय." आम्ही येथें असल्यामुळेंच मुसलमानांपासून तुमचें रक्षण होतें असें इंग्रज बोलून दाखवितात व असले उद्गार ऐकूनच मुसलमान लोकांना उत्तेजन मिळतें. कायदेकौन्सिलांत मुसलमानांचा एकहि प्रतिनिधी नसतां, खरा उपदेश बाहेर मुसलमानांना करावयाचा तो न करितां कौन्सिलांतील गुजराथी, पारशी यांच्या पुढाऱ्यांना लॉर्ड हॅरिस यांनीं उपदेश केला याचें केसरीनें वैषम्य मानलें. पुढारी लोक यांत काय करणार ? बद्रुद्दिन तय्यबजी किंवा सयानी ह्यांचें सिद्दी आरब वगैरे लोकांवर जितकें वजन तितकेंच तेलंग याज्ञिक यांचें मवाळी घाटी लोकांवर

वजन. हा वाद खरोखर अशिक्षित अनुयायांतला असतो. अशा लोकांना जर दाबांत ठेवावयाचें तर सरकारानें एकाला जवळ व एकाला दूर न मानतां सर्वांनाच सारखा बडगा दाखविला पाहिजे. तसें न होईल तर मुंबईतील हिंदु लोकांनीं दुसरे दिवशीं केलें त्याप्रमाणें हिंदूंनाहि आपल्या हातानें आपलें संरक्षण करावें लागेल. हें मत टिळकांनीं केसरींतून प्रतिपादिलें. मुंबईच्या गिरणीतील मराठ्यांनीं पोलिसांना स्पष्ट शब्दांनीं असें सांगितलें कीं, केवळ आत्मसंरक्षणाकरितांच आम्ही हातांत काठ्या घेत आहों.

हा युक्तिवाद कित्येकांना कडू वाटूं लागला. ते म्हणूं लागले, गोड बोलून सर्वांचें समाधान करण्याची ही वेळ, असें असतां तुम्ही असें तिखट काय बोलतां? त्यावर टिळक उत्तर देत कीं, सरकारच्या पक्षपातीपणामुळें आतां असें उघड बोलण्याची वेळ आली आहे. हिंदु अमूक एक करितात म्हणून आम्हांस त्याची चीड आली असें अज्ञानी मुसलमानांनीं म्हणणें कदाचित् शोभेल. पण सुधारलेल्या सुशिक्षित सरकारास तें म्हणणें चालूं देणें शोभणार नाहीं. हिंदु लोक खावी तितकी गय खात नाहींत असें म्हणून, हिंदु लोकांविषयीं मन कलुषित करण्याचा प्रयत्न सर्व हिंदुस्थानभर यावेळीं चालला होता; व या दोन जातींच्या पंचायती नेमून दंगे न होण्याची सर्व जबाबदारी त्यांनीं आपल्या शिरावर घ्यावी असें सरकार चाहत होतें. सरकारच्या या सूचनेस भुलून कित्येक पुढारी ही जबाबदारी आपल्या शिरावर घेण्यास मान पुढें करीत होते. पण टिळकांनीं या वेळीं असें निक्षून बजाविलें कीं, ही तुमची चूक होत आहे. कोणीहि सुशिक्षित पुढारी या कामाला कधींहि पुरे पडणार नाहींत. हिंदुमुसलमान पुढारी स्वतः या कामीं मनानें अलिप्त आहेत. पण दंग्याचें खरें कारण अडाणी लोक असतात व त्यांची समजूत सहसा पडत नाहीं. त्यांना एकच गोष्ट पटेल. ती ही कीं, सरकार खरोखर निःपक्षपाती असून भीड, भीति, किंवा स्वार्थ कशालाहि बळी न पडतां ते फक्त न्यायी कायदेच अमलांत आणतील. ब्रह्मदेशांत मुसलमानांनीं दंगा केला त्याला कारण हें झालें कीं, हिंदूंच्या देवळांजवळ गाई मारूं नयेत असा सरकारनें हुकूम सोडला. उलट वायव्य प्रांतांत अजीमगड येथें दंगा झाला त्याचें कारण हिंदूंच्या वस्तींत हव्या तिकडे गाई मारण्यास सरकारनें कायदेशीर अडथळा करावा तो केला नाहीं. केसरीचें म्हणणें इतकेंच कीं, हिंदु व मुसलमान यांप्रमाणें या प्रकरणांत स्वतः सरकार हाही एक पक्ष आहे, व एकंदरीनें हा तिरंगी सामना आहे, हें कोणी विसरूं नये. दोन्ही जातींचे सणवार उत्सव वगैरे पूर्वापारप्रमाणें निर्विघ्नपणें चालूं देण्यास सरकारनें मदत केली पाहिजे. मुसलमानी मोहोल्यांत शिरून खाटकाच्या घरची गाय सोडवून आणील तर अशा हिंदूस या फाजिल धर्माभिमानाबद्दल शिक्षाच झाली पाहिजे. उलट नागपंचमी गोकुळअष्टमी असल्या सणांत वाद्यें वाजविल्यानें आम्हांस चीड येते असें म्हणणाऱ्या दुराग्रही मुसल-

मानांसहि शिक्षा झाली पाहिजे. लॉर्ड हॅरिस यांनीं हिंदुमुसलमान पुढाऱ्यांना मात्र शांततेचा बोध केला. पण त्याबरोबरच हाताखालच्या अधिकाऱ्यांना निःपक्षपातीपणाचा बोध करावा तो मात्र त्यांनीं केला नाहीं, असें टिळकांनीं लॉर्ड हॅरिस यांना दूषण दिलें.

सुमारें एक महिन्यानें मुंबईचें वातावरण शांत होऊन तेथें दंग्याची चर्चाहि होण्याचें थांबलें. पण मुंबईहून हा वाद निघून पुण्यास आला. ता. १६ आगस्ट रोजीं म्हणजे मुंबईच्या दंग्यानंतर अवघ्या पांच दिवसांनीं पुण्यास नागपंचमीचा सण पडला. या सणांत नागोबाची मिरवणूक निघत असे. मिरवणूक म्हटली म्हणजे त्यांत वाद्यें आलींच. व या वाद्यांविषयीं तक्रार करून मुसलमान दंगा करतात कीं काय या भीतीनें पुण्याच्या अधिकाऱ्यांनीं कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. मिरवणुकीच्या रस्त्यावर दीडशें हत्यारबंद पोलीस, नंग्या तरवारीचे घोडेस्वार व नजीकच चौथ्या बॉंबे रायफल्सची पलटण इतकें सैन्य जमवून, कलेक्टर मि. चार्लस, पोलिस सु. मि. म्याकफर्सन वगैरे अधिकारी कंबरबंदांत पिस्तुलें चढवून आले होते. इतकी तयारी पाहिल्यावर अर्थातच मुसलमानांना दंगा करण्याची इच्छा झाली नाहीं; पण पुण्यासहि अस्वस्थतेचें बीज रुजूं घातलें होतें आणि त्याचें झाड, छोटेसें कां होईना, पण पुढें एक वर्षांत पहावयास सांपडलें.

मुसलमानांचे दंगे होण्यास सरकारी अधिकाऱ्यांचा पक्षपातीपणा कारणीभूत होतो ही गोष्ट पुण्यामुंबईतील सुधारक पक्षालाहि कबूल होती व केसरीप्रमाणें ज्ञानप्रकाश वगैरे पत्रांनींहि हेंच मत प्रगट केलें होतें. ता. २८ आगस्ट १८९३ चा ज्ञानप्रकाश म्हणतोः–" Some of the government officials may think it to be an agreeable pastime to put one race against another and to make political capital out of the whole affair. But how dangerous this procedure is can now very well be realised when we have experienced this year a frightful succession of disturbances. From the times of the great Salem Riots in Madras up to the present moment, the outcry of unduo encouragement of one class against another and dealing leniently with the one and harshly with the other has been often raised; and had our government taken note of this ere long we would have been undoubtedly spared much troubles and recriminations."

पण यापुढें जाऊन हेच विचार जाहीरसभांच्या द्वारें सरकारापुढें मांडण्याचा प्रश्न निघाला असतां. हीं पत्रें व त्यांचे स्फूर्तिदाते माघार घेऊं लागले. आणि अशा सभा भरविण्याचा हट्ट टिळक धरूं लागले, यामुळें पुराणमतवादित्वाबरोबर मुसलमानांचा द्वेष करण्याचा आरोपहि टिळकांवर येण्यास सुरवात झाली.

शुक्रवार ता. २५ आगस्ट रोजीं किवळेकर रानडे यांच्या वाड्यांत श्री. बाळासाहेब नातू याच्या अध्यक्षतेखालीं पुण्यांतील सुमारें ७५ हिंदु पुढाऱ्यांची सभा भरली होती. हिंदुमुलमानांच्या दंग्यांचीं कारणें काय व ते मोडण्यास कोणते उपाय करावे, याविषयीं हिंदु लोकांचें मत सरकारास कळाविण्याकरितां हिंदूंची एक मोठी जाहीर सभा भरावी असें तेथें बहुमतानें ठरलें. सभेंतच अशी एक हरकत निघाली कीं, सभा भरवून सरकारास काय सांगावयाचें तें सांगावें, पण ती सभा दोन्ही जातींची मिळून भरवावी. समंजस मुसलमान लोक आपापल्या परीनें हिंदूंशीं दिलजमाई करण्याचे प्रयत्न करीत होते ही गोष्ट खरी. पण मुसलमानांस पक्षपात दाखवल्यामुळें दंगे होतात हें जर सरकारास स्पष्ट सांगावयाचें असेल तर संयुक्त सभा भरवून काय उपयोग ? त्याचा फारसा विचार झाला नाहीं. मग असें मत जाहीर रीतीनें सांगणें हेंच तत्वतः चूक असें कोणास म्हणावयाचें, तर गोष्ट वेगळी. असो. वेगळी हिंदूंची तेवढी सभा भरवूं नये असें टाइम्सकारप्रभृतींचें म्हणणें होतें. त्यास अर्थातच कोणी विशेष किंमत दिली नाहीं. परंतु आपल्यांतीलच लोक अशा सभेविरुद्ध, तेव्हां तो एक विचार करण्यासारखा प्रश्न झाला. उदाहरणार्थ रानडे मेहता हे अशा सभेविरुद्ध होते; व मुंबईहून महादेव चिमणाजी आपटे, वाच्छा, याशिक, भालचंद्र कृष्ण, माधवराव भट, बंडोपंत भाजेकर, नानासाहेब देशमुख वगैरे गृहस्थांकडून नुस्त्या हिंदूंची सभा भरविली जाऊं नये अशाबद्दल सार्वजनिक सभेकडे शिफारसपत्रहि आलें होतें, व त्याचा सार्वजनिक सभेंत विचारहि झाला. आणि रानडेपक्षाच्या कित्येक लोकांनीं सभेच्या निमंत्रणपत्रिकेवर सह्या दिल्या होत्या त्या त्यांनीं परत घेतल्या. परंतु संकल्पाप्रमाणें अखेर सभा रविवार ता. १० सप्टेंबर रोजीं शनिवारवाड्यापुढें उभारलेल्या भव्य मंडपांत भरली. अध्यक्षस्थानीं श्रीमंत बाळासाहेब नातू हे होते. सभेचें काम बरेंचसें कठीण झालें असल्यामुळें भाषणें करणारांनीं आपलीं भाषणें लिहून आणलेलींच वाचलीं. यावरून आपण नाजूक जोखमीचें व जबाबदारीचें काम करीत आहोंत ही जाणीव सभा करणारांना होती असें उघड दिसतें. पण जबाबदारी असली तरी ती घ्यावयाची हा त्यांचा निश्चयहि तितकाच उघड दिसतो.

अशी सभा भरवूं नका असा उपदेश करणारांवर अनेक वक्त्यांकडून सभेंत बरीच खरमरीत टीका झडली. टिळकांनीं इसापनीतींतील विहिरीच्या कांठीं निजलेल्या मनुष्याची गोष्ट सांगून, अशा सभेपासून अनिष्ट परिणाम झालाच तर सभा भरविणारांनीं केला व न झाला तर तो आम्हीं टाळला अशा दुहेरी मतलबाची थट्टा केली. नामजोशी यांनीं अशी कोटी लढविली कीं, हिंदु-मुसलमान पुढाऱ्यांना उपदेश करण्याची आज्ञा खुद्द गव्हर्नरसाहेबांनीं केली, ती पाळण्याकरितांच आम्हीं सभा करीत आहोंत. सभेंतील मुख्य मर्माचा ठराव

म्हटला म्हणजे टिळकांनीं आणलेला, व ज्यांत गोरक्षणी चळवळीवरील आक्षेपांचें खंडण केलें होतें तो होय. एकाहि मुसलमानाचें मन दुखवूं नये म्हणून दहा हजार हिंदूंचें मन दुखविलें जातें. धर्मदृष्टया पूज्य मानलेल्या वस्तूंत गाईचा समावेश होत नाहीं असा एका कोर्टानें निकाल दिला ! व जुनी वहिवाट कुणा करितांहि मोडली तरी सर्वच अनवस्था व्हावयाची. इत्यादि मुद्दे टिळकांच्या भाषणांत आले होते. सभावाल्यांची मुख्य तक्रार अशी होती कीं, सभेची जबाबदारी आम्ही घेतों, मग तुम्ही विनाकारण आमच्या हेतूचा विपर्यास मात्र करितां तो कां ? टिळक लिहितातः—" रा. ब. रानडे यांनीं सांगितलेली गोष्ट आमच्या मतें जर मान्य ठरेल तर ती आम्ही मान्य करूं; नाहींतर करणार नाहीं. असा आमचा पूर्वापार क्रम आहे. व तोच सध्यांच्या प्रकरणींहि आम्ही स्वीकारला आहे." असें निक्षून लिहिण्याचें कारण असें दिसतें कीं, कोणत्याहि राजकीय सभेंत वाचण्यासाठीं आपल्या सहीचें पत्र रानड्यांनीं पूर्वीं कधीं धाडलें नव्हतें तें या खेपेस धाडलें. या गोष्टीस उद्देशून केसरीनें त्यांना बजाविलें कीं, पुढारी हे लोकांचे धनी नसून खरोखर चाकर आहेत ही गोष्ट रानडे विसरतात, व कोणा रावबहादुराचें मत म्हणजे कांहीं तें लोकमत नव्हे. याच सुमारास रानड्यांप्रमाणें फेरोजशहा मेथांकडूनहि टिळकांस तार आली होती, व ही तार करण्यास गोखले यांनीं दिलेली माहिती कारणभूत झाली असाहि एक मुद्दा निघाला होता. तात्पर्य, पुण्यामुंबईचे बहुतेक पुढारी व सार्वजनिक सभा ही एकीकडे, आणि टिळक व पुण्यांतील त्यांचे अनुयायी एकीकडे, असे बरोबर दोन तट झाले.

रावबहादुर रानडे हे या सभेच्या विरुद्ध प्रथमपासूनच होते असें नाहीं. लॉर्ड हॅरिस यांचें धोरण त्याना मान्य नव्हतें, परंतु जाहीर रीतीनें गव्हर्नरसाहेब आपल्या धोरणाची मांडणी कशी करितात हें दिसून येईपर्यंत सभा भरवूं नये असें त्यांचें प्रथम मत होतें. पुढें हॅरिससाहेबांचें बोलून झालें तरी रानड्यांचा निश्चय होईना. त्यांना यापुढें आठ दिवसांची मुदत दिली, तीही संपली, तरी आतां सभा भरवा असें ते स्पष्ट म्हणेनात. अर्थात् सभा भरविणारांना या अनिश्चितपणाचा जाच वाटूं लागला. रावबहादुरांचीं कारणें समजून घेण्याविषयीं सभा भरविणारांनीं प्रयत्न केला, व तीं आपल्यास पटत नाहींत असें ठरल्यावर मगच सभा भरविण्याचा निश्चय केला. इतकें झाल्यावर सभा भरविणारे आपल्या कृत्यास जबाबदार आहेत असें म्हणून रानडे व त्यांचे अनुयायी यांनीं सभावाल्यांचा नाद सोडून द्यावयास पाहिजे होता. परंतु खुद्द सभेंत वाचण्याकरितां रानड्यांनीं प्रतिकूल मताचें पत्र पाठविलें; आणि त्यांच्या अनुयायांनीं रानड्यांची तेवढी सद्बुद्धी व इतरांची दुर्बुद्धी, किंवा जातींतील तंटे मोडण्याची रानड्यांची इच्छा आणि जातिद्वेष वाढविण्याची टिळकप्रभृतींची इच्छा, असा भेद काढण्यास उघड उघड सुरुवात केली.

यामुळें रागावून जाऊन ता. २६ सप्टेंबर १८९३ च्या केसरींत टिळकांनीं 'रा. ब. रानडे व त्यांचे अनुयायी ' या मथळ्याखालीं एक अतिशय स्पष्टोक्तीचा व चर-चरीत लेख लिहिला व त्यांत 'रावबहादुरांस तरी सद्‌बुद्धीची सनद कोठून मिळाली आहे ? ' या आपल्या प्रसिद्ध वाक्याचें त्यांनीं समर्पक समर्थन केलें.

टिळक जातिद्वेष वाढवितात असें म्हणणारांना आणखी एक कारण मिळालें. दंग्यानंतर कांहीं दिवसपर्यंत मुसलमानी मोहोल्यांतून हिंदी मजूर वगैरे जाऊं लागले म्हणजे त्यांना मुसलमान त्रास देत व या त्रासापासून त्यांचें संरक्षण पोलीस करीना. यामुळें मजुरांनीं संप करून कामधंदा बसविला. त्यानें सर्वांचेंच नुकसान होऊं लागल्यामुळें पोलिसांस मध्यें पडावें लागलें, आणि मुसलमानी मोहोल्यांतून अधिक बंदोबस्त झाल्यावर कामधंदा पूर्ववत् चालू झाला. पण हें काम संपांनीं केलें व संपाखेरीज इतर कशानें तें झालें नसतें, हें ध्यानांत घेऊन टिळकांनीं केसरींतून या संपाचें समर्थन केलें. मुंबईस या सुमारास दंग्यांतील खटले सुरू झाले. त्यासंबंधानेंहि टिळक असें उघड प्रतिपादन करूं लागले कीं, एकाच कलमाखालच्या मारामारीचा आरोप अनेकांवर आला असला तरी त्या सर्वांना सारखी शिक्षा देणें योग्य नाहीं. ज्याची आगळीक किंवा गुन्ह्याची बुद्धी अधिक त्याला शिक्षाहि अधिक पाहिजे. प्रस्तुतच्या दंग्यांत पहिली आगळीक मुसलमानांनीं केली, व घाटी लोकांनीं दुसरे दिवशीं हातांत काठी घेतली ती केवळ आत्मसंरक्षणार्थ. म्हणून घाटी लोकांना शिक्षा झालीच तर नांवाला व जुजबी झाली पाहिजे. या उद्गारांचा अर्थ घ्यावा तसा आहे. टिळकांचें म्हणणें, मी बोलतों हेंच बोलणें खरें व न्यायाचें, रानडे व त्यांचे अनुयायी मुसलमानांची फाजील भीड धरतात म्हणून त्यांना हें बोलवत नाहीं, व ती भीड मोडण्यास मी तयार आहें म्हणून तें मी उघड बोलतों, इतकाच फरक.

याच सुमारास हिराबागेंत एका मौलवीसाहेबांचें भाषण झालें. त्यावेळीं दिवाण काजी शहाबुद्दिन हे अध्यक्ष होते. त्यांनीं हिंदूविषयीं बरीच तक्रार केली. हिंदु लोक आपल्या पत्रांतून आम्हांस शिव्या देतात. नीचपणानें आमचा उल्लेख करतात. अकबरासारख्या आमच्या राजांचे उपकार स्मरत नाहींत, हिंदु हे सदाच परतंत्र राहण्याच्या योग्यतेचे. ते मुसलमानांत मिसळून त्यांचा प्रखरपणा आपलासा करतील तरच निभावतील वगैरे विधानें त्यांनीं केलीं. त्याचें पुष्कळांना वाईट वाटलें. केसरींत पत्र लिहून 'एका एकी करूं इच्छिणाऱ्या' मुसलमान गृहस्थानें काजीसाहेबांच्या या भाषणावर अशी मखलाशी केली कीं, काजीसाहेब बोलले ते निर्भीडपणानें बोलले. हिंदुमुसलमानांत एकी व्हावी तर "सध्यांचा प्रसंग असा आहे कीं, दोन्ही पक्षांच्या लोकांनीं परस्परांस कोणकोणत्या कारणांनीं परस्परांपासून दुःख होतें व दुही वाढते हें स्पष्टपणें, निर्भीडपणें व सकारण सांगणें हेंच त्यांचें कर्तव्य होय; कारण असें केल्यानें कांहींतरी तडजोड करितां येईल व कायमची एकी साधितां येईल. नुसत्या उपदेशाच्या गोडगोड शब्दांनींच दुही माजविणाऱ्या कारणां-

वर आच्छादन घालून एकी करूं म्हणाल तर कार्यसिद्धि होईल असें समजणें भ्रांतिमूलक आहे."

काजी शहाबुद्दीन यांचें भाषण ऐकण्यास स्वतः टिळक हजर होते. त्यांच्या भाषणांतील विचार जरी टिळकांना पसंत नव्हते तरी त्यांनीं निर्भीडपणानें आपलें मत सांगितलें, येवढाच त्यांतला गुण टिळकांनीं घेतला. कारण स्वतः टिळकहि या वेळीं निर्भीडपणानेंच बोलत होते. हिंदु वर्तमानपत्रांतील लेख व हिंदु लोकांचें वर्तन हींच मुसलमानांच्या दंग्याला खरोखर कारणीभूत होतात असें जर काजी-साहेबांना भरसभेत म्हणण्याचा अधिकार, तर मुसलमान लोकांच्या आगळिकीमुळें दंगे होतात असें प्रतिपादन करण्याचा टिळकांना तो अधिकार कां नसावा?

आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत दंग्यांच्या खटल्याचा निकाल लागला. एकंदर १४५४ लोक पकडले, पैकीं ६६९ हिंदु ७८५ मुसलमान. पंचवीस हिंदु व एकोणतीस मुसलमान हे बिनशिक्षेनें अजीबात सुटले. बाकी राहिलेल्या लोकांत शिक्षेची सरमिसळ समसमान वांटणी करण्यांत आली. पण ही गोष्ट न्यायाची नव्हती. कारण प्रभासपट्टणाहून चिथावणी देण्यास मुसलमान लोक मुंबईस आले, जुम्मामशिदींतून मुसलमान काठ्या घेऊन बाहेर पडले, आजपर्यंत मुसलमानांनीं मुंबईस तीनदां दंगा केला त्या तीनहि प्रसंगीं मूळ दंग्यास जुम्मा-मशिदींतच सुरवात झाली, हें लक्षांत घेऊन रस्त्यांत उगीच अनमान धबक्यानें पकडलेल्या हिंदूंना, ते आत्मसंरक्षणार्थ सज्ज झालेले असतील तर, सोडून दिलें पाहिजे होतें. प्युनिटिव पोलिस बसवावयाचें तर तें जुम्मा मशिदींवरच बसविलें पाहिजे व त्याचा खर्च मशीदीच्या उत्पन्नातून घ्यावा, म्हणजे दंगेखोर लोकांचे जमाव पुनः मशिदींत व्हावयाचे नाहींत, आणि दंग्याचीं खरीं कारणें शोधून काढून तीं पुढें थांबविण्याकरितां स्वतंत्र कमिशनच नेमलें पाहिजे, असें निर्भीडपणें प्रतिपादन करण्याचा तडाखा केसरीनें चालू ठेविला होता. उलट टाइम्स वगैरे पत्रांनीं, मुसलमानांस दोष वगैरे न देतां व सरकारास तर दोषा-रोपांतून अजीबात वगळून, मुसलमानांना एखादा सरकारी काजी देण्यांत यावा म्हणजे दंगे बंद होतील असें मत दिलें होतें. या दोन उपायांतील भेदाचें मर्म कोणास समजून सांगण्याचें कारण नाहीं. मुसलमान लोक चिडतील अशा सम-जुतीनें भिऊन न जातां त्यांना कोणत्याहि प्रकारें चिडवूं तर नये पण आपले मामुली हक्क, वहिवाटी व चळवळी, सोडूं नयेत अशाच निश्चयानें पुण्यांतील हिंदु वागत होते. मुंबईस पोलीस कमिशनर व म्युनसिपल कमिशनर यांनीं गोरक्षणी चळवळीविरुद्ध अकांडतांडव सुरू केलें होतें. त्याच सुमारास पुण्यास गोरक्षण-सभेतर्फे जाहीर सभा भरवण्यांत आली व सिमला येथें बसलेल्या शेतकी कमी-शनकडे गोवध बंदी, गोरक्षण वगैरे संबंधीं अनेक ठराव मंजूर करून पुण्याचे तर्फे पाठविण्यांत आले.

याहून अधिक विधायक स्वरूपाची कामगिरी म्हटली म्हणजे, याच सालीं मुंबईच्या दंग्यानंतर एकदीड महिन्यानें जो गणेशोत्सव आला त्यांत हिंदूंची विशेष एकी करण्याचा प्रयत्न झाला. नव्या गणपतीउत्सवाचा हाच मूळ प्रारंभ. " यंदा येथें गणपती पोंचविण्याचा समारंभ सालाबादपेक्षां निराळ्या तऱ्हेनें होऊन त्यास बरेंच सार्वजनिक स्वरूप आलें आहे. गणपती सर्व प्रकारचे हिंदु लोक पुजतात, तेव्हां गणपती पोंचविण्याचा समारंभ सार्वजनिक झाल्यास त्यापासून अनायासेंच करमणूक होऊन लोकसमाजांत एक दिलानें कामें करण्याची जी प्रवृत्ति आहे तीसहि थोडीबहुत मदत होईल." ( केसरी ता. २६ सप्टेंबर १८९३.)

हिंदुमुसलमानांच्या दंग्याचें जें निदान टिळकांनीं केलें तें खरें ठरण्याचा प्रसंग यापुढें दोनतीन आठवड्यांतच आला. येवल्यास बालाजीची पालखी नेहमींप्रमाणें पाटलाच्या मशीदीवरून वाजत जावी कीं नाहीं हा तंटा होता. याविषयींहि डि. म्याजिस्ट्रेट यांनीं असा हुकूम काढला होता कीं, मशीदींत या दिवशीं मुसलमानांनीं जमूं नये व मशीदीच्या मागेंपुढें पंधरा पावलेंपर्यंत हिंदूंनीं वाद्यें वाजवूं नयेत. मुसलमानांना हा हुकूम अमान्य होऊन त्यांनीं कोर्टाकडे या हुकुमाविरुद्ध अपील केलें. पण पालखीच्या आदल्या दिवशींच अशी बातमी आली कीं हायकोर्टानें हा हुकूम कायम केला. हिंदूंनीं हुकमाप्रमाणें मशीदीपुढें वर्तन केलें तरी मुसलमानांनीं आंतून पालखीवर दगड फेंकले व त्यामुळें दंगा झाला. पूर्वीं बेळगांव, मालेगांव, राजापूर वगैरे ठिकाणीं असेच प्रकार झाले होते. वास्तविक डि. म्याजिस्ट्रेट यांचा हुकूम दोघांनाही असमाधानकारक होता. मुसलमानांचें म्हणणें, जुनी वहिवाट मोडून कसलेंच वाद्य हिंदूंना वाजवूं देऊं नये. हिंदूंचें म्हणणें, सर्व प्रकारचीं वाद्यें वाजवीत जाण्याची जुनी वहिवाट असतां नवीन बंधन घालण्यास डि. म्याजिस्ट्रेट यांस काय अधिकार ? वहिवाट असेल त्याप्रमाणें चौकशी करून, वहिवाट ठरेल त्याप्रमाणें हुकूम काढण्याचा अधिकार म्याजिस्ट्रेट यांस असावा; व वहिवाट ठरल्यावर ती मोडण्याबाबत जो आगळीक आधीं करील त्यास सरकारनें निर्भीडपणानें शिक्षा द्यावी, तरच कायद्याची व्यवस्था होईल, असें केसरीचें म्हणणें होतें. नोव्हेंबर महिन्यांत आग्रा येथें लॉर्ड लॅन्सडौन यांनीं भाषण केलें, त्यांत गोरक्षणी चळवळ व हिंदुमुसलमानांतील दंगे यांचा उल्लेख केला होता. त्यांत गोरक्षण सभेचे फाजील प्रचारक व अविचारी वर्तमानपत्रांतील लेखक यांना तर दोष दिलाच होता; पण "कोणी दंगा करील या भीतीनें कायद्याचा अंमल करण्यास आम्ही मागें घेणार नाहीं " असें एक मोघम वाक्य होतें; त्यानें किंचित् बाजु सांवरली. पण स्थानिक अधिकाऱ्यांच्या वर्तनांत बड्या लाट साहेबांची ही निर्भयता दिसून येत नव्हती. उदाहरणार्थ खुद्द येवल्यासच डि. म्याजिस्ट्रेट यांनीं काढलेला जाहीरनामा असि. कलेक्टर यांनीं धाब्यावर बसविला; व मुसलमान गाय खात नाहींत व सरकार

योग्य मदत करीत नाहीं, असें पाहून बालाजाची पालखी काढण्याचेंच मुळीं हिंदुंनीं रहित केलें. पुढें येवल्यांतील हिंदूंनीं मुसलमानांशीं व्यवहार बंद ठेविला आणि नाशिकचे कलेक्टर वुइंटरसाहेब यांनीं हिंदु पुढाऱ्यांस बोलावून आणून तंबी दिली व हा संप मोडविला. तात्पर्य हिंदूंना मदत तर करावयाची नाहीं व त्यांचें स्वावलंबनहि चालूं द्यावयाचें नाहीं अशाच तऱ्हेचें हें पक्षपाती धोरण होतें.

१८९४ च्या जानेवारींत मुंबईच्या दंग्यासंबंधानें सरकारी ठराव प्रसिद्ध झाला. त्यांत पो. कमिशनर व्हिन्सेंटसाहेब यांनीं गोरक्षणी चळवळीस दोष दिला होता, तो सरकारनें थोडाबहुत खोडून काढला. शिवाय याच सुमारास रावेर वगैरे ठिकाणीं मुसलमानांचे दंगे होऊन, गोरक्षणाची चळवळ जेथें ऐकूनहि माहीत नाहीं अशा ठिकाणीं मुसलमानांचा दुराग्रह व अधिकाऱ्यांची फूस यामुळें दंगे कसे होतात हें दिसून आलें. खुद्द मुंबईस दंग्याची वदंता तीन दिवस आधीं कळली होती अशी व्हिन्सेंटसाहेबांनींच कबुली दिली असतांहि, त्यांनीं योग्य तो बंदोबस्त केला नाहीं ही गोष्ट सरकारी ठरावानेंच बाहेर आली. पण येवल्यास सरकारच्या पक्षपातीपणाचा कळसच झाला. तीन वेळां आपली जुनी वहिवाट बंद ठेऊन हिंदुंनीं हार खाल्ली, तरी मुसलमान लोकांचा दंगेखोरपणा जाईना. मध्यभागचे कमिशनर मि. ग्रीट हे येवल्यास गेले तेव्हां, तेथील मुसलमान लोकांचा नाठाळपणा व दांडगाई त्यांच्याहि लक्षांत आली. परंतु अधिकाऱ्यांच्या मनानेंच असें घेतलें कीं, मुसलमान चिडतात व मारामारीलाहि प्रवृत्त होतात म्हणून हिंदुंनीं आपले सर्व प्रकारचे हक्क वहिवाटीस अनुसरून असले तरी सोडून द्यावे. हिंदुमुसलमान पुढाऱ्यांनीं आपसांत तडजोड करावी व दंगे मिटवावे असा उपदेश लॉर्ड हॅरिस हे एकसारखा करीत असत त्याचाहि अर्थ, खोल पाहूं गेलें असतां, वरील प्रकारचाच होता. हिंदुना गाय खाण्याबद्दल उद्देशून अधिकारीच काय पण अधिकाऱ्यांचें धोरण पाहून सुधारक पक्षांतील कित्येक लोकहि उपदेश करीत.

धर्माच्या तंट्यांत मुसलमानांना गाय खाण्याबद्दल जाहीर उपदेश करणारा कोणी मुसलमान भेटला नाहींच; पण जुन्या वहिवाटी व हक्क संभाळण्यास मदत करणें हें ज्यांचें काम त्यांनींहि मुसलमानांना असा उपदेश केल्याचा फारसा उल्लेख नाहीं. " भित्रे मामलेदार, मिशनरी लोकांप्रमाणें हलक्या हिंदूंची व अज्ञाणी मुसलमानांची कींव बाळगणारे कलेक्टर, मुसलमान पोलीस इन्स्पेक्टर, प्राचीन शोधांत गुंतलेले कमिशनर, आणि क्रिकेटच्या खेळांत सर्व मन गुंतलेले गव्हर्नर इतक्या ग्रहांचा योग एका येवल्याच्या राशीला यावेळीं आला होता." हिंदूंची कोणीहि दाद घेईना व खुद्द टाइम्सपत्रानेंहि येवलें येथील अधिकाऱ्यांचें वर्तन दूषणास्पद आहे असें लिहिलें. येवल्याच्या लोकांनीं सरकारकडे

तारांवर तारा केल्या. पण नाशिकचे कलेक्टर मि. वुइंटर यांनीं या तारांना क्षुद्र लेखिलें, येवढेंच नव्हे तर ' तारेस अर्जाचें तिकिट नाहीं सबब परत ' असा विक्षिप्तपणाचा शेरा त्यांनीं आपल्या हातानें तारेच्या पाठीवर लिहिलेला टिळकांना पहावयास सांपडला. ते लिहितात " तारेस तिकिट तरी कसें लावावयाचें हें आम्हांस कळत नाहीं. तारेंतून कोर्टफीचें तिकिट पाठविण्याची अजब युक्ति वुइंटर साहेबांस माहीत असल्यास ती त्यांनीं मेहरबानी करून प्रसिद्ध करावी म्हणजे लवकरच त्यास आम्ही फोनोग्राफ शोधून काढणाऱ्या एडिसनच्या पंक्तींत बसवूं "

इकडे चार महिने येवल्यास धुसफुस चालली असतां सरकार कांहीं दाद घेत नाहीं असें पहून अखेर हिंदूहि रागावले. १८९४ च्या फेब्रुवारींत म्हणजे पूर्वींच्या दंग्यानंतर सुमारें पांच महिन्यांनीं एके दिवशीं मुसलमानांनीं, नागपुरी कोष्टयांच्या मारुतीच्या देवळासमोर पाल लावले होते ते जाळले व मारुति फोडून टाकला आणि आगींत तेल ओतण्याला मशिदींत डुकर मरून पडल्याची हूल उठवली. तेव्हां मोठाच दंगा झाला. दोन्ही जातींच्या देवळांची पुष्कळ नासधूस झाली. देवळांतून गाई मारल्या गेल्या, आगी लागल्या, लष्कर बोलवावें लागलें व गोळ्या घालून दंगा मोडावा लागला; पण मौज ही कीं धरपकड झाली त्यांत बहुतेक सर्व हिंदुच पकडले गेले. येवलें येथील अधिकाऱ्यांचें वर्तन दूषणास्पद आहे असें सरकारासहि वाटून, अखेर मुसलमान पोलीस इन्स्पेक्टरची बदली केली व असिस्टंट कलेक्टर मि० हेवर्ड यांनाहि बदललें पण वर हुजुर सेक्रेटरीएट मध्यें नेऊन ठेवलें! पुढें येवल्यास हिंदुमुसलमानांच्या पंचांची सभा भरविली. पण त्यांतहि कांहीं निष्पन्न झालें नाहीं. कलेक्टर म्हणत बाजारांतील व्यवहाराची बंदी उठवा; पण हिंदु म्हणत जुन्या वहिवाटी व हक्क यांचें योग्य रक्षण मुसलमानांपासून करूं असें वचन द्या म्हणजे बंदी उठवितों. परवान्याप्रमाणें वागण्यास हिंदु तयार होते. पण वहिवाटीची पूर्ण चवकशी होऊन मग त्याप्रमाणें परवाने दिले जावे येवढेंच त्यांचें म्हणणें होतें. हिंदुमुसलमान लोकांचे पंच नेमून ते नवा निर्णय देतील तोहि आम्ही मान्य करूं, परंतु त्याची तरी अम्मलबजावणी सक्तीनें होईलच, केवळ मुसलमान हरकत घेणार म्हणून ती थांबणार नाहीं, असें जाहीर वचन सरकारनें द्यावें असें हिंदूंचें म्हणणें होतें. शेवटीं येवल्यास प्युनिटिव्ह ( जादा ) पोलीस बसविण्यांत आलें.

पण जादा पोलीस बसविणें म्हणजे बैल गेला आणि झोपा केला अशीच स्थिति प्रायः असते. पुढें मुंबईसरकारनें येवल्याच्या दंग्यावर एक ठराव प्रसिद्ध केला त्यांतहि मुसलमानांची व अधिकाऱ्यांची तरफदारीच दिसून आली. या ठरावाची बातमी केसरीनें आधीं प्रसिद्ध केली याबद्दल पुष्कळ गवगवा झाला. शिवाय या सुमारास टिळक हे स्वतः येवल्यास जाऊन त्यांनीं बरीच चवकशी

करून केसरींतून कडक लेख लिहिले व लॉर्ड हॅरिस यांच्यावर एकसारखी टीका सुरू केली. याबद्दल त्यांजवर खटला होणार म्हणून वदंता होत्या. परंतु तो झाला नाहीं. उलट येवलें येथील दंग्यांत सामील झाल्याच्या आरोपावरून तेथील ज्या बड्या लोकांवर (यांत म्युनिसिपॉलिटीचे व्हाइस प्रेसिडेंट, चेअरमन, सावकार, वकील वगैरे अनेक लोक होते ) खटले भरून सेशनकमिट करण्यांत आले होते, ते सर्व सुटले. यामुळेंहि टिळकांच्या लिहिण्याचें व येवल्याच्या हिंदूचें समर्थनच झालें. एका खटल्यांत तर नाशिकचे सेशन जज मि. अन्विन यांनीं असा शेरा मारला कीं, त्यांत सरकारतर्फे झालेल्या पुराव्यावरून एखाद्या कुत्र्यासहि फांशीं देतां येणार नाहीं. पण खटले भरण्याचा अधिकार पोलिसांना आणि खटले खोटे ठरले तरी त्यांस कोणत्याहि प्रकारें शासन होणें नाहीं, यामुळें येवल्यास खटल्याचें सत्र सुरूच राहिलें व लोकांनीं अखेर जिंकली, तरी त्यांना त्रास व खर्च मात्र पुष्कळ झाला.

असो; येथून पुढें कांहीं दिवस बाहेरील दंग्यांवरचें लक्ष निघून तें खुद्द पुण्याकडेच खेंचलें जावें अशी स्थिति उत्पन्न होऊं लागली. शुक्रवार ता. २० एप्रिल १८९४ रोजीं पुण्यास हिंदुमुसलमानांचा दंगा होण्याचा प्रसंग आला होता पण तो टळला. त्या दिवशीं गणेश पेठेंतील डुल्यामारुतीचा छबीना हनुमानजयन्तीनिमित्त निघत असे व त्याबरोबर जुन्या वहिवाटीप्रमाणें चौघडा, तासेवाजंत्रीं भजनी मेळे वगैरे असत. पण मदादीप्रमाणें यंदा चंदूभाईच्या तालमविरून वाद्यें वाजविण्याचें बंद करावें असा हुकूम झाल्यामुळें हिंदु लोकांनीं मिरवणूक काढावयाची नाहीं असें ठरविलें होतें. अधिकारी छबिनावाल्यांनीं पड खाली ती इतर कित्येकांना पटली नाहीं. रात्रीं दहा वाजतां पोलीस व मॅजिस्ट्रेट मारुतीच्या देवळाजवळ जमले. हजारों हिंदु आलेच होते व मुसलमानांच्या टोळ्याहि ठिकठिकाणीं बसल्या होत्या. छबिना रहित होऊं देणार नाहीं असें म्हणून एका उत्साही गृहस्थानें नवी पालखी व चाळीस पन्नास टाळकरी आणून छबीना काढला. लोकांस आवेश इतका आला कीं, आयत्या वेळीं पलिते मशाली मिळेनात म्हणून टेंभे पाजळण्याला लोकांनीं आपलीं उपरणीं पुढें केलीं. तासे वाजंत्र्यांची वाण जयघोषानें भरून निघाली. व अशा रीतीनें टाळ वाजवीत व भजन करीत छबिना तालमीवरून जाऊन परत आला. क्षणोक्षणीं अशी भीति वाटत होती कीं, मारामारी होणार. पण सुदैवानें ती यावेळीं टळली. मुसलमान लोक, हिंदुनीं हुकूम तोडल्याबद्दल फिर्याद करणार अशी वदंता उठली. होती. परंतु तींतून विशेष कांहीं निष्पन्न झालें नाहीं.

याच सालच्या मे महिन्यांत हिंदुमुसलमानांत वाद वाढण्यासारखी आणखी एक गोष्ट घडली. मिर्झा आबास अली बेग या नांवाचे मुसलमान गृहस्थ या वेळीं सरकारी ओरिअंटल ट्रॅन्सलेटर होते. ता. ५ मे रोजीं हे महाबळेश्वरास

असतां, फिरत फिरत क्षेत्रमहाबळेश्वरीं गेले. तेव्हां त्यांना थेट श्रीकृष्णाबाईच्या देवळांत प्रवेश करण्याची इच्छा झाली. गुरवास संशय येऊन त्यानें त्यांना हरकत केली तेव्हां "मी कनोजा ब्राह्मण आहें, मुसलमान असतों तर मला दाढी नसती काय?" असें सांगून त्यांनीं त्यास फसविण्याचा प्रयत्न केला. पण पुण्याचे दोघे ब्राह्मण कुंडांत स्नान करीत होते त्यांनीं बेग साहेबांना ओळखलें. तेव्हां ते खजील होऊन परत गेले. पुढें महाबळेश्वराच्या मॅजिस्ट्रेटकडे फिर्याद झाली, तेव्हां थोरामोठ्यांच्या मध्यस्थीनें बेग साहेबांनीं माफी मागून देवळाची शुद्धी करण्याकरतां ५० रुपये दंड दिला. या गोष्टीची चर्चा वर्तमानपत्रांतून बरीच माजली. बेग साहेबांचे स्नेही म्हणूं लागले, गुरव लोक मुसलमानांनाहि पैशाच्या लालचीनें देवळांत नेतात, मग बेगनींच येवढें काय पाप केलें ? मुंबईच्या पत्रांनीं अशी तक्रार केली कीं, हें मुसलमानांच्या द्वेषाचें लक्षण आहे. या सर्वांचा हेतु येवढाच होता कीं, अशा गवगव्यामुळें सरकारनें बेगसाहेबांना कांहीं दोष देऊं नये. पण सुदैवानें सरकारनें या कामीं थोडा सरळपणा दाखवून बेग यांना देवळांत जाण्याबद्दल दोष दिला, व 'शिवाचा नंदी हा माझ्या घोड्यासारखा दिसतो' असे उद्गार काढल्याबद्दल तर त्यांना वेगळें पत्र लिहून त्यांचे कान पिळण्यांत आले होते.

ज्येष्ठमासीं आळंदीच्या पालखीच्या वेळीं थोडी गडबड झाली. गणेशपेठच्या गेटानजीक एका कबरस्थानाजवळ नगारा वाजविण्यास मुसलमानांनीं हरकत केली. दर्ग्यांतून विटा फेंकण्यांत आल्या तेव्हां उलट हिंदूंनींहि विटांचा मारा केला. पालखी पुढें निघून गेल्यावर एक ब्राह्मण एकटा सांपडला त्याला मुसलमानांनीं धरून खूप मारलें. परंतु पोलिसांकडून त्याचा तपास वगैरे कांहीं झाला नाहीं. सरकार कांहीं करीना तेव्हां लोकांनींच कांहींतरी करणें प्राप्त आलें. पुण्यांतील हिंदु पुढारीहि लोकांस असें सांगू लागले कीं, मुसलमानांच्या उत्सवांत तुम्ही सामील होतां ते यापुढें होऊं नये. आळंदीची पालखी दर्ग्यावरून जावयाला जर मज्जाव तर हसन-हुसेनच्या थडग्यांच्या प्रतिमापुढें आल्बिदा करीत हिंदुंनीं तरी नाचत रडत कां जावें? पुण्यांतील शेंकडा नव्वद ताबूत हिंदूंचे असतात, ते त्यांनीं कां करावे ? मुसलमानांच्या स्नेहाकरितां ताबूत करावयाचे, त्या स्नेहाचा हा असा प्रकार सुरू आहे, आणि ताबूत नवसाला जितका पावेल तितका हिंदूंचा देवही खचित पावेल. उत्सवाची हौसच फेडून घ्यावयाची तर ताबूत टाकून गणपति–उत्सव करावा. हा प्रतिकाराचा उपाय आहे. "आम्ही जों जों जास्त गरीबी दाखवितों तों तों शिष्टाचार मोडल्याचा पुनः आमच्यावर मुसलमान लोक आणि सरकार आरोप करतात हें लक्षांत ठेविलें पाहिजे. श्रीकृष्णांनीं असाच उपदेश केला आहे ' ये यथा माम् प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्.'

या उपदेशाप्रमाणें कांहीं ठिकाणीं जुने ताबूत बंद करण्यांत आले. लष्करांतील कामाठीपुऱ्याचा ताबूत बंद झाला. त्याचा मलंग मुसलमान लोक मारु-

तीच्या देवळांत शिरून घेऊन गेले. पेरूच्या गेटाजवळील वाघाचा ताबूत बंद करणाऱ्या माळ्यास पोलिसानें नेऊन तंबी दिली. उलट पुण्यांतील हिंदु न्हाव्यांनी ताबुतापुढें चौघडे न वाजवण्याचा ठराव केला. या सालीं पुण्यांतील मुसलमानांचे ताबूत चाळिसापासून साठपर्यंत वाढले व हिंदूंच्या शंभर ताबुतांऐवजीं फक्त पंचवीस झाले. हिंदु लेजीमवाले मिरवणुकीला गेले नाहींत. रेवड्या आणि नाडापुड्या एकदशांशही खपल्या नाहींत. "रामेश्वराच्या देवळापासून जुन्यामंडईपर्यंत सर्व बुधवारभर रस्त्यावरील जे दिवाणखाने 'कटाक्षैर्नारीणाम् कुवलयितवातायनमिव' व्हावयाचे ते सर्व बंद केलेले होते." ताबुतांपेक्षां म्याजिस्ट्रेटांची गर्दीच रस्त्यांत अधिक भासली. अशा ओसाड व उदास रीतीनें झालेली ताबुतांची ही मिरवणुक पुण्यांत पहिलीच. या देखाव्यानें सर्वांच्याच मनावर परिणाम झाला.

हिंदूंना मुसलमानांशीं स्नेह हवा होता, पण स्वाभिमान सांडून नको होता; हें हिंदूंना सरकाराप्रमाणें मुसलमानांनाहि कळवावयाचें होतें. सर्व धर्म हिंदूंना सारखेच मान्य आहेत. पण "यो यथा वर्तते यस्मिन् तथा तस्मिन् प्रवर्तयन् माऽधर्म समवाप्नोति, नचाश्रेयश्च विंदति" हें वाक्यहि हिंदूंनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. स्नेह व तह समानशक्तीच्या लोकांतच नांदूं शकतो ही गोष्ट हिंदुंनीं विसरूं नये असा केसरीचा स्पष्ट उपदेश होता. मुंबईस तर हिंदूंना ताबूताची परवानगी देऊं नये असें खुद्द पोलीस कमिशनरांनींच ठरविलें होतें. हा हुकूम अगदींच नवा होता असें नाहीं. पण नांवाला मुसलमान पुढें करून हिंदु ताबुतांचे परवाने काढीत ते मात्र केसरीच्या या उपदेशानें या वर्षी थांबले. या सालीं ताबुतांपुढें कोळणी नाचल्या नाहींत आणि मारवाडी बैराग्यांचीं सोंगें सजलीं नाहींत. पेणमध्यें तर बहिष्काराचा उपयोग चांगला झाला व तेथील दुही मिटली. एकमेकांचें एकमेकांवाचून अडतें असा अनुभव आल्याशिवाय साम होत नाहीं. "अमर्षशून्येन जनस्य जंतुना न जातहार्देन न विद्विषादरः" ही भारवीकवीची उक्ती लोक आजवर नुसती ऐकत होते ती या प्रसंगीं अनुभवास आली.

नागपंचमीच्या दिवशीं पुण्यास नागोबाची मिरवणूक निघते. तिचा बंदोबस्त पूर्वीच्या सालीं किती कडेकोट केला होता हें मागें दिलेंच आहे. यंदां फिरून तोच प्रश्न आला. तेव्हां म्याजिस्ट्रेटांनीं हिंदुमुसलमानांचे जाब घेतले त्यांत उभयतांनींहि वार्षिक वहिवाटीप्रमाणें सर्व कांहीं व्हावें असें लिहून दिलें. पण दंगे न करण्याबद्दल म्याजिस्ट्रेटांनीं चारचौघांचे जातमुचलके घेऊन बंदोबस्तीहि केली. इतक्यांत पोलिस सुपरिंटेंडट म्याकफर्सनसाहेब यांनीं अवचित असा हुकूम काढला कीं, मशीदीच्या आगेमागें चाळीस पावलें वाद्यें वाजवूं नयेत. हिंदु लोक ही गोष्ट कबूल करीनात. खुद्द मुसलमान कबूल असतांहि पोलिसांनींच हरकत घ्यावी हें अयोग्य अशी तक्रार करून, मशीदीवरून मिरवणूक वहिवाटीप्रमाणें नेऊं देईनात तेव्हां, मशीदीजवळ नागोबा टाकून लोक परत गेले. मग तो पोलिसांनीं बैल लावून पोंचता

केला. नवरा कबूल नवरी कबूल पण उपाध्याच्या पोटांत दुखतें अशी जी म्हण आहे तिचा अनुभव या ठिकाणीं आला. उलट, नागोबा सोडून लोक गेले ते पोलिसांनीं अडविल्यामुळें असें असतां त्यांच्यावरच रस्ता अडविण्याबद्दल खटला भरण्यांत आला, व सात आरोपींस प्रत्येकीं पंचवीस रुपये दंड झाला. हिंदु लोकांच्या या ताठरपणाच्या वागणुकीचा विपर्यास करण्यास कांहीं लोक तयार होतेच. त्यांनीं सरकाराकडे असा अर्ज केला कीं, मुसलमान कॉंग्रेसच्या चळवळींत शिरत नाहींत म्हणून रागावलेले पुण्याचे ब्राह्मण त्यांना अशा रीतीनें छळीत आहेत, व सरकारच्या राज्यास धोका आणण्याची राजद्रोही चळवळ त्यांनीं सुरू केली आहे. या सुमारास पोलीससाहेबांनीं पोलीस ॲक्टाअन्वयें कायमचे म्हणून वाद्यांचे नियम जाहीर केले त्यांत उघड पक्षपात केला होता. मशीदीच्या आसपास वाद्यें वाजविण्यास अष्टौप्रहर बंदी, व हिंदु देवळांतून मात्र प्रत्यक्ष पुराण चाललें असेल तेव्हांच बंदी. शिवाय गाड्याघोडीं रस्त्यांतून जात असतां, किंवा रस्त्यांत कोणी कोठें पुराण–कुराण वाचीत असतां, व पोलीस कामगार सांगतील तेव्हां वाद्यें बंद करावीं असाहि एक नियम यांत होता. हे नियम अर्थातच मूर्ख-पणाचे होते. कारण हे नियम पत्करून वाद्यें वाजविण्यापेक्षां तीं टाकून दिलेलींच बरीं हें कोणीहि समंजस मनुष्य कबूल करील. यापुढें गणपतीचा सण आला. तेव्हां ६०० मुसलमानांनीं कलेक्टरकडे अर्ज केला. आणि हिंदूंची एक कमेटी स्थापून कलेक्टर मि. ओम्यानी यांजपुढें सर्व खरा प्रकार मांडल्यावर त्यांनीं असें जाहीर केलें कीं, वाद्यांचे हे नियम खाजगी मिरवणुकीस लागू नाहींत. सार्वजनिक मिरवणुकीपुरते आहेत. कचेरींतील वाद अशा रीतीनें संपला. पण गणपति-उत्सवास जें नवीन स्वरूप यंदां येऊं पहात होतें तें सुशिक्षित हिंदूंतीलच कित्ये-कांना खपलें नाहीं.

इतके दिवस धुमसत असलेला द्वेषाग्नि केव्हां तरी एकदां भडकल्याशिवाय राहणार नाहीं हें अगदीं उघड होतें. पुण्यांतील सुधारक सुधारून वाढविलेल्या गणपत्युत्सवास नांवें ठेवीत होते, व याचा परिणाम चांगला होणार नाहीं अशीं भविष्यें वर्तवीत होते. पण मुसलमानांच्या दुराग्रहाचा निषेध त्यांच्याकडून व्हावा तितका जोरानें होत नव्हता; व त्यांच्याच धोरणानें चालावयाचें म्हणजे मुसल-मानांनीं हळूहळू कोणत्याहि रस्त्यांतून कसलेंहि वाद्य वाजूं देऊं नये व हिंदूंनीं कायमचे मूग गिळून बसावें असें झालें असतें! पण ही गोष्ट टिळकांना मान्य नव्हती. अल्पसंख्याकांनीं झाला तरी बहुसंख्याकांवर जुलूम किती करावा व बहु-संख्याकांनीं तो भिडेखातर किंवा भीतीखातर किती सोसावा याला मर्यादा असलीच पाहिजे, आणि आपल्या योग्य हक्कांच्या संरक्षणाच्या कामीं एकादे वेळीं एकादा धोका आला तर तो सोसला पाहिजे असें टिळकांचें प्रथमपासून निश्चयात्मक मत असून, त्याच धोरणानें त्यांनीं आज दोन वर्षें या विषयावर केसरींत लेख लिहिले

होते. वाद्यांच्या संबंधानें पुण्यांतील अधिकाऱ्यांनीं केलेले नियम अन्यायाचे होते हें सुधारकांनाहि कबूल होतें, ही गोष्ट सार्वजनिक सभेनें त्यावेळीं सरकारशीं केलेल्या पत्रव्यवहारावरून सिद्ध होते. राहतां राहिली स्वयंप्रतिकाराची गोष्ट. त्या बाबतींत टिळकांचें व सुधारकांचें मत त्यांच्या स्वभावभेदामुळें केव्हांहि जुळणें शक्य नव्हतें. पण अशा प्रतिकाराच्या तत्त्वाला उघड नांवें ठेवितां येईनात म्हणून धर्मसुधारणेच्या नांवाखालीं ते गणपति उत्सवाला नांवें ठेऊं लागले.

या उत्सवाची कायमची व्यवस्था करण्याकरितां जेव्हां खाजगी सभा भरली तेव्हां त्यांत वादाचें पुष्कळच रण माजलें, व प्रतिपक्षाच्या वर्तमानपत्रांतूनहि टिळकांवर पुष्कळ हल्ले झाले. टिळकांच्या धोरणाचा निषेध करण्याकरितां छपन्न सह्यांचें एक सर्क्युलर या सुमारास निघालें होतें. त्याचाच उलट निषेध करून टिळक लिहितात—"गांव म्हटला कीं तेथें महारवडा असावयाचाच. तद्वतच कांहीं अंशीं पुण्यांतील प्रकार होऊं पहात आहे. गणपतीचा उत्सव किती हौसेनें व कळकळीनें लोक करीत आहेत याकडे लक्ष न देतां, आपल्या शहाणपणाच्या तोंऱ्यांतच मुरडणारे पंडितंमन्य गृहस्थ आमच्या पुण्यनगरीं विराजमान होत आहेत. या गृहस्थांची अशी समजूत आहे कीं, पुण्याचें जेवढें काय शहाणपण आणि अब्रू आहे ती सर्व परमेश्वरानें एका पेटींत घालून तिच्या कुलपाची किल्ली या गृहस्थांस आणून दिली आहे." असो. उत्सवाचें हें पहिलेंच साल असल्यामुळें कांहीं सुधारकपक्षाचे लोक गणपति वगैरे पहावयास बाहेर पडत असत. गोपाळराव गोखले हे या वर्षी मेळे पाहण्याकरितां विंचूरकरांच्या वाड्यांत गेले होते असें सांगतात. त्या पक्षाचे दुसरे एक पुढारी राघोपंत नगरकर यांनींहि केसरीस पत्र लिहून, गणपति उत्सवासंबंधानें तत्त्वाचा मतभेद नाहीं, पण कांहीं व्यक्ती व्यवस्थापक मंडळींत सामील करून घेण्यासंबंधानेंच वाद होता, असा खुलासा केला होता; आणि ग्रामण्यांतील ओढ लक्षांत घेऊन नगरकरांबद्दल गैरसमज होण्यासारख्या कंड्या कोणी पिकवीत असेल तर तें अश्लाघ्य आहे, व उपेक्षा हेंच त्याचें शासन, असें सर्टिफिकेट टिळकांनीं नगरकरांना केसरींत दिलें होतें.

पण उत्सवांत सुधारक सामील होवोत वा न होवोत, उत्सव तेवढ्याकरितां कांहीं थांबणार नव्हता. तो मुसलमानांना चिडविण्याकरितां जरी सुरू केलेला नव्हता तरी, हिंदु विरुद्ध मुसलमान या प्रचलित वादांत, हिंदुसमाज अधिक एकजीव कसा करावा व मुसलमानांना न भितां हिंदूंनीं आपले हक्क कसे प्रस्थापित करावे हें शिकविण्याचा त्याचा हेतु होता. "आज कित्येक वर्षें आल्लिवदानें किटलेली जीभ श्रीमंगलमूर्तीच्या नामोच्चारानें पुनः पवित्र होत चालली आहे व "स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः" या गीतावाक्याचा लौकिक अर्थ सर्व लोकांच्या मनावर चांगला ठसला आहे" असे खुल्या दिलाचे उद्गार टिळकांनीं केसरींत या सुमारास काढले त्याचें मर्म कोणाच्याहि तेव्हांच

लक्षांत येईल. असो; अनंतचतुर्दशीच्या दिवशीं सार्वजनिक मिरवणुकीस परवानगी मिळते कीं नाहीं अशी शंका प्रथम वाटत होती, पण कलेक्टर मि. ओम्यानी यांनीं ती निवारली. तथापि मनांतील धुगधुग अगदींच गेली नव्हती. ता. ११ सप्टेंबरचा केसरी लिहितो "समारंभ अपूर्व व प्रेक्षणीय होईल अशी उमेद आहे; पण आजच्या काळांत भविष्यकाळच्या गोष्टी सांगण्यापेक्षां भूतकालच्या गोष्टीच सांगणें बरें." या सावधगिरीचें प्रत्यंतर दुसरे दिवशींच मिळालें.

उत्सवाचे पहिले आठ दिवस सुरळीत निभावले. पण पुढें गांवांत मुसलमानांमध्यें हालचाल दिसूं लागली. जो तो हिंदु आपापला गणपति व आरास सांभाळण्याकरितां विशेष खबरदारी घेऊं लागला. चौकांची नाकेबंदी करून गुप्तपणें राहणें ही कामगिरी हिंदु तालिमबाजांनीं आपणाकडे घेतली. क्वचित् एखाद्या गणपतीशीं चुकूनहि एखादा खडा वाजला कीं मुसलमान वावरल्याचा संशय येई. बढाई आळीच्या गणपतीवर मुसलमानांचा विशेष डोळा म्हणून त्यावर जागता पहारा ठेवला होता. पोलीस बंदोबस्त कडेकोट असून असली जाग्रणाची कामगिरी त्यांना प्रथमच मिळाली होती. सर्व शहर मेळ्यांनीं फुलून गेलें होतें, व नियम सांभाळून वाद्यें वाजत येत जात होतीं.

पण अखेर शुद्ध त्रयोदशीच्या रात्रीं खिरींत मिठाचा खडा पडलाच! त्या दिवशीं अवर्शीच मुसलमानांनीं, तो बुधवारचा दिवस असतांहि, कुराणपढण्याकरितां म्हणून मशिदी उघड्या ठेविल्या होत्या. यांपैकीं एक मशीद दारूवाले पुलाजवळ आहे तिजवरून कांहीं मेळे वाद्यें वाजवीत रस्त्याचे पेठेंत जाऊनहि आले. पण दहा वाजण्याचे सुमारास श्रीमंत सरदार तात्यासाहेब नातू यांचा मेळा मशिदीवरून जाऊं लागला, तेव्हां पोलीसच्या हुकुमाप्रमाणें गाडीवरील तबला बंद ठेवून नुसती पेटी वाजत होती तरी, मशिदींतून मुसलमान लोक काठ्या घेऊन बाहेर पडले. त्यांनीं पेटी फोडली, मेळ्यांचा जमाव मोडला, व तात्यासाहेब नातूंनां काठ्यांनीं झोडलें. तें इतकें कीं, त्यांना उचलून जवळच्या गुजराथी देवळांत न्यावें लागलें. हां हां म्हणतां ही बातमी गांवांत पसरली. तेव्हां कांहीं उत्साही लोक धांवून गेले, व त्यांनीं मशिदींत शिरून तेथील मुसलमानांना चोपलें आणि हंड्या दिवे वगैरे सामान फोडून टाकलें. ही वर्दी लागतांच पांचपन्नास पोलीस येऊन त्यांनीं मशिदीपुढें ठाणें दिलें. पण यापूर्वींच मशिदींत घुसन मुसलमानाना शासन करणारे जे कोणी हिंदु होते ते चौघे चार दिशेस पळारहि झाले होते. उगीच रिकामटेकड्या प्रेक्षकांची गर्दी मात्र आतां होऊं लागली; व ती इतकी वाढली कीं, मोतीचौक व पूल यांचे दरम्यान पांचसात हजार मनुष्य जमलें. पोलीससाहेब मेजर मॅकफर्सन हे येतांच त्यांनीं गर्दींत घोडा घातला त्यानें पुष्कळांस इजा झाली. तेव्हां कित्येकांनीं साहेबांवरहि हात टाकला. इतक्यांत कलेक्टर, सिटी म्याजिस्ट्रेट वगैरे अधिकारी येऊन दाखल झाले; पण दंगा पूर्वींच थांबला होता.

याच रात्रीं, नातूंच्या मेळ्यावर दारुवाल्याच्या पुलाजवळ मुसलमानांचा हल्ला झाला तत्पूर्वी, टिळक, माधवराव नामजोशी व बाबामहाराज असे गाडीत बसून याच रस्त्यानें गेले होते. टिळकांची गाडी मशिदीजवळ येतांक्षणींच लोकांनीं 'टिळक-महाराज कीं जय' असा घोष केला. त्यावेळीं थोडी गडबड झाली व दंगा होतो कीं काय अशी भीति वाटली. दंगा झाला असता तर ती गोष्ट सरकारच्या पथ्यावर पडून सरकारला टिळकांना दंग्यांत गोंवता आलें असतें आणि त्यांच्या निर्भीड व झोंबणाऱ्या लेखांबद्दल सूड उगवावयास चांगली संधी सांपडली असती. पण क्रीडा-भुवनातील सभेच्या प्रसंगाप्रमाणें यावेळींहि नामजोशांचें चातुर्य व प्रसंगावधान टिळकांच्या उपयोगी पडलें. त्यांनीं गाडी झटकन पुढें काढून नेली. ती कोठें गेली हें लोकांना कळलें नाहीं. रात्रभर टिळक नामजोशी हे नामजोशांच्या गिरणींत बसून राहिले होते. सकाळपर्यंत टिळक नामजोशी कोठें आहेत याचा लोकांना पत्ताहि नव्हता.

दंग्याकरितां म्हणून कोणी पकडलेच पाहिजेत याकरितां पंधरा लोक पकडले. दहाबारा असामींना सामान्य जखमा झाल्या होत्या. त्यांतील कित्येकांना पोलि-सांचाच प्रसाद मिळाला होता. एक मुसलमान इस्पितळांत नेल्यानंतर लौकरच मरण पावला. हिंदु कोणी मेला नाहीं. गुरुवार पहांटेपर्यंत हा गोंधळ चालू होता. दोनप्रहरची मिरवणूक थांबवावी असा फिरून प्रयत्न झाला. पण मि. ओम्यानी यांनीं पूर्वीचा हुकूमच कायम केल्यामुळें मार्केटांतून मिरवणूक निघाली. पण मिरवणुकीस अपशकुन करण्याकरितां मुसलमानांनीं भरदिवसा बढायांचा गणपति अखेर फोडलाच. चंदूभाईच्या तालमीजवळहि आणखी एका गण-पतीची अशीच दुर्दशा झाली. गुरुवारीं सायंकाळीं इस्पितळांतून मेलेल्या इसमाचें प्रेत घेऊन त्याची मिरवणूक मुसलमान लोक भर बुधवारांतून काढणार होते. पण मि. ओम्यानीं यांनीं खुबीनें त्यांस परस्पर वाटेस लाविलें. शुक्रवारी अगदीं बाजूस एक दोन मारामाऱ्या झाल्या. पण दिवसरात्रभर पोलीस व लष्करी शिपाई यांचा खडा पाहारा असल्यामुळें विशेष कांहीं घडलें नाहीं. पुष्कळ मुसल-मान मशिदींत जमले होते व ते सोमेश्वराच्या देवळावर हल्ला करणार अशी बातमीहि होती. पण अखेर कांहीं अनुभवास आलें नाहीं. हिंदूंच्या हातांत काठी दिसली कीं ती काढून घ्यावी असा प्रकार सुरू झाल्यामुळें पोलिसांवरील लोकांचा भरंवसा उडून गेला. मशिदींत जमलेला एकहि मुंजावर किंवा गणपति फोडणारा एकहि मुसलमान पकडला गेला नाहीं. मात्र मुसलमानांच्या हातचा मार खाल्लेले स्वतः तात्यासाहेब नातू हेच दुसरे दिवशीं पकडले गेले.

मशिदीवर हल्ला करणारे लोक पूर्वीच निसटून जाऊन, आपण भलतेच लोक पकडले आहेत असें पोलिसांना माहीत असतां, खटल्याचें काम मात्र पुढें चालू झालें. सरकारफें बॅ. लौन्डस व आरोपींतर्फे चिमणलाल सेटलवाड हे काम चाल-

चीत होते. गांवांत इतरहि कांहीं खटले झाले. गणपतराव घोटवडेकर, भाऊसाहेब रंगारी, कृष्णराव ढोले म्युनिसिपल कमिशनर, वगैरेंवर आरोपी होण्याचा प्रसंग आला होता. पण ते अखेर सुटले. एका वढायास मात्र फ्रायसाहेबांना मारण्याकरतां हातांत काठी घेण्याचा प्रयत्न करण्याबद्दल अठरा महिन्यांची शिक्षा झाली! एकंदर पांच खटले सेशनकमिट झाले. त्यांपैकीं तेरांचा जो खटला मुख्य होता तो प्रसिद्धच आहे. त्यांत सरकारतर्फे बॅ. लौन्डस असून, आरोपींतर्फे बॅ.गाडगीळ व नारायणराव चंदावरकर, ब्रॅन्सन वगैरे काम चालवीत होते. असेसरांत दोन ख्रिश्चन, दोन पार्शी, व एक हिंदु असे निवडले गेले. न्यायाधीश सुप्रसिद्ध मि. जेकब हे होते. अखेर सोमवार ता. २९ आक्टोबर रोजीं खटल्याचा निकाल लागून असेसर व न्यायाधीश यांनीं सर्व आरोपींस निरपराधि ठरवून सोडून दिलें. पुण्यांतील ॲंग्लो-इंडियन पत्रांनीं जज्ज व असेसर यांच्यांत मतभेद झाल्याची खोटीच कंडी पिकवली, व तिचा निषेध स्वतः न्यायाधीशांना न्यायासनावरून करावा लागला.

दुसरा सेशन खटला तात्यासाहेब नातू यांच्या एकट्यांवर चालला होता व तेहि त्यांतून निर्दोषी ठरून सुटले. अशा रीतीनें पुण्यांतील लोकांवरच्या संकटाचें वातावरण जज्ज जेकब यांच्या न्यायप्रियतेमुळें लवकरच निवळलें. जेकबसाहेब हे, याच काय पण इतर सर्व दिवाणी फौजदारी खटल्यांतहि, अत्यंत शांतपणें व विनभोबाट काम चालवीत असत. दंग्यांतील खटले ही लोकांच्या दृष्टीनें अर्थात त्यांची एक कसोटीच होती, व ते त्या कसोटीस मात्र पुरे उतरले. इंग्रजी राज्यांत कोठे तरी केव्हां तरी न्याय मिळतो असले उद्गार टिळकांच्या तोंडून ज्या कांहीं थोड्या गोऱ्या न्यायाधिशांनीं काढविले त्यांत जेकबसाहेबांची गणना आहे! सदरहू खटले चालू असतां त्यांनीं कोणाचीहि भेट घेतली नाहीं, येवढेंच नव्हे तर, इतक्या दिवसांत खाजगी टपालांतील एक पत्रहि फोडलें नाहीं असें सांगतात. या महिन्या दोन महिन्यांत पांचपंचवीस आरोपी तडातड निर्दोषी ठरून सुटले यामुळें तितक्या व्यक्ति पोलिसांच्या छळांतून वांचल्या हें तर खरेंच, पण खटले चालू असतां उलट तपासणींत व बॅरिस्टरांच्या भाषणांतून स्थानिक पोलिसांच्या कारवाईवर जो प्रकाश पडला तो विशेष महत्त्वाचा होता. या सर्वांचा नैतिक परिणाम इतका झाला कीं, पुण्याच्या ब्राह्मण लोकांवर आपण आजवर विनाकारण आग पाखडली याबद्दल ना. गव्हर्नरसाहेबांनीं त्यांची माफी मागावी असें ठणठणीत आव्हान टिळकांनीं केसरींतून केलें. हें आव्हान स्वीकारण्याइतकें औदार्य लॉर्ड हॅरिस यांच्यामध्यें अर्थात्च नव्हतें, पण यापुढील त्यांच्या भाषणावर व सरकारी ठरावांच्या धोरणावर आळा पडण्यास निःसंशय मदत झाली. शिवाय आपल्या हक्काकरितां हिंदु झगडले तर, प्रथम मुसलमान कदाचित् गैरवाजवी रीतीनें चिडतील, पण चिडले तरी एखाददुसरी चकमक होऊन मग ते शुद्धीवर येतील, हा त्यांचा अदमास खरा ठरला. कारण १८९४ नंतर आतांपर्यंत पुण्यांत फिरून

हिंदुमुसलमानांचे दंगे विशेषसे झाले नाहीत. हल्लींचा काळ तर या दोन जातीं-मधील स्नेह सर्वतोपरी दृढ करण्याचा असल्यामुळें यापुढेंहि असले तंटे होणार नाहींत अशी सर्वांचीच अपेक्षा आहे.

जेकबसाहेबांबद्दल पुण्याच्या लोकांस कृतज्ञता वाटत असल्यामुळें ती कशी प्रकट करावी हें पुण्याच्या लोकांना एक कोडेंच पडलें. कारण ते आधीं युरोपियन, त्यांतून न्यायाधीश, व त्यांतूनहि अगदीं तुटक व स्वतंत्र बाण्याचे. पण त्यांतूनहि युक्ति निघाली. ता. १ डिसेंबर रोजीं पुणें म्युनिसिपालिटीच्या शाळांचा बक्षिससमारंभ व्हावयाचा होता, त्यावेळीं बक्षिसें देण्यासाठीं त्यांना निमंत्रण करण्यांत आलें. त्यांनींहि ती विनंति मान्य केली. असलीं कामें न्यायाधीश लोक नेहमीं करतात, पण या प्रसंगीं म्यु. कमेटीनें इतर चाळीस युरोपियन गृहस्थांना या समारंभास निमंत्रण केलें असतां शपथेला त्यांतील एकहि आला नाहीं ! त्यांनीं एक जुटीनें जेकबसाहेबांवर बहिष्कार घातला. उलट निम्मा गांव जेकबसाहेबांना पाहाण्याकरितां त्या दिवशीं मार्केटाजवळ लोटला होता, व साहेब परत जातांना त्यांनीं त्यांजवर पुष्पवृष्टीहि करून घेतली. साहेबांना या गोष्टीचा आधीं संशय येता तर ते आलेहि नसते. पण तसा संशय न आल्यानें लोकांचें साधून गेलें. या गर्दीच्या वेळीं पोलीस जवळ जवळ हजरच नव्हते. पण त्यांची गरजहि नव्हती. एक चांगला न्यायाधीश एका तब्बल रेजिमेंटचें काम करतो हीच गोष्ट प्रत्ययास आली ! दंग्याच्या या प्रकरणाची आरती शेवटीं ता. १ डिसेंबर रोजीं रेमार्केटांत जंगी जाहीर सभा भरून करण्यांत आली. अध्यक्षस्थानीं काशिनाथपंत नातु वकील हे होते. सभेच्या निमंत्रण पत्रिकेंत "सरकारच्या हेळसांडीमुळें व पोलिसांच्या दुर्व्यवस्थेमुळें पुण्याचे लोकांवर ओढवलेल्या संकटांतून मोकळे झालेल्या लोकांचें अभिनंदन करणें, व १८९० च्या चौथ्या ( पोलिस ) आक्टानें उसळलेला कहर सरकारच्या नजरेस आणून देणें" हा हेतु प्रदर्शित केलेला असून, सभेंतील ठराव त्या हेतूस अनुसरूनच होते. सदर कायद्याचा दुरुपयोग होत आहे तो बंद व्हावा, वाद्यांचे व इतर परवाने देतांना जुनी वहिवाट लक्षांत घ्यावी, वगैरे ठरावांवर अनेक लोकांचीं भाषणें होऊन, सभा विसर्जन करण्यांत आली.

हिंदू व मुसलमान येवढीं नांवें घेतांच पोलिसांनीं वाटेल ते हुकूम काढावे व वाटेल त्यावर खटले भरावे, आणि रेव्हेन्यु म्याजिस्ट्रेटांनीं हवा तसा अन्याय करावा, असा प्रकार या वेळीं किती चालू होता, याचें उदाहरण याच सुमारास वाईस घडलें. तें फारच नमुनेदार असल्यामुळें त्याची थोडक्यांत हकीगत देतों. भाद्रपदमासीं वाईस 'द्वारें' निघत असतात. द्वार म्हणजे चार दिशेनें मुलें यात्रेस बाहेर जाऊन गांवांत परत येतात त्यावेळीं त्यांच्या काढलेल्या मिरवणुकी. गांवचे लोक या मुलांना सामोरे जातात व त्यांस वाजत गाजत गांवांत आणतात. मिर-

वणुकीच्या वाटेंत एक मशीद आहे. आदल्या वर्षी वहिवाटीप्रमाणें मशीदविरून 'द्वारें' वाजत गेलीं. यंदा गाडें उलटलें, व ठराविक जाहिरनामा लागला. तो रद्द होई-पर्यंत मानला पाहिजे म्हणून पुढाऱ्यांनीं मशीदीपुढें वाद्यें थांबविलींहि. पण कोणा एका बेजबाबदार मनुष्यास बेसुमार हौस येऊन त्यानें एकट्यानें झांज वाजविली. अर्थात् खटला फार तर या एकावर व्हावा, पण या गुन्हेगारास इतर लोक साथीदार मानण्यांत येऊन, अकरा संभावित पुढाऱ्यांवर खटले करून त्यांना वाई-हून साताऱ्यास वीस मैल पायीं चालत नेलें. खटला भरणार दुल्लेखां इन्स्पेक्टर व संमति देणार रँडसाहेब असिस्टंट कलेक्टर ! हीं दोन नावें महाराष्ट्रांत मशहूर आहेतच. पण बिचारे तरुण असि० कलेक्टर केनेडी साहेब हे मात्र या खोड्यांत अचानक पडले. अनुभव नसल्यानें त्यांनीं हिंदु साक्षिदार तेवढे बेभरंवशी असा शेरा मारून, दंड न करितां या संभावित लोकांना अन्यायानें ऐन शिक्षा दिल्या. ही गोष्ट पुढें, म्हणजे सत्याचा प्रकाश त्यांच्या मनांत पडल्यावर, त्यांच्या मनास फार खाऊं लागली. एका माहितगार गृहस्थानें याविषयीं आम्हांस असें सांगि-तल्याचें स्मरतें कीं, केनेडी साहेब हे पुढें न्यायखात्यांत एक उत्कृष्ट न्यायाधीश ठरले, व अखेरपर्यंत वाई हा शब्द उच्चारलेला ऐकला कीं, ते लज्जेनें खाली मान घालीत. वाईच्या या ब्राह्मण पुढाऱ्यांना अपील कोर्टानें जामिनावरहि सोडलें नाहीं. आणि शिक्षा भोगून झाल्यावर साताऱ्चे लोक त्यांचा जाहीर सन्मान करतील म्हणून साताऱ्च्या अधिकाऱ्यांनीं त्याविरुद्ध आधींच जाहिरनामे काढून ठेविले !

वाई येथें या प्रकरणीं ज्या लोकांना कैदेच्या शिक्षा झाल्या त्यांचीं नांवें खालीं दिलीं आहेत. १ तात्यासाहेब गाडगीळ २ तात्यासाहेब पंत ३ बाबाजीराव पुरो-हित म्यु. चेअरमन ४ अंताजीपंत जोशी, वाई न्यू इंग्लिश स्कूलचे चालक ५ वासुदेव बाबूराव पंडित ६ रामकृष्ण माधवराव वैद्य, कन्सीलीएटर व लोकलबोर्ड चेअरमन ७ विश्वनाथ हरी कोठावळे, सावकार ८ गोपाळ तात्या ढवळेकर ९ खंडेराव वाकडे १० जनार्दनपंत एरंडे, इनामदार ११ बाळकृष्णपंत ढवळेकर. या सर्वांना २१ दिवसापासून १ महिन्यापर्यंत कैदेच्या शिक्षा झाल्या होत्या. कित्येकांस याशिवाय दंड व तो न दिल्यास वरच्या इतक्याच शिक्षा दिल्या होत्या. कित्येकांवर दोन दोन खटले असून त्यांत निरनिराळ्या शिक्षा देण्यांत आल्या.

यानंतरहि हिंदुमुसलमानांच्या दंग्यासंबंधानें सार्वजनिक चर्चा बरेच दिवस चालू होती. खुद्द पुण्यांत टिळकांनीं या वादांत मिळविलेला नैतिक विजय कित्येकांच्या मनांत सलत होताच. त्यामुळें सुधारक, केसरी, मराठा, ज्ञानप्रकाश यांच्या लढाया सुरू होत्या. विलायतेंतील प्रमुख मासिक पुस्तकें म्हणजे 'नाइंटीन्थ सेंचरी' वगैरे यांतून अज्ञानी किंवा स्वार्थी इंग्रज लोक कांहीं तरी लेख लिहीत व हिंदी वर्तमानपत्रें त्यांस उत्तरें देत. लंडन टाईम्समध्यें सर वुइल्यम हंटरसारख्या सुज्ञ मनुष्यानेंहि एक वेळ असें लिहिलें कीं, महाराष्ट्रांत हिंदुमुसलमानांमध्यें बखेडे झाले

तो कांहीं केवळ वेळेचा गुण नव्हे, महाराष्ट्रांत सरदार मंडळींनीं मुद्दाम केलेली ती एक योजना होय. लंडन टाईम्समधले लेख हे प्रायः सरकारी पत्रव्यवहाराचें प्रतिबिंब असतें हें लक्षांत घेतां, हा आरोप किती भयंकर होता हे दिसून येईल. सरदारांचें नांव निघण्याचें कारण इतकेंच कीं, वाईच्या खटल्यांत कांहीं इनामदार आरोपी होते. हें वाग्युद्ध लॉर्ड हॅरिस यांच्या आरतीपर्यंत पुरलें. इकडे मुसलमानांनींहि ब्राह्मणांवर घाणेरडे आरोप करून सरकाराकडे अर्ज पूर्वीच केले होते. पण पुण्यांतील मार्केटच्या सभेनंतर मुसलमानांनीं आपलीहि एक सभा, दोन हजारांची, जुम्मा मशीदींत भरविली होती. नबाब अबदुल मजीदखान नांवाचे कोणी गृहस्थ अध्यक्ष होते, व "मराठ्यांवर स्वारी करण्यापूर्वी विजापूर दरबारांत जशीं वीरश्रीचीं भाषणें होत असत तसाच कांहींसा रंग या सभेंत उडाला" म्हणतात. सभेंत पोलीस अधिकाऱ्यांचे अर्थातच आभार मानण्यांत आले. यांस उद्देशून केसरी लिहितो. "आज पोलिसांस थँक्स देण्याकरितां मुसलमानांची सभा भरली, कांहीं दिवसांनीं पोलिसांना शिव्या देण्याचाहि त्यांना प्रसंग येईल." दिवस या शब्दाऐवजीं वर्ष असा शब्द घेतला असतां केसरीचें हें भविष्य पुढें खरें ठरलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. सार्वजनिक सभेनें आपल्या मंदगतीनें पोलिस ॲक्टाचा निषेध चालविला होता, व मार्केटच्या सभेंत टिळक प्रभृति लोकांची जी कमेटी नेमण्यांत आली तिचेंहि काम सुरू झालें. पण पुढच्या सालीं पुणें म्युनिसिपालिटी व कायदेकौन्सिलच्या निवडणुकी, आणि पुण्यास बोलाविलेल्या राष्ट्रीय सभेची तयारी, वगैरे अधिक महत्त्वाचे विषय पुढें आले. वादाच्या मुहुर्तमेढी नव्या रणक्षेत्रांत रोविल्या गेल्या, व हिंदुमुसलमानांच्या दंग्यांची आठवण मागें पडली ती पडलीच.

दंग्यांच्या बाबतींत मुसलमानांकडून आगळीक अधिक होते ही गोष्ट अखेर स्वतः एका जिल्हाधिकाऱ्याच्याच प्रत्ययास अकल्पित रीतीनें आली; व तीहि अशा स्थितींत कीं, हिंदूंना नांव ठेवण्यास त्यांत यत्किंचितहि जागा कोणास सांपडावयाची नाहीं. १८९५ सालच्या गणपत्युत्सवांत हा प्रकार घडून आला. खानदेशांत धुळें येथें या सालीं अनंतचतुर्दशीच्या दिवशीं गणपतींची मिरवणूक निघाली. हिंदूंनीं योग्य ते परवाने घेतले होते. तथापि मिरवणुकीस हरकत करण्याचा मुसलमानांचा फार आग्रह. मुल्लाच्या मशिदीवरून मिरवणूक जाईल तेव्हां तेथें दंगा होणार आहे अशी बातमी कलेक्टर मि. क्युमिन यांस लागली, तेव्हां ते स्वतः पोलिसपार्टी घेऊन मशिदीजवळ जाऊन उभे राहिले. मशिदींत सुमारें ४०० मुसलमान आगाऊच जमून राहिले होते. मिरवणूक मशिदीपाशीं येतांच ते दीन दीन करीत बाहेर पडले. क्युमिनसाहेबांनीं त्यांची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण ती न पटतां, त्यांच्याच अंगावर दगड येण्यास सुरुवात झाली. अखेर गर्दींत एका मुसलमानानें त्यांना मशिदीच्या

आंत खेंचून नेण्याचा प्रयत्न केला व दुसऱ्यानें काठी उगारली असें पाहून, स्वतः क्युमिनसाहेबांनी गोळीबाराचा हुकूम दिला नसतांहि, पोलीस अधिकाऱ्यांच्या हुकुमानें गोळीबार झाला. चार मुसलमान तावडतोब मेले व २८ जखमी झाले. हा प्रकार प्रत्यक्ष एका साहेबाच्या डोळ्यादेखत घडला यामुळें सरकारची गैरसमजूत करून देण्यास कोणास जागा राहिली नाहीं. 'कलेक्टरच्या तोंडचा हुकूम होण्याची वाट पोलिसांनीं कां पाहिली नाहीं' या प्रश्नाला असें उत्तर दिलें गेलें कीं, यजमानाच्या अंगावर वाघ चालून आला असें त्यांचा शिपाई पहात असतां, यजमानाच्या तोंडून हुकूम सुटला नाहीं या सबबीवर, तो तरवार चालविणार नाहीं तर मूर्ख ठरेल ! दंगा करण्याचा बेत मुसलमानांचा आधींपासून होता ही गोष्ट मशिदींत सांठवलेल्या दगडांच्या राशी, काठ्यांचीं जुडगीं, आणि मखनशहा नांवाच्या मुसलमानानें धुळ्यांतील मुसमानांकडून आधीं घेकविलेल्या शपथा व जुळविलेली वर्गणी यावरून चौकशींत सिद्ध झाली. मशिदीजवळ हिंदूंनीं कांहींच केलें नाहीं. तेव्हां या प्रकरणांत कोणीकडून तरी हिंदु गोवावा म्हणून मुसलमानांनीं असा बाहाणा केला कीं, क्युमिन साहेब आपल्या हाताखालच्या हिंदु अधिकाऱ्याचें ऐकून आग्रहास पडले! पण रावेरप्रकरणीं स्वतः क्युमिन साहेबांनीं काढलेल्या सर्क्युलरावरूच ते सामान्यतः हिंदु लोकांच्या विरुद्ध आहेत असें दिसून आलें होतें. तात्पर्य, धुळें येथील दंग्यानें टिळकांनीं दोन वर्षें चालविलेली तक्रार परस्पर सिद्ध केली. मुसलमान लोकांची मनधरणी करण्यापासून भस्मासुरी प्रकार होतो, हें सरकारच्या नजरेस आलें. हिंदूना तर भित्यापाठीं ब्रह्मराक्षस हें पूर्वींच अनुभवास आलें होतें. धुळ्याच्या दंग्याला उद्देशून ता. १० सप्टेंबर १८९५ च्या केसरींत टिळकांनीं जो अग्रलेख लिहिला तो या विषयावरील बहुधा त्यांचा शेवटचा लेख होय. कारण यापुढें हिंदुमुसलमानांचा अध्याय संपून दुष्काळाच्या नव्या अध्यायास सुरुवात झाली; त्यानंतर प्लेगशाही व रँडशाही यांचा अध्याय आला, व त्यामागून राजद्रोहाचे खटले वगैरे अध्याय निघाले. या शेवटच्या लेखांत टिळकांनीं जें लिहिलें तें एकाद्या समारोपासारखेंच वाचकांना भासतें. टिळक लिहितातः—" मुसलमानांचा पक्ष यथार्थ नाहीं. सर्व मशिदींपुढें, सर्व काळीं, सर्व प्रकारचीं वाद्यें बंद ठेवलींच पाहिजेत हें म्हणणें अगदीं चुकीचें असून त्यास कोणीही समंजस मनुष्य आपली संमति देणार नाहीं. मशिदींपुढें वाद्यें बंद करण्याचा हक्क काय तो थोडाबहुत वहिवाटीवरूनच निष्पन्न होतो. ही वहिवाट कोठें कोणत्या प्रकारची आहे हें त्या ठिकाणच्या हिंदुमुसलमानांस माहीत नाहींसें नाहीं. करितां आमच्या मुसलमानबंधूंस आमची अशी सूचना आहे कीं, त्यांनीं मृदंग टाळ वगैरे सौम्य वाद्यें देखील मशिदींवरून कोणत्याहि वेळीं वाजत जाऊं न देण्याचा जो हट्ट धरला आहे तो त्यांनीं सोडून दिला पाहिजे. मुसलमान लोकांस जर प्रार्थनेच्या वेळीं गडबड सोसत नाहीं तर मग, रस्त्यांत

आगगाडींत, तारघांत, दुकानांत वगैरे पाहिजे त्या ठिकाणीं ते प्रार्थना कां व कशी करतात ? इतकेंच नव्हे तर प्रार्थनेच्या वेळीं मुसलमान असेल तेथें त्यानें प्रार्थना करावी असा त्यांच्या शास्त्राचा नियम आहे. तेव्हां वाद्यांपासून गडबड होते अथवा मशिदीवरून वाद्यें वाजवीत नेणें धर्मप्रमाणें निषिद्ध आहे, या दोन्ही समजूती अगदीं अयोग्य असून, त्या कोणीतरी आपमतलबी गृहस्थानें मुसलमान लोकांच्या डोक्यांत भरवून दिल्या आहेत, हें त्यांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. म्हणजे वाद्यांच्या प्रश्नाचा निकाल लागण्यास अडचण पडणार नाहीं. सरकारी अधिकारी आपली बाजू घेतात म्हणून चढून जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. प्रसंग आला म्हणजे हिंदु व मुसलमान दोघेही त्यांस सारखेच."

तात्पर्य, दोन्ही समाजांच्या पंचकमेट्या नेमाव्या, त्यांनीं वाद उत्पन्न होईल तेथें चौकशी करून वहिवाट ठरवावी, उभयतांनीहि तो ठराव मान्य करून सरकारास कळवावा, त्याला अनुसरून सरकारनें हुकूम काढावे, व त्याची अंमलबजावणी करण्यास जो तयार असेल त्याच्या हक्काचें संरक्षण सरकारनें आपली सर्व शक्ती खर्चून करावें, असें विवेचक बुद्धीचें टिळकांचें लिहिणें बोलणें होतें. या विवेचक सूचनांचा सर्व लोकांनीं आग्रह धरावा म्हणजे सरकार त्या मान्य करील, निदान हिंदुसमाजानें तरी या योजनेस चिकटून बसावें व मुसलमान रागावतील असल्या भलत्या भीतीनें भिऊन न जातां आपल्या रास्त हक्काचें स्वप्रयत्नानीं संरक्षण करावें, ही एकच शिकवणूक टिळकांच्या दोनतीन वर्षांच्या लेखांतून दिसून येते. वाद्यांचा प्रश्न दिसण्यांत वादग्रस्त दिसला तरी त्यांतूनहि कांहीं विधायक योजनेनें मार्ग बाहेर निघतो, हें औंध संस्थानांत जुने वृद्ध पंतप्रतिनिधी यांनीं हिंदू व मुसलमान या दोघांच्याहि सल्ल्यानें जे नियम केले होते ते वाचल्यास दिसून येण्यासारखें आहे. म्हणून ते नियम या भागाच्या परिशिष्टांत दिले आहेत. पुण्याचे पो. सु. म्याकफर्सन यांनीं वाद्यांचे जे नियम केले व ज्यावर पुण्यांतील सर्व पक्षांकडून एकसारखीच टीका झाली ते नियमहि त्यांच्याच जोडीला त्याच परिशिष्टांत दिले असल्या कारणानें 'हें चित्र पहा व तें चित्र पहा' अशी वाचकांस दोहोंची सहज तुलना करितां येईल.

हिंदूंची स्वतंत्र सभा भरविण्यासंबंधीं जरी टिळक व सुधारक पक्ष यांच्यांत मतभेद होता तरी, सरकारी अधिकाऱ्यांचा पक्षपातीपणा व मुसलमानांची आगळीक, या बाबतींत टिळकांचें व त्यांचें मत एकच होतें. फरक इतकाच कीं, ज्ञानप्रकाशादि त्या पक्षाचीं पत्रें या दोन्ही प्रकारांचा निषेध सौम्यपणानें व मुसलमानांशीं भीडमुर्वत ठेऊन करीत, व टिळक या हक्कसंरक्षणाच्या बाबतींत आपल्या स्वभावास अनुसरून सरकार किंवा मुसलमान यांपैकीं कोणाचीहि पर्वा करीत नसत. मुंबईच्या दंग्याबद्दल जो सरकारी सारवासारवीचा गुळमुळीत ठराव प्रसिद्ध झाला तो टिळकांप्रमाणेंच सुधारकपक्षालाहि पसंत पडला नाहीं

व त्यांनीं आपल्या परीनें त्याचा निषेधच केला. या ठरावावरील ता. १९ जानेवारी १८९४ च्या अंकांतील अग्रलेखांत ज्ञानप्रकाशकार लिहितात "सरकारच्या या ठरावाचें थोडक्यांत सार सांगावयाचें म्हटलें तर सरकारी अधिकाऱ्यांची, लहानसहान शिपायापासून पोलिस कमिशनरपर्यंत सर्व अधिकाऱ्यांची स्तुति, फौजेचे लोक आणले होते त्यावरील अधिकाऱ्यांची स्तुति, व कारणासंबंधानें 'नरो वा कुंजरो वा' येवढेंच कायतें या ठरावांत आहे असें म्हटलें म्हणजे झालें." सरकार मुसलमानांस भिऊन वागून त्यांच्याबद्दल पक्षपात करतें अशी हिंदु लोकांची सकारण तक्रार होती. पण सरकारी ठरावांत त्याच्या अगदीं उलट उल्लेख केलेला होता तो असा:—"कारण असो वा नसो, सरकारच्या वर्तनांत हिंदु लोकांविषयीं पक्षपात व आम्हां मुसलमानांविषयीं अनास्था दिसून येते तेव्हां आपल्या जातीच्या संरक्षणार्थ आपणच कांहींना कांहीं तजवीज केली पाहिजे असा मुसलमान लोकांचा ग्रह झाला आहे." या विपरीत उल्लेखाचा उतारा देऊन ज्ञानप्रकाशकार लिहितात:—"आतां या सरकारच्या विधानासंबंधानें काय बोलावें हे आम्हांस समजत नाहीं. आमची हिंदू लोकांची ओरड गप्प करण्यासाठीं ही तोंडीस तोंड तर सरकारनें ठेऊन दिली नाहींना!"

ठिकठिकाणच्या दंग्यांत मूळ आगळीक मुसलमानांची होते, हिंदु मागाहून व केवळ प्रतिकारार्थ दंग्यांत सामील होतात, ही गोष्ट अगदीं उघड दिसत असूनहि आंग्लो इंडियन पत्रें व सरकारी अधिकारी त्याच्याकडे डोळेझांक करीत, ही गोष्टहि अर्थात् ज्ञानप्रकाशकारांस रुचली नाहीं. येवल्याच्या दंग्यासंबंधानें ते लिहितात:—"एवंच दंग्याचें मूळ कारण देऊळ व मारुतीची मूर्ति हीं उध्वस्त केलीं हें होय. आतां हें देऊळ कोणी उध्वस्त केलें हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. आणि ज्यांनीं तें उध्वस्त केलें त्यांनींच पुन: दंग्यास सुरुवात केली हेंहि पण सांगावयास पाहिजे असें नाहीं. इंग्रज पत्रें आतां त्याविषयीं कांहींहि म्हणोत!"

सारांश, वाद्यांच्या नियमासंबंधानें व हिंदुमुसलमानांच्या भांडणांतील अधिकाऱ्यांच्या वर्तनासंबंधानें टिळक व सुधारकपक्ष यांचें धोरण तत्वत: एकच होतें, तथापि या बाबतींत सुधारक पक्षाचीं पत्रें किंवा त्यांच्या हातीं असलेली सार्वजनिक सभा यांनीं जी चळवळ केली त्याहून दसपट किंवा शतपट टिळकांनीं ती अधिक जोरानें केली याविषयीं कोणास शंका नाहीं. सरकारासंबंधानें अत्यंत कडक शब्द टिळकांनीं केसरींत वापरून फौजदारी खटला होण्याचा धोका सोसला, आणि स्पष्ट शब्दांनीं मुसलमानांच्या आगळिकखोर स्वभावाचा निषेध करून, व हिंदूंना एकजूट करण्याविषयीं उत्तेजन देऊन, मुसलमान समाजाचा द्वेष पत्करला. पण मुख्य कार्याच्या दृष्टीनें पाहतां वादाचा प्रश्न खऱ्या स्वरूपांत मांडून, लोकमत बनविण्याचें काम टिळकांनीं यशस्वीपणानें केलें ही गोष्ट नाकबूल करतां

यावयाची नाहीं. सार्वजनिक सभेचें त्रैमासिक आणि त्या वेळचे सुधारक—ज्ञानप्रकाशाचे अंक जो चाळील त्याला हें दिसून येईल. ता. २९ नोव्हेंबर १८९४ रोजीं, म्हणजे पुण्यांतील दंगे होऊन गेल्यावर, सार्वजनिक सभेमार्फत सेक्रेटरी गोपाळराव गोखले यांनीं सरकारास एक अर्जयादी लिहिली, तींत खुद्द सरकारचें धोरण पक्षपातीपणाचें होतें असें प्रत्यक्ष म्हटलें नव्हतें खरें; पण जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत सर्वांना कमी अधिक दोषच दिला होता. पुणें, सोलापूर, बेळगांव, अहमदनगर, सातारा, वांई, येवला, रत्नागिरी, चिपळूण, पेण, कल्याण इत्यादि अनेक ठिकाणच्या दंग्यांची हकीगत लक्षांत घेऊनच हा अर्ज लिहिला होता, व या कामीं सभेनें स्वतः फारतर मध्यस्थी व दिलजमाई घडवून आणण्याचा मात्र प्रयत्न केला, इतर कांहीं केलें नाहीं असें लिहिलें होतें. टिळकांच्या एकतर्फी लिहिण्याचा व चळवळीचा एक प्रकारें हा निषेधच ध्वनित केलेला दिसला. सभेनें आपलें मत असें दिलें कीं, धार्मिक समारंभांत वाद्यें वाजविणें व लौकिक समारंभांत वाद्यें वाजविणें यांतला मार्मिक भेद जिल्हाधिकाऱ्यांना कळत नाहीं. म्याकफर्सनसाहेबांनीं पुण्यास नियम काढले त्यांवरून सामाजिक आचारविचारांचें त्यांचें अगाध अज्ञानच प्रगट होतें, व जबाबदार अधिकाऱ्यांचें कृत्य म्हणजे काय याची त्यांना ओळखहि होती असें दिसत नाहीं. पोलिसांच्या रिपोर्टांवर भिस्त ठेवल्यानें, पुढाऱ्यांशीं अधिकारी तुटून वागल्यानें, व वादांतील वहिवाटीविषयीं हुकमापूर्वी योग्य न्यायाधिकाऱ्यांकडून चौकशी न करविल्यामुळें आजवर सर्व घोटाळा झाला. मशीदीपुढें झालें तरी मंजुळ वाद्यें वाजवूं द्यावीं, मोठा किंवा कर्कश आवाज करणारीं वाद्यें फारतर वाजवूं देऊं नये. तात्पर्य, वाद्यांसंबंधाचा सर्व अधिकार पोलिसांकडून काढून घ्यावा असें सभेनें आपलें मत दिलें.

पण सरकाराजवळ टिळक काय व गोखल्यांची सार्वजनिक सभा काय दोघांचीहि प्रतिष्ठा कामाच्या दृष्टीनें जवळ जवळ सारखीच होती. गोखल्यांच्या अर्जांत पोलिसांना दिलेल्या दोषाखेरीज सरकारास खुपण्यासारखा एकहि शब्द नव्हता. पण अर्जाच्या प्रारंभीं गोखल्यांनीं असें सुचविलें होतें कीं, सभा या कामीं सांगते तें हिंदु मुसलमान व पारशी या सर्व समाजाचें मत आहे. या विधानाचाच सरकारला गुस्सा आला. लॉर्ड हिलसाहेब त्या वेळीं अंडर सेक्रेटरी होते. त्यांनीं तावडतोब उत्तर लिहिलें कीं, अर्जांतील इतर अनेक विधानें तर पुष्कळशीं निराधार आहेत, व त्यांचा समाचार वेगळा घेण्यांत येईलच, पण पहिलें हें सांगा कीं, सगळ्या समाजांबद्दल बोलण्याचा अधिकार तुमच्या सभेला कोणी दिला व अर्जाचा मसुदा मंजूर झाला तेव्हां कोण कोण हजर होते? तेव्हां गोखल्यांना अर्थातच कबूल करावें लागलें कीं, सभेंत एकंदर १५२ हिंदु, चार पार्शी व फक्त दोन मुसलमान आहेत! मसुदा मंजूर झाला तेव्हां एकंदर १६ सभासद हजर होते! यावर सरकारी प्रश्न असा आला कीं, या सोळांत कोण कोणच्या जातीचे, अनुकूल व

प्रतिकूल मतें कोणाचीं कशीं पडलीं हें कळवा. यावर गोखल्यांनीं उत्तर दिलें कीं कमेटींत कांहींच मतभेद नव्हता. अर्जांतल्या प्रश्नाचा विचार त्यांतील तक्रारींच्या योग्यायोग्यतेवरूनच केला पाहिजे. आजवर असली तपशीलवार माहिती सरकारनें कधीं मागितली नाहीं, सभेनें ती कधीं दिली नाहीं, व इल्लींहि सभा ती देऊं इच्छित नाहीं. तात्पर्य, मूळ वाद्यांच्या नियमांचा विचार बाजूस राहिला व हीं दुसऱ्याच वादाचीं वाद्यें वाजूं लागलीं. या वादाचें कारण असें. सभेंत जे दोन मुसलमान होते त्यांनीं सरकारास कळविलें कीं, सार्वजनिक सभा ही हिंदु लोकांची आहे, आमचा तींत कांहीं संबंध नाहीं. आम्ही सभासद असलों तरी तिच्या कामकाजाला आमची संमति नसते. सर्वांचा संग्रह करून होईल तितकें निःपक्षपातीपणानें विचार करण्याला रानडे गोखल्यांसारखे लोक तयार असतां, व मुसलमानांकडून घेण्यापेक्षां त्यांना अधिक देण्यासच ते तयार असतां, त्यांना एकहि मुसलमान गृहस्थ असा भेटला नाहीं कीं जो त्यांच्या पद्धतीनें व शांत डोक्यानें विचार करील. ही गोष्ट ओळखूनच टिळकांनीं असें धोरण ठरविलें होतें कीं, मिळतें घेण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी जर मुसलमान मिळतें घेत नाहींत, तर आपण तरी त्यांच्या लहरीबरोबर फरफटत ओढत किती दूर जा! आपले खरे हक्क काय व ते आपण कोठपर्यंत बजवावेत याचा विचार करून ते जाहीर करावे व त्यांना अनुसरूनच आपली चळवळ चालू ठेवावी, मग त्यांतून काय निघेल तें निघेल. हें धोरण पक्षभेदाचा पुरस्कार करण्यासारखें दिसण्यांत दिसतें. पण आज हिंदुमुसलमानांची एकी अधिक झाली आहे, व या एकीचा उपदेश उभयपक्षांकडून जोरानें चालू आहे, अशा स्थितींत देखील जर परस्पर गैरसमज पूर्णपणें दूर होत नाहींत; दंगेधोपेहि होतात, आणि आपण दुसऱ्यास सवलती देत देत व दुसऱ्यांचीं मतें आपणावर लादून घेत घेत कोठपर्यंत पुढें जावें याच्या निश्चित मर्यादा ठरविल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें आजहि जर हिंदुसमाजाला वाटतें, तर तीस वर्षांपूर्वी या सावधगिरीच्या धोरणाची आवश्यकता हिंदु लोकांना किती भासत असेल, व यामुळें टिळकांचेंच धोरण योग्य आणि सामाजिक स्वाभिमानाला धरून आहे असें हिंदु लोकांना किती वाटत असेल, याची कल्पना सहजच करितां येईल.

टिळक हे आपण होऊन मुसलमानांशीं कधींहि कुरापत काढीत नसत व तडजोडीच्या कोणत्याहि विचाराला ते नेहमीं तयारीच दाखवीत. जुनी ऐतिहासिक चर्चा करितांनाहि झालें तरी त्यांचा रोंख मुसलमानांना दूषण देण्यापेक्षां हिंदूंवर आणलेल्या आक्षेपाचें खंडन करण्याकडेंच अधिक असे. हिंदु या नात्यानें त्यांची स्वाभिमानबुद्धि मोठी तीक्ष्ण असून, 'दुसरा चिडेल' या शब्दांची भीति त्यांच्या मनाला कधींहि शिवत नसल्यानें, इतरांप्रमाणें मुसलमानांशीं वागतांनाहि कोणी अरे म्हटलें तर त्याला बराबर कारे म्हणण्याला ते कधींहि कचरत नसत. किंबहुना दुसऱ्यानें आगळीक केल्यास तेजस्वी रीतीनें त्याचा प्रतिकारच करावयाचा, फाजील

भऊपणानें पड खावयाची नाहीं किंवा भगलहि द्यावयाची नाहीं, असाच त्यांचा स्वभाव असे. दंग्याधोप्यांच्या या दोन वर्षांत त्यांनीं केलेली चळवळ याच स्वभावाला अनुसरून होती. ही चळवळ विशेष मृदु मनाच्या किंवा भित्र्या अशा कांहीं लोकांना आवडली नाहीं हें खरें; पण या लोकांनीं क्वचित् एखादा सरकारकडे अर्ज अथवा शांततेचा किंवा स्नेहभावाचा मोघम उपदेश याशिवाय भांडणें तोडण्यास कांहीं अधिक केलें नाहीं; व हिंदुसमाजाच्या हक्कांवर जो हळू हळू घाला पडत होता त्याच्या निवारणाचा प्रयत्न तर त्यांजकडून मुळींच झाला नाहीं. मुसलमान लोक सर्व प्रकारें चढाईचा हल्ला करीत असतां, नुसत्या शांतिसूक्ताचें पठण करीत बसण्यापेक्षां निदान वाग्दंड तरी हातांत घेऊन उत्तेजनपूर्वक जो हिंदूंचें साह्य करील त्याची किंमत व कौतुक सर्वसाधारण हिंदुसमाजास अधिक वाटली यांत नवल काय?

१८९४ सालीं टिळकांनीं केसरींत दंग्यांच्या विषयावर जे लेख लिहिले त्यांच्या योगानें त्यांनीं मुंबईतील गुजराथी समाजाचें प्रेम पुष्कळच संपादलें; व पुण्यांतील त्यांचे शुक्लपक्षीय प्रतिपक्षी देखील त्यांच्या मताप्रमाणें असणारी टिळकांची धर्मनष्टता व उभयतांत प्रत्यक्ष झालेली शिवीगाळ विसरून जाण्यास तयार झाले. मुंबईचे लक्ष्मीदास खिमजी या व्यापारी गृहस्थानें मुंबईच्या दंग्याच्या आधीं प्रभासपट्टण येथील दंग्यांत जखमी लोकांकरितां मुंबईस पुष्कळ खटपट केली होती. पुढें खुद्द मुंबईस दंगा झाला तेव्हां त्यांनीं तेथील जखमी हिंदूंना तर पुष्कळ मदत केलीच, पण दंग्याच्या दुसऱ्या दिवशीं हिंदु लोक जे हातांत काठ्या घेऊन उठले त्यांना लखमीदास खिमजी यांनीं उत्तेजन दिलें, व घाटी लोकांत हजारों रुपये वांटले असा त्यांच्याविरुद्ध पोलिसचा रिपोर्ट झाला होता. त्याचें एक प्रत्यंतर असें मिळालें कीं कांहीं कारणानें लवकरच लखमीदास खिमजी यांना गव्हर्नरसाहेबांची भेट घेण्याचें कारण पडलें असतां गव्हर्नरसाहेबांनीं त्यांची भेट घेण्याचें मुद्दाम नाकारिलें. अशा पाणीदार गृहस्थाला टिळकांकडे पाहून या वेळीं 'अस्ति कोऽपि मम समानधर्मा' असें वाटलें असल्यास नवल नाहीं. मुंबईच्या सुशिक्षित लोकांत यापूर्वी टिळकांविषयीं किंचित् अनादरबुद्धि होती. पण मुंबईस व बाहेर दंगे झाल्यापासून, विशेषतः येवलें रावेर वगैरे ठिकाणच्या दंग्यांसंबंधानें सरकारचे गुप्त हुकूम टिळकांनीं प्रगट केल्यापासून, व पुण्यांत धिटाईनें हिंदूंच्या हिताचें समर्थन केल्यापासून मुंबईतील लोकांचेंहि त्यांजवरील प्रेम वाढूं लागलें.

शेवटीं एकच गोष्ट सांगावयाची ती ही कीं, वाद्यें वाजविण्याचा हा प्रश्न जरी दिसावयाला पुढें आला होता तरी त्याच्यामागें महत्त्वाचे दुसरेहि प्रश्न होतेच. सरकार मुसल्मानांचा पक्ष धरतें असा जो प्रवाद होता तो खरोखरच यथार्थ होता; पण त्याचें कारण मुसलमानांच्या मशिदींवर हिंदूंच्या देवळांपेक्षां सरकारचें अधिक प्रेम होतें हें नव्हे, तर राजकारणाच्या डावांत हिंदूंना शह देण्याला मुस-

लमान हे सरकारला उपयोगीं पडण्यासारखे होते व पडूंहि लागले होते हेंच होय. पूर्ववृत्तांत पाहिला तर १८५७ च्या बंडानंतर कित्येक वर्षेपर्यंत मुसलमानलोकांवरच इंग्रज सरकारचा राग अधिक होता. वहाबी लोक सरकारास भयंकर वाटूं लागले होते. लॉर्ड मेयो यांचा खून एका मुसलमानानेंच केला होता. लिटनशाहींत अफगाणिस्थानप्रकरण झालें त्यामुळें मुसलमान इंग्रजांवर रागावले होते. पण सर्व गोष्टी आलटून पालटून होतच असतात, त्याप्रमाणें १८८५ सालीं राष्ट्रीय सभा स्थापन झाल्यानंतर राजकीयपक्षांची एक नवीन प्रकारची मांडणी हिंदुस्थानांत होऊं लागली. राष्ट्रीय सभेंत बहुतेक सर्व सुशिक्षित हिंदु लोक. त्यांनीं राज्यकारभारावर टीका करण्याला व आपल्या आकांक्षांचें पोतें सोडून त्यांतील चिजा जगापुढें मांडण्याला सुरवात केली. हें पाहून सरकारास तें एक नवें व कायमचें संकट भासूं लागलें व त्याचा प्रतिकार करावयाचा तर मुसलमान समाज हातीं धरला पाहिजे अशी युक्ति त्यांना सहजच सुचली. सर सय्यद अहमद यांना पुढें करून त्यांनीं सुशिक्षित मुसलमानांकडून राष्ट्रीय सभेवर बहिष्कार घालविला; आणि अशिक्षित मुसलमान समाज तर किंचित् फूस मिळाली असतां धर्माच्या बावतींत माथें फिरवून घेण्यास नेहमींच तयार. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासूनच कायदे कौन्सिलच्या मागणीस सुरुवात झाली होती. १८९२ सालीं कायदेकौन्सिलांची वाढ होऊन निवडणुकीचें तत्व डोकावूं लागलें होतें. आणि कौन्सिलांत तेज पडणें ही तर गोष्ट सर्वस्वीं शिक्षणावर अवलंबून ! त्यामुळें मुसलमान समाजाच्या मनांत एकदम असा अकल्पित प्रकाश पडला कीं, कौन्सिलांत शिरून हिंदु लोक आपला फायदा करून घेणार व आमचें नुकसान करणार, आणि कौन्सिलांत सुशिक्षित मुसलमान जावे असें म्हणावें तर चुटकीसरशी शिक्षण वाढत नाहीं ! तेव्हां इतर रीतींनीं हिंदुसमाजाला पायबंद घालणें जरूर असें मुसलमानांच्या मनानें घेतलें. आलिगड कॉलेजचे गोरे प्रिन्सिपाल थिओडोर बेक यांनीं "आंग्लो महॅमिडन ओरिअंटल असोशियन" या नांवाची संस्था स्थापण्याची कल्पनाहि काढली. पण सर सय्यद अहमद यांना ही कल्पना कमीपणाची वाटली. ते झाले तरी दूरदर्शी व स्वाभिमानी होते. हिंदु व मुसलमान हे एकाच हिंदी शरीराचे दोन डोळे आहेत असें ते म्हणत. पण डोळे दोन व दृष्टी एक असें होण्याला दोन्ही समाजांत शिक्षण समसमान झालें पाहिजे अशी त्यांची समजूत असल्यामुळें, त्यांनीं राजकारण थोपवून धरून सर्व भर शिक्षणावर दिला होता. आणि मुसलमानांकरितां हिंदूंचें राजकारण थोपविलें जावें या हेतूनें त्यांनीं राष्ट्रीय सभेला उघड विरोध चालविला होता. पॅन इस्लामिझमचा उपदेश सुरू झाला होता. पॅनइस्लामिझमचा विजय होण्याकरितां आज इंग्रजांचें शत्रुत्व करणें हें जसें मुसलमानांस जरूर वाटलें, तसेंच त्या काळीं त्याच हेतूनें इंग्रजांशीं होईल तितका स्नेह ठेवावा असें मुसलमान पुढाऱ्यांस वाटत असे. तात्पर्य, बंगा-

ळच्या फाळणीच्या वेळीं, प्रजेंतील ज्या दुहीच्या धोरणाचा कळस झाला त्याचा पाया १८९२–९३ चे सुमारास घातला जात होता. सरकार व मुसलमान दोघे एक जीव होऊन राष्ट्रीय सभेस विरोध करीत होते, व वाद्यें मिरवणुकी यांचीं भांडणें ह्या या मुख्य वृक्षाच्या किरकोळ शाखा होत्या. मुसलमानी आकांक्षेची ही वावडी कोणत्या दिशेनें उडत होती हें टिळकांनीं त्यावेळीं बरोबर ओळखिलें होतें, व त्याला अनुसरूनच त्यांनीं या भांडणांतील आपलें धोरण ठरविलें होतें.

पण त्यांच्यावर जातिद्वेषाचा आरोप करणारांनीं जातिद्वेषाचा मूळ उगम खरा कोठें आहे हें पहावयास पाहिजे होतें. विश्वबंधुत्व व राष्ट्रीयत्व या भावनाच मुळीं कांहींशा परस्परविरोधी आहेत. पहिलींतून दुसरींत उतरण्यापेक्षां, दुसरींतून पहिलींत वर प्रवेश करणें हाच सोपा व नैसर्गिक मार्ग होय, असें टिळकांना प्रथमपासून वाटत असे. आपले पाय जमिनींत घट्ट रोविल्यानंतर मगच स्नेहवृद्धीकरितां आपला हात दुसऱ्याचे हातांत दिलेला बरा; नाहींतर हाताबरोबर आपणहि खालीं खेचले जाण्याचा व स्थानभ्रष्ट होण्याचा संभव आहे, असें टिळकांना पक्कें वाटत असून सुधारकांना तसें वाटत नसे, हाच त्यांच्या धोरणांतील मुख्य फरक होय! हा फरक तेव्हां तर लोकांच्या लक्षांत येण्यासारखा नव्हताच, पण यालाच पुढें गणपतीउत्सव व शिवाजी उत्सव यांची जोड मिळाली. एकाला धर्मविषयक भांडणें वाढविण्याचें स्वरूप, व दुसऱ्याला जातिविषयक भांडणें वाढविण्याचें स्वरूप सामान्य लोकांच्या दृष्टीनें येण्यासारखें असल्यानें, टिळकांच्या भांडखोरपणाच्या दुर्लौकिकांत अधिकच भर पडली. अफझुलखानाच्या वधासारख्या वादग्रस्त विषयांची चर्चा वर्तमानपत्रांतून होऊं लागून टिळक शिवाजीमहाराजांचें समर्थन निर्भीडपणें करूं लागले. आणि शेवटीं १८९७ च्या राजद्रोहाच्या खटल्यांत राजद्रोहाच्या शाबिदीला या ऐतिहासिक चर्चेचा आधार सरकारनें व न्यायाधीशांनीं घेतला, यामुळें टिळक म्हणजे तो एक बडा सैतान होय अशी मुसलमान लोकांची पक्की समजूत होऊन राहिली. सुदैवानें ही त्यांची समजूत टिळकांच्या मृत्यूपर्यंत टिकली नाहीं; व टिळकांनीं आपलीं कोणतींहि जुनीं मतें न सोडतां देखील, मुसलमान पुढाऱ्यांना टिळकांचेंच धोरण बरोबर व आपलें स्वतःचें धोरण चूक ही गोष्ट पुढें पटून, अलीबंधूंसारख्या पुढाऱ्यांनीं 'टिळक हेच आमचे खरे राजकारणी गुरु होत' असें जगजाहीर केलें! इतकें परिवर्तन खुद्द टिळकांच्या डोळ्यांदेखत झालें!

## भाग १९ परिशिष्ट (१)

### औंधकर पंतप्रतिनिधि यांचा जाहीरनामा

औंध येथें वाद्यें वाजविण्यासंबंधानें हिंदु व मुसलमान या दोनहि जातींच्या पुढाऱ्यांच्या विचारानें झालेले नियमः—

"संस्थान औंध येथील हिंदूंचे देवळांपुढें व मुसलमान लोकांचे मशीदींपुढें वाद्यें व ढोलगीं वाजविण्याचे संबंधानें ठाणें किन्हई येथील दोन्ही जातींचे पुढाऱ्यांचे एकमतानें पुढील वहिवाटीसाठीं नियम ठरविण्यांत आले आहेत ते येणेंप्रमाणेंः—

१ नुसतें थडगें असेल तर ती मशीद म्हणजे निमाज पढण्याची अगर पूजा करण्याची जागा समजावयाची नाहीं, सबब त्यावरून जातांना पाहिजे तीं वाद्यें पाहिजे तेव्हां वाजविण्यास हरकत नाहीं.

२ असूरखाना म्हणजे डोले करण्याची जागा हें भजनाचें ठिकाण नाहीं, सबब त्याजवरून जातेसमयीं वरप्रमाणें पाहिजे तेव्हां पाहिजे तीं वाद्यें व ढोल वाजविण्यास हरकत नाहीं.

३ निमजगा हमेश गांवाबाहेर असावयाचा आणि रमजान महिन्यांत रोजे (उपास) संपल्यावर एक रोज, व जिल्हेज महिन्यांत बकरीईदचे सणाचे दिवशीं एक रोज, मिळून दोन रोज निमजग्यापुढें काजी सर्व मुसलमानांना खुदबा पढून ऐकवितो, सबब वर्षांतून त्या दोन रोजीं खुदबा न ऐकूं येई असे रीतीनें वाद्यें ५० फुटांच्या आंत वाजविलीं जाऊं नयेत.

४ निमाजास वाद्यांची हरकत नाहीं, कारण निमाज मशीदींतच पढला जातो असें नाहीं. निमाजाची वेळ आली म्हणजे ओढ्याचें कांठीं, नदीचे काठीं, अगर माळावरहि निमाज ज्याचा तो पढतो, व कुराणांत निमाजाच्या वेळीं वाद्यें बंद असावीं असें लिहिलेलें नाहीं. सबब मशीदीवरून निमाजाचे वेळेसहि वाद्यें वाजविण्यास हरकत नाहीं. परंतु प्रत्येक शुक्रवारीं मशीदींत काजी सर्व मुसलमानांस खुदबा पढून ऐकवतो, सबब शुक्रवारीं मात्र खुदबा पढण्याचे वेळीं मशीदीचे अलीकडे व पलीकडे वीस पावलें म्हणजे ५० फूट अलीकडे व पलीकडे वाद्यें वाजवूं नयेत.

५ वाद्यें या शब्दांत ताशा, ढोल, नगारा, वाजंत्री यांचा समावेश होतो. परंतु त्यांत वीणा, सतार, बाजाची पेटी, हारमोनियम वगैरे मधुर वाद्यें यांचा समावेश समजूं नये.

६ सदर नियम ज्या मशीदी पुरातनच्या व रस्त्यास लागून असतील, त्यांसच

लागू समजावेत. त्या रस्ता सोडून अगर नवीन कोणी मुद्दाम रस्त्यावर बांधील तर त्यांस लागू नाहींत.

७ शुक्रवारीं मशीदींतील खुदब्याचे वेळेस व निमाजग्यांतील खुदब्याचे वेळेस जे वाद्यासंबंधीं नियम कलम ३ व ४ यांत सांगितले आहेत, ते पाळून श्री गणपति, नागोबा, गोकुळ बळी अगर कोणताहि हिंदूंचा समारंभ, अगर जत्रेचे संबंधाचा समारंभ, वाद्यें वाजवण्यासहित, खुशाल सर्व मशीदींवरून व निमाजग्यांवरून जातील.

८ हिंदूंचीं जीं देवळें आहेत तेथें कीर्तन अगर पुराण, अगर एखादें धर्मकृत्य होते समयीं मुसलमान लोकांनीं वाद्यें, ताशे ढोल वगैरे वाजवीत जाणें झाल्यास, म्हणजे ५० फूट आगेंमागें, बंद केलीं पाहिजेत.

९ उभयतां जातींचे मुख्यांचे संमतीनें हे नियम ठरले असल्यामुळें, दोघां जातींचे लोकांनीं पाळले पाहिजेत; जर कोणी नियम तोडले तर, ज्या जातींविरुद्ध नियम तोडला जाईल त्यांनीं दांडगावा न करितां सरकारांत कळवावें म्हणजे ते कायदेशीर बंदोबस्त करतील.

तारीख ८ माहे सप्तंबर १८९४

सह्या हिंदू पुढाऱ्यांच्या

सह्या मुसलमान पुढाऱ्यांच्या आमचे समोर.

**रामचंद्र शिवराम देशपांडे**

मा० वर्ग ३ सं० औंध.

सदर्हू नियम उभयतां शार्तींतील पुढारी लोकांनीं केलेले मंजुरीस आले ते मंजूर केले आहेत.

तारीख ९ सप्तंबर १८९४

**श्रीनिवास परशराम पंतप्रतिनिधि,**

**जहागिरदार सं० औंध**

---

## भाग १५ परिशिष्ट (२)

### पुण्याचे पो. सु० मॅकफर्सन यांचा जाहीरनामा.

तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, यापुढें दि० पो० सु० साहेब हे रस्त्यांत अगर रस्त्याजवळ वाजंत्री, ढोल, ताशे, अगर इतर वाद्यें आणि शिंगें, अगर इतर कर्कश वाद्यें वाजविणें याचे परवाने देऊन नियम करतील आणि त्याजवर निर्बंध ठेवतील.

ज्या दिवशीं वाद्यें वाजविणें असेल त्याचे अगोदर पूर्ण तीन दिवस वाद्यें वाजविण्याचा परवाना मिळण्याबद्दलचा अर्ज शहर पोलीस ऑफिसांत केला पाहिजे आणि अशा परवान्यावांचून रस्त्यांत अगर रस्त्याजवळ कोणतेंहि वाद्य वाजविलें जाऊं देणार नाहीं.

परवाना मिळण्याबद्दल अर्ज केल्यानंतर अर्जदारास छापील नमुन्यांत बहुत-करून परवाना दिला जाईल व त्या परवान्यांत खालीं लिहिलेल्या शर्ती दाखल केल्या जातील.

१ गाडी अगर घोडे जवळ आले असतां ते जात तोंपर्यंत वाद्यें वाजविणें अगर पताका फडकाविणें म्हणजे ( मार्गे—पुढें करणें ) अगर कोणतेहि तऱ्हेचा गोंगाट करणें बंद केलें पाहिजे.

२ मिरवणुकीच्या मंडळ्या एकाद्या सार्वजनिक उपासनेच्या जागेजवळ सार्व-जनिक उपासना चालली असतां आल्या म्हणजे त्यांनीं आपलीं वाद्यें बंद केलीं पाहिजेत आणि सदर उपासनेच्या जागेवरून जात असतां गोंगाट न करतां गेलें पाहिजे.

३ कामावर हजर असलेला कोणीहि पोलीस अम्मलदार अमुक वेळेपर्यंत वाद्यें बंद करण्यास हुकूम करील तर तीं बंद केलीं पाहिजेत.

४ कोणत्याहि सार्वजनिक रस्त्यावर रात्रीचे अकरा वाजल्यापासून सूर्योदया-पर्यंत वाद्यें वाजविण्यास परवानगी नाहीं.

५ जो कोणताहि मनुष्य जाणून बुजून वर नमूद केलेल्या शर्ती मोडील अगर त्या मोडण्यास साह्य करील तर तो सन १८९०चा आक्ट ४ कलम ६८ प्रमाणें २०० रु. दंडास पात्र होईल.

ता. २ आक्टोबर सन १८९४

T. MACPHERSON मेजर

डिस्ट्रिक्ट पोलीस सुपरिंटेंडेंट, पुणें.

# भाग ११ वा

# बापट–कमिशन

सामान्य परिचयाच्या लोकांना फारशी माहिती नाहीं असे कांहीं प्रसंग टिळकांच्या चरित्रांत घडून आले होते. बापट-कमिशन हा त्यांतलाच एक होय. तो सव्वीस वर्षां पूर्वी व तोहि दूर बडोद्यास घडला. वर्तमानपत्रांतून त्याची हकीकत फार थोडी आली. जी आली तींत टिळकांचें नांवाहि नव्हतें. या सर्व कारणांमुळें टिळकांच्या चरित्रांतला एक प्रसंग या नात्यानें तो जवळ जवळ अज्ञातच राहिला. पण या बापट-कमिशन प्रकरणांत टिळकांचे सुमारें १०–५ महिने खर्ची पडले. इतकेंच नव्हे तर त्यांत त्यांच्या अंगचे दोन मोठे गुण निदर्शनास आले. एक मित्रकार्याकरितां अत्यंत झीज सोसणें, व दुसरा लढाऊ कुशाग्र बुद्धि. बापट-कमिशन प्रकरणांत टिळक हे नायक नसले तरी उपनायक खास होते. म्हणून त्यासंबंधींची हकीकत या भागांत देण्याचें योजिलें आहे.

बापट म्हणजे वासुदेव सदाशिव बापट. त्यांची मित्रमंडळी नेहमीं त्यांना रावसाहेब बापट या नांवानें उल्लेखीत. ही पदवी त्यांना इंग्रजसरकारनें दिलेली नव्हती, बडोद्यांतील त्यांच्या मोठ्या हुद्याच्या अधिकारामुळें त्यांना ती स्वयंभू प्राप्त झाली होती. कमिशनानंतर 'बडोदा बापट' या टोपण नांवानें लोक बापटांना ओळखीत. बापट हे रत्नागिरी जिल्ह्यांत एका गरीब घरण्यांत जन्मले. ते मोठे तरतरीत व बुद्धिमान्, पण कॉलेजचा खर्च झेपण्याचें त्राण त्यांच्या अंगीं नव्हतें. कॉलेजांत असतांच त्यांना बडोद्यास नोकरी मिळाली. यामुळें बी. ए. चा अभ्यास त्यांनीं मध्येंच सोडला. यावेळीं बडोद्यास रेव्हेन्यु सर्व्हे सेटलमेंट खात्याचे मुख्याधिकारी मि० इलियट नामक गोरे सिव्हिलियन होते. त्यांची मर्जी बापटांवर बसून त्यांनीं त्यांना प्रथमच चाळीस रुपयांची नोकरी दिली. यापुढील मार्ग बापटांनीं झपाट्यानें आक्रमिला. सुमारें चार पांच वर्षांत म्हणजे १८८२ सालीं सवाशें रुपयांवर ते हेडक्लार्क झाले. १८८६ सालीं त्यांचा प्रवेश इलियट साहेबांच्या खात्यांत होऊन, तीन वर्षांनीं ते साहेबांचे खास मदतनीस (असिस्टंट कमिशनर) झाले. व १८९४ पूर्वींच त्यांचा वट पगार पावणेसातशेंपर्यंत वाढला होता. त्यांच्यावर खटला होऊन मध्येंच इतिश्री झाली नसती तर ते नायब दिवाणाच्या जागेपर्यंत चढण्याचा फार संभव होता. या सर्वांला त्यांची हुशारी तर कारण खरीच, पण इलियट साहेबांची त्यांच्यावरील मर्जी ही देखील पुष्कळ अंशानें कारणीभूत होती. ही मर्जी पुढें पुढें इतकी वाढली कीं, बापटांनीं सांगावें आणि इलियटसाहेबांनीं ऐकावें असा लोकांचा समज होऊन बसला. खरोखरच बापटांनीं बडोद्यांत

आपली कारकीर्द गाजविली. त्यांचे ते घारे डोळे, पांढरा सफेत पोषाख, उमदा काठेवाडी घोडा हीं मनावर परिणाम करण्यासारखीं होतींच. पण त्यांची कारकीर्द गाजली असें दक्षिणी लोकांना वाटण्याला त्यांची कर्तबगारी, पण गुजराथी लोकांना तसें वाटण्याला त्यांचा स्वभाव, हाच मुख्य कारणीभूत होता. स्वभावानें ते तापट असत. कोणाची भीड न धरतां टाकून किंवा तोडून बोलण्यांत त्यांचा हातखंडा असे; व गुजराथी लोक दक्षिणी लोकांना पाण्यांत पाहातात अशा भावनेनें गुजराथी लोकांचें वाटेल तेथें उट्टें काढण्यांत ते कमी करीत नसत. पण साहेबाची मर्जी आणि बिनमुर्वतखोर स्वभाव या दोन दोषांत तिसऱ्या एका गोष्टीची भर पडून बापटांच्या कारकीर्दीला त्रिदोष संन्निपात झाला. ती म्हटली म्हणजे त्यांजकडे असलेलें सर्व्हे सेटलमेंट खात्याचें अप्रिय काम.

वरील त्रिदोषानें बापटांची कारकीर्द अकालीं कशी खुंटली हें सांगण्यापूर्वी, टिळक व बापट यांचा संबंध काय व बापट कमिशनमध्यें टिळक कसे गोंवले गेले, हें थोडक्यांत सांगतों. टिळक व बापट हे सहाध्यायी नसले तरी त्यांची कॉलेजांतच ओळख पडली होती. शिवाय दोघेहि रत्नागिरीचेच. या उभयतांचे तिसरे स्नेही दाजी आबाजी खरे हे होत. बापट कॉलेजचे अभ्यास अर्धेच सोडून बडोद्यास गेले तरी या त्रिवर्गाचा स्नेह खंड पावला नाहीं. उलट कारणाकारणानें तो वाढतच गेला. बडोदेदरबारांत पूर्वीपासून चार दोन तरी दक्षिणी लोक मोठ्या हुद्यावर असण्याची परंपरा होती. आणि ज० स० गाडगीळ किंवा बापूसाहेब आठल्ये यांच्याप्रमाणें ती परंपरा बापट हे आपल्या हुशारीनें राखणार असा टिळकांना विश्वास होता. दुसरे पक्षीं टिळकांची विद्वत्ता व स्वार्थत्याग या गुणांचे बापट हे चहाते होते. केसरी व मराठा पत्रांत बडोद्यांतील राजकारणासंबंधानें जे लेख येत त्यांची माहिती व धोरण हीं प्रायः रावसाहेब बापटांच्या द्वारें मिळत. सर. टी. माधवरावांच्या बडोद्याच्या कारकीर्दीविषयीं केसरींत आलेल्या टीकेचा बराचसा आधार बापट यांनीं पुरवलेली माहिती हा होता. आणि मराठा पत्रांत तर बापटांनींच लिहिलेले पण अर्थात बिनसहीनें लिहिलेले लेख मधून मधून प्रसिद्ध होत. या स्नेहसंबंधाला व्यवहाराच्या बाजूनेंहि पुष्टि मिळाली होती. टिळकांचे जुने मित्र चित्रशाळेचे वासुदेवराव जोशी यांना बडोदेदरबारचीं छपाई वगैरेचीं अनेक कामें नेहमीं बापट साहेबांच्या ओळखीमुळें मिळत. याच सुमारास ( १८९१ ) टिळकांनीं फर्ग्युसन कॉलेज सोडून मोंगलाईत लातूर येथें कापूस वठण्याचा ( जिनिंग ) कारखाना काढण्याचा उपक्रम केला. त्यास बापट यांनीं बडोद्याचा एक पेढीवाला गिरधरलाल नानाभाई यांजकडून ५००० रु० कर्ज देवविलें होतें.

अशा रीतीनें टिळक व बापट यांचा जिव्हाळ्याचा स्नेहसंबंध असल्यामुळें, बापटांवर संकट येतांच त्यांच्या मदतीला टिळक धावून गेले असतील हें ज्याला टिळकांचा स्वभाव माहीत आहे त्याला कोणी सांगावयास नकोच.

पण या कामांत पडण्यांत टिळकांचा हेतु एकेरी नसून सजोड होता. मेह्याच्या संरक्षणाबरोबरच बडोदे संस्थानचे अधिपति श्री० सयाजीराव गायकवाड यांच्या कारकीर्दीवर ठपका ठेवण्याचा ब्रिटिश रेसिडेन्सीचा जो गुप्त प्रयत्न या वेळीं जोरांत चालू होता, त्याचा प्रतिकार करावा अशीहि टिळकांची इच्छा होती. पूर्वी कोल्हापूर प्रकरणांत टिळकांना शिक्षा झाली ती त्यांच्या देशी संस्थानच्या अभिमानामुळेंच! आणि फिरून बारा वर्षांनीं संस्थानिकांविषयीं असलेलें प्रेम प्रकट करण्याचा जो प्रसंग टिळकांना प्राप्त झाला तोहि त्यांनीं तितक्याच तत्परतेनें साधून तशीच झीजहि सोसली. बापट कमिशनमध्यें टिळक हे स्वतः जरी आरोपी नव्हते, तरी जणूं काय स्वतः आपणच अपराधी आहोंत अशा भावनेनें त्यांनीं बापटांतर्फे अथपासून इतिपर्यंत मुकदम्याचें सर्व काम चालविलें. नांवाला बॅरिस्टर व वकील दुसरे होते; टिळकांचें नुसतें वकीलपत्रहि या कज्जांत दाखल नसेल. तथापि, बापटांतर्फे हजर राहून काम चालविणारे बॅरिस्टर व वकील यांच्या वकिली मेंदूचेंच काय, पण वकिली कारकुनाचेंहि काम टिळकांनीं स्वतःचा मोठेपणा विसरून केलें असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं.

असो. बापटांची कारकीर्द संपुष्टांत येण्याला व टिळकांनीं कमिशनच्या कामांत पडण्याला उभयसाधारण असें कारण म्हटलें म्हणजे 'बारखळी' ऊर्फ सेटलमेंट खात्याच्या द्वारें श्रीसयाजीराव यांच्या कारकीर्दीशीं येणारा संबंध हेंच होय; व त्याविषयीं थोडीशी माहिती देणें जरूर आहे. हें खातें १८८३ सालच्या ऑगस्टांत इलियटसाहेबांकडे आलें. पण सगळी मोजणी पुरी न झाल्यामुळें खात्याचें प्रत्यक्ष काम १८८६ पर्यंत सुरू झालें नाहीं. आणि महाराजसाहेबांनीं मंजूर करावयाचे ते नियम तयार होण्यास आणखी तीन वर्षे लागल्यानें, बारखळी पोटखात्याचें काम १८८९ च्या मार्चमध्यें सुरू झालें. या खात्यांत जेंकिंस, ऑमॅन, मॅकॉनकी वगैरे गोऱ्या सिव्हिलियन लोकांनीं पूर्वी सुपरिंटेंडेंट म्हणून काम केलें होतें. परंतु त्यांच्या वेळीं कोणत्याहि प्रकारचा गवगवा झाला नाहीं. पण इलियटसाहेबांच्या कारकीर्दीत तो झाला याचें कारण, त्यांच्या कामाला प्रत्यक्ष इनाम चौकशीचें स्वरूप येऊन कोणाच्या इनामावर आणेवारीचा आकार बसणें, सनद नसल्यामुळें कोणाचें इनाम सरकारजमा होणें, वगैरे गोष्टी घडून आल्या. इनाम चौकशीचें कामच कोठेंहि लोकांच्या डोळ्यांवर येण्यासारखें असतें. आणि उदाहरणार्थ खुद्द ब्रिटिश अमलांत, त्यापूर्वी तीस चाळीस वर्षे इनाम कमिशनच्या कारभारामुळें जो खरा अन्याय किंवा अन्यायाचा गवगवा झाला त्याहुन इलियट साहेबांच्या कारभारांत अधिक घडून आला होता असें नाहीं. तथापि धन्याचा धनी कोणी नाहीं, या म्हणीप्रमाणें मुंबईसरकारच्या इनाम–कमिशनविरुद्ध तक्रारी करून कड पोंचविण्याला दुसरी जागा नसल्यामुळें त्या तक्रारीबद्दल कोणाचा घातपात होऊं शकला नाहीं. पण त्याच तक्रारी बडोद्यासारख्या संस्थानांत

झाल्यानें एकदम त्यांचें स्वरूप प्रचंड करून भासवितां आलें. पण हें करणारांचा हेतु इनामदारांची दाद लावण्यापेक्षां महाराजसरकारच्या राज्यकारभारावर ठपकाच ठेवण्याचाच अधिक होता. सयाजीरावमहाराज आपल्या स्वतंत्र बाण्यामुळें, किंबहुना आपल्या उद्योगप्रियतेमुळेंहि, ब्रिटिशसरकारला म्हणजे एजंट गव्हर्नरजनरल यांना अप्रिय झाले होते. इलियटसाहेबांवरहि व्यक्तिशः रेसिडेन्सीचा तसाच कांहीं राग होता. कारण ते महाराजांचे टयूटर (शिक्षक) असल्यापासून त्यांना सयाजीरावांचा अभिमान वाटे; व जातीनें इंग्रज असतांहि महाराजांच्या स्वतंत्र स्वाभिमानी बाण्याचें ते कौतुक करीत. रेसिडेन्सीच्या मनांत जेव्हां जेव्हां महाराजांस चेपावयाचें येई तेव्हां तेव्हां इलियटसाहेब महाराजांना खाजगी रीतीनें सल्ला देत, व उघड त्यांची तरफदारीहि करण्यास मागें पुढें पहात नसत. त्यांतच बापटसाहेबांच्या अप्रियतेचीहि भर पडली. बापट हुशार, तरतरीत, व संस्थानचें काम इमानानें करणारा, म्हणून महाराज व इलियट यांची त्यांजवर मेहेरनजर. पण इतर कारणांकरितां लोकांची व रेसिडेन्सिची बापटांवर नाराजी. म्हणून बापटांचें देव्हारे माजवूं देणारे महाराज व इलियट यांच्यावरहि त्यांची नाराजी. पण महाराज, इलियट व बापट हे तिघेहि बडोद्यास असल्यानें तिघांचा जोंपर्यंत एकमेकांस जोर होता, तोंपर्यंत कोणासहि त्यांचें वांकडें करतां आलें नाहीं. पण १८९४ च्या सुमारास असा योग जमून आला कीं, महाराज व इलियटसाहेब दोघेहि विलायतेस गेले; व इकडे बापट एकटे सांपडले. त्याबरोबर, रेसिडेन्सी इनामदार व बापटसाहेबांचे खाजगी शत्रु हे सर्व एक होऊन त्यांनीं हल्ला चढविला, व तो यशस्वी होऊन 'बापटकमिशन'मध्यें त्याचें पर्यवसान झालें.

इनामांची चौकशी करणें, त्यांच्या सनदा पाहणें, त्यांवर योग्य तो आकार बसविणें हें काम बडोदें संस्थानांत, मुंबईसरकारचें पाहून, यापूर्वी सुमारें पाऊणशें वर्षेपर्यंत मधून मधून सुरू होतेंच. पण सर्व जमिनींची सरसकट मोजणी व सेटलमेंट करण्याचें काम सयाजीरावांच्या कारकीर्दीपर्यंत कोणीं केलें नाहीं. याचें कारण हेंच कीं, खंडेराव मल्हारराव वगैरे अधिपति राज्यकारभांत पद्धतशीर लक्ष घालणारे नव्हते. राजा सर. टी. माधवराव हे सुशिक्षित असतांहि त्यांना या कामाकडे लक्ष घालण्याला वेळ मिळाला नाहीं. १८८९ सालीं नवीन इनामखात्याचें काम सुरू झाल्याबरोबर इनामदार लोक सहजच खडबडून जागे झाले. खुद्द इलियटसाहेबांकडे त्यांच्या खात्याच्या कामाविरुद्ध १८८९ ते १८९२ सालापर्यंत सुमारें ९००० अर्ज आले, व त्यांची व्यवस्थाहि लागली. याच अवधींत खुद्द महाराजसाहेब व त्यांचे दिवाण यांजकडेहि परस्पर अर्ज होत; पण त्यांची संख्या या चार सालांत दीड पावणेदोनशेंवर गेली नव्हती. असें असतां बडोद्याचे त्या वेळचे रेसिडेण्ट कर्नल बिडलफ यांनीं अन्यापारेषु व्यापार करून अर्जदारांना तक्रारी करण्यास उत्तेजन देण्याची सुरवात केली. वास्तविक दरबारच्या अंतर्व्यवस्थेंत लक्ष

घालण्याचा ब्रिटिश सरकारास कांहींच हक्क नव्हता; पण संस्थानीं दरबारच्या गळ्याभोंवतीं रेसिडेन्सीची तात नेहमींच लागून राहिलेली असते, व ती केव्हां आवळून गळचेपी करील याचा नेम नसतो. 'ब्रिटिशसरकारची देखरेख' या शब्दांचा अर्थ इंग्रजसरकारच्या सोयीप्रमाणें हवा तितका संकुचित व हवा तितका विस्तृत होऊं शकतो. पूर्वी कोल्हापूरदरबारांत वतनें व जमिनी सरकारजमा होण्याचे इतके अनुचित प्रकार चालले असतां, ब्रिटिशसरकारानें एखादें कमिशन नेमण्यास सुचविल्याचें ऐकिवांत नाहीं. पण सयाजीरावमहाराज, इलियटसाहेब, व रावसाहेब बापट या त्रिवर्गाच्या रागावर कमिशन नेमण्यापर्यंत बडोद्यांत पाळी आली. महाराज मात्र, ते महाराज म्हणूनच या आगींतून बचावले. इलियट साहेबांना थोडीशी झळ लागली पण तेहि बचावले. गोऱ्या सिव्हिलियनला प्रत्यक्ष कोण काय करणार !

राहतां राहिले बापट. तेव्हां 'अजापुत्रं बलिं दद्यात्' या न्यायानें त्यांना यज्ञपशु बनविण्यांत आलें. १८९२ ते १८९३ या दोन सालीं मिळून सेटलमेंट खात्यावर दोन तीन निरनिराळ्या दिशांनीं हल्ले चढविण्यांत आले होते. पहिल्या हल्ल्यांत रेसिडेन्सी पक्षाचा पहिल्या झटापटींतच निकाल लागला; व फिर्यादींना आपले शब्द परत घ्यावे लागले. हे फिर्यादी म्हणजे त्या वेळचे गुर्जर दिवाण मणीभाई जसभाई हे होत. दुसरा हल्ला १८९३ च्या प्रारंभाला महाराज विलायतेस गेले अशी संधि साधून करण्यांत आला. या वेळीं अशी तक्रार करण्यांत आली कीं, इनामखात्यांतील बापट वगैरे अधिकारी सर्वस्वीं स्वतंत्र व बेहोष रीतीनें वागतात. पण 'हें कसें तें सिद्ध करा' असा इलियटसाहेबांनीं आग्रह धरतांच हे आरोपाचे डोलारे कोसळले. फिरून दिवाणसाहेबांना शब्द परत घ्यावे लागले, येवढेंच नव्हे तर खुद्द महाराजांनीं या खात्यांतील लोकांना बक्षिसें व देणग्या दिल्या (६ एप्रिल १८९३), आणि बापटांना तर त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पेनशन घेतल्यानंतर स्वतंत्र असामी देण्याचें आश्वासन महाराजांनीं जाहीर केलें. तिसरा हल्ला बारखली खात्यावर म्हणजे मुख्यतः बापटांवर करण्यांत आला. या वेळीं इलियटसाहेब विलायतेंत रजेवर गेले होते; व त्यांचे जागीं आलेले मॅकॅनकी साहेब हे शुंभ, लहरी, व खुनशी असल्यामुळें कर्नल बिडलफ यांचें नामी साधलें. १८९३ च्या नोव्हेंबरांत इलियट साहेब विलायतेहून परत आल्यावर फिरून त्यांनीं बापटांवरील आरोपाचें निराकरण केलें; पण १८९४ च्या एप्रिलांत ते फिरून विलायतेस गेले व महाराजहि तिकडेच गेले. असें पाहून दिवाण मणिभाई, रेसिडेंट बिडलफ, व सेटलमेंट कमिशनर मॅकॉनकी या तिघांचें कूट जमून त्यांनीं बापटांविरुद्ध सर्रास अर्ज घेण्यास सुरुवात केली. आणि बापटांवर खटला भरण्याचा निश्चय झाला.

या प्रकरणांत दिवाण व रेसिडेन्ट हे चालक असून मॅकॉनकीसाहेब हे त्यांचे

हस्तक बनले होते. मेकॉनकीसाहेबांचा स्वभाव खालसांतील लोकांना अपरिचित नाहीं. ते सोलापूर, रत्नागिरी, नगर व नाशिक येथें कलेक्टर असतांना त्यांनीं आपल्या लहरी स्वभावाचे गुण पाघळलेले लोकांच्या स्मरणांत अजून आहेत. त्यांच्या इतका लहरी खुनशी सिव्हिलियन अद्याप झाला नसेल. कर्नल बिडल्फ यांच्या कटांत ते सामील होते येवढेंच नव्हे, तर आपण सेटल्मेंट कमिशनर असतां बारखळी खात्यावर बापटांची स्वतंत्र नेमणूक झाली हें त्यास मोठें वैषम्य वाटलें होतें. आणि बापटांवर लांच खाल्ल्याचे आरोप ठेवून त्यांची चौकशी करण्याचें निश्चित झाल्यावर खुद्द मेकॉनकीसाहेबांनाच स्पेशल मॅजिस्ट्रेटचा अधिकार दरबार कौन्सिलकडून देण्यांत आला. बापटांविरुद्ध पुरावा मिळविण्याकरितां मेकॉनकीसाहेबांनीं जून, जुलै, आगस्ट या महिन्यांत बडोद्यामध्यें मॅजिस्ट्रेटी अधिकाराच्या बळावर नुसता नंगा नाच घातला. त्यांनीं अनेक साक्षीदारांना गैरवाजवी माफी दिली, दरबारकडून प्रत्यक्ष देणग्यांचीं वचनें बहाल करविलीं, कित्येक सरकारी नोकरांना सस्पेंड केलें, कित्येकांना बडतर्फीची दहशत घातली, कित्येक साक्षीदारांना पोलिसच्या चौकी पहाऱ्यांत किंवा कच्च्या कैदेंतहि ठेवलें व तेथें त्यांना सक्तीनें वागविण्यांत आलें. व्यापारी लोकांच्या वह्या सरसकट जप्त करून आणण्यांत आल्या. इनामदारांना लालुच दाखवून खोटा पुरावा देण्यास त्यांनीं तयार केलें, व कित्येक आरोपींस सरसकट गुन्ह्यांची माफी दिली. तात्पर्य, बापटांविरुद्ध पुरावा गोळा करण्यांत बरावाईट कोणताहि प्रकार शिल्लक ठेवण्यांत आला नाहीं.

हे सर्व प्रकार चालू असतां बापट कामावरच होते. आपल्या विरुद्ध काहूर उसळत आहे याविषयीं त्यांच्या कानांवर नित्य नव्या बातम्या येत; परंतु त्यांना उघड हुकूम कोणताच दिला नव्हता. महाराज व इलियटसाहेब दोघेहि विलायतेंत, खुद्द दिवाणसाहेब आपल्यावर रुष्ट, सर्व शत्रूंनीं उचल खाल्लेली, चांगले चांगले मित्र म्हणविणारे देखील भेदरून जाऊन, बापटांचें कांहीं कां होईना पण दरबाऱ्च्या रोषाची आग आपल्या घराला लागूं नये म्हणून चार हात दूर राहूं लागले. यामुळें रावसाहेब बापट हे गांगरून गेले असल्यास नवल नाहीं. अशा वेळीं आपले मित्र टिळक यांची त्यांना आठवण होणें स्वाभाविक होतें; व टिळकांनींहि स्नेहाला स्मरून त्यांना हरएक प्रकारें मदत करण्याचें आश्वासन दिलें. जून १५ चे सुमारास टिळकांनीं उभयतांचे स्नेही वासुदेवराव जोशी यांना बडोद्यास पाठविलें, व यापुढें बापटांना बडोद्यांत राहूं देणें हें घातक वाटल्यावरून त्यांना हरप्रयत्नानें वळवून नेण्याचा जोशांनीं विचार केला. ता० १८ जून रोजीं मुंबईस जाणारी गुजराथ मेलट्रेन बडोदें स्टेशनवर येण्याचे सुमारास बापट व जोशी दोघेहि स्टेशनावर येऊन दाखल झाले. बरोबर सामान फक्त जोशी यांचेंच असून, बापटसाहेब जणूं काय त्यांस पोंचविण्याकरितांच आले होते. बापटांमागें लागून आलेले गुप्त पोलीस कांहीं अंतरावर उभे राहून टेहेळणी ठेवीत होते! इतक्यांत गाडीची शीळ झाली. व

गाडी चालूं लागतांच बापटसाहेबहि फूटबोर्डावर पाय ठेवून जोशी यांचे डब्यांत उडी मारून बसले ! जोशी यांनीं सेकंडक्लासचीं दोन तिकिटें आधींच काढून ठेवलीं होतीं. बापट डब्यांत शिरलेले पाहातांच गुप्तपोलिसांनीं धांवपळ सुरू केली. पण गाडी स्टेशनाबाहेर केव्हांच निघून गेली. पोलिसांनीं सुरत-नवसरी-पर्यंत तारांवर तारा केल्या. पण रेल्वेच्या हद्दींत फौजदारी कायद्याचे सर्व अधिकार इंग्रज सरकारचे स्वाधीन असल्यामुळें व खात्यांतील मॅजिस्टेटाचें वॉरंट नसल्या-मुळें बापटांना कोणीहि प्रतिबंध करूं शकले नाहींत. जोशांबरोबर बापट पुण्यास आले ते पुढें महिना दीडमहिना फरारीसारखेच होते. पुणें पोलिसांच्या सहाय्यानें बडोदा पोलिसनें जंग जंग पछाडले, पण जोशांनीं बापटांचा यत्किंचितहि पत्ता लागूं दिला नाहीं.

पण केवळ बडोद्याहून निघून आल्यानें हें संकट टळणें शक्य नव्हतें. ते फरारी झाल्यामुळें त्यांच्यावरील संशय सहजच बळावले. त्यांच्या शत्रूंना त्यांच्या-वर आरोप ठेवण्यास उत्तेजन मिळालें. ता० ३०-१-१८९४ पासून बापटांना सस्पेंड करण्याचा हुजूर हुकूम सुटला. बडोदें सोडल्यानंतर एक महिन्यानें मुंबई हायकोर्टाचे सॉलिसिटर पेन गिल्बर्ट यांनीं बापटांतर्फे दरबारपुढें हजर होण्याची परवानगी मागितली. परंतु कांहीं दिवसांनीं त्यांस दिवाणसाहेबांकडून असें कळविण्यांत आलें कीं, बापटांच्या कामांत त्यांचा वकील घेण्याची वेळ अद्यापि आलेली नाहीं ! आदले दिवशीं सॉलिसिटर मि. गिल्बर्ट यांनी रेसिडेंट कर्नल बिडलफ यांची गांठ घेतली; व त्यांस असें सांगितलें कीं, बडोद्यास येऊन जातीनें हजर झालें असतां अटक होणार नाहीं, निदान वॉरंट बजावलें तरी जामीनावर सुटका होईल, इतकें आश्वासन मिळेल तर बापट बडोद्यास परत येण्यास तयार आहेत. कारण आपल्यावरील आरोपांना उत्तर देण्याची व ते खोडून काढण्याची त्यांची इच्छा आहे. पण रेसिडेंट साहेब फारच घुस्सांत होते. ते म्हणाले "शिक्षा होईल म्हणून पळून जाणाऱ्या आरोपीशीं मी तह करूं इच्छित नाहीं." "बापट आजारी होते म्हणून गेले" असें सॉलिसिटरनें सांगितलें. पण बापट बडोद्यां-तून जाण्याच्या कारणाला मनोमन साक्ष असल्यामुळें रेसिडेंटसाहेबाला ही सबब खरी कशी वाटणार ? सॉलिसिटर गिल्बर्ट यांनीं टिळकांना खालील शब्दांनीं या भेटीचें तात्पर्य कळविलें. "कर्नल साहेब बापटांविरुद्ध किती तडफडून व द्वेष-बुद्धीनें बोलले याचें वर्णन मी करूं शकत नाहीं. साहेबमजकुरांना उलट बोलून जागच्या जागीं झाडून टाकावें असें मला अनेक वेळां वाटलें, पण म्हटलें मी आरोपिताचा वकील ! मला गय खाल्लीच पाहिजे."

अखेर ता. १३ आगस्ट १८९४ रोजीं बापटकमिशन नेमलें गेलें. कमिशन नेमून चौकशी व्हावयाची ठरल्यावर बापटांना बडोद्यांतून बाहेर राहणें इष्ट नव्हतें. अर्थात् ते आपण होऊन बडोद्यास परत जाऊन कमिशन-

पुढें हजर झाले. फिर्यादीतर्फे काम चालविण्याला प्रथम बॅरिस्टर फेरोजशहा मेथा व नंतर मि. ब्रॅन्सन हे असून त्यांना मुंबईचे प्रसिद्ध भाईशंकर हे मदत करीत होते. एक तर भाईशंकर यांची हुशारीबद्दल प्रसिद्धि होती. शिवाय आरोप लांच-लुचपतीसंबंधाचा असून त्यांत गुजराथी भाषेंत ठेवलेल्या जमाखर्ची चोपड्यांचें काम बसल्या उठल्या पडावयाचें होतें, व हिशेबी कामांत भाईशंकर यांचें डोकें फार तीक्ष्ण! तसेंच बडोद्याचे सरकारी वकीलहि मदतीस होतेच. याशिवाय इनामखात्यांतील किडे, असंतुष्ट इनामदार, पैसे खाऊ, चहाडखोर, घरभेदे, कृतघ्न बनलेले नीच लोक वगैरेंची मदत होती ती निराळीच. याच्या जोडीला अप्रत्यक्ष मदत म्हटली म्हणजे महाराज व इलियट हे गैरहजर असल्यामुळें मैदान मोकळें सुटलें होतें ही होय. दिवाण मणिभाई हे एका अर्थानें फिर्यादी असून, शिवाय दरबारचे कोणते कागद कमिशनपुढें हजर करण्याकरितां परवानगी घ्यावी व कोणते मागें ठेवावे, कोणते सांपडत नाहींत म्हणावें व कोणते गुप्त म्हणून दाखवीत नाहीं म्हणून म्हणावें, या सर्वांचा पूर्ण अधिकार दिवाणसाहेबांना आलेला होता; व तो त्यांनीं मनसोक्त बजावलाहि. पैशाची वाण फिर्यादीपक्षाला नव्हती हें सांगणें नकोच.

उलट बापट यांची स्थिति अगदीं निराळी होती. दरबारशीं झगडण्याइतकें द्रव्यबळ त्यांच्या संग्रहीं नव्हतें. यामुळें त्यांना बॅरिस्टर देतां आला नाहीं. प्रथम कांहीं दिवस मुंबईचे हायकोर्ट वकील महादेव चिमणाजी आपटे व कांहीं दिवस दाजी आबाजी खरे यांनीं बापटांतर्फे काम चालविलें. खुद्द बडोद्याचे वकील रामभाऊ गोखले यांनींहि त्यांचें उघडपणें वकीलपत्र घेतलें होतें. तथापि खरें बोलावयाचें म्हणजे, पूर्वी सांगितल्याप्रमाणें, वकिलाचें बहुतेक काम व वकिलाच्या कारकुनाचें निमेंशिमें काम बळवंतरावजी टिळकानांच करावें लागलें. किंबहुना सर्वच गोष्टींची सिद्धता त्यांना करावी लागली. घर फिरलें म्हणजे घराचे वासेहि फिरतात! येवढे बापट वजनदार, बडोद्यांत त्यांचे इतके स्नेही, पण प्रसंग आला तेव्हां बापटांच्यातर्फे हपीस उघडून बसण्याला टिळकांना गांवांत कोणी जागा देईना! शेवटीं स्टेशनाजवळ रोडे यांच्या धर्मशाळेंत बापट, टिळक, वासुदेवराव जोशी यांनीं तळ देऊन तेथेंच आपली कचेरी सजविली. कमिशनचें काम सुमारें चार महिने चाललें होतें. या मुदतींत केसरी–मराठा–पत्रें व लॉ क्लास यांची केवळ तात्पुरती व्यवस्था टिळकांना करतां आल्यामुळें त्यांचें काम यथातथाच चालू होतें. पक्षी बारा कोसांवरूनहि आपल्या घरट्यावर नजर ठेवतो अशी म्हण आहे, व आपल्या वर्तमानपत्रासंबंधानें ही म्हण टिळक नेहमीं खरी करून दाखवीत. तथापि या प्रसंगीं त्यांचें चित्त बापटांच्या मुकदम्यांत इतकें गढून गेलें होतें कीं, वर्तमानपत्राकरितां लेख लिहिण्याला क्वचितच फुरसद होई. सकाळचा सर्व वेळ दोन प्रहरीं होणाऱ्या कामाचें अगाऊ चिंतन करण्यांत जाई; दोन प्रहरचा सर्व वेळ कोर्टांत

जाई; व रात्रीचा सर्व वेळ दोन प्रहरीं झालेल्या कामाचीं टिपणें व चर्चा करण्यांत जाई.

तथापि त्यांतल्या त्यांत वेळ काढून टिळक केसरी मराठ्याकरितां कांहीं मजकूर लिहून पाठवीत असत. कमिशनपुढें झालेला पुराव्यांतील मुख्य भाग फिर्यादीतर्फेच्या साक्षीदारांचा होता, व बहुतेक साक्षीदारांच्या पुराव्यांत हिशेबी वह्यांचा संबंध येई. या वह्या प्रायः कोर्टातल्या कोर्टात तपासाव्या लागत. त्या गुजरार्थीत असत, आणि टिळकांना गुजराथी चोपड्या चांगल्या वाचण्याइतकें गुजराथी येत नसे. यामुळें बापटांची मदत त्यांना घ्यावी लागे. तथापि उलटतपासणीचे वेळीं प्रश्न सुचविण्याचें काम टिळकांचेंच असे; व टिळकांसारखा मदतनीस प्रश्न सुचविण्यास मागें असल्यावर कोणता वकील स्वतःचें डोकें व्यर्थ शिणविण्याची हौस बाळगणार ? टिळक व बापट यांनीं मिळून हें हिशेब तपासाचें व त्यावरून उलटतपासणी करण्याचें काम इतकें उत्तम केलें कीं, कित्येक साक्षीदार खोटे ठरले, येवढेंच नव्हे तर गिरधरलाल नानाभाईसारख्या मुख्य साक्षीदाराच्या वह्या म्हणजे हिशेब खोटे आहेत, व फिर्यादीच्या हातीं या वह्या आल्यानंतरहि त्यांत खोडाखोडी शोध घालणें वगैरे गुन्हेगारीचे प्रकार घडून आले आहेत असें पुराव्यानिशीं त्यांनीं फिर्यादीच्या गळ्यांत बांधलें. कमिशनचें काम चालू असतांच बॅरिस्टर फेरोजशहा मेहेता हे तें काम टाकून गेले; त्याचें एक कारण उघडकीस आलेले हे पुराव्याचे बनावट प्रकार होत असें सांगतात. बॅरिस्टर मेहेता व सॉलिसिटर माईशंकर यांचा यावरून थोडासा बेबनावच झाला असेंहि म्हणतात. बापटांतर्फे लेखी डिफेन्स देण्यांत आला त्याचेंहि बहुतेक सर्व काम टिळकांनींच केलें. कोर्टातून आल्यावर रात्रीं घरीं बसून पुढील डिफेन्स लिहावयाचा, व दुसरे दिवशीं तो कोर्टात नेऊन वाचावयाचा, असें काम १० डिसेंबर ते २४ डिसेंबरपर्यंत चाललें होतें. सुमारें २०० छापील फुलस्केप कागद भरतील येवढा हा डिफेन्स मोठा झाला असून, शिवाय आरोपीतर्फे साक्षीदार तपासल्यावर त्या पुराव्याचा सारांश म्हणून दिलेली कैफियत आणि कमिशननें निकाल दिल्यानंतर त्यावर हुजूरकडे दिलेली लेखी कैफियत मिळून आणखी सुमारें ५० पानें होतील. यावर्षी मद्रास येथें भरलेल्या दहाव्या राष्ट्रीय सभेला टिळकांस जातां आलें नाहीं. आरोपीतर्फे शेवटची कैफियत १५ जानेवारी १८९५ रोजीं गुदरली गेली. तथापि टिळक लवकर मोकळे झाले नाहींत. ते बडोद्यास नसून पुण्यास आले तरी बापट कमिशनचा वेध त्यांना लागलेलाच होता. मात्र ता. १ मार्च १८९५ पासून फिरून त्यांनीं लॉ क्लास उघडून आपल्या नित्य व्यवसायास सुरुवात केली.

बापटांचा इनसाफ करण्याकरितां नेमलेलें कमिशन १८५० च्या ३७ व्या अॅक्टाप्रमाणें नेमण्यांत आलें होतें. त्याला डिपार्टमेंटल हेंच स्वरूप खरोखर

होतें. म्हणजे तें न्याय इन्साफाचें कोर्ट नव्हतें. बापटांवरील लांचलुचपतीचे आरोप हें एक दरबारी प्रकरण होतें. तो फौजदारी खटला नव्हता. तथापि कमिशननें आपल्याकडे न्यायकोर्टाचा अधिकार आहे अशा समजुतीनें वर्तन केलें. बापटांवर एकंदर ३६ आरोप सुरवातीस होते. पण त्यांतील अखेर बारा शिल्लक ठेवून त्यांजवर निकाल देण्यांत आला, व त्यांतील अकरांमध्यें बापटांना दोषी ठरविलें. येवढेंच नव्हे तर दोषारोपाकरितां बापटांस ६ महिने साधी कैद व १०,००० रु. दंड अशी शिक्षा देण्याबद्दल शिफारसहि केली. ही गोष्ट त्यांनीं सर्वस्वीं अधिकाराबाहेरची केली, इतकेंच नव्हे, तर कायदेकानूंचें ज्ञान किंवा न्यायमनसुबीची खरी पद्धति आणि पुराव्याचा कायदा यांचीहि कमिशनला फारशी ओळख नाहीं असें त्यांनीं चालविलेलें काम व दिलेला निकाल यावरून दिसून येण्यासारखें आहे. पण सुदैवानें कमिशनच्या हातीं रिपोर्ट करण्यापलीकडे अधिक कांहीं अधिकार नव्हता. अखेर हुकूम देणें ही खुद्द महाराजांच्या अखत्यारांतलि गोष्ट होती. यामुळें बापटांना न्याय मिळण्याची आशा होती व अखेर ती कांहींशी खरीहि ठरली. ता. १९ जानेवारी १८९५ रोजीं महाराजसरकार विलायतेहून परत आले; व लौकरच त्यांनीं बापट कमिशनचें प्रकरण हातीं घेतलें. खटल्यांत दाखल झालेले सर्व कागद, तसेंच बापटांतर्फें मागणी करण्यांत आलेले पण दिवाणांच्या हुकुमानें गुप्त म्हणून मागें ठेवण्यांत आलेलेहि सर्व कागद, महाराजांनीं रा. ब. पंडित व दलाल या दोघां कायदेपंडितांकडे अभिप्रायाकरितां दिले. या दोघांचा अभिप्राय असा पडला कीं, कांहीं थोडे खेरीजकरून इतर सर्व खटल्यांत बापट निर्दोषी आहेत. पण थोडीशीहि शंका राहूं नये,म्हणून पुन्हां बडोदा हायकोर्टांतील एक पारशी जज्ज व खुद्द दिवाणसाहेब यांचा अभिप्राय घेऊन चौघांच्या अभिप्रायांनीं निम्मेपेक्षां जास्त खटल्यांत व तिघांच्या अभिप्रायानें उरलेल्या खटल्यांत बापट हे निर्दोषी ठरल्यामुळें महाराजांनीं बापटसाहेबांस स्वतः निर्दोषी ठरविलें. मात्र नोकरीवर परत रुजू करून घेतलें नाहीं. याचा अर्थ उघडच आहे. तो असा कीं, बापटांवरील मुख्य आरोपासंबंधानें जरी महाराजांचें मन निःशंक होतें, तरी जमिनीवर शेण पडलें तर तें थोडीबहुत तरी माती घेऊन वर उठतें या म्हणी-प्रमाणें कांहीं किरकोळ बाबतींत महाराजांच्या मनांत किंतु राहिला. तसेंच ब्रिटिश-सरकारच्या क्रोधाचें जें येवढें भूत उभें राहिलें ते निदान घांसभर तरी बळी घेतल्याशिवाय संतुष्ट व्हावयाचें नाहीं हें लक्षांत घेऊन महाराजांनीं बापटांना प्रत्यक्ष नोकरीवरून दूर करून आपल्या शत्रूंशीं समेट केला. तथापि बापट यांना १२५ रु. पेन्शन महाराजांनीं करून दिलें, व आमरणांत त्यांच्यावर त्यांचें प्रेम कायम होतें. सन १९१५ सालीं बापटसाहेब त्यांचा थोरला मुलगा व त्यांची पत्नी हीं सर्व एकदम निवर्तल्यामुळें, बापटसाहेबांचा धाकटा मुलगा उघडा पडलेला पाहून त्यांच्या अभ्यासाकरितां महाराजांनीं दरमहा तीस रुपयांची स्कॉलरशिप चार वर्षें देण्याचा

हुकूम केला. बापट हे कमिशनच्या निकालानंतर पुण्यास येऊन कायमचे राहिले व त्यांचा अखेरचा काळ टिळकांच्या सान्निध्यांत गेला. बापट व टिळक यांच्या स्वभावांत जमीन–अस्मानाची तफावत असतां, दाजीसाहेब खऱ्यांप्रमाणेंच बापटांशींहि टिळकांचा स्नेह आमरण अखंड राहिला; व बापट वारल्यावर त्यांच्या मुलाची सर्वप्रकारें व्यवस्था लावून देऊन व महाराजसाहेबांकडे त्याच्याकरितां खटपट करून तोच स्नेह त्यांनीं मरणोत्तरहि चालविला.

खुद्द सयाजीराव महाराज व टिळक यांची ओळख कमिशनच्या पूर्वींची होती. पण ती कमिशनमुळें दृढ झाली हें स्वाभाविकच होय. कमिशनचें काम करतांना टिळक स्वतःच्या केसाच्या बचावाकरितां झटत होते हें जरी सकृद्दर्शनीं खरें असलें, तरी अंतरंगांत आपण महाराजांनाहि मदत करीत आहों अशी जाणीव जशी टिळकांना होती तशी ती महाराजांना नसणें अशक्य आहे. टिळकांबद्दल महाराजांच्या मनांत इतर रीतींनें जी आदरबुद्धि होती तींत या जाणिवेनें भरच पडली असेल. मात्र टिळकांच्या बाजूनें ही सेवा करतांना निःस्वार्थी बुद्धीची होती व पुढेंहि ती तशीच राहिली. पुष्कळ लोकांची अशी समजूत दिसतें कीं, महाराजसरकारांनीं पुणे येथील नारायण पेठेंतील आपला वाडा टिळकांना दिला तो ही पूर्वींची सेवा लक्षांत घेऊन फुकट दिला. पण ही समजूत सर्वस्वीं चुकीची आहे. टिळकांनीं हा वाडा घेतला नसता तर इतर लोक त्यावर दृष्टी ठेवून बसले होते; व त्यांनीं महाराजांकडे मागणीहि केली होती. कारण महाराजांस तो विकून टाकून पुण्याचें आपलें 'एस्टाब्लिशमेंट' मोडावयाचें होतें. या दृष्टीनें वाड्याची किंमतहि त्यांनीं दरबार एंजिनिअरकडून करविली. ती सुमारें सवा-सतरा हजार रुपये भरली; पण शक्य तर थोडी किंमत मजकरितां कमी करा अशी टिळकांनीं इच्छा दर्शविल्यावरून महाराजांनी टिळकांना हा वाडा पंधरा हजार चारशें रुपयांना विकला. टिळकांना वाडा फुकट दिल्याची गोष्ट कोणी बोलला कीं, प्रस्तुत लेखकास त्याचें हसूं येतें. कारण वरील रकमेचा चेक पटवून पावती आणण्याचें काम प्रस्तुत लेखकाकडे त्या वेळीं आलें असून त्यानें बडोद्यास जाऊन हा व्यवहार आपल्या हातानें पुरा केलेला आहे.

बापट कमिशनचें काम चालवितांना टिळकांनीं कोणतें नवे मुद्दे काढले व उलटतपासणी कशी यशस्वी केली याचें वर्णन पुष्कळ लोकांच्या तोंडून प्रस्तुत लेखकास ऐकावयास मिळालें आहे. पण येवढें सांगितलें असतां पुरें कीं बारा वर्षांपूर्वीं ज्या फेरोजशहा मेहतानीं अशाच एका संस्थानीं प्रकरणांत टिळकांचें वकीलपत्र घेऊन काम चालविलें त्यांना या प्रकरणांत, टिळक प्रतिपक्षी असतां ते कायदेपंडितगिरी किंबहुना वकिली किती उत्कृष्ट करितात हें पाहाण्याचा अपूर्व योग आला, व टिळकांच्या बुद्धिमत्तेविषयींच्या त्यांच्या आदरांत भरच पडली.

शेवटीं बापट व इलियट या उभयतांच्या संबंधानें चार ओळी लिहून हें

प्रकरण पुरें करितों. पुष्कळ लोकांना अशी शंका असावी कीं, इलियटसाहेबांना बापटांची हुशारी पटली असली तरी त्यांच्या प्रामाणिकपणाविषयीं त्यांची खात्री पटलेली नव्हती. तशी असती तर विलायतेहून मुद्दाम येऊन त्यांनीं बापटांतर्फे कमिशनपुढें साक्ष दिली दिली असती. पण या शंकेचें उत्तर समाधानकारक असून खुद्द इलियटसाहेबांचीं या बाबतींतील पत्रें आम्हीं पाहिलीं आहेत. त्या पत्रांवरून इलियट यांचा अभिप्राय असा दिसतो कीं, 'ज्या अर्थी केवळ बापटांच्या हुकमावरून निकालांत निघालेल्या इनामचौकशीचा संबंध या लांचलुचपतीच्या खटल्यांत आणला गेला होता, व या बहुतेक प्रकरणांत ज्यांच्याकडून लांच घेतल्याचा आरोप त्यांनीं कोणतीहि फलप्राप्ति झाल्याचा पुरावा फिर्यादीस करतां आला नाहीं, त्या अर्थी मी पुरावा देण्याकरितां न आलों तेंच बरें; कारण परस्परच निर्णय लागतो. उलट मी आल्यानें बापटांवर अधिक आग मात्र पाखडली गेली असती.' ता. ६ डिसेंबर १८९४ च्या पत्रांत ते लिहितातः—
"Do you see why I kept away ? I should have been swept off my legs & the attack on you would have been far fiercer than it has and you would have been left without any assistance at the end. I write freely because I am writing privately & above all because I still believe that these charges do not shake my confidence in you."

बापट कमिशन व टिळक यांसंबंधानें अनेक आख्यायिका आम्ही ऐकल्या आहेत त्यांतल्या दोन तीन देऊन हें प्रकरण पुरें करूं. पहिली आख्यायिका अशीः— टिळक बडोद्यास होते तोंपर्यंत त्यांच्या मागें गुप्त पोलिसांचा सदैव पहारा असे. टिळक हे बापटांचे स्नेही एवढाच त्यांचा अपराध. पण हे स्नेहीहि सुखासुखी आलेले नव्हते, तर बापटांना नांदत्या दिवाणाविरुद्ध मदत करायला आलेले होते! एके दिवशीं टिळक गांवांत एका गृहस्थाकडे कांहीं कामाकरितां गेले असतां बाहेर गुप्त पोलीस तिष्ठत बसला होता. त्या बिचाऱ्याला झोंप लागली. टिळक बाहेर येऊन पाहतात तों आपल्या 'बॉडीगार्ड' साहेबांस झोंप लागलेली. तेव्हां त्यांनीं त्याला मुद्दाम हाका मारून जागा केला व सांगितलें कीं, 'बाबा, ऊठ, मी निघालों. चालूं लाग. नाहींतर तुझ्या नोकरीवर पाणी पडेल.' त्याच दिवशीं टिळकांनीं दिवाण मणीभाई यांना एक खरमरीत पत्र लिहिलें व विनंति केली कीं, 'तुम्हांला वाटेल तर मी माझी रोजची डायरी पाठवीत जाईन; पण माझ्यामागें पोलिसाचा ससेमिरा काय म्हणून ? त्यामुळें मला नसला तरी मी ज्यांच्याकडे जातों त्यांना त्रास होतो. मी तुमच्या राज्यांत फंदाफितुरी करण्याकरितां आलों नसून माझ्या एका मित्राला केवळ न्याय मिळण्याच्या कामीं मदत करण्याला आलों आहे.'

दिगंबर गोपाळ वैशंपायन या नांवाचा एक गृहस्थ बडोद्यास होता. तो बापटांचा लांच खाण्यांतला हस्तक अशा समजुतीनें त्याला पकडून व कच्च्या अटकेंत ठेवून त्याजकडून कबुलीजबाब लिहून घेण्यांत आला. बिचारा अटकेंत पडल्यावर काय करणार ! पण ठकासि व्हावें ठक या उक्तीची त्याला आठवण झाली. त्यानें कबुलीजबाब लिहून देण्याचें कबूल केलें व सांगितल्याप्रमाणें सर्व मजकूर लिहून दिला. मात्र शेवटीं सही केली तींतच सफाईनें लपेट मारून 'मी नाकबूल' अशीं अक्षरें घुसडून दिलीं. पोलिसांनीं लपेटाबद्दल विचारतां 'मेणवलीकर' असें नांवापुढें गांव घातलें असें त्यानें सांगितलें. बिचाऱ्या पोलिसाला तें खरें वाटलें, व आश्चर्य हें कीं त्यांनीं हें उत्तर खरें खोटें याचा आधीं नीट विचार केला नाहीं, आधीं पुरती किंवा अक्षरलपेट उकलून देखील वाचली नाहीं. दिव्याखालीं अंधेर म्हणतात तो हा असाच ! असा कबुलीजबाब लिहून दिल्यावर दिगंबरपंत यांची सुटका झाली. अर्थात् योग्य वेळीं त्यांस साक्षीकरितां कमिशनपुढें आणण्यात आलें. त्यांनीं सुरवातीस नाकबुली दिली, तेव्हां त्यांना खोटें पाडण्याकरितां त्यांचा अस्सल कबुलीजबाब पुढें करण्यांत आला व वाचला गेला. तेव्हां दिगंबरपंत म्हणाला 'आणखी पुढें वाचा !' फिर्यादी वकील म्हणाला, 'यापुढें तर नुसती तुमची सही आहे.' दिगंबरपंत म्हणाला 'अहो, त्यांतच तर माझी नाकबुली आहे.' झालें ! सहीच्याहि पुढें काय म्हणून वाचून पाहतात तों 'मी नाकबूल' हीं अक्षरें ! तीं वाचून काय हंशा उडाला असेल याची कल्पना सहजच करतां येईल !

बापटांविरुद्ध मुख्य साक्षीदार गिरिधरलाल नानाभाई. पुष्कळ वर्षांपासून त्याच्या पेढीशीं बापटांचा व्यवहार. अखेरपर्यंत बापटांचें बहुतेक देणें घेणें, ठेवी ठेवणें, जरूर तर कर्ज काढणें वगैरे सर्व पैशाचे व्यवहार या पेढीमार्फत चालत. असा मनुष्य बापटांविरुद्ध साक्ष देण्यास फारच पसंत. कारण जो काय खरा पुरावा मिळणार तो त्याच्याच वहींत; व खोटा पुरावा असेल तर त्यालाहि त्याच्या हिशेबी वह्यांचाच आश्रय मिळणार. व त्याप्रमाणें नवीं खोटीं खातीं सुरू करून व जुन्यांमध्येंहि फिरवाफिरव करून पुरावा तयार करण्यांत आला होता. हा साक्षीदार जिंकला म्हणजे खटला जिंकला असेंच असल्याकारणानें टिळकांनीं त्याचे सर्व हिशेब डोळ्यांत तेल घालून तपासले; व या तपासणीच्या आधारें वकिलाकडून उलटतपासणी सुरू असतां गिरधर हा अगदीं रडकुंडीस आला. साक्ष बहुतेक संपत आली होती व संध्याकाळचा सुमार होता, म्हणून आजच साक्ष संपवूं नये कांहीं भानगडीचे प्रश्न दुसरेहि दिवसाकरितां शिल्लकेंत ठेवावें, व आजची वेळ कशी तरी इकडचे तिकडचे प्रश्न विचारण्यांत निभावून न्यावी, असें टिळकांचें म्हणणें होतें. पण दाजीसाहेबांनीं तें न ऐकतां घाईने साक्ष त्या दिवशीं संप-

विली. टिळकांना या गोष्टीचा फार राग आला व उभयतां स्नेह्यांचे पूर्वी केव्हां झालें नाहीं असें कडाक्याचें भांडण दोघे घरीं गेल्यावर झाले व शेवटीं दाजी-साहेबांनीं आपली चूक कबूल केली असें सांगतात ! या खटल्यांत वकीलापेक्षांहि अधिक आस्थेनें टिळकांनीं काम चालविलें, व पुढें स्वतःचें खटले झाले त्यांतहि त्यांच्या या आस्थेचा अनुभव खुद्द त्यांच्याहि वकिलांना कबूल करावा लागला. रोज डिफेन्सचे पांच पन्नास ताव नवे लिहून आणून कोर्टांत वाचले जात याचें फिर्यादीचा बॅरिस्टर ब्रानसन यास सहजच नवल वाटलें. कारण बॅरिस्टर लोक स्वतः अशी मेहनत कधीं जन्मांतहि करीत नाहींत; आणि करतीलच तर मर-तीलहि. सॉलिसिटर लोकांनीं तवा तापवून पोळी लाटून बारिस्टरांच्या हातावर टाकली कीं मग ती आडवी उभी भाजण्यांत त्यांची कुशलता पाहून घ्यावी ! ब्रानसन एक दिवस विनोदानें म्हणाले " रोज इतकें नवें काव्य लिहिणारा हा स्फूर्तिसंपन्न कवि तरी कोण ? " पण हा कवि कोण हें ब्रानसनसाहेबांना तिऱ्हा-इतानें सांगण्याचें कारण नव्हतेंच. एकाच टेबलाजवळ पुष्कळ दिवस समोरा-समोर बसून आरोपीच्या डिफेन्सचीं सर्व सूत्रें कोण चालवीत आहे, हें त्यांच्या डोळ्यांला दिसतच होतें !

बापटांवर दिवाण मणीभाई यांनीं अविचारानें आणलेले बहुतेक आरोप अखेर या नाहीं त्या रीतीनें निकालांत लागले. तथापि एवढी गोष्ट खरी कीं, त्यांच्या नांवावर कोणीतरी, कदाचित् त्यांचेच कोणी संबंधी, लांच खात असावे. पण ज्या प्रकरणांत लांच खाल्ल्याचा बोभाटा त्याच कामांत लांच देणाराविरुद्धच प्रायः निकाल झालेले होते! याचा उघड अर्थ हाच कीं, बापटांना लाचांची माहिती नसावी. पण ज्यांचे पैसे गेले त्यांचे पैसेहि गेले व वरती निकालहि विरुद्ध लागला. असे दुहेरी अन्याय झाल्यामुळें, बापटांच्या नांवाचा बोभाटा फार झाला. आणि मनुष्य एकदां अप्रिय झाला म्हणजे त्याचा नाश कोणत्या रीतीनें होणार याची चिकित्सा लोक साधारणपणें करीत नाहींत. बापटांना कमिशनानें दिलेली शिक्षा जरी अन्यायाची होती तरी बापट तुरुंगांत गेल्यानें ज्यांना आनंद झाला असता अशांची संख्या दुःख होणारांपेक्षां कदाचित् जास्तच भरली असती. पण ज्याचें अन्न खाल्लें त्या धन्याची नोकरी बापटांनीं इमानानें केली याबद्दल कोणा-चाच वाद नाहीं, व हें इमानच टिळकांच्या मदतीपेक्षांहि त्यांच्या अधिक उप-योगा पडलें, टिळकांना झालें तरी बापट हे कोणीकडून तरी सुटावे येवढेंच हवें होतें, म्हणून बापटप्रकरणाचा अखेर निकाल जाहीर करतांना जें अंतीं गोड तें सर्व गोडच असें म्हणून केसरीनें बापटांच्या शत्रूवर फार हल्ला न करितां या प्रकरणाचा गोडीनेंच समारोप केला.

बापटांचा डिफेन्स देतांना टिळकांना क्राफर्डकमिशनच्या रिपोर्टाची बरीच मदत झाली. दोन्ही खटले लांचलुचपतीचेच होते. पण टिळकांचा हितसंबंध

या दोहोंत मनानें वेगवेगळा होता. क्राफर्डप्रकरण सुरू असतां टिळकांची बाजू क्राफर्डसाहेबांस लांच देणाऱ्या व बडतर्फ झालेल्या मामलेदारांच्या तर्फेची होती. ते भीमभाई पेंडसे वगैरे सरकारी अधिकाऱ्यांना, म्हणजे फिर्यादी पक्षास, मदत करीत होते. उलट बापटप्रकरणांत त्यांची मदत आरोपीला होत असून फिर्यादीच्या वकिलाशीं त्यांची झुंज होती. क्राफर्डसाहेबानें लांच खाल्ले हे अगदीं सत्य असतां कमिशननें त्याला निर्दोषी ठरविलें व टिळकांनाहि बापट निर्दोषीच ठरावयास पाहिजे होते. यामुळें क्राफर्डाच्या वकिलांनीं जे युक्तिवाद लढविले व त्यांच्या न्यायाधिशांनीं जे युक्तिवाद स्वीकारले ते सर्व यथाप्रसंग टिळकांनीं उपयोगांत आणले. व या सर्वांच्या मुळाशीं एक गमतीचें मर्म होतें तें हेंच कीं, जो युक्तिवाद इंग्रजसरकारला क्राफर्ड प्रकरणांत पटला तो बापटांच्या प्रकरणांत कां पटूं नये असें विचारण्यास मोकळीक होती! बापटांच्या कामीं हा पूर्वीचा दाखला मानण्यास सरकार मनांतून तयार नव्हतें तरी उघडपणें त्यांना त्या दाखल्याला नांवहि ठेवतां येईना. तेरीबी चुप मेरीबी चूप!

# भाग १७ वा

# किरकोळ चळवळी

## ( १८९० ते १८९९ )

टिळक राजीनामा देऊन डेक्कन एज्युकेशन सोसायटींतून बाहेर पडल्यावर पुढें काय करावें याविषयीं त्यांचें मन क्षणभर गोंधळल्यासारखें झालें याविषयीं शंका नाहीं. ज्या हेतूनें न्यू इंग्लिश स्कूल, फर्ग्युसन कॉलेज व डेक्कन एज्युकेशन सोसायटी या संस्था त्यांनीं स्थापल्या तो हेतु या राजिनाम्यानें खंडित झाला, व तोच हेतु मनांत धरून आयुष्याची पुढील दिशा आंखावयाची म्हणजे फिरून वेगळी शाळा, वेगळें कॉलेज, व वेगळी सोसायटी काढावयाची या गोष्टी ओघानेंच प्राप्त होतात. परंतु आठ वर्षांचे परिश्रम अशा रीतीनें व्यर्थ गेल्यावर फिरून त्याच त्या गोष्टी करणें हें टिळकांना सहजच कंटाळवाणें वाटूं लागलें असावें. सोसायटीच्या भांडणांतील चुका कांहीं टिळकांकडे व कांहीं इतरांकडे असल्या, तरी समान योग्यतेच्या होतकरू तरुण मंडळींनीं एकत्र राहून चालविलेल्या उद्योगांत स्वभावभेदामुळें कज्जे माजणें हें अपरिहार्य आहे हा रोकडा अनुभव त्यांना आला असून फिरून पूर्वीसारखी मांडणावळ मांडण्यांत अर्थ नाहीं असेंच त्यांच्या मनानें घेतलें. शिवाय नवी शिक्षणसंस्था काढणें म्हणजे जुन्याशीं टक्कर देऊन जुनी व नवी दोन्हीं संस्था कमकुवत करणें होय म्हणून तीहि गोष्ट उचित नाहीं, असेंहि त्यांच्या मनांत येई.

छापखाना घ्यावयाचा तर त्याला जोडून नवीन वर्तमानपत्रें काढावयाचीं नाहींत अशा अटीनें तरी ते बांधून जाणार होते. परंतु सोसायटीचा राजीनामा देतांना नवीन शाळा काढूं नये अशी अट त्यांना कोणी घातली नव्हती, अगर त्यांनींहि मान्य केली नव्हती. यामुळें मनांत येतें तर तें नवीन कॉलेज सहज काढूं शकले असते; व त्याला युनिव्हर्सिटीकडून परवानगी मिळती तर तें कॉलेज फर्ग्युसन कॉलेजला जड झालें असतें यांतहि शंका नाहीं. कारण प्रोफेसर या नात्यानें टिळकांनीं कॉलेजांत चांगला लौकिक संपादन केला होता, व राजीनामा देऊन बाहेर पडतांना ते महाराष्ट्रांतील लोकसमाजाची सहानुभूति बरोबर घेऊनच बाहेर पडले होते. सोसायटींत शिल्लक उरलेली मंडळी ही नव्या सामाजिक मताची, रावसाहेब रावबहादुर अशांच्या कच्छपीं लागणारी, व सरकाराकडून दिवसेंदिवस अधिकाधिक मदत मिळावी अशी अपेक्षा करणारी होती, हा ग्रह केसरी–मराठा पत्रांवरून व विशेषतः आगरकरांच्या केसरीच्या राजीनाम्यावरून लोकांच्या मनावर चांगलाच बिंबलेला होता. आणि विष्णुशास्त्री खासगी शाळा काढतात म्हटल्याबरोबर जसे त्यांच्या

भोंवतीं टिळक–आगरकरादि गण जमले, तसेच टिळक नवीन शाळा किंवा कॉलेज काढते तर त्यांनाहि अशा तरतरीत माणसांची मदत मिळणें मुळींच कठीण नव्हतें. पूर्वीच्या आठ सालांत न्यू स्कूल फर्ग्युसन कॉलेज यांतून बाहेर पडलेल्या पदवीधरांची सहानुभूति प्रायः टिळकांकडेच होती. पुढें १८९८ सालीं पुण्यांत महाराष्ट्र कॉलेज निघालें त्याला टिळकांची संमति आहे असें कळतांच त्याला जर चांगला शिक्षकवर्ग लाभला तर दहा वर्षांपूर्वी, म्हणजे टिळकांच्या नांवावर सरकारचा रोष होण्यापूर्वी, त्यांना अशी मंडळी व तिजबरोबर द्रव्याची मदत निःसंशय मिळाली असती. प्रारंभीं नामांकित विद्वानांची शिक्षक म्हणून मदत नसतां, आज न्यू पूना कॉलेजला सुस्थिति कशी प्राप्त झाली आहे हें लक्षांत घेतलें असतांहि वरील अनुमान दृढच होतें.

तथापि शिक्षणसंस्थेवरून एक प्रकारें मन विटल्यासारखें होऊन टिळकांनीं पुनः ती दिशा अंगिकारली नाहीं. कोणी त्यांस जर कधीं असें विचारिलें कीं, तुम्ही तोडीस तोड म्हणून दुसरें कॉलेज कां काढलें नाहीं, तर ते त्याला दोन उत्तरें देत. एक उत्तर असें कीं, भिन्न स्वभावाची मंडळी एकत्र आली असतां हटकून त्रास होतो. दुसरें उत्तर ते "विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयं छेत्तुमसांप्रतम्" या संस्कृत वचनानें देत. कसेंहि असलें तरी यापुढें केवळ स्वतंत्र रीतीनें चालवितां येईल असाच कांहींतरी उद्योग उपजीविकेकरितां व सार्वजनिक कार्य म्हणून करावयाचा असें त्यांच्या मनानें घेतलें. पहिल्या दृष्टीनें त्यांनीं दोन उद्योग आरंभिले. एक लातूरची जिनिंग फॅक्टरी व दुसरा लॉ क्लास. पैकीं फॅक्टरीच्या बाबतींतहि अपेक्षेइतका त्यांचा स्वतंत्रपणा राहिला नाहीं, व भागिदारी म्हणजे एकप्रकारचें परावलंबन असेंच त्यांच्या अनुभवास आलें. लॉ क्लासच्या बाबतींत मात्र ते पूर्ण स्वतंत्र होते. या क्लासाची मांडणावळ मोठी किंवा गुंतागुंतीची नव्हती. एक पगारी मदतनीस घेऊन दोघांनीं दोन वर्गांत वांटून घेतलेले कायद्याचे विषय शिकवावयाचे इतक्यापुरताच त्यांचा खटाटोप होता, व सुमारें सात वर्षेपर्यंत हा क्लास अव्याहत चाललाहि.

पण सार्वजनिक म्हणून वर्तमानपत्राचें जें कार्य टिळकांनीं पत्करिलें तें या दोहोंपेक्षांहि अधिक स्वतंत्र होतें. त्या वेळचा केसरी अवघ्या दहा कालमांचा असल्यामुळें व त्यांतच पत्रव्यवहार, लिहून आलेला मजकूर, एखाद्या कारकुनानें काढून दिलेलें वर्तमानसार वगैरे मजकूर, व नव्या पुस्तकांच्या वगैरे महत्त्वाच्या जाहिराती समाविष्ट होत असल्यामुळें केसरी लिहिण्याचें काम टिळकांना एक दिवस पुरे. रविवारीं आठ दिवसांच्या वर्तमानपत्रांचा भारा घरीं येऊन पडला म्हणजे ते गरुडपक्षाच्या नजरेनें त्यांतील उपयुक्त मुद्दे तेवढे तेव्हांच निवडून काढीत व काय चार कॉलम मजकूर लिहावयाचा असेल तो हाताशीं लेखक घेऊन एकदम लिहून टाकीत. प्रुफें

वाचण्याचें कामहि रात्रीं अपरात्रीं उरकून जाई. अशा रीतीनें आठवड्यांतून कमींतकमी पांच दिवस त्यांना आपल्या इतर व्यवसायाला मोकळे मिळत. कधीं गांवीं जावयाचें असल्यास एखाद्या स्नेह्यावर किंवा वेळीं कारकुनावरहि केसरी सोंपवून जात. मग टेबलांत पडलेलें एखादें कोणाचें शिलकी आर्टिकल तो घाली, किंवा ठराविक स्नेह्यांपैकीं एखाद्याच्या खणपटीस बसून तें त्याजकडून लिहून घेववी. त्या काळीं बदली संपादकाचें काम बरेंच सोपें असे. आधीं वादग्रस्त काय तो एकच म्हणजे सामाजिक विषय. त्यावरहि कांहीं विशेष वाद चालू नसल्यास केसरींत सहसा लेख येत नसत, व तेवढा विषय वगळला म्हणजे राजकीय बाबतींत लिहिण्याला सगळें रान मोकळें. राजद्रोहाचें कलम तेव्हां बहुधा योगनिद्रेंत पडलेलें होतें. व आज काल राजकीय चळवळींतील मतभेद सुईच्या अग्रासारखे तीक्ष्ण झालेले आहेत ते तेव्हां तसे झालेले नसल्यामुळें कोणीहि कांहीं विषयावर लिहिलें तरी चाले. वाचकवर्गाची दृष्टी स्तिमित असल्यामुळें संपादकालाहि आपल्या अग्रलेखाची विशेष खाराखुशी करण्याचें कारण नव्हतें. हेमंतव्याख्यान मालेचे रिपोर्ट, स्पेन्सरमतप्रकाशन, विलायतचा किंवा उत्तरहिंदुस्थानचा प्रवास, तंव्या भिल्ल किंवा शहाजहान बेगम यांचें चरित्र, असल्या अवांतर लेखांनीं केसरीच्या दहा कॉलमांतील निम्मी अधिक जागा अडविली गेली तरी कोणास त्याचा विषाद वाटत नसे. तसेंच आजचा अग्रलेख आणि उद्यांचा अग्रलेख यांच्या भाषेंत महदंतर दिसून आलें तरी हल्लींप्रमाणें वाचकांत चिकित्साबुद्धी जागृत होत नसे. त्या वेळचा केसरी चालविणें हें टिळकांखेरीज इतरानांहि थोड्या मेहनतीचें काम असे, व एकाच वर्षांत आळीपाळीनें केसरीचे अनेक संपादक होऊं शकत. तात्पर्य, टिळकांना तर हें काम थोड्या वेळांत होण्यासारखें असून पूर्ण स्वतंत्रपणानेंहि करितां येण्यासारखें होतें. यामुळें तेंच त्यांनीं उचललें व तें प्रथम प्रथम तरी निवळ सार्वजनिक कार्य असेंच होतें. कारण टिळक जरी केसरीचे मालक असले तरी आधीं त्यांत प्राप्ती फार होत नसे व होत असे तीहि कर्जफेडीकडे जाई. पण टिळकांनीं आरंभिलेल्या लोकसेवेला तें अवश्यक होतें. केसरींतून त्यांना नवीन विचार वाचकांपुढें ठेवितां येत, व आठवड्यांत जो सार्वजनिक उद्योग ते करीत त्याचा बौद्धिक आढावा त्यांना केसरीच्या आर्टिकलांत देतां येत असे. टिळक नेहमीं म्हणत कीं, मी केसरी आठवड्यांतून एक दिवस लिहितों खरा, पण त्या एका दिवशीं काय लिहावयाचें याचे विचार माझ्या डोक्यांत आठवडाभर घोळत असतात. अनेक उद्योग एकदम चालविण्याची पात्रता जरी त्यांच्या अंगीं असे, तरी त्यांचें बहुधा सगळें चित्त व्यग्र करून टाकणारा असा कांहीं तरी एखादा विशिष्ट उद्योग कोणत्याहि वेळीं त्यांच्या हातीं असे. यामुळें त्या वेळचा केसरी पाहिला असतां तो टिळकांनीं लिहिल्याची खूण म्हणजे एखादें चटकदार आर्टिकल किंवा एकाच विषयावर लिहिलेलीं दोन तीन चरचरीत स्फुटें येवढाच

भाग त्यांत वाचनीय असावयाचा. लेख लिहिणें हें काम त्यांना न आवडणारें असें तें प्रायः म्हणत. पण कोणत्याहि विषयावर त्यांचे विचार मनांत इतकी खळबळ करून सोडीत कीं, त्यांवर लेख लिहिणें हें श्रमाला कारणीभूत न होतां त्यापासून त्यांना उलट विरामच वाटत असे.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी मनानें सोडल्यानंतर त्यांनीं पहिली चळवळ हातीं घेतली ती क्रॉफर्डप्रकरणाची होय व तिच्या संबंधाची सविस्तर हकीकत पूर्वीच्या एका प्रकरणांत दिलीच आहे. पण ही चळवळ पुष्कळशी स्थानिक स्वरूपाची होती. तिचे उद्गार पार्लमेंटमध्यें निघाले व मामलेदारांना माफी देण्याविषयींचें बिल वरिष्ठ कायदेकौन्सिलांत आणावें लागलें तरी खरा प्रश्न मुंबई इलाख्यांतील मध्यभागाच्या रेव्हेन्यु कमिशनरच्या कारभारासंबंधाचा होता; व त्यांत बहुतेक महाराष्ट्रीयच गोवले गेले होते. पण या पहिल्याच चळवळींत टिळकांनीं जी चिकाटी व तडफ दाखविली तिचा परिणाम मुंबई इलाख्यांतच काय पण इतर प्रांतांतील लोकांवरहि थोडासा झाला. व या चळवळीपासून प्रत्यक्ष राजकारणाच्या क्षेत्रांत त्यांचा जो प्रवेश झाला तो कायमचाच झाला. शाळा सोडीपर्यंत इतर उद्योगांत पडावयाचें नाहीं हें तत्व टिळकांनीं गोखल्यांना अडविण्यापुरतेंच पहिल्यानें पुढें आणिलें असें नव्हे तर तें स्वतः त्यांनींहि आचरिलें होतें. याचें ढळढळीत प्रत्यंतर हेंच कीं, १८८८ पर्यंत राष्ट्रीय सभेच्या चार बैठकी झाल्या असतां टिळक एकाहि बैठकीस हजर राहिले नव्हते. तथापि शाळेंतून टिळक मोकळे झाल्यावर स्वाभाविकपणेंच राष्ट्रीयसभेच्या चळवळींत पडावें असें त्यांना वाटलें. ता. १७ मार्च १८८९ रोजीं पुण्यास जाहीरसभा भरून तींत राष्ट्रीयसभेच्या त्या वर्षाच्या बैठकीचा विचार झाला. त्या सालची सभा मुंबई इलाख्यांत भरावी येवढें निश्चित झालें होतें; पण मुंबईस भरावी कीं पुण्यास भरावी हें तोंपर्यंत ठरलें नव्हतें. म्हणून शक्य तर सभा पुण्यास भरवावी असें पुणेकरांना वाटत होतें. पुण्याचा हक्क दोन प्रकारांनीं होता. एक असा कीं, १८८५ सालची सभा प्रथम पुण्यासच भरवावी असें ठरलें होतें, पण पुण्यास आयत्या वेळीं कॉलऱ्याचा उपद्रव झाल्यामुळें तो बेत रहित करावा लागला. दुसरा हक्क असा कीं, पुणें ही मुंबई इलाख्याची दुसरी राजधानी असल्यामुळें मुंबईस एक सभा झाल्यावर दुसरी सभा तरी पुण्यास होणें न्याय्य ठरतें. असो; पण हा हक्क बजावणें म्हणजे एक प्रकारें मुंबईकरांशीं वाद घालणेंच होतें म्हणून, त्या कामावर कुशल वकीलांचीच नेमणूक व्हावयास पाहिजे होती म्हणून, या सभेंत टिळक व नामजोशी यांच्याकडे तें काम सोंपविण्यांत आलें. मुंबईकरांशीं वैर बांधावयाचें नाहीं अगर त्यांस नाखूष करावयाचें नाहीं पण शक्य तर सभा पुण्यास आणावयाची असा पुणेकरांचा निश्चय होता. पुण्यावर दारिद्र्याचा आक्षेप कायमचा, व तुम्ही सभा भरवितों म्हणतां पण पैसा कोठून आणणार असा आक्षेप मुंबईस

जाणाऱ्या पुणेकर वकीलांच्या तोंडावर हटकून टाकण्यांत येईल, म्हणून सभेंत अडीच हजार रुपयांचे आंकडे घालण्यांत आले. त्याप्रमाणें टिळक व नामजोशी मुंबईस गेले. पण सभा मुंबईस भरविण्याचा आग्रह मुंबईकरांनीं सोडला नाहीं. तथापि मुंबईकरांस जसें नाखूष करावयाचें नाहीं तसेंच पुण्याला सभा न मिळाली तरी आपणहि नाखूष व्हावयाचें नाहीं असाहि पुणेकरांचा निश्चय होता. म्हणून या वकिलांनीं मुंबईच्या मदतीकरितां महाराष्ट्रांत वर्गणी गोळा करण्याचेंच काम उलट अंगावर घेतलें. त्या सालच्या जुलै महिन्यांत नूलकरांच्या अध्यक्षतेखालीं एक वर्गणी कमेटी नेमण्यांत येऊन वर्गणी जुळविण्यास सुरुवात झाली, व टिळक-नामजोशी यांनीं महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांत मिळून सुमारें दहा हजार रुपये वर्गणी गोळा केली.

डिसेंबरमध्यें सर वुइल्यम वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईस जंगी राष्ट्रीय सभा भरली. सुमारें चार हजार लोकांचा मांडव घालण्यांत आला होता. कर्मधर्मसंयोगानें १८८९ सालीं भरलेल्या या सभेस १८८९ प्रतिनिधि होते. राष्ट्रीय सभेच्या आठवड्यांत केसरी तात्पुरता मुंबईस नेऊन त्याची दैनिक आवृत्ति काढण्यांत आली. या कामगिरीवर वासुदेवराव केळकर व रामभाऊ साने यांची योजना करण्यांत आली व तें काम त्यांनीं रात्रीचा दिवस करून उत्कृष्ट पार पाडलें. या सभेंत चार्लस ब्रॅडलॉ हे हजर असून त्यांना मानपत्र देण्यांत आलें, व त्यांच्या समोर पार्लमेंटसभेंत बिल आणून कशा प्रकारचीं कायदेकौन्सिलें हिंदुस्थानाकरितां मागावीं याविषयीं ठराव झाला. पण हा ठराव वादग्रस्त ठरला व कलमवारीनें चर्चा सुरू असतां टिळकांनीं एक उपसूचना आणिली होती. ही सूचना अशी होती कीं, हिंदुस्थानसरकारच्या कायदेकौन्सिलचे सभासद निवडावयाचें काम प्रत्यक्ष मतदारांमार्फत न होतां अप्रत्यक्ष रीतीनें म्हणजे प्रांतिक कायदेकौन्सिलांच्या द्वारें व्हावें. या उपसूचनेस प्रो. गोखले यांनीं अनुमोदन दिलें. परंतु ती बहुमतानें नामंजूर झाली. टिळक व गोखले यांनीं राष्ट्रीयसभेंत एकमतानें केलेलें हें काम जसें पहिलें तसेंच तें शेवटचें असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं. यानंतर सर्वत्र त्यांचा मतभेद दिसून येतो. प्रत्यक्ष मतदारांच्या मतांनीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांतील सभासद निवडण्याची प्रातिनिधिक स्वराज्याची पायरी हल्लीं येऊन पोचली आहे खरी, तथापि लोकनियुक्त सभासदांचा प्रवेश वरिष्ठ कायदेकौन्सिलांत झाल्यापासून म्हणजे १८९२ पासून १९१९ पर्यंत टिळक व गोखले यांनीं मिळून सुचविल्याप्रमाणें प्रांतिक कौन्सिलच्या सभासदांनीं वरिष्ठ कौन्सिलचे सभासद निवडून देण्याचीच पद्धति अमलांत होती हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

या सुमारास प्रांतिक परिषदाहि मुंबई इलाख्यांत भरूं लागल्या होत्या. पहिल्या परिषदेस टिळक हजर नव्हते. दुसरी परिषद पुणें येथें रावबहादुर गोपाळराव हरी देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं भरली, तींत क्राफर्डप्रकरणीं सभे-

पुढें आलेल्या ठरावास दुजोरा देण्याचें काम टिळकांकडे होतें. ठरावांत असें म्हटलें होतें कीं, " क्राफर्ड–प्रकरणांतील मुंबईसरकारच्या वर्तनाबद्दल या इला-ख्यांतील सारी प्रजा त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानिते, आणखी या सभेचें असेंहि मत आहे कीं अगदीं पापाचें व घाणीचें मूळ काढून टाकून सारें कामदार-मंडळ शुद्ध करून टाकण्यांत व फार दिवसांची घाण नाहींशी करण्यांत मुंबई-सरकारनें आपलें कर्तव्य बजाविलें. " या ठरावावरील चर्चेत मतभेद झाला होता व त्यावर मोठा कडाक्याचा वाद होऊन अखेर टिळकांच्या सूचनेप्रमाणेंच वरील अर्थाचा ठराव मंजूर झाला. क्राफर्डसंबंधानें गुळमुळीत निषेध करून, त्यांतच टाकतां आला तर मामलेदारांवर दोष अधिक टाकण्याचा प्रयत्न ॲंग्लो इंडियन पत्रें करीत असत, पण अधिक दोष क्राफर्डचाच होता व त्याला पायबंद लावणें हेंच कठीण पण अवश्य असें या वेळचें कर्तव्य होतें, तें सरकारनें केलें म्हणूनच त्यांचें धैर्य वाखाणावयाचें, हाच वरील ठरावाचा मुख्य अर्थ आहे.

१८९० सालची तिसरी प्रांतिक सभा फिरून पुण्यास १८९० च्या मे महिन्यांत नामदार काजी शहाबुद्दीन यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. टिळ-कांनीं सरकारी अबकारी खात्याच्या धोरणाच्या निषेधाचा ठराव या सभेपुढें मांडला. या ठरावांत 'लोकल ऑप्शनचा' हक्क मागण्यांत आला होता. या ठरावा-वरील भाषणांत त्यांनीं केनसाहेबांशीं झालेल्या पत्रव्यवहाराचा उल्लेख करून, देशी व दोन्ही प्रकारच्या विलायती दारूचा खप वाढला हें सिद्ध करून, तो वाढला नाहीं असें जें सरकारचें म्हणणें होतें तें खोडून काढलें. मद्यपान–निषेधक मंडळ्या इकडे निघतात हें ठीक आहे, पण निघाव्या लागणें हेंच मुळीं गैर आहे, कारण पूर्वी मराठी राज्यांत दारूचा खप इतका नसे, वगैरे माहिती सांगून म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें, ग्रामपंचायती किंवा स्थानिक मतदार संघ यांच्या मताप्रमाणेंच गांवांत अगर बाहेर दारूचीं दुकानें घालणें अगर न घालणें याविषयीं हक्क लोकांस मिळावा असें टिळकांनीं आग्रहाचें मागणें केलें. दुर्दैवानें ' लोकल ऑप्शन ' गेल्या तीसबत्तीस वर्षांच्या चळवळीनेंहि अद्याप मिळालें नाहीं. या परिषदेंत पुढील सालच्या परिषदेच्या व्यवस्थेकरितां नामजोशांबरोबर टिळक व गोखले यांना जोड सेक्रेटरी नेमण्यांत आलें.

पुढील सालची प्रांतिक परिषद पुण्यास मे महिन्यांत इस्लामपूरचे सुप्रसिद्ध वकील गोविंदराव लिमये यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. तींत कंठाळी ठरावां-शिवाय दुसरा एक महत्त्वाचा ठराव, म्हणजे संमतिबिलासंबंधाचा, टिळकांनीं मांडला. त्यांत संमतिबिलासंबंधानें प्रसिद्ध झालेल्या लोकमताचा योग्य विचार न केल्याबद्दल हिंदुस्थानसरकारचा निषेध केला होता. त्यावरील भाषणांत, टिळकांनीं 'लोकमत' या शब्दाचा अर्थ सांगतांना बहुजनमत तें लोकमत किंवा सुशिक्षित लोकांचें मत तें लोकमत यांपैकीं कोणताहि अर्थ घेतला तरी, लोकमत हें संमति-

वयाच्या बिलाच्याविरुद्ध होतें असें प्रतिपादिलें. बहुजनसमाजाच्या मताच्या दृष्टीनें वरील विधान सर्वस्वीं निर्विवादच होतें. सुशिक्षित लोकांच्या मतासंबंधानें मात्र वाद होता व जसे कित्येक नामांकित सुशिक्षित लोक या बिलाला अनुकूल होते तसेच कित्येक नामांकित लोक प्रतिकूलहि होते ही गोष्ट मात्र कांहीं खोटी नव्हती. याहि परिषदेंत पुढील सालाकरितां टिळकांना व त्यांचे जोडीस राममाऊ साने यांना जोड सेक्रेटरी नेमण्यांत आलें. पूर्वीचे सेक्रेटरी या नात्यानें टिळक व गोखले या दोघांनींहि आपापले राजिनामे परिषदेस रीतीप्रमाणें सादर केले. ते पुढील सालाकरितांहि नेमण्यांत आलेच असते; तथापि गोखले हे नाकबूल असल्यानें त्यांचा राजिनामा मंजूर झाला व टिळक यांची नेमणूक कायम झाली.

पांचवी प्रांतिक परिषद फिरून पुण्यासच झाली. ही सभा पूर्वीच्या सर्व सभांहून मोठी दणदणीत झाली. अध्यक्षस्थानीं ना. फेरोजशहा मेथा यांची नेमणूक झाली होती. वास्तविक पुण्यांत भरलेल्या सभेला मुंबईचे हे उमराव सहसा कशानें लाभणार ? पण राष्ट्रीय सभेच्या कारभाराचें केंद्र मुंबईस असतांहि, ओळीनें तीन चार सभा पुण्यास भरून त्या यशस्वी झालेल्या पाहिल्यावर पांचव्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारणें फेरोजशहांस कमीपणाचें वाटण्यासारखें नव्हतें. या परिषदेचा विशेष हा कीं, महाराष्ट्राबाहेरील उपप्रांतांतील लोक परिषदेस पहिल्यांदा हजर राहिले. फेरोजशहा मेथा अध्यक्ष होणार तेव्हां वाच्छा, सेटलवाड वगैरे येणार. अर्थात् गुजराथी मंडळीहि येणार; पण त्याहून महत्त्वाचें कारण हें कीं, कायदेकौन्सिलें सुधारण्याचा आक्ट पार्लमेंटांत नुकताच पास झाला असून त्याच्या अंमलबजावणीचे नियम करण्याचा महत्त्वाचा प्रश्न यावेळीं लोकांपुढें होता. स्वतः प्रांतिक सभेबद्दलहि नियम होणें जरूर वाटूं लागलें होतें. सभा ता. ७–८ नवंबर रोजीं हिराबागेंत भरली होती. शहरांतील प्रमुख मंडळी तर हजर होतीच; पण पर ठिकाणचे लोक लक्षांत घेतां "एवढा मोठा संभावित व वजनदार लोकसमाज पुण्यांत क्वचितच पाहण्यांत आला असेल" असें या सभेचें जें वर्णन केसरीनें दिलें, त्यांत बहुधा अतिशयोक्ति नसावी.

स्वागताध्यक्ष रावबहादुर विष्णु मोरेश्वर भिडे पेन्शनर हे होते. फेरोजशहा मेथा यांचें या प्रसंगींचें भाषण फारच चांगलें झालें म्हणतात. त्यांत राजकीय विषयांचें तर उत्कृष्ट विवेचन होतेंच; पण पुण्यांत यापूर्वी वर्ष दीड वर्ष माजलेल्या सामाजिक मतभेदाचा संबंध राजकीय मतभेदांशीं आल्याशिवाय रहात नाहीं हें लक्षांत घेऊन उभय पक्षांची एकवाक्यता करण्याच्या हेतूनें मेथा यांनीं खालील मार्मिक उद्गार काढिले ते लक्षांत ठेवण्यासारखे आहेतः–लीवानरप्रभृति इंग्रज म्हणतात कीं, लोकापवादास भिऊन सामाजिक व नैतिक सुधारणेखेरीज राजकीय सुधारणा करूं पाहणारा गृहस्थ हिंदुस्थानचा खरा मित्र नाहीं. हें तत्व तात्विकदृष्ट्या अगदी खरें आहे व याच मुद्यावर माझे मित्र चंदावरकर यांनीं नुकतेंच

डेक्कन कॉलेजांत एक सुंदर व्याख्यान दिलें होतें. परंतु हें तत्व अमलांत आणितांना त्यास बरेच अपवाद आहेत ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. एकदां मनुष्याचें मन जागृत झालें म्हणजे सर्वच बाबतींत त्याची चळवळ सारखी सुरू राहते. परंतु तेवढ्यानेंच राजकीय व सामाजिक बाबतींत त्याचें पाऊल एकदम एकसारखें आणि एकाच वेळेस पुढें पडलें पाहिजे असें म्हणतां येणार नाहीं. कित्येकदां नवे विचार व नव्या कल्पना एकदम स्वीकारण्याबद्दल मनाची प्रवृत्ति न होतां तें उलट खातें, व जुन्या गोष्टी पुनः स्थापन करण्याकडे लक्ष जातें. दोन भिन्न भिन्न सुधारणा एकमेकांच्या अभिमुख आल्या म्हणजे असाच प्रकार व्हावयाचा व यांतून निभावून जे बाहेर पडतील त्यांचेच हातून परकीय सुधारणेंतील चांगल्या गोष्टींचा आपल्यामध्यें संग्रह होईल. माझे मित्र टिळक यांनीं परवां औद्योगिक परिषदेपुढें जातीच्या बंधनांचा अंमल सरकारमार्फत व्हावा अशाबद्दल जो एक उत्तम निबंध वाचला त्याबद्दलहि कांहीं लोक त्यांस नांवें ठेवीत आहेत. माझ्या मतें कोणच्याहि गोष्टीचा पुरा तपास केल्याशिवाय अंगिकार करावयाचा नाहीं अशा अति चोकस बुद्धीचा हा परिणाम आहे. माझी अशी खात्री आहे कीं या स्थितींतून ते बाहेर पडले म्हणजे त्यांस नांवें ठेवणाऱ्या लोकांपेक्षां तेच अधिक खरे व कळकळीचे सुधारक आहेत असें लोकांचे नजरेस येईल."

या परिषदेंत पहिला ठराव नवीं कायदेकौन्सिलें कोणत्या नमुन्याचीं असावीं याविषयीं होता. तो मांडण्याचें काम टिळकांकडे होतें व त्यांत तूर्त म्युनिसिपालिट्यासारख्या संस्थांना मतदारसंघ नेमावें अशी सूचना केली होती. परिषदेच्या शेवटीं पुढील अधिवेशनाविषयीं ठराव झाला त्यांत पुढील सभा मुंबईत अगर गुजराथ प्रांतांत कोठें भरावी तें ठरलें व अध्यक्ष मेहेता यांच्या सूचनेवरून वाच्छा व सेटलवाड या नव्या सेक्रेटरींच्या जोडीला टिळक यांस नेमावें असें ठरलें. पुढील म्हणजे सहावी प्रांतिक परिषद अहमदाबाद येथें ता. १–३ नोव्हेंबर रोजीं मुंबईचे सॉलिसिटर राहेमतुल्ला महमद सयानी यांचे अध्यक्षतेखालीं भरली. या सभेंत टिळकांनीं देवगड, पेण, पनवेल वगैरे तालुक्यांतील रिव्हिजन सेटलमेंटच्या तक्रारींसंबंधींचा ठराव मांडला. फिरून या सभेंत पुढील सालाकरिता वाच्छा, सेटलवाड, धरमसी या तिघांबरोबर टिळकांस प्रांतिक परिषदेचे चिटणीस नेमण्यांत आलें. तसेंच न्याय व अंमलबजावणी या खात्यांच्या विभागणीसंबंधीं विधायक योजना तयार करण्याबद्दल फेरोजशहा मेहता यांच्या अध्यक्षतेखालीं जी एक कमेटी नेमण्यांत आली तींत टिळकांना निवडण्यांत आलें होतें. यापुढील प्रांतिक सभा १८९४ सालीं मुंबईस भरली; तिला कांहीं कारणानें टिळकांस हजर राहतां आलें नाहीं. पुढील सालीं खुद्द पुण्यासच अकराव्या राष्ट्रीय सभेचें अधिवेशन झालें. तिच्या चिटणीसमंडळांत टिळक हे समाविष्ट होते, परंतु पुढें वाद उपस्थित होऊन त्यांनीं चिटणीशी सोडली. या गोष्टीचें सविस्तर

वर्णन एका स्वतंत्र प्रकरणांत आम्हीं देणार असल्यामुळें त्याचा विशेष उल्लेख येथें करीत नाहीं. शिवाय पुढील सालीं टिळक हे मुंबई कायदेकौन्सिलचे सभासद व युनिव्हर्सिटीचे फेलो वगैरे होऊन त्यांच्या मान्यतेची व कामगिरीची वावडी वरच्या वाऱ्याला लागली, यामुळें यापुढें प्रांतिक परिषदेशीं असलेला त्यांचा संबंध गौण या सदरांत पडतो म्हणून त्याचा उल्लेख येथेंच संपवितों. यापुढेंहि टिळक प्रायः प्रांतिक परिषदेस हजर रहात व अर्थातच एखादुसरा महत्त्वाचा ठराव पुढें आणीत. कराची ( १८९६ ) व सोलापूर ( १९०२ ) येथील परिषदांस ते हजर राहूं शकले नाहींत. उलट साताऱ्यास सन १९०० सालीं भरलेल्या परिषदेंत टिळक हजर राहिल्यामुळें पुणें-मुंबईकर मंडळींचा निकराचा सामना झाला त्याची हकीकत त्या वेळच्या वृत्तांतांत यथाक्रम येईलच.

१८९० सालीं टिळकांच्या इतर चळवळींसंबंधानें मुख्यतः एकच गोष्ट नजरेस येते. ती लष्करी शिक्षणासंबंधाची. या सालच्या मार्च महिन्यांत ड्यूक ऑफ कॅनाट पेन्शन घेऊन विलायतेस परत जाण्याच्या विचारांत होते. ड्यूक ऑफ कॅनाट म्हणजे अर्थात व्हिक्टोरिया महाराणीचे चिरंजीव. यांनीं लष्करी खात्यांत नोकरी धरलेली असून पेन्शनीच्या वेळीं ते मुंबई इलाख्याचे सेनापति होते. पुण्यास त्यांचा वर्षांतून बरेंच दिवस मुक्काम पडे. हल्लीं कौन्सिलहॉलच्या अलीकडच्या रस्त्यावर कॅनॉट हॉटेल म्हणून जी मोठी खाणावळ आहे त्याच इमारतींत ते पुण्यास असतांना रहांत असत. हा बंगला पुण्याचे एक धनिक नागरिक व म्युनिसिपालटीचे सभासद हरी रावजी चिपळूणकर गोसावी यांनीं मुद्दाम ड्यूकसाहेबांकरितां बांधला. आपल्या मुलाची राहण्याची उत्कृष्ट सोय करून दिल्याबद्दल खुद्द व्हिक्टोरिया महाराणीचें स्वदस्तुरचें आभारप्रदर्शक पत्र त्यांस आलें होतें असें सांगतात. ड्यूकसाहेब हे अधिकारानें व खानदानीनें इतके बडे असतांहि ते सुस्वभावी असल्यामुळें लोकांशीं सौजन्यानें वागत असें म्हणतात. त्यांतूनहि हिंदी लोकांची लष्करी महत्त्वाकांक्षा पूर्ण व्हावी व त्यांना लष्करांत मोठ्या हुद्याच्या जागा मिळाव्या अशाविषयीं त्यांनीं सहानुभूति दर्शविलेली असून विलायतेंत यासंबंधानें खटपट करण्याचें आश्वासनहि दिलें होतें. याकरितां ते विलायतेस परत गेल्यावर इकडे त्यांचें स्मारक करावयाचें तें वरील परिस्थितीस अनुसरून करावें, अर्थात त्याला एखाद्या लष्करी शिक्षणाच्या शाळेचें स्वरूप द्यावें, म्हणजे एक पंथ व दो काज असें दुहेरी साधावें अशी कल्पना निघाली. यासंबंधानें पुण्यास ता. ९ मार्च रोजीं एक सभा भरून तींत वरील कल्पना नक्की ठरली व ड्यूकसाहेबापुढें ती कल्पना मांडण्यासाठीं डेप्युटेशन पाठविण्याचें ठरलें. डेप्युटेशनमध्यें दक्षिणमहाराष्ट्रांतील अनेक संस्थानिक, पुण्यांतील कित्येक मोठे सरदार, व कांहीं थोडे खाजगी गृहस्थहि समाविष्ट करण्यांत आले होते. या डेप्युटेशनच्या चिटणिसांचे जागांवर

टिळक व नामजोशी यांची नेमणूक झाली होती. संकेताप्रमाणें ड्यूकसाहेबांच्या परवानगीनें डेप्युटेशनपैकीं कांहीं मंडळी मुंबईस जाऊन त्यांनीं साहेबांची गांठ घेतली व तुम्ही योजिलेल्या लष्करी शाळेस माझें नांव देण्यास हरकत नाहीं असें साहेबांनीं सांगितलें. परंतु अखेर अशी शाळा निघाली नाहीं व या विशिष्ट प्रकारचें स्मारकहि झालें नाहीं. पुण्याच्या सभेंत गंगाराम भाऊ म्हसके व काजी शहाबुद्दीन यांनीं सदर स्मारकाची मूळ कल्पना व्यवहार्य नाहीं असें बोलून दाखविलें होतें. पण उलट रावबहादुर रानडे यांनी असें मत प्रदर्शित केलें होतें कीं, खानदानीच्या लोकांना कांहीं थोड्या तरी जागा द्याव्या असें सरकारनेंच पूर्वीपासून ठरविलेलें आहे, व सामान्य शिपायाचा संतोष राखणें जरूर तसाच जुन्या सरदारघराण्यांतील लोकांचा संतोष राखणें हेंहि जरूर आहे. अडचण काय ती लष्करी शाळेचीच होती, व स्मारकाच्या रूपानें तीहि काढावी इतकाच हा प्रयत्न होता. परंतु पुढें सरकाराकडून संस्थानिकांना गुप्त सल्ला मिळावयाचा तो मिळाल्यामुळें ज्यांच्याकारितां शाळा त्यांनींच पाय मागें घेतला व सर्वच योजना जेथल्या तेथें थबकली.

सन १८९१ ते १८९३ या तीन सालांत मिळून टिळकांनीं ग्रंथकार या नात्यानें एक मोठी कामगिरी केली. ही कामगिरी म्हणजे त्यांनीं ओरायन, अथवा 'वेदकालनिर्णय' या विषयावरील निबंध पुस्तकरूपानें लिहिला. १८९१ सालच्या मे महिन्यांत पुण्यास डेक्कन कॉलेजांत व ता. १५ मे रोजीं हिराबागेंत सदर विषयावर त्यांचीं व्याख्यानें झालीं. डेक्कन कॉलेजच्या व्याख्यानास रा. ब. मानकर हे अध्यक्ष होते. १८९३ सालीं हें पुस्तक छापून प्रसिद्ध झालें, परंतु त्यांच्या इतर पुस्तकांबरोबर याहि पुस्तकासंबंधाची विस्तृत माहिती पुढें एका वेगळ्या प्रकरणांत आम्हीं देणार असल्यामुळें त्याचा याहून अधिक उल्लेख येथें करीत नाहीं.

१८९४ सालीं टिळकांनीं पार्लमेंटसभेस उद्देशून एक अर्ज तयार केला. त्याचा विषय समकालीन सिव्हिल सर्व्हिस परीक्षा हा असून त्यांत या परीक्षा घेणें हें हिंदी लोकांच्या दृष्टीनें कसें अवश्य आहे याचें मुद्देसूद विवेचन केलें होतें. क्राफर्डप्रकरणीं पार्लमेंटला अर्ज करण्याचा त्यांचा पहिला प्रयत्न १८८९ त झाला व या कामीं धुइल्यम डिग्बीसाहेबांशीं त्यांचा परिचय जडला तो पुढें अनेक वर्षे कारणाकारणानें चालू होता. पुढें केन, ब्रॅडलॉ, ह्यूम, वेडरबर्न वगैरे लोकांच्या ओळखी झाल्यानें हा पत्रव्यवहार आणखी सुरू झाला. आदलें वर्षी हर्बर्ट पॉल यांचा समकालीन परीक्षा घेण्याविषयींचा ठराव नुकून पास झाला होता व याबद्दल अभिनंदनार्थ मुंबईस व इतर अनेक ठिकाणीं टोलेजंग सभाहि भरल्या होत्या. परंतु पार्लमेंटनें ठराव केला तरी त्याची अंमलबजावणी करणार हिंदुस्थानसरकार ! व त्यांनीं अनेक कारणें दाखवून ही अंमलबजावणी फेटाळून लाविली. टिळक

यांचा सदरचा अर्ज हिंदुस्थानांतील बड्या नोकरशाहीच्या या कृत्याच्या निषेधाकरितां केलेला होता.

पुढील सालीं (१८९५) लो. टिळकांचा पुणें शहर म्युनिसिपालिटींत व त्यावरोबरच मुंबई कायदेकौन्सिलांत प्रवेश झाला. त्यांचे मित्र माधवराव नामजोशी हे १८८१ पासूनच म्युनिसिपालिटीच्या कामांत लक्ष घालूं लागले होते, व त्या संस्थेंतील कामकाज किंवा वाद या कामीं त्यांना टिळकांची मदत असे. स्वतः टिळकहि म्युनिसिपालिटीच्या पहिल्याच निवडणुकीस उमेदवार उभे राहते तर ते निवडूनहि आले असते यांत संशय नाहीं. परंतु त्यांनीं व नामजोशी यांनीं सार्वजनिक कार्यक्षेत्रें एक प्रकारें आपापसांत वांटून घेतलीं होतीं. स्थानिक स्वराज्य व औद्योगिक चळवळ हा प्रांत नामजोशांच्या वांटणीस आला होता; व प्रत्यक्ष राजकीय आणि धार्मिक व सामाजिक चळवळ हा प्रांत टिळकांचा म्हणून ठरून गेला होता. म्युनिसिपालिटीच्या म्यानेजिंग कमेटींत बसून शेंकडों चिल्लर कागदपत्रांचा निकाल करणें याविषयीं टिळकांना एक प्रकारची अप्रीति वाटत असे. उलट अशा कामाची नामजोशांना तितकीच आवड असे. पण या गोष्टीमुळें पुण्यांतील व्यापारी वगैरे लोकांच्या अंतरंगांत नामजोशांनीं आपला प्रवेश करून घेतला होता. शहरच्या हद्दींत येऊन बाहेर जाणाऱ्या मालावरील जकात परत देवविण्याची त्यांची चळवळ प्रथमच यशस्वी झाल्यामुळें नामजोशी हे व्यापारीवर्गाचे वाली म्हणून ठरून गेले होते. कमेटीचे अध्यक्ष सरदार दोराबजी पदमजी यांच्या मनावर नामजोशांच्या बुद्धिमत्तेचा व कामकाज करण्याच्या पद्धतीचा चांगलाच पगडा बसला होता, व म्युनिसिपालिटीच्या कोणत्याहि महत्त्वाच्या कामकाजांत ते नामजोशांचा सल्ला घेत. लॉर्ड रे यांच्या कारकीर्दीत सन १८८८ सालीं नामजोशांनीं पुण्यास औद्योगिक प्रदर्शन भरविलें त्या कामीं शहर म्युनिसिपालिटीनेंहि बराच भाग घेतला होता; व प्रदर्शन उलगडल्यावर त्यांतील अवशिष्ट वस्तु देणगी म्हणून किंवा विकत घेऊन व त्याला रे इंडस्ट्रियल म्युझियम–लॉर्ड रे यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ केलेला औद्योगिक वस्तुसंग्रह–असें नांव देऊन, प्रदर्शन कमेटीनें तो शहर म्युनिसिपालिटीचे स्वाधीन केला व अजूनहि तो कमेटीच्याच ताब्यांत आहे. या प्रदर्शनाच्या कामीं नामजोशांना टिळकांची पुष्कळ मदत झाली होती. पुणें म्युनिसिपालिटीची धंदेशिक्षणाची शाळा स्थापण्यांतहि नामजोशांनींच पुष्कळसा भाग घेतलेला होता. या सर्व गोष्टींत टिळक असून नव्हते, याचा अर्थ या गोष्टींत स्वतःच्या नांवानें ते कोणतेंहि काम करीत नसत. परंतु नामजोशांना सल्लामसलत देणें, सूचना करणें, त्यांच्या निवडणुकीच्या प्रसंगीं अंगमेहनतीनें झटणें वगैरे मदत टिळकांकडून नामजोशांना होई. नामजोशांची संध्याकाळची बैठक बहुधा कोठें तरी व्यापारी पेठेंत असावयाची, व नामजोशांबरोबरच टिळकांचा व वेताळ पेठेंतील शेट हुकूमचंद ईश्वरदास वगैरे व्यापा-

त्यांचा स्नेहसंबंध १८८१–८२ पासून जडला तो अखेरपर्यंत तसाच टिकला. हुकुमचंदांचें (यांना हाखाभाई म्हणत) दुकान हें टिळक–नामजोशांचें दुसरें घरच होतें. उभयतांनीं एकमेकांची अड–अडचण अखेरपर्यंत सोसली. नामजोशी १८९६ सालीं वारले. यापूर्वीच्या निवडणुकीपर्यंत ते सतत १२–१३ वर्षें म्युनिसिपालिटींत निवडून येत. ते नेहमीं कोठल्या तरी वार्डांतून निवडले जात. वाटेल त्या वार्डाला नामजोशांनीं उभें रहावें व निवडून यावें असा एक प्रकारचा अधिकार नामजोशांच्या लोकप्रियतेमुळें त्यांना मिळाला होता. शेवटच्या निवडणुकींत मात्र ते फसले. १८९५ सालीं टिळक प्रथमच निवडणुकीस उभे राहिले ते जनरल वार्डांत, म्हणजे सुशिक्षित मतदारांनीं करण्याच्या निवडणुकीकरितां. याच सालीं कै. विनायक रामचंद्र ऊर्फ अण्णासाहेब पटवर्धन यांनाहि निवडणुकीस लोकांनीं उभें केलें. उभें केलें म्हणण्याचें कारण असें कीं, हा एक प्रकारचा अण्णासाहेबांवर जुलूम होता. पण त्यांची लोकप्रियता इतकी होती कीं, 'नॉमिनेशन पेपर'वर सही करण्यापलीकडे त्यांना स्वतः निवडणुकीची खटपट म्हणून तेव्हांच काय, पण पुढें केव्हांहि करावी लागली नाहीं. त्यांच्या नांवचें एक मत गणपतीची सुपारी म्हणून बाजूला काढून ठेवलेलेंच असावयाचें. टिळकहि निवडणुकीच्या वेळीं पोलिंग स्टेशनवर गेले असले तरी ते फारसे स्वतःकरितां नव्हे. अण्णासाहेबांप्रमाणें तेहि गैरहजेरींत देखील निवडून यावयाचेच. पण त्या वेळीं पुणें हायस्कूलचे हेडमास्तर विठ्ठल नारायण ऊर्फ दादासाहेब फाटक एम. ए. हेहि जनरल वार्डाकरितां निवडणुकीस उभे राहिले असल्यामुळें टिळकांची मदत त्यांना विशेष झाली. अण्णासाहेब व टिळक हे अनुक्रमें पहिले दुसरे आलेच. रावसाहेब मोघे म्हणून एक उमेदवार होते त्यांना मिलिटरी फायनॅन्स ऑफिसमधील मोठ्या मतदारसंघाचें पाठबळ असल्यामुळें त्यांचा नंबर तिसरा आला. चौथ्या जागेबद्दल मात्र भारी झटापट झाली आणि विठ्ठल रावजी पाठक हे घसरतात असें दिसूं लागलें, तेव्हां टिळक–पटवर्धन यांच्या उरलेल्या मतांचा हात देऊन त्यांना वर ओढून घेतलें. पुढें नव्या म्युनिसिपालिटींत म्यानेजिंग कमेटींत टिळक व पाठक उभयतांहि निवडून आले व टिळकांची इच्छा असती तर तेच चेअरमनहि व्हावयाचे. पण त्यांनीं पाठक हे वडील म्हणून त्यांनाच चेअरमन निवडाविलें व कमेटींतील काम उभयतांनीं एक मेळानें चालविलें. पाठक हे सरकारी नोकर व हायस्कूलचे हेडमास्तर व टिळक हे राजकीय चळवळींतील लोकपक्षाचे पुढारी व सरकारचे उघड उघड दावेदार. तथापि अजून टिळकांवर राजद्रोहाची व सरकारच्या शत्रुत्वाची तसमुद्रा बसलेली नव्हती. व म्युनिसिपालिटी हें एक प्रकारचें असें क्षेत्र आहे कीं, तेथें सोवळें, ओवळें स्पृश्यास्पृश्य हे सामान्यतः एकत्र नांदू शकतें. शिवाय खासगी व्यवहारांत कोणत्याहि सरकारी नोकराशीं देखील स्नेहभावानें वागण्यास टिळक तयार असत. यामुळें दादासाहेब पाठक व टिळक यांची जी एक दोन वर्षांची

निकट संगति घडली ती पाठक यांस फारच आवडली; व पुढें राजकीय मतभेद तीव्र झाले तरी पाठक हे टिळकांच्या सौजन्याला स्मरणपूर्वक वाखाणीत व पुण्यास आल्यावर टिळकांना भेटल्याशिवाय जात नसत. टिळकांची म्युनिसिपालिटींतील कारकीर्द अवघी वर्ष सव्वा वर्षाचीच झाली. कारण १८९७ सालच्या सप्टेंबर महिन्यांत त्यांच्यावर खटला होऊन त्यांत शिक्षा झाली. व तेथून त्यांचा व म्युनिसिपालिटीचा संबंध तुटला तो कायमचाच तुटला.

यापुढेंहि मधून मधून कमेटीच्या कामांत ते लक्ष घालीत, पण फक्त विशेष प्रसंग असल्यास. १९०१–२ सालीं म्युनिसिपालिटींत पॉटिंजरसाहेबांनीं तयार केलेल्या ड्रेनेजच्या म्हणजे मैलमोरीच्या योजनेचा विचार म्युनिसिपालिटींत सुरू झाला त्या-वेळीं त्यांनीं केसरींत या विषयावर एक दोन लेख लिहून लोकमत स्पष्ट प्रकट केलें होतें. दर तीन वर्षांनीं कमिटींत नव्या निवडणुकी होत तेव्हां राष्ट्रीय पक्षाचीच मंडळी निवडून यावी असा त्यांचा कटाक्ष व तत्प्रीत्यर्थ खाजगी प्रयत्नहि असे. स्वतः कमेटींत जाण्याची यापुढें त्यांना कधींच इच्छा झाली नाहीं. पण आपल्या पक्षाचे अनुयायी बाळगोपाळ यांचेंच तेथें बहुमत असावें; आणि कमेटींतील कार-भार ही जशी सामान्य मनुष्याची अधिकार उपभोगण्याची हौस पुरविण्याची एक जागा, तशीच ती सार्वजनिक काम नियमशीर पद्धतीनें व बहुमताच्या तंत्रानें कर-ण्यास शिकण्याची एक शाळा आहे असें ते समजत. कमेटींतील जागा या स्थानिक कारस्थानाच्या पटांतील कटीच्या जागा असल्यानें आपल्या रंगाच्याच सोंगट्या त्यावर बसाव्या अशी त्यांना हौस असे. कमेटींत एखादा मोठा वादाचा प्रश्न निघाला म्हणजे हे मेंबर लोक त्यांना सल्ला विचारण्यास नेहमीं जात व त्यांचा बराच वेळ घेत. १९०१–२ सालच्या त्रैवार्षिक निवडणुकींत शनिवार पेठे-करितां टिळकांनीं आपले स्नेही बाळासाहेब नातू यांना उमेदवार म्हणून उभें केलें. नातू हे केवळ टिळकांच्या आग्रहानें उभे राहिलेले असून ' मी स्वतः एक काडीहि इकडची तिकडे करणार नाहीं ' अशी अट त्यांनीं घातली होती. ती अट अखेरपर्यंत वाजवीहून अधिक कडक रीतीनें त्यांनीं पाळली, व त्यांना प्रतिपक्षी राव-बहादुर बाबुराव रामचंद्र ओंकार हे भेटले ते कर्मधर्मसंयोगानें असे कीं त्यांच्याइतका खटपटी व कारस्थानी उमेदवार क्वचितच आढळतो. सगळ्या वार्डांतील मतदारांची नांवानिशी, ठावाठिकाण वगैरे गोष्टी त्यांना मुखोद्गत असत. नातूंच्या अनास्थेला पेठें-तील त्यांच्या अप्रियतेची थोडीशी भर होतीच. शिवाय ज्यांच्याकरितां खटपट कराव-याची व जे खटपट करणार ते दोघेंहि राजकीय दृष्ट्या अस्पृश्य ठरलेले. यामुळें हा सामना चुरशीचा म्हणून अतिशय प्रेक्षणीय असा झाला व निवडणुकीच्या पेट्या अगदीं बंद करण्याच्या वेळीं तीन मतें ओंकार यांना अधिक पडून ते निवडून आले. पण या प्रसंगीं निवडणुकीचें लहानसें काम असलें तरी तें एकदां पत्करलें म्हणजे त्यांत टिळक लक्ष किती बारकाईनें घालीत हें दिसून आलें. त्या दिवशीं मतदा

रांची छापील यादी व पेन्सिल हातांत घेऊन पोलिंग स्टेशनवर ते आठ तास उभे होते; व पडल्या न पडल्या मतांचा हिशेब ठेऊन, घेठेंत हिंडून मतदार पुढें घालून आणणाऱ्या लोकांना ते एकसारखे हुकूम सोडीत होते. पुढें सरदार दोराबजी पदमजी हे १९०२ सालीं वारले तेव्हां त्यांचे जागीं लोकनियुक्त अध्यक्ष नेमला जावा अशी टिळकांची खटपट होती. पण ती त्यावेळीं साधण्यासारखी नव्हती, असें पाहून ना. गोखले यांस अध्यक्ष निवडण्याची सभासदांची इच्छा दिसून येतांच ही निवडणूक करण्यास त्यांनीं आपल्या पक्षास मान्यता दिली; व सरकारानें गोखले यांची नेमणुक दोराबजी यांचे जागीं केल्यावर गोखले यांना सर्वानुमतें अध्यक्ष निवडण्यांत आलें. तथापि गोखले हे सर्वांशीं योग्य असले तरी सरकारनियुक्त सभासद, लोकनियुक्त नव्हेत, ही उणीव टिळकांना भासत होती. व १९०८ सालीं निवडणुकी झाल्या त्यांत ती भरून काढण्याचा त्यांचा विचार होता. यावेळीं त्यांचे स्नेही बाबासाहेब पेंडसे व गणेश व्यंकटेश जोशी हे पेन्शन घेऊन पुण्यास रहात असल्यामुळें अण्णासाहेब पटवर्धन यांच्याबरोबर या दोघांना टिळकांनीं आग्रहानें उभें केलें, व तिघेही विशेष खटपट करावी न लागतां सहज निवडून आले. उरलेली चौथी जागा तरी आपण हस्तगत करावी असा पुण्यांतील नेमस्त पक्षानें निश्चय करून त्याकरितां निकराचा प्रयत्न केला. या पक्षाचे उमेदवार हरी नारायण आपटे व टिळकपक्षाचे उमेदवार शिवरामपंत परांजपे यांचें या चौथ्या जागेकरितां फारच प्रेक्षणीय युद्ध झालें. या प्रसंगींहि टिळक स्वतः पोलिंग स्टेशनवर येऊन मदतगारांच्या सैन्याच्या हालचाली करवीत होते व ही निवडणूक त्यांनीं जिंकली. तथापि बाबासाहेब पेंडसे अगर गणपतराव जोशी यांना अध्यक्ष म्हणून निवडण्याची त्यांची खटपट साधली नाहीं, व सरदार नौरोजी पदमजी हेच निवडून आले. म्युनिसिपालिटीच्या कारभारांत टिळकांनीं लक्ष घालण्याचा यापुढचा व शेवटचा प्रसंग म्हटला म्हणजे १९२० सालीं सक्तीच्या शिक्षणाचा प्रश्न कमेटींत निघाला तेव्हां. कमेटींतून राष्ट्रीय पक्षानें अशी योजना पुढें आणली होती कीं, प्राथमिक शिक्षण हें सक्तीचें व मोफत करावयाचें तर तें प्रथम फक्त मुलांकरितां करावें, व अधिक खर्चाची तजवीज करून आणि अनुभव पाहून पुढें तें शिक्षण मुलींकरितांहि अमलांत आणावें. परंतु शहरांतील नेमस्त पक्ष व सेवासदनाची मंडळी यांनीं ही योजना स्त्रीशिक्षणाच्या सुधारणेला विरोधी आहे अशी समजूत करून घेऊन, किंवा खरेंच बोलावयाचें तर पुढें होणाऱ्या नवीन कौन्सिलांच्या निवडणुकींत टिळकपक्षास विरोध करण्याला ही एक बरीशी संधी आहे तिचा फायदा भरपूर घ्यावा असें ठरवून, शहरांत कांहीं एक दिवस जंगी चळवळ केली. त्यांत वर्तमानपत्रांच्या रकान्यांचें युद्ध, मिरवणुकींचे थाट, व जाहिरपत्रकांची गर्दी याबरोबरच जाहिरसभांनाहि ऊत आला. या वेळीं किर्लोस्कर थिएटरांत भरलेली एक सभा फारच दंगलीची झाली, व या

सभेंत टिळकांनीं केलेलें भाषण हें म्युनिसिपालिटीच्या बाबतींतील त्यांचें शेवटचें कार्य होय.

पण स्वतः म्युनिसिपालिटीचें त्यांच्यासंबंधाचें एक कार्य राहिलें होतें तें तिनें १९१९ सालीं टिळक विलायतेहून परत आले त्यावेळीं बजाविलें. तें असें कीं, टिळक विलायतेहून ज्या दिवशीं पुण्यास आले त्याच दिवशीं कमेटीनें त्यांना जाहीर रीतीनें मानपत्र दिलें. अधिकारी वर्गाबाहेर जाऊन खाजगी गृहस्थाला शहरम्युनिसिपालिटीनें दिलेलें हें पहिलेंच मानपत्र होय. या प्रसंगाचा उल्लेख पुढें यथाक्रम, यथाकाल येईलच. मूळ उद्देशाप्रमाणें प्रस्तुत प्रकरणांत १८९० ते ९५ या पांच सालांतल्याच टिळकांच्या चळवळीची इकीकत द्यावयाची हें खरें; तथापि त्यांचा व शहर म्युनिसिपालिटीचा संबंध वस्तुतः थोडाच आला हें वरील इकीकतीवरून दिसून येईल; व म्हणूनच १८९५ च्याहि पुढें जाऊन या संबंधांतील अवशिष्ट अशी जी थोडीशी इकीकत तीहि येथें देऊन हा विषय पूर्ण केला आहे.

---

भाग १८ वा

# टिळक व कायदेकौन्सिल

• पुणे शहर म्युनिसिपालिटीहून मुंबई कायदेकौन्सिलाशीं टिळकांचा संबंध थोडा अधिक आला. तो त्यांच्या सार्वजनिक आयुष्यांतील कालावधीच्या मानानें फारच थोडा म्हणजे अवघा सवादोन वर्षांचा होता. तथापि दुसऱ्या एका दृष्टीनें म्युनिसिपल निवडणुकीपेक्षां कायदेकौन्सिलांतील त्यांचा प्रवेश अधिक महत्त्वाचा ठरतो. १८६१ सालीं हिंदुस्थानांतील कायदेकौन्सिलें प्रथम विस्तार पावलीं. पूर्वी सर्व हिंदुस्थानाकरितां मिळून एकच वरिष्ठ कायदेकौन्सिल होतें, व त्याचे सर्व सभासद सरकारी अधिकारी असत. परंतु १८६१ च्या कायद्यानें ही स्थिति पालटली, म्हणजे वरिष्ठ कायदेकौन्सिल शिल्लक ठेवून मद्रास व मुंबई वगैरे प्रांतांना प्रांतिक कायदेकौन्सिलें देण्यांत आलीं. तसेंच वरिष्ठ व कनिष्ठ दोन्ही प्रकारच्या कायदेकौन्सिलांत पगारदार सरकारी नोकर नाहींत असे कांहीं सभासद नेमण्याचा अधिकार कौन्सिलांच्या अध्यक्षांनां देण्यांत आला. या सभासदांस जादा सभासद असें म्हणण्यांत येऊं लागलें. त्यांची संख्या वरिष्ठ कायदेकौन्सिलांत सहांपासून बारांपर्यंत असावी, व प्रांतिक कौन्सिलांतून निदान निम्मे जादा सभासद सरकारी नोकरांव्यतिरिक्त असावे आणि त्यांच्या नेमणुकीची मुदत दोन वर्षांची असावी असें ठरलें. या जादा कौन्सिलरांत ऊर्फ नामदारांत कशा प्रकारच्या गृहस्थांची नेमणूक सरकार करीत असेल हें वाचकांना कल्पनेनें ताडतां येण्यासारखें आहे. सर्वकाळ सर्वच माणसें वाईट नेमलीं गेलीं असा याचा अर्थ नाहीं. कारण दादाभाई, रानडे, तेलंग, मेथा, बद्रुद्दीन तय्यबजी असे गृहस्थ याच अधिकारांत मुंबई सरकारानें जादा कौन्सिलर म्हणून नेमिले ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. पण असल्या एका ठळक व स्वतंत्र विचारांच्या मनुष्यागणिक होयबा असे पुष्कळ नेमले गेले हाच मुद्दा या ठिकाणीं महत्त्वाचा आहे. संस्थानिक, सरदार, मुंबईचे बडे शेट किंवा बॅरोनेट, विशिष्ट जातींचे पुढारी, अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधि वगैरे अनेक वर्ग जादा सभासदांच्या जागेकरितां हक्क सांगण्यास नेहमीं तयार असतच. व अशांचे हक्क मान्य करणें हें सरकारासहि मोठें सोईचें असे. यामुळें एखादे दादाभाई किंवा फेरोजशहा मेथा सरकारच्या नेमणुकीनें कौन्सिलांत गेले तर त्यांच्या भोंवतीं या दुसऱ्या प्रकारच्या नामदारांचा गराडा पडून, सरकारच्या बाजूचें बहुमत होण्यास या दुसऱ्या प्रकारच्या लोकांची मदत नेहमीं हटकून मिळावयाची; व पहिल्या वर्गांतील सभासदास सत्तेपुढें शहाणपण व्यर्थ हीच म्हण अनुभवास यावयाची. मुंबईच्या एखाद्या शेटयाच्या डोक्याची शीर एखादे वेळीं चढली म्हणजे,

किंवा भाषण लिहून देणारा कडक स्वभावाचा किंवा बेसावध टांकाचा भेटला तर सरकारास तो वाटेल तें टाकूनहि बोलावयाचा. पण बिचारा काय बोलतो हें याचें याला माहीत असेल कीं नाहीं कुणास ठाऊक ! अशा शांत विचारानें सरकारी सभासद त्याची कींवच करीत. कसेंहि असलें तरी त्यांचा उपयोग नाहीं. बरें दुसऱ्या प्रकारचे म्हणजे होयबा सभासद घेतले तर ते एकंदर कौन्सिलच्या निवळ करमणुकीच्या सदराखालीं पडत. कोणी खानदानीची श्रीमंती दाखविण्याकरितां नटून जाई. कोणी आपण संस्थानिक म्हणजे एक अजब चीज असें भासविण्याकरितां चित्रविचित्र पोषाक घालून जाई. कोणी गव्हर्नरसाहेबांच्या डोळ्यास डोळा भिडवून बसल्यानें कोठें बोलावयाचें व कोठें हात उचलावयाचा याचें त्यास भान राहात नसे. कोणी लिहून आणलेलें भाषण वाचतांना अडखळत शाळेंतील पोरासारख्या चुका करीत, व अशा रीतीनें हास्यास्पद ठरत. एखाद्याचा सभासदाचा दोन वर्षांतील कौन्सिलचा वृत्तांत काढून पाहिला तर कौंसिलांत गेल्यापासून बाहेर पडेपर्यंत बिचाऱ्याचे ओंठहि हलले नाहींत असा शेराहि त्याच्यावर मारतां आला असता. खुद्द पुणे शहरांत दोन्ही म्हणजे चांगल्या व वाईट प्रकारच्या सभासदांचा अनुभव आला होता. कारण रा. ब. रानडे हे पुण्यांतले व सरदार खंडेराव रास्ते हेहि पुण्यांतलेच. रानड्यांनीं कौन्सिलांत आपलें तेज कसें पाडलें असेल हें सांगावयास नकोच. उलट खंडेराव रास्ते म्हणजे ती एक सर्व प्रकारें हास्योत्पादक मूर्तिच असे. हे जादा कौन्सिलर स्वतःस ऑनरेबल न म्हणविता हॉनरबल म्हणवीत; आणि "Ascendency" हा शब्द त्यांचें भाषण लिहून देणाऱ्या कोणा लेखकानें दुर्दैवानें घातला त्याचा उच्चार रास्ते यांनीं " अॅस्केन्डन्सी " असा केला. तेव्हां कौन्सिलांतील गंभीर स्वभावाच्या लोकांनाहि हसूं आंवरलें नाहीं असें सांगतात. खंडेराव रास्ते यांना पुण्यांत 'मेहुणपुऱ्यांतील तारा' असें नांव मिळालें होतें.

केसरींत वासुदेवराव केळकर लिहितातः—"रा. ब. खंडेराव रास्त्यांसारखे मेंबर नेमण्यांत कांहीं हाशील आहे ! प्रिन्सिपाल वर्डस्वर्थसारख्यांचें अंतेवासित्व कर्मधर्मसंयोगानें कांहीं दिवस ज्यांच्याकडे आल्यामुळें ज्यांना आपल्या 'मेन्टल क्यालिब्री'च्या 'आस्केनडन्सी'मुळें पाहिजे त्या बिकट प्रश्नास 'प्रन्ड' करण्यास मुळींच श्रम पडत नाहींत, अशा वजनदार बाळसेदार, व निनादार, हानरबलनें मि. पील, मि. तेलंग व सर जेम्स फर्ग्यूसन यांच्या खांद्याला खांदा लावून कायदेकानू करण्याचें भारी जूं " आं " करून " वाकावें " लागलें तरी बेहत्तर आहे, पण कसें तरी ओढावें यांत कांहीं अर्थ आहे व मजा आहे ! चतुर शेतकऱ्यांची अशी चाल आहे कीं, कांहीं नाजुक काम असलें म्हणजे तें केवळ दांडग्या बैलावर टाकावयाचें नाहीं. त्याच्या जोडीला खातीचा एखादा मठ्ठ बैल जोडावयाचा. म्हणजे दगदग पडत नाहीं. त्याप्रमाणेंच आमच्या इकडील गव्हर्नरांचा परिपाठ दिसतो. का. कौ. चे सगळेच आडिशनल मेंबर हुशार व स्वतंत्र असे नेमले तर

कदाचित् त्या जंगी मंडळीला दृष्ट पडेल म्हणून तीटवजा ते एकदोन दम्नू ऑनरेबल करून ठेवण्यास कधींही चुकत नाहींत." ही स्थिति फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. १८६० ते १८९० या तीस वर्षांत या इलाख्यांतील शिक्षणप्रसारामुळें लोकस्थितींत महदंतर पडलें होतें; व राष्ट्रीय सभेचा जन्म होऊन तिनें सर्व बाजूंनीं राजकीय आकांक्षा उद्दीपित केल्या होत्या. यामुळें कायदेकौन्सिलांची सुधारणा करणें सरकारास प्राप्त झालें. मुंबईच्या सुप्रसिद्ध राष्ट्रीय सभेंत ब्रॅडलॉ साहेबांच्या आगमनानें १८८९ सालीं कौन्सिलचा विषय विशेष नांवारूपासहि आला, व त्यांनीं विलायतेंत परत गेल्यावर पार्लमेंटपुढें आणण्याकरितां एक बिल तयार केलें. व १८९० सालीं तें हाउस ऑफ् कॉमन्समध्यें दाखलहि केलें. पण तें इतर कामाच्या गर्दीमुळें फुकट गेलें. पुढें १८९१–९२ चा कौन्सिल ॲक्ट मंजूर होऊन लोकनियुक्त सभासद नेमण्याचें तत्व प्रथम मंजूर करण्यांत आलें. या वेळीं ग्लॅडस्टनसाहेब हे अधिकारारूढ नव्हते. लोकनियुक्त प्रतिनिधि नेमण्याचे स्पष्ट शब्द बिलांत नसले तरी हिन्दुस्थानसरकार या तत्वाचा अंमल करील अशी त्यांनींहि आशा प्रगट केली होती. या बिलानें वरिष्ठ कौन्सिलांतील जादा सभासदांची संख्या सोळा ही ठरविली; व प्रान्तिक कौन्सिलांतील ही संख्या वीस ठरविण्यांत आली. यांपैकीं मुंबई कौन्सिलांत आठ जागा निवडणुकीकरितां ठेवण्यांत आल्या होत्या. लोकांच्या दृष्टीनें या आठ जागा तर निवडणुकीस अपुऱ्याच होत्या; परंतु त्या आठांची वांटणी करण्यांत आली तीहि फार वाईट झाली होती. मुंबईसरकारच्या नियमाप्रमाणें या आठांतील दोन जागा सिंधला, एक गुजराथेला, एक कर्नाटक कोंकण मिळून, एक दक्षिणेंतील सरदारांना व तीन मुंबई शहराला; अशा वांटण्या झाल्या होत्या. सिंधच्या व दक्षिमहाराष्ट्रांतील सरदार जमीनदारांना मिळालेल्या जागेवर कोणी सरकारचेच हस्तक यावयाचे, मुंबई शहरांतील तिन्हींपैकीं दोन जागा युरोपियन लोकांना मिळणार, एक मुंबईच्या म्युनिसिपॅलिटीला व एक युनिव्हर्सिटीला गेली; नाहीं म्हणावयाला गुजराथेंतील म्युनिसिपॅलिट्यांना एक व दक्षिणेंतील लोकलबोर्डांना एक अशा दोनच जागा खरोखर सामान्य जनतेकरितां राहिल्या. वास्तविक नुसत्या पुण्याकरितां नाहीं तरी पुणें म्हणजे मुंबईसरकारची दुसरी राजधानी ज्यांत आहे त्या मध्यभागाला एक जागा मिळावयास पाहिजे होती. पण महाराष्ट्राला नांवापुरती जी एक जागा दिली ती सरकारानें सरदारांच्या गळ्यांत बांधल्यामुळें पुणे व मध्यभागचे सहा जिल्हे यांचा खरा लोकप्रतिनिधि असा कोणी निवडून येण्याचा संभव राहिला नाहीं. या जागा अशा रीतीनें वांटण्यांत पुण्यांतील चढेल सुशिक्षित लोकांना थप्पड देण्याचा सरकारचा इरादा उघड दिसत होता ही मोठीच तक्रार होती, व पुण्यास आणि इतर अनेक शहरीं या बाबतींत जाहीरसभा वगैरे भरून सरकारकडे अर्ज पाठविण्यांत आले होते.

कायदे कौन्सिलांत सभासद निवडून देण्याच्या हक्कांतून मध्यभागास वगळ-ल्याबद्दल पुण्याच्या लोकांना अर्थातच विशेष राग आला. ता. ९ एप्रिल १८९३ रोजीं आप्पाबळवंताचे वाड्याजवळ पूर्णानंद नाटकगृहाच्या जागीं नारायण-भाई दांडेकर यांच्या अध्यक्षतेखालीं मोठी जाहीरसभा भरली होती. सर्व पक्षांचे लोक तींत सामील होते. भिंतीवर लावलेल्या मोठ्या जाहिरातींवर एका किल्ल्याचें चित्र काढलें होतें. या किल्ल्यास तीन दरवाजे असून मधला दरवाजा बंद आहे व दुसरे बाजूचे दोन दरवाजे खुले आहेत, किल्ल्यावर कांहीं साहेबलोक आहेत, व मधल्या दरवाजावर एक ब्राह्मण दरवाजा उघडण्याकरितां ठोठावतो आहे असें हें चित्र होतें. दरवाजा ठोठावणारा ब्राह्मण म्हणूनच दरवाजा बंद! दुसरा कोणी त्यांतून येणारा असता तर दरवाजा कदाचित् लागलाहि गेला नसता हें सर्वच जाणत होते. पुढें पुणेकरांचें समाधान करण्याच्या किंवा तोंड बंद करण्याच्या हेतूनें, सरकारानें याच सालीं पुणें शहर म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष दोराबजी पद-मजी यांची कायदेकौन्सिलांत नेमणूक केली. पण सरकारचा हा कावा लोकांच्या लक्षांत येऊन चुकला. व या नेमणुकीनें चळवळ थांबली नाहीं. या सभेकडून लॉर्ड हॅरिस यांचेकडे अर्ज पाठविण्यांत आला त्यांत मध्यभागाचें महत्व यथायोग्य वर्णिलें होतें, व मध्यभागच्या म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें मिळून तरी एक जागा द्यावी अशी विनंति करण्यांत आलेली होती. पूर्वी वांटलेल्या आठ जागा ज्यांच्या त्यांना ठेवूनहि ही मागणी सरकारास मान्य करतां आली असती. कारण वीस जादा सभासदांपैकीं आठाऐवजीं दहा जागा देखील सरकारास निवडणुकीकरितां ठेवतां आल्या असत्या. परंतु मध्यभागाकरितां जागा ठेवली कीं ती पुण्यांतला कोणीतरी राजद्रोही ब्राह्मण उपटणार अशी मुंबईसरकारची खात्री असल्यामुळें त्यांनीं नियम केले तेच मुळीं कायम करून प्रसिद्धहि केले; व पहिल्या झटक्यास तरी पुणेकरां-वरील राग उगवून घेतला. पण हा अन्याय कायमचा टिकणें शक्य नव्हतें. १८९३ च्या निवडणुकींत गुजराथेतर्फे चिमणलाल हरी सेटलवाड व दक्षिण भागातर्फे बेळगांवचे वकील विष्णु रघुनाथ नातू हे निवडून आले होते. पहिल्या निवडणु-कीची द्विवार्षिक मुदत १८९५ सालीं संपावयाची त्या आधींच, महाराष्ट्रांतील चळवळीचा परिणाम होऊन निवडणुकीचे नवीन नियम मार्च महिन्याच्या प्रारंभीं (१८९५) प्रसिद्ध करण्यांत आले. त्यांत मध्यभागांतील सहा जिल्ह्यांच्या लोकल-बोर्डांना मिळून एक जागा देण्यांत आली. शिवाय दक्षिणेंतील सरदार व गुजराथें-तील म्युनिसिपॅलिट्या व दक्षिण भागांतील (कर्नाटक-कोंकण) लोकलबोर्डें यांच्या जागा कायमच ठेविल्या. वास्तविक उत्तर भागांतील म्युनिसिपालिट्यांप्रमाणें मध्य-भागांतील जागाहि म्युनिसिपालिट्यांनाच द्यावयास पाहिजे होती. परंतु लोकल-बोर्डापेक्षां म्युनिसिपालिट्या या अधिक स्वतंत्र असतात, निवडणुकीच्या बाबतींत जिल्हा कलेक्टर हेच लोकलबोर्डाचे अध्यक्ष असल्यामुळें त्यांच्या भीतीनें व मदतीनें

सरकारपक्षपाती असाच उमेदवार निवडून येण्याचा अधिक संभव ही गोष्ट लक्षांत घेऊनच मुंबईसरकारानें तशी योजना मुद्दाम केली असली पाहिजे.

मध्यभागाला दिलेली जागा पुण्याचाच कोणीतरी पुढारी उपटणार ही सरकारची अपेक्षा वास्तविक कांहीं खोटी नव्हती; व निवडणुकीचे नवीन नियम प्रसिद्ध होतांच या जागेकरितां कोण उमेदवार उभे राहणार व अखेर ती कोणास मिळणार याची चर्चा व खटपट सुरू झाली. दक्षिण भागाच्या जागेकरितां विष्णुपंत नातू, शिवाय भाटे, छत्रे वगैरे बेळगांवचे वकील आणि दाजी आबाजी खरे, शामराव विठ्ठल वगैरे मुंबई-हायकोर्टाचे वकील हे उमेदवार म्हणून उभे राहिले. या बाबतींत खरे यांना टिळकांची सहानुभूति पूर्ण होती; परंतु इतर लोकांतहि त्यांचे कांहीं स्नेही असल्यामुळें टिळकांना ही सहानुभूति केसरीच्या द्वारें प्रगट करण्यास अर्थातच अडचण वाटली. ही त्यांची अडचण मध्यभागातर्फे त्यांना अधिकच नडली. कारण मध्यभागाच्या निवडणुकीस टिळक हे स्वतःच उमेदवार म्हणून पुढें आले होते. सहा जिल्ह्यांतील लोकलबोर्डांना मिळून एक जागा दिली याचा अर्थ प्रत्येक जिल्हाबोर्डाचा प्रत्येक सभासद हा या निवडणुकींतील मतदार होता असा नाहीं. बोर्डानें जिल्ह्याच्या लोकसंख्येला अनुसरून कांहीं एका प्रमाणानें आपल्यांतील सभासद प्रथम मतदार म्हणून निवडून द्यावयाचे व अशा निवडलेल्या प्रत्येक मतदारानें नंतर मतपत्रिकेवर आपलें मत भरून द्यावयाचें. या योजनेप्रमाणें सहा जिल्ह्यांत मिळून, पासष्ट मतदार निवडावयाचे व त्या पासष्टांपैकीं ज्या उमेदवाराला बहुमत मिळेल तो निवडून यावयाचा होता. पैकीं खानदेशाला पंधरा, साताऱ्याला तेरा, पुण्याला अकरा, नाशिकाला नऊ, नगराला नऊ व साताऱ्याला आठ याप्रमाणें मतदारांची वांटणी झाली होती. निवडणुकीकरितां मुख्य तीन उमेदवार उभे होते. एक रा. ब. श्रीराम भिकाजी जठार, रा. धोंडो शामराव गरुड व स्वतः टिळक. पैकीं जठार हे पुण्यांतील नेमस्त पक्षाचे या बाबतीपुरते प्रतिनिधी होते. जठार हे अव्वल पिढींतील पदवीधर असून त्यांची बहुतेक सर्व नोकरी वऱ्हाडच्या सरकारी शिक्षणखात्यांत झालेली होती. आणि पेन्शनीच्या वेळीं ते त्या प्रांताचे डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन म्हणजे मुख्य विद्याधिकारी होते. पेन्शन घेतल्यावर ते पुण्यास येऊन घर बांधून राहिले. पुण्यांतील नेमस्त पक्षांत अध्यक्षपणाचा मान अद्यापि पेन्शनर लोकांकडे असण्याइतकीच त्यांची राष्ट्रीयत्वांत प्रगति झाली होती. जठार हे मोठे हुद्देदार, नामांकित सुशिक्षित व श्रीमंत, शिवाय वयानें वडील. यामुळें त्यांना पुढें करून मध्यभागातर्फेची नामदारीची जागा आपल्या पक्षास मिळवावी असें ठरवून जठार यांना नेमस्तांनीं पुढें केलें होतें. परंतु ते स्वतः थोडे मितभाषणी, भिडस्त व असल्या धालमेलीस लागणारी चपळाई त्यांचेमध्यें नसल्यानें त्यांची खटपट करण्याचें काम गोखलेप्रभृति पुण्यांतील तरुण नेमस्त मंडळीवरच पडलें होतें. व रा. ब. रानडे

यांचा सल्ला व शिफारसपत्रें घेऊन ही मंडळी हें काम करीत. दुसरे उमेदवार गरुड हे खानदेशचे रहिवासी; यांचें घराणें त्या प्रांतांत बरेंच प्रतिष्ठित. त्यांचे चुलते गोविंदराव गरुड हे सर्वांत जुन्या पिढीचे वकील व व्यक्तिशः उदार व सज्जन असल्याकारणानें, सर्व खानदेशचे पुढारी असे मानले जात. धोंडो शामराव गरुड हे त्यांचे पुतणे. यांनीं मुंबईस कांहीं वर्षे सॉलिसिटरचा धंदा केला व कांहीं दिवस इंदूर संस्थानांत न्यायखात्यांत नोकरी केली होती. १८९५ चे सुमारास ते धुळ्यास येऊन घरीं स्थाईक राहिले होते. अशा रीतीनें हा तिरंगी सामना सुरू झाला. प्रथमतः स्वतः गोविंदराव गरुड हेच उमेदवार म्हणून उभे राहणार अशी वदंता होती व ही गोष्ट खरी असती तर त्यांच्याविरुद्ध आपण उभें रहावयाचें नाहीं असें टिळकांनीं ठरविलें होतें. इतर गोष्टी बाधक नसतील तर वडीलपणाला योग्य तो मान द्यावयाचा ही प्रवृत्ति टिळकांमध्यें होती व पुण्यास भरलेल्या एका प्रांतिकसभेचें अध्यक्षस्थान इस्लामपूरचे मराठी वकील गोविंदरावजी लिमये यांना जसें देण्यांत आलें होतें, तसाच कौन्सिलांत शिरण्याचा पहिला मान स्वतः गोविंदराव गरुड उभे असते, तर त्यांना टिळकांकडून मिळाला असता असें वाटतें. धोंडोपंत गरुड यांची आपल्या चुलत्याशीं या दृष्टीनें अर्थातच बरोबरी नव्हती. म्हणून ते आपल्या चुलत्याच्या मदतीनें उभे राहिल्यास त्याची पर्वा करण्याचें टिळकांना कारण नव्हतें. रा. ब. जठार हेहि वयानें वडील खरे. तथापि ते नेमस्तपक्षातर्फे प्रतिपक्षी म्हणून उभे राहिल्याकारणानें त्यांच्या मार्गांतून बाजूस होण्याची टिळकांना जरूरी नव्हती.

या तिघां उमेदवारांना तीन प्रकारें पाठबळ होतें. मतदारसंख्येच्या दृष्टीनें एक खानदेश म्हणजे जवळ जवळ दोन जिल्ह्यांइतका होता व गरुडघराण्याच्या संबंधानें खानदेशाचीं सर्व पंधराच्या पंधरा मतें गरुड यांसच मिळावयाचीं हें ठरलेलें होतें. खानदेश जिल्हा मागासलेला, जिल्हा बोर्डाचे बहुतेक सभासद अशिक्षित पाटील किंवा देशमूख, मतदार निवडणुकीकरितां सभा भरणार तेव्हां अध्यक्षस्थानीं कलेक्टरसाहेब, उजव्या हाताला हुजूर डेप्युटी कलेक्टर व डाव्या हाताला स्वतः गरुड असे बसले म्हणजे काम दोन मिनिटांत व्हावयाचें. हुजुर डेप्युटीसाहेबांनीं उठून यादी वाचावयाची व बाकी सर्वांनीं नुसतें होय म्हणावयाचें. अशा रीतीनें निवडून आलेले पंधरा मतदार कलेक्टरसाहेबांपुढें उघड्या मतपत्रिकेवर सही करण्यास गेले म्हणजे गरुडांचें नांव लिहिणार यांत काय आश्चर्य? शिवाय स्थानिक अभिमानाच्या दृष्टीनेंहि तें योग्य होतें. जिल्ह्यांतील मनुष्य सोडून त्यांनीं बाहेरच्या उमेदवाराला मत कां म्हणून द्यावें? टिळक हे बुद्धिमान व वर्तमानपत्रकर्ते, सरकारचे निर्भीड टीकाकार व अनेक सार्वजनिक चळवळी चालविणारे असले, तरी खानदेशांतील खेडवळ लोकांना त्यांचें कौतुक कसें असणार? रा.ब. जठार यांना खुद्द न्या. रानडे यांचें पाठबळ होतें असें म्हटलें म्हणजे, प्रत्येक जिल्ह्यां-

तील समस्त नेमस्त वर्गाचें पाठबळ होतें हें निराळें सांगावयास नकोच. सरकारी नोकरींतील कोणचा सुशिक्षित मनुष्य रानड्यांचा शब्द खालीं पडूं देईल? स्वतः टिळकांना पाठबळ होतें तें अर्थात त्यांच्या लोकप्रियतेमुळें जोडलेल्या अनेक शेठ्यांचें व राष्ट्रीय भावना जागृत असणाऱ्या इतर लोकांचें. गरुडांना खानदेशाच्या जोडीला इतर कोठें फुटून फुटून अशीं कां होईना सात आठ मतें मिळाली तरी त्यांचें काम होण्यासारखें होतें व खानदेशाच्या खालोखाल लगतच्या नाशिक जिल्ह्यांत त्यांचें वजन बरेंच होतें. याच्या उलट जठार किंवा टिळक यांना एका ठिकाणचीं सर्व मतें इटकून मिळावीं असा कोणताहि संबंध नव्हता. खानदेशांतील जशी मूळ मतदारांचीच निवडणूक एकमतानें होणार तशी जठार किंवा टिळक यांच्यातर्फे कोणत्याहि जिल्ह्यांत होण्याचा संभव नव्हता. बहुमत कोणा एखाद्या उमेदवाराच्या प्रयत्नानें झाल्यास त्याची खरशी व्हावयाची. पण त्यांतहि सरमिसळ मतदार येणार नाहींत अशी खात्री देतां येणें शक्य नव्हतें. त्यांतल्या त्यांत स्वस्थांनीं मह प्रबळ असतो ही म्हण या बाबतींत टिळकांविषयीं खरी ठरण्यासारखी नव्हती. पुणें शहर हें टिळकांना स्वगृहासारखें झालें होतें हें खरें व निवडणूक पुणें शहरांत किंवा म्युनिसिपालिटींत व्हावयाची असती तर टिळकांचीच झाली असती. पण जिल्हाबोर्डाची रचनाच तेव्हां अशी होती कीं, सरकारी अधिकाऱ्यांचेंच प्राबल्य त्यांत विशेष असे; व खुद्द शहरांतील कांहीं लोक जिल्हाबोर्डांत सभासद असले तरी ते बहुधा सरकारी वळणाचेच असत. यामुळें निवडणुकीच्या कामीं टिळक हे पुणे जिल्ह्याला पारखेच झाले होते. ते १८९५ व १८९७ या दोन सालीं सहा जिल्ह्यांतील बहुमतानें निवडून आले, पण पुण्याच्या आठ मतांपैकीं त्यांना एकहि मत मिळालें नव्हतें असें वाटतें.

असो. पुण्यांत या सुमारास पक्षभेदांना सुरवात झाली असल्याकारणानें एका बाजूस ज्ञानप्रकाश व सुधारक व दुसऱ्या बाजूस केसरी असा निवडणुकीच्या बाबतींत उघड सामना सुरू झाला. खुद्द उमेदवारांचें गुणवर्णन करण्याच्या बाबतींत टिळक हेच स्वतः संपादक असल्यामुळें केसरीला तोंड मिटून बसावें लागलें होतें. केसरीचें काम फक्त इतकेंच सुरू होतें कीं, उमेदवार या नात्यानें टिळकांवर जे आक्षेप आणले जात, त्यांना उत्तर द्यावें. बुद्धिमत्ता, विद्वत्ता किंवा राजकारणाचें ज्ञान या दृष्टीनें टिळकांवर कोणताच आक्षेप घेतां येण्यासारखा नव्हता. तेव्हां प्रतिपक्षीयांनीं असें एक तत्व पुढें आणलें कीं, वर्तमानपत्रकर्त्यांनीं कायदेकौन्सिलांत जाऊं नये. या तत्वाला स्पेन्सरचा आधार दाखविण्यांत येऊं लागला. पण या एका तत्वानें टिळकांचा पाडाव व इतर सर्व स्वकीयांचें समर्थन करणें नेमस्त पक्षाला शक्य नव्हतें. सुधारकानें म्हणजे आगरकरांनीं टिळकांविरुद्ध स्पेन्सरचा हा आधार दाखविला होता; पण एकाच लेखांत केसरीच्या संपादकांनीं कायदेकौन्सिलांत जाऊं नये असें ज्या आगरकरांनीं म्हटलें त्यांनी

त्याच लेखांत ' केसर इ हिंदचे' संपादक वाच्छा व सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे संपादक गोपाळराव गोखले यांनीं कौन्सिलांत जावें अशी शिफारस केली. याचा फायदा घेऊन केसरीनें कोटी केली कीं, " सुधारकानें शिफारस केलेल्या संपादकांस कायद्याचें ज्ञान नाहीं म्हणून ते कौन्सिलांत जाण्यास लायक व टिळकांना कायद्याचें ज्ञान असल्यामुळें ते नालायक असा युक्तिवाद करावयाचा असल्यास मग तो ठीकच आहे."

१८९५ सालीं एप्रिल महिन्यांत निवडणुकीची ही दंगल सुरू होती व उमेदवारांच्या गुणदोषचर्चेशिवाय त्यांनीं अंगीकारलेल्या प्रयत्न पद्धतीवरहि उभयपक्षीं टीका चालू होती. टिळकपक्षपाती लोकांनीं म्हणावें कीं, रावबहादूर जठार हे न्या० रानडे यांचीं पत्रें जिल्ह्यांतील अधिकारी वर्गांना नेऊन लावतात व कलेक्टर लोक टिळकांविरुद्ध मतें मिळविण्याची खटपट करतात. याला नेमस्त पक्षाचें उत्तर असें होतें कीं, टिळक झाले तरी ही गोष्ट कोठें करीत नाहींत? त्यांचे स्नेही बाबासाहेब पेंडसे हे मध्यभाग रेव्हेन्यू कमिशनरचे मुख्य असिस्टंट असल्यामुळें आणि तालुक्यांतील सर्व मामलेदार वर्गाची शेंडी पेंडशांच्या हातीं असल्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांची मदत टिळकांनाहि होते. वस्तुतः दोन्ही आक्षेपांत सारखाच अर्थ होता. म्हणजे दोन्ही आक्षेप फुकट होते. कारण निवडणुकींतील तीनहि उमेदवार साधेल तसा अधिकारी वर्गाचा हात निवडणुकीच्या खटपटीमध्यें आपल्यातर्फे उपयोगांत आणीत होते. एकाला हा अधिकारी लाभला तर दुसऱ्याला तो, इतकाच फरक. रानड्यांच्या शिफारसपत्रावरून तालुका मुनसफांनीं जठारांकरितां खटपट करावी व बाबासाहेब पेंडसे यांचा कल पाहून त्याच तालुक्यांतील मामलेदारांनीं टिळकांकरितां खटपट करावी असें होत असे. कित्येक ठिकाणीं खासगी सहानुभूति एका बाजूस व उघड मदत दुसऱ्या बाजूस असेंहि द्वंद्व सुरू होतें. जठार—टिळकांना मुख्य मदत रानडे—पेंडसे यांची होती असें समजून लोकांनीं या मुद्यावर एक कोटी बसवली होती. रानड्यांचें घर रामेश्वराचे देवळापाशीं व बाबासाहेब पेंडसे हे सोट्या म्हसोबाचे देवळाजवळ रहात या गोष्टीस अनुलक्षून, उघड नांवें घेण्याचें टाळून, एकानें म्हणावें जठारांना श्रीरामेश्वर प्रसन्न झाला आहे म्हणून त्यांची इतकी टुरटूर, तर दुसऱ्यानें उत्तर द्यावें कीं टिळकांना सोट्या म्हसोबा प्रसन्न आहे; बिचाऱ्या भोळ्या रामेश्वराचे दंडधारी उग्र सोट्या म्हसोबापुढें काय करणार! अखेर अखेर टिळकपक्षाची सरशी होणार असें दिसूं लागल्यावर कित्येक पत्रकारांनीं टिळकांवर निर्वाणीची वासवी शक्ति टाकण्याच्या सूचनाहि सुरू केल्या. १८९१ च्या कौन्सिल ॲक्टानें निवडणुकीचें तत्व अप्रत्यक्ष रीत्याच मान्य केलें होतें. निवडणुकीनें अमुक एक सभासदांची संख्या द्यावयाची असें नियमानें ठरलें. व त्याप्रमाणें मतदारसंघहि बनविण्यांत आले खरे. तथापि या नियमानेंच सरकारानें एक हातचा म्हणून असा राखून ठेविला होता कीं,

कोणी मतदारसंघानें आपला प्रतिनिधि निवडून दिला तरी त्याला ती जागा निवडणुकीच्या हक्कानें मिळालीच पाहिजे असें नाहीं. मतदारांनीं प्रतिनिधि निवडून गव्हर्नरसाहेबांपुढें उभा करावयाचा व त्यांनीं तो योग्य वाटल्यास किंवा त्यांना हरकत नसल्यास स्वतःच्या हातानें कौन्सिलांत प्रविष्ट करावयाचा, या दोहोंतील भेद अर्थात् फार सूक्ष्म आहे. मतदारांनीं निवडून दिलेला उमेदवार गव्हर्नरसाहेबांनीं नापसंत म्हणून नामंजूर केला अशी गोष्ट सहसा होत नाहीं हें खरें. पण अरेरावीचीं निर्वाणीचीं अस्त्रें, कोठेंहि जा, असल्या सूक्ष्म भेदांतच नेहमीं दडवून ठेवलेलीं असतात व मांजराच्या नखांप्रमाणें तीं वाटेल तेव्हां पुढें काढतां येतात. या निवडणुकीच्या नियमांत नुसता 'इलेक्टेड' असा शब्द नसून "ऑन् इलेक्शन, शुड् बी प्रेझेन्टेड टु धि गव्हर्नर फॉर नॉमिनेशन" असे शब्द होते; व या शब्दांचा फायदा घेऊन मुंबई गॅझेट पत्रानें अशी उघड सूचना केली होती कीं टिळक हे एका "पिसाट व फाजिल" पत्राचे चालक असल्यामुळें त्यांना जर मध्यभागांतील मतदारांनीं निवडून दिलें तरी अखेरीस गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट यांनीं ही निवडणूक आपल्या अधिकारांत रद्द करावी. या सूचनेचा केसरीनें इतकाच फायदा घेतला कीं, मुंबई गॅझेटकार ज्या अर्थी हें निर्वाणीचें शस्त्र उपयोगांत आणण्याची सूचना करीत आहेत त्या अर्थी लोकांनींहि त्यांना हटकून निवडून द्यावें अशी त्यांची योग्यता उघड ठरते. केसरी लिहितो, "टिळकांची लोकांकडून ही पहिलीच निवड आहे असें नाहीं. त्यांस मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो निवडलें तेव्हां त्यांची निवडणूक पसंत करणें अगर न करणें हें सरकारच्या स्वाधीन होतें. पण त्यावेळीं लॉर्ड हॅरिस साहेबांची कारकीर्द असतांहि सदर निवडणूक रद्द करण्याचें कोणाच्याहि मनांत आलें नाहीं. मग गॅझेट कर्त्यास आजच हे विचार सुचण्याचें कारण काय, हें आम्हांस समजत नाहीं." केसरीच्या लिहिण्याचा यापुढें झोंक असा होता कीं, जठारांच्या मदतगारांनीं, जिल्ह्यांतून जेथें हात चालला तेथें, टिळकांचा पाडाव करण्याकरितां, प्रत्यक्ष युरोपियन कलेक्टर हे जिल्हाबोर्डाचे सभासद म्हणून त्यांस कायदे कौन्सिलच्या निवडणुकींतील मतदार निवडलें, व तेवढ्यानेंहि भागत नाहीं असें पाहून त्यांनीं ही अजब युक्ति मुंबई गॅझेटकारांकडून वदवली. गॅझेटचे माजी संपादक मॅक्लीनसाहेब यांनीं पार्लमेंटांत असें उघड बोलून दाखविलें होतें कीं, ह्यूमसाहेब हे हिन्दी लोकांना राजकारण शिकवितात म्हणून त्यांस गोळी घालून ठार मारावें ! या गोष्टीस अनुलक्षून केसरीनें असें लिहिलें कीं, मुंबई गॅझेटची परंपराच अशी द्वाड आहे; व कॉंग्रेसच्या युरोपियन चालकाला जो गोळी घालील त्यानें कॉंग्रेसच्या एका स्थानिक सेक्रेटरीस कौन्सिलांत मज्जाव करण्याची सूचना केली तर त्यांत कांहीं आश्चर्य करण्यासारखें नाहीं. गॅझेटनें ही सूचना जितकी टिळकांना विरोध करण्याकरितां केली होती तितकीच ती जठारांना प्रत्यक्ष मदत

करण्याकरितांहि केली होती. कारण लोकांच्या सांगणीवरून गॅझेटनें निवडणुकीपूर्वी असें मुद्दाम लिहिलें होतें कीं, मध्यभागांतील उमेदवारांपैकीं सर्वांत सरशी होण्याजोगे जठार हे एकच उमेदवार आहेत. मुंबई गॅझेटचीं विधानें एकत्र जमेला धरल्यास गॅझेटला ही निर्वाणीची युक्ती सुचविण्याचें खापर जठारपक्षाच्या डोक्यावर केसरीनें फोडलें यांत आश्चर्य नाहीं. या मुद्यावर केसरींत ' हे सोन्याचे विचार खुद्द गॅझेटकर्त्यांच्या तोंडांतून निघाले असले तरी ' असे शब्द एका अंकांत आले आहेत. मग ' सोन्याचे ' हा शब्द द्व्यर्थी रीतीनें उपयोगांत आणला असल्यास न कळे. " सोन्याचे शब्द " याचा अर्थ मौल्यवान असा खरा, पण " सोनी नामक गृहस्थाच्या तोंडून निघालेले " असाहि असण्याचा संभव आहे. मग हे सोनी म्हणजे जठरांचे स्नेही व पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल रा. ब. विष्णु बाळकृष्ण सोहोनी हे टिळकांच्या मनांत असतील कीं काय कोणास ठाऊक ! नांवावर कोट्या करून आपलें मनोगत अशा रीतीनें टिळक केव्हां केव्हां व्यक्त करीत हें केसरीच्या वाचकांस माहीत असेलच. मुंबई गॅझेटनें वरील प्रकारची सूचना केल्यानें टिळकांचा तोटा न होतां त्यांना थोडीबहुत सहानुभूतिच मिळाली असेल. अँग्लोइंडियन पत्राची शिफारस ही निवडणुकीच्या कामीं प्रायः साधक होण्यापेक्षां बाधकच अधिक ठरते व अखेर लॉर्ड स्टँढर्स्ट यांनींहि गॅझेटच्या या सूचनेप्रमाणें आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला नाहीं हेंहि खरें. वादाच्या भरांत असली नादानपणाची युक्ति सरकारास सुचविल्याचा आरोप केसरीनें आणला व तो खरा नसला तरी त्या प्रक्षुब्ध वातावरणांत क्षणभर कित्येकांना तो खरा वाटण्याचा संभव होता. यानंतर चौदा वर्षांनीं या अधिकाराचा दुरुपयोग सरकारानें केल्याचें प्रत्यक्ष उदाहरण घडलें व याहि वेळीं नेमस्त पक्षावर असाच आरोप आला होता हें केसरीच्या वाचकांस स्मरत असेलच. सन १९०९ सालीं नरसिंह चिंतामण केळकर हे मध्यभागांतील लोकलबोर्डातर्फेच कायदेकौन्सिलाच्या निवडणुकीस उभे असून प्रत्यक्ष मतें पेटींत पडण्यास सुरुवातहि झाली होती. अशा आयत्या वेळीं गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांनीं उपरिनिर्दिष्ट अधिकाराचा उपयोग करून 'केळकर हे सरकारास अनिष्ट म्हणून कायदेकौन्सिलांत बसण्यास अपात्र' असा शेरा मारून त्यांची उमेदवारी कार्यकारी कौन्सिलच्या ठरावानें नामंजूर करून, सरकारी गॅझेटांत जाहीर केली. अर्थात् केळकरांचे प्रतिपक्षी उमेदवार हरी नारायण आपटे यांनीं तें कारस्थान केल्याचा लोकप्रवाद त्यांजवर आला. पण आपट्यांवरील हा आरोप जसा निराधार होता असें आम्हांस वाटलें, त्याप्रमाणेंच जठारपक्षावरील तेव्हांचा आरोपहि बहुधा निराधार असावा. गॅझेटची सूचना स्वतः गॅझेटकर्त्यांना सुचण्यासारखीच होती. तसेंच पुढें केळकरांची उमेदवारी नामंजूर करण्यास त्यांना आदलें वर्षी हायकोर्टाची

बेअदबी केल्याबद्दल कैदेची शिक्षा झाली होती हेंच खरें कारण, असें खुद्द गव्ह-र्नरसाहेबांनीं कित्येकांजवळ बोलूनहि दाखविलें होतें.

दक्षिणभागांतील निवडणुकीचें भांडण इतकें तीव्र नव्हतें. दाजीसाहेब खरे यांचे प्रतिपक्षी नातू व छत्रे यांनीं आपखुषीनें आपलीं नांवें परत घेतल्यामुळें खरे यांना भाटे वकील येवढेंच प्रतिपक्षी उरले. पण या दोहोंत खरे यांनाच बहुमत मिळण्याचा पुष्कळ संभव होता. उत्तरभागातर्फे सेटलवाड व गोकुळदास पारेख यांच्या दरम्यान पुष्कळच झटापट सुरू होती. पण यांपैकीं कोणीहि आला तरी सरकारशीं भांडणारा असाच येणार होता. मुंबई युनिव्हर्सिटीतर्फे मि० सेल्बी, प्रि. मॅकिकन, बॅ. फर्क पॅट्रिक व जव्हेरीलाल उमीयाशंकर याज्ञिक असे चौघे उमेदवार होते. पण जव्हेरीलाल हे लोकहितदक्ष असल्यानें त्यांनाच बहुमत मिळणारें होतें.

अखेर मध्यभागाच्या निवडणुकीचें काम ता. १८ मे रोजीं पुरें झालें व मतपत्रिकांची तपासणी झाली त्यांत टिळकांना ३५, गरुडांना २६ व रा. ब. जठार यांना अवघीं दोन मतें मिळालीं. सातारा, सोलापूर आणि नाशिक या तिन्ही जिल्ह्यांतील सर्व म्हणजे तीस मतें एकट्या टिळकांना मिळालीं. शिवाय खानदेश, पुणें, नगर या जिल्ह्यांतूनहि कोठें एक कोठें दोन अशीं मतें त्यांना पडलीं. पुण्याच्या अकरा मतांपैकीं सहा मतें गरुड यांना मिळालीं. याशिवाय खानदेशांत बारा, नगरांत आठ मिळून गरुडांची भरती झाली. पासष्टांपैकीं एक मत पडलें नाहीं व एक अग्राह्य ठरलें व बाकीच्या त्रेसष्टांचा आढावा वरील-प्रमाणें निघाला.

निवडणुकीचा निकाल जाहीर झाला तरी वादाचे ध्वनि उमटतच होते. मामले-दार मंडळींनीं अधिकाराचा दुरुपयोग करून टिळकांना मतें देवविलीं, अशी नेमस्तपक्षानें उघड तक्रार केली. ती गॅझेटमध्यें प्रसिद्ध झाल्यानें टिळकांनीं त्या पत्राला समर्पक उत्तरहि दिलें. उलट टिळकांतर्फे असें शाबीत करण्यांत आलें कीं, नाशिक व पुणें येथें कलेक्टर व असिस्टंट कलेक्टर यांनीं टिळकांविरुद्ध उघड खटपट केली. पण हा वाद पुढें फार दिवस टिकण्यासारखा नव्हता व सरकारानेंहि टिळकांची निवडणूक मंजूर केल्यानें तो कायमचाच मिटला. आजवर टिळकांच्या उद्योगीपणाची व सूत्रचालकत्वाची प्रचीति स्थानिक कारस्थानापुरतीच दिसून आली होती. पुणें शहर म्युनिसिपालिटीची निवडणूक हा त्यांना कःपदार्थ होता; व आदले वर्षी युनिव्हर्सिटीचे फेलो म्हणून त्यांची निवडणूक झाली, तींतहि त्यांना फारसे परिश्रम पडले नाहींत. बहुतेक काम टपालखात्यानेंच केलें. पण कायदे कौन्सिलच्या या निवडणुकींत मात्र वेगळा प्रकार अनुभवास आला. सामान्य जनतेच्या सहानुभूतीशिवाय इतर सर्व गोष्टी त्यांना प्रतिकूल कशा होत्या, हें वर दर्शविण्यांत आलेंच आहे. अशा वेळींही निवडणूक टिळकांनीं आपल्या उद्योग-

शक्तितेनें आणि कित्येक एकनिष्ठ मदतगारांच्या मेहनतीनेंच जिंकली. टिळकांनीं एकदां निवडणुकीस उभें राहण्याचा निश्चय केल्याबरोबर मतदारांची यादी सर्वांच्या आधीं मिळविण्यापासून तों मतपत्रिकेचा निकाल सर्वांच्या आधीं समजण्यापर्यंत त्यांची खटपट अहर्निश चालू होती. व्यक्तिदृष्ट्या जठार व गरुड यांची चपळाई व मेहनत हीं टिळकांच्या मानानें कांहींच नव्हती. निवडणुकींत टिळकांना दोन मोठे मदतगार लाभले होते. एक टिळकांचे मित्र, चित्रशाळेचे मालक वासुदेवराव जोशी व दुसरे टिळकांचे भाचे, धोंडोपंत विध्वंस. या उभयतांनीं केलेले परिश्रम व योजलेल्या हिकमती यांचीं वर्णनें ऐकून आम्हांस कैक वेळां मोठीच करमणूक झाली आहे.

ता. १२ जून १८९५ रोजीं कायदेकौन्सिलचे सेक्रेटरी एच्. डब्ल्यू. हेवर्ड यांजकडून टिळकांना त्यांची निवडणूक मंजूर झाल्याचें पत्र आलें. पुढील ऑगस्ट महिन्यांत पुण्यास कायदेकौन्सिलची पहिली बैठक झाली तिला अर्थातच टिळक हे हजर होते. या बैठकीत मुंबई इलाख्याचें अंदाजपत्रक चर्चेस निघालें होतें. हल्लींच्या मानानें त्या वेळच्या कौन्सिलांत सभासदांची संख्या थोडी असून बैठकी थोड्या होत व प्रत्येक बैठकीचे दिवसहि थोडेच असत. प्रस्तुतच्या बैठकींत पांच सभासदांनीं मिळून एकंदर ३९ प्रश्न विचारले होते. त्यांत जव्हेरीलाल याज्ञिक यांचे बारा होते. फेरोजशहा यांचे आठ, दाजीसाहेब खरे यांचे चार, टिळकांचे सहा व चिमणलाल सेटलवाड यांचे आठ होते. हल्लीं सभासदांची संख्या पुष्कळच वाढली असून एकाद्या सभासदानें दहा वीस प्रश्न विचारणें हें कांहीं अपूर्व नाहीं. सर जॉर्ज क्लार्क यांच्या कारकीर्दींत दादासाहेब करंदीकर यांनीं एकदां कौन्सिलला १०८ प्रश्नांची माळ वाहिली होती. अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा अधिकार होता खरा, परंतु तोहि फार मर्यादित असे. १८९४ सालीं ना. जव्हेरीलाल याज्ञिक हे अंदाजपत्रकावर भाषण करीत असतां लॉर्ड हॅरिस यांनीं त्यांना "तुमचें बोलणें मुद्याला सोडून आहे" असें म्हणून थांबवून उपमर्द केला होता. १८९५ चें बजेट निरस होतें तथापि आडदांड लॉर्ड हॅरिस जाऊन दिसण्यांत गरीबसे लॉर्ड सँढर्स्ट असल्यामुळें, असल्या नीरस अंदाजपत्रकांतूनहि महत्त्वाचे तत्वाचे प्रश्न उपस्थित करतां येतील असें टिळकांस वाटत होतें. पार्लमेंटमध्यें बजेटला मंजुरी द्यावी लागते. तो अधिकार नवीन ॲक्टानें दिला नव्हता हें खरें. तथापि मंजुरीखेरीजकरून इतर रीतीनें कौन्सिलांतील वादविवाद थेट पार्लमेंटसारखा होण्यास हरकत असूं नये, असें लोकनियुक्त प्रतिनिधींचें म्हणणें होतें. या सुमारास हिंदुस्थानसरकार व प्रांतिक सरकार यांच्या दरम्यान आर्थिक संबंध कसे असावे हा प्रश्न प्रामुख्यानें पुढें आला होता. नांवाला या दोन सरकारांमध्यें पांच पांच वर्षें टिकणारा एक करार म्हणून होत असे. परंतु खर्चाचा बोजा अंगावर आला असतां तो प्रांतिक सरकारच्या

अंगावर टोलविण्याची खोड वरिष्ठ सरकारास लागलेली होती. ही नाहींशी होण्यास पंचवार्षिक करार दुरुस्त करून घेतलेच पाहिजेत पण ते पाळण्याची एक प्रकारची हमीहि वरिष्ठ सरकारकडून घेतली पाहिजे असें कौन्सिलांतील सरकारी व बिनसरकारी, सर्वच सभासदांचें म्हणणें होतें. वरिष्ठ सरकारकडून अधिक उत्पन्न तोडून घेऊन तें स्वतंत्र रीतीनें खर्च करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास आधीं मिळवावा मग व तो खर्च कसा करावा याविषयीं आपापसांत भांडत बसावें हेंच धोरण अर्थात योग्य होतें. टिळकांनीं आपल्या भाषणांत याच मुद्यावर विशेष चर्चा केली. १८७० सालीं पंचवार्षिक कराराची पद्धति प्रथम सुरू झाली. तेथपासून चार पंचवार्षिक करार संपून पांचव्याचें हें चौथें वर्ष सुरू होतें. टिळकांनीं १८७० च्या पूर्वीचे जमाखर्चाचे आंकडे घेऊन असें दाखविलें कीं, या पंचवीस वर्षांत मुंबई इलाख्याचें उत्पन्न साडेपांच कोटी वाढलें व प्रजेला त्रास होणाऱ्या बाबींचें उत्पन्न अदमासाबाहेर फैलावलें. पंचवार्षिक करारांच्या मूळ हेतूंप्रमाणें हा वाढावा मुख्यतः लोकोपयोगी कामांकडे खर्च होण्यास पाहिजे होता. पण तो तसा न होतां गैरवाजवी कामावर उधळपट्टी झाली आणि खातेवार खर्च वाढून बसला व जें थोडें उत्पन्न उरलें होतें तें हिंदुस्थानसरकार घेऊन बसलें. शिवाय आपल्या भाषणांत जंगलखातें व अबकारी खातें यांच्या कारभारावर टिळकांनीं विशेष टीका केली होती. पंचवीस वर्षांत जंगलखात्याचें उत्पन्न २४ लक्ष वाढलें, पण त्याच्या उलट खर्चहि एकवीस लक्ष वाढला. म्हणजे सरकारास फक्त तीन लक्ष रुपयांची ऐन बचत होण्याकरितां लोकांस २५ लक्ष रुपये अधिक द्यावे लागले. अबकारी खात्यांत प्रतिवर्षीं दुकानांची संख्या कांहीं-तरी कमी करावी मग त्यांत उत्पन्न तुटलें तरी हरकत नाहीं असें टिळकांनीं सुचविलें होतें. पण तेव्हांहि हल्लींसारखेच जबाब सरकारी अधिकाऱ्यांकडून दिले जात. एक प्रकारची सूचना अमलांत आणण्यास कठीण असली तरी सरकारानें दुसरी सुचवावी पण कोणीकडून तरी सूचना करणाऱ्याचा हेतु तडीस जाईल अशी व्यवस्था सरकारनें करावी. पण अशा गोष्टींचा शांतपणें कौन्सिलांत विचारच होत नाहीं, असा तेव्हांचाहि अनुभव होता. तात्पर्य, कौन्सिलांत होणाऱ्या कामाबद्दल टिळकांची आदरबुद्धि नव्हती व त्यांनीं कौन्सिलच्या कामास मधून मधून 'फार्स' अशीहि संज्ञा दिल्याचें आढळतें. तरी कौन्सिलांत शिरणें हेंहि इतर कामांबरोबरच राजकीय चळवळ करणारांचें एक काम आहे असें त्यांचें स्पष्ट मत असून त्यांनीं तें स्वतः व्यवहारांतहि आणिलें होतें. ता. २१ जानेवारी १८९६ च्या केसरींत खालील वाक्य आढळतें. "कायदेकौन्सिलची सभा ही एक प्रकारची थट्टाच आहे असें वाटल्याशिवाय राहणार नाहीं. गेल्या कौन्सिलच्या बैठकींत एकंदर काम सुमारें पाऊणतास चाललें होतें. तितक्या अवकाशांत वीस प्रश्नांचीं उत्तरें, कांहीं कागदांचें वाचन, आणि एका बिलाचा मसुदा मंजूर करणें हे सर्व

विधि उरकून घेण्यांत आले. 'यथा यक्षस्तथा बलिः' या न्यायानें टिळकांनीं या बैठकींत फक्त तीनच प्रश्न विचारिले होते. पण ९५-९६ च्या दरम्यान त्यांनीं पंचवार्षिक करारावर एक विस्तृत म्हणजे सुमारें पन्नास पानांचा निबंध लिहिला. त्यांत वर दर्शविलेल्या टीकेच्या धोरणास अनुसरून त्यांनीं झाडून प्रत्येक खात्याचा आढावा काढून, जमा कशी वाढली, खर्च कसा वाढत गेला व या दोहोंतहि प्रजेच्या हिताकडे दुर्लक्षच कसें झालें हें तपशीलवार दाखविलें होतें. धनगर जसा पाळलेल्या मेंढयांचे अंगावरील लोकर कांहीं ठराविक मुदतीनंतर कात्रीनें कातरून घेतो, त्याप्रमाणें वरिष्ठ सरकारची वर्तणूक प्रांतिक सरकारासंबंधानें असते असें त्यांनीं या निबंधांत सिद्ध केलें आहे. हा निबंध सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाच्या १८९६ सालच्या एप्रिलच्या अंकांत प्रसिद्ध झालेला आहे. तो टिळकांनीं लिहिला असें त्यावर नांव नाहीं. पण याच विषयावर याच त्रैमासिक पुस्तकांत रा. ब. रानडे यांनीं असेच चार लेख लिहून पूर्वीच्या चारहि पंचवार्षिक करारांचें सूक्ष्म निरीक्षण केलें होतें. रानडे यांच्या लेखावरहि नांव नाहीं. परंतु पूर्वीचे चार लेख रानड्यांचे व हा पांचवा टिळकांचा ही गोष्ट परिचितांस माहीत आहे. शिवाय याचें एक गमक असें आहे कीं, १८९६ च्या एप्रिलांत सार्वजनिक सभेच्या अधिकारमंडळांत क्रांति झाली असून गोपाळराव गोखले यांनीं त्रैमासिकाचें काम सोडून दिल्यावर टिळकांच्या सूचनेवरून सार्वजनिक सभेनें त्या कामावर महादेव राजाराम बोडस हायकोर्ट वकील मुंबई, यांची नेमणूक केली होती. सभेंतील क्रांतीनंतरचा हा पहिलाच अंक असून त्यांतच टिळकांचा हा उत्कृष्ट निबंध आला असल्याकारणानें सभेच्या कामांत कोणत्याहि रीतीनें कमीपणा आला असें लोकांस वाटलेंच नाहीं. रानडे करूं शकले, तें मीहि करीन अशी धमक टिळकांच्या अंगीं होती यामुळें रानड्यांच्या हातांतील संस्था आपल्या हस्तगत करण्याचा हुरूप त्यांस वाटत असे. याच सालीं (१८९६) दुष्काळ पडल्यामुळें शेतसाऱ्याच्या तहकुबीचा व सुटीचा प्रश्न जोरानें पुढें आला व या बाबतींत टिळकांनीं सार्वजनिक सभेमार्फत केवढी चळवळ केली याची माहिती आम्हीं वेगळी देणारच आहों. येथें इतकेंच सांगावयाचें कीं, कायदेकौन्सिलांत गेल्यामुळें ना० सभासद बाहेरच्या चळवळीला नालायख होतात अशी जी कित्येक लोकांची समजूत आहे ती टिळकांनीं या चळवळीनें पूर्णपणें खोडून काढलेली आहे. उलट एकादी चळवळ करणारा मनुष्य कौन्सिलांत असल्यास त्याच्या बाहेरच्या चळवळीला मदतच होते, व रंगरूप येतें असेंच त्यांनीं सिद्ध केलें. यामुळें कायदेकौन्सिलें ही एक थट्टा आहे असें वाटत व म्हणत असतांहि ते शक्य तेथवर कौन्सिलांत निवडून येण्याचा उद्योग करीत होते. १८९७ च्या मे महिन्यांत पूर्वीच्या निवडणुकीची मुदत संपल्यानें फिरून टिळक हे मध्यभागच्या लोकलबोर्डातर्फे निवडणुकीस उभे राहिले व याहि वेळीं

फिरून त्यांना धुळ्याचे धोंडो शामराव गवड हेच प्रतिपक्षी उभे राहिले. या वेळची निवडणूक पूर्वीपेक्षांहि टिळकांना अधिक सोपी गेली, व केसरींत या विषयासंबंधाचा वाद फारसा आढळत नाहीं. या खेपेस केसरींतून कायदेकौन्सिलच्या बाबतींत दक्षिण भागांत दाजीसाहेब खरे, उत्तरभागांत सेटलवाड व दक्षिणेंतील सरदारांतर्फे बाबासाहेब घोरपडे इचलकरंजीकर यांची तरफदारी टिळकांनीं केलेली आढळते. उत्तर भागांत चिमणलाल सेटलवाड यांस म्युनिसिपालिटींतील अधिकारी वर्गानें कसून विरोध केला. यामुळें व पूर्वींच्या निवडणुकींत मध्यभागाच्या कित्येक जिल्ह्यांतून खुद्द कलेक्टरांदिकांस मतदार निवडल्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांनीं कौन्सिलच्या निवडणुकींत कितपत भाग घ्यावा किंवा त्यांस मत तरी असावें कीं नाहीं हा प्रश्न उपस्थित झाला. श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांच्या निवडणुकींत टिळकांकडून त्यांना पुष्कळच मदत झाली. व दोघांचें यावेळीं पुष्कळच सख्य होतें. पण –९७ च्या खटल्यापासून पुढें सर्वच गाडें बदललें. या नव्या निवडणुकीत टिळकांस किती मतें मिळालीं हें माहित नाहीं. परंतु खुद्द पुण्याचा असा कोणी प्रतिपक्षी उमेदवार नसल्यामुळें एक खानदेश सोडून बाकी अनेक जिल्ह्यांत टिळकांना फारशी खटपट केल्याशिवाय बहुमत मिळालें. ता. २३ जून १८९७ रोजीं कायदेकौन्सिलचे सेक्रेटरी मि. बॅचलर यांनीं तुमची निवडणूक सरकारनें मान्य केली आहे असें टिळकांना कळविलें. याहि वेळीं सरकारनें ही निवडणूक मान्य करूं नये असा मुंबईच्या टाइम्स वगैरे पत्रांनीं वाद उपस्थित केला होता. व पूर्वींच्या दोन वर्षांतील टिळकांची धामधूम लक्षांत घेतां सरकाराला आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करावयाचा असता तर त्याला त्यांना पूर्वीहून अधिक सबल कारणें सांपडलीं असतीं याविषयीं शंका नाहीं. परंतु सरकारनें तसें केलें नाहीं. येवढेंच नव्हे तर या बाबतींत एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी दिसते कीं, ता० २२ जून रोजीं रात्रीं पुण्यास गणेशखिंडीजवळ रॅन्ड साहेबांचा खून झाला असतां त्याच्या दुसऱ्या दिवशीं कौन्सिल सेक्रेटरींनीं वरील पत्र लिहिलें आहे. मात्र कदाचित् असेंहि असेल कीं, टाइम्सनें काढलेल्या शंकेचा निकाल गव्हर्नरसाहेबांच्या कार्यकारी कौन्सिलानें रॅंडसाहेबांच्या खुनाच्या आदले आठवड्यांत केलेला असल्यामुळें कौन्सिलच्या ठरावाची अंमलबजावणी करण्याच्या अनेक मामुली कामांत सेक्रेटरी बॅचलर साहेब यांनीं हेंहि काम पत्रावर सही करून निकालांत काढलें असेल. खुनामुळें सरकारची टिळकांसंबंधींची दृष्टी बदलली यांत शंका नाहीं व म्हणूनच त्यांच्यावर खटला भरण्यांत आला; व खुनानंतर कांहीं दिवसांनीं विचारास म्हणण्यापेक्षां विकारास अधिक वेळ मिळता तर कदाचित् निवडणूक नामंजूर करण्याचाहि ठराव कौन्सिलनें केला असता. पण पुढील महिन्यांत टिळकांवर खटला झाल्यामुळें टिळकांनीं आपण

होऊनच कौन्सिलच्या जागेचा राजीनामा दिला आणि अशा रीतीनें सरकारच्या ठरावानें व्हावयाचें तें स्वतः टिळकांनींच घडवून आणलें; व त्यांची ही दुसरी निवडणूक झाली तरी फुकट गेली.

टिळक कैदेंतून सुटून आल्यावर त्यांनीं १८९९ सालीं फिरून एक वेळ कौन्सिलांत शिरण्याचा प्रयत्न केला. पण यावेळीं परिस्थिति सर्व प्रकारें बदलून गेली होती. एक तर त्यांच्यावरील खटल्यानें त्यांचे बिनसरकारी स्नेहीहि मेद-रून गेले होते. मग सरकारी नोकरींत असणाऱ्या स्नेह्यांची स्थिति विचारा-वयासच नको. राजद्रोही मनुष्याला अप्रत्यक्ष कां होईना पण मदत म्हणजे तो एक प्रकारचा राजद्रोहच होय; व कोणाबद्दल असा यत्किंचितहि संशय येता तर त्याला बडतर्फी ठेवलेलीच होती; यामुळें लोकलबोर्डांत टिळकांकरितां मतें मिळ-विणें हें काम अतिशय कठीण होऊन बसलें होतें. निवडणुकीच्या नियमांत, कैदेची शिक्षा हें कोणासहि उमेदवार होण्यास बाधक व्हावें, अशी व्यवस्था केलेली असती तर तिचा फायदा घेऊन सरकारनें त्यांच्या उमेदवारीच्या गळ्यास प्रथ-मच नख लाविलें असतें. नियमांत तसा अधिकार नसल्यामुळेंच लोकमताची फिरून एक वेळ परीक्षा पहावी अशी कल्पना टिळकांस सुचली, व म्हणूनच ते उभे राहिले. पण त्यांना प्रतिकूल असणाऱ्या कारणांत आणखी एका गोष्टीची भर पडली. ती ही कीं, यावेळीं गोपाळराव गोखले हे स्वतःच नेमस्त पक्षातर्फें उमेदवार म्हणून निवडणुकीस उभे राहिले. १८९५ च्या निवडणुकीस जठार हे उभे राहिल्यानें गोखले हे बाजूस सरले. परंतु पुढच्याच वर्षी ते रॉयल कमिशनपुढें साक्ष देण्याकरितां वाच्छा, सुरेन्द्रनाथ बानर्जी वगैरेबरोबर विलायतेस गेले; व त्यांची साक्ष इतकी चांगली झाली कीं, मुंबई कौन्सिलांत प्रवेश होण्याच्या त्यांच्या पात्रतेविषयीं कोणासच शंका उरली नाहीं. १८९७ च्या एप्रिल, मे महिन्यांत ते पुण्यास असते तर एरवींहि टिळकांस प्रतिपक्षी उमेदवार म्हणून तेच उभे राहिले असते. पण या निवडणु-कीच्या वेळीं गोखले विलायतेंत होते. पुढें टिळकांच्या जागीं गरुड यांची नेमणूक होऊन गेली. ती १८९९ पर्यंत टिकली. दरम्यान गोखले परत आले. पण विलायतेंत केलेल्या कांहीं विधानांसंबंधानें ते येतांच त्यांना माफी मागावी लागली; व त्याचा परिणाम इतका विपरीत झाला कीं १८९७ सालीं उमरावतीस भरलेल्या राष्ट्रीय सभेंत त्यांचें भाषण कोणी ऐकून घेणार नाहीं म्हणून त्यांनीं कोणत्याहि विषयावर भाषण केलें नाहीं. यामुळें पुढें एक दीड वर्षभर गोखले हे एक प्रकारच्या अज्ञातवासांत होते. पण हरप्रयत्नांनीं त्यांची नाउमेद दूर करून गोखल्यांना सार्वजनिक कार्यांत पुढें आणलेंच पाहिजे असा त्यांचे गुरु व पुरस्कर्ते न्या० रानडे यांनीं निश्चय केला; व तो योग्यच होता. गोखले यांच्या चरित्रक्रमास फिरून सुरुवात होण्याला नव्या निवडणुकीचा आलेला

प्रसंग ठीकच होता. टिळक, गोखले यांचें हें युद्ध प्रत्यक्ष सुरू झालें असतें तर पुष्कळच रंगलें असतें, ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. परंतु टिळकांच्या शिक्षेमुळें त्यांचे पूर्वीचे पुरस्कर्ते कच खाणार हाच अंदाज खरा ठरला. खानदेशाखालोखाल मतदारांचा मोठा गड्डा सातारा जिल्ह्यांत होता; व येथें टिळकांना पूर्वीप्रमाणेंच आधार मिळता तर त्यांनीं आपला नॉमिनेशन पेपर पाठविण्याचा विचार केला असता. परंतु नव्या परिस्थितींत त्यांना पहिला धक्का साताऱ्यासच बसल्यामुळें त्यांना लोकमताचा ठाव लागला व त्यांनीं आपला नॉमिनेशन पेपरहि पाठविला नाहीं. दुसरें हेंहि एक कारण खरें कीं, या खेपेस निवडणुकीला उभें राहावें अगर न राहावें याचा टिळकांना निश्चय एकदम न झाल्यानें त्यांचे कांहीं दिवस विचारांत गेले व या संधिकालांत गोपाळराव गोखले हे पुढें येऊन आपली उमेदवारी जाहीर करून व जिल्हानिहाय शिफारसपत्रें घेऊन त्यांनीं मतें मिळविण्याचा उद्योग जोरानें सुरू केलाहि होता. यामुळें कित्येकांच्या बाबतींत टिळकांनीं उशीरानें पुढें येणें ही खरोखरीची अडचण झाली असली तरी कित्येकांना तें एक निमित्त झालें. पूर्वीच्या निवडणुकींत मदत केलेले टिळकांचे एक कट्टे स्नेही टिळकांच्या दुसऱ्या एका स्नेह्यास खालीलप्रमाणें लिहितातः—" हा विषय नाजुक आहे खराच. तरीपण स्वच्छपणें लिहिणें जरूर आहे. स्वतः टिळकांनीं उभें राहण्याचा निश्चय केल्याचें तुमचे लिहिण्यांत नाहीं. याचा अर्थ मी असा करतों कीं, सरकारानें टिळकांना निवडणुकीस कसे उभे राहता ते राहा असें एक प्रकारें आव्हान दिलें आहे, अशी भावना करून घेऊन टिळकांना उभें रहा असा आग्रह करणारा एक मोठा मित्रवर्ग पुढें आला असून मुख्यतः त्याचीच ही खटपट सुरू आहे. स्वतः आम्हांस तसें वाटत नाहीं. पण वरील मित्रवर्गाचें म्हणणेंच खरें धरलें तरी दुसराहि एक विचार आहे तो असा कीं, टिळक उशीरां पुढें आल्यानें निवडून न आले तरी टीकाकार असेंच म्हणणार कीं, लोक त्यांना अनुकूल नाहींत म्हणूनच ते निवडून आले नाहींत. शिवाय टिळकांचें नांव पुढें न आल्यानें ज्यांनीं प्रो. गोखले यांना आधींच वचन देऊन टाकिलें आहे त्यांची वाट काय? म्हणून आमची अशी विनंति आहे कीं, अशा आयत्यावेळीं निवडणुकीस उभें राहण्याचा आग्रह तुम्ही टिळकांस करूं नये, अशी या मित्रवर्गाला तुम्ही विनंति करावी. याच्या उलट असेंहि म्हणतां येईल कीं, अशाहि बिकट परिस्थितींत टिळक निवडून आले तर तें यश अधिकच उज्ज्वल दिसणार नाहीं काय? पण ही विचारसरणी घातक म्हणून तुम्ही टाकून द्यावी. ते एकटे एकच उमेदवार उभे राहतील अशी व्यवस्था आधीं करतां आली असती, तर सरकार व लोकमत यांची खरी कुस्ती पहावयास सांपडली असती. पण तें आतां अशक्य आहे. शिवाय रा. ब. पाठक हे येथें पेनशन घेऊन राहिल्यापासून त्यांनीं गोखले यांच्याकरितां फारच खटपट चालविली आहे. त्यांनीं मागितलेल्या

त्या माफीशिवाय त्यांच्याविरुद्ध दुसरें कांहीं तरी तुम्हास दाखवितां येतें काय ? असा प्रश्न ते जेव्हां टाकतात तेव्हां कित्येक लोक निरुत्तर होतात. प्रो. गोखले हल्लीं येऊन रावबहादुरांच्याच घरीं उतरले आहेत व अनेकांना त्यांच्याविषयीं सहानुभूति वाटते. म्हणून हें पत्र तुम्ही टिळकांस दाखवा व फार उशीरा ते पुढें आल्यानें आमची स्थिति मोठी विकट झाली आहे असें त्यांस कळवून, उमेदवार न होण्याचाच सल्ला आमच्या वतीनें तुम्ही त्यांना द्या." असो; टिळकांना उभे रहा म्हणून आग्रह करणारे जसे अनेक लोक होते तसेच त्यांनीं इतक्या उशीरां पुढें येऊं नये व निवडून न येण्याचा धोका पत्करूं नये असा प्रांजल सल्ला देणारेहि कांहीं होते. कारण फिरून १८९६ चा सामना म्हणजे टिळक विरुद्ध गरुड विरुद्ध पुण्यांतील नेमस्तपक्षाचा प्रतिनिधि असाच तिरंगी सामनाप्राप्त झाला होता. पण परिस्थितीनें थोडी उलट खळी होती. यामुळें टिळकांनीं आपला नॉमिनेशन पेपरहि पाठविला नाहीं व गोपाळराव गोखले हे बहुमतानें निवडून आले.

टिळक व कायदेकौन्सिलें यांचा संबंध येथें संपला. यापुढें त्यांनीं कौन्सिलच्या निवडणुकींत प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष भाग घेतला नाहीं. गोखले अवघे दोनच वर्षे मुंबई कौन्सिलांत होते व त्यानंतर ते एकदम वरिष्ठ कौन्सिलांत गेले. इकडे त्यांचे जागीं हरी सिताराम दीक्षित सॉलिटर हे चार वेळां लोकल बोर्डातर्फे निवडून आले. त्यानंतर १९०९ सालीं न. चिं. केळकर, द. ना. आपटे, धोंडो शामराव गरुड यांचे चिरंजीव सि. धों. गरुड असे तिघे उभे होते. परंतु सरकारानें केळकरांवर बहिष्कार घालून त्यांची उमेदवारी रद्द केली व गरुड यांस बहुमत मिळून अखेर ते निवडून आले व पुढेंहि अनेक वर्षे तेच निवडून येत. विलायतेहून परत आल्यावर १९२० सालीं सुधारलेल्या कौंसिलाच्या पहिल्या निवडणुकी होण्याच्या वेळीं काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी स्थापन करून आपल्या पक्षाचे होतील तितके उमेदवार निरनिराळ्या कौन्सिलांतून निवडून यावे अशाविषयीं टिळकांची खटपट सुरू झाली होती व सदर पार्टीची उद्देशपत्रिका त्यांच्याच नांवें प्रसिद्ध झाली. तथापि स्वतः निवडणुकीस उभें राहण्याचें त्यांनीं मनांतहि आणलें नाहीं. १९२० च्या मे महिन्यांत पुण्यास टिळकांना पर्स फंड नजर करण्याकरितां गायकवाड वाड्यांत त्यांच्या मित्रमंडळींची मोठी सभा भरली होती. त्या प्रसंगीं अनेक लोकांनीं त्यांना वरिष्ठ कायदेकौंसिलांत निवडून येण्यास उमेदवार म्हणून उभे राहण्याबद्दल अत्यंत आग्रह केला. तथापि या खटपटींत स्वतः करितां केव्हांहि पडावयाचें नाहीं असा त्यांच्या मनाचा निश्चय असल्यामुळें त्यांनीं तो आग्रह जुमानला नाहीं व तुम्ही सर्व कायदेकौंसिलांत जा म्हणजे मी गेल्यासारखाच झालों असें सांगून त्यांनीं तो प्रसंग संपादून नेला.

टिळक व मुंबई कायदेकौन्सिल यांच्या संबंधाविषयीं एकच लहानशी गोष्ट सांगून हें प्रकरण संपवूं. टिळक मुंबईस वारल्यानंतर एक दोन आठवड्यांत पुण्यास

कायदे कौन्सिलची सभा भरली होती. त्या वेळीं ना० बेळवी यांनीं टिळकां-विषयीं दुःखप्रदर्शनार्थ एक ठराव मांडण्याची नोटीस दिली होती. परंतु गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड यांनीं ती मुदतींत नाहीं अशा सबबीवर अग्राह्य म्हणून फेटाळून लावली. अर्थात् मृत्यूच्या मुदतीची ही सबब शुष्क होती. पण गव्हर्नर-साहेबांस टिळकांच्या गुणांची चर्चा कौन्सिलांत व्हावी हें खपलें नाहीं हेंच खरें. पुढें टिळकांच्या एक दोन स्नेह्यांची समजूत काढतांना गव्हर्नर साहेब म्हणाले, "टिळकांचें शव चौपाटीवर दहन करण्याचा लोकोत्तर मान मी दिला त्या अर्थीं टिळकांना मी सर्वस्वीं प्रतिकूल होतों असें नाहीं."

टिळक हे कायदेकौन्सिलांत असतां त्यांनीं काय कामगिरी केली याचा विचार, त्यावेळीं कौन्सिलांतून काय काम करितां येणें शक्य होतें या एकांगी दृष्टीनेंच केला पाहिजे. या दृष्टीनें पाहतां असें दिसतें कीं, त्यांच्या दोन वर्षांच्या मुदतींत झालेल्या दोन बजेटांवरील चर्चेत प्रांतिक राज्यकारभारावर टीका करण्यास जेवढा वाव होता तेवढी, व त्या वेळीं प्रचारांत असलेल्या पद्धतीनें, त्यांनी टीका केलीच. पण दादाभाई, याज्ञिक, वाच्छा, गोखले यांच्या उदाहरणानें आंकडेगिरीची जी श्रेष्ठ प्रकारची म्हणून टीका मानण्यांत येत असते तिचाहि टिळकांनीं पूर्ण उपयोग केला होता. टिळकांच्या दोन वर्षांच्या अवधींत विशेष वादग्रस्त अशीं बिलें पुढें आलीं नव्हतीं, व त्यावेळीं चर्चेकरितां ठराव पुढें मांडण्याची परवानगी नव्हती हें प्रसिद्ध च आहे. अशा वेळीं आंकडेगिरीला सहजच महत्व येतें. आणि प्रांतिक पंचवार्षिक करारांचें सिंहावलोकन करून, रानड्यांच्या लेखांशीं बेमालूम सांधा जोडणारा जो फडनिशी लेख सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत टिळकांनीं लिहिला, त्यावरून त्यांच्या आंकडेगिरीचें ज्ञान पूर्ण मान्यता पावलें. एवंच कौन्सिलांतील कोणाहि नामांकित सभासदाप्रमाणेंच त्यांचेंहि या दोन वर्षांतील काम झालें. पण कौंसिलांतील कामापेक्षांहि बाहेरच्या चळवळीवर त्यांचा भर विशेष असल्या-कारणानें फक्त या चळवळींच्या तीक्ष्णतेच्या मानानें कौन्सिलांतील त्यांचें काम सौम्य वाटतें इतकेंच कायतें. राष्ट्रीय चळवळीचें राजकीय फळ कायदे-कौन्सिलांच्या द्वारेंच पदरांत पाडून घ्यावें लागतें हें त्यांचें तत्व ठरलेलें असल्या कारणानें ते कौन्सिलांत तर शिरलेच, पण केवळ तेथील चळवळीनें त्यांनीं समाधान मात्र मानिलें नाहीं, ही गोष्ट त्यांच्या व्यापक धोरणाला धरूनच होती. टिळकांच्या वेळीं लोकनियुक्त सभासदांचें बहुमत कौन्सिलांतून नव्हतें. तें असतें तर त्यांनीं थेट अडवणुकीपर्यंत मजल नेली असती. याविषयीं कोणास शंका नाहीं. आणि पुढें तें लाभण्याचा संभव दिसला म्हणूनच त्यांनीं १९१९ चा सुधारणांचा कायदा अपुरा वाटत असतांहि लोकांना कौन्सिलांत शिरण्याचा जोरानें उपदेश केला.

---

## भाग १९ वा

# दोन नवे राष्ट्रीय उत्सव

## ( १ ) श्रीगणपत्युत्सव

एकाच राष्ट्रीय भावनेचीं अनेक अंगें असूं शकतात. देशभाषेची सुधारणा व वृद्धी, स्वकीयांच्या इतिहासाचें संशोधन, जुन्या साधूसंतांच्या परंपरेची उपासना, ऐतिहासिक थोर पुरुषांचें चरित्रवर्णन, तेजस्वी भावनांचें काव्यद्वारां निवेदन, परंपरागत यात्रा, उत्सव, संमेलनें यांची अभिवृद्धी वगैरेंच्या द्वारानें राष्ट्रीय किंवा उपराष्ट्रीय बुद्धि व भावना प्रकट व दृढहि होते व वरील सर्व उद्योगांचा परिणाम राजकीय स्वरूपाची राष्ट्रीय भावना जागृत करण्याकडे होतो. महाराष्ट्राला जुनी ऐतिहासिक परंपरा शेंकडों वर्षांची आहे. या परंपरेचा शिवाजी-महाराजांच्या वेळीं जास्तींत जास्त विकास होऊन पेशवाईअखेर तिचा जास्तींत जास्त संकोच झाला. इंग्रजी राज्यांतील पाहिल्या पांचपन्नास वर्षांत महाराष्ट्राच्या राष्ट्रीय भावनेवर अनेक बाजूंनीं राख उधळली गेली. या अवधींत मराठे नामशेष झाले व ब्राह्मण इंग्रजी शिक्षणाच्या मागें लागून सरकारी नौकरींत शिरूं लागल्यामुळें त्यांची राष्ट्रीय भावना अर्थात् मलीन झाली. या अवधींत महाराष्ट्रांतील मुसलमान तर अगदींच हतबल झालेले असून त्यांनीं कोणत्याही दिशेनें आपलें डोकें वर काढण्याचा प्रयत्न केला नाहीं पण अन्तर्मुख व संकोचवृत्तीच्या ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराच्या प्रयत्नांनीं मोठाच आघात होण्याचा संभव प्रथम प्रथम तरी दिसूं लागला.

हिंवाळ्यांत जशी झाडाझुडांची वाढ खुंटून तीं स्तिमित होऊन राहतात पण या अवधींत त्यांनीं शोषण केलेलीं जीवनद्रव्यें पुढच्या वृद्धीला कारणीभूत होऊन वसंतऋतु प्रादुर्भूत होतांच त्यांचें नवजीवन कोमल अंकुरांच्या रूपानें प्रत्येक शाखेवर दिसूं लागतें, त्याचप्रमाणें इंग्रजी अंमलाच्या पहिल्या पांच पन्नास वर्षांत महाराष्ट्राच्या जुन्या वैभवाचा पालापाचोळा गळून पडल्या-वर नव्या शिक्षणाच्या रूपानें जें खतपाणी महाराष्ट्राच्या बुद्धीला मिळालें होतें त्याचा परिणाम नवीन वाङ्मय, नवीन संस्था, नवीन उद्योग यांच्या रूपानें दिसूं लागला. महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रें, शिक्षणसंस्था व राजकीय सभा ही राष्ट्रभावनावृक्षाची नवीन पालवी होय. श्रीगणपती—उत्सव, श्रीशिवाजी—उत्सव यांना थोड्या उशीरानें प्रारंभ झाला असला तरी या पालवींतच या उत्सवांचीहि गणना केली पाहिजे. या दोन उत्सवांना दूषण देणारांनीं त्यांच्या उत्पत्तीची जबाबदारी टिळकांच्या माथ्यावर ठेविली. कायद्याच्या दृष्टीनें ही निर्णायक स्वरू-

याची कबूली होय, व हे दोन उत्सव ज्यांना इष्ट वाटतात त्यांना त्यांचें श्रेय टिळकांकडे देण्याला या कबुलीचाच पुरावा पुरे आहे.

चिरोल साहेब आपल्या सुप्रसिद्ध पुस्तकांत लिहितातः—" आपल्या राजकीय चळवळीस धर्माचा पाठिंबा असला म्हणजे चांगलें या उद्देशानें हिंदुस्थानांतील अत्यंत लोकप्रिय देव जो गणपति तो आपल्या सर्व चळवळींचें आदिदैवत करण्याची क्लृप्ति टिळकानें लढविली. वस्तुतः गणपति हा देव हिंदूलोकांचा विघ्नाधिपति असून ग्रंथांच्या पहिल्या पानावर त्याचें चित्र घालण्यानें त्यांना मोठा आनंद होतो. खेड्यांत किंवा हमरस्त्याच्या बाजूला दगडास शेंदूर फांसून कसातरी आकार आणलेल्या गणपतीचें देऊळ नाहीं अशी गोष्ट सहसा व्हावयाची नाहीं. गणपतिउत्सवाची नवीन टूम काढून गणेश मंडळ्या स्थापन करून व तरुण तालिमबाजमंडळींचे मेळे तयार करून लोकांवर आपली छाप बसविण्याची युक्ती टिळकांनीं काढली ती अद्वितीय होती......गणपतिउत्सवामुळें टिळकांच्या चळवळीचें क्षेत्र फारच विस्तृत झालें." शिवाजीउत्सवासंबंधानेंहि चिरोलसाहेबांनीं अशीच कबूली दिली आहे; ते लिहितातः—"मराठेमंडळीस आपल्या बाजूला आणण्याचें काम टिळकांस अद्यापि करावयाचें होतें. म्हणून ज्या शिवाजीनें मुसलमान लोकांचा पराभव करून महाराष्ट्रांत हिंदुपदपातशाहीची स्थापना केली त्याचा जन्म एका मराठ्या सरदाराच्या कुळांत झाला असल्याकारणानें त्याच्या पराक्रमाचे पवाडे गाऊन शिपाईबाण्याचे जे मराठे लोक, त्यांच्या मनांत इंग्रजी राज्याविषयीं असलेलें प्रेम नाहींसें करून त्याना आपल्या बाजूला वळवून आणण्याच्या उद्योगास टिळक लागला. कांहीं लोकांचा असा तर्क आहे कीं, एका इंग्रज गृहस्थानें वर्णिलेल्या रायगडावरील शिवाजीच्या समाधीच्या शोचनीय स्थितीची हकीकत वाचूनच टिळकाच्या मनांत प्रथमतः कल्पना आली कीं, शिवाजीउत्सव सुरू करून त्याचा फायदा राजकीय चळवळीस करून घ्यावा... कसेंहि असो, टिळकानें शिवाजीला पुढें आणून मोठी 'राष्ट्रीय' धामधूम सुरू केली व सन १८९५ सालीं महाराष्ट्रांत सर्व मुख्य ठिकाणीं शिवाजीच्या जन्मदिवसानिमित्त उत्सव करण्यांत आले."

या दोन उताऱ्यांवरून या दोन्ही राष्ट्रीयउत्सवांच्या सुरवातीचें यश टिळकांनाच दिलें पाहिजे हे शत्रुपक्षाच्या कबूलीवरूनहि उघड होतें. तोबऱ्याला तोंड पुढें तर लगामाला मागें कां अशी एक म्हण आहे. तिचेंच परिवर्तन करून आम्ही असें म्हणतों कीं, या दोन राष्ट्रीय उत्सवांपासून महाराष्ट्राच्या राष्ट्रीय बुद्धीला जर फायदा झाला असेल तर, अशा उत्सवाकरितां टिळकांनीं आपणांवर खटले करून घेतले व तुरुंगवास सोसला, त्या अर्थी "लगामाला जर पुढें ओढणार तर तोबऱ्याला कां मागें ढकलणार?" असें कोणी कां विचारूं नये? व तानें या नवीन राष्ट्रीय घटनांच्या यशाची माळ टिळकांच्या गळ्यांत कां घालूं नये?

असो; प्रथम आपण गणपतिउत्सवच घेऊं. हा उत्सव जुना येवढेंच नव्हे तर अत्यंत थाटानें पूर्वींहि होत असे ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. परंतु तो उत्सव थोड्या निराळ्या म्हणजे विशेष प्रकारच्या सामुदायिक रीतीनें सुरू केला ही एक गोष्ट, व हिंदुमुसलमानांच्या दंग्यास सुरुवात झाल्यानंतर तो सुरू केला ही दुसरी गोष्ट, या दोहोंतच टिळकांच्या "क्लृप्तीचें" वैशिष्ट्य आहे. जुन्या थाटमाटांत टिळकांच्या हातून भर पडली असें म्हणतां येत नाहीं. कारण हल्लीं कोणी कितीहि आरास केली तरी, पूर्वीं अनेक राजवाड्यांतून स्वतः राजेलोक हौसेनें उत्सव करीत असतां जो थाट, समारंभ, रोषनाई व आतषबाजी उडे तिची सर चार मध्यम प्रतीच्या पेठकर मंडळींनीं केलेल्या उत्सवाला कशी येणार ? पण जुनें राजवैभव व तेज व्यक्तिमात्रांतून निघून हल्लीं सामान्य जनतेंत विखुरलेलें असल्यामुळें त्या जनतेलाच सामुदायिक रीतीनें उत्सवांत भाग घेण्यास लावणें हाच या बाबतींतला जीर्णोद्धार होय; व जे सामान्य लोक या उत्सवांत पडत नव्हते, व पडले तरी सामुदायिक भावनेनें पडत नव्हते, त्यांच्याकडून त्या भावनेनें टिळकांनीं उत्सव सुरू करविला यांतच त्यांचें शहाणपण व चतुराई दिसून येते.

जुन्या काळीं राजेरजवाडे उत्सव करीत तेव्हां दहा दहा दिवस उत्सव चालत, रंग सफेती लावून वाडे शृंगारले जात, हत्ती घोडे शिपाई प्यादे यांच्यासह मिरवणुकी निघत, व मंडपांत गाणें बजावणें पुराण कीर्तन लळितें सोंगें वगैरे प्रकार होत आणि समाराधना होऊन दक्षिणा-देणग्या दिल्या जात ही गोष्ट प्रसिद्ध आहे. तसेंच गणपतिपूजन हें उत्सवाच्या रूपानें ज्याच्या त्याच्या दर्जाप्रमाणें हिंदुसमाजांतील यच्चयावत जाती करीत; हेंहि सर्वांस विदित आहे. या बाबतींत टिळकांनीं कांहीं नवीन केलें नाहीं पण सार्वजनिक विसर्जन व मेळे ही रचना नवीन होती. १८९३ च्या गणपत्युत्सवांत म्हणजे मुंबईतील हिंदुमुसलमानांच्या दंग्यांनंतर सुमारें सहा आठवड्यांनीं गणपतिउत्सव सुधारून वाढविण्याची कल्पना प्रथम निघाली. या गोष्टीचा उल्लेख आम्हीं मागील एका भागांत केलाच आहे. "यंदा येथें गणपति पोंचविण्याचा समारंभ सालाबादपेक्षां निराळ्या तऱ्हेनें होऊन त्यांस बरेंच सार्वजनिक स्वरूप आलें आहे." हें त्या सालच्या केसरीच्या १९ च्या अंकांतील वाक्य हेंच गणपत्युत्सवाचें बीजवाक्य किंवा उगमस्थान होय. हिंदूंच्या वेगळ्या सभा भरवून दंग्यासंबंधाचें स्पष्ट मत जाहीर करण्याची चळवळ सुरू असतां एके दिवशीं, टिळक नामजोशी वगैरे मंडळी बाबामहाराजांच्या वाड्यांत जमली व तेथें उत्सवास नवीन वळण देण्याची कल्पना निघून मुक्रर झाली. या मंडळींतील गणपतराव घोटवडेकर वगैरे लोक कट्टे गाणपत्य असून ते पूर्वीपासूनच हा उत्सव करीत असत. बाळासाहेब नातू वगैरे जुन्या मताची मंडळी अर्थातच या गोष्टीस अनुकूल होती. टिळक हे स्वतः मोठेसे आचारमार्गी नसले तरी त्यांच्या घरीं गणपति आणून पूजीत. या ब्राह्मण मंडळींना दगडू शेट हलवाई, भोरकर

वकील, बैद्योया तरवडे, गावडे पाटील, भाऊसाहेब रंगारी वगैरे ब्राह्मणेतर मंडळी हौसेनें मिळाली व पहिल्याच सालच्या उत्सवास नमुनेदार स्वरूप आलें.

पुढच्या सालीं उत्सव अधिक थाटाचा होऊन, मूर्ती, मेळे वगैरेंची संख्या पुष्कळच वाढली. दरम्यान ताबुतांवर बहिष्कार घालण्याची चळवळ बळावल्यानें शिलकी पडलेल्या उत्सवप्रियतेचा फायदा गणपतीसमारंभाला मिळाला यांत आश्चर्य नाहीं. १८९४ च्या उत्सवाचे दिवस "सुवर्णाच्या अक्षरांनीं नोंदण्यासारखे गाजले." बहुधा प्रत्येक आळीला एक एक गणपति बसला होता. त्यांतील कित्येक मूर्ती फार प्रेक्षणीय होत्या. आरास व चित्रेंहि प्रेक्षणीय झालीं होतीं. अगदीं झगझगीत मखमलीच्या पोषाखापासून तों साध्या शुभ्र वस्त्रांपर्यंत सर्व प्रकारचे पोषाख दिसत होते. हातांतील चित्रविचित्र काठ्या, ठेक्यानें पडणारें मेळेवाल्यांचें पाऊल, गायकांचा मधुर आवाज, अनेक रसांनीं ओथंबलेलीं गाणीं, मराठ्यांची वीरश्रीयुक्त कवाईत, निशाणांची गर्दी वगैरे गोष्टी आतां पुण्यांतील लोकांच्या परिचयाच्या झाल्या असल्यानें त्याचे आज कौतुक वाटत नाहीं, तेव्हां तें खचित वाटण्यासारखेंच होतें. तसेंच गणपतिविसर्जनाच्या मिरवणुकीचा थाट आतां अगदीं तोंडपाठ झाला असल्यामुळें त्याची अपूर्वाई वाटत नाहीं हें खरें; पण सुमारें तीस वर्षांपूर्वी प्रथमच सार्वजनिक समारंभ झाला त्या वेळीं जो प्रकार प्रथमच लोकांनीं पाहिला तो वर्णन करण्यासारखाच कोणालाहि वाटला असतां. १८९४ सालच्या गणपतिविसर्जनाचें जें वर्णन केसरींत आलें आहे त्यांतील दहा पांच ओळी खालीं देत आहों. त्यावरून या समारंभाची परंपरा कशी अखंड चालली आहे हें दिसून येईल.

"दोन वाजले. पूर्वसंकेताप्रमाणें नेमलेल्या ठिकाणीं आळोआळीचे गणपति रेमार्केटाकडे येऊं लागले. आसपासच्या खेडेगांवांचे गणपतिहि येऊन दाखल झाले. त्या सर्वांचें वर्णन कोण करूं शकेल ! जिकडे दृष्टी फेकावी तिकडे गणपतीचेंच दर्शन होत आहे; चोहींकडून 'गणपतीबाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या' असा ध्वनि कर्णपथावर आदळून गगनमंडळ भेदून जात आहे; सर्वांच्या मस्तकीं मंगलसूचक गुलाल शोभतो आहे; टिपऱ्यांचे लेजिमींचे, घुंगुरांचे, चौघड्यांचे व सनयांचे भिन्न भिन्न स्वरसंमेलनानें मनावर चमत्कारिक परिणाम उत्पन्न होत आहे; रेमार्केटापासून अप्पाबळवंताच्या गेटापर्यंत प्रेक्षकांचे थवेच्या थवे असल्यामुळें पाऊल ठेवावयासहि जागा मिळत नाहीं; रस्त्यावरील माड्या, छपरें, कौलारें गजबजून सजीव झालेलीं दिसत आहेत, असा कादंबरीकारांस मात्र कल्पनागम्य देखावा प्रत्यक्ष पाहिल्यानंतर तेथें गेलेल्या प्रेक्षकगणास अनिर्वाच्य प्रेमानंद झाला व सर्व भक्तगणांस धन्यता वाटली यांत कार्य आश्चर्य ? स्वारींत अघाडीवर कसब्याचा गणपति व सर्वांच्या पिछाडीस श्री. बाबामहाराज यांचा गणपति असे होते. वाटेनें मंगलमूर्ती मोरयाचा ध्वनि, गुलालाचा धुमाकूळ,

आणि वस्ताद्यांचा वर्षाव, असा समारंभ सुमारें सहा वाजण्याचे सुमारास लकडी-पुलाजवळ पोंहोंचला. वाळवंटावर लेझीम, पट्टा, भजन इत्यादि व्यवहार होऊन मग गणपतींचें विसर्जन झालें व मंडळी आलेल्या थाटानेंच परत फिरली. येणें-प्रमाणें यंदांचा समारंभ फारच प्रेक्षणीय झाला. पूर्वी पेशव्यांचे वेळेस जे गणपति निघत होते व हल्लीं बडोदें, सांगली वगैरे ठिकाणीं जे समारंभ निघतात त्यांच्या बरोबरीचा हा समारंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं."

उत्सवावर मुख्य आक्षेप तेव्हां कोणते घेतले जात असतील याची कल्पना कोणासहि करितां येईल. आज उत्सव सुरू आहे. पण आक्षेपक कंटाळल्यामुळें किंवा पुनरुक्तीनें आक्षेप पोंचट झाल्यामुळें ते आतां फारसे ऐकूं येत नाहींत इतकाच फरक. उत्सव नुसत्या ब्राह्मणांचा या आक्षेपास तर जागाच नव्हती. कारण त्यांत इतर जातींचाच भरणा फार होता. उत्सवाला राजकीय स्वरूप होतें हा आक्षेपच होऊं शकत नाहीं. कारण उत्सव राष्ट्रीय भावनेनें सुरू झाला होता व राष्ट्रीय भावनेंत राजकारणाचा समावेश उघडच होतो. ज्याची कोणी नाक-बूली देईल तोच आक्षेप होऊं शकतो. मुसलमानांच्या चढेलपणाच्या वृत्तीमुळेंच कांहीं अंशीं हा उत्सव हातीं घेण्याची कल्पना सुचली, व जे हिंदु लोक ताबुतांची पूजा करितात त्यांना सलोख्यानें वागवून घेण्यास मुसलमान लोक तयार नस-ल्यानें, हिंदूंना ताबुतांपासून परावृत्त करावें, व उत्साहनिवृत्त केलेल्या या लोकांना स्वधर्माशीं संबंध असलेली अशी कांहीं तरी नवीन करमणूक मिळवून द्यावी, असा टिळकांचा बोलून चालून उद्देशच असल्यामुळें त्याहि दृष्टीनें आक्षेपास जागा नव्हती.

हिंदु लोक आपल्या देवतांचा नवीनच कां होईना उत्सव करूं लागल्यास त्यांत मुसलमानांना राग येण्याचें काय कारण? टिळक मधून मधून उत्सवाच्या जुन्या परंपरेची केसरीच्या वाचकांस आठवण करून देत होते; पण ती इत-क्याच करितां कीं, मुसलमानांसंबंधाची मनांतील तेढ न लपवितांहि, आपण कांहींतरी द्वेषमूलक असें भलतेंच कृत्य करीत नाहीं, तर जुनीच गोष्ट फक्त अधिक नांवारूपाला आणीत आहों येवढेंच दर्शविण्याकरितां. अठरापगड जातींचा अशिक्षित समाज, एकत्र सामील व्हावयास पाहिजे तर तो टिळकांसारख्या पुढा-ऱ्यानें कां होईना, पण अगदींच कांहीं नवीन सोंग उभें केलें तर तें कसें पत्क-रील. तात्पर्य; जुना आधार व नवा संस्कार मिळून हा उत्सव बनविलेला होता हेंच आक्षेपकांना सरळ उत्तर होतें.

उत्सव धार्मिक म्हटला तरी भक्तीचें मान कमी असा आक्षेप होऊं शकतो. पण कोणत्याहि उपासनेला समारंभाची जोड मिळाली म्हणजे त्यांत--उदाहरणार्थ रामनवमीच्या गोकुळअष्टमीच्या समारंभांत-जितका भक्तीचा भाग सामा-न्यतः असतो तितका यांत होता. पदांवरील आक्षेपांस उत्तर हें कीं, उत्सवाच्या

निमित्तानें साऱ्या कवींचें रान एकदमच फुललें, त्यांत कविता बरी असणार व वाईटहि असणार. 'टला' ट व 'पला' प जुळविणाऱ्या कवींना कवित्वाची हौस आली तर तिला नको कोणी म्हणावें? कवि जसे अनेक दर्जाचे तसे श्रोतेहि! जे ते आपापल्या आवडीप्रमाणें हवे ते निवडून घेतच असतात. त्याबद्दल दुसऱ्यांची तक्रार काय म्हणून? पदांत राजद्रोह घडला किंवा व्यक्तींची बेअब्रू झाली तर त्याचा इलाज करण्याला कायदेशीर मार्ग आहेत. शेवटीं एकच आक्षेप उरतो कीं, हा उत्सव टिळकांनीं सुरू केला म्हणून तो आम्हांस त्याज्य वाटतो! अर्थात् या आक्षेपाला उत्तर देण्याचें कारणच नाहीं. एकंदरीनें तो किती लोकांना ग्राह्य वाटला व कितींना त्याज्य वाटला या संख्याप्रमाणानेंच त्याचे गुणदोष ठरविले पाहिजेत. कसेंहि असो, हा राष्ट्रीय उत्सव सुरू केल्यानें टिळकांनीं जितके लोक तोडले, त्यांपेक्षां सहस्रपट लोक जोडले यांत शंका नाहीं. शिवाय जे तोडलेसे वाटतात, तेहि आधीं अर्धवट तुटलेलेच होते.

या उत्सवाची टूम पुण्यांतच काय पण बाहेरहि लोकांनां पुष्कळ पसंत पडली. मुंबई, कोल्हापूर, सातारा, नगर, धुळें वगैरे अनेक ठिकाणीं पुण्याच्या नमुन्यावर तावडतोब उत्सव सुरू झाले. १८९६ च्या उत्सवाच्या प्रसंगीं उत्सवाला राष्ट्रीय महोत्सवाचें स्वरूप येऊं लागल्याचा उल्लेख केसरीनें केला आहे. शेंकडों ठिकाणांहून उत्सवाचीं पत्रें आलीं; मालेगांव, नागपूर, बेझवाडा, पुलगांव, धारवाड, हुबळी, रत्नागिरी वगैरे गांवचीं नावें लक्षांत घेतां उत्सवाची व्याप्ती समजून येते. मुंबईस डॉ. देशमुख, दाजीसाहेब खरे, दिवाणबहादूर मणिभाई, रावबहादूर पितळे वगैरे मंडळी हिंदूंच्या वेगळ्या सभा भरविण्यास प्रतिकूल होती, तीहि आतां उत्सवांत सामील झाली. कित्येक ठिकाणीं जुने उत्सव चालू असतां टिळकांच्या स्पर्शदोषांमुळें त्याला नवीन हरकती घेण्यांत येऊं लागल्या. बडोद्यास अधिकारी समर्थ हे सुधारक असल्यामुळें, त्यांनीं उत्सवास मुद्दाम हरकत घेतली. बडोद्यास गणपतिविसर्जनाचा समारंभ फार जुना. खुद्द रेसिडेंटसाहेबालाहि महाराजांबरोबर या समारंभास पायीं जावें लागे. पहिल्या सयाजीरावांच्या वेळीं रेसिडेंटानें जाण्याचें एकदां नाकारलें, तेव्हां हक्काचा प्रश्न उपस्थित होऊन गणपति तसाच पडून राहिला. आणि दहा वर्षांनीं महाराजांसारखा निकाल झाल्यावर रेसिडेंटला पायीं बरोबर घेऊन, दहा वर्षांचे गणपती एकदम विसर्जनाला काढले! असें असतांहि माधवराव समर्थ यांनीं या सालीं मिरवणुकीस हरकत घेतली, पण तीहि पुढें निघाली. इतर कोठें मुसलमानांच्या हरकती नवीन उपस्थित होऊं लागल्या. तळेगांवास सरदार दाभाड्यांबरोबर तेथील मुसलमानांनीं दाभाड्यांचा गणपती घेऊन मशिदीवरून वाद्यें वाजवीत जावें असा फार वर्षांचा प्रघात होता; पण यंदां त्यांनीं हरकत घेतली. तात्पर्य निरनिराळ्या विरोधि भावनांनीं, निरनिराळ्या ठिकाणीं, निरनिराळ्या प्रकारची हरकत येऊं लागली.

परंतु एकंदरीनें उत्सवाचें पाऊल तेव्हांपासून जें पुढें पडलें तें मागें आलें नाहीं. या उत्सवांत दोष नाहींत असें कोणाहि म्हटलें नाहीं. परंतु हिंदुसमाजाला या उत्सवाची एक नवीन जोड करून दिल्यानें, राष्ट्रीय भावनेचें एक अंग किंवा उपांग अधिक सुदृढ झालें हें कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं.

गणपतिउत्सवासंबंधानें १८९६ सालीं प्रतिपक्षांना उद्देशून टिळकांनीं जी केसरीत टीका केली, ती टीकेच्या समर्पकतेप्रमाणें भाषेच्या उज्ज्वलतेच्या दृष्टीनेंहि वाचकांनीं वाचण्यासारखी असल्यामुळें, त्यांतील एक उतारा खालीं देत आहों. " धर्मबुद्धि ज्याच्या मनाला शिवत देखील नाहीं, जडाच्या पलीकडे ज्यांची बुद्धि जाऊंच शकत नाहीं त्या अभागी व्यक्तींची कींव करण्यापलीकडे आम्हांस त्यांच्यासंबंधानें कांहींच म्हणावयाचें नाहीं. श्रीमंगलमूर्तीच्या महोत्सवाचे वेळीं दिवाभीतांप्रमाणें ह्या दोन-चार मंडळींनीं खुशाल आपल्या खोलींत दडून रहावें. परंतु आम्ही " पाषाणी-पूजक " नाहीं असें केवळ लिहून दाखविणारांनीं मंदिरांत, अथवा डोळे मिटून झाल्यावर परत घरीं आल्यानंतर रामभजन करणाऱ्यांनीं, महाराष्ट्राच्या या राष्ट्रीय महोत्सवाचे वेळीं आपल्या बुद्धिसामर्थ्यानें लोकांस साहाय्य करण्यास पुढें कां सरसावूं नये ? आपल्या कृतींनीं सामान्य जनांचा हे थोडक्याशा अंशीं तरी निष्कारण बुद्धिभेद करीत आहेत, हें यांना उमगत नाहीं काय ? सर्व पृथ्वीतल प्रथम स्वच्छ सपाट करून मग आपणास फायदेशीर अशा पर्वतांच्या रांगा व नद्यांचे ओघ उत्पन्न करण्याच्या खटपटीला कोणी लागला तर त्याला काडीचेंहि यश यावयाचें नाहीं हें उघड आहे. पूर्वीपासून प्रवर्तित जें चक्र तें तसेंच कालदेशावर नजर देऊन पुढें चालविणें हाच शहाण्याचा रस्ता आहे. डाव्या कानशिलास उजव्या हातानें वळसा देऊन तोंडांत घांस ढकलण्याइतक्या हास्यास्पद ".प्रम-दाक्नां " च्या कल्पना लोकांपुढें मांडण्यापेक्षां, आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस भक्ति ज्ञान मनोरंजन ह्या सर्वांपासून उत्पन्न होणारे फायदे एकदम करुन देणाऱ्या राष्ट्रीय महोत्सवाचे वेळीं देह व बुद्धि जरा झिजविली असतां, लेखणीद्वारेंच केवळ पंढरिनाथाचे भक्त म्हणून फडकणाऱ्या मंडळीनें आपलें थोडेंबहुत तरी कर्तव्य बजावल्यासारखें होईल. असले राष्ट्रीय उत्सव जागृत राखणें व नसल्यास नवे प्रचारांत आणणें हा राष्ट्रीयत्व कायम ठेवण्याचा एक उत्तम मार्ग आहे, व आमच्या सुशिक्षित मंडळीनें त्याची अनास्था करूं नये, अशी त्यांस विनंति करून आजचा लेख संपवितों. "

वरील उताऱ्यांत निव्वळ अधिक्षेप भरलेला असून तोही अर्थात् जशास तसें या नात्याचाच होय हें, त्या वेळचे सुधारक सुबोधपत्रिका वगैरे वर्तमानपत्रांचे लेख वाचले असतां कळून येईल अशी आमची समजूत आहे. पण ता. १ सप्टेंबर व ८ सप्टेंबर १८९६ या दोन तारखांच्या अंकांत "राष्ट्राय महोत्सवांची आवश्यकता" "राष्ट्रीय महोत्सवांचे वेळीं सुशिक्षितांनीं काय केलें पाहिजे" या मथळ्याखालीं केसरीनें

जे लेख लिहिले ते विचारपरिप्लुत व वाचनीय आहेत. गणपत्युत्सवाच्या नवीन चळवळींचा समारोप व भावी शिवजयंत्युत्सवाची प्रस्तावना असेंच त्या लेखांचें स्वरूप आहे. या लखांत प्रथम ग्रीस देशांतील ऑलिंपियन महोत्सवाची माहिती दिली आहे. तोहि देवतेचाच एक उत्सव होता. त्या ठिकाणीं कवि, पंडित, वीर, मुत्सद्दी, साधुसंत सर्व जमत. अनेकप्रकारची चर्चा व अनेकप्रकारचे खेळ होत. राष्ट्रीय बहुमान मिळविण्याचा तो एक प्रसंग होऊन राहिला होता; व ग्रीशन लोकांची मोडलेली घडी या उत्सवानें फिरून बसविली असें त्याचें वर्णन इतिहासकार करतात. पिथियन जत्रेंत ललितकलांची उपासना होई. निमियन उत्सव हा लष्करी पेशाच्या लोकांचा होता. रोमन लोकांची सर्कस हा एक महोत्सवच असे. क्रूसेडस् नामक धर्मयुद्धें होण्यापूर्वी खिस्तजयन्तीलाहि वीर्यपोषक अशाच उत्सवाचें स्वरूप होतें. आयरिश लोकांना राष्ट्रीय भावना जागृत करण्याला 'तारा' येथील जत्रा फार उपयोगी पडल्या, इत्यादि परदेशासंबंधाची माहिती देऊन नंतर आपल्या इकडील मोठे यश, सत्रें, कालप्रियनाथ देवाच्या निमित्त भरणाऱ्या जत्रांसारख्या मोठ्या जत्रा, व वारकऱ्यांच्या वाऱ्या वगैरे उत्सवांची माहिती कालानुक्रमानें दिली आहे. व शेवटीं मुंबईंत हुताशनीप्रीत्यर्थ निघणाऱ्या वरघोड्यानें सुद्धां उत्सवप्रिय अशा समाजाची जी करमणूक होते तिची देखील प्रशंसा करून, असलीं कार्यें उत्सवच करूं जाणत, तीं वर्तमानपत्रेंहि करूं शकत नाहींत असा आपल्या धंद्याकडे थोडा कमीपणाहि केसरीनें घेतला होता.

दुसऱ्या लेखांत कांहीं जुने सण व उत्सव आतां उद्वेगकारक वाटतात म्हणून कसे टाकून दिले पाहिजेत व त्यांचे जागीं नवीन उत्सव कसे आणले पाहिजेत याचें मुद्देसूद विवेचन केलें आहे. निदान ठिकठिकाणीं पूर्वापार होणाऱ्या उत्सवांचा फायदा तरी घ्यावा असें सुचवून, पर्वती चिंचवड चाफळ अशा ठिकाणीं चालकांनीं व लोकांनीं मिळून उत्सवांची दिशा नवी आंखावी असें सुचविलें आहे; व सुशिक्षितांनीं या संधीचा फायदा घेऊन जुन्या लोकांशीं एकजीव होऊन आपलें शिक्षण व नव्या कल्पना यांचा फायदा लोकांस करून द्यावा असेंहि सुचविलें आहे. समाज तरला तरच सुशिक्षित लोकहि तरतील, प्रार्थनासमाजाच्या मंदिरांत भक्तिभावाचे पोवाडे गात बसण्यापेक्षां, एखाद्या गणपतीच्या मंडपांत भक्तिमहात्म्याचें वर्णन रानड्यांसारख्यांनीं केलें, किंवा चाफळच्या उत्सवांत त्यांनीं रामदासांवर व्याख्यान दिलें तर त्यानें अधिक कार्य होईल असें सुधारकांनांहि सुचविलें आहे.

## (२) श्री शिवाजी उत्सव.

गणपत्युत्सवाप्रमाणें शिवाजी उत्सव हाही कांहीं एका निमित्तानें पुढें आला. वास्तविक उत्सवाला मिळालेलें निमित्त इतर निमित्तांइतकेंच होतें. पण टिळकांचें चातुर्य तें हेंच कीं, हें लहानसें निमित्त घेऊन त्यांनीं शिवाजीउत्सवाची कल्पना केसरीत

लेख लिहून व तिला बाहेरील चळवळीची जोड देऊन थोड्याच काळांत अतिशय नांवारूपाला आणून चिरस्थायी करून सोडली. या चळवळीचा वृत्तांत थोडक्यांत असा आहे. या चळवळीपूर्वी दहा वर्षे म्हणजे १८८५ सालीं, रायगड येथील शिवाजीमहाराजांच्या समाधीच्या जीर्ण स्थितीचा उल्लेख कांहीं कारणानें वर्तमानपत्रांतून पुढें आला. हा उल्लेख कुलाबा जिल्ह्यांतील जंगलखात्याच्या एका इंग्रज अधिकाऱ्यामुळें आला! रायगडचा किल्ला सरकारी जंगलाच्या हद्दींत समाविष्ट आहे. १८८५ त मॉन्युमेंट्स आक्ट (ऐतिहासिक वस्तुसंरक्षणाचा कायदा) झालेला नव्हता, तरी सर्व किल्ला, किल्ला म्हणून व जंगलची हद्द म्हणून सरकारच्या ताब्यांत होता. किल्ल्याबरोबर किल्ल्यांतील समाधीहि आलीच. पेशवाई अखेर रायगड किल्ल्यावर वस्ती व सरकारी शिपाईप्यादे रहात असत. १८१८ पासून म्हणजे पेशवाई नष्ट झाल्यापासून, वरील वस्ती बिलकुल मोडली व नुसतें जंगल माजलें. तथापि हें जगल तुडवीत रायगडचा इतिहासप्रसिद्ध किल्ला पाहण्याला लोक दर वर्षी जात असत. कोणच्याही चौकस गव्हर्नरानें हा किल्ला पहावयाचा ठेवलेला नसावा. सर रिचर्ड टेंपल हे मुंबईचे गव्हर्नर असतां ते हा किल्ला पहावयास गेले होते. या प्रसंगाचें मोठें बहारीचें वर्णन पुढें सुमारें वीस वर्षांनीं टाईम्स ऑफ इंडिया पत्रांत ए. टी. सी. या सहीनें, जुन्या आठवणी लिहिणाऱ्या एका इंग्रजानें केलें होतें.

बहुधा हे ए. टी. सी. म्हणजे आर्थर क्राफर्ड साहेबच असावे. त्यांनीं टाइम्सला लिहिलेल्या पत्रांना Stray leaves from my note book ( माझ्या टिपणवहींतील सुटीं पानें )असा मथळा असून रायगडसंबंधीं हें पत्र त्यांतील ३६ वें आहे. टेंपलसाहेब गव्हर्नर असल्यावेळीं, क्राफर्डसाहेब हे रेव्हेन्यू कमिशनर, व डॉ. वाटर्स व क्यापटन पिट हे त्यांच्याबरोबर गेले होते. क्राफर्ड साहेब लिहितात "रायगडावर गेल्यानंतर टेंपलसाहेब समाधीच्या चौथऱ्यावर चढले व त्यांना इतकी स्फूर्ती झाली कीं, आपल्या कल्पनाशक्तीची भरारी दोनशें वर्षे मागें नेऊन समाधीजवळच्या जागेवर पूर्वी केव्हां भरला असेल अशा एखाद्या शिवाजीच्या दरबाराचें काव्यमय वर्णन त्यांनीं केलें. नंतर फिरून शिवाजी मृत्यु पावतांच संभाजीनें आपल्या सावत्र आईचा केलेला छळ, तिनें उलट त्याला दिलेला शाप वगैरे अद्भुत देखावे वर्णन करून, शेवटीं टेंपलसाहेब म्हणाले " वरील दोन देखाव्यांचीं चित्रें जगांतील अनेक देशाचे चित्रकार जे इकडे येतात त्यांनीं अवश्य काढावीं अशी मी शिफारस करतो. पण " गस्ताव दोरे " या चित्रकाराशिवाय इतर कोणास हीं चित्रें काढणें साधेल असें मला वाटत नाहीं. या प्रसंगीं टेंपलसाहेबांनीं रायगडावरील देखाव्याचीं अनेक चित्रें पेन्सिलीनें काढून घेतलीं. जातांना डागडुजीकडे पूर्णपणें लक्ष ठेवण्याविषयीं मला तर त्यांनीं निक्षून सांगितलेंच, पण आजवर खुद्द तुमच्या जिल्ह्यांत

असणाऱ्या असल्या इतिहासप्रसिद्ध स्थळाची डागडुजी ठेवण्याकडे तुमचें लक्ष कसें गेलें नाहीं, अशा अर्थाचें एक कडक पत्रहि त्यांनीं कुलाब्याच्या कलेक्टरला लिहिलें."

पुढें सात आठ वर्षांनीं रायगडावरील समाधीचा विषय फिरून लोकांपुढें आला. या वेळीं कुलाबा जिल्ह्याच्या जंगलच्या अधिकाऱ्यानें टेंपलसाहेबांच्या या हुकमाचा फायदा घेऊन, मुंबईसरकाराकडे लिहून, समाधीच्या दुरुस्तीला कांहीं मंजुरी मिळावी अशी विनंति केली. त्याचा उल्लेख वर्तमानपत्रांतून झाल्यामुळें या विषयाची जाहीर चर्चा होऊं लागली. डग्लससाहेबांनीं मुंबई इलाख्यासंबंधीं एक पुस्तक प्रसिद्ध केले, त्यांतहि या समाधीच्या दुःस्थितीविषयीं उल्लेख होता. १८८५ सालीं गोविंद बाबाजी जोशी वसईकर, ग्रंथकार व उपदेशक, हे बडोद्यास असतां त्यांना ही चर्चा वाचून आपण अद्यापि रायगड पाहिला नाहीं याविषयीं वाईट वाटलें व ३ एप्रिल रोजीं ते रायगडास गेले. तेथील सर्व स्थिति पाहून या विषयावर त्यांनीं एक पुस्तकच लिहिलें. तें पुढें १८८७ मध्यें त्यांनीं छापवेलें. डग्लससाहेबांनीं आपल्या पुस्तकांत शिवाजीची समाधि महाराष्ट्रांतील लोकांनीं आजवर अशा दुःस्थितींत राहूं दिली याबद्दल फार नांवें ठेविलीं होतीं. जोशी यांच्या मनाला ही गोष्ट फार लागली. डग्लससाहेबांनीं कोल्हापूर व सातारा येथील छत्रपतींचे वंशज व पेशवे, यांना तर दोष दिलाच होता; पण सामान्य लोकांपैकींहि कोणी या समाधीच्या दुरुस्तीकरितां एक रुपयाहि कधीं दिला नाहीं असें म्हटलें होतें. या दूषणानें जोशी यांना स्फूर्ती तर झालीच पण एक रुपयाच्या वर्गणीच्या उल्लेखानें सामान्य लोकांकडून वर्गणी जमवून, राजेलोकांच्या मदतीची अपेक्षा न धरतां, हें कार्य आपणच पुढाकार घेऊन करावें अशी कल्पना त्यांना आली असें दिसतें. या विषयावर कांहीं कविताहि आपल्या पुस्तकांत त्यांनीं दिल्या होत्या. जोशी यांनीं के. जनार्दन नांवाच्या एका शिल्पज्ञ इंजिनियराकडून, समाधीवर छत्री बांधण्याला लागणाऱ्या कामाचें तपशीलवार अंदाजपत्रकहि तयार केलें होतें. या छत्रीच्या खर्चाचा अंदाज ४५०४६ रु. इतका झाला होता. रायगडावरून परत येतांच जोशी यांनीं मुंबईचे 'नेटिव्ह ओपीनियन' वगैरे वर्तमानपत्रांतून याविषयीं लेख लिहिले होते व त्याच सालच्या (१८८५) डिसेंबर १५ च्या केसरींत लॉर्ड रे यांनीं समाधीच्या जीर्णोद्धाराचें काम सरकारांतून व्हावें अशी शिफारस केल्याची बातमी देऊन, याबद्दल त्यांना धन्यवादहि दिलेले आढळतात. शिवाय सालिना पांच रुपयांची मंजुरी समाधीवरील किरकोळ सफाईकरितां मंजूर करण्यांत आली होती. पण या चळवळीचा शेवट तेथेंच झाला. किरकोळ कांहीं वर्गणी प्रत्यक्ष तेथेंच जमूं लागली होती, असेंहि वर्तमानपत्रांतील कांहीं उल्लेखांवरून दिसून येतें. पण या चळवळीला चांगलें स्वरूप येण्याला आणखी दहा वर्षें लागलीं.

१८९४ सालीं ता. २० एप्रिल रोजीं मुंबईचे सुप्रसिद्ध पार्शी लेखक आर. पी. करकेरिया यांनीं प्रतापगडचा किल्ला या विषयावर मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीपुढें, एक मुद्देसूद व माहितीनें भरलेला निबंध वाचला. प्रतापगडच्या किल्ल्याचा इतिहास म्हणजे त्यांत अफजुलखानाच्या वधाची गोष्ट आलीच. यापूर्वी अफजुलखानाच्या वधासंबंधानें इंग्रज इतिहासकारांनीं एकतर्फी मत लिहून ठेविलें होतें. त्यांचा मुख्य भर मुसलमानांनीं लिहिलेल्या हकीगतींवर असून ग्रांट डफ यानें दिलेल्या हकीगतींचेंहि, त्यांनीं विवेकबुद्धीनें परिशीलन केलेलें नव्हतें. आजपर्यंतची समजूत अशी कीं, शिवाजीमहाराजांनींच अफजुलखान यास थापा देऊन, भुलवून प्रतापगडावर भेटीस बोलाविलें, व तेथें त्याचा कपटानें खून केला. पण करकेरिया यांनीं अनेक आधार घेऊन या निबंधांत असें सिद्ध केलें कीं, शिवाजीस जिता अगर मेला धरून आणण्याची प्रतिज्ञा, अफजुलखानानें विजापूर दरबारीं केलेली असल्यामुळें भेटीचें आमिष दाखवून कपट करण्याची बुद्धि अफजुलखान यासच प्रथम सुचणें स्वाभाविक होतें. व भेटींतहि प्रथम त्यानेंच शिवाजीचें डोकें आपल्या खाकेंत धरून, त्यावर तरवार चालविली व मगच शिवाजीनें आपलें हत्यार चालवून अफजुलखानास मारलें. पूर्वी इतिहासकार स्कॉट वेअरिंग, यानें मराठे लोकांच्या या राजाला न्यायबुद्धि दाखविली होती व नवीन इतिहासकारांनींहि हे दोन्ही वृत्तांत तुलनात्मक बुद्धीनेंच पाहिले पाहिजेत.

१८९५ च्या एप्रिल महिन्याच्या अखेरीस केसरींतून शिवाजीच्या स्मारकावर लेख येण्यास सुरुवात झाली. "शिवाजीचें नांव तुम्ही गाजवा हें पद्य आमच्या कानीं पडल्यास बरेच दिवस झाले. परंतु त्यांतील अर्थाप्रमाणें उपदेश घेऊन काम करतांना कोणीहि आढळत नाहीं." अशी प्रस्तावना करून केसरी लिहितो कीं, "मराठ्यांचे हितशत्रु लॉर्ड हॅरिसाहेब हे देखील शिवाजीच्या पराक्रमाचें वर्णन करीत असतात. त्यांचे वंशज व सरदार हे स्मारकाची कांहींच खटपट करीत नाहींत त्या अर्थीं त्यांचें जिणें व्यर्थ होय." डग्लससाहेबांनीं समाधीचें वर्णन खालील शब्दांनीं केलें होतें. "समाधीचा अंतर्भाग झाडाझुडपांनीं व्याप्त केला आहे. धर्मशाळेच्या फरसबंदींतून मोठमोठे वृक्ष वाढले आहेत व त्याजवळील देवालयाची धाण झाली असून त्यांतील मूर्ती जमिनींवर फेकून दिली आहे. सिंक्लेअरसाहेबांच्या शिफारशीवरून मुंबईसरकारनें सालिना पांच रुपये मंजूर केले ते, इंग्रज परकी हें लक्षांत घेतां पुष्कळच होत. पण संस्थानिकांनीं व सामान्य लोकांनीं ढिलाई सोडून, जागोजाग सभा भरवून फंड जमा करण्याची तजवीज करून, जगास आपली कृतज्ञता दाखविली पाहिजे."

पण पत्रांतून हा उपदेश सुरू होण्यापूर्वीच खाजगी प्रयत्न सुरू झाला होता व केसरीकडे वर्गण्या येण्यास नंतर लौकरच सुरवात झाली. ता. ३० एप्रिलच्या अंकांत एका विद्यार्थ्यानें खानेसुमारीच्या आधारें हिशेब करून तीन कोटी हिंदु

लोक तरी या स्मारकास वर्गणी देणारे मिळावे व तसें झाल्यास एक एक पैसा म्हटला, तरी चार लक्ष अडसष्ट हजार सातशें पन्नास रुपये जमतील, असा ठराविक हिशेब करून स्वतःचे दोन आणे पाठविले ! महाड रायगडाजवळच असल्यामुळें तेथील लोकांनीं पुढील सालापासून खुद्द रायगडावर जाऊन शिवाजी उत्सव साजरा करण्याचा बेत प्रसिद्ध केला. याच तारखेच्या अंकांत स्मारकाकरितां जमणाऱ्या वर्गणीची पोंच, केसरीतून दिली जाईल असें प्रसिद्ध होतांच लहानसहान वर्गण्या येण्यास सुरवात झाली. ता. ७ मे च्या केसरींत स्मारकासंबंधीं एक कमेटी नेमून तिजमार्फत पद्धतशीर काम करण्याचा विचार जाहीर झाला. ता. १४ मे च्या अंकांत रायगडच्या एका वारकऱ्यानें गडाच्या वाटेनें आणि वरती प्रवाशांकरितां काय सोयी झाल्या पाहिजेत याची माहिती दिली. पण आपण करतों हें एक प्रकारें मनोराज्य आहे अशी भीतीहि त्यानें व्यक्त केली होती. दुसऱ्या एका गृहस्थानें लिहिलें कीं, संस्थानिक लोकहि या कामीं लक्ष घालीत आहेत. आपण इचलकरंजीकर बाबासाहेब घोरपडे, यांजवळ गोष्ट काढतांच त्यांनीं सालिना १०० रुपये उत्सवाची व्यवस्था समाधीकरितां करून देण्याचें कबूल केलें. ता. २१ मेपासून केसरींत आणे पै वार फंडाची पोंच प्रसिद्ध होऊं लागली व ती इतकी जागा व्यापूं लागली कीं, "केसरींतील जाहिरातीच्या प्रत्येक ओळीस जो दर आहे त्यापेक्षां कमी वर्गणी देऊन ती जागा अडवूं नये" अशी वर्गणीदारांना नाजूक सूचना द्यावी लागली.

ता. २८ मेच्या अंकांत या विषयावर कांहीं कविताहि आल्या. एका मराठा विद्यार्थ्यानें संस्थानिकांचा निषेध करून असें लिहिलें कीं, "ज्यानें स्वराज्य स्थापनेकरितां व धर्मसंरक्षणाकरितां समशेर विद्युल्लतेसारखी चमकावून महा पराक्रम केले त्या छत्रपतीच्या स्मरणार्थ एक छत्रपतीहि न देतां, ज्यानें टीचभर अंगणांत हातभर बॅट फिरवून आपल्या क्रिकेटपटुत्वाचा दिवा पाजळला अशा गोरकाय पुतळ्याच्या पुतळ्याकरितां शेंकडों पुतळ्या पाण्यांत फेकतां त्या तुम्हांला खूळ लागलें असें कोण म्हणणार नाहीं !" ता. ३० मे रोजीं सायंकाळीं हिराबागेच्या मैदानांत स्मारकाप्रीत्यर्थ टोलेजंग सभा भरली. सभेस सरदार जहागिदारहि हजर होते. यामुळें तो एक सरदारांचा दरबारच वाटला. सरकारी दरबारांत न होणारी गोष्ट म्हणजे सरदार लोकांनीं सभेंत भाषणेंहि केलीं. उच्चस्थानीं चाफळकरस्वामी बसले होते. प्रारंभीं सेनापति दाभाडे यांनीं टिळकांच्या व आपल्या सहीनें निघालेली निमंत्रणपत्रिका वाचून दाखविल्यावर श्रीमंत पंत प्रतिनिधि यांस अध्यक्ष नेमण्यांत आलें. नंतर न्या. रानडे यांजकडून संमतिदर्शक आलेली तार वाचण्यांत आली. तींत न्यायमूर्तीनीं कायमचा फंड उभारण्याची कल्पना सुचविली होती. श्रीमंत बापूसाहेब कुरुंदवाडकर यांनीं १८८५ ची व हल्लींची ही चळवळ एकच होत असें सांगून सर्वांना मदत करण्यासंबंधाचा पहिला ठराव मांडला. त्याला

डॉ. विश्राम, रॅ. गाडगीळ, सरदार पोतनीस, नारायण भिकाजी जोगळेकर वगैरेंनीं अनुमोदन दिलें. पोतनीस यांनीं एक महत्त्वाची गोष्ट सांगितली कीं, मराठेशाहींत समाधीच्या उत्सवासाठीं दरसाल मोठी रक्कम खर्ची पडत असे, हें आपल्याजवळील ऐतिहासिक कागदपत्रांवरून सिद्ध होतें. दुसरा ठराव बाळासाहेब कुरुंदवाडकर यांनीं पुढें आणला तो कमीटी नेमण्याचा होता. कमेटींत पन्नास पंचावन गृहस्थांचीं नांवें चाफळकरस्वामींपासून सामान्य व्यापारी मंडळीपर्यंत घातलीं होतीं. बाबासाहेब नातू खजिनदार, दाभाडे सेनापति, बाबासाहेब इचलकरंजीकर व टिळक असें अधिकारी मंडळ नेमलें गेलें.

कमिटीच्या ठरावास इतरांबरोबर शेक अबदुल रझाक—बिजली वाईकर या मुसलमान गृहस्थांनींहि संमति दिली. नंतर टिळकांनीं असा खुलासा केला कीं, कोल्हापूरकरांसारख्यांनीं मनावर घेतल्यास ते एकटेच समाधीची दुरुस्ती करूं शकतील; पण सर्व दर्जांच्या व सर्व जातींच्या लोकांकडून पै पैशापासून वर्गणी गोळा होऊन ती या कामीं खर्च व्हावी अशीच सर्वांची इच्छा आहे. शेवटीं बाबासाहेब इचलकरंजीकर यांनीं अध्यक्षांचे आभार मानतांना टाईम्सपत्राच्या टीकेस उत्तर देऊन व रानड्यांच्या तारेचा उल्लेख करून असें सांगितलें कीं सरकारच्या सालिना चार रुपयांच्या देणगीनें, समाधीच्या जीर्णोद्धाराचें सर्व काम पुरें झालें असें रानड्यांना वाटल्याचें टाइम्सनें म्हटलें व तें चूक होतें. सभेच्या शेवटीं कोल्हापूरच्या छत्रपति महाराजांकडे या बाबतींत डेप्युटेशनहि पाठविण्याचें ठरलें व स्वामींच्या आशिर्वादानें सभा विसर्जन व्हावयाची तोंच करवीरकर छत्रपति यांची सभेस सहानुभूति असल्याची तार टिळकांचे हातीं येऊन पडली.

या चळवळीमुळें जुने किल्ले जाऊन पाहण्याचीहि लोकांस स्फूर्ति होऊन प्रवाशांचें प्रवासवृत्त छापून येऊं लागलें. बडोदें वगैरे बाहेरगांवींहि सभा सुरू झाल्या. बडोद्यास बरेच सरदार सभेला आले होते व एकानें पन्नास रुपयांचें वर्षासनहि कबूल केलें. पाचोरें येथील मुसलमानांनींहि स्मारकास मदत पाठविली. ता. २ जुलै ९५ च्या अंकांत टिळकांनीं अनेक लोकांकडून आलेल्या स्मारकसंबंधीं सूचनांची चर्चा केलेली आढळते. "कोणी गडकिल्ल्यानिहाय उत्सव सुचविले, कोणास कथाकीर्तनेंच आवडलीं कोणाला सातारा पुण्यास भव्य पुतळे उभारावेसें वाटलें, कोणाच्या मनाची धांव तालमींच्या अड्ड्यांकडे गेली. कोणी जागजागीं शिवाजीच्या नांवानें मोफत विद्यालयें काढावीं असें सुचविलें" या सर्वच कल्पना चांगल्या असल्या तरी त्या एका फंडांत अर्थातच बसूं शकत नाहींत. यामुळें कमेटीनें मनाशीं असें ठरविलें कीं, समाधीवर छत्री बांधून उत्सव सुरू करण्यासच चाळीस हजारांवर रुपये लागतील, पुतळ्याची गोष्ट मनांत आणली तर लाख रुपयांपर्यंत मजल जाईल म्हणून वर्गणी जुळेल त्या मानानें हातपाय पसरावेत. आण्या अर्ध्या आण्यानें पंधरा सोळाशें रुपये जुळले होते पण मोठ्या

वर्गण्या अद्यापि यावयाच्याच होत्या. व दुर्दैवानें त्यांना अखेर 'लो'च बसला. १८८५ सालीं दादासाहेब पंत प्रतिनिधि यांच्या अध्यक्षतेखालीं कमेटी करण्यांत येऊन आबासाहेब कागलकर यांनीं मुद्दाम रायगडास मनुष्य पाठवून छत्रीच्या खर्चाचा अंदाज केला होता, तोच वीस पंचवीस हजारांचा भरला. अर्थात् इतकी वर्गणी जुळल्यावर मग पुढचा विचार. नाहीं म्हणावयाला सयाजीराव-महाराजांकडून एक हजार रुपये रोख आले होते.

शिवाजीस्मारकाची चळवळ टिळकांनीं हातीं घेतांच मुंबईच्या इंग्रजपत्रांनीं कान टवकारले. टाईम्सनें आश्चर्यानें असें लिहिलें कीं, "समाधीच्या दुरुस्तीसंबंधीं व्हावें तितकें पूर्वीच झालें आहे. तें आमच्या सारख्यांनींच प्रथम सुचविलें होतें. त्यावर योग्य दिसलें तें सरकारानें केलें. न्या. रानडे तेलंगसारख्यांना सरकारनें जितकें केलें ततकें पुरें वाटलें. त्यांनीं १८८५ सालीं समाधीच्या दुरुस्तीकरितां सभा भरवून वर्गणी गोळा करण्याचें काम सुरू केलें होतें. पण सरकारानें पुढें व्यवस्था केली ती त्यांना पटून, त्यांनीं वर्गणी वगैरेचें काम बंद केलें. असें असतां हल्लीं पेशव्यांचें स्तोम माजविणाऱ्या कित्येक लोकांनीं सरकारच्या व्यवस्थेस नांवें ठेवून, समाधीची पडझड झाल्याचें निमित्त करून, एक नवीनच चळवळ सुरू केली आहे. रायगडास त्यांनीं मोठा उत्सवहि केला. समाधि जर सरकारच्या ताब्यांत आहे व जरूर ती दुरुस्ती त्यांनीं केली आहे तर या नव्या चळवळीची काय गरज आहे हें आम्हांस समजत नाहीं." (मुं. टा. मे २९ स. १८९५)

या आक्षेपाला इचलकरंजीच्या एका गृहस्थानें ता. ११ जून १८९५ च्या टाईम्समध्यें उत्तर दिलें. त्याचा मुख्य मुद्दा असा होता कीं, ही नवीन चळवळ स्वयंस्फूर्त आहे. ती पुण्यांतील अमुक एका व्यक्तीनें सुरू केली असें नाहीं. १८८५ सालीं चळवळ सुरू झाली तेव्हां कोल्हापूरच्या रीजंटसाहेबासारख्यांचाच तिला मुख्य पाठिंबा होता; दुर्दैवानें पुढें रीजंट ( आबासाहेब घाटगे ) वारले, म्हणून तें काम मागें पडलें. १८८६ सालीं सरकारनें थोडेंबहुत केलें; पण समाधीच्या मानानें तें कांहींच नव्हतें. कोल्हापूर वगैरे ठिकाणच्या सामान्य राज-पुरुषांच्या समाधींना देखील कितीतरीपट मोठ्या नेमणुका असतात. बहुतेक सर्व सरदार शिवाजीमहाराजांच्या गादीचेंच अन्न खातात; यामुळें त्यांना कांहीं तरी ऋण फेडावें असें सहजच वाटतें. सामान्य लोकांतहि उत्साह असाच आहे. कोणीहि खजीनदार नेमून जाहीर होण्यापूर्वीं नुसती स्मारकाची कल्पना प्रसिद्ध होतांच अनेक ठिकाणीं लोकांनीं लहानसहान रकमांनीं हजारपांचशांच्या वर्गण्या गोळा करून ठेवल्या आहेत. व या नव्या चळवळीलाहि कोल्हापूरच्या महाराजां-सारखे राजे लोक व न्या. रानड्यांसारखे विद्वान लोक अनुकूळ असतां उगीच तिच्याबद्दल संशय कां घ्यावे समजत नाहीं.

मुंबई ग्याझेटांतहि कोणा एका नामधारी मराठ्यानें ही स्मारकाची खटपट

सगळी ब्रम्हणांच्या पोटाकरितां आहे असा आक्षेप घेतला; कारण शिवाजीचा उत्सव केला तरी घालणार ब्राह्मणभोजनच. त्याच्या मतें शाळा, बोर्डिंग असली कांहींतरी योजना व्हावी. सोलापूरच्या सौ. लक्ष्मीबाई किर्लोस्कर यांच्या-सारख्या स्त्रिया चळवळीला उत्तेजनपर पत्रें पाठवूं लागल्या. एका शास्त्र्यानें शिवाजीसंबंधाचे कांहीं जुने श्लोक पाठविले. खाणवाले, खाणावळवाले हेहि वर्गणी धाडूं लागले. विद्यार्थ्यांच्या सभा भरूं लागल्या. मुंबईस सभा भरून यल्लापा बाळाराम, डॉ. देशमुख, ना. खरे आणि ना. सेटलवाड, यांना तेथील कमेटीचे सेक्रेटरी नेमण्यांत आले. ता. ६ आगस्टच्या अंकांत वर्गणीचा आंकडा ५६०० रुपयांपर्यंत गेल्याचें प्रसिद्ध झालें. श्री. शंकराचार्यांनीं दरसाल दहा रुपयांची नेमणूक करून दिली. शिवाजीमहाराजांमुळें हिंदुधर्म जगला हें जर खरें तर हिंदुधर्मगुरूंनीं दिलेलें दहा रुपयांचें वर्षासन हें कांहीं फारसें मोठें नव्हे. निदान परधर्मी इंग्रजांकडून मिळालेल्या पांच रुपये वर्षासनापेक्षां तें अधिक मोठें नाहीं. पण श्रींचा आशिर्वाद किंवा आज्ञापत्र या नात्यानें, त्याची किंमत विशेष वाटल्यास नवल नाहीं. ता. २० आगस्टला वर्गणीचा आंकडा ६५०० पर्यंत गेला. मुंबईच्या एका गुजराथी नाटक कंपनीनें एका खेळाचें उत्पन्न ७०० रुपये या स्मारकाला दिलें. फर्ग्युसन कॉलेजांत सभा भरली त्या वेळीं प्रो. भानू यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें असून अनेक प्रोफेसरहि हजर होते. ता. २६ आगस्ट रोजीं करवीरकर छत्रपतींकडे डेप्युटेशन जावयाचें होतें तें गेलें. श्रीमंत इचलकरंजीकर, श्री. कुरुंदवाडकर, ना. बंटमोरीकर देसाई, सेनापती दाभाडे, सरदार पोतनीस, डॉ. देशमुख, सरदार मुतालीक, श्री. बाबामहाराज, माधवराव नामजोशी, सोलापूरचे चक्रदेव, साताराचे करंदीकर, बेळगांवचे नातू वगैरे मंडळी डेप्युटेशनमध्यें असून, टिळक हे डेप्युटेशनचे चिटणीस म्हणून गेले होते. महाराजांनीं डेप्युटेशनचा सत्कार करून असें उत्तर दिलें कीं, " आपल्या इतर पूर्वजांच्या छत्र्यांप्रमाणेंच रायगडावरील छत्रीचीहि व्यवस्था आपण करूं व अंदाज ठरेल त्याप्रमाणें वार्षिक देणगीची रक्कम मागाहून जाहीर करूं. "

पण पुढील सप्टेंबरापासून पुण्यास राष्ट्रीयसभेसंबंधाचा वाद जोरांत आला तरीहि स्मारकासंबंधाचे केसरींतील लेख कमी झाले नाहींत. एकेक पान भरून वर्गणीचे आंकडे प्रसिद्ध होत. १ आक्टोबरच्या अंकांत वर्गणीचा आंकडा नऊ हजारांवर गेल्याचें जाहीर झालें. पण हॅरिस स्मारक फंडाला ४० हजारांचे आंकडे पडले व येवढी चळवळ करून शिवाजी फंडाला अवघे नऊच हजार. हें शल्य कोणाचेहि मनांत सलण्यासारखेंच होतें. याच सुमारास न्या. रानड्यांनीं मराठ्यांच्या राज्यपद्धतीवर एक निबंध वाचला. त्यांत शिवाजीमहाराजांच्या मुलकी राज्यपद्धतीसंबंधानें भरपूर माहिती देऊन गुणवर्णन केलें होतें त्याचाही या चळवळीला उपयोग झाला. पण मुंबईच्या व इतर पत्रांतून क्वचित् एखादा निंदक

डोकें वर काढीच. एका मराठी पत्रांतच एका गृहस्थानें असें लिहिलें कीं, 'स्मारक फंडाच्या वर्गणीचा पैसा टिळक हे जाहिरातीचा खर्च म्हणून केसरीला देऊन टाकणार!' वास्तविक केसरी हा सवडीप्रमाणें मजकुराच्या जागेंत किंवा जाहिरातींच्या जागेंत फुकट किंवा आपल्या खर्चानें पुरवणी घालूनहि वर्गणीची याद छापीत असे. अर्थात वरील आक्षेप म्हणजे बरोबर पांढऱ्याला काळें म्हणण्यासारखाच होता. 'दख्खनसमाचार' नांवाच्या एका मासिक पुस्तकांत एका गृहस्थाला शिवाजी महाराज व आगरकर यांची तुलना करण्याची लहर येऊन त्यानें असा निर्णय दिला कीं, शिवाजीनें सार्वजनिक हिताचें कृत्य असें कांहीं एक केलें नाहीं! गोरगरीबांचे बळी घेतले, रक्तपात केला व स्वतःवर छत्रचामरें उडवून घेतलीं! उलट आगरकर हे किती देशहितैषी! त्यांनीं स्वार्थत्यागानें देशहित केलें, म्हणून आगरकरांनाच शिवाजीहून श्रेष्ठ ठरविलें! पण स्मारकाच्या वर्गणीचें काम यामुळें बंद पडलें नाहीं. ग्वालेर, उज्जनी वगैरे ठिकाणींहि सभा भरून तिकडील मराठे सरदार या चळवळींत सामील झाले. ता. ५ नोव्हेंबरपर्यंत वर्गणीचा आंकडा ११००० वर पोंचला.

राष्ट्रीयसभेच्या वादांत असतांहि टिळक स्मारक फंडाला विसरले नाहींत. मग सभेच्या सेक्रेटरीशिपचा राजिनामा देऊन मोकळे झाल्यावर ते त्यास कसे विसरतील? त्यांनीं आपली नेहमींची प्रसंगावधानता ठेऊन ता. २९ डिसेंबर रोजीं, ऐन राष्ट्रीय सभेच्या गर्दींत, रे मार्केटच्या विस्तीर्ण मैदानांत राष्ट्रीय सभेचे खुद्द अध्यक्ष, बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी, यांनाच अध्यक्ष करून जाहीर सभा भरविली. मैदान गर्दीनें फुलून गेलें असून, एका प्रमुख वृक्षाच्या खांदीवर रेशमी दोरीनें शिवाजीमहाराजांची तसबीर टांगून ठेविली होती. अशा स्फूर्तिदायक प्रसंगीं सुरेंद्रबाबु व पंडित मदनमोहन मालवीय अशा वक्त्यांचीं भाषणें किती स्फूर्तिदायक झालीं असतील हें सांगावयास नकोच.

या जाहीरसभेवरहि आक्षेप आणणारे गृहस्थ निघालेच. त्यांनीं या समुदायांतले लोक फार म्हणून ते ऐकणार काय, विचार कसला करणार, आणि ठराव कसला करणार असा आक्षेप काढला. कोणत्याही चळवळींत लोकसमुदायाचें प्रदर्शन हा एक ठराविक भाग असतो ही गोष्ट आक्षेपकांस अगदींच माहित नसेल असें नाहीं. पण फुकट घेण्याला जशी कोणतीहि गोष्ट स्वस्त, तशीच आक्षेप घेण्याचा निश्चय करणाराला कोणतीहि गोष्ट वाईटच दिसणार. मग ती रेमार्केटांतील या यशस्वी सभेसारखी कां असेना? १८९६ ची अक्षय्यतृतीया जवळ येऊं लागली तेव्हां शिवाजी उत्सवाचा नक्की दिवस कोणता धरावा व उत्सव कोणत्या रीतीनें करावा याविषयीं चर्चा सुरू झाली. ता. १८ फेब्रुवारीच्या अंकांत इतिहाससंशोधक दत्तात्रय बळवंत पारसनीस यांनीं केसरींत पत्र लिहून आपलें असें मत कळविलें कीं, मराठ्यांचा खरा इतिहास प्रसिद्ध होणें हें समाधीच्या जीर्णोद्धारा-

पेक्षांहि अधिक उपयुक्त स्मारक होईल. बंगाली व हिंदी भाषेंत शिवाजीचीं लहान लहान चरित्रें लिहिलीं जात आहेत या गोष्टीचा उल्लेख करून, १८४७ सालीं प्रतापसिंहमहाराजांच्या राज्यासंबंधानें विलायतेंत वाद सुरू असतां, जार्ज टॉमसन नामक एका पार्लमेंटच्या सभासदानें शिवाजीचें सुंदर वर्णन केलें होतें, त्यांतील एक उतारा त्यांनीं प्रसिद्ध केला. याच अंकांत बाबाजी काशिनाथ पटवर्धन, महाडकर ज्योतिषी, यांनींही पत्र लिहून चालू सालीं वैशाख शु. द्वितीयेस रायगडावर हजर राहून आपण मोठा उत्सव करणार आहों असें जाहीर करून सर्व लोकांकडून मदत मागितली. वास्तविक महाडकर हे या बाबतींत टिळकांचेंच मत किंवा निश्चय प्रगट करीत होते. यापूर्वींच टिळकांनीं उत्सवाबाबत महाड येथील पुढारी मंडळीशीं पत्रव्यवहार सुरू केला होता.

ता. ३ मार्चच्या केसरींत उत्सवाचे नियम प्रसिद्ध करण्यांत आले. सर्वांस प्रसादाचें भोजन दिलें जाईल, उत्सवास लागणारें सर्व सामान देशीच वापरलें जाईल, शुद्ध स्वरूपाचीं कथा–कीर्तनें, नाटकें, गोंधळ, पोवाडे वगैरेंना, त्यांत चांगलें शिववर्णन असेल तर, या नव्या संस्थानचे मानकरी समजले जाऊन इतर मानकऱ्यांबरोबर त्यांस मानाचे नारळ देण्यांत येतील, पन्नास स्वयंसेवक घेऊन जो सेवेला गडावर जाईल त्यालाहि मानकरी म्हणावें असें ठरलें होतें. स्त्रियांनीं सामान्यतः उत्सवास न जावें, कारण त्यांची तेथें व्यवस्था नीट राहण्याचा संभव नाहीं, अशीहि सूचना देण्यांत आली होती. याच सुमारास करकेरिया, व एम्. जे. या सहीनें लिहिणारा त्यांचा प्रतिपक्षी, यांच्या दरम्यान अफझुलखानाच्या वधासंबंधानें वाद फिरून सुरू झाला. त्याला उद्देशून केसरीनें लोकांस अशी सूचना केली कीं, महाराष्ट्रांतील लोकांनीं या वादांत आतां पुराव्यानिशीं पडावें. याचा अर्थ जुनें कागदपत्र शोधावे व ते प्रसिद्ध करावे. ता. १७ व २४ मार्चच्या अंकांत, लोकांनीं कोणते कागद शोधावे, कोणते कोठें मिळण्याचा संभव आहे वगैरेसंबंधानें एक विस्तृत व सूचक असा लेख मुद्दाम लिहिण्यांत आला होता. त्याच अंकांत स्मारकफंडाची वर्गणी सुमारें १६००० रुपये जमली ती स्वतंत्र खजिनदाराकडे जमा असल्याचें जाहीर करून टिळकांनीं असें कळविलें कीं, १६००० ही रक्कम थोडी आहे; ती पन्नास हजारांपर्यंत वाढली पाहिजे व योग्य प्रयत्नानें वाढेलहि; व याकरितां एक वर्षभर फंडाची रक्कम बँकेंत तशीच पडून राहिली तरी हरकत नाहीं. दरम्यान अधिक पैसे जुळतील व अधिक योजनाहि सुचविल्या जातील.

याच अंकांत दुसराहि एक खुलासा करण्यांत आला; तो असा कीं, रायगडावरील उत्साहाचे म्हणून जे नियम प्रसिद्ध झाले ते स्थानिक उत्सव कमेटीनें केलेले होत, स्मारकफंड कमेटीचे नव्हेत. कमेटीनें उत्सवाची अशी कोणतीहि योजना अद्यापपर्यंत केलेली नव्हती. महाडकर हे उत्सवाकरितां वेगळी वर्गणी जमवीत होते. हा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर धरलेला असल्यामुळें त्यास कदाचित्

पांचदहा हजार रुपयेहि खर्च येण्याचा संभव होता; अर्थात् ही सर्व रक्कम स्मारक-फंडाच्या सोळा हजार रुपयांतून खर्चणें अयोग्यच झालें असतें. रायगडाबरोबर पुण्यासहि उत्सव साजरा होण्याकरितां कमेटी नेमण्यांत आली होती. ऐतिहासिक कागदपत्र जुळविण्याची सूचना होतांच कांहीं कागदपत्रांच्या कालनिर्णयासंबंधानें मनोरंजक वाद उपस्थित झाले, व सुप्रसिद्ध ज्योतिर्गणिती शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं शिवदिग्विजय बखर ही शके १७४० मध्यें लिहिली गेली असली पाहिजे असें सप्रमाण सिद्ध केलें.

याच सुमारास अफजुलखानाच्या वधाचा वाद, प्रो. चिं गं. भानू यांनीं ता. २८ मार्च रोजीं, डेक्कन कॉलेजच्या "हिस्ट्री क्लब" पुढें काढला. या प्रसंगीं कॉलेजचे विद्वान् प्रिन्सिपाल प्रो. बेन हेच अध्यक्षस्थानीं होते. भानूंच्या व्याख्यानांतील मुख्य मुद्यावर प्रो. बेन यांनीं दिलेलें मत डेक्कन कॉलेजच्या त्रैमासिकाच्या एप्रिलच्या अंकांत छापलें आहे. बेन यांचा अभिप्राय थोडक्यांत व स्पष्ट असा असावयाचा! तो या प्रकरणीं असा होता. "या प्रश्नावर अधिक चर्चा करण्याचें प्रयोजन नाहीं. शिवाजीसारख्या लोककल्याणकर्त्याची परीक्षा सामान्य नीतीच्या दृष्टीनें करावयाची नसते. मराठ्यांचें स्वातंत्र्य स्थापण्याची कामगिरी शिवाजीच्या शिरावर होती, यास्तव त्यानें ती तडीस नेण्यासाठीं जें जें केलें तें सर्व योग्यच केलें. तें त्यानें राष्ट्राच्या हितासाठींच केलें."

रायगडच्या उत्सवाचा पहिला दिवस ता. १५ एप्रिल हा ठरला होता. त्याला आयत्या वेळीं एक मोठें विघ्न येईलसें दिसूं लागलें. रायगड हा सरकारी जंगलाच्या हद्दींत आहे. यामुळें जंगलांत गर्दी जमणार म्हणून जंगल अधिकाऱ्यांची परवानगी मागण्यांत आली व ती मिळाली. पण जंगलखात्याप्रमाणें रेव्हेन्यू खात्याचीहि ती हद्द असल्या-मुळें बंदोबस्ताकरितां उत्सव चालकांनीं महाडच्या मामलेदारांना वर्दी दिली. त्यांनीं ती यादी कलेक्टरसाहेबांकडे पाठविली. पण साहेबांनीं या उत्सवाला जत्रांचा कायदा लागतो असें ठरवून, अर्ज मुदतींत नाहीं या सबबीवर, परवानगी नाकारिली. गर्दी तर जमूं लागली आणि परवानगीचें नसतें खेंकटें अगदीं आयत्या वेळीं उभें राहिलें. तेव्हां टिळकांना तांतडीनें स्वतः महाबळेश्वरास जावें लागलें. प्रथम मनधरणी करावयाची कौन्सिलदारांची. ती टिळकांनीं करून पाहिली. पण न्यूजंटप्रभृति मंडळी बधेनात. शेवटीं खुद्द गव्हर्नरसाहेबांपर्यंत हें गाऱ्हाणें टिळकांना न्यावें लागलें.

या वेळीं टिळक हे कायदेकौन्सिलचे सभासद असून अर्थात् त्यांचें कांहीं वजन सरकारदरबारीं शिल्लक होतें, यामुळें गव्हर्नरसाहेबांना असल्या साध्या गोष्टींत टिळकांना नाखूष करवेना. स्मारकाच्या चळवळीचा सर्व इतिहास, इंग्रज लोकांचीं समाधीच्या दुःस्थितीविषयीं मतें, आणि खुद्द इंग्रजसरकारानें या कामीं दाखवि-लेली सहानुभूति या गोष्टी लॉर्ड सँढर्स्ट यांना टिळकांनीं समजून सांगितल्यावर त्यांनीं एकदांची परवानगी दिली. ही परवानगी मिळण्याला किती प्रयास पडले व किती

प्रकारचे गैरसमज निस्तरावे लागले हें टिळकांसच माहीत असल्यामुळें, व उत्सवांत होणाऱ्या भाषणांचें स्वरूप एकादे वेळीं नकळत कसें बिघडूं शकतें याची जाणीव त्यांना असल्यामुळें, टिळकांनीं केसरींतून असा स्पष्ट इशारा दिला कीं, "या उत्सवासंबंधानें अनेक लोक खोटेंनाटें लिहून सरकारचा गैरसमज करण्यास प्रवृत्त होतील हें सांगावयास नकोच. यापूर्वींच तशी थोडीबहुत सुरुवातहि झाली आहे. नसता दोष आपणावर कोणी लादला तर आपण त्यास दाद देणार नाहीं हें खरें; तथापि राज्यकर्त्यांची वृत्ति आपणाविषयीं कशी आहे याचें मनन केलें तर त्यांस नांवें ठेवण्यास जागाच मिळूं नये, असें आपलें वर्तन असलें पाहिजे; म्हणून चालकांनीं व रायगडीं जमणाऱ्या लोकांनीं आपले वर्तनांत, हालचालींत, व भाषणांत राखवेल तितका नेमस्तपणा राखावा हें आम्हीं सर्व सुज्ञ गृहस्थांस सांगावें असें नाहीं." उत्सवास महाबळेश्वरीं परवानगी मिळवून टिळक तसेच महाडवरून रायगडास गेले. उत्सवकमेटीच्या प्रयत्नानें व चळवळीच्या नवेपणामुळें हजारों लोक उत्सवाला आले होते. यंदा जमली इतकी गर्दी रायगडावर गेल्या शेंदीडशें वर्षांत कधीं एकदम जमली नसेल. गड उंच, चढाव अगदींच सोपा नाहीं. महाडसारखें तालुक्याचें कोंकणी गांवहि बारा मैल लांब. यामुळें उत्सवाचें सर्व सामान वर चढविणें हें किती श्रमाचें काम झालें असेल याची कल्पना सहजच होते.

पण हौसेला सर्व कांहीं गोष्टी वश असतात. उत्सवास सरकारी हरकत आल्याची बातमी आयत्या वेळीं पसरल्यामुळें उत्सव हाणून पाडला जाणार अशा आशेनें आक्षेपक मंडळीहि मोठ्या खुषींत होती; पण संकट येऊन दूर झालें म्हणजे उमेदीला दुप्पट जोर येतो, तसाच चालकांच्या उमेदीलाहि जोर आला. उत्सवाला परवानगी नको असा सरकारी ठराव होऊन तो सर्व योग्य अधिकाऱ्यांकडे रवाना झाल्यामुळें उरलेल्या थोड्या अवधींतहि पुष्कळच काम झालें. आदल्या दिवसापासून गडावर माणसांची सारखी रांग लागली होती. बाराहि मावळांतले प्रतिनिधि आले होते. किल्ल्यावरील नगारखान्याचा चौक, राजदरबारचा दिवाणखाना, दिवाणांचा वाडा, दारूखान्याचें कोठार, जगदीश्वराचें व शिरकाईदेवीचें देवालय वगैरे इमारती, म्हणजे प्रायः सर्व इमारतींचे अवशेष, हे मनुष्यांनीं गजबजून गेले होते. शेंकडों वर्षांत जेथें केरसुणी फिरली नव्हती तेथील कोळीष्टकें यंदा प्रथमच झाडून निघालीं. देवळांच्या गाभाऱ्यांतील झिरप्यानें बनलेलीं डबकीं उपसून टाकण्यांत आलीं. तुटक्याफुटक्या मूर्तींच्या आंगावरून फार दिवसांनीं एकदां हात फिरला गेला. पिण्याच्या पाण्याचा तलाव बराचसा स्वच्छ करण्यांत येऊन मुख्य मार्गावरचे कांटे सराटे काढून टाकण्यांत आले होते. सभेच्या जागीं तट्ट्यांचा मांडव घातला असून मांडवाचें तोरण उभारून, उंच जागीं शिवाजी व रामदास यांच्या गाद्या मांडून त्यावर तसबिरी ठेवल्या होत्या. सकाळीं विनायकशास्त्री अभ्यंकर यांचें कीर्तन झालें. मध्यंतरीं पुण्यांतील घोटवडेकर यांच्या मेळ्यानें, 'उठा चलाहो

करा तयारी रायगडीं जाऊं' हें पद खड्या आवाजांत म्हटलें. अंगांत नुसती बंडी किंवा कमरेस लंगोटी अशा गरीबी थाटाची मावळे मंडळी, कांबळ्यांत भाकरी बांधून घेऊन आली होती, व आपापल्या ऐपतीप्रमाणें नारळसुपारीचा नजराणा गादीपुढें ठेवीत होती. दोन प्रहरीं गंगासागर तलावाजवळ स्वयंपाकाची व्यवस्था केली होती. एका खाणावळवाल्यानेंहि या ठिकाणीं आपली छावणी दिलेली असून त्याला गिऱ्हाईक पुष्कळ मिळत होतें.

सायंकाळीं पांच वाजतां पुढील समारंभास सुरुवात झाली. प्रथम टिळकांनीं कार्यक्रम समजावून सांगितला. अनेक मेळ्यांनीं पदें म्हटलीं. नारायण बापुजी कानिटकरांनीं व शिवरामपंत परांजपे व दापोलीचे गोगटे यांनीं ऐतिहासिक हकीकत निवेदन केली. शेवटीं टिळकांनीं समारोपादाखल भाषण करून, इंग्रज लोकांनीं ऑलिव्हर क्रॉमवेलचें स्मारक केलें, फ्रेंच लोकांनीं नेपोलियन बोनापार्टचें स्मारक केलें, तसें आपणहि आपल्या स्वराज्यसंस्थापकाचें स्मारक करीत आहों, यांत अराजनिष्ठेचा मागमूसहि नाहीं असें सांगितलें. नंतर पोवाडे म्हणण्यांत आले व मध्य रात्रीं जगदीश्वराचे देवळांतून मोठा छबीना काढण्यांत आला.

दुसरे दिवशीं मंडळी गडावरील निरनिराळीं स्थानें पहाण्यास गेली. यापैकीं बहुतेकांनीं या गडावरील देखावे आणि भोंवतालचें सृष्टिसौंदर्य प्रथमच पाहिलें होतें. कडेलोटाच्या जागा, निसर्गसिद्ध तट, भयाण बुरूज, मलीन झालेली पाण्याचीं टाकीं, जळक्या इमारतींचे वेडेवांकडे अवशेष, पडक्या इमारतींची जोतीं, ओसाड देवळें, अर्धवट बुजलेलीं भुयारें, बुजत चाललेल्या रहदारीच्या व रखवालीच्या वाटा, जुनाट वृक्षांचीं खोडें, धान्यांचीं कोठारें व दारुखाने यांतून अजून हातास येणारी बानगी, व अनेक स्थळांना धुक्याप्रमाणें चिकटून राहिलेल्या अस्पष्ट, अर्ध-बोबड्या आठवणी आणि गतवैभवाच्या स्मरणानें मनाला येणारी शून्यता या गोष्टी, कांहीं पहात व कांहीं अनुभवीत, मंडळी एकदोन प्रहर फिरत होती. या प्रसंगीं पुष्कळांच्या इतिहासाची उजळणी झाली व त्याहून पुष्कळ लोक गडाचा इतिहास प्रथमच शिकले. दोनप्रहरच्या समाराधनेनंतर कित्येक कीर्तनकारांनीं नवीन रचलेलीं आख्यानें लाविलीं. शेवटीं तानाजी मालुसरे, येसाजी कंक वगैरे जुन्या मराठे घराण्यांचे वंशज समारंभाला आले होते त्यांच्यापासून प्रारंभ करून सर्व मानकऱ्यांना व कार्यकर्त्या स्वयंसेवकांना नारळ वांटण्यांत आले. पुढील व्यवस्थेसाठीं कायमचें मंडळ नेमण्यांत आलें. खटपटी महाडकर लोकांचे मनःपूर्वक आभार मानून झाल्यावर, रामदास शिवाजी व व्हिक्टोरिआ महाराणी यांच्या नांवानें त्रिवार जयघोष होऊन परीचशी मंडळी खाली उतरली.

अशा उत्सवांपासून तरी काय मिळणार ? असें विचारणारे लोक होतेच. पण सर्वच प्रकारच्या कार्यसिद्धीनंतर 'ततः किं ततः किं' हा ? प्रश्न विचारावयाला उरतोच ? व त्याचें समर्पक उत्तर देणें अर्थात् कठीण आहे. महाराष्ट्रांत राष्ट्रीय बुद्धि

उत्पन्न होण्यास अशा उत्सवांनीं आणखी एक साधन होईल व ' मराठा तेवढा मेळवावा' या उपदेशाप्रमाणें थोडेंसें आचरण होईल, याहून वेगळ्या प्रकारचें उत्तर उत्सवाचे चालक झाले तरी काय देणार? ज्यांचा उत्सव ते स्वतः मराठे; व उत्सवांतहि मराठ्यांच्या महत्त्वामुळें पांढरपेशांचे आधीं त्यानांच प्रसाद व मानाचा विडा देण्यांत आला. याहून आणखी कोणती गोष्ट चालकांच्या शुद्धबुद्धिची खूण म्हणून दाखवावयाला हवी? सरकारासहि हा उत्सव मनांतून अप्रिय असला तरी उघडपणें त्यांस नांवें ठेवण्यास जागा नव्हती, हें आयते वेळीं लँबसाहेबांनीं घातलेला प्रतिबंध लॉर्ड सँढर्स्ट यांनीं दूर केला यावरून सिद्ध होतें. सरकारचे बातमीदार व कांहीं अधिकारीहि उत्सवास रायगडावर हजर होते. त्यांनीं सरकारकडे काय रिपोर्ट केले हें माहीत नाहीं, पण पुढें लौकरच कांहीं गोष्टी अशा घडून आल्या कीं, शिवाजीउत्सव करणें हीच गोष्ट मुळीं राजद्रोहाच्या सदराखालीं पडूं लागली, व टिळकांवरील राजद्रोही हेतूचा आरोप सिद्ध करण्याला ते शिवाजी उत्सवाचे चालक होते, असला पुरावा ग्राह्य धरण्यांत आला. मग उत्सवांत भाषणें काय झालीं, याच्या रिपोर्टावर थोडेंच अवलंबून राहणार होतें ! लॉर्ड सँढर्स्ट यांजकडून परवानगी मिळवून टिळकांनीं कुलाब्याचे कलेक्टर लँबसाहेब यांचा पाडाव केला, पण पुढच्याच वर्षी लँबसाहेब पुण्यास कलेक्टर होऊन आले व टिळकांवरचा राग सव्याज काढण्याला त्यांना संधि मिळाली.

पण लँबसाहेबच कशाला ? पुण्यांतील सुधारकप्रभृति लोकांनांहि ही उत्सवाची चळवळ मानवली नाहीं. शिवाजीला अवतारी पुरुष हें विशेषण लावण्यानें तर्ककर्कश अशा सुधारकांचें चित्त खवळलें, व 'टिळकांनीं नव्या विद्येचें अध्ययन फुकट केलें' असें ते म्हणूं लागले. पण मनोभावनेची भाषा ही अशीच असते. रानडेदेखील प्रार्थनामंदिरांतील व्यासपीठावरून भक्तिमहात्म्य प्रेमळपणानें आळवितांना भक्त व भगवंत यांच्या भेटीच्या गोष्टी असंभवनीय नाहींत असें प्रतिपादित असत तें कसें ? याचा अर्थच असा कीं, सुशिक्षितांतहि आस्तिक्यबुद्धि असणारे व नसणारे असा भेद होऊं शकतो. जिवावरच्या प्रसंगांतून निभावणें, बुद्धीला अगम्य असे पराक्रम करणें असल्या गोष्टी विशेष लोकोत्तर माणसांच्या हातून घडतात, व त्या कां घडतात याचें निवळ अज्ञेयवादी मनुष्याला तर्कबुद्धीनें समर्थन करितां येत नाहीं. टिळक म्हणत, अज्ञेयवाद्यानें आपल्या विशेषणांतला 'अ' वाटेल तेवढा मोठा लिहिला तरी तो समाधानाला पुरा पडत नाहीं. पुष्कळ 'व्हिलेज हॅम्प्डेन' झाले पण इतिहासप्रसिद्ध हॅम्प्डेन एकच तो कां ? शिवाजीइतके शूर पुरुषहि इतर अनेक झाले असतील, पण एकट्या शिवाजीलाच येवढें यश व कीर्ति कां लाभावी याचें कारण सांगतां येत नाहीं, म्हणून तो एके प्रकारें अवतारीच पुरुष होय. अवतारी या विशेषणांत इतकाच अर्थ असतो कीं, नुसत्या प्रयत्नानें न होण्यासारख्या कांहीं गोष्टी त्याजकडून घडल्या जातात. सुधारकांचा मुख्य आक्षेप

उत्सव रामनवमीच्या थाटावर चालला असा होता. पण शिवाजी हा आज जितका ऐतिहासिक पुरुष तितकाच श्री रामचंद्रहि एका वेळीं होता. या वादासंबंधानें लिहितांना शेवटीं तिन्हाइतांनीं असा निर्णय दिला कीं, आक्षेपांच्या मुळाशीं मत्सररूपी राक्षस आहे! "गांठ दोहींची घाली आत्मबोधें" अशा प्रकारचें टिळकांचें धोरण होतें. पण सुधारकांना जुन्या मताच्या समाजाची पर्वा नव्हती हाच फरक. ज्या मूळ कल्पनेनें १८८५ सालीं स्मारकाची चळवळ सुरू झाली तोच हेतु टिळकांनीं आपल्या खटपटीनें व उत्साहानें अधिक नांवारूपाला आणला हा त्यांचा दोष कीं गुण?

असो; रायगडच्या उत्सवानंतर स्मारकाच्या वर्गणीची पोंच बरीच रोडावली, व केसरीचे कित्येक अंकच्या अंक या पोंचेशिवाय जाऊं लागले. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें या मथळ्याखालीं एक सुंदर लेखमाला सुरू झाली. परंतु तिचा परिणाम अर्थात् सुशिक्षित लोकांपुरताच होता. टिळकांच्या कल्पनेप्रमाणें निदान ५०००० रुपये जुळल्यावर मग समाधीच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात करावी असें होतें. पण 'थेंबें थेंबें तळें साचें' ही म्हण खरी असली तरी तळें भरतां भरतां थेंबहि कंटाळतात, व मोठ्या लोंढ्यानें पांचचारवेळ तरी पाणी वाहून तळ्यात यावें तें न आलें तर अखेर तळें भरतहि नाहीं. तसेंच याहि बाबतींत झालें. लोंढ्याचें पाणी म्हणजे या कामीं संस्थानिकांकडून येणारी मोठमोठी वर्गणी. पण सरकारदरबारीं आंतून काय किल्ली फिरली गेली हें सांगतां येत नाहीं. त्यांनीं आपले हात आंखडले. सुधारक वगैरे तर मूळपासून तटस्थच होते. ते टीका करीत नव्हते तेव्हांहि त्यांना या कामीं वर्गणी देण्याची हौस नव्हती.

तात्पर्य १८९६ च्या जून महिन्यापासून स्मारकाच्या वर्गणीचें काम थंडावत चाललें. स्वतः टिळकहि जमलेली वर्गणी बँकेत आहे व कमेटी नेमून घेतली आहे या दमावर कांहीं दिवस स्वस्थ बसले; पण त्याचें कारण हेंच कीं लोक संस्थानिक व खुद्द मुंबईसरकार देखील, यांजकडून या स्मारकाप्रीत्यर्थ आणखी बरीच देणगी मिळविण्याची टिळकांना उमेद होती. पुढच्याच सालीं त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला व कर्मधर्मसंयोगानें राजद्रोहात्मक ठरलेले बहुतेक लेख शिवाजी उत्सवासंबंधाचें असल्यामुळें ही त्यांची उमेद कांहीं दिवस अर्थातच खचली. पण हेही दिवस निघून जातील व पूर्वसंकेतानुरूपच स्मारकाचें काम तडीस जाईल याविषयीं ते मनांतून निराश झाले नव्हते व या त्यांच्या सदाशावादित्वाचें प्रत्यंतर पुढें आलेंहि. कैदेंतून सुटून आल्यावर फिरून रायगडावर मोठे उत्सव झाले, उत्सवाचा फैलावा कलकत्त्यापर्यंत झाला, व लॉर्ड लॅमिंग्टन यांच्या कारकीर्दींत मुंबईसरकारानें पांच हजाराची देणगीहि स्मारकास देऊं केली. पण ती सर्व हकीगत येथें न देतां यथाक्रम पुढें देण्यांत येईल.

---

## भाग २० वा

# राष्ट्रीय सभेच्या मंडपाचा वाद

सन १८९४ सालची राष्ट्रीयसभा मद्रास येथें भरली होती. त्या बैठकीच्या अखेर पुढील बैठक पुणें येथें भरविण्याविषयीं रीतसर आमंत्रण देण्यांत आलें. पूर्वीप्रमाणें ह्यूमसाहेब हेच जनरल सेक्रेटरी म्हणून निवडण्यांत आले; आणि पुण्यास भरणाऱ्या बैठकीची व्यवस्था मुंबईचे फेरोजशहा मेहता व दिनशा वाच्छा या मंडळीच्या देखरेखीखालीं पुण्यांतील मंडळींच्या हातून घडवून आणावयाची होती. राष्ट्रीयसभेचें अधिवेशन आपल्या शहरीं भरविण्याची पुणेकरांची महत्त्वाकांक्षा प्रथमपासूनच दिसून येत होती. पण १८८५ सालीं पुण्यांतील वाऱ्याच्या उपद्रवानें तिच्या मार्गांत आयत्यावेळीं आडकाठी आणली; व १८८९ सालीं मुंबईकरांच्या उत्साहामुळें व ब्रॅडलॉसाहेब सभेला हजर राहणार असल्यानें सभा पुण्यास भरूं शकली नाहीं. असे दोन सुप्रसंग टळल्यानंतर, मुंबईइलाख्यांत फिरून तिसरें अधिवेशन होण्याची वेळ आली तेव्हां पुणेकरांनीं आपला हक्क जोरानें पुढें आणला यांत आश्चर्य नाहीं. १८९५ च्या पूर्वी तीन चार वर्षें पुण्यानें संमति बिलास जोराचा विरोध करून व इतर रीतीनेंहि आपलें नांव हिंदुस्थानांत गाजविलें होतें. नवीन कायदेकौन्सिलांचा प्रश्न पुढें आला तेव्हांहि पुणेकरांनीं त्याच्या रचनेविषयीं आपलीं विशिष्ट मतें प्रतिपादन करून, विचारवंत पुढारी व चिकित्सक या नात्यानें, भर राष्ट्रीयसभेंत मुंबईच्या पुढाऱ्यांची बरोबरी केली होती. खुद्द राष्ट्रीयसभेच्या घटनेचा प्रश्न यापूर्वीच चर्चेकरितां निघालेला असून त्यावरहि आपलें म्हणून कांहीं म्हणणें आहे असें पुणेकरांनीं राष्ट्रीयसभेच्या मुख्य चालकांना भासविलें होतें. शिवाय १८८५ व १८८९ सालीं ज्यांच्या पुढारीपणामुळें पुणें शहरास सर्व हिंदुस्थानांत विशेष महत्त्व येत होतें ते माधवरावजी रानडे जरी हल्लीं (१८९५) पुण्याहून बदलून मुंबईस गेले होते, तरी त्यांचा लळा मुंबईपेक्षां पुण्यासच अधिक होता; व पुण्यांतील आपल्या हाताखालच्या बालगोपालांकडून राष्ट्रीयसभेच्या अधिवेशनाचें काम पार पाडण्याची त्यांची हौस अद्यापि अपुरीच राहिली होती. या सर्व कारणांमुळें १८९५ सालची राष्ट्रीयसभा पुण्यास भरण्याचेंच ठरलें, व पुणेकरांस उमेदीनें काम करण्यास तो एक विषय होऊन बसला.

तथापि पुण्यांतील पक्षभेद तेव्हांहि बाहेर प्रसिद्धीस आलेला होता, व राष्ट्रीयसभा पुण्याला दिली तर ती कशी काय पार पडते या विषयीं तिच्या चालकांनां प्रथमपासूनच थोडीबहुत शंका वाटत होती, ही गोष्ट कांहीं अगदीं खोटी नाहीं. केसरी म्हणतो, " १८८९ सालींहि येथें सभा भरण्याचा योग जमून आला

नाहीं. मग चार वर्षांच्या या सकुमार मुलीस पुण्याची रुक्ष हवा कदाचित् मानवणार नाहीं अशी तिच्या पुरस्कर्त्यांस शंका आली असल्यास कोण जाणें. असो, आतां मुलगी अकरा वर्षांची चांगली धष्टपुष्ट झाली आहे. कौमार्यदशा संपून यौवनावस्थेची झांक पडूं लागलेल्या स्त्रीच्या स्वभावांत जसा थोडथोडा फरक पडूं लागतो, तसेंच राष्ट्रीयसभेचें अंतर्बाह्य स्वरूप हळू हळू बदलत चाललें आहे. पोरवयाला साहजिक असणारी तिची अल्लड वृत्ति जाऊन तिच्या ठिकाणीं गांभीर्य, विचारशीलता व उद्दिष्ट हेतु साध्य करून घेण्याविषयीं निश्चयबुद्धि अधिक दिसूं लागली आहे. पूर्वीचा उत्साह व भावी विजयाची आशा हीं आहेत तशीं आहेतच, किंबहुना वृद्धिंगत होत आहेत म्हटलें तरी चालेल. फार तर अनुभवानें व ज्ञानानें चित्ताला जें एक प्रकारचें स्थैर्य येत असतें त्यामुळें तीं पूर्वीप्रमाणें वेळीं अवेळीं व अमर्यादपणें व्यक्त होत नसतील इतकेंच." ' मुंबईकरांनीं दोन वेळ दगदग सोसली ' असा त्यांना मोठेपणा देऊन हें काम आतां पुण्यानें आपल्याकडे घेतलें, व " पुढारीपणाचा डौल मिरविणाऱ्या पुण्याला " तें काम लौकिकाप्रमाणें पार पाडणें अवश्यच होतें. काम इतकें मोठें होतें कीं, तें स्वीकारतांना पुणेकरांना आपल्या जुन्या कर्तबगारीची आठवण करावी लागली. पण जुन्या कर्तबगारीच्या मानानें हल्लीं आपल्या कर्तबगारीचा ऱ्हास झाला आहे ही जाणीव पुणेकरांस होती. पुण्याचे रिकामटेकडे विनोदी निंदक सहजच म्हणूं शकले कीं, जुन्या पेशवाईतील दारूगोळा गेला व रावबाजीच्या वेळचा साखरगोळाहि गेला! तात्पर्य लढाई राहो पण नुसती मोठी समाराधना कशी घालावी याचीहि संवय पुणेकरांस राहिली नाहीं. कर्तव्यविरहित हताश झालेल्या पुणेकरांनीं आपला उतूं जाणारा उत्साह व शक्ति प्रामण्यें, कुटाळक्या, विझिकांचे सामने वगैरे रिकाम्या उठाठेवींतून खर्च करावी; त्यांनीं राष्ट्रीयसभा भरविण्याच्या उठाठेवींत कशाला पडावें ? पण पुण्यांत आपलें डोकें वर काढणाऱ्या राष्ट्रीय पक्षाला व माधवरावजी रानडे यांच्या अनुयायीवर्गाला अशी उमेद वाटत होती कीं, आपण राष्ट्रीयसभेचें अधिवेशन यशस्वी करून दाखवूं.

पण पुण्यांतील पक्षभेदालाहि याच सुमारास उघड तोंड लागलें होतें ही गोष्ट फारशी आश्वासनपर नव्हती. या सालच्या मार्च महिन्यांत पुणें म्युनिसिपालिटीच्या त्रैवार्षिक निवडणुकी झाल्या, त्यांत बरीच लढालढी झाली. टिळकपक्षाचे नामजोशी हे उमेदवार पडले, पण उलट टिळकांचे स्नेही बाळासाहेब नातू व श्रीमंत बाबामहाराज हे निवडून आले. शिवाय मध्यभागाला प्रथमच मिळालेल्या कायदेकौन्सिलच्या निवडणुकींत स्वतः टिळक यांना यश मिळाल्यामुळें पुण्यांत राष्ट्रीयपक्षाची अधिकाधिक सरशी होत चालली होती. एप्रिल महिन्यांत राष्ट्रीयसभेचें काम करण्याकरितां वर्किंग कमेटी नेमण्यांत आली, व तिनें खुद्द पुणें शहरांत पंधरा हजार रुपये वर्गणी जमा करण्याच्या उमेदीनें काम सुरू केलें.

दरम्यान शिवाजीमहाराजांच्या समाधीच्या जीर्णोद्धाराची चळवळ सुरू होऊन, त्यांत टिळकांना सेक्रेटरी नेमण्यांत येऊन, महाराष्ट्रांतील राजेरजवाड्यांची बैठकहि विंचूरकरांच्या वाड्यांत टिळकांच्या घरीं पडूं लागली. यामुळें रानड्यांच्या अनुयायीवर्गाहून टिळकांना दरबारी प्रतिष्ठाहि अधिक लाभूं शकते हें लोकांच्या नजरेला येऊं लागलें. तसेंच सार्वजनिक सभेच्या अंतर्व्यवस्थेंतील वाद रंगाला येऊन ता. १४ जुलै रोजीं भरलेल्या वार्षिक सभेंत टिळकपक्षाचा हात बराच शिरला, व पुढें होणाऱ्या राष्ट्रीयसभेच्या वादाला ती एक प्रकारची प्रस्तावनाच झाली.

त्या सालच्या जुलै महिन्यांतच राष्ट्रीय सभेच्या वादाला खरा प्रारंभ झाला. टिळक हे स्वतः राष्ट्रीयसभेचे एक सेक्रेटरी होते; पण कायदेकौन्सिलची निवडणूक, शिवाजी-स्मारकाची चळवळ वगैरे गोष्टीमुळें त्यांचें लक्ष राष्ट्रीय सभेच्या कामांत असावें तितकें नाहीं अशी तक्रार प्रतिपक्षाकडून सुरू झाली. एका दृष्टीनें वर्गणी वगैरे जुळविण्याचें काम व्हावें तितकें झपाट्यानें होत नव्हतें ही गोष्ट खरी; पण त्याचें कारण मात्र टिळकांचें दुर्लक्ष हें नसून, सामाजिक परिषदेला राष्ट्रीयसभेचा मंडप दिला जाणार तो कां जावा, असा एक भलताच प्रश्न यासुमारास उपस्थित होऊन गांवांत त्याची चर्चाहि सुरू झाली होती हेंच त्याचें खरें कारण होय. स्वतः टिळक वर्किंग कमिटीचे एक सेक्रेटरी असले तरी वर्किंग कमिटीतील बरेचसे प्रमुख लोक रानड्यांचे अनुयायी होते. शिवाय, त्यांतल्यात्यांत वयोवृद्ध व पोक्त अशी मंडळी याच वर्गांत असल्याकारणानें प्रतिष्ठितपणामुळें लाभणारें पुढारीपण बरेंचसें याच वर्गाकडे आलें होतें. अर्थात् वर्गणी गोळा करण्याच्या वगैरे कामाची जबाबदारी टिळकांइतकी, किंबहुना टिळकांहूनहि अधिक, गोखलेपक्षावर होती; व या पक्षाची मंडळी कामास निघाली म्हणजे, राष्ट्रीयसभेचा मंडप सामाजिक परिषदेला द्यावयाचा कीं नाहीं या प्रश्नाची चर्चा, शुष्क असली तरी, त्यांच्या मार्गांत येई. ही चर्चा करण्यांत प्रमुख लोक म्हटले म्हणजे श्रीमंत बाळासाहेब नातू, पुणेंवैभवकार केळकर व त्यांचा कंपू ही होत. टिळकांची सहानुभूति व स्नेह व्यक्तिशः वर्किंग कमेटीच्या प्रमुख लोकांपेक्षां नातूप्रभृति मंडळींशींच अधिक होता. तथापि, सेक्रेटरी या नात्यानें काम करीत असतां, हा स्नेह लक्षांत न घेतां इतरांशीं मिळून सभेच्या तयारीचेंच काम पुढें ढकलावें असें टिळकांनीं प्रथम तरी मनाशीं ठरविलें होतें यांत शंका नाहीं. मुख्य कचेरींतून सर्व महाराष्ट्रभर सर्व सेक्रेटरींच्या सह्यांनिशीं हजारो पत्रें, व विशेष ठिकाणीं अधिकृत प्रतिनिधि पाठविण्यांत आलेले असून, रा. ब. वासुदेव बापूजी कानिटकरप्रभृति इंजिनियर मंडळी ही विशेषतः कोणत्याच पक्षाची अभिमानी नसल्यामुळें, तीं सभेची जागा ठरविणें, सभेचा मंडप व प्रतिनिधींच्या छावण्या यांचे नकाशे तयार करणें, वगैरे गोष्टी पद्धतशीर रीतीनें करीत होती. तात्पर्य, मंडपाचा वाद असला तरी तो प्रत्यक्ष कामास आड येऊं देऊं नये अशाच इच्छेनें टिळकांसुद्धां सर्व सेक्रेटरी काम करीत असून, केसरींतील लिहि-

णहि त्याच धोरणाचें असे. सामाजिक परिषद राष्ट्रीयसभेच्या मंडपांत यंदांच प्रथम भरणार होती असें नाहीं. ती आज सात आठ वर्षें ठिकठिकाणीं अशीच भरत असे, व ती तशी भरूं नये असें म्हणणारे लोक आज प्रथमच पुण्यांत उत्पन्न झाले होते असेंहि नाहीं. पण खुद्द पुण्यांतच राष्ट्रीय सभा यंदां भरावयाची असल्यामुळें पुण्यापुरता हा वाद अर्थात विशेष नेटाला लागण्याचा संभव होता. हा वाद वाढूं नये अशी टिळकांची मूळ इच्छा खरी. दहा वर्षें सभा निर्विघ्नपणें अनेक ठिकाणीं पार पडली, व यंदां पुण्यासच तिला प्रथम विघ्न आलें तर तें सर्वच दृष्टींनीं वाईट—त्याची जबाबदारी आपणावर बरीचशी येईल—हें टिळकांना माहीत होतें. यामुळें, सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरेल तरच आम्ही वर्गणी देऊं, किंवा उलट ती तेथें न भरेल तरच आम्ही वर्गणी देऊं, अशा दोन्ही बाजूंच्या आग्रही लोकांचा निषेध टिळकांनीं केसरींतून चालविला होता. असला आग्रह धरणारे लोक राष्ट्रीय सभेचे खरे हितचिंतकच नव्हते; राष्ट्रीय सभा पुण्यास भरावी असें असेल तर सभेला येणाऱ्या पाहुण्यांची व्यवस्था नीट कशी राहील याचीच काळजी पुणेकरांनीं आधीं वाहिली पाहिजे; मंडपांत परिषद भरावी किंवा न भरावी यापैकीं कोणच्याहि गोष्टीबद्दल हवी तशी जामिनकी आधीं पटेल तरच आम्ही वर्गणी देऊं असें म्हणणारांप्रमाणें तरच ती गोळा करण्यास आम्हीं निघूं असें म्हणणारेहि मूर्ख आहेत, असें केसरीनें तोडून लिहिलें होतें. किंबहुना टिळकांचा कल नातूपक्षाविरुद्ध या बाबतीपुरता झुलै अखेरपर्यंत तरी निःसंशय होता; व परिषद मंडपांत भरवूं नये या आग्रहांत फारसा अर्थ नसल्यामुळें "राष्ट्रीयसभा भरून गेल्यानंतर तो मंडप उष्टा झाला, मग त्यांत परिषद भरविली काय व न भरविली काय त्यांत कांहीं विशेष अर्थ नाहीं, उष्ट्या मंडपांत आपलें काम उरकून घेणारी सभा राष्ट्रीयसभेच्या दृष्टीनें गौणच ठरतें" असा 'भोळ्या भावाचा' युक्तिवाद टिळकांनीं चालविला होता. वास्तविक हा युक्तिवाद पोकळ होता; कारण राष्ट्रीयसभेकरितां बांधलेल्या मंडपांत 'राष्ट्रीयसभेच्या आधीं' सामाजिक परिषद भरविली जावी असें आजवर कोठेंहि घडलें नव्हतें. परिषद, कोठेंहि राष्ट्रीयसभा भरून उष्टा झालेल्या मंडपांतच मागाहून भरे. त्या सालीं पुण्यांत झालें तरी 'राष्ट्रीयसभेच्या आधीं सामाजिक परिषद मंडपांत भरवूं द्या' अशी सुधारकांची मागणी नव्हती; व पुराणमतवादी नातूपक्ष भांडण करीत होता, तोहि झाला तरी परिषद आधीं भरली जाते याकरितां नसून 'मागाहून भरली जाते तीहि पण तेथें भरूं देऊं नये' अशाकरितांच. पण 'उष्ट्या मंडपा'ची कोटी पुढें आणण्यांत टिळकांचा झोंक अशी एक सूचना करण्याचा होता कीं, उष्ट्या मंडपांत कोणी सभा भरविली तर त्याला महत्त्व उरत नाहीं असें नातूपक्षानें वाटेल तर म्हणावें, पण मंडपाचा वाद नेटाला लावूं नये. येऊन जाऊन वादाचा मुद्दा हाच कीं नाहीं, कीं सामाजिक परिषदेस लोक फारसा मान देत नाहींत ? अर्थात् ती सभा उष्ट्या मंडपांत

भरते या गोष्टीनें तो मुद्दा सहजच सिद्ध होतो. दुसऱ्याची उपेक्षा करण्यानें त्याजबद्दल क्षुद्रबुद्धि दर्शवावी, व या रीतींत गर्भित असलेली मान्यता आपणाकडे घ्यावी, अशीहि आढ्यता मिरविण्याची जगांत जी एक रीत आहे, तिचा अवलंब पुण्यांतील पुराणमतवादीपक्षानें करावा म्हणजे आपल्या मित्रांचें समाधान झालें, व राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी या नात्यानें आपलें कार्य बिनबोभाट पार पडलें, असली दुहेरी युक्ति मनांत ठेऊन 'उष्टा मंडप' ही शब्दयोजना टिळकांनीं मुद्दाम केली होती. ही तुच्छताबुद्धि याहिपुढें नेण्याकरितां टिळक असाहि युक्तिवाद करूं लागले कीं, सामाजिक परिषद भरलीच तर उष्टया मंडपांत भरणार हें तर झालेंच; पण सामाजिक परिषद ही संस्थाच मुळीं निरुपयोगी आहे असेंच पुष्कळांचें मत आहे. पण असेहि लोक ज्या अर्थीं आपली वर्गणी आंखडून धरीत नाहींत, त्या अर्थीं परिषद उष्टया मंडपांत भरण्यास हरकत करणारांनीं तरी वर्गणी देण्याचा आपला हात कां आंखडून धरावा ? सामाजिक परिषदेकरितां राष्ट्रीयसभेस व्यत्यय आणणें हें कोणासहि श्रेयस्कर नाहीं, असा उभयपक्षांस उपदेश करून टिळकांनीं केसरींतून लोकांस असें कळविलें कीं, मी काय बोलून चालून सेक्रेटरी, सभा पार पाडावी येवढें मला कळतें. तें कार्य पार पाडण्याकरितां मी तरी इकडे तिकडे न पाहतां कायावाचामनें खटपट करणार व मजजवळ पैसे असते तरीहि मी ते या कार्याकरितां खर्चिले असते. पण पुढें हळू हळू ही त्यांची बाजू सुटून ते वर्किंग कमेटींतील जाचामुळें, व नातूपक्षाच्या ताणामुळें, नातूपक्षाकडे अधिकाधिक झुकूं लागले.

सप्टेंबर महिन्यांत केसरींत अशा अर्थाचीं पत्रें प्रसिद्ध होऊं लागलीं कीं, "मंडपांत परिषद भरविणें ही गोष्ट पुण्यांतील बहुजनमताला आवडणारी नाहीं. हें बहुजनमत सिद्ध होण्याकरितां सह्या घेण्याकरितां सर्क्युलरें निघत आहेत, परिषदेविरुद्ध जे लोक असतील त्यांनीं सह्या द्याव्या, व अशा रीतीनें वादाचा निकाल करून घ्यावा." यामुळें बाहेरगांवच्या लोकांस असें वाटूं लागलें होतें कीं, मंडपाचा हा वाद बेसुमार वाढल्यास राष्ट्रीयसभा पुण्यास भरूं शकणार नाहीं किंवा भरली तरी निर्विघ्नपणें पार पडणार नाहीं. पण टिळक केसरींतून लोकांचें असें समाधान करीत होते कीं, हा वाद खरा व मोठा आहे यांत शंका नाहीं, तथापि त्यामुळें राष्ट्रीयसभेस धोका येण्याची भीति मात्र निराधार आहे. कारण कोणताहि वाद असला तरी तो तुटण्यास कांहींतरी मार्ग निघण्यासारखा असतोच व तो याहि बाबतींत निघूं शकेल. किंबहुना तो काढावा आणि राष्ट्रीयसभा यशस्वी करावी असा सेक्रेटरी वगैरे अधिकारी मंडळींनीं निश्चय केलेला आहे. लोकांची अशा रीतीनें समजूत घालण्याचा टिळकांचा हा प्रयत्न नुसता युक्तिसिद्धच नव्हे तर प्रामाणिकपणाचाहि होता असें आम्हांस वाटतें. कारण पुण्यास राष्ट्रीयसभा भरवण्याची ती रहित झाली तर बाळासाहेब नातू यांस कांहीं वाईट न वाटतां पुराण-

मतवादी लोकांचा तो एक विजय असेंच वाटण्याचा संभव होता. उलट या अनिष्ट प्रकाराचें खापर सर्व हिंदुस्थानचे लोक माझ्या एकट्याच्या डोक्यावर फोडतील, ते बाळासाहेब नातू वगैरे कोणी ओळखणार नाहींत, हें टिळकांस पूर्णपणें माहीत होतें. म्हणून मंडपाच्या वादाचा अखेर निकाल कोणाच्याहि बाजूचा होवो, पण तो निकाल कोठेंतरी लावून घेऊन अखेर राष्ट्रीयसभा व्हावी, मग तें कोणताहि पक्ष आपल्या एकट्याच्या जबाबदारीवर कां करीना, असें टिळकांचें धोरण होतें. हा वाद तोडण्याला प्रथम तरी स्वागत कमेटी हीच मुख्य जागा होय हें त्यांस माहीत होतें. या कमेटीचा निकाल मान्य करण्यास ते स्वतः सर्वस्वीं तयार होते. अजाण लोक मात्र इकडून तिकडून उडून सेक्रेटरींच्या बोकांडीं बसत. एक त्यांना म्हणे "परिषद मंडपांत भरणार नाहीं असें लिहून द्या." दुसरा म्हणे "परिषद मंडपांत भरेल तेथून ती हांकून दिली जाणार नाहीं असें लिहून द्या व मग वर्गणी मागा, देऊं." पण त्यांना हें कळेना कीं स्वतः सेक्रेटरींचें मत कांहींहि असलें, किंवा वर्गणीच्या लोभानें आश्वासन द्यावें असेंहि त्याच्या मनांत आलें व तें त्यानें दिलें, तरी त्याचा काय उपयोग ? वादाचा निकाल लावण्याचा खरा अधिकार सेक्रेटरींना तर नव्हताच पण पुण्यांत नेमलेल्या वर्किंग कमेटीलाहि तो नव्हता. तर वर्किंग कमेटीहून श्रेष्ठ अशी जी स्वागत कमेटी तिलाच तो होता. या मोठ्या कमेटींत मुंबई शहर व एकंदर महाराष्ट्रांतील लोक वर्गणी दिल्याच्या हक्कानें समाविष्ट होऊन राहिलेले होते; व पुण्याच्या वर्किंग कमेटीनें हा वाद आपल्याला झेपत नाहीं व मिटवितां येत नाहीं असें पाहून तिनें असा ठराव केला कीं, दर दोनशें रुपयांस एक मत अशा प्रमाणानें एकंदर वर्गणीदारांपैकीं होतील तितके मतदार निश्चित करून ते बहुमतानें निर्णय देतील तो सर्वांनींच मान्य करावा. अशा रीतीनें तरी पुणें शहरावरील ही जबाबदारी दुसऱ्याचे गळ्यांत पडून कांहींतरी तडजोडीनें निकाल लागेल असें टिळकांना वाटत होतें. स्वतः पुणेकरांचें मत कांहींहि असलें तरी तें इतर लोकांवर लादलें जाऊन त्यांच्यांत असंतोष उत्पन्न करणें अयोग्यच झालें असतें. स्वागत कमेटींत सुमारें सव्वादोनशें लोक व त्यांत खुद्द पुण्याचे फार तर पाउणशें लोक असल्याकारणानें, स्वागत कमेटीनें कोणताहि निकाल दिला तरी तो त्रयस्थाचाच होणार. ता. १७ सप्टेंबरच्या अंकांत टिळक लिहितात "सामाजिक परिषदेचा निकाल झाल्यावांचून राष्ट्रीयसभेस पैसे देऊं नका असें सांगणारे कित्येक गृहस्थ पुण्यांत आहेत. पण ते राष्ट्रीयसभेचे शत्रु आहेत असें आम्ही समजतों. राष्ट्रीयसभेचीं सर्व कामें बहुमतानें झालीं पाहिजेत, व तोच न्याय जर सामाजिक परिषदेच्या प्रश्नास लागू करण्याचें ठरलें आहे तर आतां तुमच्या मनासारखा निकाल होईपर्यंत तुम्ही वर्गणी देऊं नका असें लोकांस सांगणारे गृहस्थ ढोंगी व दुराग्रही आहेत असें आम्ही समजूं."

सामाजिक परिषद ही राष्ट्रीयसभेस बांडगुळासारखी चिकटलेली होती. अर्थात् बांडगुळ कापलें जात नाहीं म्हणून झाडच तोडा असें कोणी म्हणत नाहीं. उंदराचें बीळ बुजत नाहीं म्हणून कोणी घर पाडीत नाहीं. किंवा आपण आज देऊळ बांधून ठेविलें तर उद्यां त्याच्या सभामंडपाच्या कोपऱ्यांत दुसरा कोणी आपलाहि एखादा मारुती बसविणार नाहीं कशावरून, अशा भीतीनें कधीं कोणी देऊळ बांधण्याचें टाकलें नाहीं. असे परोपरीचे दाखले देऊन आधीं वर्गणी द्या व मग मताच्या जोरावर भांडा असा उपदेश टिळकांनीं सारखा सुरू ठेवला होता. बाळासाहेब नातू व पुणेंवैभवकार हे जसे एका टोंकास तसेच नगरचे केशवराव पटवर्धन व पुण्याचे काशीनाथपंत नातू दुसऱ्या टोंकास होते; व या दोन पक्षांच्या कचाट्यांत राष्ट्रीयसभेच्या अधिवेशनाची दामटी होण्याचा बराच रंग दिसूं लागला. या सुमारास जुन्या पक्षातर्फे एक हँडबिल निघालें. त्यावर अनेक सह्या होत्या. त्यांतच श्री. बाबामहाराज, डॉ. गर्दे वगैरे लोकांच्याहि सह्या होत्या. पण हे दोघेहि टिळकांचे विशेष स्नेही असल्यामुळें टिळकांनीं त्यांजकडून असा जाहिर खुलासा करविला कीं, सामाजिक परिषदेविरुद्ध निघालेल्या हँडबिलावर जरी आमच्या सह्या आहेत तरी त्यांचा अर्थ इतकाच कीं, परिषद मंडपांत भरवूं नये असें आमचें मत आहे. पण त्याचा अर्थ असा नाहीं कीं, परिषद मंडपांत भरणार कीं न भरणार हें ठरेपर्यंत वर्गणीच देऊं नये. वर्गणीच्या जोरावर मतदार मिळवावे व मतदारांच्या जोरावर स्वागतकमेटीचा निकाल मिळवावा, म्हणजे राष्ट्रीय सभाहि नीट होते व मंडपांत परिषद भरवूं नये असाहि निकाल मिळवितां येतो; असें खोल धोरण टिळकांनीं मनांत ठेविलें. पण दुर्दैवानें पुराणमतवादी पक्षाचे अध्वर्यु बाळासाहेब नातू हे खूप श्रीमंत असतांहि पैसा खर्चणें म्हणजे त्यांच्या जिवावर येई, आणि त्या पक्षाच्या अनुयायीवर्गांत झाला तरी बहुतेक अगदीं मध्यम स्थितींतील लोकांचा भरणा. यामुळें स्वागत कमेटीच्या मतदारसंघांत नातूपक्षाला बहुमत मिळेल असा रंग दिसेना; आणि टिळक व नातू हे पुराणमतवादी म्हणून एका पक्षाचे अशी सहज कल्पना करून घेऊन हा सर्व बखेडा टिळकच करवितात असा आरोप त्यांचे प्रतिपक्षी त्यांच्यावर आणूं लागले.

सुधारकपक्षातर्फेहि हँडबिलें निघूं लागून, टिळकप्रभृति सेक्रेटरी अद्यापि राष्ट्रीयसभेचें कांहींच काम करीत नाहींत असा त्यांत त्यांनीं गवगवा सुरू केला. त्याचा हेतु असा होता कीं मेथा, वाच्छा प्रभृति लोकांचें लक्ष या गोष्टीकडे जाऊन पुण्यास राष्ट्रीयसभा होऊं शकत नाहीं अशा समजुतीनें त्यांनीं ती सभाच उचलून दुसरी कोणीकडे न्यावी. या हँडबिलांतील प्रत्येक आक्षेपास टिळकांनीं जाहीर उत्तर दिलें व आक्षेपकांची थोडीशी थट्टाहि केली. "नवरानवरीच्या पूर्वींच भिक्षुक वर्गानें ओरड कां सुरू करावी ? वांकड्या पाठीच्या खुर्च्यांना 'आस्ट्रेलियन चेअर्स' असें नांव असलें तरी त्या मुंबईस वाटेल तेव्हां

मिळूं शकतात; चहाकॉफीच्या पेलेबशांना 'चिनीमाती'ची भांडीं असें नांव असलें तरी तीं आणण्यास चीन देशाला जाण्याचें कारण नाहीं; इंड्याझुंबरें विलायतेंत होतात व आतां तर सप्टेंबर अखेर आली, मंडपाला इंड्याझुंबरें कसची मिळणार अशीहि कोणी रड गाण्याचें कारण नाहीं; बंगल्यांच्या परवानग्या, मैदानाचा भाडेपट्ट, मंडप वगैरेंचीं कंत्राटें, स्वयंसेवकांची नोंद वगैरे सर्व गोष्टी यथास्थित कांहीं झाल्या आहेत व कांहीं होत आहेत"–असें टिळकांनीं सेक्रेटरी या नात्यानें जाहीर केलें. इतर ठिकाणीं जेथें सभा भरल्या, तेथें कामें याहिपेक्षां उशीरां सुरू झालीं असेंहि त्यांनीं सप्रमाण सिद्ध केलें. तथापि पुण्यांतील पक्षभेदाचा तिरंगी सामना दिवसेंदिवस अधिकाधिक रंगांत येऊं लागल्यामुळें, या तीन पक्षांच्या तावडीतून राष्ट्रीयसभेचें तारूं कसें धड पार पडतें याविषयीं वर्किंग कमेटीला मनांतून थोडीबहुत चिंता वाटूं लागली होती ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. आंधळे, अजाण किंवा पक्षांध अशाच लोकांच्या बहुतेक टीका; पण त्यांमुळें गैरसमज मात्र खूप पसरला. पक्षाभिमान धरून वर्किंग कमेटीच्या कामाला मदत करण्यास पुष्कळ लोक तयार होते. परंतु अशा लोकांना कामांत घेणें म्हणजे कामाची प्रगति न करितां त्याची पिछेहाट करण्यासारखेंच होतें. टिळक स्पष्ट नांव घेऊन लिहितात "श्री. बाळासाहेब नातू यांस राष्ट्रीय सभेचें काम सांगितल्यानें जसा घोटाळा होण्याचा संभव आहे, तद्वतच सुधारकांची कथा होय. ज्या तरुण मंडळीनें राष्ट्रीयसभेचें काम करून राष्ट्रभक्ति दाखविण्याचें मनांत आणिलें आहे त्यांनीं या दोन्ही पक्षाभिमानांचे भानगडींत न पडतां काम केलें पाहिजे."

पण पक्षाभिमान सोडण्याचा स्वतः टिळकांनीं इतरांस कितीहि उपदेश केला तरी स्वतः टिळकांचा पक्षाभिमान सुटला नव्हता असेंच कित्येकांस वाटे. सामाजिक सुधारणा हा शुद्ध फार्स आहे असें एक विधान केसरींत आल्यामुळें, हें पहा टिळकांचें या वादांतील खरें मत अशी मुंबईच्या पत्रांनीं हाकाटी केली. हेतु हाच कीं पुण्यास सभा भरवूं देऊं नये. तसेंच, पुण्याचें भांडण आवरणारें नाहीं तेव्हां एकीशिवाय अशीं मोठीं कार्यें पार पडत नाहींत असें दर्शविण्याकरितां, सातारचे पुढारी, करंदीकर–सहस्रबुद्धे वकील, वगैरेंनीं पुण्यामुंबईस तारा करून कळविलें कीं, पुण्यास सभा होत नसेल तर आम्हीं ती साताऱ्यास बोलावून पार पाडण्यास तयार आहोंत. या तारेंतील शब्दांपेक्षां तिच्या पोटांतील ध्वनिच विशेष मुद्याचा होता. पुण्यास सभा भरूं न शकली तर ती बहुधा मुंबईस जाईल, साताऱ्याला कोणी देत नाहीं, हें सद्या करणाऱ्यांना पक्कें माहीत होतें. रेलवे स्टेशनापासून अकरा मैलांवरच्या लहानशा गांवांत राष्ट्रीयसभा भरणें फारसें शक्य नव्हतें हेंहि तार करणारांना माहीत होतें. पण पुण्यांतील पक्षभेदाचा गुप्त निषेध, साताऱ्यांतील मित्रमंडळींच्या एकीची गुप्त स्तुति, व राष्ट्रीयसभेच्या अधिवेशनाची कांहीं एक खटपट करावी न लागतां अडचणीच्या वेळीं राष्ट्रीयसभा भरविण्याचें

श्रेय, या सर्व गोष्टी जर केवळ एका आठ आण्याच्या तारेनें साधतात तर त्या कां दवडा? असा सातारकरांचा हा कावा आहे अशीहि टीका त्या वेळीं खुद्द साताऱ्यांत व बाहेर झाली हें खरें आहे. परंतु या निमंत्रणावरून राष्ट्रीयसभा अंगावर घेऊन कोसळलीच तर ती भरविण्याला सातारकरांनीं माघार घेऊन बोलणें फोल झाल्याची कबूली दिली असती असें मात्र आम्हांस वाटत नाहीं. कारण या वेळीं साताऱ्यांतील सुशिक्षित वर्गात नमुनेदार एकजूट होती हें आम्हीं स्वानुभवानें सांगूं शकतों.

असो, साताऱ्या या तारेचा उपयोग इतकाच झाला कीं, पुण्यांतील कित्येक लोकांना आपल्यांतील दुहीची लाज वाटली. याच सुमारास टिळक हे एकदां साताऱ्यास गेले होते तेथें त्यांच्या संभाषणांत सामाजिकपरिषदेविरुद्ध मजकूर आला, अशा बातम्या पुण्यास आल्या. यामुळें टिळकांना सेक्रेटरींच्या जागेवरून काढून सर्व सत्ता सुधारकवर्गाच्या हातीं द्यावी असा प्रयत्न जोरानें सुरू झाला. पण या वर्गाच्या महत्त्वाकांक्षेइतके कर्तृत्व मात्र त्यांच्या अंगीं नाहीं असें टिळकांचें म्हणणें होतें. आक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यांत वर्किंग कमेटीची निरनिराळीं पोटमंडळें नेमलीं जाऊन सर्व खात्यांची व्यवस्थाहि करण्यांत आली. पण आक्टोबर-अखेर या वादाचें स्वरूप अधिकच भडकलें. ता. २२ आक्टोबर रोजीं रेमार्केटच्या मैदानांत एक मोठा मांडव घालून एक जाहीर सभा भरविण्यांत आली. निमंत्रणपत्रिकेवर टिळकपक्षाच्याच लोकांच्या सह्या होत्या. अध्यक्षस्थान श्री. बाबामहाराज यांस देण्यांत आलें होतें, सभेचा उद्देश असा जाहीर झाला होता कीं, राष्ट्रीयसभा ही सर्व मतांच्या व जातींच्या लोकांची असल्यामुळें, तिच्या अधिवेशनाची व्यवस्था बहुजनसमाजाच्या मतानेंच लागली पाहिजे. वर्किंग कमेटींत टिळकांविरुद्ध बहुमत होतें. व टिळकांना सेक्रेटरींतून काढून टाकण्याचा विचार चालू होता; त्याचा प्रतिकार करण्याकरितांच ही जाहीर सभा भरविली होती हें अगदीं उघड दिसलें. या सभेस हरकत करण्याकरितां गोखले यांच्या पक्षानें सभेंत हस्तपत्रकें वाटलीं, त्यांचा आशय असा होता कीं, राष्ट्रीसयभेसंबंधीं भरविण्यांत येणारी जाहीरसभा पुण्यांतील स्टँडिंग कांग्रेसकमेटीच्या विद्यमानेंच भरली पाहिजे तशी ही नाहीं. शिवाय सभेची योग्य मुदतीची नोटीस लोकांस नाहीं. निमंत्रणपत्रकावर सह्या करणाऱ्या अनेक लोकांनीं वर्गणी दिली नसून दुसऱ्या लोकांनीं दिलेल्या पैशाची व्यवस्था करण्याचा या सभेला अधिकार नाहीं. सभेंत विरोध करण्याकरितां काशिनाथ परशराम गाडगीळ, वामन विष्णु लेले वगैरे गृहस्थ आले असून टिळकांच्या भाषणास ते विरोध करूं लागले, तेव्हां सभेंत थोडासा दंगा झाला. तो पोलिसांनीं लवकरच मोडला. या सभेमध्यें टिळकांनीं वर्किंग कमेटींत झालेली भानगड लोकांपुढें आणली. पन्नास रुपये वर्गणी देणाराला स्वागत कमेटींत एक मत असावें असा ठराव पूर्वी झाला होता. पण सुधारक-

पक्षांतील लोकांनीं आतां असा बूट काढला कीं, पन्नास रुपयांला एक मत या हिशोबानें जितकी पट अधिक वर्गणी तितकीं त्यास जास्त मतें असावीं. तसें झाल्यास पुण्यांतील श्रीमंत वर्गणीदारांना हजर राहून अनेक मतें देतां येतील ! बिचारी स्वागतकमेटी अद्यापि बनावयाचीच होती. ती कशी बनवावी हाच आतां वाद सुरू झाला. त्याचा निकाल आम्हीं करूं असें वार्किंगकमेटी म्हणूं लागली. पण वर्किंग-कमेटी ही झाली तरी पुण्याच्या नागरिकांतूनच नेमली गेलेली; तेव्हां कमेटीहून नागरिकच श्रेष्ठ, व खुद्द वर्किंग कमेटींत तंटे लागल्यास त्यांचा निर्णय नागरिकांची जाहीर सभाच करूं शकणार.

टिळकांच्या भाषणानंतर सभेंत कांहीं ठराव पास झाले. राष्ट्रीयसभेचें काम एकट्या म्हणजे सुधारक पक्षाच्या हातीं राहूं नये, स्वागतकमेटी नवी नेमून तिचे चिटणीस टिळकांनांच नेमावें, व जुनी वर्किंगकमेटी रद्द करावी वगैरे सूचना त्यांत केल्या होत्या. पण दुसऱ्या एका ठरावांत सामाजिक परिषदेची आणि राष्ट्रीयसभेची सांगड तोडली जावी असें स्पष्टच म्हटलें होतें. याचा अर्थ उघडच असा होत होता कीं, राष्ट्रीयसभेच्या मंडपांत सामाजिक परिषद भरूं देऊं नये. टिळक हे आजवर असें म्हणत होते की, पुण्यांतील तीन पक्षां-पैकीं, काय वाटेल तें करून राष्ट्रीयसभा यशस्वी करावी असें म्हणणाऱ्या पक्षां-तला मी आहे. पण प्रस्तुतच्या जाहीर सभेंत बाळासाहेब नातू वगैरे मंडळींनीं भाग घेतला नव्हता तरी आपल्या हातीं सत्ता ठेऊन मग त्या सत्तेच्या जोरावर नातूपक्षाचें म्हणणें पार पाडून घ्यावें असा टिळकांचा कावा आहे, असें लोक म्हणूं लागले. या सभेमुळें बाहेरच्या लोकांच्या समजुतींतील घोंटाळा कमी न होतां उलटा वाढला. तेव्हां खुलासा करण्याकरितां म्हणून टिळकांनीं एक विनंतिपत्र बाहेरगांवीं रवाना केलें. त्यांत पूर्वापार सर्व हकीकत लिहिली होती. सभेंत टिळक बोलले नाहींत अशा कांहीं गोष्टी यांत होत्या त्या अशा. 'जोंपर्यंत बाळासाहेब नातू यांनीं अदूरदृष्टीनें टिळकांपासून फुटून निघून तिसरा पक्ष उत्पन्न केला नव्हता तोंपर्यंत टिळकपक्ष व सुधारकपक्ष वर्किंग कमेटींत तुल्यबल होता. पण नातूंनीं तिसरा पक्ष उपस्थित केल्यामुळें सुधारकांचें पारडें वर झालें. टिळक हे स्वतः एक सेक्रेटरी असतां जाहीरसभेच्या निमंत्रणपत्रकावर त्यांनीं सही केली, आणि वार्किंग कमेटी रद्द करण्याचा ठराव सदर सभेंत मंजूर झाला, या अपराधाकरितां वर्किंग कमेटीनें टिळकांनाच आपणांतून काढून लाविलें.' हा सर्व बखेडा न्या. रानडे यांस मनापासून आवडत नव्हता; व ते एका बाजूस टिळक दुसऱ्या बाजूस गाडगीळ नगरकर वगैरेंना घेऊन समेटाची बोलणीं बोलत असत. पण जाहीर-सभेच्या दिवशीं, सभेच्या आधीं कांहीं वेळ, टिळक हे रानड्यांच्या घरीं समेटाचीच चर्चा करण्यास गेले असतां, तेथें रानडे प्रुफें वाचीत बसलेले त्यांनीं पाहिले. तीं सभेंत वांटलेल्या जाहीर निषेध पत्रकांचींच होतीं ! टिळकांना वर्किंग कमेटींतून

काढून टाकल्यावर ते मुंबईस गेले असतां त्यांच्या घरांतील सेक्रेटरीचें दफ्तर उचलून नेण्याची खटपट डॉ० गाडगीळ यांनीं केली पण ती फसली. जाहीरसभेंत ठरल्याप्रमाणें स्वागतकमेटीचे चिटणीस म्हणून टिळक काम करूं लागले व कागदपत्रहि त्यांच्या जवळच होते. तथापि रानडे व त्यांचे अनुयायी हे दुसऱ्या पक्षास असल्यामुळें मुंबईशहरच्या सर्व लोकांचें मत टिळकांविरुद्ध, व इतर प्रांतातले पुढारीहि मुंबई-शहरच्या पुढाऱ्यांचें धोरण पाहूनच वागूं लागले. अशा रीतीनें बिनतोड बखेडा उत्पन्न झाला. तेव्हां आतां पुण्याबाहेरील लोकांनीं, अधिवेशनाच्या व्यवस्थेचें काम कोणाच्या हातीं रहावें याविषयीं, आपलें मत द्यावें व बहुमत ज्याच्या बाजूस पडेल त्याजकडे सेक्रेटरीचें काम देण्यांत येईल; सुधारकपक्षाच्या हातीं काम जावें असें बहुमतानें ठरविलें तर आपण खुषीनें काम सोडून देऊं, असा मजकूर या विनंतिपत्रांत होता.

इकडे ता. २६ आक्टोबर रोजीं मुंबईस फेरोजशहा मेथा यांच्या दफ्तरांत मुंबई स्टँडिंग कांग्रेस कमेटीची सभा भरविण्यांत आली. या सभेस पुण्यांतील दोन्ही पक्षांच्या लोकांस निमंत्रण करण्यांत आलें होतें. मुंबईची सभा भरविण्याचें कारण असें होतें कीं, गोपाळराव गोखले व काशिनाथपंत गाडगीळ यांनीं मुंबईस पत्र लिहून असें स्पष्ट कळविलें कीं, टिळक हे आतां उघडपणें नातूंच्या पक्षास जाऊन मिळाले आहेत. जाहीरसभेनंतर हा आक्षेप खोडून काढणें टिळकांना जड जाऊं लागलें. या सभेंत टिळकांनीं हा आक्षेप खोडून टाकून, मी नातूंच्या पक्षाचा नाहीं असें प्रतिपादन केलें होतें. तसेंच बाजारपेठेंतून वर्गणी मागण्याचें काम सुरू असतां टिळक लोकांना वर्गणी द्या म्हणत व नातू देऊं नका म्हणत असा तंटा चाललेला लोकांच्या उघड नजरेस पडत होता. तथापि सामाजिक सुधारणेसंबंधीं टिळकांच्या मतांचा गवगवा आज चारपांच वर्षे जोरानें होत असल्यामुळें, त्यांच्या व बाळासाहेब नातूंच्या हेतूंतील कुशाग्राइतकें सूक्ष्म अंतर फेरोजशहासारख्या गृहस्थांस नक्की कसें अजमावतां येणार ? "सामाजिक परिषद ज्यांस नको आहे, त्यानें ती राष्ट्रीयसभेच्या मंडपांत भरूं देऊं नये असें म्हटलेंच पाहिजे असें नाहीं. नातू व टिळक दोघांनाहि सामाजिक परिषद नको असें वाटतें. परंतु दोघांची कारणें मात्र भिन्न आहेत. नातू आग्रही असले तर सुधारकहि आग्रही नाहींत असें नाहीं. परिषद निराळी भरविल्यानें जर तिला धक्का पोंचत नाहीं तर परिषदवाल्यांचा येवढा आग्रह तरी कां ?" अशा प्रकारचीं सूक्ष्म मतें फेरोजशहा मेथा यांस समजण्यासारखीं नव्हतींच असें नाहीं, पण त्यांच्या पूर्वग्रहामुळें तीं ते लक्षांत घेईनात. टिळकांनीं कांहींहि केलें तरी त्यांत अंतःस्थ हेतु आहे असेंच मेथा यांस भासविण्यांत येई. मुंबईच्या सभेत दोन्ही बाजू हजर असल्यानें सर्व उखाळ्यापाखाळ्या अर्थातच निघाल्या, तेव्हां मेथा वगैरेंना मोठें संकट पडलें. होतां होईतों सर्व पक्षांचे लोक वर्किंग कमेटींत असावे व श्रीमंत

लोकांना पन्नास रुपयांस एक याप्रमाणें अनेक मतें आपल्या बायकापोरांतहि वांटून देतां यावीं, हा वर्किंग कमेटीचा ठराव मात्र योग्य नाहीं असेंच मुंबईच्या लोकांचें मत पडलें. तथापि नुसत्या पुण्याच्या लोकांवर हें काम सोंपविल्यास अखेर अखेर तंटे अनावर होऊन सभेचें काम धोक्यांत पडेल असें वाटून मुंबईच्या सभेंत असें ठरलें कीं, जुनी वर्किंग कमेटी जवळ जवळ रद्द करून, टिळकपक्षाचे दोन सेक्रेटरी, गोखले पक्षाचे दोन सेक्रेटरी, आणि दिनशा वाच्छा, चिमणलाल सेटलवाड व दाजीसाहेब खरे असे मुंबईचे तीन, मिळून सात सेक्रेटरींनीं यापुढील सभेचें काम करावें. या नवीन व्यवस्थेच्या योगानें, मंडपवादाचा अखेर निर्णय कसाहि लागो, परंतु राष्ट्रीयसभेचें काम तडीस जाईल, असें समजून टिळकांनीं ही व्यवस्था मान्य केली. किंबहुना ही व्यवस्था मान्य केल्याशिवाय टिळकांना दुसरा मार्गच नव्हता. या व्यवस्थेनें पुण्यांतील जाहीरसभेचे ठरावहि रद्द झाले हें मात्र येथें नमूद केलें पाहिजे.

पुढील आठवड्यांत वाच्छा, सेटलवाड व खरे हे पुण्यास आले. ते पुण्यास आल्यावर त्यांना असें आढळून आलें कीं, सरदार नातू व तत्पक्षीय एकांतिक मताचे लोक मूठभर आहेत; व मंडपवादाचा निकाल अखेर खुद्द कांग्रेसनें लावावा, पण आधीं कांग्रेस नीटपणें भरूं द्यावी, असें म्हणणाऱ्या मध्यम वर्गाचेंच बहुमत पुण्यांत आहे. तथापि याहि वर्गाकडे सर्व काम सोंपविण्याची सोय नाहीं. कारण सुधारक लोक मदत घेणार ती सर्व स्वपक्षीयांकडून. उलट टिळक यांचें म्हणणें असें कीं, राष्ट्रीयसभेस मदत घ्यावयाची ती सर्व वर्गांकडून सारखी घेतली जावी; व पुण्यांतील उदमी, व्यापारी, कारागीर सर्व मंडळींनीं राष्ट्रीयसभेंत प्रतिनिधी म्हणून जाऊन मग हवें तें हवें तसें आपल्या हातानें करून घ्यावें. सुधारकांच्या मतें टिळकांच्या हेतूप्रमाणें भटभिक्षुक, साळीमाळी, तेली तांबोळी यांचा भरणा राष्ट्रीयसभेंत झाला तर बहुमत आपल्याविरुद्ध जाऊन घोटाळा होईल व अशा लोकांच्या जिवावर टिळक हे सामाजिक परिषदेस आयते वेळीं दगा देतील. अशा प्रकारचा विरोध पाहून मुंबईहून आलेल्या सेक्रेटरींनीं अखेर असें ठरविलें कीं, टिळक यांनीं आपल्या सर्व गोष्टी मागें घ्याव्या व जुन्या वर्किंग कमेटीनें आपलें पूर्वीचें धोरण पुढें चालू ठेवावें. या निकालानें अर्थात् टिळक तोंडघशीं पडले. एका आठवड्यापूर्वींच ज्या व्यवस्थेला सामान्यरीत्या कां होईना पण मान्यता दिली, तिलाच आतां नांवें ठेवावीं असा प्रसंग त्यांचेवर आला. पण नांवें ठेवूनहि आतां कांहीं उपयोग नव्हता. अतिशयोक्तिप्रिय एकांतिक असे दोन पक्ष प्रबल झाल्यावर बहुजनसमाज मध्यम मताचा असला तरी त्याचें निभेनासें होतें. नातूपक्षाला राष्ट्रीयसभा मोडली तरी यत्किंचितहि वाईट वाटणारें नव्हतें, व सुधारक पक्ष मुंबईहून आलेल्या त्रिवर्ग सेक्रेटरींच्या जोरावर उलट अधिकच प्रबल झाला. अशा स्थितींत जाहीरसभेंत व्यक्त झालेलें बहुजनमत

टिळकांच्या बाजूला असतांहि त्यांना सेक्रेटरीच्या जागेचा राजिनामा देणें अपरिहार्य झालें. केवळ नातूपक्षाच्या हातीं जाऊन राष्ट्रीयसभेचें काम यशस्वी रीतीनें पार पडण्याचा संभव नव्हता. सुधारक पक्षाच्या हातीं हें काम गेल्यास तें लोकांना अप्रिय अशा मुठभर लोकांच्या हातीं गेल्यासारखें होईल हें खरें, पण इतर प्रांतांच्या दृष्टीनें पाहतां तें काम रीतीप्रमाणें तडीस लावण्याची तरी पात्रता त्यांजमध्यें आहे; अर्थात्, राष्ट्रीयसभेचें काम एका विशिष्ट रीतीनें झालें तर तें इष्ट खरें, पण तशा प्रकारानें तें होत नाहीं म्हणून तें मुळींच कोणी करूं नये, खुशाल लाथाडून द्यावें हें म्हणणें चुकीचें होईल; असें मनाशीं ठरवून टिळकांनीं राजिनामा दिला. आपला हेका चालवावयाचा किंवा माघार घेऊन सभा भरवूं द्यावयाची, पुण्याबाहेर दवडूं द्यावयाची नाहीं, असा बिनतोड विरोध आला असतां टिळकांनीं आपला हेका सोडला असें उघड दिसतें. टिळकांना असें करण्याशिवाय इलाज नव्हता हें चांगल्या अर्थानें खरें आहे, व आम्हींहि वर तसें म्हटलेंच आहे. टिळक हे नातूपक्षास जाऊन उघडपणें मिळण्यास तयार असते तर, त्यांना सभा पुण्याबाहेर घालवूनहि, "परप्रांतांचे लोक पुण्यांतील दुहीबद्दल मला नांवें ठेवतील तशींच तीं सुधारकांनाहि ठेवतील, मिळून दोषच आला तर दोघेहि प्रतिपक्षी तो सारखाच वांटून घेऊं," असें टिळकांना वाटेल तर म्हणतां आलें असतें. पण या वेळीं तरी आपला पराभव स्वीकारून त्यांनीं राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें पड खाल्ली असेंच कोणासहि म्हणावें लागेल. पुण्यांत सभा न भरण्याऐवजीं, पुण्याचे लोक उदासीन असूनहि कां होईना ती भरलेली अधिक बरी, असेंच त्यांनीं ठरविलें व केसरींतून तसें लिहिलेंहि. मी सेक्रेटरी नसलों तरी हरकत नाहीं, राष्ट्रीयसभेस सर्वांनीं मदत द्यावी असा उपदेशहि त्यांनीं लोकांना केला.

टिळकांनीं राजिनामा दिला तरी वाद पुढें चालूच होता. टिळकांच्या विनंतिपत्रांतील विधानें खोडण्याकरितां कांहीं रावबहादुरांनीं आपल्या सहीनें एक उत्तर प्रसिद्ध केलें. सुधारकपक्षाचा एक प्रकारें विजय झालेला होता व त्या भरांत त्यांनीं सभेचें काम जोरानें सुरू केलें होतें; पण लोकांची उदासीनता त्यांना घालवितां आली नाहीं. एका व्यापारी सभेंत असा ठराव झाला कीं, राष्ट्रीयसभेची सर्व व्यवस्था सुधारकांच्या हातांत गेल्यामुळें, आतां सामाजिकपरिषद त्या मंडपांत भरण्याचा विशेष संभव आहे, व आम्हांस तर ती सभा तेथें भरावी हें इष्ट नाहीं, म्हणून आम्ही कांग्रेसबद्दल उदासीन आहोंत. अशा रीतीनें राष्ट्रीयसभा एकतर्फी होऊं पहात आहे अशी ओरड सुरू झाली. वास्तविक एकतर्फीपणा असला तर तो व्यवस्थापकवर्गापुरता होता. इतर प्रांतांचे लोक यावयाचे तसे येणारच होते व ते आलेहि. खुद्द पुण्यांतलेहि लोक बरेचसे प्रतिनिधि म्हणून निवडून जाणार होते व पुढें गेलेहि. पण सभेची व्यवस्था एकतर्फी असल्यानें

तिला आयत्या वेळीं कांहीं व्यत्यय येतो कीं काय ही भीति मात्र शिल्लक उरली व अखेरपर्यंत ती नाहींशी झाली नाहीं. त्रयस्थ म्हणविणाऱ्या एका गृहस्थानें केसरीला पत्र लिहून त्यांत पुण्यांतील लोकांनीं उदासीनता टाकून द्यावी असा उपदेश केला होता. पण तो "आपलें खरें स्वरूप सुधारकांस दाखविण्यास तयार होण्याकरितां." वरील उपदेशाचा अर्थ उघडच आहे. कित्येक लोक टिळकांनीं माघार खाल्ली याबद्दल त्यांना नांवेंहि ठेऊं लागले. कित्येक एम्. ए. एल्एल्. बी. सारख्या लोकांनीं टिळकांना वेगळी राष्ट्रीयसभा भरविण्याचीहि चिथावणी दिली. पण केवळ व्यवस्थापक वेगळे झाल्यानें वेगळी राष्ट्रीयसभा भरूं शकत नाहीं, हें या गृहस्थांनीं ध्यानांत आणलें नसावें. पुणें शहरांत जरी लोकमत टिळकांच्या बाजूचें असलें तरी खुद्द पुण्यांतहि केवळ सुधारकांच्या रागावर राष्ट्रीयसभेची बैठक मोडून, किंवा तिच्या कामांत बिघाड होऊन, परप्रांताच्या लोकांनीं पुणें शहराला हंसत व निंदा करीत परत जावें हें त्यांना मानवणारें नव्हतें; व पुण्यांतील बहुजनसमाजाची सहानुभूति टिळकांकडे असली तरी, त्यांनीं यावेळीं राजिनामा दिला हेंच योग्य असें सुशिक्षित लोकमतालाहि वाटत होतें. पुण्यांतील व्यापारी उदीमी वगैरे मंडळींच्या मताला महत्त्व असेल, पण बाहेरच्या सर्व प्रांतांशीं जेथें संबंध येणार तेथें रानडे, गोखले व अनेक रावबहादुर यांचें म्हणणें त्यांना जितकें खरें वाटणार, किंवा खरें न वाटलें तरी त्यांची ते जितकी भीड धरणार तितकी टिळकांची धरणें अशक्य होतें. परप्रांताशीं व्यवहार करण्याच्या दृष्टीनें पाहतां टिळक हे आपल्या पक्षांत एकटे एकच होते; व सुधारक पक्षांत, मुंबईकरांची त्यांना असलेली मदत लक्षांत घेतां, निदान दहापांच नांवें तरी अशीं होतीं कीं, जीं इतर प्रांतांतील लोकांच्या परिचयाचीं होतीं. स्वतः टिळक व नामजोशी हे यापूर्वी प्रसिद्धीस आले होते, पण या दोघांना रानडे, मेथा, वाच्छा गोखले, सेटलवाड, खरे इतक्या मंडळींशीं परप्रांतीय लोकमताच्या आखाड्यांत कुस्ती जिंकणें शक्य नव्हतें. आपल्या पक्षाला लोकप्रसिद्ध अशी माणसें नसल्यामुळें येणारा कमीपणा टिळकांना परवां परवांपर्यंत भासत होता. मग १८९५ सालीं त्यांची स्थिति काय असेल हें सांगावयास नकोच. किंबहुना त्या वेळच्या वादानें स्वतः टिळकांना इतर प्रांतांतून जी मान्यता पूर्वी होती, ती कांहींशीं कमीच झाली असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं. तात्पर्य मुंबईहून आलेल्या सेक्रेटरींनीं बाजू उलटविली असें पाहून, टिळकांना राजिनामा देण्याशिवाय गत्यंतर नव्हतें व राजिनामा दिल्यावर पुढें टिळक काय करतात, तेवढाच कित्येकांना कौतुकाचा व कित्येकांना चिंतेचा विषय होऊन राहिला होता.

या वेळची टिळकांची खरी मनःस्थिति काय असावी याची आम्हांस चांगली कल्पना होते. राष्ट्रीयसभेस अपाय होऊं नये असें त्यांस मनापासून वाटत होतें यांत बिलकूल शंका नाहीं. पण पूर्वी राजिनामा दिला नव्हता तेव्हां सामा-

जिक परिषद मंडपांत भरण्यासंबधानें किंवा न भरण्यासंबंधानें जें किंचित ताटस्थ्य त्यांच्या बुद्धींत होतें तेंहि आतां जाऊन परिषद मंडपांत भरली जाऊंच नये असें उघड उघड प्रतिपादन करण्यास त्यांना मोकळीक झाली. राजिनामा देईपर्यंत ते नातूपक्षांत समाविष्ट नव्हते, पण राजिनामा दिल्यानंतर नातूपक्षास आपण मिळालों असें लोकांनीं म्हटलें तरी त्याची पर्वा करण्याचें कारण नाहीं असें त्यांना सहजच वाटूं लागलें. राष्ट्रीयसभेची व्यवस्था एकतंत्री झाल्यानें अधिवेशन यशस्वी होण्याला मदत झाली असेंच एका अर्थी त्यांना वाटत असावें. परप्रांताचे जे लोक येणार त्यांचें व्यवस्थापकांशीं भांडण नाहीं; गांवच्यांचें भांडण असलें तरी व्यवस्थेंत त्यांचा हात नाहीं; सर्व परप्रांतीय प्रतिनिधींवर बहुमताची मात करूं अशी आशा वाटण्याइतकें मनुष्यबळ व द्रव्यबळ टिळकांच्या खास पक्षाला नव्हतें; आणि बाळासाहेब नातूंचा विरोध असला तर तो कोरडा असावयाचा, ओला असावयाचा नाहीं यामुळें त्यांच्या पक्षाचे लोक प्रतिनिधि म्हणून बेसुमार घुसतील व कांहीं उलथापालथ करतील अशी भीति नव्हती. तथापि नातूपक्षाला सामाजिक परिषदेच्या नांवानें बाहेर इतकी दंगल माजावेतां येणें शक्य होतें कीं, हा पक्ष वेळीं काय करील व न करील, खुद्द राष्ट्रीयसभेला कोणतें विघ्न आणील न आणील, याचा नियम कोणास सांगवत नव्हता. म्हणून नातूपक्षाच्या या भीतिप्रदतेचा फायदा घेऊन परिषद मंडपांतून निघाली तर काढावी येवढाच आतां टिळकांस उद्योग उरला व नातूंनाहि त्यांची मदत या कामीं इष्टच होती. अशा रीतीनें टिळक व नातू यांच्या पक्षांत हेतु व कृति यांच्या दृष्टीनें पूर्वीं जी तफावत होती ती आतां बरीच नाहींशी झाली. सुधारक आधींच म्हणत कीं टिळक व नातू हे दोन दिसले तरी एकच आहेत. ते आतां एकच दिसूंहि लागल्यामुळें, 'आम्ही पूर्वीपासून म्हणत होतों तेंच खरें, व टिळकांचा नुसता बहाणा होता' असें म्हणण्यास त्यांना जागा झाली. पण सभेची व्यवस्था एकट्या सुधारकांच्या हातीं आल्यानें त्यांची जबाबदारी व तिजबरोबर चिंता दुणावली; व टिळकांचा पाडाव वावदुकीनें करण्यापेक्षां पुण्यांत राष्ट्रीयसभेविरुद्ध उठलेली भुतावळ कशी निवारावी हें त्यांना एक मोठेंच कोडें येऊन पडलें. आणि या भुतावळींतल्या एका गृहस्थाचा संबंध नोव्हेंबर महिन्यांत प्रथम आला, त्याच्या योगानें तर सुधारकांचें धाबेंच दणाणलें. हे गृहस्थ म्हटले म्हणजे श्रीधर विठ्ठल दाते हे होत.

श्रीधर विठ्ठल दाते हें महाराष्ट्रांतलें जुन्या काळचें एक बडें प्रकरणच होतें. त्यांचें सर्वच कांहीं अजब होतें त्यांचें पूर्वचरित्र बहुतेक पुण्याबाहेर घडलें असलें तरी त्यांची कीर्ति पुण्यास त्यांच्यापूर्वींच येऊन धडकली होती. या कीर्तीचें वर्णन एका शब्दांत यथार्थतेनें करावयाचें म्हटलें म्हणजे 'स्वारी प्रत्येक गोष्टींत दांडगेश्वर होती' असें करितां येईल. दाते हे पदवीधर नसले तरी त्यांना इंग्रजी शिक्षण चांगलें

मिळालें होतें आणि आपल्या बुद्धिमत्तेनें व वाचनानें त्यांनीं तें बरेंच वाढविलें होतें. त्यांना चांगला इंग्रजी लेखक किंवा वक्ता अशी संज्ञा देतां आली नसती; कारण त्यांच्या लिहिण्याबोलण्यांत खऱ्या वाङ्मयाची झांक फारशी नसे. सदभिरुचि व औचित्य यांच्या बंधनांची ओळखहि त्यांना फारशी नसे. पण लेखन व भाषण यांचा ओघ त्यांजपाशीं अखंड असे. भरमसाट लिहिणें, भरमसाट बोलणें यांत त्यांचा हातखंडा असे. पूर्ववयांत त्यांनीं सरकारी नोकरी केली व शेवटीं ते मामलती-वरून बडतर्फ झाले होते असें म्हणतात. त्याचीं इतर कारणें कांहींहि असतील, परंतु साहेब लोकांची देखील वेळ पडल्यास भीडमुर्वत ठेवावयाची नाहीं व त्यांना वाटेल तसें टाकून बोलावयाचें व लिहावयाचें हा दोष त्यांना भोंवला असल्याचा संभव आहे. त्यांच्या दांडगेश्वरपणाबद्दल लोकांची जी समजूत होती तिला मात्र साहेब लोकांशीं असणारें त्यांचें उद्धट वर्तन येवढेंच कारण खास नव्हतें. स्वतः लोकसमाजाशींहि ते तसेच वागत. अधिकारी या नात्यानें दाते यांची नाठाळाशीं गांठ पडली असतां, आपणास सवाई नाठाळ भेटला अशीच त्याची खात्री होईल असें वर्तन त्यांजकडून होई. उलट एकादी गैरवाजवीदेखील गोष्ट करण्याचें मनांत आलें, व लोकमत त्याला विरुद्ध पडलें, तरीहि हरप्रयत्नानें ती गोष्ट घडवून आणण्याचे कामीं दाते यांचा हातखंडा होता. आपलें कार्य सिद्ध करण्याला जरूर तर ते सगळ्या गांवच्या मुसक्या बांधतील, किंवा सगळ्या गांवाला आग लावून देतील. किंवा हवीं तीं घरें एका रात्रींत जमीनदोस्त करून व त्यांवर नांगर फिरवून, सकाळीं 'काय झालें' म्हणून विचारण्यास स्वतः स्वारी जाग्यावर हजरच, असा त्यांचा लौकिक असे. कुशाग्रबुद्धी, जबरदस्त स्मरणशक्ति व सरकारी कागदपत्रांच्या दाखल्याचें उत्कृष्ट ज्ञान यांच्या योगानें मुलकी वकीली करण्यास ते सर्वस्वीं लायक होते, व नोकरींतून सुटल्यावर सरकारी खात्याकडील अर्ज लिहून देण्याचें काम ते करीत असत. या कामाकरितां त्यांनीं थोडाबहुत कायदाहि वाचला होता व वकील या नांवानेंच त्यांना लोक विशेष ओळखीत. त्यांनीं तयार केलेले कांहीं अर्ज आम्हीं पाहिलेले आहेत. त्यांत वकिली आधारा-पेक्षां जुनी वहिवाट व दप्तरी दाखले यांचे आधार देण्याची त्यांची हातोटी अधिक समर्पक दिसून येते. पण सामान्यतः मुलकी प्रकरणांतले निकाल कायद्याच्या किंवा दाखल्याच्या आधारांपेक्षां अंतस्थ दरबारी खटपटीच्या आधारावरच अधिक अवलंबून असतात ही गोष्ट मशहूर आहे, व अंतस्थ खटपट कशी करावी याचें ज्ञान श्रीधर विठ्ठल यांना पुष्कळ होतें. या ज्ञानाच्या जोरावर त्यांनीं अनेक कामें जिंकून पुष्कळ पैसा मिळविला होता. इनाम कमिटीचें काम नुकतेंच होऊन गेलें असल्यामुळें इनाम चौकशीचे अर्ज त्या काळीं बरेचसे होत असत. मुलकी खात्याच्या दांडगाईनें इनाम गांव जप्तींत पडत, इनामदार हे स्वतः मिजाशी व अज्ञानी असल्यामुळें ते अनेक वर्षें तसेच जप्तींत पडून रहात, व त्यांच्या उत्पन्नांचा

ऐवज पुष्कळसा सांचे. पण जमीच्या या कुलपाला श्रीधर विठ्ठली किल्ली लागली कीं, बाहेरून अर्ज, आंतून खटपट, अशा प्रयत्नानें अनेक वेळीं जप्ती खुली होई व शिलकी ऐवजाची रास इनामदाराच्या हातांत पडण्याची वेळ आली कीं श्रीधर विठ्ठल हे आपल्या फी करितां आधीं ठरवून ठेविलेली मोठी रक्कम तींतून उचलीत. अथणी तालुक्यांतील एका बेडकीहाळ गांवाच्या जप्तीसंबधानें त्यांना अर्जाची व खटपटीची फी म्हणून एक लक्ष रुपये मिळाले होते असें सांगतात. जुन्या व नव्या मिळकतीनें समृद्ध होऊन सुखवस्तु म्हणून ते पुण्यास येऊन राहिले होते; व मेहुणपुऱ्यांतील, हल्लीं लोकसंग्रह छापखाना असलेला, त्यांचा वाडा हल्लींच्या स्थितींत पाहणाऱ्यालाहि त्याचा मालक कसा असावा याची स्थूल कल्पना येऊं शकेल. पण स्वतः श्रीधर विठ्ठल या वाड्यांत नांदत असतां त्यांचें ऐश्वर्य ज्यांनीं पाहिलें असेल त्यांलाच तें खरें माहीत.

श्रीधर विठ्ठल यांची उंची सहा फुटांवर असून त्यांतच त्यांच्या पागोट्याची उंची मिळविली म्हणजे तो एखादा मनुष्य चालत नसून कपड्यांचीं ठाणें अंगावर चढविलेला नालपीर चालला आहे असें वाटे. त्यांचें शरीर जसें उंच तसेंच रुंद व भरदार असे. त्यांच्या डोक्यावरील पागोट्यायेवढें मोठें पागोटें त्या वेळीं सर्व पुण्यांत दुसऱ्या कोणाचें नव्हतें. त्यांचा आवाजहि शरीराच्या प्रमाणानेंच होता. विंचुरकरांच्या वाड्याशीं येऊन दारांतूनच त्यांनीं 'टिळक' म्हणून हांक मारली म्हणजे वाड्यांतला कानाकोपराहि दणाणून निघे. भाषणपद्धतीहि आवाजासारखीच दणकट. तोंडांतून कोणाला उद्देशून काय शब्द निघेल याचा नेम नाहीं. एकदां शिव्यांची फेंक सुरू झाली कीं शिव्या खाणाऱ्याबरोबर नुसता ऐकणाराहि चीत होऊन जावयाचा. संभाषणात्मक इंग्रजी बोलण्याची संवय त्यांना फार असे व एकदां पट्टा इंग्रजींत सुरू झाला म्हणजे तोहि अर्धा अर्धा तास सारखा चाले; मग त्यांत किती खऱ्या गोष्टी, किती दंतकथा, किती उतारे, किती आधार येतील यांचा नेम नाहीं. टिळकांपेक्षां दाते हे वयानें बरेच मोठे असल्यामुळें ते त्यांना सहजच मुलाप्रमाणें वागवीत. टिळकांसारख्यांशीं बोलावयाचें तेंहि बहुतेक सगळें आशयीं. उलटसुलट युक्तिवाद किंवा विवेकशील चर्चा ही दाते यांना कधीं माहीतच नव्हती. त्यांच्या भाषणांत गोष्टी येतील त्या तशा 'असल्याच पाहिजेत किंवा नसल्या तरी झाल्याच पाहिजेत;' निदान त्यांच्या जड जोड्याच्या पायाची ठोकर व भीमसेनी मुठीचा आघात यांच्या जोरानें होणार नाहीं अशी गोष्टच नव्हती. बोलण्याप्रमाणें त्यांचें हसणेंहि ठाणबंद घोड्याच्या खिंकाळण्यासारखेंच असे. टिळक त्यांच्यापुढे उभे राहिले व संभाषण जोरांत चालू असलें म्हणजे पाहणारांस वाटे कीं, हा टिळकांना आतां खाकेंत मारून गाडींत घालून घेऊन जातो कीं काय? पण वामनमूर्ति टिळकांचीहि योग्यता श्रीधर विठ्ठल जाणून असत. आहे मूल पण तलवारबहाद्दर आहे, असें ते टिळकां-

विषयीं म्हणत. पुढें पुढें रिकामपणीं येऊन गप्पा मारण्याचें एक स्थान म्हणजे टिळकांचें घर असें त्यांना झालें होतें व टिळकांनाहि नाइलाजानें आपला बहुतेक वेळ खर्च करून, मनांतून कंटाळा आला तरी, या बड्या धेंडाला नाखूष करवत नाहीं म्हणूनच त्यांच्याशीं बोलत बसावें लागे. एखादे वेळीं टिळकांनाच ते घरीं बोलावून घेत. आणि आपलें घर लोकांना हिंडून दाखविण्याची जी खोड पुष्कळांना असते तिची लहर आली असतां, तळघरांत मांडून ठेवलेल्या पांच पन्नास प्रकारच्या लोणच्या-मुरंब्याच्या बरण्यांपासून तों तिजोरींतील मनगटासारख्या सोन्याच्या सऱ्यांचे जोड व टपोऱ्या मोत्यांचे सर येथपर्यंत सर्व चिजा दाखवून ते आपलें ऐश्वर्य टिळकांना नीट समजावून देत.

पण हें ऐश्वर्यप्रदर्शनच या मंडपाच्या वादांत टिळकांना थोडेंसें उपकारक झालें. तो प्रकार असा. श्रीधर विठ्ठल हे मोठे धर्मनिष्ठ नसले तरी मंडपाच्या वादांत त्यांचा ओढा नातूपक्षाकडे होता व राष्ट्रीयसभेच्या मंडपांत सामाजिक परिषद भरविली जाऊं नये हें यांचें मत हळू हळू गांवांत प्रकट झालें. नातूपक्षाला हा एक मोठाच लाभ घडला. तथापि दाते या भांडणांत उघड रीतीनें पूर्वी फारसे पडले नव्हते. जो त्यांच्या तावडींत सांपडेल त्याच्या देखत ते परिषदेला लाखोली वाहून तिचा चक्काचूर करीत. पण राष्ट्रीयसभेला झटून मदत करणारां-पैकीं ते नव्हते. पुढें वर्किंग कमेटींतील वाद जोराला लागला व कोणत्या तरी एका पक्षाच्या हातीं राष्ट्रीयसभेची व्यवस्था देणें प्राप्त होईल असें दिसूं लागलें. पण हें ठरवितांना पैशाच्या दृष्टीनें कोणता पक्ष अधिक पात्र आहे हीहि गोष्ट विचारांत घेतल्याशिवाय निर्वाह नव्हता. नुसत्या मेहनतीच्या दृष्टीनें टिळकांचा पक्ष कांहीं कमी नव्हता, पण पैशाचा प्रश्न आला म्हणजे सहजच त्याला खालीं पहावें लागे. बाळासाहेब नातू यांची मदत असली तर कोरडी असावयाची हें मागें सांगितलेंच आहे पैसे खर्चण्याचा प्रश्न निघाला कीं त्यांच्या हजारों सबबी पुढें आल्याच. टिळकांनीं जोडलेले नवीन कोही बाबामहाराज हे नांवानें श्रीमन्त असले तरी बारा वर्षें कोर्टांत चाललेल्या दत्तकाच्या वादामुळें स्वतःच कर्जाखालीं जिकरीस आलेले. टिळकांनीं वाटेल त्या रकमेची प्रामिसरी नोट लिहून पुढें टाकली तरी ते सहीला माघार न घेण्याइतके मनानें उदार होते. पण त्यांच्याहि प्रामिसरी नोटीला या वेळीं सावकार लोकांत फारशी किंमत उरली नव्हती. अशा स्थितींत वर्किंग कमेटीचा वाद जवळजवळ या मुद्यावर आला कीं, राष्ट्रीयसभेची व्यवस्था हातीं घेण्याची ज्याची इच्छा असेल त्यानें ती पार पाडण्याच्या जामिनकीबद्दल आधीं कमीत कमी दहा हजार रुपये मोजावे. गोखलेपक्षांत मोठमोठे वकील पेन्शनर वगैरे लोक व रानड्यांची अप्रत्यक्ष जामिनकी असल्यामुळें ते दहा हजार रुपये केव्हांहि मोजूं शकते. उलट टिळकांच्या बाजूला बहुजनमत खरें, पण हुकमी दहा हजार रुपयांची रकम नाहीं. हा रुपयांचा प्रश्न नेटाला

लागला तेव्हां टिळक बाळासाहेब नातूंकडे रकम कर्जाऊ मागण्यास गेले; पण योग्य तारणाशिवाय आपण रक्कम देऊं शकत नाहीं असा नातूंनीं जबाब दिला. या अडचणींत सांपडल्यामुळें टिळकांना श्रीधर विठ्ठल यांची आठवण सहजच झाली व तळघरांत नेऊन ऐश्वर्य दाखविणाऱ्या या गृहस्थाच्या श्रीमंतीइतकेंच त्याचें धारिष्टहि आहे कीं नाहीं हें पहावें असें टिळकांस वाटलें. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, श्रीधर विठ्ठल या धाडसाच्या परीक्षेंत खरोखरच पहिल्या वर्गांत उतरले! एके दिवशीं रात्रीं टिळक व त्यांचे स्नेही वासुदेवराव जोशी हे मुठींत जीव घेऊन अवेळीं श्रीधर विठ्ठल यांचे घरीं गेले. अशा वेळीं टिळक कधीं यावयाचे नाहींत, ते कां आले याचें दात्यांना सहजच आश्चर्य वाटलें. आणि विचारपूस होतां होतां ओघानें टिळकांनीं ही पैशाची गोष्ट काढली; आणि सांगितलें कीं, दहा हजार रुपये जर मोजतां येतील तर राष्ट्रीयसभा आपल्या हातीं येते. पण ते कसे मिळणार ? दाते यांनीं क्षणभरहि विचार न करितां सांगितलें कीं, रुपयांची तजवीज होऊं शकेल, तुम्ही सभा हातीं घ्या. पण रुपये रोकड पाहिजेत त्याची वाट काय? याविषयीं टिळकांनीं सांगितलें कीं नातूंच्याजवळ रोकड वाटेल तितकीं आहे. पण ते योग्य तारण मागतात. तेव्हां श्रीधर विठ्ठल म्हणाले तारण काय वाटेल तेवढें देतों. असें म्हणून त्याच पावलीं ते टिळक व जोशी यांना घेऊन तळघरांत गेले व दहा हजारांहून अधिक किंमतीच्या सोन्यामोत्यांच्या दागिन्यांचा डबा, पावतीदाखल एक चिटोरेंहि न मागतां, त्यांनीं टिळकांच्या स्वाधीन केला. तो डबा तसाच उपरण्याखालीं दडवून घेऊन टिळक व जोशी हे नातूंकडे गेले व अशा रीतीनें दहा हजार रुपये खडे झाले. टिळकांनीं महाराष्ट्रांतील लोकांना राष्ट्रीयसभेच्या कामांतील घोटाळ्याविषयीं खुलाशादाखल जें जाहीरपत्रक काढल्याचें मागें उल्लेखिलें आहे त्यांत, सद्यःस्थितिवर्णनाच्या कलमांत, एक कलम खालीलप्रमाणें लिहिलेलें आहे, "पुण्यांतील दहाहजार रुपये वर्गणी कोणत्याहि पक्षास देतां येईल." या वाक्याचा खरा आधार म्हटला म्हणजे श्रीधर विठ्ठल दाते यांनीं मध्यरात्रीं टिळकांच्या स्वाधीन केलेला हा भारी दागिन्यांचा डबा होय.

या उदारपणाच्या कृत्यानें परिषदेच्या प्रतिपक्षाच्या प्रमुखस्थानीं दाते यांची गणना एकदम होऊं लागल्यास नवल नाहीं. ते गांवांतील एक वजनदार गृहस्थ म्हणून समेटाच्या कामीं त्यांचा उपयोग करून पाहण्यांत येऊं लागला. त्यांनीं रा. ब. रानडे यांची गांठ घेतली व परिषद मंडपांत भरविण्याचा आग्रह आपण धरणार नाहीं असें आश्वासन रानडे यांचेकडून घेतलें. अशा रीतीनें परिषद बाहेर पडली व दहा हजार रुपयांच्या जोरावर कांग्रेसची व्यवस्था टिळकपक्षाच्या हातीं येण्याचा संभव दिसूं लागला. पण इतक्यांत मुंबई स्टँडिंग कमेटीनें मध्यें पडून सर्व व्यवस्था चिटणीस ससकाच्या हातीं देण्याची योजना केली, ती टिळकांनीं मान्य केल्यामुळें बाजू उलटली. वर्किंग कमेटी सुधारकांच्या हातीं

कायम झाली व परिषद बाहेर भरविण्याविषयींचें आश्वासन परत घेण्याला रानडे यांच्या अनुयायांनीं त्यांना चिथवून त्यांत यशहि संपादलें. यामुळें श्रीधर विठ्ठल दाते यांना आपलें अखेरचें शस्त्र बाहेर काढावें लागलें. ता० १० नोव्हेंबर रोजीं रेमार्केटच्या मैदानांत प्रचंड जाहीरसभा भरविण्यांत आली. लोकसमूह सुमारें दहा हजार असावा म्हणतात. अध्यक्षस्थानीं डॉ. गर्दे यांची निवडणूक करण्यांत येऊन एक दोन ठरावहि करण्यांत आले. मुंबई कमेटीनें ज्या अर्थी पुण्यांतील लोकांना धाब्यावर बसविलें त्या अर्थीं पुण्यास होणारी राष्ट्रीय सभा ही निवळ एकपक्षीय होय, व सामाजिक परिषदेचा व आपला संबंध राष्ट्रीय सभेनें कायमचा तोडून टाकावा, अशा अर्थाचेहि ठराव होते. या सभेंत टिळकांनीं भाग घेतला नाहीं. तिचें अपूर्वत्व एकाच गोष्टीनें सिद्ध झालें. ती ही कीं श्रीधर विठ्ठल दाते यांनीं मुख्य ठरावावर दीड तास भाषण करून त्यांत कोणाची कांहीं बाकी ठेविली नाहीं. त्यांचे भाषणांतील मुख्य मुद्दा कांहीं गैरवाजवी नव्हता. राष्ट्रीयसभा ही सर्वांना पूज्य आहे. तिचे उत्पादक रानडे हेहि पूज्य आहेत. त्यांच्या अनुयायांच्या हातीं सभेची व्यवस्था गेली तरीहि त्यांत कांहीं अस्वाभाविक नाहीं. पण परिषद मंडपांत भरविण्याचा आग्रह वर्किंग कमेटी धरते ही गोष्ट मात्र गैर आहे. यांत अधिकाराचें अतिक्रमण होतें. सुधारक-प्रमुख वर्किंग कमेटीवर पुण्यांतील लोकांनीं विश्वास टाकला असला तर तो राष्ट्रीय-सभेच्या बैठकीच्या व्यवस्थेपुरता. पण सामाजिक परिषद ही बहुजनमताला अप्रिय आहे असें पक्कें ठाऊक असतां, हातीं आलेल्या अधिकाराचा उपयोग कमेटी जर परिषदेस मंडप देण्याकडे करील तर तो विश्वासघात होईल. वर्किंग कमेटींतील लोक सुधारणावादी आहेत तसेच मी व टिळक हेहि आहोंत. किंवा इंग्रजी शिक्षणाचें वारें लागलेले सर्वच लोक सुधारक असतात. पण सामाजिक परिषद व तिचे पुढारी लोकांत अप्रिय आहेत व लोक जर परिषदेला मंडप देण्याच्या विरुद्ध आहेत तर यांनीं तो कां द्यावा?

पण दाते यांच्या भाषणांतील खरी खोंच या युक्तिवादांत नव्हती तर भाषणाच्या ओघांत त्यांनीं दहशतीचीं अशीं जीं एक दोन वाक्यें उच्चारलीं त्यांत होती. तीं वाक्यें अशीं:—"लोकांच्या विरुद्ध जर सभा भरेल तर ती राष्ट्रीय होईल काय? तेथें विरुद्ध मताचे लोक गेले तर त्यांच्यानें त्यांना घालवून देववेल काय? अशानें गोंधळ होईल, राष्ट्रीयसभेला आग लागेल, दयानंदाचे वेळचा प्रसंग येईल. संमतिबिल सरकारला सत्तेमुळें पास करतां आलें. पुण्यांतील सुधारकांची आमच्याविरुद्ध जाण्याची काय मगदूर आहे? इंद्रायतक्षकाय स्वाहा याप्रमाणें यांची दशा होईल. या बादशाही शहरांत आम्हीं यांचें चालूं देऊं काय? सामाजिक परिषद हा रोग आहे. हें कुलंगीकुत्रें आहे. तें पुण्यास एकदां मंडपाच्या बाहेर काढून दिलें म्हणजे इतर गरीब शहरीं त्रास देणार नाहीं." वगैरे वगैरे. श्रीधर

विठ्ठल यांची कीर्ति आधींच लोकांना माहीत होती. अशा स्थितींत हें भाषण झालें. मग काय विचारावें? सभा ही येवढी मोठी होती कीं, तिचे ठराव मंजूर झाल्याचें जाहीर करण्याकरितां कर्णे, शिंग व चौघडे आधींच आणून ठेविले होते. ठराव मंजूर होतांच 'कर्णा बजाव' म्हणून श्रीधर विठ्ठल यांनीं हुकूम द्यावा व वाद्यांच्या गोंगाटांनीं ठरावाची मंजुरी जाहीर व्हावी असें चाललें होतें. असल्या सभेंत प्रतिपक्षी येऊन काय करणार? सभेंतून परत जातांना लोकांच्या तोंडीं राष्ट्रीयसभेंत गोंधळ होईल, मंडपाला आग लागेल, इंद्रायतक्षकाय स्वाहा होईल हेच शब्द घोटाळत होते. मंडप अद्यापि बांधावयाचाच होता! पण कल्पना-प्रधान लोकांना तो आधींच जळालेला दिसूंहि लागला! लोक म्हणत, एर्वीतेवी लोकांना पशु म्हणता खरे मग त्यांनीं पशूसारखें वर्तन केलें तर त्यांत आश्चर्य कां मानतां! पुढें मंडप बांधण्यास सुरवात झाली, तेव्हां श्रीधर विठ्ठल हे संध्याकाळचे प्रहरीं गाडींत बसून मंडपाच्या जागीं जात व मुद्दाम कुचेष्टा करण्याकरितां कमरेवर हात ठेऊन शेजारच्या लोकांस म्हणत 'मंडपास आग लावावला ही जागा फार छान दिसते.' वास्तविक आग लावणारा दुष्ट मनुष्य आपले बेत असे जाहीर रीतीनें बोलून दाखवीत नसतो. पण भीतीनें गांगरलेल्या मनुष्याला हें सांगून काय उपयोग! पुढें एक दोन आठवड्यांत हा वादच मुळीं मिटला. सामाजिक परिषद आपण दुसरे जागीं भरविणार, असें तिचे सेक्रेटरी रा. ब. रानडे यांनीं जाहीर केलें. तथापि राष्ट्रीयसभेच्या व्यवस्थापकांवर झालेली लोकांची सामान्य इतराजी अद्यापि कायमच असल्यामुळें मंडपास कदाचित् आग लागेल ही भीति त्यांच्या मनाला मधून मधून डसत असे; व आग लागली तर ती विझविण्याकरितां विशेष प्रकारच्या साधनांचीहि मंडपाजवळ तजवीज करण्यांत आली होती.

वर्किंग कमेटीचा राजीनामा देऊन बाहेर पडल्यावर टिळकांनीं यापूर्वी आपण केलेल्या कामाचा रिपोर्ट व जमा खर्चाचा हिशेब तावडतोब प्रसिद्ध केला आणि कांग्रेसच्या कामांतून ते कायमचे मोकळे झाले. पण परिषद मंडपांतून बाहेर खेंचण्याचें काम शिल्लक उरलें होतें व तिची खेंचाखेंची एकदोन आठवडे खूप जोरानें सुरू होती. टिळकांनीं जरूरीचें विनंतीपत्र बाहेरगांवीं पाठवून लोकांस असा इषारा दिला कीं, राष्ट्रीयसभेकरितां प्रतिनिधींची निवडणूक जाहीरसभांतून व कमेट्यांतून होईल त्याबरोबरच परिषद मंडपांत भरवूं नये अशा अर्थाचे ठरावहि मंजूर होऊन वर्किंग कमेटीकडे धाडले जाव, व त्याप्रमाणे धडाधडा ठराव येऊं लागले होते. इकडे वर्किंग कमेटीनें 'राष्ट्रसभासमाचार' म्हणून एक तात्पुरतें वर्तमानपत्र ज्ञानप्रकाशाच्या जोडीला काढून आपली बाजू लोकांपुढें मांडण्याचा प्रयत्न चालविला होता. तसेंच परिषदेचे चिटणीस रा. ब. रानडे यांनीं परप्रांतांतून सल्ला मिळविण्याकरितां जीं पत्रें पाठविलीं त्यांचीं उत्तरें म्हणून किंवा स्वतंत्र निरोप म्हणून पत्रें येऊं

लागली. त्यांतहि परिषद मंडपांत भरविण्याच्या हट्टामुळें स्वतः राष्ट्रीयसभेसच जर विघ्न येण्याचा संभव असेल तर तो आग्रह सोडून द्यावा असा सल्ला मिळूं लागला. लंडन टाइम्स, अमृतबझार पत्रिका, इंडियन नेशन, हिंदू पेट्रियट, होप, पॉवर, नॅशनल गार्डियन, मद्रासचा हिंदू वगैरे अनेक पत्रांनीं असाच सल्ला दिला होता व दाते यांनीं जाहिरसभेंत भाषण करितांना त्यांतील कांहीं उतारे वाचून दाखविले होते. बंगाल्यांत एका 'इंडियन मिरर' पत्राखेरीज कोणीच मंडपांत सभा भरविण्यास अनुकूल नव्हतें. ठिकठिकाणचे शास्त्रीपंडित हे तर मुळीं परिषदेच्याच विरुद्ध होते मग ती मंडपांत भरविण्याविरुद्ध असतील हें सांगावयासच नको. राष्ट्रीयसभेस प्रतिनिधी निवडतात म्हणून सामाजिक परिषदेलाहि मुखत्यार निवडावेत व अशा रीतीनें तिचें राष्ट्रीय स्वरूप व्यक्त करावें असा प्रयत्न कित्येक ठिकाणीं झाला. पण तें व्यर्थ झालें. लहान गांवांतून परिषदेला थाराच नव्हता पण शहरांतूनहि लहानशा जागेंत थोडी निवडक मंडळी जमून व वातावरण बिघडल्यामुळें कोठें कोठें दारेंहि लावून घेऊन या निवडणुकीच्या सभा भरवाव्या लागल्या. सुधारक म्हणजे जनावरांतले शहाणे किंवा उकिरड्यांत पडलेले हिरे हें एकच वर्णन, कोणी स्तुतिपर लावी कोणी निंदापर लावी, असले वाद बहुधा रक्ताचें गालबोट कोठेंतरी लागल्याशिवाय मिटत नसतात व तें गालबोटहि पुण्यास लागलें. ता. २३ नोव्हेंबर रोजीं न्यू इंग्लिश स्कूलमधील शिक्षक व त्या वेळचे सुधारकाचे संपादक वासुदेव बळवंत पटवर्धन हे हॅम्लेट नाटकाचा प्रयोग पाहून परत येत असतां त्यांना कोणीं काठी मारली व त्यायोगानें त्यांच्या डोक्याला लहानशी जखमहि झाली. काठी कोणी मारली याचा पत्ता लागला नाहीं; पण सुधारकपक्षानें त्याचा वहीम अर्थात् टिळकपक्षावर घेतला; व लोकांच्या तोंडीं कांहीं वेळ तोच विषय होऊन बसला. आज एकाच्या डोक्यांत काठी घातली, उद्यां खरोखरच मंडप जाळतील असें सुधारक म्हणूं लागले. पुढें खरोखरच काय झालें असतें कोणास ठाऊक! पण श्रीधर विठ्ठल दाते यांचें दहशतीचें भाषण व वासुदेवराव पटवर्धन यांस झालेली जखम यांनीं लोकमत हाबरलें यांत शंका नाहीं. कसेंहि असो याहि गोष्टीनें भरींत भर पडून परिषद मंडपांतून अखेर बाहेर निघाली ही गोष्ट मात्र खरी.

ता. २८ नोव्हेंबर रोजीं रा. ब. रानड्यांनीं तारेनें असें जाहीर केलें कीं, सामाजिक परिषदेकरितां राष्ट्रीयसभेचा मंडप यंदां न मागण्याचें आम्हीं ठरविलें आहे. लगेच केसरीनें जादापत्रक काढून ही बातमी महाराष्ट्रभर कळविली. स्टॅंडिंग कांग्रेसकमीट्यांतील वीस कमेट्यांकडून परिषदेस अनुकूल असे अभिप्राय आले होते व दहांनीं तडजोडीची शिफारस केली होती. पण कांग्रेस कमेट्या ठिकठिकाणीं रानड्यांच्या अनुयायांच्या हातीं होत्या. यामुळें कमीट्यांतील बहुमत निरुपयोगी आहे, हें स्वतः रानड्यांनाच माहीत होतें, व अखेर सर्वसाधारण

लोकमतालाच मान देऊन रानडे यांनीं परिषद मंडपांतून बाहेर नेण्याचें ठरविलें. या निकालाचें श्रेय इतर पुष्कळ कारणांकडे असेल, तरी पण त्यांतल्यात्यांत पुण्याच्या राष्ट्रीयसभेचे नियोजित अध्यक्ष बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांना तें श्रेय बरेंच दिलें पाहिजे. त्यांनीं पुण्यांतील वर्किंग कमेटीला स्पष्ट लिहून कळाविलें कीं, मी स्वतः सुधारणावादी असलों तरी परिषदेविषयींचें लोकमत लक्षांत घेणें जरूर आहे व मी तुम्हाला राष्ट्रीयसभेचा अध्यक्ष हवा तर मी पुण्यास येण्यापूर्वी पुण्यांतील तंटे मोडले पाहिजेत. हा निर्वाणीचा खलिता वाचल्यावर रानडे यांना आपला आग्रह सोडणें भाग पडलें. परिषद मंडपांतून बाहेर काढण्याचा आपला निश्चय सुरेंद्रबाबूंस तारेनें कळवितांना रानडे यांना फार वाईट वाटलें म्हणतात. आठ वर्षे घडत आलेली गोष्ट यंदा प्रथम व आपल्या शहरांतच मोडावयाची ही गोष्ट मनाला लागण्यासारखी खरीच. पण लोक म्हणूं लागले अवघीं आठ वर्षे चालू असलेली गोष्ट बदलण्यास जर इतकें दुःख, तर शेंकडों वर्षे चालत आलेल्या चालीरीती मोडण्यास लोकांनाहि किती दुःख होत असेल ? परिषदेंत नुसत्या सूचना होत नसून समाजावर अत्यंत कडक टीका होतात. असली अप्रिय परिषद, लोकांना सर्वांशीं प्रिय असलेल्या राष्ट्रीयसभेच्या मंडपांत भरविण्याचा आग्रह धरणें हीच मुळीं चूक. मग ती दुरुस्त करण्यांत एवढें दुःख कां वाटावें ?

अशा रीतीनें टिळकपक्षाचा विजय झाला. पण त्याचा दुरुपयोग पुढें टिळकांनीं केला नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. टिळकांप्रमाणें नातूपक्षाचेंहि कार्य झालें. पण, सुधारकांच्या हातीं राष्ट्रीयसभेची व्यवस्था या सबबीवर आपला रुसवा चालू ठेऊन नातूपक्षानें वर्गणीचा हात थोडाबहुत आंखडताच धरला. टिळकांनीं मात्र आपलें पूर्वीचेंच धोरण सुसंगत रीतीनें चालवून, अप्रियतेचें बीज खणून निघालें, आतां सर्व लोकांनीं पुढें येऊन सढळ हातानें राष्ट्रीय सभा यशस्वी करण्यास मदत करावी असें खुल्या दिलानें सांगण्यास सुरुवात केली. " राष्ट्रीयसभेचें काम 'अ'नें केलें काय किंवा 'ब'नें केलें काय आम्हांस सारखेंच. त्याबद्दल आग्रह धरून बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं; निदान आग्रह धरण्याची ही वेळ नाहीं. सभा दानतीन आठवड्यांवर आली. आतां जुना वाद विसरून शहराचें नांव राखण्याचा अभिमान धरला पाहिजे व आहे ही व्यवस्थापक मंडळी आपलीच असें मानून त्यांस मदत केली पाहिजे. " या उपदेशाप्रमाणें त्यांच्या हातीं जमण्यासारखी २५०० रुपयांची वर्गणी त्यांनीं जमवून वर्किंग कमेटीकडे पाठविलीहि. यानंतर वर्किंग कमेटींत उभयपक्षांचे समसमान लोक घेऊन दोघांना मिळून सभेचें काम करितां आलें असतें. पण आपल्या पराभवामुळें वर्किंग कमेटी नाराज होऊन राहिली होती व टिळकांनीं वरीलप्रमाणें मदतीचा उपदेश केला व प्रत्यक्ष मदतहि केली, तरी तिनें आपलें काम एकतर्फीच चालविलें.

तथापि अखेर काम एकतर्फी कां होईना पण तडीला जाऊन पुण्याची

राष्ट्रीयसभा थाटानें पार पडली यांत शंका नाहीं. सभेचे अध्यक्ष बाबू सुरेंद्रनाथ यांच्याशीं टिळकांनीं आधींपासून सूत लावून ठेविलें होतें. त्यांनीं बाबूजींना पत्रें लिहून पुण्यांतील वस्तुस्थिति योग्य वेळींच कळवून ठेविली होती व टिळकांच्या सूचनेनें त्यांनीं वर्किंग कमेटीला तंटे मिटविण्याचा इषारा दिला होता. अध्यक्ष हे वर्किंग कमेटीचे पाहुणे या नात्यानें कमिटीनें त्यांचा सर्व प्रकारें सत्कार केलाच. पण टिळक कांग्रेसच्या व्यवस्थेंत नव्हते तरी त्यांनीं अध्यक्षांचा सत्कार वगैरे कामीं आपल्या पक्षाचें वैशिष्ट्य ठेवण्याची खबरदारी घेतली होती. सुरेंद्रनाथ पुण्यास येणार तेव्हां पुण्यातर्फे त्यांचें जें स्वागत व्हावयाचें तें अर्थात् स्वागत कमेटीकडूनच होणार; पण त्याच्याहि आधीं आपल्या पक्षाकडून तें व्हावें अशी टिळकांनीं युक्ती योजली. अध्यक्षांनीं मनमाडास उतरून दौंडावरून पुण्यास यावें असें ठरलें होतें व ते त्याप्रमाणें दौंडास येऊन ते आपल्या डब्यांतच निजून राहिले निजले होते. त्यांच्या स्वागताकरितां म्हणून सेक्रेटरी गोखले हे रात्रीच्या गाडीनें दौंडास गेले. पण सुरेंद्र बाबू निजलेले पाहून ते तसेच स्टेशनावर एका बाजूस सुरेंद्रनाथ जागे होण्याची वाट पहात बसले. इकडे टिळकांनीं आपले भाचे धोंडोपंत विद्वांस यांना स्वदस्तुरचें पत्र देऊन आगाऊच दौंडास पाठविलें व त्यांनींहि हळूच जाऊन, सुरेंद्रबाबू जागे होऊन डब्याचें दार उघडतात तोंच त्यांना टिळकांचें पत्र दिलें. अशा रीतीनें ही गमतीची हुल्लड टिळकांनीं जिंकली. गोखले नंतर येऊन पाहतात तों सुरेंद्रबाबूंच्या हातांत खुद्द टिळकांचें पत्र! अध्यक्षांचें स्वागत कमेटीतर्फे पुण्याच्या स्टेशनावर करण्याची जय्यत तयारी झाली होती. पण टिळक, बाबामहाराज, नातू वगैरे मंडळींनीं अगोदरच हडपसर स्टेशनावर जाऊन तेथेंच अध्यक्षांचा सत्कार करून त्यांस पानसुपारी केली. सारांश, टिळकांच्या चातुर्यानें अध्यक्षांच्या हातांत पहिलें पत्र टिळकांचेंच पडलें व पहिला स्वागत समारंभहि टिळकपक्षाचाच झाला. टिळकांनीं धोंडोपंतांजवळ दिलेल्या पत्रांतच हडपसर स्टेशनावरील पानसुपारीचा उल्लेख होता अर्थात् या दोन्ही योजना टिळकांच्या एकदमच डोक्यांत आल्या व त्यांच्या योजनेप्रमाणें सर्व अचूक घडून आलें; तसेंच राष्ट्रीयसभेच्या दुसऱ्याच दिवशीं संध्याकाळीं रेमार्केटांत पांच वाजतां श्रीमंत पंत प्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखालीं श्रीशिवाजीस्मारकासंबंधीं टिळकांनीं जंगी जाहीर सभा भरवून तींत सुरेंद्रनाथ बानर्जी, पंडित मदनमोहन मालवीय वगैरे लोकांचीं व्याख्यानें करविलीं. स्मारक चळवळीचे सेक्रेटरी टिळक, तींत सुधारकांचा कांहीं संबंध नाहीं, या दृष्टीनें पाहतां टिळक व बाबू सुरेंद्रनाथ यांचा हा निकट स्नेहसंबंध लोकांच्या डोळ्यांत भरण्यासारखाच होता व सुधारकांच्या डोळ्यांत खुपण्यासारखा होता. पण येवढ्यानें भागलें नाहीं. या सभेंतून मंडळी उठून तशीच पेटिटच्या "ईगल्स नेस्ट" नामक बंगल्यांत श्रीबाबामहाराज यांनीं राष्ट्रीयसभेच्या प्रतिनिधींना दिलेल्या गार्डनपार्टीला गेली. या

समारंभाचे यजमान टिळकांचे स्नेही, अर्थात यांतहि टिळपक्षानेंच आपला हात साधून घेतला. अशा रीतीनें टिळक हे राष्ट्रीयसभेचे सेक्रेटरी नसतांहि, एका बाजूनें सामाजिक परिषद मंडपांतून बाहेर काढून देऊन व दुसऱ्या बाजूनें अध्यक्षांचा सत्कार-समारंभ वगैरे करून आपल्या पक्षाचें महत्त्व परप्रांतांतील पुढारी लोकांच्या मनावर टिळकांनीं यथायोग्य बिंबवून दिलें. सामाजिक परिषदेकरितां मंडपापासून बरीच दूर, म्हणजे फर्ग्युसन कॉलेजचें हल्लींचें क्रिकेट खेळण्याचें मैदान आहे त्या जागीं, जागा खणून साफ करून मंडप घालण्यांत आला होता व तेथें तिचेंहि काम व्यवस्थित रीतीनें पार पडलें. परंतु परिषदेंत लोक सोडावयाचे ते तिकिटाशिवाय सोडावयाचे नाहींत व तिकिटें द्यावयाचीं तींहि अगदीं माणूस पाहून कसून पारखून द्यावयाचीं असा बंदोबस्त करण्यांत आला होता.

त्या वर्षींच्या सामाजिक परिषदेंत न्या. रानडे यांनीं या मंडपवादासंबंधानें बरेंच महत्त्वाचें भाषण केलें. त्यांनीं केलेला खुलासा खालील अर्थाचा होता. मुंबई, कलकत्ता, लाहोर, नागपूर, मद्रास, अलाहाबाद इतक्यांपैकीं एकाहि ठिकाणीं हल्लींसारखा वाद उत्पन्न झाला नाहीं मग तो पुण्यासच कां व्हावा ? पुणें हें खचित या इतर शहरांबरोबरीचें आहे. या शहराचा आपणा सर्वांनाच अभिमान आहे. पुण्यास घडलेली गोष्ट होऊं नये असा माझा अदमास होता, पण घडली खरी. बाहेरच्या पुष्कळ ठिकाणांहून तारा व पत्रें आलीं. लोकांना वाटलें हा वाद व्यक्तिविषयक आहे. पण तें खरें नाहीं. दहाबारा लोक एकत्र जमले तरी मतभेद होतो व असे व्यक्तिशः मतभेद जगाच्या अंतापर्यंत टळणार नाहींत. पुण्याप्रमाणें इतरत्रहि पक्षभेद आहेत. एकानें दुसऱ्याला वाईट म्हणावें, दुसऱ्याबद्दल गैरसमज करून घ्यावा हें सर्व ठिकाणीं चालूच आहे. पण या सामान्य खुलाशानें प्रस्तुत प्रसंगीं समाधान होत नाहीं. मंडपांत सभा भरवावी कीं नाहीं असली सामान्य गोष्ट; पण केवळ या क्षुद्र आग्रहाकरितां उभयपक्षांतील शहाणेसुर्ते लोक इतके वेडे झाले असें म्हणावयाचें काय? नाहीं; त्याला अधिक खोल कारणें आहेत. इतर ठिकाणीं जी गोष्ट करण्याचें धैर्य लोकांत नव्हतें तें एकट्या पुण्याच्या लोकांनीं दाखविलें हेंहि म्हणणें मला पटत नाहीं. खरें कारण मला वाटतें असें आहे; सामाजिक सुधारणेचे बिकट प्रश्न सोडविण्याच्या, या एकाच देशांत अनेक लोकांत, अनेक रीती आहेत. बंगाल्यांत समाजसुधारकांनीं ब्रह्मसमाजाच्या नांवानें स्वतंत्र वर्गच बनविला. एकट्या ईश्वरचंद्र विद्यासागराखेरीज एकहि समाजसुधारक या वर्गाबाहेर असलेला आढळणार नाहीं. पण यामुळें एका टोंकाला कालीचे उपासक म्हणजे जुन्यांतील जुन्या मताचे लोक, आणि दुसऱ्या टोंकाला ब्रह्मसमाजिस्ट म्हणजे अगदीं नव्यांतील नव्या मताचे लोक, असे दोन अगदीं पृथक् वर्ग निर्माण झाले. ते इतके कीं एका वर्गाचा दुसऱ्या वर्गाशीं अर्था अर्थीं कांहींएक संबंध राहिला नाहीं. जसा बंगाल्यांत ब्रह्मसमाज तसाच जवळ जवळ पंजाबांत आर्यसमाज. पण

सामाजिक परिषदेचा खरा हेतु जुन्या समाजपरंपरेची शिडी लाथाडून देऊन पाठीनें भिंत चढण्याचा नाहीं. पुराणमतवादित्व ही एक शक्ति आहे. ती विसरतां तर येत नाहींच पण टाकाऊहि मानतां येत नाहीं. नवा धर्मग्रंथच बनवून त्यावर नवीन सामाजिक रचना करणें हा एक मार्ग झाला. पण इतरहि अनेक मार्ग आहेत ते टाकाऊ नाहींत; व सर्वांना एकच मार्ग मान्य होईपर्यंत सर्वांनीं पृथक्‌पणें सहकारित्व केलें पाहिजे. आमच्या इलाख्यांतील विशेष हा आहे कीं बंगाल्याप्रमाणें जुन्या समाजाशीं फटकून व एकप्रकारें बंडखोरी पत्करून आम्ही सुधारक लोक काम करीत नाहीं. आम्हीं इकडे सर्व रीतींचा उपयोग एकदम करीत असतों. बनेल तेव्हां जातींच्या द्वारें सुधारणा करवितों. जमेल तेव्हां शंकराचार्यांना वळवून आज्ञापत्रें मिळविण्याचा प्रयत्न करितों. वाटेल तर शपथपत्रिकांवर सह्या करून स्वयंनिर्मित बंधनानें प्रगति करूं पहातों. जरूर वाटेल तेव्हां कोणीं कायद्याकडे धांव घेतो. पण बंगाल्याप्रमाणें आम्हीं सुधारक आपली वेगळी जात किंवा वेगळा धर्म किंवा सवता सुभा बनवीत नाहीं. या प्रांतांतील सुधारकांचा मार्ग कित्येकांना अनिश्चित, स्वच्छ व तुटक, असा वाटणार नाहीं; पण तो आमचा कमकुवतपणा नसून तीच आमची बळकटी होय. सुधारक व पुराणमतवादी एकाच छावणींत राहून मार्ग आक्रमण करीत आहेत म्हणूनच पुण्यांत तंटे झाले. सवता सुभा निर्माण करून मुळांत वाद उत्पन्न होण्याचाच टाळतां येणं हें अगदीं सोपें काम होतें. पण त्या मार्गाचा आम्हाला अवलंबच करावयाचा नव्हता. व्यक्तिद्वेष व गैरसमज पुण्यांत नव्हते असें नाहीं. पण वादाचें खरें कारण तें नसून त्या कारणानें वादांत थोडी भर टाकली. पण इतर ठिकाणीं न माजलेला वाद पुण्यांत माजण्याचें कारण आम्हीं एकत्र राहूनच आपापल्या दृष्टीनें प्रगति करूं इच्छितों हें होय.

शेवटीं या मंडपवादांतून निघालेल्या एका गोष्टीचा उल्लेख करून हें प्रकरण पुरें करूं. ही गोष्ट म्हणजे, लोकमताला किंवा लोकशक्तीला "ब्रूटफोर्स" किंवा "जनावरांची शक्ति" असें निंदाव्यंजक नांव गोपाळराव गोखले यांनीं एका सर्क्युलरांत दिलें त्यावरून निघालेला मनोरंजक वाद. हा वाद कांहींसा शुष्कच होता. पण तो त्या वेळीं टिळकांना फायद्याचा होता म्हणून त्यांनीं आरंभिला व त्यांतूनहि गोखले यांनीं सेलबीसाहेबाकडे शब्दार्थासाठीं धांव घेतल्यानें फुकट वाढला.

गोखले यांचें मूळ वाक्य अशा अर्थाचें होतें कीं, टिळक पुण्यांत आपलें म्हणणें खरें करूं पहात आहेत तें 'ब्रूटफोर्स' च्या आधारें. टिळकांनीं या शब्दप्रयोगाचा तावडतोब गवगवा केला व गोखले हे लोकमताला पशूंचें मत असें म्हणतात अशी तक्रार जनतेपुढें मांडली. 'ब्रूट' या शब्दाचा अर्थ जनावर होतो ही गोष्ट निर्विवाद आहे. पण 'ब्रूटफोर्सचा' म्हणजे पाशवी शक्तीचा उपयोग केला जातो असें म्हणण्यांत, तो उपयोग करणारांना किंवा ज्यांच्या शक्तीचा उप-

योग केला जातो त्यांना, 'जनावरें' म्हणून शिवी दिल्यासारखी होते कीं काय येव-ढाच रोकडा वादाचा प्रश्न उरतो. लोकमत म्हटलें म्हणजे तें नुसत्या सुशिक्षितांचें मत नव्हे तर अशिक्षितांचेंहि मत त्यांत येतें; पण लोक अशिक्षित म्हणून त्यांना जनावरांची उपमा देणें हा त्यांचा उपमर्द होय असें टिळकांचें म्हणणें होतें. 'लोक' या शद्बाची जशी नक्की व्याख्या नाहीं तशीच 'सुशिक्षित' या शद्बाचीहि नाहीं. लोक म्हटले म्हणजे जसे त्यांत समाजाचे थर अगदीं खालपर्यंत एकमेकांस चिकटलेले असतात, तशाच सुशिक्षितांतहि एकाहून एक अधिक विद्वान् अशा चढत्या पायऱ्या अनेक असतात. अर्थात् 'लोक' म्हणजे सर्वांत अधिक विद्वान् नव्हेत किंवा सर्वांत अधिक अज्ञ हेहि नव्हेत. लाखों रुपयांचा व्यापार करणारे लोक पढिक नाहींत म्हणून गाढव आणि बेकनचीं दोन बुकें वाचणारा चष्मेवाला पदवीधर तेवढाच शाहाणा कसा ठरतो ! ता. १५ नोव्हेंबरच्या अग्रलेखांत केसरी लिहितो " केसरी हा जात्याच जनावरांचा राजा असल्यामुळें त्याला तेली–तांबोळी उदमी व्यापारी वगैरे जनावरांत मिसळण्यास कांहींच हलकेपणा अथवा लाज वाटत नाहीं. किंबहुना जनावरें हींच आपली शक्ति असें तो समजतो. मग इंग्रजी विद्येनें चावट किंवा वृथाभिमानी झालेले लोक कांहींहि म्हणोत "

लोकांना आपण जनावरें म्हटलें हा आरोप गोखल्यांना फार झोंबला. शिवाय गांव आधींच बिथरलेला. त्यांत सुधारकांनीं लोकांना जनावरें म्हटलें असें ठरल्यावर मग बोलावयासच नको. या आरोपाचें निराकरण कसें होणार ? वादाचा मुद्दा पडला इंग्रजी वाक्याच्या अर्थाचा; तेव्हां टिळकांचा अर्थ चूक ठरल्यास तो त्यांनीं मुद्दाम गैरसमज करण्याच्या बुद्धीनें तसा केला, असें भासवितां येऊन बाजू उलटविण्याचा एक संभव होता; म्हणून गोखल्यांनीं आपल्या नांवानें प्रसिद्ध झालेलें सर्क्युलर डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपाल सेल्बी यांजकडे पाठवून ब्रूटफोर्स या शद्बाचा टिळकांनीं जो अर्थ केला तो बरोबर किंवा चुकीचा आहे असा अभिप्राय विचारला व सेल्बीसाहेबांनींहि आपला अभिप्राय खालील शद्बांत दिलाः—

"To say that in attributing to certain people a design to carry their measures by 'brute force' you intended to call them brutes is non-sense." पण यानें गोखल्यांची बाजू विशेष सांवरली गेली असें मात्र नाहीं. ' ब्रूटफोर्स ' या शब्दप्रयोगांत ब्रूट या शब्दाचा जनावर हा जो वाच्यार्थ तो जाऊन त्याचे जागीं लक्षणेनें आडमुठें शरीरबल, किंवा निवळ शिरगणतीचें बळ, किंवा अशिक्षित लोकसत्तेचें बळ असा अर्थ येतो ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. तथापि शब्दार्थ केवळ लक्षणारूढ झाला म्हणून मूळ शब्दोच्चारामुळें मनांत उत्पन्न होणारे सर्वच विचार लुप्त होतात असें नाहीं; व त्यांतील कांहीं विचार जर निंदाव्यंजक असले तर तो शब्दप्रयोग करणाराला निंदा थोडी तरी अभिप्रेत होती असा कोणीं बळेंच जरी आरोप केला तरी त्यांतून

निसटतां येत नाहीं. 'ब्रूटफोर्स' याचा अर्थ जनावरें असाच कां घ्यावा असें विचारणाराला उलट असा प्रश्न टाकतां येतो कीं, तो शब्द वापरतांना तुमच्या मनांत निंदाबुद्धी नव्हतीच याची जामिनकी काय ? जनावरी शक्ती याचा अर्थ अशिक्षित लोकमत इतकाच जर तुमच्या मनांत होता तर "opinion of uneducated people" असा सरळ निर्विवाद प्रतिशब्दच तुम्ही कां वापरला नाहींत? तात्पर्य, गोखल्यांनीं आधीं आक्षेपार्ह शब्द वापरून बाजू अंगावर घेतली व खुलासादाखल साहेबाचें सर्टिफिकीट आणून ती अर्धांकच ओढवून घेतली. 'तेलीतांबोळ्यांचे पुढारी' व 'ब्रूटफोर्स' हे दोन शब्द महाराष्ट्रीय राजकारणाच्या इतिहासांत अढळ होऊन राहणारे असून, त्यांची उत्पत्ति या मंडपवादांत असल्यामुळें ही हकीकत येथें दिली आहे. टिळकांचें एकंदर सार्वजनिक चरित्र हें जर एकाद्या कमानीसारखें मानलें तर सामान्य जनसमाजाचा पाठिंबा हा त्या कमानींतील 'चावीचा दगड' म्हणतां येईल; व या वादांतील मूलतत्व खरोखरच फार महत्त्वाचें आहे. प्रस्तुत वादांतील मुद्यावर टिळकांनीं गोखल्यांना दिलेलें उत्तर टिळकांच्या वादपद्धतींतील उत्कृष्ट नमुन्यादाखल असल्यामुळें, ता. १९ नोव्हेंबरच्या केसरीच्या अग्रलेखांतील खालील ओळी आम्हीं या ठिकाणीं मुद्दाम उतरून घेतल्या आहेतः—

"मि. सेल्बी हे दोन सोप्या इंग्रजी शब्दाचा अर्थ सांगण्यास आम्हास नको आहेत. 'ब्रूट' म्हणजे जनावर आणि 'फोर्स' म्हणजे शक्ति, हे या दोन शब्दाचे मुख्य अर्थ आहेत हें कोणताहि कोश उघडला असतां कोणासहि कळून येईल. ब्रूट हा शब्द संख्यावाचक आहे असें कोणीच म्हणूं शकणार नाहीं. करितां 'ब्रूट फोर्स' म्हणजे संख्येचा जोर असा जो मि० सेल्बी यांनीं अर्थ केला आहे तो लाक्षणिक आहे, असें त्यांनाहि कबूल करावें लागेल. एकाद्यानें कोणास बैल म्हटलें असतां त्यास शिंगें अगर शेपटें फुटत नाहींत ही गोष्ट आम्हांस मान्य आहे, पण यामुळें आमच्या कोटिक्रमास काडीइतकाहि धक्का येत नाहीं. जनावरांस शक्ति असते पण अकल नसते, करितां 'जनावरांची शक्ति' हे शब्द लाक्षणिक अर्थानें नुसत्या संख्येच्या म्हणजे विनअकलेच्या लोकांच्या जोरास लावितात. परंतु लाक्षणिक अर्थानें 'ब्रूट फोर्स' या शब्दाचा उपयोग केला तरी त्यांत लोकांचा उपमर्द केला ही गोष्ट शिल्लक राहतेच. नुसत्या संख्येचा जोर म्हणजे तरी काय? अकल नाहीं हेंच कीं नाहीं ? मार्केटांत नुसतीं डोकीं जमलीं होतीं आणि अकला सुधारकांचे ताब्यांत होत्या, हाच जर 'ब्रूट फोर्स' याचा मि. सेल्बी यांच्या म्हणण्याप्रमाणें अर्थ असेल तर त्यांत आणि आम्हीं केलेल्या अर्थांत कांहीं तफावत आहे, असें आम्हांस वाटत नाहीं.

"लोकमत, हा ज्याप्रमाणें सामासिक शब्द आहे त्याप्रमाणें 'ब्रूट फोर्स' हाहि धरला पाहिजे, आणि तसा तो धरला असतां लोक म्हणजे 'ब्रूट' व मत म्हणजे फोर्स असें उघड होते ! सारांश रे मार्केटांत जमलेली मंडळी 'मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति'

किंवा ' साक्षात् पशुः पुच्छविषाणहीनः ' या वर्गांतील असून अशांचें मत म्हणजे बिनशेपट्या आडमुठ्यांचें मत असाव, ब्रूट फोर्स म्हणणारांचा हेतु होता, असेंच म्हणावें लागतें. विनाकारण शब्दवाद वाढविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ' नुसत्या संख्येचा जोर' यांत 'नुसता' शब्द वापरण्याचा हेतु 'बिनअकल संख्येचा जोर' असें भासविण्याचाच आहे कीं नाहीं ? मग लोकांस बिनअकल म्हटलें काय आणि पशु म्हटलें काय एकच. ' ब्रूट फोर्स ' याच्या अर्थाचा वाद करून खुंटा हलवून मात्र बळकट करून घेतला ! "

---

## भाग २० परिशिष्ट (१)

### टिळकांची ' हिंदु ' पत्रावर फिर्याद

[ या परिशिष्टांत एका फिर्याद–अर्जाची नकल दिली आहे. ती फिर्याद टिळक हे मद्रासच्या 'हिंदू' वर्तमानपत्रावर करणार होते. फिर्यादीचें कायदेशीर कारण फिर्याद–अर्जांत दिलेंच आहे. त्या संबंधीं थोडक्यांत हकीगत द्यावयाची तर ती अशीः—सेक्रेटरीशिपची भांडणें मिटलीं व सामाजिक परिषद मंडपांतून बाहेर निघाली, परंतु राष्ट्रीय सभेला पुण्यातर्फे प्रतिनिधी निवडण्याचें काम शिल्लकच होतें. पण ही बाजूहि टिळकांनीं युक्तीनें जिंकली. ता. २० डिसेंबर रोजीं सकाळीं, सुधारकांच्या हातीं गेलेल्या स्वागतमंडळानें असें जाहीर केलें कीं, पुण्यातर्फे डेलिगेट निवडण्याकरितां नागरिकांची जाहीर सभा रविवार पेठेंतील फडके यांचे वाड्यांत सायंकाळीं भरणार आहे. ही थोड्या तासांची नोटीस आणि चौफेर संकुचित जागा लक्षांत घेतली म्हणजे सभा भरविणारांचा हेतु तेव्हांच लक्षांत येण्यासारखा होता. पण त्यांच्यावर तोड करण्याला टिळकपक्षहि कांहीं कमी नव्हता. ठरल्या वेळेच्या आधीं तासभर, टिळक त्यांच्या पक्षाची प्रमुख मंडळी व लॉ क्लासचे विद्यार्थी फडक्यांचे वाड्यांत जाऊन खुर्च्या बाकें अडवून बसले. ते असे कीं ठराविक वेळेला गोखले नगरकर वगैरे मंडळी आली त्यांना जागाहि मिळेना. या घांदलींत बराबर सभेची वेळ होतांच वासुदेवराव जोशी यांनीं पूर्वसंकेतानुरुप उठून श्रीमंत दामोदर यशवंत जोग यांचें नांव अध्यक्ष म्हणून सुचविलें, व जोग यांनींहि अनुमोदनाची वाट न पाहतां तडक जाऊन अध्यक्षाची खुर्ची घेतली. लगेच दुसऱ्या एकानें उठून टिळकांच्या पक्षांतील लोकांची एक यादी पुण्याच्या प्रतिनिधींची यादी म्हणून वाचून दाखविली.

आणि 'आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनं' अशा रीतीनें सुधारकपक्षीय मंडळी अवधान सांवरतात–न सांवरतात–तोंच सभेचें काम होऊन सभा बरखास्तहि झाली. सुधारक वर्ग ओशाळला होऊन परत गेला, व त्यांनीं फिरून वेगळी सभा भरवून आपल्यापुरते प्रतिनिधी निवडून घेतले. टिळकांच्या या युक्तिबाज हुलडीचा सुधारकांनीं गवगवा केला, व निरनिराळ्या वर्तमानपत्रांस तारा पाठविल्या. त्यांत टिळकांच्या लॉ क्लासांतील मुलांनीं गर्दी केली अशा अर्थाचा कांहीं मजकूर होता. ही खोटी बदनामीची हकीकत छापल्याबद्दल खालीलप्रमाणें फिर्याद करून 'हिंदु' पत्राला प्रायश्चित्त देण्याचा टिळकांचा विचार होता; व ती दाखल झाली असती तर 'हिंदू' पत्राचे संपादक जी सुब्रह्मण्य अय्यर यांना कांग्रेसच्या मंडपांत बसूं कीं सिटी मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांत बसूं असा गमतीचा सवाल पडण्यासारखा होता. पण टिळकांचा खरा कटाक्ष बिचाऱ्या 'हिंदु' पत्राच्या संपादकापेक्षां ज्यानें पुण्याहून ही खोटी तार पाठविली त्याच्यावर होता हें सांगावयास नकोच. सुब्रह्मण्य अय्यर व टिळक हे स्नेही होते. पण अय्यर हे सुधारक असल्यामुळें या मंडपवाद प्रकरणांत त्यांची सहानुभूति गोखलेपक्षाकडे होती. म्हणून स्नेही कां होईना पण त्यालाहि इजेरी घेतल्याची चुणुक दाखवावी असें टिळकांना वाटलें असावें. सुब्रह्मण्य अय्यर यांचे सहकारी संपादक वीरराघवाचारियर हे जुन्या मताचे असल्यामुळें अय्यरपेक्षां त्यांची व टिळकांची गट्टी अधिक होती. तेहि राष्ट्रीय सभेला येणार होते; व टिळकांची ही फिर्याद प्रत्यक्ष दाखल झाली असती तरी ती शेवटीं काढून घेण्यांत आली असती याविषयीं कोणासच शंका नाहीं. ]

फिर्याद अर्जी–मेहेरवान सि. मा. वर्ग १ यांचे कोर्टांत

"फिर्यादी–बाळ गंगाधर टिळक. रा. पुणें पेठ सदाशिव

आरोपी–जी. सुब्रमण्य अय्यर, रा. मद्रास–हिंदु वर्तमान पत्राचे मालक छापणारे व प्रसिद्ध करणारे, १०० माउंटरोड मद्रास.

इं. पी. कोड कलम ५००

फिर्यादीची फिर्याद इं. पी. कोड कलम ५०० प्रमाणें अशी आहे कीं, आरोपी हे मद्रास येथें दररोज निघणाऱ्या हिंदु नामक वर्तमानपत्राचे मालक छापणारे व प्रसिद्ध करणारे आहेत. त्यानी आपल्या सदरचे पत्रांत तारीख २१ डिसेंबर सन १८९५ इसवीचे अंकांत इंडियन टेलीग्रामस या सदराखालीं पान ५ कालम ४ चे आरंभीं Disgraceful Squabble at Poona असें हेडिंग घालून, त्याखालीं आपल्या पुण्याच्या बातमीदाराकडून आलेली म्हणोन तार छापून प्रसिद्ध केली आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं, पुणें येथें तारीख २० डिसेंबर सन १८९५ इसवी रोजीं रविवार पेठेंतील फडक्याचे वाड्यांत भरलेल्या जाहीर सभेची हकीगत म्हणून दिलेली आहे, त्यांत फिर्यादीची

व त्याच्या लॉ क्लासची बेअब्रू होईल असा मजकूर छापून प्रसिद्ध केला आहे. सदरहू मजकूर खोटा असून तो छापून प्रसिद्ध केल्यामुळें फिर्यादीबद्दल व त्याचे संस्थेबद्दल ( लॉ क्लास ) लोकांचे दृष्टीनें कमीपणा आणला आहे. त्यामुळें फिर्यादीची बेअब्रू होऊन त्याचे मनास फार वाईट वाटत आहे. हें कृत्य आरोपीनें फिर्यादीचे अब्रू घेण्याचे इराद्यानें केलें आहे. आरोपीचें वर्तमानपत्र पुणें शहरांत प्रसिद्ध झालें आहे. ज्या सदराखालीं आरोपीनें फिर्यादीची अब्रू घेण्याचा मजकूर छापला आहे त्याजवर खूण करून तें वर्तमान य.सोबत हजर केलें आहे यास साक्षीदार.

१ मि. पी. वाज सिटी पोलीस इनस्पेक्टर, पुणें.

१ श्रीमंत दामोदर यशवंत जोग रा. पेठ बुधवार.

१ रावसाहेब गणेश रामचंद्र फडके रा. पेठ सदाशिव.

१ रा. वासुदेव गणेश जोशी रा. पुणें, पेठ सदाशिव.

१ रावबहादूर श्रीराम भिकाजी जठार रा. पेठ नारायण.

१ रा. कृष्णाजी रघुनाथ ने. ज. लायब्ररीचे सेक्रेटरी रा. पेठ सदाशिव. साक्षीस येतेवेळीं तारीख २१ डिसेंबर सन १८९५ इसवी रोजींचा, मद्रास येथील प्रसिद्ध होणारे 'हिंदु' नांवाचे पत्राचा अंक घेऊन येणें.

याशिवाय लागतील ते साक्षीदार चौकशीचे वेळीं हजर करूं. येणेंप्रमाणें पुरावा घेऊन आरोपीस इंडियन पी० कोड कलम ५०० प्रमाणें गुन्हा केला आहे, असा ठराव व्हावा व त्याबद्दल कायदेशीर तजवीज व्हावी. आरोपी हे यंदाचें कांग्रेसचे डेलिगेट या नात्यानें पुणें येथें येणार आहेत असें समजतें, करितां त्यांजला एक समन्स त्यांचे राहते ठिकाणचें म्हणजे मद्रासचें व दुसरें समन्स पुणें येथें त्यांजवर लागूं करण्याकरितां देणेचा हुकूम व्हावा. कळावें तारीख २३ माहे डिसेंबर सन १८९५ इसवी.

## भाग २१ वा

# सार्वजनिक सभा व डेक्कन सभा

कोणत्याहि देशांत मनुष्यास पुढारीपण यावयास त्याला परिस्थितीशीं झगडावें लागतें. परिस्थितींत समकालीन संस्थांचाहि समावेश होतो. संस्था म्हणजे एकाच हेतूनें प्रेरित झालेल्या कार्यकर्त्या माणसांचा संघ. देशाची किंवा प्रांताची प्रगति मोजण्याचे संस्था हे वाटेवरचे मैलाचे दगड तर खरेच; कारण त्यांच्या निरनिराळ्या वेळच्या स्वरूपांवरून राष्ट्राच्या प्रगतीच्या स्वरूपाचा अंदाज करितां येतो. पण मजल मोजण्याच्या मैली दगडांपेक्षां फौजेच्या चढाईच्या मार्गावरील लष्करी ठाणीं किंवा नाकीं हें वर्णन संस्थांना अधिक लागू पडेल. वाट चालून गेल्यावर किती मजल झाली इतकेंच फक्त मैलाचा दगड दर्शवितो, पण लष्करी ठाणीं किंवा नाकीं हीं पुरी झालेली सैन्याची मजल पदरांत पाडून वरतां सुरक्षित बसण्याला आणि पुढील मजल मारण्याचीं साधनें पुरविण्याला उपयोगीं पडतात. सर्व देशांत ज्याला पुढारीपण--अखेर पुढारीपण--मिळालें त्याला प्रथम लहान व नंतर मोठ्या संस्था हळू हळू काबीज कराव्या लागतात, व या विजयाला स्वतः आपल्या गांवच्या संस्था म्हणजे सार्वजनिक युद्धाचीं लहानशीं लष्करी नाकीं काबीज करावीं लागतात. हें झगडणें व हा विजय याला ग्राम्य व उदात्त अशीं दोन्हीं प्रकारचीं स्वरूपें पहावीं तशीं असतात. भांडणामध्यें तामसवृत्ती प्रगट झाल्याशिवाय अर्थातच रहात नाहीं; तेवढ्यापुरतें भांडण ग्राम्यच म्हणावें लागेल. मोठीं माणसें भांडलीं तरी तें भांडणच. पण या भांडणाच्या पर्यवसानाकडे व्यक्तिमहात्म्याच्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे त्यांतील उदात्त स्वरूपहि पाहणाऱ्याच्या नजरेस आल्याशिवाय रहात नाहीं.

मनुष्य हा स्वभावतःच संहतिप्रिय असतो व शिक्षणानें ही संहतिप्रियता कमी न होतां उलट वाढतेच. इंग्रजी शिक्षण सुरू होण्यापूर्वी हिंदुस्थानांत संघ नव्हते असें नाहीं; पण इंग्रजी शिक्षणानंतर जे संघ सुरू झाले त्यांचें स्वरूप थोडें वेगळें किंवा सुधारलेलें होतें इतकेंच. पूर्वीहि चार लोक एकत्र बसून गप्पा मारीत नसतील असें नाहीं. अव्वल इंग्रजींत घरबैठे खेळ खेळण्याचे अड्डे पुण्यांत पुष्कळ होते असें म्हणतात. साधारण प्रतिष्ठित मनुष्याच्या घरीं चार लोक रिकाम्या वेळीं हटकून जमावयाचे; पानतंबाखू हें पूर्वी चहाचे काम करी; व बुदबळें सोंगट्या वगैरेंचे खेळ खेळणारे दोघेचौघे असले तरी प्रत्येक बाजूला बसून पाहणारे, सुचविणारे, भांडणारे, ओरडणारे असे लोक अनेक असत. या खेळांचे सामने रोज तर चालतच पण प्रसंगविशेषीं त्यांचे सप्ताहहि होत; व हा अड्डा मांडी मोडल्याशिवाय किती प्रहर एकसारखा खेळतो अशा मुद्यावर स्पर्धा चाले. दुसऱ्या एका

प्रकारचे संघ तालमींतून आढळत. येथेंहि वस्ताद व त्याची शिष्यशाखा मिळून तो एक क्लबच होई, व या क्लबांचें नैमित्तिक कार्य म्हटलें म्हणजे शेजारच्या गांवीं जाऊन कुस्त्यांचे फड जिंकणें हें होय. पूर्वी देवळांतून पुराणांना रोज संध्याकाळीं स्त्रियांप्रमाणें पुरुषहि अभिश्रवणाला जात, व ज्या देवळांत अधिक चांगला पुराणिक त्यांत दर संध्याकाळीं अधिक गर्दी जमे. पण इंग्रजी शिक्षण सुरू होण्यापूर्वी लोकांनीं एकत्र जमून राजकीय चर्चा करण्याचा प्रघात नव्हता तो या शिक्षणापासून नवीन पडला यांत शंका नाहीं. वर दर्शविल्याप्रमाणें संहतिप्रियता किंवा संघबुद्धि तीच, पण तिचा उपयोग मात्र थोड्या वेगळ्या तऱ्हेनें होऊं लागला. पूर्वी प्रसंगविशेषीं एखादा अर्ज वगैरे करावयाचा असल्यास तो सह्यांकरितां फिरविला जाई व त्यावर लोक सह्या करीत. परंतु सामुदायिक खेळांप्रमाणें किंवा वक्तृत्वाप्रमाणें राजकीय चळवळ ही प्रत्यक्ष सामुदायिक अशा स्वरूपाची नव्हती. एकत्र जमण्याला लोक भीत असत असा त्याचा अर्थ नव्हे, तर एकत्र जमून राजकीय विचारांचा विनियम करण्याची संवयच अद्यापि त्यांना लागलेली नव्हती.

मुंबई इलाख्यांत १८५२ सालीं दादाभाई नौरोजी यांनीं मुंबई असोसिएशन नांवाची राजकीय संस्था स्थापिली. यानंतर चौदा वर्षांनीं पुण्यासहि अशीच संस्था स्थापण्यांत आली. तिचें नांव प्रथम पूना असोसिएशन असें होतें. या दहा वीस वर्षांत मुंबई, मद्रास, बंगाल वगैरे सर्वच प्रमुख प्रांतांतून अशा संस्था स्थापल्या गेल्या. तीन वर्षांनीं पुण्यांतील याच सभेला 'पुणें सार्वजनिक सभा' असें नांव देण्यांत येऊन १८७० च्या एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या तारखेस, सदाशिव पेठेंतील औंधकरांच्या वाड्यांत तिची पुनः प्राणप्रतिष्ठापना करण्यांत आली. सभेनें जाहीर केलेला हेतु असा होता कीं, सरकार व लोक यांच्या दरम्यान मध्यस्थी करण्याकरितां लोकांच्या मागण्या व त्यांची खरी स्थिति, सरकारास वेळोवेळीं अर्जांच्या रूपानें कळवावी, आणि उलट सरकारचे हेतु लोकांस खुलासेवार समजून सांगावे.

सार्वजनिक सभेच्या स्थापनेची कल्पना सुचण्यास एक तात्कालिक कारण घडलें. सन १८७० च्या सुमारास पर्वतीसंस्थानच्या व्यवस्थेंत लोकमतानुरूप सुधारणा व्हावी या उद्देशानें कांहीं प्रयत्न करण्याचा, पुण्यांतील कित्येक कार्यकर्त्या हिंदु गृहस्थांचा बेत होता. पण या एकाच कामाकरितां एकादी सभा स्थापण्यापेक्षां सामान्यरीत्या सर्व सार्वजनिक कार्यांकरितां मिळून एक सभा स्थापन करावी, म्हणजे तिचा पर्वतीसंस्थान सुधारण्याचें कामीं प्रथम उपयोग होऊन, पुढें दुसरींहि सार्वजनिक कार्यें तिच्याद्वारें करितां येतील, अशा उद्देशानें ही सभा स्थापन करण्यांत आली. शके १७९२ चे वर्षप्रतिपदेच्या शुभमुहूर्तावर ( २ एप्रिल १८७० रोजीं ) श्रीमंत श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरून अधिकारी मंडळ निवडण्यांत आलें. कै. गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका हे या खटपटींत मुख्य असून, सभेचे पहिले नियम त्यांनींच केलेले आहेत. औंधकर

हे अध्यक्ष; व भोरकर, सांगलीकर, जमाखिंडीकर, कुरुंदवाडकर वगैरे संस्थानिक उपाध्यक्ष नेमण्यांत आले. राजमाचीकर, गोखले, कर्वे, व स्वतः सार्वजनिक काका हे चिटणीस झाले. १८७३ च्या दुसऱ्या निवडणुकींत मिरजकर (दोन्ही), अकलकोटकर, जतकर, फलटणकर हेहि संस्थानिक उपाध्यक्षांच्या यादींत समाविष्ट झाले. सभेच्या सन्मान्य अधिकारी मंडळांत दक्षिणेंतील संस्थानिकांचीं नांवें १८९७ पर्यंत होतीं. १८९१ ते १८९६ पर्यंत प्रो. गोखले हे चिटणीस होते, तोंपर्यंत सभेचें काम सरकारास फारसें न दुखवितां चाललें होतें. पण १८९६ सालीं प्रो. गोखले यांनीं सभेची चिटणीशी सोडली, व सभेचीं सूत्रें टिळकांचे हातीं आलीं. गोखल्यांच्या जागीं प्रो. शिवरामपंत परांजपे हे चिटणीस नेमले गेले. शेवटीं १८९७ सालच्या मार्च महिन्यांत मुंबईसरकारनें एक ठराव प्रसिद्ध करून, सभेची राजमान्यता उघडपणें काढून घेतली. १८९७ मध्यें श्रीमंत जमाखिंडीकर, सभेचे एक उपाध्यक्ष, वारले व त्यापुढें सरकारची उघड प्रतिकूलता असल्यामुळें संस्थानिकांचीं नांवें सभेच्या सन्मान्य अधिकारी मंडळांत दिसेनाशीं झालीं. संस्थानिकांप्रमाणें सरकारी नोकरांचीं नांवेंहि १८९७ चे पूर्वी सभासदांचे यादींत दिसून येतात. महादेव मोरेश्वर कुंटे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णाजी रघुनाथ केळकर या प्रमुख सरकारी नोकरांचीं नांवें त्या वेळच्या सभासदांच्या पटावर आढळतात.

सार्वजनिक काकांप्रमाणें रा. ब. रानडेहि सभेच्या आधारस्तंभांपैकीं होते. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं सभासदांच्या यादींत त्यांचें नांव कोठेंच मिळत नाहीं. सन १८७७ सालचे सुमारास नौरोजी फर्दुजी यांस इंग्लंडांत फिनान्स कमेटीपुढें साक्ष देण्यास पाठविलें होतें. त्या वेळीं या कामीं त्यांस सल्लामसलत देण्यास रा. ब. रानड्यांची नेमणूक केल्याचा उल्लेख सभेच्या दप्तरीं सांपडतो. याशिवाय इतरत्र त्यांचें नांव कोठेंहि आढळत नाहीं. प्रत्यक्ष रंगभूमीवर न येतां स्टेज म्यानेजरप्रमाणें पडद्याआड राहून काम करण्याची रानडे यांची रीत सुप्रसिद्ध आहे, व तोच प्रकार येथें घडला व सभासदांच्या यादींत त्यांचें नांव नसलें तरी पहिल्यापासून प्रत्येक योजनेंत तेच सूत्रचालक असत.

सभेची स्थापना प्रथम औंधकरांचे वाड्यांत झाली हें वर सांगितलेंच आहे. पुढें श्रीमंत सांगलीकर यांचा वाडा, फडतरे यांचा वाडा, व नंतर कांहीं दिवस विश्रामबागेजवळील नगरकरांचा वाडा, अशा निरनिराळ्या ठिकाणीं सभेच्या बैठकी होत असत. सभेच्या कामाचा व्याप जसजसा वाढत चालला, तसतशी अर्थातच सभेकरितां स्वतःच्या स्वतंत्र जागेची उणीव अधिकाधिक भासूं लागली. सन १८८४ सालीं, सभा स्थापन झाल्यापासून चौदा वर्षांनीं, ही उणीव भरून निघण्याचा योग आला तो असा. सार्वजनिक काका १८८० त निवर्तले. त्यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ जमा झालेली ६००० रुपयांची रक्कम, स्मारकफंडाचे

अधिकाऱ्यांजवळ चार वर्षे तशीच पडून राहिली होती. ही रकम या कामाकरितां त्यांचेकडून मिळवून, व त्यांत आणखी ९००० रुपयांची भर घालून, १८८४ सालीं दाणेआळींतील वाळवेकर यांची हवेली १५००० रुपयांस खरेदी केली. या हवेलीच्या दुसऱ्या मजल्यावरील पूर्वेकडील दिवाणखान्यास 'जोशी हॉल' असें नांव देण्यांत आलें, व येथेंच प्रथम प्रथम सभा भरत असे. पण पुढें ही जागा देखील अपुरी पडूं लागली, म्हणून पश्चिमेकडील दिवाणखाना विस्तृत करण्यांत आला, व येथेंच अलीकडे सभा भरतात. ही विस्तृत जागा देखील आतां केवळ लहानसहान सभांकरितांच उपयोगांत आणली जाते व मोठ्या जाहीर सभांस शिवाजीमंदिर किंवा मार्केटचे मैदान देखील सध्यां पुरेनासें झालें आहे.

'लोकांची गाऱ्हाणी सरकारपुढें मांडणें' हाच सभेचा मुख्य उद्देश होता हें वर आलेंच आहे. या कामीं दादाभाई नौरोजी, नौरोजी फर्दुजी, जगन्नाथ शंकरशेट, डॉ. भाऊ दाजी प्रभृति मंडळींनीं चालविलेली, मुंबईची बॉंबे असिएशन, व बाबू क्रिस्तोदास पाल, डॉ. राजेंद्रलाल मित्र वगैरे मंडळींनीं कलकत्त्यास चालविलेली 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन,' या दोन संस्थांचीं उदाहरणें सार्वजनिकसभेच्या उत्पादकांच्या व चालकांच्या प्रथमपासून डोळ्यांपुढें होतीं. सभेच्या कर्तबगारीनें वरील दोन संस्थांइतकेंच तिला महत्त्व प्राप्त झालें.

पहिल्यानें सभेचें लक्ष स्थानिक बाबतींत विशेष होतें. पर्वतीसंस्थानसुधारणेच्या एका स्थानिक कार्यांतच तिचा उगम होता. पर्वतीसंस्थानचें प्रकरण सभेच्या खटपटीनें, एकीकडे रेव्हेन्यु कमिशनरपर्यंत व दुसरीकडे दिवाणी कोर्टापर्यंत पोंचलें होतें. पण या पहिल्या कामांत सभेला फारसें यश आलें नाहीं. पुढें सभेनें पुणें शहरसुधारणेचीं कामें हातांत घेतलीं. कायद्यांचे मसुदे पूर्वीं इंग्रजींतून प्रसिद्ध होत असत, ते मराठींतून प्रसिद्ध करण्याचा प्रघात सभेच्या प्रयत्नानेंच सुरू झाला. मुंबई हायकोर्टांत एतद्देशीय न्यायाधीश नमला जाण्याबद्दलची खटपट सभेनेंच केली. ज्यूरीचे हक्क, रेलवेच्या उतारूंच्या तक्रारी, म्युनिसिपालिटींत लोकनियुक्त सभासदांच्या नेमणुकी, संस्थानिक व सरकार यांचे संबंध अशा अनेक बाबतींत सरकारास वेळोवेळीं सूचना सादर करण्याचें काम सभेनें सुरू ठेविलें होतें. १८७२ सालीं हिंदुस्थानचे कैवारी फॉसेटसाहेब, यांस ब्रायटनच्या मतदारांनीं निवडून दिल्याबद्दल सभेनें त्यांचें अभिनंदन करून, ब्रायटनच्या मतदारांचे आभार मानले. त्याच सालीं हिंदुस्थानची कारभाराची चौकशी करण्यासाठीं पार्लमेंटनें नेमलेल्या कमेटीपुढें साक्ष देण्याकरितां फर्दूजीशेट यांची नेमणूक करण्यांत आली. त्यांस आलेला खर्च, मुंबईची बॉंबे असोसिएशन व सार्वजनिक सभा या दोघांनीं सोसला. यापुढील सार्वजनिक सभेनें केलेली महत्त्वाची चळवळ म्हणजे १८७६-७७ सालांतील दुष्काळाच्या वेळची होय. पूर्वींपासूनच कायमधाऱ्याची पद्धत अमलांत यावी याबद्दलची सभेची खटपट होती. १८७७ सालांत दुष्काळाचें स्वरूप

फारच उग्र झालें तेव्हां सभेनें जाहीर सभा भरवून सरकारकडे पत्रव्यवहार सुरू केला, व दुष्काळ फंड जमवून ठिकठिकाणीं दुष्काळकमेट्या स्थापन करविल्या. विलायतें-तील पत्रांतूनहि जाहिराती देऊन फंड मिळविण्याची खटपट सभेनें केली.

सार्वजनिक सभेची प्रगति, उत्क्रांतितत्वावर हळू हळू न होतां, जी थोडी झाली ती क्रांतिकारक पद्धतीनें म्हणजे खळबळ होऊनच झाली. अशा खळ-बळीचे प्रसंग, सभेच्या पन्नास वर्षांच्या इतिहासांत एक दोनच घडून आले. प्रत्येक खळबळीचे वेळीं वादाचा मुद्दा फारसा तत्वाचा नसतां, एक चालक किंवा चालकमंडळ जाऊन, त्याचे जागीं दुसरा चालक किंवा चालकमंडळ येणें, हेंच चळवळीचें खरें कारण असे. सार्वजनिक सभेच्या पहिल्या अमदानींत, गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका हे सभेचे मुख्य चालक असत, व सभे-च्या त्या वेळच्या मुख्य दिवाणखान्याला त्यांचें नांव देण्यांत आलें यावरून त्यांचें महत्त्व सभेच्या कामीं किती होतें, याची सहज कल्पना येईल. पर्वतीच्या सुधारणेकरितां अस्तित्वांत आलेली सभा, सार्वजनिक कार्यांच्या गोडीनें पुढेंहि चालू ठेवण्यांत आली. सभेचा हेतु सरकार व प्रजाजन यांची मध्यस्थी कर-ण्याचा. तो जिच्या हातून पार पडेल अशी दुसरी कोणतीहि संस्था त्या वेळीं अस्तित्वांत नव्हती. वर्तमानपत्रांत राजकीय विषयावर क्वचित् लेख येत, परंतु वर्त मानपत्राचे लेख सरकारानें वाचले तरी सरकारकडून त्या लेखांना उत्तर जाण्याची वहिवाट आतां थोडीबहुत आहे, पण तेव्हां मुळींच नसे. तथापि आपण म्हणतों त्यावर सरकार काय म्हणतें, हें कळविण्याची आकांक्षा हल्लीं कायदेकौन्सिलांत प्रश्नाच्या रूपानें व त्याहीपेक्षां ठरावावरील वादविवादाच्या रूपानें सफल होते, ती त्या जुन्या काळीं सफल होण्याला अर्ज हेंच एक साधन असे. सरकारास सभेकडून अर्ज गेला व त्यांजकडून त्याला, बरें वाईट किंवा शेटक कसें कां होईना, पण उत्तर आलें म्हणजे पुण्यांतील समाजाची राजकीयबुद्धि जागृत आहे असें समा-धान पुढाऱ्यांना वाटे. सार्वजनिक काकांचे सभेंतील खरे जोडीदार म्हणजे महा-देव गोविंद रानडे हे होत. माधवरावजी हे १८७१ सालीं पुण्यास फर्स्टक्लास सबजज्ज, म्हणजे त्या वेळचे 'सदर अमीन' या जागेवर कायम नेमणूक होऊन आले. रानडे पूर्वीं पुण्यास थोडेच दिवस होते तरी त्यांचा लौकिक पुण्यास गाजत होता. ते बाहेर मोठमोठ्या हुद्यावर कामें करण्यास गेले असले तरी त्यांचेंहि पुण्यावर लक्ष होतें; कारण पुणें ही तेव्हांहि बुद्धिमत्तेची राजधानी मानली जात असे; मग खुद्द पुण्यास कायमची जागा मिळाल्यावर अर्थातच त्यांनीं पुण्याला आपल्या विद्वत्तेचा फायदा करून दिला, व पुण्याच्या चळवळ्या स्वभावाचा फायदा सार्वजनिक कार्याकडे करून घेतला. तेव्हांची सार्वजनिक सभा नवी, तींत सरदार वगैरे प्रतिष्ठित लोकांचा भरणा, व रानडे ८०० रु. पगाराचे बडे हुद्देदार व प्रमुख विद्वान, यामुळें सभेचें चालकत्व त्यांच्याकडे

गेल्यास नवल नाहीं. रानडे पुण्याहून नाशकास बदलून जाईपर्यंत बऱ्याच उलाढाली झाल्या, त्यासंबंधाची हकीकत दुसरीकडे सविस्तर दिलीच आहे. येथें इतकेंच सांगावयाचें कीं, यांतील बहुतेक चळवळी सार्वजनिक सभेच्या विद्यमानें झाल्या. व सभेची कीर्ति इतकी वाढली कीं, बाहेरगांवच्या मोठमोठ्या संस्थानांतील किंवा सरकारी समारंभास सभेला निमंत्रणें येत व सभा आपलीं शिष्टमंडळें पाठवी. अशापैकीं विशेष महत्त्वाचा प्रसंग म्हटला म्हणजे, दिल्ली दरबारचे वेळीं सभेनें पाठविलेलें शिष्टमंडळ होय. या प्रसंगीं सितारामपंत चिपळूणकर हे नांवारूपाला आले व तेथून पुढें सभेचें चालकत्वहि हळू हळू त्यांना मिळालें. सितारामपंत चिपळूणकर हे विष्णुशास्त्री यांच्याहून वेगळ्या स्वभावाचे असले तरी, सभेंत बोलणें चालणें व सार्वजनिक कार्यांत पडून अंगमेहनत करणें या बाबतींत, ते त्यांचे पुतणे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचेपेक्षांहि अधिक तरतरीत व उपयुक्त होते. सितारामपंत चिपळूणकर व शिवराम हरी साठे या चिटणीसांच्या जोडीकडे सार्वजनिक सभेचें चालकत्व क्राफर्डप्रकरणापर्यंत राहिलें. या वेळीं सभेंत दुसरी क्रांति घडून आली व तींत चिपळूणकरांच्या ऐवजीं गोपाळराव गोखले हे सार्वजनिक सभेचे चिटणीस झाले.

सभेंतील दुसरी क्रांति १८९५–९६ या सालीं झाली. या खळबळींत चेअरमन विष्णु मोरेश्वर भिडे, चिटणीस गोपाळराव गोखले व शिवराम हरी साठे वगैरे रानडे पक्षाच्या लोकांच्या हातून सभेचें चालकत्व जाऊन, तें टिळकांच्या पक्षाकडे आलें. क्रांति व्हावयाची ती अर्थात् सभेंत बहुमत मिळवून. सभेंत बहुमत मिळविण्याला जुन्या सभासदांचीं मतें मिळविण्यापेक्षां नवे सभासद मिळवणें हेंच अधिक सोईचें होई. सभेचा या वेळपर्यंत नियम असा असे कीं, नवीन सभासद होण्याला, महाराष्ट्रांतील कोणा तरी पन्नास सद्‌गृहस्थांनीं त्याच्या निवडणुकीची शिफारस करावी. सर्व सभासदांच्या सभेंत ती शिफारस मंजूर झाल्यावर, नव्या सभासदाची निवडणूक झाली असें समजावें. परंतु नवे सभासद करण्याची खटपट एकदां सुरू झाली म्हणजे, सह्या मिळविण्याची ही अडचण पुण्यास विशेष भासण्यासारखी नव्हती, व क्रांति घडण्याच्या वेळीं उभय पक्षांच्या खटपटीनें सभासदांची संख्या एकदम वाढे. सभेच्या चालकत्वाचीं सूत्रें एकाकडून दुसऱ्याकडे जाण्याच्या स्वरूपाची क्रांति जितके वेळां झाली तितके वेळां सभेच्या सभासदांची संख्या एकदम फुगली. पण क्रांतीचें काम एकदां झालें म्हणजे ती उन्हाळ्यांतील प्रवाहाप्रमाणें आपोआप रोडावी व पटावर असलेल्या सभासदांकडूनहि वर्गणी सहसा वसूल होऊं नये, असाच दाखला सभेच्या कागदोपत्रीं मिळेल. तोच प्रकार सभेचीं सूत्रें टिळकांचे हातीं येण्याचे वेळीं झाला. स्वतः टिळक हे आधीं पुष्कळ वर्षांपासून सार्वजनिक सभेचे सभासद होते. सितारामपंत चिपळूणकरांचा राजिनामा होऊन, त्यांचे जागीं गोपाळराव गोखले हे सभेचे चिट-

णीस झाले त्याचे आधीं डे. ए. सोसायटींत भांडणें होऊन स्वतः टिळकांनीं सोसायटी सोडलेली असल्यामुळें, या क्रांतीचे वेळीं टिळक हे चिपळूणकरांच्या बाजूचे होते. एका अर्थानें चिपळूणकरांना जो यश तो क्राफर्डसाहेबांच्या स्नेहामुळें व क्राफर्डप्रकरणांत टिळक मामलेदारपक्षाचे असल्यामुळें ते क्राफर्ड साहेबाचे प्रतिपक्षी. सार्वजनिकसभेनेंहि क्राफर्डसाहेबांविरुद्ध चळवळ चालविली होती. परंतु या क्रांतींत गोखल्यांचाहि संबंध असल्यामुळें टिळकांनीं चिपळूणकरांचाच पक्ष घेतला होता; पण गोखल्यांचा पाडाव करण्यास लागणारें बहुमत यावेळीं त्यांचे हातीं नव्हतें. त्यांचा अनुयायी वर्ग अद्यापि जुळावयाचा होता, पण तो पुढील पांचसहा वर्षांत चांगलाच जुळला. व त्याचे जोरावर त्यांना गोखल्यांचा पाडाव करून सभेचीं सूत्रें आपल्या हातीं घेतां आलीं. यापूर्वी रानडे मुंबईस हायकोर्टचे जागीं बदलून गेले होते, पण ते पुण्यास असते तरी टिळकपक्षानें त्यांना दाद दिली नसती, हें मंडपवादांतील हकीगतीवरून लक्षांत येईलच.

सार्वजनिक सभेची वार्षिक सभा, हा क्रांतीचे वेळीं, युद्धाचा दिवस आपोआपच ठरतो. १८९५ सालीं हा दिवस १४ जुलै रोजीं पडला. युद्धास तोंड प्रथम म्यानेजिंग कमेटीच्या निवडणुकींत लागलें. जुने ५० व विशेष खटपटीनें उभयपक्षानें केलेले नवे ७५, मिळून १२५ सभासद या वार्षिक सभेस हजर होते. सभेचे अध्यक्ष टिळकपक्षीय व्हाइस प्रेसिडेंट श्री. बाबामहाराज हे होते. वार्षिक अहवाल, जुने हिशेब व पुढील अंदाजपत्रक या गोष्टी ठराविक असून फारशा वादग्रस्त नसतात त्या प्रथम होऊन गेल्या. पण व्यवस्थापक मंडळ निवडण्याच्या वेळीं हमरातुमरीचा वाद झाला, आणि 'बॅलट' पद्धतीनें निवडणूक न होतां माधवराव नामजोशी यांच्या सूचनेवरून ३५ नांवांची यादी वाचून दाखवूनच बहुमतानें मंजूर झाली. आपला हात चालण्यासारखा होता, तरी टिळकांनीं जुने व्यवस्थापक मंडळ सगळेंच्या सगळें बदलून आपल्या पक्षाचें नवें नेमलें नाहीं. फक्त आपल्या पक्षाचें बहुमत होईल इतकीच साधारण व्यवस्था केली. पण क्रांतीचें स्वरूप येण्यासारखी खरी गोष्ट म्हटली म्हणजे, जुने चेअरमन विष्णु मोरेश्वर भिडे यांचे जागीं विनायक रामचंद्र ऊर्फ अण्णासाहेब पटवर्धन यांना चेअरमन निवडलें. जुने खजिनदार भाऊसाहेब नातू, यांचे जागीं श्रीमंत बाळासाहेब नातू यांना नवीन खजिनदार नेमले. बिनपगारी सहकारी चिटणीस शिवराम हरी साठे यांचे जागीं भावेस्कूलांतील शिक्षक जालनापूरकर, आणि पगारी चिटणीस विष्णुपंत करंदीकर यांना काढून टाकून त्यांचे जागीं कृष्णराव मांडे यांना नेमण्यांत आलें. पण मुख्य चिटणीस प्रो. गोपाळराव गोखले यांना नव्या निवडणुकींत टिळकांनीं धक्का लाविला नाहीं. पण यांतील कावा असा होता कीं गोखल्यांना चिटणीस ठेवलें तरी त्यांच्या पक्षाचीं पाळेंमुळें तोडून टाकून, त्यांना अलग करून एकटें ठेवावयाचें.

अशा स्थितींत ते राहिलेच तर आपले ताबेदार व गेलेच तर आपल्या पायानें गेले, आम्ही घालविले नाहींत, असें म्हणण्याची तयारी!

या क्रांतीला ज्ञानप्रकाश वगैरेंनीं टिळकांच्या अहंपिशाचिकेचा खेळ असें नांव दिलें. झालें हें वाईट झालें असें दर्शविण्याकरितां पुण्याच्या कांहीं बातमीदारांनीं मुंबईच्या पत्रांत अशा बातम्या प्रसिद्ध केल्या कीं, सभेंत शिवीगाळ झाली व ती पार पाडण्यास पोलीसांची मदत घ्यावी लागली. पण टिळकांनीं या क्रांतीचें समर्थन असें केलें कीं, व्यवस्थापक मंडळांत कांहीं नवीन लोक असले तरी जुन्या मंडळांतील वजनदार दहापांच लोकहि आम्हीं निवडलेच. म्हातारे शिवरामपंत साठे यांचे जागीं तरुण जालनापूरकर आले तर काय वाईट? व एका पगारी दुय्यम चिटणिसाऐवजीं दुसरा आला म्हणून सभा कांहीं बुडत नाहीं. कालांतरानें पक्षांतर किंवा खांदेबदल होतच असतें व याच बाबतींत पूर्वीं सितारामपंत चिपळूणकरांना व नामदार नूलकरांना गोखले पक्षानें निवडलें नाहीं, ही मुद्याची आठवण टिळकांनीं दिली. एवढेंच नव्हे तर टिळकांनीं असेंहि स्पष्ट लिहिलें कीं, चिपळूणकरांनीं केलेली सभेची सेवा गोखल्यांपेक्षांहि अधिक होती व सभेला लौकिकास चढविलें असेल तर तें खरोखर चिपळूणकरांनींच. यामुळें चिपळूणकरांची निवडणूक न करितां गोखल्यांची केली ? हा सभेनें तेव्हां कृतघ्नपणाच केला. खजिनदार बदलले यांत तरी काय विशेष, पुण्यांतील श्रीमंत घराणेदार लोकांना हा मान आळीपाळीनें मिळालाच पाहिजे व आजपर्यंत असें झालें नाहीं हेंच चुकलें. शिवराम हरी साठे यांनीं नुसतीं हेलपाट्याचीं कामें केलीं त्यांना तहाहयात पेन्शन दहा रुपये आणि सितारामपंत चिपळूणकर यांनीं चौदा वर्षे सभेचे अर्ज लिहिले, त्रैमासिकाच्या संपादकाचें काम केलें, पण ते मेल्यावर त्यांच्या मुलाला सहा रुपयांची स्कॉलरशिप देण्याचेंहि जुन्या मंडळींना जड गेलें. नवी मंडळींची टोळी असली तर जुन्या मंडळींचीहि टोळीच होऊन बसली होती. जसें द्यावें तसें घ्यावें. ज्या युक्तीनें नूलकर व चिपळूणकर यांना खो मिळाला तिनेंच भिडे व साठे यांना मिळाला. त्यांतल्यात्यांत गोखले हे तरतरीत व काम करण्यालायख त्यांना आम्हीं ठेविलेंच कीं नाहीं ? चिपळूणकरांचा व क्रॉफर्डसाहेबांचा स्नेह, म्हणून ते ज्ञानप्रकाशांत व्यक्तिशः क्रॉफर्डची थोडी तरफदारी करीत. पण सभेचें मत क्रॉफर्डसाहेबांच्याविरुद्ध असल्यामुळें सभेचे चिटणीस या नात्यानें त्यांनीं क्रॉफर्डची तरफदारी केली नाहीं. जुने चेअरमन रा. ब. भिडे यांचाहि थोडा असाच प्रकार झाला होता. सभेच्या त्रैमासिकांत हॅरिससाहेबाच्याविरुद्ध लेख येत. पण खाजगी नात्यानें त्यांनीं हॅरिसच्या स्मारकाला वर्गणी दिली होती. ज्ञानप्रकाशांत लिहिण्याबद्दल जर चिपळूणकर सभेचे सेक्रेटरी होण्याला अयोग्य, तर अप्रिय अशा गव्हर्नरच्या स्मारकाला वर्गणी दिल्याबद्दल सभेचे चेअरमन होण्याला भिडेहि अयोग्यच. शिवाय भिड्यांपेक्षां विनायकराव ऊर्फ अण्णासा-

हेच पटवर्धन हे प्रत्येक बाजूनें अधिक लायक. वृद्ध, निरुपद्रवी, पेन्शनरांपेक्षां स्वतंत्र धंद्याचा, लोकोपयोगी, असा विद्वान् मनुष्य काय वाईट? दोन दिवस सासूचे दोन दिवस सुनेचे हें चाललेलेंच आहे. सभेंत गोखले यांनीं पांचसहा वर्षे बहुमत भोगलें तें पुढें टिळकांनीं कां भोगूं नये? एक पक्ष अधिकारांतून जातो दुसरा अधिकारारूढ होतो हें रहाटगाडगें चालूच असावयाचें. एकाचे पंचवीस, दुसऱ्याचे दहा, त्याऐवजीं आतां एकाचे दहा दुसऱ्याचे पंचवीस इतकाच फरक झाला. वास्तविक ही क्रांति केवळ स्थानिक महत्त्वाची. सार्वजनिक सभेच्या व्यवस्थापक मंडळींत कोण निवडले किंवा चेअरमन कोण झाले, किंवा गोखल्यांचें बहुमत जाऊन, तें टिळकांना मिळालें, तरी त्यांत मुंबईच्या इंग्रजी पत्रांतून गवगवा करण्यासारखें काय आहे? पण टिळकांची अपकीर्ति करण्याकरितां गोखलेपक्षास मॉडरेट किंवा नेमस्त हें नांव देऊन टिळपक्षास फॉरवर्ड किंवा फाजील असें नांव देऊन कागाळी करण्यांत आली होती. आपलें चालत नाहीं असें पाहून गोखलेपक्षानें तडजोड सुरू केली होती, पण ती फार उशीरां. तडजोड रहित झाली तेव्हां 'टिळकांनीं आम्हांला फसविलें' अशी कागाळी सुरू झाली. या क्रांतीस उद्देशून टिळकांनीं असें लिहिलें कीं, दोन पक्ष निर्माण झाल्यामुळें एकाच गांवांत दोन वेगळ्या संस्था काढण्यापेक्षां एकापक्षानें साधल्यास आपलें बहुमत केलें तर तें अधिक योग्य. मुंबईची परंपरा वेगळी होती. तेथें एका सभेच्या तीन सभा झाल्या. दादाभाईंनीं स्थापलेली 'ईस्ट इंडिया असोसिएशन,' तींत पटेना म्हणून मंडलिकांनीं 'बॉबे असोसिएशन' काढली आणि नव्या पिढींतील मेथा, तेलंग, बद्रुद्दिन यांचें व मंडलिकांचें पटेना म्हणून त्या तिघांनीं 'प्रेसिडेन्सी असोसिएशन' काढली. टिळकांना वेगळी सभा काढतां आली असती पण ती न काढतां त्यांनीं जुन्याच सभेंत बहुमत करून सूत्रें आपल्या हातीं घेतलीं तर त्यांत त्यांनीं वावगें तें काय केलें?

इतका वेळ स्वतः गोपाळराव गोखले हे पुढें येऊन कांहीं बोलले नव्हते. पण ता. ६ आगस्टच्या केसरींत त्यांनीं आपल्या सहीचें पत्र देऊन कांहीं खुलासा केला. त्यांनीं असें कबूल केलें कीं, नवीन सभासद करण्याच्या चढाओढींत आमच्यानें टिळकांच्या पक्षाशीं कधींहि बरोबरी करवणार नाहीं. त्यांची तक्रार इतकीच कीं तडजोडीचें बोलणें लावून टिळकांनीं व वासुदेवराव जोशी यांनीं आम्हांस फसविलें. खरा प्रकार असा दिसतो कीं, अण्णासाहेब भिडे यांना जागेवरून काढूं नये असें टिळकांचें मत होतें व तसें त्यांनीं वचनहि दिलें होतें. पण टिळकपक्षाच्या पोटांतच एक पक्ष निर्माण होऊन त्यानें टिळकांचें वचन धाब्यावर बसविलें. गोखले यांची दुसरी तक्रार अशी कीं, राजकीय मतें जर आज सर्वांचीं सारखींच आहेत तर पक्षभेदापासून आजवर अलिप्त असलेल्या

सार्वजनिक सभेंत आजच दुही कशाला! जुन्या मंडळीनें एकदोन प्रसंगांखेरीज नव्या मंडळीचें प्रायः ऐकलें होतें.

चिपळूणकरांसंबंधानें गोखले यांनीं असें लिहिलें कीं, मला चिपळूणकरांच्या जागीं सेक्रेटरी नेमिलें तेव्हांच मी होऊन मंडळीस कळविलें होतें कीं, 'सितारामपंतांसारखी कामगिरी मजसारख्याकडून होण्याचा संभव नाहीं. सभेचा व चिपळूणकरांचा सलोखा होणें अशक्य ठरलें व माझ्याहून अधिक चांगला मनुष्य त्या वेळीं व्यवस्थापकमंडळीला मिळाला नाहीं. म्हणून त्यांनीं मला नेमिलें असेल, यांत मी काय केलें ?" या पत्रास त्याच अंकांत टिळकांनीं उत्तर दिलें. गोखले यांनीं लिहिलें तें अगदीं सरळबुद्धीनें लिहिलें आहे असें टिळकांनीं कबूल केलें. टिळकांचें म्हणणें इतकेंच कीं, तडजोड मोडल्याची जबाबदारी आपणावर नसून गोखलेपक्षाकडेच होती, आणि बहुमत असलेल्या पक्षानें आपल्या मनासारख्या निवडणुकी करविल्या त्यांत त्याला दोष देतां येत नाहीं. एकीचा उपदेश गोखल्यांनीं केला होता त्याचा फायदा घेऊन, टिळकांनीं गोखल्यांनाच असें उलट विचारिलें कीं, तुमच्या मनासारख्या इतर निवडणुकी झाल्या नाहींत म्हणून आपण सेक्रेटरीचें व संपादकाचें काम अंगावाहेर टाकण्याची जी गुप्त धमकी दिली आहे ती तरी कां द्यावी ? असो; हा वाद कांहीं दिवस येथेंच थांबला. दरम्यान पुण्याच्या कांग्रेसचा वाद उत्पन्न झाला, मग नगाऱ्यापुढें टिमकीला कोण पुसतो? सार्वजनिक सभेंतील क्रांतीमुळें राष्ट्रीयसभेच्या वादाला थोडीबहुत मदत झाली ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. फिरून हा वाद १८९६ सालीं उमटला. टिळकांनीं सार्वजनिक सभा हस्तगत केल्यावर, त्यांजवर घेतां येण्यास उरलेला रोकडा आक्षेप म्हटला म्हणजे सभेचें व त्रैमासिकाचें काम पूर्वीपेक्षां वाईट होऊं लागलें हाच होय. वर उल्लेखिलेल्या गोखले यांच्या पत्रांतहि त्यांनीं आपल्या सौम्य पद्धतीनें, जातां जातां धक्का देऊन असें ध्वनित केलें होतें कीं टिळक, पटवर्धन वगैरे मंडळी मनावर घेतील तर हीं कामें चांगलीं करण्याची पात्रता त्यांचे अंगीं आहे. पण त्या कामांची ते बहुधा हेळसांडच करितील. संस्था जिंकणें हें एक वेळ सोपें पण ती हातीं ठेवून चालविणें कठीण असें म्हणण्याचा गोखले यांचा झोंक होता. त्यांतल्यात्यांत हा टोला टिळकांपेक्षा अण्णासाहेब पटवर्धनांवरच अधिक रोखलेला होता. भिडे हे निरुपद्रवी होयबा असले, तर अण्णासाहेब हे स्वतः कांहीं न करितां व दुसऱ्यास करूं न देतां उपद्रव मात्र करितील असा गोखल्यांचा आशय. १८९६ सालीं सार्वजनिक सभेंत टिळकांचें बहुमत अधिकच दृढ झालेलें पाहून, कांग्रेसच्या हिशेबांची चर्चा करितांना टिळक हे असेच आहेत, त्यांना काम कगवास नको, त्यांनीं सेक्रेटरी या नात्यानें कांग्रेसचें फारसें काम केलें नाहीं, व आतां त्यांनीं सार्वजनिक सभा हातीं घेतली तर तीच गोष्ट अनुभवास येणार, असें ज्ञानप्रकाशानें लिहिलें. पण ही त्यानें नसती खाजवून खरूज काढल्यासारखी

झाली. खुद्द कॉंग्रेससंबंधानें टिळकांनीं असें उत्तर दिलें कीं, चिटणीस या नात्यानें टिळकांनीं किती काम केलें व किती वर्गणी जमविली, हें आदल्या सालीं नव्या सेक्रेटरींकडे शिल्लक स्वाधीन करतांना, टिळकांनीं हिशेबासुद्धां प्रसिद्ध केलेंच होतें. नवीन यादांत त्यांनीं स्पष्ट असें विधान केलें कीं, वर्गणी म्हणून जितकी मी स्वतः दिली तितकी ज्ञानप्रकाशकार व त्यांचे साथीदार या सर्वांनींहि मिळून दिली नाहीं. ही गोष्ट खरोखरच महत्त्वाची आहे. प्रांतिक सभेचीहि अशीच गोष्ट. पुण्याच्या सभा झाल्या पण दोन तीन परिषदा "टिळक—नामजोशांस आपल्या पदरचे पैसे खर्च करून करावयास लागल्या होत्या, व शेवटच्या प्रसंगीं तर तीन दिवस उपास काढून काम करावें लागत होतें." याच टीकेंत टीकाकारानें दुर्दैवानें सार्वजनिक सभेचेंहि नांव आणलें होतें. पण त्यावर टिळकांनीं उत्तर दिलें कीं "वर्षांतून एकादें आर्टिकल लिहून सार्वजनिक सभेच्या जर्नलची भरभराट जर कायम राहती, तर गेल्या पांच सात वर्षांत जर्नलच्या वर्गणीदारांची संख्या सहाशेंपासून दोनशें-वर आली नसती." हल्लीं तें जर्नल नीट न चालण्यास जर कांहीं कारण असेल तर त्याचा दोष सुधारक पक्षाकडेच आहे. प्रो. गोखले यांस जर तें काम सोडाव-याचें असलें तर तें हातीं घेऊन चालविण्यास पुष्कळ लोक तयार आहेत, परंतु दोन चार महिन्यापुरतें तें काम करावयाचें आणि पुनः तें प्रो. गोखले यांचेकडे द्यावयाचें, असल्या चावटपणास मात्र कोणी कबूल नाहीं. खुद्द गोखले यांच्या कारकीर्दींत गेल्या वर्षीं जुलै आणि आक्टोबरचे मिळून दोन अंक आणि तेहि अपुऱ्या मजकुराचे एकदम कां प्रसिद्ध करावे लागले ! यावरून कांचेच्या घरांत कोण बसलें आहे व दगडी बंगल्यांत कोण आहे, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. यावर गोपाळराव गोखले यांनीं ता. १७ आगष्ट रोजीं केसरीस पत्र लिहिलें. त्याचा आशय असा कीं दर तीन महिन्यांच्या अंकांत त्रैमासिकांत बहुधा दोन आर्टिकलें लिहिलीं जात व ज्या वेळीं गोखले स्वतः लिहीत नसत, तेव्हां ते आपल्याहून अधिक लायख गृहस्थाकडून (माधवराव रानडे, गणपतराव जोशी इ.) लिहवून घेत. चिपळूणकरांचें सभेशीं पटत नाहींसें झाल्यापासून म्हणजे १८८८ च्या आरंभापासून जर्नलची फार हेळसांड झाली होती. गोखल्यांकडे काम आलें तेव्हां पटावर ५०० वर्गणीदार होते पण त्यांपैकीं २२५ हून अधिक, नुसते नामधारी होते. गोखल्यांनीं हें काम सोडलें तेव्हां सुमारें २५० वर्गणी-दारांकडे अंक रवाना झाला होता. वर्गणीचें उत्पन्न मात्र दिवसेंदिवस कमी झालें हें गोखल्यांना कबूल करावें लागलें. कदाचित् असिस्टंट सेक्रेटरीची ती चूक असेल. देशाच्या हल्लींच्या स्थितींत, गोखले म्हणतात, वर्गणीदारांच्या संख्ये-वरून कोणत्याहि मासिक–त्रैमासिकाची योग्यता ठरविणें बरोबर होणार नाहीं. यावर टिळकांचें उत्तर तयार होतेंच. टिळकांनीं हिशेबच मांडून दाखविला. गोखले यांनीं त्रैमासिकाचे एकंदर सव्वीस अंक काढले. त्यांत ४१ स्वतंत्र लेख

आहेत. पण यांतील स्वतः किती लिहिले हा आंकडा त्यांनीं सांगितला नाहीं. टिळकांच्या अंदाजाप्रमाणें गोखल्यांचे असे फक्त आठ किंवा नऊच लेख भरतील. एक वेळ जर पांचशें वर्गणीदार होते व त्याचे दोनशें झाले तर लोकांना अभिरुचि कमी याशिवाय दुसरें कांहीं तरी कारण असलें पाहिजे.

असो; हे वाद न संपण्यापैकींच होते. १८९६ च्या मार्चपासून गोखल्यांनीं रजा घेतली होती, व शेवटीं १८९६ च्या आगस्ट महिन्यांत त्यांनीं रीतसर राजिनामाच दिला. त्यांनीं राजिनामा देऊं नये म्हणून त्यांना पुष्कळांनीं आग्रह केला. परंतु तो त्यांनीं परत घेतला नाहीं. ता. १५ आगस्ट रोजीं वार्षिक सभा भरली, तींत गोखले यांचे जागीं महाराष्ट्र कॉलिजांतील प्रोफेसर शिवराम महादेव परांजपे यांची नेमणूक करण्यांत आली. त्रैमासिकाचे संपादकाचें काम पुढें महादेव राजाराम बोडस, हायकोर्ट वकील मुंबई, यांजकडे देण्यांत आलें. बोडस हे टिळकांच्या पूर्वपरिचयाचे. त्यांचे वडील महामहोपाध्याय राजारामशास्त्री बोडस, यांचा व टिळकांचा चांगला परिचय असे. बोडस यांचें इंग्रजी, मराठी व संस्कृत हे तीन्ही भाषाविषय तयार असून त्यांनीं एम. ए. ची परीक्षा दिली होती व एल्. एल्. बी चा अभ्यास करते वेळीं, ते कांहीं दिवस न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक, व ९३–९४ मध्यें मराठा पत्राचे सहकारी संपादक होते. केसरीमध्येंही त्यांनीं कित्येक लेख लिहिलेले असून संपादक होण्याला जे विशेष गुण लागतात ते बोडसांचे अंगीं बरेचसे होते. बोडसांची बुद्धिमत्ता, बहुश्रुतपणा, लेखनकौशल्य हीं आपल्या वर्तमानपत्राच्या दृष्टीनें टिळकांना संग्राह्य वाटल्यावरून बोडस हे एल्. एल्. बी. ची परीक्षा पास झाल्यावर टिळकांनीं त्यांना केसरी मराठ्याच्या संपादक वर्गांत सामील होण्याविषयीं विचारलेंहि होतें. परंतु मुंबईस राहून हायकोर्ट वकीलीच्या जोडीला राजधानींतील सार्वजनिक कार्यहि करावें अशी बोडस यांची इच्छा असल्यामुळें ते पुण्यास राहिले नाहींत. परंतु सार्वजनिक सभेचें त्रैमासिक आपल्या पक्षाकडे चालविण्याची जबाबदारी आल्यावर, त्याचा संपादक नेमण्याचे वेळीं टिळकांना बोडस यांची सहजच आठवण झाली, व तें काम करण्याचें बोडस यांनीं कबूलहि केलें. परंतु स्वतःची म्हणून जी जबाबदारी होती ती टिळक विसरले नव्हते. बोडस यांच्या नांवानें प्रसिद्ध झालेल्या पहिल्याच अंकांत टिळकांनीं "Decentralisation of finance" या विषयावर एक माहितीनें भरलेला असा महत्त्वाचा लेख लिहिला. यावेळीं ते कायदेकौन्सिलचे सभासद असल्यामुळें मुंबईच्या प्रांतिक सरकारच्या सांपत्तिक स्थितीचा विचार करणें त्यांना इतर रीतीनेंहि प्राप्तच होतें. शिवाय माधवराव रानडे यांनीं, त्रैमासिकांत याच विषयावर लेखमाला, आपलें नांव न घालतां, लिहिली ती अपुरी राहिली होती. टिळकांचा हा निनांवी लेख म्हणजे या मालेचा शेवटचा हप्ता होय. मनावर घेतल्यास टिळक वाटेल त्या विषयावर उत्कृष्ट लेख लिहूं शकत हें सर्वमान्य होतेंच, व सार्वजनिक सभा ताब्यांत घेतल्यावर

त्यांनीं लिहिलेला त्रैमासिकांतला हा लेख वाचणारास, स्पर्धा हा शब्द स्वतः वाईट असला तरी रानडे यांची बरोबरी करण्याची 'महत्त्वाकांक्षा' टिळक धरीत ती अगदींच व्यर्थ नव्हती असें कबूल करावें लागेल. भाषाविषय व तत्वज्ञान यांत टिळकांना रानड्यांची बरोबरी करितां येईल हें कोणीहि नाकबूल केलें नसतें. पण राजकारणी विषयांवर टिळक आडवे तिडवे लिहून हवे तितके कोरडे ओढतील, पण अशा विषयांचा सूक्ष्म आंकडेमोडीचा अभ्यास त्यांच्या हातून होणार नाहीं अशी शंका कित्येकांना आलेली असल्यास, त्यांची वरील लेख वाचला असतां ती सहज दूर होईल. हाताखालीं चार माणसें घेऊन कामें करवावीं अशी रानड्यांप्रमाणेंच टिळकांनाहि इच्छा व उमेद असे, आणि स्वपक्षाचें वर्चस्व स्थापावें ही महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनांत प्रबळ असली तरी सार्वजनिक सभा हातीं घेतली तेव्हां ती पूर्वीप्रमाणें चालवून दाखवूं व तिचा लौकिक कायम राखूं अशीच त्यांना मनांतून हौस होती. पण रानड्यांच्या हातीं असलेल्या सभेला जीं गंडांतरें येणें कधींहि शक्य नव्हतें तीं टिळकांच्या हातीं सभा आल्यामुळें तिला हटकून येणारीं होतीं, व तीं तशीं पुढें आलींहि.

सार्वजनिक सभेचें प्रकरण पुरें करण्यापूर्वीं तींतून बाहेर पडलेल्या गोखले-प्रभृतींनीं पुण्यांतच दुसरी एक संस्था प्रतिस्पर्धी स्वरूपाची काढली, तिच्यासंबंधानें थोडी हकीगत देणें जरूर आहे. यापूर्वीं सभा रानड्यांचे हातीं जवळ जवळ वीस वर्षें होती, व अलीकडे सात आठ वर्षें सभेचें बहुतेक कार्य गोपाळराव गोखले यांचे हातून होत असून त्यांना कार्यकारी मंडळींतील बहुमताचा पाठिंबा होता. पण टिळकपक्षाचें बहुमत आणि काम करणार गोपाळराव गोखले असा मेळ बसणें शक्य नसल्यामुळें, गोखल्यांनीं राजिनामा दिला. त्यानंतरहि त्यांच्या पक्षाची कांहीं मंडळी सभेंत होती व त्यांनीं जागांचे प्रत्यक्ष राजिनामे दिले नाहींत, तथापि सर्वांनीच सभेंतून जवळ जवळ अंग काढून घेतलें होतें. १८९६ च्या दिपवाळीच्या सुटींत रानडे पुण्यास आले, त्या वेळीं सार्वजनिक सभेंतील ही मंडळी त्यांचे घरीं जुळली, तेव्हां पुढें काय करावें असा प्रश्न सहजच निघाला व जुनी सभा आपल्या हातीं रहात नाहीं त्या अर्थी तशाच प्रकारची दुसरी सभा काढावी असें ठरलें. प्रथम वेगळी सभा काढण्याला न्या. रानडे कबूल नव्हते असें म्हणतात. पूर्वी नूलकर सभेचे चेअरमन असतां, त्यांनीं रानड्यांचें ऐकूं नये व आपल्या मताप्रमाणें काम करावें असें घडून येत होतें. पण तेव्हां वेगळी सभा स्थापन करण्याची कल्पना न निघण्याचें कारण असें कीं, मुख्य कार्यकर्ते चिटणीस सितारामपंत चिपळूणकर हेहि मोठे स्वतंत्र बाण्याचे व केवळ रानड्यांनाच गुरु असे न मानणारे होते. यामुळें रानड्यांना मनांतून असंतोष वाटत असला तरी स्वतः त्यांना आपल्या नांवानें पुढें येऊन, या राजकीय सभेचें कोणतेंहि काम करणें शक्य नव्हतें व सर्वस्वीं आपल्या तंत्रानें चालेल असा मनुष्यहि हाताशीं नव्हता.

पुढें नूलकर व चिपळूणकर दोघेहि स्थानभ्रष्ट झाल्यानें रा. ब. रानड्यांचें वर्चस्व सभेंत पुनः प्रस्थापित होऊन, सात आठ वर्षें अबाधित चाललें. पण आतांचा प्रसंग सर्वच दृष्टींनीं निराळा होता. पूर्वी रानडे स्वतः जाग्यावर म्हणजे खुद्द पुण्यास होते व ते पुण्यास असल्यावर मग एखादी गोष्ट सर्वस्वीं त्यांच्याच मताप्रमाणें न झाली तरी त्यांचा थोडाबहुत सल्ला घेतल्याशिवाय होत नसे. हल्लीं त्यांची बदली मुंबईस झाल्यामुळें, जागेवर राहिल्यानें होणारी त्यांची मदत, त्यांच्या पक्षांतील लोकांना प्रत्यक्ष मिळेनाशी झाली. दुसरें असें कीं त्यांचा शिष्य म्हणवून घेऊन सर्वस्वीं त्यांच्या तंत्रानें आणि मोठ्या मेहनतीनें काम करणारा गोखल्यांसारखा हस्तक त्यांना मिळाल्यामुळें स्वतंत्र संस्था काढणें जरूर व सुलभहि झालें. जरूर अशाकरितां कीं, गोखल्यांची बुद्धि राजकारणांत विशेष चालते व रानड्यांसारखेंच तेहि राजकारणांत मोठे कार्यकर्ते होतील असें दिसून येऊं लागलें होतें. डे. ए. सोसायटीचे लाईफ मेंबर म्हणून त्यांना आणखी दहापांच वर्षें काढावयाचीं होतीं; पण त्यांचें राजकीय कामच इतकें वाढलेलें व आणखी वाढणारें होतें कीं कॉलेजांतील शिक्षणाचें त्यांचें काम त्यापुढें फिकें न पडलें तरी त्या मानानें लोकदृष्ट्या गौणच ठरत होतें. वीस वर्षें सोसायटींत नोकरी करण्याचा करार म्हणजे नैतिक बंधन होतें म्हणूनच गोष्ट वेगळी. नाहींतर शिक्षणाचें काम टाकून देऊन सर्वस्वीं राजकारणांत पडून नांवारूपास येण्याची व देशसेवा करण्याची त्यांची योग्यता, खुद्द मुंबईसहि फेरोजशहा मेथाप्रभृतींना पटली होती. पण संस्थेशिवाय कामाला बळ व तेज नसतें, व हातची चालती संस्था तर गेली. त्यांना नवीन संस्था काढून दिल्याशिवाय त्यांची हौस व तरतरी फुकट जाणार याकरितां वेगळी संस्था काढणें जरूर झालें. शिवाय सार्वजनिक सभेच्या धोरणांतील मतभेद पूर्वींहून अधिक तीक्ष्ण झालें होते. नूलकर व रानडे यांचें न बनलें तरी एक नोकर तर दुसरे पेन्शनर इतकाच फरक. पण टिळक व रानडे यांच्यांत नुसत्या कमी अधिकाचा फरक नसून मूळ स्वभावाच्या जातींतच फरक होता. सभेच्या अर्जांतून वगैरे टिळक कोणचें धोरण पत्करतील हें पूर्वी दिसून येण्यास मार्ग नव्हता; पण केसरींतील लेख व पुण्यांतील बखेडे लक्षांत घेतां जुन्या परंपरेस सोडून तें धोरण जाईल असें मानण्यांत रानड्यांची मोठीशी चूक नव्हती. गोखल्यांप्रमाणेंच दुसरीहि कांहीं तरुण सुशिक्षित मंडळी या वेळीं नेमस्तपक्षातर्फे पुढें येऊं पहात होती. उदाहरणार्थ विनायकराव कीर्तन्यांचे चिरंजीव डी. व्ही. कीर्तने, विलायतेहून जे नुकतेच बॅरिष्टर होऊन आले होते, ते इंग्रजी वगैरे चांगलें लिहीत. विनायकराव कीर्तने व रानडे हे सहाध्यायी असल्यामुळें बॅ. कीर्तने हे रानड्यांनाहि मुलाप्रमाणेंच होते. त्यांनींहि नवीन सभा काढण्याची बरीच उचल केली. तिसराहि एक वर्ग या कामांत होता, तो पुण्यांतील वृद्ध पेन्शनर लोकांचा. प्रत्यक्ष फारसें काम न करितां आलें तरी सार्वजनिक कार्यांत कोठें तरी सहज

जुळून जावें अशी त्यांनाहि हौस असे. सार्वजनिक सभेला खुद्द रानड्यांचा आश्रय असल्यामुळें पेन्शनर लोकांना सभेंत राहून काम करण्यांत कांहीं धोका नव्हता. पण टिळकांच्या हातीं सभा गेल्यावर पेन्शनर लोकांचें काय होणार ? तात्पर्य पुण्याच्या नेमस्त पक्षांतील वृद्ध तरुण या दोघांच्याहि सार्वजनिक कार्याच्या हौसेला मान देऊन रानडे वेगळी सभा काढण्यास कष्टानें कबूल झाले; पण नवी सभा काढली तरी जुनीवरील त्यांचें ममत्व नाहींसें झालें नाहीं याचा पटण्यासारखा पुरावा हाच कीं, मृत्युपत्रानें यांनीं वार्षिक व्याजाच्या ज्या कित्येक देणग्या दिल्या त्यांत सार्वजनिक सभेलाहि एक देणगी त्यांनीं दिलेली आहे.

ता. ३१ आक्टोबर १८९६ रोजीं मुंढव्याजवळच्या कीर्तन्यांच्या खास बागेंत मेजवानी झाली तिला बहुतेक प्रमुख नेमस्त मंडळी हजर होती. त्याप्रसंगीं न्या. रानडे हेहि हजर होते. व त्याच प्रसंगीं डेक्कन सभा या नांवानें खास नेमस्त पक्षाची अशी एक राजकीय सभा स्थापण्याचा विचार निश्चित झाला. ही बातमी टिळकांना लगेच समजली. परंतु पुढें दोन दिवसांनीं निघणाऱ्या केसरींत त्यांनीं या गोष्टीची वाच्यता केली नाहीं. नवी सभा स्थापन करण्याचें ठरलें खरें पण तिचें उद्देशपत्रक प्रसिद्ध झाल्याशिवाय कांहीं लिहावयाचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें. कारण या उद्देशपत्रिकेंत जीं विधानें केलीं जातील त्यांवर टीका करणें अर्थात् अधिक सोईचें होतें. अदमासाप्रमाणें पुढच्याच आठवड्यांत हें हेतुपत्रक प्रसिद्ध झालें. व त्यांत सभा काढण्याचा उद्देश सांगतांना सार्वजनिक सभेवर जो हल्ला करण्यांत आला त्यानें टिळक इतके चिडून गेले कीं, सांगतां पुरवत नाहीं. या विषयावरील ता. १० नोव्हेंबर १८९६ च्या अंकांतील त्यांचा लेख मासलेवाईक आहे. मर्मभेद करण्यासारखे टिळकांच्या लेखणींतून उतरलेले कडक शब्द या लेखांत जितके एकत्र सांपडतील तितके इतर कोणत्याहि लेखांत क्वचितच सांपडतात. अग्रलेखाचा मथळाच मुळीं " हा म्हातारचळ कीं पोरखेळ " असा आहे. ही सलामी म्हातारे रानडे व कितनेप्रभृति ' पोरें ' यांना मध्यमवयीन टिळकांनीं दिली होती. सर्व लेखांत रागाचे कढावर कढ व त्वेषाच्या सरीवर सरी आलेल्या दिसून येतात. मोठ्या लोकांचे दोषहि मोठे. रानड्यांनीं डेक्कन सभा काढून फार मोठी चूक केली. ते मोठे झाले म्हणून आम्हीं, तिचा उघड निषेध करण्यास भितों कीं काय ? त्यांची विद्वत्ता व बुद्धिमत्ता आम्हांलाहि थोडी आहे, आणि कोणाच्या ऐश्वर्याला आम्हीं भुलत नसतो. दुष्काळाचीं कारणें शोधतांना केरूनाना छत्रे यांना सूर्यावरचे डाग उजेडांत आणावे लागले, त्याचप्रमाणें या रानड्यांनीं पाडलेल्या मुत्सद्देगिरीच्या दुष्काळांत त्यांच्या आंगचे दोष दाखविणेंहि प्राप्तच आहे. बेकन जसा मानवजातींत अति हुशार पण अति नीच त्याप्रमाणें रानड्यांची बुद्धि व्यापक असली तरी अंतःकरण उदात्त नव्हे. ईश्वराला कमी दर्जाचाहि जोडीदार खपत नाहीं, तसेंच रानड्यांना टिळक खपले नाहींत, म्हणून

त्यांनीं सार्वजनिक सभेच्या छातीवर पाय देण्याकरितां डेक्कन सभा काढली; पण मुहूर्त अमावास्येचा मिळाला आणि प्रसंगहि ताडीच्या बागेंतील मेजवानीचा! अशा वाईट वेळीं, बुद्धिभ्रंशकारक प्रसंगीं कुत्सित कल्पनाच जन्मास यावयाची. मेजवानीचे वेळीं भक्तमंडळींनीं न्यायमूर्तीदेवाला विनाविलें कीं, आमची काम करण्याची हिंमत जिरत चालली. आम्हांला नव्या सभेचा वर द्या. देवानें तो दिला व दुसरी सभा काढा म्हणून सांगितलें. नेमस्त पक्षांतील पेन्शनर, तोफखान्यांतील निरुपयोगी बोज्यांप्रमाणें, गुलामगिरीचा छाप मारून सोडलेले. गोल्डस्मिथच्या काव्यांतील म्हातारा शिपाई, तरुणपणीं लढलेल्या लढायांतील आवेशानें वर्णनें देतो तसें या वृद्ध रावबहादुरांनीं सरकारी नोकरींतील पराक्रम सांगावे. त्यांनीं तें केलें पण हातून न होण्यासारखें दुसरें करण्याची हाव धरली. असले डझन दीड डझन पेन्शनर आणि परप्रकाशित स्वयंशहाणे तरुण, अशा वृद्धतरुणांचा अपूर्व योग रानड्यांच्या कृपाछत्राखालीं आल्यानें ही सभा निघाली. रानड्यांनीं अविचार केला. त्यांच्या हातून भ्रूणहत्येचें पातक घडलें. विषवृक्ष असला तरी आपल्या हातानें तो लावला गेलेला, म्हणून तोडूं नये ही नीति ब्रह्मदेवालाहि पटली, पण रानड्यांना पटली नाहीं. त्यांनीं सार्वजनिक सभेला सवत निर्माण करून, कौटिल्य, अनुदारता व क्षुद्रबुद्धि जगजाहीर केली. पण अखेर किंबेवाड्याच्या आरसेमहालीं पांजरपोळांत झुळणारे पेन्शनर काय दिवे लावणार तें दिसतच आहे. असें एकना दोन टिळकांनीं रागाच्या भरांत लिहिलें.

टिळकांशीं आपलें पटत नाहीं, राजकीय धोरणांत टिळक आमच्यापासून फार दूर व आम्हीं तुम्हांला फार जवळ, असें सरकारला व अँग्लो–इंडियन लोकांना भासविण्याचा प्रयत्न, डेक्कनसभावाल्यांनीं आंग्लो–इंडियन पत्रांतून चालविला, त्याचा तर टिळकांना विशेष राग आलाच; पण सार्वजनिक सभेला त्यांनीं नांवें ठेविलीं याचा टिळकांना अधिक राग आला. सभेंत बहुमत कांहीं दिवस नसलें म्हणून काय बिघडलें ? पण न्या. रानड्यांना सभेंत सासूबाईपणा करण्याची नेहमीं सवय झालेली, तेव्हां हातांतून अधिकार गेला हें त्यांना कसें खपणार ! डेक्कनसभेच्या उद्देशपत्रकावर इतरांबरोबर आठ रावबहादुरांच्या सह्या होत्या व तें न्या. रानडे यांच्या संमतीनें प्रसिद्ध झालें होतें. या उद्देशपत्रकांत दोन शब्द गोविले गेले तेच पुढें महाराष्ट्राच्या काय पण सर्व हिंदुस्थानच्या राजकारणांत पक्षभेद–दर्शनाच्या बाबतींत चिरस्थायी होऊन राहिले. हे दोन शब्द म्हणजे Liberalism व Moderation उदारमतवादित्व व नेमस्तपणा हे होत. पहिल्या शब्दांत राजकीय मतांपेक्षां सामाजिक मतभेदाचीच खोंच अधिक होती. लिबरल हा शब्द आतां एका राजकीय पक्षाला कायमचा लागून राहिला आहे. ज्या पक्षाला प्रतिपक्षी नेमस्त हें नांव देतात, त्यालाच लिबरल हें नांव स्वतः नेमस्त देहे? देतात. अशा रीतीनें आज लिबरल व मॉडरेट या दोन शब्दांची समव्याप्ति झाली

आहे. पण १८९६ सालीं महाराष्ट्रांतील एका पक्षानें तो शब्द प्रथम आपणाला लावून घेतला त्या वेळीं त्याला निवळ सामाजिक अर्थ होता. जे सुधारक तेच लिबरल. सुधारक या शब्दाचें तेव्हां तें भाषांतर होतें. या शब्दयोजनेचा खरा हेतु, टिळक हे पुराणमताभिमानी आहेत, म्हणून आम्ही त्यांच्यापासून वेगळे आहोंत असें दाखविण्याचा होता. नेमस्त या शब्दाचा अर्थ दुष्प्राप्य वस्तूची हांव न धरणारा असा उद्देशपत्रकांतच दिला होता. शब्दार्थांतील या श्लेषांचा फायदा घेऊन आंग्लोइंडियन पत्रांनीं सार्वजनिक सभेला व टिळकांना नांवें ठेऊन घेतलीं व डेक्कन सभेला उचलून धरण्यांतहि त्यांचा तोच हेतु साधणारा होता. पण सामाजिक बाबतींत मतभेद असला तरी राजकीय बाबतींत निराळ्या नांवांचे निराळे पक्ष होण्याची वेळ आली नाहीं, असें टिळकांचें म्हणणें होतें.

*टिळक व गोखले हे दोन्ही कांग्रेसला मानणारे, मग फरक कोठला?* "टिळक किंवा नातू हे इंग्रज सरकारचें राज्य बुडविणार आणि न्यायमूर्ती किंवा गोखले तें तारणार असें प्रत्यक्ष किंवा परंपरेनें उद्गार काढणें, म्हणजेच आधीं आपला नीचपणा किंवा मूर्खपणा व्यक्त करण्यासारखें आहे. इंग्रजसरकार इतकें समर्थ आहे कीं, तें दोघांसहि थप्पड मारून खालीं बसवील. सुधारणेंत ज्याप्रमाणें गरम नरमाचा भेद आहे तसा राजकीय कामांत नाहीं व गरम सुधारकांनीं आपणांस थंड मुत्सद्दी म्हणवून घेऊन, इतर लोकांवर पर्यायानें राजद्रोहाचा आरोप करणें, हा निवळ पाजीपणा होय" इतकें टाकून लिहिल्यावरहि टिळकांनीं कांहीं थोडे बारीक चिमटे घेतले होते. सार्वजनिक सभा रानड्यांच्या तंत्रानें चालत होती तेव्हांच तिच्यावर सरकारानें राजद्रोहाचा ठपका ठेवला होता. तो धुवून काढतां काढतां न्यायमूर्तींना प्रयास पडले. राजकीय कामांत गरम झाल्यानें माफी मागण्याचा प्रसंग सभेला आला तो गोखल्यांच्याच कारकीर्दींत. सार्वजनिक सभेलाच खरोखर प्रातिनिधिक स्वरूप होतें, कारण पन्नास लोकांनीं संमति दिल्याशिवाय कोणास तिचा सभासद होता येत नव्हतें. डेक्कन सभेंत मात्र अधिकारी वाटेल त्याला घेणार व वाटेल त्याला अडविणार. रानड्यांची गुरुपरंपरा मान्य करील असा कोल्ह्याला कोल्हा भेटेल तेव्हांच त्याचा प्रवेश होणार. म्हणून सभेला 'रावबहादुरांचा पांजरपोळ' अथवा 'रानड्यांचा मेळा' हें नांव योग्य आहे. रानड्यांची विद्या मोठी आणि बुद्धि खोटी. त्यांच्या पत्रिकेंत बुद्धिस्थानीं कोणीतरी पापग्रह असेल. स्वतः झीज न सोसतां लोकांस मोह घालून देशकार्य पुढें ढकलावयाचें ही रानड्यांची शुक्रनीति होय, वगैरे वगैरे.

हा लेख लिहितांना आपण मर्यादा उल्लंघित आहों असें खुद्द टिळकांनाहि वाटलें. कारण शेवटच्या वाक्यांत त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, "जरा स्वैराचारानें विटाळलेली लेखणी पुनः हातीं घ्यावी लागणार नाहीं अशी आशा आहे." या वादाचा फायदा घेऊन सरकारच्या पुष्कळशा बगलबच्चांनीं सार्वजनिक सभेला

आंग्लोइंडियन पत्रांतून शिव्या देऊन घेतल्या. टिळकांनीं फॅमिन कोड लोकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला त्यांत पिकाच्या आणेवारीप्रमाणें शेतसारा देण्याचा हात कमी अधिक आंखडून धरण्याचा उपदेश अर्थातच होता. मुंबई टाइम्सनें याला उद्देशून टिळकांनीं " नो रेंट कँपेन " म्हणजे जमीनदार बुडविण्याची मोहिम सुरू केली आहे असें लिहिलें. हे शब्द आयर्लंडांतील चळवळीवरून टाइम्सला सुचले हें उघड आहे व ऐरिश लँडलीग हा जसा बेकायदेशीर म्हणून ब्रिटिश सरकारनें बुडविला, तशीच सार्वजनिक सभाहि बुडवावी असा टाइम्सचा रोख होता. पण सार्वजनिक सभेचीं तरफदारी करणारींहि कांहीं पत्रें प्रसिद्ध झालीं. मुंबई ग्याझेटांत पत्र लिहून " कालिविक " हें नांव धारण करणाऱ्या एका गृहस्थानें, या दोन सभांच्या रचनेंतील खरा भेद दाखवून दिला होता. त्यानें असेंहि लिहिलें कीं, पहा टिळक व त्यांचे प्रतिपक्षी यांच्यांतला फरक. टिळकांना राष्ट्रीयसभेच्या सेक्रेटरीच्या जागेचा राजीनामा द्यावा लागला तेव्हां तो देऊन ते बिनबोभाट बाजूला सरले व पैशासुद्धां सर्व दप्तर त्यांनीं ताबडतोब स्वाधीन केलें. आणि हे लोक आपली प्रतिष्ठा कमी झाल्याबरोबर दुसरी सभा काढतात. खुद्द टाइम्सलाच एका गृहस्थानें पत्र लिहून विचारलें कीं, केसरीनें रानड्यांना म्हातारचळ लागला असें म्हटलें त्यांत आणि तुम्ही ग्लॅडस्टनसाहेबाला " वेडा, बुद्धिभ्रष्ट म्हातारा " म्हटलें यांत काय फरक ?

या दोन सभांचा वाद पुढें जाहीर रीतीनें फारसा वाढला नाहीं. डेक्कनसभाहि सार्वजनिकसभेप्रमाणें दुष्काळासंबंधानें अर्जं वगैरे पाठवूं लागली व सरकारचीं या सभेला उत्तरेंहि जाऊं लागलीं. यामुळें कांहीं दिवसपर्यंत या दोन सभांच्या धोरणांतील फरक सूक्ष्मपणें पाहण्याचा लोकांना एक उद्योगच होऊन राहिला होता व सरकारलाहि एकास बरा म्हटल्यानें दुसऱ्यास परस्पर वाईट म्हणण्याचें नाजूक काम सहज करतां येऊं लागलें. पण सरकारानें जसें सार्वजनिक सभेला कांहीं दिलें नाहीं, तसेंच डेक्कन सभेलाहि त्यांनीं कांहीं लभ्यांश होऊं दिला नाहीं. लभ्यांश झाला असला तरी इतकाच कीं, लोकमतदर्शक सूचना स्वीकारून त्याप्रमाणें दुष्काळांत लोकांना सवलती वगैरे अधिक देणें. दोहोंपैकीं कोणतीच सभा स्वतःकरितां कांहींच मागत नव्हती. पुढें थोड्याच दिवसांत एकसंत्रेकरांच्या चुकीमुळें यापुढें आम्ही तुम्हाला ओळखणार नाहीं असें सरकारनें सार्वजनिक सभेला कळविलें, व डेक्कन सभेशीं पत्रव्यवहार सुरू ठेवला, इतकाच फरक.

पुढच्या सालीं वेल्बी कमीशनपुढें साक्ष देण्याकरितां डेक्कन सभेचे सेक्रेटरी या नात्यानें गोखले हे विलायतेस गेले. त्यांनीं आपल्या कैफियतींत डेक्कन सभेचें वर्णन तिच्या उद्देशपत्रकांतील शब्दांनींच केलें. आणि डेक्कन सभेपूर्वी अशाच एका सभेचा मी सेक्रेटरी होतों असें म्हणून सार्वजनिक सभेचा उल्लेख केला होता. पण हा उल्लेख प्रथम अपुरा आल्यामुळें, गोखले यांच्या साक्षीवर अग्रलेख

लिहितांना, ता. ११ मे १८९७ च्या केसरींत, गोखल्यांनीं राजनिष्ठेचें फाजिल प्रदर्शन आणि जातां जातां सार्वजनिक सभेवर टाप झाडण्याचा प्रयत्न केला असें जुन्या आठवणी मनांत येऊन टिळकांनीं म्हटलें होतें. या टीकेला गोखल्यानीं लंडनहून ता. २९ मे रोजीं उत्तर लिहिलें. त्यांत " सार्वजनिक सभेचाही उल्लेख डेक्कन सभेप्रमाणेंच मीं नांवानें केला होता; " असें म्हटलें होतें. दोन्ही एकच प्रकारच्या सभा असें म्हटल्याबद्दल त्यांनीं सर्व उतारा पाठविला; त्यावरून सहजच खुलासा होण्यासारखा होता.

सार्वजनिक सभा व डेक्कन सभा यांचा पुढील इतिहास महाराष्ट्राला विदितच आहे. पण डेक्कन सभेची मूळ स्थापना ही वर दर्शविलेल्या कारणांकरितां विशेष महत्त्वाची ठरते. या वादांतील टिळकांचा मुख्य मुद्दा इतकाच कीं तुम्ही स्वतःला नेमस्त म्हणून घेतां यामुळें आम्ही परस्पर तुलनेनें जहाल ठरतों. तुम्ही आम्ही एकत्र राहूनच काम करूं. दोन दिवस तुमचा पक्ष वरचढ होईल, दोन दिवस आमचा होईल; डावा उजवा येवढ्या भेदानें, पण एकाच शरीराचे दोन अवयव, या नात्यानें आपण ओळखलें जावें. शरीराला चिकटून राहिलेले दोन हात परस्परांस केव्हांहि उपयोगी पडतील. ते तुटून एकमेकांपासून वेगळे झाले म्हणजे कामास येणार नाहींत. हे हात तोडून एकमेकांपासून अलग करावे, त्यांना एकमेकाचें नातें विसरावयास लावून, वेळीं त्यांचें आमचें कांहीं नातेंच नाहीं असेंहि म्हणण्यास लावावें, अशी सरकारची राजनीति प्रथमपासून असल्याचें टिळकांना दिसत होतें. आणि बंगालच्या फाळणीपासून पुढें तर, हें धोरण म्हणजे फोडून झोडण्याचें धोरण, सरसकट अमलांत येऊं लागलें. टिळकांनीं ओळखलेलें राजनीतीचें हें मर्म बिनचूक होतें यांत शंका नाहीं. परंतु सभा वेगळी काढली याकरितां, त्यांनीं रानड्यांवर जो भयंकर हल्ला केला, तो त्यांतील शब्दांच्या दृष्टीनें योग्य ठरेल असें वाटत नाहीं. ते शब्द लिहितांना लेखणी स्वैर झाली हें स्वतः त्यांनींच कबूल केलेलें आहे व दोष दिसून येत असतांहि तो टिळकांनीं टाळला नाहीं ही गोष्ट उत्तराशिवाय शिल्लक उरते. दुसरें असेंहि म्हणतां येईल कीं, या फुटीमागें कमीतकमी दहा वर्षांचा इतिहास होता. या अवधींत बहुधा असें एकहि वर्ष गेलें नाहीं कीं, ज्यांत टिळक व सुधारकपक्ष यांच्यांत कसून भांडणें झालीं नाहींत. या भांडणांत उभयपक्षांतील पुढारी लोकांची स्वभावभिन्नता इतकी उघड झाली होती कीं, दोघांचें यापुढें बनेल हें संभवतच नव्हतें. यापूर्वीच्या भांडणांत सुधारकपक्षाकडे दोष होता, असें घेऊन चाललें तरी, वेगळी सभा काढणें हा त्यांचा फिरून वेगळा नवा दोष होऊं शकत नाहीं. पुण्यास बोलावलेल्या राष्ट्रीयसभेची नुसती व्यवस्था करणें यांत मतभेदाला असलीच तर फार थोडी जागा असावी. पण तेथेंहि तो इतका माजला कीं, स्वतः टिळकांना राजिनामा देऊन कार्यकारी मंडळांतून बाहेर पडावें लागलें. वेगळी राष्ट्रीयसभा भरवितांच येत नव्हती,

ही गोष्ट वेगळी. पण वेगळी कार्यकारी मंडळी ही जी त्यांतल्या त्यांत शक्य गोष्ट, ती टिळकांच्या अनुयायांच्या आग्रहानें सुचविण्यांत आलीच होती. सारख्या स्वभावाच्या दोन मनुष्यांत मतभेद झाला तर त्यांना वेगवेगळ्या संस्था काढण्याचें काम पडत नाहीं. ते आंत राहून कसेंहि निभवून घेतात. पण मतभेदाचें बीज विषमस्वभावाच्या भूमींत रुजलें म्हणजे पोटांत मुळ्या व बाहेर शाखा वाढतच जातात. टिळकांनीं डे. ए. सोसायटी सोडल्यानंतर त्यांनीं शिक्षणसंस्था अशी वेगळी काढली नाहीं, ही गोष्ट खरी, तथापि एका कर्त्या मनुष्याच्या सार्वजनिक चारित्र्याला जेवढीं साधनें लागतात तितकीं सर्व टिळकांना वेगळींच उभारावीं लागलीं. रानडेगोखले पक्षानें डेक्कन सभा काढण्यांत तरी दुसरें काय केलें ? या सर्वांत वाईट येवढेंच होतें कीं, गोखलेपक्षाचीं पत्रें टिळकांविषयीं कसेंहि लिहीत असोत, पण स्वतः रानडेच काय, गोखले यांचीहि शब्दाची मर्यादा, टिळकांसंबंधानें बोलतांना व लिहितांना इतकी सुटली नव्हती ही गोष्ट विसरून चालत नाहीं. सरकाराशीं वागतांना किंचित नरमपणाचा दोष रानडेपक्षाकडे देणें योग्य, तर प्रस्तुत लेखांतल्यासारख्या शिव्या रानड्यांसारख्यांना देण्याचा दोष टिळकांनाहि द्यावा लागतो. प्रत्येक गोष्टींतलें उचित अनुचित हें वेगळेंवेगळें असतें; व समाजांत राजकीय पक्षभेद दिसल्यानें, सरकारचा फायदा होतो या टिळकांच्या म्हणण्यांत तथ्य असलें तरी, तेवढ्यामुळें नुस्ती वेगळी सभा काढण्याबद्दल असे अपशब्द लिहिणें हें अनुचित म्हणावें लागतें. असो, आज रानडे, गोखले, टिळक सर्व निघून गेल्यावर, प्रसंगविशेषीं राग अनावर होऊन, शब्दमर्यादा सुटण्याच्या टिळकांच्या दोषाचें वरील लेख हें एक उदाहरण इतकेंच त्याला आतां महत्त्व उरतें.

## भाग २१ वा

# टिळक व लॉर्ड हॅरिस

राजकारणाच्या विषयांत मनुष्य टीका करण्याला प्रवृत्त झाला म्हणजे त्याला प्रांतिक गव्हर्नराचें नांव घ्यावेंच लागतें. राज्यकारभाराच्या घड्याळाच्या पोटांतली यंत्रांची मांडणी, परस्पर संबंध, व सापेक्ष गति, हीं कशींहि असोत; पाहणारा हा तबकडीवरील काटेच मुख्य मानतो. वेळ दाखविण्याचें मुख्य काम तेच करितात. ते खरी वेळ सोडून फार वेळ मागें रहात असले, किंवा बिलकूल थांबले, किंवा फार वेळ पुढें जात असले, तर त्यावरूनच घड्याळाची परीक्षा होते, व स्तुति किंवा निंदा त्यांच्याच पदरीं पडते. प्रांतिक राज्यकाभाराच्या दृष्टीनें घड्याळांतली स्प्रिंग होणारे गव्हर्नर क्वचित् लाभतात. तबकडीवरील कांटे होणेंच पुष्कळांच्या नशीबीं येतें. याचें कारण पांच वर्षांच्या मुदतीनें येणाऱ्या विलायती शाहण्यांना, इकडील परिस्थितीचें यथार्थज्ञान आधीं कमी, व कोणास तें असलें तरी सिव्हि-लियन सेक्रेटरी व कौन्सिलर लोकांच्या धोरणाला विरोध करून आपल्या धोरणा-चेंच घोडें पुढें दामटण्याला जें धैर्य व खंबीरपणा लागतो तो तरी त्यांच्या अंगीं असत नाहीं. पण हें मुळांतलें कारण कांहींहि असलें तरी प्रांताचा सर्व कारभार गव्हर्नराच्या नांवानेंच चालतो, व चांगलीं कामें झाल्यास स्तुतीचा अहेर जसा त्याला लाभतो तसेंच कारभार वाईट ठरल्यास लोकनिंदेचें ओझेंहि त्याला आप-ल्याच पाठीवर घेऊन विलायतेस परत जावें लागतें. राज्यकारभारांत आजवर कित्येक चांगलीं लोकोपयोगी कामें झालीं असतील, पण एकाहि कौन्सिलदाराचें स्मारक किंवा पुतळा झाल्याचें कोणी पहात नाहीं. सगळीं स्मारकें खुद्द गव्हर्न-रांचींच होतात. अर्थात् याच्या उलट, नांवें ठेवण्याला जर लोकांना कोणाचें नांव घ्यावयाचें तर तेंहि त्यांनीं गव्हर्नराचेंच घेतलें तर त्यांत त्यांचा काय दोष ?

कर्मधर्मसंयोगानें मुंबई इलाख्याला १८८५ ते १८९५ या दहा वर्षांत दोन गव्हर्नर एकामागून एक असे लाभले कीं एकानें जितकें स्तुतीस, तितकेंच दुसऱ्यानें लोकनिंदेस स्वतःला पात्र करून घेतलें. हे दोन गव्हर्नर म्हणजे लॉर्ड रे व लॉर्ड हॅरिस हे होत. या गव्हर्नरांशीं टिळकांचा व्यक्तिशः संबंध तर बराच आला; पण सार्वजनिक दृष्टीनेंहि केसरीला एकाची जितकी भरपूर स्तुति, तितकीच दुसऱ्याची भरपूर निंदा करावी लागली.

सुदैवानें या दोघांहि गव्हर्नरांच्या गुणदोषासंबंधानें स्वतः टिळक व त्यांचा प्रतिपक्षी सुधारकवर्ग—म्हणजे तेव्हांचा नेमस्त वर्ग, यांच्यामध्यें ऐकमत्य होतें. यामुळें, एकच प्रकारचें मत असतां तें निरनिराळ्या रीतीनें, निरनिराळ्या मार्गेंत,

व निरनिराळ्या जोमानें प्रगट करण्यामध्येंच मनुष्याचा खरा स्वभावभेद दिसून येतो; व लोकांचें खरें हित कोणी पाहिलें, तें सांभाळण्यांत अधिक दक्षता कोणी दाखविली, अधिक धाडस कोणी प्रगट केलें, किंवा अधिक स्वार्थत्याग कोणी स्वीकारला हें व्यक्त होतें. सरकारपक्षाशीं परोपरीनें बरोबर सामना करील असा लोकपक्ष उभा करणें, व वर्तमानपत्रांतून लोकमत प्रगट करणें, हें एकच ध्येय सार्वजनिक कार्यांत पडूं लागल्यापासून टिळकांनीं आपल्या डोळ्यांपुढें ठेविलें होतें. असा पक्ष उभा ठाकणें किंवा असें लोकमत प्रगट होणें हें जर राष्ट्र-हिताच्या दृष्टीनें इष्ट मानलें, तर टिळकांनीं केलें तेंच योग्य केलें मग त्यांत किर-कोळ दोष कांहीं असोत, व त्यांच्या प्रतिपक्षानें केलें तें अयोग्य केलें मग त्यांत किरकोळ गुण कांहीं असोत, असाच निवाडा जगाला अखेर द्यावा लागेल.

लॉर्ड रे यांची कारकीर्द अनेक दृष्टींनीं लोकप्रिय झाली होती. क्रॉफर्ड प्रकरणांत न्यायबुद्धि ठेवून त्यांनीं स्वकीयांविरुद्ध झगडण्यांत पुष्कळ धैर्य दाखविलें; खंबायतचे पोलिटिकल एजंट विल्सन यांनीं संस्थानच्या दिवाणाशीं व्यक्तिशः अपमानकारक व अनीतिमूलक वर्तन केलें, त्याची चौकशी करण्याकरितां लॉर्ड रे यांनीं एक कामिशन नेमलें. यामुळें गोरा अधिकारी झाला तरी लॉर्ड रे यांच्या-जवळ त्याला क्षमा नाहीं हा त्यांचा फार महत्त्वाचा गुण प्रगट झाला. कायदे-कौन्सिलांत सरकारतर्फें सभासद नेमावयाचे ते लॉर्ड रे यांच्याइतके सर्वमान्य असे दुसऱ्या कोणीहि आजवर नेमले नाहींत. सर्व इलाखाभर हिंडणें, आपत्तीच्या प्रसंगीं लोकांना सरकारी मदत देणें, या गोष्टींनीं त्यांची लोकहिततत्परता विशेष दिसून आली. जंगलखात्याविरुद्ध लोकांचीं गाऱ्हाणीं परमावधीला पोंचलीं होतीं त्यांची चौकशी कमिशन नेमून त्यांनीं केल्यानें लोकांना फार बरें वाटलें. या व अबकारी खात्यांत, तसेंच जमीनमहसूल खात्याच्या कांहीं बाबींत, लॉर्ड रे यांनीं अखेर लोकांना नाराज केलें ही गोष्ट खरी; तथापि या कामांतील दोष त्यांच्या कौन्सिलदारांवर टाकून स्वतः त्यांना होईल तितकें मोकळें करण्याची बुद्धि टीकाकारांना व्हावी, इतकी लोकप्रियता त्यांनीं इतर रीतीनें संपादली होती. औद्योगिक प्रगति व शिक्षण या कामीं लॉर्ड रे यांनीं विशेष सहानुभूति दाखविली. महाराष्ट्रांतील या वेळचे पुढारी व संपादक हे खाजगी कॉलेजांतील प्रोफेसरहि असल्यामुळें, शिक्षणाच्या बाबतींत अत्यंत उदारमतवादी अशा या विद्वान् गव्हर्नरांनीं, आपल्या धोरणानें महाराष्ट्र मोहित करून सोडलें असल्यास नवल नाहीं. प्रो. गोखल्यांपेक्षांहि व्यक्तिशः टिळकांचा लॉर्ड रे यांच्याशीं अधिक निकट परिचय होता. कॉलेजांतील कुटुंबांत वडीलबंधूंचा मान टिळक—आगरकरांकडे असल्यामुळें, सरकारदरबारीं शिक्षणविषयक ज्या उलाढाली कराव-याच्या, त्यांचीं सूत्रें या दोघांच्या हातीं असत. पण त्यांतल्यात्यांत आगरकर हे कमी चलनशील, टिळक हे प्रकृतीनें अधिक सुदृढ, म्हणून आगरकरांपेक्षां हीं

सूत्रें टिळकांच्या हातींच अधिक रहात. टिळकांचे मदतीस नामजोशी, यांना प्रोफेसरीचा मान मिळाला नव्हता, तरी कल्पकता, चतुराई व उद्योग यांत ते कांहीं कमी नव्हते. यामुळें टिळक व नामजोशी हेच सरकारदरबारीं येरझारा घालीत, व कागदी घोडे नाचवीत. व्यक्तिशः त्यांचा व लॉर्ड रे यांचा स्नेह पुढें पुढें इतका जमला कीं, आधीं दिवस व वेळ ठरवून गव्हर्नरसाहेबांची गांठ घ्यावयाची हा जो शिरस्ता, तोहि यांचे बाबतींत माफ होऊन, कारण-परत्वें त्यांनीं केव्हांहि गव्हर्नरसाहेबांचे भेटीस जावें, व विशेष कामांत नसल्यास पूर्वसंकेताची खबर न सांगतां लॉर्ड रे यांनींहि त्यांची भेट घ्यावी.

लॉर्ड रे यांची कारकीर्द संपली असें पाहून खरोखरच सर्व मुंबई इलाखा हळहळला. तिकडे वर लॉर्ड रिपन व इकडे खालीं लॉर्ड रे या दोन्ही मूर्ति उदार धोरणाच्या दृष्टीनें एकाच मुशींत ओतलेल्या असें लोकांना वाटे. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत, १८९० सालीं, प्रो. गोखले यांनीं लॉर्ड रे यांच्या कारकी-र्दीचें पर्यालोचन करितांना, ती एकंदरीनें पुष्कळच यशस्वी झाली व त्यांनीं अपूर्व धैर्य आणि कर्तव्यनिष्ठा दाखविली अशा अर्थाचे गोड, गंभीर व स्तुतिपूर्ण शब्द वापरले आहेत. एखाद्या साहेबासहि चांगलें म्हणण्याची पाळी सुदैवानें आली असतां टिळक देखील या गोष्टीला कधीं माघार घेत नसत. लॉर्ड रिपन हा इंग्रज म्हणून त्यांनीं त्यांचे गुण घेण्यांत कधीं कुचराई केलेली नाहीं. फार काय पण यकःश्चित पोलिस सुपरिंटेंडेंट ब्रुइन मरण पावल्या-वर त्यांच्या गुणवर्णनपर अग्रलेख टिळकांनीं लिहिल्याचें केसरीच्या वाच-कांस स्मरत असेलच. लॉर्ड रे यांच्यासंबंधानें तर टिळकांनीं उज्ज्वल स्तुतिपर लेख लिहिला असता यांत शंकाच नाहीं. लॉर्ड रे विलायतेस परत जाण्याचे वेळीं टिळक हे केसरींत लिहीत नसल्यामुळें तसा लेख लिहिण्याची त्यांना संधि नव्हती, इतकेंच काय तें. लॉर्ड रे यांच्या पूर्वी सर जेम्स फर्ग्युसन यांच्या अमदानींत टिळकांना कोल्हापूरप्रकरणीं शिक्षा झाली खरी. तथापि तेव्हांहि शिक्षणापलीकडे कोणचेंहि सार्वजनिक कार्य टिळकांनीं अंगिकारलेलें नसल्यामुळें, फर्ग्युसनसाहे-बांना उघड बरें वाईट म्हणण्याचा प्रसंग त्यांना आला नाहीं; व परिस्थितीनुरूप आपल्या नव्या कॉलेजला खुद्द फर्ग्युसन साहेबांचें नांव द्यावें लागल्यानें, गुणदो-षांचा व स्तुतिनिंदेचा, त्यांचा जमाखर्च, बिनबाकीनें संपला होता असें घेऊन चालण्यास हरकत नाहीं. पण टिळकांनीं सार्वजनिक कार्यांत प्रवेश करण्याला आणि लॉर्ड हॅरिस यांच्यासारखे गव्हर्नर इकडे येण्याला एकच गांठ पडली व या कारकीर्दीचा शेवट होईपर्यंत, टिळकांच्या केसरींतील लेखांचा निर्भीडपणा व कडुकपणा एकदम इतक्या परकाष्ठेला गेला कीं, लॉर्ड हॅरिस यांच्याच कारकीर्दींत टिळकांवर बहुधा राजद्रोहाचा पहिला खटला व्हावयाचा, पण तो प्रसंग पुढील अमदानीपर्यंत ढकलला गेला इतकेंच.

लॉर्ड रे यांच्याप्रमाणें लॉर्ड हॅरिस यांच्याहि गुणदोषांसंबंधानें टिळकपक्ष व गोखलेपक्ष यांचें पूर्ण एकमत होतें, व लॉर्ड हॅरिस यांच्यावर टिळकांनीं कसें शस्त्र उपसलें होतें हें दाखविण्यापूर्वी, या गव्हर्नराविषयीं येथून जातांना खुद्द प्रो. गोखले यांनींहि काय अभिप्राय दिला होता हें सांगणें जरूर आहे. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत ते लिहितात "No Regime has ever left so many disagreeable memories behind. Certainly no regime within our memory was guilty of a more systematic defiance of public opinion or set the rulers and the ruled wider apart" "ज्याची आठवण झाली असतां परोपरीनें मनाला उद्वेगच वाटावा, अशी लॉर्ड हॅरिस यांच्यासारखी दुसरी कारकीर्द आजवर झाली नाहीं. लोकमताला ज्यानें अधिक धिक्कारलें किंवा सरकार व प्रजा यांजमध्यें अधिक बेबनाव उत्पन्न केला असा दुसरा गव्हर्नर आजवर झाला नाहीं." या टीकेचे शब्द सौम्य व सभ्य आहेत. पण अर्थाच्या दृष्टीनें पाहतां कोणा गव्हर्नराला वाईट म्हणावयाचें तर याहून अधिक तें कोण काय म्हणणार ? पण प्रश्न हाच कीं, जो गव्हर्नर इतका वाईट त्यांच्यासंबंधानें असे सभ्य व सौम्य शब्द लिहिणें हें तरी सर्वस्वीं योग्य काय म्हणून मानावयाचें? लोक कांहीं खचित हीच भाषा मनांत वापरीत नसतील. आणि ते जी भाषा खरोखर मनांत वापरीत असतील ती उघड रीतीनें कितपत बोलून दाखवावी ? लोकहिताच्या दृष्टीनें अशा प्रसंगीं भाषा सौम्य योजणें हें बरें कीं आम्ही पुढें दर्शविणार त्याप्रमाणें टिळकांनीं वापरलेली निर्भीड व कडक भाषा वापरणें अधिक बरें? या प्रश्नांचें उत्तर वाचकच देतील असें आम्हांस वाटतें.

लॉर्ड हॅरिस यांनीं लोकांस आवडण्यासारखें कृत्य आपल्या अमदानींत क्वचितच केलें. यामुळें टिळकांनाहि त्यांच्या संबंधानें चांगला शब्द लिहिण्याचा बहुधा कधींच प्रसंग आला नाहीं. उलट पदोपदीं त्यांना वाईटच म्हणावें लागलें. परंतु या प्रत्येक प्रसंगीं टिळकांनीं काय म्हटलें याचे उतारे देण्याचें कारण नाहीं, व तसें केलें असतां विस्तारहि पुष्कळ होईल. परंतु लॉर्ड हॅरिस विलायतेस जाण्याचे वेळीं, दुःखावर डाग देण्याकरितांच कीं काय त्यांच्या दोस्तभगत मंडळींनीं त्यांचें स्मारक करण्याची चळवळ सुरू केली, तेव्हां टिळकांनाहि स्वतः हॅरिस साहेबांना टाकून लिहावें लागलें व इतर टीकाकारांचे कडक लेखहि केसरींत छापून लोकमत प्रकट करणें भाग पडलें. प्रो. गोखले यांच्यासारख्या सावध, नेमस्त व सौम्य अशा गृहस्थाचें लॉर्ड हॅरिस यांच्याविषयींचें मत—ज्याला खुद्द न्या० रानडे यांचीहि पूर्ण संमति होती असें खुशाल म्हणतां येईल—वर दर्शविल्याप्रमाणें असतांहि जर त्यांचें स्मारक करण्याची चळवळ कोणी करूं लागला, तर खऱ्या लोकप्रतिनिधीला राग कां येणार नाहीं ? व तो राग अनुरूप अशा शब्दांनीं प्रगट करण्याला तो कां मागें घेईल ?

जो म्हणून गव्हर्नर परत जाईल त्याचें स्मारक करणें हा जर एक कांहीं ठरा-विक लोकांचा धंदाच होऊन बसला, तर त्याचा प्रतिकार एरवीं व्हावा तरी कसा ? त्यांतूनहि स्मारक करविणारांची अशी फाजिल हौस व उमेद कीं, तें स्मारक सर्व जनतेचें म्हणून तिच्या माथ्यावर मारून दडपून द्यावयाचें. आपणास मानपत्रें मिळावीं अशी लॉर्ड हॅरिस यांची स्वतःची इच्छा कितपत असावी हें सांगणें कठीण आहे; पण कारकीर्दीच्या अखेर अखेर त्यांनीं इलाख्यांत बरीच पायपिटी केली; व त्यांच्या पायाची धूळ आपल्या शहरीं पडावी अशी त्यांच्या भक्त मंडळींनींहि पराकाष्ठा केली यांत शंका नाहीं. अशा वेळीं या मानपत्रांच्या प्रय-त्नाला ठिकठिकाणीं विरोध होण्याकरितां टिळकांनाहि केसरींतून एकसारखें चलन द्यावें लागलें. लॉर्ड हॅरिस हे स्वतः व त्यांचें भक्तमंडळ स्पष्ट वक्तेपणाच्या गुणाची तारीफ मिरवीत. पण सर्वाधिकारसंपन्न अशा गव्हर्नरांचेंहि जर लोकांना टाकून बोलल्याशिवाय समाधान होत नाहीं, तर ज्यांच्या हातीं तोंडच्या शद्बां-शिवाय दुसरी कोणतीहि सत्ता उरली नाहीं, त्यांनाही स्पष्ट बोलावेंसें वाटल्यास त्यांचा काय दोष ?

एवी तेवी कारकीर्द संपली, आतां जुन्या गोष्टी काढून काय मिळणार, असें म्हणून स्वस्थ बसण्याचा लोकांनीं निश्चय केला असता तरी स्वतः हॅरिससाहेब स्वस्थ बसण्यास तयार नव्हते. अहमदनगर, सोलापूर या दोन ठिकाणीं त्यांना १८९४ च्या आक्टोबरांत मानपत्रें देण्यांत आलीं. या मानपत्रांनाहि उत्तरें देतांना साहेबमजकुरांनीं अशा शब्दांचा उपयोग केला कीं, त्यांना आपल्या उच्च पदाचें विस्मरण झालें व माथें फिरल्यामुळें ते वाटेल तसें बडबडूं लागले आहेत, असें लोक म्हणूं लागले. " ज्या लोकांवर आज चार वर्षें अंमल चालविला त्यांच्या पुढारी मंडळीस आमच्या अकला गेल्या असें सांगणारा गव्हर्नर आजपर्यंत मिळाला नव्हता. ते नीच आहेत असें सांगण्याची गर्वोक्ति लॉर्ड हॅरिस यांचेच हातून झाली, इतरांचे हातून झाली नसती. " टिळक लिहितात, " एकोणीसाव्या शत-कांत राणीसरकारचे अमलाखालीं हिंदुस्थानसारख्या देशांत, दक्षिणेंत पेशव्यांचे राजधानीसारखे ठिकाणीं पोलिसानें झोटिंगपाच्छाई चालवावी, परवान्याशिवाय वाजवीत जाण्याबद्दल प्रेतें अडवावींत, उपासनेच्या ठिकाणीं काळ्या डगल्याच्या शिपुड्यांनीं जाऊन कीर्तनें, भजनें बंद करावींत, व शहरांतील शहाण्यासुर्त्या माणसांनीं असा छळ चालू द्यावा, ही गोष्ट आमची अकल गेल्याचें निश्चित दर्शक आहे. लॉर्ड हॅरिस यांच्या मोठ्या अधिकारामुळें त्यांनीं भरसभेंत लोकांस शिव्या दिल्या तर कोणी त्यांस तेथल्यातेथें उलट जबाब देत नाहीं ही गोष्ट खरी. पण या एकोणिसाव्या शतकांत कायदेशीर शिव्या देण्याचा अधिकार गव्ह-र्नर साहेबांसच आहे असें नाहीं. जो तो आपल्या घरचा व धंद्याचा गव्हर्नरच

आहे; व नामदारसाहेबांस जी गोष्ट एका प्रसंगीं व एका स्थलीं करितां येते, तीच अन्य प्रसंगीं व अन्य स्थलीं दुसऱ्यास सहज करितां येण्यासारखी आहे."

पण टिळकांना एका अर्थी हॅरिससाहेबांपेक्षां त्यांच्या नेटिव अनुयायांचाच राग विशेष आला. ही 'देशहितचिंतक' मंडळी 'जी सरकार' नांवाचें एक मराठींत वर्तमानपत्र काढून गव्हर्नराचा पुतळा करण्याबद्दल चळवळ सुरू करणार अशी थट्टा सुरू होती. कदाचित ती सुधारकपत्राला उद्देशून असावी. अशा लोकांनीं टिळकांच्या लिहिण्यांत राजद्रोह आहे असें सुचविण्यास सुरवात केली. त्यावर टिळकांनीं असें उत्तर दिलें कीं, 'गव्हर्नर हा राणीसरकारचा नुस्ता मुनीम आहे. त्यावर टीका करणें म्हणजे राणीसरकारवर टीका नव्हे. अमूक एक गव्हर्नर नको दुसरा पाठवा अशी मागणी करण्यांत देखील जर राजद्रोह नाहीं, तर गव्हर्नरास नुस्तें वाईट म्हणण्यांत राजद्रोह कसला ? आम्हांवर होणाऱ्या जुलमाला राणी-सरकारची संमति नाहीं, असें असतां त्या जुलमाविषयीं लिहावयाचें नाहीं तर वर्तमानपत्र काढावेंच कशाला हें आम्हांस समजत नाहीं.' पण येवढें लिहून टिळक थांबले नाहीत. प्रत्यक्ष लेखाप्रमाणें मनःस्थितीचा इतर पुरावाहि राजद्रोहाच्या चौकशींत ग्राह्य मानतात हें जाणूनच कीं काय टिळक लिहितात, आमची अशी समजूत आहे कीं, "आम्हीं लिहितों त्यांतहि आमच्या मनाची स्थिति जितकी व्यक्त व्हावी तितकी होत नाहीं."

लॉर्ड हॅरिस यांचा पुतळा करण्याची कल्पना प्रथम निघाली तेव्हां ( नोव्हेंबर १८९४ ) टिळकांनीं असें सुचविलें कीं, "हॅरिससाहेबांचें बरोबर ध्यान पुतळ्यांत साधण्यास त्यांचे खालील गुण पुतळा करणारानें मनांत ठेवावे. ( १ ) लोकमताचा तिरस्कार ( २ ) खेळण्याची हौस ( ३ ) योग्य असें काम करण्याचा कंटाळा ( ४ ) स्पष्टोक्तीची प्रीति ( ५ ) आपल्या भाषणानें लोकांस कसें काय वाटेल याची बेफिकीरी ( ६ ) हाताखालील कामगारांचा बोज ठेवण्याची युक्ती ( ७ ) वैमनस्यवर्धनाची हातोटी ( ८ ) राष्ट्रीय गुणांचा ऱ्हास करण्याची शैली ( ९ ) स्वजातिबांधवांचें प्रेम.

१८९५ च्या जानेवारी अखेर पुतळ्याची कल्पना जोरावली, पण साहेबांच्या दौऱ्यांत त्यांना जें लोकमत दिसून आलें त्यावरून बोध घेऊन, पुतळा सार्वजनिक न करितां फक्त दोस्त मंडळीतर्फे होणार असें जाहीर झालें. वर्गणीचा आंकडा २५००० जमला त्यांत संस्थानिकांचेच २०००० होते. मात्र कोणत्या गुणाकरितां पुतळा करावयाचा याचा उच्चार सभेंत झाला नाहीं. याच्याहि पूर्वी एक सभा भरून तींत लॉर्ड हॅरिस यांनीं शारीरिक खेळांस उत्तेजन दिल्याबद्दल पुतळा करावा अशी चर्चा निघाली होती व तींत रानडे, मेथा वगैरे मंडळीहि होती. पण पुढें ती कल्पना रहित झाली असलें मर्यादित स्मारक करण्यास कदाचित् कोणी हरकत घेतली नसती. 'आमच्या

पुरातन बलवर्धक मारुती देवतेला दोन उदबत्त्या, एक नारळ आणि एक हार असें सामान पुरतें. त्याप्रमाणें एखाद्या जिमखान्यांत हॅरिससाहेबांची एकादी तसबीर ठेवल्यानें हें काम भागलें असतें.' विशेष गुणाला उद्देशून विशेष स्मारक करणें हें ठीक आहे, पण बाप चांगला असो वा वाईट असो त्याचें श्राद्ध जसें मुलानें दरवर्षी केलेंच पाहिजे, तसेंच दर पांच वर्षांनीं गव्हर्नर विलायतेस जाऊं लागला म्हणजे त्याचें स्मारक लोकांनीं केलेंच पाहिजे, अशी जी समजूत बोकाळत चालली होती तिचा टिळकांनीं निषेध केला.

लॉर्ड विलिंग्डन यांच्या स्मारकासंबंधानें कांहीं वर्षांपूर्वी जशी चळवळ झाली, तशीच लॉर्ड हॅरिस यांच्या स्मारकाविरुद्ध झाली. मात्र टाउन हॉलांतल्या दंगलीसारखी दंगल झाली नाहीं इतकेंच काय तें. या स्मारकाविरुद्ध लिहिण्याला क्रॉनिकलसारखीं खंबीर वर्तमानपत्रें त्यावेळीं मुंबईस नव्हतीं, पण केसरीनें ती बाण भरुन काढली. पुणें शहर म्हणजे मुबई इलाख्यांतील दुसरी राजधानी. तेव्हां पुण्यासहि स्मारकाकरितां कांहीं वर्गणी गोळा झाल्याशिवाय कशी राहणार ? सरदार दोराबजी पदमजी यांच्या बंगल्यावर भिडे, भांडारकर वगैरे १०।१५ माणसें खाजगी रीतीनें जमून, आपापसांत ७०० रु. गोळा करून मुंबईस पाठविण्याचें ठरलें; व लगेच मुंबईच्या ॲंग्लो इंडियनपत्रांत तार प्रसिद्ध झाली कीं, पुण्यांतील हिंदु, मुसलमान व पारशी या जातींतील ' मुखत्यार ' लोकांची सभा भरून वर्गणी गोळा झाली. अर्थात् या गोष्टीचा गवगवा झाला, तेव्हां भिड्यांनीं प्रसिद्ध केलें कीं, मी मुखत्यार म्हणून गेलों नव्हतों. पण डॉ० भांडारकर हे मुग्धच राहिले. त्यावर केसरीनें भाण्डारकरांना सत्याभिमानाचा टोला देऊन " कृतं आणि अनुमोदितम् " या दोहोंची जबाबदारी सारखीच असते असें जाणवून क्रीडांभुवनांतलि मारामारीची हकिकत डॉक्टरसाहेबांनीं टाइम्सकडे पाठविल्याची आठवण दिली.

लॉर्ड हॅरिस यांच्या कारकीर्दीत भांडारकरांना व्हाइस चॅन्सेलर नेमण्यांत आलें व कॉलेजांतलि त्यांची तसबीर हॅरिससाहेबांनींच उघडली होती. अर्थात्, हें इकडच देवाण घेवाण झालें. त्याला उद्देशून टिळक लिहितात, " डॉक्टरसाहेब हे चांगले धर्मशास्त्रपारंगत आहेत. तेव्हां त्यांस असें पक्कें माहित आहे कीं, नामदारसाहेबांचें हें ऋण या जन्मांत ऊर्फ कारकीर्दीत न फेडलें तर त्याकरितां त्यांस व डॉक्टरसाहेबांस पुनर्जन्म घ्यावा लागेल ! "

अखेर अखेर टिळकांनीं या दोस्तभगत लोकांना काय वाटेल तें म्हटलें. ते तोंडपुजे आहेत, ते लांगूल-चालन करितात ! पण स्मारकसभेचें काम कसें तरी तडीस गेलें. ता. १२ फेब्रुवारी १८९५ च्या केसरींत टिळकांनीं लॉर्ड हॅरिससाहेबांची आरती केली, व असें म्हटलें कीं, पूर्वी एखाद्या आचाऱ्याचें कसब पाहून त्यास मामलतदारी देत असें म्हणतात, त्याचप्रमाणें लॉर्ड हॅरिस

हे चेंडूफळी चांगली खेळतात म्हणून त्यांना गव्हर्नरी दिली झालें! तात्पर्य हॅरिस-साहेबासंबंधानें कांहीं म्हणावयाचें टिळकांनीं बाकी ठेविलें नाहीं. मग हॅरिस-साहेबांवर ज्यांनीं कविता लिहिल्या त्यांची मजल त्याच्याहि पुढें गेली असल्यास नवल नाहीं. ता० २२ जानेवारी १८९५ च्या केसरींत 'श्री हारीसाष्टकम्' म्हणून एक कविता आली होती त्यांतील खालील ओळी बरेच दिवस लोकांच्या तोंडीं राहिल्या होत्या.

कामें होतिल चोख खालिल जरी खोट्या रिपोर्टांवरी ।
कौन्सिलदार कशास, तूं तरी कशा ? दाहा हजारांवरी ॥
पोषवितो तोषवितो यास्तव गोऱ्यांस थोर हारीस ।
लोळवितो पोळवितो यास्तव आम्हांस थोर हा रीस ॥

१९ फेब्रुवारीच्या अंकांत कोणी माधव कवीनें चार सर्गांत हारिस चरित्र ग्रथित केलें होतें. त्यांचीं नांवें ( १ ) नेमणूक ( २ ) गुरूपदेश ( ३ ) प्रजाजनविलाप ( ४ ) प्रयाण अशीं ठेविलीं होतीं. त्यांतील एक साकी अशी होती

जेव्हां होइल पहा आर्यभू क्रिकेटमय ही सारी ।
तेव्हां म्हणतिल सगळे होता बहुत चांगला हारी ॥

एकानें 'क्रिकेटभूमीचा विलाप' म्हणून काव्य लिहिलें होतें. तात्पर्य, ज्याला जशी सुचली तशी त्यानें हॅरिससाहेबाची पोटभर निंदा करून घेतली. तथापि टिळकांनीं लिहिलें तेंच खरें कीं, आम्ही लिहितों त्यांत आमच्या मनाची स्थिति जितकी व्यक्त व्हावी तितकी होत नाहीं. 'कोणाचें अंतःकरण जर हल्लींच्या स्थितीमुळें आमच्यासारखें उद्विग्न अथवा संतप्त झालें नसलें तर 'स योगी ह्यथवा पशुः' यांपैकीं कोणत्या तरी वर्गांत त्यास घालावें लागेल.'

## भाग २३ वा

# १८९६ च्या दुष्काळांतील चळवळ

महाराष्ट्र हें दुर्दैवानें दुष्काळाचें आगर असल्याचें प्रसिद्धच आहे. १८७६ सालीं दुष्काळ पडला तो स्मरत असणारे वाचक आज कितीतरी थोडे असतील. पण १८९६ सालापासून जी दुष्काळपरंपरा सुरू झाली ती आठवणारी पिढी अद्यापि तरुण आहे, तिनें या दुष्काळाचें दुःख पुष्कळच सोसलेलें आहे. पाऊस असो वा नसो; धारण सरसकट इतकी महाग झाली आहे कीं, दुष्काळ आणि सुकाळ यांचे दरम्यान फरक म्हणून राहिलाच नाहीं. 'पांचावर धारण बसणें' हा एक रूढ वाक्प्रचार. त्यांत खरोखरच एक प्रकारचा इतिहास सांठवलेला आहे. अतिशय महागाई झाली, खावयाला धान्य मिळत नाहीं म्हणून प्राणसंकट ओढवलें असा जो जुन्या लोकांच्या आठवणींतला काळ असेल तेव्हां ही म्हण पडली. तेव्हांहि एक रुपायाला पांच शेर धान्य मिळत असलें पाहिजे असेंच अनुमान निघतें. हल्लीं म्हण, जुनी तीच आहे, पण धारण मात्र पांचांखालीं उतरून तिहीवर कायमची येऊन बसल्यासारखी दिसते. अर्थात म्हणहि बदलण्याची पाळी आली; मग म्हण बदलत नसते ही गोष्ट निराळी.

तथापि धारण इतकी खालावली असतांहि, पांचशेर धारणीच्या वेळीं जो हाहाःकार उडे तो हल्लीं उडलासा वाटत नाहीं हेंहि खरें आहे. पावसाचें मान व धारण, दोन्हीहि पूर्वीच्या दोन्हीं दुष्काळांहून हल्लीं एकंदरीनें कमी झालीं आहेत. तरी हाहाःकार न होण्याचें कारण असें वाटतें कीं सामान्य सुखवस्तु मनुष्य तेव्हां-प्रमाणें आतांहि कसा तरी जगूं शकतोच, पण मुख्य फरक पडला तो खालच्या प्रतीच्या लोकांच्या स्थितींत. तो असा कीं हल्लीं या देशांत लहान मोठ्या काम-गिऱ्या पुष्कळच निघाल्या आहेत. पूर्वी मजूर पुष्कळ व कामें थोडीं अशी स्थिति असे. हल्लीं मजूर थोडे आणि कामें पुष्कळ अशी उलट स्थिति झालेली आहे. मजूरीचे दर पूर्वीच्या चौपट किंवा पांचपटहि वाढलेले असून धान्याचे दर मात्र चौपट किंवा पांचपट खालावलेले नाहींत. यामुळें मजूर लोकांना जी खाजगी कामावर मजूरी मिळते तींत त्यांचें पोट भरूं शकतें, व कामेंहि पुरून उरण्या-इतकीं असल्यामुळें केवळ दुष्काळी मजुरांकरितां म्हणून सरकारास वेगळीं कामें काढावीं लागत नाहींत. दुष्काळी खर्चाची योजना ही जी एक बाब, हिंदुस्थान-सरकारच्या जमाखर्चांत, पूर्वी मोठी महत्त्वाची व अवघड होऊन बसली होती ती आतां जवळ जवळ नाहींशी झाल्यासारखी आहे. लोकांच्या पोटाला उपास-मारीचे सूक्ष्म चिमटे कमी सोसावे लागतात असें नाहीं. आणि गुरांची प्राणहानि

आणि पाण्याचें दुर्भिक्ष्य हीं पूर्वींइतकींच जाचतात. पण अन्न न मिळाल्यामुळें रस्तोरस्तीं किंवा गांवोगांवीं माणसें उपाशीं मरून पडल्याचा जो ढोबळ प्रकार पूर्वी आढळे तो हल्लीं कांहींसा टळला आहे ही गोष्ट खोटी नाहीं.

वरील कारणांकरितां हल्लीं 'सरकारी दुष्काळ' नाहीं व दुष्काळी राज्यव्यवस्थेचा बखेडाहि नाहीं. यामुळें १८९६ सालच्या टिळकांच्या दुष्काळी चळवळीची जी थोडीशी हकीगत आम्ही पुढें देत आहों तिचें स्वारस्य कदाचित् कित्येक वाचकांस समजून येणार नाहीं. पण सव्वीस वर्षांपूर्वी या चळवळीला मोठेंच राजकीय महत्त्व होतें. १८७६ सालीं जुन्या पद्धतीचा दुष्काळ पडला असतां दुष्काळी कारभाराची योजना सरकारापाशीं कांहीं एक नव्हती. उलट आज नव्या पद्धतीच्या दुष्काळांत दुष्काळी कारभारच फारसा शिल्लक उरलेला नाहीं. म्हणून अशी चळवळ होऊं शकत नाहीं. पण १८९६ चा काळ असा होता कीं, १८७६ च्या दुष्काळाच्या अनुभवानें फॅमिन कोड वगैरे तयार होऊन राहिलेलें असतां व पूर्वीप्रमाणें दुष्काळामुळें प्राणहानि होत असतां, सरकार या फॅमिन कोडाचा उपयोग जरूर तितक्या तत्परतेनें किंवा सढळपणानें करीत नव्हतें. सरकारच्या या हलगर्जीपणामुळें दुष्काळासंबंधीं राजकीय चळवळ करणें अवश्य झालें; व ती टिळकांनीं इतक्या नेटानें केली कीं सरकारच्या गुप्त कचेरींत ठेवलेला त्यांच्या अप्रियतेचा घेला तिजमुळें अगदीं भरण्याच्या बेताला आला.

१८९६ सालीं टिळक कायदेकौन्सिलचे सभासद होते व इकडे सार्वजनिक सभाहि त्यांचे हातीं पूर्णपणें आली होती. पण सभेच्या द्वारें या बाबतींत जितकी चळवळ त्यांना करितां आली तितकी त्यांना कौन्सिलच्याहि द्वारें करितां आली नाहीं. याचें कारण कौन्सिलच्या सभासदांचे अधिकारच तेव्हां इतके मर्यादित होते. आधीं वर्षांतून कौन्सिलची सभा फार तर दोनदां होई. वार्षिक अंदाजपत्रकावरील चर्चेपेक्षां राज्यकारभारावर टीका करण्यास दुसरी कोणतीहि संधि नसे. प्रश्न विचारण्याची परवानगी तेव्हां होती, पण हल्लींप्रमाणें कोणत्याहि विषयावर ठराव पुढें आणून सरकारावर तोहमत आणतां येत नसे. अंदाजपत्रकावर वर्षांतून एक भाषण केलें म्हणजे नामदार मंडळींचें कौन्सिलांतील काम संपलें! मग नामदारीच्या वजनाचा फायदा घेऊन कौन्सिलदार वगैरेंच्या खाजगी मुलाखती मिळऊन काय घडेल तें करावें, येवढीच कामाची कूस होती. १८९६ सालीं दुष्काळ पडणार असें नक्की ठरलें, तेव्हां कौन्सिलची वार्षिक मुख्य बैठक आधींच होऊन गेली होती व कर्मधर्मसंयोगानें त्या सालीं मृगनक्षत्र पंचकांत अतिवृष्टि होऊन प्रचंड पूरहि आले. कित्येक नद्यांच्या पुरांची तुलना करावयाची असतां अजूनहि १८९६ च्या पाण्याकडे बोट दाखवितात. अतिवृष्टीनें नुकसान झालें; पण तो ओला दुष्काळ. रब्बीच्या हंगामांत पाऊस पडणारच नाहीं, असें स्वप्न प्रथम कोणास पडलें नाहीं. त्या सालच्या दुष्काळासंबंधानें केसरींत पहिला उल्लेख

२१ सप्टेंबरच्या अंकांत आढळतो. "हस्त लागले पण एकदां अतिवृष्टि होऊन जो पाऊस उडाला, त्याचा अद्याप ठिकाण नाहीं. वायव्यप्रांतांत दुष्काळानें आपलें बिऱ्हाड ठेवण्यास सुरुवात केली असून, मदतीचीं कामें काढण्यासहि हुकूम झाले आहेत. आमच्रेकडे तीच स्थिति होते कीं काय अशी आम्हांस भीति वाटूं लागली आहे, व आणखी कांहीं दिवस पावसानें डोळे वटारले तर तो प्रसंग खास येईल हें सांगावयास नकोच." ही भीति लवकरच खरी ठरली. कानपूर, आग्रा, येथें लुटालूट होऊन ती नागपूरपर्यंत आली. लोक म्हणूं लागले यंदां एक नवाच रोग आला आणि फार वर्षांनीं दुष्काळ पडला, तेव्हां दुर्मुख हें संवत्सर आपलें नांव खरें करितें कीं काय ! या इलाख्यांत आठवड्याच्या सरकारी रिपोर्टांत दुष्काळाचें नांव येईना. मात्र परदेशाहून इकडे गहूं येण्यास सुरुवात झाली. आणि दुसरें एक प्रत्यंतर असें कीं ख्रिस्ती भटांनीं हिंदु मुलें घेऊन बाटविण्याला सुरुवात केली.

१८७६ सालीं लोकांनीं जवळचें किडुकमिडुक मोडून खाल्लें, व तेव्हां धान्याचीं जुनीं पेवें तरी होतीं. पण त्यांची चाल यापूर्वीं वीस वर्षांत मोडून गेली. सरकारी रिपोर्टांतून दुष्काळाचा उल्लेख नाहीं हें पाहून वर्तमानपत्रेंहि रागानें लिहूं लागलीं. उत्तर हिंदुस्थानांत या सुमारास उन्हाळा असल्यानें सरकार पर्वतशिखरावर जाऊन हवा खातें, उष्ण मैदानांत लोक दुष्काळानें मरतात, आणि व्हाइसरायसाहेबांनाहि राजेरजवाड्यांकडे जाऊन भेटण्याला दुर्दैवानें हीच वेळ सुचली. अशी केसरींतील टीका वाचून अधिकाऱ्यांना अर्थातच राग येऊं लागला. दुष्काळ पडला तर सरकार रीतीप्रमाणें तजवीज करील असें मोघम आश्वासन कायदे-कौन्सिलच्या सभेंत मिळालें होतें. पण संशयार्थी वाक्यांची वेळ जाऊन रोकडा दुष्काळ दिसूं लागला होता. ता. २० आक्टोबरच्या अंकापासून फॅमिन कोडाचा आधार घेऊन, लोकांनीं आपल्या हक्कांस जागृत राहून दुष्काळ निवारण्याचे उपाय सरकाराकडून करवून घेतले पाहिजेत अशी शिकवण देण्यास केसरीनें सुरुवात केली होती. दुसऱ्या पक्षीं धान्याच्या लुटी थांबविणें, परोपकारार्थ स्वस्त धान्याची दुकानें काढणें वगैरे गोष्टी करून लोकांना सरकारास आपणाकडून थोडी मदत करितां येण्यासारखी असते ती त्यांनीं करावी असाहि विधायक उपदेश केसरीनें केला होता. दुष्काळाचा फायदा घेऊन गबर होणाऱ्या व्यापाऱ्यांनाहि केसरीनें झणझणीत इषारा दिला होता. आमच्या हातून होईल तें आम्ही करूंच; पण सरकारच्या हातीं आहे तें सरकारच्या हातून करविण्याचीहि दक्षता आम्हालाच घेतली पाहिजे असा दुहेरी उपदेश लोकांना केसरीनें सुरू केला होता.

पण वर्तमानपत्राची चळवळ म्हणजे बेजबाबदार चळवळ, अशी एक प्रकारची समजूत तेव्हांहि अर्थातच असे. एका अर्थानें तें खरेंच. कारण वर्तमानपत्रकारानें 'आम्ही' असें मोठ्या तोंडानें किंवा जाड्या टाकानें म्हटलें तरी, 'आम्ही' म्हणजे कोण किती ? एकाद्या संस्थेनें अर्ज केला तर त्याला वजन अधिक,

व अशी संस्था आतां टिळकांच्या हातीं आलेली होती इतकेंच नव्हे तर तिजकडून या बाबतींत अर्ज वगैरे करविणें हें तिची पूर्वपरंपरा वाढविण्यासारखेंच होतें. " Decentralisation of provincial finance " मुख्य व प्रांतिकसरकारच्या पैशाची वांटणी, या विषयावर सभेच्या त्रैमासिकांत निनांवी लेख लिहून रानडे यांच्या लेखमालेचा सांधा जसा टिळकांनीं बेमालुम जोडला, तसाच दुष्काळी चळवळ सभेकडून आपण मागें राहून करविण्यांतहि टिळकांनीं रानडे यांचेंच उदाहरण गिरविलें. रानडे सरकारी नोकरींत असले तरी राजकारणांत पडणाऱ्या तरुण पिढीला गुरूच्या नात्यानें धडे पाठ देण्याइतकी पात्रता माधवरावजींमध्यें होती हें टिळक नेहमीं बोलून दाखवीत; व कांहीं बाबतींत त्यांचें उघड अनुकरण करून शिष्य या नात्यानें स्तुतीचा करमारहि देत. १८७६–७७ च्या दुष्काळाचे वेळीं रानड्यांनीं सार्वजनिक सभेकडून महाराष्ट्रांत फिरते एजंट पाठवून दुष्काळासंबंधीं खरी व अस्सल माहिती आणविण्याचा प्रघात सुरू केला होता. सभेच्या त्रैमासिकांतून या एजंटांनीं आणलेल्या हकीगतीवरून " Famine narratives " 'दुष्काळी काहण्या' या नांवाखालीं रिपोर्ट प्रसिद्ध होत व त्यांचे आधारावर रचलेले विधायक सूचनांचे अर्ज सभेकडून सरकाराकडे रवाना होत. या कहाण्या व अर्ज यांचा सरकारानें तेव्हां योग्य परामर्श घेऊन मधून मधून सभेचे आभारहि मानले होते. मग आंताहि तसेंच कां होऊं नये ? तीच सभा, तसलीच दुष्काळची परिस्थिति, तीच शोधकबुद्धि, व त्या वेळेप्रमाणें आजहि परिस्थित्यनुरूप विधायक अशाच शिफारशी. मग सरकार सभेचे कदाचित् आभार न मानो, परंतु चलनशील होऊन सभेच्या अर्जांना सरळ सरळ उत्तरें तरी देईल. पण ती गोष्ट घडावयाची नव्हती. सभेचें नांव व अर्जपद्धति तीच, परंतु, चालक माणसें हीं तर बदललींच सभेची आणि शिवाय सरकारच्या समजुतीप्रमाणें सभेचे हेतुहि बदलले. मग जुना दाखला उपयोगी कसा पडणार ?

ता. ८ नोव्हेंबर रोजीं सभेनें सरकाराकडे एक सविस्तर अर्ज पाठविला. हा अर्ज चेअरमन अण्णासाहेब पटवर्धन व चिटणीस शिवरामपंत पराजपे आणि जालनापूरकर यांचे सहीनें गेला होता. परंतु तो बहुतांशीं टिळकांनींच तयार केला होता. त्यांत सोलापूर, विजापूर, नगर या जिल्ह्यांतील सविस्तर हकीगत दिलेली होती. पाण्यावैरणीची नुसती टंचाई नसून खराखुराच दुष्काळ पडलेला आहे, व सरकारानें कोणतीहि औपचारिक सबब न मानतां, हिंदुस्थानचे लोक दरसाल दीड कोटी रुपये दुष्काळचा विमा उतरण्यादाखल देत असतात हें लक्षांत घेऊन, ताबडतोब दुष्काळ जाहीर करून योग्य त्या उपायांचा अवलंब करावा असें त्यांत लिहिलें होतें. १८७६–७७ च्या दुष्काळानंतर तयार झालेलें फॅमिन कोड जरी सर्वांगपूर्ण नसलें तरी त्याच्या आधारें उपाययोजनेस सुरुवात करण्यास हरकत नाहीं, असें सभेनें आपलें मत दिलें होतें. व्यापारी हे जात्या थोडेसे

लोभी असले तरी केवळ त्यांच्यामुळेंच ही महर्गता झालेली नाहीं, आगगाड्या झाल्या खऱ्या पण उपयोगाप्रमाणें त्यांचा दुरुपयोगहि अशा वेळीं होऊं शकतो, संस्थानिकांनीं यापूर्वींच दुष्काळी कामें काढलीं असून सरकारचीं मात्र निघत नाहींत, वगैरे मुद्दे अर्जांत होते. या अर्जाला सरकाकडून उत्तर आलें. त्यांत प्रत्येक मुद्याविषयीं सरकारतर्फेचा खुलासा केला होता. तथापि उभयतांमधील वावदूकपणाची ही झटापट सर्व येथें सांगत बसण्याचें कारण नाहीं. १८९७ च्या जानेवारी–एप्रिल या जोड अंकांत टिळकांनीं फॅमिन कोडावर स्वतंत्र निनांवी लेख लिहिला होता व त्यांतील अनेक दोष दाखविले होते. फॅमिन कोडाची दुरुस्ती सरकाराकडून व्हावयाचीच होती, व त्या दृष्टीनें सरकारापुढें लोकमत मांडण्याकरितां म्हणून हा लेख मुद्दाम लिहिण्यांत आला होता. याच अंकांत, महाराष्ट्र कर्नाटक कोंकण या तिन्ही पोटप्रांतांतील जिल्ह्यांतील मुख्य मुख्य गांवीं सभेनें आपले एजंट पाठविले होते त्यांजकडून आलेल्या अहवालांतून माहिती घेऊन, ती एकत्र करून सुसंगत रीतीनें दिली होती.

पण याहीपेक्षां विशेष महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे १८९६ च्या नोव्हेंबर डिसेंबर जानेवारी या महिन्यांत टिळकांनीं सभेकडून सरकारशीं जो बराच पत्रव्यवहार करविला त्यांत मुख्य मुद्दा, विणकर लोकांचे प्राण वांचवून त्यांना घरबसल्या कांहींतरी काम मिळवून देण्याची योजना कशी करावी याविषयीं होता. विणकर लोकांना खडी फोडावयास लावणें हें अगदीं निष्ठुरपणाचें व अप्रयोजकपणाचें होतें. नगर जिल्ह्यांतील कामावर गेलेल्या विणकरांना दररोज पावणेदोन आणे देखील मजुरी पडत नसे; अशा लोकांकरितां फॅमिन कोडानें त्यांच्याच धंद्यांतील काम पुरविण्याची कांहीं तजवीज सांगितली होती. फक्त त्याला सरकारी अधिकाऱ्यांनीं जागजागीं व्यापारी लोकांचीं मंडळें बनवून भांडवलाच्या दृष्टीनें थोडीबहुत मदत करावी व विणकरांस रोजीं चार आणे तरी मजुरी पडेल असें काम त्याला घरबसल्या देववावें. समाईक भांडवलांतून त्यांना सूत पुरवावें, व त्यांजकडून कपडा तयार होऊन येईल तो घेऊन विकून त्याचे पैसे परत समाईक भांडवलांत घालावेत. यावर सरकारचें मोघम उत्तर असें आलें कीं, विशेष प्रकारच्या विणकरांना काय काम द्यावें याचा विचार सरकार करीत आहे. परंतु डिसेंबरच्या पहिल्यादुसऱ्या आठवड्यापर्यंत सरकारनें निश्चित अशी कांहींच योजना प्रसिद्ध केली नाहीं. इकडे सोलापूर येथील प्रसिद्ध व्यापारी अप्पासाहेब वारद व शेट वीरचंद दीपचंद वगैरे मंडळी याच प्रश्नाचा विचार व्यवहाराच्या व भूतदयेच्या दृष्टीनें करीत होती. त्यांच्याशीं टिळकांचा पत्रव्यवहार सुरू झाला व पुढें सभेनेंहि त्यांना आपले प्रतिनिधि म्हणून सोलापुरास पाठविलें. ता. १२ डिसेंबर रोजीं सोलापुरास एक कमेटी स्थापली गेली व तिच्यातर्फे टिळकांनीं सरकारशीं पत्रव्यवहार सुरू केला.

कमेटीची योजना अशी होती कीं, पांचशेंपासून हजार विणकर लोकांच्या

कुटुंबाना दुष्काळापुरतें काम देऊन सहा महिने पोसावें. एक हजार कुटुंबें म्हणजे सुमारें चार हजार लहानमोठीं माणसें होतात. कमेटीनें स्वतःचें सूत पुरविल्यास विणकरांचें एक कुटुंब रोज एक साडी किंवा खादी विणू शकेल. एका नगाची किंमत दोन रुपयें धरल्यास रोज दोन हजार रुपयांचें कापड तयार होईल; म्हणजे महिना साठ हजार रुपये किंवा सहा महिन्यास तीन लक्ष साठ हजार रुपये इतक्यांची तजवीज करावी लागेल. हा सर्व कपडा विकून पैसे होण्याला फार तर दोनतीन वर्षे लागतील असें घेऊन चालल्यास, सरकारनें दोन वर्षे अडीचलक्ष रुपये बिनव्याजी द्यावे; बाकीचें भांडवल लोकांनीं उभारावें. सूत पाहून खरेदी करणें, तें विणकरांना वांटणें, त्यांजकडून येणाऱ्या कपड्याची किंमत ठरविणें, कपडा विकणें, हिशेब ठेवणें, वगैरे सर्व गोष्टी सोलापूर कलेक्टरांच्या देखरेखीखालीं करण्याचें काम व्यापारी मंडळानें पत्करलें. मुख्य प्रश्न अडीच लाख भांडवलाचा होता. कमेटीचें म्हणणें इतकेंच होतें कीं, खडीच्या कामावर विणकरांना नेऊन सरकार मजुरी देणार तीच रकम त्यांनीं कमेटीचे भांडवलांत घालावी. सुताचा पुरवठा करण्यासाहि कमेटी तयार होती. कमेटीचा अंदाज चुकून जर ह्या व्यवहारांत तोटा आला तर दहा टक्के सरकारनें सोसावे व दहा व्यापारी मंडळ सोशील. याहून अधिक तोटा येईल तर शेट वीरचंद दीपचंद व मुरारजी गोकुळदास, मिलचे म्यानेजर सोलापूर, यांनीं तो सोसण्याचें कबूल केलें होतें. उलट या व्यवहारांत कांहीं नफा झाल्यास तो कोणीहि भागीदारानें न घेतां धर्मकृत्यास द्यावयाचा होता. तात्पर्य बिनव्याजी दोन वर्षेपर्यंत अडीचलक्ष रुपये द्यावयाचे व त्यांपैकीं फारच झालें तर दहा टक्के बुड सोसावयाची, हें करण्यास सरकार तयार असेल तर चार हजार विणकर लोकांचे प्राण दुष्काळांत वांचविल्याचें श्रेय सरकारास मिळेल अशी ही योजना होती. येवढेंच नव्हे, तर खडीच्या कामावर या चार हजार लोकांना जी मजुरी सरकारला द्यावी लागली असती तिच्याहून हा तोट्याचा हिस्सा फारच कमी होता. खडी फोडण्याला रोजीं दोन आणे दिले तर खरोखर एक आण्याचीहि खडी सरकारच्या हातीं पडत नाहीं, व एकदम पुष्कळ खडी फोडून ठेविली तर ती खपण्याला अनेक वर्षे लागल्यानें तिकडूनहि तोटाच. टिळकांच्या या पत्राला सेक्रेटरी मांटीथ यानीं असें उत्तर पाठविलें कीं, सरकार ही योजना मंजूर करणार नाहीं. आपल्या ताब्यांत नसलेल्या खासगी लोकांच्या हातीं आपला पैसा सरकार यत्किंचितहि देऊं शकत नाहीं! व्यापारी लोक जे दहा टक्के तोटा पत्करावयास तयार आहेत त्यांनींच हें सगळें भांडवल घालून वाटल्यास सगळा नफाहि घ्यावा.

यावर फिरून टिळकांनीं सरकारास पत्र लिहून कळविलें कीं, सरकारचा पैसा कमटी आपल्या हातीं मागते अशी सरकारची समजूत झाली ती चुकीची आहे. पैशाचा सर्व ताबा सरकारनें कलेक्टरसाहेबांकडे द्यावा, त्याला हरकत नाहीं.

शिवाय कमेटीवर निम्याहून अधिक लोक सरकारनें आपल्या अधिकाऱ्यांपैकीं नेमले तरी हरकत नाहीं. सोलापूरच्या कमेटीचा हेतु इतकाच कीं सरकारशीं या बाबतींत सहकार्य करून प्रत्यक्ष कार्यांत येणाऱ्या त्यांच्या अडचणी दूर कराव्या. योजनेंतील कारभार व्यापारी व्यवहाराचा आहे. येवढ्याकरितांच कोणत्याहि प्रकारच्या नफ्याची अपेक्षा न करितां शेट वीरचंद दीपचंदांसारखे व्यापारी या कामांत पडूं इच्छितात. ही योजना एक ठिकाणीं सिद्धीस गेली तर तशीच इतर ठिकाणींहि तडीस जाईल. लोक आपखुषीनें थोडेबहुत पैसे घालून मदतीला येत असतां त्यांची मदत सरकारनें नाकारणें गैर होईल. याहि पत्राला अखेर सरकारनें चार ओळींत नकार लिहून हा सर्व विषय तोडून टाकला.

टिळकांनीं दुष्काळाच्या बाबतींत आणखी एक महत्त्वाची गोष्ट सार्वजनिक सभेकडून करविली. सरकारनें जें फॅमिन कोड तयार केलें होतें तें अर्थात् सार्वजनिक उपयोगाकरितां. मुख्यतः सरकारनें काय करावें हें त्यांत ठरविलें असलें तरी, त्याच्या अमलबजावणीचा उपयोग स्वतः सरकारला किंवा त्यांच्या अधिकाऱ्यांना व्हावयाचा नसतो. स्वकर्तव्यबुद्धीनें सरकारनें काय करावें हें या कोडांत लिहिलेलें असलें तरी, त्यांतील उपयोगाचीं कलमें उगवून घेणें हें लोकांच्या हिताचें असल्यामुळें त्यांनाहि फॅमिन कोडाचीं कलमें कळणें अवश्य ठरतें. देणें हें जसें सरकारचें काम तसेंच मागणें हेंहि लोकांचें काम. फॅमिन कोडांत काय आहे हें कळल्याशिवाय तें काम त्यांनीं कसें करावें ? वास्तविक स्वतः सरकारनेंच फॅमिन कोडाची आवृत्ति मराठींत करून, ती मोफत न दिली तरी निदान विक्रीस ठेवावयास पाहिजे होती. पण मूळ इंग्रजी प्रत मिळण्याची जेथें मारामार, तेथें ती देशभाषेंतील कोठली मिळणार? हें जाणून टिळकांनीं सार्वजनिक सभेकरितां एक लहानसें पुस्तक मराठींत तयार केलें. त्यांत फॅमिन कोडाचा सारांश, दुष्काळ–व्यवस्थेसंबंधीं सरकारनें काढलेल्या ठरावांचा सारांश, निवडुंगापासून वैरण करण्याची कृति, दुष्काळी जिल्ह्यांत काढलेल्या सरकारी कामाची माहिती, सरकारी नोकरांना दुष्काळांत ज्या सवलती मिळाव्या त्यांची माहिती, तगाई कायद्याखालचे नियम, इत्यादि मजकूर होता. या पुस्तकाच्या सहा हजार प्रती सार्वजनिक सभेनें छापविल्या. प्रत्येक मराठी जिल्ह्याच्या कलेक्टरांकडे शंभर प्रति फुकट वांटण्याकरितां दिल्या, व आणखी लागल्यास दर शेकडा अडीच रुपये किंमत घेऊन त्या हव्या तितक्या दिल्या जातील असें कळविलें. पुस्तकांत चुकभूल असेल ती सर्वस्वीं सभेची, सरकारवर त्याची कांहीं जबाबदारी नाहीं. फक्त सरकारमार्फत वांटलेल्या पुस्तकांकडे या बाबतींत लोकांचें लक्ष अधिक जाईल अशी सभेनें विनंति केली होती. परंतु सरकार सभेच्या वारशाला जेवलेलें. हें पुस्तक दुष्काळासंबंधाचें असलें तरी खाजगी आहे म्हणून तें आम्हीं वांटूं इच्छित नाहीं असें सरकारनें सभेला कळविलें. कित्येक कलेक्टरांनीं त्यांजकडे पाठविलेल्या शंभर प्रति जाळल्या. फाडल्या किंवा

केराच्या टोपलींत टाकून दिल्या! एक दोघे अधिक सभ्य किंवा रागीट होते त्यांनीं तीं पुडकीं जशींच्या तशीं सभेकडे परत केलीं. सभा येवढ्यावर थांबली नाहीं. तिनें तुरमुंडी देऊन दुष्काळनिवारणाच्या अनेक अंगांसंबंधीं ता. ४ जानेवारी १८९७ रोजीं सरकारकडे फिरून विस्तृत अर्ज पाठविला. पण कोणत्याहि विस्ताराचा संकोच कसा करावयाचा हें सरकारास चांगलें माहीत असतें. फिरून मांटीथसाहेबांनीं चार ओळींचें तुटक उत्तर पाठविलें. त्यांत असें लिहिलें कीं, सभेला जें जें उत्तर हवें तें तें दर आडवड्याच्या सरकारी रिपोर्टांत पहावयास मिळेल. जणूं काय हा आठवड्याचा रिपोर्ट म्हणजे दुष्काळपीडित लोकांची शकूनवंतीच! ज्यांचें कोठें कांहीं उणें पडेल त्यांनीं तो रिपोर्ट उघडून डोळे मिटून हात पडेल तेथें खडा ठेवावा. त्यांच्या नशीबानें त्यांत कांहीं बऱ्याची वार्ता निघाली तर हंसावें नाहींतर रडावें! मांटीथसाहेबाच्या या चार ओळींच्या उत्तरांतून एक असा ध्वनि निघत होता कीं, या दुष्काळाच्या दिवसांत सरकारला आधींच जिकीर आहे ती काय थोडी झाली म्हणून तुम्ही आणखी उत्पन्न करितां? लोक आहेत, आम्हीं आहों, पाहून घेऊं. उगाच तिऱ्हाइतानें मध्यें तोंड घालूं नये!

वीस वर्षांपूर्वी सार्वजनिक सभेनें जवळ जवळ अशाच पद्धतीनें काम केलें होतें. त्या वेळीं सभेला न झिडकारितां सरकारानें तिचे उलट आभार मानले होते. १८७६ च्या आक्टोबरांत सभेनें खाजगी दुष्काळी रिपोर्ट सरकारकडे पाठविला त्यावर मुंबईसरकारचे सेक्रेटरी चॅपमनसाहेब लिहितातः—" दुष्काळी जिल्ह्यांतील माहिती सरकाराकडे वेळोवेळीं पाठविण्याचा तुमचा विचार आहे त्याबद्दल सरकारला फार आनंद होत आहे." १८७७ सालीं सेक्रेटरी केनेडीसाहेब लिहितात "सभेनें आपले रिपोर्ट पाठविले याबद्दल सरकार आभारी आहे." ता० ११ जुलै रोजीं सभेनें गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांना मानपत्र दिलें, त्याहि वेळीं सभेच्या दुष्काळविषयक विचारांसंबंधानें गव्हर्नरसाहेबांनीं सहानुभूतिपूर्ण असेच उद्गार काढले. त्या वेळच्या व आजच्या या सरकारच्या वर्तनांत जमिन अस्मानाचें जें अंतर पडलें त्याला इतर अनेक कारणें असतील; पण त्यांत हेंहि एक निःसंशय होतें कीं, पहिल्याचे वेळीं सभा शिवरामपंत साठे यांचे तोंडानें बोलत असली तरी ती माधवरावजी रानडे यांचे डोक्यानें विचार करीत होती. आणि हल्लीं कोणी जालनापूरकर कोणी मांडे कोणी परांजपे अशांच्या सहीवर सभेचे अर्ज जात असले तरी, ती टिळकांच्या डोक्यानें विचार करीत आहे, असा सरकारास नुसता संशयच नव्हे तर पक्की माहितीहि होती. आणि टिळक–म्हणजे १८९१ पासून ६-७ वर्षें घडलेलें त्यांचें चरित्र–सरकारच्या डोळ्यांपुढें आल्याशिवाय कसें राहणार?

पण हें प्रकरण पुढें लवकरच हातघाईवर आलें. १८९७ च्या जानेवारी महिन्यांत शेतसाऱ्याची तहकुबी व माफी या विषयावर सभेनें सरकारास एक विस्तृत

अर्ज केला. त्यांत मुख्य मुद्दा असा होता कीं १८९७ चें सरकारचें या बाबतींतलें धोरण १८७६ च्या धोरणाहूनहि कमी उदार आहे. खरा शेतकरी कोण, खोटा शेतकरी कोण, श्रीमंत कोण, गरीब कोण, खातेदार कोण, कूळ कोण, असले सूक्ष्म फरक काढून सरकारनें साऱ्याच्या सुटी-तहकुबीचें क्षेत्र शक्य तितकें संकुचित केलें होतें. त्यांतल्या त्यांत, पुणें जिल्हा कलेक्टरानें मामलेदार लोकांना आंतून कांहीं खोडसाळ हुकूम दिले होते व त्यास सरकारनें पसंती दाखवून इतर जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांना त्याप्रमाणें वागण्याची ढोबळ शिफारस केली होती याचा सभेच्या अर्जांत उल्लेख केला होता. ही गोष्ट सरकारच्या नाकाला फार झोंबली. आपले खाजगी हुकूम बाहेर फुटतात कसे ? हा मोठा राग. या अर्जांतील मुख्य प्रश्नाचें उत्तर देण्याचें बाजूला टाकून, सेक्रेटरी मि. मांटीथ यांनीं पहिल्या तडाख्याला सभेला उलट हाच प्रश्न विचारला कीं, 'पुणें कलेक्टरानें काढलेले हुकूम तुम्हाला पहावयास कसे मिळाले तें सांगा.' त्याबरोबर सभेनें ताडलें कीं, आपली गोळी बरोबर लागू झाली. वास्तविक सरकारानें बिडून जाऊन भलत्याच मुद्यावर वाद नेणें व मुख्य प्रश्नास सरळ जबाब न देणें हें गैरमुत्सद्दीपणाचेंच लक्षण होय. तुम्ही सांगतां तसे हुकूम पुणें जिल्हा कलेक्टरांनीं काढलेले नाहींत असा स्पष्ट इनकार करणें, किंवा हुकूम नाकबूल करितां येत नसतील तर ते यथायोग्य आहेत असें प्रतिपादन करणें, हाच सरळ व खरा मार्ग होता; आणि मुख्य प्रश्नाची वासलात अशा रीतीनें लाविल्यावर मग कलेक्टरच्या किंवा मुंबईसरकारच्या दप्तरांतले हुकूम बाहेर कसे फुटले किंवा फुटतात याची चौकशी करणें हेंच शहाणपणाचें झालें असतें. तसें न करितां, तुम्हाला हुकूम कसे कळले एवढाच प्रश्न विचारण्यांत, सभेनें आणलेल्या आरोपाची कबुली सरकारनें आपोआप पदरांत घेतली असेंच झालें. पण मन पापी असलें आणि राग अनावर झाला म्हणजे अशाच गोष्टी हातून व्हावयाच्या. या गोष्टीचा फायदा घेऊन सभेनेंहि सरकारास अगदीं भोळेपणाच्या ऐटीनें कळविलें की, तुम्हाला हुकूम कोठें कसे मिळाले असें जें विचारतां त्याचेंच मुळीं सभेला आश्चर्य वाटतें. ठाणें, कुलाबा, पुणें या तीन जिल्ह्यांत तरी एकाच प्रकारचे हुकूम सुटून गांवकामगारापर्यंत गेले आहेत; व या कामगारांनींहि शेतसारा वसूल करण्याच्या उद्योगांत लोकांना ते हुकूम सहजच कळविले आहेत. एकाला सूट किंवा माफी द्यावयाची व दुसऱ्याला न द्यावयाची या फरकाचें समर्थन हे हुकूम समजाऊन सांगितल्याशिवाय कसें करितां येणार ? हुकमाविषयीं आम्ही लिहिलेली माहिती मुळांतच चूक असेल तर गोष्ट वेगळी. पण ती तुम्हाला कोठून मिळाली असा भलता प्रश्न करण्यांत काय अर्थ ? शिवाय याच उत्तराच्या अर्जांत फॅमिन कमिशनच्या रिपोर्टांचा आधार घेऊन, सरकारानें उपस्थित केलेल्या सूक्ष्म भेदांवर सभेनें टीकेचा आणखी हल्ला चढविला होता. त्यावर खुद्द गव्हर्नर-इन-कौन्सिलचा स्वतंत्र ठराव ता. १० फेब्रुवारी १८९७ रोजीं

निघाला त्यांत असें लिहिलें होतें कीं, पुणें कलेक्टराचे हुकूम प्रसिद्ध करण्यास सरकारनें परवानगी दिली नव्हती, अशा हुकमांचा सारांश एखाद्या पत्रांत प्रसिद्ध झाला असला तरी तेंहि गैरशिस्तच असल्यामुळें त्याचा आधार कोणास घेतां येत नाहीं. पण अगदीं 'सरकारी ठराव' निघाला म्हणून भलत्याच गोष्टीचें समर्थन कसें होणार ?

पण सरकारचें नशीब सवाई शिकंदर! आपल्या अंगाला चिकटलेलें हें सभेचें कुसळ कसें तरी झाडून टाकण्याला सरकार एकादें निमित्त हुडकीत होतें व तें त्यांना लवकरच मिळालें. दुष्काळसंबंधीं माहिती गोळा करण्याकरितां सभेनें आपले एजंट ठिकठिकाणीं ठेविले होते हें मागें सांगितलेंच आहे. एजन्सीचें हें काम म्हटलें तर सोपें, म्हटलें तर अवघड. मिळेल ती माहिती घेऊन सभेकडे यथातथ्य कळविणें यांत फार जबाबदारी नाहीं व त्याला फारसें शहाणपणहि लागत नाहीं. पण सगळेच एजंट सारख्या अकलेचे कसे मिळणार ? कोणाला नुसत्या निरोप्या एजंटाचें काम मानवत नाहीं. स्वतःच्या शहाणपणानेंहि आपण कांहीं करावें असें कित्येकांना वाटतें. ही इच्छा स्तुत्य खरी; पण ती शोभण्याला मनुष्यहि तितकाच शहाणा व खबरदार असावा लागतो. अनंतराव जोशी एकसंबेकर म्हणून धारवाड जिल्ह्यांत सभेचे एक एजंट काम करीत होते. या गृहस्थांनीं आपल्या सहीवर हस्तपत्रकें काढून ठिकठिकाणीं सभा भरविण्याचा क्रम चालविला होता. ता. २१ डिसेंबर १८९६ रोजीं सभा भरविण्याचें एक हस्तपत्रक त्यांनीं प्रसिद्ध केलें. त्यांत असें लिहिलें होतें कीं, 'चालू दुष्काळांत एकहि मनुष्य उपासमारीनें मरूं नये अशी राणीसरकारची इच्छा असून त्याप्रमाणें व्हाइसरॉय साहेबांना तारहि आली आहे. मुंबईसरकारचा रेव्हेन्यू कमिशनर लोकांना असा हुकूम आहे कीं, जेथें पीक सहा आणेपर्यंत आलें असेल तेथें सगळा शेतसारा एकदम माफ करावा, व बारा आणेपर्यंत पीक आलें असल्यास एक वर्षाची तहकुबी द्यावी.'

या हस्तपत्रकाचें निमित्त सरकाराला पुरलें. मांटीथसाहेबांनीं त्याची एक प्रत सभेकडे पाठवून तिला विचारलें कीं, हे एकसंबेकर सभेचे एजंट म्हणवितात तेव्हां ते सभेचे एजंट खरेच आहेत कीं काय ? आणि त्यानीं या हस्तपत्रकांत केलेल्या विधानांची जबाबदारी सभा आपल्या शिरावर घेते कीं नाहीं याचें स्पष्ट उत्तर द्या. फिरून एक वेळ मुख्य मुद्दा बाजूस राहून भलत्याच दुसऱ्या मुद्यावर घासाघीस सुरू झाली. वास्तविक सभेचेंहि या बाबतींत धोरण असावें तसें राहिलें नाहीं. मॉंटीथसाहेबांच्या प्रश्नाचें सरळ उत्तर सभा एकदम देऊन टाकती तर सरकारच्या हातचें निमित्त निघून गेलें असतें. पण सभेनें पहिली चूक ही केली कीं, सरकारच्या २ फेब्रुवारीच्या पत्राचा जबाब ५ मार्चपर्यंत पाठविलाच नाहीं. सरळ धडाडीचें उत्तर सभेकडून न जाण्याचें कारण हेंच कीं एकसंबेकरांचीं विधानें बरोबर आहेत असें तिला म्हणवेना, किंवा उलट तीं विधानें चूक आहेत व एक-

संबेकरांचें कृत्य त्यांना दिलेल्या अधिकाराबाहेरचें असल्यामुळें सभा त्याची जबाबदारी घेऊं इच्छित नाहीं असेंहि तिच्यानें म्हणवेना. विधानें खरीं म्हणावीं तर सभेची अब्रू जाते व एकसंबेकराला खोटा म्हणावें तर तेंहि वाईट दिसतें. कारण निःस्वार्थीपणें लोक तुमचें काम करितात त्यांना तुम्ही बळी कसे देणार? मग त्यांत तुमचा थोरपणा तो काय? आपला म्हणविला त्याला पाठीशीं घातलें पाहिजे हीच नीति प्रभावी ठरली. सभेंत उत्तराचे अनेक मसुदे झाले व खलबतें भरलीं. या सुमारास टिळक कांहीं दिवस पुण्याबाहेर गेले होते व सभेचें अखेरचें उत्तर त्यांनीं सर्वस्वीं पसंत केलें होतें असें आम्हास वाटत नाहीं. कसेंहि असो; सभेनें असा खुलासा केला कीं हस्तपत्रकाचा उद्देश केवळ एखादी सभा भरविण्याचा सभा भरवून फॅमिनकोडाची माहिती लोकांना देऊन उलट त्यांचें म्हणणें समजून घ्यावयाचें इतकाच होता. एजंट लोकांनीं काढलेलीं सभांचीं हस्तपत्रकें सार्वजनिक सभेकडे अगाऊ पसंतीला येत नसतात तेव्हां त्यांतलि कोणतें विधान बरोबर, कोणतें चूक, याचा निर्वाळा सभेनें कसा द्यावा? पण येवढेंहि म्हणून सभा थांबली नाहीं. तिनें आणखी असें म्हटलें कीं, एकसंबेकर यांना सभेकडून सर्वसाधारणपणें त्यांच्या कामाविषयीं ज्या सूचना देण्यांत आल्या होत्या त्यांचें कांहीं उल्लंघन एकसंबेकर यांचेकडून झालें असें सभेस दिसत नाहीं. एकसंबेकर यांनीं सुटीतहकुबीविषयीं हस्तपत्रकांत माहिती दिली ती तुम्हाला कोठून मिळाली असें एकसंबेकर यांस विचारतां ते असें कळवितात कीं, तसे हुकूम असल्याबद्दल ठिकठिकाणीं लोक बोलत होते. स्वतः एकसंबेकर यांनींच काढलेल्या दोन हस्तपत्रकांत सुटी तहकुबीविषयीं दोन वेगळीं विधानें केलेलीं आढळतात यावरून परस्पर–विरोधी अशा कंड्या उठत असल्या पाहिजेत असें दिसतें; व या विषयावर सरकारानें आपले निश्चित्त हुकूम तावडतोब प्रसिद्ध न करितां दिरंगाई केली हें त्यांचें एक कारण असेल. एकसंबेकर यांचें विधान चूक असलें तरी त्या चुकीला लोकवार्तेचा कांहीं आधार असेल, व अशा लोकवार्तेवर एकसंबेकर यांचा अजाणतां कदाचित् विश्वास बसला असेल. इतकें लिहून फिरून शेवटीं सभा म्हणते, एकसंबेकरांची चूक सरकारनें नजरेला आणली; चांगलें झालें. इतर छापील वर्तमानपत्रांतून वगैरे अशाच आणखी कांहीं चुका असल्यास त्या सरकारानें अशाच दुरुस्त कराव्या!

अशा उत्तरानें काय निकाल लागणार हें दिसतच होतें. सभेकडून उत्तर येण्यास उशीर झाल्यामुळें आधींच ता. ५ मार्च रोजीं सरकारानें सभेला निर्वाणीचा खलिता पाठवून असें कळविलें होतें कीं, एक आठवड्याचे आंत तुमचेकडून उत्तर न आल्यास सरकार या प्रकरणाचा मर्जीनुरूप एकतर्फी निकाल करील. दारू आधीं ठासून भरलीच होती; त्यावर सभेकडून वरील प्रकारच्या तेजस्वी उत्तराची ठिणगी जाऊन पडतांच धडाका उडाला. मुंबईसरकारानें यथाविधि ठराव काढून

सभेला कळविलें कीं, एकसंबेकर यांचीं विधानें धडधडीत खोटीं. साधारण जाणता समंजस मनुष्य अशा लोकवार्तेवर विश्वास ठेवील हें संभवत नाहीं. विधानांचा परिणामहि असा झाला कीं अज्ञानी शेतकऱ्यांनीं सारा अडवून धरण्याचे संप केले. पांच आठवडे घेऊन सभेनें उत्तर दिलें त्यांत या खोट्या विधानांचा इनकारहि केला नाहीं. खुलासा म्हणून दिला तो बरोबर नाहीं. बरें, अशा गोष्टी पुढें घडून येणार नाहींत असें आश्वासनहि दिलें नाहीं. अशा कृत्यांचा परिणाम वाईट होतो, लोक सारा देत नाहींत, सरकारला नोटिसा काढाव्या लागतात, सार्वजनिक हिताला धोका येतो, म्हणून सरकार असा ठराव करितें कीं. हल्लींच्या स्थितींत सार्वजनिक प्रश्नावर सरकारास लोकमत कळविण्याच्या पात्रतेचा हक्क सभेस नाहीं. या लांबलचक वाक्याचा अर्थ इतकाच कीं फिरून सरकारकडे विनंति अर्ज पाठविण्याची तसदी सभेनें घेऊं नये, व पाठविला तरी त्याचें उत्तर देण्याची तसदी सरकार घेणार नाहीं. वास्तविक यापासून प्रत्यक्ष नफानुकसान असें कोणाचेंच कांहीं झालें नाहीं. पूर्वी सभेला मान्यता होती म्हणून तिला सरकार कांहीं मानाचें शेलापागोटें बांधीत नव्हतें, व आतां ही मान्यता काढून घेतली म्हणून सभेचें डोकें कोणी तोडलें नाहीं, ती पूर्वीसारखीच जिवंत राहिली, असें सकृद्दर्शनीं कोणी म्हणूं शकेल. पण सरकार व लोक यांच्यामध्यें मध्यस्थी करण्याचा आणि सरकारचे हेतु लोकांना व लोकांचीं गाऱ्हाणीं सरकारला अर्जद्वारां समजावून सांगणें, हें कार्य जर सभेनें स्वीकृत केलें होतें, तर तें थांबलें यांत विघडलें नाहीं असें म्हणून कसें चालेल? चळवळीच्या अनेक मार्गांपैकीं तो फक्त एक होता व सभेची मान्यता काढून घेतल्यानें इतर मार्ग कांहीं बंद झाले नाहींत ही गोष्ट खरी. पण या मार्गावरील द्वाराला कुलूप पडल्यानें तो एक मार्ग तरी बंद झालाच कीं नाहीं ? खरोखरच पुष्कळ लोकांना त्या वेळीं असें वाटलें कीं झाली ही गोष्ट कांहीं बरी झाली नाहीं. एकसंबेकरांची चूक झाली म्हणजे तिनें जग बुडालें असा अर्थ नाहीं. पण सभेच्या एजंटानें ती चूक केली याकरितां ती आपली असें मानून सभेनें दिलें याहून अधिक सरळ, सभ्य व मिळतें घेण्याच्या भाषेनें उत्तर द्यावयास पाहिजे होतें. असें न झाल्यानें "पहा, टिळकांनीं सभा हातीं घेतली व बुडविली" असें म्हणण्यास प्रतिपक्षास जागा झाली. मग बुडविणें याचा अर्थ कोणताहि असो.

दुष्काळसंबंधाची चळवळ जरी सार्वजनिक सभेमार्फत होत होती तरी. त्या चळवळीचा परिणाम केवळ सरकाराकडे अर्ज करून होणार त्यापेक्षां त्या चळवळीचा लोकांत जो गवगवा होणार त्यामुळेंच तो अधिक व्हावयाचा हें उघड आहे. या दृष्टीनें सार्वजनिक सभेच्या चळवळीला टिळकांनीं केसरींत लिहिलेल्या लेखांची पुष्कळच मदत झाली. सभेनें सरकाराकडे एखादा नुसता अर्ज करणें, आणि सभेनें अमूक एक अर्ज केला आहे असें केसरींत प्रसिद्ध होणें,

या दोहोंतील अंतर कोणाच्याहि तेव्हांच लक्षांत येईल. आणि सभेतील चळवळीची स्फूर्ती उत्पन्न करणारे टिळक व केसरींत लिहिणारेहि टिळकच, ही गोष्ट लोकांना माहीत होती म्हणून वरील फरक कमी पडण्यासारखा नव्हता. काम करत्या माणसाच्या हातीं संस्था व वर्तमानपत्र अशीं सजोड साधनें असलीं म्हणजे एकाचा दुसऱ्यास उपयोग होऊन दोहोंचा मिळून परिणाम द्विगुणित होतो. तसेंच येथेंहि झालें. किंबहुना सभेच्या चळवळीनें सरकाराला जी भीती किंवा निदान काळजी वाटली असेल, तिजपेक्षां केसरींतल्या लेखांनीं त्यांना ती अधिक वाटली असेल यांत शंका नाहीं.

ता. १७ नोव्हेंबर १८९६ पासून केसरींतून दुष्काळासंबंधीं खडखडीत लेख येऊं लागले. " दुष्काळ आतां खास पडला आहे हें सांगावयास नकोच. गुरें कडब्याच्या किंमतीस विकूं लागलीं व कडबा सोन्याच्या भावानें जात चालला आहे " ! अगदीं जिवावर बेतली तरी आपल्या लोकांना सरकारापाशीं काय मागावें हें देखील कळत नाहीं. यामुळें टिळकांनीं भाषांतर केलेले फॅमिन रिलीफ कोड केसरींतून देण्यास याच आठवड्यांत सुरुवात झाली होती; व व्यक्तिशः टिळकांच्या प्रेरणेनें गांवोगांवीं सभा भरवून सरकाराकडे अर्ज पाठविण्याचें काम सुरू झालें होतें. ना० खरे यांच्यासारखे न हलणारे मुंबईचे हायकोर्ट वकील देखील तालुक्यांच्या गांवाला जाऊन, कातकरी लोकांना सरकाराकडून मदत कोणती मागावी याविषयीं उपदेश करूं लागले होते. सार्वजनिक सभेच्या अर्जांत जी सौम्यता किंवा जें मितभाषित्व येत असे तें वर्तमानपत्रांत टिळक संभाळित नसत, किंवा त्यांनीं तें संभाळावें अशी कोणाची अपेक्षाहि नव्हती. वाचणाराच्या सहज मनांत भरेल व प्रतिपक्षाच्याहि सहज गळीं उतरेल अशा रीतीनें अगदीं साधें सोपें लिहिल्यामुळें त्याचा परिणाम पुष्कळच होई. प्रथम सरकार आपलें आहे असें एकदां सांगून टाकलें, म्हणजे मग आपल्याच आहेत अशा सांगून टाकण्यासारख्या इतरहि पुष्कळ गोष्टी मिळत. सरकार आपलें तर त्यांतील छोटे मोठे अधिकारीहि आपलेच. अर्थात् त्यांच्यावर आपला हक्क आहे. त्यांनीं आपलें काम चांगलें केलें पाहिजे, मनांत दया बाळगिली पाहिजे. ते आपलें काम न करतील तर गुन्हेगार ठरतील; दुष्काळग्रस्त लोकांचीं दुःखें सरकारच्या नजरेला आणण्याचें काम लोकांपेक्षां त्यांचेंच अधिक आहे. सरकारी पैसा हा एक प्रकारें आपलाच; तेव्हां शेतसाऱ्याची सूट दिल्यानें तो थोडा कमी झाला तरी आमचेंच नुकसान, तें आम्ही सोसूं. जंगलेंहि आमचींच. म्हणून त्यांतील झाडपाला वगैरे सरकारानें आम्हास प्राणरक्षणार्थ दिलाच पाहिजे. तात्पर्य सरकार जें जें करील त्याचा तर लोकांनीं पूर्ण फायदा घेतलाच पाहिजे, पण सरकार जें जें न करील तें तेंहि त्यांना करावयास लावलें पाहिजे. आणि सामान्य लोकांना या गोष्टी कळत नाहींत म्हणून पुढाऱ्यांनीं त्या त्यांना समजून सांगितल्या पाहिजेत. सरकारी तिजोरींतले

पैसे न पुरले तरी आम्ही कर्ज काढून लोकांचे जीव वांचवूं असें स्टेट सेक्रेटरी पार्लमेंटांत एकदां बोलून गेले, त्याचा पुरा फायदा घेऊन टिळक लिहितात, "सरकारची इतकी तयारी असल्यावर मग लोकांनीं फुकट कां मरावें हें आम्हास समजत नाहीं. दाता आहे पण मागणारेच नाहींत अशी स्थिति येऊं नये. मग दाता खरा असल्यास टिकेल, नाहींतर त्याचा कच्चेपणा तरी अनुभवास येईल. सबब सर्वांस आमची अशी विनंती आहे कीं, ज्यास जीव वांचविण्याकरितां मदत पाहिजे असेल त्यानें कलेक्टरसाहेबाकडे जाऊन ती मागावी." इतका स्पष्ट उपदेश असल्यावर मग लोक हालाचाल कां करणार नाहींत ? टिळकांनीं सरकारच्या परोपकारबुद्धीचें हें मायावी मोहोळ चाळविल्यानें गांधिलमाशा उठून अधिकाऱ्यांच्या भोंवतीं हिंडूं लागल्या. टिळकांचा उपदेश दिसण्यांत अगदीं सरळ. दुष्काळांत कोणाला कसलीहि अडचण आली कीं त्याला सरकाराकडे धाडा असा सर्वांना एकसारखा उपदेश; व ते एकटेच जात नसतील तर तुम्ही त्यांना घेऊन जा असा फिरून पुढाऱ्यांना उपदेश. अशा साळसूद उपदेशाला सरकार तरी काय हरकत घेणार ?

दुसरे पक्षीं अधिकाऱ्यांवरहि कडक शब्दांची त्यांची टीका सुरूच होती. महाबळेश्वराच्या थंड हवेंत बसून, सर रिचर्ड टेंपल यांचें अनुकरण करून, अच्छेर धान्य माणसाच्या पोटाला पुरतें असें म्हणावयाला गव्हर्नर साहेबांचें काय जातें ? आम्हाला देखील गव्हर्नर साहेबाना फार फार तर एक हजार रुपये पगार असावा म्हणजे पुरे असें वाटतें. फरक इतकाच कीं आमचें न ऐकतां अधिकारी पगाराखेरीज वरतीं हुंडणावळीचें काँपेन्सेशन उपटतात, आणि दुष्काळांत सांपडलेल्या मजुरांना दररोज अच्छेराऐवजीं शेर दाणे देण्यास तिजोरींत पैसा नाहींसा होतो; तरी दुष्काळ निवारणार्थ उभारलेल्या फंडाचे कोटीनकोटी रुपये सरकारानें खाल्ले आहेत ते आहेतच ! याच सुमारास व्हॉइसराय लॉर्ड एलजिन हे संस्थानिकांना भेटी देण्याला निघाले होते. अर्थात् ते जेथें जातील तेथें मेजवान्यांचा थाट उडे, दारूच्या बाटल्या रिकाम्या होत, दारूकाम सोडलें जाई, रोषनाई होई व प्रायः दरएक संस्थानिकाला लाखों रुपये खर्च येई. तेच पैसे प्रजेच्या दुष्काळनिवारणाकडे लावले तर किती तरी अधिक उपयोग झाला असता, हें म्हणणें कोणासहि पटण्यासारखें होतें; पण इतका वाईटपणा पत्करून तें म्हणतो कोण ? व्हाइसराय बडोद्यास गेले तेव्हां त्यांच्या जयजयकारार्थ बगीच्यांत मोठा समारंभ झाला. त्यांत तीस चाळीस लोक चिरडून ठार मेले. "राजे लोकांनीं तमाशे करावे आणि कंगाल प्रजेनें ते बघण्याच्या गर्दींत चिरडून मरावें असे दिवस इंग्रज लोकांसारख्या सुधारलेल्या राजकर्त्यांच्याहि अमदानींत राहिले आहेत, हें आश्चर्य होय. इकडे महाबळेश्वरास 'इष्टापुरी,' ( स्ट्रॉबेरी ) नामक विलायती फळांचा दुष्काळ पडला तेव्हां त्याच्याकरितां

कांहीं फंड जमविण्यांत गव्हर्नरांनी पुढाकार घेतला. पण दुष्काळ रिलीफ फंडाचा मात्र पत्ता नाहीं."

इकडे सार्वजनिकसभेकडून टिळकांनीं एका आठवड्यांत चहूंकडे आपले एजंट पाठविले होते. त्यांत वि. का. राजवाडे, न. चिं. केळकर, नारायणबावा घमंडे, शंकर गणेश लवाटे, महाडकर ज्योतिषी, गोविंदराव टिळक वगैरे नांवें आढळतात. अशा एजंटांकडून आलेल्या पत्रांचा सारांश सभेच्या त्रैमासिकांत पुढें तीन महिन्यांनीं प्रसिद्ध होणार म्हणून केसरींतून दर आठवड्यास त्यांतील निवडक पत्रें प्रसिद्ध होऊं लागली. स्थानिक पुढाऱ्यांकडून सभेच्या एजंटांना पत्रें येऊं लागलीं. सभेच्या एजंटाप्रमाणें चिटणीस शिवरामपंत परांजपे व अच्युत सिताराम साठे हेहि ठिकठिकाणीं हिंडावयास गेले होते. हे एजंट व चिटणीस प्रायः स्थानिक अधिकाऱ्यांना जाऊन भेटत व जिल्ह्यांतील दुष्काळ–योजनेची माहिती सरळपणानें देत. कित्येक कलेक्टर व अधिकारी उर्मटपणानें वागत; त्या संबंधाच्या कागाळ्या येत. त्याला उद्देशून टिळक लिहितात "कायदेशीर रीतीनें सरकाराशीं भांडावयास रयतेस कसें शिकवावें ही विद्या आमच्या पुढारी लोकांस शिकावयाची आहे; व ती जेव्हां ते शिकतील तेव्हांच सरकारी अधिकाऱ्यांचा उर्मटपणा उतरेल व रयतेस कांहीं फायदा होईल." हें शिकतांना व शिकवितांना अर्थातच बरेवाईट अनुभव येत. ता. १३ डिसेंबर रोजीं ठाणें जिल्ह्यांतील उंबरगांव पेट्यांत खत्तलवाड येथें दोन हजार लोकांची सभा भरली होती. या सभेला कोळी, वारली वगैरे अगदीं अडाणी लोक जसे हजर होते तसेच महालकरी, फौजदार, असि० कलेक्टर डुबोले वगैरे अधिकारीहि हजर होते. सभेस पोलिसपार्टी मुद्दाम आणविली होती. सभेला अच्युतराव साठे हे सार्वजनिक सभेचे एक प्रचारक म्हणून गेले होते. ते मोठे बोलके असत; व कोंकणी लोक भेटले तर कोंकणी भाषेंत बोलण्याची विद्याहि त्यांना येत असे. या सभेत साठे यांनीं डुबोलेसाहेबादेखत लोकांना तीन तीनदां बजावून सांगितलें कीं तुमचीं पिकें बुडालीं असलीं तर तुम्ही सरकारास सारा देऊं नका. सर्व वेळ डुबोलेसाहेब उभे होते. दिलेली खुर्चीहि त्यांनीं घेतली नाहीं. बोलतांना साठे म्हणाले 'सरकारी अधिकाऱ्यांच्या छत्राखालीं आम्ही बोलत आहों.' तेव्हां साहेब म्हणाले 'आमचें नांव तुम्ही मध्येंच कां गोवितां?' सभेच्या शेवटीं डुबोलेसाहेब साठे यांच्याशीं दोन गोड शब्द बोलून गेले, पण या गोड शब्दांचें उट्टें लवकरच दुसरीकडे निघालें. या सभेचे वर्णन केलेल्या केसरीच्या अग्रलेखाला 'पोलिसाच्या पेटलेल्या बंदुकीच्या टप्प्यांत भरलेली रयतेची जंगी सभा' असा मथळा दिलेला वाचून लोकांच्या मनावर काय परिणाम झाला असेल याची कल्पना सहजच होईल. तात्पर्य लोकांस सरळ सीधा उपदेश करून, सरकारास दटावून किंवा प्रत्येक असामान्य प्रसंगाचें चटकदार वर्णन देऊन गांवानिहाय लोकांना व त्यांच्या

पुढाऱ्यांना हालचाल करावयास लावणें हाच केसरीचा मुख्य उद्देश होता व तो सर्वस्वीं सफळ होत होता.

या गोष्टीनें अधिकारी चिडून जाणार हें ठरलेलेंच होतें. १८९६ च्या डिसेंबरच्या अखेरीस सभेच्या तीन प्रचारकांवर खटले करण्यात आले. यापैकीं दोन कुलाबा जिल्ह्यांत व एक ठाणें जिल्ह्यांत झाला होता. कुलाबा जिल्ह्यांत खटले झाले ते दोन गृहस्थांवर. एक प्रो. अच्युतराव साठे व दुसरे दत्तोपंत आपटे. तिसरा खटला उंबरगांवचे परांजपे, कारुळकर व पिंपुटकर यांजवर झाला होता. पैकीं साठे यांच्या खटल्यास विशेष महत्त्व आलें होतें. कारण त्यांच्यावरचा खटला म्हणजे प्रत्यक्ष सार्वजनिक सभेवरचाच खटला होय. हा खटला भरला त्या वेळीं टिळक कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेस गेले होते. तेथें त्यांना तारेनें ही बातमी समजली व त्याच दिवशीं ते पुण्यास येण्याकरितां परत निघाले. सभेचे पुढारी पुढें काय करावें म्हणजे डिफेन्स कोणच्या रीतीचा द्यावा याचा निश्चय न झाल्यामुळें घोटाळत पडले होते. कलकत्त्याहून टिळक एकसारखा पस्तीस तासांचा प्रवास करून पहांटे साडेतीन वाजतां येऊन पोहोंचले, तों सभेची मंडळी त्यांचे घरीं अपरात्रीं येऊन वाट पहात बसली होती. पण इतक्या श्रमानंतरहि एक क्षणभर विश्रांति न घेतां खटल्याची सर्व हकीकत ऐकून घेऊन डिफेन्स कसा द्यावयाचा याचें धोरण टिळकांनीं ठरविलें. खटला पेण येथें चालला. निकालाच्या दिवशीं हजारों लोक कचेरीजवळ जमले होते. खटल्याकरितां पेण येथें टिळक हे स्वतः गेलेले असून इतर वकील बॅरिस्टर वगैरे लोकांचीहि गर्दी जमली होती. खटल्याचे आदले दिवशीं मोठी जाहीरसभा बाबासाहेब घारकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेचा परिणाम खटल्यावर कदाचित् होईल अशी धास्ती कित्येकांस वाटली पण ती खरी ठरली नाहीं. सभेंत टिळकांनीं असें बोलून दाखविलें कीं, 'हल्लींचें राज्य कायद्याचें आहे, सरकारचा कायदा हातीं घेऊन तो लोकांस चांगल्या रीतीनें कळेल असा सांगण्याबद्दल जर प्रो. साठ्यांवर खटला चालू आहे तर पुष्कळ लोकांस कायदा समजून सांगण्याचें काम माझें नेहमींचेंच आहे, तेव्हां माझ्यावरहि पुष्कळ खटले झाले पाहिजेत.'

अशा ठणठणीत भाषणाचा परिणाम लोकांवर होऊन त्यांची भीति गेली, व साठ्यांना शिक्षा झाली असती तरी तिच्या दहशतीवर हें विरजण अगाऊच पडलें. पुढें खटल्याच्या सुनावणीस सुरवात झाली तेव्हां प्रथमच खरे वकील यांनीं अशी तक्रार केली कीं, आपटे व साठे यांजवरील आरोपाचा प्रकार वेगवेगळा असल्यामुळें त्यांचे खटले वेगवेगळे चालावे. ही तक्रार मॅजिस्ट्रेटनें मान्य करून, एकट्या साठ्यांचा खटला सुरू केला, व चारदोन साक्षिदारांच्या जबानींत साठ्यांविरुद्ध कांहींच निष्पन्न न झाल्यानें बुकसाहेबांनीं त्यांना त्याच दिवशीं निरपराधी ठरवून सोडून दिलें. साठ्यांनंतर आप-

त्यांचा खटला सुरू झाला पण तो तहकूब राहिला. त्यांतहि पहिले साक्षीदार फसल्यानें पोलिसांना दुसरे साक्षीदार आणण्यास मुदत घ्यावी लागली व अखेर त्यांस एक वर्षाची साधी कैद व दोनशें रुपये दंड अशी शिक्षा झाली. साऱ्यां-सुद्धां सर्व वचपा आपट्यांवर निघाला. हा खटला शाबित करविण्याला पोलिसांस फारच मेहनत पडली. दोन साक्षिदारांनीं असें सांगितलें कीं, पोलिसांचे धम-कावणीवरून आम्ही आरोपीविरुद्ध साक्ष दिली. एकानें तर अंगावरचे वळ न्याया-धिशाला दाखविले. उलट आरोपीतर्फे बऱ्याच साक्षी झाल्या. तरी सोनार, आग्री, ठाकूर वगैरे सर्व जातीचे लोकांनीं या दुष्काळांत ब्राह्मणांच्या शिकवणीनें सरका-राविरुद्ध कट केला म्हणून ते बेभरंवशीक असें मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं ठरविलें !

असो, आपट्यांनीं मुख्य उपदेश दारू न पिण्यासंबंधाचा केला असून, त्यांनीं मुख्यतः केनसाहेबांच्या भाषणाचा एक उतारा वाचून दाखविला होता. पण तिसरा म्हणजे ठाणें जिल्ह्यांतील खटला खुद्द टिळकांच्या अंगाशीं येऊन भिड-ण्याचा संभव दिसूं लागला. कारण ज्या हस्तपत्रकांवरून खटला झाला त्यांत केसरींतील ता. १५ डिसेंबरचा उतारा ठळकपणें नजरेस येईल असा दिला होता. त्यांतच खुद्द फॅमिन रिलीफ कोडाचाहि उतारा दिला होता. पण त्याचा काय उपयोग ? जाहिरनामा पुण्यास आर्यभूषण छापखान्यांत छापला असल्यामुळें पोलिसांनीं छापखान्यांत येऊन त्याची लेखी प्रत जप्त करून नेली होती. पण आरोपींना जाहिरनामा नाकबूल करावयाचा नव्हता. खटला ठाण्याचे कलेक्टर मि. लोगन यांच्यापुढें २ जानेवारी रोजीं सुरू झाला. त्याचा अखेर निकाल ता. १७ जानेवारी रोजीं लागला, त्यांत आरोपींना दोषमुक्त करून सोडून देण्यांत आलें.

जाहिरनाम्यांतील भाषेची छाननी झाली तेव्हां लोगनसाहेबांना असें कबूल करावें लागलें कीं, केसरीच्या उताऱ्यांतील भाषा अत्यंत सावधपणाची आहे. इतकें कबूल करूनहि साहेबांनीं असा शेरा दिलाच कीं, भाषा सावधपणाची असली म्हणून काय झालें ? लिहिणारानें कर्ज काढून सारा भरूं नये असें लिहिलें असलें तरी कोणत्याहि स्थितींत सारा मुळीं देऊंच नये असा वाचकांचा ग्रह होण्याचा संभव आहे. तथापि त्यांनीं हा आपला तर्कवाद परिणामीं आवरता घेऊन आरोपीस सोडून दिलें. आपटे यांनाहि असेंच सोडून द्यावयास पाहिजे होतें. कारण त्यांनीं तरी मुख्यतः केनसाहेबांच्या उताऱ्याचाच उपयोग केला होता. पण या उताऱ्याबरोबर त्यांच्या इतरहि कांहीं भाषणाचा पुरावा करण्यांत आला होता. शिवाय केनसाहेबांच्या शब्दांवरून आपट्यांना शिक्षा झाली तर ते त्याचा गवगवा करण्याला थोडेच येणार होते ? टिळकांच्या उताऱ्याची गोष्ट मात्र वेगळी होती. कारळकर पिंपुटकरांना शिक्षा देऊन केसरीला खटला करण्याशिवाय सोडणें हें अशक्य होतें. किंबहुना वरील उताऱ्यांतील लेखाशिवाय राजद्रोह शाबीत करण्याला दुसरे कितीतरी लेख सांपडण्यासारखे होते. पण कांहींहि असो; लोगनसाहेबांना

कारूळकर पिंपुटकर यांस शिक्षा देवविली नाहीं. याचें कारण केसरीचा संबंध त्यांत आला होता हेंच म्हणावयास हरकत नाहीं. दुष्काळविषयक लेखांतील टिळकांची सावधगिरी स्वतः त्यांनाच काय पण कारूळकर पिंपुटकर यांनाहि उपयोगी पडली असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुढें टिळकांवर प्रत्यक्ष खटला झाला तेव्हां हेतुशाबितीकरितां दुष्काळावरील लेखांपैकीं एखाददुसरा पुराव्यांत देण्यांत आला होता. पण त्याहि खटल्यांत त्यावर विशेष जोर पडला नाहीं.

असो; अनेक जिल्ह्यांतून दुष्काळी कारभाराच्या बाबतींत अधिकाऱ्यांच्या हातून अनेक प्रमाद घडले. चळवळहि विविधप्रकारची झाली. लोकांच्या अज्ञानाच्या अनेक मौजा पहावयास सांपडल्या; पण त्या सर्वांची हकीगत देण्याचें कारण नाहीं. या चळवळींत टिळकांचा जो संबंध आला तेवढ्यापुरतेंच आपणांस पहावयाचें आहे. व त्यासंबंधानें इतकेंच सांगितलें असतां पुरें होईल कीं, केसरीनें या चळवळींत सगळें रान हालवून सोडलें. या पांचचार महिन्यांतील केसरी पाहिले तर कोणासहि असें दिसून येईल कीं निम्मा किंवा तीन हिस्से केसरी या चळवळीच्या हकीकतींनेंच भरून गेलेला आहे. त्यांतील एक भाग जुने सरकारी रिपोर्ट, कमिशनांचे अहवाल, इतर प्रांतांतील सरकारी दुकानांचे दाखले वगैरे आधारभूत माहितीनें भरलेला असे. याचा उपयोग असा होई कीं टिळकांच्या टीकेला सरकारच्याहि दृष्टीनें विद्वत्तेचें अधिष्ठान मिळे. कित्येक वेळां असेंहि होई कीं, जी माहिती जिल्ह्याधिकाऱ्यांना नसे ती केसरींत प्रथम वाचावयास मिळे; कारण ते आपलें काम इतकेंच समजत कीं, वरच्या हुकमाची अंमलबजावणी होईल तितक्या थोडक्या खर्चात, व थोडक्या अंगमेहतीनें करावयाची. त्यांतूनहि एखादा जिल्हाधिकारी मेहनती किंवा उदार असला तरी त्याचें काम अर्थातच त्याला पुरून उरण्यासारखें होई. यामुळें दुष्काळाच्या प्रभावाचा तो व्यापक दृष्टीनें विचार करीत बसेल कशाला ! म्हणून त्यालाहि टिळकांच्या वाचनाचें व व्यापक दृष्टीचें कौतुक वाटे. दुसरा भाग म्हणजे या विषयावरील अग्रलेख किंवा स्फुटसूचना. या दोहोंना बहुधा कांहीं तरी नवा विषय व नवें खाद्य दर आठवड्यांत मिळेच. कोठें नमूद करण्यासारखी सभा झाली, कोठें अधिकाऱ्यांनीं काढूं नये ते हुकूम काढले, कोठें दांडगाई केली, कोठें निष्ठुरता दाखविली, तर टिळकांचें तारायंत्र तयारच असे. बाहेरगांवचे बातमीदार अशा कामीं मोठे तत्पर असत, व कोणच्याहि गोष्टीचा गवगवा कसा करावा हें केसरीनें लोकांना शिकविलें असल्यामुळें, तेहि पान हललें कीं वित्तंबातमी काढून तत्परतेनें ती टिळकांकडे पोंचवीत. अग्रलेखांत व स्फुटांत पुष्कळदां पुनरुक्ति होई. पण चळवळींत पुनरुक्तीचा अभ्यास हाच सर्वांत अधिक उपयोगी पडतो असा टिळकांचा विश्वास असल्यामुळें, त्याच कल्पना किंबहुना कित्येक वेळीं तेच ते शब्द आलटून पालटून लिहिण्यांत त्यांना कंटाळा न येतां हौसच वाटत असे. तिसरा भाग म्हटला म्हणजे दर आठवड्यास प्रसिद्ध

होणारीं सरकारचीं दुष्काळपत्रकें. त्यांचींहि भाषांतरें किंवा सारांश टिळक हटकून देत. कारण वेगळी टीका केली तरी खुद्द सरकारांत काय चाललें आहे याची माहिती लोकांना अवश्य मिळावयास हवी असेंच त्यांचें मत असे. मधून मधून एखादा खटला झाला किंवा खटला होण्याची वदंता उठली तर टीकेच्या आंबट ताकांत मिठाचा दाणा पडल्याप्रमाणें त्यास गोडीच येई. तात्पर्य नुसते वर्तमान-पत्रकार या दृष्टीनेंही चळवळ टिळकांनीं नमुनेदार करून दाखविली यांत शंका नाहीं.

पण या चळवळींत विध्वंसक टीकेबरोबरच विधायक कामगिरीहि टिळकांचे हातून बरीच झाली. सार्वजनिक सभेतर्फे सोलापुरास जाऊन त्यांनीं विणकर लोकांचे जीव रक्षिण्यासाठीं योजना तयार करून सरकारपुढें मांडण्यांत व्यापाऱ्यांना मदत केली, या गोष्टीचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. पण त्याहून अधिक फळाला आलेली कामगिरी म्हटली म्हणजे पुणें शहरांत त्यांनीं स्वस्त धान्याचीं दुकानें मांडविलीं ही होय. बेकार लोकांनीं धान्याचीं दुकानें लुटल्याची माहिती प्रसिद्ध होई ती केसरींत अर्थात् देत. परंतु ती केवळ लोभी व्यापाऱ्यांना आपल्या कर्तव्याचा उमज पडावा व तें त्यांचेकडून न झाल्यास कोठून कसा गोता येईल हें त्यांच्या लक्षांत पुरें यावें म्हणून. पण बाजारलूट होणें हें अनिष्ट व अश्लाघ्य असें ते प्रतिपादित, इतकेंच नव्हे तर असल्या उपद्रवी लोकांचे हल्ले इतर लोकांनीं जुटीनें परतवावे असाच त्यांचा उपदेश असे. व्यापाऱ्यांच्याहि पोटांत शिरून धंद्यांत इतर रीतीनें श्रीमंतांकडून नफा मिळविला तरी धर्मदाय म्हणून क होईना पण स्वस्त धान्याचीं दुकानें काढावीं याकरितां टिळकांनीं पुष्कळ प्रयत्न केला. राजकीय चळवळीला झालें तरी लोकोपयोगाचें अधिष्ठान असल्यावांचून भागत नाही हें नेहमीं टिळकांच्या लक्षांत असे.

भाग २४ वा

# पुण्यांतील प्लेगचा अनर्थ

'दुःखं दुःखानुबंधी' म्हणतात तेंच खरें. दुर्दैव हें दूरदर्शी शिकाऱ्याप्रमाणें संकटांच्या जोड गोळीची बंदूकच प्रायः वापरतें; एरवीं १८९६-९७ सालीं दुष्काळ व प्लेग हे दोघे एकाच वेळीं कसे यावे? दुष्काळाचा नेहमींचा जोडीदार माहामारीचा वाखा. पण त्या उभयतांमध्यें एक प्रकारचा ऋणानुबंध व कार्य-कारण संबंध तरी असतो. दुष्काळामध्यें गरीब लोक उपाशीं अर्धपोटी असतात. भूक भागविण्याकरितां मिळेल तें कदान्न ते खातात. तेंहि निश्चितपणें मिळण्या-सारखें नसल्यामुळें मिळेल तेव्हां भुके पुरतेंच खात नाहींत. अधिकहि खातात. यामुळें दुष्काळांत अजीर्ण, असा विरोधाभासहि उत्पन्न होऊं शकतो. अतिवृष्टीचा दुष्काळ असला तर अन्न कुजकें म्हणून, आणि अनावृष्टीचा दुष्काळ असला तर पाणी दूषित म्हणून, मिळून रिकाम्या किंवा फार भरलेल्या पोटाला त्याची अपायकारक मदत तयारच असते; अशा रीतीनें ज्या प्रांतांत दुष्काळ पडला त्या प्रांतांत त्याचें पाठोपाठ माहामारीचा वाखाहि आला असें आढळून येतें. पण १८९६ सालीं दुष्काळाच्या जोडीला असा एक रोग आला कीं, त्याचा व याचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. हा रोग म्हणजे बद्या ताप ऊर्फ ब्यूबॉनिक प्लेग. १८९७च्या आपत्तीच्या प्रारंभीं ही जोडी महाराष्ट्रभर अनिरुद्धपणें माचूं लागली. दुष्काळ हा लोकांना नेहमींच्या परिचयाचा नसला तरी त्याची त्यांना कल्पना तरी करितां येत होती. पण बद्या ताप हा असा चमत्कारिक व भयंकर होता कीं, त्याच्या प्रत्यक्ष भेटीनें तर मरण येईच पण नुसत्या संशयानेंहि मनुष्य अर्धमेला होई. मृत्यु हा केव्हांहि भयंकरच. पण अपमृत्यु हा त्याहून भयंकर वाटतो. व तोहि एक नाहीं दोन नाहीं, तर ओळीनें शेकडो मनुष्यांना गांठूं लागला म्हणजे मग तो किती भयंकर वाटेल!

मुंबईत दुष्काळाचें दुःख फारसें अनुभवास येत नाहीं. पण प्लेगनें राजधानीचें शहर म्हणून कांहीं मुंबईची बाकी ठेवली नाहीं, किंबहुना मुंबईतच तो प्रथम-प्रगट झाला. व सुखाच्या वस्तु जशा मुंबईहून बाहेर गांवीं रवाना होतात तसाच प्लेग हाहि तेथून बाहेर गांवीं पसरला. १८९६ च्या ऑक्टोबर महिन्याच्या प्रारंभीं मुंबईच्या मांडवी भागांत कांहीं तरी नवा अतर्कित असा आजार उत्पन्न झाल्याचा गवगवा सुरू झाला. सर्व सप्टेंबर महिनाभर लोक थोड थोडे आजारी पडून मरतच होते; पण मोठ्यांचें सर्वच मोठें या न्यायानें या बेसुमार वाढलेल्या मृत्युसंख्येची प्रथम कोणी काळजी केली नाहीं. वाळकेश्वरच्या पहाडी बंगल्यापासून तों भाय-

खळ्यावरील नागपाड्याच्या किंवा कामाठीपुऱ्याच्या गलिच्छ वस्तीपर्यंत स्वच्छता, अस्वच्छता आरोग्य व अजारीपणा या सर्वांचे नमुने प्रतवार पाहावयास सांपडतात. मांडवींत आधींच वस्ती गलिच्छ. तेथील लोकांस हवेचें सुख फार कमी. मोऱ्या गटारें जुन्या चालीचीं; त्यांतून कुजका गाळ फार सांठलेला. व त्यांतच कुजक्या धान्याचीं कोठारें भरलेलीं; असा योग मिळाल्यानें महिना दोन महिने या भागांत मृत्यु नेहमींहून अधिक झाले तर मुंबईच्या हेल्थ ऑफिसरला देखील एखादे वेळ त्याचें कांहीं वाटणार नाहीं. पण एक महिन्यांत जीं चारशें माणसें मेलीं त्यांत संख्येपेक्षांहि अधिक संशयास्पद व भीतिप्रद असें कांहीं तरी असावें ही गोष्ट म्युनिसिपल अधिकाऱ्यांच्या हळू हळू लक्षांत येऊं लागली, व या भागांतील डॉक्टर लोकांनींहि या संशयाला दुजोरा दिला.

शेवटीं मरणाला भिऊन मांडवींतलि लोक जेव्हां उठून दुसऱ्या वस्तींत जाऊन राहूं लागले येवढेच नव्हे तर आगगाड्या भरभरून गुजराथेकडे जाऊं लागल्या तेव्हां या आजाराचा खरा गवगवा झाला. मग सभा भरल्या, कमिट्या नेमल्या गेल्या, वर्तमानपत्रांतून रोज बारिक सारीक हकीकती प्रसिद्ध होऊं लागल्या, व मांडवींत स्वच्छता करून रोगाची वाढ हटवितां आली तर पाहावी म्हणून हजारों रुपये खर्चून या भागांतील गटारें उपसण्यास सुरवात झाली. पण प्रथम मुंबई शहरच्या इतर भागांत व नंतर बाहेरगांवीं रोगाची साथ पसरण्याची राहिली नाहीं. प्रथम कांहीं दिवस रोगाचा पूर्वेतिहास पाहतां, मांडवीपर्यंत माग निघे. परंतु कांहीं दिवसांनी मांडवीप्रमाणेंच इतर अनेक गांवींहि रोगाचें मूळ आगर बनून, तेथून नवीन फैलावा होऊं लागला. मुंबई इलाख्यांत अनेक ठिकाणीं हा रोग पसरलेला पाहून आगगाडीनें एकजीव झालेल्या दूरच्या प्रांतांनाहि रोगाची भीति वाटूं लागली. व जें साम्राज्यबंधन चांगल्याकरितां तेंच प्रसंग आला म्हणजे वाइटाकरितांहि बंधनच ठरतें, त्यांतून सुटका होत नाहीं. म्हणून बंगाल व पंजाब या दूरच्या प्रांतांप्रमाणें खुद्द इंग्लंडच्या लोकांनाहि भीति पडली. हा रोग त्यांच्या परिचयाचा होता. १६६५ सालीं त्यानें लंडन शहर बेचिराख करून टाकलें होतें; यामुळे हिंदुस्थानांतला हा पाहुणा फिरून आपणांत आला तर पंचाईत व्हावयाची, या भीतीनें प्लेग निवारणाचे उपाय तावडतोब योजले जाण्याविषयीं विलायतेहून हिंदुस्थानसरकाराला निकडीच्या तारावर तारा येऊं लागल्या.

पुण्यांत प्लेगची पहिली केस सप्टेंबरच्या अखेरीस झाली असावी. मुंबईहून येणाऱ्या लोकांवर, निदान आजारी लोकांवर, म्युनिसिपल लोकांनीं लक्ष ठेवावें असें ठरलें. व ता. ६ आक्टोबरच्या अंकांत केसरीकार लिहितात " येथील कांहीं डॉक्टर लोकांच्या पाहण्यांत मुंबईहून आलेल्या मंडळीपैकीं एकदोन इसमांमध्यें तेथील ज्वर कांहीं सौम्यरूपानें आल्याविषयीं त्यांनीं आम्हास कळविलें आहे."

यापुढें २०–२५ वर्षें ज्यानें पुण्यास अतिशय छळलें व ज्याच्या कारवाईतून अनेक अद्‌भुत व भयंकर असे प्रसंग पुणें शहराला फिरून शेंपन्नास वर्षांनीं अनुभवास आले, त्या कधींहि न विसरला जाणाऱ्या अशा प्लेगच्या उद्भवाचा बहुधा हाच पहिला जाहीर उल्लेख असावा.

जानेवारीच्या प्रारंभीं मुंबईच्या कचेऱ्या कोर्टें वगैरे बंद होण्यास सुरवात झाली. त्याच्या योगानें मुंबईहून बाहेर जाणाऱ्या लोकांची संख्या वाढूं लागली, आणि जी. आय. पी. रेलवेमार्गानें पुण्यास मुंबईहून तापाचे लोक देखील डॉक्टराच्या तपासणीतून चुकून येऊं लागले. फेब्रुवारीच्या प्रारंभापर्यंत सुमारें सव्वाशें प्लेग केसेस रविवार, भाजीआळी, लोणार आळी वगैरे बाजूंस झाल्या. प्लेगविरुद्ध केलेली नाकेबंदी फुकट जाऊन पुण्यांत संसर्ग पसरत चालल्यावर, गांवांत उपचार कोणचे सुरू ठेवावे याचा विचार सुरू झाला. प्रथम सर्वसाधारण माहिती देण्याकरितां केसरींत टिळकांनीं दोन लेख तज्ञ डॉक्टरांकडून लिहवून, म्युनिसिपालिटीच्या उपचारांना स्वतः लोकांकडून काय मदत व्हावी याचा उपदेश सुरू केला. सरकारविरुद्ध लोकांची तरफदारी टिळक नेहमीं करीत असले तरी खुद्द गांवांतील व्यवस्थेसंबंधानें बोलावयाचें झाल्यास, ते लोकांना त्यांच्या अज्ञानाबद्दल व हलगर्जीपणाबद्दल दोष देण्यास माघार घेत नसत. ता. २ व ९ फेब्रुवारीच्या केसरींतील खुद्द अग्रलेखांत कचरापेटीच्या अलीकडे दोन पावलें केर टाकणाऱ्या अडाणी बाईला दोष देण्यापर्यंत टिळकांच्या स्थानिक स्वराज्याच्या महत्त्वाचा पारा चढला होता. " सकाळपासून संध्याकाळपर्यंत कोणी मोरींतील गाळ, कोणी चुलीची राख, कोणी कोपऱ्यांतील केर, कोणी मुलाची विष्ठा, कोणी चिंध्या, कोणी रोडे, कोणी चिपाडें वाटेल तेथें टाकीत असतात, यामुळें केर काढून टाकण्याचें काम म्युनिसिपालिटीच्या हातांत असलेल्या साधनांनीं कधींहि पूर्णपणें तडीस जात नाहीं. " प्रत्येक घरवाल्यानें प्लेगविषाचा कणनाकण आपल्या घरांत येऊं न देण्याची खबरदारी घ्यावी असा उपदेश करून, विनसाधनाच्या माणसांनीं घरचे रोगी प्लेगच्या इस्पितळांत पाठवावेत असाहि सल्ला केसरीनें दिला होता.

पण त्याजबरोबर या सुमारास सरकारी उपायांची जी योजना सुरू झाली होती तिच्यांतील दोष दाखविण्यालाहि टिळकांनीं सुरुवात केली होती. टिळकांची तक्रार अशी होती कीं, योग्य वेळीं शक्य ते उपाय करून प्लेग हिंदुस्थानांत न येण्याचा किंवा निदान मुंबईतून बाहेर न पसरण्याचा इलाज सरकारनें करावयास पाहिजे होता, तो तेव्हां केला नाहीं; व आतां प्लेग चोहोंकडे पसरून ठिकठिकाणीं तो बद्धमूल झाल्यावर कडक उपाययोजना कितीहि केली तरी त्यानें रोग तर थांबणार नाहींच पण लोकांचा मात्र विनाकारण अतिशय छळ होईल. सरकारी डॉक्टर झाले तरी त्यांना प्लेगच्या खऱ्या स्वरूपाचा अंदाज एकदम करवला नाहीं. पिसवांच्या द्वारें रोग पसरतो ही गोष्ट तेव्हां शास्त्रसिद्ध झालेली नसतांहि,

हा रोग स्पर्शसंचारी नाहीं किंवा वातसंचारीहि नाहीं असेंच जवळजवळ सरकारी डॉक्टरांनीं प्रथम मत दिलें होतें. पण वस्तुस्थितीनें त्यांना सपशेल खोटें ठरविल्यामुळें, विशेषतः विलायतेहून नुकसानीच्या भीतीनें गांगरलेल्या सरकाराकडून निकराचे हुकूम येऊं लागल्यावर, इकडील सरकारची एकदम धडपड सुरू झाली; आणि प्रथम जो आळस केला व अनास्था दाखविली तिचा वचपा, सरकारी अधिकाऱ्यांनीं एकदम उग्र स्वरूपाचे उपाय योजून, भरून काढण्याचा विचार केला. पण ही मोठी चूक होत आहे असें केसरीनें वेळींच बजाविलें. तात्पर्य प्लेगचा झालेला प्रसार व स्वरूप लक्षांत घेतां जे उपाय यापुढें योजणें, ते अज्ञानी लोकांच्या हातीं जसे विसंबितां येत नाहींत, तसेंच ते सरकारी अधिकाऱ्यांनींहि आपल्याच हातीं सर्वस्वी घेऊन चालणार नाहीं. तर या कामीं स्थानिक स्वराज्यसंस्थांना सरकारानें योग्य ते अधिकार दिले पाहिजेत, व लोकांच्या चालीरीती लक्षांत आणून, कांहीं त्यांच्या समजुतीनें घेऊन तर कांहीं सक्ती करून, पण एकंदरीनें स्थानिक पुढाऱ्यांच्या सल्लयानें व मदतीनेंच झालें तर हें काम नीट होईल असें टिळकांनीं वेळींच सरकारच्या नजरेस आणिलें.

पण ता. ४ फेब्रुवारी रोजीं कायदेकौन्सिलांत सर्वव्यापक असा एक कायदा मंजूर करवून, जवळ जवळ लष्करी कायद्याच्या थाटाचे अधिकार आपल्या अधिकाऱ्यांना सरकारानें दिले व ते अधिकार अमान्य करणाराला शिक्षा ठरविल्या. हा कायदा लोकमताला धरून नाहीं व त्याची अंमलबजावणीहि त्रासदायक होईल, अशी तक्रार दरभंग्याचे महाराज व नामदार आनंदाचार्लू वगैरे गृहस्थांनीं वरिष्ठ कायदे कौन्सिलांत केली. पण अशा तक्रारी ऐकण्याचा तो काळ नव्हता. पहिल्या क्षणास कायदा, तर दुसऱ्या क्षणास त्या कायद्याअन्वयें प्रांतिक सरकारचे नियम, मिळून सगळी जय्यत तयारी असल्यामुळें, नेहमींच्या पद्धतीप्रमाणें जिल्हा कलेक्टर हे एकदम साम्राज्याचा अवतार बनून सायुध सशक्तिक होऊन बसले. ते करतील ती पूर्वदिशा. त्यांच्या कृत्यावर न्यायकोर्टांत तर फिर्याद चालणेंच नाहीं, पण त्यांना तुम्ही असें कां करितां असें नुसतें विचारण्याची देखील सोय सरकारी नियमांनीं लोकांना ठेविली नाहीं. सरहद्दीवरील क्वारंटाईनपासून तों रोगाच्या संशयावरून चीज वस्तूसकट घरदार जाळण्यापर्यंत, व वाटेल त्या स्थितींत आजारी मनुष्याला वाटेल तेथें नेण्यापर्यंत, सर्व अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना मिळाले होते. आणि कदाचित् त्यांच्याहि हातून व्हावा तितका करडा अंमल होणार नाहीं म्हणून प्लेगचे अनेक स्पेशल अधिकारी नेमण्यांत आले. या विशेष कामासाठीं जो अमलदार नेमावयाचा तो विशेष गुणांनीं युक्त असला पाहिजे हें ओघानेंच प्राप्त होतें, व या गुणांतहि बिनमुर्वतखोरपणा, कडक स्वभाव, दंडुकेशाहीची आवड, लोकमताविषयीं तिरस्कारबुद्धि वगैरे गुणांचा समावेश होतो हें सांगावयास नकोच. ज्या गांवावर सरकारची विशेष अवकृपा त्यावर असल्या गुणांनीं युक्त

अशा अधिकाऱ्याचीच प्रायः नेमणूक व्हावयाची. अशाच प्रकारचे एक अधिकारी पुण्यास लाभल्यामुळें लोकांना पुष्कळच त्रास सोसावा लागला व टिळकांवरहि विशेष प्रकारचीं संकटें ओढवलीं.

अधिकाऱ्यांनीं योजलेला पहिला उपाय म्हटला म्हणजे क्वारंटीनची नाकेबंदी. या नाकेबंदीच्या ठिकाणीं लोकांची राहण्याची, खाण्यापिण्याची वगैरे सोय बिलकुल नसे; व प्रवासी लोक अनमानधपक्यानें मध्येंच पकडले जाऊन इस्पितळांत पडून किंवा लांबच्या प्रवासांत जवळच्या माणसामाणसांची ताटातूट होऊन आपत्ति ओढवे. पण अशीं नाकेबंदीचीं ठिकाणें एकेका रेलवेवर एखाद दुसऱ्या ठिकाणींच असल्यामुळें, आणि प्रवासास निघणें वा न निघणें पुष्कळसें ऐच्छिक असल्यामुळें या क्वारंटीनचा गवगवा इतकासा झाला नाहीं. पण खरी तक्रार रोग्याचें स्थलांतर करण्यासंबंधाची होती व ती मात्र गांवोगावीं सुरू होती. घरीं रोगी ठेवल्यानें घर दूषित होतें, यामुळें रोग्याची वार्ता कळतांच त्याला त्याच्या घरांतून काढून इस्पितळ हे नांव दिलेल्या कोठल्या तरी एखाद्या गैरसोयीच्या जागीं नेऊन टाकावयाचें असा सर्रास प्रकार सुरू होता. याहि बाबतींत केसरीचें लिहिणें विवेचक बुद्धीचेंच होतें. इस्पितळासंबंधानें असलेल्या लोकांच्या विपरीत बुद्धीचा केसरीनें जसा जोराचा निषेध चालविला होता, तसाच रोग्याला उचलून नेण्याच्या बाबतींत आणि इस्पितळांतील गैरव्यवस्थेच्या बाबतींत सरकारावरहि टिळकांनीं कडक टीका चालविली होती. इस्पितळें म्हणजे मनुष्यें मारण्याची जागा अशा समजुतीनें पुण्यामुंबईस ज्या हरतऱ्हेच्या गप्पा कानीं पडत त्या "इतक्या चुकीच्या व मूर्खपणाच्या आहेत कीं, त्यांचा उल्लेख करणें देखील आम्हांस योग्य दिसत नाहीं" असें टिळकांनीं केसरींत स्वच्छ लिहिलें होतें. पण अधिकाऱ्यांनाहि केसरी असें सांगत होता कीं, तुमची सक्ती व तुमची विवेकशून्यता यांच्यामुळें रोग्यांना त्यांचे आप्त किंवा स्नेही हे दडवून ठेवतात किंवा अनेक ठिकाणीं हलवितात यामुळें संसर्ग कमी करण्याचा जो हेतु तो फसून उलट संसर्ग वाढतो. शिवाय मुद्याची गोष्ट म्हणून केसरीनें अशी लिहिली कीं, "सेग्रिगेशनचें म्हणजे रोगी बाहेर काढण्याचें काम लोकांच्या अनुकूलतेवांचून कधींहि सिद्धीस जावयाचें नाहीं."

या कामीं पुणें म्युनिसिपालिटीनें विवेचकबुद्धीचे कांहीं नियम तयार करून सरकारकडे पाठविले पण त्यांनीं ते अमान्य केले. यामुळें सेग्रिगेशनचा नियम नांवाला असतांहि रोग्यांची पळवापळव इतकी होई कीं, जोराचा प्लेग गांवांत असतां हुडकूं गेल्यास इस्पितळांत नेण्याला रोज फार तर एखादा रोगी सांपडे. जें काय व्हावयाचें असेल तें पुण्याचेंच होऊं द्या, समजूत पटून लोक इस्पिळांत गेले तर ठीकच आहे, नाहींपेक्षां सक्ती करूनहि सगळे रोगी तर इस्पितळांत जावयाचेच नाहींत, उलट त्यांची गांवांतल्या गावांत पळापळ होऊन किंवा

त्यांना बाहेर गांवीं नेल्यानें रोग मात्र विनाकारण फैलावेल. संगमाजवळचें इस्पितळ अगदीं कनिष्ठ प्रतीच्या लोकांना चालेल असें होतें. पण मनुष्य वरच्या दर्जाचा व घरचा सुखी संपन्न असला तरी त्यालाहि त्याच जागेंत नेऊन कोंबावयाचें हा न्याय कोठचा ? यावर अधिकारी म्हणत मेल्यावर तरी गरीब श्रीमंत एकाच ठिकाणीं जाळतात कीं नाहीं ? पण हा युक्तिवाद मूर्खपणाचा होता. जीव असेपर्यंत शक्य तितका पैसा खर्च करून रोगी किंवा त्याचे आप्त होईल तितकी चांगली व्यवस्था करण्याची इच्छा धरणारच. यावर अधिकारी म्हणत, लोकांचे जितके दर्जे तितकीं वेगवेगळीं इस्पितळें आम्हीं तरी कशीं काढावीं ? या शंकेचें समाधान हेंच कीं, सरकारला वेगवेगळीं इस्पितळें काढण्याची इच्छा किंवा ऐपत नसेल तर लोकांनीं तीं काढावीं व तीं काढण्याला सरकारनें परवानगी द्यावी. इकडे ही सूचना करीत असतांना तिकडे टिळक हे स्वतः हिंदुलोकांकरितां असें वेगळें इस्पितळ खाजगी प्रयत्नानें काढण्याची खटपट करीतच होते.

पुण्यास प्लेगव्यवस्थेकरितां मुद्दाम नेमलेले अधिकारी मि. रँड यांनीं ता. १७ फेब्रुवारी रोजीं कामाचा चार्ज घेतला. रँडसाहेब सातारा जिल्ह्यांत असिस्टंट कलेक्टर असतां तीन वर्षांपूर्वीं वाईस वाद्यांचे नियम मोडल्याबद्दलचे खटले झाले ही गोष्ट पुण्यांत सर्वांना माहीत होती. साहेब मितभाषी असून त्यांचा अंमल कडक असे, यामुळें त्यांची नेमणूक अशा वेळीं पुण्यास होणें हें लोकांना संकटांतून संकट उद्भवल्यासारखें वाटलें. 'सरकारच्या हल्लींच्या रोखावरून त्यांची अंमलबजावणी बऱ्याच कडकपणानें चालू होईल असा रंग दिसत आहे. पण अशा तऱ्हेच्या कडक अंमलबजावणीचा व्हावा तसा उपयोग न होतां उद्दिष्ट हेतु सिद्धीस जाण्यास अधिकच अडथळा होईल असें सेग्रिगेशनच्या उदाहरणावरून अनुमान करण्यास हरकत नाहीं' असें भाकीत टिळकांनीं साहेब पुण्यास येण्यापूर्वींच करून ठेविलें होतें. शिवाय पुढें काय होणार हें दिसूं लागल्यामुळें टिळकांनीं रँडसाहेब येण्याच्या आधींच पुण्यांतील डॉक्टर लोकांची एक सभा भरवून तिचे ठराव म्युनसिपल कमेटीकडे व सरकारकडे पाठविण्याची व्यवस्था केली होती. यांत एक ठराव असा होता कीं, भीति व चिंता हें रोगाचें एक निमित्त कारण होऊं शकतें, याकरितां सेग्रिगेशन हें सर्वस्वीं म्युनिसिपालिटीच्या हातून व सौम्यपणें होऊं द्यावें. आणि लोकांचीं खाजगी इस्पितळें काढून तीं योग्य चालकांच्या हातीं दिल्यास लोक आपखुशीनें इस्पितळांत जाण्यास मदतच होईल.

येथें हेंहि सांगितलें पाहिजे कीं, प्रथम प्रथम सर्वांचाच समज असा होता कीं, युरोपांतील राष्ट्रें हिंदुस्थानांतील प्लेगच्या वार्तेनें खूप भ्यालीं, व्हेनिस येथें सर्व राष्ट्रीय परिषद भरविण्याचा विचार सुरू झाला, हिंदुस्थानचें नांव दहशतखोर म्हणून बेअब्रूकारक ठरूं लागलें, व याच करितां सरकार घाबरून जाऊन वेड्यासारखें इलाज करूं लागलें आहे. त्यांत दुष्टपणाचा भाग नाहीं, ही गोष्ट केसरींतील

उद्गारांवरून वाचकांस दिसून येत होती. पण कोणच्याहि कारणानें कां होईना गैरशिस्त उपाय योजण्यांत यावे हें कांहीं चांगलें नाहीं. आगगाडींत बसून तिसऱ्या दिवशीं पुण्यामुंबईहून बनारसला प्लेग नेण्याला सरकारला कोणाला हरकत करवत नाहीं, मग घरच्या घरीं एखादा रोगी राहिला किंवा कदाचित् एका पेठेंतून दुसऱ्या पेठेंत गेला तर त्याकरितां एवढें आकाशपाताळ एक करण्याचें कारण काय इतकेंच आक्षेपकांचें म्हणणें होतें. दुर्दैवानें पोलिसांपैकीं कांहीं बदमाष लोक, गांवांत उडालेल्या गडबडीचा फायदा घेऊन, कोणालाहि 'चल तुला प्लेग झाला आहे इस्पितळांत घेऊन जातों' असें म्हणून व मग पैसे घेऊन त्याला सोडून देत. सेग्रिगेशनच्या धोरणाचा हा एक अभावित दुष्परिणाम होऊं लागला.

रोगी घरीं राहिल्यापेक्षां तो इस्पितळांत गेलेला अधिक बरा हें मत स्वतः टिळकांनाहि मान्य होतें, व या बाबतींतील लोकांचे गैरसमज खोडून काढण्याचा ते उघड प्रयत्न करीत असत. ता. १६ फेब्रुवारीच्या अंकांत टिळक लिहितातः— "इस्पितळांत रोगी गेला कीं तो मरतो किंवा त्यास मारतात अशी जी बातमी उठली आहे ती खोटी आहे. इस्पितळ आम्ही प्रत्यक्ष पाहिलें आहे. रोग्याबरोबर एक दोन घरच्या माणसांस तेथें जाऊं देतात. रोग्याच्या खाण्यापिण्याची रहाण्याची व औषधपाण्याचीहि व्यवस्था चांगली असते असें आम्ही खात्रीपूर्वक सांगूं शकतों. घरांतून रोग्यास बाहेर काढणें यांत जें काय वाईट वाटेल तेवढेंच. बाकी व्यवस्था कोणत्याहि प्रकारें वाईट नाहीं. इस्पितळांत रोग्यास कोणास भेटावयाचें असल्यास त्यास बिनहरकत जाऊं देतात. सर्व व्यवहार खुला आहे. त्याबद्दल कोणत्याहि प्रकारची शंका घेण्यास कारण नाहीं." टिळकांना सेग्रिगेशनला अडथळा करावयाचा असता तर ते असें स्पष्ट स्पष्ट जीव तोडून इस्पितळाला कधींहि सर्टिफिकेट देते ना. त्यांचें म्हणणें इतकेंच असें कीं, रोगी जुलमानें किंवा अविचारानें घराबाहेर काढला जाऊं नये. शक्य तेयवर त्याची समजूतच घातली जावी. पण तिकडे लक्ष कोण देणार ? उलट पूर्वी जे अधिकार म्युनिसिपालिट्यांकडे होते, ते मुंबईस एका प्लेग कमिटीकडे देण्यांत येऊन पुण्यास तर ते एकट्या रँडसाहेबांकडेच सोपविण्यांत आले. शिवाय इस्पितळांत रोगी जितके जावे तितके जात नाहींत असें आढळून आल्यावरून, घरांतील रोगी हुडकून काढण्याकरितां तपासणी सुरू करण्याचें ठरलें. पण या तपासणीनें सेग्रिगेशनची भीति अर्थातच दुणावली. गव्हर्नरसाहेबांनीं सांगतांना असें सांगितलें कीं, कोणी रोगी छपवून ठेवील तरच त्यास सक्तीनें बाहेर काढण्यांत येईल. याचा अर्थ रोगी उघड घरीं ठेऊन नीट त्याची शुश्रूषा होत असेल, व संसर्ग टाळण्याचे सामान्य उपाय योजण्यांत येत असतील, तर रोगी घरींच राहूं द्याव-

याचा. पण हे गव्हर्नरसाहेबांचे शब्द त्यांच्या तोंडांतच राहिले आणि अंमल मात्र सर्रास सुरू झाला. पण अजून टिळकांनीं आशा सोडली नव्हती.

'यदिसमरमपास्य नास्तिमृत्योर्भयमिति युक्तमितोन्यतः प्रयातुं' या अश्वत्थाम्याच्या उक्तीची आठवण देऊन ते लोकांना असें म्हणत कीं, आपला गांव सोडून उगाच परगांवीं जाऊन रोग फैलावण्यांत अर्थ काय? परवांपर्यंत गांवाबाहेर जितके लोक गेले तितके होळकराच्या दंग्याच्या वेळींहि पुण्यांतून गेले नसतील. मग हा वाढत चाललेल्या हतवीर्यतेचा प्रभाव म्हणा, अगर अज्ञानाचा किंवा गैरसमजाचा म्हणा. जेथल्यातेथें राहून संसर्गनिरोधाच्या योग्य तजविजी कराव्या व शेवटीं ईश्वरावर भंरवसा ठेवावा. असा उपदेश करण्याला टिळकांना खरी पात्रता होती, कारण ते स्वतः प्लेगच्या सगळ्या दिवसांत कुटुंबांतील सर्व माणसांसह पुण्यासच राहिले होते. येवढेंच नव्हे तर भर प्लेगच्या दिवसांत ते वाटेल त्या ठिकाणीं जात, वाटेल त्या मंडळींत मिसळत व वेळीं अवेळीं जाग्रणें करूनहि कार्यास सिद्ध असत.

पुण्यांत प्लेगचा कारभार वाढला, तेव्हां खडकी लष्कर वगैरे हद्दींसह पुण्या-करितां एक प्लेगकमेटी मुंबईप्रमाणें नेमण्यांत आली; व रँडसाहेबांच्या मदतीस कर्नल फिलिप्स व कॅपटन बेव्हरीज हे दोन लष्करी अधिकारी दिले गेले. मग काय विचारतां? आधींच उल्हास, त्यांत फाल्गुन मास. लष्करी अधिकाऱ्यांच्या बरोबर लष्करी सक्ति, लष्करी शिपाई, व लष्करी न्याय याहि गोष्टी आल्या हें सांगावयास नकोच. मार्चच्या दुसऱ्या आठवड्यांत दडवून ठेवलेले रोगी हुडकून काढण्याचें म्हणजे प्लेगच्या तपासणीचें काम जोरांत सुरू झालें व एका आठा दिवसांत ही तपा-सणी इतकी बोकाळली कीं, ता. १६ मार्चच्या केसरींतील अग्रलेखाला ' पुण्यांत सध्यां चालू असलेला धुमाकूळ ' असा मथळा टिळकांना द्यावा लागला; व या लेखांतलें पहिलेंच वाक्य असें लिहावें लागलें कीं:—"सांथीच्या रोगामुळें यंदा शिमगा पुण्यास आठदहा दिवस आधींच सुरू झाला असें हल्लीं ठिकठिकाणीं घरांतील कापडाच्या वगैरे ज्या होळ्या होत आहेत त्यांवरून वाटण्याचा संभव आहे."

तपासणीला लष्करी लोक आले त्यांत गोऱ्या सोजिरांची एक पार्टीहि आली. ही गोष्ट अदमासाबाहेर घडली, तथापि शक्य तेथवर या योजनेसहि नांवें न ठेव-ण्याच्या निश्चयानेंच जणुं काय टिळक असें लिहीत कीं, सोजिर लोक जाऊं नये अशा कित्येक ठिकाणांत जातात. पण या लोकांना तुमचें हें देवघर किंवा स्वयंपाकघर काय माहीत? खरी चूक असेल तर ती सोजिरांबरोबर तपासणीस मदत करण्यास जाणाऱ्या हिंदी स्वयंसेवकांचीच आहे. लष्करी लोकांच्या हातीं कारभार गेला तरी जुलूम होऊं नये अशी गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट यांची इच्छा अत्यंत उत्कट होती यांत शंका नाहीं. टिळकांनीं याबद्दल केसरींत त्यांचे पुनः पुनः आभार मानिले आहेत. सोजीर येऊं नये ते आले पण आतां त्याबद्दल तक्रार करण्यांत अर्थ नाहीं. त्यांच्याबरोबर हिंदी स्वयंसेवकांना जाण्याची सवलत दिली आहे तिचा

आपण भरपूर फायदा घ्यावा म्हणजे झालें, असा उपदेश टिळकांनीं चालविला होता. त्यांचें कर्मयोगित्व यांतच दिसून येत होतें. पण तपासणीच्या नांवानें जें लष्करी अवडंबर माजविलें जाई व धुमाकूळ घातला जाई त्याचाहि केसरींतून निषेध होत होता. प्रथम रोग्यांकरितां तपासणी सुरू झाली ती लपवून ठेविलेल्या प्रेतांकरितां म्हणून पुढें फैलावली. कोणी रोगी लपवून ठेवील पण प्रेत कोण कसें किती दिवस लपवून ठेवील ? पण नाहीं. शिवाय दुसरें असेंहि होऊं लागलें कीं घरचा रोगी किंवा प्रेत एकदांच जुलमानें उचलून नेलेलें पुरवलें, पण अशा घरावर एकदां तांबड्या रोगणाची खूण पडली म्हणजे मग तें दूषित घर साफ करण्याकरितां लष्करी पार्टी येई, तिच्या हालून होणारी नासधूस नको ! तपासणीला सोजिर निघाले तरी बरोबर हिंदी लोक असत. पण घर धुण्याची पार्टी वाटेल तेव्हां येई व घरांतील वाटेल तो माल बाहेर काढून जाळून टाकीत किंवा फिरून उपयोगांत आणतां न येईल अशा रीतीनें स्वच्छ करीत! शिवाय मोकळी सुटलेली ही पार्टी तांबडी खूण पडलेल्या घराबरोबरच नुसतीं कुलपें पडलेल्या घरांतहि जबरीनें शिरे. लोक धांदलीनें जीव कसातरी बचावण्याकरितां चीजवस्त मागें टाकून निघून जात, व या धुलाईपार्टीला अशा घरांतून वाटेल तसा हात मारावयास सांपडे. लोक कर्तव्यभ्रष्ट होऊन घरें सोडून गेले याकरितां त्यांना ही शिक्षा म्हटलें तर गोष्ट वेगळी, पण प्लेगपार्ट्यांनीं लोकांच्या मालमत्तेचें पुष्कळ नुकसान केलें ही गोष्ट अगदीं उघड होती.

मार्चच्या पहिल्याच आठवड्यांत टिळकांच्या खटपटीनें पुण्यास हिंदू लोकांकरितां एक वेगळें प्लेग इस्पितळ उघडण्यांत आलें. तें वरच्या प्रतीच्या हिंदू लोकांकरितां होतें. तथापि तें केवळ ब्राह्मणांकरितां राखून ठेवलेलें नव्हतें. इस्पितळाला वर्गणी देणाऱ्यांच्या पहिल्या यादींत प्रथमच डॉ. भांडारकर, रावसाहेब शिरोडकर कॉंट्रक्टर वगैरे गृहस्थांचीं नांवें आढळतात. पहिल्याच प्रयत्नास ८०० रुपये वर्गणी गोळा झाली. इस्पितळाची व्यवस्था गांवांतील अनेक वर्गांच्या पुढाऱ्यांच्या कमेटीकडे देण्यांत आली होती. तींत काळूराम भाऊ मनसाराम, पां. रा. बारी, परशुमराम स्वूपचंद वगैरे मंडळी होती. औषधपाण्याची सर्व व्यवस्था डॉ. गर्दे यांचे भाचे, पुण्यांतील नवीन डॉक्टर विष्णु वामन भागवत, यांचेकडे सोपविली होती; व त्यांच्या मदतीला डॉ. सहस्रबुद्धे महाजन आणि मेडिकल स्कूल मधील वरिष्ठ वर्गांतील विद्यार्थी केतकर, वैद्य, जोग हे असत. अधिकाऱ्यांनीं व्यवस्थेसंबंधानें प्रथम बऱ्याच हरकती घेतल्या. पण अखेर इस्पितळ सुरू झालें, व पहिल्याच दिवशीं इस्पितळांत चौदा रोग्यांची नोंद झाली. यापैकीं बरेच आपखुशीनें आले होते ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. शिवाय जे कोणीं जुलमानें आले होते त्यानींहि पण सरकारी इस्पितळापेक्षां हें खासगी इस्पितळच पसंत केलें यावरून टिळकांची या बाबदींतली टीका व योजना दोन्हीं बरोबर होहीं हेंच सिद्ध होतें.

इस्पितळांत वर्गणीदारांना आपल्या घरचा मनुष्य पाठविण्याचा पहिला हक्क असे. इतरांना प्रवेश फी दहा रुपये व रोज एक रुपया फी द्यावी लागे. इस्पितळांत रोगी आला व त्याला स्वतःच्या खात्रीच्या डॉक्टराचें औषध घ्यावयाचें असलें तरी त्याला तशी परवानगी असे.

तात्पर्य इस्पितळाचे नियम एकंदरीनें सौम्य व सोईचे असेच होते व ते लौकरच लोकप्रिय झालें. इस्पितळास जागा अगदीं शहराजवळ पण खुल्या मैदानांत मिळाली होती. हल्लीं पी. वाय. सी जिमखाना व डेक्कन जिमखाना यांची उत्तर दिशेची हद्द मिळते त्या खडकाळ पटांगणांत खाणीलगत हें इस्पितळ बांधण्यांत आलें होतें. इस्पितळाच्या इमारती सामान्य पत्र्याच्या व तट्टयाच्याच केल्या होत्या. तथापि रोग्यांना तेथें एकप्रकारें घरीं असल्यासारखेंच वाटे. याचें कारण इतकेंच कीं, त्यांचीं माणसें शुश्रुषेला त्यांचेजवळ असत; व डॉक्टर वगैरे लोक त्यांना मोठ्या ममतेनें वागवीत व गैरशिस्त असा प्रतिबंध कोणताच नव्हता. मार्च महिन्याचे अखेरीस पुण्यांतील प्लेगची मृत्युसंख्या हळू हळू कमी होऊं लागली, व दोन महिन्याच्या अनुभवानें इस्पितळांतील राहणीहि लोकांच्या परिचयाची झाली. शिवाय इस्पितळ गांवानजीक असल्यामुळें नागरिक लोक पूसतपास करण्याकरितां मुद्दाम तिकडे जात. यामुळें इस्पितळाचे भयाण स्वरूप जाऊन तो एकप्रकारें खुशालीच्या सार्वजनिक अड्ड्यासारखाच होऊन बसला. दहा हातांवर प्लेगचे रोगी असतांहि मित्रमंडळी खुशाल जेठे मारून सर्व प्रकारच्या गप्पागोष्टी सांगत बसत. तेथें हंसणें खिदळणेंहि चाले, चहा कॉफीहि होई, व परिस्थितींत शक्य तेवढा विनोदहि माजे. स्वतः टिळकांच्या दिवसांतून एकदोन खेपा तरी या इस्पितळाकडे होत. तपासणी पार्टीबरोबर ते स्वतः कधीं फारसे हिंडावयास गेले नाहींत. परंतु रँडसाहेब किंवा प्लेग कमेटीकडे लोकांच्या तक्रारी घेऊन जाणें व त्यांची दाद लावणें, याकरितां एकदोन दिवसांनीं प्लेग कचेरीकडे त्यांच्या खेपा होतच असत.

खाजगी इस्पितळाची सोय साधारण मनाप्रमाणें झाली, पण इतर प्लेगव्यवस्थेंत लोकांच्यातर्फे बोट शिरकण्यासहि जागा उरली नव्हती. आमच्या घरीं आम्हांस सुखानें कां मरूं देत नाहीं असें लोक विचारीत; व त्याला खरें स्पष्ट उत्तर असें होतें कीं, हिंदुस्थानच्या व्यापाराला धक्का बसण्याचा संभव आहे म्हणून ठराविक मुदतींत प्लेग धुवून काढावा असा विलायतसरकारचा सक्तीचा हुकूम झाला आहे याकरितां ! दिरंगाईची गोष्ट असती तर कदाचित् लोकांची सल्लामसलत घेऊन प्लेगचा कारभार झाला असता. उलट पुण्यांतील पुढाऱ्यांचें या प्लेगच्या कडक कारभारांत अंग आहे हा लोकांचा गैरसमज होता, तोच स्पष्ट शब्दांनीं लिहून टिळकांना धुवून काढावा लागला. लोकांच्या हातीं व्यवस्था असती तर लष्करी शिपायांचें कारणच नव्हतें, पण सर्व कारभार सरकारच्या मार्फत चाललेला म्हणून वाटेल

तितकें लष्कर व वाटेल तशी सक्ति. 'तपासणी करण्याकरितां दररोज जें अवडंबर घालण्यांत येतें तें पाहिलें म्हणजे एक रोगी घराबाहेर काढण्यास मल्हाररावाला बडोद्याहून काढण्याचे वेळीं जी तयारी केली होती त्यापेक्षांहि येथील अधिकारी जास्त तयारी करीत आहेत असें दिसून येतें.' असें वर्णन केसरीनें केलें होतें.

रोगी किंवा प्रेत घरातून हलविल्याबरोबर दुसरी एक आपत्ति येई ती अशी कीं, स्वाराच्या गेटाजवळ सेग्रिगेशन कँप म्हणून छावणी केली होती तिकडे उरलेल्या घरच्या माणसांना तावडतोब घेऊन जात. या छावणींत लोकांना दहा दिवस रहावें लागे, व तेथें राहण्याची जेवणाखाण्याची वगैरे सर्व प्रकारें अव्यवस्था होती. तेथेंहि फिरून व्यवस्था करणें लोकांच्या पुढाऱ्यांकडेच आलें. यामुळें तेथेंहि पुढाकार घेऊन टिळकांना व्यवस्था करावी लागली. तेथें दुकानें उघडणें, खाना-वळी घालणें, फक्त दूषित ठरतील त्यांचेंच कपडे धुतले जावे अशी तक्रार करणें, हीं सर्व कामें जिकीरीची असत, पण तीं करावीं लागत. ही व्यवस्था एका रिलीफ कमेटीच्या नांवानें सुरू झाली. त्यांत पुण्याचे वृद्ध पेन्शनर बापू पुरुषोत्तम जोशी, गोविंद कृष्ण टिळक वकील, गणपतराव साठे पेन्शनर जेलर वगैरे मंडळी होती. सेग्रिगेशन कँपमध्यें स्वतंत्र सोपे बांधणें जरूर होतें, पण त्यावर प्लेग कमेटीकडून व्हावा तितका खर्च झाला नाहीं. त्याकरितांहि लोकांकडे वर्गणी मागावी लागली. वास्तविक प्लेग व्यवस्थेचा सर्व खर्च सरकारी हुकमानें चालत असे व त्याचा बोजा अखेर पुणें म्युनिसिपालिटीवरच पडावयाचा अशी समजूत होती. असें असतां हा सर्व खर्च कशावर किती करावा हें नुसतें सुचविण्यालाहि गांवच्या लोकांना हक्क राहिला नव्हता. प्लेग कमेटीच्या कानींकपाळीं टिळक प्रभृतींनीं सकाळ संध्याकाळ कटकट चालविल्यामुळें प्लेग व्यवस्थेच्या प्रत्येक खात्यानिहाय लेखी नियम प्लेग कमेटीला प्रसिद्ध करावे लागले. तथापि नियमांपेक्षां त्यांच्या अम्मलबजावणींतच खरी जिकीर असते. या कँपमध्यें जाणें येणें हें तुरुंगाप्रमाणें परवान्यानेंच चाले. आंत सांपडलेल्या लोकांना कैद्यांचें स्वरूप तर इतकें आलें होतें कीं, अजाण शिपाई कँपच्या कंपाऊंडावरून बाहेरच्या मनुष्याशीं बोलण्यालाहि आंतील मनुष्यांना एखादेवेळीं हरकत करीत! जणूं काय तोंडच्या हवेबरोबर रोगाचा संसर्ग अशा उघड्या हवेत एकाचा दुसऱ्याला लागला असता! तसेंच सर्व शहराला एक-प्रकारचा लष्करी वेढा कांहीं दिवस देण्यांत आला असून रात्रीं पासाशिवाय मनुष्यांना आंतबाहेर सोडीत नसत. गांवातील रोगी बाहेर पळून नेऊं नयेत हा वरील व्यवस्थेचा खरा हेतु. पण धडधाकट मनुष्य आपल्या पायानें बाहेरून गांवांत चालत येत असला तर वास्तविक त्याला हरकत होण्याचें काय कारण? पण जवळ 'पास' नसल्यानें कित्येक लोकांना रात्रीच्या रात्रीं बाहेर झाडाखालीं काढाव्या लागत. अशी स्थिति झाल्यानें प्लेगव्यवस्थेला लोक मोंगलाई हें नांव देऊं लागले!

लॉर्ड सँढर्स्टसाहेब प्रारंभीं एकदां पुण्यास येऊन गोड बोलून लष्करी व्यवस्थेंत कोणत्याही प्रकारचा जुलूम होऊं नये असें सांगून निघून गेले. पण पुढें अनुभव मात्र पावलोपावलीं वेगळा आला. हा रोग भयंकर असल्यामुळें त्याला उपायहि जालीमच पाहिजेत अशी टिळकांची मनांतून पक्की खात्री असल्यामुळें, पुण्यांत चालू असलेल्या उपायांना तत्वतः त्यांची हरकत नव्हती. ते फिरून फिरून केसरींत लोकांना अप्रिय असलेली गोष्ट स्पष्टपणें लिहीत. ता. १३ एप्रिलच्या अंकांत खालील वाक्य आढळतें—" या असल्या राक्षसाला ( प्लेगचा ) विरोध करण्यास राक्षसीच उपाय पाहिजे, व तो सांपडेल तेथें त्यास धरून खणून काढला पाहिजे. हल्लीं घरें सफाई करण्याचें वगैरे जें काम गांवांत चाललें आहे तें शास्त्रोक्त आहे; व हें काम जर अशा रीतीनें चाललें नसतें तर पुण्याच्या रस्त्यांत प्रेतें पडण्याची वेळ आली असती!"

पण हे उपाय झाले तरी लोकांची समजूत घालूनच अमलांत आणावे आणि स्थानिक पुढाऱ्यांची मदत घेतल्यास तशी समजूत पडणें शक्य आहे असा टिळकांना भरंवसा होता. उलट गांवांतील प्रत्येक मनुष्य रोग छपवितो अशा समजुतीनें अंमल चालवावयाचा तर प्रत्येकाच्या मागें एकेक पोलिस लावल्याशिवाय गत्यंतर उरत नाहीं, व ही गोष्ट अर्थात् अशक्य कोटींतील होय. गांवच्या पुढाऱ्यांच्या हातीं व्यवस्था दिल्यानेंच केवळ निम्मा अधिक तक्रारी मिटल्या असत्या, व उपाययोजनेंतहि कमी पडलें असतेंच तर फारच थोडें कमी पडलें असतें. पण काळ्या लोकांवर विश्वास टाकावयाचा नाहीं, गोऱ्यांच्या हातूनच सर्व काम करावयाचें, असें धोरण प्लेग कमेटीनें ठरविल्यामुळें सर्व बखेडा झाला. गोरे सोजिर लोक कसे असतात व एका शिस्तीच्या गुणामागें त्याच्याबरोबर किती अवगूण त्यांच्यांत येतात हें कोणास सांगावयास नकोच. तपासणीला निघाले म्हणजे बरोबर आलेल्या स्वयंसेवकाशीं ते कधीं नीट बोलावयाचे नाहींत. तो कारणानें दोन पावलें मागें राहिल्यास त्याकरितां थांबावयाचे नाहींत. वेडावणें, माकडचेष्टा करणें, भलतेंच कांहीतरी बोलणें, दटावणें, भलत्याच्याच अंगाला हात लावणें, धक्के देणें, कारण नसतांहि इच्छेप्रमाणें हव्या त्या जागेंत शिरणें, केवळ कौतुक बुद्धीनें घरांतलि हवी ती जिन्नस उलथीपालथी करून किंवा उघडून पाहणें, चोरट्या बुद्धीनें वस्तु उचलून खिशांत घालणें वगैरे कितीतरी गोष्टी ते कांहीं अज्ञानानें तर कांहीं उन्मत्तपणानें करीत. हिंदी शिपाई यापेक्षां पुष्कळ सौंधेपणानें वागले असते किंबहुना तसे वागत होतेहि. मुसलमान झाला तरी त्याला हिंदूच्या घरींदारीं कसें वागावें हें सहजच कळतें. उलट हिंदू शिपाई असला तरी तो मुसलमानाच्या घरांतील गोषा वगैरे सहजच सांभाळतो. शिवाय अधिकार देऊन हिंदी स्वयंसेवक प्लेगकमेटीनें आपल्या बरोबर दिले आहेत असें हिंदी शिपायांना एकदां

कळलें म्हणजे ते अदबी राखून वागत. व सर्वांत मोठी गोष्ट म्हटली म्हणजे हिंदी शिपायांना स्वयंसेवकाची भाषा समजूं शकते.

या सर्व गोष्टी प्लेग कमेटीच्या लक्षांत आल्या नसत्या असें नाहीं. पण इतका विचार करतो कोण? होईल तितक्या झटपटीनें शहरांतून प्लेग खणून काढावयाचा, मग त्यांत काय होईल तें होवो इतकेंच त्यांचें पहाणें. बिचारे स्वयंसेवक सोजिरांच्या हातून घडणारे प्रमाद डोळ्यांनीं पहात पण त्यांना हूं कीं चूं म्हणण्याची सोय नव्हती. फार तर नोट बुकांत तक्रारी टिपून घ्याव्या व नंतर त्या प्लेग कमेटीपुढें मांडाव्या. पण तेथेंहि तोच नमुना. कोणी तक्रार केली तर यांत काय आहे त्यांत काय आहे असें म्हणून सर्वांचा निकाल लागे. अर्थात् या अपमानाची चीड छळाच्या भरीस पडे. टिळकांनीं एक वेळ स्पष्ट लिहिलें कीं, "आम्हीं गरीब झालों म्हणून या सर्व गोष्टी चालल्या आहेत." या एका शब्दांत सर्व सार आलें. पण आंतून राग कितीहि धुमसत असला तरी टिळक या बाबतींत पुष्कळच जपून लिहीत ही गोष्ट, परिशिष्टांत दिलेल्या सुधारकांतील उताऱ्यांवरून दिसून येईल. प्लेगची मृत्युसंख्या दिवसेंदिवस आपोआप कमी होऊं लागली होती, यामुळें तरी विशेष सक्ती न केली असतांहि प्लेग कमी होईल हें तारतम्य प्लेगकमेटीला राहावयास पाहिजे होतें. पण तें राहिलें नाहीं. उलट कमेटीची शिस्त सरावानें अधिकाधिक बसूं लागली तसतशी तिच्या अमलदारीची कदरहि वाढूं लागली.

एप्रिलच्या प्रारंभीं रा. ब. विठ्ठल नारायण पाठक, डॉ. गर्दे, बापू पुरुषोत्तम जोशी, स्वतः टिळक वगैरेंच्या सह्यांनीं प्लेग कमेटीकडे एक रीतसर तक्रार अर्ज करण्यांत आला. त्यांत लोकांवर जुलूम न होतां उपाययोजना चांगली कशी होऊं शकेल याचें सविस्तर वर्णन दिलें होतें. सह्या करणारांनीं असेंहि लिहिलें होतें कीं आम्ही तपासणी पार्टीबरोबर मधून मधून हिंडले फिरलेले असून आमच्या प्रत्यक्ष अनुभवानें या गोष्टी लिहीत आहों. अर्जाच्या शेवटीं असेंहि लिहिण्यांत आलें कीं, केवळ सहकारिता करण्याच्या दृष्टीनें आम्ही हें लिहीत आहों. तपासणी वगैरे उपायांना लोकांची किंवा आमची तत्वतः बिलकुल हरकत नाहीं, पण प्रत्यक्ष कृतींत जो त्रास होतो तो टळावा इतकीच आमची इच्छा आहे. पण रँडसाहेबांच्या डोक्यांत पुण्याच्या लोकांबद्दल दूषित पूर्वग्रहानें ठाणें दिलेलें, यामुळें त्यांनीं कोणतीच गोष्ट मनावर घेतली नाहीं. मार्चच्या प्रारंभीं टिळकांनीं एक स्वतंत्र 'मेमोरँडम' लिहून गव्हर्नरसाहेबांकडे पाठविला होता, व त्यांनीं तो तसाच रँडसाहेबांकडे पाठवून दिला. पण टिळकांना बोलावून घेऊन त्यांनीं कधीं असें नाहीं असें याची चर्चाहि केली नाहीं. एप्रील अखेर रोग पुष्कळच हटला. पण दोन महिन्याच्या अनुभवानें अशी स्थिती झाली कीं, पुण्यातील कोणीहि सभ्य गृहस्थ स्वयंसेवक म्हणून

प्लेग पार्टीबरोबर यापुढें जाण्यास खूष नव्हता. स्वतः रँडसाहेब गांवात कधींच हिंडले नाहींत. त्यांना कामाचा उरक कमी, व त्याहीपेक्षां काम करण्याची करामत कमी. मुंबईचे जनरल गॅटेकर वगैरे प्लेगकमेटीचे अधिकारी सुजाण होते. लष्करी अमलदार होऊनहि त्यांनीं लोकाशीं जितकें सहानुभूतीचें वर्तन ठेविलें तितके, रेव्हेन्यु ऑफिसर या नात्यानें लोकांत इरइमेश वागणाऱ्या या सिव्हिलियन साहेबांनीं ठेविलें नाहीं. या प्रसंगीं टिळकांना क्राफर्ड साहेबांची आठवण होऊन त्यांनीं केसरीत असें स्पष्ट लिहिलें कीं, क्राफर्डसाहेब लांचखाऊ तर खरेच पण ते जर यावेळेस असते तर लोकांस खूष ठेऊन त्यांनीं सरकारचें कामहि उरकून दिलें असतें.

पुण्याच्या स्थितीबद्दल टिळक मनांतून अशा रीतीनें तडफडत असतां ते नुसत्या प्लेग कमेटीसच दोष देत होते असें मात्र नाहीं; तर सुशिक्षित लोकांनाहि ते तितकाच दोष देत होते ही गोष्ट विसरतां कामा नये. ता. २० एप्रिल १८९७ च्या अंकांत त्यांनीं याविषयीं आपलें खरें मत स्पष्ट शब्दांनीं प्रगट केलें आहे; व तें याकरितां कीं सुशिक्षित लोकांनीं या वेळीं एकत्र होऊन जर आपलें कर्तव्य योग्य रीतीनें केलें असतें तर रँडशाहीला पुष्कळ आळा बसला असता, किंवा निदान तिजविरुद्ध गवगवा तरी अधिक झाला असता व तो उपयोगी पडला असता, असें त्यांच्या मनानें पक्कें घेतलें होतें. टिळकांचें म्हणणें असें कीं मारवाडी गुजराथी लोक व्यापार मागें टाकून प्लेगला भिऊन परदेशी गेले पण ते बोलून चालून अशिक्षित. पण सुशिक्षित लोक बायकापोरांच्या काळजीकरितां गांव टाकून निघून गेले या गोष्टीचें समर्थन करितां येत नाहीं. ही स्थिति प्लेगपेक्षांहि अधिक भयंकर. प्लेगसारखें संकट एखादेवेळीं येतें तेव्हां जर आपली व्यवस्था आपणास जुटीनें करवली नाहीं तर ती एकप्रकारें आपली नालायकीच होय. प्रत्येक पेठेतून शेसवाशें शिकलेले लोक काम करण्यास निघाले असते तर निम्मा जुलूम कमी झाला असता. हिंदू हास्पिटल गरीबांकडून फी न घेतांहि चालवावयास पाहिजे होतें, व तेथील देखरेख सर्वांनीं वाटून घेतली असती तर सहज निभावली असती. पण हास्पिटल टिळकांनी सुरू केले व चालविलें त्याला मदत कोण करतो अशा विचारानें एका विशिष्ट वर्गाचे लोक गप्प बसले होते. कॉंग्रेसचे व्हॉलंटियर होण्याला जो तो पुढें; कारण तेथें मिरवावयास व मौज पहावयास सांपडते. पण प्लेगच्या संकटांत स्वयंसेवक होण्याला पाय मागे. हें टिळकांनी एकाच पक्षास उद्देशून लिहिलें नव्हतें. दोन्ही पक्षातील लोक गांव सोडून बाहेर गेले होते. सरकारी नोकरांना प्लेग ड्यूटी करावयास सांगितली असती तर ती त्यांना करावयास लागली नसती काय ? व पुढें कांहीं वर्गांनी ती खरोखरच करावी लागली. 'जुलूम जुलूम तो काय होणार ? तुम्हास तो असह्य झाला असला तर प्लेगनें मरण्यापेक्षां या जुलुमानें का मराना ? सरकारचा तुमच्यावर विश्वास नाहीं. तुमच्या अकलेची व कराम-

तीची त्यांस जरूर नाहीं.' लोकांचे जीव वाचविण्याकरितांच जर सरकारची ही सर्व खटपट म्हणावी, तर दुष्काळांत सर्व देशभर मिळून प्लेगपेक्षां कितीतरी अधिपट मृत्युसंख्या होत होती. अर्थात् परोपकाराइतकाच या प्लेगच्या व्यवस्थेत सरकारचा स्वार्थहि होता. आणि स्वार्थाकरितां त्यांनीं लोकांना काय वाटेल तो त्रास झाला तरी चालेल पण सक्तीनें प्लेग खणून काढावयाचा असें ठरविलें. आतां हें त्यांचें धोरण कोण बदलूं शकणार? पण लोकांना इतकेंच करतां आलें असतें कीं, आपण गांवांत राहून जुलमाला थोडा तरी प्रतिकार व्हावा व तो हटावा. पण लोकांनीं आपलें कर्तव्य न केल्यामुळें झाला याहून अधिक जुलूम होत नाहीं हा ईश्वरी प्रसादच समजला पाहिजे! खुद्द पुण्यांत ही स्थिति मग खेडे-गांवांतून काय होईल याची कल्पना करितां येते इत्यादि. "इंग्रजी सोजिरांस व इंग्रजी मिशनरी बायांस प्लेगच्या भरवस्तींत जाऊन लोकांस मदत करण्याइतकी हिंमत आहे. व ते मदत करितात तीं आम्ही डोळ्यांनीं पहात असतां, आम्ही आपल्या गरीब लोकांस सोजिरांचे ताब्यांत देऊन भराभर आपल्या जिवाच्या रक्षणार्थ निघून जातो, तेव्हां आपल्या राष्ट्राचें नशीब उघडण्याची वेळच अद्याप आली नाहीं म्हणून एकप्रकारच्या तीव्र निराशेनें स्वस्थ बसावें लागतें."

पुण्याबाहेरहि प्लेगचा जुलूम होता, तथापि खुद्द पुण्यांत जी एक प्रकारची कदर लोकांना भासली तितकी बाहेर भासली नाहीं. बाहेरगांवीं प्लेगचा कारभार कडक नियमांनीं होत असला तरी अमलबजावणी करणार पाटील कुळकर्णी किंवा फार तर प्लेग मामलेदार. तो खेडेगांवांत जुलूम करावयाला स्वतःच थोडासा भितो किंवा विवेकशील बनतो. निदान त्याचें हातांपायां पडलें असतां कारभार थोडा सौम्य होऊं शकतो. पण पुण्यांतील रँडशाहींत यांपैकीं एकहि शक्य नव्हतें. बाहेरचे लोक केसरीकडे पत्रें पाठवून उघड विचारीत कीं, ही मोंगलाई पुण्यांतील लोक कशी चालूं देतात? त्याचा खुलासा ता० २७ एप्रिलच्या अंकांत टिळकांनीं स्पष्ट शब्दांनीं दिला आहे. पुण्यांत लष्कर इतकें जमविलें होतें कीं, पेशवाई गेली तेव्हां सुद्धां एल्फिन्स्टनसाहेबाजवळ बेटावर इतके शिपाई नसतील. अर्थात् मुंबई व कराची प्रमाणें पुण्यालाहि जुलूम सहन करणें प्राप्त झालें. आगळि-कींबद्दल कोर्टांत फिर्याद करतां येत नाहीं. कारण १८९७ च्या प्लेग कायद्यानें तो मार्ग बंद करण्यांत आला. अर्ज केला तर तो जुमानीत नाहींत आणि दांडगाई केली तर इतक्या सैन्यापुढें ती चालत नाहीं. यामुळें सरकार ज्या गोष्टी स्वतः कर-णार त्या लोकांनीं आपण होऊनच करणें, येवढाच इलाज शिल्लक राहिला होता. पण स्वतः लोकांनीं तेंहि केले नाहीं! टिळक वैतागानें लिहितात "एक लहानसें हास्पिटल उभारण्यापुरते व चालविण्यापुरते पैसे सगळ्या पुण्यांत गोळा झाले नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे." दांडगाईला प्रतिकार करावा ही शिक-वण ते देत नव्हते असें नाहीं. सोजिर लोक नियमाबाहेर वागत असतील तर

त्यांना प्रतिबंध करणें हा गुन्हा नाहीं, तसेंच चोरी करणाराचा हात खुशाल धरावा, मग तो सोजीर असला म्हणून काय झालें? असें टिळकांनीं केसरींत स्पष्ट लिहिलें होतें " कांहीं दिवसांपूर्वी दहापांच सोजिरांनीं रास्त्याच्या पेठेंत रात्रीं जाऊन कांहीं गडबड केली व त्याबद्दल त्यांस चांगला चोप बसून त्यांपैकीं एकजण इस्पितळांत मरण पावला असें समजतें. परंतु याकरितां जसें कोणास जबाबदार धरतां आलें नाहीं तसेंच इतर बाबतींतहि होणार आहे. मात्र आपण कायदेशीर रीतीनें वागलें पाहिजे. तसें वागणें कांहीं मोठें कठीण आहे असें नाहीं. लोक जर आपापल्या हक्कास जागृत राह-तील तर कितीहि सक्तीचे उपाय सरकारनें योजले तरी त्यांत जो फाजिलपणा होतो तो होणार नाहीं अशी आमची खात्री आहे. पण चांगले चांगले लोक गांव सोडून गेल्यानें आणि गांवांत राहिलेल्या गरीब लोकांत असावें तितकें धाडस नसल्यानें या जुलमाचा प्रतिकार आमच्या हातून होत नाहीं ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे............हल्लीं जी मोगलाई किंवा रँडशाही सुरू आहे ती केव्हांहि फार दिवस टिकणें शक्य नाहीं, व लोक कितीहि गरीब असले तरी हा त्रास ते एकसारखा सोसून घेतील असें आम्हांस वाटत नाहीं. करितां प्लेगनें मेलों तर मेलों, पण या त्रासांतून आपली सुटका करून घेऊं, असें लोकांस वाटूं देण्यापर्यंत लॉर्ड सँढर्स्ट यांनीं त्यांचा अंत पाहूं नये अशी त्यांस आमची विनंति आहे."

वरील मजकूर लिहितांना टिळकांना तारेवरची कसरत कशी करावी लागली असेल हें ज्याला कायद्याचें यत्किंचित् खरें ज्ञान असेल त्यालाच कळून येईल. तारेवरच्या कसरतीपेक्षांहि ही तरवारीच्या धारेवरची कसरत म्हटलें तर अधिक शोभेल. तथापि प्रस्तुत प्रकरणीं उत्तेजन देऊन लिहितांना, टिळक स्वतःला कायद्याचा धोका सोसण्यास किती तयार असत हें सांगण्यापेक्षांहि, आपणाप्रमाणें लोकांनीं विधायक कार्य करण्यास अडचणीच्या प्रसंगीं तयार व्हावें अशी टिळकांची मनांतून किती कळकळ किंवा तडफड असे हें दाखविण्याचाच येथें आमचा मुख्य हेतू आहे. स्वतः गांवाबाहेर जाऊन राहिलेल्या सुधारक पक्षाच्या लोकांनीं मेळेवाल्यांना प्लेगचें निमित्त करून उगाच टाकून लिहिलें, त्याला टिळकांनीं तिखट उत्तर दिलें तें तर योग्यच होतें, परंतु टिळकांची टीका काय नुसती विध्वंसक असावयाची, अमुक असें करा अशी विधायक दिशा ते दाखवीत नसत, असें म्हणणारांना या प्लेगच्या बाबतींत तरी टिळकांनीं नुसता उपदेश करूनच नव्हे, तर स्वतः धडा-डीनें पुढें होऊन व कृति करून, जें उत्तर दिलें तें खरोखर अधिक समर्पक होतें. तुलनाच केली तर या प्रसंगीं त्यांच्या प्रतिपक्षीयांहून अधिक विधायक कामगिरी टिळकांनीं केली हें कोणाहि निःपक्षपाती मनुष्यास कबूल करावें लागेल. फिरून ता. ४ मेच्या अंकांत टिळक लिहितात " अशा वेळीं जुलूम

करणाऱ्याच्या नांवानें नुस्ती ओरड करून उपयोगी नाहीं. घरास आग लागली असतां, ज्याप्रमाणें आग लावणाराच्या नांवानें नुस्ती जळफळ करून घरांतील मालमत्तेचें संरक्षण होत नाहीं, तर बंब वगैरे आणून होईल तितका घराचा बचाव करावा लागतो, तद्वतच सध्यांचा प्रकार आहे. सरकारास शिव्या देण्यास पुढें पुष्कळ वेळ आहे......गांवाबाहेर राहून ओरड करण्यापेक्षां आमच्या पुढाऱ्यांनीं अधिक काय केलें असा जर कोणी प्रश्न केला तर आम्ही काय उत्तर देणार?.........मग आम्ही लोकांचे पुढारी कसले?.........ज्या आळींत जावें ती आळी ओसाड. निदान 'तेल्यातांबोळ्यांखेरीज' तेथें कोणी दृष्टीस पडत नाहीं अशी स्थिती येऊन ठेपली आहे. आणि आतां सोजीर गांवाबाहेर गेले म्हणजे ही सर्व मंडळी भरभर परत येईल आणि आश्चर्य करीत बसेल कीं येवढा जुलूम पुण्यांतल्या लोकांनीं सोसला तरी कसा!"

टिळकांच्या या लिहिण्यानें पुण्याच्या पत्रांतून वाद माजला. एकानें म्हणावें मेळेवाल्यांनीं काय केलें, दुसऱ्यानें म्हणावें कांग्रेसवाल्यांनीं काय केलें. पण टिळक आत्मविश्वासानें लिहितात "कामें कोण करितो व कोण नाहीं हें निदान काम करणारास तरी सांगण्याची जरूर पडत नाहीं." पण हा वादहि लवकर थांबला. ता. १६ मे रोजीं रँडसाहेबांच्या सहीची नोटीस प्रसिद्ध होऊन प्लेगची तपासणी लवकरच थांबण्याचें ठरलें. प्लेगचे रोगी दडवून ठेवले जातील तर त्यांचीं घरें साफ केली जाणार नाहींत वगैरे निमित्तानें रँडसाहेब तपासणी पुढेंहि चालू ठेवणार होते. परंतु टिळक वगैरे मंडळींनीं आपण होऊनच असें सुचविलें कीं डॉक्टरच्या तपासणीशिवाय कोणीहि घरांतील प्रेत उचलून नेऊं नये. तपासणीनंतर प्रेत नेण्यास परवाना द्यावा, व तपासणींत रोगी प्लेगनें मेला असा दाखला दिला गेला तरच तें घर धुतलें जावें. एरवीं धुण्यापुसण्याचा त्रास देऊं नये. ही सूचना रँडसाहेबांनीं अखेर मान्य केली. ता. २८ मे च्या पुढें हिंदु प्लेग इस्पितळ बंद करावें असाहि जुलमाचा हुकूम रँडसाहेबांनीं प्रथम केला होता. पण तोहि शेवटीं त्यांना बदलावा लागला. व न जाणो पावसाळ्यांतहि प्लेग होईल या भीतीनें हिंदु इस्पितळ चालू ठेवण्यांत आलें. अशा रीतीनें गांवांत एखाद दुसरी केस होते किंवा एखादादिवशीं केस होतहि नाहीं इतका रोग हटल्यावर तपासणी वगैरे सरकारी उपाय थांबले. प्लेग कमी झाला तो बहुधा उन्हाळ्या हवेमुळेंच हळूहळू कमी झाला हें दर आठवड्याचे आंकडे प्रसिद्ध होत त्यावरून सहज लक्षांत येण्यासारखें होतें. कारण प्लेग हळू हळू ठराविक क्रमानें हटत गेला. नुसत्या सक्त उपायांनींच तो हटावयचा तर आदल्या आठवड्यांत पुष्कळ असतां पुढच्याच एका आठवड्यांत तो अजीबात बंद व्हावयास पाहिजे होता, पण तसें झालें नाहीं. बाहेरच्या उपायांनीं विझलेली आग एकदम विझते. पण आपल्याआपण विझणारी आग क्रमानें कमी कमी होत येते. हाच न्याय प्लेगलाहि लागू होता.

यापुढें दहापांच वर्षे तरी खूप जोराच्या प्लेगची गेल्यामुळें, प्लेगचा उद्भव त्याची वाढ किंवा त्याची बंदी या गोष्टींशीं कोणत्याहि ठराविक सरकारी उपायांचें कोणतेंहि प्रमाण हटकून बसूं शकत नाहीं, असा अनुभव पुढें आपोआप आला; व तो सरकारास कबूलहि करावा लागला; अखेर उंदीर धरणें किंवा इनाक्युलेशन करणें याशिवाय बाकी सर्व जालिम उपाय सरकारानें कंटाळून व पराभव पावून बंद केले. व सगळा प्लेगचा कारभार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हातीं देण्यांत आला. पण १८९७ हें प्लेगचें पहिलेंच वर्ष असल्यामुळें सरकार व त्यांचे डाक्तर म्हणतील तेवढेंच खरें, इतर सर्व खोटें, अशी स्थिति झाली. आणि प्लेग जंतु बहुधा आपल्या मरणानें मेले असें असतां सरकारी उपायानें प्लेग हटल्याची चहूंकडे द्वाहि फिरविली गेली! विलायतेस तारा जाऊन धडकल्या व प्लेग कमिट्यांच्या कामाची तारीफ होऊं लागली. मात्र अनंत दुःख व छळ सोसलेल्या बिचाऱ्या हिंदी लोकांसंबंधानें कोणी एकहि सहानुभूतीचा शब्द काढला नाहीं. पण शिमगा जाऊन कवित्व मागें उरतें. त्याप्रमाणें आज काय व तेव्हां काय, प्लेगचें ठाणें उठलें तरी, प्लेग कमेटीच्या कारभाराची आठवण बुजणें मात्र अशक्य झालें होतें. इतकेंच नव्हे तर अशा मनाच्या आठवणीपेक्षांहि एका अकल्पित रीतीनें पुण्यावर सहा महिने गाजलेल्या जुलमाचा प्रतिध्वनि उमटला, व त्यामुळें फिरुन पुण्याला आणखी कांहीं दिवस, पण निराळ्या प्रकारचें, जें दुःख भोगावें लागलें त्याची हकीगत पुढील भागांत देण्यांत येईल.

## भाग २४ परिशिष्ट (१)

## प्लेगच्या जुलमासंबंधीं सुधारक पत्रांतील कडक लेखांचे उतारे

### सुधारक ता. १२-४-९७

इंग्रजसरकारचे अंमलदार इतके बेगुमान होतील असें कधीं वाटलें नव्हतें ! परंतु ब्यूबॉनिक प्लेग म्हणजे आजार नव्हे, सोजरांचें पेंढार आहे असें म्हणावें लागत आहे ! पाहिजे त्यांचीं घरें फोड, पाहिजे त्या जिनगीची अफरातफर कर, पाहिजे त्या ठिकाणीं धिंगाणा घाल, पाहिजे त्याचा हात धर, आणि हवें त्याला ओढीत ने, ही का घरतपासणी, का लोकांची यत्ता ? अर्जांची दाद नाहीं, फिर्यादीची फिकिर नाहीं, तक्रारीची किंमत नाहीं, आणि कायद्याची पर्वा नाहीं ! अशीच रँडसाहेबांच्या यमदूतांपैकीं कित्येकांची वागणूक आहे ! या आडदांड रानटी सोजरांस कशाचीच दाद नाहीं ! घरांत बाळंतीण आहे ! ओढा तिला बाहेर, डोळे दुखरे आहेत घाला गाडींत, हा तडाखा सुरू आहे ! हें आहे काय ? हा कां बंदोबस्त का धुमाकूळ ? का रँडशाई ?

### सुधारक ता. १९-४-९७

इतक्या दिवस चोरीवरच भागत होतें, पण आतां बायकांच्या अंगावर हात टाकण्यापर्यंतही मजल येऊन ठेपली आहे ! आणि इतके सारे प्रकार घडत असून आमचे लोक पहावें तों आपले शांत ! खरोखर आमच्या लोकांसारखे नामर्द लोक पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही सांपडणार नाहींत असें मोठ्या शरमेनें कबूल केलें पाहिजे ! अरे, तुम्हीं असे अगदीं निःसत्व कशानें झालां ? आपल्या आहांची अब्रु बचावण्यासाठीं थोडी तरी हालचाल करा ! अरे असे

**भांगूबाईसारखे रडतां काय ? आडदांडांस कायदा शिकवा.**

' आमच्या देवांतले सोजरांनीं टाक चोरले ! ' ' आमची पैशाची पेटी फोडून रुपये उधळले आणि खिशांत टाकले ! ' 'आमचे पापडच विटाळले !' ' आमच्या कुटुंबाला पांचवींचेंच बाहेर काढिलें!' हे व या तऱ्हेचे उद्गार आमच्या पुणेंकरांच्या तोंडून दिवसांतून दहा वेळां निघत आहेत ! आणि जितके वेळ हे उद्गार-हें मुळमुळ रडणें आम्हीं ऐकतों तितका आह्मांला खरोखर संताप येतो ! अरे तुह्मी आहांत कोण ! पुरुष आहांत का बायका ? असें आपल्याशीं रडण्यानें का ही रँडशाई हटणार आहे ? अशानें तर तिला उलट ऊत येईल ! आजपर्यंतच्या तुमच्या वल्गना कोठें आहेत ? सोजीर झाला, नाहीं सोजराचा काका झाला म्हणून काय झालें ? चोरी करतो आहे ना ? तुम्ही त्याला पकडीत कां नाहीं ? अंगावर चालून आलेल्याचा प्रतीकार करणें, बेकायदेशीर वर्तन करणाराला कायदा किंवा हात दाखविणें हा कांहीं गुन्हा नव्हे. माणसांसारखें स्वतःच्या

पायावर उभे रहा आणि दाखवा या ब्रिटिश खोंडाना कीं त्यांची बेताल अंदाधुंदी जोंपर्यंत कायदा आमच्या बाजूस आहे तोंपर्यंत आम्ही निमूटपणें चालूं देणार नाहीं! सरकारच्या कायद्यानें बेकायदेशीर मस्तीपासून आपला बचाव करून घेण्याचा अधिकार प्रत्येकास ठेविला आहे हें लक्षांत ठेवून वागा!

## सुधारक ता. १०-५-९७

तें कांहीं नव्हे! या सगळ्यांतील इंगित एकच आहे. आमचा स्वाभिमान नष्ट झाला आहे. आणि थोडासा अवशिष्ट आहे तो हतवीर्य होऊन पडला आहे त्याला पाठीचा जोर नाहीं. त्याला उभें राहून चार हात करतां येण्यास त्याच्या पायांत जीव नाहीं; प्लेगकमिटीनेंच काढलेले कायदे बाजूला ठेवून बेदिक्कतपणें तुमच्या घरांत धिंगाणा घालणारे विलायती खोंड तुह्मांला खिजविण्याची-चिडविण्याची-संताप-विण्याची पराकाष्ठा करीत असूनही तुम्ही खिजत नाहीं-चिडत-नाहीं-संतापत नाहीं! हें कशाचें दर्शक आहे? पेटींतला पैसा गेला, फडताळांतले पापड विटाळले, दुभत्यांतलें दहीं फस्त झालें; आजापणज्यापासून तुमच्या देव्हाऱ्यांत नित्य पूजा घेणारे तुमचे देव फुटून चूर झाले, किंवा भडभुंजाच्या दुकानीं छटाकाचें काम करूं लागले; तुमच्या काकांमामांस दहाजणांनीं मिळून नागवें केलें आणि नाचायला लाविलें! इतकें सगळें झालें तरी तुमच्या एकाच्यानेंही याचा प्रतीकार जागच्या जागीं करवला नाही! हें कशाचें लक्षण? फार तर काय, पण जगांतील अत्यंत रानटी जातींपासून अत्यंत सुधारलेल्यापर्यंत सर्व देशांत ज्या एका बाबतींत मनुष्याच्या मनोवृत्ती अत्यंत नाजूक असतात त्या बाबतींतही या खोंडांनीं तुम्हांला डंवचले-तुमच्या आया-बहिणी-लग्नाच्या बायका यांची विटंबना केली-त्यांच्या अंगांवर फुलें टाकिलीं-त्यांच्याशीं पाठशिवाशिवी केली तरी देखील तुम्ही आपले संथ ते संथच! धिक्कार असो असल्या समाजाला!! जनावरांना देखील इतका संथपणा इतका सोशीकपणा शक्य नाहीं! इतका नेभळा सोशीकपणा तुमच्यांत आला आहे! मग कशाला ती बडबड? यांतील अत्यंत-अत्यंत दुःसह गोष्ट ही कीं, इतका जुलूम चालला असतां आपण इतके भित्रे, इतके नेभळे झालों आहों ही जाणीव हृदयाला डसते घरे पाडीत आहे. आणि-नको नको तें! बाहेरील जुलुमापेक्षांही आंतली टोंचणी, ही प्रबुद्धनिराशा-फारच दुःसह! अंगांत रग नाहीं! पायांत जीव नाहीं! मनगटांत तकवा नाहीं! गळ्यांत त्राण नाहीं! आणखी पुनः असें म्हटलेलें सपत नाहीं! कोण दुर्धर ही स्थिति!!!

---

भाग २५ वा

# राजद्रोहाचा पहिला खटला

टिळकांनीं फर्ग्युसन कॉलेज सोडल्यानंतर त्यांचीं पहिलीं चार वर्षे स्थानिक व सामाजिक वादांत गेलीं. १८९१ सालीं ते केसरीचे जबाबदार संपादक झाल्यावरहि हेच वाद कांहीं दिवस चालू होते. निदान केसरीच्या लेखांत लक्ष घालावें असे सरकारास वाटण्यासारखे विषय तरी तेव्हां फारसे उपस्थित झाले नव्हते. पण १८९३ पासून केसरीच्या टीकेचें तोंड सरकारकडे फिरलें. प्रथम हिंदुमुसलमानांचे दंगे, त्यानंतर हॅरिसशाहीचे प्रताप, त्यानंतर दुष्काळ निवारणाची चळवळ, व त्यानंतर पुण्यांतील प्लेगप्रतिबंधक उपायाचा जुलूम—अशा रीतीनें टिळकांनीं सरकारावर केलेल्या टीकेंतील कडकपणा, व उलट टिळक हे आपणाला एक प्रबळ शत्रु उत्पन्न होत असल्याविषयीं सरकारची भावना, हीं दोन्हीं क्रमाक्रमानें वाढतच गेलीं. सामाजिक वादयुद्धांत टिळकांनीं आपल्या प्रतिपक्षांना बेजार करून सोडलें किंवा लोळविलें हें पाहून, हा कोणी एक नवा तरतरीत पुढारी पुढें येत आहे इतकेंच फार तर सरकारला वाटलें असेल. पण ही एक प्रकारची निवळ कौतुकबुद्धीच होय. तींत वैमनस्याची छटा अद्यापि उमटली नव्हती. पण हिंदुमुसलमानांच्या दंग्यासंबंधानें केसरीचे जोराचे हल्ले सुरू झाले, तेव्हां हा नवा पुढारी आपला दुष्मान आहे, व त्याला आपल्या मर्मावर जोराचे घाव बिनचूक घालतां येतात, असें सरकारास दिसूं आल्यापासून टिळकांचें नांव सरकारी चित्रगुप्ताच्या काळ्या वहींत कायमचें नोंदलें गेलें.

हिंदुमुसलमानांच्या भांडणांतील सरकारच्या पक्षपाती धोरणाच्या आविष्करणापेक्षांहि, टिळकांची दुष्काळनिवारणासंबंधाची चळवळ सरकारास अधिक जाचक वाटली. दोन जातींपैकीं एकाचा पक्ष सरकार अधिक उचलून धरतें असें म्हटल्यानें सरकारची बेअब्रू झाली तरी ती फारशी होऊं शकत नाहीं. पण दुष्काळांत सरकारनें घ्यावी तशी काळजी न घेतल्यानें प्रजा उपाशीं मेली हा आक्षेप खरा ठरला तर सरकारची बेअब्रू हटकून व्हावयाची. त्यांतच शेतसाऱ्याची सूट मागण्याचा जो उपदेश टिळकांनीं शेतकऱ्यांना चालविला त्याला 'सरकारचा शेतसारा मुद्दाम बुडवा' अशा उपदेशाचें स्वरूप देणें ही गोष्ट सोपी होती. टाइम्स वगैरे पत्रांनीं टिळकांच्या या चळवळीला 'नो रेंट कॅंपेन' असें नांव दिलें होतें. सरकार जमीन महसूल घेतें तो (रेंट) खंड म्हणून नव्हे, तर जमीनीवरील कर म्हणून—असें प्रतिपादण्याचा आग्रह अशा पत्रांचा एरवीं सुरू असतो. पण तो या क्षणीं विसरून त्यांनीं सरकारला जमीनदार ठरविलें. अर्थात् ही एकंदर कल्पना

त्यांनीं ऐरिश लँड लीगच्या इतिहासावरून घेतली, यामुळें त्यांना क्षणभर सरकार हें जमीनदारांसारखें व टिळक हे पार्नेलसारखे दिसूं लागले.

इकडे टिळक पुणें म्युनिसिपालिटींत, मुंबई युनिव्हर्सिटींत, आणि मुंबईच्या कायदेकौन्सिलांत निवडून आल्यामुळें त्यांची लोकप्रियता सरकारास उघड दिसून आली; व हें प्रकरण डोईजड होणार अशी सरकारनें १८९५ सालापासूनच मनाशीं पक्की गांठ घातली होती. १८९६ च्या दुष्काळी चळवळींतच टिळकांवर खटला व्हावयाचा; पण सरकारी कायदेपंडितांना आपलें जाळें कमकुवत आहे असें मनांत वाटत असल्यामुळें टिळकांसारखा मोठा मासा पकडण्याकरितां ते टाकण्याची त्यांची छाती होईना. म्हणून त्यांनीं आपटे साठे वगैरे लहानसान मासे त्यांत पकडण्याचा प्रयत्न केला. पण तोहि कांहीं साधला तर कांहीं फसला. पुढें प्लेगच्या भांडणांत टिळकांचें व सरकारचें फारच घासूं लागलें, व पुण्यांतील लोकांच्या असंतोषाबरोबर केसरीच्या टीकेच्या कडकपणाचाहि कडेलोट झाला हें सरकारानें पाहिलें. परंतु या बाबतींत पुष्कळशी चूक आपणाकडे आहे, व लोकांनीं जळफळावें इतका छळ त्यांना सोसावा लागला खरा, याचीहि जाणीव सरकारास होती. म्हणून याहि टीकेकरितां केसरीवर खटला करण्यास सरकारचें मन घेईना.

तथापि खटल्याची पूर्वतयारी हळूहळू जमत जाऊन दारूचा बार भरून राहिलेला होता. फक्त त्यावर ठिणगी पडण्याचा काय तो अवकाश होता, व ती ठिणगी ता. २२ जून च्या रात्रीं रँडसाहेबाच्या खुनानें पडली. या बाबतींत मनोमन साक्ष असल्याप्रमाणें, आपणावर केव्हांना केव्हां तरी राजद्रोहाचा खटला होणार हे टिळक जाणून होते. १८९६ सालीं मराठा पत्रांत या भावी खटल्याचा उल्लेख करून "वादळ होऊं घातलें आहे, धोक्याचा बावटा लौकरच उभारला जाईल" असें एक रूपक संपादकानें केलें होतें; पण लिहिणारानें तें भविष्य म्हणून वर्तविलें होतें. तथापि, भविष्यांना देखील गर्भावस्थेंत कांहीं काल घालवावा लागतो तेव्हांच तीं अनुभवरूपें जन्मास येतात. शंभर अपराध झाले म्हणजे विंचू चावतो असें मुलांना सांगत असतात. टिळकांना चावण्याकरितां टपून बसलेल्या सरकारी विंचवाच्या नांगीनें शंभरावा अपराध घडतांच डंख मारला. मात्र हा शंभरावा अपराध वस्तुतः टिळकांचा कोणत्याहि प्रकारें नव्हता. रँडसाहेबाचा खुन प्लेगअमदानीच्या जाचाकरितां चाफेकरांनीं केला, आणि शिवाजी उत्सवांतील भाषणें केसरींत प्रसिद्ध केल्याबद्दल टिळकांवर राजद्रोहाचा खटला झाला, कशास काय संबंध ! पण ठिणगी कोणीहि लावली तरी बंदुकीच्या तोंडापुढें जो कोणी उभा असतो त्यालाच तींतील गोळी हटकून लागावयाची !

पुण्यांत रँडशाहीनें किती अनर्थ केला होता, लोक किती गांजले–पिडले होते, याचें वर्णन मागील भागांत आलेंच आहे. हा छळ केव्हां विकोपाला जाईल व कोणत्या वेळीं कोणाचा घातपात होईल याचा नेम नाहीं असें लोकांना,

प्लेगची तपासणी सुरू असतांना, वाटत होतें. पण दुःख कितीहि झालें तरी तें हळूं हळूं विसरून जाण्याचा मानवी मनाचा धर्मच आहे. त्याप्रमाणें १८९७च्या उन्हाळ्यांत प्लेग थांबून तपासणी बंद झाल्यावर पुण्यांतील लोक झालें गेलें दुःख हळू हळू विसरूं लागले. रात्रभर डोळ्यावर पडलेली झांपड दूर होऊन अरुणोदय झाला म्हणजे एक मोठें संकट टळलें—किंबहुना पुनर्जन्म झाला—अशा भावनेनें पक्षी हे जसे आनंदानें शब्द करूं लागतात, व त्यांच्या हालचालीनें झाड फिरून गजबजूं लागतें, त्याप्रमाणें प्लेगमुळें पुण्यांतून बाहेर गेलेले लोक हळू हळू परत येऊं लागले. घरांना चार चार महिने पडलेलीं कुलपें उघडलीं जाऊन त्यांची झाडलोट चुना-सफेती सुरू झाली. सरकारी कचेऱ्यांतून किंवा खाजगी कार्यालयांतून शिल्की पडलेल्या प्रकरणांच्या राशी निकालांत निघुं लागल्यामुळें, लोकांत विशेष हाल-चाल सुरू झाली. मे महिना हा पुणे शहरवासीयांना मोठा उलाढालींचा जात असतो तसा तो यंदाहि, प्लेग थांबल्यामुळें, जाणार असें दिसूं लागलें. टिळकांचा वकीलीचा वर्ग फिरून सुरू होण्याची जाहिरात लागली.

प्लेग व दुष्काळ हे विषय बदलून नव्या स्फूर्तीनें केसरीत लेख लिहिण्यासारखे नवे विषयहि उपस्थित झाले. एक विषय राणीच्या डायमंड ज्युबिलीचा. याबाबत सार्वजनिक सभेनें ता. २३ मे रोजीं मानपत्र सादर करण्याचा ठराव केला. येव-ढेच नव्हे, तर प्रजेचीं गाऱ्हाणीं कितीहि असलीं तरी तींच सर्व प्रसंगीं उगाळीत बसणें योग्य नाहीं; सरकाराशींहि निव्वळ सुखाचा म्हणून शब्द बोलण्याचे प्रसंग असतात; व त्यांतलाच ज्युबिलीच्या मानपत्राचा प्रसंग असल्यानें त्यांत १८५८ च्या जाहिरनाम्याची नुस्ती आठवण करून देण्यापलीकडे इतर कोणत्याहि अप्रिय गोष्टींचा उल्लेख करावयाचा नाहीं, मग त्यामुळें लोकांकडून राजनिष्ठेचा आरोप आला तरी चालेल असें सभेनें ठरविलें, व केसरीनेंहि तसेंच प्रतिपादिलें. तात्पर्य, सर-काराशीं शिष्टाचार सुचण्याइतकी मनाची शांतता पुणेकरांच्या मनांत पुनः प्रस्था-पित झाली होती. या धोरणाला अनुसरूनच ता. ८, १५, २२ जूनच्या केस-रीच्या तीन अंकांत टिळकांनीं महाराणीसरकारचा जयजयकार करून अभिनंदन पर लेख लिहिले होते. महाराणीचें भाग्य, तिचें शील व चारित्र्य, तिच्या साठ वर्षांच्या कारकीर्दीत झालेला साम्राज्याचा विस्तार, राज्य घटनेचें निर्बंध वंद्य मानून तिनें केलेला कारभार, वगैरे गोष्टी टिळकांनीं खुल्या दिलानें व गुण घेण्याच्या बुद्धीनें लिहिल्या. साम्राज्याचा उत्कर्ष इंग्रजांच्या गुणांच्या दृष्टीनें यथा-योग्यच झाला व इंग्रजहि राज्यकर्ते असल्यामुळें त्यांचा आनंद तो थोडाबहुत प्रजेचाहि आनंदच असला पाहिजे असें लिहून तिसऱ्या लेखांत मात्र हिंदु-स्थानच्या दारिद्र्याचें वर्णन केलें होतें. इंग्रजी राज्यांत हिंदुस्थान भरभराटलेलें दिसलें तरी सूज वेगळी आणि पुष्टता वेगळी या दृष्टीनें फरक केलाच पाहिजे हेंहि प्रांजलपणें सांगितलें होतें. परंतु या टीकेनें या लेखाच्या अभिनंदनपर स्वरू-

पाला बाध आणण्याचा उद्देश नव्हता व तो येतहि नव्हता. याचें गमक असें कीं आयरिश लोकांनीं ज्युबिलीच्या उत्सवांत भाग घेण्याचें ठरविलें ही गोष्ट नमूद करूनहि हिंदुस्थानानें आयर्लंडचें अनुकरण करावें असें केसरीनें उपदेशिलें नव्हतें.

दुसरा स्फूर्तिदायक विषय शिवाजी स्मारकाच्या चळवळीचा. ता. १ जून १८९७ केसरीत विभूतिपूजा या विषयावर एक सुंदर सोपपत्तिक अग्रलेख टिळकांनीं लिहिला. ठिकठिकाणीं शिवजन्मोत्सव झाल्याची पत्रें येत होतीं व या साली पदवीधर व इतर सुशिक्षित लोक या उत्सवांत बरेच पडले होते. यामुळें उत्सवाला कांहीं पद्धतशीर स्वरूप येईल अशी आशा वाटूं लागली होती. इंग्रजी राज्यांत राजकीय उत्सव बंद पडले पण या ऐतिहासिक विभूतीचें पूजन करण्याची तरी संधी या राज्यांत मिळाल्याबद्दल केसरीनें आनंद प्रदर्शित केला होता. खुद्द पुण्यांतील उत्सव अद्यापि व्हावयाचाच होता. पुण्यांत प्रथमपासून जन्मोत्सव न होता राज्याभिषेकोत्सवच होत असे. यंदा उत्सव ता० १२ जून रोजीं लकडी-पुलाजवळील विठ्ठलमंदिरांत सुरू झाला. प्लेगचीं दुःखें भोगून उरल्यामुळेंच कीं, काय त्या सालचा उत्सव विशेष थाटाचा झाला. स्तुतिपर पद्यें झाल्यावर प्रो. शिवरामपंत परांजपे यांचें पुराण झालें. विषय राजसूय यज्ञ व शकुनि-धृतराष्ट्र संवाद हा होता. "असंतोषः श्रियो मूलम्" व "संतोषास्तु श्रियो हन्ति" हीं त्यांची आधारवचनें होतीं. प्रो. जिनसीवाले यांनीं सांगितलें कीं शिवाजीचे पराक्रम हा महत्त्वाकांक्षेचा प्रभाव नसून स्वदेश व स्वधर्म यांची धुळधाण झालेली पाहून आलेल्या चिडीचा तो प्रभाव होता. दुसरे दिवशीं विंचुरकरांचे वाड्यांत मर्दानी खेळ झाले. रात्री टिळकांच्या अध्यक्षतेखालीं प्रो. भानू यांचें अफजुल-खानाचा वध या विषयावर व्याख्यान झालें. त्यांत खुनाच्या आरोपापासून त्यांनीं शिवाजीचा बचाव केला. जिनसीवाले यांनीं नेपोलियन, सीझर यांच्या हातून झालेल्या मनुष्यवधांचा दाखला देऊन इतिहासकारांनीं या दोघांना जसें निर्दोषी ठरविलें तसेंच अफजुलखानाच्या वधासंबंधानें शिवाजीसही निर्दोषीच ठरविलें पाहिजे. उपसंहारादाखल टिळकांनीं भाषण केलें त्यांत या वधांतील सात्त्विक बुद्धीचा निर्देश करून वर्षांतून एक दिवस तरी सर्व लोकांनीं शिवाजीचा उत्सव करण्यास एकत्र जमावें अशी सूचना केली होती. ता. १५ जूनच्या अंकातच निशाणी भवानी तलवार या सहीनें व शिवाजीचे उद्गार या मथळ्यानें कोणा एका गृहस्थानें कविता पाठविल्या त्या छापल्या होत्या. त्यांत विभूतिपूजनास उत्तेजन असून शिवाय तत्कालीन राजकीय अन्याय व दुःखें याचाहि पाढा वाचला होता.

लगेच टिळकांच्या एका शत्रूनें जास्टिस या टोपण नांवानें मुंबई टाइम्सला पत्र लिहून केसरीतील उत्सवाची हकिकत, त्यावरील स्फुटें वगैरे मधून कांहीं निवडक वाक्यें घेऊन त्याचें भाषांतर सढळ हातानें करून या उत्सवांतील भाषणांत राजद्रोह भरलेला आहे असें ध्वनित केलें होतें. वास्तविक अफजुलखानाच्या

वधाचा वाद नवा नसून जुनाच होता हें पूर्वीच्या एका भागाववरून वाचकांस दिसून आलेच असेल. त्यां वेळीं टिळक हे जितके राजद्रोहि असतील तितकेच फार तर ते आतांहि असतील व शिवाजीनें अफजुलखानाचा वध केल्याचें समर्थन करण्याबद्दल टिळकांवर जर पूर्वी खटला झाला नाहीं तर तसाच तो हीं भाषणें किंवा हे लेख यांचें करितां होण्याचे कारण नव्हतें. पण कोणतेहिं कार्य घडून येण्याला एकच कारण निर्णयात्मक होऊं शकत नाहीं. अनेक कारणांची त्यांत गुंतागुंत असते. तशीच प्रस्तुत प्रसंगींहि झाली होती. अफजुलखानाच्या वधाचा हा वाद याहि प्रसंगीं चार उलटी सुलटी उत्तरें प्रत्युत्तरें गाजून निकालांत निघाला असता. पण या खुनाच्या चर्चेत राजद्रोहाची बुद्धी मूळाशीं आहे असा संशय येण्याचे खरे कारण, या चर्चेपासून एक आठवड्यांत पुण्यांत एक भयंकर खून झाला हेंच होय. हा खून म्हणजे ज्युबिलीच्या मुख्य दिवशीं म्हणजे मंगळवार ता० २२ जूनच्या रात्रीं सरकारी मेजवानीनंतर गणेशखिंड रस्त्यावर पुण्यांतील प्लेगचे मुख्य अधिकारी रँडसाहेब यांचा झालेला खून होय!

बुधवार ता. २३ जून रोजीं उजाडण्याचें आधींच खुनाची बातमी सर्व शहरभर पसरून सर्व लोक भीति व विस्मय यांनीं स्तंभित होऊन गेले होते. रस्त्यावर उभे राहुन बोलण्याची तर सोय नव्हतीच परंतु घरांत दारें उघडीं ठेऊन बोलण्यालाहि लोक कचरूं लागले. कारण गुप्त पोलीस शहरांत वावरूं लागल्याची बातमी खुनाच्या बातमीबरोबरच शहरांत पसरली होती. पण या बातमींत रँडसाहेब गोळी लागून मेले या खेरीज निश्चयात्मक अशी बातमी कोणतीच नव्हती असें म्हटलें तरी चालेल. असली बातमी कोण कुणाला विचारणार व कोण कुणाला सांगणार. किंबहुना खरा प्रकार गांवांतील लोकांस कांहींच कळत नव्हता. सर्व घालमेल सरकार पोलीस अधिकारी व मुंबईच्या गोऱ्या पत्रकारांचे बातमीदार यांच्या दरम्यानच चालू होती. खुनानंतर सात दिवसांनीं प्रसिद्ध झालेल्या केसरींत जी हकीगत आली तींत गटारगप्पांच्या रकमाहि अनेक होत्या. निश्चयात्मक हकीगत इतकीच होती कीं, मंगळवार ता. २२ जून रोजीं रात्रीं गणेशखिंडीतील गव्हर्नरसाहेबांच्या बंगल्यांत जुबिली निमित्त मोठी मेजवानी व स्वागत समारंभ झाला. बंगल्याच्या विस्तीर्ण आवारांत उत्कृष्ट रोषणाई केलेली होती. भोवतालच्या सर्व टेकड्यांवरून खंडोगणतीं लांकडें व गवताचाचोळ्याचे प्रचंड ढीग पेटवून आनंददर्शक होळ्या केल्या होत्या. मध्यरात्रीस समारंभ खलास झाल्यावर रँडसाहेब हे आपल्या गाडींत बसून परत निघाले. बंगल्याच्या मुख्य फाटकापासून सुमारें पांचशें यार्डावर त्यांची गाडी आली तेव्हां बाजूच्या झाडीतून कोणी मनुष्य बाहेर येऊन तो रँडसाहेबांच्या गाडीवर मागाहून चढला व त्यानें त्यांच्या पाठीकडून पिस्तुल झाडलें. त्यांतील गोळी व छरे डाव्या खांद्यांत शिरून ते गाडींतच बेशुद्ध पडले. कांहीं सेकंडांनीं या गाडीच्या

मागोमाग येणाऱ्या दुसऱ्या गाडीवर असाच एक बार झाला तींत लेफ्टनंट आयर्स्ट व त्यांची बायको अशीं होतीं. या बारातील गोळी आयर्स्ट यांच्या डोक्यांतून आरपार जाऊन प्राणोत्क्रमण होऊन ते आपल्या बायकोच्या अंगावर कोसळून पडले. अंधाऱ्या रात्रींची वेळ, बार एकदम उडालेले, यामुळें गाड्यांचे घोडे दचकून धांवत सुटले. आयर्स्ट यांच्या गाडींत त्यांची बायको ओरडत होती ती ऐकून कोणी ले. लुई यांनीं गाडी थांबवून आंत पाहिले तो हा प्रकार. मागोमाग रँड यांची गाडी आली त्यांत पाहतात तों तेहि बेशुद्ध होऊन कण्हत पडले होते. हस्पितळांत नेल्यावर रँडसाहेबांना औषधोपचार करण्यांत आला. पुढें मरणोन्मुख स्थितींत त्यांची जबानीहि घेण्यांत आली. शेवटीं ११ दिवसपर्यंत कष्ट सोसून त्यांचा अंत झाला.

त्या रात्रीं गणेशखिंड रस्त्यावर नाकेबंदी झाली. दुसरें दिवशीं सकाळच्या तपासांत खून झाला त्या जागेजवळच्या सडकेखालच्या मोरींत दोन तलवारी, एक बाटली, एक दगड अशा जिनसा सांपडल्या. पण त्यांवरून कांहीं सुगावा लागला नाहीं. चहूंकडचे पटाईत गुप्त पोलिस पुण्यास बोलविण्यांत आले. त्यांच्यातील मुख्य अधिकार प्रसिद्ध गुप्तपोलिस ब्रुइनसाहेब यांस देण्यांत आला आणि गुन्हा पकडून देण्याकरितां वीस हजारांचें बक्षीस सरकारनें जाहीर केलें. पण पोलिसांच्या आधींच रिकामटेकड्या लोकांचे तर्कवितर्क सुरू झाले. पुण्यांत ब्राह्मणांचें एक मोठें बंड होणार होतें किंवा अजूनहि होईल व रँडसाहेबांचा खून ही त्या बंडाची पहिली सलामी होय, अशी कल्पना इंग्रजपत्रकारांनीं जगजाहीर केली. पण बंडाची कल्पना सरकार खरी मानो वा खोटी मानो परंतु या खुनाबद्दल पुणें शहरच्या सर्व नागरिकांना जबाबदार धरलें पाहिजे असें ठरवून पुण्यावर तावडतोब जादा पोलीस नेमण्यांतहि आलें. खुनाच्या निषेधाविषयीं पुण्यांत स्वयंस्फूर्तीनें एखादी मोठी सभा होईल, अशी सरकार वाट पहात होतें. पण ही अटकळ खरी न ठरल्यानें सरकाला विशेष राग आला. व हा राग पुणेकरांच्या प्रत्यक्ष तोंडावर काढून एकीकडून त्यांचा निषेध व दुसरीकडून खुनाचा तपास लावून देण्याविषयीं मदतीची याचना करण्याकरितां ता. २८ जून रोजीं तेव्हांचे कलेक्टर मि. लँब यांनीं म्युनिसिपल टेक्निकल स्कूलच्या इमारतींत प्रमुख लोकांची सभा आपण होऊन बोलावली खून कोणाचा व कोणच्या प्रसंगीं झाला यावरून कटाचें अनुमान नक्की निघतें असे सभेला सांगण्यांत आलें. हा गुन्हा घडणें हेंच आधीं पुण्याला लांछनास्पद आहे पण तो न सांपडला तर अधिक वाईट व तो हुडकून देण्यांत पुणेकरांनीं मदत न केली तर ते सर्वांत वाईट. तसें घडून आल्यास सरकार तीव्र उपाय योजील. आम्ही काय गरीब पंगू आहों अशी सबब ऐकणार नाहीं. याशिवाय पुण्यांतील वर्तमानपत्रांना, विशेषतः केसरी व टिळक यांना उद्देशून पण नांव न घेतां राजद्रोहाचा सरसकट आरोप लँब-

साहेबांनीं केला. एक आठवड्यापूर्वी झालेल्या शिवाजी उत्सवांतील व्याख्यानां-चाहि उल्लेख या भाषणांत अर्थांतच आला होता. टिळकांनीं गुन्हा शोधून काढण्यास मदत करावी असा जरी ध्वनि या भाषणांत नव्हता, तरी राजकीय चळवळीच्या रूपानें ते पुणें शहरावर रसरलेले निखारे पसरीत आहेत ते इतर लोकांनीं कंबर बांधून राजनिष्ठेचें पाणी ओतून विझवून टाकावेत अशी मात्र सूचना निःसंशय होती. प्रत्यक्ष खून करणारांना तर शिक्षा होईलच पण इतरांनाहि दुःखें सोसावीं लागतील अशी धमकी शेवटीं रँडसाहेबांनीं दिली व खुनी मुक-दमा सुरू होण्याच्या आधीं किंबहुना, खुनी इसम सांपडण्याच्याहि आधीं, सरकारला हाताशीं टिळक व इतर कांहीं पत्रकर्ते मिळाले. त्यांच्यावर खटल्याचें सत्र जुलै-अखेर सुरूंहि झालें.

रँडसाहेबांच्या खुनामुळें आपणावर कांहींतरी संकट कोसळणार असें टिळ-कांना स्वप्न पडलें असतांना देखील केसरीच्या पुढील तीनचार अंकांत जे लेख आले त्यांत यत्किंचितहि मऊपणा आला नाहीं. ता० ६ जुलैच्या अंकांत जुबि-लीवर कांहीं कविता प्रसिद्ध झाल्या, त्यांत केसरीच्या धोरणाप्रमाणें व्यक्तिशः व्हिक्टोरिया राणीचें अभिनंदन व स्तुति असली तरी नोकरशाहीवर टीकाच केली होती.

आबादानी अमुचि कथिली तुजला सेवकांनीं
मत्स्यालागीं कुशल कथिलें वृत्त जैसें बकांनीं
नाहीं द्रव्य न वस्त्र नाहिं नशिबीं आरोग्य तें आमुच्या
बाकी सर्व सुखें प्रजेस अमुच्या माआझमाराणीच्या

या ओळींत केसरील पूर्वीच्याच टीकेचें सार आहे. याच अंकांतील अग्र-लेखाला "सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय?" असा मथळा घालून त्यांत पुण्यावर बसविलेल्या जादा पोलिसाविषयीं सडकून टीका केली होती. "एखादा मोठा हत्ती पिसाळला असता ज्याप्रमाणें तो वाटेल तशी धुळधाण करीत सुटतो तद्वत आमच्या सरकारची स्थिति झाली आहे. खुन्यास जो खून चढावयाचा तो आमच्या सरकारास चढून सरकारची नजर अगदीं फिरून गेली आहे." खून ब्राह्मणानें केला व त्याच्या मुळाशी एक मोठा कट आहे अशी सरकारची सम-जूत पण टिळकांना आत्मविश्वास पुरा असल्याकारणानें या दोन्ही गोष्टींचा स्पष्ट इनकार सुरू ठेवला होता. पैकीं गुन्हेगार ब्राह्मण नाहीं ही प्रतिज्ञा जरी फुकट गेली तरी कट नव्हता ही प्रतिज्ञा तरी अखेरपर्यंत खरी ठरली व त्यामुळेंच टिळकांची शिक्षा सहा महिने कमी झाली हें पुढें ओघानें सांगण्यांत येइलच. असो. कदाचित खुनी मनुष्य ब्राह्मण ठरला तरी तो हुडकून काढण्याला वीस हजार रुपयांचे बक्षीसाची लालूच पुरे आहे, सगळ्या शह-रावर जादा पोलिसाचा जुलूम करण्याचें कारण नाहीं व जादा पोलीस नेमलें म्हणून

गुन्हा सांपडेल असेंहि नाहीं, वगैरे टीका सरळ व स्पष्ट शब्दांनीं केसरीनें केली. अंगावर गोमाशी बसल्यामुळें थयथय करणारा ठाणबंद घोडा, गोल्डस्मिथच्या प्रहसनातील फोकर किंवा बोंबल्या, वगैरे उपमाहि केसरीनें सरकारला वाहिल्या होत्या; आणि 'लांडगा आलारे लांडगा आला' असें वरचेवर विनाकारण ओरडणाऱ्या ॲंग्लोइंडियन पत्रांना या प्रसंगीं खरोखरच लांडगा येऊन भेटला, एका अर्थानें बरें झालें, त्यांची खोड मोडली असेंहि ध्वनित केलें होतें. ज्युबिलीच्याच दिवशीं तिकडे पेशावरास एका गाझीनें एका युरोपियनास दिवसाढवळ्या गोळी घालून ठार मारिलें. इकडे याच सुमारास ठाण्यास दरवड्याच्या एका खटल्यांत गंगाराम नांवाच्या इसमाजवळ कांहीं जुनी हत्यारें सांपडलीं व मायेरानावर हल्ला करून सगळे युरोपियन कापून काढण्याचा कट आम्ही करीत होतो अशी त्यानें जबानी दिली. ज्यूरीनें गंगारामाला वेडापिसा म्हणून सोडून दिलें. पण राजद्रोही कटाच्या संशयाचें शेण जमिनीवर पडलें तर तें माती घेतल्याशिवाय कसें उठणार ?

लँबसाहेबांच्या कडक भाषणानंतर खुनाचा निषेध करण्याकरितां हिराबागेंत डॉ. भांडारकर यांच्या अध्यक्षतेखालीं सभा झाली. पण लँबसाहेबांच्या उतावळ्या टीकेनें या सभेची वाफ पूर्वींच निघून गेलेली असून सभेंत झालेलें काम बोंडपडक्या कळसुत्री बाहुल्यांच्या खेळासारखें झालें. रँडसाहेबांच्या स्मशान—यात्रेला युरोपियनाबरोबर नेटिव्ह लोकहि कांहीं आपण होऊन गेले होते. पण स्मशानभूमीच्या दरवाज्याजवळ भांडारकरांसुद्धां सर्व नेटिव्हांना मज्जाव झाला. डॉ. कावसजी होरमसजी यानां हरकत करण्यांत आली, तेव्हां त्यांनीं मी मुंबईचा शेरीफ होतो असें देवडीवाल्याला सांगून पाहिलें. पण शेरीफ झाला तरी त्याला कोण मानतो ?

ता. १३ जुलैच्या अंकात "राज्य करणें म्हणजे सूड उगविणें नव्हे" असें केसरीनें सरकारला बजाविलें. दोन आठवड्यांतलि लोकमत पाहतां केसरीच्या या टीकेला पाठिंबाच मिळण्यासारखा होता. पण दडपशाहीचें गिरमिट सुरू झालें तें मागें कसें परतणार ? त्याचा एकेक वेढा अधिकच बसत चालला होता. जादा पोलिसाचा वार्षिक खर्च लाख सवालाख रु. ठरून पहिल्या हप्त्यादाखल पुणें म्युनिसिपालिटीकडे ४५००० हजाराची मागणीहि करण्यांत आली. पण तिच्याजवळ इतका पैसा नाहीं व कर्ज काढावें तर तसें करण्यास अधिकारहि नाहीं असें कमेटीनें कळविल्यावर, सरकारनेंच कमेटीच्या नावें रकम लिहून खर्च सुरू केला; व पुढें हळू हळू स्वतः म्युनिसिपालिटीच सरकारच्या ताब्यांत गेल्यासारखी स्थिति झाली. ता. २० जुलैच्या अंकांत टिळकांनीं 'राजद्रोह कशाला म्हणतात' या विषयाची चर्चा सुरू केली. कारण याच सुमारास पार्लमेंटमध्यें कोणा सभासदानें स्टेटसेक्रेटरीला असा प्रश्न विचारला कीं, टिळकांचीं भाषणें राजद्रोही आहेत कीं काय ? त्याला सेक्रेटरीनीं असें उत्तर दिलें कीं, हा कायद्याचा प्रश्न असून या संबंधानें मुंबईसरकारचें मत अद्यापि कायमचें ठरलें नाहीं. याचा अर्थ उघड होता.

तो असा कीं, सरकार टिळकांवर खटला करण्याच्या तयारींत होतें; व टिळकांनींहि राजद्रोहाच्या विषयावर अग्रलेख लिहिला याचा अर्थ खटल्यांत पुढें द्याव्या लागणाऱ्या डिफेन्सची त्यांनीं आगाऊ तयारी सुरू केली होती.

ता. २७ जुलैचा केसरीचा अंक आदले दिवशीं लिहून दुसरे दिवशीं सकाळीं म्हणजे मंगळवारीं टिळक मुंबईला गेले. मुंबईच्या या खेपेचें त्यांचें कारण असें होतें कीं, खटल्यासंबंधानें काय खलबतें चालू आहेत याचा तपास काढावा. पण त्याहून दुसरेंहि एक महत्त्वाचें कारण होतें. तें असें. रँडसाहेबाच्या खुनाची बातमी तारेनें विलायतेस जातांच तेथील पत्रांतून सर्व बाजूनीं लेख येऊं लागले. डेली क्रॉनिकलनें सरकारचें डोकें ठिकाणावर नाहीं असा जादा पोलिसासंबंधीं शेरा मारला. लंडन टाइम्सनें प्रसिद्ध केलें कीं खून होणार हें पुण्यांतील सर्व लोकांना आधीं कळलें होतें व खुनाची बातमी लागतांच सर्वांच्या तोंडावर आनंदाची टवटवी दिसत होती! कोणी म्हणे देशी वर्तमानपत्रेंच याला जबाबदार आहेत, कोणी म्हणे धर्मसमजुतींत हात घातल्याचा हा परिणाम, कोणी म्हणे १८५७ साल पुनः येणार, कोणी म्हणे सगळे ब्राह्मण धरून फांसावरच चढवा, कोणी म्हणे सोजिर मोकळे सोडून घरें देवळें बाटविलीं, आतां कां रडतां! कोणी म्हणे असे खून यापूर्वी झाले नाहींत हेंच भाग्य माना. क्रॉफर्डसाहेबांनीं पुण्याच्या ब्राह्मणांवर शस्त्र उगारलें व भावनगरी राष्ट्रीयसभेला जबाबदार धरूं लागले. या सुमारास प्रो. गोपाळराव गोखले हे विलायतेस होते त्यांची मँचेस्टर गार्डियनच्या बातमीदारानें मुलाखत घेऊन प्रश्न विचारले, त्याला उत्तरादाखल गोखले यांनीं असें सांगितलें कीं, प्लेगकमेटीनें पुण्यांत अतिशय जुलूम केला म्हणूनच हे खून झाले असावेत. त्यांनीं असेंहि सांगितलें कीं सोजिर व प्लेगचे अधिकारी बायकांना रस्त्यावर आणून तपाशीत. एकदोन बायकांवर जुलूम होऊन एकीनें जीवहि दिला!

गोखल्यांच्या मुलाखतीची ही हकीकत प्रसिद्ध होतांच भडका उडाला. पार्लमेंटांत प्रश्नांची सरबत्ती झाली. लंडनहून मुंबई व मुंबईहून लंडन अशा सरकारी तारांची गर्दी उसळली. अखेर मुंबईसरकारच्या खातरजमेवर स्टेटसेक्रेटरींनीं जाहीर केलें कीं गोखले यांनीं केलेले सगळे आरोप खोटे आहेत. दुर्दैवानें गोखले यांनीं केलेल्या विधानांत अतिशयोक्ति होती! पुण्याहून कित्येक प्रतिष्ठित लोक व विद्वान स्नेह्यांनीं पाठविलेल्या खाजगी पत्रांच्या आधारावर गोखल्यांकडून हीं विधानें करण्यांत आलीं होतीं. पण एक चूक निराधार बातम्या लिहिणारांची तर दुसरी चूक त्या जाहीर करणारांची. बिचाऱ्या गोखल्यांना काय माहीत कीं, आयत्या वेळीं आपले बातमीदार दगा देतील! पण कोल्हापूरप्रकरणांत जो अनुभव टिळकांना आला तोच या प्रकरणांत गोखल्यांनाहि आला. पूर्वी टिळक आगरकरांना जशी माफी मागावी लागली तशीच पुढें गोखल्यांना मागावी लागली. विलायतेहून लिहून येतांच पुण्याचे कलेक्टर लँबसाहेब यांनीं गोखल्यांच्या स्नेही मंडळींना व

पुण्यांतील प्रमुख गृहस्थांना गोखल्यांनीं सांगितलेल्या बातम्या खऱ्या की खोट्या असें लिहून विचारिलें. पण ज्यांनीं गोखल्यांना विलायतेंत निराधार बातम्यांच्या घोड्यावर घातलें त्यांनीं लॅबसाहेबांना 'आमची ऐकीव बातमी अशी अशी आहे' असेंहि नुसतें कळविलें नाहीं. पण इकडे गोखल्यांनीं जशी अतिशयोक्ति केली तशीच स्वतः सरकारनेंहि तिकडे करून असें जाहीर केलें कीं, बायकांवरील जुलूमसाच काय पण प्लेगच्या अमदानींत कसलाच प्रकारचा जुलूम झाला नाहीं! अर्थात् या बाबतीं-पुरतें तरी सरकारास खोटें पाडतां येईल अशी टिळकांना उमेद असून "असेरीस सरकारचीच फजीती होईल हें त्यांनीं लक्षांत ठेवावें" असें केसरीनें स्पष्ट बजा-विलेंहि. प्लेगसंबंधाच्या ज्या कोणाच्या तक्रारी असतील त्या पत्त्या मुद्यासह केसरी-कडे कळवाव्या असें ता. २० जुलैच्या अंकांत टिळकांनीं जाहीर केलें होतें. पुढील आठवड्यांत जितक्या तक्रारी हातीं आल्या तितक्या घेऊन व सोजीर लोकांच्या जुलमाचा मिळाला तो पुरावा गोळा करून, तो मुंबईच्या चँपियन वगैरे पत्रांतून छापवून मोठा गिल्ला करावा हाच यावेळीं मुंबईस जाण्यास टिळकांचा हेतु होता. आणि टिळकांवर खटला न होता तर गोखल्यांनीं केलेल्या आरोपांच्या बाबतींत गोखल्यांच्या मित्रांकडून गोखल्यांचें जें समर्थन किंवा पाठपुरावा झाला नाहीं, तो टिळकांकडून झाला असेंहि कदाचित् पुढें लोकप्रत्ययास येण्याचा संभव होता.

पण मुंबईस ज्या घटकेला टिळकांचा हा उद्योग सुरू झाला त्याच घटकेस टिळकांवर खटला करण्याचा सरकारचा उद्योगहि सुरू झाला. याचें नांव योगायोग! ता. २७ जुलै रोजीं सरकारी सालिसिटर निकलसन यांनीं ओरिएंटल ट्रॅन्सलेटर मिर्झा आबास अल्ली बेग यांच्या सहीची १२४ अ. कलमाखालची फिर्याद मुंबईचे चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. स्लेटर यांच्यापुढें दाखल केली, आणि पकडवारंट व झडतीवारंट मिळविलें. पकडवारंट टिळक, आर्यभूषण छापखान्याचे म्यानेजर बाळ, व मालक हरी नारायण गोखले इतक्यांवर होतें. पैकीं टिळक हे आपल्याच पायानें मुंबईस गेलेले होते. वारंटाची बातमी अर्थात् गुप्त राखण्यांत आली होती व टिळक मुंबईत आहेत असें माहीत असतांहि रात्रीं दहा वाजे-पर्यंत वारंट बजावण्यांत आलें नव्हतें. त्या दिवशीं नित्यक्रमाप्रमाणें टिळक हे त्यांचे स्नेही दाजी आबाजी खरे हायकोर्ट वकील यांच्या घरीं गिरगांवातील आंग्रे-वाडींत उतरले होते; व रात्रीं जेवणखाण करून ते दोघे बाहेर येऊन बसतात तोंच युरोपियन पोलिस अधिकारी येऊन त्यानें टिळकांस वारंट दाखविलें. सर्व मजकूर त्यांना एका क्षणांत समजला. लगेच टिळकांनीं गड्याला हांक मारून आपला बिछाना बांधून देण्यास सांगितलें, व स्वतः खरे यांना मॅजिस्ट्रेटकडे जाऊन जामीन घेतोसा विचारा येवढेच सांगून, पोलिस सार्जेटबरोबर ते बाहेर येऊन गाडींत बसले. गाडी तडक फोर्टमधील पोलिस कामेशनरच्या मोठ्या कचेरीच्या इमारतीकडे गेली, व माडीवरील एका बंदोबस्ताच्या खोलींत टिळकांना ठेऊन कुलूप लावण्यांत

यानें. दाजिसाहेब खरे हे मॅ. स्लेटरसाहेबांकडे गेले, पण अदमासाप्रमाणेंच त्यानें जमीन घेण्याचा हुकूम देऊं शकत नाहीं असें सांगितलें. निराशा होऊन रात्रीं ११॥ वाजण्याचे सुमारास खरे हे पोलिस कचेरींत येऊन टिळकांच्या खोलीचें दार ठोठाऊं लागले, तों टिळक स्वस्थ झोंपीं गेले असून घोरत होते. जामिनाचा हुकूम मिळण्याची टिळकांना फारशी आशा नव्हतीच; म्हणून पुढें सुचेल ती योग्य तजवीज करा येवढेंच सांगून टिळकांनीं खरे यांना निरोप दिला.

आर्यभूषण छापखान्याचे मालक हरी नारायण गोखले हे या वेळीं पुण्यास नसून कोंकणांत गेले होते, व मुरुडाहून परत येतांना केळशी येथें धोंडोपंत विद्वांस यांचें घरीं टिळकांवरील खटल्याची तारेनें आलेली बातमी त्यांना समजली. लगेच दोघे मिळून, आगबोटी बंद असल्यामुळें, पायवाटेनें मुंबईस येण्यास निघाले. यामुळें गोखले यांजवरील वारंट लोंबकळतच राहिलें. बुधवारीं सकाळीं पुण्यास धरपकडी व झडत्या झाल्या. आर्यभूषण प्रेसचे म्यानेजर केशवराव बाळ यांना पकडून पोलिसांनीं केरुरीसंबंधाचे अनेक कागदपत्र जप्त केले व सर्वांना मुंबईस रवाना केलें. बुधवार ता. २८ रोजीं स्लेटर साहेबांपुढें कच्च्या चौकशीला सुरुवात झाली. कोर्टाबाहेर दोनतीन हजार लोक जमले होते. टिळकांतर्फे रसेल व केशवराव देशपांडे हे बॅरिस्टर, आणि खरे व माधवराव बोडस हे वकील काम चालवीत होते. अर्ज फक्त जामिनापुरताच होता पण तो नामंजूर करण्यांत आला. गुरुवारी (ता. २९) स्लेटर साहेबांच्या निकालाविरुद्ध जामिनापुरता अपील अर्ज हायकोर्टात खरे व सेटलवाड यांनीं दाखल केला. न्या. पार्सन्स व रानडे यांची जोडी न्यायासनावर होती. तिनें असा निकाल दिला कीं, दोन दिवसांनीं फिरुन पोलिसकोर्टात खटला चालू होणार असल्यामुळें टिळकांना जामिनावर सोडण्याचें कारण नाहीं; अधिक विलंब लागल्यास पाहतां येईल. शनवार ता. ३१ रोजीं स्लेटरसाहेबांपुढें कच्च्या चौकशीचें काम आणखी चालून मुख्यत: केशवराव बाळ यांचेसंबंधीं पुरावा दाखल करण्यांत आला. या दिवशीं रसेलसाहेबांऐवजीं दिनशा दावर (भावी न्यायाधीश) यांस बॅरिस्टर देण्यांत आलें होतें. सोमवारी फिरुन खटला निघाला. केसरी कोण काढतो, कोण लिहितो, कोण छापतो, कोण वाटतो या सर्व मुद्यांना उद्देशून टिळकांनीं सरसकट सांगून टाकलें कीं मला आधींच कां नाहीं विचारिलें ? मीच सर्वस्वीं केसरीचा चालक, मालक व प्रकाशक आहे. सर्व मजकुराची जबाबदारी मजवर आहे. बाळ यांनीं सांगितलें कीं मी निवळ कारकून असून मजवर जबाबदारी कांहींएक नाहीं. अशी तांत्रिक चौकशी होऊन उभयतांनांहि सेशन कमिट करण्यांत आलें. झडतीवारंटाच्या आधारावर केसरी मराठा पत्रांच्या वर्गणीदारांच्या यादी वगैरे सर्व कागदपत्र पोलिसांनीं आपल्या ताब्यांत घेतले होते, ते परत मिळविण्याविषयीं प्रथम बरीच तक्रार झाली; व बॅ. दावर यांनीं जेव्हां कोर्टास असें निक्षून सांगितलें कीं, केसरीवर खटला झाला म्हणून केसरी

कांहीं भेद होऊं शकत नाहीं, व त्याचे कामचलाऊ कागदपत्र व्यवस्थापकांस परत न मिळतील तर लोक सरकारावर खुनशीपणाचा आरोप करतील सांभाळ्य, तेव्हां लगेच ते कागदपत्र टिळकांच्या सॉलिसिटरच्या स्वाधीन करण्यांत आले.

पण इकडे टिळकांचा खटला सुरू असतांच इतर लोकांची धरपकड सुरू झाली. टिळकांस पकडल्याच्या दुसरेच दिवशीं सकाळीं उजाडतें न उजाडतें तोंच पुण्याचे पोलिस सुपरिंटेंडेंट मि. केनेडी यांनीं पांचपन्नास पोलिसांची पार्टी घेऊन श्रीमंत बाळासाहेब व तात्यासाहेब नातू (मवली पाती) यांच्या घरास वेढा दिला, व १८२७ चा रेग्युलेशन नं. २५ या अन्वयें मुंबईसरकारानें काढलेलें वॉरंट बजाऊन उभयतांना कैद करण्यांत आलें. वाड्याची आणि बागेंतील तात्यासाहेबांच्या घोडदौडीच्या इमारतीची झडती घेऊन कांहीं हत्यारेंहि जत करण्यांत आलीं. उभयतांना लगेच मुंबईच्या आगगाडींत बसविण्यांत आलें. पैकीं तात्यासाहेब यांस ठाणें येथें उतरून घेऊन येथील तुरुंगांत रवाना केलें, व बाळासाहेब यांना साबरमतीच्या तुरुंगांत पोंचविलें. नातूंना ज्या रेग्युलेशनप्रमाणें कैद केलें तो कायदेपंडितांच्याहि ध्यानांत नसण्याइतका जुना व अडगळींत पडलेला होता. या कायद्यांत विशेष गोष्ट ही होती कीं, एखाद्या मनुष्यावर सरकारची इतराजी झाल्यास व त्याचा उघड इन्साफ करण्याची सरकारची इच्छा नसल्यास त्याला त्या अन्वयें कैदेंत ठेवावें, त्याची मालमिळकत जप्तींत टाकावी, व तींतूनच त्याला पोटगी द्यावी. नातूंना तुरुंगांत रवाना केल्यानंतर त्यांच्यासंबंधीं कांहींच करण्याचें उरलें नव्हतें. पण ते तुरुंगांत असेपर्यंत टिळकांच्या तुरुंगवासापेक्षांहि कांहीं अंशीं अधीकच गवगवा त्यांच्या कैदेविषयीं इकडे व विलायतेंत चालू होता. ज्यूरीनें निकाल दिला म्हणजे न्यायकोर्टाचा तो निवाडा असें मानून त्याविरुद्ध टीका न करणें हा एक प्रकारचा शिष्टाचार समजला जात असल्यामुळें, टिळकांच्या खटल्याबद्दल अपीलानंतर कोणी फारसें बोलेना. काय झाली ती पुढें त्यांच्या सुटकेचीच खटपट झाली. पण ज्यूरीच्या निकालाविरुद्ध बोलणें हें जसें शिष्टाचाराचें उल्लंघन तसेंच एखाद्याचा उघड इन्साफ न करितां त्याला तुरुंगांत टाकणें हेंहि शिष्टाचाराचें उल्लंघनच ठरत असल्यामुळें, जनतेची निंदक जीभ व लेखणी बसल्या उठल्या कट्यारीसारखी सरकारच्या अंगांत घुसून जखमा करीत होती. नातूबंधूंनींहि "तुरुंगांतून आम्हाला सोडा नाहींतर आमची उघड चौकशी करा" अशा आव्हानांच्या अर्जांचा सपाटा सुरू केला होता. सरकारच्या अवकृपेनें रोगी ज्वराप्रमाणें आपली मुदत भोगून घेतलीच, तरी शेवटीं सरकारला एक प्रकारें आपणाकडे कमीपणा घेऊन नातूबंधूंना बंधमुक्त करावें लागलें. या संबंधाची थोडीशी हकीगत पुढें येईलच. याशिवाय मोदवृत्त, पुणेवैभव, प्रतोद वगैरे वर्तमानपत्रांवर याच सुमाराला खटले झाले त्यासंबंधाचीहि हकीगत पुढें दिली आहे.

सोमवार ता. २ आगस्ट रोजीं टिळकांचा खटला सेशनकमिट झाल्यावर,

लगेच म्हणजे बुधवार ता. ४ रोजीं हायकोर्टांत न्यायमूर्ती बद्रुद्दिन तय्यबजी यांज-पुढें बॅ. दावर यांनीं टिळकांना जामिनावर खुलें करण्याचा अर्ज केला. दावर यांची मुख्य तक्रार अशी होती कीं, तुरुंगांत ठेविल्यानें टिळकांना आपला डिफेन्स तयार करण्यास अडचण पडेल. लेखांतील खुलासे, पुराव्याचे कागद, ग्रंथांतील आधार वगैरे गोष्टींत स्वतः टिळकांची मदत असल्याशिवाय भागणार नाहीं. तुरुंगांत नुसतें जातां येतांच मारामार पडते. मग खुलें संभाषण पुष्कळ वेळ कसें चालणार ? शिवाय सेशन सुरू होण्याला एक महिनाभर अवकाश. पूर्वी बंगवासी पत्रावर खटला झाला तेव्हांहि संपादकास जामिनावर सोडल्याचा दाखला होता. पण दावर यांना फार वेळ भाषण करण्याचें कारणच पडलें नाहीं. न्याय-मूर्तीनीं 'तुम्ही कितीचा जामीन द्याल' असें एकदम विचारिलें, व वाटेल तेवढ्या रक-मेचा जामिन आम्ही देऊं असें दावर यांनीं सांगितलें. ॲडव्होकेट जनरल यांनीं मामुली हरकत घेतली पण न्यायमूर्तींनीं ती जुमानली नाहीं; व पंचवीस पंचवीस हजारांचे दोन जामीन व पन्नास हजार रुपयाचा स्वतः टिळकांचा जातमुचलका घेऊन त्यांना खुलें करावें असा कोर्टानें निकाल दिला. गुन्हा राजद्रोहाचा म्हणून मोठा असला तरी खून वगैरेंच्या गुन्ह्यासारखा तो भयंकर नाहीं व आरोपी चौकशीचे वेळीं हजर होणार नाहीं असेंहि नाहीं, हीच सरळ आणि न्यायाची विचारसरणी न्या. तय्यबजी यांनीं अंगिकारली होती. पण सरकारला ही गोष्ट आवडली नाहीं असें पुढें कळून आलें. उलट लोकांना ती आवडली हें जागच्या जागींच कळून आलें. कारण निकाल सांगून न्यायमूर्ती जाग्यावरून उठतांच कोर्टांत जमलेल्या शेंकडों लोकांनीं टाळ्यांचा गजर केला, व त्या टाळ्यांची जाडी पुरवणी बाहेर कोर्टाच्या आवारांत पांच चार हजार लोक जमले होते त्यांनीं काढली. वर्दीप्रमाणें जामीन दिल्यावर ता. ४ रोजीं रात्रींच टिळकांची कच्च्या कैदेंतून मुक्तता झाली.

वाटेल तेवढ्या रकमेचा जामीन आम्ही देऊं असें बॅ. दावर यांनीं धडाडीनें सांगितलें होतें. त्याप्रमाणें, बंगवासी पत्रकाराला अशाच आरोपाकरितां जेवढ्या रक-मेच्या जामिनावर सोडण्यांत आलें होतें त्याच्या दसपट अधिक रकमेचा जामीन टिळकांकडून घेण्यांत आला. पण या कामीं बॅरिस्टरच्या तोंडून धडाडीचे शब्द निघण्यापूर्वी जामीन राहण्याला धडाडीचा मनुष्य उभा रहावयास पाहिजे होता, व तो मिळाला म्हणूनच दावर यांनीं असें छातीठोक विधान केलें होतें. जामिन राहणारे हे गृहस्थ म्हणजे यशवंत विष्णु ऊर्फ अण्णासाहेब नेने, व शेट द्वारकादास धर-मसी हे होत. त्यांनीं प्रत्येकीं २५००० रुपयांच्या सरकारी प्रामिसरी नोटा न्यायमूर्तींचा हुकूम होतांच कोर्टांत हजर केल्या. टिळकांना जामिनावर सोडणें ही गोष्ट खुद्द न्यायाधीशालाहि जर अवघड होऊन बसली होती, तर स्वतः जामीन राहणाऱ्या गृहस्थाला ती किती अवघड असेल याची कोणासहि कल्पना

येईल. फार काय पण पूर्वी न्या. रानडे यांच्यापुढें जामिनाचा अर्ज झाला असतां रानड्यांनीं जामीन मंजूर केला नाहीं व बद्रुद्दिन तय्यबजी यांनीं तो मंजूर केला येवढ्यावरूनच, लोकांनीं स्वतःचीं अनुमानें बसवून, रानडे व तय्यबजी यांचे धैर्याची आपले ठिकाणीं तुलना केली. मुंबईचे मुसलमान लोक म्हणूंहि लागले कीं, "बघा, टिळकांचा जातभाई बामण कसा आणि आमचा खंबीर गडी मुसलमान कसा ! शेवटीं मुसलमानानेंच बामणाला सोडविलें"! न्यायमूर्ती रानड्यांच्या तर्फे कदाचित् असें सांगतां येण्यासारखें होतें व कांहींनीं सांगितलेंहि कीं, तय्यबजी यांनीं जामीन घेतला तेव्हां टिळकांचा खटला सेशनकमिट झालेला असून हाय-कोर्टाच्या अधिकारक्षेत्रांत येऊन बसला होता; पण रानड्यांच्या पुढें हा अर्ज आला तेव्हां खटला सेशनकमिट झालेला नसून, मॅजिस्ट्रेटपुढें चालू होता, अद्यापि म्हणून हायकोर्टानें खालच्या कोर्टाच्या कामांत त्या वेळीं हात घालण्याचें नाकारलें हें योग्यच केलें. पण यावरहि एक उलट उत्तर होतें, व तें असें कीं, खटला जरी त्या वेळीं सेशनकमिट व्हावयाचा होता तरी जामीन घेण्याचा प्रश्न मॅजिस्ट्रेट-साहेबांनीं नकारार्थी निकालांत आधींच काढला होता. या निर्णयावरच अपील या नात्यानें न्या. रानडे यांजकडे जामिनकीचा अर्ज केलेला होता; व जीं कारणें लक्षांत घेऊन अखेर न्या. तय्यबजी यांनीं टिळकांना जामिनावर खुले केलें तीं लक्षांत घेऊन ता० २ रोजीं न्या. रानडे यांनाहि तीच गोष्ट करितां आली असती. आरोपी पळून जाणारा नाहीं व तो मोकळा झाल्यानें स्वतः त्याच्या बचावाला योग्य संधी मिळत असून सरकारी पुराव्यांत देखील कोणत्याहि तऱ्हेनें कमीपणा येण्याचा संभव नाहीं; असें असतांहि जामीन नाकारल्यानें आरोपीला विनाकारण तुरुंगांत खितपत पडावें लागणार होतें. निदान सामान्य लोकांना तरी न्या. रानडे व पार्सन्स यांच्या निकालांतील सूक्ष्म कायदेबाज श्लेष कळण्यासारखा नसल्या-मुळें, त्यांना सहजच वाटलें कीं रानड्यांनीं सरकारला भिऊन टिळकांना जामि-नावर सोडलें नाहीं. तें कसेंहि असो. अण्णासाहेब नेने यांनीं टिळकांना जामिन राहण्यांत त्या काळच्या मानानें विशेष धैर्य दाखविलें यांत शंका नाहीं. टिळक व नेने यांना पूर्वी विशेष परिचय नव्हता; तथापि या अकल्पित सहाय्यानें त्या उभ-यतांचा जो स्नेह तेव्हां जडला तो दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जाऊन आमर-णांत तसाच टिकला हें प्रसिद्ध आहे.

या जामिनकीच्या बाबतींत एकदोन गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या घडून आल्या. टिळकांना पकडलें त्या दिवशीं त्यांचा जामीन घेण्यांत आला नाहीं, तरी दुसरे दिवशीं जामीन घेण्यांत येईल असा सर्वसाधारण समज होता. यामुळें जामिना-करितां उभें राहण्यास तयार होणाऱ्या माणसांची जुळवाजुळव करण्याची खटपट दुसरे दिवसापासूनच सुरू झाली, व अनेक लोक स्वतःच्या स्फूर्तीनें या कामीं पुढें आले. त्यांत कांहीं दक्षिणी व कांहीं गुजराथी असे होते. परंतु त्यांतील बरीच मंडळी

द्रव्यबलाच्या दृष्टीनें सामान्य प्रतीची होती. आणि वदंता तर अशा होत्या कीं टिळकांना जामीन नाकारला न गेला तरी इतक्या भारी रकमांचा जामीन मागतील कीं तो देण्यास हटकून अडचण पडावी. चार किंवा पांच लक्षांचा जामीन मागितला तर इतकी रक्कम किंवा सरकारी प्रामिसरी नोटा वगैरे अमानत ठेऊं शकेल असा एक मनुष्य कोण मिळणार? या रकमेकरितां दहा निरनिराळे लोक जमवून त्यांच्या नांवच्या निरनिराळ्या रकमा किंवा नोटा ठेवतों म्हटलें तर कोर्ट मान्य करील कीं नाहीं अशीहि शंका वाटत होती. बरें, एकच मनुष्य नांवाला पुढें करून इतरांनीं त्याच्या नांवाच्या प्रॉ. नोटा करून देणें हीहि मोठी विचाराचीच गोष्ट कोणासहि होणार. परंतु आधीं जामीन घेतातच कीं नाहीं हे नक्की ठरावयाचें असल्यामुळें, जामीन राहण्यास तयार झालेल्या अनेक गृहस्थांनीं मॅजिस्ट्रेटकोर्टांत जामिनाचे अर्ज करण्याचे वेळीं हजर रहावें इतकीच व्यवस्था प्रथम करण्यांत आली. या सुमारास कै. डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांजकडून डॉ. नानासाहेब देशमुख यांजकडे एक निरोप गेला, त्यांत भाटवडेकर यांनीं स्वतः जामीन उभें राहण्याचें आश्वासन मोठ्या खुषीनें दिलें होतें. येवढेंच काय, पण मॅजिस्ट्रेट कोर्टांत अर्ज करण्यांत आला तेव्हां डॉ. भालचंद्र हे स्वतः हजरहि झाले, व त्यांनीं देशमुखांस असें सांगितलें कीं, पांच लक्षांपर्यंत जामीन द्यावा लागला तरी मी तयार आहें. पण त्या दिवशीं मॅजिस्ट्रेटनें जामीन घेत नाहीं असें सांगितलें. पुढें हायकोर्टाकडे खटला सेशनकमिट झाल्यावर जामिनाचा अर्ज फिरून व्हावयाचा तेव्हां डॉ. भालचंद्र यांच्या या आश्वासनाचा मोठाच आधार टिळकांच्या स्नेह्यांना वाटला. पण दैवयोग असा कीं याच सुमारास मुंबईसरकारनें डॉ. भालचंद्र यांना मुंबई कायदेकौन्सिलचे एक सभासद आपल्यातर्फे म्हणून नेमलें, व ही गोष्ट घडून येतांच जामिनकीच्या बाबतींतला हा मोठा आधार एकदम तुटला. कारण फिरून डॉ. भालचंद्र यांजकडे निरोप गेला तेव्हां त्यांनीं असें सांगितलें कीं, पूर्वी मी जामीन उभा राहण्यास तयार होतों हें तुम्हांस माहीतच आहे, पण हल्लीं सरकारनें मला कायदेकौन्सिलाचा सभासद आपल्यातर्फे नेमून मजवर एक प्रकारें आपला विश्वास टाकला आहे, याकरितां मला आतां जामीन राहतां येत नाहीं. पण डॉ. भालचंद्रच काय, इतर अनेक लोकहि जे पूर्वी खुषीनें जामीन राहण्यास तयार होते ते पोलिसांच्या उद्योगामुळें हळू हळू मागें पाय काढूं लागले. खुद्द आण्णासाहेब नेने यांचा एक युरोपियन सॉलिसिटर चांगल्या ओळखीचा होता; त्यानें नेने हे टिळकांना जामीन राहण्यास तयार झाल्याचें ऐकून त्यांना सांगितलें कीं, टिळक हे जामीन देऊन पळून जाणार आहेत, सबब तुम्ही विनाकारण गोत्यांत पडूं नका. पण नेने यांना हा सल्ला अर्थातच मानवला नाहीं. शिवाय न्यायमूर्ती बद्रुद्दिन तय्यबजी यांनीं जामीन मागितले ते फक्त पंचवीस पंचवीस हजाराचे दोन मागितले. यामुळें नेने यांना ही जामिनकी आपल्या

आवांक्यांत आहे असेंहि आढळून आलें. यामुळें शेवटीं ते एक जामीन रहावे असें ठरलें. पण दुसऱ्या जामिनाची तजवीज कशी होणार? मुंबईचे लखमीदास खिमजी यांनीं आपले भाचे द्वारकादास धरमसी यांना जामीन उभे राहण्यास तयार केलें. पण अमानत ठेवण्याच्या सर्व पैशाची तजवीज होईना. लखमीदास खिमजी यांनीं द्वारकादास यांच्या नांवें सुमारें वीस हजारांचे बाँडस् बदलून दिले, त्याचे भरतीस नेने यांनीं आणखी सुमारें पांच हजारांच्या स्वतःच्या प्रॉमिसरी नोटा घातल्या, व अशा रीतीनें नेने आणि द्वारकादास धरमसी हे दोन जामीन उभे राहिले व ते स्वीकारण्यांतहि आले.

याच सुमारास पुणेवैभवाचे संपादक शंकरराव केळकर व मोदवृत्त पत्राचे संपादक भाऊशास्त्री लेले यांचेहि खटले मुंबईस चालावयाचे असून त्यांना जामीन मिळण्या-बद्दल अर्ज करण्यांत येणार होते. त्याहि बाबतींत नेने यांनीं जामीन राहण्यास तयारी दर्शविली, व टिळकांचे सांगण्यावरून नेने हे शंकरराव केळकर यांस पांच हजारांकरितां जामीन राहिलेहि. लेले यांच्या जामिनकीचें मात्र जुळलें नाहीं. कारण खटला चालविण्याच्या वगैरे बाबतींत लेले यांचे सल्लागार वेगळे व स्वतः त्यांचा हेकेखोरपणा विशेष, यामुळें लेले यांची जामिनकी नेने यांनीं पत्करली नाहीं. तात्पर्य राजद्रोहाचा खटला ज्यावर होईल त्याला एक जामीन पाहिजे तर नेने हे केव्हांहि तयार आहेत असें तेव्हां ठरून गेल्यासारखें झालें. १९०८ सालीं टिळकांवर दुसरा खटला झाला तेव्हांहि नेने जामीन राहण्यास तयार झाले होते. पण तेव्हां जामीनच घेण्यांत आला नाहीं!

असो; १८९७ च्या या खटल्याच्या वेळीं टिळकांना मुंबईत मदत करणाऱ्या मंड-ळींत यशवंतराव नेने, दाजीसाहेब खरे, माधवराव बोडस, नानासाहेब देशमुख, भाऊ-साहेब आठल्ये, अॅडव्होकेट सेटलूर, बॅ. केशवराव देशपांडे, वैद्यबंधू, दाजीबा पिटकर वगैरे प्रमुख होते. दाजीसाहेब खरे हे तर टिळकांचे बाळमित्रच. पुढें मुंबईत राहून खरे हायकोर्ट वकीली करूं लागल्यावरहि टिळकांचा मुक्काम, ते मुंबईस जात तेव्हां, खरे यांजकडेच असे. दोघेहि सिक्कनडास दरवर्षी एकाच बंगल्यांत महिना महिना रहात. मध्यंतरी कांग्रेस, हिंदुमुसलमानांचे दंगे, वगैरे बाबतींत दोघांचा मतभेद होत असे, तरी बेबनाव झालेला नव्हता. पुढें कायदेकौन्सिलच्या निवडणुकीच्या बाबतींत टिळकांची मदत खरे यांना बरीच झाली होती तात्पर्य, सदर खट-ल्याच्या वेळीं कायदेशीर मदतीचा मुख्य भार अर्थात् खरे यांजवरच पडला. पण खरे हे राजकारणांत नेमस्त असून स्वभावानेंहि किंचित् कमी धीट असत. यामुळें टिळकांना स्नेही या नात्यानें जरी त्यांना दूर लोटण्याची इच्छा नव्हती तरी या खटल्याचे कामीं मदत केली असतां ती केवळ परस्पर आहे असें सरकारास भास-विण्याकडे त्यांचा कल असे. डॉ. देशमूख हे मुंबईतील लोकप्रिय व वजनदार गृहस्थ असून ते व अण्णासाहेब नेने यांनीं मिळूनच टिळकांच्या जामिनाची

खटपट केली. सेटलूर हे मोठे उद्योगी व जिव्हाळ्याचे होते. ते आणि त्यांचे स्नेही माधवराव देशमूख यांनीं खटला संपल्यावर मुकदम्याचें पुस्तक छापविलें, व पुढें टिळकांची मुक्तता होण्यासंबंधानें विलायतेंतील हॉवर्डसोसायटीमार्फत झालेली खटपट सेटलूर यांनींच करविली. बॅ. देशपांडे हे त्यावेळीं इंदुप्रकाशांत इंग्रजी मजकूर लिहीत असत. तरुण हौशी बॅरिष्टराच्या नात्यानें त्यांनींहि टिळकांना या वेळीं मदत केली. पण या प्रसगीं सर्वांहून अधिक मदत, आमच्या समजुतीप्रमाणें, महादेव राजाराम बोडस यांची झाली. ते पूर्वी पुण्यांत न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक व कांहीं दिवस मराठा पत्राचे संपादक म्हणून होते तेव्हांपासून ते टिळकांचे पक्षपाती असत. एल्एल्. बी. ची परीक्षा पास झाल्यावर केसरीमराठ्याच्या संपादकवर्गांत कायमचे सामील होण्याविषयीं टिळकांनीं बोडसांना विचारलेंहि होतें; पण हायकोर्टाची वकिली संभाळून मुंबईसच सार्वजानिक कार्य करावें या महत्त्वाकांक्षेनें बोडस पुणें सोडून मुंबईस राहिले. त्यांनीं या वेळीं पुढें येऊन केवळ स्नेहभावनेनें खटल्याचे कामीं हरएक प्रकारची मदत केली. वकील बॅरिष्टरांना माहिती देणें, कोर्टांत खेपा घालणें, सॉलिसिटर यांस कामास लावणें, व डिफेन्सफंड उभारण्याची खटपट करणें या सर्व गोष्टींत त्यांचा हात किंबहुना पुढाकार होता. पुण्याचे मंडळीपैकीं खरी मदत वासुदेवराव जोशी यांची झाली. ता. ४ आगस्ट रोजीं टिळक जामिनावर खुले झाल्यानंतर सुमारें पांच आठवड्यांनीं म्हणजे ता. ८ सप्टेंबर रोजीं खटला हायकोर्टसेशनमध्यें जस्टिस स्ट्राची यांजपुढें निघाला.

दरम्यान टिळकांच्या डिफेन्स वगैरेसंबंधीं काय हकीकती घडल्या त्या पाहूं. जामिनावर खुले होतांच टिळक पुण्यास आले. तों दुर्दैवानें तेथें त्यांजपुढें एक दुःखरूपी विषाचा पेला जणूं काय भरूनच ठेवलेला होता. ता. ५ रोजीं टिळक पुण्यास आले व दुसरेच दिवशीं त्यांचे नवीन पण परमस्नेही श्री. बाबामहाराज यांना महामारीच्या वाऱ्याचा उपद्रव झाला. ही बातमी कळल्यापासून शनिवारीं ता. ८ ते मृत्युमुखीं पडेपर्यंत टिळकांनीं बहुधा त्यांचे जवळ बसूनच वेळ काढला. दोनचार वर्षांपूर्वीपासून टिळक हे प्रथम बाबामहाराजांचे सल्लागार, नंतर सहकारी कार्यकर्ते, व शेवटीं जिवलग स्नेही अशा क्रमानें त्यांचा जिव्हाळा वाढला होता. दहापंधरा वर्षें कोर्टांत वाद खेळून महाराजांनीं आपलें विवादित दत्तविधान शाबित करून इस्टेटीचा ताबा नुकताच घेतला होता. सरदारपटांत त्यांचें नांव दाखल झालें होतें, व स्वतः दिवाणी दाव्यामुळें ते निर्धन किंबहुना कर्जबाजारी बनले होते तरी त्यांचा स्वभाव खर्चिक व उदार असल्यामुळें इकडे कर्ज काढीत असतांहि सार्वजानिक वगैरे कार्यांत ते देणग्या देत असत. ते सुशिक्षित नसले तरी एक प्रकारचा सभाधीटपणा, निदान सभांतून अध्यक्ष होऊन खुर्चीवर बसण्यापुरता कां होईना, त्यांचे अंगीं होता; व सभांना अध्यक्ष उपाध्यक्ष करण्यास आपल्या हौसेनें एक फर्स्टक्लास सरदार मिळतो, तो टिळक तरी हातचा कां जाऊं देतील ?

यामुळें टिळक व बाबामहाराज यांचें परस्परांचे घरीं जाणें येणें विशेष होऊं लागलें. बाबामहाराजांची ती ठेंगणी ठुसकी मूर्ति, त्यांचीं रंगीबेरंगी उंची जाकिटें, हिरवें पागोटें, निळा चष्मा वगैरे पुण्यांतील गोष्टी नव्या पिढीच्याहि लक्षांत, लहानपणीं पाहिलेल्या म्हणून असतील, गांवांत दिसणाऱ्या सर्वांहून मोठ्या घोड्यांच्या रथांत ही उत्सवमूर्ती घालून टिळक व त्यांची स्वही मंडळी रस्त्यानें निघाली म्हणजे लोकांना मोठी मौज वाटे. टिळकांच्या सहवासामुळें सरकारचा डोळा बाबामहाराजांवर आधींपासूनच होता. त्यांना हत्यारांचा परवाना, त्यांच्या घरीं शिपाईप्यादे आणि हत्यारांचा संच असल्यामुळें रँडसाहेबांचा खून झाल्यापासून महाराजांच्या घरावर गुप्त पोलिसांची चौकी बसली होती; व सरदार नातूंना पकडून नेल्यापासून बाबामहाराजांवरहि कांहींतरी संकट येणार अशी चिंता त्यांच्या हितचिंतकांना लागून राहिली होती. अखेर संकट आलेंच, पण तें तुरुंगवासाचें संकट न येतां आपलें स्वरूप बदलून महामारीच्या मिषानें आलें. वाखा झाल्यापासून दुखण्याचें पाऊल मागें असें मुळींच पडेना. कांहीं शंकेखोर लोक असेंहि म्हणूं लागले कीं, सरकारच्या गुन्हेगारींत सांपडल्यामुळें महाराजांनीं हिरकणी खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, हा महामारीचा आजार कांहीं खरा नव्हे! अशा संशयांतच महाराज मरण पावते तर कदाचित् पोलिसांच्या उपद्व्यापानें त्यांचें प्रेत डॉक्टरांच्या हातीं जावयाचें व चिरफाड होऊन त्याची विटंबना व्हावयाची हें एक; शिवाय कर्जबाजारी असले तरी इस्टेट मोठी पडली, महाराजांचें कुटुंब अगदीं तरुण असून गरोदर होतें, आणि त्यांचे रक्षण व पुढील व्यवस्था बखेडा न माजतां हरप्रयत्नानें होणें जरूर होतें. या सर्व गोष्टी मनांत आणून टिळकांनीं प्रथमपासूनच चांगली वेळेवर खबरदारी घेऊन डॉ. मोदी, डॉ. विश्राम, व डॉ. मेकॉनकी या तीन डॉक्टरांचें औषध सुरू केलें होतें. यांपैकीं डॉ. मोदी हे पारशी, डॉ. विश्राम हे ब्राह्मणेतर, व डॉ. मॅकॉनकी हे युरोपियन असून पुण्याचे सिव्हिलसर्जन होते. ही योजना लक्षांत घेण्याजोगी आहे. या योजनेमुळेंच आसन्नमरण अशा स्थितींत बाबामहाराज यांचें मृत्युपत्र पार पडलें व अखेर न्यायकोर्टांतूनहि तें कायम झालें. या मृत्युपत्रांत टिळकांनीं आपल्या समजुतीनें इतर चार चांगलीं माणसें ट्रस्टी व एक्झीक्यूटर म्हणून नेमलीं होतीं. पण स्वतः बाबामहाराज यांनीं आग्रह धरून टिळकांचें नांव ट्रस्टी म्हणून घातलें व टिळकांनीं नाइलाजानें त्याला संमति दिल्यावर महाराजांना समाधान वाटलें. हें मृत्युपत्र होणें महाराजांच्या इस्टेटीच्या दृष्टीनें एक मोठेंच कार्य झालें, व टिळक हजर नसते तर कदाचित् तें मृत्युपत्र होण्याचेंच राहून गेलें असतें. टिळक दोनच दिवस उशीरां जामिनावर सुटते तर त्यांना आपल्या स्नेह्याची अखेरची भेट व इस्टेटीला मृत्युपत्राची व्यवस्था हीं दोन्ही अंतरलीं असतीं. पण योगायोगाप्रमाणेंच सर्व गोष्टी घडत असतात हें म्हणणें कांहीं खोटें नाहीं. मात्र या योगांत एक विशेष

गोष्ट ही होती कीं, योग्य वेळीं महाराजांकडून जें मृत्युपत्र करवून टिळकांनीं इष्टेटीचें हित साधलें त्यामुळेंच त्यांनीं, स्वतःवर पुढें ओढवणाऱ्या एका मोठ्या संकटाचें बीज, आपल्या हातानें लावून ठेविलें असें पुढें अनुभवास आलें.

बाबामहाराजांच्या मृत्युपत्राची अशा रीतीनें समाधानकारक व्यवस्था लागल्यानंतर टिळकांना या पुढची गोष्ट म्हणजे स्वतःच्या खटल्याची व्यवस्था करणें ही प्राप्त झाली. ही व्यवस्था म्हणजे अर्थात् कोर्ट खर्चाची, व या खर्चाची रक्कम तर फार मोठी होणार हें उघड दिसत होतें. टिळकांना त्यांच्या आयुष्यांत पुढें पुढें केसरीच्या उत्पन्नामुळें सार्वजनिक किंवा कोर्टातील भांडणासारख्या कामाकडेहि खर्च करण्याकरितां लागणाऱ्या पैशाची वाण पडली नाहीं. तथापि चिरोलकेसच्या वेळीं दोन तीन लक्ष रुपये लागणारे असल्यामुळें तेव्हाहि वेगळा सार्वजनिक फंडच उभारावा लागला. ताईमहाराजप्रकरणीं त्यांना एकंदर पन्नास साठ हजार रुपये खर्च आला पण तो अनेक वर्षांवर वांटून गेल्यामुळें त्याकरितां टिळकांना सार्वजनिक वर्गणी मागावी लागली नाहीं. तो खर्च पडेल तसा तसा केसरीच्या चालू शिलकेंतून किंवा कर्जाऊ रकमा काढून व परत करून—म्हणजे केसरींतूनच—टिळकांना भागवितां आला. पण १८९७ च्या खटल्याच्या वेळची स्थिति फारच बिकट होती. केसरींतून उरणारा नफा हा केसरीमराठ्याचे दुय्यम संपादक, कारकून, पुस्तकें, वर्तमानपत्रांच्या वर्गण्या, तारा, कांग्रेस वगैरेसंबंधीं प्रवासखर्च व स्थानिक किरकोळ चळवळी यांवर खर्च होऊन उरेल तो म्हणजे फारच थोडा केसरीच्या कर्जफेडीकडे जात असे. यामुळें प्रत्यक्ष संसाराकडे केसरीच्या उत्पन्नांतून टिळकांना एक पै देखील घेतां येत नव्हती, व संसारखर्च भागविण्याकरितां म्हणूनच टिळकांनीं लॉ क्लास काढला होता, हें मागें एका भागांत सांगितलेंच आहे. लातूरच्या गिरणीचें कर्जहि डोक्यावर होतेंच. यामुळें लॉ क्लासचें सर्व उत्पन्न टिळकांचे त्या वेळचे स्नेही सावकार व पेढीवाले, चित्रशाळेचे मालक वासुदेवराव जोशी, यांजकडे भरावयाचें, संसारखर्चाला लागतील तसेतसे पैसे त्यांजकडून आणावयाचे, व वार्षिक आढाव्यांत येणें रक्कम उरेल ती तेवढी कर्जफेडीकडे जावयाची असाच क्रम बहुधा चाले. अशा स्थितींत राजद्रोहाच्या खटल्यांत जे मोठमोठे वकील बॅरिस्टर लावे लागणार त्याला लागणाऱ्या पैशाची तजवीज कशी व्हावी ? त्याकरितां सार्वजनिक वर्गणी करणेंच जरूर होतें; व टिळक जामिनावर सुटण्यापूर्वीच मुंबईच्या त्यांच्या स्नेह्यांनीं ता. ३ आक्टोबरच्या केसरींत 'डिफेन्सफंडा'ची जाहिरात दिली होती. केसरीप्रमाणें इतर पत्रांवरहि कांहीं खटले झाले होते व आणखी कांहीं होण्याचा रंग होता. त्यांचे संपादकहि बिचारे निर्धनच, व सर्वांवर आरोप एकच, म्हणून सर्वांचा बचाव एकाच तंत्रानें व एकाच धोरणानें होणें हे योग्यच होतें. फौजदारी खटल्यांत फिर्यादीच्या ठिकाणीं जसें राणीसरकारचें नांव लिहिलें गेलें होतें, तसेंच केसरी व इतर वर्तमानपत्रांचे संपादक खटल्यांत सांपडले तरी पर्यायानें

ते खटले सर्व जनतेवरच असून, आरोपींच्या ठिकाणीं आपणच सर्व लोक मिळून आहोंत असें मानणें रीतीचें होतें. यामुळें सार्वजनिक 'डिफन्सफंड' गोळा करण्याची कल्पना निरपवाद ठरून ती अंमलांतहि आली. या फंडाचे पैसे मेसर्स 'हिरालाल मुल्ला आणि मुल्ला' सॉलिसिटर्स यांजकडे पाठवावे असें जाहीर झालें, व दुसरे दिवसापासून पैसे येऊंहि लागले.

पण टिळकांवरील हा खटला सर्व महाराष्ट्रानें आपणावर आहे हें जसें मानलें तसेंच इतर प्रांतांनींहि या कामीं आपली सहानुभूति तावडतोब प्रदर्शित केली. महाराष्ट्र व बंगाल यांचा लागाबांधा काय आहे कळत नाहीं, पण तेव्हां डिफेन्सफंडाची चळवळ सर्व हिंदुस्थानांत प्रथम बंगाल्यांत व तीहि मोठ्या जोरांत झाली. अमृतबझार पत्रिकेचे संपादक शिशिरकुमार व मोतीलाल घोस हे तर टिळकांचे चहाते व स्नेहीच होते. परंतु या वेळीं सर्व हिंदुस्थानभर राजकारणांत एकाच दिलाची मंडळी होती व पक्षभेद अद्यापि प्रबळ झालेला नव्हता, यामुळें बंगाल्यांत सुरेंद्रनाथ बानर्जीप्रभृति लोकांनींहि डिफेन्सफंडाचें कार्य उचलून धरलें. ता. ३ आगस्टच्या केसरीच्या अंकांतच मुंबईच्या बातमीदारानें असें लिहिलें होतें कीं, टिळकांना मदत करण्यासाठीं एका बंगाली जमीनदारानें पन्नास हजार रुपये काढून ठेवल्याची तार आली आहे. पण ही बातमी शब्दशः खरी नव्हती, व पुढील आठवड्यांत तर ती निवळ आफवा असेंहि ठरलें. ही बातमी प्रथम अँग्लोइंडियन पत्रांत प्रसिद्ध झाल्यामुळें डिफेन्स फंडाला अडथळा आणण्याकरितांच त्यांनीं ती प्रसिद्ध केली असावी असाहि संशय आला. पण बातमी जशी खोटी तसा हा संशयहि खोटा होता. कसेंहि असलें तरी, या पन्नास हजाराच्या खोट्या भपक्यानें खरी वर्गणी जमण्याचें काम मात्र शिथिल पडेल अशी भीति वाटून ता. १० आगष्टच्या अंकांत ती बातमी खोटी आहे असें स्पष्ट जाहीर करून लोकांनीं वर्गण्या देण्यास आळस करूं नये अशी सूचना फिरून देण्यांत आली. वर्गणी पूर्वी 'हिरालाल व मुल्ला' यांजकडे द्यावी असें जाहीर झालें होतें, पण प्रख्यात सॉलिसिटर भाईशंकर व कांगा यांनीं सवलतीनें व स्नेहबुद्धीनें टिळकांचें काम चालविण्याचें पत्करिल्यामुळें यापुढें फंडाची वर्गणी त्यांजकडे व डॉ. नानासाहेब देशमुख यांजकडे भरावी असें लोकांना कळविण्यांत आलें.

पैशाप्रमाणें वकीली सल्ला व मदतहि भरपूर आणि फुकट मिळेल असें वाटूं लागलें. कोणी म्हण मि. नॉर्टन येऊन फुकट काम चालविणार. कलकत्त्याचे सुप्रसिद्ध बॅरिस्टर उमेशचंद्र बानर्जी यांचेंहि नांव या बाबतींत ऐकूं येऊं लागलें. राजद्रोहांच्या कामीं गांवच्या वकिलांपेक्षां बाहेरच्यांचाच हात अधिक यशस्वी होतो असा सामान्य अनुभव किंवा समज असल्यामुळें मुंबईच्या बॅरिस्टरांचें नांव अर्थात् कोणी घेत नसे. किंबहुना बाहेरच्या मनुष्यानें येऊन काम चालवावें यांत थोडें स्वारस्यहि होतें. हा खटला म्हणजे सरकारशीं एक प्रकारचें युद्ध, व युद्ध

निघालें म्हणजे दूरदेशचे राजेहि मदतीला येण्याचा पौराणिक किंवा ऐतिहासिक सांप्रदाय प्रसिद्धच आहे. मुंबईतील इंग्रज बॅरिस्टरांनीं हा खटला आपण हातीं घेणार नाहीं असें वळणावळणांनीं दर्शविलें होतें. देशी बॅरिस्टरांपैकीं नांव घेण्यासारखे काय ते फेरोजशहा मेथा. पण परप्रांताचा मिळाला तरी या प्रसंगीं इंग्रज बॅरिस्टरच आधिक इष्ट असें वाटून तीच योजना अखेर मुकर झाली; व टिळकांच्या डिफेन्सचा विडा बंगाल्यानें उचलून कलकत्त्याचे बॅरिस्टर प्यू व गार्थ हे टिळकांचा खटला चालविण्यास येणार असें लवकरच जाहीर झालें. दावर व देशपांडे हे वकीलपत्र देऊन राखून ठेवण्यांत आलेच होते; कारण केसरीशिवाय पुणेवैभव, मोदवृत्त वगैरे इतर कांहीं वर्तमानपत्रांवर खटले झाले होते त्यांच्या बचावाकरितांहि वकील हवेच होते .

डिफेन्स फंड हळू हळू जमूं लागला होता व कलकत्त्याहून बॅरिस्टर येणार असें बहुतेक ठरल्यासारखें झालें होतें; तथापि केवळ फंडावर विसंबून राहणें टिळकांना शक्य नव्हतें. स्वतःचे म्हणून कांहींतरी दोन तीन हजार रुपये बरोबर घेऊन गेल्याशिवाय मुंबईत त्यांना पाय ठेवण्याची सोय नव्हती. खुद्द पुण्यांत वर्गणी जमावी तशी जमली नाहीं. बाळासाहेब नातूंसारखे स्नेही पैसे खर्च करण्याला चिकट, तरी ते जाग्यावर उभे असते तर कांहीं तजविजीनें त्यांजकडून कर्ज काढतां आलें असतें. पण त्यांना धरून नेल्यामुळ तीहि बाजू अडली गेली. त्यांच्या मागें त्यांच्या घरीं पैसा हवा तितका होता; पण त्यांच्या इष्टेटीवर जप्ती बसलेली. शिवाय टिळक व नातू एकाच वेळीं कैद करण्यांत आल्यामुळें गांवच्या लोकांनीं फारच दहशत खाली. मात्र या वेळीं वासुदेवराव जोशी यांनी खाजगी स्नेह्यांकडे वगैरे जाऊन कोणाकडून शंभर कोणाकडून दोनशें अशा कांहीं रकमा उसनवार आणल्या, व या मिळाल्यावर टिळकांनीं मुंबईस जाण्याची तयारी केली. ही तयारी करितांना आपल्याला शिक्षा होणार अशी खात्री असल्यामुळें टिळकांनीं आपलें मृत्युपत्रहि केलें. हें मृत्युपत्र सांगण्यास टिळक व लिहिण्यास धोंडोपंत विद्वांस हे बसले तेव्हां, आपल्या तुरुंगवासापेक्षां सांपत्तिक स्थितीच्या कल्पनेचाच प्रकाश मनावर एकदम पडल्यानें, सांगणाराच्या व लिहिणाराच्या दोघांच्याहि डोळ्यांना पाणी आलें. टिळकांची मिळकत काय ती येऊन—जाऊन केसरी-वर्तमानपत्र. पण त्याच्या डोक्यावरील कर्ज अद्यापि सर्व फिटलें नव्हतें. शिवाय केसरीची लोकप्रियता व वर्गणीदारांची संख्या हीं स्वतः टिळक पत्रांत लिहीत यामुळें होतीं; अर्थात् त्यांच्या पश्चात केसरी नीट न चालला तर वर्गणीदारांची संख्या कमी व्हावयाची. खटल्यानें केसरीचें नांव एकप्रकारें अधिक प्रसिद्ध होणार हें खरें; पण केसरीचा वर्गणीदार होणें ही देखील सरकारच्या दृष्टीनें एक प्रकारची गुन्हेगारी ठरून वर्गणीदारांना पोलिसांकडून चिमटे घेतले जाण्याचा किंवा छळ होण्याचा संभव होता. गिरणीचें कर्ज व त्याच्या व्याजाचे हप्ते चालूच

होते, व चरितार्थाचें मुख्य साधन लॉ क्लास हा बंद पडणार होता. तात्पर्य, कुटुंब-पोषणाचीं साधनें बहुतेक बंद होऊन कर्जाचा बोजा मात्र वाढणार, व अशा स्थितींत कैदेंतच मृत्यु आल्यास त्या घाताइतकी सीमा उरणार नाहीं, असें वाटूनच टिळकांच्या डोळ्याला पाणी आलें असलें पाहिजे. पण ही स्थिति अर्थात क्षणभरच टिकणारी होती, व तो क्षण जातांच टिळकांनीं मृत्युपत्र लिहून पुरें केलें. त्यांत केसरी व कर्ज या दोन गोष्टींचीच व्यवस्था करावयाची होती आणि त्याकरितां वासुदेवराव जोशी, धोंडोपंत विद्वांस, दाजीसाहेब खरे, वासुदेवराव बापट वगैरे मंडळी अधिकारी पंच म्हणून नेमण्यांत आली होती.

सप्टेंबरच्या प्रारंभीं हायकोर्टाचें सेशन सुरू होणार असून ता० ६ सप्टेंबर रोजीं केसरीवरील खटल्यास प्रारंभ होणार असें अर्धवट सरकारी रीतीनें जाहीर झालें होतें. पण दरम्यान, हा खटला शक्य तर पुढें ढकलला जावा अशी कांहीं लोकांकडून खटपट सुरू झाली. त्यांपैकीं ब्रुइनसाहेब हे एक प्रमुख होते. खुनाचा तपास लावण्याकरितां पुण्यास स्पेशल डेप्युटी ऑफीसर म्हणून त्यांची नेमणूक झाली असल्याचें मागें सांगितलें आहे, व हल्लीं त्यांचा गुप्त तपास जारीनें सुरू होताच. ब्रुइनसाहेब हे मोठे हुशार व पाणीदार असल्याबद्दल लौकिक होता, व इतर कांहीं गोष्टी त्यांच्या आड न येत्या तर ते मुंबईचे पोलिस कमिशनरहि व्हावयाचे ! त्यांच्या वागण्याच्या पद्धतींत आढ्यता मुळींच नसे, व सामान्य माणसाशींहि सर्व व्यवहार करण्याइतकें चांगलें सफाईदार मराठी ते बोलत. एकंदरीनें कोणत्याहि विलायती साहेबापेक्षां त्यांना इकडील समाजांतील मनुष्यस्वभावाचें ज्ञान अधिक होतें. यांनीं खुनाचा तपास हातीं घेतल्यावर पहिल्याच झडपेत मनाशीं असा तर्क केला, व तो बरोबरच होता कीं, टिळक व नातूबंधू यांचें अंग या खुनांत असण्याचा संभव नाहीं. एकाला तुरुंगवास प्राप्त झालाच आहे व दुसऱ्याला तो लवकरच होईल; पण लोकांना दहशत घालण्याची सरकारची हौस फिटण्याकरितांच ही कैद त्यांना भोगावी लागणार होती. एका दृष्टीनें टिळक व नातू पुण्यांत नसल्यानें खुनाचा तपास लागण्यास मदत होईल असें सरकारास वाटण्यासारखें होतें. पण ब्रुइन यांना मनांतून अशी आशा वाटत असावी कीं, टिळकांना असले सूत होणें ही गोष्ट आवडणारी नसल्यानें म्हणा, किंवा खुनाचा तपास लवकर न लागल्यास पुणेकरांना त्रास सोसावा लागेल तो टळावा म्हणून म्हणा, गुन्ह्याचा शोध लागण्यास टिळकांकडून कांहीं तरी मदत होईल. यामुळें टिळकांचा खटला पुढें ढकलला जावा, आणि इकडे टिळकांकडून मुदत मिळण्याचा अर्ज करवून तिकडे सरकाराकडूनहि त्यास मान्यता देववावी असा बेत ब्रुइनसाहेबांनीं बहुधा केला होता.

पण या बाबतींत ब्रुइनसाहेबांची लवकरच निराशा झाली ! त्यांनीं पुण्यास टिळकांचा मुक्काम असतां दर एकदोन दिवशीं टिळकांकडे येऊन अनेक प्रका-

रच्या गप्पा मारण्याचा परिपाठ ठेविला. या गप्पा म्हणजे दोन अत्यंत धूर्त व बुद्धिमान् मनुष्यांच्या करामतींची झटापटच होती. परस्परांचे हेतु परस्परांस पूर्णपणें माहीत. तथापि ब्रुइनसाहेब हे बोलूनचालून आपल्या पायानें टिळकांकडे जात, व तुम्ही माझ्या घरीं येण्याचें कारण नाहीं असें तोडून सांगून शिष्टाचाराचें उलंघन करण्याची टिळकांना इच्छा नव्हती; यामुळें या भेटींत व्यत्यय मुळींच येत नसे. उलट उभयतांच्या एकदां गप्पा सुरू झाल्या म्हणजे त्यांत कांहीं उघड, कांहीं अर्धवट गुप्त, व कांहीं सर्वस्वींहि गुप्त अशा गोष्टींची चर्चा चालत असल्यामुळें उभयपक्षीं संभाषण लांबत असे. प्रत्येकाचा असा प्रयत्न कीं, आपल्या हितास विघातक अशी कोणतीहि गोष्ट आपल्या तोंडून तर बाहेर न पडावी, पण दुसरा काय बोलेल त्यावरून आपणास कांहीं सूचना घेतां आली तर पहावी. खुनांत सामील कोणत्या वर्गांतील लोक असावेत याविषयीं चुकून तरी टिळकांचा अंदाज किंवा त्यांना कर्णोपकर्णीं कळलेली माहिती आपणास समजावी हें ब्रुइनसाहेबांचें पहाणें. उलट केसरीवरील खटल्यांत सरकार कोणतें धोरण ठेवणार? आणखी कांहीं खटले किंवा धरपकड व्हावयाची आहे कीं काय? वगैरे संबंधीं गुप्त माहितीचा कानोसा लागेल तर पहावा ही टिळकांची दृष्टी. होतां होतां एक दिवस ब्रुइनसाहेबांनीं मोठी प्रस्तावना करून टिळकांस सरळ सवाल टाकूनच विचारलें कीं, तुम्ही मनावर घेतल्यास खुनाचा तपास लावण्याचे कामीं तुमची मदत आम्हांला फार होईल, ती तुम्ही कां न द्यावी? यावर टिळकांनींहि तावडतोब उत्तर दिलें तें असें. कीं "मला मदत करतां येईल असें मला आधीं वाटत नाहीं. कारण मला येऊन माहिती देणार कोण? पण तुम्ही हेंहि लक्षांत ठेवा कीं, मला चुकून कोठून कांहीं माहिती कळली तरी मी तुम्हास ती सांगूं शकणार नाहीं. कारण गुन्हेगारास शिक्षा व्हावी हें न्यायाचें आहे असें मला वाटत असलें तरी, मी कोणाच्या गुप्त हेराचें काम करणार नाहीं व कोणाचा विश्वासघातहि माझ्याकडून होणार नाहीं. तुमचें काम तुम्ही करीत आहांत, त्याच्या आडहि पण मी येणार नाहीं. ह्या खुनानें पुण्याला लांछन लागलें असें लँबसाहेब म्हणाले तें मला कबूल नाहीं. पण खुनी मनुष्याला हरप्रयत्नानें धरून तुम्ही त्यास शिक्षा देऊं नये असेंहि मी म्हणत नाहीं."

टिळकांच्या या सडेतोड बोलण्यानें ब्रुइनसाहेबांची निराशा झाली. पण लवकरच गुन्ह्याचा तपास लावण्याच्या त्यांच्या इतर प्रयत्नांस यश येऊं लागलें; व त्यांतच त्यांना हेंहि अधिकाधिक कळूं लागलें कीं, खुनाकरितां टिळकांना जबाबदार धरण्याचा आव राजकीयदृष्ट्या सरकारानें कितीहि घातला तरी निवळ न्यायाच्या दृष्टीनें ही जबाबदारी टिळकांकडे कांहीं केल्या येत नाहीं. टिळकांचा संबंध येत नाहीं असें कळल्यावरहि सेशनचा मुकदमा टिळकांनीं लांबवून घ्यावा असा ब्रुइनसाहेबांचा आग्रह टिळकांना सुरू होताच. पण त्याचें कारण

मात्र आतां असें होतें कीं, टिळकांच्या भलेपणाची छाप ब्रुइनसाहेबांवर पडून त्यांच्या मनांत टिळकांविषयीं एक प्रकारची सहानुभूति उत्पन्न झाली होती. त्यांना असें वाटत होतें कीं, खुनाचा खटला मार्गाला लागला व त्यांतील आरोपीला शिक्षा झाली म्हणजे मग आपोआपच सरकारचा टिळकांवरील राग कमी पडेल, आणि त्यांना सोडून तरी देण्यांत येईल अगर अखेर शिक्षा झालीच तर फार थोडी होईल. इकडे प्रो. जिनसीवाले हेहि टिळकांना आग्रह करूं लागले कीं, खटला महिना पंधरादिवस पुढें लांबवून घ्या. कारण टिळकांची पत्रिका पाहून त्यांनीं ग्रहांचे योग वर्तविले त्यांत चालू पंधरवडा वाईट होता असें जिनसीवाल्यांना आढळून आलें होतें. तथापि, खून सांपडला व त्यांत आपलें अंग नाहीं हें सिद्ध झालें तरी एकदां भरलेला खटला सरकार कांहीं परत घेणार नाहीं अशी टिळकांची खात्री होती. आणि याहीपेक्षां अधिक महत्त्वाचें कारण असें कीं, बंगालच्या लोकांनीं बॅ. प्यू व गार्थ यांच्याशीं करार करून त्यांचे दिवस मुक्रर केले होते व या खटला संपतांच ते दोघे विलायतेस जावयाचे होते. ब्रुइनसाहेबांनीं सुचविल्याप्रमाणें घडतें तर टिळकांनीं प्रकृति नादुरुस्त असल्याचें डॉक्टरी सर्टिफिकीट मिळवून पाठवावें व ब्रुइनसाहेबांनीं खटपट करून तें सर्टिफिकीट अधिकाऱ्यांकडून मान्य करवावें अशी योजना साधण्यासारखी होती. पण एकदां काय तो सोक्षमोक्ष होऊन जावा हें बरें, बॅ. प्यू व गार्थ हे तारखांच्या अदलाबदलीमुळें हातचे गेले तर फिरून मिळणार नाहींत, व आपल्या बंगाली लेह्यांचा गैरसमज होईल असें वाटून टिळकांनीं ब्रुइनसाहेबांस नकार दिला. मात्र ता. ६ च्या ऐवजीं ता. ८ सप्टेंबर रोजीं खटला सुरू झाला. केशवराव बाळ यांचा जामीन पूर्वींच घेतलेला होता. त्यांना निरपराधी म्हणून सोडून देतील असा सर्वांचा अंदाज होता. पण त्यांजवरील खटला रीतसर काढून घेण्यांत आलेला नसल्यानें, टिळक व बाळ या दोघांवर मिळून खटला चालू झाला.

बॅ. प्यू व बॅ. गार्थ हे दोघेच त्यांची फी भरपूर देऊन बंगाली मित्रांनीं रवाना केले होते. त्यांच्या बरोबर जे. चौधरी नामक हिंदी बॅरिस्टरहि स्वयंसेवक म्हणून आले होते. या बॅरिस्टर मंडळींचा या हायकोर्टांत उभें राहण्याचा पहिलाच प्रसंग असल्यामुळें हायकोर्टाच्या परवानगीचा प्रश्न उपस्थित झाला. प्रथम या पर इलाख्यांतील बॅरिस्टरांना मुंबई हायकोर्टांत काम चालविण्यास परवानगी देऊं नये असा हायकोर्टाचा झोंक होता. पण कलकत्त्याहून येवढा बॅरिस्टर आणिला त्याला सरकारनें नुसती परवानगीहि दिली नाहीं असा अपवाद येईल तो टळावा म्हणून आणि हायकोर्टाची इभ्रतहि रहावी म्हणून प्यू यांना तेवढी परवानगी देण्यांत आली व गार्थ यांना परवानगी नाकारण्यांत आली. जी गोष्ट गार्थ यांची तीच चौधरी यांचीहि. पण ते बोलून चालून मौज पाहण्याकरितांच आले होते.

खटल्याचे कागदपत्र तयार करणें, पुराव्यांत देण्याचे लेख जुळविणें, त्यांचा

भाषांतरें करणें, आणि बॅरिष्टरांना खटला समजावून देणें या गोष्टींना टिळकांना खरोखर दोन आठवडेच काय ते मिळाले. पण मुंबईच्या लेद्दी मंडळींची त्यांना या कामीं चांगली मदत झाली. सॉलिसिटर भाईशंकर यांनीं काम अगदींच फुकट चालविलें असें नाहीं. पण त्यांनीं व त्यांच्या कचेरींतील लोकांनीं मेहनत मात्र पुष्कळ घेतली. तीन वर्षांपूर्वीं भाईशंकर यांचा व टिळकांचा परिचय बापट-प्रकरणांत सामनेवाले या नात्यानें झाला होता, व त्या प्रसंगीं टिळकांची बुद्धि-मत्ता त्यांचे नजरेस प्रत्यक्ष पडलेली असल्यामुळें या खटल्यानें टिळकांविषयीं त्यांच्या मनांत सहानुभूति उत्पन्न झाली होती. शिवाय त्यांच्या कचेरींतील कारकून वगैरे लोकांहि हा खटला कांहीं मामुली नव्हे, त्याला वेगळें महत्त्व आहे, हें जाणत होते. इकडे टिळकांचें या खटल्याकडे स्वतःच्या दृष्टीनें तर लक्ष होतेंच; पण लोकांच्या दृष्टीनेंहि ते त्याकडे पहात होते. डिफेन्सफंडाच्या वर्गण्या दूरदूर ठिकाणांहून येत होत्या. तसेंच अनेक अकारणबंधु व हितचिंतक त्यांना सुचतील त्या सर्व उपयुक्त सूचना टिळकांकडे लिहून धाडीत होते. राजद्रोहाचा खटला ही चीज नवलाईची असल्यामुळें, निरनिराळ्या आरोपांना उत्तरें काय काय देतां येतील याविषयीं बुद्धिमान लोकांनीं बुद्धि चालविली होती. कोणी टिळकांच्या लेखांतील शब्दांचे अर्थ, कोणी पिनल कोडांतील शब्दांचे अर्थ, यांजवर भाष्यें रचलीं होतीं. कोणी प्रत्यंतरादाखल इतर लेखांतील व पुस्तकांतील उतारे काढून दिले होते. कोणी टिळकांना धैर्य येण्याकरितां म्हणून सरकारास नुस्त्या शिव्या दिलेलीं पत्रेंच पाठविलीं होतीं! कोणी प्रश्न मांडून व पत्रिका पाहून आशाजनक भविष्यें वर्तविलीं होतीं आणि कोणी मंत्रसिद्ध ताईत, अंगारे, देवाच्या अंगावरील फुलें, प्रसाद वगैरे पाठविले होते. यांपैकीं किती थोडा भाग टिळकांना बचावाच्या कामीं प्रत्यक्ष उपयोगी पडण्यासारखा होता, हें वाचकांच्या लक्षांत येईलच. कसेंहि असो. बाहेर लोक आपल्या खटल्यांत लक्ष घालीत आहेत याची पूर्ण जाणीव टिळकांना होती, व आभार-प्रदर्शनार्थ म्हणून ता. ३१ आगस्टच्या केसरींत खालील उल्लेखहि मुद्दाम करण्यांत आला होता:—"केसरीवर प्रसंग आल्यापासून केसरीबद्दल काळजी करणारे लोकांकडून ठिकठिकाणांहून पत्रें प्रत्यहीं येत आहेत तीं वाचून समाधान वाटतें. या सर्व हितचिंतकांस उत्तरें पाठविणें या गडबडींत अशक्य झालें आहे. करितां कोणीहि राग मानू नये अशी सर्वत्रांस केसरीकर्त्यांची विनंति आहे. आलेलीं सर्व पत्रें वाचण्यांत येत असून त्यांतील उपयुक्त सूचनांबद्दल केसरीकार फार आभारी आहेत व त्या सूचनांचा योग्य तो उपयोग केला जात आहे." यामुळें लोकांच्या दृष्टीनें, म्हणजे त्यांना हायकोर्टांत चाललेल्या खटल्याची हकीकत रोजच्या रोज भरपूर कळावी या हेतूनें, खटला सुरू असेपर्यंत मुंबईस जादा केसरी काढण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. हें काम टिळकांच्या परवानगीनें व उत्तेजनानें मुंबईचे मुकुंद बाळकृष्ण गुर्जर यांनीं पत्करिलें असून, पुण्याहून नरसिंह चिंतामण

केळकर व कृष्णाजीपंत खाडीलकर यांना त्यांचे मदतीस पाठविण्यांत आलें होतें.

सेशनापुढील आरोपीला न्यायाधीश चांगला अगर वाईट मिळणें ही एक प्रकारची सोडतच असते. टिळकांच्या वांटयाला न्यायमूर्ति स्ट्रॅची हे आले होते. स्ट्रॅचीसाहेब हे तरुण व तरतरीत असून शिवाय बडे बापके बेटे म्हणून त्यांची हायकोर्टांत वरणी लागली होती. त्यांचे वडील सर जॉन स्ट्रॅची हे हिंदुस्थानसरकारच्या कौन्सिलचे सभासद असून ते साम्राज्यवादी व पक्के अँग्लोइंडियन होते. त्या वेळीं मुंबईच्या हायकोर्टांत नेटिव्ह न्यायाधीश असे दोनच एक माधवरावजी रानडे व दुसरे बद्रुद्दिन तय्यबजी. पैकीं तय्यबजी यांची स्वातंत्र्यप्रियता आधींपासूनच प्रसिद्ध असून,त्यांनीं टिळकांना जामिनावर खुलें केल्यापासून त्यांच्यावर लोकांचा विश्वास जडला व सरकारचा विश्वास उडला यांत आश्चर्य नाहीं. न्या. रानडे यांनीं टिळकांना जामीन देण्याचें नाकारिलें होतें.पण ते झाले तरी सरकारच्या विश्वासांतले होते असें नाहीं. मुंबईच्या हिंदुमुसलमानांच्या दंग्यानंतर 'फेर लढो' नामक चोपड्यावर सरकारानें खटला भरला त्यांत रानडे व जार्डिन या न्यायमूर्तींनीं सरकारची निराशा केली होती; व टिळकांना जामिनावर सोडल्याची बातमी तारेनें विलायतेस गेली तेव्हां लॉर्ड हॅरिस यानीं लंडन टाइम्सला पत्र लिहून 'सरकारचा पाणउतारा करण्याची खोडच मुंबई हायकोर्टाला लागली आहे' अशी तक्रार केली होती. कारण हॅरिससाहेबांच्या अमदानींतच वरील चोपड्यावर खटला झाला होता. न्या. रानडे यांजकडे हा खटला न जाण्याचीं दुसरींहि कारणें अशीं कीं ते 'ओरिजिनिल साईड'ला किंवा सेशन चालविण्याला क्वचितच बसत.त्यांना थोडें कमी दिसे व ऐकूंहि थोडें कमी येई.अपीलकोर्टाचे जज्ज म्हणून बसल्यास दुसरा जोडीदार कामांत असतो. बोलणारा वकील फार दूर असत नाहीं. व वकिलाची तक्रार ऐकूं आली न आली तरी कागदपत्र पाहूनहि निकाल देतां येतो. मुंबई हायकोर्टाच्या सेशनाच्या कचेरींत रानड्यांना सर्वच अडचणी.तेथें दिवसा दिवे लावावे लागतात इतका अंधेर; व गलबला बंद असेल तेव्हांहि वकील साक्षीदार आरोपी चढ्या स्वरानें बोलतील तेव्हांच ऐकूं जावयाचें. कसेंहि असो, तय्यबजी किंवा रानडे यांच्यापैकीं कोणाकडेहि हा खटला गेला नाहीं; व स्ट्रॅचीसाहेबांची माहिती असलेले लोक म्हणूं लागले कीं या राजेश्रींची नेमणूक झाली हें कांहीं बरें नव्हे. पण टिळकांच्या खटल्यांत न्यायाधीश कोण यापेक्षांहि ज्यूरीवर कोण येणार हाच प्रश्न अधिक महत्त्वाचा होता; व खटला सुरू होतांच ज्यूरीच्या निवडणुकीकडे लोक एखाद्या सोडतीच्या निकालाप्रमाणें उत्सुकतेनें पाहूं लागले.

ता. ८ रोजीं बरोबर १२ वाजतां खटल्यास सुरुवात झाली. प्रथम टिळक व बाळ यांना क्लार्क ऑफ दि कोर्ट यांनीं आरोप वाचून दाखविल्यावर ज्यूरीकरितां आणविलेले लोक पुढें बोलावण्यांत आले. पैकीं सरकारतर्फे नऊ लोकांना हरकत घेण्यांत आली व टिळकांतर्फे सात लोकांना हरकत घेण्यांत आली. शेवटीं मि.

टॉमसन (फोरमन), ससून, पोर्टर, फिपसन, आनंदराव वासुदेव, वूलकोम, बाबाजी काशिनाथ, पेस्तमजी वाडिया व प्रॉक्टर इतक्या लोकांची ज्यूरी कायम झाली. यांत पांच इंग्रज, एक ज्यू, एक पार्शी व दोन दक्षिणी असा संच होता. ज्यूरीचीं नावें पहातांच एकमताचा निकाल मिळणें शक्य नाहीं हें तेव्हांच दिसून आलें. आरोपींनीं गुन्ह्याची नाकबुली दिल्यावर फिर्यादीतर्फे ॲडव्होकेट जनरल मि. लँग (यांच्या जोडीला मॅकफर्सन व स्ट्रँगमन हे मदतगार होते) यांनीं खटल्याची सुनावणी सुरू केली. त्यांनीं केसरींतील निरनिराळे लेख वाचून दाखविले, त्यावर जातां जातां थोडी टीका केली, मधून मधून कांहीं लेख पुराव्याला दिले, ते पुराव्याला ग्राह्य मानावे कीं नाहीं याविषयीं मामुली हरकती घेण्यांत आल्या, त्यांतील बहुतेक तक्रारी नामंजूर करण्यांत आल्या, किंवा नामंजूर करण्यासारख्या होत्या असेंहि वाटेल तर म्हणा. डिफेन्सतर्फे तक्रारी सांगतांना मराठी शब्दांत बसावयाचें व मराठी शब्दांत उठावयाचें असें असल्यामुळें, लवकरच प्यूसाहेबांना आपल्या शब्दज्ञानाची शिदोरी अपुरी पडतेशी वाटून त्यांना स्वतः टिळकांचें सहाय्य घेणें जरूर वाटलें, व आरोपीला माझ्या पाठीमागें खुर्चीवर बसूं द्या अशी त्यांनीं कोर्टाला विनंति केली. ती मान्य झाल्यामुळें टिळक आरोपीच्या पिंजऱ्यांतून बाहेर येऊन आपल्या सॉलिसिटरजवळ बसले व सगळा पिंजरा एकटे केशवराव बाळ यांना मिळाला!

प्यूसाहेबांचें हें कृत्य दूरदर्शीपणाचें होतें असें लवकरच ठरलें. कारण पहिले साक्षीदार व फिर्यादी सरकारी ओरिएंटल ट्रॅन्सलेटर, मि. मिर्झा आबास अल्ली बेग, यांची जबानी सुरू होतांच प्रथम खटल्याला रीतसर मंजुरी आहे कीं नाहीं या मुद्यावर थोडा वादविवाद होऊन, शब्दार्थाचे सवाल सुरू झाले, स्वतः टिळक हेच बॅरिस्टरजवळ जायच्या जागीं योग्य माहिती पुरविण्यास हजर होते यामुळें बरीच बाजू सांभाळली गेली. बेग यांच्या साक्षींत प्रथमच खटल्यास सरकारची मंजुरी रीतसर दिली गेली होती किंवा नाहीं या मुद्यावर प्यू साहेबांचें म्हणणें असें पडलें कीं या मंजुरींत नक्की अमुक लेखांबद्दल फिर्याद करावी असें लिहिलेलें नव्हतें. १२४ अ च्या गुन्ह्याबद्दल क्रि. प्रो. १९६ कलमाप्रमाणें नक्की लेखाविषयीं मंजुरी पाहिजे. ॲडव्होकेट जनरल यांचें म्हणणें लेखी मंजुरीचेंहि कारण नाहीं, फक्त संमति असली म्हणजे झालें. शिवाय फिर्याद गुदरल्यानंतरचा एक पुरवणी मंजुरीचा हुकूम त्यांनीं दाखल केला होता. त्याला अर्थातच प्यू साहेबांनीं हरकत घेतली, व टिळकांना अटक झाल्यापासूनचा सर्व प्रकार बेकायदेशीर झाला अशी तक्रार केली. पण शेवटीं न्या. स्ट्रॅची यांनीं असा निकाल दिला कीं, राजद्रोहाची फिर्याद वाटेल त्याला लावतां येऊं नये, फक्त सरकारानेंच ती लावावी, इतकाच या मंजुरीच्या कलमांचा हेतु आहे, व मंजुरीचे कागद अपुरे किंवा

आगेंमागें असले तरी प्रस्तुतची फिर्याद सरकारला संमत आहे यांत शंका नाहीं, म्हणून ती तक्रार मीं नामंजूर करितों.

यानंतर आवास अली बेग यांची जबानी पुढें सुरू झाली. तींत त्यांनीं इतर कागदपत्र दाखल केले व नंतर उलटतपासणी सुरू झाली. पहिल्या दिवसाच्या उलटतपासणींत विशेष कांहीं निघालें नाहीं. दुसरे दिवसाच्या उलटतपासणींत अनेक शब्दांची व त्यांच्या भाषांतराची चिकित्सा झाली. पण एका अर्थानें ती केवळ पाहण्यासारखी मौज होती व दुसऱ्या अर्थानें ती कौतुक वाटण्यासारखीहि गोष्ट होती. मौज अशी कीं, चालली आहे मराठी शब्दांची चर्चा आणि ती करणार कोण तर तीन गोरेसाहेब व एक मुसलमान गृहस्थ. ॲडव्होकेट जनरल, बॅ. प्यू, व न्या. स्ट्रॅची या तिघांच्याहि हातीं लेखांतील प्रत्येक मराठी शब्दाचें भाषांतर होतें. पण कोणचें भाषांतर तंतोतंत बरोबर, कोणच्या भाषांतरांतून लक्षणा व ध्वनि यासुद्धां, पण अतिव्याप्ति न होतां, नक्की अर्थ निघेल हाच मुख्य मुद्दा होता; व कोर्टांत चिरफाड झालेल्या सत्याचें "लिधाविभज्य वृषभोरोरवीति" असें जें वर्णन टिळक नेहमीं विनोदानें करीत तें या ठिकाणीं पहावयास सांपडलें. ओरिएंटल ट्रॅन्सलेटर हे अखिल भाषापंडित असले पाहिजेत अशी समजूत, पण बेग यांच्या मराठी ज्ञानासंबंधानें ती नुसती समजूतच होती. कोर्टांत ठेवलेल्या पण नेहमीं झोंपी जाणाऱ्या कोशग्रंथावरची धूळ मात्र या जबानींत निघून गेली खरी. दाद लावणें, साहिलें ( सोसलें ), खालीं दडपणें, स्वातंत्र्य, वगैरे शब्दांची भवति न भवति बरीच झाली. दाद लावणें म्हणजे दुःखमुक्तता करणें, व त्यापासून पुढें कायदा झुगारून देणें, अशी अर्थाची खेंच सुरू झाली. दाद लावणें यांत 'हत्यारांचा उपयोग करून' असें ध्वनित कां होऊं नये असाहि प्रश्न निघाला, व या वाद-विवादांत खटल्याचा दुसरा दिवस संपला.

तिसरे दिवशीं सुरवातीस प्यूसाहेबांनीं टाईम्स ऑफ इंडियामधील एका लेखाबद्दल तक्रार केली आणि वर्तमानपत्रांनीं टीकात्मक लिहूं नये व ज्यूरींनें जें वर्तमानपत्रांत वाचलें असेल तें विसरून जावें असे मामुली सिद्धान्त न्यायमूर्तींनीं सांगितल्यावर मिर्झा बेग यांची तपासणी फिरून सुरू झाली. या दिवशीं "म्लेच्छांना हिंदुस्थानच्या राज्याचा ताम्रपट ईश्वरानें लिहून दिला नाहीं" या वाक्यांतील प्रत्येक शब्दाचा कीस निघाला. 'म्लेच्छ' या शब्दाची व्याप्ति, 'दिला नाहीं' या शब्दाचें व्याकरण वगैरेबद्दल फार रण माजलें. मग 'स्वराज्य' शब्दाबद्दल व 'छाटून टाका' या वाक्याबद्दल केवढें झुंज झालें असेल याची कल्पना होईलच. दुसरा साक्षिदार 'दत्तात्रय दामोदर' हा केवळ केसरीचा वर्गणी-दार म्हणून कोर्टांत आला होता. तिसरा साक्षीदार नारायण महादेव पुराणिक हा आर्यभूषण छापखान्यांतील कारकून असून बाळ व टिळक यांचा केसरीशीं असलेला संबंध त्याजकडून शाबीत करून घेण्यांत आला. पण डिफेन्सतर्फे वेगळे साक्षीदार

द्यावयाचे नसल्यानें फिर्यादीतर्फेच्या साक्षीदारांकडूनच आपणाला उपयोगी पड- णाऱ्या कांहीं गोष्टी काढून घेण्याचा क्रम प्यू साहेबांनीं ठेविला होता. पुराणिक यांज- कडून पुष्पवाटिका, हितोपदेश, वगैरे पुस्तकें पुराव्यांत दाखल करण्यांत आलीं. चौथा साक्षिदार हेड कंपॉझिटर कोलंगडे यानें मजकुराचीं प्रुफें टिळकांकडे जात असें सांगितलें, पण ही गोष्ट नाकबूल नव्हतीच. गायडरसाहेबांनीं छापखान्याच्या झडतींतून हिशोबी वह्या हजर केल्याचें सांगितलें व सहावा साक्षिदार पुरोहित यानें केसरी व पुण्याचें टपाल हपीस यांचा संबंध सांगितला ! तो पुण्याचा माहित- गार असें पाहून त्याजकडून प्यू यांनीं पुण्यास सामाजिक सुधारणेबाबत तट पडले आहेत हें तर वदवून घेतलेंच; पण पुण्यांतील प्लेगचा कारभार, टिळकांनीं दुःख- निवारणार्थ केलेले प्रयत्न, प्लेग इस्पितळची व्यवस्था वगैरे गोष्टीहि त्याचेकडून त्यांनीं काढविल्या. बिचाऱ्याची बायकोच टिळकांनीं काढलेल्या हिंदू प्लेग इस्पितळांत पडली होती ! अर्थात् त्याचा पुरावा या मुद्यावर फारच ग्राह्य ! इस्पितळांतील स्वयंपाक सर्व हिंदूकरितां सारखाच होता, शूद्रांनांहि इस्पितळांत घेत, या गोष्टी वदवि- ण्याचा हेतु हाच कीं टिळक हे "पूना ब्रॅह्मिन"—म्हणजे केवळ ब्राह्मण्याभिमानी कोत्या विचाराचे ब्राह्मण—असा झालेला साहेब लोकांचा ग्रह निघून जावा. सातवे साक्षिदार नारायणराव दातार, केसरीचे मुंबईचे एजंट, यांनीं मुंबईतील केसरीच्या बटवड्याविषयीं पुरावा दिल्यावर टिळक व बाळ या दोघांचे खालील कोर्टांतील जबाब दाखल करण्यांत आले. यानंतर महत्त्वाची अशी एक गोष्ट घडली ती ही कीं, स्वतः न्यायमूर्तींनीं टिळकांना पुढें बोलावून कांहीं मराठी शब्द व त्यांचें व्याकरण यासंबंधीं त्यांजकडून खुलासा घेतला. न्यायमूर्ती व टिळक यांच्या दरम्यान झालेल्या संभाषणाचा विशेष तपशील देण्याचें फारसें कारण नाहीं. तथापि येवढें सांगितलें पाहिजे कीं, टिळकांना ही अपूर्व संधी मिळाल्याकारणानें बॅरिस्टरला जी गोष्ट करितां येणें अशक्य ती, म्हणजे शब्दांचे नक्की अर्थ बरोबर समजावून देणें, ही गोष्ट त्यांनीं करून घेतली, व त्यांत मनु, याज्ञवल्क्य; दादोबा पांडुरंग आणि रामभाऊ जोशी या सगळ्यांना आपापल्यापरी हजेरी द्यावी लागली!

तथापि मराठी शब्दांचा अधिक स्पष्टार्थ होण्याकरितां कोणी जाडा विद्वान् बोल- वावा किंवा नाहीं याचा विचार न्यायमूर्ती करीतच होते. आणि खरें खोटें आम्हांस माहीत नाहीं तरी, वदंता अशी दाट होती कीं डॉ. भांडारकर यांची या कामीं साक्ष घ्यावी असें सरकारानें योजलेलें असून, त्यांना हायकोर्टाजवळच मुंबई युनिव्हर्सिटीच्या इमारतींत आणून बसविण्यांतहि आलें होतें. पण अखेर भांडारकरांची साक्ष घेण्यांत आली नाहीं हें सर्वांच्याच दृष्टीनें बरें झालें. संमतिवयाच्या बिलाच्या वादापासून भांडारकर व टिळक यांच्यामधील बेबनाव जाहीर झाला होता. क्रीडाभुवनाच्या दंग्यांत टिळकांना गुंतविण्यासारखी तार भांडारकरांनीं टाइम्सला पाठविली होती इत्यादि गोष्टींचें स्मरण घालवावें म्हटलें तरी नाहींसें कसें होणार होतें? भांडारकर

साक्षीस आल्यावर एक पढिक वैय्याकारण व एक स्फूर्त वैय्याकरण यांचा रणसंग्राम मोठा बहारीचा झाला असता; व १८९१ सालीं उभयतांत झालेल्या शास्त्रार्थांच्या वादाची दुसरी आवृत्ति हायकोर्टांत निघाली असती! पण वास्तविक केवळ व्याकरणाच्या सूचिकाग्रावर आधारासाठीं टेकून बसणारा राजद्रोहाचा आरोप व त्यावरून झालेली शिक्षा ही कोणाच्या मनास पटली असती? व्याकरणाच्या औषधानें संशयाची मळमळ कमी न होतां उलट ती वाढलीच असती. कसेंहि असो; त्या दिवशीं अशा अनिश्चित स्थितींत ४॥ वाजतांच कोर्ट उठलें.

दुसरे दिवशीं म्हणजे खटल्याचे चौथे दिवशीं (ता. ११ सप्टेंबर रोजीं) प्रारंभींच न्यायमूर्तींनीं असें सांगितलें कीं, मराठी शब्दांच्या अर्थाविषयीं जास्त पुरावा घ्यावयाचा नाहीं असें मीं ठरविलें आहे. त्यानंतर लगेच अॅडव्होकेट जनरल लँग हे फिर्यादीतर्फे भाषण करण्यास उभे राहिले. गंजिफांच्या डावाप्रमाणें कोर्टांतहि अखेरी साधणें ही मोठी गोष्ट असते. टिळकांतर्फे पुरावा देण्यांत आला असता तर प्यू यांना आधीं बोलावें लागून अॅडव्होकेट जनरल यांना उत्तर देण्याची संधि मिळाली असती. पण टिळकांना स्वतःचा असा पुरावा द्यावयाचा नव्हता म्हणून परभृतिकान्यायानें त्यांनीं फिर्यादीच्या साक्षीदारांच्या द्वारेंच उलटतपासणींत आपला पुरावा दाखल करून घेतला, व सरकारी बॅरिष्टरास आधीं बोलण्यास भाग पाडून आपल्या बॅरिष्टरास उत्तर देण्याचा फायदा मिळवून दिला.

अॅडव्होकेट जनरल लँग हे मोठे संथ वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांनीं प्रथमच केशवराव बाळ यांच्याविषयीं कोर्टाला सांगतांना, कायद्याप्रमाणें ते गुन्हेगार ठरतात हा मुद्दा तर सोडला नाहीं परंतु त्या मुद्याचा आग्रहहि विशेष धरला नाहीं. तथापि बाळ यांची मुक्तता तावडतोब न होतां आरोपी म्हणून त्यांना आणखी दोन दिवस पिंजऱ्यांत उभें रहावें लागलें. आरोपी नं. १ म्हणजे टिळक यांच्याविषयीं बोलतांना मात्र त्यांनीं ही मनोवृत्ति तशीच ठेविली होती असें म्हणवत नाहीं. लँगसाहेबांच्या भाषणाचें तात्पर्य सामान्यतः खालीलप्रमाणें होतें. "केसरीच्या लिहिण्यानें अमुक एका इसमाच्या मनांत प्रत्यक्ष अप्रीति उत्पन्न झाली असें सिद्ध करण्याचें कारण नाहीं. ती होण्याचा संभव असेल तरी पुरे आहे. सरकार उलथून पडावें, किंवा सरकाराला अडथळा व्हावा अशी संधि पहात बसावें, अशी बुद्धि वाचकांच्या मनांत लेखांनीं उत्पन्न झाल्यास ते लेख राजद्रोही ठरूं शकतील. टिळक सन्मान्य, नामदार, फेलो आहेत. केसरी सात हजार खपतो. एकट्या मुंबईस नऊशें प्रति वांटल्या जातात. यावरून हें पत्र वजनदार आहे. त्यांतील लेखांचा परिणाम वाचकांच्या मनावर होणारच. केसरी सरकारला परकीय म्हणतो. केसरीचा भाऊ मराठा म्हणतो कीं, पुढें मागें कधींतरी लोकांना हातीं शस्त्र घ्यावें लागेल. लोक जुलमानें खरोखरच गांजले आहेत कीं नाहीं हें मी

सांगूं शकत नाहीं. पण लेखांत तसें म्हटलें आहे खरें. शिवाजीच्या उत्सवांत गैर कांहीं नाहीं. पण त्याला राजकीय स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. उत्सवाची संधि साधून सरकाराविषयीं अप्रीति उत्पन्न केली आहे. विभूतिपूजा, शिवजयंति, रामजयंति वगैरे लेख अशाच प्रकारचे आहेत. ब्राह्मणांचा छळ, गोवध, लंकेंतल्या राज्याचा वानरांनीं केलेला विध्वंस, शिवाजी फिरून जन्मास येण्याविषयीं प्रार्थना, इत्यादि उल्लेख काय दर्शवितात ? शब्दांच्या भाषांतरां-विषयीं तक्रारी आहेत. पण तीं जबाबदार भाषांतरकारांनींच केलीं आहेत. आम्हीं म्हणतो ते अर्थ नव्हेत हें टिळकांनींच विद्वान् साक्षीदार देऊन सिद्ध करावयाचें होतें. शिवाय एका शब्दाचा हा प्रश्न नाहीं, सर्व लेख एकत्र लक्षांत घेऊनच त्यांचा विचार करावयाचा आहे. हिंदुस्थान पैशानें गरीब झालें असें इतरहि कांहीं लोक म्हणतात. पण ते शिवाजीच्या उद्गारांसारखी भाषा बोलत नाहींत. दारिद्र्या-बरोबर धर्मच्छलाचीहि तक्रार केली आहे. गोरे लोक खोट्या सबबीवर खट-ल्यांतून सुटतात, या राज्यांत न्यायकांची अमर्यादा होते, असेंहि दर्शविलें आहे. शिवाजीच्या वेळीं हजारों तलवारी म्यानांतून बाहेर निघत अशा शब्दांमुळें, दाद लावून घेणें या उपायाला सौम्य अर्थ रहात नाहीं. अफजुलखानाच्या वधाची चर्चा ही ऐतिहासिक होऊं शकते. आणि नुसत्या शिवाजीविषयीं बोलावयाचें तर त्यानें खून केला तें योग्य असेंहि कोणास म्हणतां येईल. पण उत्सवाचें मिष करून सरकारचा संबंध त्यांत आणल्यानें त्या चर्चेचें स्वरूप राज-कीय ठरतें. राजसूय यज्ञ व डायमंडज्युबिली यांचें साम्य बोलूनचालून दाखविलें आहे. या राज्यांत असंतुष्ट राहणें हें कर्तव्य असल्याचें सांगितलें आहे. शिवा-जीच्या अपेक्षेनें सर्व युरोपियन व अमेरिकन ऐतिहासिक पुरुष तुच्छ असें म्हटलें आहे. नष्ट झालेलें स्वातंत्र्य मिळविण्यास उत्तेजन दिलें आहे. स्वातंत्र्य नष्ट झालें तें इंग्रज आल्यापासून हें उघड आहे. ''राष्ट्राला खालीं दडपीत असतील त्यांना छाटून काढा'' यांत छाटून टाकणें याचा अर्थ जर वाईट मानावयाचा नाहीं तर स्वतः भानूंनीं कोर्टांत येऊन आपला हेतु तसा नव्हता हें सांगावयास हवें होतें. खून करणें म्हणजे मार्गांतील कांटे दूर करणें अशी प्रतिभाषा फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळींहि योजण्यांत येत असे. पण तिचा अर्थ उघड आहे. घरांत शिरलेल्या चोरांना कोंडून घालून उभें जाळावें याचा अर्थ काय ? म्लेंच्छांना ताम्रपट दिला नाहीं हा व्याकरणांतील भूतकाल किंवा वर्तमानकाळ कसाहि मानला तरी त्यांतील अर्थध्वनि उघड आहे. आरोपीनें बचावाकरितां दाखल केलेल्या कागदपत्रांचा या आरोपाशीं फारसा संबंध नाहीं. शिवाजीच्या समाधीच्या दुरुस्तीला सर-कारांतून नेमणूक असली, किंवा टिळकांनीं हिंदु प्लेग इस्पितळ काढलें असलें, तरी काय झालें? शिवाजीच्या मिषानें खुनाचा उपदेश करणें व प्लेगच्या उपायाकरितां सरकारास जुलमी म्हणणें या गोष्टी घडल्याच कीं नाहीं ? प्रत्यंतरादाखल कांहीं

पुस्तकें पुराव्यांत दिलीं आहेत. पण ती लिहिणारांचा व टिळकांचा हेतु एकच असें म्हणतां येत नाहीं. त्यांतील लेख राजकीय स्थितीला उद्देशून नाहींत. शिवाय इतक्या कडक लेखावर पूर्वी फिर्याद व्हावयाची राहिली म्हणून टिळकांवरहि करूं नये कीं काय ! तात्पर्य कित्येक शब्द नुसते ऐतिहासिक नाहींत, व कित्येकांचा हेतु सरकारच्या विशिष्ट कृत्यांविषयीं नापसंती दाखविण्यापलीकडे गेलेला आहे म्हणून १२४ अ कलमांतील खुलाशाचाहि फायदा आरोपीस मिळूं शकत नाहीं."

मि. लँग यांनीं आपलें हें भाषण सुमारें पावणेदोन तासांत आटोपल्यावर बॅ. प्यू यांनीं टिळकांतर्फे भाषणास सुरुवात केली. प्यू यांची भाषणपद्धतीहि लँग यांच्याप्रमाणें सिंधि व संथ होती. एका बाजूला ब्रॅन्सन व एका बाजूला नॉर्टन असते तर खटला ऐकण्यास जमलेल्या लोकांना पुष्कळ गमती पहावयास सांपडल्या असत्या ! प्यू यांनीं सुरवातीस असें सांगितलें कीं, सर्वच गोष्टी टिळकांना प्रतिकूल आहेत. रँडसाहेबांचा खून झाला नसता तर हा खटलाच मुळीं झाला नसता. बरें झाला तोहि पुण्यास झाला नाहीं. तेथें ज्यूरीला मराठी भाषा तरी नीट कळली असती. येथें न्यायमूर्ती व ज्यूरर यांपैकीं कोणासच मराठी भाषा येत नाहीं. खटल्यापूर्वी टिळकांवर टीकात्मक अशीं पुष्कळ पत्रें दैनिक पत्रांतून छापलीं गेलीं होतीं. पार्लमेंटपर्यंत गवगवा झाला तोहि टिळकांविरुद्ध. कांहीं साक्षिदार बोलावण्यासारखे होते व ते बोलावण्याचें काम वास्तविक फिर्यादीचें होतें. पण त्यांनीं ते बोलाविले नाहींत. आम्ही पुराव्यांत कांहीं कागद दाखल केले म्हणून अवांतर गोष्टी पुढें आणून मि. लँग यांना तास दीडतास बोलतां तरी आलें. नाहीं तर त्यांना बोलावयासच कांहीं नव्हतें. ज्या लेखांवरून खटला केला त्यांतील बरेच कवितारूप आहेत. अर्थात् त्यांत अलंकारपद्धतीचा उपयोग होणारच अलंकारिक भाषा शब्दार्थानें घेऊन कोणी आरोप करूं लागेल तर बोलणेंच खुंटतें. यानंतर प्यू यांनीं शिवाजी उत्सव मूळ कसा सुरू झाला वगैरे हकीगत सविस्तर सांगितली व विभूतिपूजेचें स्वतंत्र रीतीनें समर्थनहि केलें. ज्यूरींतील लोकांना थोडाबहुत खुशामतीनें गुदगुल्या करण्याची वकील लोकांची रीतच असते. त्या रीतीनें प्यू यांनीं ज्यूरींतील स्कॉच व वेल्श लोकांना त्यांच्या मायदेशांत होणाऱ्या रॉबर्ट ब्रूस, वुइल्यम वॉलेस, यांच्या उत्सवांची आठवण करून दिली; आणि अशा उत्सवांत तुम्ही स्वतः पुष्कळ वाटेल तसें अद्वातद्वा बडबडतां, आवेशयुक्त भाषणें करितां, आणि होमरूलहि मागतां, म्हणून तुम्हाला जर कोणी इंग्रजांशीं अराजनिष्ठ म्हणत नाहीं तर तोच न्याय तुम्ही टिळकांनाहि लावा असें सांगितलें. हे उत्सव पाश्चात्य धर्तीवरच बसविले आहेत. केसरींतील विभूतिपूजेचा लेख कार्लाइलच्या एका निबंधाच्या आधारेंच लिहिला आहे. पत्रव्यवहारांत क्वचित् जरा फाजील शब्द वापरले असले तरी ते स्वतः संपादकाचे

नसतात. निर्भीड स्पष्टोक्तींत जहाल शब्द यावयाचाच. अफजुलखानाच्या वधाचें समर्थन केलें म्हणून त्यामुळें रँडच्या खुनाला कोणी उत्तेजन दिलें असें म्हणतां येणार नाहीं. टिळकांनीं खुनास उत्तेजन दिलें असें सरकारास खरोखरच वाटत असतें तर त्यांनीं पिनलकोडांतील खुनाच्या चिथावणीचें कलमच लाविलें असतें. मग १२४ अ हें सामान्य कलम कां लाविलें ? अफजुलखानाच्या वधाची चर्चा टिळकांशिवाय इतरांनींहि केली आहे. मग येऊन जाऊन टिळकांनाच कां दोष ? पुढें खून करवावयाच्या अशा बुद्धीनें ही चर्चा आधीं उपस्थित केली म्हणावी, तर जेव्हां प्लेग हा ऐकून देखील माहीत नव्हता तेव्हांच ही चर्चा सुरू झालेली आहे. भानू व टिळक असे विरुद्ध राजकीय पक्षांतील लोक खुनाच्या हेतूनें उत्सवांत सामील होतील काय ? राजद्रोहाचा अर्थ जो विलायतेंत तोच हिंदुस्थानांतहि असावा. प्रजेच्या दुःखांचें तिखटमीठ लावून वर्णन करून असंतोष उत्पन्न केला तरी तो राजद्रोह नव्हे. एक खून झाला म्हणून त्यामुळें एकंदर ब्रिटिश सरकारावर कांहीं अरिष्ट कोसळलें आहे असें नाहीं. खुनाचाहि कट सांपडला नाहीं, मग येवढें राज्य उलथून टाकण्याएवढा कट कोठून सांपडणार ? ज्युबिलीवरील टिळकांचे लेख वाचले तर त्यांवरून त्यांच्या बुद्धिमत्तेप्रमाणें राजनिष्ठाहि सिद्ध करितां येईल. टिळकांच्या मनांत गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट यांजबद्दल वांकडें असल्याचा पुरावा नाहीं. उलट त्यांनीं अर्ज घेऊन दुःख निवारण करून लोकांचा दुवा मिळवावा असेंच टिळकांनीं लिहिलें होतें. टिळकांच्या मनांत राज्यक्रांति करावयाची असती तर प्लेगचा अनर्थ ही संधि उत्कृष्ट होती, पण त्यांनीं बंड न करितां प्लेग इस्पितळच काढलें!

त्या दिवशीं उपहारानंतर फिरून कामास सुरुवात झाली तेव्हा बॅ. प्यू यांनीं आक्षेपित अशा लेखांपैकीं एक एक घेऊन त्याचें समर्थन केलें. पण तें सर्व किंवा त्याचा सारांशहि येथें देत बसलों असतां फार विस्तार होईल म्हणून तो भाग सोडून देतों. खटल्याच्या पांचवे दिवशीं ( ता. १३ सप्टेंबर ) प्यू यांनीं आपल्या भाषणांतील हा चर्चात्मक भाग पुरा करून १२४ अ कलमाचा खरा अर्थ सांगण्यास त्यांनीं प्रारंभ केला. प्रथम या कलमाचा एक प्रकारचा इतिहास आहे तो सांगून, नंतर या कलमांतील गुन्हा घडण्याला विशेष प्रकारचा हेतु लागतो या मुद्यावर, मूळ पिनल कोडचें हें कलम मंजूर होण्याचे वेळीं प्रथम पिनलकोड कमेटींत व नंतर कायदेकौन्सिलांत जी चर्चा झाली ती डिफेन्सला सर्वस्वीं अनुकूल असल्यानें, प्यूसाहेब ती ज्यूरीला वाचून दाखवूं लागले. तेव्हां त्यांचा व न्यायाधीशांचा बराच वाद झाला, व 'डिस्‌अफेक्शन्' या शब्दाच्या अर्थाचीहि बरीच चर्चा झाली. तसेंच डिफेन्सतर्फे जे समर्थनपर किंवा समानार्थक लेख असणारे ग्रंथ पुराव्यांत दाखल केले गेले त्यांविषयीं चर्चा होऊन, शेवटीं ज्यूरीनें आरोपीस निरपराधी ठरविण्यासारखाच हा खटला आहे असें परोपरीनें सांगून प्यू यांनीं आपलें भाषण संपविलें.

या वेळीं सुमारें साडेतीनच वाजले होते. परंतु ज्यूरीला खटला सुनावून सांगण्यास आपणास बराच वेळ लागणार आहे म्हणून तें काम उद्यांच करूं असें सांगून न्या. स्ट्राची त्या दिवशीं उठून गेले. ही मुदत कां घेण्यांत आली असावी याचीं कारणें पुढें उमगलीं. त्यांतील मुख्य असें कीं, न्यायमूर्तींना लांबलचक समारोप करावयाचा असून तो त्यांना लिहूनहि काढावयाचा होता. दुसरे दिवशीं ( मंगळवार ता. १४ सप्टेंबर ) न्यायमूर्तींनीं या समारोपास सुरुवात केली. ती संपण्याला संध्याकाळचे पांच वाजले. याहि समारोपाचा सारांश देण्याच्या भानगडींत आम्हीं पडत नाहीं. कारण त्या योगानें फार विस्तार होईल. तीनच गोष्टी या समारोपांत ठळक अशा होत्या. फक्त एकच गोष्ट टिळकांना अनुकूल अशी न्यायमूर्ती बोलले. ती ही कीं, टिळकांचे लेख व रँडसाहेबाचा खून यांजमध्यें कार्यकारणसंबंध आहे असें भासविण्याचाहि माझा हेतु नाहीं, किंबहुना ॲडव्होकेट जनरल यांना ती गोष्ट शाबीत करण्यासारखा एका काडीचाहि पुरावा पुढें मांडतां आला नाहीं, असें ते म्हणाले. पण राजद्रोहाचा गुन्हा करण्याचा टिळकांचा हेतु त्यांनीं सर्वस्वीं गृहीत धरला. फिर्यादीतर्फेच्या प्रत्येक लेखांतील जवळजवळ प्रत्येक वाक्य त्यांनीं द्वेषमूलक असें ठरविलें. आणि राजद्रोहाचा गुन्हा घडण्याला राज्य उलथून पाडण्याची तयारी किंवा बुद्धीहि शाबीत करावी लागत नाहीं, येवढेंच नव्हे तर सरकाराविषयीं प्रेमभाव नसणें म्हणजेच द्वेषभाव असणें, असाहि त्यांनीं कलमांतील सरळ शब्दांचा अर्थविपर्यास केला. न्या. स्ट्रॅची यांच्या या अर्थावर, स्वतः सरकारची जुनी समजूत, न्यायकोर्टाचे ठराव, आणि प्रत्यक्ष लोकांचें आचरण, या सर्वांचीं इतकीं प्रतिकूलतेचीं पुटें बसलीं आहेत कीं, स्ट्रॅचीसाहेबांचा अर्थ आतां कोणी नुसता हातांतहि धरणार नाहीं. पण रोग्यांचे प्राण घेत घेत जसा वैद्य तयार होतो त्याप्रमाणें आरोपींना अन्यायानें शिक्षा देत देत न्यायमूर्तीहि खरा न्याय करण्याला शिकतात. अन्यायानें शिक्षा भोगणें हा राजकीय अपमृत्यु असें मानलें तर, टिळकांनी स्वतः शिक्षा भोगभोगून राजद्रोहाचा खरा अर्थ ठरण्यास जी मदत केली ती त्यांना तिसऱ्या जन्मांत तरी उपयोगी पडली असें म्हणतां येईल!

असो; सायंकाळचे पांच वाजतां न्यायमूर्तींचा समारोप संपून ज्यूरींतील गृहस्थ पलीकडील दालनांत निघून गेले. ते परत येईपर्यंत दरम्यान कोर्टास कांहींच काम नव्हतें. याचा फायदा घेऊन बॅ. प्यू यांनीं पुढें कराव्या लागणाऱ्या अपीलाचें बीजारोपण म्हणूनच कीं काय, न्यायमूर्तींच्या समारोपांतील दोष न्यायमूर्तींच्या नजरेला आणले. आणि ‘ डिस्-लॉयल्टी ’ ‘ डिस् अफेक्शन ’ वगैरे शब्दांचे वाच्यार्थ व लक्षणार्थ यांविषयीं उभयतांमध्यें बरीच चर्चा झाली. पण मी सर्व गोष्टींचा नीट विचार केलेला आहे असें सांगून न्यायमूर्तींनीं अधिकारयुक्त वाणीनें हा वाद संपविला.

ज्यूरी उठून गेल्यावर सुमारें पाऊणतासांत ती परत आली. तिनें प्रथमच असें सांगून टाकलें कीं, आरोपी नं. २ केशवराव बाळ, आर्यभूषण छापखान्यांतील कारकून व मदत म्यानेजर, यांना आम्हीं निर्दोषी ठरवितों. आरोपी नं. १ टिळक यांच्यासंबंधानें मात्र हें एकमत टिकलें नाहीं. कारण सहा ज्यूरर लोकांनीं टिळकांना दोषी ठरविलें व तिघांनीं निर्दोषी ठरविलें. न्यायमूर्तींनीं हा बहुमताचा निर्णय मान्य केला. लगेच क्लार्क ऑफ धि क्राऊन यांनीं टिळकांना विचारलें कीं, तुमच्यावर आरोप शाबीत झाला आहे तथापि तुम्हांला शिक्षा देऊं नये अशाविषयीं तुमचीं कांहीं कारणें असल्यास सांगा. त्यावर टिळकांनीं उत्तर दिलें कीं, 'ज्यूरीला मी दोषी वाटत असेन पण मला स्वतःला मी निर्दोषी आहें असेंच वाटतें. राजद्रोहाच्या हेतुपुरःसर हे लेख लिहिलेले नाहींत हें मी सांगतों. व त्यांचा परिणाम देखील राजद्रोह उत्पन्न करण्याचा होईल असें मला वाटत नाहीं. लेखांतील शब्दांच्या अर्थाविषयीं जाणत्या विद्वान् अशा लोकांची साक्ष स्वतः सरकारतर्फेच घ्यावयास पाहिजे होती तीहि घेण्यांत आली नाहीं.' टिळकांनीं सांगितलेलीं हीं कारणें अर्थात् न्यायमूर्तींना पटण्यासारखीं नव्हतींच. त्यांनीं टिळकांना असें बजावलें कीं, वाचकांच्या मनांत अराजनिष्ठा उत्पन्न करण्याच्या हेतूनेंच तुम्ही लेख लिहिल्याविषयीं माझी खात्री झाली आहे. "तुमचा गुन्हा मोठा असला तरी भयंकर नाहीं. या देशांत राजद्रोहाचा हा दुसराच खटला आहे. १२४ अ हें कलम जुनें व एका बाजूला पडलेलें, यामुळें आपण निर्भयपणें हवें तें लिहिलें तरी चालेल असें तुम्हांला सहजच वाटलें असावें. प्लेगच्या बाबतींत तुम्ही सरकारची व लोकांची मोठीच कामगिरी बजाविली आहे; तरीपण तुमची बुद्धिमत्ता व विद्वत्ता लक्षांत घेतां तुम्ही हे लेख लिहिले ही गोष्ट फार वाईट केली, व तुम्ही पुढेंहि असेच लेख लिहिले असते तर लोकांवर संकटेंच गुदरलीं असतीं. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन मी तुम्हांस फक्त अठरा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा देतों." बाळ यांना उद्देशून न्यायमूर्तींनीं सांगितलें कीं, 'तुम्हाला निर्दोषी ठरवून सोडून देण्यांत आलें आहे.' अशा रीतीनें सायंकाळीं सुमारें साडेसहा वाजण्याचे सुमारास कोर्टाचें काम संपून, पोलिस अधिकाऱ्यांनीं टिळकांना खालीं आणून गाडींत बसवून एकदम तुरुंगाकडे नेलें.

शिक्षेनंतर अपील ही गोष्ट ओघानेंच येणारी होती. मात्र हें अपील लेटर्स पेटंटप्रमाणें विलायतेंतील प्रिव्ही कौन्सिलकडेच करतां येत होतें. तथापि तें अपील करण्यालाहि आधीं हायकोर्टच्या मुख्य न्यायाधिशापुढें अर्ज करून परवानगी मिळविणें, किंवा निदान आम्ही परवानगी देत नाहीं असा निकाल घेणें, अनिवार्य होतें. याकरितां मॅ. प्यू यांच्या संमतीनें लगेच सॉलिसिटर भाईशंकर आणि कांगा यांनीं एक चौदा कलमी अर्ज तयार केला. तो अर्ज महत्त्वाचा असल्यामुळें, विशेषतः टिळकांना झालेल्या अन्यायाविषयींच्या रीतसर तक्रारींचा

त्यांत निष्कर्ष काढलेला असल्यामुळें त्यांतील कांहीं भाग या भागाच्या शेवटीं परिशिष्टादाखल दिला आहे.

अपील अर्जावर ता १७ सप्टेंबर रोजीं टिळकांचा प्रतिज्ञालेख व सही होऊन लगेच तो हायकोर्टाकडे गुदरण्यांत आला, व त्याची सुनावणी ता. २४ सप्टेंबर रोजीं हायकोर्टाच्या फुलबेंचपुढें झाली. फुलबेंच असलें तरी तीनच न्यायाधीश– म्हणजे फॅरन, कँडी, व स्ट्रॅची–असे अपील ऐकण्यास बसले, हें अपील स्ट्रॅची-साहेबांविरुद्ध होतें तरीहि स्वतः ते या न्यायत्रिमूर्तींत बसले येवढेंच नव्हे तर स्वतः त्यांनीं टिळकांचे बॅरिष्टर मि. रसेल यांस चर्चात्मक असे अनेक प्रश्न विचारून कुंठित करण्याचाहि बराच प्रयत्न केला. रसेल यांच्या भाषणानंतर सरकारतर्फे अॅ. जनरल लँग यांचें भाषण होतांच न्या. फॅरन यांनीं कोर्टाचा निकाल सांगितला. ते म्हणाले, प्रत्येक खटल्यांत प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्याचा अधिकार नाहीं. म्हणून या खटल्यांत कांहीं विशेष अन्यायाची गोष्ट घडली आहे कीं काय येवढेंच पाहिल म्हणजे झालें. मुंबईसरकारतर्फेच प्रत्यक्ष फिर्याद दाखल झाल्यामुळें त्यांची मंजुरी नव्हती किंवा आहे ती अपुरी आहे हा मुद्दाच उरत नाहीं. शिवाय न्या. स्ट्रॅची यांनीं ज्यूरीला कायद्याचा अर्थ समजून सांगितला तो एकंदरीनें बरोबर होता. 'प्रीतीचा अभाव' म्हटलें काय व 'प्रीतीला प्रतिरोधि अशी भावना' म्हटली काय दोन्ही एकच. सरकार या शब्दाचा अर्थ चुकला अशी तक्रार आहे; पण तीहि बरोबर नाहीं. मिळून अपील करण्यासारखा कांहीं मुद्दा निष्पन्न झालेला नाहीं. म्हणून आम्हीं अपीलाची परवानगी देत नाहीं. अशा रीतीनें मुंबईहायकोर्टांतील टिळकांतर्फेची कामगिरी संपली. परंतु स्पेशल अपील म्हणून प्रिव्हीकौन्सिलकडे अपील करतां येत होतें व तें लगेच करण्यांत आलेंहि.

इकडे टिळक तुरुंगांत गेल्यामुळें केसरी–मराठा वर्तमानपत्रांचें पुढें काय करावयाचें हा प्रश्न टिळकांच्या स्नेह्यांपुढें सहजच उत्पन्न झाला. ता० १० ऑगस्ट १८९७ च्या अंकापर्यंत केसरीच्या शेवटीं "हें पत्र आर्यभूषण छापखान्यांत हरी नारायण गोखले यांनीं छापलें व बाळ गंगाधर टिळक यांनीं प्रसिद्ध केलें " असा कायदेशीर उल्लेख येत असे. ता० १७ ऑगस्टच्या अंकापासून टिळकांना शिक्षा होईपर्यंत, संपादक किंवा प्रसिद्ध करणार म्हणून टिळकांचेंच नांव चालू राहिलं; परंतु छापणार हरि नारायण गोखले यांच्या ऐवजीं बळवंत कृष्ण कोलांगडे यांचें नांव घातलें जात असे. याचा अर्थ हरि नारायण गोखले यांना टिळकांवर खटला होतांच केसरीचे मुद्रक या नात्यानें आपली जबाबदारी नकोशी झाली, व त्यांनीं ती खरोखरीचा प्रिंटर कोलांगडे याजवर टाकली. टिळकांना शिक्षा झाल्यावर, परस्पर दुसऱ्याच्या नांवानें कां होईना पण केसरी आर्यभूषणछापखान्यांत छापला जाण्याचीहि जबाबदारी गोखले यांच्यानें घेववेना. टिळकांना शिक्षा सुनावल्याबरोबर धोंडोपंत विध्वंस यांना गोखले यांनीं तातडतोब असें

सांगून टाकलें कीं, यापुढें केसरी दुसऱ्या वाटेल त्या छापखान्यांत छापण्याची तजवीज पहा! टिळक व गोखले यांच्या दरम्यानचा आर्यभूषणमध्यें केसरी छापण्याचा, पहिला करार १८९४ पूर्वींच संपला होता; तरी त्याच करारांत लिहिल्याप्रमाणें गोखले यांनीं केसरी छापण्याचें बंद करण्यास निदान तीन महिन्यांची नोटीस देणें जरूर होतें; व टिळकांवरील खटल्याची आपत्ति लक्षांत घेतां तर अशी नोटीस देणें अधिकच योग्य ठरत होतें. शिवाय गोखले यांनीं आपलें नांव काढून घेतल्यामुळें त्यांना व्यक्तिशः कांहींच धोका नव्हता. प्रेस ॲक्ट तेव्हां झालेला नसल्यामुळें छापखान्याचा जामीन मागणें किंवा तो सरकारजमा करणें याहि आपत्ती छापखान्यावर येणाऱ्या नव्हत्या. तरीपण गोखले यांनीं आपलाच हेका चालविला, व यापुढें मी तर केसरी छापून देणारच नाहीं परंतु टिळक परत येईपर्यंत तुम्हीहि केसरी बंदच ठेवावा हें बरें असा विचित्र सल्ला त्यांनीं धोंडोपंत विध्वंस यांस दिला! पण स्वतः विध्वंस किंवा टिळकांचे स्नेही व असिस्टंट वगैरे मंडळींना हा सल्ला अर्थातच रुचण्यासारखा नव्हता. यामुळें त्यांनीं दुसरा एकादा छापखाना गांठून त्यावर केसरी छापण्याचें ठरविलें. संपादकांचें 'डिक्लेरेशन' करण्यास मनुष्य मिळविण्यापेक्षां त्यांतल्यात्यांत छापखान्याचीच अडचण खरी होती. कारण टिळकांचे असिस्टंट या नात्यानें नरसिंह चिंतामण केळकर हे १८९६ च्या मार्च महिन्यापासून पुण्यास येऊन दाखल झालेले असून, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर हेहि त्याच सालच्या अखेर येऊन दाखल झालेले होते. १८९६ च्या सप्टेंबर आक्टोबर महिन्यांपासून केळकर हे टिळकांच्या देखरेखीखालीं मराठ्यांत अग्रलेखांसुद्धां सर्व मजकूर लिहूं लागले होते, व खाडिलकर यांनीहि केसरींत टिळकांच्या देखरेखीखालीं लिहिण्यास सुरुवात केली होती. यामुळें केळकर व खाडिलकर यांपैकीं कोणीहि केसरीच्या संपादकाची जबाबदारी अंगावर घेण्यास तयार होता. पण छापखाना चुटकीसरसा कोठून तयार होणार? तथापि, सुदैवानें तीहि अडचण या वेळीं निभावून गेली.

भिडे या नांवाचे एक पेन्शनर गृहस्थ होते त्यांनीं रविवार पेठेंत फडके यांच्या वाड्यांत श्रीविठ्ठल नांवाचा छापखाना काढला होता. त्यांनीं लगेच केसरी छापून देण्याचें कबूल केलें. माल मुद्रक व संपादक म्हणून यापुढें वेगवेगळीं मनुष्यें न गुंतवितां कोणीतरी एकानेंच या दोन्ही जबाबदाऱ्या पत्कराव्या असें ठरून केळकर यांनीं शहर मॅजिस्ट्रेटपुढें केसरीचे संपादक म्हणून डिक्लेरेशन केलें; व ता. २१ सप्टेंबरच्या अंकापासून "हें पत्र रविवार पेठेंत श्री विठ्ठल छापखान्यांत नरसिंह चिंतामण केळकर यांनीं छापून प्रसिद्ध केलें" असा उल्लेख करण्यांत येऊं लागला. मराठापत्राचें हि डिक्लेरेशन अर्थात् केळकर यांनींच केलें आणि ता. १९ सप्टेंबरपासून तें पत्रहि त्यांच्याच नांवानें सुरू झालें. या सर्व नवीन व्यवस्थेमुळें व्यवस्थापक या नात्यानें धोंडोपंत विध्वंस यांस बराच त्रास पडला. केसरी आर्यभूषणमध्यें छापून देत

नाहीं असें सांगितल्यामुळें केळकर विध्वंस यांनीं गोखले यांच्याशीं तंटाहि करून पाहिला. परंतु तो फुकट गेल्यामुळें छापखान्याची व्यवस्था तर दुसरीकडे करावीच लागली; पण वर्गणीदारांस अंक रवाना करणें व हिशेबाच्या नव्या वह्या घालणें वगैरे सर्व गोष्टी करण्याकरितां विध्वंस यांना विंचुरकरांच्या वाड्यांत वेगळी कचेरी सुरू करावी लागली. ही सुरुवात त्यांनीं ता. १९ सप्टेंबर १८९७ रोजीं, विंचुरकरांच्या वाड्यांतील टिळकांच्या राहत्या घराच्या पडवींत, दोन देवदारीं खोकीं घेऊन केली; व तेव्हांपासून पुढें आजवर केसरीच्या कचेरीला जें स्वरूप प्राप्त झालें आहे त्याचें मुख्यतः श्रेय टिळकांबरोबर विध्वंस यांना एकट्यांनाच दिलें पाहिजे. ता. २१ सप्टेंबरच्या अंकांत केसरीचे व्यवस्थापक यांनीं वर्गणीदारांना खालीलप्रमाणें विनंति केली. " केसरीवर भयंकर प्रसंग गुदरल्यामुळें बारीकसारीक कामांतहि थोडकी गैरव्यवस्था होण्याचा संभव आहे. या अव्यवस्थेकडे वर्गणीदार दुर्लक्ष करतील अशी आशा आहे." पण वर्गणीदारांची केसरीला पूर्ण सहानुभूति असल्यामुळें ते फिरकोळ अव्यवस्थेकडे दुर्लक्ष करतील यांत शंकाच नव्हती. नवीन वर्गणीदार होत ते जुन्या पत्त्यावर पत्रें पाठवीत तीं वेळच्यावेळीं मिळण्याचीहि व्यवस्था होईना. म्हणून नवीन संपादक केळकर यांच्या नांवें खाजगी पत्त्यावर पत्रें पाठवावीं अशी जाहीर सूचना केसरींत घालावी लागली. तथापि व्यवस्थापकांच्या ऑफिसाची घडी लवकरच बसली, व विठ्ठल प्रेसचे मालक व व्यवस्थापक यांनीं नवीन मोठी जबाबदारी पत्करली असतांहि केसरी वेळेवर छापून देण्याचें कामीं त्यांनीं फारच दक्षता दाखविली. लॉ क्लासला मध्यंतरीं थोडी सुटी होती, तोहि फिरून ता. ३ आक्टोबरपासून आपण सुरू करणार अशी केळकर यांच्या सहीची जाहिरात प्रसिद्ध झाली. या सर्व गोष्टी अशा रीतीनें बिनबोभाट पार पडतील अशी पुष्कळांना अपेक्षा नसावी. ता. १९ रविवार रोजीं दोनप्रहरपर्यंत मराठा प्रसिद्ध झाला नाहीं यामुळें टिळकांचीं दोन्ही पत्रें बंद पडणार असा कित्येक लोकांनीं तर्कहि बांधला. पण मराठा फक्त रविवाराऐवजीं सोमवारला प्रसिद्ध झाला, व केसरी तर मंगळवारींच रीतीप्रमाणें निघाला. हें पाहतांच पुण्याहून टाइम्सला एक तार गेली व ती त्यानें प्रमुख जागीं प्रसिद्ध केली .तारेत मजकूर असा होता कीं, टिळकांचीं दोन्ही पत्रें पुनः निघूं लागलीं व केळकर नांवाच्या एका एल्. एल्. बी. गृहस्थानें या दोन्ही पत्रांचें डिक्लेरेशन केलें आहे!

विलायतेस अपील लावण्याची खटपटहि अशाच तांतडीनें करण्यांत आली; व शनिवार ता. २ आक्टोबरच्या मेल बोटीनें टिळकांचे स्नेही ना. दाजी आबाजी खरे केसरीवरील खटल्यासंबंधाचे कागदपत्र घेऊन विलायतेस गेले. आणि मागाहून ता. १६ आक्टोबर रोजीं सॉलिसिटर कांगा हेहि उरलेले कागदपत्र घेऊन विलायतेस निघण्याचें ठरलें. खटला महत्त्वाचा असल्याकारणानें त्याच्या साद्यन्त हकीगतीचें पुस्तक निघणें अवश्यच होतें. डिफेन्सतर्फे शॉर्टहँड रिपोर्टर नेमलेला

असल्यामुळें सर्व मजकूर, वकीललोकांच्या भाषणासह, तयार होऊन लवकरच मिळाल्यामुळें, इंग्रजी पुस्तक तावडतोब छापण्यांत आलें. बॅ. देशपांडे यांनीं टिळकांचें लहानसें चरित्र लिहून दिलें, ॲडव्होकेट सेटलूर यांनीं चर्चात्मक प्रस्तावना लिहून दिली, व छपाई वगैरेचें सर्व काम महादेव कृष्ण देशमुख यांनीं झपाट्यानें पार पाडिलें. मराठी पुस्तकहि खंडेराव भिकाजी बेलसरे यांनीं काढलें, पण इंग्रजी पुस्तकाच्या आधारें मराठी आवृत्ति तयार करावयाची असल्यामुळें १८९८ च्या प्रारंभापर्यंत तें प्रसिद्ध झालें नाहीं. पण या उशीराचा एक फायदा बेलसरे यांस मिळाला तो असा कीं, ता. १९ नोव्हेंबर १८९७ रोजीं लंडन येथें प्रिव्ही कौन्सिलपुढें टिळकांच्या अपील अर्जाची सुनावणी झाली त्या हकीगतीचाहि समावेश त्यांना आपल्या या पुस्तकांत करितां आला.

टिळकांचे खटल्यासंबंधीं लोकमत काय होतें हें विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. झाडून सर्व एतद्देशीय वर्तमानपत्रकारांनीं टिळकांना शिक्षा दिली याचा निषेधच केला. आणि एकदोन पत्रांखेरीज बाकी सर्व ॲंग्लो-इंडियन व विलायती पत्रांनीं झालें तेंच योग्य झालें असें म्हटलें व त्यांपैकीं कांहींनीं टिळकांस झाली ही शिक्षा फार थोडी असें म्हणून सरकारनें अपील करून ती वाढवून घ्यावी असाहि सल्ला दिला. पण ही गोष्ट अर्थातच शक्य नव्हती. या खटल्यांत देशी-विदेशी हा फरक सर्वच दृष्टींनीं दिसून आला. ज्यूरींत जितके इंग्रज तितक्यांनीं टिळक दोषी असा निवाडा दिला व जितके हिंदी सभासद होते तितक्यांनीं टिळकांना निर्दोषी ठरविलें. इंग्रजांनीं टिळकांना शिक्षा झाली त्या दिवशीं मेजवान्या झोडल्या. उलट गिरणी मजुरांपर्यंत अनेक टिळकभक्तांनीं त्या दिवशीं उपोषणें केलीं. कित्येक कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं स्वेच्छेनें एकदोन सुट्या घेतल्या व कित्येक दंडाला काळीं फडकीं बांधून हिंडूं लागले. पण दुःखप्रदर्शनाचा हा प्रकार विद्यार्थ्यांपुरताच होता असें नाहीं; तर अमृतबझारपत्रिका, हिंदु वगैरे पत्रांनीं आपल्या वर्तमानपत्रांत सर्वत्र काळ्या रुळी घालून मुद्रणस्वातंत्र्य नष्ट झालें अशी भावना प्रगट केली.

१२४ अ कलमाचा विपरीत अर्थ, न्या. स्ट्रॅचीं यांचा एकतर्फी समारोप या गोष्टींनीं सरकारचा राग जितका लोकांना आला तितकीच टिळकांविषयीं विशेष प्रकारची सहानुभूति वाटण्यासहि कारणें घडून आलीं. टिळकांच्या विद्वत्तेविषयीं व देशभक्तीविषयीं सर्वांच्या मनांत आदर होताच, पण टिळकांनीं माफी मागावी म्हणजे आम्ही कदाचित् त्यांचेवरील खटला काढून घेऊं अशी कारवाई टिळकांच्या कांहीं स्नेह्यांच्या मध्यस्थीनें सुरू होती. तथापि, टिळकांनीं माफी मागण्याची ही सूचना झिडकारल्याचें प्रसिद्ध झालें. अर्थात् गोखले यांनीं मागितलेली माफी व टिळकांनीं झिडकारिलेली माफी या दोहोंची तुलना लोकांनीं आपल्या मनांत करणें हें स्वाभाविकच होतें. अमृतबझार पत्रिकेचे संपादक मोतीलाल घोस

यांनीं लिहिलेल्या पत्रास टिळकांनीं अटकेनंतर पण खटल्याच्या निकालापूर्वी उत्तर पाठविलें, त्यांत एक महत्वाचें वाक्य असें होतें कीं " प्रो. गोखले किंवा ज्ञानप्रकाशकार यांच्याप्रमाणें माझी लेखणी लेचीपेची नाहीं "–"आय ॲम नॉट ए कच्चा रीड." वरील वाक्यांत गोखल्यांना धैर्य नाहीं असें म्हणण्यापेक्षांहि स्वतः मी टांकाचा अधिक खंबीर आहे इतकेंच टिळकांना सुचवावयाचें होतें. तें कसेंहि असो, केवळ माफी मागितल्यानें शिक्षा वाचण्याचा संभव असतां टिळकांनीं ती मागितली नाहीं, इतकी गोष्ट निर्विवाद असून ती जाहीर झाल्यानें तिनें टिळकांच्या धैर्याचा ठसा लोकांच्या मनावर विशेष बसविला.

दुसरीहि एक गोष्ट टिळकांविषयीं सहानुभूति उत्पन्न करणारी झाली. ती अशी कीं रँडसाहेबांचा खून कोणी केला याचा पत्ता पोलिसांना लागला; व त्याबरोबरच त्यांना व सरकाराला हें समजून आलें कीं, कित्येकांस शंका होती तरी टिळकांचा संबंध अप्रत्यक्ष रीत्याहि या खुनाच्या कटांत येऊं शकत नाहीं. खटला भरला त्यावेळीं सरकारची संशयनिवृत्ति झालेली नव्हती; पण पुढें ती हळू हळू होऊं लागली; व ॲडव्होकेट जनरल यांचें भाषण होण्याच्या वेळेपर्यंत वातावरण या दृष्टीनें बरेंच निवळलें होतें हें पूर्वी आम्हीं दर्शविलेंच आहे. या गोष्टीचा उपयोग इतकाच झाला कीं टिळकांना मोठी शिक्षा व्हावयाची ती न होतां फक्त १८ महिन्यांची झाली. पण पुढें त्यांच्या सुटकेविषयीं जे प्रयत्न सुरू झाले त्यांना ही संशयनिवृत्ति उपयोगीं पडली. खुनासंबंधानें जशी टिळकांविषयीं कित्येकांची संशयनिवृत्ति व्हावयाची होती तशीच, सुधारक पक्षांतील कित्येक लोक टिळकांवरील खटल्यास कारणीभूत झाले कीं नाहीं याचीहि संशयनिवृत्ति होणें जरूर होतें. खटल्यापूर्वी टाइम्समध्यें 'जस्टिस' या सहीनें जें एक चिथावणीचें पत्र प्रसिद्ध झालें होतें तें पत्र पुष्कळ लोकांनीं कीर्तने बॅरिस्टर यांजवर मनानें लादलें. कारण यापूर्वी पांच सात महिन्यांत कीर्तने यांच्या सहीनें टिळकांविरुद्ध कांहीं पत्रें याच वर्तमानपत्रांत छापलीं गेलीं होतीं. यामुळें जस्टिस नामधारी मी नव्हे असें कीर्तन्यांना केसरीकाराकडे लिहून कळवावें लागलें. भांडारकर हे सरकारतर्फे विद्वान तज्ञ म्हणून साक्षीला येणार ही गोष्ट प्रसिद्ध झालीच होती. त्यांनीं हें पत्र लिहिलें असावें असाहि कित्येकांचा तर्क होता, तो संशय देखील खोटा ठरला. तथापि हें पत्र सुधारक वर्गापैकीं कोणी तरी लिहिलें असावें असा अंदेशा होता तो पुढें केव्हांहि दूर झाला नाहीं. या संशयामुळें सुधारक वर्गावर लोकांचा राग होता, व एकावर राग झाला म्हणजे दुसऱ्याविषयीं सहानुभूति वाढते या मानसिक तराजूच्या नियमाप्रमाणें, या संशयामुळेंहि टिळकांना थोडीशी सहानुभूति मिळाली.

रँड साहेबाचा खून कोणी केला असावा याविषयीं अनेकांचे अनेक तर्क होते. मरणापूर्वी स्वतः रँडसाहेब व लेफ्टनंट आयर्स्ट यांची बायको

यांच्या सवाऱ्या झाल्या त्यांवरून कांहींच सुगावा लागण्यासारखा नव्हता. दोघांनाहि गोळ्या लागल्या त्या पाठमोऱ्या अकस्मात लागल्या. त्यांचे समोरून किंवा त्यांचे बाजूनें कोणी धावल्या किंवा पळाल्याचें त्यांनीं पाहिलें नव्हतें. त्यांचा कोचमन किंवा त्यांचेजवळ बसलेला पट्टेवाला यांपैकींहि कोणी कांहीं पाहिलें नाहीं. मिसेस आयर्स्ट या मागच्या गाडींत होत्या, त्यांना मात्र पुढल्या गाडीवर एक पांढरा पोषाक केलेला माणूस चढून कांहीं सोडतो आहे असें दिसलें. तो फटाके सोडीत असावा अशीहि क्षणभर त्यांची कल्पना झाली! लगेच तो मनुष्य गाडीवरून उडी टाकून उजव्या हातास पळाला. तो इसम ठेंगणा, जाडेलासा असावा असें त्यांना भासलें. ही चमत्कारिक गोष्ट या बाई आपल्या नवऱ्यास सांगणार तोंच, स्वतः त्यांच्याहि गाडीमागें आवाज झाला व त्याच क्षणीं आपला नवरा जखमी होऊन कण्हत मागें पडला असें त्यांनीं पाहिलें. अर्थात् यापुढें इकडे तिकडे कांहीं पाहण्याचें त्यांना भानच राहिलें नाहीं. रस्त्यावर साधारण रहदारी होती, व पहिल्या आवाजाबरोबर त्यांचा गाडीवाला ओरडला तेव्हां लोकांनीं बाजूला सरण्याकरितां तो ओरडला असावा इतकेंच त्यांना वाटलें. दुसरे दिवशीं खुनाची बातमी जाहीर झाली तेव्हां पोलिसांना व सरकारी अधिकाऱ्यांना कोणा ब्राह्मणानें खून केला असावा असें वाटलें; उलट पुण्यांतील कोणी लोक म्हणत, खुनी इसम कोणीतरी नेटिव्ह लष्करांतील बेदिल झालेले शिपाई असावे. एरवीं पिस्तुलें काडतुसें कोठून मिळणार? व इतका अचुक नेम तरी कोणाला साधणार? कोणी म्हणत खासगी द्वेषामुळेंच साहेबासाहेबांत हा प्रकार झाला असावा. कोणी असेंहि म्हणत कीं पुण्याच्या पोलिससाहेबाचें यांत अंग होतें व बिचाऱ्या नेटिव्ह लोकांवर अंदेशा आण्याकरितां त्यांनी ही राजकीय महोत्सवाची संधी साधली.

पण लोकांच्या जवळ तर्कवितर्कांशिवाय चौकशीचें दुसरें कांहींच साधन नव्हतें. पोलिसांनीं मात्र गुन्हेगार हे ब्राह्मणच असावे या धोरणानें चौकशी सुरू केली; व त्यांची पहिली शिकार जरी फसली तरी दुसरी साधली. पुण्यांतील प्रमुख लोकांकडे ब्रुइनसाहेबांच्या येरझारा लौकरच सुरू झाल्या होत्या, व त्यांपैकीं श्रीधर विठ्ठल दाते यांनीं साहेबांना एक गमतीची झुकांडी दिली. ब्राह्मणांचे कोणी दोन मुलगे आपणांकडे आले व आपण साहेबलोकांचे खून करणार वगैरे गोष्टी त्यांनीं आपणापाशीं काढल्या, अशी माहिती श्रीधर विठ्ठल यांनीं दिल्यावरून मुंबईच्या दोन ब्राह्मणमुलांना, ते बिचारे श्रावणीस बसले असतां, पुण्यास पकडून आणलें. प्रथम पोलिसांपुढें धाकानें त्यांनीं कांहींतरी मजकूर सांगितला. पण मॅजिस्ट्रेटपुढें उभें केल्यावर ते नाकबूल गेले. तथापि त्यांना चार चार हजार रुपयांचा जामीन व जातमुचलका मात्र द्यावा लागला. सप्टेंबरच्या प्रारंभीं पुण्यांतील द्रविडांमार्फत पोलिसांना जो पत्ता लागला तो मात्र अखेरपर्यंत टिकला. द्रविड-

बंधूंनीं कोणा चाफेकर बंधूंचीं नांवें घेतलीं, व प्रथम दामोदर हरि चाफेकर यास अटक झाली. त्यानें ता. ८ आक्टोबर रोजीं मुंबई प्रे. मॅजिस्ट्रेट हॅमिल्टन यांजपुढें कबुलीजबाब दिला तो इतका व्यापक होता कीं, तो कोणी मायेफिरू वेडा मनुष्य असून कांहीं तरी सांगत आहे असेंच लोकांस वाटलें. आजपर्यंत पुण्यांत किंबहुना मुंबईतहि जितके दांडगाईचे गुन्हे झाले तितके सर्व आपणच केले असें त्यानें सांगितलें. चाफेकराचे वडील हे एक प्रसिद्ध कीर्तनकार असून दामोदर व त्याचे बंधु हे कीर्तनाचे वेळीं मागें उभे राहून बापाची साथ करीत. स्वतः दामोदर सत्तावीस वर्षांचा व त्याचे भाऊ बाळकृष्ण व वासुदेव हे या वेळीं २४ व १८ वर्षांचे होते. हे बंधु शिपाईगाण्याचे असून दामोदरानें तर सरकारी लष्करी नोकरींत शिरण्याचे प्रयत्नहि केले होते. पण त्याचें ब्राह्मण्य त्याच्या आड आलें. मला नोकरींत घ्याल तर चारशें ब्राह्मणांची कवायती पलटण तयार करीन असेंहि त्यानें सांगितलें. पण जेथें एक ब्राह्मण खपण्याची मारामार तेथें चारशेंची कल्पना कशी रुचणार ! अशा रीतीनें निराशा झाल्यामुळें चाफेकराच्या मर्दुमकीनें इतर वळणांनीं मार्ग काढला. "वासुदेवराव पटवर्धन, दामुअण्णा कुलकर्णी वगैरे सुधारक, यांना आणि थोरात वेलिणकर वगैरे धर्मांतर केलेल्या हिंदूंना मीच ठोक दिला, मुंबईतील राणीच्या पुतळ्यावर मीच डांबर ओतलें व गळ्यांत जोड्यांची माळ घातली, युनिव्हर्सिटीचा मंडप मीच जाळला, पुण्यांत प्लेगच्या अमदानींत सोजीर लोकांनीं केलेले अत्याचार पाहून मला त्वेष आला, व त्यांचा मुख्य अधिकारी रँडसाहेब याला मारून सूड उगविण्याचा मीच निश्चय केला, बंदुकी अमुक ठिकाणांहून चोरल्या, दारूगोळा अमुक ठिकाणीं मिळविला, पिस्तुलें व तरवारी अमुक ठिकाणाहून घेतल्या, रँडसाहेबाला मारण्याचे पूर्वीचे प्रयत्न असे तसे फसले, शेवटीं जुबिलीच्या दिवशीं दिवसभर ईश्वरप्रार्थना करून व हत्यारें बरोबर घेऊन मी व माझा भाऊ बाळकृष्ण असे गणेशखिंड रस्त्यावर गेलों, मी रँड साहेबाला गोळी घातली व बाळकृष्णाने लेफ्टनंट आयर्स्ट याला मारलें, व हत्यारें नाल्यावरील पुलाखालीं झांकून ठेवून आम्हीं कालव्याचें रस्त्यानें परत आलों, दुसरे दिवशीं लोंढे यांचे विहिरींत हत्यारें टाकून देऊन ता. २४ जून रोजीं मुंबईस निघून आलों व फिरून कीर्तनें करूं लागलों. पुढें टिळकांवर खटला झाला नातूंना पकडलें इतर लोकांना त्रास झाला म्हणून मीच पोलीसच्या स्वाधीन होऊन कबुलीजबाब देण्याचें ठरविलें, ब्रुईनसाहेब हे माझे स्नेही आहेत, त्यांचे जवळ मी माझा सर्व वृत्तांत लेखी दिला आहे, पण त्यांच्या माझ्या दरम्यान काय गोष्टी झाल्या त्या मी त्यांच्या सम्मतीशिवाय उघड करूं शकत नाहीं" अशा अर्थाचा तो जबाब होता.

वरील जबाबांत खऱ्या खोट्याची बरीच सरमिसळ झाली होती. शिवाय मुंबई गॅझेट पत्राला एका निनांवी गृहस्थानें याच वेळीं पत्र पाठवून कळविलें कीं चाफेकर

खोटें बोललों—मीच रँडला मारला—अशी बातमी प्रसिद्ध झाल्यानें तर लोक अधिकच घोटाळ्यांत पडले. पण जबानींतील मुख्य भाग खरा असें ठरलें, व सेशनकोर्टांत जरी दामोदर यानें जबाब परत घेतला तरी नव्हंबरच्या प्रारंभीं खुनाचा खटला सेशनकमिट होऊन पुढें फेब्रुवारी महिन्यांत पुण्याचे सेशनजज्ज मि. क्रो यांजपुढें खटला चालून त्यास फांशीची शिक्षाहि देण्यांत आली. दामोदर यास पकडतांच बाळकृष्ण मोगलाईंत पळून गेला, व तो पुढें बरेच दिवस सांपडला नाहीं. तथापि पुढें तोहि सांपडला व चौकशी होऊन फांशी गेला. येवढेंच नव्हे तर ज्या द्रविडबंधूंनीं बक्षिसाच्या आशेनें चाफेकरबंधूंचें नांव सांगून खुनाचा पत्ता लावून दिला त्यांचेहि खून झाले, व ह्याबद्दल तिसरा भाऊ वासुदेव व त्याचा स्नेही कोणी रानडे हेहि फांशी गेले. पण तो सर्व प्रकार मोठा अद्भुत असला तरी येथें देतां येत नाहीं. चाफेकरासंबंधाची ही हकीगत सांगण्याचा मुख्य मुद्दा असा कीं, टिळकांचा खटला सेशनांत निघण्यापूर्वींच खुनाचा पत्ता पोलिसांना पक्का लागल्यामुळें, टिळकांविषयींचा गैरसमज निघून गेला; व त्यांची तुरुंगांत रवानगी झाल्यापासूनच कांहींतरी करून त्यांची सुटका करावी असें कोणी कोणी लोक बोलूं लागले. तसेंच 'भवानी तलवार' अशी सही घालून केसरींत छापलेले शिवाजीचे उद्गार जरी राजद्रोही ठरले होते व भवानी तलवार या नांवाच्या पुस्तकाचा जारीनें शोध चालूं होता, तरी लवकरच नेटिव्ह प्रेस रिपोर्टर गोपाळराव साठे यांनीं या पुस्तकावर दिलेला सरकारी अभिप्राय प्रसिद्ध झाला त्यावरून देशाभिमान व राजद्रोह या दोन गोष्टी एकच नव्हत हें आपोआप सिद्ध झालें.

मात्र या गोष्टींचा उपयोग प्रिव्ही कौंसिलच्या अपीलाला कांहीं होण्यासारखा नव्हता. ता. १९ नोव्हेंबर १८९७ रोजीं हें अपील व्हाइट हॉलमध्यें लॉर्ड चॅन्सेलर हॅल्सबरी, लॉर्ड हॉबहौस, लॉर्ड डेव्ही व सर रिचर्ड कौच या न्यायमूर्ति मंडळापुढें निघालें. टिळकांतर्फे बॅ. मि. अस्किथ, मेन, उमेशचंद्र बानर्जी हे असून बॅ. प्यू गार्थ व ना. खरे हे त्यांस मदत करीत होते. सरकारतर्फे आर्थर कोहेन व जे. एच्. ब्रॅन्सन यांनीं काम चालविलें. ॲस्किथसाहेब हे नुसते एक सुप्रसिद्ध बॅरिस्टरच नव्हेत तर ग्लॅडस्टनसाहेबांच्या प्रधान मंडळांतील नांवाजलेले होम मिनिस्टर होते. राजकीय दर्जा व वकिलींतील यश यांचा मेळ हटकून पडतोच असें नाहीं पण मोठ्या प्रयासानें एवढा नामांकित बॅरिस्टर दिल्यामुळें लोकांना सहजच आशा लागून राहिली होती. राजद्रोहाच्या गुन्ह्याला विलायतेंत फारसें महत्त्व नाहीं, किंबहुना अलीकडील पिनलकोडांत त्याला स्थानहि नाहीं, अशा विचारानें ती आशा अधिकच बळावली होती.

खटल्यांतील लेख हे मूळ मराठी भाषेत असल्यामुळें त्यांच्या अर्थाचा निर्णय मराठी न समजणारा न्यायाधीश व ज्यूरी यांनीं करावा हें विपरीत होय असें टिळकांतर्फे म्हणण्यांत आलें होतें. हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या कानावर चुकून तरी

मराठी शब्द जात असतील, पण आतां अपीलांत न्यायासन उठून विलायतेंत गेलें तेथें मराठी शब्दांचा कीस निघूनच अखेर न्यायनिर्णय व्हावयाचा हें एका अर्थी हास्यास्पदच होतें. पण सगळें राज्यच विलायतेंतून चालतें तेथें न्यायाची अडचण कसली ? प्रिव्ही कौन्सिलांतील न्यायाधीशाप्रमाणें टिळकांचे बॅरिस्टर मि. ॲस्क्विथ यांना मराठी कशाशीं खातात हें देखील माहीत नव्हतें; पण भाषांतराच्या आधारावर इतर सर्व कारभार चालतो तसाच अर्थात् तो येथेंहि चालला. टिळकांच्या वकील–सॉलिसिटरांनीं 'ब्रीफ'इतकें सविस्तर तयार करून दिलें होतें कीं, अस्क्विथसाहेबांना कशाचीच अडचण पडली नाहीं. या ब्रीफांत खालील कोर्टांत दाखल झालेल्या निशाणीभूत मराठी कागदपत्रांचें भाषांतर–प्रथम प्रत्येक मराठी शब्द, त्या खालीं त्याचा इंग्रजींत लिहिलेला मराठी उच्चार, त्या खालीं त्याचा इंग्रजी प्रतिशब्द, सर्वांचा मिळून अर्थ व त्यावर सविस्तर भाष्य–अशा महाप्रयत्नानें तयार करून अस्क्विथसाहेबांना दिलें गेलें होतें. सरकारतर्फेंहि असेंच ब्रीफ तयार झालें असलें पाहिजे; व या दोहोंवरून सहा हजार मैल व सात समुद्र यांपलीकडे प्रिव्ही कौन्सिलांत या खटल्यांतील न्यायपांडित्य झालें !

ॲस्क्विथसाहेबांनीं बराचसा भर १२४ अ कलमाचा अर्थ, त्यांतील स्पष्टीकरण व अपवाद यांचा भेद व घोंटाळा, अप्रीति शब्दाचा विशिष्ट अर्थ, कडक राजकारणी टीका व राजद्रोह यांतील अंतर, स्ट्रॅचीसाहेबांनीं पुराव्याशिवाय अंगिकारलेल्या अनेक बाधक गोष्टी इत्यादि मुद्यांवरच एकंदरीनें दिला होता. शेवटीं हे सर्व बाण फुकट जाऊं लागलेसें पाहून, हा खटला सामान्य नव्हे, हायकोर्टानें अपील मंजुरी न दिली तरी प्रिव्ही कौन्सिलनें मुद्दाम लक्ष घालण्यासारखाच हा खटला आहे, या मुद्याच्या रुळावर त्यांनीं गाडी नेली. एका अर्थानें हा मुद्दा महत्त्वाचा होता. १२४ अ कलमाचा अर्थ करण्याची संधि प्रिव्ही कौन्सिलास टिळकांच्या महत्वाच्या या खटल्यांत पहिल्यानेंच मिळाली होती. स्ट्रॅचीसाहेबांनीं केलेला विपरीत अर्थ अपिलांत न फिरला तर तोच दाखला होऊन बसेल, व तो दाखला हिंदुस्थानांतील वक्ते व वर्तमानपत्रकर्ते यांना सर्व प्रकारच्या राजकीय चळवळींत फार घातक होईल. अशा उदार तत्वांचें प्रतिपादन या उदार मतवादी बॅरिस्टरांनीं करून पाहिलें. पण प्रिव्ही कौन्सिलच्या न्यायाधीशांना ही मोठी जबाबदारी अंगावर घेण्याची इच्छाच नव्हती. न्यायाधीशांनाहि सांपडेल तेथें पळवाटेनें पळून जाणेंच फार आवडतें. कारण खरा न्याय देणें ही खरोखरच मोठ्या जिकीरीची व धैर्याची गोष्ट असते. ॲस्क्विथसाहेबांना आपलें म्हणणें कांहीं वेळ मांडूं दिल्यावर ही न्यायाधीश मंडळी अपील घेतां येतें कीं नाहीं या पळवाटेकडेच धांवली. यामुळें सरकारतर्फें हजर झालेले बॅरिस्टर मि. कोहेन यांनीं नुकताच १४ जुलै १८९७ रोजीं प्रिव्ही कौन्सिलचाच जो एक ठराव झाला होता तेवढा, म्हणजे सुमारें चार ओळी, वाचून दाखवून आपलें सर्व काम संपलें व साधलें

असा बहाणा केला. या ठरावांत असें म्हटलें होतें कीं "कायदेशीर काम करण्याची रीत चुकल्यामुळें अथवा स्वाभाविक न्यायतत्वाचें उल्लंघन झाल्यामुळें अथवा इतर कांहीं कारणांमुळें जबरदस्त अन्याय झाला आहे असें दाखविल्यावांचून फौजदारी कामामध्यें राणीसरकार हात घालणार नाहीं, किंवा त्याची फिरून तपासणी करणार नाहीं." टिळकांच्या खटल्यांत वास्तविक वरील दोन्ही तिन्ही दोष घडून आले होते. पण हें वकीलांनीं म्हणून काय उपयोग ? ज्या कारणांकरितां ॲस्क्विथसाहेबांनीं या खटल्यांत मुद्दाम लक्ष घालावें असें म्हटलें तेंच कारण न्यायमूर्तींना लक्ष न घालावें असें वाटण्यास प्रभावी झालें असावें.

कसेंहि असो. कोहेन यांचें चारदोन मिनिटें भाषण होतांच न्यायमूर्तींनीं इतर लोकांना दुसऱ्या दालनांत जाण्याची आज्ञा केली, व थोड्याच वेळांत त्यांना परत बोलावून अपील नामंजूर केल्याचें सांगितलें. स्ट्रॅचीसाहेबांची एकंदर सुनावणी लक्षांत घेतां आमच्या मतें अपिलाची परवानगी देण्यास पुरेशीं कारणें नाहींत, असा थोडक्यांत हा निकाल दिलेला होता. स्ट्रॅचीसाहेबांच्या सुनावणीप्रमाणें याहि निकालावर प्रतिकूल लोकमताची पुष्कळ झोड उठली. पण अर्थात् त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. टिळकांच्या मित्रमंडळींनीं व वकिलांनीं आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली; पण टिळकांच्या शिक्षेचा एकहि दिवस त्यांना या मार्गानें कमी करितां आला नाहीं. प्रिव्ही कौन्सिलपुढील फौजदारी अपील ही महाराष्ट्र प्रांतांतील लोकांना नवीच गोष्ट असल्यामुळें, टिळकांचे स्नेही गजानन भास्कर वैद्य यांनीं, टिळकांच्या शिक्षेनंतर व अपिलाचा निकाल लागण्याचे आधीं, 'प्रिव्ही कौन्सिल त्याची रचना व त्याची काम चालविण्याची पद्धत' या विषयावर माहितीनें पूर्ण भरलेले चार उत्कृष्ट लेख केसरीमध्यें प्रसिद्ध केले. शेवटल्या लेखांत त्यांनीं प्रिव्ही कौन्सिलची स्तुति करून प्रिव्ही कौन्सिलांतील न्यायाधीश गंभीर विद्वान् न्यायी पापभीरु व दयाळु असतात सत्य दया न्याय आणि शांति हे प्रख्यात गुण त्यांजमध्यें मूर्तिमंत वास करितात असा, अर्थात् एका बड्या इंग्रज ग्रंथकाराचाच आधार घेऊन, मोठें सर्टिफिकेट देऊन महाराष्ट्रांतील लोकांच्या आशेच्या मुळाला पाणी घातलें होतें. पण ज्या अंकांत हें सर्टिफिकेट छापलें गेलें त्यांतच अपील नामंजूर झाल्याची बातमी देण्याचा प्रसंग केसरीला आला. या निकालानें इंग्रजी न्यायपद्धतीवरील प्रजाजनांचा विश्वास उडवून टाकला असें केसरीला लिहावें लागलें.

असो, हें प्रकरण पूर्ण करण्यापूर्वीं इतर दोनतीन अशाच खटल्यांचा उल्लेख करणें जरूर आहे. हे खटले म्हणजे पुणेंवैभव, प्रतोद व मोदवृत्त यांजवरील होत. पुणेंवैभवाचे संपादक शंकरराव केळकर यांस टिळकांना मुंबईत पकडल्याचे दुसरे दिवशींच अटक करण्यांत आली होती. पोलिस इन्स्पेक्टर गायडर यांनीं केळकर यांना 'तळेगांव स्टेशनावर उद्यां सकाळीं भेटा,' अशा अर्थाची तार केली; व ते स्टेशनावर येतांच, ज्या गाडींतून नातूबंधूंना कैद करून नेण्यांत येत होतें त्याच

गाडींत त्यांनाहि घालून नेण्यांत आलें. पुणेंवैभवाचे संपादक हे मोठेसे राजकारणी चळवळ्या लोकांपैकीं नव्हते. इतकेंच कीं त्यांची लेखणी जरा द्वाड असे. पण ते सरकाराप्रमाणें सुधारकांना व टिळकानाही शिव्या देत. या पत्राचे वर्गणीदार हजार बाराशांहून अधिक नव्हते, आणि सगळ्या मुंबईत अवघे पांचचार अंकच खपत, असें असतां याहि पत्रावर खटला झाला, आणि तें मुंबईत वाटलें जातें असल्या पोकळ निमित्तावर त्याचाहि खटला सरकारनें मुंबई हायकोर्टापुढेंच भरला. संपादक शंकरराव केळकर व त्यांचे प्रिंटर याना सेशनकमिट केल्यानंतर त्यांची जामिनावर सुटका झाली. सेशनांत सुदैवानें ज्यूरीमध्यें मतभेद झाल्यानें त्यांच्या फेर चौकशीचा हुकूम झाला. पण अखेर माफी मागितल्यामुळें त्यांना सोडून देण्यांत आलें. ज्या अंकावरून खटला झाला त्यांत फक्त मामुली प्लेग कमिटीच्या जुलमावर टीका होती. शिवाय ऐतिहासिक विवेचनांत इतकाच मजकूर आला होता कीं, पृथ्विराज चव्हाणाच्या चुकीनें जसा महंमदघोरीचा फायदा झाला, व औरंगजेबाच्या जुलमामुळें जसें शिवाजीला राज्य स्थापन करितां आलें, तसेंच रावबाजीच्या मूर्खपणामुळें इंग्रजांचा फायदा झाला; तरी पण येवढें राज्य हातीं आलें आहे तर आतां प्रजेचें पालन तरी उत्तम तऱ्हेनें करावें अशी प्रार्थनाच आंग्लप्रभूला या लेखाच्या शेवटीं केली होती. सांगण्याचें तात्पर्य हें कीं इंग्रजी न्यायाच्या नमुन्यांत, हा खटला कडेपर्यंत जाता तर, आणखी एक भर पडली असती. पण पुणेंवैभवाच्या माफीनें ही गोष्ट टळली. पुणेंवैभवकार टिळकांना नेहमीं सामाजिक बाबींवरून शिव्या देत, पण या माफीप्रकरणामुळें या शिव्या देणारा व घेणारा यांच्यां किंमतींतील फरक पुणेंवैभवकारांना कोणी न सांगतां कळून आला असेल.

'मोदवृत्ता'चे संपादक काशिनाथ वामनशास्त्री लेले यांना ता. ३० ऑगस्ट रोजीं पकडून साताऱ्यास नेलें. खटल्याचे अंक ता. १३ मे व ता. ३ जून असे होते. टीकेचा विषय प्लेगपासून झालेला फायदा व राज्यपद्धतीचें धोरण असे होते. खटला साताऱ्यास सेशनजज्ज मि. अॅस्टन याजपुढें चालणार या भीतीनें तो मुंबईस हायकोर्टापुढें चालावा असा अर्ज करण्यांत आला व तो मंजूरहि झाला. व तेथेंहि खटला जितका पुढें ढकलला जाईल तितका ढकलला जाण्याकरितां लेले शास्त्री यांनीं कांहीं खरा आजार म्हणून व कांहीं आजाराचा बहाणा करून डाक्तरी सर्टिफिकेट मिळवून खटला एकदोन महिने पुढें जाण्याची खटपट केली. त्यांत त्यांचा हेतु असा असावा कीं टिळकांच्या खटल्याचा निकाल लागून सरकारचा राग या किंवा त्या रीतीनें थोडाबहुत शमल्यावर मग आपला खटला निघाल्यास शिक्षा झालीच तर फार थोडी होईल. भाऊशास्त्री यांचा या मुदतींत जामीन पटला नाहीं यामुळें त्यांना कच्च्या कैदेंत बरेच दिवस काढावे लागले. अखेर ता. २५ नोव्हेंबर रोजीं हा खटला मुंबई हायकोर्टांत सुरू झाला.

ज्यूरींत सात युरोपियन व दोन हिंदू होते. सरकारतर्फे ॲडव्होकेट जनरल हे हजर असून लेले यांनीं मात्र कोणी वकील बॅरिस्टर न देतां स्वतःच खटला चालविला. भाऊशास्त्री हे तऱ्हेवाईक स्वभावाचे असल्याविषयीं प्रसिद्धि होती. त्याचा मासला त्यांनीं हायकोर्टालाहि दाखविला. खटला सुरू होण्याच्या आधीं त्यांनीं एक माफीचें पत्र सरकारास सादर केलें होतें. त्यांत असा मजकूर होता कीं "मी एक संस्कृतशास्त्री, भाषांतरकार आहें. इंग्रजीपेक्षां वेदाचें अध्ययन माझें अधिक झालें आहे. मी वर्तमानपत्रांत बहुतेक इंग्रजी ग्रंथकारांच्या लेखांचीं रूपांतरेंच देतों. तेव्हां मजवर राजद्रोहाचा आरोप येऊं नये. पण आतां आला. माझा गैरसमज होता हें मला कळून आलें. म्हणून मी क्षमा मागतों." पण हें माफीपत्र नामंजूर झाल्यानें, एर्वीतेवी शिक्षा होणार मग आपल्या खोंचदार भाषणाची हौस तरी कां फेडून घेऊं नये असें लेले यांनीं मनाशीं ठरविलें. आजारीपणाचा बहाणा कायम ठेऊन एका मनुष्याच्या पाठीवर बसून ते कोर्टांत आले! पिंजऱ्यांत बसावयास त्यांना खुर्ची मिळाली पण त्यांच्या पाठीला पोंक आलें असल्यामुळें स्वारी खुर्चीवर खुरटूनच बसली. माफी न पटल्यामुळें खटला सुरू झाला. ॲडव्होकेटजनरल यांचें काम सोपेंच होतें. त्यांनीं मोदवृत्तांतील लेख वाचून दाखवून जातां जातां उगीच थोडथोडी टीका केली. सरकारतर्फे साक्षीदार पुढें आले त्यांची लेले यांनींच उलट तपासणी केली. तिचा सर्व रोख असा होता कीं, हे खटले भरण्यापूर्वी सातारा जिल्ह्यांतील कोणाहि कनिष्ठ अधिकाऱ्यानें लोकांत असंतोष असल्याचा रिपोर्ट वरिष्ठाकडे केलेला नव्हता. रिपोर्टांत असंतोष नाहीं तर लोकांतहि तो नव्हता; व लोकांत असंतोष नाहीं तर वर्तमानपत्रांनीं वाटेल ती टीका केली म्हणून काय झालें? पण हा एक पेंच होता. असंतोषाचा रिपोर्ट नाहीं म्हटलें तर लेखाचा दोष कमी होणार; असंतोष असून रिपोर्ट केला नाहीं म्हटलें तर अधिकारी तोंडच्या कबुलीनेंच नालायक व जुलमी प्रवृत्तीचे ठरणार! माझी ख्याति धर्मचर्चा करणारा म्हणून आहे, राजकीय लेखक म्हणून नाहीं, असेंहि त्यांनीं कांहीं साक्षीदारांकडून वदविलें. शेवटीं डिफेन्सचें म्हणून भाषण करितांना लेले यांनीं आधीं मुदत मागितली व ती देत नाहीं म्हणतांच भाषणास सुरुवात केली. ते म्हणाले—माफी दिली नाहीं यांत सरकारचीच बेअब्रू! 'चुकणें भूषण आम्हा भूषण करणें क्षमा तुम्हां देवा' हाच न्याय येथें लागू. मुलगा बापाला बोलतो तशीच प्रजा राजाला. इंग्रजी विचारांनीं राजद्रोह होत नाहीं मग मराठीनेंच काय पाप केलें? मोर्ले पार्नेल हे काय थोडे कडक लिहितात? त्या अस्सलींची ही माझी नकल आहे. मी बोलून चालून धर्मशास्त्री. मी डिफेन्सफंडाहि गोळा केला नाहीं. मला वकील तरी कशास हवा? रेंड्या खून सांपडला, कट नाहीं असें ठरलें, आतां सरकारनें आकस कां धरावा? ॲंग्लोइंडियन पत्रकर्ते हेच खरे राजद्रोही. त्यांच्यावर मात्र कधीं खटला होत नाहीं. ते आम्हाला

आमच्या बापजाद्यांना शिव्या देतात मग आम्ही शिव्या कां देऊं नयेत ? प्रजाद्रोह हा राजद्रोहाइतकाच वाईट आहे. ज्युबिलीच्या प्रसंगी गळेकापू दरोडेखोर तुम्ही सोडले. मी ब्राह्मण, त्यांतूनहि क्षमा मागितली, मला मात्र तुम्ही सोडीत नाहीं ! सरकारला स्तुतिपाठक हवेतेवढे मिळतील, पण माझ्यासारखें कडू पण पथ्यकर बोलणारा शास्त्री मिळायचा नाहीं.' शेवटीं एक संस्कृत सुभाषित म्हणून भाऊशास्त्री यांनीं आपलें भाषण संपविलें. अखेर न्यायमूर्तींची मामुली सुनावणी झाली. ज्यूरीनें सर्वानुमतें आरोपीस दोषी ठरविलें पण तो आजारी अशक्त म्हणून दयेची शिफारस केली. लेले यांनीं फिरून एक वेळ देवाची शपथ घेऊन अजून तरी माफी द्या असें विनविलें. पण तिचा उपयोग इतकाच झाला कीं, न्यायमूर्तींना दया येऊन लेले यांना त्यांनीं नऊ महिन्याच्या साध्या कैदेची शिक्षा दिली.

चौथा खटला प्रतोदावरील. हें पत्र इस्लामपूर येथें निघत असे, त्याचे वर्गणीदार बेताबातातेच होते. तथापि सातान्याचे तेव्हांचे सेशनजज मि. ॲस्टन यांजपुढें खटला गेल्यावर कायद्याचा नायटा झाल्याशिवाय कसा राहिला असता ? असला गोड घांस पुढें येतांच ॲस्टनसाहेबांनीं इतर कामें ढकलून हा खटलाच अलीकडे ओढला, व तडकाफडकी चौकशी करून संपादक रामचंद्र नारायण कशाळकर यांना जन्मठेपेची कैद व छापखानेवाले व मालक कृष्णाजी धोंडदेव हरमळकर यांना, अगदीं दयेचा कडेलोट म्हणून, सात वर्षांची सक्तमजुरी दिली ! यावर हायकोर्टांत अपील होऊन तें ता. १७ नोव्हेंबर रोजीं सुनावणीस निघालें. ता. २३ रोजीं त्याचा निकाल सांगण्यांत आला. न्यायासनावर तीन न्यायमूर्तींचें फुलबेंच होतें. फॅरन, पार्सन्स व रानडे या तिघांनीं गुन्हा तर शाबीत धरलाच; पण जन्मठेप काळेंपाणी रद्द करून त्यांनीं संपादकास फक्त एक वर्ष सक्तमजुरी दिली व मालकाचीं सात वर्षें काढून टाकून तीन महिन्यांच्या साध्या कैदेवर भागविलें. पण अशा रीतीनें निकालापुरते एक असलेले हे तीन न्यायमूर्ती कारणें लिहितांना अनेक होऊन राजद्रोहाच्या व्याख्येचे तिघांनीं तीन प्रकार केले. स्ट्रेचीसाहेबांचा पिनल कोडाचा अर्थ कोणीच मान्य केला नाहीं. राजकीय गोष्टींत द्वेष किंवा असंतोष उत्पन्न करून राजनिष्ठा कमी करणें ही फॅरनसाहेबांची व्याख्या. पार्सन्ससाहेबांनीं राजकीय गोष्टींत सरकारची सत्ता किंवा कायदे न जुमानणें असा राजद्रोहाचा अर्थ केला. रानडे यांनीं स्ट्रेचीसाहेबांचा व्याख्येचा स्वीकार नाहीं व निषेध नाहीं असें धोरण ठेविलें. मात्र राजकीय चळवळीच्या दृष्टीनें प्रथम १२४ अ कलमाचा इतिहास सांगून, नंतर इंग्लंडांतील राजद्रोहाच्या कायद्याच्या अनुरोधानेंच इकडील कायद्याचाहि अर्थ केला पाहिजे हें दाखवितांना त्यांनीं बरीच विद्वत्ता खर्ची घातली होती. कसेंहि असो, न्यायमूर्तींनीं स्ट्रेचीसाहेबांना कमीपणा न आणला तरी ॲस्टनसाहेबांचा खुनशी स्वभाव, आपल्या दयाळू कृतीनें धिकारून जगजाहीर केला, येवढी मात्र गोष्ट खरी. पण ॲस्टनसाहेबांचा खुनशीपणाचा

हा रोग औषधानें न जातां मरणानेंच जाणारा होता हें, पुढें ते साताऱ्याहून पुण्यास न्यायाधीश होऊन आले व तेथून पुढें हायकोर्टांत गेले तरी, त्यांच्या दुष्ट वर्तनावरून दिसून येतच होतें. प्रस्तुत चरित्राच्या पुढील दुसऱ्या खंडांत ताईमहाराज-प्रकरणीं अॅस्टनसाहेबांविषयीं आम्हांस बरेंच लिहावें लागणार आहे म्हणून हा पोटमुद्दा येथेंच सोडून दिला आहे.

अशा रीतीनें चार वर्तमानपत्रांवर खटले झाले, टिळक व नातूबंधु तुरुंगांत गेले, तरी दडपशाहीचा जोर कमी झाला नाहीं. किंबहुना येथून ती अधिकच वाढीस लागली. आणि हिंदुस्थानच्या राजकीय चळवळींच्या इतिहासांतील या प्रकारच्या दडपशाहीचा अध्याय लिहिण्यास जो इतिहासकार बसेल त्याला, रँडसाहेबांचा खून व १८९७ मधील राजद्रोहाचे हे खटले येथूनच विवेचनास प्रारंभ करावा लागेल. पण नुसत्या दडपशाहीनेंहि सरकारचें काम भागलें नाहीं. राजद्रोहापासून स्वतःचें रक्षण करण्याकरितां खुद्द १२४ अ कलमाची दुरुस्ती करून, मर्म-संरक्षक अशीं नवीं कवचकुंडलेंहि त्यांना धारण करावीं लागलीं. टिळक तुरुंगांत असतांच पिनलकोड व क्रिमिनल प्रोसीजर कोड यांच्या दुरुस्तीचीं नवीं बिलें कौन्सिलांपुढें आलीं व तीं लवकरच रीतीप्रमाणें मंजूरहि झालीं. १२४ अ हें कलम दुरुस्त करावें लागलें–त्याचे शब्द अधिक व्यापक व ग्रासकारक करणें भाग पडलें–या एकाच गोष्टीवरून स्ट्रॅचीसाहेबांनीं केलेला त्याचा अर्थ चूक होता हें आपोआपच सिद्ध होतें. टिळकांनीं या अन्यायाचे परिणाम तर भोगलेच; पण उलट कित्येक प्रतिपक्षीयांकडून असाहि दोष लावून घेतला कीं, राजद्रोहाचें कलम निरुंद होतें तें टिळकांच्या कारणानें उगाच रुंद मात्र झालें. वास्तविक रुंदावलेल्या या कलमाची ज्यांना जन्मांतहि खरी भीति नसावयाची–म्हणजे ज्यांच्या राजनिष्ठ वर्तनामुळें त्यांजवर सरकारची अवकृपा होण्याचा कधींहि संभव नाहीं–अशाच मवाळ लोकांकडून वरील आक्षेप आलेला होता. पण त्याचा अर्थ इतकाच कीं, १२४ अ कलमाचे शब्द व्यापक झाले हें त्यांचें खरें दुःख नसून कोणीकडून तरी टिळकांना नांव ठेवण्यास मिळावें इतक्या पुरतेंच तें निमित्त होतें. उलट ज्यांना परिणामाकडे लक्ष न देतां धीटपणानें सरकारावर टीकाच करावयाची होती त्यांनीं राजद्रोहाचें कलम रुंद का निरुंद हें कधीं मनांतच आणलें नाहीं. 'राजद्रोह करणाराला भीति नाहीं व राजनिष्ठांचा मात्र उगीच कांगावा' असें जर सरकारतर्फे कोणी उत्तर दिलें असतें तरीहि तें शोभण्यासारखें होतें. असो; पिनलकोडाच्या दुरुस्तीचा संबंध प्रत्यक्ष टिळकांच्या खटल्याशीं अशा रीतीनें येत असल्यामुळें येथें त्याचा जुजबी उल्लेख केला आहे. राजद्रोहात्मक कलमांचा गेल्या तीस वर्षांतील इतिहास जितका मनोरंजक तितकाच तो विस्तृतहि आहे. पण त्याचें योग्य स्थळ एखाद्या राजकीय इतिहासग्रंथांत होय; व्यक्तिविषयक चरित्रांत नाहीं.

## भाग २९ वा परिशिष्ट ( १ )

### टिळकांचा व्याकरणासंबंधीं खुलासा.

[ खालील प्रश्नोत्तरें खटल्याच्या दिवशीं न्यायमूर्ति व टिळक यांच्या दरम्यान झालीं तेव्हांचा देखावा पाहण्यासारखा होता. ]

न्याय०—आरोपी टिळकांस कांहीं खुलासा मला विचारणें आहे. टिळकांस उद्देशून—" म्लेंच्छांना हिंदुस्थानाच्या राज्याचें ताम्रपट परमेश्वरानें दिलेलें नाहीं " या वाक्याविषयीं तुम्हास कांहीं खुलासा करणें आहे असें समजतें. तुमचा काय खुलासा आहे सांगा पाहूं.

रा. टिळकः—त्यांतील क्रियापदाच्या काळाविषयीं खुलासा करणें आहे तो असाः- म्लेंच्छांना, हें म्लेच्छ शब्दाचें द्वितीया विभक्तीचें रूप. हिंदुस्थानाचें, हें षष्ठ्यंत विशेषण. राज्याचें हीं—षष्ठी विभक्ति. ताम्रपट—नाहीं या क्रियापदाचा कर्ता. परमेश्वरानें—तृतीया विभक्तीचें रूप, " दिलेलें " याशीं संबंध. दिलेलें हें 'देणें' याचें भूतभूतकाळाचें रूप. नाहीं—हें नसणें या अर्थाचें क्रियापद. " नाहीं " या क्रियापदास मराठींत भूतकाळ नाहीं.

न्याय०—" नाहीं " हें मुळीं क्रियापदच नाहीं काय ?

रा. टिळकः—" नाहीं " हें " क्रियाविशेषण " नव्हे, क्रियापदच आहे.

न्याय०—त्याचें भाषांतर तुम्ही कसें करतां ?

रा टिळकः—" नाहीं " म्हणजे आहे याचा अभाव; न व आहे यांचें संयुक्तरूप; वादांतील वाक्याचा अर्थ 'मुसलमानांस दिलेलें नव्हतें' असाच होतो.

न्याय०—" नाहीं " याचा अर्थ इंग्रजींत " नॉट " शब्दानें येतो ना ?

रा. टिळकः—होय; " नाहीं " म्हणजे " न " ( is not ); त्यास भूतकाळाचें रूप नाहीं. त्याचा उपयोग वर्तमान, भूत व भविष्यकाळाच्या धातुसाधितांशीं करतात; व त्यावरून वर्तमान, भूत व भविष्यकाळाचा बोध होतो. धातुसाधितावरून काळ समजतो. " नाहीं " यावरून त्या क्रियेचें अस्तित्व नसल्याचें मात्र समजतें.

न्याय०—तुमचें म्हणणें नुसत्या " नाहीं " या शब्दाचा अर्थ नकार इतकाच होतो ना ?

रा. टिळकः—त्यावरून काळाचा बोध होत नाहीं. काळाचा बोध धातुसाधितावरून होतो. आपल्यास आधार पाहिजे असेल तर हे आहेत ( मराठी व्याकरण नि. ३७,३८ पहा. )

न्याय०—तुमचा खुलासा काय सांगणें असेल तेवढाच मला पाहिजे.

रा. टिळकः—या क्रियापदाचीं तीन्ही काळीं रूपें होतात तीं अशीं. देत नाहीं [ वर्तमान ].

न्याय०:–त्याचें इंग्रजी भाषांतर करा.

रा. टिळकः–( भाषांतर सांगून ) ' देत ' वर्तमानकाळवाचक धातुसाधित आहे. दुसरें रूप, ' दिलें नाहीं ' अथवा ' दिलेलें नाहीं ' हा पहिल्या रूपाचा भूतकाळ. ' दिलें ' अथवा ' दिलेलें ' याच्या योगानें क्रिया भूतकाळीं झाली असा अर्थ होतो. " नाहीं " याजपासून अकरणरूप सिद्ध होतें. दोन्हींचा मिळून अर्थ ' देण्याची क्रिया झाली नाहीं ' असा होतो.

न्याय०–" दिलें नाहीं " " दिलेलें नाहीं "; " दिलें " " दिलेलें " दोन्ही एकच काय ?

रा. टिळकः–होय. " ले " अथवा " लेलें " असलें तरी अर्थ एकच. तिसरें भाविष्यकाळाचें रूप " देणार नाहीं. " बोलणाराचे मनांत निक्षून बोलत आहों असें समजाविण्याचें असेल तर मराठींत तिन्ही रूपांचा एकदम उपयोग करितात. उदाहरणार्थ " देत नाहीं, " " दिलें नाहीं " " देणार नाहीं. "

न्याय०–भूतकाळीं उपयोग करणें असल्यास कोणतें रूप ?

रा. टिळकः–" दिलें नाहीं " अथवा " दिलेलें नाहीं. "

न्याय०–वर्तमान भूतकाळीं रूप कसें होईल.

रा. टिळकः–मघां सांगितलें तेंच रूप.

न्याय०–दिलें नाहीं व दिलेलें नाहीं, हीं रूपें भूतकाळीं व वर्तमानभूतकाळीं योजतात काय ?

रा. टिळकः–मराठींत अकरणरूपीं वर्तमानभूतकाळाचें निराळें रूप नाहीं.

न्याय०–भूतकाळाच्या दोन्ही पर्यायांत रूप एकच, असेंच ना ?

रा. टिळकः–अर्थभेद वाक्याच्या संदर्भावरून समजावयाचा; मराठींत करणरूपीं वर्तमान भूतकाळीं निराळीं रूपें आहेत; परंतु अकरणरूपीं नाहींत.

न्याय०–मी तुम्हास उलट तपासूं इच्छित नाहीं; किंवा प्रश्नहि विचारीत नाहीं. वर्तमान भूतकाळीं अकरणरूपीं कसें रूप योजतात एवढ्याचाच खुलासा मला पाहिजे; व तुमचें म्हणणें वाक्याचे संदर्भावरून समजतें असेंच आहे काय ?

रा. टिळकः–असें दिसतें कीं सदर प्रसंगीं " दिलेलें नव्हतें " असेंहि रूप योजतां येईल.

मि. प्यू०–मला वाटतें, रा. टिळकांस प्रश्न ऐकूं गेलेला नाहीं.

न्याय०–माझें म्हणणें ऐकूं जाईल असें करितों. ( टिळकांस ) मी असें विचारतों कीं, वादांतील वाक्याचें भाषांतर वर्तमान भूतकाळीं केलेलें आहे, व तें बरोबर आहे किंवा त्याचें भाषांतर भूतकाळीं होणेंच वाजवी आहे ? अशाबद्दल कारणें असल्यास सांगा.

रा. टिळकः–या वाक्याच्या वरच्या वाक्याचें भाषांतरही, याच्यासारखेंच रूप असतां केलें आहे त्यावरून दिसेल.

मि. प्यू.–( वाचतो ) " शिवाजीमहाराजांनीं केलें नाहीं " हें वाक्य.

रा. टिळकः–या वाक्यांत तसेंच रूप आहे; व्याकरणाचे दृष्टीनें तेंच रूप आहे. या वाक्यांत केलें नाहीं असें आहे व वादांतील वाक्यांत "दिलेलें नाहीं" असें आहे.

न्याय०–पहिलें रूप " केलें नाहीं " असें आहे. " केलेलें नाहीं " असें कोठें आहे ?

रा. टिळकः–मराठींत भूतकालवाचक धातुसाधितें " लें " अथवा ' लेलें' घालूनहि होतात. ' केलें नाहीं ' या ठिकाणीं ' केलेलें नाहीं ' असें मी घातलें असतें तरी चाललें असतें. ' महाराजांनीं हकलण्याचा प्रयत्न केला ' हेंहि भूतकाळींच आहे.

न्याय०:–हेंहि तसलेंच रूप काय ?

रा. टिळकः–तसलेंच भूतकाळाचें रूप आहे. या वाक्यांतील " त्यांस " हें दर्शक सर्वनाम मागील वाक्यांतील म्लेंच्छांबद्दल आहे–यावरून वादांतील वाक्य भूतकाळीं आहे, असें ठरतें. पुढील वाक्यांतहि मागील वाक्यांतील मुसलमानांबद्दल मीं लिहिलेलें आहे. त्या वेळच्या स्थितीचें वर्णन मी केलें आहे * आतां स्वातंत्र्य शब्दाबद्दल मला कळवावयाचें आहे. तें असें.

न्याय०–म्लेंच्छ शब्द ज्या वाक्यांत आला आहे त्याबद्दल तुम्हीं सांगितलें. याशिवाय आणखी कांहीं सांगणें राहिलें नाहींना ?

रा. टिळकः–माझ्या म्हणण्यास आधार कृष्णशास्त्री गडबोले यांच्या व्याकरणाचा आहे.

न्यायः—सदर व्याकरण मराठींत अथवा इंग्रजींत आहे ?

रा. टिळकः–मराठींत—सदर पुस्तकाच्या दुसरे आवृत्तीचें पान ११८ कलम ३२३ पहावें ( नि० ३८ ). मी नामांकित दोन तीन व्याकरणांतील आधार दाखविणार आहें.

न्याय०–पण मला ते वाचतां येणार नाहींत.

रा. टिळकः–हें सरकारी विद्याखात्यांत चालत होतें.

---

* तीं तीन वाक्यें अशीं. ( १ ) श्री शिवाजीमहाराजांनीं स्वतःचें टीचभर पोट जाळण्याकरितां कांहीं केलें नाहीं. ( २ ) म्लेंच्छांना हिंदुस्थानाच्या राज्याचें ताम्रपट परमेश्वरानें दिलेलें नाहीं. ( ३ ) आपल्या जन्मभूमींतून त्यांना हाकून लावण्याचा महाराजांनीं उद्योग केला, त्यांत पराभिलाषाचें पाप नाहीं. "त्यांना" याचा संबंध पूर्वीच्या वाक्यांतील म्लेंच्छांशीं आहे; म्हणून त्याचा अर्थ मुसलमान असा होतो, असें येथें टिळकांचें म्हणणें आहे .

**न्याय०**–जो भाग तुह्मी वाचून दाखविणार तो दुभाष्यास वाचूं द्या. तुम्हीं ज्या पुस्तकांच्या आधारावरून अमुक अर्थ निघतो असें दाखविणार, त्याच अर्थाचा उल्लेख असणाऱ्या मराठी पुस्तकांचा नामनिर्देश करून कांहीं उपयोग नाहीं. या कोर्टाच्या भाषांतर करणाराकडून भाषांतर झाल्याशिवाय कोणत्याहि आधाराचा उपयोग मी करूं देणार नाहीं.

**रा. टिळकः**–दुसरा दादोबा पांडुरंगकृत मराठी व्याकरण, ८ वी आवृत्ति १८८५ मध्यें प्रसिद्ध झाली आहे, त्यांतील पान १७०–७१ कलम ४७५ व पान ३९९ यावर आहे. ( नि० ३९ ) आणखी एक आधार रामचंद्र भिकाजी जोशी यांनीं १८९५ त छापलेल्या लोकमान्य व्याकरणाचीं पानें १६५--६६ याजवरील मी देतों.

**न्याय**–मि. प्यू ! उद्यां या आधारांचें भाषांतर हजर कराल काय ! मि. प्यूः–होय; करूं.

**रा. टिळकः**–स्वातंत्र्य शब्द स्वतंत्र यापासून भाववाचक नामाचा प्रत्यय लागून सिद्ध झाला आहे. संस्कृतांत याची योजना कोणत्याहि प्रकारचें स्वातंत्र्य या अर्थीं अथवा कर्मस्वातंत्र्य या अर्थीं करतात. यास आधार मनु भाग ९ श्लोक ३, व याज्ञवल्क्य भाग १, श्लोक ८५, यांचा आहे. या मूळ श्लोकांचें भाषांतर झालेलें आहे. याची योजना बापाचा मुलावरील ताबा केव्हां नाहींसा होतो हें सांगतांना केलेला आहे. बाळमित्र नांवाच्या मराठी पुस्तकाचा भाग १ पान ४६ याजवर सदर अर्थीं याच शब्दांचा उपयोग केला आहे.

**न्याय०**–मि. प्यू ! या शब्दाच्या अर्थाविषयीं कांहीं वाद आहे काय ? मि. प्यूः–नाहीं.

**रा. टिळकः**–' वरून खालीं दडपत असेल ' याचा प्रयोग दुसऱ्यावर वरचढ करणें या अर्थीं करतात. शारीरिक दाब या अर्थीं करीत नाहींत. ' वरून खालीं ' याचा अर्थ नुसता खालीं असा होतो, तसेंच 'छाटून काढणें' याचा अर्थ कापणें असा बहुधा करितात. परंतु 'जिवें मारणें' या अर्थीं करीत नाहींत.

**न्याय०**–त्याचा अर्थ काय ? **रा. टिळकः**–कापणें.

**न्यायः**--जिवें मारणें या अर्थीं कधीं करतात कीं नाहीं. ? **रा. टिळकः**–कधींहि नाहीं.

**न्यायः**–जर जीव घेणें असा अर्थ होत नाहीं, तर काय होतो ?

**रा. टिळकः**–त्याचा अर्थ "दूर करणें" "अगदीं राहूं न देणें" असा होतो. यास आधार मेजर क्यांडीच्या कोशाचा आहे. सदर कोशांत "ठार मारणें" या अर्थीं "काटणें" याचा उपयोग केलेला आहे.

**न्याय०**–सदर कोशांत इंग्रजी " किल " शब्दास मराठी शब्द दिला आहे काय ?

रा. टिळकः—कत्तल करणें अथवा कापणें. आतां वरून खालीं याबद्दल कळवितों. याचा अर्थ मराठींत 'खालीं' एवढाच होतो. हा मराठी भाषेंतील एक विशेष भाषणप्रकार आहे. माझें ह्मणण्यास बळकटी मेजर क्यांडीनीं तयार केलेलें व सरकारांतून छापलेलें मराठी क्रमिक चवथें पुस्तक पानें ९४,१७७ व मराठींतील इसापच्या कल्पित गोष्टी. पा. ११६ यांवरून येते. शिवाजीमहोत्सवाचे वेळीं माझे अध्यक्षतेखालीं प्रो० भानूचें भाषण झालें. त्या भाषणांतील सदर शब्दाचा अर्थ वर दर्शविल्याप्रमाणें मी समजलों; व माझें भाषण सदर प्रसंगीं अखेरीस झालें तेव्हांहि मी सदर अर्थाचेंच वाक्य बोललों. ( येथें ता. १५ जून १८९७ च्या अंकांतील आपल्या भाषणाच्या शेवटल्या भागाचें इंग्रजी भाषांतर दाखविलें )

न्यायः—यांत खालीं दडपण्याविषयीं कांहीं नाहीं काय ?

रा. टिळकः—ठार मारण्याविषयीं कांहीं नाहीं. समाजसुधारकांच्या सामाजिक बाबतींत असलेल्या वादविवादाविषयीं उल्लेख आहे. ह्याचा अर्थ " दूर करणें " असा होतो. कज्याच्या कागदांतील पान १४१ ओळ ४० यांत असलेले "दाद लावणें" या शब्दांबद्दल मला खुलासा करावयाचा आहे. दाद शब्दाच्या उपयोगावरूनच बळजोरीचा अर्थ निष्पन्न होत नाहीं. दाद म्हणजे दुःखाचें गाऱ्हाणें; लावून हें लावणें या धातूचें प्रयोजकभेदी रूप आहे. दाद याचा अर्थ मागणें ( इंग्रजी शब्द Relief ) यासारखा आहे. उदाहरणार्थ वादी अमुक मागणें मागतो. मी असें खात्रीनें ह्मणतों कीं, या शब्दाचा उपयोग बळजोरी या अर्थी केल्याचें एकही वाक्य मराठींत नाहीं. दाद मागणें व दाद लावून घेणें हे एकाच अर्थाचे दर्शक निराळे दोन शब्दसमुच्चय आहेत. दाद मागणें याचा अर्थ स्वतः मागणें करणें असा होतो. लावून घेणें याचा अर्थ दुसऱ्याकडून तें काम करविणें असा होतो. तें "लावणें" धातूचें प्रयोजक रूप आहे.

न्यायः—त्याचा अर्थ मागणें, किंवा प्रार्थना असा होतो असें तुमचें म्हणणें काय ? तर ह्याचा अर्थ अर्जानें अथवा हकीगत कळवून मागणें असाच अवश्य होतो काय ?

रा. टिळकः—होय; नेहमीं तसाच अर्थ होतो. प्रो० परांजपे यांच्या पुराणांत ज्या दोन श्लोकार्धाचा उल्लेख आहे, ते महाभारतांतील दोन श्लोकांच्या पहिल्या ओळींने वेंचे आहेत. अतृप्ति ही भरभराटीस कारण असते व तृप्तीपासून नाश होतो असें भाषांतर ते दोनही वेंचे एकच वाक्य आहे अशा समजुतीवर झालें आहे; परंतु ती चुकी आहे. मूळ वेंचे संस्कृतांतील आहेत; मराठींतील नाहींत. पहिला हा एका श्लोकाची पहिली ओळ आहे. दुसरा निराळ्याच श्लोकांतील आहे. ते उद्गार दुर्योधनानें आपल्याविषयीं काढिलेले आहेत. त्याच्या ह्मणण्याचा अर्थ—"राजानें ( आपण ) नेहमीं असंतुष्ट राहिले पाहिजे. प्रजेनें मात्र नेहमीं संतुष्ट

असावें. परंतु राजानें असंतुष्ट असणेंच उचित; हितोपदेशांतील पद्याचा तोच अर्थ आहे. आपल्यास आणखी कांहीं खुलासा हवा असल्यास मी खुषीनें करण्यास तयार आहें. मला इतकेंच कळवावयाचें होतें. ”

---

## भाग २५ वा परिशिष्ट (२)

### टिळकांचा हायकोर्टास अपील अर्ज

[ अर्जातील पहिल्या पांच कलमांत महत्त्वाचा असा कांहींच मजकूर नसल्यामुळें तीं गाळलीं आहेत. ]

( ६ ) चौकशी चालली असतांनाच, अर्जदार यांजवर फौजदारींत खटला करावा अशा बद्दलची वर निर्दिष्ट केलेली मंजुरी म्हणून आलेला कागद फिर्यादीतर्फे कोर्टापुढें आला व त्या वेळीं अर्जदार याजवर ठेवलेल्या अपराधाबद्दल फिर्याद करण्यास सदरची मंजुरी क्रिमिनल प्रो. कोडाच्या कलम १९६ प्रमाणें पुरेशी नाहीं, अशा मुद्यावर अर्जदारातर्फे हरकत घेण्यांत आली; परंतु सदर मंजुरी सदर कलमाप्रमाणें पुरी आहे, आणि जरी पुरेशी नसून त्यांत कांहीं दोष असला तरी तीस सदर प्रोसीजर कोडाचे ५३२ कलमाप्रमाणें कांहीं बाध येत नाहीं, असें म्हणून जज्ज साहेबांनीं ती हरकत नामंजूर केली. सदरची मंजुरी पुराव्यांत घेतल्यानें खटल्याच्या चौकशीमध्यें आपलें फार नुकसान झालें अशी अर्जदार याची सविनय प्रार्थना आहे.

( ७ ) सदर खटल्याची चौकशी चालली असतां, ता. ६ एप्रिल व ४ मे व २६ मे १८९७ रोजांच्या केसरीच्या अंकांत छापलेला दुसरा कांहीं मजकूर, अर्जदार याचा हेतु दाखविण्याकरितां, फिर्यादीतर्फे पुराव्यास देण्यांत आला; व सदरचा मजकूर निराळेच लोकांकडून छापण्यास आला होता सबब तो मजकूर अर्जदार याचा हेतु दाखविण्यास योग्य पुरावा आहे असें होणार नाहीं, अशा मुद्यावर अर्जदारातर्फे हरकत घेतली होती; परंतु ती नामंजूर झाली. परंतु असा पुरावा घेण्यांत आल्यानें आपलें फार नुकसान झालें अशी अर्जदाराची सविनय प्रार्थना आहे.

( ८ ) ज्यूरीस उद्देशून अर्जदारातर्फे वकिलाचें भाषण चाललें असतां कलम १२४ ( अ ) पिनल कोडांत कसें आलें यासंबंधाची हकीगत बरोबर समजावी म्हणून व इतर कित्येक कारणांवरून हिंदुस्थानाच्या पिनल कोडांत कलम १२४ ( अ ) घालते वेळीं हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलाचे सभासद, मि. स्टीफन साहेब यांच्या भाषणांतील कांहीं उतारे ज्यूरीस वाचून दाखविण्याची अर्जदाराच्या वकिलाची इच्छा होती, परंतु सदहू विद्वान न्यायमूर्तींनीं ठराव

केला कीं सदई उतारे सर जेम्स स्टीफन यांच्या भाषणांतले म्हणून वाचण्याचा अधिकार अर्जदाराच्या वकीलास नाहीं, त्यांनीं पाहिजे तर आपल्या भाषणाचाच भाग म्हणून ते वाचावे.

( ९ ) ज्यूरीस एकंदर खटल्याचा सारांश समजावून देतांना या विद्वान न्यायमूर्तींनीं जशा इतर कांहीं गोष्टी सांगितल्या तसाच खालीं लिहिल्याप्रमाणें मजकूर ज्यूरीस सांगितला व तसें सांगण्यामध्यें अर्जदारास मिळालेल्या सल्ल्याप्रमाणें चूक झाली आहे. तो मजकूर खालीं लिहिल्याप्रमाणें:—

( A ) अप्रीति म्हणजे प्रीतीचा अभाव होय.

( B ) अप्रीति म्हणजे द्वेष, वैमनस्य, नावड, वैर, तिरस्कार व सरकाराविषयीं प्रत्येक प्रकारची दुष्ट बुद्धि होय.

( C ) कदाचित् राजद्रोह हा शब्द साधारणपणें सर्वांपेक्षां अधिक चांगला अर्थव्यंजक होईल, व त्यामध्यें सरकाराविषयीं प्रत्येक प्रकारच्या दुष्ट बुद्धीचाहि समावेश होईल.

( D ) कोणीहि मनुष्यानें सरकाराविषयीं दुसऱ्याच्या मनामध्यें द्वेषबुद्धि उत्पन्न करूं नये. किंवा उत्पन्न करण्याचा प्रयत्न करूं नये.

( E ) सरकार या शब्दाचा अर्थ ब्रिटिश राज्य किंवा त्याचे प्रतिनिधि अगर कोणीहि सरकारी कामगार असा आहे.

( F ) ज्या लेखामध्यें सरकाराच्या योजनेवरच केवळ टीका केलेली नसून खुद्द सरकारवरच खरमरीत टीका केली आहे, अशा लेखास कलम १२४ ( अ ) याचा खुलासा लागू नाहीं.

( G ) ज्या लेखांवरून आरोप आणला आहे त्या लेखांत सार्वजनिक रोगाबद्दलचा कायदा अथवा बसावलेला एखादा विशेष कर अथवा राज्यव्यवस्थेसंबंधीं धोरण, प्लेग किंवा दुष्काळ बंद करण्याकरितां सरकारानें केलेल्या तजविजी व अशा प्रकारच्या योजना यांवर नुसती टीकाच नसून खुद्द सरकारावर व सरकारच्या अस्तित्वावर व सरकारच्या विशेष लक्षणांवर अथवा लोकांविषयीं सरकाराचे अमुक अमुक हेतु व विचार आहेत यांजवर टीका आहे, असें ज्यूरीचें मत झाल्यास ज्यूरीनें कलमाचा खुलासा अगदीं एका बाजूस ठेवावा, व कलमाचा पूर्वभाग मात्र लागू करावा.

( H ) प्राप्तीवरील कराचा कायदा, सार्वजनिक रोगाचा कायदा, अथवा लढाईची मोहिम अथवा प्लेग अगर दुष्काळ बंद करण्याबद्दल व लोकांस न्याय मिळण्याबद्दल केलेल्या तजविजी, या सर्व कृत्यांवर कोणी टीका केली व ती टीका कितीही खरमरीत, कितीहि अयोग्य, कितीहि खोडसाळपणाची व अनुचित असली तरी हरकत नाहीं. परंतु जर तो या मर्यादेच्या पलीकडे गेला व सरकाराच्या कृत्यांवर टीका करतांना किंवा इतर वेळीं वाचकांच्या मनांत खुद्द सरकाराविषयीं द्वेषबुद्धि

किंवा तिरस्कार उत्पन्न करील ( उदाहरणार्थ जर तो प्रजेस सोसावें लागलेलें प्रत्येक दुःख व संकट यास कारण सरकारच आहे अथवा सरकार परद्वीपस्थ आहे व त्यांच्या चाली रीति भिन्न आहेत अथवा सरकाराचे हेतु वाईट आहेत अथवा प्रजेच्या कल्याणाविषयीं सरकार उदासीन अगर विरुद्ध आहे, असें प्रतीपादन करील ) तर या कलमाप्रमाणें तो दोषी होईल व कलमाला जोडलेल्या खुलाशानें त्याचा बचाव होणार नाहीं.

( I ) कायद्याचा असा अर्थ केला असतां कोणाही विचारी मनुष्यास इष्ट स्वातंत्र्य मिळणार आहे; व यापेक्षां जास्त स्वातंत्र्य दिल्यानें मुद्दाम आपलें दौर्बल्य कबूल केल्यासारखें होतें व तें सरकारालाच नव्हे तर लोकांलाहि अहितकारक आहे.

( J ) ज्या लेखांची ज्यूरीला सुनावणी झाली आहे ते लेख वाचून सरकाराविषयीं द्वेषबुद्धि उत्पन्न होण्याचा संभव आहे असें ज्यूरीस वाटल्यास अर्जदाराचा सरकाराविषयीं द्वेषबुद्धि अथवा अप्रीति उत्पन्न करण्याचा इरादा होता असें अनुमान काढणें योग्य होईल.

( K ) लिहिणाराचा हेतु सरकारवर वाचकांचीं मनें खवळविण्याचा होता किंवा अगदीं निराळाच कांहीं प्रकार करण्याचा होता यावद्दल स्वतः लेख वाचून ज्यूरीनें आपल्या मनाशीं करून काय तें ठरवावें.

( L ) ' शिवाजीचे उद्गार ' या कवितेमध्यें सरकारच्या एखाद्या विशेष कृत्याबद्दल जरी लिहिलें नाहीं तरी हल्लींच्या महर्घता, दुष्काळ, इत्यादि संकटांच्या वेळीं सरकार देशांतून संपत्ति नेत आहे असा सरकारावर सामान्य आरोप केला आहे; आणखी लिहिणाराचा हेतु केवळ जमाबंदीच्या व्यवस्थेंत कांहीं सुधारणा व्हावी एवढाच जरी असला, तरी सुद्धां, वर्तमानपत्रामध्यें सरकारी खर्चासंबंधानें लिहिण्यास जशी हरकत नाहीं तसें या कवितेंतील लिहिण्याशीं सर्व गोष्टी जुळवून पहातां व कोणत्याहि विशिष्ट कराचा उल्लेख केलेला नाहीं या गोष्टीकडे लक्ष दिलें असतां हें लिहिणें सरकारद्वेष्याविषयींच होतें असें ज्यूरीनें समजावें.

( M ) सर्व कवितेचा सामग्र्यानें विचार करितांना तींतील सर्व विषय विशेष प्रसंगींच कां एके ठिकाणीं गुंफलेले होते, याचें कारण आपल्यास नीटसें कांहीं दिसत नाहीं.

( N ) सन १८९४ सालांतील केसरीच्या लेखाप्रमाणें या कवितेमध्यें अविचाराच्या व हलगर्जीपणाच्या कोणत्याहि कृत्यावर टीका आहे असें कांहीं नाहीं.

( O ) सदर कवितेच्या शेवटीं म्हटल्याप्रमाणें सरकारनें लोकांस सुखी करावें म्हणून जो उपदेश केला आहे त्याचा अर्थ सरकारनें केला आहे तद्व्यतिरिक्त दुसरा होणार नाहीं; परंतु वस्तुतः लोक सुखी नाहींत, असेंच त्यांत लिहिलें आहे; व सरकारास लोकांनीं अर्ज केला होता अशाविषयीं त्यांत मुळीं उल्लेखहि आढ-

-ळत नाहीं. त्याच कवितेंत आणखी शिवाजीनें सरकारास निरोप पाठविला आहे व शिवाजीकडून इंग्रज सरकारास काय फायदे झाले याची त्यांस आठवण दिली आहे. यावरून लिहिणाराचा हेतु इंग्रजसरकाराविषयीं लोकांचीं मनें कलुषित करण्याचाच होता यांत तिळमात्र संशय नाहीं.

( P ) लेखांतील हेतु आणण्यासाठीं विवक्षित लेख दुसऱ्या लेखाचे शेजारीं ठेऊन वाचला पाहिजे असें ज्यूरीस सांगितलेलें होतें; तरी मूळ अंकामध्यें राणीसरकारच्या ज्युबिलीमहोत्सवासंबंधें जयजयकाराचा पत्रकर्त्यांचा एक लेख जो अर्जदारातर्फे पुराव्यांत घातला आहे, तो या दोन आरोपविषयक लेखांच्यामध्यें छापलेला असतांहि जजसाहेबांनीं त्याच्याकडे लक्ष देण्याविषयीं ज्यूरीस मुळीं सांगितलेंहि नाहीं.

( Q ) दुसऱ्या लेखांतील मजकूर लिहितांना अर्जदारानें भूतकाळाबद्दल वर्तमानकाळ व वर्तमानकाळाबद्दल भूतकाळ योजून कसा डावपेंच लढविला आहे, ही गोष्ट ज्यूरीनें विचारांत घेतली पाहिजे.

( R ) श्री शिवाजी व नेपोलियन आणि फ्रान्स देशांतील राज्यक्रांतीच्या वेळची लोकांची कत्तल, या संबंधानें स्वतंत्र ऊहापोह करून लिहिलें असतें, तर त्याला हरकत नव्हती. परंतु वरील गोष्टी बोलणारा वक्ता विशेष काळास व महाराष्ट्र देशासच उद्देशून बोलला, तसें बोलण्याचें त्यास कांहीं कारण नव्हतें.

( S ) आपल्या गुरूस मारलें असतांहि शिष्यास कांहीं दोष लागत नाहीं असें अर्जदारानें स्पष्ट म्हटलें आहे.

( T ) चोर आपल्या घरांत शिरले असतां त्यांस बाहेर घालविण्याची जर आपल्या मनगटांत ताकद नसेल तर त्यांना कोंडून बेलाशक जाळावें असें वाक्य लिहिल्यानें सरकारच्या कृतीचा प्रतिकार जबरदस्तीनें करावा असें म्हणण्यासारखें होतें.

( V ) केसरींतील लेख व रँड व आयर्स्ट यांचा भयंकर खून या दोहोंमध्यें कार्यकारण संबंध आहे असें सुचविण्याची आपली यत्किंचित् देखील इच्छा नाहीं व सदर्हू लेख त्या खूनास कारणीभूत झाले असें शाबीत करतां येणार नाहीं, असें अॅडव्होकेटजनरल यांनीं सांगितल्यामुळें ज्यूरीनें आपल्या मनांतून ती गोष्ट अजिबात काढून टाकावी, असें जरी सुनावणीच्या आरंभीं जज साहेबांनीं म्हटलें तरी आपल्या भाषणाच्या उत्तर भागामध्यें त्यांनीं असें सुचविलें कीं, शिवाजीनें खून केला ही गोष्ट बरोबर होती व लोकांनीं एकी करावी वगैरे दुसऱ्या लेखांतील गोष्टींचा विचार करावयाचा तो देशाची स्थिति व विशेषेंकरून पुणें व पश्चिम हिंदुस्थान येथील लोकांच्या मनोवृत्ति यांकडे लक्ष पुरवून केला असतां, साधारण वाचकांच्या मनांत काय विचार उत्पन्न होतील याचा निर्णय तुम्हांस करतां येईल. आपली असेंहि सांगितलें कीं, आपल्या श्रोत्यांनीं भारतांतील श्रीकृष्णाच्या

उपदेशाप्रमाणें चालावें व आपल्या कृत्याचें फल आपल्यास मिळावें या हेतूनें जर कोणतेंहि कृत्य केलें तर दोष आपल्यावर येत नाहीं असा अर्जदार यानें लोकांस उपदेश केला.

(W) ता. ४ मेचा लेख, दुसऱ्या प्लेगसंबंधीं लेखापेक्षां, गुन्ह्याच्या लेखाशीं जवळचा आहे, यावरून त्या वेळीं सरकाराविषयीं अर्जदाराचे विचार मित्रत्वाच्या उलट होते ही गोष्ट ज्यूरीनें लक्षांत ठेवावी असें न्यायाधीशांनीं सांगितलें. परंतु अर्जदारातर्फे पुराव्यांत घातलेला मजकूर, व ज्यावरून अर्जदार व रँड साहेब यांचा मित्रभाव दिसण्यासारखा होता, तसेंच त्या वेळीं प्लेग बहुतेक नाहींसा झाला होता व ता. २० मे या दिवशीं लष्करी शिपाई काढून सुद्धां न्यावयाचे होते, वगैरे बहुत गोष्टी ज्यांत लिहिल्या आहेत, तो ता. १८ मेचा लेख, यःकश्चित् लेखाप्रमाणें गणून, त्याचा उल्लेखहि साहेब मजकुरांनीं केला नाहीं.

(X.) प्रथम जेव्हां लोकांपुढें भाषणें झालीं तेव्हां व नंतर ता. १५ जून १८९७ रोजीं जेव्हां तीं केसरींत छापिलीं तेव्हां, पुण्यास लोकांची मनोवृत्ति कशी होती याबद्दल मुळींच पुरावा दाखल झालेला नसतां, त्या वेळीं चळवळ व अस्वस्थता होती असें न्यायाधीश साहेबांनीं सांगितलें. परंतु प्लेगबद्दल केलेली योजना बंद होऊन ता. २० मे रोजीं सोल्जर लोक काढून नेले जातील असें ता १८ मे रोजीं सरकारी जाहिरनाम्यानें प्रसिद्ध झालें होतें ही पुराव्यांत आलेली गोष्ट मात्र त्यांनीं ज्यूरीच्या लक्षांत आणली नाहीं.

१०. ज्यूरीनें निकाल सांगण्यापूर्वीं नामदार हायकोर्टाच्या अभिप्रायाकरितां खालील कायद्याचे प्रश्न राखून ठेवावे अशी विद्वान जज्ज साहेबांस अर्जदारातर्फे विनंति करण्यांत आली असून त्यांनीं ती नामंजूर केली. ते प्रश्न येणेंप्रमाणें:—.

( १ ) सदहु प्रकरणीं केलेल्या फिर्यादीस क्रि. प्रो. कोड, कलम १९६ प्रमाणें पुरेशी मजुरी अगर परवानगी आहे कीं काय ?

( २ ) नसेल तर सदर कोडाचें कलम ५३२ प्रमाणें सदरचा कमीट केलेला कज्जा हातीं घेण्यास व त्याची चौकशी करण्यास सदरचे कोर्टास अधिकार आहे कीं काय ?

( ३ ) अप्रीति म्हणजे इंग्रज सरकार अथवा त्यांचे प्रतिनिधि व सरकारी कामगार यांच्याविषयीं हरएक प्रकारें प्रीतीचा अभाव, असें जे ज्यूरीस न्यायाधीशानीं सांगितलें तें बरोबर आहे कीं काय ?

११. त्यानंतर अर्जदार यानें आपले सॉलिसीटर मि० भाईशंकर नानाभाई यांचे मार्फत लेटर्स पेटंटचे २६ वे कलमाप्रमाणें सर्टिफिकेट मिळण्याबद्दल नामदार यांजकडे अर्ज केला परंतु तें सर्टिफिकेट देण्याचेंहि त्यांनीं नामंजूर केलें.

१२. अर्जदार यास अशी सल्ला आहे व त्याची अशी खात्री आहे कीं, वर निर्दिष्ट केलेल्या विशेष गोष्टींशिवाय आणखी कित्येक गोष्टींसंबधानें न्यायाधीश

साहेबांनीं ज्यूरीस चुकीची समज दिली व वर सांगितल्याप्रमाणें जर जज्ज साहेबांनीं सांगितलें नसतें तर ज्यूरीचें बहुमत अर्जदाराच्या विरुद्ध झालें नसतें.

१३. हा खटला, केवळ अर्जदारासच नव्हे, तर हिंदुस्थानांतील सर्व छाप-खानेवाले व तमाम लोक यांसहि फार महत्त्वाचा आहे. कारण जज्जसाहेबांच्या म्हणण्यावरुन असें दिसतें कीं आपल्या अडचणी दूर व्हाव्या म्हणून केलेला कोण-ताहि अर्ज इतर बाबतींत कितीहि निर्दोष असला तरी तो अर्ज करणारा किंवा करणारे इसम पिनल कोडाच्या १२४ (अ) कलमाप्रमाणें शिक्षेस पात्र होणार आहेत.

१४. अर्जदार यास अशीहि सल्ला आहे व त्याची अशी खात्रीहि आहे कीं सदरचें जज्जसाहेबांचें सांगणें अगदीं कायदेशीर आहे असें मानलें तर त्या योगानें हिंदुस्थानांतील मुद्रणस्वातंत्र्य भाषणस्वातंत्र्य व सार्वजनिक कामानिमित्त एकत्र जमण्याचा हक्क, हीं जरी अगदीं नाहींशीं झालीं नाहींत तरी त्यांस बराच धक्का पोंचणार आहे.

ह्या सर्व कारणांस्तव लेटर्स पेटंटचें कलम ४१ या अन्वयें ह्या खटल्यांत प्रिव्ही कौन्सिलास अपील होणें योग्य आहे असा आपण अभिप्राय द्यावा अशी अर्जदार याची आपल्यास विनंति आहे.

व त्याबद्दल आपल्या कर्तव्यास जागून अर्जदार नेहमीं ईश्वराची प्रार्थना करील.

(सही) माईशंकर आणि कांगा        बाळ गंगाधर टिळक.
अर्जदाराचे अटर्नीज.

मी अर्जदार बाळ गंगाधर टिळक आपल्या धर्माप्रमाणें अशी प्रतिज्ञा करितों कीं, सदहु अर्जांत लिहिलेला मजकूर माझ्या पुऱ्या माहितीप्रमाणें व खात्रीप्रमाणें खरा आहे.

बाळ गंगाधर टिळक.

## भाग २५ वा परिशिष्ट (३)

### टिळक डिफेन्स फंड.

या फंडाच्या कामीं मुंबई शहरच्या बरोबरीनें कलकत्त्यानें वर्गणी जमविली ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. पर प्रांतांपैकीं कलकत्त्याच्या अमृत-बझार पत्रिकेइतकी मदत टिळकांना या प्रसंगीं इतर कोणाकडून झाली नाहीं. शिशिर कुमार व मोती बाबू यांचें टिळकांवर विशेष प्रेम होतें. आणि सुरेंद्रनाथ बानर्जी हे तेव्हां निखालस टिळकांच्या प्रतिपक्षांत मोडत नसून, दोन वर्षांपूर्वी पुण्यास राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष या नात्यानें आल्या वेळीं त्यांनीं टिळकांचा निकट परिचय केला होता. टिळकांस पकडतांच बचावाची पहिली चळवळ बंगाल्यांत पत्रिकेनें सुरू केली; व मुंबई येथील टिळकांच्या मित्रांना कलकत्त्याहून अनपेक्षित रीतीनें एक दिवस तारेनें अशी बातमी कळविण्यांत आली कीं टिळकांचा बचाव करण्याचें जोखीम एकटा बंगालप्रांत आपल्या शिरावर मोठ्या खुषीनें घेत आहे. आणि हें आश्वासन कलकत्त्यानें पाळलेंहि. कारण बचावाचा मुख्य भाग म्हणजे बॅरि-स्टरांची मदत ती सर्व कलकत्त्याहून करण्यांत आली, व कलकत्त्याहून आलेले मुख्य बॅरिस्टर मि. प्यू यांचा बहुतेक सर्व खर्च कलकत्त्यानें सोसला. आमच्या माहितीप्रमाणें टिळक फंडाकरितां जमलेल्या रकमेंतून मुख्य खर्च खालीलप्रमाणें झाला. १२००० बारा हजार रु. एल. पी. प्यू बॅरिस्टर यांची फी; ५००० रुपये कलकत्त्याचे बॅरिस्टर मिस्टर गार्थ यांची फी; १५०० रु. प्यू यांच्या जोडीला मुंबईचे बॅरिस्टर दावर, रसेल, ब्रानसन हे राखून ठेवण्यांत आले होते त्यांची फी; १००० रु. कलकत्त्याचे बॅरिस्टर प्यू गार्थ व जे. चौधरी यांचा प्रवासखर्च; ३७०० रु. छापणावळ (मुंबईतील टाइम्स ऑफ इंडिया रिपन प्रेस गोवर्धन मुद्रणालय इ.) निवळ भाषांतरांकरितां सुमारें २००० रु. खर्च आला. कोर्ट फी, रिपोर्टर फी, गाडीभाडें मिळून सुमारें १००० रु. खर्च आला. मुंब-ईचे सॉलिसिटर भाईशंकर व कांगा यांच्या कंपनीची फी सुमारें पांच हजार झाली. या नंतर याच कामीं विलायतेस अपील लावण्याकरितां टिळकांचे स्नेही दाजीसाहेब खरे व दिनशा वाच्छा यांचे जावई एफ्. एम्. कांगा सॉलिसिटर गेले त्यांच्या प्रवासखर्चाकरितां तीन हजार रु. खर्च झाला असून, खुद्द विलायतें-तील बॅरिस्टर सॉलिसिटर्स व तेथील छपाई मिळून सुमारें पांच हजार खर्च झाला.

टिळक डिफेन्स फंडाची जमा व खर्च यांचे ठोकळ आंकडे केसरीमध्यें व आमचे समजुतीप्रमाणें मुंबई टाइम्समध्येंहि प्रसिद्ध करण्यांत आले होते; व ज्यांनीं फंडास वर्गण्या दिल्या त्यांचें तेवढ्यानें समाधानहि झालें होतें. पण सार्वजनिक वर्गण्यांच्या बाबतींत सामान्य नियम असा अनुभवास येतो कीं, ज्यांनीं वर्गण्या दिल्या त्यांपेक्षां ज्यांनीं न दिल्या त्यांनाच फंडाच्या विनियोगाविषयीं अधिक

काळजी वाटते! एकानें वर्गणी द्यावी व दुसऱ्यानें त्याच्या खर्चाची चिंता वाहण्याचा बहाणा करावा हाहि एक प्रकारचा श्रमविभागच होय! बंगाल्यांत 'हितवादी'पत्रानें या श्रमविभागांतील दुसरें म्हणजे अधिक जोखमीचें हें काम आपल्या अंगावर घेतलें होतें. या पत्राच्या संपादकानें स्वतः या फंडाला मोठीशी वर्गणी दिली नव्हती किंवा वर्गणी जमविण्याची खटपटहि फारशी केली नव्हती. तथापि बंगाल्यांत वर्गण्या कोणी व किती दिल्या असा प्रश्न मधून मधून जाहीर रीतीनें विचारण्याचा त्यानें क्रम ठेविला होता व या पृच्छेचा प्रतिध्वनि महाराष्ट्रांतहि एकदोन वर्तमानपत्रांत निघाला होता.

---

## भाग २५ वा परिशिष्ट (४)

### १२४ अ कलमाचा इतिहास

सन १८९७ सालीं टिळकांवर राजद्रोहाचा खटला झाला तो कालगणनेच्या दृष्टीनें दुसरा असला तरी महत्त्वाच्या दृष्टीनें पहिलाच होय. ज्या कलमाखालीं हा खटला झाला त्याचा वृत्तांत थोडासा गमतीचा आहे. इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांत सुरू होऊन यापूर्वी शंभरांवर वर्षे होऊन गेलीं होतीं. या अवधींत इंग्रजी राज्याला वाईट म्हणणारे लोक अनेक होऊन गेले, व सरकारकडून त्यांना निरनिराळ्या मार्गांनी शासनहि करण्यांत आलें. पण अद्यापि सर्व हिंदुस्थान म्हणण्यासारखें एकजीव झालें नव्हतें. राष्ट्रीयसभा जन्मून १८९७ सालीं जरी बारा वर्षे झालीं होतीं तरी तिच्यांतून राजद्रोह निघू शकतो अशी कल्पना लोकांनाच काय पण राजकर्त्यांनाहि नव्हती. इंग्रजी अमदानीच्या पहिल्या काळांतहि उपद्रवी लोकांना सरकारानें शासनें केलीं, पण न्यायकोर्टांत खटले मांडण्यापेक्षां वेगळ्या प्रकारांनीं. या पहिल्या काळांत हिंदीलोकांपेक्षां कांहीं अंशीं युरोपियन लोकांकडूनच इंग्रज सरकाराला उपद्रव अधिक झाला. हिंदुस्थानांतील पहिलीं पहिलीं वर्तमानपत्रें चालविणारे लोक बहुधा इंग्रजच होते. अर्थात् सजातीय सजातीयांविरुद्ध लिहूं लागला म्हणजे तो फारसा भीत नाहीं, लेखणी वाटेल तशी कडक चालवितो; व सरकार त्यांना शिक्षाहि कडक, म्हणजे एकदम हद्दपारीची देई. जुन्या रेग्युलेशन्स्प्रमाणें ही गोष्ट कायदेशीर स्वरूपांत करतां येत होती. एवढेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील दुर्वृत्त इंग्रज लोकांना शिक्षा करावयाची तर त्यांना हद्दपार करणेंच अधिक श्रेयस्कर अशा प्रकारचें धोरण हिंदुस्थान सरकारानें आपल्या मनाशीं ठरवून ठेविलें होतें. आणि १८३० व १८४० च्या दरम्यान फौजदारी कायदा जेव्हां पिनलकोडाच्या रूपानें संकलित करण्यांत आला तेव्हां, लॉ कमिशनचे अध्यक्ष लॉर्ड मेकॉले यांनीं पिनलकोडाच्या प्रस्तावनेंत या गोष्टीचा उल्लेखहि केलेला आहे. या पहिल्या

पिनलकोडांत अशी व्यवस्था केली होती कीं, ज्या गोरकायाला दोन वर्षांची साधी कैद किंवा एक वर्षाची सक्तमजुरीची कैद देण्यांत आली असेल त्याला सरकारानें वाटेल तर कंपनीच्या मुलखाबाहेर इतर कोठें काळ्यापाण्यावर पाठवावें. या धोरणाला अनुसरून अनेक गोरेकाय संपादकांना बोटींत घालून विलायतेस अगर इतरत्र रवाना करण्यांत आलें होतें. एवढेंच काय पण या धोरणाचा विसर सरकारास अद्यापाही पडला आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण याच धोरणाला अनुसरून मुंबई क्रॉनिकल पत्राचे संपादक बेंजामिन हॉर्निमन यांना, डिफेन्स ऑफ इंडिया अॅक्टाचा फायदा घेऊन, वारंटानें पकडून दडपून बोटींत घालून विलायतेस नेऊन सोडलें, व अजूनहि त्यांना इकडे येण्याला परवाना देण्यांत येत नाहीं.

गोरकाय राजद्रोही लोकांकरितां ही विशेष व्यवस्था केली होती तरी हिंदी-लोकहि राजद्रोहाचा गुन्हा करणारच नाहींत असें नसल्यामुळें, या गुन्ह्याचा समावेश पिनलकोडांत करणें प्राप्त होतें. १८३७ च्या पिनलकोडांत या गुन्ह्याचें कलम नंबर ११३ असें असून या गुन्ह्याला दंड किंवा दंडासह तीन वर्षेपर्यंत साधी कैद, किंवा दंडासह वाटेल त्या मुदतीपर्यंत हद्दपारी, अशी शिक्षा ठेवण्यांत आली होती. पैकीं साधी कैद ही नेटिव लोकांकरितां व हद्दपारी ही गोरकायांकरितां असा फरक कायदा करणारांनीं मनांतून योजिला होता हें वर केलेल्या विवेचनावरून लक्षांत येईलच. या कलमासंबंधानें दुसरी गोष्ट सांगावयाची ती अशी कीं, राजद्रोहाच्या गुन्ह्याला मूळ पिनलकोड करणारांच्या दृष्टीनें सौम्य स्वरूप होतें. कारण याच पिनलकोडाच्या ४७९ कलमाप्रमाणें खासगी मनुष्याच्या बदनामीला दोन वर्षें साधी कैद अगर दंड अगर दोन्ही अशी शिक्षा सांगितली होती. राजद्रोह झाला तरी ती एक प्रकारची फार तर ' बदनामीच ' होय; खासगी मनुष्याच्या बदनामीला दोन वर्षें कैद व सरकारच्या बदनामीला तीन वर्षें कैद एवढाच फरक. लॉ कमिशनच्या मनांत राजद्रोहाला इंग्लंडांत जें सौम्य म्हणजे केवळ बदनामीच्या गुन्ह्याचें स्वरूप होतें तेंच इकडेहि ठेवावें असें असल्याचें उघड दिसतें.

१८६० सालीं पिनलकोड मंजूर झालें तेव्हां लॉ. कमीटीच्या मसुद्यांतील राजद्रोहाबाबत ११३ वें कलम अजीबाद गळबटलें. असली नजरचूक कशी व्हावी याचा समाधानकारक खुलासा आजवर कोठेंच आमच्या पाहण्यांत आला नाहीं. दहा वर्षांनंतर ही चूक सरकारच्या लक्षांत आली. तेव्हां या ११३ व्या कलमांतील मजकुराचें एक नवीन कलम बनवून तें १२४ कलमास पुरवणीदाखल दाखल करण्यांत आलें. अर्थात् त्यावेळीं शांतता नांदत असल्यामुळें ही नसती उठाठेव सरकारनें कशाला करावी असा आक्षेप निघालाच; पण शिवाय या कलमांतील अप्रीति हा शब्द अतीशय व्यापक आहे अशीहि तक्रार कायदेकौन्सि-

लांत करण्यांत आली. पण सरकारतर्फे फिटस् जेम्स स्टीफन यांनी असा आश्वासनपर खुलासा केला कीं, शांततेच्या काळांत हें कलम आम्ही पिनल कोडांत घालीत असलों तरी त्याचा उपयोग केव्हां करणार हीच गोष्ट खऱ्या महत्त्वाची आहे; व त्या विषयीं आम्ही असें नक्की सांगतों कीं देशांतील शांतता आतां नष्ट होणार अशी आपत्ती उत्पन्न होईपर्यंत आम्ही या कलमाचा उपयोग करणार नाहीं. विचारस्वातंत्र्याला आळा घालणें हा या कलमाचा उद्देश नसून बंड थांबविणें किंवा मोडणें या कामींच त्याचा उपयोग करण्याचा उद्देश आहे. बंडाच्या म्हणजे सरकारी सत्तेचा व अधिकाराचा पाया उखडून टाकण्याच्या गोष्टी जोंपर्यंत वर्तमानपत्रकार बोलत नाहीं तोंपर्यंत या कलमाची भीति बाळगण्याचें त्याला कारण नाहीं. टीका हवी तितकी कडक करूं, पण कायदा आहे तो मान्य करूं व पाळूं, अशी त्याची मनःप्रवृत्ति असली म्हणजे झालें. या खुलाशानंतर नवीन कलम बिनहरकत पास झालें.

पुढें १८७८ मध्यें वरिष्ठ कायदेकौन्सिलांत मुस्कटदाबीचा कायदा करण्यांत आला तेव्हां हाच प्रश्न फिरून निघाला, व तेव्हांहि वरील उद्देशाचाच पुरस्कार करण्यांत आला. १२४ अ हें कलम असतां केवळ वर्तमानपत्रांकरितां म्हणून वेगळा मुस्कटदाबीचा कायदा कशाला हवा असा प्रश्न कोणी विचारील असें गृहीत धरून, त्याला उत्तर म्हणून, सरकारतर्फे असें सांगण्यांत आलें कीं १२४ अ कलमाचा व वर्तमानपत्री कडक टीकेचा संबंध नाहीं व नसावा असाच उद्देश असल्यामुळें, या विशेष कामाकरितां कायद्याची योजना करणें प्राप्त आहे. याहि खुलाशाच्या दृष्टीनें पाहतां १८९७ सालीं टिळकांना १२४ अ कलम लागू केलें हें अयोग्यच ठरतें. मुस्कटदाबीचा कायदा पुढें रद्द करण्यांत आला ही गोष्ट खरी. पण १२४ अ कलम बनवितांना जो हेतु त्यांत नव्हता तो त्यामुळें त्यांत नवीन कसा येऊं शकेल? लॉर्ड लिटन यांनीं या मुद्यावर असें स्पष्ट सांगितलें कीं "लोकांमध्यें असंतोष उत्पन्न केला परंतु त्यामुळें बंड उद्भवलें नाहीं अशा स्थितींत या कलमाला जोडलेल्या अप्रीतीच्या स्पष्टीकरणावरून कोणावरहि राजद्रोह लागू करितां येणार नाहीं. वास्तव अशा खटल्यांत शिक्षा होण्याचा संभव नाहीं." वर्तमानपत्रांच्या मुस्कटदाबीचा कायदा अशा रीतीनें पास होऊन नंतर रद्द झाल्यावर, १८९१ सालीं, म्हणजे १२४ अ हें कलम पिनल कोडांत घालण्यांत आल्यावर २१ वर्षांनीं 'बंगवासी' पत्रावर राजद्रोहाचा खटला झाला. तो या कलमाखालचा पहिलाच होय. त्यांत न्यायाधीश सर कोमर पेथरॅम यांनीं या कलमाचा अर्थ मूळ मेकॉलेच्या उद्देशाला धरूनच केला होता. पण तो अर्थ अधिक व्यापक करण्याची जबाबदारी स्ट्रॅची साहेबांनीं प्रथम आपल्यावर घेतली.

टिळकांच्या खटल्यांत सरकारचा हा उद्देशभंग आणि वचनभंग, उघडकीस

आल्यामुळें १८९८ सालीं चामर्स साहेबांनीं १२४ अ कलमाची दुरुस्ती केली व खुलासा करण्याच्या मिषानें हवे ते अधिक व्यापक शब्द घालून घेतले. या व्यापक शब्दांमुळें १९०८ सालीं टिळकांना सहजच शिक्षा झाली. पुढें १९१६ सालीं होमरूललीगच्या चळवळींत याच व्यापक शब्दांच्या आधारावर हॅच साहेबांनीं टिळकांकडून जामीन घेण्याचा हुकूम केला. पण सुदैवानें हायकोर्टानें तो रद्द करून चौखूर उधळूं पाहणाऱ्या या व्यापक अर्थाला थोडासा लगाम घातला. अशा रीतीनें टिळक व राजद्रोहाचा कायदा यांची शर्यत वीस वर्षेपर्यंत सुरू होती. विद्यमान कलमांच्या मर्यादेंत राहून होईल तितकें टीकास्वातंत्र्य गाजवावयाचें अशी टिळकांची प्रवृत्ति असल्यामुळें, त्यांच्या 'राजनिष्ठे'च्या नाकाला नेहमीं जणूं काय सूत धरलेलें होतें व तिच्या नाडीवर बोट ठेऊन सरकार रात्रंदिवस बसलें होतें. मर्यादेच्या रेषेच्या आंत पाय राहिले असतां अंग बाहेर गेल्यानें गडी बारगळतो कीं नाहीं हें जसें मर्दानी खेळाच्या शास्त्रांत एक कायमचें शंकास्थान असतें, तसेंच टिळकांच्या राजनिष्ठेचें किंवा राजद्रोहाचेंहि झालें. १८९७ च्या खटल्याच्या निकालाचे एक विनोदी चित्र वैद्यबंधूंनीं तयार केलें होतें. त्यांत टिळकांची क्रिकेटची बॅट हद्दीच्या रेषेंत आहे पण सर्व शरीर बाहेर आहे अशा स्थितीमुळें 'टिळक बारगळले कीं नाहीं तें बोला' असा सवाल खेळगडी स्टॅची हे ज्यूरीरूपी अंपायरला विचारीत आहेत असें दाखविलें होतें. १८९७ सालीं अंपायरनें या प्रश्नास अस्तिपक्षीं उत्तर दिलें व १९१७ सालीं हायकोर्टानें नास्तिपक्षीं उत्तर दिलें. तरी पण जगाचा संशय कायमच राहिला; आणि टिळकच काय, पण कोणाहि राजकारणी टीकाकाराविषयीं असला प्रश्न नेहमीं निरुत्तरच राहणार. नदी आपलें पात्र आपल्या प्रवाहानुसार बनवीत असते. उन्हाळ्यांत तीराच्या पुष्कळ आंत पाणी राहतें व पावसाळ्यांत प्रसंगविशेषीं पात्राच्या रेषेबाहेरहि पाणी जातें. तथापि नदी व पात्र यांचा समव्याप्तिरूप जो नित्यसंबंध तोच खरा मानला पाहिजे. आणि शक्य तेथवर कायद्यांत राहून कायदा दिवसेंदिवस आपल्याला वाटेल तसा सैल करणें हें राजकारणांत ज्यांचें धोरण असतें त्यांचा आणि राजद्रोहाच्या कायद्याचा संबंधहि असाच राहणार हें उघड आहे.

## भाग २६ वा

# तुरुंगवास व सुटका

१८९७ सालीं तुरुंगांत होणारे कैद्यांचे हाल व हल्लीं सामान्यतः कोणत्याहि तुरुंगांत होणारे हाल यांमध्यें अनेक दृष्टीनें अंतर पडलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. निदान टिळकांनीं ९७ सालीं ज्या तुरुंगवासाचे कष्ट सोसले त्याची हल्लींच्या तुरुंगवासांत राहून यथार्थ कल्पना होणें शक्य नाहीं. प्रथम प्रथम तर टिळकांची फारच कठीण अवस्था झाली. जेलचें अन्न म्हणजे त्यावेळीं जाडी-भरडी कोरडी भाकरी व कोरडी चटणी येवढेंच असे. चटणींत कांदालसूण असल्यामुळें टिळक त्यांस शिवत नसत व भाकरीचा केवळ वरचा पापुद्रा पाण्यांत कुसकरून खात! सकाळीं व संध्याकाळीं तळहाताएवढा भाकरीचा एक तुकडा येवढ्यावर त्यांनीं दोन महिने काढले. त्यांचें वजन पचवीसतीस पौंड कमी होऊन ११० वर आलें! घोंडोपंत विध्वंस यावेळीं अपीलाचे कामाकरितां मुंबईसच होते. ते मधून मधून टिळकांस भेटत; व प्रत्येक भेटीचे वेळीं टिळक अधिकाधिक क्षीण होत चालले आहेत असेंच त्यांना आढळून येई. अशा स्थितींत टिळक तुरुंगांतून जिवंत बाहेर पडतात का तेथेंच त्यांचा अंत होतो, अशी त्यांच्या इष्ट-मित्रांस भीति पडली, व याला उपाय काय करावा याची चिंता त्यांस लागून राहिली. टिळकांचे हे हाल कमी करण्याचे सर्व मामुली राजमार्ग बंद झाले होते. न्यायकोर्टानें शिक्षा दिली म्हणून टिळकांना व्यर्थ तुरुंगवास भोगावा लागतो असें म्हणण्याची कांहींची तयारी नव्हती, व तुरुंगांतच कां होईना पण टिळकांना चांगलें अन्नवस्त्र द्यावें असें म्हटल्यास 'एवढे टिळक झाले म्हणून तुरुंगांतील शिस्त ती शिस्त, ती त्यांच्याकरितां बदलतां येत नाहीं' हें इतर कित्येकांचे उत्तर ठेवलेलेंच असे. राजकीय कैद्यांचा म्हणून वेगळा वर्ग मानावा ही तक्रार आज इतक्या वर्षांच्या चळवळीनें सिद्धीस गेली नाहीं ती तेव्हां हातांत तरी कोण धरणार! उलट कैदी जितका अधिक प्रतिष्ठित तितकी त्याला मामुली वाममार्गांनीं सुख मिळवून देण्याची चोरीच अधिक. तुरुंगखान्यांत शिस्त विशेष असते हें खरें, परंतु या शिस्तीच्या आड पुष्कळ चोरवाटा असतात हेंहि कांहीं खोटें नाहीं. पण वर दर्शविल्याप्रमाणें टिळकांना सवलती मिळण्याच्या उघड्या व चोरवाटाहि बंद झालेल्या होत्या. प्रतिष्ठित कैद्यांचें सदरच आधीं नव्हतें; त्यांतूनहि राजद्रोहाच्या गुन्ह्याला नैतिक अधःपाताचें स्वरूप देण्याचा प्रयत्न सरकारानें मुद्दाम सुरू केला होता. एरवीं टिळकांचें नांव मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो म्हणून सिनेटसभेमध्यें राहिलें होतें, तोहि मान सरकारानें जुलमानें काढून कां घ्यावा? कायदेकौन्सिल व पुणें शहर म्युनिसिपालिटी यांतील जागांचा राजिनामा टिळकांनीं शिक्षेपूर्वीच देऊन

टाकला होता. फक्त फेलोशिपचा राजिनामा द्यावयाचा राहिला होता. पण टिळकांची वाट न पाहतां सरकारानें आपल्याच हातानें तें काम उरकून घेतलें. अर्थात् अपमान करण्याच्या भावनेंत दुःख देण्याची भावना अतर्भूतच असते. आणि सुशिक्षित लोकांच्या संघांत प्रतिष्ठितपणानें राहण्यास टिळक हे नालायक असें ठरविण्यास जें सरकार तयार झालें तें त्यांच्या कांदालसुर्णांत लक्ष कोठून घालणार!

येऊन जाऊन रोज खालावत जाणारी टिळकांची प्रकृति व सुकणारें त्यांचें शरीर, हें पाहून तुरुंगांतील डॉक्टराच्या डोळ्यासच कांहीं दया आली तर यावयाची. पण तीहि संभव फारच कमी. सामान्य माणसाला शिस्त सोडून किंवा ती न सोडतां विशेष सवलत कोणी दिली तर त्याकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. पण टिळकांसारख्या—सर्वांचें लक्षवे घणाऱ्या—बड्या कैद्याला मुद्दाम सवलत दिल्याची कुणकुण निघाली तरी तिचा गवगवा व्हावयाचा. तात्पर्य राहतां राहिले तुरुंगांतील कनिष्ठ अधिकारी. टिळकांच्या बाबतींत लांचलुचपतीचा कांहीं संबंध नसतांहि या खालच्या नेटिव्ह अधिकाऱ्यांना त्यांची सहानुभूति वाटणें स्वाभाविक होतें, व अशाच लोकांकडून जर कांहीं सवलत टिळकांस दिली गेली असेल तर असेल. टिळकांना प्रथम कांहीं दिवस डोंगरीच्या तुरुंगांत ठेवलें होतें पण लवकरच तेथून त्यांना भायखळ्याच्या हौस ऑफ करेक्शनमध्यें नेण्यांत आलें. कोणी असें सांगतात कीं, टिळकांप्रमाणें तात्यासाहेब नातू हेहि ठाण्यानंतर मुंबईस भायखळ्यावरील हाऊस ऑफ करेक्शनमध्यें कैदी होते. त्यांना त्यांच्या घरचें ताट हक्कानें वाढून जात असे, आणि केव्हां केव्हां त्यांतूनच एखादा पदार्थ कोणीतरी पाहरेवाल्यांचा डोळा चुकवून टिळकांस नेऊन देई. तात्यासाहेब नातू यांना ही गुप्त गोष्ट कळल्यावर अर्थातच बरें वाटलें; तेव्हांपासून त्यांची भूक वाढली व टिळकांना आवडणारे पदार्थहि त्यांना आवडूं लागले. पण अर्थात् हा सर्व चोरटा मामला. ती क्वचित् घडून येणारी गोष्ट, व टिळकांची भूक झाली तरी मिळेल तेव्हां एखादा सात्विक पदार्थ खाईन तोंपर्यंत गप राहीन असें म्हणणारी नव्हती. या गोष्टीचें प्रत्यंतर हेंच आलें कीं, टिळकांचें वजन पुष्कळ कमी होऊन त्यांचे ओंठ काळे पडले व तोंडास कोरड पडल्यामुळें बोलतांहि येईना अशी स्थिति झाली. तेव्हां खुद्द तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनाच त्यांना येरवड्यास पाठवावें लागलें. त्यांना कदाचित् असें वाटलें असावें कीं टिळक पुण्याचे रहिवाशी तेव्हां भायखळ्यापेक्षां येरवड्याच्या हवेनेंच त्यांना कदाचित् अधिक बरें वाटेल.

इकडे वर्तमानपत्रांतून टिळकांविषयीं सहानुभूतीचा ठोका सुरूच होता. पण टिळकांच्या प्रकृतीची प्रत्यक्ष स्थिति काय हें बाहेर कळण्यास कांहींच राजमान्य मार्ग नसल्यामुळें अमूक असें आहे असें विधान कोणासच करितां येईना. आणि अशा बाबतींत मोघम लिहून काय भागणार! देशांत सर्वांहून अधिक प्रतिष्ठित अशी राष्ट्रीयसभा, तिचें अधिवेशन त्या सालीं उमरावतीस शंकरन नायर यांच्या

अध्यक्षतेखालीं भरलें होतें त्यांत टिळकांकरितां म्हणून वेगळा ठराव करण्याचा प्रयत्न फुकट गेला. खुद्द राष्ट्रीयसभेंत अगदीं खास खास वेगळा असा ठराव टिळकांबद्दल झाला असता तरी तेवढयानें लागलीच टिळकांची सुटका झाली असती अशी कोणी हमी दिली नव्हती हें खरें; पण तसा ठराव होण्याला देखील ठराविक नेमस्तांचा ठराविक नेमस्तपणा आडवा आला. टिळकांची प्रकृती नादुरुस्त असल्याची बातमी उमरावतीस राष्ट्रीयसभा भरण्याच्या वेळींच आली. लगेच दुमत जोरावलें. एक पक्ष म्हणे, टिळक आजारी म्हणून राष्ट्रीयसभेच्या ठरावाचा उपयोग होईल सबब तो करावा; दुसरा पक्ष म्हणे, टिळक आजारी आहेत, राष्ट्रीय सभेच्या ठरावामुळें त्यांच्या सुटकेच्या कार्याला हटकून व्यत्यय येईल म्हणूनच ठराव करूं नये. एकानें म्हणावें, राष्ट्रीयसभेच्या द्वारें प्रचंड बहुमत जाहीर झाल्यावर सरकारला नमलेंच पाहिजे. दुसरा म्हणे, असा निंदात्मक ठराव तरी करा, कीं लगेच पहा सरकार टिळकांच्या सुटकेविषयीं ठराव झाला असेल तरी माघार घेईल. नेमस्त म्हणूं लागले तुम्हाला येऊन जाऊन सरकारचा निषेध करण्याची आवड. पण आम्हाला व्यक्तिशः टिळकांची काळजी वाटते ! त्यांच्या सुटकेला बाध येईल असें कोणतेंहि कृत्य आम्ही करणार नाहीं ! मग सरकारचा निषेध करण्याची एक संधि फुकट गेली तरी चालेल. सर जमशेटजी जिजीभाई हे टिळकांच्या सुटकेकरितां सरकारकडे मध्यस्थी करणार अशी वदंता होती; पण टिळकांविषयीं राष्ट्रीयसभेंत ठराव आल्यास ते या कामांतून हात झाडून मोकळे होतील असाहि धाक त्यांच्यातर्फे म्हणून एकानें घातला. मिळून अशा बखेड्यांत टिळकांविषयीं ठराव होण्याचा रहित झाला.

या सभेंत नातूबंधूंपुरता मात्र वेगळा ठराव झाला; पण त्याचें कारण पूर्वीच्या भागांत सांगितल्याप्रमाणे असें होतें कीं, नातूंना उघड इन्साफ न करितां सरकारानें कैदेंत टाकलें होतें. टिळकांचा तर उघड इन्साफ झाला होता. नातूंच्या कैदेबद्दल सरकारचा निषेध करणें ठीक होतें. पण टिळकांविषयीं सहानुभूतिपर ठराव म्हणजे त्यांवर अन्याय झाला असें म्हणावें लागणार, व न्यायदेवीचें मंदिर अशा रीतीनें विटाळण्याची छाती लोकांना तेव्हां नव्हती. उमरावतीच्या स्वागतमंडळाचे अध्यक्ष दादासाहेब खापर्डे होते ही गोष्ट खरी. तथापि मुधोळकरप्रभृति वजनदार सभासदांच्या भिडेमुळें राष्ट्रीयसभेच्या मंडपांत टिळकांची तसबीर लावण्याचा ठरावहि त्यांना करवून घेतां येईना. मग सहानुभूतिपर वेगळा ठराव करणें न करणें ही गोष्ट तर सगळ्या राष्ट्रीयसभेच्याच हातीं. पण वेगळा ठराव न झाला तरी अध्यक्ष शंकरन् नायर यांनीं व बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं आपापल्या भाषणांत टिळकांविषयीं सहानुभूतिपर स्पष्ट उद्गार काढले. शंकरन् नायर हे कायदेपंडित. त्यांनीं टिळकांना हिंदी लोकांची ज्यूरी मिळाली नाहीं या मुद्यावर विशेष भर दिला, व टिळकांना राजकीय कैदी म्हणूनच इंग्लंडांत पाठविलें गेलें असतें असें प्रतिपादलें. सुरेंद्रनाथ

बानर्जी यांनीं मात्र नातूबंधूंच्या ठरावावर बोलतांना टिळकांबद्दलहि बोलून घेतलें. ते म्हणाले "टिळक हे खरोखरच निरपराधी आहेत व शरिरानें मला जरी टिळकांच्या अंधारकोठडींत आज जाऊन बसतां येत नाहीं तरी पण माझा आत्मा त्या ठिकाणींच आहे असें समजा." खरा न्याय झाला नाहीं व झालेल्या निकालांत नांव ठेवण्यास पुष्कळच जागा आहे असेंहि त्यांनीं सांगितलें. बाबू उमेशचंद्र बानर्जी यांनींहि आपल्या भाषणांत टिळकांचा उल्लेख करून असें सांगितलें कीं, स्ट्रॅचीसाहेबांचा अर्थ देशांतील एकाहि व्यक्तीस पसंत पडला नाहीं व त्यांनीं कायद्याची नासाडी करून मोठा अनर्थ केला. सुरेंद्रबाबूंच्या भाषणाचे वेळीं टिळकांचें नांव निघतांच राष्ट्रीयसभेंतील सभासद उभे राहिले, टिळकांच्या नांवाचा त्यांनीं कित्येक मिनिटेंपर्यंत जयघोष केला, व टाळ्यांच्या गजरामुळें सुरेंद्रबाबूंचा आवाजहि बुडून गेला. या वेळच्या राष्ट्रीयसभेच्या देखाव्यासारखा देखावा सभेच्या मंडपांत पूर्वी कधींहि दिसला नसेल असें हिंदुस्थानांतील अनेक वर्तमानपत्रांनीं या वेळीं लिहिलें. पण ही सर्व चर्चा व खऱ्या सहानुभूतीचे हे उद्गार यांचा उपयोग टिळकांचे तुरुंगांतील हाल कमी होण्यास फारसा झाला नाहीं.

गोपाळ कृष्ण गोखले व टिळक यांच्या जन्मपत्रिकेंतील ग्रहांचा परस्पर असा काय योग किंवा कुयोग बनत असेल कळत नाहीं, पण या दोघांचें साऱ्या जन्मभर कधींच बनलें नाहीं. येवढेंच नव्हे तर, त्यांचे उत्कर्षापकर्ष राहूकेतूप्रमाणें नेहमीं दोन विरुद्ध टोकांना एकाच वेळीं गेलेले आढळावयाचे. टिळक यावेळीं तुरुंगांत हाल काढीत असले तरी अतिशय कीर्तीला चढले होते. उलट गोखले हे या वेळीं लोकांना जितके अप्रिय झाले होते तितके ते साऱ्या जन्मांत इतर केव्हांहि झाले नसतील. गोखले १८९७ च्या उन्हाळ्यांत विलायतेस वेल्बी कमिशनपुढें साक्षीला गेले तेव्हां जितकी त्यांची वाहवा झाली तितकीच परत आल्यावर त्यांनीं सरकारची माफी मागितल्यावर त्यांची बेअब्रू झाली. पुण्यांतील रँडशाही-संबंधानें केसरी–सुधारकांतून इतकी कडक टीका येत होती कीं, त्यांच्या स्नेह्यांनीं त्यांना विलायतेस पाठविलेल्या बातम्या खऱ्या असाव्यात असें त्यांच्या मनानें सहजच घेतलें, आणि हिंदुस्थानापेक्षां विलायतेंतील वातावरण थोडें वेगळें असें समजून त्यांनीं केवळ पुणेकरांचें किंचित् समर्थन करावें या दृष्टीनेंच सोजिरांच्या अत्याचारांसंबंधाचीं विधानें मँचेस्टर गार्डियनवाल्यास सांगितलीं. येथपर्यंत सर्व ठीक होतें. पुढें हिंदुस्थानांत परत आल्यावर या विधानांचें समर्थन होत नाहीं असें पाहिल्यावर, अर्थात् त्यांना तीं परत घ्यावीं लागलीं व तीं त्यांनीं घेतलीं त्यांतहि चूक नाहीं. बेजबाबदार सामान्य मनुष्याच्या दृष्टीनें पाहतां त्यांनीं तीं विधानें परतच घ्यावयाचीं नव्हतीं. 'त्यांनीं फक्त इतकेंच म्हणावयास पाहिजे होतें कीं, मला विलायतेस असतांना चांगल्या चांगल्या लोकांकडून ज्या गोष्टी लिहून आल्या त्या

मला तेथें विश्वसनीय वाटल्या; त्या गोष्टींची सहाहजार मैलांवरून स्वतः जातीनें अधिक चौकशी करणें शक्य नसून, ती चौकशी होईपर्यंत मी थांबावें हें म्हणणेंहि गैर होय. तो प्रसंगच असा भयंकर होता कीं, ज्याला जी माहिती असेल ती त्यानें सांगितली पाहिजे. पण इकडे आल्यावर आपले आरोप शाबीत करितां न आले तरी, सामान्य रीत्या थोर थोर लोक खेदप्रदर्शनाची जी ठराविक त्रोटक भाषा वापरतात ती फार तर गोखल्यांनीं वापरावयाची होती. पण त्यांचें माफीपत्र इतकें लांबलचक, सविस्तर व नसत्या गोष्टींनीं भरलें होतें कीं, सामान्य वाचक तें वाचून हटकून म्हणत कीं, गोखल्यांनीं स्वतःच्या मनानें लिहून दिलें असतें तसलें कांहीं हें माफीपत्र नव्हे. गोखल्यांना धाक दाखवून, निदान त्यांच्या फाजील न्यायबुद्धीचा फायदा घेऊन, सरकारानें उच्चारित अनुच्चारित अशा शोल्जिरांच्या घाणेरड्या कृत्यांवर गोखल्यांच्या हातानें रंगसफेती फासून वरती सुगंधी रोगणही लावून घेतलें.' माफी तर मागावी पण जातां जातां आत्मसमर्थनाहि करावें अशी चारचौघांप्रमाणें गोखल्यांचीहि मनःप्रवृत्ति असणार, असें या लोकांनीं गृहीत धरलें; व हें घडून कां आलें नाहीं, याचें उत्तर त्यांनीं असें दिलें कीं, सरकारच्या धाकामुळें ! विधानें परत न घेतलीं तर अर्थात् सरकार दोष देणार व कदाचित् खटलाहि करणार, व परत घ्यावीं तर लोक नांवें ठेवणार. असा चिनतोड विरोध उत्पन्न झाला असतां त्यांना आमचा राग पुरवला व सरकारचा मात्र पुरवला नाहीं, हाच लोकांच्या मनांतील घुस्सा. आणि खरोखरच त्या वेळीं प्रथम अशी दाट वदंता होती कीं, प्लेगच्या कारभारांत सरकारास सर्टिफिकेट देणारी गोखल्यांची लांबलचक माफी सरकारनें सक्तीनें मागितली, मुंबई टाईम्सचे संपादक बेनेटसाहेब यांनीं ती सरकारला हवी तशी लिहून दिली, रानड्यांनीं तिला अनुमति दिली, व गोखल्यांनीं बिनतक्रार सही केली. गोखले विलायतेहून परत आले तेव्हां एकहि उतारू उतरण्याचे आधीं मुंबईचे पोलिसकमिशनर बंदरांत बोटीवर चढले व त्यांनीं गोखल्यांची, कोणी म्हणतात नुसती खाजगी भेट घेतली, कोणी म्हणतात त्यांच्या कागदपत्रांची झडती घेतली. यामुळें गोखले भीतीनें गांगरले व हवी ती माफी लिहून देण्यास कबूल झाले. तात्पर्य, लोकांच्या मनांत या वेळीं टिळक व गोखले यांच्या संबंधीं घोळत असलेले तुलनात्मक विचार एका वाक्यांत बोलून दाखवावयाचे तर ते असे कीं, गोखल्यांनीं केलेलीं विधानें शाबित करण्याच्या खटपटींत असतां, व रँडच्या खुनानंतरहि सरकारवर सडकून टीका करीत असतां, राजद्रोहाचा खटला होऊन टिळक हे धैर्यानें तुरुंगांत गेले; आणि गोखल्यांनीं खटल्याच्या भीतीनें, बोटभर माफीनें त्यांचें खरें काम भागण्यासारखें असतां, सरकारचें हित साधून देण्यासारखी माफी मागितली. लोक म्हणत गोखल्यांनींहि मनोधैर्य दाखविलें, पण लोकांना नाखुष करण्यापुरतें.

गोखल्यांवरील लोकांचा राग इतका अनावर झाला कीं, उमरावतीच्या राष्ट्रीय

सभेत ते भाषण करण्यास धजेनात, व ते धजते तरी लोकांनीं त्यांना खचित बोलूं दिलें नसतें. राष्ट्रीयसभेसारखा मेळा भरला व गोखल्यांनीं तींत तोंड उघडलें नाहीं यावरूनच लोकांच्या रागाची परीक्षा होते. नाहींतर विलायतेहून येवढी कामगिरी करून परत आल्यावर येवढ्या राजकीय पर्वणीला त्यांचा बोलवाला कोण व्हावयाचा ! ते कदाचित् उमरावतीस गेलेहि नसते. पण केवळ रानडे यांच्या आग्रहावरून गेले. हा सर्व प्रकार गोखल्यांना किती दुःखद झाला असेल याची कोणासहि कल्पना होईना. उमरावतीहून परत आल्यावर त्यांनीं आपल्या माफीचा खुलासा प्रसिद्ध केला त्यांत त्यांनीं असें लिहिलें कीं, कायद्याचे दृष्टीनें मला स्वतःला बिलकुल धोका नव्हता, पण मन खाऊं लागलें. "शारीरिक दुःखें भोगण्यापेक्षां पापउतारा करून घेण्यास खऱ्या गृहस्थाला अधिक धैर्य लागतें." पैकीं पहिलें विधान ठीक होतें. पण हें दुसरें विधान स्वतः गोखल्यांनीं करण्यापेक्षां इतरांनीं करण्यांतच अधिक स्वारस्य हें गोखले विसरले. मी भोळा आहें असें मनुष्यानें आपल्या तोंडानें म्हटलें तर शोभतें; पण मी भित्रा नाहीं हें म्हणणें खरें असलें तरी स्वतःबद्दल स्वतःला न म्हणतां येण्यासारखेंच तें असतें. तसेंच सोजिरांचें काम अवघड होतें असें म्हणून लोकांविषयीं विशेष न बोलतां सोजिरांविषयीं सहानुभूति गोखल्यांनीं दाखवावी हें कित्येकांना तेव्हां खरोखरच चीड वाटण्यासारखें झालें. आणि शेवटीं जेव्हां गव्हर्नरसाहेबांनी गोखल्यांची माफी खिशांत घालून वरती त्यांच्यावर टीका केली तेव्हां गोखल्यांवर रागावावें किंवा त्यांची कींव करावी हेंच लोकांना कळेना. असो. पण ही स्थिति अर्थातच फार दिवस टिकण्यासारखी नव्हती; व १८९९ च्या कौन्सिल निवडणुकीच्या वेळीं हें बेसुमार झुकलेलें लोकमताचें पारडें हळू हळू बदलत चाललें होतें असेंच दिसून आलें. पण तूर्त तरी लोकमताच्या सिंहासनावर टिळकांना राजपद लाभलें होतें, व टिळकांविषयीं किंचित् सहानुभूति दाखविल्याच्या आरोपावरून कनिष्ठ सरकारी नोकरांना वरिष्ठ अधिकारी " तुम्हांला टिळक राजा पाहिजे कीं किन व्हिक्टोरिया राजा पाहिजे " असा अधिक्षेपक प्रश्न विचारून बडतर्फी देत, यावरूनच हें राजपद एकप्रकारें सिद्ध होईल.

मात्र या राजपदाच्या उपभोगांत कांदाभाकरीशिवाय खावयाला पदार्थ नाहीं व कांबळ्याशिवाय निजावयाला बिछाना नाहीं, इतकीच कायती न्यूनता होती. ही न्यूनता घालविण्याचे इतर प्रयत्न व्यर्थ होते हें मागें सांगितलेंच आहे. पण दुसरा एक प्रयत्न थोडासा साधला व तो विलायतेंतील हावर्ड असोसिएशनच्या द्वारानें. सर्व जगांतील तुरुंगवासाचीं दुःखें कमी व्हावीं, विशेषतः अल्पवयस्क गुन्हेगारांना पुनः गुन्ह्याकडे प्रवृत्ति न होईल अशा तऱ्हेनें वागविण्यांत यावें, याकरितां स्थापन झालेली इंग्लंडांतील कनवाळू सद्गृहस्थांची हॉवर्ड असोसिएशन ही एक संस्था होती. या संस्थेचे सेक्रेटरी विल्यम टॅलॉक मांस मुंबईचे सेटलूर

वकील यांनीं टिळकांच्या जेलमधील परिस्थितीसंबंधीं सविस्तर पत्र पाठविलें. सेक्रेटरींनीं तें पत्र व त्यासोबत एक आपलें पत्र असें मिळून तावडतोब हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी लॉर्ड जार्ज हॅमिल्टन यांजकडे रवाना केलें. पण "सेटलूर यांचीं बरींच विधानें चुकीचीं आहेत, त्यांनीं वाटल्यास स्थानिक सरकारकडे अर्ज करावा, टिळकांना जेलच्या नियमांप्रमाणेंच वागविण्यांत येत आहे," अशा आशयाचें ठराविक दरबारी उत्तरच या पत्राला मिळालें. तथापि वरून असें उत्तर दिलें गेलें तरी नेहमींच्या सरकारी पद्धतीप्रमाणें आंतून चौकशी होऊन कळ फिरलीच.

सेटलूर यांनीं टिळकांविषयीं हकीकत लिहून हॉवर्ड सोसायटीची मदत मागितली यावेळीं टिळकांच्या जीविताविषयीं किती धोका वाटत होता हें विल्यम टॅलॉफ यांच्या ता० ३ जानेवारी १८९८ च्या, सेटलूर यांना लिहिलेल्या पुढील वाक्यांवरून दिसून येईल.

"If anything serious happens to Mr. Tilak in prison you might let me know of it with details. But I hope he will survive his detention." त्याचप्रमाणें तारिख २९ डिसबर १८९७ च्या पत्रांत ते लिहितात, "In my letter I reminded Lord G. Hamilton that if Mr. Tilak should die in jail, it would attract widespread criticism, both in this country and in India, of the Indian prison regime and that this of course would be very undesirable from the point of view especially of the Government."

टिळकांच्या या विशिष्ट उदाहरणावरून हॉवर्ड असोसिएशननें त्या वर्षी हिंदुस्थानांतील राजकीय कैद्यासंबंधीं एक सामान्य ठरावहि केला. तो या संस्थेच्या १८९८ च्या आक्टोबरमध्यें प्रसिद्ध झालेल्या अहवालांत नमूद केलेला आढळतो तो असा—

"The Committee have also invited the attention of the Indian Government and widely of the Indian Press to the following resolution adopted by their body in March last:—"The committee of the Howard Association have lately received various communications from India, referring to actual and prospective imprisonments, for real or alleged infringements of the Press-Laws of that Country. The Committee are of opinion that, in general, this class of offences ought to be regarded as being of a political rather than a criminal nature, and that the punishment should be differentiated accordingly."

हॉवर्ड असोसिएशनच्या पत्राला स्टेटसेक्रेटरींनीं प्रत्यक्ष उत्तर असें कांहीं दिलें नाहीं; पण टिळकांना कांहीं सवलती शक्य तर द्याव्या असें त्यांनीं मुंबई-सरकारास लिहून कळविलें. या सवलती द्यावयाच्या तर त्या जुन्या ठिकाणींच देण्यांत जेल अधिकाऱ्यांचा एक प्रकारें अपमान होतो म्हणून टिळकांचा तुरुंग बदलण्यांत आला, व त्याबरोबर हवापालटहि सहजच होणारा होता हें पूर्वी सांगितलेंच आहे. एक दिवस अकस्मात स्फूर्ती झाल्याप्रमाणें तुरुंगाचा डाक्टर टिळकांपुढें येऊन उभा राहिला व म्हणाला "तुम्हाला इथलें अन्न मानवत नाहीं हें मला तुम्हीं पूर्वींच कां सांगितलें नाहीं?" पण टिळकांचें तुरुंगांतील वर्तन खरोखरच अत्यंत नियमशुद्ध असे. सहसा तक्रार म्हणून करावयाची नाहीं, मग अधिकाऱ्यांशीं भांडण तर दूरच. जेलचे अधिकारी सर्व सत्ताधीश यामुळें भांडणांत शेवटीं आपणासच अपमान पावून स्वाभिमान गिळून बसावें लागणार, या जाणिवेनें टिळक मुळीं तुरुंगांतील भांडणच टाळीत. ते डॉक्टरला येवढेंच म्हणाले कीं माझ्या वजनावरून मला अन्न जातें कीं नाहीं याची कल्पना परस्परच करितां आली असती. तें सांगावयाला स्वतः मीच कशाला पाहिजे? स्टेट सेक्रेटरीच्या हुकमामुळें टिळकांचा हा खुलासा जेल डॉक्टरला एका वाक्यांत पटला, व टिळकांची पुण्यास बदली करण्याची शिफारस त्यांनीं सरकारास केली.

टिळकांना मुंबईहून हलविण्याचें दुसरें एक कारण असें होतें कीं १८९८ च्या जानेवारी फेब्रुवारी महिन्यांत मुंबईस प्लेग खूप जोरांत होता. खुद्द तुरुंगांतहि प्लेगमुळें कांहीं मृत्यु झाले. याकारणानें टिळकांना प्लेगचा आजार झाल्यास आपणावर मोठीच तोहमत येईल असें अधिकाऱ्यांस वाटलें. लोकांच्या मतें टिळकांना नाहक तुरुंगवास घडविला गेला हीच आधी मोठी चूक, व त्यातूनहि जर टिळकांना प्लेगमुळें अपमृत्यु आला असता तर त्या अपेशाला पारावरच नव्हता. तुरुंगाच्या नियमांप्रमाणें सर्व कैद्यांना प्लेगप्रतिबंधक लस टोंचून घेण्याचें अधिकाऱ्यांनीं ठरविलें तेव्हां टिळकांचें काय करावें हा प्रश्न सहजच उपस्थित झाला. या वेळीं इनॉक्युलेशन हें प्रयोगावस्थेंत असल्यामुळें स्वतः टिळकांचा त्यावर विश्वास अद्यापि बसलेला नव्हता. बरें, त्यांजवर सक्ति करण्याचीहि सोय नव्हती. पण सक्ति न करावी तर शिस्त मोडते, व खुद्द डॉक्टरांच्या तरी मतें त्यांना प्लेगचा अपाय होण्याचा संभव. परंतु पूर्वी सांगितल्याप्रमाणें तुरुंगांतील नियम पाळणें हें टिळकांचें ठरलेलें असल्यामुळें, व त्यातूनहि तुम्ही लस टोंचून घेतल्यास तुमचें उदाहरण पाहून इतर कैदीहि बिनतक्रार टोंचून घेतील आणि त्यामुळें आमचें कर्तव्य सुलभ होईल असें डॉक्टराकडून त्यांना मऊपणानें सांगण्यांत आल्यावरून, त्यांनीं खुशीनें टोंचून घेतलें. टिळकांच्या या उदाहरणाचा डाक्टरांच्या अपेक्षेप्रमाणेंच परिणाम झाला. कारण जे कैदी पूर्वी 'आम्ही टोंचून घेणार नाहीं, असेना असे मरून जाऊं,' असें बेजाबता बोलत होते ते टिळकांनी टोंचून घेतलें म्हणून या उपाययोजनेस

कबूल झाले. लस टोंचल्यामुळें टिळकांना दोन दिवस बराच ज्वर आला व त्यांचें वजन एकदम तीन पौंड कमी झालें. हें पाहून तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनाहि त्यांची रवानगी पुण्यास, म्हणजे जेथें प्लेग नाहीं अशा तुरुंगांत, करावी असें वाटूं लागलें.

फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यांत टिळकांना कोणास नकळत भायखळ्याहून हालवून येरवड्यास नेण्यांत आलें. या हालचालीची बातमी इतकी गुप्त राखण्यांत आली होती कीं या कामावरील पोलीस अधिकारी व बोरीबंदरचे स्टेशनमास्तर यांशिवाय तिसऱ्याच्या कानाला ही वर्दी नव्हती. एक वेगळा फर्स्टक्लास सलूनचा डबा टिळकांकरितां राखून ठेवण्यांत आला होता. त्यांत त्यांना बसवितांच सर्व दारें लावून घेण्यांत आलीं. पण कल्याणास त्यावेळीं प्लेगडॉक्टरची तपासणी असल्यामुळें डब्याचीं दारें उघडावीं लागलीं. टिळकांचें नांव उघड सांगतां येईना व लपवितांहि येईना. गोऱ्या डाक्टराला कदाचित् टिळकांचा चेहरा माहीत नसावा. पण कैद्याचा पोषाक घालून फर्स्टक्लासचा सगळा डबा एकट्यानें अड-वून बसणारा हा येवढा मातबर कैदी कोण असेल याची कल्पना करण्यास त्याला फारसा उशीर लागला नाहीं. आणि एकदां डब्याचीं दारें खिडक्या उघडल्या जाऊन प्लॅटफार्मवरील इतर लोकांना टिळक दिसल्यावर कोणी ओळखल्यासेरीज कसें राहणार? यामुळें एका क्षणांत 'टिळक टिळक' असें सर्वांच्या तोंडीं होऊन डब्याच्या भोवतीं पुष्कळच गर्दी जमली. तों इतक्यांत गाडी चालूहि झाली!

पण येरवड्यास आल्याबरोबर प्रकृतींत जरूर ती सर्व सुधारणा झाली असें मात्र नाहीं. ती हळू हळूच होत गेली. कांहीं दिवसांनीं टिळकांना थोडें दूध व भात देण्यांत येऊं लागला, आणि जेलखान्यांतच पण इस्पितळांतील रोग्याच्या जागेवर त्यांना बढती मिळाली तेव्हां मग, मागें दर्शविल्याप्रमाणें, इस्पितळांतील नेटिव असिस्टंट लोक आणि शिपाईचपरासी त्यांना सहानुभूतीनें शक्य त्या सवलती दाखवूं लागले. या गोष्टीचें सर्वांत मोठें निदर्शक असें कीं, टिळकांना अत्यंत आवडणारा असा जो पदार्थ म्हणजे सुपारी ती त्यांना बाजूला वळून तोंडांत टाकण्यास एखादे वेळीं मिळूं लागली. दुसरें असें कीं त्यांना येरवड्यास प्रथम कांहीं दिवस मुळींच काम न देतां, पुढें दिलें गेलें तें तेथील रंगशाळेंत रंग तयार करण्याचें. ही विद्या टिळकांना नवी असून तीहि कांहींतरी कष्टाचें काम तुरुंगांत केलेंच पाहिजे म्हणून संपादावयाची होती. पण कष्टाच्याहि कामाकामांत फरक असतो, व याच दृष्टीनें हें काम उपयुक्त व कांहींसें बुद्धि चालवितां येण्यासारखेंहि म्हणून टिळ-कांना तें बरेंच वाटलें. या कामाकरितां प्रो. गजर यांस विनंति केल्या-वरून त्यांनीं टिळकांना कांहीं पुस्तकें व फॉर्म्युलेहि पाठविले होते. हें रंगाचें काम करून करून शिकत असतां टिळकांनीं अनेक प्रकारच्या रंगाच्या कृति कागदावर उतरल्या होत्या, व ते कागद त्यांच्या सुटकेच्या वेळीं बाहेर

नेण्यास त्यांना परवानगीहि मिळाली होती. मोठ्या लोकांच्या सर्वच गोष्टींचें कौतुक होतें या न्यायानें, टिळकांनीं येरवड्यास चिताडलेल्या या कागदांत आपणाला कांहीं विशेष रंगविद्येचें ज्ञान होईल अशा बुद्धीनें कांहीं लोक ते वाचावयास मागून घेत, व कांहीं त्यांना आस्थेनें तोंडीं माहिती विचारीत. पण टिळक त्यांना हंसून सांगत कीं, 'माझ्या रंगविद्येचें ज्ञान तुरुंगांत बसून काम केलें तर फळाला येतें. मीं माहिती सांगतों, पण तिचा अनुभव घ्यावयाला तुरुंगांत जाण्याला तयार आहांत कां बोला ?'

हें रंगाचें काम करीत असतांच मुंबई गव्हर्नरांचें कौन्सिलर नामदार न्यूजंट यांना एक दिवस येरवड्याचा तुरुंग पाहण्याची इच्छा झाली. टिळकांखेरीज आणखी काय काय गोष्टी त्यांना तुरुंगांत पहावयाच्या होत्या हे माहीत नाहीं. पण टिळकांच्या काम करण्याच्या जागीं ते जेलरबरोबर नेमके आले. न्यूजंटसाहेबांस दुरून पाहतांच टिळकांनीं आपला मोर्चा थोडासा फिरवून नको त्या वस्तु आणण्याकरितां म्हणून ते जरा बाजूस गेले. पण न्यूजंटसाहेबांना टिळकांशीं भेटल्याबोलल्याशिवाय राहवेना. ठीकच आहे. एकाच कौन्सिलांत बरोबरीच्या नात्यानें बसणारे हे दोघे. एकमेकांची पक्की ओळख. तेव्हां टिळकांना भेटल्याशिवाय न्यूजंटसाहेबांस कसें राहवेल ? टिळकांपर्यंत जाऊन त्यांनीं त्यांना विचारलें कीं ' हें काम तुम्हाला कसें काय आवडतें ? ' त्यावर टिळकांनीं उत्तर दिलें कीं, ' आहे त्या स्थितींत आहे तें काम ठीकच आहे.' कोणी म्हणतात न्यूजंटसाहेब खऱ्या सहानुभूतीनें टिळकांना भेटावयास गेले. कोणी म्हणतात ते टिळकांना हिणविण्याकरितांच गेले. सामान्य लोकांना तरी हें दुसरें कारणच अधिक पटलें. पण या बाबतींत तर्क चालवित बसणं फारसें बरें नसल्यानें तो विषय सोडून देऊं.

तथापि तुरुंगांत पाय ठेवला म्हणजे कितीहि मोठा मनुष्य असला तरी त्याचा मान समूळ नष्ट होतो हें इतर रीतीनेंहि कळून येण्यासारखें होतें. टिळकांना येरवड्यास आणल्यानंतर एके दिवशीं कायद्याच्या कामकाजानिमित्त ना. दाजीसाहेब खरे व केळकर हे टिळकांची भेट घेण्याकरितां आगाऊ परवानगी मिळवून येरवड्यास गेले. यावेळीं कर्नल जॅक्सन हे जेलचे सुपरिंटेंडेंट होते. त्यांचा स्वभाव कसा होता हे वर्णन करून सांगण्याचें कारण नाहीं. खरे व केळकर दुमजल्यावर सुपरिंटेंडेंटच्या कचेरींत गेले. तेथ दोन खुर्च्या मांडलेल्या होत्या. एक स्वतः साहेबांची व दुसरी अर्थात् भेटावयास येणाऱ्या गृहस्थाकरितां ठेवलेली. व अशाच समजुतीनें खरे हे त्या खुर्चीवर बसले. इतक्यांत जॅक्सनसाहेब आले व खरे खुर्चीवर बसलेले पाहतांच ते त्यांच्या अंगावर वाघासारखे चवताळून जाऊन म्हणाले "या खुर्चीवर तुम्ही कां बसलां?" खरे म्हणाले " मी भेटावयास येणार असें कळविलें होतें तेव्हां खुर्ची मज-

करितांच ठेविली असेल असें वाटलें म्हणून." त्यावर साहेब म्हणाले "खुर्ची भेटणाराकरितां ठेविली असेल पण तुम्हाला ती घ्या व बसा असें मी सांगे-पर्यंत खुर्चीवर बसूं नये हें तुम्हांस कळावयास पाहिजे होतें." हें ऐकून खरे रागावून उठले तेव्हां साहेब म्हणाले "ठीक आहे आतां खुर्चीवर बसा" खरे रागानें म्हणाले "मला तुमच्या खुर्चीची गरज नाहीं, मी फक्त येथें कामाकरितां आलों आहें. मी वकील असल्यानं उभें राहून बोलण्याची मला कोर्टांत पुष्कळ सवय झाली आहे." अशा रीतीनें उभयपक्षीं धुसफुस होत असतांच त्या वेळचें काम संपलें. भेटीस परवानगी मिळविण्याच्या पत्रव्यवहारांत खरे हे हायकोर्ट वकील व कायदेकौन्सिलाचे सभासद ही गोष्ट जॅक्सनसाहेबांना माहीत झाली असलीच पाहिजे. असें असताहि केवळ जेल सुपरिंटेंडेंट म्हणून जॅक्सनसाहेबांनीं खऱ्यांचा कसा अपमान केला हें सांगण्याचा हेतु इतकाच कीं, तुरुंगांत वागण्याची टिळकांना देखील किती पंचाईत पडली असेल याची त्यावरून कल्पना होईल. गप बसावें तर हाल सोसावे लागतात, बोलावें तर हाल चुकतच नाहींत पण तक्रारी कैदी म्हणून अधिक हाल सोसावे लागणार !

पण कांहीं असलें तरी येरवड्यास आणल्यापासून टिळकांच्या स्नेह्यांच्या निराशेला उतार लागला यांत शंका नाहीं. त्यांच्या सुटकेचे प्रयत्न एकानें एक वाढूं लागले. सर्वांत मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे रँडच्या खुनाचा तपास पुरा होऊन दामोदर हरि चाफेकर यांजवरील खटला निकालांत निघाला. नोव्हेंबर १८९७ च्या पहिल्या आठवड्यांत पुण्यास बोनस साहेबांपुढें चाफेकरांची कच्ची चौकशी होऊन खटला नोव्हेंबर अखेर सेशनकमिट झाला, व पुढील सालच्या फेब्रुवारींत पुण्याचे सेशन जज् मि. क्रो व ज्यूरी यांच्यापुढें इन्साफ होऊन त्यांस फांशीची शिक्षा सांगण्यांत आली. चाफेकरांनीं वकील दिला नव्हता व मधून मधून साक्षीदारांची उलटतपासणी त्यांनीं स्वतःच केली. म्याजिस्ट्रेटपुढें दिलेला कबुलीजबाब त्यांनीं परत घेतला. 'मी पूर्वीं दिला तो कबुलीजबाबच नव्हे, जबाब लिहून घेणारे मॅजिस्ट्रेट होते असें मला कळविलें नाहीं, ब्रुइनसाहेबांनीं मला गोड गोड थापा दिल्या, तुम्हालाच बक्षीसाचे असे २०००० रु. देतों, बायकोला पोटगी देतों, भावाला नोकरी देतों, तुमच्या नांवानें देऊळ बांधून देतों, शिक्षा फारतर पांचचार वर्षांची होईल पण लवकरच तुम्हाला सोडवून घेऊं वगैरे थापा दिल्यामुळें मी कबुलीजबाबासारखें कांहीं तरी लिहून दिलें' वगैरे मजकूर चाफेकरांनीं सांगितला. पण अर्थात् त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ज्यूरीनें प्रथम असा निकाल दिला कीं, चाफेकरावर प्रत्यक्ष खून केल्याचा आरोप शाबीत नाहीं. पण खुनास मदत करणारा आरोपी खुनाच्या जागीं स्वतः हजर असल्यास त्यावर खुनाचाच आरोप लागू होतो असा कायदा असल्यामुळें चाफेकरास फांशीची शिक्षा देण्यांत आली. आरोपीनें त्यावर हायकोर्टाकडे अपील

अर्ज केला. त्यांत त्यानें लिहिलें कीं, मी किंवा बाळकृष्णा यांपैकीं कोणीही खून केला नाहीं. पोलिसांनीं मला छळलें व मजकडून जुलमानें काढून घेतलेल्या जबाबाच्या अनुरोधानें त्यांनीं पुरावा बनविला. पंचनामे खोटे केले. मी आजपर्यंत बंदुक किंवा पिस्तुल याला शिवलों नाहीं. मला चार महिने एकाद्या राजाप्रमाणें वागविलें व मजकडून हवें तें वदवून करवून घेतलें. मी शूर धाडसी, हत्याराचा धोकी, राजकारणांत पटाईत, वगैरे गोष्टी पोलिसांनीं उगीच बनवून फुगवून मांडल्या आहेत इत्यादि. पण या अपीलाचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं.

कोणी असें सांगतात कीं, येरवड्याच्या तुरुंगांत हल्लीं टिळकहि आहेत असें चाफेकर यांस समजल्यावरून, मला त्यांची गांठ घेऊं द्या, मी त्यांजकडून अर्ज लिहून घेणार आहें, अशी चाफेकरानीं विनंति केली व ती मान्य करण्यांत आली. चाफेकरांनीं जशी हकीकत सांगितली तसाच टिळकांनीं अर्ज लिहून दिला. फाशीची शिक्षा झालेल्या आरोपीचें म्हणणें, त्यांत कांहीं वावगें नसेल तर, अधिकाऱ्यास मान्य करावें लागतें. फाशीच्या शिक्षेविरुद्ध अर्ज लिहून घेण्यास चाफेकरानें मदत टिळकांची मागितली तरी ती त्यांना नाहीं म्हणतां येईना. पण टिळक व चाफेकर यांची गांठ पडून बोलणें चालणें काय होतें हें नकळत पहावयास मिळेल तर अधिकाऱ्यांना तें मनांतून नको असें कसें होईल ? कसेंहि असो, हा अर्ज फुकट जाऊन शेवटीं चाफेकर फांशी गेले. फाशीच्या आधीं कांहीं दिवस दामोदर चाफेकरानीं टिळकांची पुन्हा एकवार भेट मागितली व त्यांना अशी विनंति केली कीं "मी लवकरच फांशीं जाणार, तर मजजवळ अखेरपर्यंत राहण्याला तुमच्या जवळचें गीतेचें पुस्तक मला द्या. तसेंच फासावरून मला उतरल्यावर माझ्या प्रेताला भलत्या लोकांनी शिवून अग्नि देऊं नये अशी माझी इच्छा असून ती तुम्ही पुरवावी." स्वतः टिळक हेच कैदेंत असतां, म्हणजे परतंत्र स्थितींत, ते काय करूं शकते ? पण अधिकाऱ्यांच्या परवानगीनें त्यांनीं चाफेकराना आपल्याजवळचें गीतेचें पुस्तक दिलें व चाफेकरानींहि तें फासांवर चढेपर्यंत आपल्या हातांत बाळगून ठेवलें होतें. कर्मधर्मसंयोगानें धोंडोपंत विध्वंस यांची गांठ तुरुंगांत याच सुमारास पडल्यामुळें टिळकांनीं चाफेकरांची दुसरीहि विनंति अमलांत आणली. म्हणजे चाफेकराचें प्रेत मागून घेऊन तें यथाविधि दहन करावें असें टिळकांनीं विध्वंस यांस सांगितलें व अखेर त्याप्रमाणें करण्यांत आलेंहि.

दामोदर चाफेकर याचा शेवट अशा रीतीनें झाला, पण ही हकिकत येथें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, टिळकांचा संबंध या खुनाशीं कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें जडूं शकतो कीं काय हें सरकार अखेरपर्यंत पाहण्यास टपून बसलें होतें. आणि टिळक व चाफेकर या उभयतांच्या अखेरच्या भेटींतहि जेव्हां त्यांच्या हातास कांहीं लागलें नाहीं तेव्हां, बाळकृष्णा चाफेकर अद्यापि फरारी झाला होता तरी, सरकारानें या कुत्सित विचाराची दिशा सोडून दिली. याचेंच एक निदर्शक असें कीं,

मुंबई टाइम्ससारख्या पत्रांतून 'टिळकांना सरकारानें आता सोडावें व लोकांचें समाधान करावें' अशा सूचनेचीं पत्रें येऊं लागलीं. टिळक राजद्रोहाच्या खटल्यांत दोषी ठरले व त्यांना शिक्षा झाली यांत सरकारानें काय मिळवावयाचें तें मिळविलेंच. खुनाचा तपास लागून गुन्हेगारांस शिक्षा होईपर्यंत सरकारने टिळकांवर मुळीं खटलाच भरावयाचा नव्हता ! कारण खून झाला म्हणून ज्या लेखांवर फिर्याद झाली त्यांतील कांहीं खुनापूर्वी बरेच दिवस लिहिलेले होते. मुंबई टाइम्सनेहि टिळकांविषयीं आपली जुनी नजर किंचित् फिरल्याचें एका लेखांत दर्शविलें. पण त्यांतहि हातचा राखून ठेऊन फक्त असें म्हटलें होतें कीं 'एक तर टिळकांनीं आपणाकडून राजद्रोहाचा गुन्हा झाला असें कबूल करावे, व दुसरें असें कीं त्यांची तरफदारी करणाऱ्या लोकांनीं अशा चढ्या स्वरानें बोलूं नये व सुटकेची मागणी करावयाची तर ती त्यांनीं मेहरबानगी दाखल मागावी.' पण दोन्ही गोष्टी अशक्य होत्या. कारण शिक्षा वाचली असती अशाहि वेळीं मी राजद्रोहाचा गुन्हा केला नाहीं असें टिळकांनीं जोरानें प्रतिपादिले असतां, सहा महिने शिक्षा भोगून झाल्यावर ते आपले शब्द थोडेच परत घेणार ? बरें आपल्या स्नेह्यांनीं किंवा हितचिंतकांनीं आपल्याविषयीं उगाच चढ्या स्वरानें बोलूं नये असें टिळकांना वाटत असलें तरी ते तुरुंगांतून या कामीं कोणावर कशी भीड घालणार ?

पण टाइम्सचें हें बोलणें कांहींतरीच होतें. खरोखर वेगळाच प्रकार आंत शिजत होता. या वेळीं सरकारापुढें दुसऱ्या कोणी मांडलेली किंवा स्वतः सरकारास सुचलेली योजना अशी होती कीं, पूर्वीच्या विषयीं टिळकांना कोणी कांहीं म्हणूं नये, पण मुदत भरण्याच्या आधीं त्यांना सोडलें तर ते पुढें कसे वागतील येवढ्यापुरतीच सरकाराला चिंता वाटत होती. याकरितां त्यांना सोडलें तर त्यांनी यापुढें आजन्म आपण राजकारणांत पडणार नाहीं असें लिहून द्यावें व आपल्या सुटकेनिमित्त जाहीर रीतीनें होणाऱ्या सत्कारसमारंभांत भाग घेऊं नये अशा अटी सरकाराने सुचविल्या. कसेंहि असो, फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यांत विलायत सरकाराकडून टिळकांच्या बाबतींत सुटकेला अनुकूल असें कांहींतरी हिंदुस्थानसरकारास लिहून आलें होतें यांत शंका नाहीं, व त्यापुढच्या आठवड्यांत टिळक सुटणार सुटणार अशी वदंता इतकी दाट पसरली होती कीं त्यांची सुटका गृहीत धरून त्या आनंदप्रदर्शनाप्रीत्यर्थ आपण काय काय गोष्टी कराव्या याचाच तेवढा विचार करावयाचा उरल्याप्रमाणें लोकांची वागणूक दिसत होती ! खुद्द मुंबईसरकाराकडून इतकें खास जाहीर झालें होतें कीं, आजारी असलेल्या अशा कांहीं कैद्यांना लवकरच सरकार सोडणार आहे; व टिळक या व्याख्येंत सहजच पडण्यासारखे होते. यामुळें लोकांनीं इष्ट तें अनुमान काढल्यास काय नवल ? पण यांतहि खरोखर वडाची साल पिंपळाला लावली गेली होती. ज्यांची सुटका एरवीं सहा महिन्यांच्या आंत झालीच असती अशांना सोडण्याचीच वास्तविक

ही योजना होती, आणि टिळकांची शिक्षा तर अजून एक वर्ष शिल्लक होती! पण पुरी निराशा होऊन गेल्यावर मग हें लोकांना उमजलें. इकडे विलायतेंत टिळकांच्या सुटकेसंबंधाचे प्रयत्न या पूर्वी सुरू झाले होते. हॉवर्ड असोसिएशनची हकिकत मागें सांगितलीच आहे. पण तो प्रयत्न सुटकेपेक्षांहि तुरुंगांत नीट वागविण्यासंबंधाचाच अधिक होता. सुटकेचा असा प्रयत्न मॅक्समुल्लरप्रभृति विद्वानांकडून झाला. १८९८ च्या जानेवारींत मॅक्समुल्लर यांचे नजरेस कोणा एका गृहस्थानें असें आणलें कीं, टिळकांसारखा विद्वान पंडित राजद्रोहासारख्या आरोपावरून सक्तमजुरीची शिक्षा भोगीत खितपत पडावा ही गोष्ट योग्य नाहीं. विद्वानांचा परामर्श विद्वानानींच घेतला पाहिजे. पांच वर्षांपूर्वी ओरायन ग्रंथासंबंधानें टिळक व प्रो. मॅक्समुल्लर यांचा कांहीं पत्रव्यवहार झाला होता त्यावरून टिळकांविषयीं प्रो. साहेबांना माहिती होतीच. म्हणून चटोपाध्याय नामक एका बंगाली गृहस्थाची ऑक्सफर्ड येथें गांठ पडली तेव्हां, प्रो. साहेबांनीं आपल्या छापील ऋग्वेदसंहितेची एक प्रत टिळकांना तुरुंगांत पोंचविण्याकरितां म्हणून त्यांच्या स्वाधीन केली. ती प्रत त्यांनीं मुंबई येथील चँपियन पत्राचे संपादक डब्ल्यू. ए. चेंबर्स यांच्यामार्फत मुंबईसरकाराच्या परवानगीनें टिळकांना पोचती केली. चट्टोपाध्याय हे लंडन येथून या ग्रंथाबरोबर पाठविलेल्या पत्रांत (२१ जानेवारी १८९८) लिहितातः—" टिळकांना ऋग्वेदाची प्रत पाहिजे आहे असें प्रो. मॅक्समुल्लर यांनीं वर्तमानपत्रांत वाचलें व त्यांनीं होऊन मोठ्या आनंदानें ही प्रत पाठविली आहे. रा. टिळक यांजकरितां प्रो. मॅक्समुल्लर यांना अत्यंत वाईट वाटत आहे. टिळकांना सरकारनें अधिक सौम्यपणानें वागवावें अशी त्यांची फार इच्छा आहे. पण ही गोष्ट कोणत्या मार्गानें घडवून आणावी हें आपणांस समजत नाहीं असेंहि त्यांनीं मला लिहिलें आहे. ते आणखी लिहितात कीं, टिळकांच्या सुटकेविषयीं जर कोणी सरकारास अर्ज केला तर लोकांच्या प्रार्थनेस मान देण्याविषयीं सरकारचें मन वळविण्याच्या कामीं मीहि शक्य ती खटपट करीन. "

अर्जाची ही कल्पना अखेर विलायतेंतच फळाला आली. हिंदुस्थानांतहि या अर्जाला पोषक म्हणून दुसरा एखादा अर्ज इकडच्या मोठ्या लोकांच्या सहीनें परस्पर मुंबईसरकारकडे जावा अशीहि चटोपाध्याय यांनीं चेंबर्स यांना सूचना केली होती. नेमस्त लोकांना टिळकांच्या सुटकेविषयी सहानुभूति दाखवावी असें वाटत होतें यांत शंका नाहीं. तथापि, या सदिच्छेला अर्जाचें प्रत्यक्ष स्वरूप आलें होतें कीं नाहीं हें आम्हांस आठवत नाहीं. कदाचित् ही कारवाई विलायतेंतच परस्पर झाली तर ती अधिक परिणामकारक होईल असेंहि कोणास वाटलें असल्याचा संभव आहे. कसेंहि असो, विलायतेंतील हा अर्ज फेब्रुवारी महिन्यांतच स्टेट सेक्रेटरीकडे दाखल झाला. त्यावर प्रो. मॅक्समुल्लर, सर विल्यम हंटर, सर रिचर्ड गार्थ, विल्यम केन, दादाभाई नौरोजी

रमेशचंद्रदत्त वगैरे लोकांच्या सह्या होत्या. याशिवाय इकडे नांवें माहीत नसलेल्या अशाहि कांहीं बड्या लोकांनीं यावर सह्या घातल्या होत्या. टिळकांच्या सुटकेच्या विषयाला राजकारणाचें स्वरूप होईल तितकें कमी यावें या दृष्टीनें पार्लमेंटच्या सभासदांच्या सह्या नसाव्या असें प्रथम ठरत होतें, पण अखेर कांहीं सभासदांच्या सह्या झाल्याच. या अर्जांतील मुख्य कलमें अशीं होतीं:— (१) टिळक हे फारा दिवसांचे राजनिष्ट प्रजाजन असून त्यांनीं सरकारास वेळोवेळीं सल्ला मसलत व मदत दिली होती व कौन्सिलांतील त्यांची निवडणूक सरकारानें मंजूर केली होती (२) खटल्यांतील कांहीं लेख प्लेगमुळें झालेल्या लोकक्षोभाच्यावेळीं प्रसिद्ध झाले होते; व ते खरोखर राजद्रोही असते तर त्यांवर तेव्हांच खटला व्हावयास पाहिजे होता. (३) इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानांतहि सरकारावर कडक टीका केली तर ती चालते किंवा निदान चालावी अशी समजूत प्रचलित होती. राजद्रोहाला वाव मिळूं नये ही गोष्ट खरी; पण पहिलाच घाला टिळकांवर अशा जबरदस्त रीतीनें पडला हें मात्र योग्य झालें नाहीं. (४) टिळकांच्या ओरायनवरील निबंधावरून असें दिसतें कीं ते एक अत्यंत विद्वान् पंडित आहेत व हजारों वर्षांपूर्वीच्या हिंदुस्थानविषयक गोष्टींत त्यांचें मन विशेष रमत असतें. (५) तुरुंगातील सक्त मजूरीसारखीं कामें करण्याची या गृहस्थाला संवय असणें शक्य नाहीं व तेथील कडक शिस्तीमुळें त्यांचें प्रकृतीवर फारच वाईट परिणाम झालेला आहे (६) रँडसाहेबांचा खुनी सांपडला असून तो स्वयंस्फूर्त माथेफिरू असा अशिक्षित मनुष्य आहे, व केसरींतील लेखांनीं त्याला या कृत्याची प्रेरणा झालेली नाहीं. (७) टिळकांना शिक्षा झाल्यानें कायद्याची इभ्रत राखली जाऊन न्यायाचें कार्य होऊन गेलेंच आहे. १२४ अ. कलमाख लचा व स्वतः टिळकांचा हा पहिलाच अपराध असल्यामुळें, हिंदुस्थानांत राजद्रोह कोठें डोकावत असला तरी, बसली येवढी दहशत पुरे होऊन टिळकांची शिक्षा कमी केल्यानें लोकांचे मनावर दयेचा चांगलाच परिणाम होईल.

ता. २१ मार्च रोजीं टिळकांनीं प्रो. मॅक्समुल्लर यांस आभारप्रदर्शक उत्तर पाठविलें त्यांत खालील मजकूर होता. " ऋग्वेदसंहितेची चार पुस्तकें आपण मज करितां पाठविलीं तीं मला जेलच्या अधिकाऱ्यांनीं दिलीं. माझ्या सुटकेच्या अर्जावर आपण सही केली असल्याचेंहि मला समजलें. अर्जाचा निकाल कांहींहि होवो पण आपण मात्र मजवर इतके उपकार करून ठेविले कीं आपले कोणत्या शब्दांनीं आभार मानावे हें कळत नाहीं. मनुष्य मात्रावर संकटें हीं येतच असतात. मजवरचें हें संकट लवकरच निघून जाईल. पण आपण केलेल्या मदतीची आठवण मला कायमची राहील. घरीं सुद्धां मला रिकामा वेळ मिळतो तो ऋग्वेद, ब्रह्मसूत्रें, व भगवद्गीता ही वाचण्यांत मी घालवीत असतो. तसाच येथेंहि वाचण्यास आपण पाठविलेला ऋग्वेद ग्रंथ उपयोगी पडेल. अलीकडे ओरायनच्या पूर्वीच्या कालांतील वस्तुस्थिती-

विषयींचे माझे विचार मी निश्चित करीत होतों, व हल्लींच्या या स्थितींतून बाहेर पडल्यावर तें काम पुरें करण्याचा माझा विचार आहे." सुदैवानें या वेळीं तुरुंगावर सॉलोमन नांवाचे साहेब सुपरिंटेंडेंट होते. त्यांची विलायतेतील एम्. ए. ची परीक्षा झालेली असून ते विद्येचे चहाते व भोक्ते होते. खुद्द प्रोफेसर मॅक्समुल्लर यांनीं ज्याला आपल्या ऋग्वेदग्रंथाची प्रत नजर करण्यास पाठविली असा विद्वान् पंडित आपल्या ताब्यांतील कैदखान्यांत सक्त मजुरीचें काम करीत आहे या गोष्टीचें कौतुक वाटून, त्यांना टिळकांविषयीं सहानुभूति उत्पन्न झाली असल्यास नवल नाहीं. त्यांनीं लगेच टिळकांना विशेष सवलत म्हणून रात्रीं दहा वाजेपर्यंत वाचण्यास खोलींत दिवा दिला, कमी श्रमाचें म्हणून रंगाचें काम कायम केलें, व तुरुंगाच्या इस्पितळांतच जेवणखाण करण्याची त्यांना परवानगी दिली. अशी सोय झाल्यानें शरीर प्रकृतीला थोडें बरें वाटून रोज रात्रीं दहावाजेपर्यंत टिळक ऋग्वेदाचें वाचन करूं लागले. एखादे वेळीं ऋग्वेद वाचून कांहीं कल्पना मनांत यावी व ती मनांत घोळत असल्यामुळें पहाटपर्यंत झोंप लागू नये असेंहि व्हावें असें टिळक सांगत. पण हें जागरण हौसेचें असल्यामुळें त्यापासून त्रास होत नसे. दुसरीं कांहीं पुस्तकेंहि हळू हळू देण्यांत येऊं लागलीं व तीं देण्याकरितां घोंडोपंत विध्वंसहि वरचेवर येरवड्यास जाऊं लागले.

तुरुंगांत असतांनाहि बाहेर आपलीं वर्तमानपत्रें कशीं काय चाललीं आहेत याची चौकशी टिळक अर्थातच करीत. वरच्या खुशालीचा मामुली प्रश्न होतांच त्यांचा पुढचा प्रश्न वर्तमानपत्रांसंबंधाचा असे. शिक्षेनंतर हरिपंत गोखले यांनीं वर्तमानपत्रें छापण्याचें नाकारलें तेव्हां, पुढील आठवड्याच्या अंकास वेळ थोडा उरल्यामुळें, स्वतः सुचेल ती व्यवस्था करूनच विध्वंस टिळकांच्या भेटीस गेले व विठ्ठल छापखान्यांत पत्रें छापविण्याची व्यवस्था केल्याचें त्यांना एकदमच टिळकांना कळवितां आलें. पण वर्तमानपत्रें छापविण्याच्या कामीं त्यांचीच सल्लामसलत घेण्याचा प्रसंग थोड्याच दिवसांत फिरून दुर्दैवानें आला.

सोमवार ता. १४ मार्च १८९८ रोजीं दुपारीं चार वाजण्याचे सुमारास विठ्ठल छापखाना ज्यांत होता त्या फडक्यांच्या वाड्यास आग लागली. आग रात्रीं नऊ वाजेपर्यंत जोरांत होती. वाड्याचा मागील चौक व देवालय यांखेरीज सर्व इमारत जळून खाक झाली. पुढील चौकांत तळमजल्यावर शेट गोकुळदास यांचा लाकडी सामानाचा कारखाना असून त्याच्याच दुमजल्यावर विठ्ठल छापखाना होता. या दोन्ही कारखान्यांतील बहुतेक सर्व माल जळाला. गोकुळदास यांच्या कांहीं खुर्च्या वगैरे थोडें सामान बाहेर काढतां आलें. पण विठ्ठल छापखान्याचा एक टैप किंवा कागदाचा तुकडाहि आगीच्या तडाख्यांत राहिला नाहीं. आग लागली त्या वेळीं केसरीची बाहेरची म्हणजे जाहिरातीची बाजू छापून तयार होत होती व आंतील मजकुराचीं प्रुफेंहि तयार झालीं होतीं. पण सर्व छापखाना

जळाल्यानें फिरून पहिल्यापासून सर्व तयारी करावी लागली. पण या वेळीं जगद्धितेच्छु छापखाना उपयोगी पडला; व ता. १५ मार्चचा केसरीचा अंक निम्मा म्हणजे दहाकॉलमच कां होईना रातोरात काढून दुसरे दिवशीं वांटतां आला. केसरीच्या सबंद सतरा वर्षांत निम्मा निघालेला हा एकच अंक तेव्हां अपूर्व होय. पण आगीची हकीकत वाचून वाचकांना सहानुभूतीमुळें हा निम्मा अंकच सबंध अंकाहूनहि थोर वाटला.

जगद्धितेच्छु छापखान्यानें वेळेवर मदत करून बाजू सांवरली हें खरें; पण केसरी कायम छापून देण्यास मालक तयार नव्हते. घरचा आर्यभूषण छापखाना कबूल होईना, मग परक्या छापखान्याला दोष कसा द्यावा? जगद्धितेच्छूनें आणखी चारदोन आठवडे सवलत देण्याचें कबूल केलें, पण कायमची व्यवस्था म्हणून कांहींतरी करावयास पाहिजेच होती. याकरितां धोंडोपंतांनीं टिळकांची गांठ घेतली. पण आगीचें वर्णन मुंबई टाईम्स वगैरे पत्रांतून पूर्वी आलें असल्यामुळें जेलसुपरिंटेंडेंट यांच्या नजरेस ती बातमी पडली होती व त्यांनीं ती टिळकांना मुद्दाम कळविलीहि होती. धोंडोपंत दिसतांच 'आपला छापखाना तर जळाला, पुढें काय व्यवस्था करितोस' हा पहिलाच सवाल टिळकांनीं आपण होऊन केलेला पाहून धोंडोपंतांस बरेंच वाटलें. कारण तुरुंगांतल्या माणसाला भेटून नवीन संकटाची बातमी सांगणें ही गोष्ट कोणासहि विशेष अप्रियच वाटणार. पण टिळकांनीं याविषयीं पूर्वीच मनांत योजना करून ठेविली होती. आर्यभूषण छापखान्याचे एक मालक हरिपंत गोखले असले तरी दुसरे एक मालक कै. प्रो. वासुदेवराव केळकर हे होते. त्यांचा वारसा त्यांच्या मुलाकडे आला होता, व तो अज्ञान म्हणून त्याची व्यवस्था केळकरांचे मामेभाऊ व टिळकांचे स्नेही नारायणराव फाटक मुन्सफ हे पहात होते. त्यांजकडे टिळकांनीं फाटकांस पत्र देऊन "मी परत येईपर्यंत केसरी मराठा पत्रें पुन्हा छापून द्या" असें त्यांत लिहिलें. आणि फाटक यांनींहि टिळकांचें पत्र पाहतांच 'पत्रें छापून देतों काळजी करूं नका' असें टिळकांस आश्वासन देण्यास धोंडोपंतांना सांगितलें. त्याप्रमाणें केसरी फिरून ता. १९ एप्रिलपासून आर्यभूषण छापखान्यांत छापण्यास सुरवात झाली. ही हकीकत टिळकांस कळल्यावर त्यांना पुष्कळच समाधान वाटलें.

सुपरिंटेंडेंट सॉलोमन हे यापुढें लौकरच विलायतेस गेले. जातांना त्यांनीं टिळकांची मुद्दाम गांठ घेतली, व 'मी येथून कायमचा जात आहे तसे तुम्हीहि लवकरच येथून सुटून घरीं परत जाल' असें टिळकांस सांगितलें. त्यांच्या मागून वरील कर्नल जॅकसन हे सुपरिंटेंडेंट होऊन आले होते. त्यांनीं टिळकांचें जेवणखाण, काम, दिवाबत्ति, पुस्तकें वगैरेमध्यें फारशी ढवळाढवळ केली नाहीं; पण त्यांच्या मनाचा हलकेपणा किरकोळ गोष्टींतहि दिसून येत होता. याचें एक उदाहरण वर दिलेंच आहे. दुसरें उदाहरण असें कीं, टिळकांना पायांत जोडा

घालण्याची परवानगी मिळाल्यामुळें त्यांनीं नवीन जोडा मागितला व तो पाठविण्यांत आला. परंतु तो फार लालभडकच दिसतो, असला जोडा तुरुंगांत खपणार नाहीं, असें म्हणून त्यांनीं जोड्याला मुद्दाम काळा रंग देऊन तो टिळकांचे स्वाधीन केला!

टिळकांच्या सुटकेचा पहिला म्हणजे फेब्रुवारींतील प्रयत्न फुकट गेला. पण त्यांच्या शिक्षेचें पहिलें वर्ष संपण्याचें जसजसें जवळ आलें तसतसें त्यांस यश आलें. सुटका आधीं व्हावी तर टिळकांनीं अर्ज करावा ही सरकारची अट सहजच मागण्यासारखी होती, व अर्ज करून टिळकांनीं ती मागविलीहि. पण सुटकेच्या अटी काय याचा खल पुष्कळ दिवस चालला होता. टिळकांनीं अर्जांत फक्त इतकेंच लिहिलें होतें कीं, मला शिक्षा झाल्यावर पुष्कळ गोष्टी उघडकीस आल्या आहेत आणि खुनाचा व माझ्या लेखांचा कांहीं संबंध नाहीं, म्हणून मला मोकळा करा. पण साधल्यास यांत कायमचा हात साधून घ्यावा या हेतूनें राजकारणांत न पडण्याची अट सरकार घालूं पहात होतें. दुसरी अट सुटकेप्रीत्यर्थ झालेल्या सत्कारसमारंभांत भाग न घेण्याची. पण ही गोष्ट टिळकांनीं तेव्हांच मान्य केली. मी मानाकरितां हपापलेला नाहीं तेव्हां सत्कारसमारंभ सोडून देण्यांत मला कांहींच कठीण वाटत नाहीं असें ते म्हणाले. पण पहिली अट त्यांस मुळींच मान्य होण्यासारखी नव्हती, व या फरकामुळें सुटकेच्या प्रश्नाला तोंड लागेना.

या खटपटींत टिळकांतर्फे त्यांचे सल्लागार दाजीसाहेब खरे व सरकारतर्फेचे मध्यस्थ ब्रुइनसाहेब यांच्या खेपा येरवड्यास बऱ्याच झाल्या. ब्रुइनसाहेबांना येरवड्यास जाण्याचें इतर रीतीनेंहि काम पडे. पण प्रत्येक खेपेस टिळकांकडे जाऊन भेटून, पूर्वींच्या घरच्या परिपाठाप्रमाणें, त्यांच्याशीं गप्पागोष्टी मारण्याचा प्रघात ब्रुइनसाहेबांनीं ठेवला होता. कदाचित् ब्रुइनसाहेबांच्या चलाखपणावर सरकारचा विशेष भरंवसा असल्यामुळें, चाफेकराकडून जसा त्यांनीं वाटेल तो कबुलीजबाब काढून घेतला तसाच टिळकांनाहि भुरळ घालून आपल्याला हव्या त्या अटी लिहून घेण्यांत त्यांना यश मिळेल अशीहि कदाचित् सरकारला आशा वाटत असावी. पण जितके ब्रुइनसाहेब पक्के होते तितके टिळकहि पक्के होते. हे साहेब मायावी आहेत, गोड बोलतात, अघळपघळ बोलतात, साखर पेरतात, वगैरे गोष्टींचा अनुभव टिळकांना जुनाच होता. तथापि टिळकांसमोर नाटक करण्याची ब्रुइनसाहेबांची खोड गेलेली नव्हती. एकदोन वेळ ब्रुइनसाहेबांनीं अगदींच लगट केली; 'माझ्या हातीं हा कागद आहे यावर तुम्ही नुसती सही करा म्हणजे मी तुम्हांला आतां येथून असाच घेऊन जाऊन माझ्याच गाडींतून तडक घरीं पोंचवितों,' असें म्हणून पाहिलें. पण टिळकांनीं ब्रुइनसाहेबांची गाडी व स्वतःचें घर हीं दोन्ही पूर्वी पाहिलेलींच होतीं! ते असल्या झुकांडीनें फसणारे नव्हते.

अखेर सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत ही कारवाई फळाला आली. टिळकांना काय कबूल आहे व काय कबूल नाहीं याचा विचार न करतां मुंबईसरकारानें स्वतःच्या अटी घालून टिळक त्यावर सही करतील तर त्यांना सोडावें असा ठराव तर काढला. पण टिळक त्या मान्य करीत नाहींत असें नक्की कळल्यावर सरकारलाहि आपल्या ठरावाची दुरुस्ती करावी असें वाटूं लागलें. इतरहि अनेक गोष्टी घडून आल्या त्यांवरून सरकारचें मन त्यांचे त्यांना खाऊं लागलें होतें पार्लमेंटमध्यें लॉर्ड जार्ज हॅमिलटन ( हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी ) यांजवर मधूनमधून प्रश्नांची सरबत्ती होत होती, व ते जीं उत्तरें देत त्यांत सरकारच्या गुर्मीचा कांटा थोडथोडा मागें जात आहे असें दिसून येऊं लागलें होतें. स्ट्रॅचीसाहेबाच्या अर्थासंबंधानें सरकारास जी पूर्वी कधीं शंका नव्हती तीहि त्यांना आतां हळू हळू येऊं लागल्याचा भास झाला. मुंबई कायदेकौन्सिलच्या सप्टेंबरांतील बैठकींत पुण्यांतील प्लेग-व्यवस्थेवर कांहीं सभासदांनीं टीकेची पुष्कळच झोड उठविली. तिला उत्तर देतांना सरकारानं प्लेग अमदानींतील पुष्कळशा चुका प्रांजलपणें कबूल केल्या, व अखेर पुण्यावरील जादा पोलिस उठविल्याचें जाहीर केलें. ब्राम्हणी पुणें वाईट, पुणें वाईट, असें म्हणतां म्हणतां स्वतःच्या बकाली मुंबईचाच अनुभव त्यांना असा आला कीं, प्लेगचे दुःख निवारण करण्याकरितां झालें तरी अधिकाराचा जुलूम करण्याला कांहीं सीमा असलीच पाहिजे मुंबईस प्लेगच्या जुलमामुळें मोठमोठे दंगे झाले. खुद्द युरोपियन डॉक्टर व अधिकारी यांना आपल्यावर केव्हां कोण हात टाकील याचा नियम नाहीं अशी दहशत पडली. या इलाख्यांत सिन्नर वगैरे ठिकाणीं, पंजाबांत मारशंकर येथें व इतर अनेक ठिकाणीं दंगेधोपे झाल्यानें पुणें पुष्कळच बरें असें सरकारास कबूल करावें लागलें. खुनाकरितां म्हणून पुण्यावर जादा पोलिस बसविले म्हणावें तर खुनाच्या कटाचा संशय केव्हांच पार उडाला होता. मग जादा पोलिस ठेवण्याचें कारण काय? पण तें उठविलें म्हणजे मग टिळकांना तरी तुरुंगांत कां ठेवावयाचें? असा प्रश्न आपोआप उत्पन्न झालाच. त्या सालच्या मे महिन्यांत पोलिटिकल एजंट कोसाहेब यांनीं पुण्यांतील लोकांच्या चांगुलपणाचें जाहीर सर्टिफिकेट दिलें, व असेंहि सांगितलें कीं, चाफेकराचा खटला माझ्यापुढें चालू होता तेव्हां मी अगदीं लक्ष घालून बारीक नजरेनें पाहात होतों, पण कटाचा असा मागमूस मला काडयाइतकाहि दिसला नाहीं. कोसाहेबांच्या या भाषणानं पूर्वीचें लँबसाहेबांचें पुण्याची बदनामी करणारें भाषण परस्पर उडून गेलें. त्यामुळें जादा पोलिसांना नच पुण्यावर चालू ठेवणें हें तर सर्वस्वी अयोग्य असेंच ठरलें. तथापि पुढचें नुकसान न बचावलें तरी माफीच्या वाटेचें काय? व या प्रश्नाला उत्तर म्हणून 'तुमचे टिळक कैदेंतून सोडतों म्हणजे तुम्हाला हवी ती भरपाई मिळाली कीं नाहीं' असा उत्तरार्थक प्रश्न सरकारानें पुणेकरांना युक्तीनेंच विचारण्याचें ठरविलें असावें.

अखेर शनवार ता० ३ सप्टेंबर रोजीं टिळकांच्या सुटकेचा प्रयत्न नेटाला लागला. मि. ब्रुइन यांनीं मुंबईचे पोलिस कमिशनर मि. व्हिन्सेंट यांना सांकेतिक शब्दांनीं तार देऊन, दाजीसाहेब खरे यांस पाठवून द्या म्हणून सांगितलें. व्हिन्सेंट हे त्या दिवशीं खंडाळ्यास गेल्यामुळें त्यांना रविवारीं ती तार तेथें पोचली. त्याच पावलीं ते मुंबईस परत गेले व अपरात्रीं आंग्रे यांचे वाडींत जाऊन दाजीसाहेब खरे यांना निजलेले उठवून पुण्यास तातडतोब जाण्याचें वचन त्यांनी खरे यांजपासून घेतलें. सोमवारीं दाजीसाहेब दोन प्रहरीं एक वाजण्याचे सुमारास पुणें स्टेशनावर आले तों ब्रुइनसाहेबांचा मनुष्य तेथें हजर होता; त्यानें खरे यांस गांवांत येऊं न देतां तसेंच परस्पर ब्रुइनसाहेबांच्या बंगल्यावर नेलें. मग उभयतां मिळून येरवड्यास गेले. टिळकांसमक्ष सरकारी अटींची फिरून चर्चा झाली तेव्हां खरे यांनींहि आपलें मत म्हणून असें सांगितलें कीं, पुढें राजकारणांत न पडण्याची अट इतकी वाईट आहे कीं ती मान्य करण्यास मी टिळकांना कधींच सल्ला देणार नाहीं. शेवटीं टिळक व खरे यांच्या विचारें एक नवी अट अशी सुचविण्यांत आली कीं, फिरून टिळकांवर राजद्रोहाचा खटला होऊन जर गुन्हा शाबीत झाला तर हल्लीं सुटका झाल्यानें शिल्लक उरलेली सहा महिन्यांची शिक्षा टिळकांनीं तेव्हां पुरी भोगून द्यावी. ब्रुइनसाहेबांनाहि हें म्हणणें संयुक्तिक दिसलें. पण तें त्यांना आपल्या अखत्यारींत मान्य करतां येईना. म्हणून खरे व ब्रुइन दोघेहि कोणचाच निकाल तेथें न लावतां परत आले. खरे यांनीं पुणें शहरांत येऊन टिळकांचे घरचे मंडळीस दोन दिवसांत झालेली हकिकत खासगी रीतीनें सांगितली, व सोमवारीं रात्रीचे गाडीनें ते मुंबईस परत जाण्यास निघाले. तों स्टेशनावर ब्रुइनसाहेब फिरून हजरच. ते खऱ्यांना म्हणाले टिळकांच्या सुटकेविषयीं मी अद्याप निराश झालों नाहीं व यासंबंधीं तुमचेंहि काम अजून संपलें नाहीं. उद्यां मुंबईसरकारचा ठराव शक्य तर बदलून घेण्याचा प्रयत्न होणार आहे. तुम्ही परत फिरा. त्यावरून खरे गांवांत परत आले. मात्र खरे यांनीं ब्रुइनसाहेबांशीं बोलतांना परत जाण्याविषयीं एकच अट घातली होती ती अशी कीं, मुंबईसरकारचा ठराव हातीं पडण्यास संध्याकाळ झाली तरी तुरुंगाच्या नियमांची सबब न सांगतां रातोरात टिळकांस सोडलें पाहिजे. 'मला रहा म्हणतांच तर मी उद्यां टिळकांना आपल्या हातानें नेऊन घरीं पोचवूं शकेन असें तरी करा. नाहीं तर मी राहणार नाहीं.' सरकारी ठराव झाल्यावर पुढची गोष्ट सोपी होती म्हणून ब्रुइनसाहेबांनीं ती मान्य केली.

दुसरे दिवशीं ( मंगळवार ता० ६ सप्टेंबर ) गव्हर्नरच्या कौंसिलापुढें टिळकांच्या सुटकेचा प्रश्न निघून बहुतेक सर्व वेळ वाटाघाटींत गेला. अखेर रात्रीं ८ वाजतां, ठरलेल्या शर्तींप्रमाणें टिळकांच्या सुटकेचा ठराव घेऊन, ब्रुइन व खरे हे येरवड्यास गेले. तेथें नवीन अटींवर टिळकांची सही झाली, व लगेच टिळकांची सुटका होऊन ते व खरे मिळून रात्रीं १०॥ वाजण्याचे सुमारास विंचुरकरांचे

वाड्यांत पोंचले. अशा रीतीनें बरोबर ५१ आठवडे पक्की सक्तमजुरीची कैद भोगून टिळक परत घरीं आले. शिक्षा झाली ती मंगळवारीं व सुटका झाली तीहि मंगळवारीं! योगायोग कसा तो पहा! असें म्हणून पुष्कळ भोळ्या माणसांनीं मनाच्या शकुनवंतीला गंधाक्षता वाहिल्या. पण आठवड्याचा प्रत्येक वार दर साता दिवसांनीं हटकून येत असल्यामुळें, जगांत घडणाऱ्या गोष्टींपैकीं एक सप्तमांश गोष्टींना या योगायोगाचा लाभ हटकून मिळतच असतो!

हां हां म्हणतां टिळकांच्या सुटकेची बातमी पुणें शहरांतच काय पण सर्व हिंदुस्थानभर तारेनें पसरली, व दुसरे दिवशीं दोनप्रहरपासून अभिनंदनपर तारा व पत्रें येऊन पडण्यास सुरवात झाली. आपल्या गांवीं येण्याविषयींचीं कित्येक निमंत्रणेंहि त्यांतच होतीं! टिळकांनीं त्या सर्वांचे केसरीच्या द्वारें आभार मानले. कांहीं दिवस घरीं विश्रांति घेतल्याशिवाय त्यांना बाहेर पडणें शक्यच नव्हतें, तथापि टिळकांनीं वाड्यांत पाऊल ठेवल्यापासून त्यांना भेटण्यास येणाऱ्या लोकांची जी रीघ लागली ती मात्र कोणासहि थांब्वेना. त्या व दुसरे दिवशीं टिळकांना भेटण्याला दहा हजार मनुष्य गेलें असावें असा अंदाज मुंबईच्या दैनिक इंग्रजी पत्रांत दिला होता. दुसरे दिवशीं पुण्यांतील कांहीं देवळांत दीपोत्साह करण्यांत आला. सरदार खाजगीवाले यांनीं यंदांच्या गणपतिउत्सवांत आपला गणपति विसर्जन न करितां टिळकांच्या सुटकेकरितां म्हणून राखून ठेविला होता. त्याचाहि विसर्जनसमारंभ चार दिवसांनी थाटानें करण्यांत आला. पुढें क्रमाक्रमानें टिळकांच्या प्रतिपक्षांतील गोखलेप्रभृति मंडळीहि त्यांना सवडीनें येऊन भेटून गेली. टिळकांकडून त्यांच्यासंबंधीं तुरुंगांतील कांहीं माहिती किंवा त्यांच्या पुढील हालचाली व विचार यांजविषयीं माहिती मिळविण्याकरितांहि वर्तमानपत्रें वगैरेंकडून अनेक कुशल बातमीदार आले होते. पण टिळकांनीं बहुतेकांची निराशा नाइलाजानें केली. तरी पण पुष्कळांनीं कांहीं ऐकीव, कांहीं काल्पनिक, कांहीं अनधिकृत अशा बातमीच्या कोंड्यामांड्याची भाकर, वर फोडणी घालून, वाचकांस खावयास दिली होती. कित्येकांनीं ऐकीव माहितीच्या चारदोन काड्यांनून खंडोबा उभा केला होता. पण कोणतेंहि विकृत शब्द किंवा विचार आपणावर व्यर्थ लादले जावे हें बरें नाहीं, म्हणून टिळकांना केसरीद्वारा असें जाहीर करावें लागलें कीं, एका सुधारक पत्राखेरीज इतर कोठेंहि प्रसिद्ध झालेले माझे संवाद किंवा विचार कोणी खरे मानूं नयेत. टिळकांच्या सुटकेला उद्देशून हरएक प्रकारचे समारंभ अनेक ठिकाणीं झाले, पण त्या समारंभांत स्वतः टिळकांना हजर रहावयाचें नव्हतें अगर अप्रत्यक्ष रीतीनें भागहि घ्यावयाचा नव्हता. यामुळें त्यांतील कांहींचें स्वारस्य सहजच कमी झालें, व टिळक हजर राहते तर जे इतर कांहीं समारंभ झाले असते ते या कारणाकरितां मुळीं झालेच नाहींत.

टिळकांच्या सुटकेबद्दल त्यांना कित्येक परप्रांत व परदेश यांतूनहि पत्रें आलीं

होतीं. त्यांपैकीं फक्त एकदोन नमुन्यादाखल येथें देतों. ता. १३ ऑक्टोबर १८९८ रोजा बाबू रमेशचंद्र दत्त हे विलायतेहून लिहितात " तुम्ही सोसलेले कष्ट मनांत आले म्हणजे तुमच्या संबंधानें जी भावना उत्पन्न होते तिचें यथार्थ वर्णन पत्र-द्वारां मला करितां येत नाहीं. तुम्ही अखेरपर्यंत दाखविलेलें धैर्य व उदात्त असा सोशीकपणा वाखाणण्यासारखा आहे. असे गुण अंगीं असून अशीं दुःखें ज्या राष्ट्रांतील लोक सोसतात तींच उदयास येतात. तुमच्या या उदाहरणाचा सुपरिणाम आपल्या राष्ट्रावर चिरकालिक होईल याविषयीं मला तर शंका वाटत नाहीं. तुमचे श्रमसायास कधींहि व्यर्थ जाणार नाहींत. त्यांना चांगलेंच फळ येईल. तुमच्याविषयीं सर्वत्र इतकी सहानुभूति, आदरबुद्धी, व मान्यता प्रगट व्हावी हें पाहून आम्हांलाहि तुमच्याप्रमाणेंच धन्यता वाटत आहे. पण या धन्यतेपेक्षांहि तुमच्या हालअपेष्टेच्या स्मरणानें राष्ट्रकार्याला यश येणार हें मनांत आलें म्हणजे हें समाधान दुणावतें." ता. ३ नोव्हेंबर १८९८ रोजीं विल्यम केन हे विलायतेहून लिहितात ' तुमच्या मनाची धार्मिक प्रवृत्ति मला अवगत आहे, म्हणून कष्ट व दुःख हींच मनुष्याचें चारित्र्य पूर्णावस्थेस पोंचण्यास साधनीभूत होतात असें मी म्हटलं तर तें तुम्ही अमान्य करणार नाहीं. तुम्ही केलेल्या या अग्निदिव्यांतून अधिक शुद्ध व उदात्त अशा स्वरूपानेंच तुम्ही बाहेर पडत आहांत. हिंदुस्थानच्या हल्लींच्या आणीबाणीच्या स्थितीकडे पाहतां कोणीतरी मोठा माणूस सरकारच्या रागाला खर्ची पडावा हें अपरिहार्यच होतें, व तो मान तुम्हाला मिळाला याचें तुम्हांस भूषणच वाटेल. गेल्या कांहीं वर्षांचा हिंदुस्थानचा इतिहास कोणी लिहावयास बसेल तेव्हां तुमची योग्यता काय आहे हें न्यायबुद्धीनें त्याला लिहावेंच लागेल. आणि राजकीय स्वातंत्र्याच्या कार्यांत तुम्ही इतके कष्ट सोसलेत याबद्दल तुमच्या भावी पिढ्या तुमच्याविषयीं गर्व वाहतील तो यथार्थच ठरेल ! "

भाग २७ वा

# टिळक व वेदकालनिर्णय

प्रो. मॅक्समुल्लर यांनीं सही केलेल्या टिळकांच्या सुटकेविषयींच्या अर्जांत त्यांना सोडण्याचें एक कारण म्हणून असें दिलें होतें कीं, टिळकांचें खरें लक्ष वर्तमान कालापेक्षां गतकालामध्येंच अधिक गुतलेलें असतें. दिसण्यांत ही अतिशयोक्ति दिसते. कोणी असेंहि म्हणेल कीं, प्रो. मॅक्समुल्लर यांना टिळकांची खरी माहितीच नव्हती; ते एक विद्वान् पंडित आहेत इतकेंच त्यांना कारणपरत्वें माहीत झालेलें असावें; आणि टिळकांना तुरुंगांतून सोडावें अशी शिफारस विद्वान् पंडितांनीं करावयाची तर विद्वत्तेमुळें त्याना प्राप्त होणाऱ्या योग्यतेवरच अधिक भर देणें स्वाभाविक आहे, म्हणूनच हें किंचित् अतिशयोक्तिपर विधान त्यांनीं अर्जांत घातलें असावें. पण हा खुलासाहि खरा नाहीं. व्यवहारांत मनुष्य नित्य अनेक गोष्टी करीत असतो. पैकीं जेवणखाण, विश्रांति, उदरनिर्वाहाचा धंदा व सामान्य करमणूक या बाबी वगळल्या असतां, फावल्या वेळीं आपल्या आवडीचें असें कोणतें काम तो करितो याचा सूक्ष्म विचार केला असतां मनुष्यामनुष्यांत सहज फरक करितां येतो; व या विशिष्ट प्रकारच्या उद्योगाचे स्वरूपावरून याची वर्गवारी ठरवितां येते. या दृष्टीनें पाहतां टिळकांची खरी आवड व त्यांचा खरा आनंद विद्याव्यासंगांत होता हें कोणासहि कबूल करावें लागेल. "माझ्या मनाची खरी हौस पाहिली तर प्रोफेसर होऊन ग्रंथ लिहिण्याची; मी केवळ परिस्थितीच्या जुलमानें राजकारणांत पडलों व संपादक बनलों," हे उद्गार स्वतः टिळकांच्या तोंडून पुष्कळांनीं ऐकले असतील. प्रत्येक मनुष्याला कांहींतरी मनाचा छंद म्हणून असतो. इंग्रजींत याला 'हॉबी' असें नांव आहे. आणि पाश्चात्य देशांतील मोठमोठ्या लोकांचीं चरित्रें पाहिल्यास त्यांपैकीं प्रत्येकाची कांहींना कांहींतरी हॉबी होतीच असें आढळून येईल. नित्यक्रमिक कर्म वेगळें आणि मनाच्या छंदाचें कर्म वेगळें अशी दुहेरी जोडी प्रायः आढळते. म्हणून कोणी मुत्सद्दी उमदा चितारी म्हणूनहि प्रसिद्ध असतो, कोणी एखादा इंजिनियर चांगला कवि ठरतो, एखादा विद्याधिकारी उत्कृष्ट बागवान समजला जातो, एखाद्या नामांकित बॅरिस्टराची कीर्ती तो खटले जिंकतो यापेक्षां तो सिंहाची शिकार करतो याचीच अधिक असते. ग्लॅडस्टनसाहेब राजकारणांत गढलेले असतांहि फावल्यावेळीं लांकूड तोडण्याचें काम हौसेनें करीत, आणि ग्रीक इतिहास व पुराणें यांतील वादग्रस्त मुद्यांसंबंधानें ते मोठे अधिकारी समजले जात. तीच गोष्ट टिळकांची होती. प्रो. मॅक्समुल्लर यांनीं अर्जांत केलेलें विधान या दृष्टीनें अगदीं बरोबर

टिळकांनीं मॅक्समुल्लर यांस धाडलेल्या पत्रांत असें लिहिलें होतें कीं माझा फावला वेळ मी जुनी वैदिक संस्कृति व वाङ्मय यांच्या संशोधनांत घालवीत असतों. आणि हें त्यांचें विधान प्रत्यक्ष अनुभविण्याची संधि त्यांचा निकट परिचय असलेल्या पुष्कळ लोकांना पूर्वी आलेली आहे. इकडे राजकारणांत अटीतटीचा सामना चाललेला असावा, एखादें स्थानिक भांडण हातघाईवर आलेलें असावें, घरींदारीं चळवळींची दंगल चालू असावी, बाहेरच्या दालनांत हमरातुमरीचे वाद सुरू असावे, अशाहि स्थितींत एखादे वेळीं आंतल्या दालनांत टिळक आराम खुर्चीवर पडून हातांत एखादे वेद-विद्याविषयक, किंवा जुना खाल्डिया असीरिया इराण यासंबंधींचें, पुस्तक घेऊन ते वाचण्यांत इतके गढून गेलेले असावे कीं, बाहेर चाललेल्या वादावी त्यांना दादहि नसावी, किंवा कोणी त्यांना हांक मारली तरी तिकडे त्यांचें लक्षच जाऊं नये. मनुष्याचा खरा आनंद तोच कीं ज्यांत त्याचा लय लागतो किंवा क्षणमात्र तरी समाधि साधते. टिळक महामुत्सद्दी नसते तर ते महापंडित झाले असते हें म्हणणें खरें असलें तरी त्यांत स्वारस्य नाहीं, कारण महामुत्सद्दी असतांहि ते महापंडित ठरले.

टिळक फर्ग्युसन कॉलेजांत असेपर्यंत त्यांनीं आपला हा आवडता व्यासंग मधून मधून चालू ठेवला असला तरी त्याला ग्रंथाचें किंवा निबंधाचें स्वरूप कोठें आलेलें आढळत नाहीं. या अवधींत सामाजिक वाद चालू असतां स्मृतिग्रंथांचें त्यांचें ज्ञान अनेक लेखांतून प्रगट झालें होतें. पण लहानपणीं आपल्या वडिलांजवळ त्यांनीं केलेल्या भगवद्गीतेच्या व वेदविद्येच्या पाठांतराला फुटलेले अंकुर सन १८९० च्या पुढें दिसून आले. १८९० सालीं त्यांनीं वेदकालनिर्णयासंबंधानें जो एक सिद्धांत मनाशीं निश्चित केला, तोच पुढें ओरायन नामक लहानशा ग्रंथांत त्यांनीं प्रतिपादिला. १८९१ सालीं या विषयावर त्यांचें एक व्याख्यान हिराबागेंत झालें व दुसरें त्या सालच्या मे महिन्यांत डेक्कन कॉलेजांत वार्षिक संमेलन प्रसंगीं झालें. या विषयाला निबंधाचें स्वरूप देऊन त्यांनीं 'ओरायन' हें पुस्तक १८९३ सालीं लिहिलें, व त्याचा जो सारांश त्यांनीं त्या सालीं लंडन येथें भरलेल्या ओरिएंटल कांग्रेसकडे पाठविला तो त्या परिषदेच्या अहवालांत छापला गेला. पण वेद-काल-निर्णयाचा हा विषय या एका पुस्तकांतील विवेचनानेंहि संपणारा नव्हता. ज्या दिशेनें विचार चालवून प्राचीन कालाच्या मार्गानें वेदांच्या उगमस्थानाच्या यात्रेस टिळकांनीं प्रारंभ केला, त्या यात्रेंतील एक धाम किंवा मुकाम ओरायन नामक ग्रंथ हा असला तरी तेवढयानें ती यात्रा संपणारी नव्हती; व पुढें १९०३ सालीं 'आर्य लोकांचें मूलस्थान' या नांवाचा जो दुसरा ग्रंथ त्यांनीं लिहून प्रसिद्ध केला तो कालक्रमानें पुढचा किंवा अपर असला तरी मुख्य विषयाच्या दृष्टीनें तो मागचा म्हणजे पूर्व असाच ठरतो. ओरायन ( वेदकालनिर्णय ) आणि आर्टिक होम इन् दी वेदाज (उत्तर ध्रुवाजवळील आर्यांच्या वसतीविषयीं वेदांतील पुरावा)

या दोन ग्रंथांची न तुटणारी अशीच जोडी आहे, व एक ग्रंथ दुसऱ्या ग्रंथाचा पूरक होय असेंच त्यांनीं आपल्या दुसऱ्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. हे दोन ग्रंथ म्हणजे एका अर्थानें जुळीं भावंडें होत. जुळीं मुलें जन्मास आलीं तरी तीं एकदम न येतां एकामागून एक जन्मास येतात. दोहोंच्या जन्मांत थोडा तरी कालावधि जातोच. तथापि तीं वेगळीं न मानतां एकच मानण्यांत येतात. त्याप्रमाणें टिळकांच्या या दोन ग्रंथांच्या जन्मांत दहा वर्षांचें अंतर पडलें असलें तरी, एकाच कल्पनाकोशांतून तीं बाहेर पडलेलीं असल्यामुळें त्यांना जुळीं भावंडेंच म्हटलें पाहिजे. प्राय: कालक्रमानेंच लिहिलेल्या या चरित्रग्रंथांत ओरायनचा उल्लेख १८९३ च्या हकीगतींत यावयास पाहिजे होता, व दुसऱ्या ग्रंथाचा उल्लेख, तें १९०३ सालीं प्रसिद्ध झाल्यामुळें, १८९९ अखेरपर्यंत लिहिलेल्या या चरित्र खंडांत वास्तविक प्रविष्ट होण्यासारखा नाहीं. तथापि पूर्वीच्या कोणत्याहि प्रकरणांत झाली तरी आगेमागे पांचचार वर्षांची हकीगत, तें प्रकरण नीट समजावें म्हणून, एकत्र दिलेली वाचकांस आढळेल. तोच क्रम येथेंहि अनुसरला आहे. कारण दुसरें पुस्तक जरी १९०३ सालीं छापून प्रसिद्ध झालें तरी त्याची सर्व तयारी किंवा मांडणी टिळकांनीं १८९९ च्या पूर्वींच पुरी केली होती. म्हणून या दोहोंविषयींची हकीगत १८९० ते १८९९ येवढ्या संकीर्णकालांतील अशी लेखून या भागांत आम्ही दिली आहे.

वेदांच्या या उगमसंशोधन–यात्रेचा वृत्तांत टिळकांनीं दुसऱ्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत दिला आहे. ते लिहितात, "वेदकालनिर्णय करितांना युरोपियन पंडितांनीं वैदिक वाङ्मयाचे निरनिराळे खंड कल्पिले व त्यापैकीं प्रत्येकाला मनानें कांहीं एक कालावधि ठरवून दिला. पण प्रत्येक खंडाला फार थोडा काल दिल्यानें त्यांच्या मतें खिस्त शकापूर्वी वेदकाल हा फार तर अडीच हजार वर्षें जाऊं शकतो. पण ही कालगणना पद्धति फारच ढोबळ व अनिश्चित आहे; व या वाङ्मयांतील ज्योतिषशास्त्रविषयक विधानें लक्षांत घेऊन त्यांच्या अनुसंधानानें कालगणना केली तर हा काल सुमारें पांचहजार वर्षेंपर्यंत मागें ढकलतां येतो. केतकरप्रभृति ज्योतिर्विदांनीं गणितानें ही गोष्ट पूर्वी सिद्धहि केली आहे." युरोपियन पंडितांना ही गोष्ट एकदम पटण्यासारखी नव्हती; तरी पण या दुसऱ्या मार्गानेंहि हें संशोधन केल्यास कदाचित् कांहीं निराळीं अनुमानें काढतां येतील इतकी सामान्य कबूली त्यांनीं दिली होती. प्रो. ब्लूमफील्ड यांनीं वेदकाल पांचहजार वर्षांपूर्वी सहज जाऊं शकेल असें मान्य केलें होतें, व टिळकांचेंहि मत तसेंच असल्यामुळें ओरायन हें पुस्तक लिहून झाल्यानंतर पुढें दहा वर्षेंपर्यंत पूर्वीच्याच विचारसरणीनें त्यांनीं अधिक संशोधन चालविलें. त्यांत भूगर्भशास्त्र व प्राचीनवस्तुसंशोधन यांची त्यांस आणखी मदत मिळाली. आणि उत्तरध्रुवासंबंधींच्या या दुसऱ्या ग्रंथाचें हस्तलिखित त्यांनीं १८९८ अखेर लिहून तयार केलें. या दुसऱ्या

पुस्तकांत भूगर्भशास्त्राच्या विशेष मदतीनें टिळकांनीं वेदकाल ख्रिस्तशकापूर्वी कमीतकमी आठहजार वर्षांपर्यंत नेला आहे.

दुसऱ्या ग्रंथांतील मुख्य कल्पना टिळक हे ओरायन लिहित असतांच त्यांच्या मनाला स्पर्श करून गेली होती हे निश्चित आहे. पण त्या वेळीं ती कल्पना सिद्ध मानण्याला हवा तितका भरपूर मनाजोगा पुरावा त्यांना मिळालेला नव्हता. आणि पुराव्याच्या अभावीं असली धाडसी कल्पना खरी धरून चालणें हें सत्यनिष्ट चिकित्सकास योग्य नाही असें त्यांना वाटत असल्यामुळें, ती कल्पना मोहक व आनंददायक अशी भासली तरी, त्यांनीं तेव्हां तिचा स्वीकार केला नाहीं. किंबहुना त्या वेळीं शंकित अशा मनानेच त्यांनीं तिचा उल्लेख केला. 'ओरायन'च्या दुसऱ्या भागांत मनुष्यसंवत्सर हा देवांचा एक दिवस–म्हणजे सहा महिन्यांची रात्र व सहा महिन्यांचा सूर्यप्रकाश मिळून एक दिवस होतो, या वचनांचा उल्लेख करितांना स्वतः टिळकांनींच असें लिहिलें होतें कीं, असल्या वचनावरून उत्तरध्रुव हा पूर्वकालीं वसतिक्षम होता असें अनुमान काढणें धाडसाचें होईल. असें दर्शविणाऱ्या कथा पूर्वापार चालत आल्या आहेत ही गोष्ट खरी; तथापि उत्तरायण व दक्षिणायन यांजमध्यें फरक दाखविण्याची वेळ आली तेव्हां उत्तरायणाला दिवस व दक्षिणायनाला रात्र असें पूर्वपरिचित शब्दांनीं नूतन परिचित गोष्टींचें वर्णन आर्यांनीं दिलेलें असावें असें मानणेंच अधिक योग्य होईल! पण पुढें उत्तरध्रुव हा एके काळीं वसतिक्षम होता हें भूस्तरशास्त्राच्या आधारानें निर्विवाद रीतीनें सिद्ध झाल्यावर ज्या सिद्धान्ताविषयीं स्वतः टिळकांनींच पूर्वी संशय दाखविला होता, तो त्यांनीं पक्का ठरवून स्वीकारला. यावरून पहिला अविश्वास व दुसरा निश्चयबुद्धीचा स्वीकार या दोन्ही गोष्टी त्यांच्या मतांच्या प्रामाणिकपणाचीच साक्ष देतात.

आर्यांचें वैदिक वाङ्मय व त्यांतल्या त्यांत ऋग्वेद हा अखिल मानव जातींत अत्यंत प्राचीन ग्रंथ होय हें मॅक्समुल्लरादि पाश्चात्य संशोधकांच्या परिश्रमानें सर्वमान्य झालें होतें, तरी वेदांच्या नक्की काल–मर्यादेसंबंधीं पुष्कळच मतभेद व अनिश्चितता होती. भाषा व ज्योतिष हीं वेदकालनिर्णयाचीं दोन साधनें आणि त्यांमुळें पडलेल्या संशोधनाच्या दोन स्वतंत्र रीती ओरायन ग्रंथारंभींच टिळकांनीं सांगितल्या आहेत. पण यापैकीं भाषापद्धतीवरून कालनिर्णय करण्याच्या पद्धतीलाच मॅक्समुल्लर प्रो. हौ वगैरे पंडितांनीं विशेष महत्व देऊन ज्योतिष–पद्धत अनिश्चित व अविश्वसनीय ठरविलीं होतीं. त्यांचे म्हणणें असें कीं, इतक्या प्राचीन कालीं संपात अयनें इत्यादि गोष्टी वेदकालीन लोकांस यथार्थ माहीत असणें शक्य नसल्यामुळें, त्यावेळच्या वचनांवर आपल्या नवीन शास्त्रशुद्ध दृष्टीनें अर्थ बसवून काढलेलीं अनुमानें विश्वसनीय मानतां येणार नाहींत. पण याला टिळकांनीं असें उत्तर दिलें कीं, वेदकालीं सूक्ष्म गणित व पंचांग नसलें तरी फक्त जें

डोळ्याला दिसेल त्यावरूनहि त्या लोकांनीं कांहींतरी कालमापनपद्धति बसवलीच होती. स्थूलमानानें घेतलेल्या वेधांमध्यें चार–पांच अंशांची चूक मानली तरी त्यामुळें फारतर तीनशें–साडेतीनशें वर्षांनीं अंदाज चुकेल. पण जेथें हजारांनीं कालगणना करावयाची तेथें तीनशें साडेतीनशें वर्षें मागेंपुढें होणें कांहींच नाहीं. शिवाय वैदिक धर्मामध्यें यज्ञांचें महत्व विशेष असल्यामुळें त्यांतील निरनिराळ्या विधींना विशिष्ट कालाची आवश्यकता होती. यामुळें यासंबंधीं कांहीं स्पष्ट व कांहीं रूपकांच्या स्वरूपाचे असे उल्लेख वैदिक ग्रंथांतून अनेक आढळतात. असलें उत्कृष्ट कालनिर्णयाचें साधन सोडून भाषापद्धतीच्या आड मार्गांत शिरणेंच अधिक चुकीचें ! "संवत्सरः प्रजापतिः" व "प्रजापतिर्यज्ञः" या उपनिषदांतील वचनांवरून संवत्सर व यज्ञ हे वेदकालीं समानार्थ शब्द होते, व या दृष्टीनें यज्ञ-वर्णनांतील निरनिराळ्या वचनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केल्यास वेदकाला-विषयीं बरीच माहिती होऊं शकते.

आपल्या भाषापद्धतीप्रमाणें मॅक्समुल्लरसाहेबांनीं वेदकाळाचे छंदःकाल, मंत्रकाल, ब्राह्मणकाल आणि सूत्रकाल असे चार विभाग करून प्रत्येकाला २०० वर्षें कल्पिलीं. हा एकंदर ८०० वर्षांचा वेदकाल, बुद्धाच्या कालाच्या म्हणजे इ. स. पूर्वी ५०० वर्षांच्या पूर्वीचा असल्यामुळें, इ. स. पूर्वी १२०० वेदकालाची मर्यादा मॅक्समुलरसाहेबांनीं निश्चित केली. डॉ. हौ यांनीं वेदकालाच्या विभागांना २०० च्या ऐवजीं प्रत्येकीं ५०० वर्षें देऊन ही मर्यादा इ. स. पूर्वी २४०० वर्षेंपर्यंत खेचली होती ! टिळकांनीं या सर्व पद्धती सोडून देऊन एका निराळ्याच पद्धतीचा स्वीकार केला.

सूर्य नेहमीं बरोबर डोक्यावरून जात नाहीं, कधीं तो दक्षिणेकडून व कधीं उत्तरेकडून जातो, ही साधी गोष्ट सर्वांस ठाऊक आहे. सूर्य बरोबर डोक्यावरून जातो अशा वेळा वर्षांत सहा सहा महिन्याच्या अंतरानें दोन येतात. एकास म्हणजे जेथून सूर्य उत्तरेकडे जातो त्यावेळेस वसंत संपात म्हणतात व दुसरीस म्हणजे जेथून पुढें सूर्य दक्षिणेकडे वळतो तिला शरत्संपात म्हणतात. हा वसंत संपात हल्लीं रेवती नक्षत्रापासून अठरा अंश मागें आहे, म्हणजे हल्लीं वसंतसंपाताचे वेळीं सूर्य रेवती नक्षत्रापासून अठरा अंश मागें असतो. शा. श ४९६ चे वेळीं वसंत संपात रेवती नक्षत्रांत होता.

या वसंत संपाताचे वेळीं सूर्य ज्या नक्षत्रांत असतो तीं अगदीं सूक्ष्म गतीनें बदलत असतात. ही संपात चलनाची किंवा अयनचलनाची गति ज्योतिषांनीं ठरविली आहे, व तिजवरून गणित करून वसंत संपात अमूक वर्षांपूर्वी अमुक नक्षत्रांत होता असें सांगतां येतें. किंवा उलट वसंत संपात हा अमुक नक्षत्रांत आहे असा एकाद्या ग्रंथांत उल्लेख मिळाल्यास तो ग्रंथ किती वर्षांपूर्वीचा आहे हेंहि गणित करून काढतां येतें. "वेदांग ज्योतिषा"चे वेळीं हा वसंत संपात भरणी-

नक्षत्राच्या पुढें दहा अंश होता म्हणून त्याचा काल गणितानें इ. स. पूर्वी १३०० च्या सुमाराचा ठरतो. तैत्तिरीय ब्राह्मणामध्यें कृत्तिका नक्षत्रांत वसंत संपात असावा असें अनुमान काढण्यास प्रमाणें सांपडतात, यावरून त्याचा काल इ. स. पूर्वी २५०० वर्षांच्या सुमारास असावा असें ठरतें. ऋग्वेदांमध्यें हा वसंत-संपात मृगशीर्ष (आग्रहायणी किंवा (ग्रीक) ओरायन) या नक्षत्रांत असल्याबद्दलचीं प्रमाणें सांपडतात यावरून त्याचा काल इ. स. पूर्वी ४००० वर्षांचा असावा. याच्याहि पूर्वी पुनर्वसूंत वसंतसंपात असल्याची अस्पष्ट शापकें आढळतात, पण त्याचा स्पष्ट उल्लेख वैदिक वाङ्मयांत सांपडत नाहीं. यावरून ठोकळमानानें पुढील कोष्टक तयार होतें.

| | | |
|---|---|---|
| आदितिकाल | इ. स. पूर्वी ६००० पासून<br>इ. स. पूर्वी ४००० पर्यंत | वसंत संपात पुनर्वसूंतून<br>मृगशीर्षात येईपर्यंत |
| मृगशीर्ष काल | इ. स. पूर्वी ४००० पासून<br>इ. स. पूर्वी २५०० पर्यंत | वसंत संपात मृगशीर्षांतून<br>कृत्तिकेत येईपर्यंत |
| कृत्तिका काल | इ. स. पूर्वी २५०० पासून<br>इ. स. पूर्वी १४०० पर्यंत | वसंत संपात कृत्तिकेतून<br>भरणी जवळ येईपर्यंत<br>( वेदांगज्योतिषापर्यंत ) |

याप्रमाणें ऋग्वेदाचा काल इ. स. पूर्वी ४००० वर्षांचा ठरतो. म्हणजे पाश्चात्य पंडितांनीं ठरविलेल्या जास्तीत जास्ती काळापेक्षांहि तो २००० वर्षें पाठीमागें ओढावा लागतो, व यामुळें आर्य संस्कृति ही इजिप्शियन चिनी किंवा खाल्डियन संस्कृतीपेक्षांहि जुनाट ठरते.

आतां ओरायन ग्रंथांत टिळकांनीं हा आपला नवीन सिद्धांत कोणत्या पुराव्यानें व युक्तिवादानें सिद्ध केला हें येथें अर्थात् संक्षेपानेंच सांगितलें पाहिजे. म्हणून फक्त मुख्य मुद्यांचें टिपण तेवढें खालीं दिलें आहे. या ग्रंथाची याहून अधिक माहिती ज्यांना हवी असेल त्यांना मूळ इंग्रजींतील ग्रंथ अगर त्याचें मराठी भाषांतर वाचल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

" प्रथमतः वेदकालनिर्णयाचें महत्त्व व त्याच्या निरनिराळ्या पंडितांनीं स्वीकारलेल्या निरनिराळ्या पद्धति सांगितल्या आहेत. पुढें वैदिक काळच्या पंचांगाचें थोडें वर्णन देऊन यज्ञयागाचे काळ व वर्षारंभ यांचें विवेचन केलें आहे. यानंतर वसंतसंपात एकाकाळीं कृत्तिकांत होता असें दाखविणाऱ्या गोष्टी

देऊन तो काळ ठरविला आहे. यापुढें मृगशीर्षांत वसंतसंपात होता हें दाखविण्यासाठीं मृगशीर्ष नक्षत्राचें दुसरें नांव जें आग्रहायणी त्याच्या व्युत्पत्तीचा विचार करून तें एकदां पहिलें नक्षत्र होतें असें दाखविलें आहे; व त्यांतच आग्रहायणी शब्दाच्या व्युत्पत्तिवर आणखी चुकीच्या गोष्टी कशा रचल्या गेल्या हें सांगून, संपाताच्या आंदोलनाच्या कल्पनेचें एक शक्य कारण दिलें आहे. त्याच्यापुढें मृगाच्या शीर्षाविषयींच्या वेद ब्राह्मणें व पुराणें यांतील, व तशाच ग्रीक पुराणांतील गोष्टी देऊन त्यांचें निकट साम्य दाखविलें आहे. नंतर ग्रीक ओरायन व त्याचा पट्टा यांचे आपला 'प्रजापति उर्फ यज्ञ' व त्याचें यज्ञोपवीत यांशीं आणि पारशांचा होम (आपला सोम) व त्याची मेखला यांशीं साम्य दाखवून, ग्रीक ओरायन शब्द वैदिक आग्रहायण शब्दापासून निघाला असावा असें सांगितलें आहे. ( या सर्वांच्या मुळाशीं वसंतसंपात एका काळीं मृगांत होता ही कल्पना आहे.) त्यापुढें वैदिक काळच्या लोकांचें ज्योतिषविषयक ज्ञान किती होतें हें सांगून, तेव्हां वसंत संपात मृगशीर्षांत होता हें दाखविण्यास प्रत्यक्ष पुरावा म्हणून ऋग्वेदांतील एक ऋचा व एक सबंध सूक्त यांचें विवेचन केलें आहे. शेवटीं वसंतसंपात त्याहूनहि पुढें म्हणजे पुनर्वसूनक्षत्रामध्यें होता असें दाखविणारी एक गोष्ट घेऊन पुन्हां एकवार तिन्ही काळ म्हणजे कृत्तिका काळ, मृगशीर्षकाळ, व पुनर्वसूकाळ यांच्या मर्यादा सांगून हीं अनुमानें इतर गोष्टींशीं अगदीं अविरुद्ध आहेत असें दाखविलें आहे. ( के. ल. ओगलेकृत ओरायनचें मराठी भाषांतर पृष्ठ २–३ )

या नवीन सिद्धांतानें पाश्चात्य विद्वानांत बरीच खळबळ उडवून दिली. मॅक्समुल्लर साहेब यावेळीं उतारवयांत असल्यामुळें त्यांना टिळकांच्या ग्रंथांचें सविस्तर खंडन करावयाचें असतें तरी शक्य नव्हतें. इतर कित्येकांनीं ज्योतिष हें कालनिर्णयार्थ टाकाऊ साधन म्हणून त्याची वास्तपुस्तहि केली नव्हती, व तसें त्यांनीं टिळकांना लिहिलेल्या पत्रांतून कबूलहि केलें. किंबहुना या मार्गानें इतका शोध लावितां येईल याचेंच कित्येकांस आश्चर्य वाटलें। कित्येकांना टिळकांचा कोटिक्रम खोडतां येईना, पण पुष्कळ दिवस प्रमाण मानलेले स्वतःचे जुने सिद्धान्त सोडणें जड वाटूं लागले. जाकोबी साहेबांनीं मात्र यापूर्वी इतर साधनांवरून टिळकांच्या इतकाच वेदकाल मागें नेण्याचा प्रयत्न केला होता; त्यांना टिळकांचा हा अकल्पित आधार मिळालेला पाहून सानंदाश्चर्य वाटलें. तें त्यांनीं टिळकांना पत्रद्वारा व्यक्तहि केलें, व जुने दुराग्रह हळूहळू जाऊन अखेर तुमचाच सिद्धांत प्रस्थापित होईल असें आश्वासन दिलें. १८९४ च्या फेब्रुवारीच्या बाविसावे तारखेस, अमेरिकेंतील बाल्टीमोरच्या जॉन्स हॉपकिन्स युनिव्हर्सिटींमधील संस्कृतचे प्रोफेसर मॉरिस ब्लूमफील्ड पी. एच्. डी. यांनीं त्या युनिव्हर्सिटीच्या अठराव्या वार्षिक समारंभाचे वेळीं प्राच्यविद्येसंबंधीं एक व्याख्यान दिलें त्यांत ओरा-

यन पुस्तकानें त्यांच्या मनावर झालेला परिणाम त्यांनीं वर्णन केला आहे.

टिळकांचें ज्योतिषासंबंधीं परिपूर्ण ज्ञान व त्यांचा कोटिक्रम मांडण्याची पद्धति दोन्हीहि अपूर्व होतीं. त्यांची बुद्धी स्वभावतःच तर्कप्रधान असे. प्रथम पासूनच त्यांची गणितविषयांत विशेष गति होती. कॉलेजांत त्यावेळीं गणितविषयांत ज्योतिर्गणिताचाहि समावेश होता, व केरूनाना छत्र्यांसारखे विद्वान् व शोधक गुरू टिळकांना लाभले होते. पुढेंहि त्यांनीं या विषयाचा व्यासंग ठेवला होता. भारतीय ज्योतिषशास्त्रांतील महापंडित कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचा व टिळकांचा स्नेह असून त्यांचा याविषयीं नेहमीं परस्पर विचारविनिमय चाले. "ओरायन" प्रसिद्ध झालें त्यावेळीं दीक्षितांचा "भारतीय ज्योतिःशास्त्र" हा ग्रंथ प्रसिद्ध झाला नव्हता. तरी तेव्हां टिळकांनीं त्याची हस्तलिखित प्रत पाहिली होती. दीक्षितांना टिळकांचे सिद्धान्त बहुतेक मान्य होते. किरकोळ मतभिन्नता होती ती दीक्षितांनीं आपल्या पुस्तकांत एक दोन ठिकाणीं नमूद केलीच आहे.

'आर्यांचें वसतिस्थान' या पुस्तकाची कल्पना ओरायनप्रमाणें ज्योतिःशास्त्रावर अवलंबून नाहीं. तें शास्त्र स्वतः टिळकांच्या पूर्ण परिचयाचें असल्यामुळें त्यांना त्यांत स्वतंत्र विचार करितां येत होता. पण या दुसऱ्या पुस्तकाचें कामीं आधारभूत असे कांहीं सिद्धान्त भूगर्भशास्त्रावरून घेतलेले असल्यामुळें या बाबतींत टिळकांना कांहींसें परावलंबी व्हावें लागलें. या विषयावरील अनेक पुस्तकें त्यांनीं वाचलीं व टिपणें केलीं. पण त्यांवरून निष्कर्षभूत असा सिद्धान्त मांडतांना केवळ अज्ञ नसले तरी अतज्ञ म्हणून टिळकांना प्रथम आत्मविश्वास वाटेना. वास्तविक या नव्या दिवसांत प्रत्येक विषयांतील उपांगांचा अभ्यास वाढून तींहि जवळ जवळ शास्त्रेंच बनलेलीं असतात. शिवाय एका विषयाचें अध्ययन करणाऱ्याला, त्याच्या बरोबरीच्या इतर असहोदर अशाहि विषयांतून, केव्हां केव्हां माहिती समजावून घ्यावी लागते. सुदैवानें पाश्चात्य विद्यापीठांतून अनेक शास्त्रांचे पंडित एकत्र कार्य करीत असतात; यामुळें एकाला दुसऱ्याची मदत घेणें सोपें जातें. पण हिंदुस्थानांत तशी व्यवस्था नाहीं. यामुळें टिळकांना मोठी अडचण पडली. तथापि स्वतः भूगर्भशास्त्री नसतांहि केवळ या विषयावरील पुस्तकें वाचून जीं प्रमेयें त्यांनीं बनविलीं त्यांत कोणी फारशा चुका काढलेल्या नाहींत. पण त्यांच्या या ग्रंथांतील वादाचा मुख्य विषयहि तो नसून, वेदांतील कांहीं ऋचांचा जो अर्थ त्यांनीं बसविला व आर्यांचें मूल वसतिस्थान उत्तरध्रुवाजवळ होतें असें ठरविलें त्या अर्थासंबंधींच होता.

उत्तरध्रुवाजवळील प्रदेश खिस्तशकापूर्वी आठ हजार वर्षे वसति करून राहण्याला योग्य होता हें शास्त्रज्ञांनीं ठरविलें. पण तेथें कोणी लोक प्रत्यक्ष रहात होते कीं नाहीं याविषयीं स्पष्ट निर्णयाचीं साधनें जीं त्यांना भूस्तरशास्त्रांत मिळालीं नाहींत तीं ऋग्वेदांत टिळकांना आढळलीं. अर्थात् उत्तरध्रुवाजवळच्या प्रांतातील निसर्गसिद्ध देखाव्यांचें वर्णन जर ऋग्वेदांत सांपडतें, तर ऋग्वेद लिहिणारे किंवा त्यांचे पूर्वज

हे सदर देखावे दृष्टीस पडण्यासारख्या ठिकाणींच कोठें तरी रहात असावे, असें अनुमान टिळकांनीं काढलें. या कल्पनेनें आर्यांच्या मूल वसतिस्थानावर जसा प्रकाश पडला तसाच ऋग्वेदांच्या कांहीं ऋचांचा जो अर्थ पूर्वी लागत नव्हता, अथवा भाष्यकार किंवा निरुक्तकार यांनीं लाविला पण मनास पटण्यासारखा नव्हता, तो चांगला लागण्यालाहि मदत झाली. टिळक म्हणतात 'ही कल्पना माझे मनांत येऊन पुष्कळ दिवस झाले; पण भूगर्भशास्त्राची मदत मिळाल्याशिवाय मनाला ठाम वाटणारा सिद्धान्त बोलून दाखविण्याचें धैर्य होईना. इराणी वेद पंडितांनाहि ही कल्पना सुचली होती. पण हिमकाल संपून ध्रुवसंनिधप्रदेश वसतिक्षम झाला होता ही गोष्ट चाळिसपन्नास वर्षांपूर्वी शास्त्रसिद्ध ठरली नव्हती म्हणून त्यांनाहि आपली कल्पना प्रगट करण्याचें धैर्य झालें नाहीं. पाश्चात्य पंडितांना स्वकीयांनीं ठरविलेले भूगर्भशास्त्रविषयक नवे सिद्धान्त पटण्यास अभिमानाची अडचण नव्हती. पण वेदकाल हा त्याच सिद्धान्तांवरून इतका जुना ठरतो या गोष्टीबद्दल त्यांना अभिमान किंवा उत्साह कां वाटावा? टिळकांचे सिद्धान्त कांहीं पाश्चात्य पंडितांप्रमाणें हिंदुस्थानांतील पंडितांसहि मान्य झाले नाहींत; पण याचेंहि कारण अभिमान, मात्र उलटा अभिमान, इतकेंच काय तें. हिंदी आर्यांचा वेदकाल आमच्या किंवा आम्हांस माहीत असलेल्या संस्कृतीपेक्षां जुना कसा ठरेल असें पाश्चात्य पंडितांनीं म्हणावें; आणि टिळकांच्या विचारसरणीनें वेदकाल प्राचीन ठरत असला तरी आमचे आर्य लोक भरतभूमीतलेच स्वयंभू आहेत, ते काय म्हणून बाहेरून आले असतील, असें हिंदी पंडितांना वाटावें! पण तें कसेंहि असो, डॉ. वारन यांसारखे काहीं थोडे पाश्चात्य पंडित व टिळक यांनीं मिळून आर्यवंशाचा, किंवा निदान आदि मानव वंशाचा पाळणा कॉकेशस पर्वताच्या शिखरावरून उचलून उत्तरध्रुवाच्या कडीला अडकविला खरा! अजूनहि यांत वादबीजें अनेक राहिलेलीं आहेत. तथापि जुन्या संकुचित कल्पनांना टिळकांच्या या प्रमेयानें जोराचा धक्का दिला गेला यांत शंका नाहीं.

टिळकांच्या या ग्रंथाचे एकंदर तेरा भाग आहेत, पहिल्या भागांत टिळकांनीं सामान्यतः असें दर्शविलें आहे कीं, इतिहासकालाची मर्यादा शास्त्रीय शोधांपूर्वी फार अलीकडे पडत होती ती पुष्कळच मागें जाऊन, आपणास पूर्वी अर्थ कळत नव्हता म्हणून ज्या गोष्टी आपण पौराणिक किंवा काल्पनिक मानीत होतों त्या या शोधानंतर आतां ऐतिहासिक व सत्यस्वरुपाच्या सहजच वाटूं लागल्या आहेत. भौतिक शास्त्रप्रगतीमुळें गाथाशास्त्राची हानि झाली, पण उलट इतिहासशास्त्र अधिक पुष्ट झालें, मिळून खरी हानि कांहीं नाहीं. दुसऱ्या प्रकरणांत ऋतुपर्याय होण्याचें कारण समजून सांगितलेलें असून, प्राचीन व अर्वाचीन युगांत पृथ्वीच्या निरनिराळ्या भागांवरील हवेत फेरफार कसे झाले, ध्रुवप्रदेशांतहि एक वेळ हवा उष्ण कशी होती, हवा थंड थंड होत जाऊन अखेर बर्फाचा पूर आल्यानें

एखादा प्रदेश मनुष्यवस्तीला निरुपयोगी कसा होतो, पण फिरून कांहीं कालानें बर्फ वितळून तेथील हवा सौम्य व नंतर समशीतोष्ण होऊन फिरून ती कशी उष्ण होऊं लागते वगैरे गोष्टींचे वर्णन दिलें आहे. आणि इतकेंच सिद्ध केलें आहे कीं, ऋग्वेदांतील कांहीं सृष्टि–वर्णनांवरून ध्रुवसंनिध प्रदेशांत मनुष्यवसती असल्याची कल्पना कोणास सुचली व ती त्यानें स्वीकारली तर ती गोष्ट नवीन शास्त्रसंशोधनानें अशक्य ठरत नाहींच पण उलट तिचें समर्थनहि होऊं शकतें. तिसऱ्या प्रकरणांत ध्रुवप्रदेशाचें वर्णन दिलें आहे. तेथें थंड उन्हाळे व गरम हिवाळे म्हणजे अक्षय वसंतऋतु अगदीं अलीकडच्या हिमप्रलयापूर्वी होता; तेथें सूर्य दक्षिणेस उगवतो, तारका उगवत नाहींत किंवा मावळतहि नाहींत; तर वाटोळ्या फिरून चोविस तासांत एक प्रदक्षिणा करितात; सहा महिन्याचा एक अखंड दिवस व सहा महिन्याची एक अखंड रात्र मिळून वर्ष होतें; तेथें सूर्य वर्षांतून एकदांच उगवतो व एकदां मावळतो म्हणून वर्षांतून एकच खरी सकाळ व एकच खरी संध्याकाळ असते; व संध्याप्रकाशहि दोनदोन महिने टिकून फक्त पूर्वेस किंवा फक्त पश्चिमेस असा न दिसतां क्षितिजावर वाटोळ्या प्रदक्षिणा करितो; तेथें उषःकाल अतिशय रम्य असतो व कित्येक दिवसपर्यंत एकसारखा टिकतो; हें वर्णन देऊन यांपैकीं वेदांत काय सांपडतें तें पाहण्याविषयीं एकप्रकारची प्रस्तावना टिळकांनीं केली आहे. चौथ्या प्रकरणांत, ऋग्वेदामध्यें वर वर्णन केलेल्या ध्रुवविशिष्ट गोष्टींपैकीं सहा महिन्यांची रात्र व सहा महिन्यांचा दिवस सांपडतो, त्यालाच देवांची रात्र व देवांचा दिवस म्हणतात; देवयान–पितृयान यांचा संबंध संवत्सराच्या प्राचीन विभागाशींच असावा; आणि आर्यसंस्कृतीशीं समांतर असलेली इराणी संस्कृती व समकालीन इराणी वेदग्रंथ यांतच काय, पण ग्रीक, नॉर्स, जर्मन वगैरे लोकांच्या पौराणिक कथांतहि देवांची रात्र व देवांचा दिवस या कल्पना आढळतात, म्हणून त्या सार्थ व साधार असल्या पाहिजेत असें अनुमान काढलें आहे. पांचव्या प्रकरणांत वैदिक उषःकालाचें सविस्तर विवेचन केलेलें असून वेदग्रंथांतील उषावर्णनपर प्रत्यक्ष वाक्यें व ऋचा पुराव्यादाखल दिल्या आहेत. सहाव्या प्रकरणांत दीर्घ रात्र व दीर्घ दिवस यांचें वैदिक आधारांसह विवेचन असून, सातव्यांत मास आणि ऋतु यांचें विवेचन करून असें दाखविलें आहे कीं, पूर्वी केव्हां तरी वर्षमान सात महिन्याचें किंवा दहा महिन्याचें म्हणजे तुटकें मानीत; पांच ऋतूंचें वर्ष होत असे, व हीं वर्णनें म्हणजे निवळ कांहीं-तरी पौराणिक कथा अशी जी समजूत आजवर होती ती खरी नसून तें ऐतिहासिक सत्य होय, आणि हें सत्य ध्रुवसंनिध वसती करणाऱ्या लोकांच्याच अनुभवास यावयाचें अशी अनुमानांची सांखळी टिळकांनीं बांधली आहे. आठव्या प्रकरणांत दहा महिन्यांच्या वर्षाची कल्पना सिद्ध करण्याकरितां "गवाम् अयना"सारख्या सत्रसमारंभाचें परीक्षण कसें उपयोगी पडतें हें दाखविलें आहे. हें यज्ञसत्र दहा महिन्यां-

तर्हि सपत असे, रोमन लोकांत एकवेळ ३०४ दिवसांच्या वर्षाची कल्पना होती, 'गवाम्' शब्दाचा दिवस असा अर्थ कसा होतो, व दिवस कमी पडल्यानें वृत्रानें गाई चोरल्याच्या कथेसारख्या कथा कशा निर्माण होऊं शकतात, इतर अनेक सत्रांची वर्षमानावर केलेली रचना धर्माचार व ज्योतिर्गणित यांचा आर्यलोकांच्या अनुभवांतला संबंध न कळल्यानें युरोपियन पंडितांना आर्यधर्मग्रंथ समजण्यास अडचण कशी पडली व ध्रुवसंनिध दिसणाऱ्या अद्भुत चमत्कारांवरून अद्भुत पौराणिक कथा कशा बनविल्या गेल्या वगैरे गोष्टींची चर्चा केली आहे. नवव्या प्रकरणांत अनेक गूढ वैदिक कथा घेऊन, विशेषतः इंद्र व वृत्र यांच्या चिरकालिक युद्धाची कथा घेऊन ती ध्रुवसंनिध वसतीच्या उपपत्तीचें ग्रहण केल्यास सर्व सुसंगत कशी लागते हेंच मुख्यतः दाखविलें आहे. इंद्रवृत्रयुद्धाचें मूळ, ढग पाऊस वादळ अशा अंतरिक्षांतील चमत्कारांतहि नसून अखंड काळोखाची दीर्घ रात्र पडणें व त्या रात्रीनंतर दीर्घ प्रकाश येणें या देखाव्यांत आहे; व ज्या अर्थी हे देखावे फक्त उत्तरध्रुवाजवळ दिसतात त्या अर्थी या पौराणिक कथेचा जन्म ध्रुवसंनिध घेतलेल्या अनुभवांतच आहे असें टिळकांनीं दाखविलें आहे. दहाव्या प्रकरणांत हीच विचारसरणी पुढें चालवून वैदिक कथांतर्गत प्रातःकालिक देवता, विष्णूचा त्रिपादविक्रम, वेदांतील सप्तमूल दशमूल विभाग, दाशराज्ञ युद्ध, दशमुख रावण वगैरे कल्पनांचा उलगडा केला आहे. अकराव्या प्रकरणांत, इराणी वेद जो झेंडावेस्ता त्यांतील याच विचारपरंपरेस पोषक अशीं प्रमाणें दाखविलीं असून, बाराव्या प्रकरणांत तुलनात्मक गाथाशास्त्राच्या आधारें पाश्चात्य पुराणकथांचाहि वैदिक प्रमाणांना दुजोराच कसा मिळतो हें दाखविलें आहे. आणि शेवटचें म्हणजे तेरावें प्रकरण समारोपाच्या स्वरूपाचें असून, त्यांत पूर्वीच्या सर्व प्रमाणांचा एकत्र विचार करून ध्रुवाजवळील वसतिस्थानाचा काल खिस्तशकापूर्वी आठ हजार वर्षांपलीकडचा ठरतो, अशा प्राचीन कालीं ध्रुवसंनिध राहणाऱ्या आर्य लोकांची संस्कृती श्रेष्ठ व जुनी ठरते, आर्यजातीचें व आर्यधर्माचें मूळ इतक्या प्राचीन काळांत पुसलेलें असल्यामुळें त्या विषयींची अनुमानें स्थूलच कशीं असूं शकतात तरीपण वेदोत्पत्ति व वेदस्वरूप यांविषयीं आपले ऋषि व आचार्य यांनीं जीं मतें प्रदर्शित केलीं आहेत तींहि खरीं कशीं ठरतात, भूगर्भशास्त्रांतील प्रलय व प्रलयोत्तर फिरून जीवसृष्टीचा उदय या गोष्टीनीं प्रलयकालीं वेद नष्ट होऊन फिरून शब्दशः नसले तरी अर्थशः पुनर्जन्म पावणें, आणि याच कारणानें वेदांचे अनादित्व मानणें लक्षणेनें कसें सिद्ध होतें, वगैरे गोष्टी सांगितल्या आहेत.

ओरायन व आर्कटिक होम (आर्यमूलस्थान) या दोन ग्रंथांचा तुलनात्मक विचार करितांना कोणासहि असें दिसून येईल कीं, पहिला ग्रंथ अधिक निरुत्तर असला तरी दुसरा अधिक मनोरंजक व उद्बोधक आहे. पहिल्यांत अनुसरलेली विचारसरणी आमच्या इकडे सर्वस्वी नवी नसली तरी पाश्चात्यांना ती नवी असण्याचें

कारण हेंच कीं, हिंदू लोकांना ज्योतिर्गणिताचें ज्ञान विशेष असेल अशी त्यांना कल्पनाच नव्हती. दुसऱ्या ग्रंथांतील विचारसरणी पाश्चात्यांना नवी पण आमच्या इकडील लोकांना तर विशेषच नवी होती. वेदांतील कठीण शब्दांचे अर्थ शब्द-शास्त्रदृष्ट्या आपल्या इकडील भाष्यकारांपेक्षांहि अधिक बिनचूक रीतीनें पाश्चात्य पंडितांनी लावून दाखविल्याचीं अनेक उदाहरणें सांपडतात. परंतु वेदांतील शब्द आर्यांच्या मूल वसतिस्थानाचा प्रश्न सोडवून दारूविण्यासारख्या पद्धतीनें लावणें ही गोष्ट पाश्चात्य पंडितांना सहसा साधण्यासारखी नव्हती. ज्योतिर्गणित हें एक वेदांग आहे इतकें त्यांना खचित माहीत होतें, पण वैदिक कथांचा संबंध भूस्तर-शास्त्राशीं लावितां येईल ही कल्पना त्यांना नव्हती. हिंदी वैदिक पंडितांना तर ही विचारपद्धति नवी होती या विषयीं कांहींच लिहिण्याचें कारण नाहीं पहिला ग्रंथ सामान्य वाचकांस थोडासा रुक्ष वाटतो; पण दुसऱ्या ग्रंथांत प्रतिभाजन्य अशा अनेक कल्पना एकामागून एक पुढें येत असल्यामुळें, व सर्वांचे मिळून पर्यवसान एका अद्भुत प्रमेयामध्यें होत असल्यामुळें वाचकाला हा ग्रंथ, निदान चौथ्या प्रकरणापासून, एकदां हातांत घेतल्यावर पूर्ण केल्याशिवाय खालीं ठेववत नाहीं. भाषेच्या दृष्टीनें पाहतांहि पहिल्यापेक्षां दुसरा अधिक सरस वाटतो; व इंग्रज लोकांच्या दृष्टीनेंहि या ग्रंथाची भाषा विषयाला सर्वस्वीं योग्य व शुद्ध असल्याचें सर्टिफिकेट पायोनियरसारख्या पत्रानें दिल्यावर त्याविषयीं वेगळें कांहींच सांगण्याचें उरत नाहीं.

तथापि टिळकांचा या दोन्ही ग्रंथांसंबंधानें मिळून एका विशेष आक्षेपास उत्तर दिलें पाहिजे तें देऊन हें प्रकरण पुरें करूं. हा आक्षेप असा कीं टिळकांना स्वदेशाच्या अभिमानाइतकाच स्वभाषेचाहि अभिमान असला पाहिजे व होता, असें असतां त्यांनीं हे दोनहि ग्रंथ मराठींत न लिहितां इंग्रजींतच कां लिहावे ? याचें पहिलेंच उत्तर असें आहे कीं यांत भाषेच्या अभिमानाचा प्रश्नच नाहीं. कारण हे ग्रंथ इंग्रजींत लिहून इंग्रजी भाषा समृद्ध करण्याची कल्पना टिळकांच्या मनांत येणें कोणीहि अशक्यच म्हणेल. बरें आपल्या इंग्रजी भाषेचें ज्ञान लोकांस दाखवावें असाहि टिळकांचा हेतु असण्याचा संभव नाहीं. कारण लेखांत भाषा मुद्दाम प्रयत्नानें चांगली लिहिणे किंवा निवळ भाषासौष्ठवानें समाधान मानणें ही गोष्ट टिळकांना कधींहि शिवली नाहीं. विचाराकरितां भाषा, भाषेकरितां विचार नव्हत, हेंच तत्व त्यांना नेहमीं मान्य असे. वारा हा जसा सुगंधांत रमून खेळत बसत नाहीं, तर आपल्या गतीबरोबर सहज येणाराच सुगंध घेऊन पुढें जातो, त्याप्रमाणें टिळकांचा कोणताहि लेख, म्हणजे प्रबळ वायुगतीचा त्यांचा विचार घ्या, तो अलंकारादिकांत कधींहि वेळ मोडून खेळत राहिला नाहीं. भाषा ही एक अनिवार्य उपाधी म्हणूनच ती विचाराबरोबर जशी प्रगट होईल तशीच त्यांजकडून लिहिली जात असे. या दोन ग्रंथांची इंग्रजी भाषा टिळकांच्या वर्तमानपत्री लेखांच्या

इंग्रजी भाषेहून अधिक चांगली वठली याचें कारण हेंच कीं, उत्तम पोषाख व शरीर यांच्याप्रमाणें त्यांचे विचार व भाषा यांची या ग्रंथांत पूर्ण समव्याप्ति झालेली आहे. वर्तमानपत्रांत विकारवश मनानें लिहिल्याकारणानें शब्द अधिक उणे पडताल तोहि प्रकार या ग्रंथांत मुळींच नाहीं. हे ग्रंथ वाचणारास टिळकांच्या स्वभावाचें ज्ञान त्याला इतर रीतीनें नसेल तर, ते लिहिणारा गृहस्थ कधीं रागावत असेल किंवा चिडून बोलत असेल कीं नाहीं याची शंकाच त्याला येईल. तात्पर्य हे ग्रंथ लिहितांना आपण इंग्रजींत लिहितों या गोष्टीचा अभिमान टिळकांना मुळींच शिवला नाहीं, उलट परभाषेच्या या उपाधीची बेडी त्यांना ठिकठिकाणीं जाचली असेल असेंच अनुमान काढतां येतें.

हे ग्रंथ इंग्रजी भाषेत लिहिण्यामध्यें टिळकांमध्यें अभिमानाची अशी एक दृष्टी होती, पण ती व्यक्तिगत अभिमानाची नसून राष्ट्रीय अभिमानाचीच होती. आणि इंग्रजी भाषेत लिहिण्याच्या हेतूपेक्षां 'मुळीं हे ग्रंथ लिहिण्याचाच त्यांचा हेतु काय?' असा प्रश्न कोणी केल्यास, त्याच्या उत्तरांत भाषेच्या प्रश्नाचाहि उलगडा सहज होतो. तो असा. या दोन्हीं ग्रंथांतील मुख्य प्रमेय काय ? तर वेदांचें प्राचीनत्व सिद्ध करणें. पण हें प्राचीनत्व टिळकांनीं कोणत्या प्रमेयानें सिद्ध केलें? तर आठ हजार वर्षांपूर्वींहि वैदिक संस्कृतीचा उगम सांपडतो हें सिद्ध करून! वेदांचें इतकें प्राचीनत्व सिद्ध झालें तरी जुन्या संस्कृत पंडितांना सानंदाभिमान वाटेल असें त्यांत कांहीं होतें काय ? नाहीं. कारण वेद हे अपौरुषेय व अनादि मानण्याचीच आपली सनातन परंपरा असल्यामुळें, आठ हजार वर्षें हीं तुमच्या आमच्या लौकिक दृष्टीला जास्त वाटलीं तरी त्यामुळें वेद हे सादि व पौरुषेय आहेत असेंच ध्वनित होणार, म्हणून जुन्या पंडितांना या प्रमेयाचा आनंद न वाटतां विषादच वाटण्याचा अधिक संभव. एखाद्या माथेफिरू पंडितानें टिळकांच्या या प्रमेयावर असा टोला मारला असता कीं, प्रत्यक्ष ईश्वराच्या निःश्वसिताला चिकित्सकबुद्धी व कालगणना लावून टिळकांनीं समर्याद करून अवमानिलें! भरतखंडांत आर्य-वंश स्वयंभू मानणारांना टिळकांनीं त्यांचें उगमस्थान भरतभूमीबाहेर नेऊन बसविलें याचें कौतुक काय वाटणार? ही गोष्ट टिळकांच्याहि लक्षांत बहुधा असावी. म्हणूनच त्यांनीं दुसऱ्या ग्रंथाच्या शेवटच्या भागांत, जुन्या परंपरेच्या विद्वानांनीं सर्वस्वी नाखूष होऊं नये या करितां, वेदांचें समर्याद प्राचीनत्व आणि त्यांच्या अनादित्वाची कल्पना यांचा मेळ घालण्याविषयीं इतकी आंग-पलट केली असावी असें आम्हांस तरी वाटतें. पण हें आठहजार वर्षांइतकें वेद-प्राचीनत्व जर सिद्ध झालें तर त्याची छाप पाश्चात्य पंडितांवर मात्र किती पडेल याची कल्पना वाचकांनीं करावी, म्हणजे टिळकांनीं हे ग्रंथ इंग्रजींत कां लिहिले याचें स्वारस्य त्यांना कळण्यास उशीर लागणार नाहीं. विजयिष्णुता हा टिळकांच्या राष्ट्रीय भावनेतील एक मुख्य घटक होता हें विसरतां कामा नये. व या ग्रंथद्वय

प्रमेयाच्या शास्त्रानें त्यांना प्राच्य व पाश्चात्य संस्कृतींच्या युद्धांत प्राच्य संस्कृतीचा विजय करावयाचा होता. टिळकांनीं मराठींत पुष्कळ लिहिलें असतें, पण तें युरोपियन पंडित वाचणार कसे व काय म्हणून? पण हे ग्रंथ इंग्रजींत लिहिल्यामुळें युरोप व अमेरिका या दोन्ही खंडांतील पंडितांना ते प्रत्यक्ष वाचतां येऊन त्यांतील मर्म त्यांच्या हृदयांत भिनलें. मग कोणाला त्यामुळें गुदगुल्या झाल्या तर कोणाला विषाद वाटला असेल ही गोष्ट वेगळी. पूर्वीं या ग्रंथाच्या पांचव्या भागांत केसरीच्या जोडीला मराठा हें पत्र टिळकप्रभृति लोकांनीं कां काढलें याची जी मीमांसा आम्ही केली आहे, तीच सामान्यतः याहि ठिकाणीं लागू पडते इतकें सांगितलें असतां पुरें होईल. टिळकांना हे ग्रंथ इंग्रजींत लिहून इंग्रजांच्या मनांतील बहुमान किंवा आदरबुद्धी जिंकावयाची होती, पण ती स्वतःच्या बडेजावीकरितां नसून हिंदी राष्ट्राच्या बडेजावीकरितांच जिंकावयाची होती. या दोन्ही ग्रंथांचीं आतां मराठींत भाषांतरें झालेलीं असून त्यांनीं मराठी वाचकांचेंहि कार्य झालेंच आहे. पण हे ग्रंथ मूळ मराठींत लिहून मग त्यांचें इंग्रजींत भाषांतर करणें हें काम अनवश्यक असून, त्यांचा मूळ हेतु लक्षांत घेतां, कदाचित् सद्यःफलदायी झाले नसतें.

## भाग २७ वा परिशिष्ट ( १ )

### टिळकांच्या ग्रंथद्वयावरील कांहीं अभिप्राय

टिळकांच्या ओरायन ग्रंथावर युरोपियन पंडितांनीं व्यक्त केलेलीं मतें सरमिसळ असल्यामुळें, अमुक एक नक्की अनुकूल व अमूक एक नक्की प्रतिकूळ अशी वर्गवारी करितां येणें कठीण आहे. म्हणून दोन्हीं प्रकारचीं मतें कांहीं थोडी सरमिसळ अशींच खालीं देतों. **प्रो. व्हिटने** ( अमेरिका ) लिहितात " तुमचीं प्रमेयें फार महत्वाचीं व दीर्घपरिणामी आहेत; पण म्हणूनच अशीं प्रमेयें कितपत यथार्थतेनें काढतां येतील याविषयीं मनाला आत्मप्रत्यय वाटत नाहीं. ज्या काळीं हिंदुस्थानांत ग्रह कोणते हें देखील ठरविलें नव्हतें व त्यांना नांवेंहि दिलीं गेलीं नव्हतीं इतक्या जुन्या काळचे आधार तुम्हीं घेतले आहेत म्हणून मन जरा कचरते. " **ए. ओ. ह्यूम** (लाहोर) लिहितात " तुम्ही काढलेलें प्रमेय घेऊन त्याच दिशेनें पुढें विचार चालवून वैदिक काळ ठरविणें यांत कांहीं वावगें दिसत नाहीं. कदाचित् वीस पंचवीस वर्षांनीं विद्वान् पंडित प्राचीन कालमार्गानें जातांना तुम्ही रोविलेले हे मैलांचे मजलीचे दगड खुणेदाखल पत्करण्याचा फार संभव आहे. " **प्रो. ब्लूमफील्ड** ( बाल्टिमोर अमेरिका ) लिहितात, " तुमचें पुस्तक मी बरवर वाचलें पण तेवढ्यानें तें मनोरंजक व मोठें कल्पक असल्याविषयीं माझी खात्री झाली. तुमचें मुख्य प्रमेय स्वीकारण्यास अद्याप मन घेत नाहीं, व फिरून केव्हां तरी त्यांतील किरकोळ गोष्टींची छाननी मी स्वस्थपणानें करीन म्हणतो. " **प्रो. व्हिटने** यांनीं १८२४ मध्यें भरलेल्या अमेरिकन ओरिअंटल सोसायटीच्या वार्षिक सभेत या विषयावर प्रतिकूल पण विस्तृत चर्चा केली, तीस उद्देशून ते टिळकांना लिहितात " तुमचें प्रमेय मी अद्यापि कबूल केलेलें नाहीं, पण तुमचें संशोधन उत्कृष्ट आहे हें मी मान्य करितों. तुमचा युक्तिवाद मोठा कुशल असून तुमचें विविध व विस्तृत वाचन यांनीं प्रतिपादनाला मोठी शोभा आली आहे. तुमचें प्रमेय मला मान्य नाहीं म्हणून तुम्ही अगर तुमचा ग्रंथ याविषयीं अनादर वाटतो असें मात्र समजूं नका. तुमची वार्षिक सत्राची कल्पना मला तर अर्वाचीन वाटते. देवयान पितृयान या शब्दांचा तुम्ही करितां तो अर्थ जुन्या लोकांचा होता असें वाटत नाहीं. तुम्ही आपल्या दृष्टीनें त्यांत नवीन कल्पना पहात अहां. " **प्रो. मॅक्समुल्लर** लिहितात "तुमच्या निबंधाची हस्तलिखित प्रत येतांच मी ती प्रो. कोर्ले यांजकडे दिली. परिषदेच्या संस्कृत शाखेचे ते अध्यक्ष आहेत. एकंदर परिषदेचा अध्यक्ष म्हणून मीहि तो निबंध वाचला, पण माझी त्यावर सहज नजर गेली; व मी तो फार थोडा वेळ वाचला. पण वैदिक वाङ्मयाचा कालनिर्णय करण्याचा ज्या दिशेनें फार वर्षांपूर्वी स्वतः मी प्रयत्न केला त्याच दिशेनें तुम्हीहि प्रयत्न करीत अहांत हें पाहून

माझें लक्ष तिकडे विशेष वेधलें. आमच्या सेक्रेटरी मंडळींनीं तुमच्या निबंधांतील कांहीं विधानांत फरक करावयास पाहिजे असें मला दर्शविलें, यामुळें तो परिषदेच्या अहवालांत छापला गेला नाहीं. पण तो छापला गेला असतां तर बरें होतें असें मला वाटतें. अनेक संस्कृत पंडितांशीं बोलतांना मी त्यांना हें म्हणालों कीं टिळकांचा निबंध वाखाणण्यासारखा आहे. त्यावरून प्रत्यक्ष वैदिक वाङ्मयखंडांचाच नसला तरी त्यांत संग्रहित झालेल्या दंतकथा व परंपरागत समजुती यांचा तरी काल ठरविता येण्यास मदत होईल. पण तुमचा व्युत्पत्तिवाद पुष्कळसा चूक आहे असें मला अजून वाटतें, व त्यामुळेंच तुमच्या प्रमेयाला कमीपणा येऊन तुमच्या एकंदर निबंधाविषयीं प्रतिकूळ मत झालें असावें." (यानंतर प्रो. मॅक्समुल्लर यांनीं पांच सात उदाहरणें चुकीच्या शब्दव्युत्पत्तीचीं म्हणून दिलीं आहेत.) "तुमचे शोध टीकेच्या कसोटीला उतरून त्याना कायमची मान्यता मिळाली तर माझ्याइतका इतर कोणासहि आनंद होणार नाहीं. पण मी उद्यांच आक्सफर्ड सोडून जाणार असल्यामुळें तुम्हाला या कामीं टीकेची मदत पाहिजे होती ती करतां येणार नाहीं याबद्दल वाईट वाटतें." पण शब्दव्युत्पत्ती ही गोष्ट अत्यंत मतभेदाची असतें हें प्रसिद्ध आहे; व स्वतः मॅक्समुल्लर यांच्याहि सर्वच व्युत्पत्त्या सर्वमान्य होत्या असें नाहीं हे जर्मन पंडित पिशेल यांनीं यानंतर पुढच्याच महिन्यांत टिळकांना लिहिलेल्या पत्रावरून दिसून येईल. **प्रो. पिशेल** म्हणतात, "तुमच्या युक्तिवादांतील तपशिलाचे कांहीं मुद्दे, समजले नाहींत. कारण मला ज्योतिर्गणिताचें ज्ञान हवें तितकें नाहीं. पण एकंदरीनें पाहतां वैदिक वाङ्मय व वैदिक संस्कृती यांचें प्राचीनत्व, आणि विशेषतः मृगशीर्षाविषयीं तुम्ही काढलेलीं अनुमानें पक्कीं व खात्रीलायक आहेत असें माझें मत झालें आहे. प्रो. मॅक्समुल्लर यांच्या शब्द व्युत्पत्त्या हल्लीं युरोपांत कोणीही मानीत नाहींत, व त्या चूक आहेत असें माझें निश्चित मत आहे. मात्र गाथाशास्त्राचा तुलनात्मक विचार करणें हें आतां मागें पडत चाललें आहे. कसेंहि असो, तुमचें पुस्तक अत्यंत महत्वाचें आहे याविषयीं शंका नाहीं." बर्लिनहून **प्रो. ए. वेबर** लिहितात "तुमचीं प्रमेयें मला मान्य नाहींत. तीस वर्षांपूर्वी तुमच्या युक्तिवादांतील बहुतेक मुद्दे मी विचारांत घेतले होते ही गोष्ट तुम्हांला माहीत असण्याचा संभव नाहीं. त्यावेळीं प्रो. व्हिटने व मी या उभयतांचेंहि मत असें पडलें कीं ज्या ज्योतिषविषयक कथांवर तुम्ही इतका जोर देत आहां त्या हिंदू लोकांनीं बॅबिलोनियन लोकांपासून घेतल्या असाव्या. तसेंच ओरायन व अग्रहायण हे दोन्ही शब्द एकच असणें शक्य नाहीं." **प्रो. ब्लूमफील्ड** यांनीं या विषयावर जॉन हापकिन्स युनिव्हर्सिटीच्या वार्षिक उत्सवाचे प्रसंगीं एक व्याख्यानच दिलें त्यांत त्यांनीं खालील आशयाचे उद्गार काढले होते; "गेल्या दोनतीन महिन्यांत याहूनहि एक महत्त्वाची गोष्ट वाङ्मयसृष्टींत घडून आलेली

आहे, व तिनें तर शास्त्री व पंडित वर्गामध्यें खूप खळबळ उडून गेल्याशिवाय राहणार नाहीं. दहा आठवड्यापूर्वी बाळ गंगाधर टिळक यांनीं लिहिलेल्या एका नवीन पुस्तकाची एक प्रत मजकडे आली. पुस्तक लहानसें, ओबडधोबड, डोळ्यांत न भरणारें असे होतें. त्याची बांधणी व छपाई हिंदुस्थानांतील छापखान्यांतून निघणाऱ्या नेहमींच्या पुस्तकाप्रमाणें सदोष होती. या टिळकांचें नांवहि मी पूर्वी ऐकलें नव्हतें. तात्पर्य, त्याविषयीं माझा अनुकूल ग्रह व्हावा अशी सकृद्दर्शनीं एकहि गोष्ट नव्हती, याकरितां मी तें वामकुक्षी घेतांना सहज चाळावें म्हणून ठेऊन दिलें होतें. हेतु हा कीं रोज टपालांतून येणाऱ्या सटरफटर लेखांप्रमाणें हेंहि पाहून बाजूस टाकावें. मग एके दिवशीं या पुस्तकाची प्रस्तावना पाहिली, पण त्यांतहि विशेष चित्ताकर्षक असें कांहीं वाटलें नाहीं. वेदकाल चार हजार वर्षांपासून सहा हजार वर्षांपर्यंत मागें नेतां येतो असें त्यांत ढोबळपणानें सांगितलें होतें. पण हिंदू लोक कल्पनेवर बसून मोठ्या भराऱ्या मारतात, व शेकडों किंवा हजारों वर्षांचा काल हा त्यांच्या खिजगणतीत नसतो, अशी माझी नेहमींची समजूत असल्यामुळें टिळकांचें हें स्थूल विधान वाचून मी मनांत हंसलों व म्हणालों 'आमची सूक्ष्म परिश्रमानें बनलेलीं ठरीव मतें असल्या ढोबळ विधानांनीं हा लेखक बदलूं पाहतो काय ? पण पाहूं या तरी!' असें म्हणून मी सहज पुढें पानें चाळूं लागलों. पण लवकरच माझें हें तुच्छतादर्शक हास्य तोंडातल्या तोंडांत जिरलें, व हा लेखक म्हणतो त्यांत अपूर्व असें खरोखरच कांहीं तरी आहे असें वाटून, माझी बुद्धी त्यानें गदगदां हलविल्यासारखें मला वाटूं लागलें. वैदिक वाङ्मय व तत्संबंधीं पौर्वात्य ग्रंथ यांवर या लेखकाचें प्रभुत्व केवढें जबरदस्त आहे ही गोष्ट प्रथमच मनांत बाणली. यामुळें ग्रंथ केवळ वरवर चाळून पाहण्याची बुद्धि लोपून त्यांत खोल शिरून पहावें असा निर्धार झाला; व प्रारंभीं जी गोष्ट क्षुद्र म्हणून मी टाकून देण्यास अगदीं तयार झालों होतों तिजविषयीं माझी लवकरच सांगोपांग खात्री झाली; आणि या वर्षाच्या वाङ्मयांतील हें पुस्तक ही एक अद्भुत गोष्ट होय असें मला वाटलें. आणि यापुढें येणाऱ्या कोणाहि कालगणकाला विचार करण्याला भरपूर सामुग्री या पुस्तकांत मिळून, प्राचीन कालदर्शक चित्र सत्यस्वरूप बनण्याला कसें ठाकठीक करावें याविषयीं या पुस्तकांत बरींच साधनें मिळतील असा माझा ग्रह झाला."

प्रो. हर्मन जाकोबी यांनीं टिळकांना ओरायन ग्रंथासंबंधानें तीन पत्रें लिहिलेलीं मिळालीं. त्यांत ते लिहितात—"तुम्ही काढलेलीं प्रमेयें मीहि पण स्वतंत्र रीतीनें काढलेलीं असल्यामुळें तुमचें पुस्तक मी हौसेनें वाचलें. आमच्यापैकीं कांहीं प्रमुख संस्कृत पंडितांनीं तुम्ही व मी काढलेल्या ज्योतिषविषयक प्रमेयांना संमति व्यक्त केलेली आहे. दुसरे कित्येक नक्की मत देत नाहींत, म्हणतात आम्हाला ज्योतिषाचें पुरेसें ज्ञान नाहीं. प्रथम कांहीं दिवस नाहीं होय असेंच चालेल व

डळमळीतपणा राहील. पण नवा वेदकालनिर्णय लौकरच पक्का स्वीकारला जाईल असें मला वाटतें..........तुमच्या आमच्या प्रमेयांची चर्चा आतां इकडे सुरू झाली आहे. प्रो. बार्थ यांनीं एक मोठा निबंध लिहून ॲकॅडेमी पुढें वाचला त्यांत त्यांनीं अनुकूल मत दिलें आहे, व या नवीन शोधाचें श्रेय तुम्हाला किती द्यावयाचें व मला किती द्यावयाचें याचीहि मोठ्या निःपक्षपातीपणानें वाटणी केली आहे. प्रो. व्हिटने हे बहुधा प्रतिकूळ मत देतील पण तें चुकीचें देतील असें मला वाटतें............बार्थर, बुल्हर, फ्रॅंक हिल्बर्ट, किलहॉर्न, लिबिक, वगैरे पंडित तुमचें आमचें समर्थनच करितील असें वाटतें. तुम्ही आम्ही म्हणतों इतकी प्राचीन जर आर्य संस्कृती असेल तर तिच्या खुणा कोठें आहेत असें कोणी म्हणेल, तर त्याला उत्तर हें कीं प्राचीन शहरांच्या आसपास हा सर्व पुरावा मिळेल, पण अद्यापि तो कदाचित् भूमिगतच असेल. संशोधनाच्या योग्य रीतीनें हे भूप्रदेश उकरून पाहिले तर हा पुरावा हवा तितका सांपडेल. पण श्री आणि सरस्वती ही दोन्ही एकत्र नांदत नाहींत हे तुम्हांस माहीत आहेच म्हणून ही गोष्ट हुकमी करितां येत नाहीं." याशिवाय स्मिथ, डार्मिस्टेटर, कुन्ह व रॉथ वगैरेंचीं कांहीं पत्रें आहेत पण त्यांत मुख्य विषयाची फारशी चर्चा नसल्यामुळें त्यांतील उतारे दिले नाहींत.

---

## आर्कटिक होम

### ( आर्यांचें मूल वसतिस्थान )

**प्रो. ब्लूमफील्ड** ( बाल्टिमोर, अमेरिका ) लिहितात "माझी दृष्टी हल्लीं बिघडत चालली आहे. म्हणून मी ती 'वैदिक शब्दसंग्रह' नामक माझा ग्रंथ छापून काढण्यापुरतीच उपयोगांत आणीत असतो. म्हणून तुम्हांस या पूर्वी पत्र लिहिलें नाहीं. तुमचा हा ध्रुवोपपत्तिविषयक ग्रंथ वाचून मला फार आनंद झाला. पण त्यांतील विषय फार अवघड असल्यामुळें तो सर्व नीट मननपूर्वक वाचल्या-शिवाय माझे विचार मला जाहीरपणें सांगतां येत नाहींत. आणि माझें जें कारण तेंच या बाबतींत इतरांचेंहि असेंच तुम्ही समजा. केवळ यामुळेंच तुमच्या या ग्रंथावर पाश्चात्य पंडितांकडून व्हावी तितकी टीका अद्यापि झाली नाहीं. तुमच्या पुस्तकाचें परीक्षण करणारांना असेंच वाटलें असलें पाहिजे कीं, ज्यांत निवळ शब्दव्युत्पत्तीचा संबंध नाहीं अशा अनेक गोष्टींचा प्रथम अभ्यास केला पाहिजे तरच मत देतां येईल. या ग्रंथाची दुसरी आवृत्ती तुम्ही काढाल त्यावेळीं मात्र खरें ग्रंथपरीक्षण तुम्हाला लाभेल. मी तूर्त इतकेंच सांगतों कीं तुमची विद्वत्ता, आणि विशेषतः मला ज्या विषयानें मोहित व अंकित करून सोडलें आहे त्या

वेदांवर तुमची इतकी आस्थापूर्वक निष्ठा पाहून मला तुमच्याबद्दल फारच आदर वाटतो."

अमेरिकेतील दुसरे एक पंडित **पॉल केरस** यांनी मात्र या ग्रंथांतील सिद्धांतांना तावडतोब पूर्ण संमती दिली, व मॉनिस्ट मासिकांत आपला अभिप्राय प्रगट केला. ते आपल्या पत्रांत लिहितात, "एकदोन गोष्टींत मात्र तुमचा माझा मतभेद दिसतो. तुराणी व आर्यन या वंशांत पिंडभेद तर आहेच, पण भाषाभेदहि अधिक आहे. निरनिराळ्या वंशांच्या लोकांनीं एकच भाषा बोलणें शक्य आहे आणि ॲकेडियन लोक हे शुद्ध तुराणी नव्हेत असें तुम्ही मानतां. पण मिश्रणानेंच प्रगति होत असते." पण याहीपेक्षां निश्चित व पूर्ण अनुकूल असा अभिप्राय अमेरिकेंतील **प्रो. वॉरन** यांनीं शिकागो येथील 'ओपन कोर्ट'नामक मासिक पुस्तकांत पुढें कांहीं दिवसांनीं प्रगट केला. ते लिहितात, "आर्यांच्या वसतिस्थानावर एक नवीन व मननीय ग्रंथ हिंदुस्थानांत नुकताच लिहिला गेला आहे, आणि अमेरिका व युरोप या खंडांत विद्वान् पंडित लोक त्याचा विचार करीत आहेत. हे ग्रंथ लिहिणारे टिळक यांना संस्कृत फार चांगलें येतें व पाश्चात्य शास्त्रांचेंहि ज्ञान त्यांना बरेंच आहे. ते इंग्रजी भाषा इतकी शुद्ध व जोरदार लिहितात कीं एखाद्या इंग्रजालाहि त्यांचा हेवा वाटावा. ते कायदेपंडित असल्यानें त्यांची विवेचनपद्धति स्पष्ट आणि प्रसादयुक्त असून, खऱ्या पुराव्याच्या दृष्टीनें ग्राह्य कोणतें व अग्राह्य कोणतें याचा त्यांना चांगला विवेक करितां येतो. त्यांचा ओरायन ग्रंथ यापूर्वीच मान्यता पावला असल्यानें त्यांच्या या दुसऱ्या ग्रंथाकडे विद्वान् लोक आदरबुद्धीनें पाहतात यांत नवल नाहीं." नंतर पुस्तकांतील अनेक प्रकरणांचा उल्लेख करून ते पुढें लिहितात "यापूर्वी या विषयांत कोणीहि इंडो-इराणियन् पंडितानें ही कल्पना गृहीत धरून जितका खात्रीलायक पुरावा पुढें आणला असेल, त्याहून या ग्रंथांत टिळकांनीं पुढें आणलेला पुरावा अधिक खात्री पटविणारा आहे. त्यांच्या विवेचनांत शुद्ध शास्त्रीय पद्धतीचा त्याग केलेला कोठेंहि आढळणार नाहीं, व जें कांहीं त्यांच्या मनांत आलें तें सर्व त्यांनीं प्रांजळपणानें पुढें मांडिलें आहे. या व पूर्वीच्या ग्रंथाला टिळकांनीं जीं नांवें दिलीं आहेत तीं, त्यांत प्रतिपादिलेल्या विषयांच्या मानानें पाहतां वाजवीहून अधिक व्यापक नसतां उलट अधिक संकुचितच ठरतात. अवेस्ता ग्रंथांतील त्यांनीं दिलेला पुरावा कांहीं ठिकाणीं वेदांतील पुराव्यापेक्षांहि अधिक खात्री पटविणारा असतां, ग्रंथनामांत त्यांनीं अवेस्ताचा उल्लेखहि केला नाहीं. वीस वर्षांपूर्वी वेद व अवेस्ता यांच्या केवळ भाषांतरावरून टिळकांनीं काढलेला सिद्धान्तच मींहि ठरविला होता, व तो 'मानववंशाचा पाळणा' या नांवाच्या पुस्तकांत प्रतिपादिला होता. त्यांत कित्येक वैदिक कथांचा जो अर्थ मी आपल्या बुद्धीनें लाविला होता तोच ऋग्वेदाचा प्रत्यक्ष परिचय असणाऱ्या टिळकांनीहि हल्ली लाविलेला

पाहून मला धन्यता वाटते. टिळकांनीं कापल्या ग्रंथांत आधींच्या या माझ्या ग्रंथाचा वारंवार उल्लेख केलेला आहे. पण त्यांचा ग्रंथ माझ्याहिपेक्षां अधिक मर्मेव, मोहक, व शिवाय अधिकारी लेखकानें लिहिलेला आहे, हें मी कबूल करितों, व माझा उल्लेख केल्याबद्दल मी त्यांचे आभारच मानतो. हा ग्रंथ व जॉन ओनील यांचा 'देवतांची रात्र' हा ग्रंथ जो वाचील तो, आर्य लोकांचें आपणांस माहित असलेलें सर्वांत जुनें वसतिस्थान कोणतें, असा प्रश्न फिरून विचारणारच नाहीं, अशी माझी खात्री आहे."

---

## श्री कृष्णानंदसरस्वती स्वामी यांचा अभिप्राय

श्रीः

### जयसच्चिदानंद

स्वस्ति श्रीमत्पंडितगणगणनीय बुद्धिमत्तिलकयथार्थतिलकोपनाम्नि बलवंतनाम्नि सततं शं तन्वन्तु सानंदमुदीरितानि नारायणस्मरणानि—

भवदीयेनानेन ग्रंथेनापारमानंदं गमिताः यस्मादत्र ग्रंथेऽनन्यबुद्धिगोचरान्विषयानुद्घाटय श्रुतीनां समन्वयः प्रदर्शितः येन पुरातनविषय—समन्वयदर्शनेन नवीनतावादं परमतस्थास्त्यक्ष्यंति युगान्तेऽन्तर्हितान्वेदा इत्यंतर्धानमात्रश्रवणेन लेभिरे इति लाभ—श्रवणेन ऋषिभिः कृता मंत्रा इति मतं त्यक्त्वाऽनादित्ववादमंगीकरिष्यन्ति बुद्धिमंतः येन मनुवचनं अनादिनिधना दिव्या वागुत्सृष्टा स्वयंभुवेति वंशं ब्राह्मणं च वेदलाभक्रमसंपर्कं स्वयमुन्नतं यथार्थमितिच विश्वास्यंति । किंबहुना गायत्र्याविश्वामित्रमृषिं विश्वामित्रोपि सस्मार । मित्रेचर्षाविति पाणिनिसूत्रे सति विश्वस्य मित्रं विश्वामित्र इत्यभुपगमात् विश्वामित्रः परमात्मा सुहृदं सर्व भूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छतीति भगवद्वाक्यात् गायत्र्या ऋषिः परमात्मा विश्वामित्रशब्देन स्मरणीय इत्यर्थात्सिद्धं । इत्थमन्येष्वपि मंत्रेषु तत्तदृषिनाम्ना परमात्मा स्मरणीयः । येन ऋषिणा यो मंत्रो लब्धः स ऋषिच्छंदोदैवतविज्ञानसहितो लब्धः । ऋषिच्छंदोदैवतज्ञानाधीना सिद्धिः । तस्मादृषयो वेदाश्चानादय इति सिद्धं । गाधिसुते विश्वामित्रे नव्घाटितं पदं ऋषिच्छंदोदैवतज्ञानपूर्वपूर्वं गायत्रीमुपास्य ऋषिशब्दोलब्धः संपन्नत्वात् गायत्रीरहस्यज्ञानेन दर्शनेनच । एतेन सर्वे ऋषयो व्याख्याताः । विश्वस्यामित्रं म्लेच्छो स्यादेकत्वात् । मनुव्यासवचनयोरेकएवाभिप्रायो यथा । प्रमाणप्रमेयात्मके विश्वे प्रमाणाधीना प्रमेयसिद्धिर्न प्रमेयाधीना प्रमाण सिद्धिः । वेदः प्रमाणकोटावर्थः प्रमेयकोटौ । प्रमेयानामागमापायित्वेपि न प्रमाणानामागमापायित्वं यथा रूपादीनां प्रमाणानि रूपाद्यपगमेपि चक्षुरादीनि

नागमापायीनि । अत एव जन्मान्तरेप्यनुवर्तते लिंगशरीरं इत्यभ्युपगमः । यथा चक्षुरादीन्यनुवर्तन्ते प्रमाणत्वात्तथा वेदोपीति । यथा वेदस्तथा इतिहासाः प्रमाणत्वाव्यभिचारात् अत आह सेतिहासानीति । इदमुपलक्षणं पुराणानां । अत एव सेतिहासपुराणवक्ता व्यासः स्ववचने व्यासोहं वच्मि इति प्रयोगे प्राप्ते व्यास उवाचेति लिखति स्म । भूतानद्यतने परोक्षे लिट्प्रयोगानुपपत्तेः प्राचीन व्यासवचनमिदानींतन व्यासेन कथितमित्यर्थः पर्यवसितः । एतेन सर्वेप्युवाचशब्दा व्याख्याता इति ह आसेति कथिता इतिहासाः पुरातनं चरित्रं पुराणमितिव्युत्पत्तेः मंत्रा ब्राह्मणानि कल्पा इतिहासाः पुराणानि सांगोपांगानि प्रमाणानि अनाद्यंतानीति सिद्धं । तत्रतत्र तत्तदृषिशब्दैः परमात्मा वेदितव्योनेतरेऽनाद्यनंतानां प्रमाणानां प्रवर्तयिताऽनाद्यनंतं विना कःसंभवेत् । अत एव अर्वाचीनेषु ऋषिशब्दो मंत्रद्रष्टृत्वमात्रेण कृतार्थः । अध्यापनेन आचार्यत्वं परमाचार्यः परमात्मा । सत्येव पुरातनतमस्य वेदस्य ज्योतिःशास्त्रसिद्धेषु पुरातनतमेषु विषयेषु योजनां दर्शयित्वा पुरातनतमत्वं संसाध्य व्यासवचनमनुसृत्यानादित्व उपसंहृतो ग्रंथः । सत्यं बुद्धिमत्तिलकोसीति नारायण स्मरणानि । इति श्रीकैवल्यधामनिवासी कृष्णानंद सरस्वतीतो बाळ गंगाधर तिलककृत वेदानादित्वविचारपरामर्शः ।

## भाग २८ वा

# पुनश्च हरिः ॐ !

तुरुंगांतील हालअपेष्टेमुळें टिळकांची प्रकृति पुष्कळ खालावली होती हें मागें सांगितलेंच आहे. त्यांची प्रकृति काटक असली तरी प्रत्यक्ष अंगयष्टी लहान, व त्यांचें नेहमींचें वजन १३५ पौंडाच्या आंतबाहेर असे. तुरुंगांत मध्यंतरीं तर त्यांचें वजन १०५ पौंडाइतकें खालीं गेलें होतें. पुढें येरवड्यास प्रकृति सुधारली तरी तें ११३ पौंडावर गेलें नाहीं. यावरून त्यांना विश्रांति व पौष्टिक अन्न यांची किती जरूरी होती हें दिसून येईल. पौष्टिक अन्नाला फारसा तोटा नव्हता. पण टिळकांना घरींहि हटकून तोटा असणारी अशी एक बाब म्हटली म्हणजे ती विश्रांती व शारीरस्वास्थ्य यांची होय. आधींच त्यांचें घर नेहमीं कामकाजानिमित्त येणाऱ्या माणसांनीं गजबजलेलें असावयाचें. आणि आतां तर काय, जो कोणी कौतुक करील किंवा दाखवील तितकें थोडेंच. टिळकांनीं खटल्याची व तुरुंगवासाची सर्व हकीकत खास आपणाला वेगळी सांगावी अशी प्रत्येकाची, निदान प्रत्येक निकट परिचयाच्या स्नेह्याची, इच्छा सहजच असावयाची. ती टिळक पुरवूं म्हणतील तरी किती पुरविणार ! तुरुंगांतील मौनव्रताच्या पारण्याचें भोजन इतकें अमूप होऊं लागलें कीं, संभाषणाच्या अजीर्णानें त्यांचें तोंड दुखूं लागलें असावें. कोणाला झिडकारूं म्हणतील तर तीहि मूळची संवय नाहीं. त्यांतच आक्टोबरचे उन्हाळ्याचे दिवस आले. तेव्हां सर्वानुमतें टिळकांनीं एक महिनाभर सिंहगडावर जाऊन विश्रांती घेण्याचें ठरविलें.

बिघडलेल्या प्रकृतिला जन्मभूमीच्या हवेनें बरें वाटतें असें म्हणतात. सिंहगड ही कांहीं टिळकांची जन्मभूमी नव्हे. पण त्यांच्या मनाची हौस व प्रकृतीची केवळ लक्षांत घेतां सिंहगडचें स्थान त्यांना जन्मभूमीइतकें प्रिय वाटे व मानवतहि असे. संभाषणाला भोंवतीं चार माणसें अधिक असतील तितकीं बरीं असें मानणारे व वागणारे जरी टिळक होते, तरी विश्रांतीची भूक लागली असतां खराखुरा एकांतवासच ते स्वीकारीत. महाबळेश्वरासारख्या ठिकाणीं थंड हवा असली तरी तेथें मिजासखोर माणसांची गर्दी फार. शिवाय तें ठिकाण पुण्याहून फार लांब. यामुळें टिळकांनीं सिंहगडची जागा पसंत केली होती. प्रत्येक सुशिक्षित उद्योगी मनुष्यानें वर्षांतून कांहीं दिवस तरी एकांतवासांत विश्रांती घ्यावी असें त्यांचें म्हणणें असे. फर्ग्युसन कॉलेजच्या प्रोफेसरांकरितां सिंहगडावर एखादी जमीन घेऊन तिजवर लहानसा बंगला बांधून ठेवावा, म्हणजे त्यांना तेथें जाऊन आळीपाळीनें विश्रांती घेतां येईल, अशी पूर्वींपासून त्यांच्या मनांत योजना होती. ती त्यांना आपल्या कॉलेजच्या कारकीर्दींत पुरी करितां आली नाहीं. पण पुढें

स्वतंत्रपणें प्रस्थापित झाल्यावर त्यांनीं ती हौस पुरी केली. ते व त्यांचे मित्र दाजीसाहेब खरे या दोघांनीं मिळून सिंहगडास लहानशी जागा घेऊन गवती छप्पर घालून घर बांधलें, व दोघेंहि उन्हाळ्यांत या घराच्या दोन निम्म्या भागांत रहात. टिळकांना नेहमीं थंड हवाच मानवे. ती इतकी कीं, पुण्यांत भर थंडीच्या दिवसांतहि ते फार तर एखादा सदरा अंगावर घालून वावरत; एरवीं व विशेषतः उन्हाळ्यांत बाहेरच कोठें जावयाचें असेल त्याखेरीज, बहुधा अष्टौ-प्रहर ते अगदीं उघड्या अंगानें रहात. सिंहगडावर देखील जवळजवळ हीच स्थिती. सबंध सिंहगडच्या मुक्कामांत एक सदरा व टोपी येवढ्यानें कार्यभाग होऊन थंड हवेबरोबरच सर्व प्रकारच्या कृत्रिम राहणीचा लोप उपभोगतां येतो म्हणूनच त्यांना सिंहगड आवडे. या पलीकडे जाऊनहि टिळकांना सिंहगड आवडण्याचीं कारणें देतां येतील. मावळे लोकांशीं गप्पा गोष्टी करणें, शिवाजीच्या एका आवडत्या किल्यावर राहण्यास सांपडणें, हीं कारणेंहि होतींच. हवा थंड असून तींच ऐतिहासिक भावना प्रदीप्त करून देणारी असल्यास अशी जोड कोणासहि सहजच आवडेल. पण केवळ त्यामुळेंच सिंहगड हा त्यांनीं पसंत केला असें मात्र नाहीं. हें म्हणणें खास अतिशयोक्तीचें होईल. तथापि या एकांतवासाच्या ऐतिहासिक किल्यांत, एखाद्या विनपरिवाराच्या राजाप्रमाणें, स्वेच्छाविहार करीत असतां टिळकांवर जी उमदेपणाची झांक चढत असे ती मार्मिक तिऱ्हाइतासहि दिसली असती. १९०७ सालीं नेव्हिन्सनसाहेबांनीं सिंहगड व सिंहगडावरील टिळक या उभयतांचें जें सहृदय सुंदर वर्णन केलें आहे तें वाचणाराच्या लक्षांत आम्ही काय म्हणतो हें सहज येईल.

टिळकांनीं सबंध आक्टोबर व नोव्हेंबर महिना सिंहगडावर घालविला, व तेथें त्यांची प्रकृती लवकरच इतकी सुधारली कीं किल्याच्या निम्म्या वाटेवरील मेट्यापर्यंत उतरण्याचढण्याचे श्रम त्यांना करितां येऊं लागले. या वेळीं उद्योग असा त्यांच्या मागें थोडा होता. करमणुकीखातर गप्पागोष्टी करण्याला मित्रमंडळी कोणी आपण होऊन गडावर येत व कोणास ते मुद्दाम बोलावून घेत. तुरुंगांतून आले त्या वेळीं टिळक किती कृश दिसत होते व त्यापूर्वी ते किती गुबगुबीत दिसत हें दाखविण्यासाठीं एकत्र छापलेले त्यांचे फोटो पुष्कळांनीं पाहिलेले असतील. गाल बसलेले, तोंड काळवंडलेलें, ओंठ सुकून जाऊन त्यावरची कातडी निघत असलेली, व पाय लटपटणारे अशा स्थितींत त्यांची सुटका झाली. पण सुमारें एक महिन्याच्या विश्रांतीनें हें स्वरूप अगदीं पालटलें.

सिंहगडावर जरूर ती विश्रांति घेतल्यानंतर पुढील एक एक उद्योग टिळकांना सुचूं लागले. डिसेंबरमध्यें राष्ट्रीयसभा मद्रासेस भरली, तिला टिळकांना निमंत्रण येऊन प्रतिनिधी या नात्यानें ते हजर होते. विषयनियामक कमिटींतहि त्यांची निवडणूक झाली होती. मात्र नेहमींप्रमाणें सभेंत त्यांनीं भाषण केलें नाहीं. या

गोष्टीनें टिळकांच्या प्रतिपक्षीयांना टीकेस जागा झाली, आणि टिळकांनीं सरकाराला कांहीं तरी अपमानकारक अटी लिहून दिल्या आहेत अशी जी बातमी त्यांनीं आपापसांत पसरविली होती तिला मदतच झाली. टिळक तुरुंगांतून सुटून आले असतां व राष्ट्रीयसभेंत हजर असतां ते कां बोलले नाहींत ? तर त्यांनी सरकाराला तसें लिहून दिलें होतें म्हणून ! कित्येक म्हणूं लागले, टिळकांनीं राष्ट्रीयसभेस हजर राहावें अशी लोकांची तरी इच्छा कोठें होती ? ते हजर राहिल्यानें 'स्केलेटन अॅट दि फीस्ट—'म्हणजे मेजवानी चालूं असतां तेथें कोणी अवचित उकरून काढून आणून ठेवलेल्या प्रेताच्या सांगाड्यासारखें—त्यांचें दर्शन उद्वेगकारक झालें ! कोणी म्हणाले, आपल्या मार्गांत ही राजद्रोही मनुष्याची अडचण नको या विचारानें फिरोजशहा मेथा वगैरे लोक मद्रासला गेले नाहींत. कोणी म्हणाले, आपण राष्ट्रीय सभेस हजर राहणार नाहीं असें टिळकांनीं सरकारला वचन दिलें असतां ते त्यांनीं मोडलें तेव्हां त्याचें प्रायश्चित्त त्यांना आतां लवकरच भोगावें लागेल. कोणी म्हणाले, टिळकांची राष्ट्रीय सभेत बोलण्याची फार इच्छा होती; पण स्वतः राष्ट्रीय सभेवर येणारें संकट टाळण्याकरितां सभेच्या चालकांनीं टिळकांना बोलूं दिलें नाहीं !

पण हीं सर्व विधानें मत्सरग्रस्त लोकांनीं केलेलीं असून त्यांतील प्रत्येक विधान आपापल्या परीनें खोटेंच होतें. पैकीं कित्येक विधानांना इतरांनीं परस्पर उत्तरेंहि दिलीं. मुंबईच्या 'चँपियन पत्राचे संपादक मि. चेंबर्स यांनीं मेथांसंबंधाचें विधान खोडून काढलें. कांहीं विधानें तर तीं वाचतांच कोणीहि मूर्खपणाचीं म्हणून विल्हेत काढण्यासारखी होती. मद्रासची राष्ट्रीयसभा आटपल्यावर टिळक रामेश्वरच्या यात्रेला निघून गेल्यामुळें, इकडे काय चाललें आहे हें त्यांना कळण्यास मार्ग नव्हता. पण वाटेंत 'साउथ इंडियन पोस्ट' नांवाच्या एका इंग्रजी वर्तमानपत्राच्या बातमीदारानें त्यांची मुलाखत घेऊन यांतील कांहीं हकीकत त्यांचे कानावर घातली व प्रश्न विचारले, तेव्हां ही संधी बरी असें समजून टिळकांनीं त्याचे जवळ खुलासा केला. त्यांनीं सांगितलें कीं, 'मला बोलण्यास कोणी प्रतिबंध केला नाहीं, इतकेंच नव्हे तर उलट बोलण्याविषयीं कांहींनीं आग्रहहि केला. पण मी एकदां बोलण्यास सुरुवात केली कीं माझ्या मागें व्याख्यानें देण्याच्या निमंत्रणांचा सुळसुळाट होईल, आणि हल्लीं माझी प्रकृति बरी नसल्यामुळें व्याख्यानें देण्याइतकी अंगांत ताकद नाहीं. सभेंत न बोलण्याविषयीं मी सरकारास बांधला गेलेला नाहीं.' शेवटीं या बातमीदारानें "आतां आपण या पुढें काय करणार ?" असा प्रश्न विचारला त्याला टिळकांनीं "मीं आजवर पूर्वी जें करीत आलों तेंच पुढेंहि करणार" असें थोडक्यांत पण समर्पक उत्तर दिलें, आणि पुढें तसें केलेंहि, हें प्रसिद्धच आहे.

असो. मद्रासेस टिळक जाणार हें ऐकतांच तेथील हिंदू व मद्रास स्टँडर्ड

पत्रांनीं आणि बंगाल्यांतील पत्रांनींहि आनंद प्रदर्शित केला होता. मद्रासेस राहण्याची त्यांची सोय समुद्रकांठीं 'कर्नन कॅसल' किंवा 'आइस हाऊस' नामक बंगल्यांत करण्यांत आली होती. या बंगल्याची जुनी इमारत ही लॉर्ड क्लाइव्ह मद्रासेस होता त्यावेळीं नवीन बांधण्यांत आली होती असें सांगतात. १८९८ सालीं तिचे मालक बिलगिरी आय्यंगार नांवाचे एक नामांकित सॉलिसिटर हे होते. त्यांनीं टिळकांचें सर्व प्रकारें आदरातिथ्य केलें. लखनौ ॲडव्होकेटपत्राचे संपादक व टिळकांचे परम स्नेही पंडित गंगाप्रसाद वर्मा हेहि टिळकांबरोबर येथेंच उतरले होते. मद्रासच्या मुक्कामांत अनेक प्रमुख गृहस्थांनीं टिळकांना पानसुपाऱ्या किंवा मेजवान्या दिल्या. विशेषतः राजा सर टी. माधवराव यांच्या घरीं मद्रासेतील जुन्या महाराष्ट्रीय वसाहतवाल्यांनीं टिळकांना बडी मेजवानी दिली, व या प्रसंगीं परप्रांतांतील महाराष्ट्रीय लोकांमध्यें मराठी भाषेची अभिवृद्धि कशी करावी या विषयीं बरीच चर्चा झाली. राजा सर टी. माधवराव यांची एक लहानशी सोन्याची साखळी त्यांच्या चिरंजीवांनीं टिळकांना नजर केली. स्मार्त वैष्णव लोकांच्या देवळांतून देवदर्शनाला टिळकांस निमंत्रणें आलीं. मद्रास सोडण्यापूर्वीं टिळकांनींहि कित्येक वर्तमानपत्रकर्ते, प्रमुख मद्रासी वकील, प्रो० रंगाचार्य यांसारखे विद्वान पंडित वगैरेंना 'कर्ननकॅसल'मध्यें मेजवानी दिली. या प्रसंगीं एम्. ए. एल्. एल्. बी. अशा मोठमोठ्या पदव्या मिळविलेले वकील व शिक्षक वगैरे लोक तिकडील रूढीमुळें एकत्र जेवावयास न बसतां, तळमजल्यावर सर्व आय्यर म्हणजे स्मार्त व वरच्या मजल्यावर सर्व आयंगार म्हणजे वैष्णव अशा वेगळ्या पंक्ति करण्यांत आल्या; व एकाच वाढप्यानें स्मार्त व वैष्णव यांना वाढलेलें चालत नाहीं असें असल्यामुळें टिळकांबरोबर गेलेल्या मित्रमंडळींना निरनिराळ्या वाढप्यांच्या जोड्या करून या पंक्ति वाढाव्या लागल्या !

काँग्रेसच्या निमित्तानें टिळक हे हिंदुस्थानांतील कांहीं कांहीं मोठ्या शहरीं गेलेले होते. पण कारणाखेरीज प्रवास म्हणजे निवळ हौसेकरितां प्रवास असा त्यांनीं पूर्वी फारसा केला नव्हता. तुरुंगातून सुटून आल्यावर प्रकृति पुनः सुधारण्याच्या अवधींत त्यांना थोडासा प्रवास करण्याची इच्छा झाली. पहिला प्रवास त्यांनीं १८९८ च्या अखेरीस मद्रास कांग्रेसनंतर केला त्यांत ते सिलोनला जाऊन आले. मद्रासेहून राष्ट्रीयसभा आटोपल्यावर टिळक ताबडतोब पुण्यास परत न येतां, मदुरेस गेले. तेथून बैलगाडीनें रामेश्वरास व रामेश्वराहून सीलोनला जाऊन १८९९ च्या फेब्रुवारींत पुण्यास आले. दुसरा प्रवास त्यांनीं १८९९ च्या अखेरीस लखनौ कांग्रेसनंतर केला, तेव्हां ते ब्रह्मदेशाला जाऊन आले. पुढें पांच वर्षे मंडालेस असतांहि आपणास हें शहर पाहावयास सांपडणार नाहीं म्हणूनच कीं काय टिळकांनीं हें शहर पूर्वीच संधि साधून पाहून घेतलें ! प्रवासाची ही दुसरी खेप त्यांनीं स्वतःच्या हौसेपेक्षां त्यांचे स्नेही काशिनाथपंत छत्रे सर्कसवाले यांच्या

आग्रहावरून केली. १९०८ ते १९१४ पर्यंत तुरुंगवासाची सहा वर्षे टिळक ब्रह्मदेशांत मंडाले येथें होते, व सुटून आल्यावर विलायतेस जाण्याकरितां ते सीलोनांत कोलंबो येथें गेले होते या गोष्टी सर्वविश्रुत आहेत. पण त्याच्या पूर्वीहि ते ब्रह्मदेशांत व सीलोनास जाऊन आले होते ही गोष्ट पुष्कळांस ठाऊक नाहीं. दुसऱ्या प्रवासाची माहिती, केवळ कालानुक्रमानें पाहतां, या चरित्राच्या पुढील म्हणजे दुसऱ्या खंडाच्या प्रारंभीं यावयास पाहिजे. परंतु हे दोन्ही प्रवास फारच थोड्या अंतरानें झाले, दोहोंचा हेतु एकच होता, किंबहुना स्वतः टिळकांनीं हे दोन्ही प्रवास जमेस धरून त्यांची माहिती पुण्यास एकाच व्याख्यानांत सांगितली, व यापुढें सर्व जन्मांत टिळकांनीं असा प्रवासाकरितां प्रवास दुसरा कोणताहि केला नाहीं, म्हणून या दोन्ही प्रवासांची हकीगत एकत्र दिली असतां तें अनुचित होणार नाहीं असें वाटतें. स. १९०० सालच्या वसंतव्याख्यानमालेंत ता. ७ जून रोजीं त्यांनीं या प्रवासासंबंधीं एक सविस्तर व्याख्यान दिलें. पुढें दहा वर्षांनीं म्हणजे १९१० सालीं रा. हरी रघुनाथ भागवत यांनीं हें व्याख्यान पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध केलें होतें, पण त्याच्या प्रती अलीकडे दुर्लभ झाल्या आहेत.

टिळकांनीं आपल्या आयुष्यांत हिंदुस्थानांतल्या बहुतेक भागांत प्रवास केला, पण या दोन प्रवासांप्रमाणें त्यांनीं त्याचें वर्णन लिहिलेलें किंवा व्याख्यानरूपानें सांगितलेलें नाहीं. यामुळें या प्रवासवृत्तास विशेषच महत्त्व येतें. कारण प्रवासांत त्या त्या ठिकाणच्या लोकसमाजाचें धार्मिक, सामाजिक, राजकीय व औद्योगिक या दृष्टींनीं ते कसें निरीक्षण करीत हें या प्रवासवर्णनावरून दिसून येतें. आपल्या व्याख्यानांत प्रारंभींच त्यांनीं आपल्या या दृष्टीचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें. "आपल्या प्रांतातील लोकसमाजापेक्षां, आचारविचार आणि रीतीभाती यांत कमजास्त मानानें भिन्न असलेले समाज पाहून व त्यांच्या व आपल्या स्थितीची तुलना करून त्यापासून बोध घेण्याजोग्या कोणत्या गोष्टी आहेत, यांचा निर्णय करण्यास निरनिराळ्या देशांतील प्रवास हें मोठें साधन आहे. ... आपला देश व प्रांत सोडून परकीय प्रांतांत अगर देशांत कांहीं दिवस काढणें यांतच एक प्रकारचें शिक्षण आहे; आणि अशा प्रवासांत निरनिराळ्या प्रांतांतील लोकांच्या सामाजिक किंवा औद्योगिक स्थितीचें जर लक्षपूर्वक अवलोकन केलें तर त्यामुळें आपल्या विचारास एक प्रकारें निराळेंच वळण लागत असतें."

मद्रासपासून रामेश्वरपर्यंत टिळकांबरोबर, महाडकर ज्योतिषी, वासुदेवराव जोशी व एक आचारी अशी मंडळी होती. पैकीं महाडकर व आचारी हे रामेश्वरापासूनच परत फिरले, व पुढें टिळक व जोशी असे दोघेच सीलोनपर्यंत जाऊन आले. मदुरेस जाण्यापूर्वी वाटेंत कुंभकोणम् , तंजावर, त्रिचनापल्ली या शहरीं त्यांनीं एक एक दोन दोन दिवस मुक्काम केला; व थोडेसें वांकडें जाऊन

ते पाँदेचरीसहि दोन तीन दिवस राहिले होते. मद्रास इलाख्यांतील उंच उंच गोपुरांची विस्तीर्ण व श्रीमंत हिंदु देवालयें पाहून टिळकांच्या हिंदुधर्माभिमानी अंतःकरणावर काय परिणाम झाला असेल याची सहज कल्पना करितां येईल. ते म्हणतात " हिंदुधर्माचें व देवस्थानाचें प्राचीन स्वरूप व वैभव याची कल्पना या संस्था पाहिल्याशिवाय कोणासही व्हावयाची नाहीं......हिंदुधर्माचा वृक्ष आणि त्याबरोबरच सर्व हिंदु लोकांत जो एक प्रकारचा ऐक्यभाव दृष्टीस पडतो तो जिवंत ठेवण्यास हीं महत्त्वाचीं साधनें नाहींत असें कोण म्हणेल ?"

मद्रास इलाख्यांत तंजावरचें राज्य कायम होतें त्या वेळीं व्यंकोजी महाराजांबरोबर गेलेल्या महाराष्ट्रीय लोकांनीं तेथेंच वस्ती केली व अजून त्यांचे वंशज तेथेंच आहेत. मराठी राज्याच्या संस्थापनेच्या वेळींच स्थापन झालेल्या या महाराष्ट्रीयांच्या दक्षिणेंतील वसाहतीबद्दल महाराष्ट्रीय टिळकांना अभिमान वाटणें साहजिक होतें. ते अभिमानानें सांगतात, " दोनशें वर्षे भिन्न भाषा बोलणाऱ्या हिंदु लोकांच्या समाजांत राहूनहि या लोकांनीं महाराष्ट्रभाषेबद्दल जो आपला अभिमान व प्रेम कायम ठेविलें आहे तें खरोखरच वर्णनीय आहे; व त्यावरून भिन्न परिस्थितींत आपलें वैशिष्ट्य कायम ठेवण्याचा महाराष्ट्रसमाजाचे अंगीं असलेला गुण चांगला निदर्शनास येतो. " या वसाहतींचा व मूळ महाराष्ट्राचा संबंध दृढ व्हावा याकरितां येथील ब्राह्मणांनीं तिकडच्या ब्राह्मणांशीं सोयरिकी कराव्या अशीहि सूचना या व्याख्यानांत टिळकांनीं केली होती. " पंचद्रविडांत शरीरसंबंध होतील तेव्हां होवोत, परंतु आमच्या महाराष्ट्र समाजांतील जे लोक तिकडे गेले आहेत त्यांच्याशीं पूर्वी होत असलेला संबंध तोडणें किंवा तो पुनः सुरू करण्यास हयगय करणें हें आपल्या समाजास अहितकारक आहे असें कोणासहि वाटल्यावांचून राहणार नाहीं."

मद्रासइलाख्यांत इंग्रजी भाषेचा प्रसार इकडल्यापेक्षां त्यावेळींहि जोरत होता. तरीहि त्या लोकांची धर्मश्रद्धा व जुने आचार पाळण्याची बुद्धी जागृत असलेली पाहून टिळकांना समाधान वाटलें. पाँदेचरीसारख्या लहानशा प्रांताला पॅरिसच्या पार्लमेंटमध्यें दोन प्रतिनिधि निवडण्याचा हक्क आहे यामुळें या लहानशा फ्रेंच प्रांतांत ब्रिटिश मुलखापेक्षां प्रजेला कांहीं महत्त्वाचे अधिक राजकीय हक्क आहेत हें उघड आहे; पांदेचरीस इंग्रजीचा प्रचार फारसा नाहीं "यावरून इंग्रजी भाषेचा आमच्याकडे जो प्रसार आहे त्याचा राज्यव्यवस्थेशीं किती संबंध आहे हे लक्षांत येण्यासारखें आहे." हीं टिळकांचीं अनुमानें खरींच आहेत.

सिलोनचा प्रवास हल्लींप्रमाणें त्या वेळीं सुखकर नव्हता. टयुटिकोरिन बंदरापर्यंत फक्त रेलवे असून बोटीनें कोलंबोस जाण्याला ४०-४५ तास लागत. सिंगली लोकांच्या सामाजिक स्थितीविषयीं वर्णन करून टिळक म्हणतात, "खिस्ती मिशनऱ्यांचा तीनशें वर्षे सहवास किंबहुना त्यांचा जुलूम ज्या लोकांस

सोसावा लागला त्यांची स्थिति अशा रीतीची होणें स्वाभाविक आहे. प्रौढ-विवाह, ख्रिस्ती व बौद्धधर्मी लोकांच्या सोयरिकी, जातिभेदाचा अभाव, अभक्ष्य-भक्षण, अपेयपानाची मोकळीक वगैरे सर्व कांहीं सुधारणा यांच्यामध्यें आहेत; पण तीनशें वर्षांपर्यंत यांच्यामधील आपल्या धर्माचा अभिमान व आपलेपणा अगदीं लोपून गेला आहे. हा आपलेपणा पुन्हां जागृत करणें हें तिकडील सामाजिक सुधारणेचें मुख्य कलम आहे. बौद्धधर्माचें ज्ञान करून घ्यावें आणि सामाजिक संस्था किंवा रीतीभाती केवळ ख्रिस्ती लोकांच्या वळणावर न नेतां त्यांनीं आपलेपणा कायम राखावा अशी बुद्धि या लोकांस हल्लीं होऊं लागली आहे. सिंगली लोकांनीं केवळ ख्रिस्ती लोकांप्रमाणें विजार, कोट व टोपी असा पोषाख न करितां एक मोठा रुमाल किंवा फडकें इतर हिंदूंप्रमाणें विजारीवरून नेसावें, अशी उलट सुधारणा करण्याचे प्रयत्न सध्यां त्यांच्यांत चालू आहेत." सामाजिक बाबतीप्रमाणें सिंगली लोकांची व्यापारविषयक हीन स्थितीहि टिळकांच्या लक्षांत आल्याखेरीज राहिली नाहीं, हें त्यांच्या पुढील उद्गारांवरून दिसून येईल. " सारांश, शेतीचें उत्पन्न व खनिज पदार्थ या दोन्ही बाबतींत सिलोन अतिशय सुपीक व संपन्न असून सिंगली लोक स्वभावतः अल्पसंतुष्ट व आळशी असल्यामुळें या संपत्तीचा त्यांस विशेष कांहीं उपयोग न होतां परकी लोकच तिला आपल्या देशांत वाहून नेत आहेत."

१८९९ च्या लखनौच्या काँग्रेसहून टिळक कलकत्त्यावरून ब्रह्मदेशांत गेले. यावेळींहि त्यांचे बरोबर वासुदेवराव जोशी हे होते. याच सुमारास प्रो. काशिनाथपंत छत्रे यांची सर्कस ब्रह्मदेशांत जावयाची असल्यामुळें छत्र्यांनीं टिळकांना आपल्या बरोबर जाण्याची विनंति केली व ती मान्य करून टिळकांनीं तिकडे जाण्याचा बेत ठरविला. सर्कशीची बोट स्वतंत्र असल्यामुळें तिच्यावर सर्व प्रकारच्या सोई मनाजोग्या होत्या. टिळक रंगूनमध्यें प्रथम पंधरा दिवस होते. नंतर आगगाडीनें मंडालेस जाऊन पुनः रंगून येथें सातआठ दिवस राहून ते कलकत्त्यास परत आले. ब्रह्मदेशांत सर्व ठिकाणीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींचे हिंदु व्यापारी येत, ते आपलीं ज्ञातिबंधनें व धर्मबंधनें तेथेंहि कडक रीतीनें पाळीत. या गोष्टीस उद्देशून टिळक म्हणतात, " ब्रह्मदेश, सयाम, सिंगापूर, जावा वगैरे दूरदूरच्या ठिकाणीं व्यापाराकरितां गेलेल्या हजारों हिंदु लोकांच्या उदाहरणावरून एवढें स्पष्ट होतें कीं, आपली जात व धर्म राखणें ही गोष्ट आपल्या हातांत असते, व त्याबद्दल आपणास योग्य अभिमान असला म्हणजे व्यापाराकरितां किंवा अन्य कारणाकरितां परदेशांत प्रवास करण्यास आमचा धर्म आड येत नाहीं."

सामाजिक वादविवादांत, आधीं सामाजिक कीं आधीं राजकीय, असा तुलनात्मक प्रश्न उपस्थित झाला म्हणजे टिळक नेहमीं ब्रह्मदेशाचें उदाहरण

पुढें करीत असत. हें उदाहरण त्यांच्या मनांत भरण्यास हाच पहिला ब्रह्मदेशांतील प्रवास कारण झाला. त्यांच्या व्याख्यानांतहि त्यांनीं याविषयीं आपले विचार पुढीलप्रमाणें व्यक्त केले होते-"जातिभेदाचा अभाव, धर्मस्वातंत्र्य, स्त्रीशिक्षण, स्त्रियांस सर्व व्यवहार करण्याची मोकळीक, प्रौढविवाह, विधवाविवाह, काडी मोडणें, खाण्यापिण्याची पूर्ण मुभा, वगैरे ज्या ज्या सामाजिक व्यवस्था, सुधारणा म्हणून, घडवून आणण्याकरितां हिंदुस्थानांतील कित्येक विद्वान् गृहस्थ आज पुष्कळ वर्षें खटपट करीत आहेत, त्या सर्व सुधारणा ब्रह्मदेशांत इंग्रजी राज्य होण्यापूर्वींच झालेल्या होत्या असें यावरून आपल्या सहज लक्षांत येईल. परंतु त्यामुळें ब्रह्मी लोकांचे आपापसांतील द्वेष कमी होऊन स्वाभिमान व्हावा तितका जागृत झाला नाहीं, व अखेरीस या त्यांच्यांतील दुहीमुळेंच थीबाचें राज्य लयास गेलें, असें इतिहासावरून दिसून येतें. तेव्हां या व आपल्या समाजाची तुलना करतां, सामाजिक सुधारणेचें राष्ट्रीयदृष्ट्या किती महत्व आहे हा प्रश्न साहजिकच कोणाच्याहि मनांत उद्भवतो. कांहीं कारणांमुळें ब्रह्मी लोक इंग्रजांच्या अमलाखालीं आले असतील; पण पुढें तरी आपला धर्म, आपला देश, आपला व्यापार यासंबंधानें या लोकांत जितकी कळकळ दिसून यावयास पाहिजे होती तितकी-त्यांची सामाजिक स्थिति वर सांगितल्याप्रमाणें कित्येकांच्या मतें अनुकूल असतांहि-हल्लीं दिसून येत नाहीं. तेव्हां अर्थातच सामाजिक सुधारणा व राष्ट्रीय उन्नतीबद्दलची कळकळ या दोन गोष्टींत कायमचा कार्यकारणसंबंध नाहीं, इतकेंच नव्हें तर यांमध्यें विरोधहि असण्याचा संभव आहे असें स्पष्ट दिसून येतें. सामाजिक सुधारणा नको असें माझें म्हणणें नाहीं. घरांतील कांहीं अडचणी त्यानें दूर होऊन आपल्या समाजास त्यापासून कांहीं फायदा होईल; पण राष्ट्रीय किंवा औद्योगिक उन्नति सामाजिक सुधारणा झाल्याखेरीज व्हावयाची नाहीं असें जें कित्येक विद्वानांचें म्हणणें आहे तें चुकीचें आहे असें सीलोन व ब्रह्मदेश यांतील बौद्धधर्मी लोकांच्या स्थितीवरून चांगलें प्रत्ययास येतें. मी मागें जबलपुरास हीच गोष्ट सांगितली होती, पण त्याचा कित्येकांनीं विपर्यास केल्यामुळें पुन्हां तसा प्रकार होऊं नये म्हणून तीच गोष्ट आज स्पष्टपणें सांगितली आहे. देशाची उन्नति व अवनति केवळ सामाजिक सुधारणेवर अवलंबून आहे, असें जें मत आहे तें मला मान्य नाहीं. सामाजिक सुधारणा आधीं कीं राजकीय आधीं याबद्दल आमच्याकडे मागें बराच वाद होता व तेव्हांहि सामाजिक सुधारणेस देतात तितकें महत्त्व देणें योग्य नाहीं असें पुष्कळांनीं प्रतिपादन केलें होतें. ब्रह्मदेशांतील स्थितीवरून हेंच प्रतिपादन खरें आहे असें सिद्ध होतें, येवढेंच काय तें आतां माझें म्हणणें आहे. हिंदुस्थानांतील अनुभवहि अशाच प्रकारचा आहे, हें नेटिव्ह ख्रिस्ती लोकांच्या समाजावरून लक्षांत येण्यासारखें आहे. स्वदेशाबद्दल प्रीति, परस्परांमधील क्षुद्र

भेद किंवा द्वेष विसरून जाऊन देशकार्याकरितां जुटीनें काम करण्याची प्रवृत्ति व संवय, परदेशांत जाऊन नवीन उद्योगाचें ज्ञान संपादन करून घेण्याची उमेद, आपल्या राष्ट्राचें वैशिष्ट्य कायम ठेवण्याबद्दल आस्था इत्यादि गुण राष्ट्रीय उन्नतीस अवश्यक आहेत. हे गुण आपण इकडे ज्यास सामाजिक सुधारणा म्हणतों त्यावर अवलंबून नाहींत, इतकेंच नव्हे तर अशा प्रकारची जेथें सुधारणा झाली आहे तेथेंहि या गुणांचा अभाव असूं शकतो, असें ब्रह्मदेशाच्या स्थितीवरून स्पष्ट नजरेस येतें. ही गोष्ट नजरेपुढें असतां आमच्याकडील कांहीं लोकांनीं सामाजिक सुधारणेसच सर्व सुधारणेंत अग्रस्थान देण्याचा जो प्रयत्न चालविला आहे, तो चुकीचा आहे असें म्हणणें भाग पडतें. राष्ट्रीय उन्नतीस लागणारे गुण निराळे आहेत व ते जागृत ठेवण्यासहि निराळ्याच दिशेनें प्रयत्न करावे लागतात, व हिंदुस्थानची जर आपणांस उन्नति करणें असेल तर याच गोष्टीकडे आपणास प्रथम लक्ष दिलें पाहिजे. कित्येक इंग्रजी ग्रंथकारांनीं सामाजिक सुधारणेकडे हिंदु लोकांनीं जास्त लक्ष द्यावें व तशी सुधारणा झाल्याखेरीज ते राजकीय हक्कांस पात्र होणार नाहींत असा आम्हांस उपदेश केलेला आहे! पण ब्रह्मदेशांतील लोकांस आतां किती राजकीय हक्क मिळतात हें दृष्टीस पडेपर्यंत हा उपदेश कितपत यथार्थ आहे याबद्दल कोणाहि विचारी मनुष्यास शंका येणें अगदीं साहजिक आहे. बंगाली बाबूंस राजकीय हक्क न देण्यास ते शूर व लष्करी पेशाचे नाहींत अशी कित्येक इंग्रज अधिकारी सबब सांगत असतात. पण शीख, मराठे, रजपूत वगैरे लोकांस ते हक्क द्या म्हटलें तर तेहि देत नाहींत, हें आपणांस माहीत आहेच. सामाजिक सुधारणेची महति व त्याबद्दलचा उपदेश अशाच प्रकारचा आहे हें आपण विसरतां कामा नये."

टिळकांच्या या विचारसरणीचा पुष्कळांनीं विपर्यास केला असल्यामुळें त्यांचें या बाबतींतलें उद्गार मुद्दाम सविस्तर दिले आहेत. ब्रह्मदेशाच्या राजकीय परिस्थितींतहि टिळकांना हिंदुस्थानाच्या राज्यकारभाराचें प्रतिबिंब दिसून आलें. "जमिनीचे हक्क पूर्वीचें राज्यांत होते तसेच पाळले जातील असा जाहीरनामा थीबाचें राज्य घेतांना इंग्रजसरकारनें प्रसिद्ध केला होता. तरी उत्तरोत्तर इकडील इनामकमिशनप्रमाणें देवस्थानच्या व इतर नेमणुका कमी करण्याचा सारखा क्रम सुरू आहे. सारांश, हिंदुस्थानांतील ठरीव राज्यपद्धतीच तिकडे सुरू करण्यांत आलेली आहे. या राज्यपद्धतीमुळें ब्रह्मदेशांत इकडच्याप्रमाणें परिणाम घडून येतात किंवा कसें हें आणखी कांहीं वर्षांनीं नजरेस येईल."

ब्रह्मदेशांतील मोठमोठ्या घंटा व सोन्यानें मढविलेले राजवाडे, मद्रासेकडील भव्य मंदिरें, बाजार, तंजावरचा मोठा पुस्तकसंग्रह वगैरे गोष्टीहि टिळकांनीं या प्रवासांत पाहिल्या. पण मुख्यतः त्यांचें लक्ष कोणत्या गोष्टीकडे होतें हें वरील उताऱ्यांवरून स्पष्ट होईल. आणि टिळकांनीं इतर प्रवास केले त्यांच्या हकीकती

त्यांनीं याप्रमाणें लिहिल्या किंवा सांगितल्या नसल्या तरी त्यांत त्यांची दृष्टी अशाच प्रकारची चौकस असावी असें अनुमान सहज करितां येतें. ठिकठिकाणच्या सुशिक्षित विद्वानांशीं संभाषण करून व त्या त्या देशाविषयीं बनलेलीं आपलीं मतें त्यांच्याजवळ बोलून दाखवून त्यावर त्यांचें म्हणणें काय आहे हें ऐकावयास टिळक केव्हांहि तयार असत. अशा तऱ्हेचीं संभाषणें त्यांनीं सुशिक्षित मद्रासी, सिंगली व ब्रह्मी यांच्याबरोबर केलीं होतीं व म्हणूनच या बाबतींत त्यांचीं अनुमानें चुकीचीं ठरण्याचा संभव नव्हता.

असो; टिळकांना सरकारानें सहा महिने आधीं सोडलें ही गोष्ट अँग्लो इंडियन पत्रांना मोठी वाईट लागली. टिळकांचा राजद्रोह व चाफेकरांनीं केलेला खून हीं जवळ जवळ एकाच स्वरूपाचीं कृत्यें असें कांहीं पत्रांनीं ध्वनित केलें होतेंच. पण एका पत्रानें तर गोखल्यांनाहि याच पंक्तिस बसवून, त्यांनीं माफी मागितली होती तरी, त्यांनीं माफी मागण्यासारखे आरोप सोजीर लोकांवर करावे या कृत्याला टिळकांचा राजद्रोह व चाफेकरांचा खुनीपणा यांच्या इतकेंच सदोष ठरविलें होतें. 'ग्लोब' पत्रानें असें लिहिलें कीं "टिळक व गोखले यांसारखे लोक राष्ट्रीय-सभेस हजर राहूं शकतात यावरूनच ही सभा कशा प्रकारची आहे हें आम्हांस कळून चुकलें! स्वतः चाफेकर बंधूंनाच या सभेस हजर राहतां आलें नाहीं ही केवढी दुर्दैवाची गोष्ट! पण चाफेकर बंधूंच्या गैर हजेरीचें दुःख टिळक व गोखले यांच्या हजेरीनें सभेनें कसें तरी भागवून घेतलें." ही टीका होते न होते तोंच पुण्यांत आणखी कांहीं खून झाले. त्यामुळें खुनी कटाची कल्पना टाइम्स वगैरे पत्रांत पुन्हां डोकावूं लागली. हे नवीन खून म्हणजे द्रविडबंधूंचे खून होत, व या खुनांत चाफेकर बंधूंपैकीं सर्वांत धाकटा वासुदेव हा सांपडलेला असून मधला भाऊ बाळकृष्णा हाहि नुकताच पकडला गेला होता. १८९९ जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यांत बाळकृष्ण याची कची चौकशी होऊन फेब्रुआरींत त्याचा खटला सेशनांत निघावयाचा होता. या सुमारास टिळक हे दक्षिणहिंदुस्थानांतील प्रवास करून पुण्यास परत आले होते, व त्यांनीं अद्यापि केसरीचें डिक्लेरेशन केलें नव्हतें. तरी त्यांच्या पद्धतिप्रमाणें एखाद्या नवीन विषयाची योजना करून केस-रीत लिहिण्यास सुरवात करावी असा त्यांचा विचार चालू होता. इतक्यांत द्रविडबंधूंच्या खुनाचे एक गंडांतर येऊन, टिळकांना अकालीं मुक्त केल्याचें जें विष कांहीं अँग्लो इंडियन पत्रांच्या मनांत दबचत होतें तें त्यांनीं बाहेर ओक-ण्यास सुरवात केली. पूर्वीप्रमाणें याहि खुनासंबंधाच्या संशयाचें निराकरण परस्पर झालेंच. पण टिळकांचें नांव व पुण्यांतील खून यांची सांगड कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें घालून बोलण्याला त्यांना कांहीं दिवस संधी मिळाली, व पुढें यांतूनच ग्लोब पत्रावरील फिर्यादीचें प्रकरण निघालें, म्हणून या नवीन खुनांची हकीकत थोडक्यांत सांगतों.

रँडचा खून चाफेकरबंधूंनीं केला अशी मूळ बातमी त्यांचेच मित्र व खेळगडी द्रविडबंधू यांनीं दिली! चाफेकरबंधु व द्रविडबंधु हे सर्वजण पुण्यांतील सदाशिव पेठेंत फार थोड्या अंतरावर राहात असत, व एकमेकांच्या चालचलणुकीची एकमेकांस पुरी माहिती होती. बातमी देण्याचे वेळीं द्रविडबंधूंपैकीं एक गणेश हा खोटे कागद केल्याच्या आरोपावरून तुरुंगात होता. त्याच्या बातमीवरून दामोदर चाफेकराला अटक होऊन, चौकशी होऊन, तो फांशी गेल्यावर सरकाराने गणेश यास तुरुंगांतून सोडून दिलें; व खुनाकरितां जाहीर केलेल्या वीस हजार रुपयांपैकीं दहाहजाराचें बक्षिसहि त्यास दिलें. पण द्रविड यास तें अपुरें वाटलें. कदाचित् चाफेकराचा दुसरा भाऊ सांपडून फांशी गेल्यावर उरलेले दहा हजारांचेंहि बक्षिस देऊं असा सरकारचा बेत असावा. पण द्रविडाला दम निघेना. ' मी बातमी दिली तिच्या आधारावर दामोदर पकडला गेला असतां बाळकृष्ण पळाला हा पोलिसांचा अजागळपणा होय माझा दोष नाहीं; बक्षिसाच्या जाहीर अटीप्रमाणें मी माहिती दिली व ती खरी ठरली; तेव्हां आतांच मला सगळें बक्षीस मिळालें पाहिजे" अशी उघड तक्रार द्रविड यानें अॅडव्होकेट वगैरे पत्रांतून चालविली. शिवाय दहाहजार रुपये बक्षीस देतांना त्यांतलेच दोनशें साठ रु. इनकमटॅक्स म्हणून सरकारानें कापून घेतले याचीहि तक्रार त्यानें केली. यावर ता० ७ फेब्रुआरी १८९९ रोजीं लिहतांना केसरीनें सरकारच्या कंजुषपणाची चेष्टा करून इकडे द्रविडाची तरफदारी केली. पण तिकडे द्रविडांनी दिलेली माहिती साधार जाहीर करण्याविषयीं सरकार रयतेस जबाबदार आहे असेंहि विधान केलें होतें. या टीकेंतील " सरकारास ज्याप्रमाणें द्रविडास आपल्या कृत्याबद्दल जाब दिला पाहिजे " या शब्दांपैकीं " द्रविडास आपल्या कृत्याबद्दल जाब दिला पाहिजे " येवढेंच शब्द टिळकांच्या कोणा शत्रूनें लक्षांत ठेवले होते, किंवा निदान पुढच्या आठवड्यांत द्रविड बंधूचे खून होतांच हे शब्द त्याला आठवले! दामोदरच्या चौकशींत द्रविड साक्षीदार म्हणून आला होता, पण त्यानें बातमी काय व कशी दिली याचा उल्लेख साक्षींत निघाला नाहीं. मात्र सरकारला बातमी पटली होती; फक्त उरलेले दहा हजार केव्हां कोणास द्यावे याचाच वाद चालू होता. ब्रुइनसाहेब उरलेले दहा हजार रुपये द्रविडास देण्याच्या विरुद्ध होते; यामुळें द्रविडाचें व साहेबाचें खडाजंगी भांडणहि याच आठवड्यांत झालें होतें. पण हें बक्षिस बाजूसच राहून द्रविडबंधूंना प्राणास मुकावें लागलें. त्याचा प्रकार असा.

ता. ८ फेब्रुवारी १८९९ रोजीं रात्रीं दहा वाजण्याचे सुमारास द्रविडबंधूंच्या दाराशीं कोणी दोघे इसम आले व त्यांनीं तुम्हांला ब्रुइनसाहेबांनीं बोलाविलें आहे असें हिंदुस्थानी भाषेंत सांगितलें. हे खाली उभे असतांच द्रविडबंधू माडीवरून उतरले व चौघेहि मिळून शेजारच्या खुन्या मुरलीधराचे देवळावरून मंडलिकांच्या चाळीच्या कोंपऱ्यावरून वळले. इतक्यांत पिस्तुलांचे आवाज ऐकूं येऊन "खून खून पोलीस

पोलीस " अशा भयंकर आरोळ्या ऐकूं आल्या. उभयतां द्रविडबंधूंना गोळ्या लागून ते जखमी होऊन पडले, व दोघेहि दुसरे दिवशीं इस्पितळांत मृत्यु पावले. खुनी इसमापैकीं एक पेरूच्या गेटाकडे व एक नागनाथाचे पाराकडे पळून गेला. पोलिसांनीं रात्रीं शहराभोंवतीं नाकेबंदी केली व रेल्वेचे सर्व उतारू तपासले. रात्रींच ही बातमी गांवभर पसरली. अशा रीतीनें वीस महिन्यांपूर्वी गणेशखिंडींत झालेल्या खुनाचा प्रतिध्वनि खुन्या मुरलीधराचे कोपऱ्यावर उमटला ! व फिरून धरपकड, फिरून जादा पोलीस, वगैरे गोष्टींचें भयानक चित्र लोकांच्या कल्पनेपुढें उभें राहिलें. दुसरे दिवशीं या खुनांची बातमी विलायतेस जाऊन तिकडील पत्रांतून टीकेचा भडिमार पुन्हां सुरू झाला. इकडे पोलीस तपास जारी होऊन त्यांत चाफेकरांचा धाकटा बंधू वासुदेव, त्याचे कोणी स्नेही रानडे व साठे, यांना फरासखान्यांत बोलावून नेण्यांत आले. फरासखान्यांत प्रश्नोत्तरें चालू असतां फौजदार रामजी पांडू हे वासुदेवास कांहीं टाकून बोलले, तेव्हां त्यानें आंगरख्यांत लपविलेलें सहाबारी पिस्तुल बाहेर काढून तें प्रथम रामजी पांडू व नंतर ब्रुइन यांजवर झाडलें. तेव्हां वासुदेवावर इतरांनीं झडप घालून त्याच्या हातांतील पिस्तुल काढून घेतलें व हातकड्या घातल्या. लगेच वासुदेव व रानडे यांनीं द्रविडबंधूंचे खून आपणच केले अशी कबूली दिली. त्याबरोबर वासुदेवानें असेंहि सांगितलें कीं उद्यां माझा भाऊ बाळकृष्ण याजविरुद्ध माझी साक्ष व्हावयाची त्यापेक्षां मी आधींच मेलेला काय वाईट ! असें वाटून मी तुम्हा सर्वांचे खून करून नंतर स्वतःचाहि खून करण्याचा बेत केला होता. तात्पर्य, अशा अकल्पित रीतीनें द्रविडबंधूंचे खुनांचा पत्ता लागून पोलिसांच्या नशीबानें गुन्हेगार आपल्याच पायांनीं फरासखान्यांत येऊन कैद झाले. पण पूर्वी सांगितल्याप्रमाणें झाडाच्या देठांतून देठ निघावे त्याप्रमाणें खुनांतून खून निघूं लागल्यामुळें इंग्रजी पत्रांनीं कटाच्या कल्पनेचे घोडे नाचविण्यास सुरवात केली. ता. ७ फेब्रुवारीच्या केसरीच्या अंकांतील 'द्रविडास आपल्या कृत्याचा जाब दिला पाहिजे' येवढेच शब्द उचलून, दुसऱ्या दिवशीं घडलेल्या खुनास केसरीनें ही आदल्या दिवशीं चिथावणी दिली असा युक्तिवाद या पत्रांनीं लढविला. पण या कल्पनेला, खुनी ठरलेले दोघे चाफेकरबंधू किंवा रानडे अगर साठे यांच्या जबाबांत किंवा इतर कोठेंहि कांहीं पुरावा मिळाला नाहीं, व निघणें शक्यहि नव्हतें. बाळकृष्ण, वासुदेव, व रानडे या सर्वांना ता. १२ मार्च रोजीं फाशीची शिक्षा सुनावण्यांत आली, आणि त्यांनींहि ती आनंदानें स्वीकारून 'पुढच्या जन्मांचीहि शिक्षाहि वाटेल तर आतांच द्या' असें ठणठणीत सांगितलें.

हा गोष्टीला उद्देशून मराठा पत्रांत वासुदेव व रानडे यांना दिलदार, धैर्यवान् हीं विशेषणं लाविलीं गेलीं येवढ्याचाच आधार घेऊन फिरून इंग्रज पत्रांनीं टिळकांवर आडवी तिडवी टीका करण्यास सुरवात केली. मुंबईच्या चँपियन पत्रानेंहि या वेळीं 'काळ' पत्रांत आलेल्या कांहीं लेखांनीं चिडून जाऊन, टिळकांनीं काळ पत्राचा

उघड निषेध करावा असें आव्हान करण्याचा उपक्रम सुरू केला. पण ही नसती जबाबदारी टिळकांनीं काय म्हणून स्वीकारावी ! 'प्राप्तौ निषेधः' या न्यायानें हें आव्हान सहजच उडावितां आलें. पण इंग्रजी पत्रांनीं आणि रास्तगोफ्तार वगैरे 'जो हुकूम' पत्रांनीं टिळक व काळपत्र यांचें मागें ससेमिरा चालूच ठेविला. तथापि काळपत्राचा निषेध तर राहोच, पण उलट वासुदेव वगैरे तरुण मुलांचें धैर्य असामान्य होय ही गोष्ट इतर चारचौघांप्रमाणें केसरीनेंहि प्रतिपादण्यास कमी केलें नाहीं. तसेंच काळ पत्रकर्त्यांना राष्ट्रीय सभेंतून बहिष्कृत करावें असा मुंबईच्या कांग्रेस कमेटीनें ठराव केल्यावरून अत्याचार निषेधक असाहि कांहीं लोकांची सहानुभूति उलट दिशेला वळूं लागली. या सालच्या मे महिन्यांत पुण्यास प्रांतिक दरबार झाला त्यांत पोलिटिकल एजंट ऑस्टन साहेब यांनीं, 'संभावित घराण्यांतील मुलें खुनी कां होतात' हा विषय चर्चेस घेऊन त्याची जबाबदारी सरसकट सर्व वर्तमानपत्रांवर टाकण्याचा प्रयत्न केल्यामुळें तर, बाजू पुरीच उलटून नसत्या जबाबदारीचा हा वाद पाण्याहून पातळ होऊन गेला.

टिळकांना तुरुंगांतून आधीं सोडलें व त्यानंतर पुण्यांत आणखी कांहीं खून झाले ही गोष्ट आंग्लोइंडियनपत्रांना आवडली नसल्याचें वर सांगितलेंच आहे. यामुळें त्यांनीं टिळकांविरुद्ध केव्हां सरळ तर केव्हां आडून लिहिण्याचा, व खुनांच्या कल्पनेशीं त्यांच्या शिकवणीचा संबंध जोडण्याचा क्रम चालू ठेवला होता. १८९९च्या अखेरीस मुंबई गव्हर्नरीच्या बदलीची वेळ आली. लॉर्ड सँढर्स्ट यांचे जागीं लॉर्ड नॉर्थकोट येण्याचें ठरलें. नवा गव्हर्नर इकडे येऊं लागला म्हणजे तो आपलीं मतें विलायतेंतच जाहीर करूं लागतो. व विलायती वर्तमानपत्रकारहि त्याला त्याच्या योग्यतेप्रमाणें गौरवून उपदेशाची शिदोरी बांधून देत असतात. लॉर्ड नॉर्थकोट यांना अनेकांनीं जाहीर उपदेश केला त्यांत कॉन्झर्वेटिव ग्लोब पत्रानें ता २८ आक्टोबर १८९९ च्या अंकांत पुण्यांतील चळवळींवर विशेष जोर दिला. "मुंबई इलाख्यांत राजद्रोही मंडळ्यांच्या काळ्या माजून राहिल्या आहेत. त्यांचा पुढारी टिळक कैदेंत टाकल्यापासून चळवळ कमी असली तर ती फक्त दबून आहे. कदाचित् टिळक यांनींच सुरू केली नसली तरी, निदान त्यांच्या तंत्रानें चाललेली, खुनाची मोहिम आतां नजरेस आल्यामुळें गोडबोल्या ब्राह्मणांवर, मराठे राज्य पुनः स्थापण्याची आशा बाळगणाऱ्या ब्राह्मणांवर, नव्या गव्हर्नरांनीं विश्वास टाकूं तर नयेच पण चांगली नजरहि ठेवावी." ग्लोब पत्रांतील हा उतारा विलायतेंतील लोकमत म्हणून मुंबई टाइम्सनें १८ नोव्हेंबर १८९९च्या अंकांत उद्धृत केला, तेव्हां बरीच खळबळ उडाली, लगेच टाइम्सवर बेअब्रूची फिर्याद करण्याचें टिळकांनीं ठरविलें. आणि ता. २३ नोव्हेंबर रोजीं मुंबईच्या चिफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांत फिर्याद दाखल देखील झाली. ना. मेथा यांनीं या कामीं टिळकांचें वकीलपत्र घेतलें होतें, आणि दैनि-

यन विरुद्ध केसरी व काळ असा जो एक वाद उपस्थित झाला होता त्याच्या दृष्टीनें पाहतां ना. मेथांनीं टिळकांचें वकीलपत्र घ्यावें यांत पुष्कळच स्वारस्य होतें. मॅजिस्ट्रेट स्लेटर हे भोळे किंवा मूर्ख असल्यानें त्यांनीं मेथांना असा प्रश्न केला कीं टिळकांवर राजद्रोहाचा खटला झाला होता ना ? त्याला मेथांनीं, टिळकांच्या खटल्यांत खुद्द ॲडव्होकेट जनरल यांनीं दिलेल्या कबुलीचें, उत्तर देऊन खुटविलेंच; परंतु राजद्रोह व खून या गोष्टींत जणूं काय कांहीं अंतरच नाहीं अशी भोळी समजूत करून घेतल्याप्रमाणें लोक तेव्हां कें बोलत असत याचें हें एक उदाहरण आहे येवढेंच लक्षांत ठेवावयाचें.

असो. बदनामीकारक मजकूर आधीं छापून मागाहून माफी मागण्यास इंग्रजांना फारशी दिक्कत वाटत नसते. त्यांनीं माफी ही गोष्ट मामुली करून टाकल्यानें तें काम सोपें होऊन जातें. फिर्याद दाखल झाली असें कळतांच समन्सची वाट न पाहतां दुसऱ्याच दिवसच्या अंकांत टाइम्सनें आपली माफी प्रसिद्ध केली. मजकूर संपादकानें न पाहतां दुर्दैवानें छापला गेला, तो आधीं नजरेला आला असता तर काढून टाकला असता, या कामीं ग्लोबचीं मतें व आमचीं मतें एक नाहींत, मजकूर अन्यायाचा व निराधार असून तो छापला गेल्याबद्दल आम्हांस वाईट वाटतें, असें या माफींत लिहिलें होतें. तथापि ता. ८ डिसेंबर रोजीं खटला ठरल्याप्रमाणें चौकशीस निघाला, तेथेंहि पुनः टाईम्सच्या बॅरिस्टरानें माफीच्याच मजकुराचा पण विस्तारपूर्वक पुनरुच्चार केला; व संपादकाची ही पहिलीच चूक आहे असें म्हणून खटला काढून घेण्याविषयीं विनंति केली. उलटपक्षीं ना. मेथा यांनीं असें सांगितलें कीं, टिळकांविरुद्ध असल्या विषारी टीकेची मोहीम सुरू असल्यामुळें त्यांना हा वाद कोठें तरी थांबवावा लावणें प्राप्तच होतें म्हणून त्यांनीं ही फिर्याद केली असून, सरसकट उलटतपासणी करून घेण्यास ते कोर्टांत हजरहि राहिले आहेत. त्यांना कोर्टानें हवत घ्यावी व कोणाला काय कुचाळ विचारून मळमळ फेडून घ्यावयाची असेल ती त्यानींहि फेडून घ्यावी. मात्र आढून बोलणारा या कुत्सितपणाचा गोष्टीचा यापुढें थांबलाच पाहिजे. पण हें आव्हान कोणीच स्वीकारिलें नाहीं. टिळकांची कधानी माफी नाहीं व मॅजिस्ट्रेट साहेबांनी उभयपक्षाला भलेपणा देऊन, स्वतःचा आनंद प्रदर्शित करून, फिर्याद काढून घेण्यास परवानगी दिली.

अशा रीतीनें टिळकांचा दुय्यम गुन्हेगार माफी मागून मोकळा झाला तरी मुख्य गुन्हेगाराचा म्हणजे ग्लोब पत्राचा समाचार घेण्याचें काम राहिलेंच होतें. ग्लोब पत्र विलायतेंत, आणि हिंदुस्थानांत कायदेशीर भांडण मांडावयाचें म्हणजे मोठ्या खर्चाचें व कांहींसें परिश्रमानें काम म्हणून तें मात्र टिळकांना सुटकीनें उरकता आलें नाहीं. प्रथम ग्लोब पत्राला नोटीस देण्यात आली. पण ती त्यानें धुडकावून लावून माफी मागण्याचें साफ नाकारलें. तेव्हां मुंबईचे सॉलिसिटर हरि सीताराम

दीक्षित यांच्या मार्फत लंडन येथील सॉलिसिटर हरोल्ड व डाउनर यांना वकीलपत्र देऊन लंडन हायकोर्टात फिर्याद मांडण्याचें काम सुरू झालें. या कामीं पैसा बराच लागणार, पण त्याकरितां नवीन फंड जमविणें हें थोडेंसें सुमार वाटल्यामुळें तसें करण्यांत आलें नाहीं. मात्र पूर्वीच्या टिळकफंडापैकीं कांहीं पैसे शिल्लक होते, व ते या खटल्याकडे खर्च करणें अयोग्य होणार नाहीं असें त्या फंडाच्या चालकांस वाटल्यावरून तशा अर्थाचें सर्क्युलर फंडाचे अध्यक्ष डॉ. नानासाहेब देशमुख यांनीं काढून फंड–कमेटीच्या सभासदांची संमति मिळविली. या फंडांतून या कामावर पैसे खर्चणें योग्य असून शिवाय फिर्यादीचा निकाल टिळकांसारखा झाल्यास ग्लोब पत्राकडून नुकसानभरपाई दाखल चांगली रक्कम मिळून ती परत या फंडांत येऊन पडेल अशीहि या कमेटीस आशा वाटत होती. ता. ३० मार्चच्या पत्रांत टिळकांचा लंडनचा सॉलिसिटर लिहितोः—"ग्लोबच्या तर्फे नामांकित बॅरिस्टर येणार असून त्याच्या तोडीला तुम्हालाहि तसाच नामांकित बॅरिस्टर दिला पाहिजे. ॲस्किथ बडा मुत्सद्दी आहे पण तितका चांगला वकील नाहीं, म्हणून सर एडवर्ड क्लार्क, मि. कार्सन, सर रॉबर्ट रीड, लॉसनवाल्टन या अनुक्रमानें मिळेल तो बॅरिस्टर घ्यावा. मात्र पैशाची भरपूर तजवीज करा. हजारों रुपये लागतील. नुसतें ब्रीफ वाचण्याला हजारों रुपये घेत असतात. टिळकांनीं माफीबरोबर नुकसानभरपाईदाखल स्वतःला कांहीं रक्कम न मागतां एखाद्या धर्मकृत्याला ती देण्याविषयीं सुचविलें आहे. पण हा फारच उदारपणा झाला! असें करूं नये. प्रथम तरी व्यक्तिशः नुकसानभरपाई म्हणून बरीच रक्कम मागावी." अशा रीतीनें सर्व तयारी झाली. पण फिर्यादी म्हणून स्वतः टिळकांची जबानी व्हावी लागणार, या करितां टिळकांनीं विलायतेस गेलें पाहिजे असेंहि सुचविण्यांत आलें व त्याप्रमाणें जाण्याची टिळकांनींहि तयारी केली. पण शेवटीं या थरापर्यंत गोष्ट गेली नाहीं. ग्लोब पत्रानें प्रथम टिळकांचें आव्हान धुडकावून लाविलें पण अखेर वकिलांच्या पोक्त सल्यावरून त्यानें टिळकांची माफी मागण्याचें कबूल केलें. आम्ही अपराधी ठरलों तर वाटेल ती नुकसानी भरून देऊं, पण मुळीं गुन्हाच घडला नाहीं म्हणून माफी मागत नाहीं व धर्मार्थ दंडहि देत नाहीं हें पहिलें दांडगाईचें उत्तर टिकलें नाहीं. ता. २८ जून १९०० रोजीं लंडन हायकोर्टांत दावा दाखल होऊन तींत ७५००० रुपये नुकसानीदाखल मागण्यांत आले. तेव्हां ग्लोबनें प्रथम टिळकांकडून शंभर पौंडांचा जामीन खर्चाकरितां घेवविला, व पुरावा गोळा करण्याकरितां म्हणून नोव्हेंबरपर्यंत मुदती मागून घेतल्या. पण असल्या भलत्या विधानांना पुरावा कोठून मिळणार? पुरावा मिळण्यासारखा असता तर टाइम्सनें माफी कां मागितली असती? व सरकारानेंहि टिळकांवर थेट खुनाच्या कटाचा आरोप आणावयाचा टाकून नुसत्या राजद्रोहाच्या आरोपावरच कां भागविलें असतें?

असो; पुराव्याची निराशा झाल्यावर प्रथम "नुसता तुमचा खर्च देऊं, फिर्याद काढून घ्या," मग "खर्च देतों, पन्नास पौंड दंड देतों" व शेवटीं "खर्च देतों दंड देतों, माफीहि मागतों पण खटला काढून घ्या" अशा क्रमानें ग्लोब ताळ्यावर आला. माफीच्या अटी स्वतः टिळकांनीं पसंत कराव्या असेंहि ठरलें. पण प्रतिपक्षाला असें शरमिंधे करण्याचें अप्रिय काम टिळकांनीं आपल्याकडे घेतलें नाहीं. टिळकांच्या सल्लागारांनींच तें परस्पर केलें. टिळकांच्या सॉलिसिटरनीं ग्लोबच्या सॉलिसिटरला असें लिहिलें कीं, "आम्ही माफीचा मसुदा पाठविला आहे तो मुळींच वावगा नाहीं. स्वतः टिळकच मसुदा देते तर ते अधिक व्यापक शब्दांनीं तो लिहिते. पण त्यांना ग्लोबच्या संपादकास वाजवीहून अधिक कमीपणा आणण्याची इच्छा नाहीं. तथापि, टिळकांची येवढी मात्र इच्छा त्यांनीं संपादक महाशयांस कळविण्यास सांगितली आहे, ती ही कीं, हिंदुस्थानसंबंधी लेख लिहिणाऱ्या विलायती वर्तमानपत्रकारांचे हेतु चांगले असतील, परंतु त्यांनीं इतःपर तरी अधिक माहिती मिळवून लिहिण्याची खबरदारी घ्यावी." ग्लोबची ही माफी ता. २४ नोव्हेंबर १९०० च्या अंकांत अग्रलेखापुढें ठळक जागीं छापण्यांत आली व हें प्रकरण अशा रीतीनें संपलें. पुण्याचा ब्राह्मण म्हटला म्हणजे राजद्रोही व खुनी असावयाचा अशी टीका करण्याची जी संवय इंग्रज लोकांना सरसकटक लागली होती तिला कोणीतरी आळा घालणें जरूर होतें; व पुण्यांतील प्रमुख ब्राह्मणाला असा आळा कोर्टांत उभें राहून घालतां आला हें एका अर्थानें औचित्याला धरूनच झालें. कोणी असें सांगतात कीं ग्लोबच्या माफीची बातमी न्या. रानड्यांना समजली तेव्हां त्यांच्या भोंवतीं त्यांच्या पक्षांतील अनेक मंडळी कांहीं कामाकरितां येऊन बसलेली होती. त्यांना उद्देशून रानडे म्हणाले "पहा हें टिळकांचें उदाहरण. टिळकांचा स्वभाव एरवीं कसाहि असो, पण एखादें काम हातीं घेतल्यावर निश्चयानें त्याची पुरी तड लावीपर्यंत थांबावयाचें नाहीं व त्या प्रीत्यर्थ पडतील ते श्रम सोसावयाचे हा त्यांचा मोठा अनुकरणीय गुण होय. हा गुण आपल्या पक्षाच्या मंडळींत असावा तितका नाहीं असें मला म्हणावें लागतें."

टिळकांना किंचित् स्वस्थतेचे असे जर कांहीं दिवस केव्हां लाभले असले तर ते १८९८–९९ या दोन सालींच असें म्हणण्यास हरकत नाहीं. १९०१ सालापासून ते ताईमहाराजांच्या खटल्याच्या चक्रांत जे एकदां सांपडले ते पुढें जवळजवळ मृत्यूपर्यंत त्यांतून बाहेर निघाले नाहींत. या चक्राच्या पहिल्या घक्यानें त्यांना अगदीं जमीनदोस्त करण्याचा बेत आणला होता; पण पुढें फौजदारी मुकदम्यांतून निर्दोष ठरून त्यांची मुक्तता झाली, आणि नंतर खालच्या कोर्टापासून तों प्रिव्ही कौन्सिलपर्यंत त्यांनीं सगळे दिवाणी दावे एकामागून एक जिंकले. या बाबतींतला शेवटचा एक विजय ज्या अखेरच्या आजारांत ते मरण पावले त्याच्या पहिल्या दिवशींच टिळकांनीं मिळविला होता. कमींतकमी एकवीस वर्षें या ताई-

महाराज प्रकरणाची चिंता त्यांच्यामागें होती, व या प्रकरणानें त्यांचें रक्त इतकें खाल्लें कीं त्यामुळें त्यांचें आयुष्य पांचचार वर्षांनीं तरी कमी झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबंच १९०२-३ सालापासून लॉर्ड कर्झन यांच्या बंगालच्या कारकीर्दीमुळें अभूतपूर्व अशा प्रचंड राष्ट्रीय चळवळीचें वॉड लागलें, तींत प्रथम कांहीं दिवस त्यांच्याकडे जरी केवळ प्रांतिक पुढाऱ्याचा मान होता, तरी पुढें लवकरच ते या चळवळींतील सर्व हिंदुस्थानचे मिळून एक प्रमुख पुढारी बनले; व हा मान मरणकाळपर्यंत त्यांजकडे राहिला इतकेंच नाहीं तर तो पायरी पायरीनें वाढतच गेला. हे दोन उद्योग मिळून टिळकांना यापुढें खरी स्वस्थता अशी केव्हांच मिळाली नाहीं. म्हणून या ठिकाणीं या पहिल्या काळांतील त्यांच्या फुटकळ गोष्टींची थोडीशी माहिती देतों.

१८९१ पासून १८९९ पर्यंत टिळकांचें वास्तव्य सदाशिव पेठेंतील श्रीमंत सरदार विंचूरकर यांचे वाड्यांत असे. श्रीमंत बाळासाहेब विंचूरकर यांचा टिळकांविषयीं अत्यंत आदर असे. टिळकांनींहि विंचूरकरांना हरएक प्रकारची सल्लामसलत द्यावी, कायद्याचे आधार काढून द्यावे व वेळोवेळीं अर्जहि लिहून द्यावे यामुळें टिळक स्वतः होऊन वाडा सोडून जाईपर्यंत मालकांनीं त्यांना केव्हांहि जा असें म्हटलें नाहीं, येवढेंच नव्हे तर हळू हळू सर्व वाडा त्यांनीं टिळकांना वापरावयास दिला. येथेंच टिळकांनीं आपले वकीलीचे वर्ग, ते भटांचे वाड्यांतून काढल्यावर, ठेविले होते. वाड्यांत मागेंपुढें मोठीं आंगणें, बाग, हौद वगैरे सर्व सोयी असत. यामुळें गणपतिउत्सवाचे समारंभ, सभा, व्याख्यानें, मेळे वगैरे सर्व गोष्टी या वाड्यांत होऊं शकत. १८९७ सालापर्यंत खेड्यांतले संस्थानिक लोकहि केव्हां केव्हां टिळकांकडे पाहुणे म्हणून उतरत. बरोबरीचे कायदेकौन्सिलर किंवा सरकारास अद्याप फारसे अप्रिय न झालेले महाराष्ट्राचे प्रतिष्ठित पुढारी या नात्यानें टिळकांचा संसर्ग संस्थानिकांना यावेळीं त्रासदायक न होता भूषणावहच वाटत होता. १८९७ पासून मात्र पारडें फिरलें हें सांगावयास नकोच. वाड्यांत माणसांची रहदारी किंवा गर्दी नाहीं असें क्वचितच घडे. १८९१ पासून १८९७ पर्यंत केसरी ऑफिस आर्यभूषण छापखान्यांतच असल्यामुळें घरीं कारखाना असा कांहीं नव्हता. त्यानंतर केसरीचें हपीस स्वतंत्रपणें धोंडोपंत विध्वंस यांनीं प्रथम याच वाड्यांत सुरू केलें. पण विंचूरवाड्यांतील जागा या कामास अपुरी असल्यामुळें पुढें गायकवाडवाडा खरेदी होईपर्यंत सदाशिवपेठच्या हौदानजिक कोंपऱ्यावरील गांधी यांचे घरीं केसरीचें हपीस नेण्यांत आलें होतें. पण खुद्द केसरी छापण्याचें काम अद्यापि बाहेरच होत असल्यामुळें केसरीची कचेरी लहानच होती. संपादकमंडळापैकीं केळकर, खाडिलकर, मुख्य व्यवस्थापक धोंडोपंत विध्वंस व दोनतीन कारकून अशी लहानशीच ही कचेरी होती. कारणपरत्वें टिळक येथेंच येऊन केसरीचा मजकूर

वगैरे सांगून लिहीत. पैशाअडक्याची व्यवस्था या वेळीं करण्यासारखी अशी फारशी नव्हती. यापूर्वी चित्रशाळा हीच टिळकांच्या बँकेचें म्हणजे बहुतेक सर्व देवघेवीचें काम करी. पण स्वतंत्र कचेरी व स्वतंत्र छपील केल्यापासून हा व्यवहार इकडे सुरू झाला.

खटल्याचे वेळीं केसरीचे वर्गणीदार सुमारें सात हजार होते, ते खटल्यापासून वाढण्यास सुरुवात झाली, व १८९९ अखेर हा आंकडा दहा अकरा हजारांपर्यंत गेला होता. मराठ्याचे वर्गणीदार एक हजाराच्या आंतबाहेर प्रथमपासूनच असत. ते कधीं फार वाढले नाहींत व कधीं फार कमीहि झाले नाहींत. केसरीची वर्गणी एक रुपाया होती. मराठ्याची वर्गणी टपालहंशीलासह बाहेरगांवीं सव्वासात, शहरांत सहा रुपये सहा आणे व फुटकळ अंकास चार आणे अशी असल्यामुळें, आणि पत्र इंग्रजी असल्यामुळें, त्याचा प्रसार अर्थात्‌च पुष्कळ कमी होता. पण केसरीनें मतें परप्रांतांतून फैलावण्याकरितां केसरीचेंच एक मुदिसखाल म्हणून टिळकांनीं केसरीस कर्ज असतांहि हें पत्र चालू ठेविलें होतें, हें पूर्वी एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. टिळकांच्या गैरहजेरींत केळकर यांनी मराठा, व केळकर आणि खाडिलकर यांनीं केसरी चालविला, टिकविला, व त्यांच्या लोकप्रियतेत कमीपणा येऊं दिला नाहीं यामुळें हे दोघेहि कायमचे मदतनीस म्हणून टिळकांनीं यापुढेंहि योजले. स्वतः टिळक व हे दोन मदतनीस येवढ्यांत मिळून हीं दोन्हीं पत्रें चालण्यासारखीं होतीं. १८९६ पासून १८९९ पर्यंत टिळकांना लॉ क्लासांत केळकर हे जोडीदार असत. पण १८९९ पासून पुढें लॉ क्लास प्लेगमुळें बंद झाला तो फिरून उघडावयाचा नाहीं असें टिळकांनीं ठरविलें. नित्य नियमानें केसरीचें एखादें आर्टिकल लिहिणें व जरूरीप्रमाणें मराठ्यांतहि एखादें आर्टिकल लिहिणें या गोष्टीला टिळकांना विशेष वेळ लागत नसे. त्यांचा अवांतर कामांतच यापेक्षां अधिक वेळ पुढें जाऊं लागला; पण या वर्षदोनवर्षांत असलें काम त्यांना विशेषसें पडलें नाहीं, यामुळें हे दिवस थोडे स्वस्थतेचे लाभले. वास्तविक याच दिवसांत पुण्यास अतीशय प्लेग असल्यामुळें कोणासहि, एरवीं लाभलेली स्वस्थता नित्य काळजीमुळें अंगी लागण्यासारखी नव्हती. पण प्लेग असो कीं कांहीं असो टिळकांनीं पुणें केव्हांच सोडलें नाहीं. घरच्या सर्व मंडळीसह इनाक्युलेशनहि न करून घेतां ते विंचुरकराचे वाड्यांतच रहात.

टिळकांचें कुटुंब केव्हांहि फार मोठें नव्हतें. स्वतः त्यांना भाऊ नव्हता, व एक बहीण होती तीहि नेहमीं कोंकणांत आपल्या घरीं असे. टिळकांचे चुलते हे वेगळेच रहात. यामुळें घरीं टिळकांची बायको, तीन मुलगे व दोन मुली व दोघे भाचे, थोरले धोंडोपंत व धाकटे गंगाधरपंत, येवढाच काय तो परिवार असे. टिळकांच्या थोरल्या मुलीचें (कृष्णाबाई) लग्न यापूर्वीच झालेलें होतें. ती नाशिक येथील पुढारी वकील गंगाधर नरसिंह ऊर्फ बापूसाहेब केतकर यांचे चिरंजीव विश्वनाथ-

पंत यांस दिलेली होती. बापूसाहेब केतकर हे सुधारक व प्रार्थनासमाजिस्ट या नांवानें उल्लेखिले जात. तथापि त्यांचें शील व स्वभाव दोन्हीहि टिळकांना पटण्यासारखीं असल्यामुळें, हे व्याही वेगवेगळ्या सामाजिक मताचे होते तरी त्यांचा शरीरसंबंध उभयतांस सुखावह असा झाला. किंबहुना बापूसाहेब केतकर हे वचनाला जागणारे व पापभीरु असल्यामुळें टिळक त्यांची नेहमीं वाखाणणी करीत. हे दोघेहि बडेजावाचे भोक्ते नसल्यामुळें हें लग्न पुण्यांत या कानाचे या कानास न कळतां झालें होतें. टिळकांचा थोरला मुलगा विश्वनाथ हा या वेळीं सुमारें १५ वर्षांचा असून शाळेंत शिकत होता, व सर्वांत धाकटा मुलगा श्रीधर उर्फ बापू हा या वेळीं अवघा तीन वर्षांचा होता. या दोहोंच्या मध्यें टिळकांना पांच अपत्यें झालीं होतीं, पण त्यांतल्या दोन मुली दुर्गाबाई व मथूबाई आणि मुलगा रामचंद्र येवढींच हयात होतीं. मुली अद्यापि लहान व मधला मुलगाहि मुंजीस आलेला नव्हता. घरीं घरकामाला आचारी किंवा गडी कोणी नसे. क्वचित् मिळाल्यास एखादे वेळीं एखादी स्वयंपाकीण असे. किरकोळ झाडलोट वगैरे केसरी कचेरींतील एखादा पोरवजा गडी करी. घरीं पाहुण्यांची ये–जा सामान्यतः फारच असे, व त्यांची व्यवस्था धोंडोपंत व गंगाधरपंत हे करीत. मनुष्यबळाशिवाय हें सर्व काम असें घरच्या घरीं भागण्याचें मुख्य कारण हें कीं टिळकांच्या गृहप्रपंचांत तालेवारी किंवा बडेजावी कशांतच नसे. फुकट श्रीमतीचें एक लक्षण म्हणजे चहा हा मात्र घरीं सर्वजण घेत, पण या पलीकडे नित्य काय किंवा नैमित्तिक काय जेवणाखाणांत किंवा इतर कशांत श्रीमंतीचा मागमूसहि नव्हता. सर्व घरांत मिळून चारदोन गाड्या इतकेंहि सामान निघण्यासारखें नसेल. येऊन जाऊन स्वतः टिळकांचें सामान म्हणजे एक लिहिण्याचें ड्रावर डेस्क, दोन खुर्च्या एक पुस्तकाचें कपाट व शेल्फ. नाहीं म्हणावयाला एक इझीचेअर असावयाची. टिळक झोंपी गेले नसतील असा दिवसाचा निम्माअधिक भाग त्यांचा या इझीचेअरवर जाई. लोकांशीं बोलणें चालणें वादविवाद करणें या खुर्चीवरूनच होई. रागालोभाच्या सर्व गोष्टी, हास्यविनोद, नव्या चळवळींची उठावणी वगैरे सर्व गोष्टींचें त्यांचें अधिष्ठान ही एक इझीचेअर होय! वर्तमानपत्रांचा मजकूर लिहावयाचा तो टिळक स्वतः कधीं हातानें लिहित नसत. इझीचेअरवर पडल्यापडल्या तो ते लेखकास सांगत, व अशा वेळीं हाताला क्रिया म्हणजे अडकित्ता घेऊन सुपारी कातरून मधून मधून तोंडांत टाकणें इतकीच असे. विशेष भानगडीचा किंवा त्रासदायक असा मजकूर लिहावयाचा असतां विचाराचें भरांत मधून मधून तळहात आपल्या डोक्यावर मारण्याची त्यांना संवय असे. यापूर्वी टिळक स्वतः जवळ टेबल खुर्चीहि बाळगीत नसत असें सांगतात व तेव्हां लिहिण्यास कारकूनहि नसल्यामुळें गुंडाळलेल्या वळकटीचें टेबल करून सतरंजीच्या खुर्चीवर बसून ते जो काय लिहावयाचा तो मजकूर लिहित. नाहीं म्हणावयास पूर्वी काय व

नंतर काय स्वतः हातानें न लिहिणें वाईट दिसेल अशीं महत्वाचीं तेवढींच पत्रें ते आपल्या हातानें लिहीत.

टिळकांचा साधेपणा त्यांच्या सर्व कुटुंबांतहि दिसून येत असे. स्वतः टिळकांचे अंगावर एका तांबड्या पगडीशिवाय रंगीत असें कोणतेंच वस्त्र नसे. नेसावयाचें साधें गिरणीमाल धोतर, एक मांजरपाटी धुवट सदरा, पांढरा स्वच्छ आंगरखा व दोनअडीच रुपये किंमतीच्या नागपुरी उपरण्या जोडींतील एक पान येवढाच त्यांचा पोषाक असे. त्यांनीं हातरुमाल देखील सहसा कधीं वापरला नाहीं व साध्या चारसहा आण्याच्या काठीपेक्षां बहुमोल काठीहि हातांत घेतली नाहीं. अगदीं प्रथम कांहीं दिवस टिळक पगडी न घालतां पागोटें घालीत, पांढऱ्या ऐवजीं रंगीत आंगरखा घालीत, व सदऱ्यावर जाकीटहि असे. अशा पोषाखांतील सुमारें १८८८ ८९ च्या सुमाराचा एखादा त्यांचा फोटो पहावयास मिळतो. पण आम्हीं टिळकांना प्रथम १८९५ सालीं पाहिलें, तेव्हांपासून त्यांचा पोषाख वर दिल्याप्रमाणें बिनजाकिटी व पांढरा शुभ्रच असे. नाहीं म्हणावयास लोंकरीचा एक शॉर्ट कोट व टोपी असे, त्यांची पाळी सिंहगडावर केव्हां आल्यास येई. एरवीं सिंहगडावर काय किंवा घरीं तरी काय टिळकांचे दिवसांतील पंचवीस तास उघड्या अंगानेंच जात. घरीं कोणी पाहुणा किंवा भेटण्यास प्रतिष्ठित सद्गृहस्थ आला तरी त्याला मी उघड्या अंगानें कसा भेटूं ही शंका टिळकांच्या मनाला सहसा शिवली नाहीं. स्वतः टिळकांप्रमाणें त्यांच्या बायकोचाहि कपडालत्ता अगदीं साधा असे. चीट, पातळ, जरतार असल्या वस्त्राचा या बाईंना कधीहि स्पर्श झाला नाहीं, व खणलुगडीं केव्हां केव्हां रेशमी असलीं तरी तीं होताहोईं तों किमान किंमतीचीं असत. पण कपड्यालत्त्यापेक्षांहि या बाईच्या वर्तनांत दुसरा एक अलौकिक प्रकारचा साधेपणा असे. त्यांनीं घरचा उंबरठा कधींहि सोडला नाहीं. व खास घरच्या मनुष्याखेरीज इतरांशीं, च लचलाऊ प्रश्नोत्तरादाख हि, त्यांनीं संभाषण केलें नाहीं. आपलें घर व घरचीं मुलें माणसें यांखेरीज त्यांना अन्य व्यवसाय कधीं कांहींहि नव्हता. त्यांनीं जसें कधीं हातांत एखादें पुस्तक किंवा वर्तमानपत्र घेतलेलें कधीं कोणी पाहिलें नसेल तसेंच परक्या स्त्रीशींहि बाहेरच्या ओटीवर बसून त्या बोलत चालत आहेत असेंहि कोणी पाहिलें नसेल. कथापुराण तर नाहींच, पण सामान्य देवदर्शनालाहि वर्षातून त्या दहापांच वेळां तरी जात असतील की नाहीं याची शंकाच वाटते. घरीं दारीं माडीवर टिळकांकडे अनेक लोक येत, पण निकट परिचयाच्या लोकांना देखील टिळकांच्या स्त्रीचा आवाज आपण कधीं ऐकला असेल काय अशी डोकें खाजवून आठवणच करावी लागेल. येणाराजाणारांनीं घराचें अंगण गजबजलेलें असावयाचें, पण तेथें कधीं कोणी खेळ करणारा किंवा गाणीं म्हणणारा भिक्षेकरी, फार काय पण भांडीकुंडीं विकणारा फेरीवालाहि आलेला सहसा दिसावयाचा नाहीं. घरची आण–नें

बाजारहाट उमयतां मार्च्यांनी करावयाचा. स्वतः टिळकांनीं बाजारांत जाऊन कधीं एक पैचा जिन्नस विकत घेतला नाहीं, किंवा कोणता जिन्नस किती किंमतीला आणला याची कधीं चासाशीसच काय पण विचारसुद्धांहि त्यांनीं कधीं केली नाहीं. पानावर जिन्नस पडेल तो निमूटपणें, चवदार बेचव असेल तसा, खावयाचा; वाईट झाला तरी रागवावयाचें नाहीं व चांगला झाला तरी त्याची चव घेत मजेनें जेवावयाचें असेंहि नाहीं. खरोखरच जठराग्नीला गोळाभर भात द्यावयाचा व हातावर पाणी पडलें कीं माडी गांठावयाची असाच त्यांचा क्रम असे. दिवसा ते गव्हाची पोळी तरी खात. पण रात्रीं कोंकण्या पद्धतीनें घरची सर्व मंडळी प्रायः नुसता भातच खाई. टिळकांची येऊन जाऊन मोठी चैन म्हणजे केव्हांतरी सोडावॉटर व उन्हाळ्या दिवसांत बर्फ घातलेलें सोडावॉटर किंवा लिंबरेड.

घरच्या इतर गोष्टींप्रमाणें मुलांकडेहि त्यांचे विशेष लक्ष्य नव्हतें. ते कधीं मुलें आंगाखांद्यावर घेऊन खेळवीत बसलेले कोणी क्वचित पाहिले नसतील, मग त्यांचे लाड करणें तर दूरच. मुलें आजारीच पडली तर मात्र कुटुंब वैद्य डॉ. गर्दे यांस जरूर तेव्हां बोलावून आणून औषध योजनेंत स्वतः लक्ष घालीत. शाळेंतील विषय ते मुलांना शिकवीत बसत नसत. पण संध्या पुरुषसूक्त वगैरे शिकविण्याला, तसेंच शाळेंतील धडे वगैरे शिकवून करवून घेण्याला जरूरीपुरता शिक्षक ठेवीत. धार्मिक आचाराच्या दृष्टीनें पाहतां टिळकामध्यें म्हटला तर धार्मिकपणा होता, पण त्याचें स्तोम माजविलेलें केव्हांहि दिसत नसे. श्राद्धपक्ष श्रावणी वगैरे नैमित्तिक गोष्टी ते नियमानें करीत. घरीं वडिलार्जित देवहि होते, पण स्वतः टिळकांनीं बसून कधीं देवपूजा केली किंवा संध्येचीं तरी चार आचमनें टाकलीं असें झालें नाहीं. १८९१ पासून पुढें तर ग्रामण्याचाच बखेडा माजलेला होता. पण त्याच्याहि पूर्वीं कधीं होमहवनें, व्रतवैकल्यें, ब्राह्मणांच्या सभा व दंफार, षोडषपुजनादि आचार त्यांनी फारसे पाळले नाहींत. सोवळें नेसून जेवावयास बसण्याविषयीं मात्र त्यांचा कटाक्ष होता, व पंगत बिघडूं नये म्हणून दाजीसाहेब खरे यांचेसारखे त्यांचे मुंबईचे केहीसोबती आले तरी ते टिळकांचे घरीं सोवळें नेसूनच जेवावयास बसत.

टिळकांकडे येणारी जाणारी मंडळी रोजची बरीच असे. तथापि त्यांच्या अंतरंगांतील जेटी असे फार थोडे असत. ज्याच्या त्याच्याशीं वागणूक ज्याच्या त्याच्या लायकीपरत्वांहि उपयोगाप्रमाणें, ठेवावयाचा असें टिळकांचें साधारण तत्त्व असे. उपयोगी पडणारा मनुष्य असेल तर तो इतर रीतीनें स्वभावास न पटणारा म्हणून त्यांनीं दुराग्रहानें कधीं वर्ज मानला नाहीं, आणि उपयोगी नसेल तर, एरव्हीं तो कितीहि चांगला असला तरी, आपण होऊन त्याचें आर्जव करावयाचें किंवा स्नेह संपादावयाचा अशीहि गोष्ट ते करीत नसत. टिळकांना थोडेंबहुत महत्त्व प्राप्त झाल्यापासून त्यांच्या भोंवतीं सदुपयोगी निरुपयोगी अशा सामान्य माणसांची इतकी

गर्दी असे कीं त्यांना त्यांतून निवडच करावी लागे. पण चार मंडळी भोंवतीं घेऊन अनेक विषयांवर गप्पागोष्टी करणें, व कोणत्याहि गोष्टीत आपलीं मतें लोकांच्या गळीं उतरविण्याकरितां आग्रहानें प्रतिपादणें, या गोष्टींची टिळकांना मनापासून आवड असल्यामुळें वरवर पाहणारास त्यांच्या अंतरंगांतील कोण हें सहसा कळत नसे. पण त्यांचें अंतरंगहि विविध प्रकारचें असल्यामुळें टिळकांची आवडनिवड संकुचित असणें शक्यच नव्हतें. नाहीं म्हणावयाला १८९९ पर्यंत त्यांच्या अगदीं अंतरंगांतले विश्वासू स्नेही म्हटले म्हणजे चित्रशाळेचे मालक वासुदेवराव जोशी, बडोद्याचे रावसाहेब आपटे, मुंबईचे दाजीसाहेब खरे हेच असत. गांवांतल्या एखाद्या चळवळीतील गुप्त डाव योजणें, एखादी गुप्त बातमी कोठें तरी छिद्र पाडून आणविणें, बाहेर न बोलण्याचें धोरण ठरविणें, किंवा पैशा-अडक्याची व्यवस्था करणें या गोष्टी घरील गृहस्थ व घोंडोपंत विध्वंस यांच्या सल्ला-मसलतीनेंच होत. यांच्या पलीकडची, तरीहि पण नित्य बैठकींतली, मंडळी म्हटली म्हणजे बाळासाहेब नातू आप्पाराव वैद्य वगैरे होत. टिळकांची व या मंडळींची धार्मिक मतेंच काय पण स्वभावहि फारसे जुळणारे नव्हते. तरी पण ज्या सैन्याच्या जोरावर टिळकांनीं हळू हळू लोकमत कबज्यांत आणलें त्यांतील ही पुढारी मंडळी असत. याशिवाय दत्तोपंत वेहेरे, विष्णुपंत दर्तक, भिकाजीपंत हर्डीकर वगैरे अनेक मंडळींचीहि बैठक त्यांचे घरीं पडत असे. त्यांतील कोणी बरोबरीचें नातें उसनें आणून तोंडाचा पट्टा सोडून दुसऱ्या कोणाशींहि भांड-ण्याला योग्य असे असत. कोणी नुसती पंची सोडून जेठा मारून टिळ-कांच्या मांडीला मांडी भिडवून, राजकारणांतील ओ का ठो न कळलें तरी स्वकीयांची वाहवा व इतरांची निंदा करून, बसल्या जागीं पक्षभेदाची चावडी गाजविणारे व पाहारा जागविणारे असत. कोणी अंगीं फारसें शहाणपण नसतांहि केवळ निःस्वार्थी बुद्धीनें पराकाष्ठेची अंगमेहनत करणारे असत. कोणी चतुर बोलके म्हणून, कोणी चतुर लेखक म्हणून, कोणी हरकामे म्हणून, कोणी विश्वासू म्हणून, कोणी धाडसी म्हणून, कोणी दुसऱ्याचे अंगावर फेंकण्यास योग्य म्हणून, कोणी निवळ संभावित पण आपल्या सहानुभूतीनें स्वपक्षाला भूषण किंवा बळकटी आणणारे म्हणून, कोणी कोर्टकचेरींत एखादें वेळीं काम धाम पडल्यास आयत्या वेळीं उपयोगी पडणारे म्हणून—तात्पर्य कोणाचा कांहीं तर कोणाचा कांहीं उपयोग म्हणून मनांत हेरून, व ज्याला त्याला ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें वागवून, टिळक आपला परिवार नेहमीं समृद्धच ठेवीत असत. याशिवाय अतीत—अभ्यागत, आर्त—गरजू, तर्डी-तापसी, हरिदास—भिक्षुक, विद्यार्थी-पोटार्थी अशा टिळकांकडे येणाऱ्या जाणारांची परंपरा जी पुढें अर्थात् अधिक फैलावली तिचा प्रारंभ १८९९ च्या पूर्वीपासूनच झाला होता. पण सर्वांशीं वागण्याची जवळ जवळ

एकच पद्धति टिळकांची असल्यामुळें प्रत्येकास ' टिळकांचें लक्ष आपणाकडेहि आहे बरें कां !" असें सहजच वाटत असे.

असो; १८९९ च्या फेब्रुवारींत प्रवासाहून पुण्यास परत आल्यावर टिळकांची प्रकृती बरीच सुधारल्यामुळें फिरून केसरींत लिहिण्यास सुरुवात करावी असें त्यांच्या मनांत सहजच आलें. मागें सांगितल्याप्रमाणें 'पूर्वी करीत आलेलें काम तसेंच फिरून चालूं' करण्याचें टिळकांनीं या सालच्या जानेवारींतच जाहीर केलें होतें; व ता. ४ जुलै १८९९ पर्यंत जरी त्यांनीं केसरीचें प्रत्यक्ष डिक्लेरेशन केलें नाहीं तरी मधून मधून लेख लिहिण्यास सुरुवात केली होती. टिळक व मद्रासची कांग्रेस, केसरी काळ व चँपियन यांचा वाद, नातूबंधूंची कैद, पुणें शहरावरील खुनी कटाचे आरोप, तारमास्तरांचा संप, व शिवाजी उत्सव वगैरे केसरींत आलेलीं कांहीं स्फुटें आणि एखादा अग्रलेखहि टिळकांनीं लिहिलेला होता. तसेंच ता. २१ फेब्रुवारी पासून ता. २८ मार्च पर्यंत कोंकणांतील खोतीच्या विषयावर जी एक पांचसहा अग्रलेखांची मालिका प्रसिद्ध झाली ती सर्व टिळकांच्याच लेखणींतून उतरलेली आहे. स्वतः टिळक हे आपल्या गांवचे खोत असल्याचें मागें पहिल्या भागांत सांगितलेंच आहे; व खोतीचें त्यांच्या हिश्याचें उत्पन्न जरी फारसें मोठें नव्हतें तरी खोतीचा अभिमान त्यांना फार होता. त्यांचे मित्र दाजीसाहेब खरे यांनीं कायदे-कौन्सिलांत या वेळीं या विषयावर बरीच झोड उठविली होती, आणि सर्वांत मोठें कारण म्हटलें म्हणजे खोतांच्या हक्कावर घाला घालणारें सरकारी बिल तत्वतः जुलमाचें असल्यामुळें निवळ सार्वजनिक दृष्टीनेंहि टिळकांचें लक्ष या प्रश्नाकडे तीव्रतेनें जाणें स्वाभाविकच होतें. पण या सार्वजनिक कळकळीला टिळकांचें खोती प्रश्नाचें सांगोपांग ज्ञान हेंच विशेष उपयोगी पडलें, व या विषया-वरील केसरींतील लेखमालेमुळें बिलांत योग्य त्या दुरुस्त्या केल्या पाहिजेत असें सरकारासहि वाटूं लागलें.

अखेर ता. ४ जुलै १८९९ पासून टिळकांनीं केसरी पुन्हां हातीं घेतला. १८९७ च्या सदतिसाव्या अंकापर्यंत केसरी टिळकांच्या नांवानें निघत होता. अडतिसाव्या अंकापासून टिळक यांचें नांव त्यांच्या शिक्षेमुळें केसरीवरून निघालें होतें, तें १८९९ च्या सत्ताविसाव्या अंकावर फिरून केसरीवर दिसूं लागलें. दर-म्यानचे केसरीचे ९१ अंक टिळकांच्या नांवाला अंतरले होते. टिळकांचें नांव पूर्वी संपादक म्हणून केसरीवर असतां त्यांत इतरांनीं लिहिलेल्या अग्रलेखांचीं अनेक उदाह-रणें सांपडतील; उलट टिळकांचें नांव केसरीवर नसतां त्यांनीं वाचकांना आपल्या अग्रलेखांचें गुप्तदान केल्याचींहि उदाहरणें तशींच अनेक सांपडतील. केसरींतील टिळकांच्या लेखांचा दुसरा व तिसरा खंड प्रसिद्ध होईल तेव्हां, वाचकांस या दुसऱ्या प्रकारच्या लेखांचीं उदाहरणें त्यांत विशेष पाहावयास मिळतील. असो; या ९१ आडवड्यांत, केसरीवर टिळकांचें नांव नसल्यानें, टिळक अद्यापि केसरींत

लिहित नाहींत अशी वाचकांची समजूत होऊन त्यांना चुकल्याचुकल्यासारखें वाटणें स्वाभाविक होतें. म्हणून ता० ४ जुलैच्या अंकावर फिरून त्यांचें नांव प्रकट झाल्याबरोबर वाचकांना किती आनंद झाला असेल याची कोणासहि सहज कल्पना करितां येईल. मात्र टिळक फिरून केसरी हातीं केव्हां घेणार हें आधीं केसरींत जाहीर झालेलें नसल्यामुळें, ता० ४ जुलैचा अंक वाचणारांचेहि लक्ष शेवटच्या नांवाकडे न जाण्याचा एरवीं संभव होता. पण या अंकांतील अग्रलेखांत स्वतः टिळकांनीं आपल्याविषयीं व इतरांविषयीं कांहीं व्यक्तिविषयक खुलासाचा मजकूर, थोडाबहुत खासगी स्वरूपाचाहि, लिहिलला होताच; शिवाय त्यांतील अग्रलेखाचा मथळाच इतका असामान्य होता कीं, तो वाचकांच्या नजरेंतून चुकून जाण्याचा संभव नव्हता. उद्गारचिन्हांकित "पुनश्च हरिः ॐ" हीं अक्षरें पाहतांच सामान्य वाचकानेंहि तेव्हांच तर्क केला असता कीं. 'हे पहा टिळक फिरून केसरीचे संपादक झाले!' या लेखाच्या मथळ्यांत टिळकांनीं वेदपारायण करणाऱ्या ब्राह्मणाप्रमाणें हरिः ॐ हे वैदिक शब्द योजले होते; पण पहिल्याच वाक्यांतील 'कर्मलोप' व 'स्वाध्यायास' सुरुवात हे शब्द पाहिले म्हणजे टिळक हे नेहमीं वैदिक भावना व परंपरा यांत कसे समरस होऊन गेलेले असत हें मार्मिक नजरेच्या मनुष्याच्या तेव्हांच लक्षांत येतें. प्रथम त्यांनीं आपणास हे दिवस दिसून पुन्हां केसरी हातांत घेतां आल्याबद्दल ईश्वराचे आभार मानले. तसेंच वैदिक ऋणत्रयाप्रमाणें लौकिक म्हणून एक चौथें ऋण मनानें निर्माण करून तें उदार भावनेनें फेडलें. हें लौकिक ऋण फेडणें म्हणजे केसरीवरील खटल्याचे वेळीं व त्यानंतरहि अनेक बाबतींत अनेक लोकांनीं द्रव्यद्वारा व इतर रीतीनें जी मदत केली त्याबद्दल लोकांचे जाहीर रीतीनें आभार मानणें हें होय. हें ऋण टिळकांना इतकें मोठें वाटलें कीं तें आमरणान्त सेवा करूनहि फिटणें नाहीं असें म्हणून, आपणास सोडविणारे जामीनदार, गैरहजेरींत आपली वर्तमानपत्रें चालविणारे मदतनीस, परप्रांतांतून सहानुभूतिपूर्वक मदत करणारीं वर्तमानपत्रें वगैरेंचे आभार त्यांनीं सगळ्यांत मनःपूर्वक मानले.

केसरीवरील खटल्यामुळें लोकांत पुष्कळ चळवळ व जागृती झाली, याचें श्रेय टिळकांनीं पुष्कळ अंशीं सरकारासच दिलें. आपण सरळ रुळलेल्या मार्गानेंच जात होतों; कर्तव्य म्हणून या मार्गानें जात असतां वाटेंत ठेंच लागली याचा दोष जसा आपणास लागत नाहीं, तसें ती ठेंच लागल्यामुळें आसपासच्या लोकांत जी जागृति झाली तिचें श्रेयहि टिळकांनीं आपणाकडे घेतलें नाहीं. केसरीचा कार्यक्रम जुनाच होता, पण सरकारानें मात्र आपलें धोरण बदललें म्हणूनच खळबळ झाली; त्या अर्थीं केसरी हें या जागृतीचें निमित्त कारण व सरकार हेंच खरें उत्पत्तिकारण अशा युक्तिवादानें टिळकांनीं जागृतीचें श्रेय सरकारच्या पदरीं उपरोधकभावनेनें बांधलें. संकट आलें तें पुण्यांतील सर्वांवरच आलें होतें

हें खरें. तरी पण त्यातस्त्यांत केसरीकागदबरोबर स्वतः केसरीही ल्यास जातो कीं काय अशी पुष्कळांना धास्ती वाटत असून ती यथार्थहि होती. राजद्रोह हा शब्द लहान पण त्याचा अर्थ भयंकर, व त्याचे परिणाम त्याहूनहि भयंकर. आणि हे सर्व परिणाम पूर्ण अनुभवावे लागते तर केसरी बुडालाच असता यात शंका नाहीं. पण तें न घडून आल्यानें श्रेय टिळकांनीं आपल्या मित्रमंडळींना देऊन 'धैर्यानें पुढें होऊन' केसरी जगवून पूर्ववत् चालविल्याबद्दल केळकर, खाडिलकर व मुंबईचे बातमीदार अनंत यांचे विशेष आभार मानले होते. त्यानंतर अमृतबझार, हिंदु, चॅंपियन या पत्रांचे संपादक, व प्रो. मॅक्समुल्लर वगैरे गृहस्थ यांचे आभार त्यांच्या निरपेक्ष मदतीबद्दल मानून 'थोर पुरुषांचा स्नेह असाच अनिमित्त व निरपेक्ष असतो' असें म्हणून भवभूतीच्या शब्दांनीं टिळकांनीं त्यांना गौरविलें होतें.

नंतर टिळकांनीं सिंहावलोकन करून बावीस महिन्यांचा आढावा घेऊन वातावरण अनेक तऱ्हेनें निवळल्याबद्दल पुण्याचें अभिनंदन केलें. पण कांहीं बाबतींत पिछेहाट झाली होती तिचाहि उल्लेख त्यांनीं स्पष्टपणें केला. मुद्रण स्वातंत्र्याची एकंदरीनें बरीच हानी झाली. खाजगी शाळा खात्यांतील शिक्षकांनाहि राजकीय चळवळींत पडण्याची मनाई झाली. पिनलकोड व प्रोसिजर यांच्या दुरुस्तीनें विशिष्ट वर्गांतील लोकांच्या मानेभोंवतालची दोरी अधिक आवळली गेली. पूर्वींच्या राजद्रोहाच्या कायद्याप्रमाण पाहतां खटला झालेले लेख खरोखरच राजद्रोहि नव्हते, पण सरकारानें केसरीचें निमित्त करून घाव घातला व आपला अनेक दिवसांचा हेतु तडीस नेला इतकेंच काय तें. ही गोष्ट कित्येक वर्तमानपत्रांचे बळी घेतल्याशिवायहि त्यांना करतां आली असती! केसरीला बेकायदेशीर अशी कोणतीच गोष्ट करावयाची नाहीं; व एरवींही कायदा बदलला असता तरी तो पाळण्याचा प्रयत्न केसरीनें केला असता. आम्ही काय करावें, काय न करावें हें सरकार अधिक स्पष्ट सांगेल तरी आम्हास हवें आहे, असें म्हणून मर्यादा संकुचित असल्यापेक्षांहि मर्यादा अनिश्चित आहे याचीच मुख्य तक्रार टिळकांनीं केली. मैदान बंद होऊन बटल्यावर उभ्या केलेल्या टेबलावर कसरत करावी लागली तरी ती करूं व तींतच यश मिळवूं असा टिळकांना आत्मविश्वास वाटत होता!

पुण्यांत दुफळी झाली नसती तर पुण्यावर असलें वादळ उठलेंहि नसतें अशी टिळकांची समजूत; म्हणून केसरीवरील खटल्याची अंशतः जबाबदारी त्यांना पुण्यांत नवीन निघालेल्या नेमस्त राजकारणी लोकांवर टाकली. 'यांतील कांहीं लोकांनीं कळत न कळत आगीन तेल ओतण्याचा प्रयत्न केला हे शत्रु गुप्त असतात. यांनीच केसरींतील लेख व पुण्यांतील खून यांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केला' असा त्यांना टिळकांनीं दोष दिला. पण पुढें प्लेगचा जुलूम हाच खुनाचें कारण, असें सर्वांना कळून आल्याबद्दल समाधान व्यक्त केलें. पुण्यांत दोन पक्ष असले तरी त्यांतील कोणासहि इंग्रजांचें राज्य आज उलथून पाडाव-

यांत नाहीं व पाश्चात्यहि नाहीं. कोणी स्वतःला नेमस्त म्हणवून घेतलें म्हणून कांहीं तो नेमस्त ठरत नाहीं, किंवा कोणाला जहाल म्हटल्यानें तो जहालहि होत नाहीं. उभयतांना एकमेकास मोर–लांडोर म्हटलें तरी सरकारच्या गरुड दोघानांहि मानगुटीस धरूं शकेल. कायद्याची मर्यादा सगळ्यांनाच पाळावयाची असते. पण तींतून मिळणारी मोकळीक कितपत उपयोगांत आणावयाची यासंबंधानेंच काय तो मतभेद असतो. आहे ती स्थिति बरी म्हणण्याकडे नेमस्तांची प्रवृत्ति; पण ती समाधानकारक नाहीं असेंच केसरी म्हणणार. अशा स्थितीतहि दोघांनीं मिळून करण्यासारखें कार्य पुष्कळ असतें व तेवढें त्यांनीं केलें तरी पुष्कळच हित होईल.' अशा प्रकारचा युक्तिवाद टिळकांनीं या लेखांत केला होता.

या एकाच लेखानें टिळकांविषयीं प्रेम वाटणाऱ्या लोकांची त्यांच्या तुरुंगांतील गैरहजेरीची आठवण पार नाहींशी होऊन, ते वाढत्या अभिमानानें टिळकांकडे पाहूं लागले. टिळकांवरील खटल्यामुळें वर्गणीदारांच्या उदार आश्रयाच्या दृष्टीनें केसरीला खाडा न पडतां तें पुढेंच पडत चाललें होतें, यामुळें टिळक तुरुंगांत असतांना केसरीची जी सांपत्तिक स्थिति होती ती थोडीशी सुधारली. प्लेगमुळें लॉ क्लास चार पांच महिने बंद राहूं लागला. प्लेगची मृत्युसंख्या पुण्यास रोज २०० पर्यंत जाऊं लागली यामुळें त्यांनीं हळूहळू आपला लॉ क्लास बंद केला, व त्याकडे रोज खर्च होणारे दोन अडीच तास, म्हणजे एका अर्थानें दिवसाची कामाची निम्मी वेळ, केसरीकडे व इतर सार्वजनिक कार्याकडे टिळकांना अधिक देतां येऊं लागली. उलट-पक्षीं टिळकांनीं 'पुनश्च हरिःॐ' असा उच्चार करून कर्मयोगारूढ होण्याकरितां आसन ठोकलें, व या पहिल्याच लेखांत प्रतिपक्षावर कडक टीका केली, हें पाहून हे प्रतिपक्षीहि टिळकांशीं वाद करण्याला कंबर कसून पुढे झाले. मात्र या उभय-तांतल्या वादांचें पूर्वीचें सामाजिक स्वरूप बरेंचसें जाऊन त्यांना राजकीय स्वरूपच अधिकाधिक प्राप्त झालें. ज्या मानानें टिळकांची कीर्ति पुण्याबाहेर पसरली त्या मानानें निवळ स्थानिक अशा वादांत त्यांचें लक्ष यापुढें कमी गुंतूं लागलें. स्थानिक स्थानिकविषयक वाद अगदींच संपले होते असें नाहीं; गोखले व टिळक जोपर्यंत पुण्यांत राहून आपापलें कार्य फैलावित होते तोंपर्यंत त्यांच्यांतील वाद संपणें शक्यच नव्हतें. तथापि खऱ्या राष्ट्रीय म्हणजे सर्व प्रांतीय चळवळीला या १८९९ सालापासूनच प्रारंभ झाला. कारण साम्राज्यवादी आक्रमता-खोर उन्मत्त दीलाचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन हे हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल होऊन दाखल झाले होते. यामुळें राजकीय चळवळीचा एक भाग, म्हणजे स्थानिक व प्रांतिक भाग, बऱ्याच अंशानें मागें पडून टिळकांच्या चळवळीच्या दुसऱ्या म्हणजे सार्वदेशीय भागास येऊन पुढें सुरुवात झाली. टिळक तुरुंगांत असतांना खऱ्या किंवा दिखाऊ सहानुभूतीची जी मळमळी त्यांच्या प्रतिपक्षीयांच्या तोंडाला पडली होती ती त्यांच्या सुटकेमुळें निघून जाऊन, शब्दाला शब्द भिडवून तोंडच्या

करण्यास ते आतां तयार झाले. यामुळें पूर्वी परप्रांतांतून टिळकांवर जी टीका होत नसे तीही आतां होऊं लागली. विस्तृत कार्यक्षेत्राप्रमाणें वादक्षेत्राहि विस्तृत झालें. टिळकांच्या खऱ्या कारकीर्दीला व त्यांनीं मरेपर्यंत चालविलेल्या द्विदशवार्षिक युद्धाला येथूनच पुढें सुरुवात झाली. तो वृत्तांत या पहिल्या चरित्रखंडांत वर्णन केलेल्या वृत्तांताहून अधिकच सरस व उदात्त असा आहे. तथापि स्वतः आमच्या आणि वाचकांच्याहि सोयीच्या दृष्टीनें पाहतां, लो. टिळकांच्या चरित्राचा, आधींच अदमासाबाहेर वाढलेला, हा प्रथम खंड टिळकांच्या या 'पुनश्च हरि ॐ' च्या प्रणव घोषांतच संपविला पाहिजे. म्हणून येथेंच थांबून, आज आठ महिने सतत पण हौसेनें परिश्रम पावलेल्या या लेखणीला कांहीं दिवस विश्रांति देऊं.

प्रथम खंड समाप्त.